मा १३२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(जिल्हा वाचनालय)

मासिकाचे नांव —

संपादक —

मासिक क्रमांक — सन —

अंक —

(महिने)


खंड ६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. जुनी मासिके (संदर्भ)

मुमुक्षु वर्ष १० न
संप. १२५/१०

॥ श्री रुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेचि काळें। संसारीं होईजे निराळे।
मोक्ष पाविजे निश्चळें। स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| जुने वर्ष २४ वें | पौष १८५१ | नवें वर्ष १० वें |
| मास ४ था | जानेवारी १९३० | अंक १ ला |


संपादक व प्रकाशक,


लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मुमुक्षुकचेरी, बुधवारपेठ, पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही. पी. नें रु. ३/३

मुद्रकः—लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव, घ. नं. ३००
येथें आपल्या "हनुमान" छापखान्यांत छापिलें.

| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| १ मंगलाचरण | १ |
| २ मुरली ( कविता ) | २ |
| ३ ज्ञानेश्वरांचा ज्ञानयोग | ३ ते ६ |
| ४ ब्रह्मीभूत वासुदेवबुवा धामणीकर | ७ ते १८ |
| ५ श्रीसद्गुरुस्तवन ( कविता ) | १९ व २० |
| ६ आचार्यकृत षट्पदी | २१ व २२ |
| ७ भगवच्छरणस्तोत्रम् | २३ व २४ |
| ८ भागवतधर्ममीमांसा | २५ ते ४० |



नवीन आवृत्ति दुसरी

# सार्थ श्रीदासबोध

श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या दासबोध ग्रंथाची योग्यता लोकविश्रुत आहे. परमार्थ, प्रपंच व राजकारण यांची सांगड घालून ज्या महापुरुषानें महाराष्ट्राचा सर्व प्रकारें उद्धार केला त्याची ही दिव्यवाणी आहे. दासबोध ग्रंथ समजण्यास बिकट आहे म्हणून तो सर्वांस कळण्यास साह्य व्हावें या हेतूनें रा. पांगारकर यांनीं दासबोधाची प्रत शुद्ध करून त्याचें मराठी सुबोध भाषांतरहि केलें आहे. प्रत्येक पृष्ठावर **वर मूळ व खालीं सरळ भाषांतर** असा हा ग्रंथ तयार आहे. डोमगांवची कल्याणस्वामींची प्रत धुळेकरांनीं प्रसिद्ध केलीच आहे. कल्याणस्वामींचे बंधु शिरगांवमठाचे अधिकारी दत्तात्रयस्वामी यांच्या हातची शके १६०६ च्या भाद्रपदमासांत लिहून तयार झालेली प्रत ग्वाल्हेरीस जाऊन अक्षरशः तपासून घेऊन व दोनहि प्रतींचा मेळ पाहून रा. पांगारकर यांनीं ही प्रत तयार केली आहे. ग्रंथाच्या प्रस्तावनेंत त्यांनीं दोनहि प्रतींचा मेळ घातला आहे, व १'५० ठळक पाठभेद व ५० लेखनभेद दिले आहेत. पृ. सं. ७५०. सुंदर सोनेरी बाइंडिंग. किंमत ४ रु. व्ही. पी. नें ४॥०.

पत्ताः—व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें शहर.

मुमुक्षु मासिक
वष १० वें

# मंगलाचरण

जानेवारी १९३०
अंक १ ला



ॐ नमो सद्गुरु तूं ज्योतिषी । एकात्मतेचें घटित पाहसी ।
चिद्ब्रह्मेंसी लग्न लाविसी । ॐ पुण्येमीं तत्त्वता ।। १ ।।
वधूवरा लग्न लाविती । हें देखिलें असे बहुतीं ।
आपुली आपणा लग्नप्राप्ती । हे अलक्ष्य गती गुरुराया ।। २ ।।
चहू पुरुषार्थांचें तेलवण । लाडू वाइले संपूर्ण ।
अहंभावाचें निंबलोण । केलें जाण सर्वस्वें ।। ३ ।।
साधनचतुष्टयाचा सम्यक । यथोक्त देऊनि मधुपर्क ।
जीवभावाची मूद देख । एकाएक सांडविली ।। ४ ।।
विषयसुख मागें सांडे । तोचि पायांतळीं पायमांडे ।
सावधान म्हणसी दोहींकडे । वचन धडफुडें तें तुझें ।। ५ ।।
व्यवधानाचें विधान तुटे । सहजभावें अंत्रपट फिटे ।
शब्द उपरमोनि खुंटे । मुहूर्त गोमटे पैं तुझे ।। ६ ।।
अर्धमात्रा समदृष्टी । निजबिंबीं पडे गांठी ।
ऐक्यभावाच्या मीनल्या मुष्टी । लग्नकसवटी अनुपम ।। ७ ।।
तेथ काळा ना धवळा । गोरा ना सावळा ।
नोवरा लक्षेना डोळां । लग्नसोहळा ते ठायीं ।। ८ ।।
परी नवल कैसें कवतिक । दुजेनवीण एकाएक ।
एकपणीं लग्न देख । लावितां तूं निःशेख गुरुराया ।। ९ ।।
तुज गुरुत्वें नमूं जातां । माझें मीपण गेलें तत्त्वता ।
ऐसें करूनियां गुरुनाथा । ग्रंथकथा करविसी ।। १० ।।

—एकनाथी भागवत अ. ८

# मुरली

[ कवि:—रा. ब. खाडिलकर वकील, नाशिक. ]

गोपाल कृष्ण भगवान् । वाजवी मुरली ॥
श्यामकांत पीतांबरधारी ।
मुकुट शिरावरि वेणू अधरीं ।
ये रे यमुनातीरविहारी ।
सखया वनमाली । वाजवी मुरली ॥ १ ॥
वेणूचा रव पडतां श्रवणीं ।
पशुपक्ष्यादिक आले धांवुनी ।
नरनारीजन धंदा त्यजुनी ।
ऐकाया जमली । वाजवी मुरली ॥ २ ॥
मुरलि मनोहर साच मुरारी ।
अविट सुखा देई कंसारी ।
वानुं मुखें किती देवा थोरी ।
वाणी ही विरली । वाजवी मुरली ॥ ३ ॥
वेणुरव या देह—गृहांचा
पडला विसर सकलां साचा ।
आला हरि रे पुर प्रेमाचा ।
मति माझा मुरली । वाजवी मुरली ॥ ४ ॥
त्यजनि समाधी योगी आले ।
हरि—वेणूनें वेडावियलें ।
सगुण—सांवळ्या रूपीं रमले ।
अंतरिं ही भरली । वाजवी मुरली ॥ ५ ॥
तव माधुरिनें मति मोहियली ।
तुज भेटाया उत्सुक झाली ।
जणु प्रेमजलीं लहरी रतली ।
हृदय—कळी खुलली । वाजवी मुरली ॥ ६ ।
नंद—नंदना राजिवनयना ।
करि मुरलीच्या मंजुळ गाना ।
अर्पितसे पदिं जीवा प्राणा ।
आस मनीं उरली । वाजवी मुरली ॥ ७ ॥

# ज्ञानेश्वरांचा ज्ञानयोग

२३. असें हें ज्ञान तर अमूर्त आहे, त्याची ओळख पटायची कशी? तें ज्ञान ज्या शरीरांत प्रवेश करतें त्याच्या ( ज्ञान्याच्या ) इंद्रियांच्या व्यापारांत व डोळ्यांतहि प्रत्यक्ष दिसतें. ज्ञानी हेंच मूर्तिमंत ज्ञान. ज्ञानाचें सगुण रूप म्हणजे ज्ञानी. ज्ञान्याच्या इंद्रियांवर, त्याच्या मुखावर, त्याच्या आचारविचारांवर, त्याच्या सर्व मूर्तीवर ज्ञानाचीं चिन्हें स्पष्ट दिसतात —

पैं वसंताचें रिगवणें । झाडांचेनि साजेपणें ( प्रफुल्लितपणामुळें )
जाणिजे– तेविं करणें ( इंद्रियें ) । सांगती ज्ञान ॥ १७९ ॥
अगा वृक्षामी पाताळीं । जळ सांपडे मूळीं ।
तें शाखांचिये वाहाळीं ( विस्तारांत ) । वरीहि दिसे ॥ १८० ॥
नातरी केळी कापुर जाला । तेविं परिमळें जाणों आला ।
कां भिंगारीं दीप ठेविला । बाहेरि फांके ! ॥ १८३ ॥
तैसें हृदयीचेनि ज्ञानें । जिये देहीं उमटती चिन्हें ॥ अ. १३

वसंतऋतूच्या प्रवेशाबरोबर वृक्षलतांना टवटवी येते त्याप्रपाणें अंतरींचा ज्ञानप्रकाश इंद्रियांच्या द्वारें प्रगट दिसतो. वृक्षांना पाताळांत उदकाची भेट झाली कीं, त्या खालच्या ओलीमुळें वर आणि विस्तारांतहि ती स्पष्ट दिसते. केळीच्या गर्भांतून उपजलेला कापूर सुगंधामुळें कळून येतो. त्याप्रमाणें हृदयांत ज्ञानोदय झाला कीं, त्याचीं चिन्हें देहांवर उमटतात. हीं चिन्हें किंवा ज्ञानाचीं लक्षणें गीतेंतच अठरा सांगितलीं आहेत. अमानित्व, अदंभित्व, अहिंसा, क्षांति, आर्जव, गुरुभक्ति, शुचित्व, स्थैर्य, इंद्रियनिग्रह, वैराग्य, अनहंकार, जन्मजरादि स्मरण, अनासक्ति, समचित्तता, अव्यभिचारी भक्ति, एकांतवासाची आवड, अध्यात्मज्ञाननिष्ठा व तत्त्वज्ञानार्थदर्शन हीं ज्ञान्याचीं १८ लक्षणें आहेत. त्या लक्षणांची आपण ओळखण करून घेऊं.

२४. **ज्ञानी**— हा आत्मसंतुष्ट असतो. त्याला मानसन्मानाची चाड नसते, किंबहुना कंटाळा असतो. त्याच्या अंगच्या गुणांचे कोणी गौरव करूं लागला तर ' व्याधें रुंधला मृग जैसा ' तसा तो गजबजून जातो. ' पूज्यता डोळां न देखावी । स्वकीर्ती कानीं नायकावी ' ही त्याची आवड. ' माझें असतेपण लोपो । नामरूप हारपो ' असा त्याचा नवस. स्वधर्माचरणांत तर चुकत नाहीं, पण दंभाचा त्याला तिटकारा असतो. ' वरिवरी देह न पूजी । लोकांतें न रंजी । स्वधर्म वाग्ध्वजीं । बांधों नेणे ॥ २०८ ॥ परोपकार न बोले । न मिरवी अभ्या-

सिलें । न शके विकू जोडलें । रतीसाठीं ॥ २०९ ॥' काया, वाचा, मन, हस्त, पाद, चक्षु, यापैकीं कशानेंहि तो कोणत्याहि प्राण्याची हिंसा करीत नाहीं. अहिंसा हा त्याचा धर्मच बनतो. त्याचें चालणें, बोलणें, करणें सर्व कांहीं असें असतें कीं, त्यापासून कोणाहि जीवाला त्रास होत नाहीं. ' जीवांतळीं आंथरित आपुला जीव ' तो चालत असतो. कृमिकीटकानाहि तो भिववीत नाहीं. ' मुख मोहाचें माहेर ' असें त्याचें बोलणें मधुर असतें. 'पुढां स्नेह पाझरे । माघां चालती अक्षरें । शब्द पाठीं अवतरे । कृपा आधीं ॥ २६३ ॥ शब्द कोणालाहि खुपूं नये, कोणाच्या वर्माला स्पर्श होऊं नये म्हणून तो सहसा बोलतच नाहीं, क्वचित् आग्रहास्तव बोललाच तर मायबाप लेंकराशीं बोलतात तसा तो सप्रेमभरित बोलतो. ' साच आणि मवाळ । मितले आणि रसाळ । शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ॥ २७० ॥' प्राणिमात्रांकडे तो कूर्मदृष्टीनें पाहतो. ' पशुपक्ष्यां दावावी त्रासमुद्रा ' हें त्याच्या ठायीं नसतें. ' लीलाकमळें खेळणें । कां पुष्पमाला झेलणें ' असे त्याच्या हाताचे व्यापार सौम्य असतात. आर्ताच्या अंगावरून त्याचे हात फिरले तर ते त्याला मलयानिळाप्रमाणें सुखकर वाटतात. आर्ताला अभय देण्यापुरतेच त्याचे हात वर होत असतात ! मनांत अहिंसेचें तत्त्व पूर्ण बाणलें असल्यामुळें त्याच्या बाह्येंद्रियांना तेंच वळण लागतें. ' आवडे ते वृत्ति किरीटी । आधीं मनौनीच उठी । मग ते वाचे दिठी । करांसी ये ॥२९९॥' कोणतीहि वृत्ति आधीं मनांत उठते व मग ती वाणीत दृष्टींत व हस्तपादादिकांत येते ! फुलांत परिमळ तयार झाला कीं तो बाहेर फांकतो ! मनांतलें दयालुत्व हातापायांत प्रगट होतें.

ज्ञानी पुरुष सर्वांशीं वागतांना अत्यंत सदय व कोमल असतो पण स्वतःपुरता अत्यंत सहिष्णु असतो. त्रिविध ताप अंगावर येऊन कोसळले तरी तो चल होत नाहीं. ' जो मानापमानातें साहे । सुख दुःख जेथें सामाये । निंदास्तुति नोहे । दुखंड जो ॥ ३४६ ॥ घेऊनि जळाचे लोट । आलिया नदीनदांचे संघाट । करी वाड पोट । समुद्र जेवीं ॥ ३५० ॥ तैसें जयाचिया ठायीं । न साहणें कांहींचि नाहीं । आणि साहतसे ऐसें ही । स्मरण नुरे ! ॥ ३५१ ॥ ' स्वशरीराला जें प्राप्त होईल तें सहन करणें, त्यांत मिळून जाणें, ' उन्हाळेनि न तापे । हिमवंतीं न कांपे ' अशीं सर्व द्वंद्वें सहन करणें, व सहन करितो हेंहि मनांत न येणें ह्या लक्षणांनीं ज्ञानी संपन्न असतो. जगाशीं जुनाट स्नेह असल्याप्रमाणें तो आबालवृद्धांशीं अगदीं निष्कपट व सरळ वागतो. ' माणसाप्रति आन आन– ' भिन्नपणानें त्याला वागतां येत नाहीं ! ' वारियाची धांव । तैसे सरळ भाव । शंका आणि हांव । नाहीं जया ॥ ३६० ॥ दिठी नोहे मिणधी । बोलणें नाहीं संदिग्धीं । कवणेसीं हीन बुद्धी । राहाटों नेणें ॥ ३६५॥ दाहाहि इंद्रियें प्रांजळें ।

निष्प्रपंचें निर्मळें । पांचहि पालव ( प्राण ) मोकळे । आठहि पाहर ॥ ३६६ ॥ अमृताची धार । तैसें जयाचें अंतर...' अशा प्रकारच्या वागण्यानें अंतरशुद्धि झालेला पुरुष आपल्या ज्ञानदात्या श्रीगुरुविषयीं अत्यंत कृतज्ञ, सप्रेमभरित असतो. हीं ज्ञानलक्षणांचीं लेणीं आपल्या अंगावर ज्या गुरुमाउलीनें घातलीं तिच्या सेवेंत कृतार्थता वाटणें हें साहजिक आहे. मूर्तिमंत ज्ञान सगुणरूपानें प्रत्यक्षतेला आलेलें ह्मणजे श्रीगुरुस्वरूप होय. 'यथा देवे तथा गुरौ' या न्यायानें नवविधाभक्तीनें ज्ञानी श्रीगुरूची उपासना करितो. ' बाहेरी कर्में क्षाळिला । भीतरीं ज्ञानें उजळला ' स्वधर्मकर्मानीं बाहेर व ज्ञानानें आंत असा ज्ञानी हा अंतर्बाह्य शुचि ह्मणजे सोंवळा असतो. त्याच्या अंतरांत ' स्फटिकगृहीच डोलत । दीप जैसे ' तैसे सद्भाव नित्य खेळत असतात, विकल्प त्याला स्पर्शत नाहींत. प्रारब्धानुसार त्याचा देह संसारांत कोठेंहि कसाहि वावरत असला तरी त्याची आत्मस्थिति ढळत नाहीं—' देह तरी वरिचिलीकडे । आपुलियापरी हिंडे । परि बैसका न मोडे । मानसीची ' ॥ ४८६ ॥ जातया अभ्रासवें । जैसें आकाश न धांवे । भ्रमणचक्रीं न भवे । ध्रुव जैसा ॥ ४८९ ॥ '

याप्रमाणे त्याचा आत्मनिश्चय दृढ असला तरी इंद्रियनिग्रहाविषयीं तो नेहमीं तत्पर असतो. वीर आपल्या हत्याराला विसंबत नाहीं—' अर्जुना जो यापरी । अंतःकरण जतन करी । नेदी उभें ठाकों द्वारीं । इंद्रियांच्या ॥ ५०४ ॥ ' तो इंद्रियें विषयांच्या आहारीं जाऊं देत नाहीं, ' वमिलिया अन्ना । लाळ न घोंटी जेवि रसना ' तसा तो विषय मनांतून टाकून देतो. ' नाराचांचीं (बाणांचीं) आंथरुणें । पूयपंकीं लोळणें । तैसें लेखी भोगणें । ऐहिकींचें ॥ ५२१ ॥' हें विषय वैराग्य आत्मलाभाचें भाग्य असून यानें जीव ब्रह्मानंद भोगण्यास अधिकारी होतो. ज्ञानी याप्रमाणें अंतरापासून विरक्त असून प्राप्तकर्में सर्व यथायोग्य करतो, मात्र संसाराचें मिथ्यात्व जाणून निरहंकारपणें तीं करितो. तो फार सावध असतो. ' जन्ममृत्युजरादुःखें । व्याधिवार्धक्य कलुषें । तियें आंगा न येतां देखे । दुरूनि जो ' ॥ ५३६ ॥ व या सर्वांवर रामबाण ह्मणून 'चिंतूनि ठेवी चोखडें । आत्मज्ञान.' संसारांत वाटसरूसारखा अलिप्त वागतो. ' वृक्षाची साउली । वाटे जातां मीनली । घरावरी तेतुली । आस्था नाहीं ॥ ५९५ ॥ स्त्रीचें लोलुप्य नाहीं, मुलें बाळें वाटसरू आहेत हें जाणून वागतो. ' दारागृहपुत्रीं । जया नाहीं मैत्री । तो जाण पां धात्री । ज्ञानासी गा ॥ ६०० ॥' त्याचें चित्त शरीरवाचामनें भगवत्प्रेमानें भरलेलें असल्यामुळें त्याच्या चित्तांत भगवंतावांचून दुसरें कांहीं नसतें. ' मिळोनि मिळतचि असे । समुद्रीं गंगाजळ जैसें । मी होऊन मज तैसें । सर्वस्वें भजती ॥ ६०८ ॥ ' याप्रमाणें मी होऊन तो मला भजतो. याप्रमाणें जो देव होऊन देवाला अद्वयत्वें भजतो तो ज्ञानी. त्याला

एकांत आवडतो, समुदायाचा कंटाळा असतो. भवस्वर्गादि ज्ञान तें खरें ज्ञान नव्हे, तर परमात्मवस्तु ज्या ज्ञानास्तव दिसते तें ज्ञान, हें जाणून तो अध्यात्मज्ञानीं सद्भावाची बुडी देतो. आत्मदर्शनाला ' ज्ञान जेतुलें दावी । तेतुली वस्तुचि आघवी । तें देखें ऐसी व्हावी । बुद्धि चोख ' ॥ ६२९ ॥. ज्ञानाच्या प्रकाशानें परतत्त्वीं दृष्टि पोंचणें, आत्मनिश्चय होणें, सर्वत्र आत्मभावानें पाहणें, हें ज्ञानाचें सर्वस्व आहे. ' करतळावरी वाटोळा । डोलत देखिजे आवळा ' तसें हें ज्ञान प्रत्यक्ष दाखविलें आहे.

—अ. १३ ओंवी १८४ ते ६५२

---


# मोरोपंत-चरित्र

आणि

# काव्यविवेचन.

ग्रंथकार—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मोरोपंतांच्या चरित्रावर व काव्यविवेचनावर यांत २१ प्रकरणें असून हा ग्रंथ विद्वन्मान्य आहे. जगाच्या वाङ्मयांत पहिल्या दुसऱ्या प्रतीचे जे विरल ग्रंथ आहेत त्यांत याची गणना कै० इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं केली आहे. आठ वर्षें पंतांच्या कवितेचा शोधपूर्वक अभ्यास करून व पंतांची हस्तलिखित कविता पाहून व त्यांचीं अस्सल पत्रें मिळवून हा ग्रंथ तयार केला आहे. प्रति थोडया शिल्लक आहेत. पृ. सं. ६१५ किं. रु. २॥८.

श्रीसद्गुरवेनमः

# ब्रह्मीभूत श्रीवासुदेवस्वामी धामणीकर

( लेखक—गोविंदसुत )

**तैसें हारपलें आपण पें पावे । तें संतांतें पाहातां गिवसावें ।**
**म्हणोनि वानावे ऐकावे । तेचि सदा ॥ ४०० ॥** ( श्रीज्ञाने. अ. १८ )

## प्रस्तावना

१. कर्मवशात् पवित्र अशा भरतकुलांत सुदैवानें ज्याला यथासांग नरदेह-रूप कल्पवृक्ष प्राप्त झाला आहे, त्याचें आद्य व अवश्य कर्तव्य हें आहे कीं, त्यानें सनातन धर्मांतर्गत अध्यात्मपरंपरेनें जाऊन अक्षय्य सुखदायी असा पर-मात्मलाभ करून घ्यावा. आणि तेणेंकरून जन्ममरण, सुखदुःखात्मक आधि-व्याधियुक्त अशा या भवभ्रांतींतून मुक्त व्हावें. ही सुसंधि केवळ भरतभूमि आणि तींतील नरदेह यांवांचून इतर देशांत व देहांत नाहीं. कारण, भरत-भूमीवांचून इतर भूमि ही भोगभूमि आणि नरदेहावांचून इतर योनि ह्या भोग-योनि आहेत. या इतर भूमि आणि योनि यांच्यापुढें ध्येय काय आहे, याचा विचार केला तर असें दिसून येईल कीं, "आकंठ आहार, यथेच्छ विहार, निद्रा, भय, मैथुन, अतएव खाना, पीना, सुखसें सोना, चैन करना, और एक दिन निकल जाना" ! अशा प्रकारें "शयनं च मे सुखं च मे" शिवाय दुसरें ध्येयच नाहीं. "भोजन ते भक्ति । मरण ते मुक्ति" ! मोक्षदायक परमात्मतत्त्वाची त्यांना अद्याप कल्पनाच नाहीं. भरतभूमि आणि तींत निर्माण झालेला नरदेहही कर्मभूमि आहे. भोगभूमि नव्हे. ह्या धर्मक्षेत्र, कुरुक्षेत्र अशा कर्मभूमीमध्यें कर्मानें मोक्ष होतो. "**कर्मणैवहि संसिद्धिम्**" म्हणून आपल्या पूर्वज ऋषींनीं आध्यात्मिक मोक्ष हें ध्येय पुढें ठेवलें आणि तत्सिद्ध्यर्थ आपल्या यच्चयावत् कर्मांचा, धर्मांचा, प्रपंचाचा, आचारांचा, विचारांचा, परंपरेचा, संस्कृतीचा, चालीरीतींचा सर्व ओघ "**ज्ञाने परिसमाप्यते**" अशा रीतीनें आध्यात्ममार्गा-कडे मोठ्या चतुराईनें वळविला आहे. हे ऋषींचे आपल्यावर महत् उपकार होत. जो आचार, विचार, जी चालरीत, सुधारणा मनुष्याला केवळ विषया-सक्त करून पशु बनवील व अध्यात्मविचाराला पराङ्मुख करील तिचा त्याग झाला पाहिजे, अशा प्रकारची समाजाला शासनपद्धति गहावी म्हणून ऋषींनीं शास्त्रें निर्माण केलीं. आणि "**यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ।**

**न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम्**" असें सांगून भगवंतांनीं **तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ** " अशी भगवद्गीतेच्या सोळाव्या अध्यायाच्या शेवटीं अर्जुनाच्या निमित्तानें मोक्षगामी सर्व भरतपुत्रांना मोठया कळकळीची आज्ञा केली आहे. " **तैसा अशेषांहि पुरुषार्थां । जो गोसावी हों म्हणे पार्था । तेणें श्रुति स्मृती माथां । वैसणें घापे**" अशा परम श्रेष्ठ परंपरेच्या मार्गानें प्रपंच व परमार्थ दोन्ही यथार्थ चालवून ज्यांनीं परमात्मलाभ करून घेतला, व इतर मुमुक्षूंनाहि तो मार्ग परंपरेनें लावून दिला, तेच पुरुष धन्य, त्यांनींच नरदेहाचें खरें सार्थक केलें. म्हणून तेच खरे संत व श्रेष्ठ होत. " **यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः । सयत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते** " म्हणून अशा सत्पुरुषचीं आचारविचारात्मक शुचिर्भूत, वळणदार चरित्रें मुमुक्षुंनीं पुढें ठेवुन सदाचरणानें कित्याप्रमाणें तीं गिरवली पाहिजेत. परमात्मलाभाकरितां संताचा शोध करून त्यांचींच चरित्रें वर्णावीं, ऐकावीं म्हणून श्रीज्ञानोबा सांगतात, त्याचें कारण हेंच होय. " **आत्मज्ञानें चोखडीं । संत जे माझीं रूपडीं । तेथ दृष्टि पडो आवडी । कामिनी जैशी** ". आपले चरित्रनायक श्रीवासुदेवस्वामी धामणीकर हे अशा प्रकारचे आत्मज्ञानी पुरुष होऊन गेले. ते नुकतेच समाधिस्थ झाले. त्यांचें अल्पसें पुण्यचरित्र यथामति मुमुक्षुवाचकांपुढं मी ठेवीत आहें.

२. अध्यात्मपरंपरेनें सदसद्विचार करून जो सद्रूप झाला, तोच संत किंवा सिद्ध पुरुष होय. " **सिद्ध स्वरूपीच साजे** ". पण आजकाल अध्यात्मपरंपरेचें महत्त्व या पुण्यभूमींतून अजीबात नष्ट झालें, आणि आधिभौतिक नश्वर सुखाची लालसा राष्ट्रांत वाढली, म्हणून विषयसुख हीच नरजन्माची इतिकर्तव्यता होऊन बसली. " **विषय तो त्यांचा झाला नारायण** " ! म्हणजे विषय हाच नारायण होऊन राहिला ! यामुळें अंतःकरणांतून ब्रह्मानंद, आत्मानंद, निजानंद यांचा ओलावा, जिव्हाळा अजीबा नष्ट होऊन तेथें विषयानंदानें तळ दिला. म्हणून विषयांचा भोक्ता देहोहम् तोच आत्मा आणि विषयानंद हाच आत्मानंद होऊन बसला. याच्यापुढें आध्यात्मिक अक्षय्य सुख म्हणून कांहीं आहे, याची कल्पनाच नाहींशी झाली. इतकी भूल आपल्या लोकांना पडली आहे ! " **परी देहाहंमान भुली । जयाची बुद्धि देहींच आतली । तया आत्मविषयीं जाहाली । मध्यरात्री गा ॥८॥ जेणें चैतन्या ईश्वरा ब्रह्मा । देहाचि केलें परम सीमा** " ! अशा रीतीनें देहच आत्मा हा निश्चय बनल्यावर मग काय विचारतां ! " **जे देहचि आपणपें मानिती । आणि विषयातें भोग्य म्हणती । या परतें न स्मरती । आणीक कांहीं** ". यामुळें आत्मा स्वयंसिद्ध व स्वतंत्र, त्याप्रमाणें देहहि स्वयंमन्य व स्वतंत्र करणें हीच नर-

जन्माची इतिकर्तव्यता ठरली ! " **जे प्राणांयां कामीं भर । देहाचि वरी आदर । म्हणूनि पडला विसर । आत्मबोधाचा ·** " अर्थात् आपण कोण आहोंत याचा विचार करण्याचा मार्गच खुंटला. आणि मतस्वातंत्र्य, व्यक्ति-स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य व समता या चतुःसूत्रीच्या पायावर सामाजिक, धार्मिक, राजकीय, औद्योगिक इत्यादि आधिभौतिक सुधारणांनीं आधिभौतिक देहाला व देशाला स्वराज्य व स्वातंत्र्य मिळवून देणें, हें एकच ध्येय आजकालच्या लोकां-पुढें उभें आहे. आणि " **जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टवीती उपकारें** " या संतवाक्याचा आधार घेऊन जो जगाचें, राष्ट्राचें, समाजाचें, व्यक्तीचें आधिभौतिक कल्याण करण्यांत आपलें बुद्धिसर्वस्व व देह खर्ची घालण्याला जिवावर उदार होईल तो संत, अशी आजकाल संत शब्दाची व्याख्या पाश्चिमात्य पद्धतीवर प्रचलित झालेली आहे ! पाश्चिमात्यांना आध्यात्मिक सुखाची कल्पनाच नाहीं. पण त्यांच्याबरोबर आमचे लोकहि आंधळे झाले व संस्कृतीपासून च्युत झाले !

वरील व्याख्येनुसार आजकाल बुद्धि व देह देशाकरतां खर्ची घालणारे पुष्कळ देशभक्त, देशसेवक, देशोद्धारक, सुधारक, समाजधुरीण, महात्मे, समाजनेते इत्यादि पुरुष संत म्हणून मिरवले जाऊन आपल्या मिरवणुकी काढून घेत आहेत. केवळ देशासाठीं देह व बुद्धि खर्ची घालणारे हे धीर, वीर, शूर, विद्वान् पुरुष इहलौकिकदृष्ट्या संत आहेत, त्यांचीं धाडसाचीं, स्वार्थत्यागाचीं, बुद्धिमत्तेचीं हीं आधिभौतिक कृत्यें निःसंशय अद्भुत व प्रशसनीय आहेत; तरी पण आध्यात्मिक दृष्ट्या तें खरें संतपण खचित नव्हे. आध्यात्मिक स्वरूप-सिद्धीपुढें आधिभौतिक नश्वर स्वराज्य आणि देहस्वातंत्र्य कःपदार्थ आहे ! " **न मिळो खावया न वाढो संतान । परी हा नारायण कृपा करो** " ! भगवत्कृपा, भगवत्प्राप्ति हीं आध्यात्मविचाराच्या मार्गानेंच होते. नर-देहाची इतिकर्तव्यता त्यातच आहे. ' **सकल धर्मामध्यें धर्म । स्वरूपीं राहावें हा स्वधर्म** " आपण कोण आहोंत याचा विचार करण्याच्या परंपरेपासून जे भ्रष्ट झाले, ते मग विद्वान्, बुद्धिमान् किंवा कितीहि कर्तृत्ववान् असले, तरी विवेकभ्रष्ट म्हणून बेलाशक समजावें. आणि अशा विवेकभ्रष्टांची स्थिति अखेर " **विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः** " अशा प्रकारची होते असा अनुभव आहे· तुम्ही ज्या देहाच्या अस्तित्वावर स्वातंत्र्य मिळवणार तो तर नश्वर कालाधीन, निसर्गाधीन आहे. स्वराज्यप्राप्ति हें तर क्षत्रियांचें काम आहे. क्षात्रतेजच राष्ट्रांत जीवंत नसेल, तर इतराच्या लुडबुडीचा तेथें काय उप-योग ? तें कांहीं असो, आघातप्रत्याघातन्यायानें गेलेलें स्वराज्य

मिळवण्याचे आटोकाट प्रयत्न चालू आहेत. आणि त्यानें आज नाहीं उद्यां स्वराज्य व स्वातंत्र्यहि मिळेल. पण तें स्वराज्य व स्वातंत्र्य टिकविण्यालाहि पाया मजबूत पाहिजे. स्वराज्य व स्वतंत्रता मिळाली तरी भगवत्प्राप्ति हें आपलें ध्येय आहे, हें विसरतां कामा नये. ती भगवत्प्राप्ति स्वराज्यानें कशी होणार ? उलट राज्यातीं नरक आहे. भगवंताची कृपा झाली तर मात्र स्वराज्य व स्वातंत्र्यप्राप्ति खचित होईल. " **सामर्थ्य आहे चळवळेचें** " हें खरें असलें तरी " **तेथें भगवंताचें अधिष्ठान पाहिजे** " हेंहि निर्विवाद सत्य आहे. कोणतीहि सिद्धि प्राप्त होण्याला आणि पुढें ती टिकवण्याला अधिष्ठान किंवा पाया मजबूत पाहिजे. पाया मजबूत केला कीं त्यावर प्रपंच, परमार्थ, स्वराज्य, स्वातंत्र्य, वाटेल ती इमारत सहज उभी करतां व टिकवतां येईल. त्यावांचून तुम्हाला अधिकारच पोंचत नाहीं. तो पाया, ती भूमिका किंवा तें अधिष्ठान कोणतें ? पाश्चिमात्य उच्च शिक्षणानें तर होणें, किंवा पाश्चिमात्य संस्कृतीशीं तन्मय होऊन ती घरांत घेणें हें कांहीं तें अधिष्ठान खचित नव्हे. अर्थात् भगवंताचें अधिष्ठान हा खंबीर पाया म्हणजे भगवद्गीतेच्या सोळाव्या अध्यायांत खुद्द भगवंतांनीं सांगितलेलीं दैवी प्रकृतीचीं सव्वीस लक्षणें, आणि स्वधर्म म्हणजे चातुर्वर्ण्यव्यवस्था, हें भगवंताचें अधिष्ठान होय. आणि तें राष्ट्रांत, समाजांत, व्यक्तींत, अर्थात् समष्टींत आणि व्यष्टींत रोमरोमांतून जागृत करणें, यालाच आध्यात्मिक धारणा किंवा खरी सुधारणा म्हणतात. "**स्वरूपीं राहावें हा स्वधर्म** " तो हाच होय. हा पाया, हें अधिष्ठान जागृत करून मग तुम्ही प्रपंच, परमार्थ, स्वराज्य, स्वातंत्र्य, वाटेल तें संपादण्याची व टिकवण्याची खटपट करा. ती निःसंशय सिद्धीस जाईल. ही परंपरा जागृत करण्याची आज कोणता पुढारी खटपट करीत आहे ? ज्या ज्या वेळीं परकीयांचीं आपल्यावर संकटें आलीं, त्या त्या वेळीं हें भगवंताचें अधिष्ठान जागृत करून त्याच्या जोरावर आपले पूर्वज पूर्वी संकटमुक्त झाले आहेत. काल बदलला असें म्हणून परक्यांना व त्यांच्या संस्कृतीला कवटाळून परान्नपुष्ट झाले नाहींत. अशी आपलीं पुराणें साक्ष देत आहेत. काल बदलला नसून तुमचीं मनें कमकुवत झालीं याचा कोणीच विचार करीत नाहीं. आपल्या राष्ट्रांतील बुद्धिमत्ता, धैर्य, श्रद्धा, भावना, निष्ठा, चिकाटी, साक्षेप, ईर्षा इत्यादि प्रपंचाला, परमार्थाला, स्वराज्यप्राप्तीला अवश्य लागणाऱ्या गुणांपैकीं एकहि गुण वास्तविक राष्ट्रांतून नष्ट झालेला नाहीं. प्रचलित चळवळींच्या द्वारें ते गुण स्पष्टपणें प्रगट होतच आहेत. परंतु प्रचलित चळवळी ह्या आर्यपरंपरा, संस्कृति सोडून विपरीत मार्गानें चालून देशाचा, धर्माचा घात करीत असल्यामुळें त्याच्याबरोबर हे गुण असून ते मातीमोल होत आहेत ! ' रिकामा न्हावी कुडाला तुंबड्या लावी ' अशा रीतीनें जातिधर्म, कुलधर्म, संस्कृति, परंपरा, यांचा उच्छेद करून कुलक्षय करण्याच्या

व आपण मनुष्य असतांना पुच्छविषाणहीन पशु बनण्याच्या मार्गाला या गुणांचा उपयोग होत आहे. जगाचें खरें व शाश्वत कल्याण करणारा तोच संत होय. आपली आर्यपरंपरा सोडून पाश्चिमात्य संस्कृतीच्या मार्गानें वागण्यांत आधिभौतिक सुख स्वच्छंदानें यथेच्छ उपभोगण्यास मिळेल, अशा आशेनें आपल्या सर्व सुधारणांचा गाडा पाश्चिमात्य संस्कृतीच्या मार्गावरून हांकणें, समतेच्या नांवावर जातिभेद, वर्णभेद, स्पृश्यास्पृश्यता इत्यादि घालवून फक्त स्त्री आणि पुरुष एवढा भेद ठेवून बाकी सबगोलंकाराचा हैदोस घालणें, शारदाबिलासारखीं बिलें घरांत घेऊन इसापनीतींतील बेडकांनीं मागितलेल्या राजाची गोष्ट खरी करून दाखवून आपल्या मूर्खपणाचें प्रदर्शन करणें, अशा प्रकारच्या दिग्विजयाला कोणी जगाचें खरें कल्याण म्हणत नाहीं किंवा हा बेडेपणा करणाराला विचारी मनुष्य कधीं संतहि म्हणणार नाहीं.

३. तर मग "**जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति**" याची संगति कशी लावावयाची ? संतांचें वाक्य कांहीं खोटें नाहीं. म्हणून जग कोणतें आणि त्याचें खरें कल्याण कशांत आहे, हें पाहिलें पाहिजे. "**आपल्यावरून जग ओळखावें**" अशी म्हण आहे. जें जन्माला येतें, आणि गत होतें, तें जग होय. आपणहि देहाच्या अंगानें जन्माला येतों आणि शेवटीं गत होतों. म्हणून आपणहि जगच आहोंत. "**जें आपुले अंतरीं । तेंचि जगदंतरीं.**" ही जगरूपानें आपल्यामागें जन्ममरणाची लागलेली येरझारा अध्यात्मज्ञानानें घालवून जो मुक्त झाला, त्यानेंच आपलें खरें कल्याण करून घेतलें व जगाचें म्हणजे इतरांचेंहि खरें आध्यात्मिक कल्याण जो त्या मार्गानें करील तोच संत होय. आपलें खरें कल्याण कांहीं आधिभौतिक सुखप्राप्तींत नाहीं अध्यात्मिक सुखप्राप्तींत आहे. तसें जगाचें, राष्ट्राचें, समाजाचें, व्यक्तीचें खरें कल्याण आधिभौतिक नसून अध्यात्मिक सुखात आहे. कालाच्या ओघानुरूप प्रापंचिक सुखसोयी सुलभ करण्यासाठीं तुम्हीं आधिभौतिक सुधारणाचा अवश्य उपयोग करा, पण तें अंतिम ध्येय खास नव्हे. म्हणून आध्यात्मिक ध्येयाची, सुखाची परंपरा, धारण कायम ठेवून आधिभौतिक सुधारणा त्या पायावर मग वाटेल तशी करा. थोडक्यांत तात्पर्य, हें कीं, जगाचें खरें कल्याण आध्यात्मिक मोक्षांत आहे. त्या मार्गावरून जग पदच्युत झालें आहे. त्याला प्रथम योग्य मार्गावर आणण्याकरितां आपण अध्यात्ममार्गानें जाऊन आत्मज्ञानानें मुक्त व्हावें. आणि मग आपण ज्या मार्गानें मुक्त झालों तो मार्ग मुमुक्षूंना दाखवून त्यांना योग्य मार्गाला लावणें, हें जगाचें खरें कल्याण व हें करण्याकरतां जो स्वतः तरून दुसऱ्याला तारतो किंवा तरण्याच्या मार्गाला लावतो, तो खरा संत होय. आजच्या पुढाऱ्यांत असे प्रपंच व परमार्थ

चालविणारे सव्यसाची किती आहेत ! अशा प्रकारें परंपराभ्रष्ट झालेल्या लोकांना मार्गावर आणण्याचें काम सर्वांत कठीण आहे. जो जनकासारखा विदेही असेल त्याचेंच तें काम आहे. **"सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वंति भारत। कुर्याद्विद्वांस्तथाऽसक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम्"** अशा प्रकारें आपण स्वतः आचारशुद्ध राहून लोकांना मार्गाला लावलें पाहिजे. **"कर्माधारें वर्तावें। विश्व हें मोहरें लावावें। अलौकिक नोहावें। लोकांप्रति."** अशा मार्गानें लोक चालले असतांना त्या मार्गांत अस्मानी, सुलतानी, दैत्य, राक्षस, असुर, नास्तिक इत्यादिकांकडून अडथळे येतील तर त्यांना तोंड देऊनहि ते सहन करीत करीत दूर करण्याची समाजांत शक्ति आणण्यासाठीं वर लिहिल्याप्रमाणें स्वतःच्या अंगीं व समाजांत दैवी प्रकृतीचीं लक्षणें जागत्या ज्योतीप्रमाणें जयत ठेवणें, चातुर्वर्ण्याचा जीर्णोद्धार करून तो **" स्वे स्वे कर्मण्यभिरत "** राहील अशी समाजांत जागृति व शिस्त उत्पन्न करणें, त्यासाठीं बुद्धि व देह झिजवणें हाच खरा लोकसंग्रह, हेंच जगाचें खरें कल्याण आणि तोच **" जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती "** या कोटींपैकीं होय. **" आत्मज्ञानं विना पार्थ सर्वं कर्म निरर्थकम् "**. आत्मज्ञानी पुरुषांवांचून हा लोकसंग्रह होणें शक्य नाहीं. श्री. वासुदेवबुवा हे पूर्ण आत्मज्ञानी होते. त्यांनीं आपण तरून मुमुक्षूंना मोक्षाचा मार्ग दाखविला. स्वधर्माचरणानें वागून परंपरा जागृत ठेवली. त्यांची योग्यता हल्लींच्या राष्ट्रीय संत म्हणविणारांपेक्षां निःसंशय श्रेष्ठ होय.

४. हल्लीं या मोक्षमार्गामध्यें वैयक्तिक मोक्ष किंवा धर्म आणि राष्ट्रीय मोक्ष किंवा धर्म असा भेद करून वैय्यक्तिक पेक्षा राष्ट्रीय धर्म किंवा मोक्ष श्रेष्ठ. कारण त्यांत राष्ट्राचें कल्याण होतें, अशी समजूत करून घेऊन राष्ट्रीय धर्माचें गोडवे गाण्याचा प्रघात सुरू झाला आहे. पण ती भ्रांति आहे. वास्तविक देव ज्याप्रमाणें एकत्वानें सदा उदित आहे, परंतु समर्थ म्हणतात, लोकांनीं तो **"बहुविध केला "** पण देव कांहीं आपण होऊन **" बहुविध झाला। हें तों घडेना."** तद्वत् **"स्वरूपीं राहावें हा स्वधर्म"** हा स्वधर्म राष्ट्राचा व व्यक्तीचा एकच आहे. स्वरूपाच्या अंगानें मी बोधस्वरूपच आहें. आणि प्रकृतीच्या अंगानें मी आपला व राष्ट्राचा संसार सुखाचा करण्याकरितां चातुर्वर्ण्यापैकीं परंपरेनें आलेल्या अमुक वर्णाचा आहें, माझा वर्ण स्वतःची व राष्ट्राची परंपरा चालवून स्वतःच्या व राष्ट्राच्या संरक्षणार्थ देह व बुद्धि खर्च करण्याकरितां आहे, राष्ट्राचा मी एक घटक आहें. ही जागृति कायम ठेवून तदनुरूप वर्तन करणें, याचाच अर्थ **" स्वरूपीं राहावें हा स्वधर्म "** होय. आजकाल राष्ट्रधर्म चालविण्याकरितां पुढाकार घेतलेल्या विभूतींपैकीं अशा रीतीनें राष्ट्रधर्माची परंपरा चाल-

विणारे किती सव्यसाची पुढारी आहेत ! आणि असतील तर त्यां एकदेशी किंवा एकांडी शिलेदारांचा राष्ट्रधर्माला काय उपयोग ? सांप्रत कांहीं विवक्षित हेतूनें भारतरामायणादिकांत राष्ट्रधर्माचीं म्हणून कांहीं लक्षणें दिलीं असलीं, तरी राष्ट्राचें व व्यक्तीचें आधिभौतिक व आध्यात्मिक ध्येय अंतर्बाह्य एकच आहे. गुणकर्मविभागशः चातुर्वर्ण्य हें त्याकरतांच उत्पन्न झालें आहे. " **सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा** ". उत्पत्तीबरोबरच प्रपंच परमार्थ दोनीहि चालवून अंतीं मोक्ष व्हावा याकरतां जो सहयज्ञ निर्माण झाला, तोच हा चातुर्वर्ण्य होय. जगांत ज्ञानावांचून पाऊलहि टाकतां येत नाहीं, म्हणून महाकारण ज्ञानदेह हें ब्राह्मण्य, स्वसंरक्षणार्थ करणें म्हणजे इंद्रियें ज्या कारणदेहांतून उत्पन्न झालीं तो कारणदेह हें क्षत्रियत्व, जीवनव्यापार चालविणारा वासनात्मक लिंगदेह हा वैश्य आणि स्वयंसेवक नरकपोतडयांनीं लिडबिडलेला शूद्र म्हणजे हा स्थूल देह होय. अशा रीतीनें स्वांगानें प्रत्येक मानव चातुर्वर्ण्यच आहे. हें व्यक्तिशः चातुर्वर्ण्य स्वात्म्याच्या तसेंच राष्ट्राच्या परंपरेच्या संरक्षणार्थ आपल्या पूर्वजांनीं मोठया चतुराईनें शास्त्रोक्त मार्गा लावून परंपरागत गुणकर्मांनीं व्यवस्थित लावून दिलें आहे. ब्राह्मण्य व क्षात्रतेज हें पौरुषत्व आणि जीवन व्यापार व सेवा हा प्रकृतिधर्म होय. आजकाल खरें ब्राह्मण्य व क्षात्रतेज आपल्या राष्ट्रातून अजीबात नष्ट झालें आहे. अर्थात् पौरुषत्व नष्ट होऊन स्त्रैणपणा किंवहुना क्लैब्य पुरुषांत फार येत चाललें आहे. त्यामुळें स्त्रियांचा वरचष्मा होऊन त्यांना महत्त्व येत आहे. त्या शिक्षणानें आपलें सुप्रजाजननत्वाचें कर्तव्य विसरून पुरुषाळल्या जात आहेत. यामुळें पुरुषत्व स्त्रियांकडे जाऊन पुरुष क्लिब होऊं पहात आहेत. तसेंच शूद्र ब्राह्मण होऊं घातले आहेत. अशा प्रकारें वर्णसंकर, विचारसंकर राष्ट्रामध्यें बोकाळला आहे. जो उठला सुटला तो मला स्पृश्यास्पृश्यता मोडावी असें वाटतें, मला जातिभेद मोडावा असें वाटतें, अशा रीतीनें मला वाटतें तें शास्त्र व मी म्हणतों त्यालाच शास्त्राची अनुमति आहे, असें म्हणून प्रत्येक व्यक्ति हें एक स्वातंत्र्याच्या जोरावर स्वतंत्र शास्त्र बनत आहे ! हा कांहीं राष्ट्रधर्म किंवा राष्ट्रीय मोक्ष खचित नव्हे. या सर्व वाचाळांचे कान उपटून हातावर देणारा सवाई लोकमान्य निर्माण होईपर्यंत ही बजबजपुरी अशीच चालणार ! असो. सारांश आजकाल जो राष्ट्रधर्म म्हणून पुढें आला आहे तो खरा राष्ट्रधर्म खऱ्या पौरुषत्वानें पुढें आलेलाच नाहीं. जो धर्म सदाचारानें चालतो, तोच खरा पौरुष राष्ट्रधर्म होय. अनाचार, अत्याचार यांनीं चाललेला राष्ट्रधर्म हा मूर्खपणाचा आहे. **"अनाचारस्तु मालिन्यं अत्याचारस्तु मूर्खता"** आणि " **विचाराचारसंयुक्तः सदाचारः स उच्यते**". विचार म्हणजे ब्राह्मण्य व

आचार म्हणजे क्षत्रियत्व या उभयतांच्या संयोगांत सदाचार होतो. आजकाल खरें ब्राह्मण्य व खरें क्षात्रतेजच राष्ट्रांतून नष्ट झाल्यानें एकीची बेकी झाली व त्यामुळें खरा सदाचारच राष्ट्रांतून नष्ट झाला आहे. म्हणून एकीसाठीं कसून प्रयत्न होत आहे पण याचें पर्यवसान बेकींत होत आहे. चातुर्वर्ण्यांतील चतुराई नष्ट झाली, त्याचा हा परिणाम होय. चातुर्वर्ण्य हें एकजिनसी आहे. देह हा जोंपर्यंत एकजिनसीपणानें यथासांग उभा आहे,तेथपर्यंतच तो कार्यकारी आहे. त्याचीं हात, पाय अशीं शकलें करणें मूर्खपणा आहे. तद्वत् एकजिनसी चातुर्वर्ण्याचीं ब्राह्मण, क्षत्रिय अशीं चार शकलें करून त्याची चिकित्सा करणें मूर्खपणा होय. अशी चिकित्सा करण्याची आपल्याला लागलेली खोड घातक आहे. हें परानुकरण असून आपल्या संस्कृतीबद्दल आपलें अज्ञान प्रगट करणें होय. चातुर्वर्ण्य हें चार गुणांचें, चार वर्णांचें, चार कर्मांचें असलें तरी परस्परावलंबनानें तें एकजिनसी होऊन राष्ट्रकार्याला उपयुक्त होतें. मात्र तें एकजिनसी असलें तरी गायीचा चारा ब्राह्मणाला द्यावयाचा नाहीं. " **विंचू सर्प नारायण** " असले तरी " **वंदावें दुरून** " च. ब्राह्मणाचें काम क्षत्रियानें किंवा क्षत्रियाचें काम वैश्यानें करावयाचें नाहीं. " जेनो काम तेनो थाय । बीजा करे गोता खाय". चातुर्वर्ण्याच्या संघातांत शक्ति आहे. विघातांत नाहीं. राष्ट्रकार्याच्या वेळीं एकजिनसी आणि " **स्वे स्वे कर्मण्यभिरत** " असलेल्या चातुर्वर्ण्याच्या संघशक्तीनें तें राष्ट्रकार्य घडवावयाचें आहे.असें असतांना त्याविरुद्ध जो तो पुढारी स्वयंमन्यतेनें विघात करीत आहे. यामुळें भेदाभेद मोडून राष्ट्रैक्य करण्याचा प्रयत्न कसून चालला आहे, तरी त्याचा परिणाम बेकींत हटकून होत आहे! "विनायकं प्रकुर्वाणो रचयामास वानरम् " असा प्रकार होत आहे. याचें कारण, पुढारी हे परंपरेच्या धार्मिक पायावर स्वधर्माचरणानें उभे राहिले नाहींत. बहुतेक पुढारी कर्मभ्रष्ट, आचारभ्रष्ट, विचारभ्रष्ट, पुढें येतात, त्याचा हा परिणाम होय. हाच अधर्म असून तो स्वतःच्या व राष्ट्राच्या मोक्षमार्गाला आडवा येत आहे. स्वतःचा आणि राष्ट्राचा घात करीत आहे. विराट पुरुष हा चातुर्वर्ण्यरूपानें एक व्यक्ति आहे आणि प्रत्येक व्यक्ति ही राष्ट्राचा एक घटक आहे. एक व्यक्ति अध्यात्मज्ञानानें मुक्त झाली तर ती मागल्यापुढल्या बेचाळीस कुळ्या उद्धरते व ती सर्व राष्ट्राला भूषणभूत होते. उलट पक्षीं एका ब्राह्मणानें ताळ सोडला किंवा तो दारू पिऊं लागला तर," बामणांनीं ताळ सोडला, बामण दारु पिऊं लागले " असा सर्व ब्राह्मणजातीला काळीमा लागतो. एकंदरींत राष्ट्रधर्म व व्यक्तिधर्म हे भिन्न नसून एकत्रनिगडित एकच आहेत. आध्यामिक मोक्ष हें अंतिम ध्येय सर्वांचें एकच आहे. आणि तें चातुर्वर्ण्यानें स्वधर्मानें वागण्यावर अवलंबून आहे.

" **भूतांची दया हें भांडवल संतां । आपुल्या ममता नाहीं देहीं** ". देहावरील निःशेष ममता जाण्याला चिदचिद्ग्रंथि सुटून आत्मबोध झाला पाहिजे. तो योगादि साधनांनीं प्राप्त होणें शक्य नाहीं. आत्मबोध ज्याला झाला, तोच खरा संत आणि त्याचें भूतांवरील दयेचें खरें भांडवल म्हणजे भवभ्रांतीच्या सागरांत बुडणाऱ्या जीवांवर दया करून जन्ममरणापासून जीवांना मुक्त करणें हेंच होय. केवळ आधिभौतिक अडचणींतून प्राण्याला सोडवणें हें इहलौकिकी दयालुत्व असलें तरी तें संतपण नव्हे. वासुदेवबुवा हे मोक्षमार्गांतील संत होते. " **तुका म्हणे तोचि संत । सोशी जगाचे आघात** " याचा अर्थ केवळ निंदेचे आघात सोसण्यांत निगरगट्ट झालेले वर्तमानपत्रांचे संपादक हे संत असा अर्थ नव्हे. जन्माला येऊन गत होणारें जग असें जें आपलें शरीर, त्या शरीरावर होणाऱ्या अनंत आणि अनिवार आधि व व्याधि यांचे आघात सोसणारा तो संत होय. हे आधिव्याधींचे क्षणोक्षणीं होणारे आघात " **जो आत्मबोधयुक्त । होऊनि असे सतत । जो मातें हृदया आंत । विसंबेना** " असा पुरुष असेल तोच सहन करूं शकतो. शरीराच्या अंगानें वासुदेवबुवा जन्मादारभ्य व्याधिग्रस्तच होते. मूळव्याध, छातींत वात, दमा, कृशता, या त्यांच्यामागें व्याधि होत्या. त्यांच्यामुळें मनाला आधि असणारच. पण हे आधिव्याधींचे आघात सोसून वासुदेवबुवा पाहावें तेव्हां आनंदांत असत ! कारण अंतर्यामीं ते आत्मबोधावर, 'आत्मन्येवात्मनातुष्ट' असे स्थितप्रज्ञ होते. म्हणून जें अंतरांत, तेंच बाहेर प्रगट होणार. मेल्या गायीला पंचवीस शेर दूध अशा प्रकारचें नसत्या स्तुतीचें व सांगणोवांगणीचें हें सांगणें नव्हे. बुवांच्या सहवासांत असलेल्या पुष्कळ लोकांना ही गोष्ट माहीत आहे. गत-व्यक्तीचें नसतें माहात्म्य फुगवून सांगण्याचें कांहींच कारण नाहीं.

५. आतां कोणीहि चरित्रनायक संत असो किंवा असंत असो, त्याच्या चरित्रांत त्याचे गुणानुवादच गायीलेले असतात. कारण आकार आला कीं तेथें चेष्टा आलीच. " **आकारे रंगते चेष्टा** ". आणि श्रीज्ञानोबा ह्मणतात. " **जे चेष्टा ते गुणाधीन । आपैशी अस** ". अर्थात् चरित्र म्हटलें कीं त्यांत त्रिगुणात्मक गुणानुवाद आलेच. पण जे गुणानुवाद निर्गुणपदाची प्राप्ति करून देतात. ते सगुण सुगुण किंवा दुर्गुण असले तरी ते निर्गुणच होत. " **सगुणाचेनि आधारें । निर्गुण पाविजे निर्धारें** " किंबहुना " **तया निर्गुणालागिं गुणीं पाहावें.** " अर्थात् गुणांनींच निर्गुणाची ओळख करून घ्यावयाची आहे. शब्दानेंच निःशब्दवस्तु जाणावयाची आहे. ज्यानें आत्मा जाणला, त्यानें सर्व जाणलें, अशी श्रुति आहे. तद्वत् समर्थ म्हणतात, " **निर्गुण म्हणजे बहुगुण.** " जो निर्गुणपद पावला तो सर्वगुणसंपन्न समजला पाहिजे. " **तो पाषाणामाजी परीस । जैसा रसा आंत सिद्धरस । तैसा मनुष्या आंत तो अंश । माझाचि**

जाण. " **तैसा मनुष्य लोकाआंत । तो जरि जाहला प्राकृत । तरी प्रकृति-दोषाची मात । नेणेचि कीं.**" म्हणून अशा प्रकारच्या मनांचीं सगुण चरित्रें हीं निर्गुणच असतात. आजकाल मुद्रण व लेखनकला वाढल्यानें अनेकांचीं खरीं खोटीं रंगवलेलीं चित्रें व चरित्रें पुष्कळ प्रसिद्ध होत आहेत. कित्येक आधुनिक सुधारणांत हिंदुस्थानापासून विलायतेपर्यंत दिग्विजय गाजविलेले सुधारक दिवंगत होऊन बरेच दिवस झाले असून त्यांचीं चरित्रें अद्याप कशीं प्रसिद्ध होत नाहींत, म्हणून कित्येकजण हळहळत आहेत ! जणूंकाय अशा सुधारकांचीं चरित्रें प्रसिद्ध झालीं नाहींत, तर सुधारणा एक दोन शतकें मागें हटणार आहे ! पण प्रसिद्ध झालेलीं व होऊं घातलेलीं हीं सुधारकी आधिभौतिक पराक्रम व बुद्धिमत्ता यांनीं सुशोभित झालेलीं उठावदार चरित्रें वाचलीं, तर त्यांत चरित्रनायकाचें उठावदार छायाचित्र; परीक्षेच्या डिग्र्या, पाश्चिमात्य वळणावर आपला समाज व संस्कृति नेण्याचा आटोकाट प्रयत्न, तदनुरूप स्वतःचें व कुटुंबाचें फ्याशनेबल वर्तन, तत्प्रीत्यर्थ व्याख्यान-बाजी, लेखनबाजी, विलायतच्या सफरी, सामाजिक, धार्मिक, राजकीय, चळवळी, आधिभौतिक शोध, स्वराज्याच्य धडपडीसाठीं विलायतेपर्यंत धांवपळ, इत्यादि आयुष्यांतील गोष्टी व अध्यात्मिक विचार कांहीं एक न करतां शेवटीं हात झाडून गेले, यापेक्षां त्या चरित्रांत मर्दुमकीची, पुरुषार्थाची कांहींच गोष्ट नसते. एखादी स्त्री सौंदर्यानें, गुणांनीं, अलंकारांनीं सुशोभित आहे पण कपाळीं कुंकुमातिलक नसेल, सर्व शरीर यथासांग पण त्यांत प्राण नसेल तर काय उपयोग ? आध्यात्मिक मोक्ष हा भारतीयांचा आत्मा आहे. "**जेथें आत्मा नाहीं दाट । तेथें अवघें सरसपाट**" आजकाल प्रसिद्ध होणारीं बहुतेक चरित्रें याच प्रकारचीं असतात. "**तेथें काय हो ऐकावें । आणि काय शोधून पाहावें ? । जेथ प्रत्ययाच्या नांवें । शून्याकार १ जेणें परत्रसाधन । जेणें ग्रंथें होय ( आत्म) ज्ञान । जेणें होईजे पावन । त्या नांव ग्रंथ २ ऐसें सांगावें तें किती ! आवडी सारखें ऐकती । नाना पुस्तकें वाचिती । सर्वकाळ ३ परी परत्रसाधनेंवीण । म्हणूं नये तें श्रवण । जेथें नाहीं आत्मज्ञान । तया नांव कर्मणुक.**" मारुतीरायाला सीतामाउलीनें बहुमोलाचा नवरत्नाचा मुक्ताहार बक्षीस दिला. पण त्या मौक्तिकांत मुक्तकरणारा आत्माराम नाहीं, म्हणून मारुतीरायांनी तो फेंकून दिला ! आजकाल प्रसिद्ध होणारीं बहुतेक चरित्रें अशींच असतात. तीं इहलौकिक, आधिभौतिक दृष्ट्या, आणि आजकालच्या वस्तुस्थितीचें दर्शक म्हणून निःसंशय उपयुक्त आहेत. तरीपण आध्यात्मिकदृष्टीनें त्यांना शून्य मार्क देऊन नापास किंवा नापसंतच केलीं पाहिजेत ! "**अध्यात्मज्ञानाचे ठायीं । जया नित्यबोध नाहीं**" "**तया शरीर जें जाहालें । तें अज्ञानाचें बीं विरूढलें । तयाचें व्युत्पन्नत्व गेलें । अज्ञानवेलीं १ मोडाअंगीं अशेषें । पिसें असती**

**डोळसें । परी एकली दृष्टि नसे । तैसें तें गा".** सारांश, अध्यात्मज्ञानावांचून सर्व व्यर्थ आहे. अशा प्रकारचीं आधिभौतिक गुणांनीं सजवलेलीं चरित्रें फक्त इतिहासाची भर करतात. अध्यात्मज्ञानप्राप्तीला अशा चरित्रांचा किंवा त्या चरित्रकारांच्या वर्तनाचा बिलकुल उपयोग नाहीं. पुराणपुरुषप्राप्तीचा त्यांत लवलेश नसल्यानें पुराणप्रिय होत नाहींत. पण काळाची अशी विपरीत लाट आली आहे कीं, घरांत वडिलांचें श्राद्ध होत असेल नसेल वानवाच, पण हे आधुनिक व आधिभौतिक संत म्हणून नांवाजलेले पुरुष पुण्यवान् समजून त्यांच्या पुण्यतिथि पाळल्या जातात ! "**कालाय तस्मै नमः**" ! सांगावयाचें तात्पर्य हें कीं, या मृत्युलोकांत मोठमोठे जाडे विद्वान्, पुढारी, शोधक, कार्यकर्ते, धीर, वीर, परोपकारी, दीर्घायुष्यी, संग्रामशूर, बहुतांचे पालक, बुद्धीचे चालक, तार्किक, विद्येचे सागर, बळाचे डोंगर, धर्मरक्षक, इत्यादि जन्माला आले, तरी "**ऐसे सकळहि गेले। परंतु एकचि उरले। जे स्वरूपाकार झाले। आत्मज्ञानी**". अशा संतांचीं चरित्रेंच भावी पिढीपुढें येणें अवश्य आहे. श्रीवासुदेवस्वामी हे स्वरूपाकार झालेले संतमालिकेंतील अध्यात्मज्ञानी पुरुष होऊन गेले. म्हणून त्यांचें चरित्र हें आजकाल प्रसिद्ध होणाऱ्या वरील चरित्रांपेक्षां कितीतरी पटीनें श्रेष्ठ होय.

"**चिमुटभर कथा आणि कंडाळभर नमन**" ! श्रीवासुदेवबुवांचें चरित्र म्हणून सांगायला गेलों, आणि संतपदाच्या व्याख्येमागें लागलों, तिकडेच वाहावलों ! विषयांतर झालें. तरीपण आध्यात्मिक संत व आधुनिक संत यांतील भेद सांगणें अवश्य होतें. आधिभौतिक सुखापेक्षां आध्यात्मिक सुखाची योग्यता कितीतरी पटीनें जास्त असल्यानें त्या सुखप्राप्तीची राजर्षीपासून आलेली परंपरा कायम ठेवणारे पुरुष जास्त धन्य आहेत हें सांगावयाचें होतें. असो. आतां स्वामींचा थोडा कुलवृत्तांत सांगतों.

## कुलवृत्तांत

६. जग म्हणजे माया ही मूळांत लटकी, पण चित्रविचित्र असल्याचें सर्व साधुसंत व तत्त्वज्ञानी सांगत आले. माया "**झूट** पण नीट" म्हणावी, तर अनुष्टुप् छंदाला ज्याप्रमाणें "एक नेम नसे गणीं", त्या अनुष्टुप् छंदाप्रमाणें माया स्वच्छंदी दिसते. कोठें "**बीज तैसें फळ**" ह्मणून नियम करावा, तर इकडे "**सूर्यापोटीं शनैश्चर**" किंवा "**मोळा पोटीं केरसुणी**" ह्मणण्याचा प्रसंग येतो ! पण तसें सर्व अनियमित ह्मणावें, तर जगचालक श्रीसूर्यनारायण जर अमुक घटका पळांनीं नेमका उगवतो, तर सूर्यनारायणावर अवलंबून असलेल्या व त्याच्या सत्तेवर उत्पन्न झालेल्या जगांतील यच्चयावत् घडामोडी

व गुणकर्मविभाग नियमबद्ध असलेच पाहिजेत व तसे आहेतहि. पण आपल्याला त्या गोष्टी अज्ञेय किंवा दुर्ज्ञेय आहेत. कांहीं असले तरी वासुदेवबुवा हे " **बीज तैसें फळ** " या नियमानें जन्मास आले असें त्यांच्या कुलवृत्तांतावरून उघड दिसून येतें. म्हणून त्यांचा कुलवृत्तांत थोडक्यांत सांगणें अवश्य आहे ह्मणून सांगतों.

स्वामींचें पूर्वाश्रमीचें नांव **वासुदेव नारायण क्षीरसागर** असें आहे. हे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण होत. त्यांचे गोत्र वाशिष्ट; त्यांना सर्व वासुदेवबुवा धामणीकर असें ह्मणत असत. त्यांचें वास्तव्य धामणीगांवीं श्रीराममंदिरीं असे. धामणी हा गांव पुण्यापासून सतराकोसांवर खेड तालुक्यांत खेडाच्या पूर्वेस सहा कोसांवर आहे. त्याचें थोडें वर्णन पुढें प्रसंगानें येईल. **क्षीरसागर** यांचा मूळ गांव नगर जिल्ह्यांतील संगमनेर तालुक्यांत **बोटें** म्हणून पुणें ते नाशीक रस्त्यावर नारायणगांवापासून सहा कोसांवर प्रसिद्ध आहे. क्षीरसागरांचे घराणें पूर्वीपासून सदाचार, दातृत्व इत्यादि गुणांनीं प्रसिद्ध होतें. अतितअभ्यागत, साधु, प्रवासी यांच्याकरतां स्वखर्चानें अन्नछत्र यांच्या घराण्यांत चालू होतें. **बोटें** गांवीं यांचा एक वाडा होता. त्याचा भव्यपणा अद्यापहि तेथें दिसून येत आहे. जोशी कुलकर्णी वतनाचीं छत्तिस गांवें या घराण्याकडे होतीं. सर्वांची विभागणी होऊन आतां फक्त **बोटें** आणि जुन्नर तालुक्यांतील **कांदळी, वैशाख, खेडें** एवढीं तीनच गांवें राहिलीं आहेत. तथापि स्वराज्याचा काल संपल्यानंतर परतंत्र राजवटींत अपमान होऊं लागला तो स्वाभिमानवृत्तीला सहन होईना. शिवाय स्वामींचें निपणजे श्रीविठ्ठलमहाराज हे लहानपणापासूनच विरक्त होते. यामुळें त्यांनीं कुळकर्णीचा राजीनामा देऊन लेखणी खालीं ठेवली व ते ईश्वरभक्तीला लागले. तेव्हांपासून वतन व इनाम जमीन हल्लीं कनिष्ठ घराण्याकडे चालू आहे. श्रीविठ्ठलमहाराजापासून श्रीवासुदेवस्वामीपर्यंत क्षीरसागर घराण्यांतील ज्या पुरुषांनीं आपलें आयुष्य ईश्वरभक्तींत घालून जन्मसार्थक केलें, त्या पुरुषांची वंशवेल येथें थोडक्यांत देतों. ( अपूर्ण )

# श्रीसद्गुरुस्तवन

[ श्री· गोपाळ वामन कोटणीस ( मुधोळ ) कृत ]

ॐ नमो सद्गुरु दयाघना । ॐ नमो सद्गुरु निरंजना ॥
ॐ नमो सद्गुरु विमलैकज्ञाना । भवगजपंचानना तुज नमो ॥ १ ॥
ॐ नमो सद्गुरु आराध्या । ॐ नमो सद्गुरु स्वसंवेद्या ॥
ॐ नमो सद्गुरु जगदाद्या । स्वयंबोधबोध्या तुज नमो ॥ २ ॥
ॐ नमो सद्गुरु परामानंदा । ॐ नमो सद्गुरु सौख्यैककंदा ॥
ॐ नमो सद्गुरु परिपूर्णवरदा । दैवीसंपद्युक्ता तुज नमो ॥ ३ ॥
ॐ नमो सद्गुरु ज्ञानघना । ॐ नमो सद्गुरु सगुणानिर्गुणा ॥
ॐ नमो सद्गुरु मायाभंजना । सज्जनवनचंदना तुज नमो ॥ ४ ॥
ॐ नमो सद्गुरु चित्तचालका । ॐ नमो सद्गुरु जगदैकपालका ।
ॐ नमो सद्गुरु निजजनरक्षका । विश्वव्यापका तुज नमो ॥ ५ ॥
तुझी सत्य स्वरूपस्थिती । साग्र वर्णूं जातां वेदश्रुती ॥
त्याहि परतल्या नेतिनेति । तेथ मन्मती शके केवी ॥ ६ ॥
मम श्रोता श्रोतव्य तुझेनी । त्वचेसी स्पर्शज्ञता तुझेनी ।
चक्षुसी अवलोकन तुझेनी । रसज्ञता तुझेनी जिव्हेतें ॥ ७ ॥
घ्राणीं घ्रातव्य तुझेनी । मंतव्य या मना तुझेनी ॥
बोधव्य बुद्धिमाजी तुझेनी । चिंतन तुझेनी चित्तासी ॥ ८ ॥
यापरी सर्वेंद्रियीं समान । प्रकाशक तूं परिपूर्ण ॥
तेथ दुजें कल्पूनी स्तवी कोण । कायसें भजन ऐक्यामाजी ॥ ९ ॥
ऐशा स्थितीमाजी पूर्ण मौन । तेथ कैसें भज्य भजक भजन ॥
कैसें नम्य नमक नमन । प्रेमरसपान कैसें तें ॥ १० ॥
परि सदा लुटावें त्वन्नामामृत । सदाचि व्हावें त्वद्गुणगानरत ।
अवलोकावें तुज मूर्तिमंत । म्हणवुनी द्वैत स्वीकारी पुढें ॥ ११ ॥

क्षमा करी हा ममापराध । तूं सर्वज्ञ माय मी बाळ बुद्धिमंद ॥
पुरवी भलताहि मम छंद । सुखैककंद तूं प्रकट हो ॥ १२ ॥
त्रितापशमन तूं कृपाजलद । मायातमप्रभाकर तूं शांतिद ॥
मम मनोदधीचंद्र तूं सौख्यद । विशद बोधविदग्ध सत्य तूं ॥ १३ ॥
अखंड करवी तव नामस्मरण । निःशब्दशब्दें परिपूर्ण ॥
सततची तव पुण्यपावन । घडो दर्शन मजलागीं ॥ १४ ॥
तवालय सांडूनी जातां । छेदावे मम पद शीघ्रतां ॥
हस्तें पूजितां अन्य देवता । पापी तत्त्वता जावोत झडोनी ॥ १५ ॥
मुखें करितां अन्य स्तवन । वाचेसी बैसो अखंड मौन ॥
अन्य रूपें पाहतां हे लोचन । जावोनी पूर्ण अंधत्व येवो ॥ १६ ॥
श्रवणीं नायकतां तव गुण गान । बधिरत्व येवो तया लागून ॥
घ्राणें न करितां तव निर्माल्यावघ्राण । तें त्वरें करून झडो पैं ॥१७॥
त्वचेनें तव पूज्य पादस्पर्श । करोनी न पावतां हर्ष ॥
तें जळोनी जावो अनावकाश । भस्म निःशेष होवो कीं ॥ १८ ॥
एवं ज्ञानकर्मेंद्रियेंकरून । जें जें कर्म घडे रात्रंदिन ॥
तें तें होवो कीं तवार्पण । हें वरदान देई सद्गुरो ॥ १९ ॥
हेंचि मागणें माझें कृपावंता । वरद कर राहो मम माथा ॥
विनंति ऐके गोपालनाथा । तूंचि तात माता गणगोत्र ॥ २० ॥

॥ श्रीसद्गुरुपदार्पणमस्तु ॥

# आचार्यकृत षट्पदी

संस्कृतांतील स्तोत्रसंग्रह फार मोठा आहे. त्यांत केवळ सगुणोपासकांनीं केलेल्या स्तोत्रांचा विशेष भरणा आहे हें साहजिकच आहे. परंतु निर्गुणाच्या पायरीस पोंचलेल्या भारतीय महात्म्यांनीं सगुणाचा त्याग कधींहि केला नाहीं. तर सगुणोपासनेच्याच कृपेनें आपण निर्गुणाचा पल्ला गांठला ही सदैव जाणीव असल्यामुळें त्यांचें सगुणभक्तीचें प्रेम यत्किंचितहि कमी होत नसे; अशा महात्म्यांनीं केलेलीं स्तोत्रेंहि बरींच आहेत. खालीं दिलेलें स्तोत्र आद्यशंकराचार्यांचेंच आहे अशी सार्वत्रिक समजूत आहे. त्यांत सगुणातीत आत्मज्ञान झालेला पुरुषहि सगुणभक्ति यथार्थपणें कशी करूं शकतो हें स्पष्टपणें दृग्गोचर होतें. खिस्ती आणि महंमदी धर्मांतील लोकसमाजाच्या बुद्धीच्या टप्प्यामध्यें सहज येणाऱ्या खिस्त व महंमद या दोन व्यक्ति जर अजीबाद वगळल्या तर त्या धर्मांतील निवळ निर्गुण निराकार ईश्वराच्या सेवेनें किती लोकांस समाधान प्राप्त होईल हें सांगणें नको. उच्चतम परब्रह्म तत्त्वाचें आकलन होणें देहधारी प्राण्यास अत्यंत कष्टदायक आहे. सगुणाचा मार्गच सुसाध्य आहे हें भगवंतांनीं गीतेंत सांगितलेंच आहे. आचार्य अद्वैतसिद्धांताचे आद्यप्रणेते असल्यामुळें परमेश्वर हाच जगद्रूपानें नटला आहे, व जीव हा त्याचाच अंश आहे या मूलतत्त्वावर या स्तोत्राची उभारणी केली आहे.

१

**अविनयमपनय विष्णो दमय मनः शमय विषयमृगतृष्णाम् ।**
**भूतदयां विस्तारय तारय संसारसागरतः ॥**

अर्थः—हे विष्णो, माझ्यांतील अहंकार नाहींसा करा. माझें मन भडकूं देऊं नका. विषयोपभोगाची मृगजलासारखी फसविणारी हाव नाहींशी करा. माझ्या ठिकाणीं प्राणिमात्रांविषयीं दया प्रवृद्ध करा. व या संसारसागरांतून मला सुखरूप पैलतीरास न्या.

२

**दिव्य-धुनी-मकरंदे परिमलपरिभोग सच्चिदानंदे ।**
**श्रीपतिपदारविंदे भवभयखेदच्छिदे वंदे ॥**

अर्थः—या संसारांतील भय व क्लेश यांचा नाश करण्यास्तव लक्ष्मीपति भगवन्ताच्या पदकमलांस मी वंदन करितों. अमरसरिता गंगा ही त्या पदकमलांचा मकरंद म्हणजे मधु आहे. सत्ता, ज्ञान व आनंद ही त्रयी त्या कमलाचा सुवास आहे.

३

**सत्यपि भेदापगमे नाथ तवाहं न मामकीनस्त्वम् ।**
**सामुद्रो हि तरंगः क्वचन समुद्रो न तारंगः ॥**

अर्थः—हे जगन्नाथा, मी जीव व आपण शिव यांच्यांत जरी भेद मुळींच नाहीं, तरी मी तुमचा आहे, तुम्हीं माझे नव्हत. लाट ही समुद्राची आहे असें लोक म्हणतात, समुद्र लाटांचा आहे असें म्हणत नाहींत. दोनीहि एकरूप असले तरी समुद्र हा शाश्वत आहे, लाट ही क्षणिक आहे. तसेंच माझा जीवात्मा क्षणिक असून शाश्वत परमात्मतत्त्वाचा अंश आहे.

४

**उद्धृतनग नगभिदनुज दनुजकुलामित्र मित्रशशिदृष्टे ।**
**दृष्टे भवति प्रभवति न भवति किं भवतिरस्कारः ॥**

अर्थः—आपण गोवर्धन पर्वत उचलला. पर्वताचा भेद करणारा जो इंद्र त्याचे आपण धाकटे बंधु आहां. दानवसमुदायाचे शत्रु आहांत. सूर्य व चंद्र आपले डोळे आहेत. अशा प्रकारचे पराक्रमशाली जे आपण त्यांचें दर्शन झाल्यास माझ्या संसारबंधनाचा लोप होणार नाहीं काय ? सहज होईल.

५

**मत्स्यादिभिरवतारैरवतारवताऽवता सदा वसुधाम् ।**
**परमेश्वर परिपाल्यो भवता भवतापभीतोऽहम् ॥**

अर्थः—हे परमेश्वरा, मत्स्य, कूर्म वगैरे अवतार घेऊन नेहमीं ( संकट-काळीं ) या पृथ्वीचें संरक्षण करणारे तुम्ही आहां. तेव्हां संसारतापांनीं भय-भीत झालेल्या अशा माझें संरक्षण आपल्यास केलेंच पाहिजे.

६

**दामोदर गुणमंदिर सुंदरवदनारविंद गोविंद ।**
**भवजलधिमथन-मंदर परमं दरमपनय त्वं मे ॥**

अर्थः—हे दामोदर, हे गोविंद, आपण सर्व गुणांचे अधिष्ठान आहां. आपलें मुखकमल सुंदर आहे. या संसार-सागराचें मंथन करण्यास मंदरा-चलासारखें आपल्यांत सामर्थ्य आहे. तेव्हां ( या संसारांत माझी काय गति होईल ) ही जी मोठी भीति माझें मनांत आहे ती तुम्ही अवश्य दूर करा.

७

**नारायण करुणामय शरणं करवाणि तावकौ चरणौ ।**
**इति षट्पदी मदीये वदनसरोजे सदा वसतु ॥**

अर्थः—( हे ) करुणामय नारायणा, तुमच्या चरणांचा ( मी ) आश्रय करितों. या सहा शब्दांच्या समुदायाचा माझ्या मुखांत निरंतर वास असो.

ता............

तो कसा ? जशी षट्पदी म्हणजे भ्रमरी नेहमीं कमळांमध्यें आनंदानें वास करिते, तसा.

इति शंकराचार्यविरचितं षट्पदीस्तोत्रं संपूर्णम् ॥

---

# भगवच्छरणस्तोत्रम्

( ब्रह्मानंदविरचितम् )

१

सच्चिदानंदरूपाय भक्तानुग्रहकारिणे ।
मायानिर्मितविश्वाय महेशाय नमोनमः ॥

अर्थः––सत्ता, ज्ञान, व आनंद हीं ज्यांचीं रूपें आहेत, जे भक्तांवर अनुग्रह करितात, मायेच्या साह्यानें ज्यांनीं विश्व निर्माण केलें आहे, अशा महेशाला ( शिवाला ) मी पुनः पुनः नमस्कार करितों.

२

रोगा हरंति सततं प्रबलाः शरीरं
कामादयोऽप्यनुदिनं प्रदहंति चित्तम् ॥
मृत्युश्च नृत्यति सदा कलयन्दिनानि
तस्मात्त्वमद्य शरणं मम दीनबंधो ॥

अर्थः––नित्य प्रबल असे रोग शरीराचा ऱ्हास करीत असतात. प्रतिदिनीं कामादि षड्रिपु चित्तांत खळबळ उत्पन्न करीत असतात. ( अमक्या माणसाचे अमके दिवस भरले ) असा आयुष्याच्या दिवसांचा हिशेब करणारा मृत्यु जगभर नाचत असतो. या भयप्रद स्थितीमुळें, हे दीनांच्या पालका, मी आज तुह्मांलाच शरण येत आहे.

३

देहो विनश्यति सदा परिणामशीलः
चित्तं च खिद्यति सदा विषयानुरागि ।
बुद्धिः सदाहि रमते विषयेषु नांतः
तस्मात्त्वमद्य शरणं मम दीनबंधो ।

अर्थः––नेहमीं पिकत जाणारा देह हळुहळू नित्य नाश पावत असतो. विषयांवर लुब्ध झालेलें माझें मन नेहमीं दुःखी असतें. माझी बुद्धि बाह्यसुखसाधनांमध्यें दंग असते, आत्म्याकडे वळत नाहीं, तेव्हां हे दीनबंधो, शंकरा, तुम्हींच मला आतां आधार व्हा.

४

आयुर्विनश्यति यथाऽऽमघटस्थतोयं
विद्युत्प्रभेव चपला बत यौवनश्रीः ।
वृद्धा प्रधावति यथा मृगराजपत्नी
तस्मात्त्वमद्य शरणं मम दीनबंधो ॥

अर्थः—कच्च्या मडक्यांतून पाणी जसें भराभर झिरपून जातें, तसें आपलें आयुष्य न कळत कमी होत असतें. तारुण्याची टवटवी विजेच्या चमकण्याप्रमाणें चंचल आहे, एखाद्या सिंहिणीप्रमाणें वार्धक्य आपल्याबर वेगानें झडप घालीत असतें. (वृद्धा या शब्दाचा अर्थ संदिग्ध आहे). म्हणून तुम्हीच मला आधार द्या.

५

आयाद्व्ययो मम भवत्यधिको विनीते
कामादयो हि बलिनो निबलाः शमाद्याः ।
मृत्युर्यदा तुदति मां बत किं वदेयं
तस्मात्त्वमद्य शरणं मम दीनबंधो ॥

अर्थः—माझा खर्च प्राप्तीहून अधिक होतो (विनीते?). कामादि शत्रु प्रबल आहेत. शमदमादि सद्गुण अगदीं अल्प प्रमाणांत आहेत. तेव्हां मृत्यु (यम) जेव्हां मला जाच करूं लागेल तेव्हां मी त्याला काय सांगूं? तेव्हां हे दीनबंधो, तुम्हींच मला आधार द्या.

६

सत्संगतिर्हि विदिता तव भक्तिहेतु :
साप्यद्य नास्ति बत पंडित मानिनो मे ।
तामंतरेण नहि सा क्व च बोधवार्ता
तस्मात्त्वमद्य शरणं मम दीनबंधो ॥

अर्थः—सज्जनांची संगति ही भक्ति उत्पन्न करण्यांस कारणीभूत होते, हें सर्व जाणतात. पण मी स्वतःस पंडित मानीत असल्यामुळें सत्संगतीचाहि मला लाभ होत नाहीं. भक्तीवाचून आत्मबोधाची वार्ताहि ऐकूं येणार नाहीं. तेव्हां आतां तुह्मीच माझें आधार आहांत.

७

प्राणान्निरुद्ध्य विधिना न कृतो हि योगो
योगं विनास्ति मनसः स्थिरता कुतो मे ।
तां वै विना मम न चेतसि शांतिवार्ता
तस्मात्त्वमद्य शरणं मम दीनबंधो ॥

अर्थः—शास्त्रोक्त रीतीनें प्राणायाम करून मी योग साधन केलें नाहीं. योगावाचून माझ्या मनास स्थिरता कशी मिळणार ? माझ्या मनाची स्थिरता झाल्यावाचून माझ्या अंतःकरणांत शांति कोठून येणार ? म्हणून हे दीनबंधो, मी तुमचा आश्रय करीत आहे.

# भागवतधर्म–मीमांसा

ले. ह. भ. प. धुंडिराज रामचंद्रमहाराज, पंढरपूर.

## लेखांक ३

( ऑक्टोबर १९२८ च्या अंकावरून )

—❧❧—

आह्मां सांपडलें वर्म । करूं भागवतधर्म ॥१॥–नामदेव

१. दिव्य व पवित्र भागवतधर्माचें आचरण करणें हें परमात्मप्राप्तीचें वर्म-अंतरंग साधन–आहे असें श्रीनामदेवराय म्हणतात. हें वर्म पूर्वींच्या संत-महात्म्यांनीं दाखवून दिल्याचें श्रीतुकाराममहाराजांनीं सांगितलें आहे.

तुका म्हणे संतीं । वर्म दिलें आम्हां हातीं ॥१॥

व्यवहारांत कोणत्याहि गोष्टीचें वर्म जाणल्यावांचून कांहीं उपयोग होत नाहीं हें प्रसिद्धच आहे. ‘ तुका म्हणे वर्म जाणितल्यावीण । पावे करितां शीण सांडी मांडी ॥ ’ तसेंच परमात्मप्राप्तीविषयीं भिन्न भिन्न शास्त्रकारांनीं अनेकविध साधनांचा उपदेश केला आहे. पण प्रचलित कलिकालग्रस्त परिस्थितीमध्यें त्या सर्व वाटा क्षीण झाल्या आहेत, असें संतवचनावर विश्वास ठेवून नाइलाजानें म्हणावें लागतें. पूर्वींच्या व्यासनारदशांडिल्य इत्यादि मुनींना ही भावी परिस्थिति केव्हांच कळून चुकली होती. म्हणून अशाहि–पारमार्थिक दृष्टीनें–हीनतर परि-स्थितींमध्यें सर्व आबालवृद्धांना उपयुक्त असा एक राजमार्ग त्यांनीं पूर्वींच तयार करून ठेविला आहे. तो मार्ग म्हणजेच हा परम पवित्र भागवतधर्म होय. हा मार्ग अत्यंत सरळ असून यांत कोणतेंहि विघ्न येण्याचा संभव नाहीं. कर्माचा सूक्ष्मपणा व योगाची कठोरता यांत नाहीं, म्हणून नारद महर्षींसारख्या भाग-वतोत्तमांनींहि या मार्गाबद्दल “ अन्यस्मात्सौलभ्यं भक्तौ ” असें स्पष्ट म्हटलें आहे. तसेंच कर्म–ज्ञान–योगादि साधनांपेक्षां भगवद्भक्ति श्रेष्ठ आहे, कारण ही साधनरूप नसून फलस्वरूप आहे असेंहि नारद म्हणतात. ‘ सा कर्मज्ञान-योगेभ्योप्यधिकतरा । फलरूपत्वात् । स्वयं फलरूपतेति ब्रह्मकुमारः ॥’–ना. भ. सू. प्रेमलक्षणा भक्तीला साधनापुरतीच किंमत नसून ती साध्यस्वरूप ह्मणजे फल-रूपा आहे. ‘ बीज आणि फळ हरिचें नाम ’ असें श्रीतुकोबाराय ह्मणतात.

२. वैदिक कर्माचरणाकरितां जाति, देश, काल, शौच इ. इ. कांहीं विशिष्ट अधिकार व नियमांची आवश्यकता असते. हे सर्व नियम सांभाळले गेले व अंतरायरहित कर्माचरण घडलें तरच साधनांपासून कांहीं तरी फलनिष्पत्ति होण्याचा संभव. नाहीं तर “ तेषामसौ क्लेशल एव शिष्यते ” या ब्रह्मस्तुतींतील

वचनाप्रमाणें फक्त साधनाचरणाचे कष्टच पदरांत पडत असतात. शिवाय इतर साधनाचरण करीत असतां त्या त्या साधनांचा अभिमान उत्पन्न होत असतो, असें श्रीनाथमहाराज ह्मणतात.

'जें जें करावें साधन। तें तें साधनीं रिघे साधनाभिमान' 'तप करोनि तीर्थाटण। वाढविला अभिमान। वांटिलें जें धन। केली अहंता जतन'—तुकाराम. भागवतधर्माचरणाचें तसें नाहीं. तो यावन्मनुष्यमात्रांकरितां आहे. विधि-निषेधबाधकता, प्रमाद, अभिमान, इत्यादि विघ्नांपासून तो अलिप्त आहे. अंतः-करणांत परमात्मविषयक शुद्ध, निर्हेतुक, अव्यवहित प्रेममात्र पाहिजे, मग ती व्यक्ति स्त्री, वैश्य, शूद्र, अतिशूद्र, चांडाल यांपैकीं कोणीहि असो, भागवतधर्म-मंदिरांत प्रवेश करून अदूरतः परमात्मदर्शन घेण्यास तिला कोणीहि आडकाठी करूं शकत नाहीं. भागवतधर्माचें द्वार त्या सर्वांकरितां खुलें ठेविलें गेलें आहे. श्रीतुकाराममहाराज म्हणतात—

ब्राम्हण क्षत्रिय वैश्यशूद्र। चांडाळांहि अधिकार।
बाळें नारीनर। आदि करुनि वेश्याहि॥ १॥

याकरितांच "स वै पुंसां परोधर्मः यतो भक्तिरधोक्षजे" असें श्रीमद्भागवतामध्यें म्हटलें आहे. या श्लोकांतील 'पुंसां' हें पद या हेतूनेंच वापरलें गेलें आहे. तसेंच हा 'पर' ह्मणजे श्रेष्ठ धर्म आहे. 'मुख्य धर्म देव चित्तीं। आदि अवसान अंतीं' म्हणून या धर्मास मुख्य धर्म असें श्रीतुकोबा म्हणतात.

श्रुत्वा धर्मानशेषेण पावनानि च सर्वशः॥

सर्व धर्मांचे विचारपूर्वक श्रवण केल्यानंतरहि धर्मराजानें महाभारतांत भीष्माचार्यांना पुनः

को धर्मः सर्वधर्माणां भवतः परमो मतः॥

म्हणजे—तुम्हांला सर्व धर्मामध्यें कोणता धर्म श्रेष्ठ वाटतो, असा प्रश्न केला आहे. त्याचें उत्तर भीष्मपितामहांनीं हेंच दिलें आहे कीं, भक्तिप्रधान भागवत-धर्मच श्रेष्ठ आहे, असे माझें निश्चित मत आहे.

एष मे सर्वधर्माणां धर्मोऽधिकतमो मतः॥
यद्भक्त्या पुंडरीकाक्षं स्तवैरर्चेन्नरःसदा॥ १॥

तसेंच श्रीज्ञानेश्वरमहाराज तर या परमधर्मास 'सकल धर्मांचें कारण। नाम-स्मरण हरिकीर्तन। दया क्षमा समाधान। संतजन साधिती.' 'निजधर्म हा चोखडा' म्हणून सकल धर्मकारण व निजधर्म असें म्हणतात. श्रीमद्भागवत एकादशस्कंधामध्यें उद्धवास श्रीकृष्णानीं "धर्मो मद्भक्तिकृत्प्रोक्तः" म्हणून धर्माची हीच व्याख्या सांगितली आहे.

३. तसेंच भागवतधर्माचरणामध्यें इतर साधनांप्रमाणें अहंकाराचा उद्भव

होत नसतो, इतकेंच नव्हें तर अभिमाननाशाचें एकमेव साधन भागवतधर्मच आहे असें श्रीएकनाथमहाराज म्हणतातः—

व्रत तप तीर्थदान । करितां योग याग यजन ।
वेद शास्त्रार्थ पुराणश्रवण । तेणें देहाभिमान ढळेना ॥ १ ॥
भावें करितां माझें भजन । समूळ तुटे देहाभिमान ।
भक्ति उत्तमोत्तम साधन । भक्ताधीन परब्रह्म ॥ २ ॥

४. वैदिक कर्ममार्गापेक्षां भागवतधर्म हा व्यापक, सुलभ व श्रेष्ठ आहे असें सिद्ध झाल्यानंतर ज्ञानमार्ग व भागवतधर्म यांतील भेद कोणता आहे हें पाहणें अवश्य आहे. वास्तविक पहातां ज्ञानमार्ग हा स्वतःच्या बुद्धिबलावर अनेक प्रकारच्या आध्यात्मिक आधिभौतिकादि आघातरूपी दिव्यांतून पार पडून प्राप्त करून घ्यावा लागतो. अव्यक्तोपासकाच्या मार्गांत अनेक विघ्नें उपस्थित होत असतात. इंद्रादिपदें वाटमारेपणा करितात, ऋद्धिसिद्धींचीं द्वंद्वें त्याच्या आड येतात, तसेंच काम क्रोधादि विकारांपासून नाना तऱ्हेचे उपद्रव उद्भवत असतात. निराकाराबरोबर लढावें लागतें, मृत्यूशीं झुंजावें लागतें असें श्रीज्ञानोबारायांनीं १२ व्या आध्यायांत म्हटलें आहे. एका तत्त्वज्ञाचे तर या विषयांत असे उद्गार आहेत कीं––

" दुःसाध्यं कर्म आश्रयंविना न सिद्ध्यति । यथा तरणाभ्यासवतोऽपि बाहुभ्यां भागीरथीं तितीर्षोस्तुंबीफलाश्रयेण भवितव्यम्, अन्यथा श्रान्तहस्तपाद सन्मध्यएव निमज्जति ।" "दुःसाध्य कर्म स्वातंत्र्यानें म्हणजे आश्रयावांचून सिद्ध होत नाहीं. पोहावयास येत असतांहि मोठ्या नदींतून पोहून जाणाऱ्यानें भोपळ्याच्या साहायानेंच तरून जाणें योग्य आहे, नाहीं तर हातपाय थकून नदींत बुडून मरण्याचा संभव आहे. " तसा अव्यक्तोपासनामार्ग हा निराश्रय आहे. पण सगुणोपासनायुक्त भागवत धर्माचें मात्र तसें नाहीं. या मार्गांत मोठा आधार परमात्म्याचाच असतो. या मार्गांतील न्यूनता पूर्ण करण्याचें काम देवाकडेच असतें. जसा गर्भगोळ कोणताहि उद्योग करूं शकत नाहीं, किंवा अजातपक्षांचा सर्व भार पक्षिणीवरच असतो, तसा अनन्य भक्तांचाही सर्व भार परमात्म्यावरच असतो.–'तुका म्हणे त्याचा देवा सर्वभार.' पारमार्थिक योगक्षेमाची जबाबदारी भक्त स्वतःच्या शिरावर न घेतां परमात्म्यावर सोपवून निश्चिंत असतो, म्हणूनच भक्ताचा हात धरून भगवान् त्यास परमार्थाच्या सरळ वाटेवर नेऊन सोडीत असतो.

योगक्षेम त्याचा जाणे जडभारी। वाट दावी करीं धरोनियां ॥–तुकाराम.

सायुज्य किंवा सेवा यांपैकीं भक्त मागेल ती वस्तू परमात्मा अनन्य भक्तांस देत असतो. स्वतंत्रपणें उद्धाराचा प्रयत्न करण्याची त्यास आवश्यकता नसते.

तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ॥

म्हणून प्रेमळभक्तांचा उद्धार करण्याचें कार्य परमात्मा मोठ्या आवडीनें करितो. केवळ त्यांच्यावर अनुग्रह करण्याकरितां त्यांच्या अंतःकरणांत राहून मी प्रकाशयुक्त ज्ञानदीपानें अज्ञानजन्य मोहांधकाराचा नाश करितो असें स्वतः श्रीकृष्णानीं अर्जुनास १० व्या अध्यायांत सांगितलें आहे—

अज्ञानाचिये राती- । माजी तमाची मिळणी दाटती ।
ते नाशूनि घाली परौती । करि नित्योदयो ॥ १ ॥—ज्ञानेश्वर

म्हणून साहजिकपणेंच या मार्गांत विघ्न येण्याचा संभव नाहीं. हीच गोष्ट श्रीएकनाथमहाराज सांगतात—

एवं निर्विघ्न मजमाजि सरता । मार्ग नाहीं भक्तिपरता ।
त्रिसत्य सत्य सर्वथा । भक्ति तत्वता मज पढिये ॥ १ ॥

४. फलप्राप्तीच्या दृष्टीनेंहि पाहिल्यास इतर साधनाचरणद्वारां प्राप्त होणारें फल नामस्मरण व चिंतनपूर्वक भागवतधर्मप्रणिहित भक्तीनें प्राप्त होतें. कर्म, योग, तप, वैराग्य इत्यादि साधनाचरणानें प्राप्त होणारें चित्तशुद्धिरूपीं फल भगवद्भक्तीनेंहि सुलभतेनें प्राप्त होतें. हीच गोष्ट जनक व नवयोगेश्वर यांचे संवाद प्रसंगीं श्रीमद्भागवतांत सांगितली आहे.—भा. ११-३-४०

यर्ह्यब्जनाभचरणैषणयोरुभक्त्या चेतो मलानि विधमेद् गुणकर्मजानि ।
तस्मिन्विशुद्ध उपलभ्यत आत्मतत्त्वं साक्षाद्यथा मलदृशोः सवितृप्रकाशः ॥४०॥

रजतमादि कर्मज मळ । चित्तीं बैसले जे सबळ ॥
ते प्रक्षाळिती सकळ । भक्ति प्रेमजळ क्षाळणें ॥ १ ॥

डोळ्यांवर पडळ आलें असतां नित्यसूर्योदय होत असूनहि सूर्यदर्शन होणें अशक्य असतें. पण तेंच पडळ औषधादिकांनीं नष्ट झाल्यावर दृष्टि निर्मळ होऊन सूर्य व तत्प्रकाशानें प्रकाशणारे इतर पदार्थहि अनायासेच दिसूं लागतात. तद्वत् चित्तवृत्तीच्या मलिनतेमुळें सर्व सुखाचा आराम असा परमात्मा हृदयस्थ असूनहि जीव ह्या स्वरूपभूत आनंदाला पारखा होतो. अशा वेळीं जर जीवात्मा पुत्रवित्तलोकेषणा त्यागपूर्वक भगवद्भक्तीचा मार्ग चोखाळील तर त्यास चित्तशुद्धीपूर्वक परमात्मसुखाचा आनंद पूर्णपणें मिळूं शकेल. श्रीशंकराचार्य म्हणतात—

शुद्ध्यति हि नांतरात्मा कृष्णपदाम्भोजभक्तिमृते ॥

श्रीकृष्णचरणकमलाच्या भक्तिवांचून अंतरात्मा कोणत्याहि उपायानें शुद्ध होत नाहीं. याच आशयानें 'अवघ्या दशा येणें साधती । मुख्य उपासना सगुणभक्ति। प्रगटे हृदयींची मूर्ति । भावशुद्धी जाणोनियां ॥ १ ॥ ' असे श्रीतुकोबांचे स्वानुभवपूर्ण उद्गार आहेत. स्वतः श्रीकृष्णभगवानहि उद्धवास उपदेश करीत असतां म्हणतात कीं:—

यत्कर्मभिर्यत्तपसा ज्ञानवैराग्यतश्चयत् ।
योगेन दानधर्मेण श्रेयोभिरितरैरपि ।
सर्वं मद्भक्तियोगेन मद्भक्तो लभतेऽञ्जसा ॥ १ ॥

स्वधर्माचरण, निर्बंध, तपाचार, सांख्यज्ञानविचार, विषयत्याग, अष्टांगयोग, वातांबुपर्णाशन, दान, वेदाध्ययन, सत्यवचन, सारांश, 'जें साधे अनेकीं साधनें । तें मद्भजनें पाविजे ॥ इतके न सोसितां साधन संकटें । नुलंघितां गिरिकपाटकडे । हीं सकळ फळें येती दारा पुढें । जें माझी आतुडे निजभक्ति॥–श्रीएकनाथ. म्हणून या साधनास " सर्व साधनांचें सार " असें संत मंडळींनीं म्हटलें आहे.

५. भागवतधर्मप्रतिपादित भक्ति ही एक परमोच्च भूमिका आहे. कोणत्याहि क्षुद्र वासनांचा व गुणांचा येथें प्रवेश होऊं शकत नाहीं. भगवत्प्रेम गुणत्रयरहित, कामनाविवर्जित, क्षणोक्षणीं वृद्धिंगत होणारें, सतत प्रवाहानें वाहणारें, अत्यंत सूक्ष्म, केवळ अनुभवैकगम्य असतें असे नारद म्हणतात; 'गुणरहितं कामनारहितं प्रतिक्षणवर्धमानमविच्छिन्नं सूक्ष्मतरमनुभवरूपम्' (ना. भ. सू. ५४). अमृतांचा आस्वाद घेणारा भाग्यवान् कदन्नाकडे ढुंकूनहि पहात नाहीं. किंवा त्या क्षुद्र अन्नाचें स्मरणहि त्याचे अंतःकरणतां होत नाहीं. तद्वत् गुण व गुणकार्यानुरूप वासना यांचा संबंध भगवद्भक्तांच्या अंतःकरणांतून निःशेष तुटलेला असतो.

आणिक दुसरें नये माझ्या मना । राहिली वासना तुझे पायीं ॥

अशी ही परमात्मविषयक निर्विकार प्रेमांत अंतरंग रंगून गेल्यामुळें अवस्था प्राप्त होते. ही भावना प्रगट झाल्यानंतर त्रिभुवनविभवसंपत्ति जरी कोणी आणून दिली तरी भगवत्प्रेमांतील एक क्षणाला भक्त जें मूल्य देईल तें त्या सर्व संपत्तीस देणार नाहीं. इतकेंच नव्हे तर 'हरिचरणीं अपरोक्षस्थिति। तेथील क्षणार्धाची जे प्राप्ति । तयापुढें त्रिभुवनविभवसंपत्ति । भक्त मानिती तृणप्राय.' असें श्रीनाथ म्हणतात. परमात्मविषयक कामनेंतच त्याच्या सर्व कामनांचा अंतर्भाव झालेला असतो. 'ते माझेनि कामें सकाम । माझेनि प्रेमें सप्रेम' असतात असें श्रीकृष्णांनी म्हटलें आहे. "काम तो कामना भोगीतसे देवा' अशी ही सहज स्थिति असते. 'विषय तो त्यांचा झाला नारायण'. भक्तीच्या उज्वल मार्गाला लागल्यावर गुण व गुणकार्यादि क्रूर श्वापदांपासून त्रास होण्याचा मुळींच संभव नसतो. इतकेंच नव्हे तर अशा भक्तवर्याच्या दिव्य तेजापुढें आपला टिकाव लागणें शक्य नाहीं, असें वाटून केव्हांच ती दूर पळून जाण्याच्या तयारीस लागतात. तुकाराम महाराज म्हणतात 'सत्वरजतम आपण नासती । करिता या भक्ति विठोबाची'. तसेंच भागवतांत कपिलदेवहूति संवादांतः—

भक्तियोगस्य मे मार्गं ब्रूहि विस्तरशः प्रभो ॥

( विस्तारानें भक्तियोगाचा मार्ग सांगा ) या देवहूतीच्या प्रश्नास उत्तर देतांना कपिलानीं म्हटलें आहेः—

मद्गुणश्रुतिमात्रेण मयि सर्वगुहाशये ।
मनोगतिरविच्छिन्ना यथा गंगाम्भसोम्बुधौ ॥ १० ॥
लक्षणं भक्तियोगस्य निर्गुणस्य उदाहृतं ।
अहैतुक्यव्यवहिता या भक्तिः पुरुषोत्तमे ॥ ११ ॥
स एव भक्तियोगाख्य आत्यंतिक उदाहृतः ॥
येनातिव्रज्य त्रिगुणं मद्भावायोपपद्यते ॥ १२ ॥

गंगेच्या पाण्याची धांव जशी अव्याहत समुद्राकडेच असते, त्याचप्रमाणें सर्व गुहाशयस्थ जो मी त्या माझे केवल गुणच श्रवण करून कोणत्याहि फलाची इच्छा व भेदबुद्धि न ठेवतां माझी भक्ति करणें हें निर्गुण अशा भक्तियोगाचें (येथें निर्गुण भक्तियोग म्हणजे निर्गुणाचा भक्तियोग असा अर्थ अभिप्रेत नसून निर्गुण हे भक्तियोगाचें विशेषण आहे. निर्गुण ह्मणजे सत्वादिगुणरहित) लक्षण आहे. हा अत्यंत श्रेष्ठ असा योग आहे, ह्याच्या साह्यानें मनुष्य सत्त्व, रज, तम या गुणत्रयांचें अतिक्रमण करून जीवात्मा माझ्या स्वरूपाला प्राप्त होतो.

६. परमात्मस्वरूपीं कोणत्याहि गुणांचा संबंध नाहीं. तो 'निर्गुणं निष्क्रियं शांतं' असा आहे. 'तो गुण नव्हे कहीं । गुणातया संबंधु नाहीं' असें ज्ञानेश्वर महाराजानीं म्हटलें आहे, ह्मणूनच त्यास सच्चिदानंद असें ह्मणतां येतें, व परमात्म्याच्या पूर्ण व अखंड आनंदाचा अनुभव घेण्याची इच्छा करणाऱ्यांनींहि गुणाचें अतिक्रमण करणें अवश्य आहे. गुणातीत होण्याचा मार्ग कोणता हा प्रश्न अर्जुनानें श्रीकृष्ण परमात्म्यास १४ व्या अध्यायांत केला आहे. अर्जुन ह्मणतो—

किमाचारः कथं चैतांस्त्रीन्गुणानतिवर्तते ॥
' तो निर्गुण काय आचरे । कैसेनि गुण निस्तरे ॥
हें सांगिजो मोहरें । कृपेचेनि '

या प्रश्नाचें उत्तर देतांना श्रीकृष्ण भगवान् गुणातिक्रमणाचा हाच मार्ग अर्जुनास सांगतात—

मांच योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ।
स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ॥
' तरि व्यभिचार रहित चित्तें । भक्तियोगें मातें ।
सेवी तो गुणातें । जाकळूं शके ' ॥—ज्ञानेश्वर

गुणत्रयापलीकडे नेणाऱ्या शुद्धभक्तीकरितां चित्त व्यभिचाररहित होणें अवश्य आहे. व्यावहारिक लोकांचें चित्त सर्वदा विषयासक्त असल्यामुळें त्या

चित्तांत विषयबाहुल्यामुळें किंवा जगन्नानात्वकल्पनेमुळें व्यभिचार ह्मणजे द्वैत किंवा भेददृष्टि हा दोष पूर्णपणें वास्तव्य करीत असतो. व हा दोषच पारमार्थिक अधःपातास बीजभूत असतो. म्हणून चित्त अगोदर अव्यभिचारी करणें ह्म. चित्तांत भेदभावनेला आश्रय न देणें हें प्रथम कर्तव्य आहे. अव्यभिचार भक्तियोग ह्मणजे काय? याची व्याख्या श्रीज्ञानेश्वरांनीं अशी व्यापकदृष्टीनेंच केली आहे. परमात्मा आणि जगत् यांचा तात्त्विक संबंध पूर्णपणें लक्षांत घेणें अवश्य आहे.

रत्न व कांति, पाणी व द्रवत्व, आकाश व अवकाश, साखर व गोडी, वन्ही व त्याच्या ज्वाला, कमल व पाकळया, वृक्ष व शाखा, या दृष्टांताप्रमाणेंच जगाचा व परमात्म्याचा संबंध आहे. चंद्र पहावयाचा असल्यास त्याच्या कला वेगळ्या करण्याची गरज नाहीं. तुपाचा घट्टपणा मोडला नाहीं तरी तें तूपच. सोनें कोणत्याहि आकारांत असलें तरी तें सोनेंच. याप्रमाणें विश्वपणाला बाजूस सारून मला जाणावें असा मी नाहीं, तर विश्वासकट सर्व मीच आहे. अशा अभेददृष्टीनें मला जाणून माझी उपासना करणें म्हणजेच अव्यभिचारी भक्तियोग. येथें ( या विश्वांत व परमात्मस्वरूपांत ) भेद पाहिला तर तोच व्यभिचार होतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात —

ऐसेंनि मातें जाणिजे । ते अव्यभिचारी भक्ति म्हणिजे ।
येथें भेद कांहीं देखिजे । तरी व्यभिचार तो ॥

तात्पर्य, भक्तीस ज्ञानाची जोड असेल तरच ती भक्ति अव्यभिचारी होईल. माहात्म्यज्ञानपूर्वक स्नेहाख्य अंतःकरणवृत्तिविशेष म्हणजे भक्ति, अशी भक्तीची शास्त्रकारांनीं व्याख्या केली आहे. ज्ञानदृष्टीनेंच भेदभावनेचा नाश होतो. जगाच्या यथार्थ स्वरूपाची ओळख पटते. जग व जगन्नाथ यांचा संबंध कळून येतो. इतकेंच नव्हे तर जीवनाचा अंतरीं ओलावा झाल्यानंतर विश्व विश्वंभरीं मावळतें व विश्वरूपानें विश्वंभराचीच प्रतीती येते, आणि ज्ञानपूर्व अवस्थेमध्यें अज्ञानपारतंत्र्यामुळें विश्वाच्या ठिकाणीं आकर्षिला गेलेला प्रेमप्रवाह निरुपचार प्रेमाला विषय असणाऱ्या आत्मसागराला मिळून थांबतो असें नव्हें तर ' मिळोनि मिळताचि असे । समुद्रीं गंगाजळ जैसें ' या न्यायानें सदैव " जाय हे नकळे केव्हां रजनी दिवस " या अनुभवांत मिळतच असतो.

परि ठाकिलियाहि सागर । जैसा मागील ही यात्रा अनिवार ।
तिये गंगेचिये ऐसा पडिभर । प्रेमभावा ॥ ३७ ॥
तैसे सर्वेंद्रियासहित । मज माजीसूनि चित्त ।
जे रात्री दिवस न म्हणत । उपासिती ॥ ३८ ॥

असें या प्रेमाचें वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं १२ व्या अध्यायांत केलें आहे. अशा प्रकारें ऐक्यदृष्टीचा विकासपूर्वक प्रेमप्रवाह भगवत्स्वरूपीं राहणें हाच

गुणरहित होण्याचा सर्वश्रेष्ठ उपाय आहे. विचारी भक्तभागवतांचा हाच निश्चय असतो. एक परमात्म-स्वरूपावांचून प्रेम ठेवण्याला योग्य असें दुसरें चांगलें स्थानच नाहीं अशी त्यांची भावना असते. १३ व्या अध्यायांतील

मयिचानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी ॥

या श्लोकावरील आपल्या टीकेंत श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. 'आणि मीं वांचूनि कांहीं । आणीक गोमटें नाहीं । ऐसा निश्चयो तिहीं । जयाचा केला ॥ ६०३ ॥ किंबहुना निकट निज । जयाचें जाहले मज । तेणें आपणया आम्हा सेज । एकी केली ॥ ६०४ ॥'

तरंग जसा समुद्र बनून समुद्राशीं खेळत असतो त्याप्रमाणें भक्तहि स्वतः आत्मरूप बनून पुनः अभेदानेंच भगवत्प्रेमाचा आस्वाद घेत असतात. ही अवस्था अवर्णनीय आहे. ' हे अनुभवाचि जोगें । नोहे बोला ऐसे ' असें या अवस्थेबद्दल श्रीज्ञानोबांनीं म्हटलें आहे. असें हे प्रेम ' मूकास्वादनवत् ' अनिर्वचनीय आहे असें श्रीनारद महर्षि म्हणत आहेत. तसेंचः—

आतां माझा श्रोता वक्ता तूंचि देवा । करावी हे सेवा तुझीच म्यां ॥

असा तुकोबांचा स्वानुभव आहे.

७. परानुरक्ति किंवा परमप्रेमरूपता ती हीच. व्यावहारिक प्रेमाला परमप्रेम म्हणतां येणार नाहीं. संकोचात्मक अज्ञान पूर्ण देहभावना सांभाळून व्यावहारिकप्रेमाचा विलास चालू असतो. पण शुद्ध प्रेमांत देहाचाच नव्हे तर जीवाचाहि विसर पडतो. ' सबही विसरू देखे गोपाल देखे तो सब बहिने घेरा ' या तुकोबांच्या गौळणीच्या अनुवादाप्रमाणें अवस्था होते. प्रियाची परमसीमा अशा आत्मामाऊलीची भेट झाल्यानंतर त्या आलिंगनांत साहजिकच सांसारिक डिंडिमा आटून जाते. एकदा त्या गोवळाशीं रत-झाल्यावर मग आपोआपच यातिकुळ हारपून जातें. व—

नामगोष्ट माझी सोय सांडा आतां । रातले अनंता तुका म्हणे ॥ असें सांगण्याची पाळी येते. जाति, व्यक्ति व तन्मूलक देहाभिमानावर पाणी पडते. अशा भक्तीच्या आचरणांत केव्हांहि कोणताहि दोष उत्पन्न होणें शक्य नाहीं.

८. भगवद्भक्तीचा आरंभ द्वैतांत ( म्ह. मी परमात्म्याचा सेवक आहे— ' दासोहं—' या भावनेंत ) होतो, व पर्यवसान ' सकलमिदमहंच वासुदेवः परमपुमान्परमेश्वरःसएकः ' अशा श्रेष्ठ व उच्चतम भावनेंत होते. " दासोहं " या भावनेच्या अनुचिंतनानेंच क्रमानें उपाधिनाशद्वारां ' सोहं ' ची प्रतीती येऊ लागते. एका भगवद्भक्ताचे या विषयांतील स्वानुभविक उद्गार मननीय आहेत. तो म्हणतो—

अंतर्बहिर्यदा देवं देवभक्तः प्रपश्यति ॥
दासोऽहं भावयन्नेव दाकारं विस्मरत्यसौ ॥ १ ॥

दासोऽहमिति मे बुद्धिः पुरासीत्परमात्मनि ।
दाशब्दोपहृतस्तेन गोपीवस्त्रापहारिणा ॥ २ ॥

'दासोहं' या सेव्यसेवक भावनेनें जेव्हां भक्त भजन करित असतो तेव्हां त्या भजनाच्या परिपाकावस्थेंत जिकडे तिकडे आंत बाहेर परमात्म्याचीच व्याप्ति अनुभवास आली असतां 'दासोऽहं' या भावनेंतील 'दा' ह्या पदाची त्यास विस्मृति होते. एक भक्त तर असें म्हणतो—

'माझ्या अभ्यासाच्या अपरिपक्व अवस्थेमध्यें माझा सेव्यसेवक म्हणजे 'दासोऽहं' असाच निश्चय होता, पण अभ्यासाच्या परिपक्व अवस्थेचा समय प्राप्त झाला असतां भगवंतानें माझा भ्रम दूर केला म्हणजे त्यानें गोपीवस्त्र हरणरूपी पूर्वाभ्यस्त स्वभावाला अनुसरून माझ्या 'दासोऽहं' या भावनेंतील 'दा' या पदाचें हरण केलें.'

तस्यैवाहं तवैवाहं स एवाहमिति त्रिधा ॥

या क्रमानें प्रेमळभक्त गौणीभक्तिद्वारां पराभक्तींत प्रवेश करित असतो. एकदेशी व रजतममिश्रित प्रेमाचें स्थान व्यापक व शुद्ध सत्वात्मक प्रेमाला प्राप्त होतें, यावेळीं साहजिकच दृश्य जगाविषयीं तुच्छ, त्याज्य, निंद्य, मायिक-अशा कल्पना नष्ट होऊन 'म्हणे रमावल्लभदास । अवघा हरीचा विलास'च आहे असें वाटावयास लागतें. 'सर्व होऊनियां सर्वी' असणाऱ्या भगवंताची ही लीलाच आहे असें प्रतीतीस येते. अव्यक्त परमात्माच व्यक्त विश्वाचें पांघरूण घेऊन नटला आहे असा प्रत्यय येतो. चित्तचैतन्याची मिठी पडल्यामुळें सर्व सृष्टीच हरिरूप दिसावयास लागते. मन उन्मन होते; बुद्धि बोधाला माळ घालते. एकदेशी 'अहं' व्यापक बनतो. 'सा काष्ठा सा परागतिः' अशी ही अवस्था आहे. याच अवस्थेचें वर्णन श्रीशुकाचार्यांनीं ११ स्कंधांत

भक्त्या संजातया भक्त्याबिभ्रत्युत्पुलकां तनुम् ॥

असें केलें आहे. गौणीभक्तिद्वारां प्राप्त होणाऱ्या पराभक्तीच्या आनंदांत भक्त रंगून गेला म्हणजे देहभाव हारपून जातो. व अष्टसात्विक भाव उत्पन्न होतात. चित्त चकित होऊन आटूं लागतें, वाणी पांगुळ होते. आपादमस्तक रोमांच उठतात. अर्धोन्मीलित नेत्रांतून आनंदाश्रूंचा वर्षाव होऊं लागतो. आंतल्या सुखोर्मी आंत न मावल्यामुळें बाहेर सर्व शरीरास कंप सुटतो. सर्व रोममूळें स्वेदानें डबडबून जातात. अहाहा! खरोखर ही अवर्णनीय आनंदावस्था आहे. भक्तिभाग्याच्या सीमेवर पोहोंचलेले दैवाचे पुतळेच या आनंदाचा लाभ घेऊं शकतील. या अनिरूप्य प्रेममय अवस्थेंत भगवत्कृपेनें प्रवेश झाल्यानंतर श्रीतुकोबारायांच्या मुखांतून स्वयंस्फूर्तीनें बाहेर पडलेले बोल खरोखरच ब्रम्हज्ञान्यालाहि लाळ घोटावयास किंवा मुक्तांना आत्मस्थितीचा त्याग करावयास

लावतील यांत कांहीं शंका नाहीं. ते तसेच येथें दिल्यावांचून राहवत नाहीं—

स्थिरावली वृत्ति पांगुळला प्राण । अंतरीची खूण पावोनिया ॥ १ ॥
पुंजाळले नेत्र झाले अर्धोन्मीलित । कंठ सद्गदित रोमांच आले ॥ २ ॥
चित्त चाकाटलें स्वरूपामाझारि । न निघे बाहेरि सुखावलों ॥ ३ ॥
सुनीळ प्रकाश उदेजला दिन । अमृताचें पान जीवनकळा ॥ ४ ॥
शशिसूर्या झाली जीवें ओवाळणी । आनंदा दाटणी आनंदाची ॥ ५ ॥
तुका म्हणे सुखें प्रेमेसी डुल्लत । थिरलों निश्चित निश्चितीनें ॥ ६ ॥

तार्किकांना किंवा शब्दज्ञान्यांना हा अभूतपूर्व आनंद उपभोगावयास मिळणें शक्य नाहीं. भक्तिप्रेमसुख पंडित, वाचक, ज्ञानी, इत्यादिकांना अप्राप्त असतें असें महाराजांनीं अनेक ठिकाणीं म्हटलें आहे.

भक्तिप्रेमसुख नेणवे आणिका । पंडितां वाचकां ज्ञानियासी ॥ १ ॥
आत्मनिष्ठ जरि झाला जीवन्मुक्त । तरि भक्ति सुख दुर्लभ त्या ॥ २ ॥

९. भागवतधर्माचरणानेंच या दिव्य आनंदाचा लाभ होतो. असें प्रेमामृत ज्याला प्राप्त झालें आहे तो निरंतर त्याचेंच प्राशन करीत असतो, ' अनुभावें- ता कांहीं वेचे । वरि विटेहि ना ' असें हें सुख आहे. या सुखाच्या सेवनानें अंतःकरण तर तन्मय बनतेंच, पण इंद्रियांना सुद्धां याचाच हव्यास लागतो. ' पडिलें वळण इंद्रियां सकळां' अशी स्थिति होऊन जाते.

तत्प्राप्य तदेवावलोकयति । तदेव श्रृणोति तदेव चिंतयति ।

असें या स्थितीचें वर्णन नारदांनीं भक्तिसूत्रांत केलें आहे. या वेळीं 'नाठवूनि देह पायाचें चिंतन ' होत असतें. त्यांत क्षणाचाहि विश्राम नसतो. तसेंच उतारचढरहित असें तें प्रेम असतें. या प्रेमाचा आस्वाद घेत असतां तृप्ती- लाच भूक लागते. ' तृप्ती भुकेली काय करूं माये ' असे या स्थितीबद्दल श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं उद्गार काढले आहेत—

वत्स धालयाहीवरि । धेनू न वचावी दुरी ।
अनन्य प्रीतीची परि । ऐसीच आहे ॥ ७८ ॥
तेणें काजेवीणही बोलावें । तें देखिलें तरि पहावें ।
भोगितां चाड दुणावे । पढियंतया ठायीं ॥ ७९ ॥ अ. १८

प्रेमाची जात ही अशी असते. ती अवीट अवस्था आहे. ' वीट नाहीं पांडु- रंगीं । वाढे आर्त अंगीं तें ' म्हणून शपथपूर्वक श्रीज्ञानेश्वरमहाराज देवाजवळ म्हणत आहेत कीं—

तुझी आण वाहीन गा देवराया । बहु आवडसी जिवापासूनियां ॥ १ ॥

पांडुरंगाच्या आवडींत जीव सर्व संगाला विटतो. 'सगुण परि गुणातीत' प्रभूच्या दैवी गुणांवर मोहित झालेला गुणवान् भक्त निर्गुण भक्तियोगाच्या

आश्रयानेंच गुणभयाचें अतिक्रमण करून पराभक्तीचा अवर्णनीय आनंद अनुभवीत असतो. ब्रह्मरसानें अंगकांति पुष्ट झाली म्हणजे ब्रह्मरस अंगीं स्वात्मत्वानें ठसावला कीं, नीरस विषयांचा साहाजिकच विसर पडतो. सागरीं गंगा मिनली कीं, ती जशी मागें परतून पहात नाहीं तद्वत् ही प्रीतिगंगा आत्मसागराला जाऊन मिळालीं कीं, ती पुनः विषयाकडे परत फिरत नाहीं. याच आशयानें ' तुका म्हणे नोहे परती । तुझ्या दर्शनें मागुती ॥ तुका म्हणे चित्ता । वाटे न व्हावा परता ' असे उद्गार श्रीतुकोबारायांच्या वाणींतून बाहेर पडले आहेत.

१०. श्रीकृष्णांनीं अर्जुनास २ ऱ्या अध्यायामध्यें ब्राह्मीस्थिति प्राप्त झालेल्या स्थितप्रज्ञाचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत त्याच सर्व लक्षणांचा समावेश भक्ताच्या ठिकाणीं असतो असें स्पष्ट दिसून येतें. अभेदात्मभावनेमुळें ब्रह्मभूत तत्त्वज्ञ इष्टविषयहानि झाली असतां शोक मोहादि विकाररहित होतो. ' तत्र को मोहः कः शोकः एकत्वमनुपश्यतः ' ( श्रुति ). तसेंच सर्वात्मैक्यभाव त्यास प्राप्त झालेला असतो म्हणून तो कोणाचाहि द्वेष करीत नाहीं. ' सर्वं भूतांचिया ठायीं । द्वेषातें नेणेचि कहीं । आपपर नाहीं । चैतन्या जैसा '. त्याचप्रमाणें ' अहं च इदं च सर्वंच ब्रम्हैव ' अशी व्यापक अवस्था अंगीं बाणलेली असते म्हणून तो ' विनिवृत्तकाम ' असतो, तद्वत् भक्तिप्रेमरसांत रंगलेला भक्तभागवतहि परमात्मसुखापुढें सर्व विषयांचा केव्हांच त्याग करीत असतो. म्हणून इष्ट विषय नाश झाला असतां तो शोक तर करीत नाहींच पण परमार्थमार्गांतील हा एक कांटा नाहींसा झाला म्हणून त्यास अत्यंत हर्ष होत असतो. ' बरें झालें देवा निघालें दिवाळें । बरि या दुष्काळें पीडा केली ' हे श्रीतुकोबारायांचे उद्गार याच भूमिकेवरील होत. तसेंच तो अनुभवानें सर्व विश्वच स्वतः बनत असतो म्हणून द्वेषरहित असतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात—

आपणचि विश्व जाहला । तरी भेदभाव सहजचि गेला ।
म्हणूनि द्वेष ठेला । जया पुरुषा ॥ १ ॥

आपलें पारिखें जेथें निरसतें तेथें कोणीं कुणाशीं द्वेष करावा ! आपली जीभ आपल्या दातांत रगडली गेली तर त्याबद्दल कोणास शिक्षा द्यावी ? तेथ दांत पाडी कीं जीभ तोडी । काय करावें ? तद्वत् ' मीचि भूतें मीचि भोक्ता । माझ्या दुःखाचा मीच दाता ' अशा भावनेंत अज्ञानपूर्ण अवस्थेंत होणाऱ्या द्वेषाचा कसा रिघाव व्हावा ? तसेंच प्रेमसुखाचा आस्वाद घेणाऱ्या भक्तोत्तमाला भगवंतावांचून सर्व असार वाटत असतें. ' तुका म्हणे तूंचि खरा । येर वाउगा पसारा ॥ लटिका प्रपंच एक हरि साच ।' असा त्याचा बोध असतो, म्हणून ' इंद्रादिक भोग । भोग नव्हे तो भवरोग ' किंवा ' ब्रम्हादिक पदें दुःखाची शिराणी ।

असें त्यास वाटत असतें. अविनाशी व अवीट प्रेमसुखापुढें ऋद्धिसिद्धि आदि-करून विषयांची मुळींच किंमत नसते. ' ऋद्धिसिद्धि तुह्मां मुख्य भांडवल। आम्हांसी तें फोल भक्तीपुढें '. ज्ञानी जसा ' समदुःखसुखःस्वस्थः ' असतो तसा भक्तहि ' शीतोष्णसुखदुःखेषु समस्संगविवर्जितः ॥' असा असतो. भलते ठायीं आनंदांत निर्भर असल्यामुळें ' सुखदुःखा नाहीं चाड आम्हा ' असे उद्गार साहजिकपणें त्याच्या मुखांतून बाहेर पडत असतात. ' ठाव नाहीं सुख-दुःखा । नाचे तुका कौतुकें. ' सुखदुःखातीत होऊन देहभावना टाकून कौतुकानें निर्लज्ज होऊन ते नाचत असतात. आतां ज्ञानी पुरुष आपल्या अद्वैतबोधानें जिकडे तिकडे ' चिदेव पंचभूतानि चिदेव भुवनत्रयम् ' म्हणून चैतन्याचीच व्याप्ति अनुभवीत असतो.

ब्रह्मउन्मादपरमानंदे । जंव जंव देखे स्वानंदबोधें ।
तंव तंव चराचर पूर्णानंदे । स्वानंदकंदे दुमदुमित ॥ १ ॥ एक. भाग.

असें या ब्रह्मसद्भाव अवस्थेचें वर्णन श्रीएकनाथमहाराजानीं केलें आहे. याच-प्रमाणें भक्त भागवताचाहि " विष्णुमय जग " हाच धर्म म्हणजे स्वभाव असतो. 'तुका म्हणे अवघे दुमदुमिले देवे' अशी प्रतीति येते. 'पाहे तिकडे बाप माय । विठ्ठल आहे रखुमाई ' च दिसत असतात. आपल्या दिव्य ज्ञानदीपाच्या सामर्थ्यानें गुणदोषयातींचा विचार न करितां वाटेल त्याच्या अंतःकरणांतील अज्ञानांधकाराचा नाश करून त्यास पूर्ण मुक्त करण्याचें सामर्थ्य ज्ञानी पुरुषांच्या अंगांत असतें. तद्वत पराभक्तीच्या द्वारां यावज्जीवमात्रांना वैकुंठाचा अधिकार प्राप्त करून देण्याचें सामर्थ्य भक्तमहात्म्यांचें आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात—

ऐसे माझेनि नामघोषें । नाहींचि करिती विश्वाचीं दुःखें ।
अवघें जगचि महासुखें । दुमदुमित भरलें ॥ १ ॥
ते पहाटेवीण पहावीत । अमृतेवीण जिववीत ।
योगेवीण दावीत । कैवल्य डोळा ॥ २ ॥
परि रायारंका पाड धरूं । नेणती सानेयाथोरा कडसणी करूं ।
एकसरे आनंदाचें आवारूं । होत जगा ॥ ३ ॥
कहीं एकाधेनि वैकुंठा जावें । ते तिहीं वैकुंठचि केलें आघवें ।
ऐसें नामघोषगौरवें । धवळलें विश्व ॥ ४ ॥

१२. हें एवढें लिहिण्याचें कारण इतकेंच कीं, कित्येकांच्या मतें भक्ति म्हणजे फक्त ज्ञानाचें साधनच आहे. अंतःकरणांतील मलविक्षेप आवरणादि दोष-त्रयांपैकीं फक्त विक्षेप दोष नाहींसा करण्यापुरतीच तिची योग्यता आहे. ज्ञानोत्पत्ती-नंतर भक्ति स्वरूपानें शिल्लक रहात नसते, असा बऱ्याच वेदांतशास्त्राभिमान्यांचा आक्षेप आहे. परंतु भागवतधर्म या विधानाला आपली मान्यता देत नाहीं. ज्ञानो-त्तर ज्ञान व भक्ति हीं उभयताहि अवशिष्ट राहतात. भागवतधर्माचें (शास्त्राचें)

ज्यानीं विचारपूर्वक अध्ययन केलें असेल त्यांना हें विधान प्रत्ययास मुळींच विलंब लागणार नाहीं. अभेदभक्ति, ज्ञानोत्तर–भक्ति हें भागवतधर्माचें हृद्गत आहे, व भागवतधर्माचा हाच मुख्य सिद्धांत आहे. या सिद्धांताच्या प्रकाशांत श्रीज्ञानेश्वरमहाराज, श्रीएकनाथमहाराज, श्रीतुकोबारायप्रभृति भक्तश्रेष्ठांच्या वाङ्मयक्षेत्रांत प्रवेश केल्यास ' अद्वैतावरीहि भोगिजे ' असें भक्तिरूपी रत्न हाताला लागल्यावांचून राहणार नाहीं. श्रीमद्भागवतासारख्या ब्रह्मसंमत पुराणाचें रहस्यहि हेंच आहे हें त्यांतील अनेक प्रमाणांनीं सिद्ध करतां येण्यासारखें आहे. अभेदबोध व भक्ति एकत्र नांदणें शक्य नाहीं, असें ज्ञानाभिमानी युक्तिवादानें सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत असतात, तर भागवतधर्मीय संत मंडळींनीं दोनीहि एकत्र नांदतात असें आपल्या आचरणानें सप्रमाण सिद्ध करून दाखविलें आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात—

भक्तहि पैज न सरे । जरि ऐक्या आला ॥
ऐसा बोधचि केवळ । जो होऊनि असे निष्कळ ।
त्याहीवरी भजनशीळ । माझ्या ठायीं ॥
आंत बाहेरि योग । निर्वाळलेयाही चांग ।
तरि माझा अनुराग । सप्रेम जया ॥
विश्वचि माझें घर । ऐसी मती जयाची स्थिर ।
किंबहुना चराचर । आपण जाहला ॥
इतक्याहीवरी पार्था । माझिया भजनीं आस्था ।
तयातें मी माथा । मुकुट करि ॥

भगवंतहि अशाच भक्तावर विशेष प्रेम करीत असतात.

तरि तया ऐसे दुसरे । आम्हा पढियंते सोयरे ।
नाहीं गा साचोकारें । तुझी आण ॥
हे ना तो आवडे । मज जीवाचेनि पाडे ।
हेंही एथ थोकडें । रूप करणें ॥

असें सुद्धा श्रीकृष्णांनी अर्जुनाजवळ म्हटलें आहे.

१३. अभेदभक्तीचें मर्म पहावयाचें असल्यास तें श्रीएकनाथमहाराजांनीं भागवतांत ठिकठिकाणीं दाखविलें आहे—

देव देवपणें दाटला । भक्त भक्तपणें दाटला ।
दोहींचाही अंतु आला । अभेदु जाला अनंतु ॥ ८८ ॥
ऐसियाहीवरि अधिक सोसू । सायुज्यामाजि होतसें दासू ।
तेथील सुखाचा सौरसू । अति अविनाशू अगोचरू ॥ ८९ ॥

ये अभिन्नसुखसेवे आंतू । नारद आनंदें नाचत गातू ।
शुकसनकादिक समस्तू । जाले निजभक्तु येणेंचि सुखें ॥ ९० ॥

अद्वेष्टृत्वादिक जसे ज्ञानोत्तर लक्षण रूपानें राहतात, त्याप्रमाणें भक्तीहि लक्षणच नव्हे तर स्वभाव बनून जीवन्मुक्ति–अवस्थेंत असते असें मधुसूदन-सरस्वती स्वामींचें मत आहे.

जीवन्मुक्तिदशायां तु न भक्तेः फलकल्पना ॥
अद्वेष्टृत्वादिवत्तेषां स्वभावो भजनं हरेः ॥ १ ॥

'शिवोऽहं' या भावनेपेक्षां हा आनंद निरुपम आहे म्हणूनच 'निवृत्त-तर्षैरुपगीयमानात्'। 'आत्मारामाश्च मुनयोनिर्ग्रंथा अप्युरुक्रमे । कुर्वन्त्यहैतुकीं भक्तिं' असें श्रीमद्भागवतामध्यें शुकाचार्यांनीं अनेक ठिकाणीं म्हटलें आहे.

१४. श्रीकृष्ण भगवान् वृंदावनामध्यें गोपिकांशीं रासक्रीडा करीत असत, तेव्हां 'निमेषार्धं न तिष्ठंति वृत्तिं ब्रम्हमयीं विना' या उंच कोटींतील महात्मे श्रीशुकाचार्य लहानसा राघूचा वेष धारण करून तेथें एका बाजूस वृक्षावर बसून तो दिव्य असा पराभक्तीचा आनंद अनुभवीत असत हें सुप्रसिद्ध आहे, व याच पराभक्तीचा अनुभव घेण्याकरितां ते परमप्रेमरूपिणी राधेचे भक्त बनले. ( सर्व भागवत ग्रंथांत राधेचें नांव नाहीं याचें हेंच कारण होय, असें एका महात्म्याचें मत आहे. )

१५. निष्कामकर्मानुष्ठानपूर्वक चित्तशुद्धिद्वारां महावाक्योपदेशानें ज्याला ज्ञान प्राप्त झालें आहे, असा ज्ञानी ज्ञानोत्तर 'कर्तव्यं मे न विद्यते किंचित्' म्हणून स्तब्ध असतो, तर भगवदर्पणबुद्धीनें कर्में करणारा धर्माधर्मपरित्याग-पूर्वक भगवदेकशरण होऊन भगवत्कृपेनें ज्ञानाज्ञानातीत झालेला भक्तभागवत 'पिटूं भक्तीचा डांगोरा' म्हणून जीवमात्रांच्या आत्यंतिक हिताच्या कळव-ळ्यानें जगदुद्धारिणी भक्तीचा डांगोरा पिटीत असतो.

१६. कित्येकांना अशाहि अवस्थेंत भक्तियोगाचा आश्रय करणें म्हणजे जाणून बुजून द्वैतांत शिरणें आहे असें वाटतें. श्रीतुकाराममहाराजांना अनेकांनीं हा प्रश्न केला कीं "महाराज ! आपण सदैव 'मनीं भक्तीची आवडी' असे उद्गार काढीत असतां, पण त्यामुळें सर्वात्मक अशा ब्राह्मीस्थितीमध्यें खंड पडून, द्वैत उत्पन्न होईल, व हें द्वैतच सर्व अनर्थाला कारणीभूत असतें याची वाट काय ?" या प्रश्नास महाराजांनीं असें स्पष्ट उत्तर दिलें आहे कीं, मी जरी भक्ति-विषयक आवड दर्शवीत असलों तरी त्यामुळें ज्ञानपूर्ण अवस्थेंत भंग पडत असतो असें विधान करणें चुकीचें आहे. माझी सर्वात्मक अवस्था कोणीहि हरण करूं शकत नाहीं.

सर्वात्मकपण । माझे हिरोनि नेतो कोण ॥ १ ॥
मोक्षाचे आम्हांसी नाहीं अवघड । तो असे उघड गाठोडीस ॥ २ ॥

भक्त मोक्ष कां मागत नसतात याबद्दल श्रीएकनाथमहाराजांनीं एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं —

आधी असावें वेगळेपणें । तैं सायुज्यीं एक होणें ।
हें मुळींच अबद्ध बोलणें । सायुज्य न घेणें मद्भक्ता॥ १ ॥

मोक्ष नित्यप्राप्त म्हणून ते त्याची अपेक्षा करीत नसतात. ‘ तुका म्हणे कैंची कींव । कोठे जीव निराळा ॥ ’ हा त्यांचा सार्वकालीन अनुभव असतो. म्हणून प्राप्त पदार्थाची याचना करण्याचें त्यांना कांहीं कारण पडत नाहीं, तर अप्राप्त अशा प्रेमसुखाचीच याचना ते करीत असतात. तसेंच परमात्मा मोक्षदानाविषयीं जसा उदार आहे तितकाच भक्ति देण्याविषयीं तो कृपण आहे; असे भागवतांत एके ठिकाणीं स्पष्ट म्हटलें आहे. ‘ मुक्तिं ददाति कर्हिचित् न भक्तियोगं ’ असे हें दुर्लभ प्रेम अनन्यगतिक उपजत ज्ञानी म्हणून मोक्षनिरपेक्ष भक्तांनाच ‘ का सेवा म्हणती तरि आड । प्रेम सुये ’’ म्हणून देत असतो. इतरांना हें अप्राप्य आहे. हीच गोष्ट श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं एके ठिकाणीं सांगितली आहे—

पैंगा भक्तासि माझे कोड । मज तयांचे अनन्य गतीची चाड ।
कां जे प्रेमळाचे सांकड । आमुचिया घरीं ॥ १ ॥
पाहे पा स्वर्ग मोक्ष उपायिले । दोन्ही मार्ग तयांचिये वाहणी केले ।
आम्हीं अंगहि शेषा वेंचिले । लक्ष्मियेसीं ॥ २ ॥
परि आपणपेंवीण एक । ते तैंसेचि सुख साजूक ।
सप्रेमळालागी देख । ठेविले जतन ॥ ३ ॥

‘ भक्तास माझे कौतुक असतें व त्याच्या एकनिष्ठेची मला ( देवास ) इच्छा असते. कारण कीं, आमच्या घरीं प्रेमळांचा दुष्काळ असतो. अर्जुना ! पहा, स्वर्ग व मोक्ष हे दोन मार्ग आम्ही स्वर्गेच्छू व मुमुक्षु यांच्या रहदारीस खुले केले. आम्ही शेषाला लक्ष्मीसह आमचे शरीरहि विकून टाकिलें आहे, पण ज्यांत मीपणाचा लेशहि नाहीं असे जें ताजें प्रेमसुख तें तसेंच प्रेमळ भक्तांकरितां जतन करून ठेविलें आहे.

ज्ञानोत्तर भक्तिप्रेमसुखाचा घेतला जाणारा अनुभव ज्ञानरहित नसून ज्ञानसहित असतो. हा अभेदयुक्त भेद प्रेमामृताचा आस्वाद घेण्याकरितांच स्वीकारलेला असतो

‘ अभेदूनि भेद राखियला अंगीं । वाढावया जगीं प्रेमसुख ’ ॥

हे श्रीतुकोबांचे उद्गार प्रसिद्ध आहेत.

१६. सारांश, भागवतधर्मप्रतिपादित भक्तीची किंमत फक्त साधनापुरतीच नसून ज्ञान ही एक जशी स्वतंत्र भूमिका आहे, तशीच भक्तिभूमिकाहि स्वतंत्रच आहे हें ठरलें. तत्त्वज्ञानी आपल्या अवस्थेपासून केव्हांहि च्युत होण्याची इच्छा करीत नाहीं, तसा भक्तहि केव्हांहि या भक्तीचा त्याग करण्यास तयार होत नाहीं. इतकेंच नव्हे तर या स्थितींत क्षणाचाहि व्यत्यय भक्त सहन करणार नाहीं. ' भजनीं विक्षेप तेचि पैं मरण ' असें त्यास वाटत असतें. ' तुझियें चरणींचे तुटता अनुसंधान । जाईल माझा प्राण तत्क्षणीं ' इतकें तीव्र तें प्रेम असतें. या प्रेममय अवस्थेंत यदाकदाचित् अंतराय उत्पन्न झाला तर ' चंदनाची चोळी माझे सर्व अंग पोळी ' ' चंद्रमा करितो उबारा गे माये ' हा गोपिकांचा अनुभव प्रसिद्ध आहे.

तात्पर्य, वेदांतशास्त्रकारांनीं ज्ञान ही जशी अंतिम व स्वतंत्र निष्ठा मानिली आहे, तशी भागवतधर्मीयांनीं ज्ञानोत्तर प्रेमलक्षणाभक्ति ही स्वतंत्र निष्ठा मानली आहे. कारण, ' म्हणोनि जग असिकी वस्तुप्रभा । वस्तूचि पावे शोभा ' असा सर्वश्रेष्ठ सिद्धांत स्वानुभवानें जगाला पटवून देणारे श्रीज्ञानेश्वर-प्रभृति ' प्रगट गुह्य बोले । विश्व ब्रह्मचि केलें ' या अधिकारांतील समर्थ महात्मे—

' नाचत जाऊं त्याच्या गावा रे खेळिया सुख देइल विसांवा रे '

म्हणून खांदीं पताका हातीं टाळ घेऊन नाचत डुल्लत पंढरीच्या वारीस जातात, हा भागवतधर्माचा अलौकिकपणा नव्हे काय ?

---


# निबंधमाला-तिचें स्वरूप आणि कार्य

**कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर** यांची निबंधमाला सुप्रसिद्धच आहे. शास्त्रीबोवा मराठी भाषेचे गद्याचार्य आहेत. मालेचे मूळ ७२ अंक प्रयासानें मिळवून निबंधमालेवर ६४ पानांचा एक टीकापर निबंध शके १८२६ मध्यें ' सरस्वतीमंदिर ' मासिकांत रा. पांगारकर यांनीं लिहून प्रसिद्ध केला होता. तोच पुन्हां स्वतंत्र पुस्तकरूपानें छापला आहे. शास्त्रीबोवांचें संक्षिप्त चरित्र व नवीन अवतरणें ज्यास्त दिलीं आहेत. निबंधमालेचा हेतु, मालेंतील मुख्य व अवांतर विषय, मालेचे गुणदोष यांचें सविस्तर विवेचन यांत निर्भीडपणानें केलें आहे. किंमत ०।१० आणे.

पत्ता—**व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें.**

# पांगारकरांचीं पुस्तकें

१. **भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति चौदावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ०८ व्ही. पी. नें ०१२.

२. **संतचरित्रमालाः**—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४२ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ. सं. २५६ किं. रु. १०८.

३. **श्रीएकनाथचरित्रः**—श्रीएकनाथमहाराजांच्या चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ०१२.

४. **कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेकडो स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ०४.

५. **आनंदलहरीः**—( कवितासंग्रह ) यांत पांगारकरांच्या कवितांपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत, १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ०१२.

६. **नारदभक्तिसूत्रेंः**—( आवृत्ति ४ थी ) हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ०८.

७. **नवविधाभक्तिः**—( सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी ) यांत नवविधा-भक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ०६.

८. **निरंजनमाधवांची कविताः**—भाग १ किं. रु. भाग २ व ३ एकत्र किं. १॥ रु.

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्रः**—( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे किं. १०८.

१०. **भक्तिमणिमालाः**—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १०८

११. **सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टीः**—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध पुढारी कै. विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ०५.

१२–१३–१४. **मुमुक्षूंतील निवडक निबंधः**—भाग १ व २ किं. प्रत्येकीं १०८, भाग ३ रा किं. १०४.

१५. **मोरोपंती वेचेः**—( दुसरी आवृत्ति ) पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रहि नवीन दिलेलें आहे किं. रु. १०१२.

मुमुक्षु REG. No. B. 662

# पांगारकरांचीं पुस्तकें

१६. **पारिजातकाचीं फुलें**:—( तिसरी आवृत्ति ) परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ०८.

१७. **श्रीतुकारामचरित्र**:—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलाचा पंढरपूरचा व देहूचे सहा असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ. सह किं. रु. २.

१८. **श्रीतुकारामचरितामृत**:—तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं ०५.

१९. **निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य**:—निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख–विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ०१०.

२०. **मुक्तेश्वर**:—( चरित्र आणि काव्यविवेचन ) श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे प्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १.

२१. **मारुतिउपासना** ( चौथी आवृत्ति ):—किं. ०४.

२२. **सार्थ श्रीदासबोध**:—( आवृत्ति दुसरी ) किं. रु. ४ व्ही. पी. नें ४०१०

२३. **सार्थ मनोबोध**:—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ०१२.

२४. **समर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेंचे**:—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें ह्या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.

२५. **मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन )**:—किं. रु. २०८.

२६. **श्रीएकनाथी भागवत** (निर्णयसागर प्रेसचें, आवृत्ति तिसरी):—किं. रु. ६

२७. **श्रीसमर्थग्रंथभांडार**:—समर्थांची एकंदर कविता एकत्र सटीप छापलेली आहे. किं ४०८.


२८. **समर्थग्रंथभांडार** ( भाग २ रा ):—यांत दासबोधाशिवाय बाकीची समर्थांची सर्व कविता प्रकरणें पाडून व्यवस्थित दिली आहे. किं. रु. २०८.

२९. **ज्ञानेश्वरांची प्रभावळ**:—ज्ञानेश्वरमहाराज व त्यांचे समकालीन नामदेवराय, जनाबाई, चोखामेळा इत्यादि सर्वजातीय २५ संत यांच्या ग्रंथांतील निवडक वेंचे प्रस्तुत ग्रंथांत घेतले आहेत. यांत ज्ञानेश्वरांच्या २५०० ओव्या व सर्व संतांचे मिळून ४०० अभंग आहेत. सुंदर प्रस्तावना आहे. टीपा भरपूर आहेत. किं. रु. २.

पत्ता:—व्यवस्थापक " मुमुक्षु " पुणें शहर.

॥ श्री रुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेचि काळें । संसारीं होईजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष २४ वें | माघ १८५१ | नवें वर्ष १० वें |
| मास ६ वा | फेब्रुवारी १९३० | अंक २ रा |



संपादक व प्रकाशक,

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर. बी. ए.**

मुमुक्षुकचेरी, बुधवारपेठ, पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही. पी. नें रु. ३-८-३

मुद्रकः—लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव, घ. नं. ३०० येथें आपल्या "हनुमान" छापखान्यांत छापिलें.

# विषयानुक्रमणिका




| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ मंगलाचरण ... ... ... ... | १–३ |
| २ राजाराम रामकृष्ण भागवत ... ... ... | ४–८ |
| ३ आगरकरांचे विचार ... ... ... ... | ९–१६ |
| ४ ब्रह्मीभूत श्रीवासुदेवस्वामी धामणीकर ... ... | १७–३२ |
| ५ अनंतरावमामा यांचें चरित्र ... ... ... | ३३–३८ |
| ६ अजब चमत्कार ... ... ... .. | ३८–४० |


**वाचकांस:**—कांहीं अडचणीमुळें हा अंक निघण्यास विलंब लागला. मार्च व एप्रिलचा जोड अंक एप्रिल ता० १० ला रवाना होईल.

—म्यानेजर

---


नवीन आवृत्ति दुसरी

# सार्थ श्रीदासबोध

श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या दासबोध ग्रंथाची योग्यता लोकविश्रुत आहे. परमार्थ, प्रपंच व राजकारण यांची सांगड घालून ज्या महापुरुषानें महाराष्ट्राचा सर्व प्रकारें उद्धार केला त्याची ही दिव्यवाणी आहे. दासबोध ग्रंथ समजण्यास बिकट आहे म्हणून तो सर्वांस कळण्यास साह्य व्हावें या हेतूनें रा. पांगारकर यांनी दासबोधाची प्रत शुद्ध करून त्याचें मराठी सुबोध भाषांतरहि केलें आहे. प्रत्येक पृष्ठावर **वर मूळ व खालीं सरळ भाषांतर** असा हा ग्रंथ तयार आहे. डोमगांवची कल्याणस्वामींची प्रत धुळेकरांनीं प्रसिद्ध केलीच आहे. कल्याणस्वामींचे बंधु शिरगांवमठाचे अधिकारी दत्तात्रयस्वामी यांच्या हातची शके १६०६ च्या भाद्रपदमासांत लिहून तयार झालेली प्रत ग्वाल्हेरीस जाऊन अक्षरशः तपासून घेऊन व दोनहि प्रतींचा मेळ पाहून रा. पांगारकर यांनीं ही प्रत तयार केली आहे. ग्रंथाच्या प्रस्तावनेंत त्यांनीं दोनहि प्रतींचा मेळ घातला आहे, व १५० ठळक पाठभेद व ५० लेखनभेद दिले आहेत. पृ. सं. ७५०. सुंदर सोनेरी बाईंडिंग. किंमत ४ रु. व्ही. पी. नें ४८१०.

पत्ताः—व्यवस्थापक ‘ मुमुक्षु ’ पुणें शहर.

ग्रंथ संग्रहालय ठाणे

मुमुक्षु मासिक
वर्ष १० वें

# मंगलाचरण.

फेब्रुवारी १९३०
अंक २ रा.



ॐ नमो सद्गुरु अमरपती। अनुभव तोचि ऐरावती।
स्वानंदमदें भद्रजाती। उन्मत्तस्थिती डुल्लत ॥ १ ॥
उपदेशाचें वज्र तिख। छेदी संकल्पविकल्पपांख।
जड जीव ते पर्वत देख। निजस्थानीं सम्यक स्थापिसी ॥२॥
विवेकाचे पारिजात। वैराग्य सुमनीं घमघमित।
मुमुक्षुभ्रमर रिघोनि तेथ। आमोद सेविती चित्सुख ॥ ३ ॥
उपशम तोचि बृहस्पती। विश्वासें तुझा निकटवर्ती।
त्यास मानिसी अतिप्रीति। तो सभापती सदस्य ॥ ४ ॥
कृपाकामधेनूचीं खिल्लारें। श्रद्धावत्सांचेनि हुंकारें।
वोळल्या वोरसाचेनि भरें। तें दुभतें पुरें भागवतां ॥ ५ ॥
स्वर्गांगना अष्टमा सिध्दी। तुजपुढें नाचती नानाछंदीं।
त्यांसी दास न पाहती त्रिशुद्धी। मंदबुद्धी भाळले ॥ ६ ॥
समसाम्यें समान। अढळ तुझें सिंहासन।
सच्चिदानंदाची गादी जाण। तेथ सुखासन पैं तुझें ॥ ७ ॥
जे मन होमिताति सावधानीं। ऐसे भक्तजन देखोनी।
तेणें भावार्थ योगें संतोषोनी। निजपददानी तूं होसी ॥ ८ ॥

(एक. भा. अ. ९)

ॐ नमो श्रीगुरु सच्चिद्घन। वरुषताहे स्वानंदजीवन।
मुमुक्षुमयूर आनंदले जाण। हरिखे उड्डाण करिताती ॥ १ ॥
ते सजल देखोनि मेहो। सोहंभावें फोडिती टाहो।
रोमांचपिसीं पसरूनि पहाहो। सत्वें लवलाहो नृत्याचा ॥ २ ॥

आर्ततृषा तत्काळ बोळे । निवाले तेणें आनंदजळें ।
मग हरिखाचेनि कल्लोळें । सुख सोहळे भोगिती ॥ ३ ॥
सुभूमि देखोनि निर्मळ । जाणोनि वर्षती काळवेळ ।
वर्षों लागले जी प्रबळ । जलकल्लोळ अनिवार ॥ ४ ॥
तेणें बोळलेनि कृपाभरें । शिष्य सरितेसी पूर भरे ।
विकल्प वासर्णे एकसरें । महापूरें वाहविलीं ॥ ५ ॥
तेणें प्रवाहनिर्मळजळें । चिदैक्यसागरीं सरिता मिळे ।
मग समरसोनि तेणें जळें । राहे निश्चळ निजरूपें ॥ ६ ॥
अखंड वर्षता जळमळीं । वासनेचीं ढपें विरालीं ।
सद्भावाची ओल जाहली । वाफ लागली बोधाची ॥ ७ ॥
तेथें न पेरितांचि जाण । सहज निजबीजें परिपूर्ण ।
अंकुरली आपणिया आपण । सिद्ध संपूर्ण स्वभावें ॥ ८ ॥
फिटला दुःखदुष्काळू । जाला सुखाचा सुकाळू ।
बोळला सद्गुरु कृपाळू । आनंदकल्लोळ सच्छिष्या ॥ ९ ॥

( एक. भाग. अ. ११ )

---

## विषयसुखापेक्षां ब्रह्मानंद श्रेष्ठ कां ?

अर्जुना ! एक मोठें तळें । त्याभोंवतीं नाना जळें ।
तीं आश्रयेंच त्याच्या सकळें । नाना रूपें पाझरती ॥ १ ॥
वापी कूप विहिरें । सर्वत्र तेंचि पाणी पाझरे ।
ब्रह्म सुखाश्रयें अरे ! विषयसुखें हीं अवघींच ॥ २ ॥
परी जळ तळ्याचें पुष्कळ । पूर्ण करी काम सकळ ।
तैसा ब्रह्मानंद केवळ । पूर्ण करी मनोरथ ॥ ३ ॥
विहिरींत एका पादपाणी । धुतां होतें गढूळ पाणी ।
गोड कूपाचें गोडवणी । न करवे स्नान त्यामाजीं ॥ ४ ॥
वापींत केलें स्नान । परी न करवे वस्त्रक्षालन ।
न पाजवे वापीचें जीवन । तृषितां गाईंस आपल्या ॥ ५ ॥

ग्रंथ संग्रहालय ठाणे १५ ता. २२-३-३६

इत्यादि कार्यें सकळ । तळ्यामध्यें होती सकळ ।
अक्षोभ्य ज्यांतील जळ । ऐसा ब्रह्मानंद हा ॥ ६ ॥
विहिरीवापीकूपजळ । तैसे स्वर्गादि विषय सकळ ।
जें जें जेथें सुख फळ । ब्रह्मानंदीं सर्व तें ॥ ७ ॥
जो जाणे ऐसें ब्रह्म । जो बुद्धिगुहेंत आहे परम ।
तो भोगितो सर्व काम । एकसरा ॥ ८ ॥
अनंतानंत वेद । अनंतानंत सुखभेद ।
ते सर्वही जेथें अभेद । अनुभवी ज्ञाता ब्रह्म तें ॥ ९ ॥
नाना क्षुद्र कामना । सिद्ध होतां जें सुख जना ।
तें अनुभवितां एक निरंजना । सकळ सुखें ब्रह्मनिष्ठातें ॥ १० ॥
खातो जेव्हां आम्रफळ । भक्षितो तेव्हांचि गूळ ।
करूनि भक्षितां उभय फळ । उभयविलक्षण स्वाद तो ॥ ११ ॥
जे गोडी गुळीं । ते नाहीं केळीं ।
दोनी कालवितां तिजी वेगळी । ते गोडी नसे दोहींस ॥ १२ ॥
एकेचि वेळे सकळ । विषयभोग घडणें बाष्कळ ।
परि अनुभवितां ब्रह्म पुष्कळ । सकळ सुख त्या तृप्तींत ॥ १३ ॥
विषयसुखीं नाहीं तृप्ती । सुख म्हणतां दुःखप्राप्ती ।
ब्रह्मानंदीं समाप्ती । अवघिया कामाची ॥ १४ ॥
एक पावला फळ । तो दुसरियाकारणें तळमळ ।
हे न आढळे हळहळ । ब्रह्मानंदीं ॥ १५ ॥

—वामनपंडित ( यथार्थदीपिका अ० २ ).

# राजाराम रामकृष्ण भागवत (१८५१–१९०८)

१. निबंधमालेनंतर नांव घेण्यासारखा मराठी ग्रंथ म्हटला म्हणजे राजारामशास्त्री भागवत यांचा 'मराठयांच्यासंबंधानें चार उद्गार' (१८७७) हा होय. रा. रा. भागवत हे मुंबईच्या एका कॉलेजांत संस्कृत भाषेचे अध्यापक होते व मुंबईस त्यांनीं 'मराठा हायस्कूल' नांवाची स्वतःची इंग्रजी शाळा काढली होती. संस्कृत व मराठी दोन्ही भाषांचा व त्यांतील वाङ्मयाचा त्यांनीं उत्कृष्ट अभ्यास केला होता. फारशी व इंग्रजी ग्रंथही पाहिले होते. अध्ययन व अध्यापन यांतच त्यांनीं आपलें सारें आयुष्य घातलें. त्यांचीं कित्येक मतें व आचार लोकांस पटत नसत व तेही प्रायः कोणांत फारसें न मिसळतां आपलें काम निर्भीडपणानें व निर्लोभपणानें करीत. मनास योग्य वाटेल तें लिहावयाचें व बोलावयाचें, मग तें कोणास रुचो वा न रुचो, असा यांचा बाणा असे. 'चार उद्गार' या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत ते लिहितात, "प्रस्तुत पुस्तकांतील बराच मजकूर वादग्रस्त आहे. त्यासंबंधानें जितकी मऱ्हाटींत चर्चा होईल तितकी फार उत्तम. वाचकानीं पुढील मजकुरांत जीं कांहीं व्यंगें दिसतील तींच बेलाशक पाहिल्यानें प्रसिद्ध करावींत. जितकीं व्यंगें वाचक अधिक काढतील तितका मला जास्ती आनंद होईल व विचार करण्यास सवड सांपडेल. पत्रव्यवहार जरी निनांवी अथवा खमरीत असला तरी अवश्यमेव त्यांत विचार्य दिसेल तितकें घेऊन त्याचा विचार करण्यास आळस होणार नाहीं. विनाकारण अभिनंदनाचे चार शब्द लिहिण्यांत व उपकार मानण्यांत हांशील नाहीं." शास्त्रीबोवांचा हा सडेतोडपणा त्यांच्या आचरणांत व लिखाणांत यावज्जन्म राहिलेला स्पष्ट दिसत असे. अकराही उपनिषदांचें मराठी व इंग्रजी भाषांतर व त्यांवर ऊहापोह करणारी प्रस्तावना देऊन तीं सर्व प्रसिद्ध करण्याचें त्यांच्या मनांत होतें व त्याप्रमाणें त्यांनीं "**ऐतरेय उपनिषद्**" प्रसिद्ध केलें. पण इतर उपनिषदांकडे ते पुन्हां वळलेले दिसत नाहींत. त्यांनीं '**अलंकार मीमांसा**' '**संस्कृत भाषेची चिकित्सा**' '**ज्ञानेश्वरी महासागरांतील बुड्या**' इ० विषयांवर बरेंच लिहिलें आहे व मोरोपंतांच्या आर्येची छाननी व्हावी म्हणून त्यांनीं 'मोरोपंती आखाडा' ही काढला होता. पार्स व पार्सी धर्म, ब्राम्हण व ब्राम्हणी धर्म, मोगल व मोगली धर्म, व्रात्यस्तोम, विधवाविवाह सशास्त्र कीं अशास्त्र, आमची देशी भाषा विद्यापीठीं शोभण्यासारखी नाहीं काय, जशास तसें, प्रामाण्यबुद्धिविद्वेष, इ० लहानमोठीं चोपडींही प्रसिध्द करून त्यांनीं मुंबईकरांच्या विचारांस

त्यावेळीं मोठें चालन दिलें यांत शंका नाहीं. मराठी भाषेचा त्यांनीं चांगला पुरस्कार घेतला. तथापि भागवतांचा आवडता विषय म्हणजे भरतखंडाचा विशेषतः महाराष्ट्राचा इतिहास हा होय. मऱ्हाठा, मऱ्हाठी भाषा, मऱ्हाठे लोक, महाराष्ट्र मंडळ व महाराष्ट्रीयांचा भागवतधर्म यांविषयीं भागवतांचे ठिकाणीं उत्कृष्ट प्रेम व अभिमान जागृत होता व तो त्यांच्या सर्व लेखनाच्या मुळाशीं होता. त्यांनीं एकनाथ, शिवछत्रपति, संभाजी, रत्नाकरपंत आप्पा ( कोल्हापूरचे वीरमुत्सद्दी ), अहल्याबाई व सिंधोजी यांचीं स्वाभिमानपूर्ण त्रोटक चरित्रें लिहिलीं आहेत. तीं वाढत्या संशोधनामुळें जरीं मागें पडलीं असलीं तरी त्यांनीं त्या काळच्या लोकांत स्वाभिमानाची ज्योत उत्पन्न केली. यांचें बहुतेक लिखाण १८८३—१९०८ च्या दरम्यानचें आहे. भागवतांच्या सर्व विचारांचें व संशोधनाचें सार '**मराठ्यांच्या संबंधानें चार उद्गार**' ह्या एका ग्रंथांत केंद्रीभूत झालें आहे व मऱ्हाठी भाषेतील नामांकित ग्रंथांच्या नामावळींत ह्या ग्रंथास अवश्य स्थान मिळालें पाहिजे. सामाजिक सुधारणेसंबंधाचे भागवतांचे विचार कांहीं अंशीं लोकहितवादी, आगरकर, रानडे या परंपरेंतले होते व कांहीं अंशीं अगदीं स्वतंत्र होते. भटभिक्षुक व शास्त्रीपंडित यांजवर त्यांच्या 'कर्मठपणाबद्दल व कोत्या बुद्धीबद्दल' त्यांनीं पुष्कळ ठिकाणीं कोरडे ओढले आहेत, तथापि त्यांना शास्त्रविचार व धर्मबंधनें टाकाऊ वाटत नव्हतीं. नामधारी ब्राह्मणांवर, विशेषतः पेशव्यांवर व त्यांतही नानासाहेब पेशव्यांवर त्यांची फार करडी नजर होती, तरी ज्ञानेश्वरएकनाथांसारख्या ब्राह्मणांवर व त्यांनीं पसरलेल्या भागवतधर्माच्या तत्त्वांवर त्यांची पूर्ण निष्ठा होती. ब्राह्मणेतरांच्या कैवारानें त्यांनीं प्रसंगविशेषीं ब्राह्मणांवर भडिमार केला आहे. तथापि त्यांत उपहासद्वेषादि हीन वृत्तींचा लवलेश नसून सर्व महाराष्ट्रमंडळ एकजूट व्हावें या देशाभिमानाचे उदार बुद्धीनें त्यांनीं सर्व लिखाण केलें आहे. भागवतांच्या लेखांत कोठें कोठें एककल्लीपणा दिसतो, पण त्यांचे प्रगल्भ, उदार व देशाभिमानाचे पोक्त विचार आजही लोकांस मार्गदर्शक होण्यासारखे आहेत.

२. मऱ्हाठा शब्दाचा जुनाटपणा व त्याची व्युत्पत्ति, महाराष्ट्र देशाचे प्राचीन विभाग व मर्यादा, मऱ्हाठयांची अतिप्राचीन भाषा व अतिप्राचीन धर्म, मऱ्हाठयांचा अतिप्राचीन इतिहास, मऱ्हाठयांची मध्यंतरीय स्थिति, मऱ्हाठयांच्या अपयशाचीं सूक्ष्म कारणें, सामाजिक स्थितीच्या अनुमानाचें दिग्दर्शन, असे सहा भाग 'चार उद्गारांच्या' पूर्वार्धांत आहेत व मऱ्हाठयांच्या अंगीं स्वतःची स्थिति स्वतःच सुधरून घेण्याची योग्यता व सामर्थ्य आहे, मऱ्हाठे शुद्ध आर्य किंवा शुद्ध द्रविड नव्हत, हल्लींची स्थिति व ती सुधरून घेण्याचे कांहीं उपाय, इत्यादि विषयांचा ऊहापोह ग्रंथाच्या उत्तरा-

धींत केला आहे आणि उपसंहारांत प्रार्थनासमाजिष्टांस, जुन्या मंडळीस, नव्या मंडळीस, व सत्यशोधकांस महाराष्ट्रमंडळाचें एकपण कायम ठेवून त्याचा प्रताप दिगंतीं गाजविण्याविषयीं कळकळीची विनंति केली आहे. हा ग्रंथ प्रसिद्ध होऊन ४० वर्षे झालीं. इतक्या काळांत जें नवीन संशोधन झालें, नवीन विचारांच्या ज्या अनेक लाटा येऊन गेल्या व अजून येताहेत, नवीन ग्रंथ, नवीन परिस्थिति, नवीन शोध, नवीन संस्था, इ० प्रकारें राष्ट्राचा नवा संसार उभा राहून ज्या विविध आंदोलनांत राष्ट्र हेलकावे खात आहे त्या सर्वांचा विचार करूनही रा. रा. भागवतांचे हे 'चार उद्गार' अजूनही आमच्या राष्ट्रांतील तरुणांच्या विचारांस चालन देण्याइतके सकस आहेत अशी आमची समजूत आहे. सर्व मऱ्हाठ्यांनीं आपापसांतल्या फुटीचीं कारणें दूर करून पूर्वकालीं पूर्वजांचे हातून घडलेल्या चुकांपासून धडा घेऊन व त्या चुका दुरुस्त करून, शुष्क जात्यभिमान व क्षुल्लक स्वार्थबुद्धि यांस तिळांजळी देऊन उदारपणानें परस्परप्रेमानें वागावें व ऐक्याच्या जोरावर महाराष्ट्र-मंडळाची कीर्ति वाढवावी असा ह्या ग्रंथाचा निरोप आहे.

३. "जर प्रार्थनासमाजाचें मंदिर सार्वजनिक मऱ्हाठ्यांचें व्हावें अशी खरोखरच तुमची (समाजिष्टांची) इच्छा असली तर ब्रह्मद्वेषाचीं लिंगें काढून टाका व अस्सल मऱ्हाठ्याचा धर्म प्रार्थना समाजांत सुरू करा. रामाचें किंवा विठोबाचें नांव गाळून टाकणें व मऱ्हाठ्यांच्या देवताची टर करून मूर्तिपूजा पाप समजणें यांत निदान आम्हांस तरी शहाणपण दिसत नाहीं....ज्ञानेश्वर व रामदासस्वामी हे कांहीं सामान्य संत नव्हत. तरी त्यांचे अभंग किंवा ओव्या न घेतां क्वचित् प्रसंग पडल्यास एकट्या तुकारामाच्या अभंगांचा आदर करावयाचा, हें थोडेसें ब्रह्मद्वेषासारखें भासतें. महाराष्ट्रब्राह्मणांमध्येंही ज्ञानेश्वर व तुकाराम या दोहोंच्या संबंधानें भेदबुद्धि मुळींच नाहीं. तसेंच तुकारामास ज्ञानेश्वरापासून निराळें पाडण्याचा यत्न करून उगीच ब्रह्मद्वेषाच्या आरोपास पात्र होणें यात ब्राह्मण म्हणविणारे जे समाजांत आहेत ते मुळींच शहाणपणा करीत नाहींत असें म्हणणें भाग पडतें....तुकारामबोवांस देव मिळाला नव्हता असें प्रतिपादन करण्याची कोणाही प्रार्थनासामाजिकाची छाती नाहीं. तुकारामबोवा वारकरी होते व पंढरपूरनिवासिनीचें दर्शन होतांच प्रेमरसाच्या अलौकिक व अगाध लाटा त्यांच्या हृदयरूपी महासागरांत उसळत, तेव्हां ते मूर्तिपूजक होते याविषयीं आम्हां मऱ्हाठ्यांस तरी तिळमात्र शंका नाहीं. जी मूर्तिपूजा करून तुकारामबोवांसारखे व रामदास स्वामींसारखे जे उत्तम पद पावले तेंच पद आम्हांसहि मूर्तिपूजा करून त्यांच्या पावलांवर पाउल टाकून चालल्यास आम्हांस निःसंशय प्राप्त होईल. राममोहन गुणी होता व केशवचंद्रही गुणी होता, पण

मऱ्हाठयाच्या स्वलक्षणपणास आंधळें होऊन विनाकारण दुसऱ्याचें अनुकरण करणें, बिलकूल सोसत नाहीं."

४ "जुन्या मंडळीसही आमची हात जोडून प्रार्थना आहे. शिवाजी वगैरे मंडळी ज्या कुळांत जन्मली तीं कुळें अस्सल क्षत्रियांचींच असलीं पाहिजेत. 'नंदांत क्षत्रियकुलं' हें हवें असल्यास मगध देशाला लागूं होईल, पण आमच्या महाराष्ट्र मंडळास कदापि लागूं होणार नाहीं. आमचे पूर्वज अस्सल क्षत्रिय समजत. गागाभट्टानें शिवाजीची मुंज केली ती असला विचार केल्याशिवाय नव्हे. दुराग्रहानें त्यांस कुळंबट, शूद्र म्हणणें शोभत नाहीं एका चाकानें गाडें चालत नाहीं. तसेंच महाराष्ट्र मंडळाचें खटारें एकटया ब्राह्मण जातीच्या बळानें चालणें नाहीं....पूर्वीच्या काळीं आपले पोटभेद मोडून जाती एकवटणें हें आपलें कर्तव्य आम्हीं समजतों.

५. "'सत्यशोधक' समाज व 'दीनबंधु' या दोहांमधी आमची हात जोडून विनंती आहे कीं, उगाच ब्रह्मद्वेष करणे व ब्राह्मणांच्या विरुद्ध क्षुल्लक व कुत्सित मनाच्या पुरुषांनीं लिहिलेल्या कचऱ्याच्या पेटींत टाकण्यासारख्या लेखांनीं द्वेष माजविणें यांत बिलकूल शहाणपण नाहीं. ज्या एकनाथस्वामींनीं अतिशूद्रांचाही उद्धार व्हावा या हेतूनें सर्व धर्मतत्व मऱ्हाठींत उतरविलें व ज्या अनंत भट्टानें चोख्यासारख्या अतिशूद्राचे प्रासंगिक अभंग लिहून ठेवले तेही जातीचे ब्राह्मणच होते. एकट्या ब्राह्मणजातीच्या हातून महाराष्ट्र मंडळाचें गाडें चालणें नाहीं, तसेंच एकटया क्षत्रियजातीच्याही हातून चालणें नाहीं. शिवाजी महाराजांसारखे अवतारी क्षत्रिय ब्रह्मद्वेष करणारे नव्हते. धर्मप्रकरणीं व राज्यप्रकरणीं ब्राह्मणांचे अशेष महाराष्ट्र मंडळावर झालेले उपकार जर आज क्षत्रिय विसरले तर कृतघ्नतेचा मोठा आरोप त्यांजवर येऊन महाराष्ट्र मंडळीचें अतिशय नुकसान होईल. जे ब्राह्मण तुम्हांस कुळंबट म्हणून तुमच्या वित्तादिकांचा अभिलाष करितील त्याच्याबरोबर तुम्ही वाद खुशाल चालवावा, महाराष्ट्रांतील दरोबस्त ब्राह्मणजातीवर कृपा करून उतरूं नये..."

"जरी देवगिरीचें राज्य ज्ञानेश्वरांच्या पश्चात् अविंधांनीं लौकरच रसातळास नेलें, तरी त्यांच्यासारख्या ब्राह्मणांनीं व नामदेवासारख्या ब्राह्मणेतरांनीं या काळीं पाजळलेल्या धर्मदीपाचा प्रकाश (महाराष्ट्र) मंडळभर पडला होता. धार्मिकपणा देवानें अमुक जातीस आंदण दिलेला नाहीं. एकनाथ जरी ब्राह्मण होता तरी तो थोर व उदार मनाच्या ब्रह्ममय ब्राह्मण फळींतील होता, कोत्याबुद्धीच्या कर्मठ फळींतील नव्हता...जो पुरुष महाराष्ट्र मंडळांत जन्मून-- मग तो ब्राह्मण असो किंवा अतिशूद्रांत किंवा अविंधांत ब्राह्मणेतर असो--जसें शिवाजीच्या नांवानें व करणीनें तसेंच एकनाथाच्या नांवानें व करणीनें आपले

कर्ण पवित्र करून घेत नाहीं, तो केवळ अभागी होय. " ( एकनाथ चरित्र )

" ख्रिस्ती धर्माचें जुनाट रूप क्याथोलिक मत, अविंधी धर्माचें जुनाट रूप सुन्नी असून ब्राम्हणी धर्माचें जुनाट रूप कर्मठांच्या संप्रदायांत आपण पाहतों. नवीन रूप ख्रिस्ती धर्माच्या प्राटेस्टंट मतांत, अविंधांच्या शीया मतांत व ब्राम्हणांच्या भागवत धर्मांत आढळतें. जुनें रूप परमताचें अतिशय असहिष्णु असतें...आपल्या देशबांधवांचा, भाषाबांधवांचा उत्कर्ष प्रत्येक थोर पुरुषास हवा असतो. ...शिवाजी हा अलौकिक पुरुष होता. त्यानें महाराष्ट्र मंडळांत बिलकूल भेददृष्टि ठेविली नाहीं. अंगांत गुण असले म्हणजे जातीचा कोणीही असो त्यास बढती करून घेण्यास आयास पडत नसत. शिवाजीनें आपल्या पदरच्या प्रत्येक लहानमोठ्या अधिकाऱ्याच्या व शिपायाच्या हृदयभूमींत लाविलेल्या स्वामिनिष्ठेच्या रोप्यानें देशाभिमानाचें पाणी वर हवें तितकें ओतलें गेल्यामुळें मुळें इतकीं खोल धारिलीं होतीं कीं, त्याच्या पश्चात् शिवाजीचें पुरें शिष्यत्व संपादन केलेल्या संताजी, धनाजी, प्रल्हादपंत व रामचंद्रपंत या थोर पुरुषांनीं पुढें सरसावून महाराष्ट्र मंडळाचा सगळा भार आपल्या डोकीवर घेतला; व हिंदुस्थानातल्या पैशास व दाण्यास दक्षिणेंत खेळण्यास लावून व औरंगजेबास अगदीं हैराण करून, अखेरीस अकृतार्थच प्राणत्याग करावयास लाविलें. " ( शिवछत्रपतींचें चरित्र ).

" आम्हा मराठ्यांमध्यें आपलें मऱ्हाठेपणा पाहिल्यानें कायम राखून जो प्रयत्न चालवील त्यासच यश येईल. आमची मऱ्हाठी भाषा इंग्रेजी भाषेप्रमाणेंच जित्त झऱ्याचें पाणी आहे...सर्व महाराष्ट्रांत एक मूठभर महाशास्त्री व ओंजळभर पुराणिक अमतील ते सोडून अशेष ब्राम्हणवर्ग व राहिलेले अशेष तीनही वर्ण प्रायः पुंडलिकीमार्गाचे ( भागवतधर्मी ) आहेत.........मराठी भाषा जागती असून आगमाची भाषा आहे...शिवाजीमहाराजांनीं मऱ्हाठशाही स्थापिली ती क्षत्रिय, ब्राम्हण व कायस्थ या तिहींचा एकोपा होता म्हणून. या तीन जातींत महाराजांनीं वाणीनें व कृतीनें ओतलेलें मऱ्हाठेपण कायम होतें म्हणून पुढें राजारामाच्या वेळेस दिल्लीपतीस अकृतार्थ मरावें लागलें....( चार उद्गार ).

—राजाराम रामकृष्ण भागवत.

# आगरकरांचे विचार

## १ सोंवळेंओंवळें.

१ सोंवळें किंवा शुचिता आणि ओंवळें किंवा अमंगलता यांपैकीं पहिला गुण संग्रहणीय व दुसरा त्याज्य आहे. शुचितेची सर्व वर्गांत जितकी वृद्धि होईल तितकी होणें इष्ट आहे. ब्राम्हण लोकांचें स्वयंपाकघर व स्वयंपाकाचीं भांडीं, जेवण्याचीं ताटें व पाणी पिण्याचीं भांडीं, मुखमार्जन व स्नानविधि झाडसारवणें वगैरे गोष्टींत जी बरीच स्वच्छता दिसून येते ती इतर वर्गांनीं अनुकरण करण्यासारखी आहे. तेव्हां ज्या सोंवळयाचा स्वच्छतेशीं संबंध आहे तें रक्षणीय आहे. तसेंच जें ओंवळें म्हणजे अमंगलता तें त्याज्य आहे. यापलीकडे सोंवळयाओंवळयाचा बडेजाव करणें म्हणजे वर्गावर्गांत सलोखा न होण्यासारखी अट घालून ठेवण्यासारखें होय. "

## २ समाज.

२" समाज हा स्वाभाविकपणें ज्यास अनेक पैलू आहेत अशा खडयासारखा आहे. असला खडा खाणींतून नुक्ताच काढला असल्यास, विशिष्ट आकार, सफाई किंवा तेज यांपैकीं कोणतेच गुण त्यांत नसतात; पण कल्पक सुवर्णकाराकडून जसजसें त्यावर घर्षण होत जातें तसतसें त्यास अधिक मोहक स्वरूप येत जातें. देशांतील विचारी लोक हे कल्पक सुवर्णकार होत, व समाज हा त्यांच्या हातीं दिलेला पैलूदार खडा होय. "

## ३ सामान्यजन व महात्मे.

" भाविक व अभाविक, सुधारक व दुर्धारक, धर्मनिष्ठ व पाखंडी यांपैकीं हजारांत नऊशें नव्याण्णव लोक खुशालचेंडू असतात ! कोणत्याही गोष्टीकरितां मानेवर खडा ठेवून घेऊन किंवा भूकतहान वगैरे पडतील ते हाल सोसून श्रम करण्याचा त्यांचा मगदूर नसतो. व्याख्यानास जावें, गोडगोड बोलावें, पांचचार वर्तमानपत्रांस किंवा एखाद्या दुसऱ्या पुस्तकास उदार आश्रय द्यावा, मनाची फारच प्रसन्नता असल्यास एखादें छोटेखानी व्याख्यान झोडावें किंवा लहानसें आर्टिकल खर्डावें, आणि फारच झालें तर प्रसंगविशेषीं ज्यानें त्यानें पवित्र मानलेल्या कामास रुपया दोन रुपये वर्गणी द्यावी इतकें केलें म्हणजे बहुतेकांची शिकस्त होते. आईबापांची किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांची मर्जी खप्पा न होण्याविषयीं जपावें.........बुद्धिमंदिरांत सत्याचा दीप प्रकाशित झाल्याबरोबर वृत्ति

आनंदमय होऊन एका प्रकारें ज्याचें देहावसान सुटतें असा एखादा महात्माच आईबापांची, गणगोताची, धनद्रव्याची, जातीची, देशाची, किंबहुना समग्र मनुष्यतेची पर्वा न ठेवतां अन्तरोत्थित अमर्याद प्रेरणाबळाच्या भरंशावर हवें तेवढें महत्कृत्य हातीं घेऊन तें तडीस नेतो! सामान्य मनुष्यांनीं अशा नरवराचें आश्चर्य करावें, पूजन करावें, स्मरण करावें, शिष्यत्व करावें, पण अनुकरण करूं नये.

## लोकांत राहून सुधारणा करूं.

४. आगरकरांचे जुन्या समाजावर वारंवार हल्ले होऊं लागले तेव्हां 'तुम्ही सुधारक लोक आपली वेगळी जात कां करीत नाहीं?' असा त्यास जुन्यांकडून प्रश्न येऊं लागला. त्यांस चारदोन वेळ उत्तरेंही दिलीं. त्यापैकीं एका उत्तरांत पुढील अत्यंत समंजसपणाचा भाग आहे:—" लोकांची सुधारणा व्हावी अशी ज्यांची खरी इच्छा असेल ते लोकांपासून अजीबात तुटून निघाल्यानें ती कधींच होण्याचा संभव नाहीं......हिंदु धर्मांत बरींच व्यंगें आहेत म्हणून यहूदी, महंमदी, ख्रिस्ती किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या एखाद्या धर्माचा अंगीकार करणाऱ्या मनुष्यास विचारी ही संज्ञा सहसा देतां येणार नाहीं. तसेच आमचे कांहीं रीतरिवाज मूर्खपणाचे आहेत म्हणून प्रत्येक गोष्टींत परकीयांचें अनुकरण करणें हेंही कोणत्याही दृष्टीनें ज्याचें त्याला किंवा परिणामीं विशेष सुखावह होण्याचा संभव नाहीं असें आम्हांस वाटतें. उदाहरणार्थ, कित्येक प्रसंगीं धोतरें नेसणें सोईस्कर नाहीं म्हणून युरोपियन लोकाप्रमाणें दिवसभर पाटलोन घालून बसणें किंवा ते लोक विशेष कामाकडे कागदांचा उपयोग करतात म्हणून आपणही तसें करणें हें केवढें मूर्खपण आहे बरें! ज्या देशांत आपले शेंकडों पूर्वज जन्मास आले, वाढले व मरण पावले, ज्या देशांतील हजारों पिढ्यांनीं अनेक गोष्टींत मोठ्या कष्टानें केलेल्या अनेक सुधारणांचें फळ आपणांस ऐतेंच प्राप्त झालें अशा देशांतील धर्माचा, रीतिरिवाजांचा सर्वथैव त्याग करणाऱ्या मनुष्यास खऱ्या सुधारकाची पदवी कधींही शोभणार नाहीं. स्वभूमींत, स्वलोकांत आणि स्वाचारांत राहून अविचारी व अज्ञान देशबांधवांच्या निंदेस किंवा छळास न भितां, त्यांच्याशीं कधीं भांडून, कधीं युक्तिवाद करून, कधीं लाडीगोडी लावून अथवा सामर्थ्य असल्यास कधीं त्यांना दटावून त्यांची सुधारणा करणें यातच खरी देशप्रीति, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरें शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे. याच्या उलट जे वर्तन करितात ते सुधारणा करीत नाहींत तर फक्त शृंखलांतर करितात! अशांच्या कपाळीं लिहिलेली खरी गुलामगिरी कधींहि सुटावयाची नाहीं. भरतखंडांत अशा प्रकारचे नवीन गुलाम उत्पन्न होण्यापेक्षां तें आहे त्या प्रकारचेंच गुलामांचें राष्ट्र राहिलें तरी हरकत नाहीं! पण अली-

संग्रहालय

कडील चिन्हांवरून आम्हीं नवीन खोड्यांत आपले हातपाय अडकू न देतां ते जुन्या खोड्यांतून बेताबातानें काढून घेण्यास समर्थ होऊं अशी आशा दिसत आहे! या उप्पर भवितव्यता काय असेल कोणा जाणे!

श्री भगवद्गीतेंतील 'श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात् स्वनुष्ठितात्' या श्लोकाचें हें नवीन भाषेंत लिहिलेलें सुंदर भाष्य आहे असेंच म्हणावेंसें वाटतें. आगरकरांचें अंतरंग असें आपलेपणानें भरलेलें असल्यामुळेंच ते लोकांच्या प्रेमास पात्र झाले आहेत.

## ५ हिंदु व ख्रिस्ती.

"आम्हीं चालू हिंदुधर्मावर कितीही तीक्ष्ण प्रहार केले तथापि आमचा देश ख्रिस्ती व्हावा ही नुस्ती कल्पनाही आम्हांस सहन होणारी नाहीं."

## ६ पुण्याचे लोक!

६ "पंडिता रमाबाई 'इतर देशांत स्त्रियांनीं कसकसे पराक्रम केले' हें सांगण्याकरितां पुण्यास आल्या. हिराबागेंत त्यांचें व्याख्यान झालें. तें ऐकून घेण्याइतका देखील सभ्यपणा पुण्याच्या लोकांनीं दाखविला नाहीं. अश्लील शब्दांचें याना बाळकडूच मिळालें आहे. तुम्हांस जोंपर्यंत स्त्री तुमची दासी होय असें वाटतें व स्त्रीजातीविषयीं व त्यांच्या असाधारण गुणांबद्दल पूज्यबुद्धि उत्पन्न झाली नाहीं, तोंपर्यंत हा उद्दामपणा व बेशरमपणा जाणें फार कठिण आहे" असा आपला पुण्याच्या श्रेतृसमाजावरील कोप प्रगट करून आगरकर म्हणतातः—"तुम्हांला चटोरपणाची, अपमान करण्याची, कृतघ्नपणाची इतकी संवय लागून गेली आहे, कीं वामनरावांपासून तो थेट विनाकारण बी. ए. (वामनराव रानडे ज्ञानचक्षुकर्ते) पर्यंत असें करण्यांत तुम्हांला गौरव वाटतो. विद्येनें, अधिकारानें, संपत्तीनें, सहिष्णुत्वानें व इतर पुष्कळ नैसर्गिक गुणांनीं तुमच्याहून जे श्रेष्ठ त्यांची विटंबना व अवहेलना करणें (व ती तरी कोणाकडून- तर ज्या पोरांना विद्येचा गंध नाहीं, देशसुधारणा, देशसेवा, सामाजिक सुधारणा अशा विषयांवर मत देण्यास ज्यांना अधिकार पोंहचत नाहीं अशा पोरांकडून) यासारखें महत् पातक दुसरें कोणतें?... वाचाळपणा तर पुण्यांत इतका माजला आहे कीं वाटेल त्या विषयावर बोलावें व यथेच्छ तोंडसुख घ्यावें! असा पुरुष एखादाच सांपडेल कीं, जो विषयासंबंधानें पूर्ण माहिती मिळवून बोलेल. मोठ्या माणसांस भरसभेंत बेजबाब करणें, वडील माणसांचा मान न राखणें, अश्लील शब्द उच्चारणें, अर्थाचा अनर्थ करणें, ह्या गुणांचं आदिपीठ पुणें शहर होऊन बसलें आहे. .. पुण्यांतील लोकांनो, ज्यांना ज्यांना तुमची आंतली माहिती आहे ते सर्व तुमची दिखाऊ विद्वत्ता पाहून गालांतल्या गालांत हांसतात. कांहीं लोकांना तर तुमचा वृथाभिमान, पोकळ गर्व व

वरकांती विद्या पाहून तिटकारा येतो. बरें, इतकेंही असून बढाई कोण ! ह्याला काय येतें, त्याला काय येतें, तो कोण शाहाणा, अशी तर घमंडी ! ”

पुण्याच्या लोकांवर व श्रोतृवर्गावर या प्रकारचे, आरोप गेल्या ४०।५० वर्षांत अनेकांनीं केले आहेत व ते अगदींच खोटे आहेत असें म्हणवत नाहीं. पण यास जबाबदार कोण ? वेदशास्त्रें पुराणें, शास्त्री, पंडित, जुन्या विद्या, अनेक धार्मिक व सामाजिक परंपरा, यांवर यथेच्छ तोंड सोडून लोकांच्या अभिरुचि बिघडविणारे सुधारक कीं दुसरें कोणी ? वडिलांचें वडिलपण ज्यांनीं राखलें नाहीं त्यांचें वडिलपण त्यांच्या अनुयायांनीं राखलें नाहीं तर यास जबाबदार कोण ?

## ७ सामाजिक सुधारणा आधीं कां ?

७ “ राजकीय दृष्टीनें सध्यां आम्ही मेल्यासारखेंच आहों, पण ज्यांनीं आम्हांस राजकीय शून्यता आणली आहे त्यांच्याच सान्निध्यामुळें आमच्या धार्मिक व सामाजिक गाढ मूढतेस धक्के बसूं लागले आहेत. इंग्रज लोक आह्मांस जें शिक्षण देत आहेत व त्यांच्या अंमलांत विचारस्वातंत्र्याचा जो उपयोग आह्मांस प्राप्त होत आहे, त्या शिक्षणाच्या आणि विचारस्वातंत्र्याच्या बळशांनीं आम्हांस जागृति होऊं लागली आहे. पुष्कळांचा असा समज आहे कीं, ‘ सुधारणेचा आरंभ होणें तो राजविषयक सुधारणेपासून झाला पाहिजे. स्वातंत्र्य हें सर्वांस प्रिय आहे व आमची राजकीय सुधारणा म्हणजे आमच्या नष्ट झालेल्या स्वातंत्र्याच्या पुनःप्राप्तीविषयीं प्रयत्न करणें होय. सुधारक हे धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या छंदांत न पडतील तर सर्वांस इष्ट अशा ज्या राजकीय, व्यापारीय, शिक्षणीय व इतर सामान्य सुधारणा त्या एकमतानें करण्यास पुष्कळांची प्रवृत्ति होणार आहे. सामाजिक व धार्मिक गोष्टींविषयीं तंटे उपस्थित केल्यामुळें राजकीय गोष्टींत एकदिलानें वागणें दुरापास्त आहे. ’ या आक्षेपास असें उत्तर आहे कीं, राजकीय सत्ता तुमच्या हातीं असून व सामाजिक व धार्मिक प्रकरणांत पूर्ण ऐकमत्य असून तुम्ही परशत्रूंस हार कां गेलां ? पेशवाईचा जो मोड झाला तो आमची धार्मिक व सामाजिक स्थिति पाहिजे होती तशी नव्हती म्हणून झाला. आणि येथून पुढेंही आम्हांस सुदशा प्राप्त होण्यास व ती कायम राहण्यास आम्ही आपली गृहस्थिति व धर्माचार सुधारण्याचा प्रथम प्रयत्न केला पाहिजे, व तो करण्यास सांप्रतचा काळ अत्यंत अनुकूल आहे....ह्या समाजरूप बुडख्याला धर्म, राज्य आणि सामाजिक व्यवहार या तीन खांद्या किंवा हे तीन अंकुर एकदम फुटतात. समाजाच्या शरीराचे धर्माचार, राज्याचार आणि समाजाचार हे तीन मुख्य भाग आहेत. सर्वांआधीं गृहाचाराचें संशोधन केलें पाहिजे, ह्मणजे कुटुंबस्थिति सुधारली

पाहिजे....कोणी राजकीय, कोणी धार्मिक, कोणी सामाजिक आचारांस प्रमुखत्व देऊन इतरांस तदनुषंगी करितात. सामाजिक सुधारणेच्या अगोदर राजकीय सुधारणा झाली पाहिजे व बहुशा होते असें क्लि. थॅ. लेस्ली यांनीं युक्तिच प्रतिपादन केलें आहे. उलट धर्मसुधारणा झाल्याखेरीज दुसरी कोणतीही सुधारणा होणें शक्य नाहीं असें प्रतिपादणारेही युरोपांत पुष्कळ विद्वान् आहेत. राजकीय, धार्मिक व सामाजिक सुधारणांपैकीं प्रथम कोणती होते व करावी याविषयीं कितीही मतभेद असले तरी सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्यास आज आम्हांस जितका अनुकूल काल प्राप्त झाला आहे तितका पूर्वी कधींच प्राप्त झाला नव्हता." म्हणून सामाजिक सुधारणेचाच पुरस्कार करण्याचें आगरकारानीं आपलें ध्येय ठरविलें.

## ८ शिक्षण.

मानसिक व शारीरिक क्षीणता, दारिद्य, पारतंत्र्य, धर्मसंबंधानें वेड्याखुळ्या समजुती, जातिभेदासारखे हजारों पिढया चालत आलेले जबरदस्त निर्बंध इत्यादिकांनीं गांजून, पिळून, अथवा चिरडून जाऊन मरणोन्मुख झालेल्या देशास शिक्षणावांचून दुसरा तरणोपाय आहे असें आम्हांस वाटत नाहीं. प्राथमिक शिक्षणाची सरोस सोय करणें हें सरकारचें अवश्य कर्तव्य आहे, त्याची त्यानें सक्तीच केली पाहिजे.

पापणीला पापणी लागू न देतां उभ्या रात्री जागत काढणें, मोटयाच्या मोटा धुणीं धुणें, कोणत्याही प्रकारच्या देहधर्मास कधींही कंटाळून न जाणें, तात्पर्य प्राणापेक्षां पोरास जपणें हें अवघड काम स्त्रीच करते व तीच करूं शकणार आहे. तेव्हां ज्या स्त्रीवर अपत्यसंगोपनाचें येवढें जबाबदारीचें काम आपण सोंपवितों तिला अक्षरशत्रु असूं देणें अत्यंत अहितकर आहे.

"तारुण्यवसंत प्राप्त होऊन शरीरद्रुमावर पालवी, मोहोर, व सूक्ष्म फलनिर्भर यांचा आविर्भाव झाला असतां ते किती रमणीय दिसतात हें कोणास सांगायाला पाहिजे असें नाहीं. ही रमणीयता पराकाष्ठेची मोहक आहे व हिच्या भरांत पाणिग्रहण केल्यानें कधीं कधीं प्रमाद होण्याचा संभव आहे हेंही आम्हांस कबूल आहे. पण त्याबरोबर हीहि गोष्ट लक्ष्यांत ठेवली पाहिजे कीं, विवाहापासून उत्पन्न होणाऱ्या अत्युत्कृष्ट सुखाचा उपभोग अशा ऋतूंत युवयुवतींत स्वेच्छेनुरूप पाणिग्रहण करूं दिल्यानेंच होण्याचा संभव आहे." "शकुंतला, मालती, सुभद्रा, वत्सला, दमयंती किंवा इतर पौराणिक व काल्पनिक स्त्रिया, व दुष्यंत, माधव, अर्जुन, अभिमन्यु, नल अथवा इतर पौराणिक व काल्पनिक पुरुष, यांच्या प्रकृतींत व आमच्या प्रकृतींत जमीनअस्मानाचें अंतर पडलें आहे असें आम्हांस बिलकूल वाटत नाहीं. तारुण्य, आरोग्य, बुद्धि,

संपत्ति, स्वरूप, विद्या व ललितकलानैपुण्य जितकें त्यांना प्रिय होतें तितकें आम्हां-सही आहे." "ज्यांच्या अवयवांची पूर्ण वाढ झाली आहे, ज्यांच्या शरीराच्या प्रत्येक भागा वर तारुण्याचें तेज चकाकत आहे, विषयवासना जागृत झाल्यामुळें उल्हासानें व उत्कंठेनें अननुभूत सुखास्वादांत अहर्निश चिंतनानें ज्यांच्या अंगव्यापारांत दृष्टींत व चर्चेंत लज्जा, अधीरता, साशंकपणा वगैरे परस्परविरोधी अनेक मनोविकार वारंवार प्रतिबिंबित होऊं लागले आहेत; एकमेकांस प्रिय होण्याविषयीं ज्याचे हरएक प्रयत्न चालले आहेत; विद्या, वित्त, सौंदर्य वगैरे गुणांनीं आपणांस होईल तितकें अलंकृत करून अन्योन्यास मोह पाडण्याविषयीं जे अहोरात्र झटत आहेत; ज्यांना आपण रतिमन्मथाचे पुतळे आहों व विधात्यानें आपली विवाहमैत्री व्हावी असें योजूनच आपणास निर्माण केलें व आपल्याहून अधिक सुखी दंपत्य कोठेंही असूं शकण्याचा संभव नाहीं असें वाटूं लागलें आहे; अन्योन्यसमागम दुरावणारा प्रत्येक क्षण ज्यांस युगतुल्य झाला असून जे कामिनीस आपली समागमकारिणी मैत्रीण मानून तिच्या वाटेकडे डोळे लावून बसले आहेत अशा (यौवनस्थ) स्त्रीपुरुषांच्या रतिसुखाची बहार कोणीकडे."

## ९ जातिभेद.

९. आपल्या समाजांतले दोष आपण काढीत असलों तरी बाहेरचा हल्ला आल्यावर त्यावर तुटून पडणें हें स्वाभिमानाचें लक्षण आहे व हें आगरकरांच्या अंगीं वसत होतें हें वरील अवतरणावरून स्पष्ट आहे. यासंबंधानें आणखी एक उतारा घेऊं. "आपल्या देशांत जातींचें जें प्रचंड बंड माजलें आहे व जें परकीयांच्या टीकेस इतकें पात्र झालें आहे त्याचें इंगित काय आहे ? ज्याना समाजघटना कशी होत जाते हें ठाऊक नाहीं अशा अप्रबुद्ध भोळ्या लोकांनीं ब्राह्मणक्षत्रियादि चातुर्वर्ण्याची उत्पत्ति ब्रह्मदेवाचे तोंड, हात, पाय व ऊरु यांपासून झाली असें म्हटल्यास त्यांस फारसा दोष देतां येत नाहीं; किंवा रेव्हरंड जोतिबासारख्यांनीं दुराग्रहामुळें किंवा अविचारामुळें हिंदुस्थानांतील वर्णव्यवस्था आपलपोट्या ब्राह्मणांनीं केली आहे असें प्रतिपादिल्यास अशांच्या तोंडास हात लावण्याची सोय नाहीं. वर्णव्यवस्था उर्फ जातिभेद निर्दोष आहे किंवा त्यांत फेरफार करण्याची किंवा योग्यवेळीं तो अजीबात नाहींसा करण्याची गरज नाहीं असें आम्ही म्हणत नाहीं. सर्वत्र एकोपा किंवा खरी बंधुप्रीति याची स्थापना व्हावी, पण ही गोष्ट एकमेकांनीं एकमेकांचा द्वेष केल्यानें होण्यासारखी नाहीं. स्वार्थसाधु भटांनीं कुणब्यांस अज्ञानांत किंवा दास्यस्थितींत मुद्दाम लोळत ठेवलें असलें वेडगळपणाचें किंवा दुराग्रहाचें बरळणें मात्र आम्हांस मान्य नाहीं. शुद्ध श्रमविभागापासून सहजगत्या उत्पन्न होणाऱ्या व्यवसायभिन्नत्वामुळें जातिभेद बहुशः उत्पन्न होतो.

सुधारलेल्या नव्या किंवा जुन्या लोकांत जातिभेदाचा प्रकार या नाहीं त्या रूपानें आढळल्याशिवाय राहत नाहीं. ...नाकानें वांगीं सोलणाऱ्या आमच्यांतील जातिभेदाची टवाळी करणाऱ्या लीवानरसारख्यांच्या देशांतही ज्यांना ट्रेड गिल्डस् म्हणतात तो काय प्रकार आहे !

जुन्या रोमन लोकांत किंवा ग्रीक लोकांत एका प्रकारचा जातिभेद होता, इतकेंच नाहीं तर तो आमच्यांतील जातिभेदाहून विशेष खडतर होता. मुसलमानातील शिया व सुनी जातींतील वैमनस्यें सर्वांस अवगत आहेत. सुधारणेच्या पंथास लागलेल्या प्रत्येक लोकांत कांहींकाळ कशानाकशातरी प्रकारचा जातिभेद उद्भवल्यावांचून राहत नाहीं. ..जातिभेदापासून आम्हांस एकाकाळीं जे फायदे झाले त्यांचें वर्णन प्रसिद्ध फ्रेंच तत्ववेत्ता याच्या कॉंट ग्रंथांत केलें आहे. जातिभेदांमुळें प्रस्थापित आचार यथास्थितपणें चालून समाजास एक प्रकारचें स्थैर्य येतें. जो तो क्रमागत मार्ग आनंदानें आचरतो, फायद्यासाठीं एक वर्ग दुसऱ्या वर्गाची प्रतिस्पर्धा करीत नाहीं; वर्गावर वर्गाचा दाब असतो. समयविशेषीं चांगली किंवा वाईट गोष्ट करण्यास जूट लौकर होते; कष्टार्जित कलेचें उत्तम रीतीनें संगोपन होतें. सारांश, परंपरागत गुणांचें किंवा दोषांचें संरक्षण होऊन समाजसंनिधानांत बिघाड होऊं न देण्यास जातिसारखें दुसरें साधन नाहीं. प्रत्येक व्यक्ति आपापल्या जागीं खिळली जाऊन आपापलें कार्य नीटपणें बजावते, यामुळें जाति या सामाजिक संनिधानाचें स्थितितत्व होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. "

अशबरनर, वुइलर्ड किंवा लीवनेर सारख्य परकीयांनीं आपल्या समाजावर दोपारोप केले असतां आगरकरांचा स्वाभिमान खवळून जाऊन ते पुढेपुढें स्थितीवर आल्यासारखे बोलूं लागत, पण पहिल्यापहिल्या लेखांत त्यांनीं आपल्या सामाजिक दोषांवर अत्यंत कठोर प्रहार केलेले होते.

## १० हिंदु विधवांची नीतिमत्ता.

१० अशबरनर नांवाच्या कोणी साहेबानें हिंदुविधवावर जे ' असभ्य, खोडसाळ व असत्यप्रचुर आरोप लादले होते ' ते वाचून ' आपल्या मनाच्या सांत्वनार्थ क्षुब्ध मनोवृत्तीस कांहींसा अनियंत्रित संचार करूं द्यावा म्हणून आगरकरांनीं दोन लेखांत त्याचा चांगला समाचार घेतला आहे. त्यांत ते म्हणतात; " ज्या देशांत पतिव्रतापदप्राप्त्यर्थ लक्षावधि तरुण स्त्रियांनीं पतिचितेवर आपणांस जिवंत जाळून घेण्याचें लोकोत्तर धैर्य दाखविलें व त्याच्या अभावींही ' विवर्णा दीनवदना देहसंस्कार वर्जिता ' होऊन संन्यासवृत्तीचें अवलंबन करून उपासतापासादिकांनीं देह वाळविण्याचें व्रत अनेक युगें चालविलें, त्या देशांतील स्त्रियांस ' सनदी स्वेच्छाचारिणी ' हा किताब देणारानें आपण काय

म्हणतो याचा विचार विचार करावयास पाहिजे होता. ' स्त्रीणां पतिरेव दैवतं " या सूत्राचा वाढेल त्या स्थितींत अवलंब करणें चुकीचें असेल, सती जाणें हें अमानुष कृत्य असेल, व असंमत वैधव्यही अन्यायाचें असेल (आणि या तीनही बाबतींत आगरकरांनीं अनेक ठिकाणीं हिंदुपुरुषांवर व धर्मशास्त्रावर निर्दय कोरडे ओढले आहेत ) परंतु हिंदु स्त्रियांची पातिव्रत्यासक्ति इतर राष्ट्रांहून दृढतर झाली आहे हेंही प्रत्येक विचारी मनुष्यास कबूल केलें पाहिजे....दुष्ट लोकांच्या भुलथापीनें किंवा प्रसंगविशेषीं मनोनिग्रह न झाल्यानें वैधव्यव्रतापासून भ्रष्ट झालेल्या कांहीं विधवा असतील हें जरी खरें आहे, तथापि एकंदर विधवांच्या वर्गाविषयीं विचार करितां त्यांचें आचरण शुद्ध व स्तुत्यच आहे हें त्यांच्या शत्रूंसही कबूल करावें लागेल.......हिंदुविधवा अगदीं अनाचारांत गढून गेल्या आहेत म्हणून त्यांस पुनर्विवाहाची मोकळीक पाहिजे असें कोणी प्रतिपादन करीत नाहीं. एखाद्या मनुष्यास सक्तीनें सद्गुणी करण्यांत अर्थ नाहीं, व त्या सद्गुणाचें विशेष मोलही नाहीं. पतिमरणोत्तर वैधव्यव्रताचें आचरण करण्याइतकी ज्यांची मनोनिग्रहशक्ति नाहीं, त्यांस मारून मुटकून संन्यासी करण्यापेक्षां व त्यापासून संभवणाऱ्या पापाचरणांस कारणीभूत होण्यापेक्षां त्यांस विवाह करण्याची परवानगी दिली असतां पापाचरणाची मुळींच भीति राहणार नाहीं, व खऱ्या सद्गुणांचे लोकांस मोल कळूं लागेल. " वरील साहेबांशिवाय आणखी एका शाहण्याच्या कांद्यानें संगीत पद्यांवरून हिंदु स्त्रियांची नालस्ती केली होती त्यास उत्तर देतांना आगरकर म्हणाले, " काव्यांतर्गत स्त्रीपुरुषांच्या उद्गारांवरून कोणत्याही लोकाच्या नीतिमत्तेविषयीं अटकळ करूं गेल्यास तींत प्रमाद होण्याचा फार संभव असतो. ' मिस्टरिज् ऑफ धि कोर्ट ऑफ लंडन ' ह्या रेनाल्डच्या ग्रंथमालिकेवरून इंग्लिश लोकांच्या नीतिविषयीं मत देणें न्याय्य होईल काय? हिंदुस्थानांतील गवय्ये व नायकिणी ज्या चिजा गातात त्यांवरून लोकांच्या नीतीचें प्रमाण बांधणें महा धाडसाचें काम आहे. व्यभिचाराचें कारण आमच्या स्त्रियांचें अज्ञान होय असें हे वुड्लर्डसाहेब म्हणतात. ज्ञान आणि सद्गुण यांचा अन्योन्य संबंध कितपत आहे हें अद्यापि चांगलेसें ठरलेलें नाहीं. खोटें बोलणें, बनावट कागद करणें, चतुराईनें दुसऱ्यास फसविणें, लाच खाणें, व्यभिचार करणें हे गुन्हे ज्ञानाचा प्रसार झाल्यानें वाढतात किंवा कमी होतात याविषयीं ॲरिस्टाटलइतकाच संशय हर्बर्ट स्पेन्सर यास आहे. इंग्लिश लोक व्यभिचाराचा दोष आमच्या स्त्रियांवर अविचारानें आणूं लागतील तर तुमच्या मडमांनीं आमच्या स्त्रियांचें तीर्थ घेऊन त्या पापापासून मुक्त व्हावें इतक्या त्या पवित्र आहेत असें म्हणण्याला आम्ही कधींही सोडणार नाहीं ! हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या पातिव्रत्याइतकें शुद्ध पातिव्रत्य बहुधा दुसऱ्या कोणत्याही देशांत सांपडणार नाहीं. "

## वंशवेल

भवानीपंत
- (श्रीरामभक्त) महिपति
  - (श्रीरामभक्त) अमृतराय
- विठ्ठलमहाराज (श्रीरामभक्त)
  - नारायण (श्रीरामभक्त)
    - (श्रीरामभक्त) रघुनाथ
      - (श्रीरामभक्त) नारायणमहाराज
        - (श्रीराम० च०नायक) **श्रीवासुदेव स्वामी**
          - (श्रीरामभक्त) जनार्दनबुवा[3]
      - हरि[2]
        - कृष्णाजी
    - गोविंद[1]

विठ्ठलमहाराजांचें लग्न त्या कालच्या पद्धतीप्रमाणें लहानपणींच झालें होतें. परंतु वयाच्या सोळाव्या वर्षींच ते नारायणगांवीं श्रीबाळकराममहाराज म्हणून रामदासी सत्पुरुष होते त्यांचा अनुग्रह घेऊन तेथेंच श्रीरामसेवा करून श्रीबाळकरामाच्या सत्संगतींत राहिले. श्रीबाळकराममहाराज हेहि लहानपणापासून विरक्त असून त्यांनीं सर्व तीर्थयात्रा करून ते प्रथम **आळें** येथें वास्तव्य करून होते. **आळें** हा गांव जुन्नर तालुक्यांत असून तेथें ज्ञानोबांनीं रेड्यामुखीं वेद बोलविले त्या रेड्याची समाधि आहे. **आळें** येथेंच श्रीविठ्ठलमहाराजांनीं श्रीबाळकमहाराजांपासून अनुग्रह घेऊन प्रथम तेथें रामोपासना करून राहिले. नंतर आळयाहून बाळकमहाराज नारायणगांवीं आले. तेथें त्यांनीं श्रीराममंदिर बांधलें आणि तेथें गुरुशिष्य सेवा करीत राहिले. भक्तचरित्र लेखक

---

१ या घराण्याकडे हल्लीं वतन व इनाम आहे. २ यांनीं नारायण महाराजांचा प्रपंचभार शिरीं घेऊन त्यांना ईश्वरभक्तीकरितां मोकळें केलें. हरिपंतांचा वंशविस्तार बराच आहे. ३ हे हयात असून यांची संतति अज्ञान आहे.

श्रीमहिपतीबुवा ताहाराबादकर हेहि बाळकराममहाराजांच्या संगतीला वारंवार येऊन राहात असत. विठ्ठलपंत नारायणगांवीं राहिले हें पाहून त्यांची स्त्रीहि तेथें येऊन त्यांची सेवा करूं लागली. विठ्ठलपंत स्त्रीचा त्याग करून तेथें आले हें समजल्यावर बाळकराम महाराजांनीं विठ्ठलमहाराजांना **बोटे** गांवी राहून प्रपंचपरमार्थ चालविण्याची आज्ञा केली. यामुळें नाइलाज म्हणून ते गांवीं जाऊन राहिले. परंतु प्रापंचिकव्यवस्था सर्व त्यांचे धाकटे बंधु **महिपतराव** हेच करीत असत. आणि विठ्ठलपंत हे श्रवण, मनन, निदिध्यासांत कालक्षेप करीत असत. विठ्ठलपंतांना नारायण आदिकरून चार पुत्र होते. नारायणाचा पुत्र रघुनाथ हा विठ्ठलपंतांपाशीं असे. रघुनाथपं हे श्रीवासुदेवस्वामींचे आजे होत.

७. विठ्ठलमहाराजांच कनिष्ट बंधु महिपतराव हे इंदूरसंस्थानांत सुभेदार होते. ते मोठे व्यवहारदक्ष व राजकारणी पुरुष होते. त्यांनीं आपल्या परोपकार-बुद्धीनें पुष्कळ घराणीं उपकृत करून ठेवलीं. महीपतींना अमृतराया म्हणून एक पुत्र होता. पुत्र जाणता झाल्यावर त्याचे स्वाधीन महिपतींनीं सर्व कारभार केला. आणि ते श्रीपंढरपूर येथें जाऊन राहिले होते. ते पंढरीसच निवर्तले. त्यांच्या संगतींत आणखी आठ जण होते. या सर्वांना **नवराम** अशी संज्ञा होती. त्यांत महिपतींना जयराम असें म्हणत असत. श्रीपांडुरंगानजीक एका ओवरींत हे सर्वजण राहात असत. म्हणून त्या ओवरीला नवरामाची ओंवरी असें अद्याप म्हणतात.

८. अमृतराय हे होळकरसरकारचे पदरीं वाफगांवचे मामलेदार होते. वाफ-गांव हें पुणें जिल्ह्यांतील खेड तालुक्यांत पुण्यापासून सोळा कोसांवर आहे. तेथें होळकरसरकारचे दोन मोठे प्रचंड वाडे अद्याप आहेत. होळकरांच्या इकडील प्रांताची सर्व व्यवस्था अमृतरायांकडे असे. त्या काळीं झालेल्या भयंकर राजकीय घडामोडींत पुष्कळांचीं मनें विषण्ण झालीं. कित्येकांनीं सर्वसंग परित्याग केला. होळकरसरकारचा पराजय झाल्यानंतर अमृतराय यांनीं शके १७४७ सालीं राजसेवेचा त्याग केला. आणि श्रीभीमकराज म्हणून कल्याणसांप्रदायांतील एक सत्पुरुष होते, त्यांचा उपदेश घेऊन ते सहकुटुंब काशीयात्रेला गेले. त्यांनीं दोन वेळां सहकुटुंब पायीं काशीयात्रा केली. ज्यांनीं होळकरसरकारची मामलत केली, त्यांनींच यावेळीं राजसेवेचा त्याग करून निर्वाहार्थ " **जय जय रघुवीर समर्थ** " म्हणून कोरडी भिक्षा मागण्याचा क्रम सुरू केला! पुढें हे चार महिने चातुर्मासीं श्रीपंढरपुरास व आठ महिने बाहेर फिरूं लागले. हे फार लोकप्रिय असत. यांनीं रामोपासनेचा प्रसार फार केला.

९. **धामणी** गांव खेड तालुक्यांत आहे हें वर सांगितलेंच आहे. चहूं-बाजूंनीं डोंगर व मध्यें हा गांव आहे. यामुळें अगदीं गांवाजवळ आलें तरी

वस्ती दिसत नाहीं. या गांवीं बागाईत फार आहे. गांवच्या चारहि बाजूंनीं पाणी असून मध्यें लोकवस्ती आहे. पावसाळ्यांत थोडा पाऊस ज्यास्त झाल्याबरोबर गांवांतील लोकांना भीति उत्पन्न होते. कारण गांवाच्या दोन्ही वेशीजवळून प्रचंड पूर चाललेला असतो. पश्चिमेच्या बाजूला इतिहासप्रसिद्ध तांबेवाट आहे. त्यावरील डोंगरावर नेहमीं सैन्य ठेवीत असत. **धामणी** गांवांत कोणातरी रामभक्तानें फार प्राचीन काळीं राममंदिर बांधून ठेवलें आहे. या मंदिरांत विशेष हें आहे कीं, गाभाऱ्यांत मध्यभागीं एक दीड पुरुष खोल असा आड आहे. मुसलमानी अमदानींत मूर्तिभंजकांचा सुळसुळाट असे. यामुळें असा प्रसंग आल्यास लागलीच त्या मूर्ति आडांत ठेवतां येत असत व त्यावर दीड फूट चौरसचौरस चिरा बसावेला म्हणजे मूर्ति कोठें आहेत, याचा मागमूसहि लागत नसे. मुख्य राम, लक्ष्मण, सीता, मारुती या मूर्ति आंत ठेवल्यानंतर सिंहासनावर लहानशा विठ्ठलरखुमाईच्या मूर्ति ठेवीत असत. एकदां तुकाराममहाराज या गांवीं येऊन सभामंडपांत कीर्तन करीत होते. सिंहासनावर विठ्ठलरखुमाईच्या मूर्ति होत्या. परंतु गाभाऱ्यांतून "**जय जय रघुवीर समर्थ**" अशी गर्जना येऊं लागली! आडांत मूर्ति ठेवल्याला पुष्कळ काळ लोटला होता. यामुळें येथें राममूर्ति आहेत हें कोणाच्या स्मरणांतहि नव्हतें. गर्जना ऐकतांच तुकाराममहाराजांनीं येथें श्रीराममूर्ति आहेत असें मंडळींना सांगितलें. त्यावरून मूर्ति बाहेर काढून त्या यथाविधि श्रीविठ्ठलाचे वामभागीं सिंहासनावर स्थापन केल्या.

१०. धामणीपासून चार कोसांवर अवसरीखुर्द गांव आहे. त्या गांवीं मानदास नांवाचे प्रख्यात साधु श्रीमान् व उदार होते. त्यांची शिष्यशाखा पुष्कळ असे. त्यांनीं अवसरीस एक राममंदिर पुष्कळ पैसा खर्च करून चिरस्थायी बांधलें आहे. या मानदासांचा एक शिष्य **धामणी** येथील श्रीराममंदिरांत राहून रामसेवा करीत असे.

११. विठ्ठलमहाराजांचे पुतणे अमृतराय यांचा जन्म शके १६९८ सालीं झाला. अमृतराय हे श्रीपंढरपूर येथें चातुर्मास्य राहिले असतांना धामणीहून केशव रामचंद्र बेल्हे हे वारी करण्यासाठीं पंढरपुरास गेले. त्यांनीं तेथें अमृतरायांचा उपदेश श्रीसमर्थसांप्रदायाप्रमाणें घेतला व अमृतरायांना धामणीस येण्याविषयीं विनंति केली. त्याप्रमाणें चातुर्मास संपल्यानंतर अमृतराय हे धामणी गांवीं आले. इतक्यांत चमत्कार असा घडून आला कीं, मानदासांचे शिष्य जे धामणीस रामसेवा करण्याकरितां येऊन राहिले होते, त्यांना दृष्टांत झाला कीं, सत्पुरुष अमृतराय येथें आले आहेत, त्यांना येथील सेवा करण्यास लावावें व तुम्ही मानदासांकडे परत जावें. मानदास यांसहि तसाच दृष्टांत झाल्यामुळें

त्यांचा शिष्यास निरोप आला कीं, अमृतराय सत्पुरुष यांच्या स्वाधीन श्रीराम-मंदिर करून तुम्ही अवसरीखुर्द येथें निघून यावें. त्याप्रमाणें तजवीज होऊन अमृतराय हे धामणीस राहून रामसेवा करूं लागले. त्यांनीं मूर्तीवरील गंज काढून अर्चा केली.

१२. इकडे अमृतरायांचे चुलते विठ्ठलमहाराज हे यावेळीं दोन्ही डोळ्यांनीं अंध झाले होते. ते कांदळी येथें स्वधर्माचरणानें राहात असत. त्यांचे चारहि पुत्र दिवंगत झाले होते. त्यांना भेटण्याकरितां अमृतरायमहाराज धामणीहून कांदळीला गेले. भेटतांक्षणींच विठ्ठलमहाराज अमृतरायमहाराजांस म्हणाले, बा अमृतराया ! प्रपंचवृक्षावर बसलेले चारहि पक्षी उडून गेले ! अमृतराय म्हणाले, आपण परमेश्वरस्वरूप झाल्यानें आपले शोक, मोह सर्व नष्ट झाले, त्या आपणा समाधानी पुरुषाचें मी समाधान काय करावें ! मग विठ्ठलमहाराज अंध झाले असल्यानें त्यांची सेवा करण्याकरितां त्यांना अमृतरायांनीं धामणीस आणलें. विठ्ठलमहाराजांचे नातू म्हणजे वासुदेवस्वामींचे आजे रघुनाथराव हे त्यावेळीं नोकरीवर बाहेर होते. विठ्ठलमहाराज धामणीला आल्याचें समजल्यावर तेहि नोकरी सोडून आजोबांच्या सेवेकरितां धामणीस आले. आणि विठ्ठलमहाराजांच्या आज्ञेवरून कोरान्नभिक्षा मागूं लागले. अशा रीतीनें विठ्ठलमहाराज, त्यांचे नातू रघुनाथराव आणि पुतण्ये अमृतराय हे त्रिवर्ग धामणीस श्रीराममंदिरीं एकत्र राहून प्रपंचपरमार्थ चालवून कालक्रमणा करीत असत. अमृतरायमहाराज चातुर्मास श्रीपंढरीस जात असत. त्यांची शिस्त फार कडक असे. पण स्वभावानें फार प्रेमळ असत. अमृतरायांची शिष्यशाखा बरीच असे.

१३. विठ्ठलमहाराज प्रातःकाळीं स्नान करून नित्य नियमानें दुपारीं दोन वाजेपर्यंत ध्यानस्थ बसत असत. एक दिवस आषाढ वद्य ३० शके १७५७ रोजीं अशा रीतीनें ध्यानस्थ स्थितीतच त्यांनीं देह विसर्जन केला ! अद्याप ध्यानस्थ स्थितींतून उत्थान कां पावत नाहींत, म्हणून अमृतराय तोंडावरील बुरखा काढून पाहूं लागले, तों विठ्ठलमहाराज परमपदीं लीन झालेले दिसले ! विठ्ठलमहाराजांचा वियोग झाल्यानंतर अमृतराय काशीयात्रा करून आले. त्यांच्या पत्नी सौ. भागीरथीबाई शके १७६८ सालीं परलोकवासी झाल्या. त्यानंतर अमृतरायांनीं शके १७६९ सालीं संन्यास घेतला. तथापि पूर्वानुक्रम चालूच होता. त्यांची शिष्यशाखा इंदूरकडे व महाराष्ट्रांत बरीच मोठी होती. पुष्कळांना त्यांनीं कीर्तन करण्याला शिकविलें. अमृतराय हे फार परोपकारी व निरपेक्ष होते. पुष्कळ लोक त्यांच्या सदुपदेशाप्रमाणें वागत असत. अंमळनेर येथील प्रसिद्ध वारकरी व भगवद्भक्त गोविंदबुवा हे अमृतरायांच्या विनंतीवरून पंढरपुराहून परत जातांना धामणीस दरसाल एक दिवस राहून जाऊं लागले. व अद्यापहि त्यांच्या गादीवर असणारे पुरुष एक दिवस धामणीस मुक्काम केल्याखेरीज जात नाहींत. अमृतरायांनीं हयात असतानांच आपलें

समाधिस्थान बांधून ठेवलें होतें. समाधिस्थ होण्यापूर्वीं सहा महिने अमृतराय हे सर्वांना भेटून आले व चैत्र वद्य ६ ला आपण समाधिस्थ होणार, असें त्यांनीं सर्वांना सांगून ठेवलें होतें. त्याप्रमाणे शके १७७८ चैत्र वद्य षष्ठीला प्रातः-काळीं अमृतराय समाधिस्थ झाले. त्यावेळीं त्यांचें वय ८० वर्षांचें होतें. स्वतःच्या सदाचरणानें त्यांनीं रामसेवेंत सर्व आयुष्य घालविलें व सदुपदेशानें पुष्कळांना परमार्थमार्गास लाविलें. पूर्वींचे लोक किती सात्विक आणि विश्वासू असत हें पुढील गोष्टीवरून लक्ष्यांत येईल. एकदां अमृतरायांनीं उत्सवाकरितां वाण्याकडून साठ रुपयांचा जिन्नस आणला. ते साठ रुपये वाण्याला देऊन त्याची पावती घेतली ती अमृतरायांनीं नित्यनेमाच्या पोथींत घालून ठेवली होती. रुपये दिल्याघेतल्याचें उभयतांनाहि स्मरण राहिलें नाहीं. वाण्यानें पुनः रुपये मागितल्यावरून अमृरायांनीं कांहीं आढेवेढे न घेतां रुपये देऊन पुनः पावती घेतली. वाणी अमृतरायांचा शिष्य होता. तो नित्यानियमा-प्रमाणें पोथी वाचण्यास व श्रवणास अमृतरायाकडे येत असे. एक दिवस तो अमृतरायांची नित्यनियमाची पोथी सहज पाहात असतां तींत पूर्वी रुपये दिल्याची पावती त्याच्या नजरेस पडली. ती पाहून तो फार खजील झाला ! त्यानें मागाहून घेतलेले रुपये अमृतरायांना परत दिले आणि त्यांची माफी मागितली. अमृतराय म्हणाले, सर्व कर्ता, हर्ता बुद्धिदाता, विस्मृति किंवा स्मृति देणारा परमेश्वर आहे. त्याची क्षमा मागावी ! या रावजी वाण्याला पुढें अमृतरायांनीं कीर्तन करण्यास शिकविलें होतें व आपल्या संगतींत ठेवलें होतें. आळेकर शेटये रामानंद म्हणून होते. ते सन १७६४ सालीं समाधिस्थ झाले. यांचें मूळचें उपनांव टांकसाळे. पुणें येथें कसब्यांत त्यांचा टांकसाळीचा कारखाना होता. त्यांत सर्व प्रकारचीं नाणीं पाडण्याचीं यंत्रें होतीं, ते अत्यंत श्रीमंत होते. इंग्रज सरकारनें नाणीं काढण्याचा कारभार आपल्याकडे घेतल्यावर रामानंदांनीं आपला वाडा व संपत्ति दादाशास्त्री अग्निहोत्री यांस देऊन टाकली. आणि आपण संन्यास घेऊन ते अमृतरायमहाराजांचे संगतीला येऊन राहिले. यांचे वंशज पुणें कोल्हापूर येथें अद्याप आहेत. खेडचे प्रसिद्ध साधु श्री चंडीराम-महाराज हेहि अमृतरायांच्या भेटीला नेहमीं येत असत. सारांश, अमृतरायांचा अधिकार फार मोठा होता.

अमृतराय समाधिस्थ झाल्यानंतर बरेच वर्षे त्यांच्या पुण्यतिथीचा उत्सव फार मोठा होत असे. प्रसादासाठीं व कीर्तन, पुराण श्रवणाला बहुत मंडळी येत असे. प्रसिद्ध ताहाराबादकर महिपतिबुवांचे वंशज कीर्तन करण्याला येण्याचा पाठ असे. तीन मण पुरणाचा स्वयंपाक होत असे. अलीकडे सुमारें दहा वर्षां-पासून कांहीं विघ्नकर्त्या मंडळींच्या बखेड्यामुळें पुण्यतिथीच्या उत्सवाचें मान कमी प्रमाणावर येऊन बसलें आहे.

१४. विठ्ठलमहाराजांचे नातू रघुनाथमहाराज म्हणजे वासुदेवबुवांचे आजे यांचा जन्म शके १७३० सालीं झाला होता. त्यांनीं विठ्ठलमहाराजांच्या आज्ञे-प्रमाणें आजन्म श्रीरामसेवा केली. त्यांनीं अग्निहोत्र चालविलें होतें. त्यांना हरि व नारायण असे दोन मुलगे होते. वडील पुत्र नारायणबुवा हे वासुदेवस्वामींचे वडील होत. नारायणबुवांचा जन्म शके १७५३ सालीं झाला. अमृतरायांच्या पश्चात् त्यांची परंपरा रघुनाथमहाराजांनीं चालविली. त्यांनीं अखेर संन्यास घेतला होता. शके १७८३ सालीं चैत्र शुद्ध ९ रोजीं माध्यान्हीं ते समाधिस्थ झाले. ही निधन-तिथि पिंगळ्याचें संवादानें रघुनाथबुवांस पूर्वींच माहीत झाली.

१५. रघुनाथमहाराज समाधिस्थ झाले, त्यावेळीं नारायणबुवांचें वय तीस वर्षांचें होतें. प्रपंचाचा सर्व भार त्यांच्यावर पडला. परंतु त्यांचे कनिष्ठ बंधु हरिपंत यांनीं प्रपंच चालविला होता. व नारायणमहाराजांनीं आपल्याला रामसेवेला वाहून घेतलें होतें. नारायणमहाराज अखंड नामस्मरण किंवा स्तोत्रपाठ करीत असत. त्यांचा अधिकार फार मोठा होता. नम्र स्वभाव, हास्यवदन, मधुर भाषण, हितोपदेश, अखंड नामस्मरण या त्यांच्या सद्गुणांनीं दर्शनास येणाऱ्यांना त्यांच्याजवळून उठून जावें असें कोणास वाटतच नसे. हा अनुभव मलाहि नारायण-महाराजांच्या भेटीच्या प्रसंगीं आलेला आहे. यांची कीर्ति ऐकून पुष्कळ मुमुक्षु धामणीस येऊन त्यांच्या संगतींत राहात असत. कोणीहि अतीतअभ्यागत आला तरी श्रीरामाच्या मंदिरांतच उतरावयाची वहिवाट पडली होती. हरिदास तर नित्य कोणी ना कोणी असेच. पुराणीकहि येत असत. यामुळें मंदिरांत नेहमीं कथा कीर्तनाचा जयघोष चालत असे. नारायणमहाराजांना दूरदूरचे लोक आपल्या गांवीं आग्रहानें नेत असत. खेड, जुन्नर, शिरूर या तालुक्यांत त्यांचा लौकिक होता. बरेच दिवस आपल्या गांवीं ठेवून घेऊन व श्रीरामसंस्थानाकरितां भिक्षा जमवून देऊन परत धामणीस नारायणमहाराजांना गांवोगांवचे लोक पोंचवतें करीत असत. त्या भिक्षेचा विनियोग गृहस्थाश्रमाला उचित अशा सत्कर्माकडे होत असे व त्यामुळें भिक्षा देणारांनाहि त्याचा पुण्यांश जात असे. " **गुरू गोत्र अग्नि पूजा । अवसरीं भजे द्विजां । निमित्तादिकीं यजी । पितरोद्देशें १ या यज्ञक्रिया उचिता । यज्ञेसी हवन कारितां । हुतशेष स्वभावता । उरे जें २ तें सुखें आपुले घरीं । कुटुंबेसी भोजन करी । कीं भोग्यचि तें निवारी । कल्मषातें ३ म्हणोनि स्वधर्मेचि जें अर्जे । तें स्वधर्मेचि विनियोगिजे । मग उरे तें भोगिजे । संतोषेसी** " अशा रीतीनें नित्य पंचमहायज्ञ, पूजाअर्चा, अवतारजन्म, उत्सव, अमृतरायांची पुण्यतिथि इकडे त्या भिक्षेचा योग्य विनि-योग होत असे.

१६. आळंदीचे श्रीनरसिंहसरस्वतीस्वामी यांचा नारायणमहाराजांवर फार लोभ असे. ते त्यांना प्रेमानें अरे, जारे या एकवचनी शब्दानें संबोधीत

असत. एकदां स्वामींनीं नारायणमहाराजांना भेटीला बोलावलें. रथाची मिरवणूक चालली असतां नारायणमहाराज धामणीहून येऊन तसेच त्या समारंभांत गेले. स्वामींनीं दुरून त्यांना पाहिल्याबरोबर स्वामी रथांतून खालीं उतरले व रथांत बसण्याबद्दल महाराजांना आग्रह करूं लागले. नारायणमहाराज म्हणाले, तुमचें ऐश्वर्य तुम्हाला. मला गरिबाला काय करावयाचें आहे ? लागलीच स्वामींनीं महाराजांना स्वतः उचलून रथांत बसविलें. सर्व लोक तटस्थ होऊन कौतुकानें पाहूं लागले ! मिरवणुकीनंतर भेटींत स्वामी म्हणाले, नारायणा ! आम्ही आतां लौकरच जाणार बरें ! नारायणमहाराज म्हणाले, आपल्याला आतां जाणेंयेणें राहिलेंच नाहीं. स्वामी म्हणाले, देहाच्या गांवांत आलें कीं जावें यावें लागतें महाराज हांसून म्हणाले कीं, तेंहि खरेंच आहे ! स्वामींनीं महाराजांना कांहीं दिवस ठेवून घेऊन मग त्यांची रवानगी केली. जातांना प्रसाद म्हणून रेशमी छाटी स्वामींनीं महाराजांना दिली.

आपल्यापासून कोणास यत्किंचित्हि उपाधि व त्रास होऊं नये याबद्दल नारायणमहाराज फार दक्ष असत. याचें एकच उदाहरण देतों. हिंदींतील विचारसागर ग्रंथाचें मराठी भाषांतरकर्ते कै. आपाजी खंडेराव पिंपरीपेंडारकर यांनीं एकदां श्रीसत्यनारायणाच्या समाराधनेकरतां नारायणमहाराजांना गाडी पाठविली. गाडींतून येण्याला महाराजांना फार उशीर झाला. महाराजांसाठीं मंडळी खोळंबून बसली होती. महाराजांचें स्नान व्हावयाचें होतें. स्नान केल्यावर त्यांचें नित्य आन्हिक फार असे व त्याला वेळ लागत असे. मंडळी आपल्यासाठीं खोळंबली आहे, असें पाहून महाराजांनीं लागलींच स्नान केलें व आचमन करून सर्वांना तिष्ठत बसावें लागूं नये म्हणून पानावर येऊन बसले. मंडळींना आश्चर्य वाटलें कीं, यांचा इतका नित्यनेम आज कसा अंतरला ? परंतु भोजन झाल्याबरोबर महाराजांनीं लागलीच पुनः स्नान केलें आणि रात्रीं आठ वाजेपर्यंत सर्व नित्याचें आन्हिक आटपलें. आपामहाराजांनीं विचारलें कीं, असें कां केलें ? महाराज म्हणाले, सर्वांभूतीं राम आहे. त्याचा अगोदर संतोष करावा. आणि मग आपल्या इच्छेप्रमाणें वागावें. शिवाय तीहि रामाची पूजाच झाली ! अशा रीतीनें वासुदेवस्वामींचे वडील नारायणमहाराज हे सदा संतोषवृत्तीनें राहात असत. त्यांच्या संतोषवृत्तीचें मला नित्य स्मरण होतें ! त्यांचा सगुण उपासना, भजन, कथा, यांवर फार भर असे. सर्वांतर्यामीं राम आणि सर्व जग रामरूपच आहे, असें ते अंतर्यामापासून पाहात असत. आपण रामरूपच आहोंत हा त्यांना अंतर्यामीं पूर्ण बोध होता, पण बाहेर दास्यत्वानें राहात असत. निर्गुणाच्या गोष्टी ते कधींहि बोलत नसत. मात्र वासुदेवबुवांचें कीर्तन किंवा प्रवचन ऐकण्याला ते बसत त्यावेळीं निर्गुणस्वरूपाचें निरूपण ऐकून त्यांना फार संतोष होत असे ! नारायणमहाराज हे प्रत्यक्ष नारायण-

स्वरूपच असत. आणि त्यांच्यापुढें वासुदेवबुवा निरूपण करीत असत त्यावेळीं पितापुत्र दोघेहि आत्मानंदामध्यें कसे तल्लीन होत असत त्या देखाव्याचें वर्णन या वाणीनें होणें अशक्य आहे ! धन्य पितापुत्र ! असें त्यावेळीं उद्गार निघाल्याशिवाय राहात नसत ! नारायणमहाराजांची स्त्री सौ. लक्ष्मीबाई ह्या शके १७९४ सालीं निवर्तल्या. तेव्हांपासून तर महाराजांनीं आपल्याला सर्वस्वी हरिभजनाला वाहून घेतलें होतें. विशेष कोणाशीं वाच्यता न करतां आपल्या नित्यनेमांत, स्तोत्रपाठांत, नामस्मरणांत अहोरात्र रंगलेले असत, हें मी त्यांच्या भेटींत स्वतः पाहिलेलें आहे. श्रीज्ञानेश्वरी, दासबोध, एकनाथी भागवत, यांचें अखंड वाचन चालत असे. विष्णुसहस्रनाम, भगवद्गीता तर झोंपेंतसुद्धां बरळत असत ! बोटांना जपाची इतकी संवय होऊन गेली होती कीं, झोंपेच्या वेळींहि आंगठा चारहि बोटांवरून चालत असे ! यांच्या मातोश्री शके १८०२ सालीं निवर्तल्या. नारायणमहाराजांनीं पुष्कळ लोकांना आपल्या उपदेशानें भक्तिमार्गाला लाविलें. शिष्यशाखा बहुत वाढली. नारायणगांवचे कै. कमळाकर रावजी बारसोडे म्हणून त्यांचे एकनिष्ठ सेवक असत. त्यांचा व वासुदेवबुवांचा पारमार्थिक सुखसंवाद फार गाढ होत असे. नारायणमहाराजांनीं भिक्षेश्वर मंदिराचा मंडप भव्य टोलेजंग बांधला. यामुळें कीर्तनपुराणांची चांगली सोय झाली.

१७. अशा रीतीनें रामसेवेमध्यें नारायणमहाराजांचा उत्तम प्रकारें आनंदांत काळ चालला असतां त्यांचा अंतसमय समीप आला. जुन्नरास त्यावेळीं श्रीयुत विष्णु सदाशीव केळकर मामलेदार होते. ते हल्लीं पेन्शनर आहेत. आपल्या कामांत ते फार दक्ष असून भगवद्भक्त आहेत. त्यांनीं कीर्तनाकरितां वासुदेवबुवांना निमंत्रण करण्यासाठीं शिपाई व घोडें पाठविलें. कोणीहि प्रेमानें बोलावलें असतां नाहीं म्हणण्याचें त्यांच्या फार जीवावर येत असे. निमंत्रण आल्याबरोबर दुसरे दिवशीं सकाळीं जाण्याची बुवांनीं तयारी केली व 'सकाळीं जुन्नरास जातों' असें वडिलांजवळ जाऊन उद्गारले, कारण पूर्वपद्धतीला अनुसरून पितापुत्रांचें कधीं प्रत्यक्ष भाषण होत नसे. आडपडद्यानें तिन्हाईत मध्यस्थाच्या द्वारें भाषण होत असे. अशा प्रकारचें पितापुत्रांचे तें मर्यादेचें वागणें पाहून आनंद होत असे व धन्यता वाटत असे ! आजकाल पितापुत्र, पतिपत्नी यांच्यांतील मर्यादा सातासमुद्रापार गेली ! घरांत कोणत्याहि प्रकारची कोणाहीमध्यें मर्यादा अशी राहिलीच नाहीं. मग भीड कोठून राहाणार ? स्त्रियांचा उपजत अंगस्वभाव लज्जा, ती तर स्त्रियांमध्यें लवमात्र राहिली नाहीं ! स्त्री, पुरुष, धनी, चाकर, मुलें यांच्या अंगांत आजकाल स्वातंत्र्याचें वारें खेळत असल्यामुळें कुटुंबामधून धाक हा शब्दच नाहींसा झाला ! वाटेल त्यानें वाटेल तसें स्वैर वागावें, बोलावें,

चालावें! आजकालचा हा प्रकार पाहून हंसावें कां रडावें तेंच समजत नाहीं!! असो.


१८. वासुदेवबुवांना रात्रीं झोंपेंत असें ऐकूं आलें कीं, "वासुदेवा उद्यां जाऊं नको, पुढें केव्हां तरी जातां येईल." आपल्यास कोणी हांक मारली कीं काय, असें वाटून वासुदेवबुवा जागे होऊन पाहूं लागले तों कोणी नाहीं. पण शब्द तर ऐकले म्हणून दुसरे दिवशीं सकाळीं जुन्नरास जाण्याचा बेत रहित करून मी तूर्त येत नाहीं, अशी शिपायाजवळ केळकरांना बुवांनीं चिठ्ठी दिली. इकडे नारायणमहाराज सकाळीं उठले, प्रातर्विधि आटोपला, कांखेला भिक्षेची झोळी अडकवून "**जय जय रघुवीर समर्थ**" असा उच्चार करून मनाचे श्लोक म्हणत भिक्षेला चालले. तीन चार घरें भिक्षा मागितली. इतक्यांत एका घरीं पायऱ्यांवरून झुकांडी जाऊन पडले. पायांच्या नळीला लागलें. मूर्च्छा आली. त्वरेनें त्यांना मंदिरांत आणलें. तोंडांत पाणी घातलें. त्याच स्थितींत त्यांना स्नान घालून गंध लावलें. मुद्रा लावल्या. माळा घातल्या. भोंवतालच्या गांवीं वार्ता गेली. दर्शनार्थ लोकांची गर्दी लोटली. सायंकाळीं चार वाजण्याच्या सुमारास नारायणमहाराजांनीं "**जय जय राम**"! ह्मणून प्राण सोडला! शके १८२७ च्या आषाढ वद्य १३ ला नामदेवाच्या पुण्यतिथीच्याच दिवशीं त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. त्यावेळीं त्यांचें वय ७४ वर्षांचें होतें. झोंपेंत ऐकूं आलेले शब्द तीच आज्ञा समजून वासुदेवबुवांनीं जुन्नरास जाण्याचा बेत रहित केला. यावरून त्यांची धूर्तता व पितृआज्ञापालन दिसून येतें!

## श्रीवासुदेवस्वामी

१९. वरील कुलवृत्तांतावरून वाचकांच्या लक्ष्यांत हें आलेंच असेल कीं, बुवांचें घराणें मूळचें नांवाप्रमाणेंच **क्षीरसागरांचे**, अर्थात् सदाचार, दातृत्व इत्यादि गुणांनीं युक्त, स्वधर्माचरणी, श्रीरामाचे उपासक, खुद्द **श्रीविठ्ठलमहाराज** त्यांचें बंधु **महिपति**, पुतण्ये **अमृतराय**, नातू **रघुनाथराव**, आणि पणतु म्हणजे वासुदेवस्वामींचे वडील **नारायणमहाराज**, अशा चार पिढ्या ज्या कुलांत विरक्ति, भिक्षावृत्ति, आणि श्रीरामभक्ति अव्याहत परंपरेनें चालू होती, त्या कुलांत "**बीज तैसें फल**" या न्यायानें श्रीवासुदेवस्वामींचा जन्म व्हावा आणि तेणेंकरून "**अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम्। एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम्**" हें गीतावाक्य सत्य असल्याचें निदर्शनास यावें यांत नवल तें काय! "**जे विवेक द्रुमांचे मुळीं। बैसले आहाती नित्य फळीं। तयां योगियांचिया कुळीं। जन्म पावे**". त्याप्रमाणें

नारायणमहाराजांच्या उदरीं वासुदेवबुवा हे भाद्रपद शुद्ध सप्तमी शके १७८० रोजीं मूळ नक्षत्रावर जन्मास आले. आणि त्यांनीं मूळ मायेचें समूळ निर्मूलन करून व आपलें अवतारकृत्य संपवून ते आश्विन शुद्ध दशमी शके १८५१ रोजीं प्रातःकाळीं विजयादशमीला सात वाजतां धामणी मुक्कामीं वासुदेवस्वरूपीं निजधामीं गेले !

श्रीवासुदेवस्वामींची जन्मकुंडली खालीं लिहिल्याप्रमाणें:—




ज्योतिषशास्त्रदृष्टया विचार केला तर प्रथम स्थान मस्तक अर्थात् आकाश, त्या आकाशाचा कारक ग्रह गुरु तो त्या आकाशांत म्हणजे पहिल्याच स्थानांत आहे. आकाशाचा गुण शब्द; यामुळें वासुदेवबुवांना बोलण्याचा कधीं कंटाळा म्हणून नसे. तो गुरु शुक्राच्या घरांत बसला. शुक्र मुत्सद्दी, चतुर यामुळें वासुदेवबुवांचें बोलणें मोठया चतुराईचें व गोड असे. वाणी अस्खलित, गंभीर, निश्चयात्मक, सप्रमाण, अनुभवाची असे. आवाज मोठा खणखणीत असे. पष्ठस्थानीं स्वगृहींचा शुक्र हेंहि वक्तृत्वकला उत्तम असण्याला कारण आहे. तृतीय म्हणजे पराक्रमस्थानीं केतु आहे. केतु हा ध्वजादर्शक आहे. कै. लोकमान्य टिळक यांच्या कुंडलींतही तृतीयस्थानीं कन्येचा केतु होता. लोकमान्यांचा कीर्तिध्वज लोकमान्य म्हणून फडकला. वासुदेवस्वामींचा कीर्तिध्वज परमार्थमार्गांत फडकला ! चतुर्थस्थान सुख. त्या ठिकाणीं शत्रुघरीं शनि बसला. यामुळें सुखाचा भाग कमी पडला. मात्र शनीनें वैराग्यवृत्ति दिली. शनि हा वातकारक असल्यानें व चतुर्थस्थान हें छाती असल्यानें बुवांच्या छातींत नेहमीं वात होत असे, तो अंतकालापर्यंत होता. त्या वातानें त्यांना फार त्रास होत असे.

२०. पंचमस्थान बुद्धीचें, त्या स्थानचा मालक बुध. तो तर पंचमांत स्वगृहींचा, उच्च, त्रिकोणाधिपति त्रिकोणांत, अशा अधिकारानें बसला आहे ! तेव्हां बुद्धिमत्तेचें काय वर्णन करावें ! तशांत पंचमस्थानचा कारकग्रह गुरु तो तर त्या बुधावर पूर्ण दृष्टीनें पाहात आहे. अशा

रीतीनें बुधगुरूची बुद्धीला पूर्ण अनुकूलता मिळाल्यावर ती " **यो बुद्धेः परतस्तु सः** " अशा प्रकारच्या बोधस्वरूप परमात्म्याचा लाभ करून देईल यांत नवल तें काय! " **जिये परमात्माचि अवधि** " अशा प्रकारची सद्‌बुद्धि फार दुर्लभ आहे असें श्रीज्ञानोबा म्हणतात. त्या बुद्धीची कृपा स्वामींवर होती ! अर्थात् वासुदेवबुवा हे " **एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात् कृतकृत्यश्च भारत** " अशा पदाप्रत पोंचले होते हें पत्रिकेवरून उघड होतें.

षष्ठस्थान रिपूचें, त्या ठिकाणीं शुक्र स्वग्रहींचा बसला आहे. त्यामुळें स्वामींना शत्रु कोणी नव्हता. उत्पन्न झालाच तर त्याचा निःपात व्हावयाचा. कारण धर्मकर्मादि स्थानांचा मालक शनि. तो पूर्ण आणि उच्च दृष्टीनें त्या स्थानाला पाहात आहे. अष्टम स्थानीं म्हणजे गुदस्थानीं मंगळ आणि चंद्र असल्यानें व मंगळ रक्ताचा मालक असल्यानें बुवांना जन्माची मूळव्याध होती. मात्र कुंडलींत चंद्र मंगळ योग कोठेंहि असो, तो आजन्म अन्नवस्त्राचा योगक्षेम कमी पडूं देत नाहीं. बुवांना भिक्षेचें कां होईना, पण अन्नवस्त्राची ददात नव्हती. नवमस्थानीं शनीच्या घरचा राहू हा संन्यास योग करवितो. अध्यात्मविचारानें स्वामींची चिदचिद्‌ग्रंथि सुटली असल्यामुळें संकल्पाचा न्यास होऊन ते स्वांगानें संन्यासी पूर्वीच झाले होते. पण बाह्यांगानेंहि ब्रह्मीभूत होण्यापूर्वींच चार महिने त्यांनीं संन्यास घेतला होता. हा योग नवमस्थानाच्या शनीच्या घरच्या राहूनें आणला. आपल्या कायावाचामनाचे त्रिगुणात्मक भाव आणि फलप्राप्ति ग्रहांधीन कशी असते, हें यावरून समजून येईल. यावरून एक घडलेली गोष्ट मला आठवली ती सांगतों. बरेच दिवसांची गोष्ट. ह. भ. प. पांगारकर यांची कचेरी पूर्वी फडतरे यांच्या वाड्यांत पुण्यास असतांना तेथें ह. भ. प. विष्णुबुवा जोग, पांगारकर, मी व आणखी दोन तीन इसम बसलों होतों. ज्योतिषसंबंधीं गोष्टी निघाल्या. मला कांहीं ज्योतिष येत नाहीं व मी त्याचा अभ्यासहि केलेला नाहीं. परंतु त्यावेळीं पुण्यांत प्रसिद्ध असलेले ज्योतिषी कै. दामुअण्णा ढेरे, यांच्या संगतींत माझे कांहीं दिवस गेल्यानें बरेचसे आडाखे त्यावेळीं लक्ष्यांत होते. दामुअण्णा निवर्तल्यावर संगति सुटली आणि ज्योतिषाचा नादहि सुटला. असो, याप्रमाणें मंडळी बसली असतांना विष्णुबुवांनीं मला विचारलें कीं, माझी कुंडली कशी असेल सांगा पाहूं ? मी म्हटलें, आपल्या नवमस्थानीं शनि असला पाहिजे. नंतर बुवांनीं कुंडली कागदावर काढून दाखविली तो नवमस्थानीं तुळेचा शनि नेमका होता असें दिसलें. नवमस्थान हें धर्मस्थान त्या ठिकाणीं शनि, राहू, केतु हे ग्रह असल्यास ते वैराग्य, संन्यास योग दाखवितात. त्या धोरणानें मी सांगितलें. यावरून ध्यावयाचें एवढेंच कीं, सर्व कांहीं ग्रहाधीन व कालाधीन आहे. आपल्या

आधीन कांहीं नाहीं. फक्त आपले आपण आपल्या आधीन आहोंत. ते दुसऱ्या कोणाच्या आधीन नाहींत. तें आपलें आत्मस्वरूप, निजस्वरूप आपलें आपणच आत्मकृपेनें, आत्मबोधानें ओळखून घ्यावयाचें आहे. '**त्याची प्राप्ति त्यासीच घडे । येरां सर्वथा नातुडे .**" आत्मबोध हा पराधीन नसून स्वाधीन आहे. परंतु तो स्थिर होईल अशी बुद्धि चोख पाहिजे.

२१. वासुदेवबुवांच्या मातोश्रींचें माहेर धामणी गांवांतच बाबा जोशी यांजकडे होतें. त्या घरीं बुवांचा जन्म झाला. मूळ नक्षत्रावर जन्म झाल्यामुळें मातापितरांनीं तीन दिवस मुलाचें मुखावलोकन केलें नाहीं. चौथे दिवशीं अवसरीहून कुलोपाध्याय आले. त्यांनीं जातक वर्तवून सांगितलें कीं, हा पुत्र सद्‌गुणी, सदाचरणी, ईश्वरभक्ति करणारा होईल. यावरून भीति दूर झाली. याबद्दल मग शांति केली. सर्वांना आनंद झाला.

२२. वासुदेवबुवांचें मराठी शिक्षण धामणीसच झालें. शके १७९० सालीं त्यांचें वय दाहा वर्षांचें असतांना ते चौथी इयत्ता शिकत होते. शाळेची परीक्षा घेण्याकरितां त्या सालीं कै. लोकमान्य टिळकांचे वडील गंगाधरशास्त्री आले होते. चौथीची परीक्षा चालली असतांना वासुदेवबुवांची बुद्धिमत्ता पाहून गंगारशास्त्री टिळक फार खुष झाले, आणि वासुदेवास म्हणाले, तूं इंग्रजी शिकण्यासाठीं पुण्यास चल. वासुदेव म्हणाला नानांना ( वडील ) विचारा. गंगाधरशास्त्री वाडिलांकडे जाऊन म्हणाले कीं, या मुलाला इंग्रजी शिकण्याकरितां पुण्यास पाठवा. मी त्याची सर्व सोय उत्तम लावून देतों. नारायणमहाराज म्हणाले कीं, इंग्रजी शिकून काय करावयाचें ? याचा जन्म **राजसेवेकरतां** नसून **रामसेवेकरतां** आहे ! गंगाधरशास्त्रयांनीं विचार करून व परिस्थिति पाहून शेवटीं आपला आग्रह सोडला. त्यावेळीं वासुदेवबुवा भागवत सांगत असत. त्यांचें पुराण गंगाधरशास्त्र्यांनीं मुद्दाम ऐकिलें. ते फार खुष झाले आणि वासुदेवबुवांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गेले.

२३. वासुदेवबुवांचें लग्न दहावे वर्षीं झालें. लग्नांत बायको अवघी चार वर्षांची होती ! त्यावेळीं परकी सरकारचा कायदा बळेंच घरांत घेणारे अति शहाणे पीर यांचा सुळसुळाट नव्हता ! बुवांचे श्वशुर हे नारोडी गांवचे राहाणारे. त्यांचें नांव धोंडूतात्या जोशी. ते मुंबईस कॉन्ट्राक्टरचा धंदा करीत असत. ते मोठे परोपकारी व आपल्या लोकांना उद्योगधंदा लावून देण्यांत मोठे दक्ष असत. त्यांना दोन बायका होत्या. पहिलीला मूल होईना म्हणून दुसरी केली. दुसरीचीं मुलें जगत नसत. एकदां नारायणमहाराज भिक्षेकरितां नारोडी गांवीं गेले असतांना धोंडूतात्यांना एक अडीच वर्षांची मुलगी होती. ती त्यांनीं नारायणमहाराजांच्या झोळींत टाकली आणि ही मुलगी जगली तर आपल्या मुलाला देईन असें धोंडूतात्यांनीं नारायणमहाराजांस सांगितलें. त्या-

वेळीं आजच्या सारखी लग्नाच्या कामी फाजील चिकित्सा होत नव्हती. मुलगी चार वर्षांची झाल्यावर धोंडूतात्या धामणीस आले. वासुदेवबुवांची त्यावेळीं सोडमुंज झालेली नव्हती. ती धोंडूतात्यांनीं स्वतःच्या खर्चानें केली आणि तुम्ही काशीस जाऊं नका, मी आपली मुलगी तुम्हांस देतों असें तात्यांनीं वासुदेवबुवांस सोडमुंजींत सांगून परतविलें. नंतर तात्यांनीं लागलीच दोन्ही-कडील साहित्याची तयारी स्वखर्चानें केली, आणि मुलीचें आपल्या हातें विष्णु स्वरूपी वासुदेवबुवांना सालंकृत कन्यादान केलें. कांहीं दिवस तात्या धामणीस राहून मग काशीस गेले. तेथें त्यांनीं संन्यास घेतला. त्यांच्या देहावसानानंतर त्यांच्या इच्छेनुरूप त्यांना जलसमाधि देण्यांत आली.

वासुदेवबुवांच्या पत्नी सौभाग्यवती कृष्णाबाई यांनीं बुवांच्या सत्संगतींत संसार सुखाचा करून वयाच्या त्रेपन्नाव्या वर्षी शके १८४० सालीं पति-संन्निध आनंदानें देह ठेवला. सर्व संसार सुखाचा होऊन मुलेंबाळें झालीं, आतां पतीची गरज उरली नाहीं, आतां—आतांच काय, पण केव्हांहि मन मानेल तेव्हां नवऱ्याच्या दास्यत्वांत न राहातां नवऱ्यापासून फटकून राहाण्यास हरकत नाहीं असें स्त्रीस्वातंत्र्याच्या तोऱ्यांत भरसभेंत निर्लज्जपणें बडबड करणाऱ्या चवचाल स्त्रियांचा आजकाल सुळसुळाट होऊं पहात आहे ! व हेंच नर-जन्माचें सार्थक मानण्याचा प्रघात पडत चालला असून असें शिक्षण स्त्रियांना देण्याचे कारखाने काढले जात असून त्याला सुशिक्षित म्हणवून घेणारे आधुनिक अंध लोक उत्तेजन देत आहेत ! पण हें आर्यस्त्रियांच्या पातिव्रत्याचें लक्षण खचित नव्हे. स्त्रियांना किंवा पुरुषांना स्वातंत्र्य असावें याबद्दल वाद नाहीं. पण तें पशुवत् मनसोक्त वर्तनाचें स्वातंत्र्य नव्हे. बौद्धिक स्वातंत्र्य हें खरें स्वातंत्र्य होय आणि तदनुसार स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या बुद्धीला केव्हांही स्वातंत्र्य आहे. त्याला आपल्या पूर्वजांनीं कधींहि प्रतिबंध केलेला नाहीं. मन हें ओढाळ गुरूं स्वच्छंदी विषयानुरक्त असल्यामुळें आपल्या पूर्वजांनीं पुरुषांचें मन शास्त्राधीन आणि स्त्रियांचें मन पतिअधीन ठेवलें यांत काय गैर आहे ? काडीमोड किंवा पुनर्विवाह नुसता शब्द उच्चारला तर खरी पतिव्रता प्राणच सोडील. पण आजच्या सुशिक्षित स्त्रियांतून पातिव्रत्यधर्म नष्ट होऊन त्या पतिवरत्या म्हणजे वरचढ किंवा पतीशीं व्रात्य होऊं पाहात आहेत ! आणि त्याला आपले शहाणे सुरते पुरुष फूस देत आहेत ! असो. खऱ्या पतिव्रतेचा संसार सुखाचा झाला, मुलेंबाळें झालीं, सुना नातू झाले, तरी तिचा एक हेतु राहिलेलाच असतो. तो हा कीं, पतीच्या देखत अहेवपणानें पतिचरणीं देह अर्पण करून अखंड सौभाग्यवती व्हावें ! कृष्णाबाईंची ही सदिच्छा पूर्ण झाली व त्या अखंड सौभाग्यवती झाल्या ! त्यांना पांच मुली व एक मुलगा अशीं अपत्यें आहेत.

२४. वासुदेवबुवांच्या तीव्र बुद्धीचें वर्णन वर दिलेंच आहे. ते नवव्या वर्षापासूनच पुराण सांगू लागले व कीर्तन करूं लागले. हें कोणाला सांगितलें तर खरेंहि वाटणार नाहीं! पण प्रभावशाली बुद्धीचा प्रभावच असा असतो. "**तेथें कांहीं चाड नाहीं वयाची**"! आठव्या वर्षापासूनच भागवत वाचण्याची तीव्र इच्छा. त्याप्रमाणें ते वाचूं लागले. श्रीराममंदिरांत दरसाल पिंपळवंडीकर नानादेवशास्त्री हे गोकुळ अष्टमीच्या उत्सवाला श्रावणमासीं व वाफगांवचे यशवंतशास्त्री हे भाद्रपदमासीं श्रीमद्भागवताच्या सप्त्याला येत असत. दोघांहि शास्त्र्यांचा मुक्काम तेथें चार चार महिने होत असे. त्यांच्याजवळ स्वामींनीं मुख्यत्वेंकरून संस्कृतांचें अध्ययन केलें. यशवंतशास्त्री वाफगांवकर हे वेदांतशास्त्रांत फार निपुण असत. त्यांच्याजवळ बुवा वेदांत शिकले. यशवंतशास्त्र्यांची थोरवी बुवा नेहमीं सांगत असत. त्यांचें चिरंजीव शंकरशास्त्री वाफगांवकर प्रसिद्ध आहेत. रूपावळी, समासचक्र म्हणून झाल्यावर स्वबुद्धीनेंच वासुदेवबुवांनीं भारत भागवत ग्रंथ सांगण्याला आरंभ केला. "**मोटकी देहाकृति उमटे। आणि निजज्ञानाची पहांट फुटे। सूर्यापुढें प्रगटे। प्रकाश जैसा॥ तैशी दशेची वाट न पाहातां। वयसेचिया गांवा न येतां। बाळपणींच सर्वज्ञता। वरी तयातें**" हे श्रीज्ञानोबारायांनीं गीतेच्या आधारें काढलेले उद्गार त्यांनीं आपल्या स्वतःच्या चरित्रानें खरे करून दाखविलेच; पण वासुदेवबुवांसारख्या पुण्यपुरुषाच्या चरित्रांतहि त्याची सत्यता दिसून येत आहे! वासुदेवबुवांची उत्कट ईश्वरभक्ति आणि वेदांतनिरूपणाची सुगमता पाहून पुष्कळ हरिभक्तांची श्रवणार्थ धामणीस येरझार सुरू असे. त्यांची वाणी निःसंशय प्रासादिक होती. त्यांच्यावर सद्गुरूची पूर्ण कृपा झाली होती. यामुळें त्यांच्या कीर्तनश्रवणानें पुष्कळ श्रोत्यांचीं अंतःकरणें उचंबळत असत आणि क्षणभर तरी ब्रह्मानंदाचा आस्वाद मिळून दुःखनिवृत्ति होत असे. बुवांना वेदांतवाचनाचा जबरदस्त नाद होता आणि त्यांचा दांडगा व्यासंग होता. श्रीमद्भागवत, ज्ञानेश्वरी, दासबोधादि समर्थांचे समग्र ग्रंथ, भगवद्गीता, एकनाथी भागवत, उपनिषदें, अध्यात्म रामायण, हे ग्रंथ त्यांच्या नित्यवाचनांत असून त्यांतील रहस्यें त्याना चांगलीं अवगत होतीं व त्यांचा ते कीर्तनांत, प्रवचनांत श्रोत्यांच्या अंतःकरणावर चांगला ठसा उमटवीत असत. आचार्यांचें हरिमीडे स्तोत्र बुवांच्या फार आवडीचें असे. त्याचा ते कीर्तनांत फार उपयोग करीत असत. याशिवाय वेदांतकेसरी, अपराधक्षमापन स्तोत्र, निर्वाणअष्टक, चर्पटपंजरी, आर्तत्राणपरायण स्तोत्र, अपरोक्षानुभूति, यतिपंचक, शुकाष्टक, हस्तामलकस्तोत्र धन्याष्टक, गोविंदाष्टक, षट्पदी, वाक्यवृत्ति, सदाचार इ. आचार्यांचीं स्तोत्रें बुवांना मुखोद्गत असत व त्यांचा ते कीर्तनांत, प्रवचनांत नेमक्या ठिकाणीं

उपयोग करीत. यामुळें श्रोत्यांच्या अंतःकरणावर लागलाच त्याचा ठसा उमटत असे. तुकाराम, रामदास, ज्ञानेश्वर, एकनाथ, निळोबा इत्यादि संतांचे अभंग, पदें, गारुडभारुड इत्यादिकांचें बुवांना पाठांतर फार असे. वडीलांप्रमाणेंच बुवांची वाणी नेहमीं स्तोत्रपाठ करीत असे. त्यांच्या सान्निध्यांत कसाही दुःखी मनुष्य आला असला तरी तो मधुर उपदेशानें दुःखनिवृत्त होऊन जात असे. आपल्या सदुपदेशानें त्यांनीं पुष्कळ मुमुक्षूंचीं मनें निःसंशय करून त्यांना भक्तिमार्गाला लावलें आहे. त्यांचा स्तोत्रपाठ अविश्रांत चालत असे. ते रात्रीं एक प्रहर काय ते वाणीला विश्रांति देत असत. स्तोत्र म्हणतां म्हणतां ते कधीं कधीं जागे होत असत. त्यांची अखंड निर्गुणभक्ति होती. सगुणसाक्षात्काराला ते महत्त्व देत नसत, तथापि निरूपण करतांना कीर्तनांत, प्रवचनांत किंवा कोणाबरोबर सुखसंवाद चालला असतांना अष्ट सात्विकभाव त्यांना उत्पन्न होऊन त्यांचा कंठ दाटून येत असे व तें प्रेमाचें भरतें त्यांना आंवरत नसे! ते रामनामाचा जप करीत असत. पहांटे उठून ते प्रातःस्मरामि करीत असत. त्यावेळीं मुक्त कंठानें ईश्वरगुणानुवाद गाऊन तादात्म्य पावत असत.

२५. मी जुन्नरास नोकरीवर असतांना सन १८९५ सालीं वासुदेवबुवांचें मला प्रथम दर्शन झालें. तेथें समर्थांच्या आत्मारामग्रंथावरील त्यांचें प्रवचन मीं ऐकिलें. त्यानंतर सन १८९६–९७ सालीं मी फिरत्या नोकरीवर असतांना माझा जुन्नर रस्त्यावरील मंचर गांवीं कांहीं दिवस मुक्काम पडला. त्याचवेळीं सुदैवेंकरून वासुदेवबुवांचा मुक्काम दीड दोन मैलांवर अवसरीखुर्द गांवीं होता. यामुळें दररोज रात्रीं मंचरहून अवसरीला जावें, तीन तीन तास बुवांच्या कीर्तनश्रवणाचा लाभ घ्यावा. आणि मंचरला परत यावें असा योग अनायासें जुळून आला. त्यावेळीं समजून आलें कीं, हें पाणी कांहीं निराळें आहे! त्यानंतर मी सुमारें चोवीस वर्षे फिरत्या नोकरीवर असतांना दरसाल ज्या ज्या वेळीं खेड, शिरूर, जुन्नर या प्रांतांत फिरण्याचा मला प्रसंग येई, त्या त्या वेळीं बुवांच्या दर्शनाचा त्यांच्या कीर्तनाचा व संभाषणसुखाचा मनमुराद लाभ घेतां येत असे. कांहीं सत्पुरुष नुसते दर्शनीय असतात. दर्शनापलीकडे त्यांच्याकडून दुसरा संवादसुखाचा लाभ मुमुक्षूनां मिळणें शक्य नसतें आणि कांहीं सत्पुरुष नुसते संभाषणीय असतात. त्यांचें नुसतें संभाषण ऐकून घ्यावें. एरव्हीं हातीं धरण्याची किंवा संगत करण्याची सोय नसते. वासुदेवबुवा हे दर्शनीय आणि संभाषणीय होते. दर्शनीय म्हणजे देखणे, माळा, मुद्रा, दिसण्याला भव्य असा अर्थ नव्हे. तसेंच संभाषणीय म्हणजे नुसती बडबड करणारे खडके वेदांती नव्हे. तर आचारानें दर्शनीय पुण्यपुरुष, विचारानें सुखसंवादात्मक संभाषणीय असा आचारशुद्ध आणि विचारशुद्ध पुरुष होय. आचारशुद्ध

म्हणजे तरी, बसले आहेत तीन तीन तास स्नानसंध्या करून गोमुखींत हात घालून किंवा नाक दाबून असा अर्थ नव्हे. स्नानसंध्यादि नित्य नैमित्तिक कर्म तर पाहिजेच. पण आचारशुद्ध म्हणजे शुद्धस्वरूपाप्रत पोंचविणारा जो आचार तोच शुद्ध आचार आणि अशा आचरणानें वागणारा तोच आचारशुद्ध होय. वर्णाश्रमधर्माप्रमाणें भागा आलेलें नित्यनैमित्तिक कर्म करून तें कर्म उत्पन्न झालें कोठून व लयाला गेलें कोठें आणि मी कर्मातीत, ' **न मां कर्माणि लिंपंति न मे कर्मफले स्पृहा** ' अशा प्रकारचा कर्मातीत, निर्मळ, शुद्धबुद्ध कसा आहे हें जाणणें, याचा अर्थ आचारशुद्ध होय. तसेंच शुद्ध पदापर्यंत जे विचार पोंचवितात, ज्या विचारांनीं शुद्धस्वरूपाचा बोध होतो, अशा प्रकारचा विचार ज्याच्या जवळ जागत्या ज्योतीप्रमाणें जपत असतो तो पुरुष विचारशुद्ध होय. अशा प्रकारें वासुदेवबुवा हे आचारशुद्ध आणि विचारशुद्ध असल्यानें ते दर्शनीय व संभाषणीय सत्पुरुष होते. असा सव्यसाची सत्पुरुष आजकाल सांपडणें फार दुर्मिळ होय. वासुदेवबुवा यांना बहुत लोक मान देत असत. श्रीयुत कृष्णाजी बल्लाळ देवल, कै. रामचंद्र धोंडदेव इंदोलीकर वगैरे पुष्कळ नेटिव्ह प्रांत आफिसर, मामलेदार इत्यादि हे वासुदेवबुवांचें कीर्तन ऐकून त्यांचे धन्यवाद गात असत. श्रीयुत माधवराव नारायण उर्फ बाबासाहेब हुल्लयाळ हल्लीं पुणें जिल्ह्याला डे. कलेक्टर आहेत, ते कट्ट वैष्णव आहेत. त्यांचा श्रीमद्भागवतावर जबर व्यासंग आहे. ते जरी वैष्णव आहेत, तरी बुवांची योग्यता जाणून त्यांना ते फार मान देत असत, व बुवांच्या दर्शनाचा लाभ ते घेत असत. खेड तालुक्यांत गेल्यावर वासुदेवबुवांचें कीर्तन, प्रवचन किंवा दर्शन म्हणजे एक मेजवानीच असे ! त्यांची प्रसन्न व आनंदित मुद्रा पाहून मनुष्य क्षणभर आपलें दुःख विसरून जात असे. कै. लोकमान्य टिळक एकदां जुन्नरास जात असतां मंडळींनीं त्यांना मुद्दाम खेडास उतरविलें व बुवांचें प्रवचन ऐकविलें. एकंदरींत वासुदेवबुवा खेड जुन्नर प्रांताला सर्वमान्य भूषण होतें.

२६. मंचर मुक्कामीं असताना बुवांच्या कीर्तनाचा लाभ घेतल्यानंतर मी पुण्यास आलों. पुण्यास माझ्या सलगींतील व मजवर अत्यंत प्रेम करणारे वेदांत प्रवीण कै. वासुदेव विश्वनाथ वैशंपायन म्हणून एक सद्गृहस्थ होते. त्यांचें अल्पसें चरित्र मनोरंजक असल्यानें मी तें पुढें देणार आहे. पुण्यास हल्लीं पेन्शन घेऊन सुखवस्तु राहिलेले श्रीयुत श्रीधर वामन उर्फ दिगंबरराव जोशी पोलीस प्रॉसिक्युटर, यांची व वासुदेवराव वैशंपायन यांची लहानपणापासून गट्टी असे. दोघांनाही पारमार्थिक शुद्ध विचारांची मनापासून अत्यंत आवड, दोघांचीही बुद्धिमत्ता दांडगी; उभयतांची विचारभूमिका एक असे. उभयतांच्याहि कानावर मीं वासुदेवबुवांची

### श्रीगुरुदासमहाराज ऊर्फ

# अनंतरावमामा यांचें चरित्र

( लेखक—दत्तात्रय रामचंद्र व्यवहारे, दिग्रस. )

आयुष्य हेचि रत्नपेटी । माजीं भजनरत्नें गोमटीं ।
ईश्वरीं अर्पुनिया लुटी । आनंदाची करावी ॥

—श्रीसमर्थ.

## पूर्ववृत्तांत

श्रीसंतवर्य गुरुदासमहाराज उर्फ अनंतरावमामा यांचा जन्म सातारा येथें चैत्र शु० १४ शके १७८७ मध्यें झाला. सातारा येथील रावजीभट धांदरफळे यांचे हे पुत्र व सुप्रसिद्ध सत्पुरुष श्रीविष्णुकवि यांचे धाकटे बंधु होत. लहानपणापासून यांची प्रवृत्ति पारमार्थिक मार्गाकडे वळलीसें दिसतें. माहूर येथें श्रीविष्णुदासमहाराज असतांना, गुरुदासमहाराज तेथें आले; परस्परांचें चरित्र उभयतांच्या चरित्राशीं बरेंच निगडित आहे. माहूर येथें अनंतरावांचें वास्तव्य १२ वर्षें झालें. त्या कालांत त्यांनीं आपल्या बंधूपासून परमार्थाचा बोध घेतला. त्याना योगाची माहिती श्रीविष्णुदासमहाराजांनीं सांगितली. त्यानंतर अनंतरावांनीं तेथें शाळा काढली. त्या शाळेंतील विद्यार्थीवर्ग अजून माहूर येथें हयात आहे. राजे जगज्जीवनराव उदाराम यांसारखी मंडळी विद्यार्थीवर्गांत असे. या काळानंतर त्यांनीं श्रीदत्तशिखरावर नोकरी धरली. नंतर थोडे दिवस ते करोडगिरी खात्यांत नोकरीस होते. अखेर शके १८११ मध्यें ते माहूर सोडून साताऱ्यास गेले. त्यांचें अक्षर सुंदर असल्यामुळें साताऱ्या वृत्तसुधा, व बोधसुधाकर छापखान्यांत लेखकाची नोकरी धरली; यांचें चित्रकलेंतहि नैपुण्य होतें, सबब पुणें येथें चित्रशाळेंत कांहीं दिवस नोकरीस होते. या वेळीं त्यांनीं आपल्या मातोश्रीस पुण्यास नेलें. अनंतरावांचें लग्न व्हावें अशी आईची इच्छा होती; परंतु भवितव्यता असें सांगत नव्हती.

---

१ हा कथाभाग महाराजांचे भागिनेय रा. नरहरशास्त्री जोशी खरशीकर यांनीं लिहिलेल्या श्रीविष्णुदासाच्या चरित्रांत आहे. ( पान ४८ व ७० पाहा. )

२ महाराजांनीं काढलेल्या एका चित्राचा नमुना ढाणकीचे रा. माधवभटजी जवळ आहे. तो प्रस्तुत लेखकाच्या पाहाण्यांत आला. रा. माधवभट हे विष्णुकवीचे शिष्य होत.

श्रीगुरुदासमहाराजांचें भविष्य उज्ज्वल होतें. शके १८१३ मार्ग० शु० १२ रोजीं पुण्यास गंगाबाईनीं—महाराजांच्या मातोश्रीनीं—देह ठेविला. याप्रमाणें अनंतरावजींचा काळ पुण्यास चालला असतां, त्यांना त्याच्या वामामुळें फार त्रास होऊं लागला; व त्यायोगें त्यांची प्रकृति खालावली. तदनंतर नोकरी सोडून ते धोमास आले; तेथें बारा वर्षे खडतर जपतपानुष्ठानादि सत्कृत्यांत घालविलीं. धोमास कृष्णंभटजी नामें एक अधिकारसंपन्न पुरुष रहात असत, हे महाराजांचे गुरु होत. या प्रसंगीं धोम येथील कांहीं हितचिंतक मंडळींनीं महाराजांची चांगली शुश्रूषा केली. मिरज संस्थानाचें अधिपति श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन यांचें मातुल श्रीमामासाहेब यांनीं त्यांना फारच साहाय्य केलें होतें. यांच्या साहाय्यामुळेंच मला परमार्थलाभ घेतां येत आहे असें वारंवार ते म्हणत असत. येथून ह० भ० प० नारायणबुवा दुसखेडकरांबरोबर हे शके १८२८ त मार्गशीर्षांत माहुरीं आले; व तेथेंच श्रीदत्तात्रयांच्या सेवेंत आपलें सर्व आयुष्य वेंचिलें. विहंगम दृष्टीनें महाराजांच्या चरित्राकडे नजर टाकली तर असें दिसून येईल कीं, धोम येथील भगवद्भक्तीपासून महाराजांच्या अंतःकरणांत सद्गुरुभक्तीचा बीजांकुर वृद्धिंगत झाला.

## माहूर येथील काळ

२. शके १८२८ नंतर शके १८४६ पर्यंत म्हणजे सरासरी १८ वर्षे व प्रथमचीं १२ याप्रमाणें ३० वर्षे महाराज माहुरास होते. त्यांचा ध्यानयोग अप्रतिम असे. त्यांची शरीरयष्टि अशक्त असल्यामुळें ते सहजच बसून ध्यानयोग करूं लागले. त्यांची झोपडी स्वतंत्र असे. ध्यानयोगांत मग्न असतां व इतर प्रसंगीं त्याच्या मुखातून स्रवलेली कविता ज्ञानपर व उपदेशपर आहे. श्रीविष्णुदासमहाराजांचें देहावसान झाल्यानंतर सात वर्षे गुरुदासमहाराजांनीं त्या मठांत काढलीं; व सद्गुरुभक्तीचा बावटा उभारून ठेविला. कवितेचे कांहीं मासले येथें देतों.

### ओंव्या

दशेंद्रियांसहित मन । केलें तुजलागी समर्पण ॥
नुरलें बोलाया दुजेपण । निराळेंपण श्रीगुरु ॥ १ ॥
आपण माझा अंगिकार केला । तेणें माझा मीपणा नेला ॥
मीतूंपण हा भावचि मेला । नाहीं उरला श्रीगुरु ॥ २ ॥
सरितासागर भेटी होतां । द्वैत दृष्टीं न दिसे पाहातां ॥
इंधनाग्नी समरसता । नुरे द्वैतता श्रीगुरु ॥ ३ ॥
आतां तरी मी हा कुठला । मीं–तूं–चा खटला तुटला ॥
कठिण मायामृतघट फुटला । भवनिधी आटला श्रीगुरु ॥ ४ ॥

समभागानें भाग उडाला । निःशेष बा ी ब्रह्मचि उरला ॥
तव कृपें गुरुदासोद्धरला । भवनिधी तरला श्रीगुरु ॥ ५ ॥

वरील कवितेंत द्वैत हरपण्याची भावना किती स्पष्टपणें दाखविली आहे हें दिसून येईल. आतां आपण महाराजांच्या ध्यानयोगाकडे वळूं.

---

## ध्यानयोग

३. धारणेची व्याख्या दोन प्रकारची. ( १ ) 'देशबंधश्चित्तस्य धारणा' ( पातंजल योगसूत्र ). कोणत्यातरी देशावर चित्ताला स्थिर करणें याला धारणा म्हणतात. योगकल्पद्रुमाकरांत 'हृदादि देशेषु विकृष्य सर्वतो । विधारणं यन्मनसः स्थिरात्मन.' सर्वांकडून मन एका ठिकाणीं आणून नंतर हृदय आदिकरून देशाच्या ठिकाणीं ठेवणें याला धारणा म्हणतात. परंतु ती कोणाला होते, तर 'स्थिरात्मनः' म्हणजे ज्याची श्रद्धा वेदशास्त्रें व गुरु यांच्या ठिकाणीं पूर्ण आहे त्याला; व ( २ ) असेंच मला करावयाचें आहे असा निश्चय करतो त्याला. नाहींतर आज असें झालें बुवा, उद्या कोणास ठाऊक ? अशा मनुष्याच्या लघ्वीशौचहि हातची नसतें, मग मन ताब्यांत येणार कोठचें ?

देशहि तीन प्रकारचे आहेत, ( १ ) आध्यात्मिक म्हणजे हृदय, कंठ, मस्तक इत्यादि. ( २ ) आधिभौतिक—मणि, दगड, पर्वत झाडें इ. आणि ( ३ ) आधिदैविक--चंद्र, सूर्य, तारा, विष्णु, शिव इ इ. पैकीं कोणता देश कोणाला हितकर होतो, हें त्याच्या अनुभवावरून सद्गुरूस कळितां येतें. दुसरें, ज्या पदार्थावर आपण धारणा करितों तो पदार्थ आपल्या आवडीचा पाहिजे. नाहींतर धारणा करावयाची नृसिंहाची व दर्शनाला जावयाचें श्रीकृष्णाच्या. धारणा करीत असतां प्रथम मनांतच नानाप्रकारचे पदार्थ तयार होतात. पुढें पुढें ते पदार्थ तयार होत नसून त्यांचीं नांवेंच ऐकूं येऊं लागतात. किंवा पहिलें नांव उठू लागून नंतर पदार्थ होऊं लागतात. पैकीं नांवें उठूं लागलीं असतां डोळयाच्या नीलबिंदूवर चित्ताची एकाग्रता करावयाला सांगून नंतर इष्ट ठिकाणीं धारणा करावयास सांगावी, व पदार्थ उठले असतां, अनाहत नादाच्या ठिकाणीं धारणा करावयास सांगून नंतर इष्ट ठिकाणीं धारणा करावयास सांगावी.

पदार्थांचीं नांवें जर मनांत उठलीं असतील, आणि अनाहत नादावर धारणा केली, तर तेच शब्द दृढ होऊन त्यांचा कल्लोळ ऐकूं येतो, आणि पदार्थ जर डोळयाच्या नील बिन्दूवर धारणा करावयास सांगेल, तर तेच पदार्थ डोळयापुढें दिसतात. श्वासावर धारणा करीत असतांना अनेक प्रकारचे शब्द ऐकूं येऊं लागले असतां नील बिन्दूसहित श्वासावर धारणा स्थिर ठेवावी व श्वासाचा शब्द कल्लोळांत लुप्त होऊं न देतां स्पष्ट ओळखून काढून धारणेंत

आणावा. तात्पर्य, धारणा करीत असतांना विजातीय वृत्ति उठत असतात. नंतर पुढें वृत्तीला संवय होऊन वारंवार तोच पदार्थ वृत्तींत येतो म्हणजे दुसरा विजातीय पदार्थ येतच नाहीं. यालाच **ध्यान** म्हणतात. मूर्तीचें ध्यान करणें जितकें श्रेयस्कर आहे, तितके इतर ध्यान करणें श्रेयस्कर नाहीं. श्री गुलाबराव महाराज म्हणत, 'माझा अनुभव असा आहे कीं, श्रीकृष्ण, शिव, आणि देवी यांच्यावांचून इतर ध्यानें निद्राविभ्रांतून लौकर सोडवीत नाहींत. पैकीं पुरुषांना होईल तोंपर्यंत कृष्ण व शिवाचें व स्त्रियांना देवीचें ध्यान हितावह आहे.'

**४. ध्यान हें कल्पित नसून ईश्वराला आपल्या हृदयांत आविर्भाव करणारें आहे. सर्व चित्त सर्वात्मक झालें म्हणजे "मीं ध्यान धरिलें आहे," अशा प्रकारची बुद्धि देखील रहात नाहीं. परंतु ध्येयाचें मात्र सारखें भान होत असतें; यालाच " समाधि " म्हणतात. म्हणजे ध्याना-मध्यें ध्येय, ध्याता व ध्यान असा भेद भासत असून समाधींत फक्त ध्येयाचेंच मात्र भान होतें. परमेश्वराच्या मूर्तरूपावर ध्यान करीत असतां आपलेपणा न भासून केवळ परमेश्वराचें मूर्तरूपच भासणें यालाहि 'समाधि' म्हणता येतें.**

'ध्यानधारणा' या सदराखालीं आलेला सर्व उतारा " श्रीगुलाबरावमहाराजांची व्याख्यानें " या पुस्तकांतून उद्धृत केला आहे.—लेखक. [पहा—व्याख्यान ८ वें 'ध्यान']

५. उपरिनिर्दिष्ट उतारा श्रीगुरुदासमहाराजांच्या कालक्रमणेवर यथास्थित लागूं पडतो, तो कसा याचें विवरण करूं. महाराजांना 'शुद्ध चैतन्याची' धारणा करावी असें वाटे व त्याकरितां ते नेहमीं तळमळ करीत, हें पुढील उद्गारांवरून ध्यानीं येईल.

१८३१, सौम्यनाम संवत्सरे, भाद्रपद शु॥ ७, सकाळ मातृतीर्थी वरील रोजीं झालेल्या ध्यानांत ते म्हणतात,

" आजपर्यंत कधीं कधीं कांहीं चमत्कार दिसत होते, व दिसतात. त्यांत विशेषेंकरून तपस्वी, दिव्य ज्योति, दिव्य वेष वगैरे दिसतात, पण तिकडे फारसे लक्ष न जातां निराकारावरच वरचेवर मन धांव घेतें. पण तो निरा-कार म्हणजे केवळ शुद्ध चैतन्य शक्तीचा जोर फार विलक्षण असल्यामुळें अशक्तपणाला सहन होत नाहीं. आणि **तिकडचा तर मनाला वीट न येतां, मन त्यांतच वारंवार उड्या घालतें —**"

महाराजांना श्रीदत्त व देवी यांचे साक्षात्कारहि वारंवार होत. ध्यानामध्यें आलेलीं कांहीं प्रश्नोत्तरें विचारणीय आहेत. माघ शु॥ १० शनिवार, १८३१ रोजीं झोपडींत प्रश्न आला:—

| | | |
|---|---|---|
| देव कुणाजवळ | उत्तर | भावाजवळ |
| भाव कुणाजवळ | ,, | शांतिजवळ |

| | | |
|---|---|---|
| शांति कुणाजवळ | ,, | विरक्ताजवळ |
| विरक्ति कुणाजवळ | ,, | निरभिमान्याजवळ |
| निरभिमान कुणाजवळ | ,, | मिथ्या मायेजवळ |
| मिथ्यामाया कुणाजवळ | ,, | ब्रह्माजवळ |
| ब्रह्म कुणाजवळ | ,, | ब्रह्माजवळ |

त्यांना झालेला एकच साक्षात्कार पुरे आहे. त्यांच्याच शब्दांत पाहूं.

"......इतक्यांत एक हदग्याच्या झाडाखालीं फक्त पांढरी लंगुटी, जटेचे केस मोकळे सोडलेले, दोन्ही हात उंच करून दोन्ही हातांत दोन्ही बाजूंचे वीत वीत पदर धरलेली, एक पांढरी लांबच लांब लंगुटी होती........"

—माघ शु॥ ३, सोमवार, शके १८३१.

६. महाराजांच्या ध्यानांतील एक **मननीय** उतारा देऊन हा लांबलेला लेख **आटोपता घेऊं.**

**माघ शु॥ १२ गुरुवारीं पहाटे झोपडींतील स्वप्न.**

कांहीं लोक बोलत बसले होते; इतक्यांत एक मुलगा माझ्या समोर येऊन बोलूं लागला. तो त्यांना म्हणाला, " तूं स्वयंभू ब्रह्मच आहेस. देह हा एक आत्म्याला अंगरखा घातला आहे. नांव, रूप हे या अंगरख्याचे आहे. तूं अंगरखा घालणारा या अंगरख्याहून वेगळा असतां, अंगरखा सबाह्य तुझीच व्याप्ति असा तूं अखण्ड अविनाशी सर्वसाक्षी, जन्ममरणातीत असा असून अंगरख्याच्या सुखदुःखाचें विकत श्राद्ध घेऊन सव्य-अपसव्य करण्याच्या व्यर्थ भरीस पडून आपण होऊन कां जन्म-संसृतीची माळ गळ्यांत घालून घेतोस ? देह प्रारब्धाचा आहे. त्याप्रमाणें त्याला अन्नोदकवस्त्राची योजना देहाआधींच परमेश्वरानें केली आहे. त्याची त्वां रिकामी काळजी करून कांहीं उपयोग नाहीं, तर त्याची कांहीं एक चिन्ता न करतां तुझ्याच प्राप्तीची तूं केलीस तर चिंता कर. या अशाश्वत वस्तूं-विषयीं वेड घेऊन भ्रमूं नकोस. नावरूप हें फोलकट आहे असें समजून सर्वत्र तूंच आहेस, यावर विश्वास ठेवून तूं सुखी रहा ! "

पुढें पुढें त्यांची स्थिति अशी झाली होती कीं, ते ईश्वरमय बनले होते. श्रीगुरुविना त्यांना कोणताच पदार्थ दिसत नसे. तशा परिस्थितींत त्यांच्या कवितांचे वेंचेहि दिसतात. ते म्हणतात—

" भक्ताला देवाची । देवासी भक्ताची । चाड आणिकाची । असूं नये "

—श्रीगुरुदास

योग कसा करावा याविषयीं त्यांचें एक उत्कृष्ट पद आहे. तें असें:—

" अर्कचि ध्यावा । चोथा तो फेकुन द्यावा ॥ ध्रु० ॥

बोलणें बोलावें वदनानें । ऐकणें ऐकावें कर्णानें
पहाणें पाहुनिया नयनानें । योग साधावा ”

याशिवाय कितीतरी उत्कृष्ट मासले काढून देतां येतील

एवंच महाराजांनीं, आपल्या तीव्र तपोबलानें परमेश्वर आपलासा करून घेतला व आपल्या वंशाचें नांव चिरस्मरणीय करून ठेविलें. महाराजांसारख्या परमवंद्य विभूतीच समाजाच्या उद्धाराला कारणीभूत होतात. सांप्रतावस्था अत्यंत बिकट आहे. भावभक्ति, धर्मश्रद्धा यांना फाटा मिळाला आहे. साधुसंतांना मान राहिलेला दिसत नाहीं. श्रद्धाळु अंतःकरणांची जनतेंत तीव्रतर उणीव भासूं लागली आहे. प्राप्त परिस्थिति कशी का असेना, परंतु अंतीं परमेश्वराला हेंच मागावयाचें कीं, अशा पुण्यपावन विभूति या पृथ्वीतलावर नेहमीं पाठवीत जा, कीं ज्यांच्यायोगें जडमूढ मानव—जातीचा उद्धार होईल !

महाराजांनीं मातेची कूस धन्य केली. श्रीविष्णुदास ब्रह्मीभूत झाल्यानंतर महाराजांनीं ज्येष्ठ बंधूंची ईश्वरतुल्य सेवा केली, भक्तगणांना संतुष्ट ठेविलें. अखेरीस श्रीदत्तभजनामृताचा लाहो घेत घेत महराज पौष व॥ १, शके १८४६ रोजीं निजस्वरूपीं लीन झाले !!

**श्रीसद्गुरुचरणारविंदीं समर्पित.**

---

# अजब चमत्कार.

( लेखक—कृष्णाजी गोविंद पाटणेकर, मुंबई. )

**दाणे दाणेपर लिखा है खानेवालेका नाम ।**
**रोटी तेरा धुंडत आवे मनमे रखो विश्राम ॥**

साधु कबीरदास——

[ ह. भ. प. रामचंद्र कृष्ण कामत यांच्या तोंडून ऐकलेली गोष्ट ]

अहाहा ! काय ही दिव्य वाणी ! काय हें ह्या दिव्य वाणींतील अपूर्व रहस्य ! पूर्ण सत्य ! पुण्य पावन अशा काशीक्षेत्रानजीक असलेल्या एका शहरांत एक धनाढ्य शेटजी रहात असे. तो अत्यंत सुखवस्तु गृहस्थ असल्यामुळें व लक्ष्मीदेवीची त्याच्यावर पूर्ण कृपादृष्टि असल्यामुळें शेटजी ऐश्वर्यमदानें अगदीं धुंद झाले होते ! एके दिवशीं एक फकीर रस्त्यानें वर उद्धृत केलेला कबीरदासांचा दोहरा म्हणत जात होता. तो गच्चीवर हवा खात ईझिचेअरवर पडून राहिलेल्या शेटजींनीं ऐकला. लगेच त्या शेटजींनीं फकिराला भिक्षा वगैरे न घालतां माडीवर बोलाविलें व म्हटलें, “ फकीरजी, आतां आपण जो

दोहरा म्हटलात त्याची सत्यता आपण पटवून द्याल काय ?" फकीरानें म्हटलें, 'होय, पटवून द्यायला काय उशीर!' वास्तविक पाहतां ह्या दोहऱ्यासंबंधीं इतकें ईर्षेला पेटून ऊहापोह करण्याचें शेटजीला बिलकूल कारण नव्हतें. आलेल्या फकीराला भिक्षा घालून वाटेस लावलें असतें तर भागलें असतें. पण आधींच ऐश्वर्यमदानें धुंद असलेल्या व त्यांत ईर्षेला पेटलेल्या त्या शेटजींची स्थिति "आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला" ह्या पद्यांतील मर्कटा-प्रमाणें झाली असल्यास त्यांत नवल तें कोणतें ? किंबहुना असेंहि म्हणतां येईल कीं, हा जो फकीर भिक्षा मागत वरील दोहरा म्हणत जात होता तो त्यांतील रहस्याचा प्रत्यक्ष पूर्ण अनुभव घेतलेला गृहस्थ असल्यामुळें त्यानें त्या शेट-जींच्या ऐश्वर्यमदाचा नक्षाच उतरविण्याकरितां परमेश्वरानें जणूं ह्या फकिराच्या तोंडून वदविला असेल असें म्हटल्यास फार सयुक्तिक ठरेल.

त्या शेटजींची बायको सुशील होती. तिनें आपल्या यजमानास पुष्कळ विन-विलें कीं, आपण या उठाठेवींत बिलकुल पडूं नये, परंतु शेटजी हट्टी व करारी स्वभावाचा असल्यामुळें तिच्या विनंतीकडे लक्ष न देतां लगेंच त्यानें नोकराकडून धान्य आणविलें व फकीरापुढें ठेवून म्हटलें—" फकिरजी, बोला आतां या धान्यावर कोणाकोणाचें नांव आहे तें!" लगेंच फकीरानें उत्तर दिलें, " महाराज, यांतील दोनच दाण्यावर काशींतील कुक्कुटाचें नांव आहे." हें फकिराचें भाषण ऐकून शेटजी म्हणाले कीं, ह्या दोन दाण्यावर काशींतील कोंबड्याचें नांव आहे हें फकीरानें सिद्ध केलें तर ठीकच, नाहींतर फकिराची धिंड काढून त्याला पुनः असा दोहरा कधींहि न म्हणण्याबद्दल सक्त ताकीद द्यावी व सिद्ध करून दाखविल्यास त्याला आपली अर्धी संपत्ति बहाल करावी असें त्या दोघांमध्यें ठरलें.

शेटजींनीं लागलेंच तें धान्य आपल्या स्वयंपाक्याकडून तयार करविलें व त्याच ठिकाणीं फकिर समक्ष त्यानें तें अन्न वाढवून आपण भोजनास बसला. थोडा वेळ गल्यावर तें अन्न अर्थात् संपत आलेंच होतें; व शेवटचा घास घेऊन आतां फकिराच्या वचनाची असत्यता सर्वांसमक्ष पटविणार. इतक्यांत असा चमत्कार झाला कीं, एकदम शेटजीला जेवत असतांना उत्तरा (ठसका) लागून शेटजी एकदम थंडगार पडले! त्यांची श्वासोच्छ्वासाची गति अगदीं बंद पडण्याच्या बेतांत आली. ही स्थिति पाहून शेटजींच्या सच्छील अशा धर्मपत्नीनें फकिराचे घट्ट पाय धरून परोपरीनें क्षमा मागितली व म्हटलें, "महाराज, आतां आपल्या या धर्मकन्येला चुडेदान देऊन तिच्या सौभाग्याचें रक्षण करा." ही तिची करुणास्पद स्थिति पाहून फकीराचें अंतःकरण विरघळून गेलें! व त्यांनीं तिला म्हटलें, " मुली, भिऊं नकोस, थोड्या वेळानें तुझा पति सावध होईल."

तो फकीर तिला आश्वासन देत होता तरी तिच्या मनाची स्थिति समाधान

कारक नव्हती. इकडे शेटजींचे डोळे पांढरे होण्याची वेळ आली, आतां पुढें कोणता उपाय करावा हेंच कोणास सुचेना. मग काय विचारतां ? धांवपळ करून या वैद्यास बोलवा, त्या हकीमास आणा, त्या एम. डी. झालेल्या डॉक्टरास पाचारण करा, असें करतां करतां त्यांच्या नाकीं नऊ आले, तरी शेटजीस कांहीं गुण म्हणून पडेना ! पुढें सर्वांच्या विचारानें असें ठरलें कीं, शेटजीस अशाच स्थितींत काशींत नेऊन तेथल्या एका प्रसिद्ध हकीमाकडे नेऊन त्यांस दाखवावें. गुण आल्यास शेटजींचें नशीब !

असें म्हणून व शेवटचा उपाय म्हणून त्यांस काशींतील हकीमाकडे डोलींतून नेण्यांत आलें ! बरोबर नोकर चाकर, पत्नी व तो फकीरहि गेला होता. इकडे काशींतील त्या हकीमाचें घर गांवच्या सीमेवरच होतें, तिकडे ही मंडळी गेली. इकडे तो हकीम प्रत्येक रोग्याची तपासणी करीत करीत ह्या आमच्या शेटजींकडे आला; व त्याची नाडी हातांत धरून पाहूं लागला तों नाडी तर चांगली चाललेली हकीमाला आढळून आली. तेव्हां शेटजींच्या पत्नीनें हकीमास पूर्वींपासून घडलेली हकीकत सांगितली व शेटजीस आराम वाटेल अशी औषधयोजना करण्यास सांगितलें. हकीमानें त्याचें प्रकृतिमान पाहून असें ठरविलें कीं, याला रोग वगैरे कांहीं नाहीं, याची नाडीतर फार उत्तम चालत आहे, तेव्हां अशी स्थिति होण्याचें कारण तो शोधूं लागला. लगेंच कनवटींतील तपकिरीची डबी काढून तींतील चिमूट घेऊन शेटजींच्या नाकाला लावतांच चटकन् शिंकेसरशीं नाकांतील श्वासोच्छ्वासाच्या नळींत जाऊन राहिलेले दोन दाणे खालीं पडले ! हा प्रकार चालला असतांना त्या वेशींतील कोंबडा आपलें खाद्य वेंचीत वेंचीत त्या ठिकाणीं आला व त्यानें त्या शेटजींच्या शिंकेसरशीं खालीं पडलेले दोन दाणे भक्षण करून फकिराचें भविष्य खरें करून दाखविलें ! मग शेटजींनीं ठरल्याप्रमाणें त्या फकिराचें सन्मानपूर्वक स्वागत केलें व त्यास आपली अर्धी संपत्ति बहाल केली !

वाचकहो ! व्यवहारांत देखील असे प्रसंग वारंवार अनुभवावयास सांपडतात. एकाकरितां राखून ठेवलेला जिन्नस अगांतुक कोणी तरी पाहुणा येऊन त्या जिनसाचा वाटेकरी होतो व बहुधा संसारांत ह्याच कारणावरून 'ज्याचा भाग तो नेतो' ही म्हण रूढ झाली असावी व ती किती सत्यपूर्ण आहे याची या प्रसंगावरून खात्री पटते.

वरील गोष्टीवरून आपणांस इतकाच बोध घेतां येईल कीं, आपण एखाद्यावर उपकार केला किंवा एखादा आपला आश्रित असला, तर आपण आहों म्हणून त्याचा चरितार्थ चालतो, किंवा मी अमक्याचा पोशिंदा आहे वगैरे अभिमानमूलक प्रवृत्तीचा पूर्ण निरास झाल्याशिवाय "**आम्हीं काय कुणाचें खातों तो राम आम्हाला देतो**" या व वर उल्लेख केलेल्या दोहऱ्याची सत्यता कधींहि पटावयाची नाहीं. अस्तु.

जय जय रघुवीर समर्थ !

# पांगारकरांची पुस्तकें

१. **भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति चौदावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ०८ व्ही. पी. नें ०१२.

२. **संतचरित्रमालाः**—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४२ संतांची चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ. सं. २५६ किं. रु. १०८.

३. **श्रीएकनाथचरित्रः**—श्रीएकनाथमहाराजांच्या चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ०१२.

४. **कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडो स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ०४.

५. **आनंदलहरीः**—( कवितासंग्रह ) ह्यांत पांगारकरांच्या कवितांपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत, १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ०१२.

६. **नारदभक्तिसूत्रें**—( आवृत्ति ४ थी ) हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ०८.

७. **नवविधाभक्तिः**—( सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी ) यांत नवविधा-भक्तींचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ०६.

८. **निरंजनमाधवांची कविताः**—भाग १ किं. रु. भाग २ व ३ एकत्र किं. १॥ रु.

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्रः**—( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे किं. १०८.

१०. **भक्तिमणिमालाः**—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १०८

११. **सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टीः**—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध पुढारी कै. विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ०५.

१२-१३-१४. **मुमुक्षूंतील निवडक निबंधः**—भाग १ व २ किं. प्रत्येकीं १०८, भाग ३ रा किं. १०४.

१५. **मोरोपंती वेंचेः**—( दुसरी आवृत्ति ) पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रहि नवीन दिलेलें आहे. किं. रु. १०१२.

मुमुक्षु **REG. No. B. 662**

## पांगारकरांचीं पुस्तकें

**१६. पारिजातकाचीं फुलें:**—( तिसरी आवृत्ति ) परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ०८.

**१७. श्रीतुकारामचरित्र:**—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलाचा पंढरपूरचा व देहूचे सहा असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ. सह किं. रु. २.

**१८. श्रीतुकारामचरितामृत:**—तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं ०५.

**१९. निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य:**—निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख-विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ०१०.

**२०. मुक्तेश्वर:**—( चरित्र आणि काव्यविवेचन ) श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे प्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १.

**२१. मारुतिउपासना** ( चौथी आवृत्ति ):—किं. ०४.

**२२. सार्थ श्रीदासबोध:**—( आवृत्ति दुसरी ) किं. रु. ४ व्ही. पी. नें ४०१०

**२३. सार्थ मनोबोध:**—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ०१२.

**२४. समर्थसंजीवनी ऊर्फ रामदासी वेंचे:**—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें ह्या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.

**२५. मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन ):**—किं. रु. २०८.

**२६. श्रीएकनाथी भागवत** (निर्णयसागर प्रेसचें, आवृत्ति तिसरी):—किं. रु. ६

**२७. श्रीसमर्थग्रंथभांडार:**—समर्थांची एकंदर कविता एकत्र सटीप छापलेली आहे. किं. ४०८.


**२८. समर्थग्रंथभांडार** ( भाग २ रा ):—यांत दासबोधाशिवाय बाकीची समर्थांची सर्व कविता प्रकरणें पाडून व्यवस्थित दिली आहे. किं. रु. २०८.

**२९. ज्ञानेश्वरांची प्रभावळ:**—ज्ञानेश्वरमहाराज व त्यांचे समकालीन नामदेवराव, जनाबाई, चोखामेळा इत्यादि सर्वजातीय २५ संत यांच्या ग्रंथांतील निवडक वेंचे प्रस्तुत ग्रंथांत घेतले आहेत. यांत ज्ञानेश्वरांच्या २५०० ओव्या व सर्व संतांचे मिळून ४०० अभंग आहेत. सुंदर प्रस्तावना आहे. टीपा भरपूर आहेत. किं. रु. २.

पत्ता:—**व्यवस्थापक " मुमुक्षु " पुणें शहर.**

॥ श्री रुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होईजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष २४ वें | फाल्गुन–चैत्र १८५२ | नवें वर्ष १० वें |
| मास ६।७ | मार्च–एप्रिल १९३० | अंक ३।४ |



संपादक व प्रकाशक,

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

मुमुक्षुकचेरी, बुधवार पेठ, पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही. पी. नें रु. ३-३

मुद्रकः—लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव, घ. नं. ३००
येथें आपल्या "हनुमान" छापखान्यांत छापिलें.

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ मंगलाचरण | १ |
| २ ब्रह्मीभूत श्रीवासुदेवस्वामी धामणीकर | २–४३ |
| ३ गोपाळ गणेश आगरकर | ४४–६७ |
| ४ कांहीं मराठी लेखकांचें निधन | ६८ |
| ५ स्वयंवराचे दुष्परिणाम | ६९ |
| ६ इंग्रज विधवांची स्थिति | ७० |
| ७ श्रीशंकराचार्यांचें अस्पृश्यांस उत्तर | ७१–७४ |
| ८ संतसंग | ७४–७७ |
| ९ अभिप्राय | ७७–८० |



# निरंजनमाधवाची कविता

**भाग १ ला किं. १ रु.** **भाग २–३ किं. १॥ रु.**

पहिल्या बाजीराव पेशव्यांचे अमदानींतल्या राजकारणी, योगी व अधीत अशा निरंजनमाधव कवीच्या काव्यांच्या कविलिखित प्रतीवरून हे दोन भाग छापले आहेत. दुसऱ्या भागांत ज्ञानेश्वरमहाराजांचें उद्बोधक चरित्र रसाळ वाणीनें गाइलेलें ग्रथित केलें आहे. तिसऱ्या भागांत चिद्बोधरामायण हें अध्यात्मरामायणाच्या धर्तीवरील काव्याचें बालकांड आहे. अद्वैतबोध वगैरे वेदांतपर पांच स्फुट काव्यें कठिण विषय सुलभपणें प्रौढ भाषेंत सांगणारीं अशीं घातलीं आहेत, व शेवटीं मराठींतील एकच चंपू काव्य जें "सूभद्रा–चंपू" नांवाचें या कवीनें केलें आहे तें छापलें आहे. यांतील भाषा आणि वर्णनशैली प्रौढ, मनोहर व सुंदर असून सुभद्राहरणाचा नेहमीचा कथाभाग या कवीनें आपल्या विद्वत्तेनें रसिकमान्य केला आहे. अशा या अपूर्व काव्यसंग्रहानें हे दोन भाग भरले असून दोन्ही एकत्र बांधविले आहेत.

पत्ताः—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें सिटी.

मुमुक्षु मासिक
वर्ष १० वें

# मंगलाचरण

मार्च एप्रिल
१९३०
अंक ३४



खं वायुमग्निं सलिलं महीं च ज्योतींषि सत्वानि दिशो द्रुमादीन् ।
सरित्समुद्रांश्च हरेःशरीरं यत्किंच भूतं प्रणमेदनन्यः ॥ [भागवत]

ब्रह्मउन्माद परमानंदें । जंव जंव पाहे स्वानंदबोधें ।
तंव तंव चराचर पूर्णानंदें । देखे स्वानंदकंदें दुमदुमित ॥ ३२ ॥
पृथ्वी आप तेज वायु नभ । देखे हरिरूप स्वयंभ ।
भूतां महाभूतांचें डिंभ । न देखे भिन्नक्षोभ अभिन्नत्वें ॥ ३३ ॥
जेवीं कांतोनियां रंध्रसळें । स्फटिकदीपगृह अंगमेळें ।
चितारिलीं अश्वगजदळें । तीं भासती सोज्ज्वळें आंतुलेनि दीपें ॥३४॥
तेवीं सोमसूर्यादि तेजशक्ती । कां वन्हि नक्षत्रें जे लखलखिती ।
जननयनादि निजदीप्ती । देखे आत्मज्योती सतेज ॥ ३५ ॥
पृथ्वी गंधरूपें स्वयें असे । तो गंधु कस्तुर्यादिकीं भासे ।
तेवीं भगवत्सत्ता सर्वत्र असे । परी सात्विकीं दिसे अति प्रगट ॥३६
पूर्वपश्चिमादि योग । दशदिशांचे दिग्विभाग ।
तेही देवाचेचि अंग । तद्रूप श्रीरंग स्वयें भासे ॥ ३७ ॥
तृण दूर्वा दर्भ द्रुम । देखोनि म्हणे हे हरीचे रोम ।
नोळखा हे अतिविषम । निजांगीं सम हरिरूप पाहतां ॥ ३८ ॥
दिशा आपुल्या आंगोळिया । गणितां दिसती वेगळालिया ।
परी असती लागलिया । स्वयें सगळिया अखंड अंगीं ॥ ३९ ॥
चैतन्यापासूनि वोघ । निघाले सरितारूप अनेग ।
तेही चैतन्य घन चांग । चिद्रूपें सांग सदा वाहती ॥ ४० ॥
ऐसे वेगवेगळे भाग । पाहतां उल्हासे जंव चांग ।
तंव अवघें उघडें जग । देवोचि सांग स्वयें जाला ॥ ४१ ॥
यालागीं सर्व भूतांचे ठायीं । अनन्य शरण कैसा पाहीं ।
लवण जैसें सागरापायीं । ठायीं ठायीं जडोनि ठाके ॥ ४२ ॥

(ए. भा.)

# ब्रह्मीभूत श्री वासुदेवस्वामी धामणीकर.

( ले. गोविंदसुत. )

( फेब्रुवारीच्या अंकावरून समाप्त )

माहिती घातली. लागलीच त्यांनीं पुण्याहून धामणी सतरा अठरा कोस आहे, तेथें तांगा व माणूस पाठविला. बुवा अशक्त असत. तरी पण कोणाचाहि मनोभंग करण्याचें त्यांच्या फार जिवावर येत असे. निमंत्रण ज़ातांच बुवा पुण्यास आले. गायआळींत एक कीर्तन झाल्याबरोबर बुवांचा लौकिक सर्व पुण्यांत पसरला. तुळशीबाग, बेलबाग, सोमेश्वर, रामेश्वर, ओंकारेश्वर इत्यादि अनेक देवळांतून व कै० श्रीमंत तात्यासाहेब खासगीवाले, कोनकर, कटककर, मोरोबादादा, संगमेश्वरकर जोशी, ताई महाराज इत्यादिकांच्या वाड्यांतून बहुत ठिकाणीं बुवांचीं मोठीं प्रेमळ आणि सुश्राव्य कीर्तनें झालीं. निमंत्रणावर निमंत्रणें येऊं लागलीं. दररोज दिवसा व रात्रीं अशीं दोन दोन कीर्तनें होऊं लागलीं. लोकांची भीड तुटेना. बुवांची मूळची प्रकृति अशक्त, आजारी पडण्याची वेळ आली. शेवटीं बुवांनीं एक दिवस कोणाला न विचारतां व न कळूं देतां यःपलाय केलें ! निमंत्रणें आलीं तों बुवा जागेवर नाहींत. लोकांची निराशा झाली ! शके १८२० म्हणजे सन १८९७ किंवा १८९८ सालची ही गोष्ट आहे. त्यावेळीं बुवांचें वय ३९।४० वर्षांचें होतें. त्यानंतर ते वर्ष दोन वर्षांनीं पुण्यास येत असत. मंडळी त्यांना मुद्दाम आणीत असत. याप्रमाणें दहा बारा वर्षांत त्यांच्या पांच सात खेपा झाल्या. बुवा पुण्यास आले म्हणजे त्यांचीं कीर्तनें प्रवचनें होत असत. आपल्याला जें समजत आहे, तें दुसऱ्याला मोकळ्या मनानें सांगावें, अशी त्यांची फार इच्छा असे. कोणी विचारणारा आला, तर त्याला आस्था आणि अंतःकरणपूर्वक मोकळ्या मनानें त्याची समजूत पडेपर्यंत निरनिराळ्या प्रकारांनीं मोठ्या कळकळीनें बुवा सांगत असत. अलीकडे बुवा फार थकले होते. तथापि कोणी कीर्तनाचा प्रवचनाचा आग्रह केल्यास ते कीर्तन, प्रवचन करण्याला मोठ्या उमेदीनें उभे राहात. परंतु अशक्ततेमुळें कीर्तन अर्धवट पुरें करून त्यांना मटकन् खालीं बसावें लागे ! गेल्या वैशाखमासीं बुवा महिनाभर पुण्यास होते. वैशाख वद्य अमावास्येला हरिभक्तिपरायण केशवराव महाराज देशमुख यांच्या ज्ञानेश्वरी मठांत लोकाग्रहास्तव त्यांचें अशक्त स्थितींतच अर्धातास बुद्धियोगावर प्रवचन झालें. त्यावेळीं ते इतके थकले होते कीं, श्रीनरसोबाचे देवळापासून सुमारें एक फर्लांग अंतरावर ज्ञानेश्वरी मठांत पायीं येण्याला त्यांना पंधरा मिनिटें लागलीं. या प्रवचनाला कै० प्रोफेसर परांजपे, विद्वद्वर्य नानासाहेब वैद्य, वैद्यभूषण गणेश शास्त्री जोशी, श्रीयुत वासुकाका जोशी, ह. भ. प. केशवराव महाराज देशमुख वगैरे बरीच मंडळी आली होती. तेंच बुवांचें पुण्यांतील शेवटचें प्रवचन आणि तीच त्यांची मला व पुण्याला शेवटची भेट !!

श्रीयुत दिगंबरराव जोशी यांचें वर नांव आलेंच आहे. त्यांचें व बुवांचें

जिव्हाळ्याचें प्रेम असे. यामुळें बुवा दिगंबरपंतांकडे वारंवार येत असत. व दिगंबरपंतांचे मनांत आलें तर तेही बुवांच्या दर्शनास धामणीस मुद्दाम जात असत. बुवा दिगंबरपंतांकडे आल्यावर दोघांनाहि मूळव्याधीचा उपद्रव, बहिर्दिशेला बराच वेळ लागावयाचा, यामुळें सकाळींच उठून प्रातःस्मरामि झाल्यावर उभयतांनीं लांब पर्वतीच्या बाजूला बहिर्दिशेच्या निमित्तानें जावें व तेथें वेद, वेदांत, उपनिषदें यांच्या संबधानें तास तास एकांतांत उभयतांचे सुखसंवाद होत असे.

आतां वासुदेवराव वैशंपायन यांचें थोडें चरित्र सांगून मग वासुदेवबुवांकडे वळूं. पुण्याचे प्रसिद्ध जहागीरदार आबासाहेब पुरंदरे यांजकडे पनवेलचे कै० विसुनाना वैशंपायन कारभारी होते. त्यांनीं आबासाहेबांचा कारभार फारच उत्तम करून आपला व आबासाहेबांचा लौकिक वाढविला होता. विसुनानांचे चिरंजीव वासुदेवराव होत. वासुदेवरावांचें पहिलें कुटुंब दामोदर विद्याधर गोखले यांची कन्या. प्रसिद्ध कादंबरीकार हरिभाऊ आपटे यांचे वासुदेवराव हे साडू होत. वासुदेवरावांनीं पहिलें कुटुंब निवर्तल्यावर दुसरें कुटुंब केलें. ती सुप्रसिद्ध लेखक श्रीयुत हरि रघुनाथ भागवत बी. ए. यांची बहीण होती. वासुदेवराव प्रथम कलेक्टर आफिसांत क्लार्क होते. नंतर वडिलांच्या पश्चात् पुरंदऱ्यांचे कारभारी झाले. वासुदेवरावांना वेदांताचा फारच नाद होता. ते कीर्तन करीत असत. पुण्यांतील कीर्तन, पुराण एकहि सोडीत नसत. मारुती उत्सवांतील रात्रींचीं कीर्तनें होतात तीं सर्व दररोज एक फेरी करून ऐकत असत. शास्त्री, पंडित, वेदांती, धांदाती, हल्लींचे आधुनिक तत्त्ववेत्ते या सर्वांच्या बुद्धिवादाचा ठावठिकाण, खोली, उंची, पूर्णपणें त्यांनीं जाणली होती. इतक्या अल्पवयांत त्यांनीं सर्व वेदांताचें आलोडन करून ते शुद्ध भूमिकेवर निःसंदेहपणानें स्थित झाले होते. त्यांचें मरणसमयीं वय अवघें तीस बत्तीस वर्षांचें होतें. बुद्धि अति तीव्र असे. त्यांची निःसंदेहपणाची बैठक अखेरपर्यंत ढळली नाहीं. शास्त्री, वेदांती, यांचा जमाव पाहिला कीं, वासुदेवरावांनीं त्यांच्या पुढें मजेनें एकादें कोडें टाकावें आणि आपसांत कलागत लावून देऊन त्यांच्या वितंडवादाची मौज ऐकत बसावें, हा नाद वासुदेवरावांना फार असे. सर्व शास्त्री, वेदांती हे बहुतेक शास्त्रीय वाचनांत गुरफटलेले; "**वस्तु राहिली एकीकडे । आपण धांवतो भलतीकडे**" अशा स्थितींत "**सारासाराचे निवाडे । कैसे होती**" ? ही अनुभवशून्य बहुतेक शास्त्री, पंडित, वेदांती, हरिभक्तिपरायण यांची स्थिति असते. वासुदेवरावांनीं प्रश्न करावे कीं, शास्त्रीबुवा ! सर्वब्रह्म खरें कां विमलब्रह्म खरें ? सगुणब्रह्म खरें कां निर्गुण खरें ? विष्ठा ही ब्रह्म आहे काय ? विश्व हें ब्रह्म आहे कां भ्रम आहे ? तुमचें शरीर ब्रह्म कां भ्रम ? स्वतः तुम्ही कोण आहांत आणि ब्रह्म असाल तर कशावरून ? तुमचा स्वतःचा

अनुभव आणि सिद्धांत काय ? ब्रह्म जाणतो तो कोण ? इत्यादि प्रश्न विचारले कीं, त्या श्रोत्यांना सत्संगतीनें, स्वानुभवानें विचार न करतां स्वयंमन्यतेमें शास्त्रांच्या वचनांत गुरफटून शास्त्राधारें विचार करण्याची लागलेली खोड; म्हणून वासुदेवरावांनीं अशा प्रकारचे प्रश्न या मंडळींच्या अंगावर फेंकले कीं, शास्त्री पंडितांनीं किंवा भगवद्भक्तांनीं शास्त्रवचनांचा कीस काढीत भांडत बसावें आणि आमच्या वासुदेवरावांनीं तो वितंडवाद ऐकत बसावें ! बरें, या विवादी वावदूक मंडळींना खरा सिद्धांत सांगावयाला जावें तर ते अहंमन्यतेच्या किंवा स्वयंमन्यतेच्या लवडसवडीनें लिडबिडलेले असल्यामुळें खरा बोध त्यांच्या अंतःकरणांत शिरण्याची आशाच नसते ! उपदेशक आणि उपदेश-ग्राहक यांच्यामध्यें गुरुशिष्यत्वाचा भाव असेल, शिष्याला ग्राहक बुद्धि असेल, तरच तेथें उपदेश ठसणार. "**एक शिष्य एक गुरु । हा रूढला साच व्यवहारू । मत्प्राप्ति प्रकारू । जाणावया** "म्हणून त्या शास्त्री, पंडित, भगवद्भक्तांच्या निगरगट्ट झालेल्या बुद्धींत ग्राहकशक्तीचा अभाव झालेला असतो. आणि काहीं एका प्रकारचें त्यांचें मत दृढ झालेलें असतें. अशा त्यांच्या त्या मनांत शुद्धमतीनें शुद्धस्वरूपाचा बोध शिरणें शक्य नसतें. म्हणून त्यांना खरा सिद्धांत सांगण्याची सोय नसते. यामुळें तो वितंडवाद मौजेनें ऐकण्या-पलीकडे दुसरा इलाज नसतो.

वासुदेवरावांचा स्वभाव फार उमदा आणि बेफिकीर असे. त्यावेळीं पुण्यास पाइटकर मामा म्हणून एक अद्वितीय विभूति होती. त्यांना मीं पाहिलें होतें. तुळशीबागवाल्यांचा व पाइटकर मामांचा काहीं नात्याचा संबंध होता. पुण्यांतील प्रसिद्ध आप्पासाहेब गद्रे यांचे वडील कै० बापूसाहेब, यांचे पाइटकर मामा हे गुरु होत. मामा हे पेन्शनर होते. वऱ्हाडांत ते मास्तर होते. मामांनीं वेदांताचीं इंग्रजी, मराठी संस्कृत सर्व पुस्तकें वाचलीं होतीं. आणि पाठांतर अतीच दांडगें होतें ! त्यांना अद्वितीय म्हणण्याचें कारण, बाराचिवारा चोवीस तास बोलत बसण्याची त्यांची तयारी असे ! तासाचे तास त्यांच्या वाणींतून इंग्रजी, मराठी वेदांतवाङ्मयाचा ओघ निघत असे, तो ऐकतच बसावें असें वाटे ! त्यांच्या तोंडाला कधीं खिळ नसे. विचार गंभीर खंबीर व मननीय असत. कोठें तरी स्नान, कोठें तरी भोजन, आवडीच्या लोकांकडे कधीं तरी येऊन बोलत बसत. असे ते मामा जणू अवलीया असत. असा पुरुष दुसरा माझ्या पाहाण्यांत नाहीं. वासुदेवराव हे पाइटकर मामांच्या सहवासांत रात्रींच्या रात्री घालवीत असत. वासुदेवरावही पाइटकर मामाप्रमाणें रात्रीं अकरा बारा वाजतांहि कधीं कधीं अकस्मात दत्त म्हणून आवडीच्या लोकांकडे जात असत ! प्लेगच्या दिवसांत एकदा आमचा दौऱ्यावरील मुक्काम सायंकाळीं पुण्यास आला. आमचें बिऱ्हाड मोकळेंच होतें म्हणून ऑफिसची मंडळी आमच्याच बिऱ्हाडीं उतरली होती.

रात्रीं सर्व सामसूम निजले. रात्रीं बारा वाजतां वासुदेवरावांची स्वारी मजकडे आली. पहांटे पांच वाजेपर्यंत ते व मी ज्ञानेश्वरीची चर्चा करीत बसलों. पुढें झोंप लागली. दरवाजा चुकून उघडा राहिला. भामट्यानें आंत शिरून सर्व कारकुनांचे रुमाल, पगडया, कोट इ० पोषाख सर्व लांबविले! मंडळी प्रातर्विधि आटोपून बाहेर जाण्याला पाहतात तों पोषाख नाहीं! पोलिसामार्फत पुष्कळ तपास केला, पत्ता लागला नाहीं!

वासुदेवराव अल्पवयांत ३०।३२ वर्षांचे असतांच निवर्तले. त्यांना ताप येऊं लागला. त्यांजकडे मी रात्रीं दासबोध वाचण्यास जात असें. श्रीयुत दिगंबरराव जोशी हेही येत असत. एक दिवस दासबोध वाचून रात्रीं दहा वाजतां मी बिऱ्हाडीं आलों. इतक्यांत दिगंबरराव मजकडे तांतडीनें आले आणि म्हणाले, वासुदेवाची स्थिति चांगली नाहीं. त्यानें तुम्हांला आतांच्या आतां बोलावलें आहे! मी लागलीच गेलों. वासुदेवराव हे माटे यांचे सांप्रदायी रामदासी असत. मी गेलों तों त्यांनीं रामदासी भगवा पोशाख चढवलेला, हातांत चिपळ्या आणि भजन चाललें होतें. मी जातांच मला वासुदेवराव कडकडून भेटले आणि म्हणाले, "परशुरामभाऊ! तुमचाआमचा ऋणानुबंध आतां सुटणार! कांहीं फिकीर नाहीं. पुढल्या जन्मीं भेटूं! मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, मी यावेळीं चांगला शुद्धीवर आहें. परंतु लवकरच मी बेशुद्ध होणार आहें, आणि त्या बेशुद्ध स्थितींत आबासाहेब वगैरे मंडळी डिमेलो वगैरे डॉक्टर आणतील आणि इंग्रजी औषधें माझ्या घशांत कोंबून मला भ्रष्ट करतील. म्हणून याचा बंदोबस्त तुम्ही करा"! इतकें झाल्यावर कांहीं वेळानें ते बेशुद्ध झाले. इंग्रजी औषधें न देण्यासंबंधानें मीं व दिगंबररावांनीं पुष्कळ प्रयत्न केला. परंतु कांहीं उपाय चालला नाहीं. आबासाहेब आदिकरून मंडळींनीं डॉक्टरचीं औषधें सुरू केलीं. बेशुद्ध स्थितींत वासुदेवराव ८।१० दिवस होते. पुढें एक दिवस ते कढीभात मागूं लागले. अशा रोग्यानें कढीभात मागितला म्हणजे रोगी जगण्याची आशा नाहीं असें समजावें. मी रात्रंदिवस वासुदेवरावांजवळ होतों. कढीभात मागितल्याच्या दुसरे दिवशीं सकाळीं शुद्धींत असतांना वासुदेवरावांचें प्राणोत्क्रमण झालें. प्राणोत्क्रमण होण्यापूर्वी मीं त्यांना विचारलें कीं, तुम्ही शुद्धींत आहांना? अधिष्ठानाच्या ठिकाणीं कांहीं गडबड झाली नाहींना? किंचित् हास्य करून त्यांनीं मान हालवून 'नाहीं' असें खुणेनें दाखविलें व क्षणार्धांत प्राण सोडला! वासुदेवराव आम्हांस चटका लावून गेले! परंतु अंतकालाच्या वेळीं "**बाहेरी भूतांचीं पांचहि खवळें। नेणतांचि पडलीं**" अशा प्रसंगीं "**प्रतीतीचिया पोटींचें पाणी न हाले**" हा श्रीज्ञानोबांनीं "**अंतकालेंच**

**मामेव०** " या श्लोकावर सांगितलेला अनुभव वासुदेवरावांनीं अंतकाळीं प्रत्यक्ष दाखविला ! आतां पुढल्या जन्मीं भेटण्याचें मला दिलेलें आपलें वचन ते केव्हां व कोठें पुरें करतील, हें त्या विश्वकर्म्याला माहीत ! एकंदरींत वासुदेवराव वैशंपायन हे आध्यात्मिक ज्ञानसंपन्न होते. दुर्दैवानें अल्पवयी झाले नसते तर त्यांनीं निःसंशय आध्यात्मिक ज्ञानांत चांगलीच कीर्ति मिळविली असती. वासुदेवबुवांबद्दल वैशंपायन यांची दिगंबरपंतांप्रमाणेंच जिव्हाळ्याची पूज्यबुद्धि असे. बुवांचे सिद्धांत व त्यांची शुद्धबुद्ध भूमिका वैशंपायन यांना पटली होती. सन १८९७ सालीं वैशंपायन यांनीं बुवांना प्रथम पुण्यांत आणलें. त्यानंतरहि त्यांनीं आपल्या हयातींत दोन तीन वेळां पुन्हां पुण्यांत आणलें होतें. आणि पर्वती तळ्यानजीकच्या पुरंदरे यांच्या बागेंत बुवांच्या संगतींत आम्हीं रात्रींच्या रात्री घालविल्या आहेत. ते दिवस गेले !

वासुदेवबुवांचीं कीर्तनें वारकरी पद्धतीप्रमाणें होत असत. पुण्यांत त्यांचीं कीर्तनें होत त्या वेळीं प्रथम वासुदेवराव वैशंपायन उभे राहून अभंग व भजन म्हणत व नंतर वासुदेवबुवा कीर्तनाला उभे राहात आणि वासुदेवराव हे बुवांच्या मागें उभे राहात असत. त्यांची साथ बुवांना फार उपयोगी पडत असे. बुवा उभे राहिले म्हणजे त्यांनीं प्रथमारंभीं " **टाळ धरूं कथा करूं । रामालागीं हांका मारूं** " हा समर्थांचा किंवा दुसरा एखादा गोडसा अभंग म्हणण्याला आरंभ केल्याबरोबरच कीर्तनांत रंगदेवता उभी राहात असे. बुवांचा आवाज मोठा आणि फार प्रेमळ व गोड चालीवर ते अभंग म्हणत असत. बुवांच्या कीर्तनाला त्या वेळीं एक प्रसिद्ध विद्वान् शास्त्री येत असत. पण ते कधीं पुढें येत नसत. कोणत्याही कीर्तनांत त्यांचा पुढें येऊन बसण्याचा सहसा पाठ नसे. " **कथा होते तेथें जावें । दूर दीनासारखें बैसावें । तेथील हार्द्र तें घ्यावें । अंतर्यामीं** " ह्या समर्थवचनाचें ते अनुकरण करीत असत. त्या बाबतींत दीनासारखे याऐवजीं शास्त्रीबुवा घोंगडीचें बुंगरूट पांघरून गुप्तरीतीनें येऊन दूर बसून तेथील हार्द्र घेत असत. वासुदेवराव वैशंपायन यांनीं गीतेचा अर्थ या शास्त्रीबुवांजवळ समजावून घेतला होता. यामुळें वासुदेव हा आपला शिष्य आहे असें शास्त्रीबुवा समजत असत. वासुदेवरावही शास्त्रीबुवांची योग्यता जाणून होते. वासुदेव हा आपला शिष्य असतांना तो वासुदेवबुवांच्या मागें उभा राहातो हें पाहून शास्त्रीबुवा मनांत फार जळफळत असत. हा व्यभिचारदोष शिष्य करतो अशी त्यांची समजूत होती व त्याप्रमाणें ते उद्गार काढीत असत ! शेवटीं वासुदेवराव निवर्तल्यावर शास्त्रीबुवांनीं उद्गार काढले कीं, " वासुदेव हा गुरुद्रोहामुळें अल्पायु झाला !" आतां या अज्ञानाला काय म्हणावें ? शास्त्रीबुवा स्वतःचे ज्ञानानें पुढें आलेले, प्रवचनांत सर्व श्रोत्यांना गार करून सोडीत. पण स्वभाव तापट ! शास्त्रीबुवांनीं

बायकोच्या रागानें शेवटीं संन्यास घेतला होता म्हणतात ! यावरून मी जें वर म्हटलें आहे कीं, कांहीं विभूति फक्त संभावनीय असतात, प्रत्यक्ष हातीं धरण्याची सोय नसते, त्यांपैकीं ही विभूति होती हे वासुदेवबुवाही जाणून होते. पण तें मनांत न आणतां ते शास्त्रीबुवांपाशीं मोठ्या प्रेमानें वागत असत. अशा प्रकारच्या बऱ्याच विभूति माझ्या पाहाण्यांत आहेत. आणि त्यावरून अर्जुनानें भगवंताला जो प्रश्न केला आहे कीं, " **अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः** " ? " **तरी देवा हें कैसें । जे ज्ञानियांचीही स्थिति भ्रंशे । मार्ग सांडूनि अनारिसे । चालत देखों ॥ सर्वज्ञही जे होती । हे उपायही जाणती । तेही परधर्मे व्यभिचरती । कवणे गुणे** " ? हा अर्जुनाचा प्रश्न आणि त्यावर भगवंताचें उत्तर " **काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः । महाशनो महापाप्मा विद्धयेनमिह वैरिणम्** " याची आठवण झाल्याशिवाय राहात नाहीं ! हरीची माया अनिवार हेंच खरें !

वासुदेवबुवांचीं कीर्तनें ऐकून त्यांची धन्यता गाणारे पुण्यांत अद्यापहि लोक आहेत. लोकमान्य टिळक, प्रो० जिन्सीवाले, परांजपे इत्यादि जाडे विद्वान्, श्री. नानामहाराज साखरे, डॉक्टर महाजनी, केशवशास्त्री दामले, विष्णुबुवा जोग, पांगारकर इत्यादि शास्त्री, पंडित, विद्वान् भगवद्भक्त बुवांच्या कीर्तनाला येऊन समाधान व्यक्त करीत असत. वासुदेवबुवा हे शास्त्री, पंडित, विद्वान् होते अशांतला मुळींच भाग नाहीं. पण त्यांच्याजवळ जें होतें तें खणखणीत नाणें होतें. त्यांच्याजवळ निश्चयाचें बळ होतें. त्यांची वाणी " **अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितंच यत्** " अशा प्रकारची होती. त्यांच्या वाणींत बौद्धिक तपश्चर्येचें तेज होतें., ते निश्चयाचे महामेरु होते. त्यांच्या वाणींत प्रसाद होता. त्यांची रसवंती फार गोड असे. त्यांच्या अंतरांतून अनुभवाचे बोल निघत असत: यामुळें कोणत्याहि अधिकाराचा श्रोता असला तरी त्याचें चित्त क्षणभर तरी विश्रांति पावत असे. विद्वत्ता किंवा तर्कप्रतिष्ठा आणि वस्तुस्थितीचा अनुभव यांत जमीनअस्मानाचें अंतर असतें. श्रोत्यांचें हृदय कितीही पाषाणवत् असलें तरी अनुभवोद्गार असतात ते तशाही हृदयाचें विदारण करून आंत शिरतात व अंतरांत सत्याचा प्रकाश क्षणभर तरी खाचित पाडतात. "**निश्चय बैसे वस्तूंकडे । तरी ज्ञानमार्गीही सामर्थ्य चढे**" विद्वत्ता, तर्कप्रतिष्ठा, बहुश्रुतपणा, श्रुतिविप्रतिपन्नता, भाराभर आणि भराभर पाठांतर, अभंगामागें अभंग व ओंवीमागें ओंवी, अशा रीतीनें केलेलें निरूपण कितीहि समर्पक असलें तरी त्यापासून भवभ्रांति जाणें शक्य नाहीं. करमणुकीपलीकडे त्याचा कांहीं उपयोग नाहीं. " **बहु श्रवण घडलें ज्याला । ताडे तोडे शिकून आला । त्या वक्तृत्वें श्रोतयांला । स्वहित न घडे । वक्ता**

**पाहिजे अनुभवाचा । ज्ञाता नसावा पुस्तकींचा । पुस्तकज्ञानें श्रोतयांचा । श्रम तुटेना सर्वथा.**" वासुदेवबुवांचा अधिकार समर्थांनीं वर्णन केल्याप्रमाणें होता. "**जो सकळ जाणोनि नेणता । जो श्रोतयांचाही श्रोता । जेथें अहंतेचि वार्ता । निःशेष नाहीं**" अशा प्रकारच्या त्यांच्या तेजामुळें श्रोत्यांच्या अंतःकरणावर त्यांच्या निरूपणाची छाप बसून श्रोते तल्लीन होत असत. पुण्यांतील तुळशीबागेचा पूर्वापार लौकिक कीं, त्या विस्तीर्ण व चव्हाटयावरील मंदिरांत कसाहि वक्ता येवो, त्याची कथा कांहींतरी गडबड झाल्याशिवाय शांत रीतीनें पार पडणें शक्यच नाहीं. त्यावेळीं पुण्यांत टवाळ मंडळी व मुलें फार असत. कथेमध्यें बेटकुळया सोडाव्या, आरडाओरड, धक्काबुक्की, गोंगाट करावा, आणि हरिदासाची हवेलंडी उडवावी, अशी टवाळांची प्रवृत्ति असे. पण ज्या दिवशीं वासुदेवबुवांची कथा तुळशीबागेंत प्रथम झाली, व समाज चिकार जमला होता, अशा मोठया समाजांत बुवांनीं लहानथोर सर्वांचीं मनें आपल्या निरूपणाकडे वेधून घेतलीं व कथा शांतपणानें पार पडली, लोक बुवांचे धन्यवाद गाऊं लागले, त्यावेळीं माझे मित्र कै० प्रसिद्ध दत्तोपंत वेहेरे यांनीं असे उद्गार काढलेले माझ्या कानांत अद्याप गुणगुणत आहेत कीं, "या तुळशीबागेंत सर्व श्रोत्यांचीं मनें तल्लीन करून घेऊन इतक्या शांतपणानें पार पडलेली कथा मीं आजच पाहिली. कथेला इतक्या आतुरतेनें जमलेला प्रचंड समाजहि आजच पाहिला!" अशा प्रकारें त्या वेळीं बुवांनीं पुण्यांत चांगला लौकिक मिळविला होता.

बाळ्या भोळ्यांचीहि सहज समजूत पटावी, अशाप्रकारची वासुदेवबुवांची भाषासरणी मोठी गोड, प्रासादिक, साधी, सोपी, सरळ, सहज, सुलभ असे. यामुळें श्रोत्यांचें चित्त लागलीच वेधलें जात असे. शिवाय त्यांच्या परमार्थप्रतिपादनामध्यें एक प्रकारचें वैशिष्टय असे. तें इतर वेदांतप्रतिपादन करणाऱ्या वक्त्यांमध्यें सहसा दिसून येत नाहीं. तें वैशिष्टय थोडें विस्तारानें सांगणें अवश्य असल्यानें सांगतों. श्रमावांचून जशी द्रव्यप्राप्ति नाहीं, तशी ईश्वरप्राप्ति ही कष्टसाध्य आहे, "**चणे खावे लोखंडाचे । तेव्हां ब्रह्मपदीं नाचे.**" इहामुत्रफलभोगविराग, शमदमादिषट्क संपत्ति, योग. संन्यास, भक्ति, निष्कामकर्म इ० साधनें केलीं तरच परमात्मप्राप्ति, अशी सर्वांची समजूत आहे. व त्यामुळें "**पावावया देवाधिदेवा । बहुविध श्रम करावा । तेणें देव ठायीं पाडावा । हें सर्वमत**" होऊन बसलें आहे. अर्थात् "**नाना तपें नाना दानें । नाना योग नाना साधनें । हीं सर्वही देवाकारणें । करिजेत आहे.**" जणूं काय तपयोगादि साधनांनीं देव प्रगट होऊन भेटतो, अशी पुष्कळ मुमुक्षूंची प्रामाणिक समजूत असून त्याप्रमाणें त्यांचा साधनक्रमहि मनापासून चालला

ग्रंथालय

आहे. कित्येक निष्ठावंत मुमुक्षु आपण देवाचे दास समजून त्यांनीं विठ्ठलाचे, रामाचे, गजाननाचे घट्ट पाय धरले आहेत. हे पायच आपल्याला देवदर्शन करून देतील अशी त्यांची प्रामाणिक निष्ठा असते. तिसऱ्या प्रकारचे मुमुक्षु आहेत त्यांचा " **सर्वं खल्विदं ब्रह्म** " हा देव असून तो जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं, दुमदुमून ओतप्रोत भरला आहे, अशी त्यांची शास्त्राधारें समजूत असते. " जें जें देखे भूत । तें तें मानी भगवंत " अशा मानीव भक्तीनें देव भेटतो अशा समजुतीचेहि कांहीं मुमुक्षु असून त्याप्रमाणें सर्वांभूतीं भगवंत मानून तेवढयावर संतुष्ट राहाणारेहि कांहीं मुमुक्षु आहेत. अशा रीतीनें अनेक खडतर साधनें देवप्राप्तीकरतां करणारे किंवा एकनिष्ठेनें देवाचे घट्ट पाय धरणारे, जळीं, स्थळीं काष्ठीं, पाषाणीं तसेंच सर्वांभूतीं देव पाहाणारे अथवा मानणारे भक्त, योगी इत्यादि मुमुक्षु अनेक आहेत. हा त्यांच्या सात्विक, प्रेमळ, भाविक, श्रद्धाळु, निष्ठावंत सद्‌गुणाचा प्रभाव होय. पण देव कांहीं या साधनांनीं किंवा मानीव भक्तीनें, निष्ठेनें प्राप्त होणारा खचित नाहीं. शमदमादि अगर तपयोगादि करून प्राप्त होणारा कष्टसाध्य असा सायासाचा आमचा देव मुळींच नसून तो सहजसिद्ध आहे. म्हणून समर्थ म्हणतात, "**सहज सोडून सायास। हाच कोणी एक दोष** " होय. सहज देव हा सतत असतो व सायासाचा देव फुटका, नासका असतो. " **सहज देव असताचि असे। सायासें देव फुटे नासे** " म्हणून सहजाच्या प्राप्तीला सायास काय उपयोगी ? " **सहज समजाया कारणें। नाना हठयोग करणें। परंतु एकाएकीं समजणें। घडत नाहीं.**" सारांश देवप्राप्तीला या कष्टप्रद साधनांचा कांहींएक उपयोग नाहीं. त्याचप्रमाणें रामाचे किंवा विठोबाचे पाय घट्ट धरले तरी देवाची प्राप्ती होणें शक्य नाहीं. कारण आमच्या देवाला मुळीं पायच नाहींत ! ज्ञानोबा म्हणतात, " **पायां पडूं गेल्यें तंव पाऊलचि न दिसे। उभाचि स्वयंभ असे। समोर कीं पाठिमोरा न कळेचि। ठकचि पडलें कैसें** "" **क्षेम देऊं गेल्यें तंव मीच मी एकली। लांचावला जीव राहे**" " **तूं उभा ना बैठा। दिघडा ना खुजटा। तुज तळीं वरी वैकुंठा। तूंच आहासी** " ! अशा रीतानें परेशाला पाठी पोटच नाहीं, त्या अनादिसिद्ध आयत्या देवाचे तुम्हीं वेगळेपणानें पाय कसे व कोठें धरणार ? आतां तुमचा देव जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं असला, तरी तो परक्या ठिकाणचा देव तुमच्या काय उपयोगी ? तुमच्या हृदयांत असेल तर उपयोग. तुमच्या हृदयांत असेल, तर परक्या स्थळीं पाहाण्याची तुम्हांला जरूरच नाहीं. शिवाय हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, " **जळोनि काष्ठाचा आकार। अग्नि होय काष्ठाकार। परी काष्ठ होईल हा विचार। बोलोंचि नये** " म्हणजे जळांत, स्थळांत, काष्ठपाषाणांत देव असला तरी जळस्थळादि हीं कांहीं देव होणार नाहींत. कारण, काष्ठावर विशेषत्वाला आलेला अग्नि

जसा काष्ठ जळालें कीं नष्ट होतो, तद्वत् काष्ठपाषाणादिकांत विशेषत्वानें आलेला देव काष्ठपाषाणांचा संहार झाला कीं त्यांतील देव नष्ट झाला म्हणून समजावें. कारण खरा देव जगांत, देहांत नसून जगाच्या व देहाच्या विरहित विदेही आहे. " **सृष्टी वेगळा निवांत । देवभक्तांचा एकांत** " अशी वस्तुस्थिति आहे. देह नष्ट झाला कीं, देहांतील देव आटोपला! एकंदरींत देवप्राप्तीला या साधनांचा व मानीव भक्तीचा कांहीं उपयोग होत नाहीं. ह्मणून " **पावावया भगवंतातें । नाना पंथ नाना मतें** " निर्माण झालीं, किंवा नाना साधनें केलीं, तरी समर्थ ह्मणतात, " **परी त्या देवाचें स्वरूप तें । कैसें आहे** " याचा विचार मुख्यत्वें केला पाहिजे आणि त्याच्याहि पूर्वीं प्रथम मीं कोण हा विचार केला पाहिजे. " **आधीं पाहावें मी कोण । मग परमात्मा निर्गुण । तो ओळखावा.**" अर्थात् प्रथम " **कोऽहम्** " आणि मग देव कोण हें पाहिलें पाहिजे. आत्मशुद्धीवांचून देवशुद्धि होणें शक्यच नाहीं. अशा रीतीनें देवाच्या व आपल्या ओळखीचें यथार्थ स्वरूप जर त्या साधनांत, समजुतींत किंवा भक्तींत, योगांत प्रतिबिंबित होणार नाहीं, तर तीं साधनें उराशीं घट्ट धरून देवप्राप्ति होणें शक्यच नाहीं हें उघड आहे. वासुदेवबुवांच्या प्रतिपादनांत मुख्यत्वेंकरून देवाचें आणि आपलें यथार्थ स्वरूप कसें आहे याचें निरूपण साध्या व सोप्या भाषेनें केलें जात असे. आणि तें निरूपण इतकें गोड असे कीं, नाळ फिरवल्यावांचून गलबत जसें पूर्व स्थळावर येतें, तसें वासुदेवबुवांच्या निरूपणानें कोणत्याहि अधिकाराचा श्रोता देवाला आपल्याहून वेगळेपणानें कितीही दूर पाहात फिरत असला तथापि क्षणभर तरी " **आपणचि देव आपणचि भक्त । आपणचि मुक्त संतसंगें** 'किंवा " **साधनें जें कांहीं साधावें । तें तो आपणचि स्वभावें** " याचा ' चक्क प्रकाश त्या श्रोत्याच्या अंतःकरणांत पडत असे. देव सायासाचा नसून सहज असल्यानें त्याच्या प्राप्तीचें साधनहि सहजविचाराचेंच असलें पाहिजे. तो साधनाचा सहजविचार वासुदेवबुवांच्या प्रतिपादनांत रंगदेवतेच्या प्रसन्नतेनें सहज येत असे. आणि त्या सहजांतच मोठी मौज वाटत असे!

देवाचा विचार किंवा शोध हा वास्तविक मनाचा, तर्काचा, अनुमानाचा, बहुविध साधनांचा, तुलनात्मक विचाराचा विषय नसून तो केवळ शुद्ध सात्त्विकबुद्धीचा विषय आहे. मग शम, दम, योग, याग, इत्यादि श्रमाचीं साधनें शास्त्रांनीं कशासाठीं सांगितलीं आहेत, असा साहजिक प्रश्न येतो. त्याचें उत्तर असें कीं, बोधस्वरूप परमात्म्याचा प्रकाश बुद्धिद्वारा अंतःकरणांत प्रगट व्हावयाचा आहे. त्या कार्याला बुद्धि ही मूळचीच शुद्ध, बुद्ध, स्वतंत्र असली तरी त्या सात्त्विकबुद्धीला तात्त्विक विचार करण्याच्या कामीं विषयांनीं रंजन करून घेण्याची खोड असलेल्या रजोगुणात्मक मनाकडूनें

प्रत्यवाय येतो. कारण मन हें कामरूप आहे. त्यानें बुद्धीचें ज्ञान आवृत करून घेतलें आहे, "**इंद्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते । एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम्**" म्हणून इंद्रियांचें व मनाचें संयमन करण्यासाठीं हीं साधनें शास्त्रांनीं सांगितलीं आहेत. तीं यथार्थच आहेत. तथापि मुमुक्षूंनीं हेंहि लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं, ज्या शमदमादि साधनांमध्यें देवाचा यथार्थ शोध आणि बोध नसेल, त्या साधनांचा कांहीं उपयोग नसून त्या उपायांनीं उलट अपायच होतो. "**यांतें साधावया लागीं । जें बळ आणिजे अंगीं । तें इंधनें जैसा आगी । सावावो होय**" **तैसे उपाय कीजती जे जे । ते यासींच होती विरजे**" यासाठीं या रजोगुणात्मक मनाला वर्मानेंच मारलें पाहिजे. म्हणजे साधन आणि मुख्यत्वें वर्म, या दोहोंचा मारा या मनावर पाहिजे. नुसत्याच साधनांनीं किंवा नुसत्याच विचारानें कांहीं मन मारलें जात नाहीं. मनाचें वर्म कोणतें ? "**कां जे या मनाचें एक निकें । जे दाखिली या गोडीचिया ठाया सोके । म्हणूनि अनुभवसुखचि कौतुकें । दावीत जाइजे**". सारांश, बुद्धीला आत्मबोधाकडे वळविण्याला विषयाधीन इंद्रियें व इंद्रियाधीन जें मन, तें व्यत्यय आणतें. त्या मनाला मारण्याकरतां हीं शमदमादि साधनें असलीं, तरी त्या साधनांत साध्य वस्तूचा, परमात्म वस्तूचा, आत्मबोधाचा प्रकाश प्रतिबिंबित झाला नाहीं, आणि जन्मभर नुसतें साधन करीत बसलें, तर त्याचा कांहीं उपयोग नाहीं. "**व्यर्थ भराभर केलें पाठांतर । जोंवरीं अंतर शुद्ध नाहीं**" याप्रमाणेंच तें साधन व्यर्थ होय. "**यम नियम प्राणायाम प्रत्याहार हे सकळहि उपाय परी अपायरे । जंव तमाळनीळ सांवळा हृदयीं ठाण मांडूनी न रहायरे । नुद्धरिजे नुद्धरिजे गोपाळेंविण नुद्धरिजे**" असें ज्ञानोबा म्हणतात. म्हणून अशा प्रकारचें परमात्मसुखनिधान मनाला आपल्या प्रतिपादनानें सहजासहजीं दाखविण्यांत वासुदेवबुवांचें हातखंडा काम असे. तळहातींच्या आंवळ्याप्रमाणें वासुदेवबुवांना तें साधून गेलें होतें ही ईश्वरी देणगी होय. देवाचें व आपलें शुद्ध बुद्ध स्वरूप कसें आहे, हें श्रोत्यांना बिंबवून देण्यामध्यें वासुदेवबुवा आपलें बुद्धिसर्वस्व मोठया आस्थेनें अंतःकरणपूर्वक खर्च करीत असत. हें वासुदेवबुवांच्या परमार्थप्रतिपादनाचें वैशिष्ट्य होय.

आमचे मित्र पुण्याचे रहिवाशी मननामोदकर्ते श्रीअक्कलकोटस्वामीभक्त श्रीयुत माधव गोविंद उर्फ बाबुराव भिडे नुकतेच सहज भेटले. त्यांना मीं श्रीवासुदेवबुवांचें चरित्र लिहित असल्याचें सांगितलें. वासुदेवबुवा साधारण धट्टेकट्टे असतांना तीन तीन तास कथा करीत होते, त्यावेळीं भिडे यांनीं बुवांच्या कीर्तनांचा व प्रवचनांचा लाभ घेतला आहे. त्यावरून त्यांनीं वासुदेवबुवांच्या प्रतिपादनासंबंधानें खालील उद्गार काढले. " वासुदेवबुवांच्या प्रति-

पादनशैलीमध्यें विशेषत्व असे तें हें कीं, इतर प्रतिपादनकर्ते हे ज्ञातेपणाच्या अभिमानावर आरूढ होऊन आपण सर्वज्ञ समजून प्रतिपादन करतात. पण वासुदेवबुवा हे अभिमानरहित असत. व त्यामुळें श्रोत्यांचा अधिकार काय हें पाहाण्याकडे त्यांचें मुळींच लक्ष नसे. लहान वत्स ज्याप्रमाणें लोकभावनेकडे लक्ष न देतां स्वच्छंदानें आपलें आपल्या ठिकाणींच बागडतें, आणि त्यामुळें त्याचें तें बागडणें मोठें रमणीय दिसतें, तद्वत् वासुदेवबुवांचें व्याख्यान सहज रमणीय असे! त्यांची प्रवचनशैली केळीच्या कमळाप्रमाणें असे. म्हणजे त्यांनीं प्रतिपादनार्थ घेतलेलें प्रमेय हें प्रतिपादनाच्या ओघांत आपोआप प्रफुल्लित होत असे. यामुळें नांवाला जरी बुवांनीं कीर्तनारंभीं एखादा विशिष्ट विषय किंवा अभंग प्रतिपादनाला घेतला, तरी कीर्तनाच्या उपसंहारांत आमूलाग्र सर्व वेदांतविषयाचा सहजासहजीं उगाणा होत असे!" बाबूराव भिडे यांचें हें म्हणणं अगदीं यथार्थ आहे. बुवा कीर्तनाला उभे राहिले किंवा प्रवचनाला बसले, म्हणजे मी एक वक्ता आणि हे श्रोते, ही भावनाच त्यांना राहात नसे. आणि "**होऊनीयां श्रोता वक्ता। करी आपुली आपण कथा**" या रमावल्लभदासाच्या अभंगाचा साक्षात् अनुभव दिसत असे! आपल्यापुढें श्रोते आहेत हें त्यांना भानच नसे. ते स्वात्मानंदांत त्यावेळीं निरूपण करतांना रंगलेले असत! आपल्या हल्लींच्या स्थितीहून ब्रह्मस्थिति म्हणजे कांहीं निराळी विशिष्ट आहे, ती फार दुर्लभ आहे, अशी पुष्कळांची समजूत असते. व असें साधारणतः सर्व वक्त्यांचें प्रतिपादनहि असतें. पण वासुदेवबुवांची प्रतिपादनशैली याच्या उलट असे. सर्वांत सुलभ, सुगम, सहज, प्रत्यक्ष असें कांहीं असेल, तर तो परमार्थ आहे किंबहुना आपण प्रपंच म्हणून करीत आहोंत, तो प्रपंचाकरतां प्रपंच नसून परमार्थाकरतां प्रपंच करीत आहों, इतकेंच नव्हे, तर आपला प्रपंच हाच परमार्थरूप आहे, परमार्थ आपल्याहून निराळा नाहींच. परमार्थ हा प्राप्त करून घेण्याचा विषय नसून आपण मूर्तिमंत परमार्थरूपच कसे आहोंत, "**साधनें जें कांहीं साधावें। तें तो आपणचि स्वभावें**" कसे आहोंत, परमार्थ हा साध्य नसून सिद्धच कसा आहे, आपली सर्व चाललेली क्रिया ही आत्मारामाचीच नित्य पूजा कशी चालू आहे, "**तो बोले तें स्तवन। तो देखें तें दर्शन। अद्वया मज गमन। तो चाले तेंचि, तो करी तेतुली पूजा। तो कल्पी तो जप माझा। तो निजे तेचि कपिध्वजा। समाधि माझी**" या सिद्धस्थितीवर आपण मुळचेंच कसे आहोंत, फक्त समजुतीचा घोंटाळा झाला आहे, व त्यामुळें "**अनंत जन्मींचा काट जडला-अभ्यासचि पडून गेला**" आहे, तेवढी भ्रांति सद्गुरुकृपेनें, सत्संगतीनें व आत्मानात्मविचारानें घालवावयाची आहे, अशा प्रकारचें प्रतिपादन करून

वासुदेवबुवा मुमुक्षूंची भ्रांति क्षणभर तरी फार उत्तम रीतीनें उडवीत असत. मागाहून क्षणभरानंतर "**येरें माझ्या मागल्या**" म्हणून देहबुद्धीचें आत्मबुद्धीवर पटल आलें तरी निरूपणाच्या वेळीं तरी आपण जणुं वैकुंठांतच आहोंत असें त्यावेळीं श्रोत्यांना वाटे ! वास्तविक आपल्याला प्रारब्धसंचितांत कांहींएक बदल करावयाचा नाहीं व बदल ब्रह्मदेवालाहि करतां येत नाहीं. अर्जुन क्षत्रिय, तो लढाईकरतांच रणांगणावर आला व शेवटीं लढाईच केली. पण मध्यें मोह झाला होता, तेवढा श्रीकृष्णप्रभूंच्या उपदेशानें घालविला. तद्वत् आपण जो कर्मगड्डा बरोबर घेऊन आलों आहोंत, तो आपोआप ओघानें रिता होत आहे. त्याला प्रतिबंध करावयाचा नाहीं व करतांहि येत नाहीं. आगे त्यांत पुढील जन्माकरतां भरहि घालावयाची नाहीं. म्हणून तत्त्ववेत्ता हा "**इंद्रियां आज्ञा न करी । विषयांचें भय न धरी । प्राप्तकर्म नाव्हेरी । उचित जें जें**" अशा रीतीनें प्रकृतींत असला तरी प्रकृतीचें कर्म आपल्यावर घेत नाहीं व कशाचाही त्याग करीत नाहीं. "**आतां गृहादिक आघवें । कांहीं नलगे त्यजावें । जें घेतें जाहलें स्वभावें । निःसंग म्हणोनि**" आपणही समजुतीचा झालेला घोटाळा आत्मबोधानें घालवावयाचा आहे आणि तें काम केवळ बुद्धीचें आहे. दिव्य दृष्टि म्हणून कांहीं निराळी नाहीं. सदसद्विवेकबुद्धि हीच दिव्य दृष्टि होय. दृष्टि तीच, द्रष्टा तोच, दृश्य तेंच, परंतु दृष्टींत दोषाचें केर आहे, ज्ञानाचेंच ज्ञानावर पटल आलें आहे, तें सत्संगतीनें व आत्मबोधानें घालवावयाचें आहे. "**बावुलीचि सारावी हातें । पाणी असे आयतें**" अशा प्रकारचें वासुदेवबुवांचें प्रतिपादन असे. समर्थादि संतकवींचें प्रतिपादन दासबोधादि ग्रंथांतून अशाच प्रकारचें आहे. समर्थ म्हणतात, परमार्थ हा "**आहे तरी परम सुगम । परी जनासी जाहला दुर्गम । कां जयाचें चुकलें वर्म । सत्समागमाकडे.**" इतर योगयागविभ्रमपंथीं न शिरतां श्रीगुरूचे चरणकंज हृदयीं स्मरले, कीं काम झालें, इतका हा परमार्थ "**सुलभाहुनि सुलभ बहु**" आहे. "**संसारत्याग न करितां । प्रपंच उपाधि न सांडितां । जनामध्यें सार्थकता । विचारेंचि होय**" "**असून मायिक उपाधि । तेचि सहज समाधि । श्रवणें वळावली बुद्धि । कृतनिश्चयाची**" अशा प्रकारचीं समर्थांचीं तशींच श्रीज्ञानोबांचींही पुष्कळ वचनें आहेत. "**अहिक तरी न नशे । आणि मोक्ष तो उरला असे**" "**हा असताचि उपाधि आकळूं न शके**" हें बुद्धियोगाचें माहात्म्य होय. "**मनाचा मार न करतां आणि इंद्रियां दुःख न देतां । एथ मोक्ष असे आयिता । श्रवणाचि माजी**" "**अग्निसेवा न सांडितां । कर्माची रेखा नोलांडितां । आहे योगसुख स्वभावथा । आपणपांचि**" इत्यादि इतर संतांचींहि बहुत वचनें आहेत. त्यांची सार्थकता वासुदेवबुवांच्या ठसठशीत अनुभवी वाणीनें श्रोत्यांच्या अंतःकरणांत

निःसंदेहपणानें ठसत असे. देहाच्या अंगानें देहांत सुखदुःखांची कितीही धडपड झाली, तरी आपल्या स्वानंदाला यत्किंचितही ढका लागत नाहीं. “ **प्रतीतीचिया पोटींचें । पाणी न हालें** ” ( ज्ञाने. ) याची साक्ष वासुदेवबुवा आपल्या निरूपणानें श्रोत्यांच्या अंतःकरणावर उत्तम प्रकारें वठवीत असत. गुदस्त सालीं शके १८५० च्या पौषमासीं चित्रशाळेचे मालक सुप्रसिद्ध श्रीयुत वासुकाका जोशी हे मुद्दाम वासुदेवबुवांना भेटून आपली शंकानिवृत्ति करून घेण्याकरतां खेडास आले होते. बुवा खेडास आले होते व मीहि गेलों होतों. उभयतांचा बराच वेळ सुखसंवाद झाला. त्या संवादांत बुवांनीं शेवटीं आपण प्रत्येक जीव “ सदेह, सप्राण, सेंद्रिय सुखरूपच आहोंत ” हें सिद्ध करून दाखविलें. वासुकाका शेवटीं निरुत्तर झाले आणि हे शब्द त्यांनीं आपल्या स्मरण वहींत मुद्दाम टिपून ठेवले. गेल्या नवंबरच्या चित्रमयजगत्‌मध्यें बुवांचा मृत्युलेख आला आहे. त्यांत “ मी सदेह, सप्राण, सेंद्रिय सुखरूपच आहें, असें बुवा नेहमीं प्रतिपादन करीत असत ” म्हणून जो उल्लेख आला आहे, तो त्या भेटीचाच परिणाम होय. वासुकाकांना वृद्धापकाळामुळें अलीकडे तत्त्वशोधनाचा बराच नाद लागला आहे ही फार आनंदाची गोष्ट आहे. वासुकाका हे धोमचे राहाणारे असून तेथें कै० विश्वनाथदादा पाटणकर संतशिरोमणि राहात असत. त्यांचा व त्यांचे शिष्य बापूभट सोमण यांचा लहानपणीं काकांना समागम असल्यामुळें काका बहुत विदेशांतर करून आले तरी परंपराभ्रष्ट, नास्तिक झाले नाहींत. आपण तत्त्वाला धरून वागतों अशी काकांची प्रामाणिक समजूत आहे. वारकरी द्वैतउपासक असल्यानें त्यांना अद्वैतपर ज्ञानेश्वरी वाचण्याचा अधिकार नाहीं, तसेंच नैष्कर्म्यसिद्धिपर ज्ञानेश्वरी वाचणाऱ्यांनीं फलश्रुति सांगणारें गुरुचरित्र वाचूं नये असें त्यांचें म्हणणें आहे. पुष्कळ वारकऱ्यांना तें हें सांगतात पण त्यांचें समाधान होईल असें उत्तर त्यांना कोणीं अद्याप देत नाहीं. मला वाटतें गुरुचरित्रांत केवळ सिद्धिचमत्काराच्याच गोष्टी नसून वर्णाश्रमधर्माच्या क्रिया व वेदांतहि प्रतिपादन केलेला आहे. व “ **नबुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम्०** ” या गीतावचनाप्रमाणें लोकसंग्रहार्थ नैष्कर्म्यानेंहि कामिक ग्रंथ वाचण्याला हरकत नाहीं. “ **देखें फळाचिया आशा । आचरे कामुक जैसा । कर्मी भर होआवा तैसा । निराशाही** ” ही ज्ञानोबांनीं लोकसंग्रहाची व्याख्या दिली आहे. मात्र केवळ फळाशेच्या हेतूनें गुरुचरित्र वाचूं नये हें खरें. द्वैतभक्तीमध्येंच अद्वैतबोध होण्याकरतां ज्ञानेश्वरी वारकरी हे वाचींत असतील तर तें अवश्य कर्तव्य आहे. वासुकाकांनीं हे दोन्ही ग्रंथ सत्संगतींत राहून वाचले, तर त्यांची ही शंका खचित नाहींशी होईल. असो.

परमार्थप्रतिपादनामध्यें वासुदेवबुवा हे संतवाक्यांचा नुसता शब्दार्थ

सांगत न बसतां रहस्यार्थ सांगून त्या वाक्याच्या यथार्थतेचा ठसा श्रोत्यांच्या अंतःकरणावर ठसवीत असत. तें निरूपण प्रत्यक्षच ऐकण्यास पाहिजे. त्याशिवाय व्यर्थ. परंतु त्याची थोडीतरी दिशा लक्ष्यांत येण्याकरतां एकदोन मासले सांगतोः—

"**काहीं सांडावें लागत नाहीं । कांहीं मांडावें लागत नाहीं । एक विचार करून पाहीं । म्हणजे कळे**" ही दासबोधांतील समर्थांची ओंवी, आणि तिचा शब्दार्थ असा कीं, परमार्थांत कांहीं सांडण्यामांडण्याची खटपट नाहीं, नुसतें विचाराचें काम. पण एवढया अर्थानें मनुष्य आचारभ्रष्ट होऊन " इदंच नास्ति परं न लभ्यते " असें होईल. म्हणून याचा रहस्यार्थ हा कीं, सांडण्यामांडण्याची प्राकृत घडामोड चालूच आहे. पण सांडणारा किंवा मांडणारा तूं नाहींस. कारण, "**जंव प्रकृतीचें अधिष्ठान । तंव सांडी मांडी हें अज्ञान । जे चेष्टा ते गुणाधीन । आपैशी असे.**" शिवाय सांडावयाला व मांडावयाला तुझें असें येथें जर कांहींच नाहीं, प्रत्यक्ष शरीर, मन, इ० कांहींच तुझें नाहीं, तर तूं सांडीमांडी कशाची करणार ? " **भ्रममूलमिदं जगत्** " हें जर खरें आहे तर सांडावयाला व मांडावयाला तुझ्या हाताला काय लागणार ? आत्मबोधानें, स्वानुभूतीनें हा " **विचार करून पाहीं । म्हणजे कळे** " हा रहस्यार्थ होय.

" **अरे जें झालेंचि नाहीं । त्याची वार्ता पुससी कायी** " ही समर्थांची ओंवी. हिचा शब्दार्थ असा कीं, " जग मुळीं झालेंच नाहीं, त्याची वार्ता काय पुसावी ? " या शब्दार्थानें वास्तविक श्रोत्यांचें कांहीं खरें समाधान होत नाहीं. कारण प्रत्यक्ष जग दिसत असून तें झालें नाहीं म्हणून सांगून खरें कसें वाटणार ? जग झालेंच नाहीं म्हणणारे कांहीं लोक आहेत. त्यांच्या त्या मताला कित्येक वेदांती अजातवाद असें म्हणतात. पण बोधाच्या अंगानें पाहिलें असतां हा अजातवाद नसून सिद्धांत आहे. "**चेयीलिया आपुलें ज्ञान । जैसें नाहींच होय स्वप्न । तैसें स्फुरतें त्रिभुवन । वावो जहालें**". सूर्याच्या अंगानें पाहिलें तर सूर्याच्या ठिकाणीं जग झालेंच नाहीं. पण जगाचे अंगानें पाहिलें तर जग झालें नाहीं, हें खरें वाटणार नाहीं. तद्वत् बोधांत जग नाहीं आणि जगांत बोध नाहीं अशी वस्तुस्थिति आहे. समर्थांच्या ओंवीचा रहस्यार्थ असा कीं, बा शिष्यराया ! तूं जग **झालें** म्हणतोस, मी **नाहीं** म्हणतों. आतां तुझ्या म्हणण्याप्रमाणें जग '**झालेंचि**'. पण त्या झाल्याचा परिणाम काय होतो ? **झालें** याचा अर्थच मुळीं **निमालें**. अर्थात् नाहींसें झालें. जें जें उत्पन्न होतें तें भूतकाळांत गडप होतें. नदीच्या ओघांत संध्येला बसलें असतां केशवायनमः च्या आचमनाला जें पाणी, तें कांहीं नारायणाच्या आचमनाला नाहीं. अशा ओघाप्रमाणेंच उत्पन्न होणारें सर्व **नाहीं** मध्यें गडप होत आहे,

अर्थात् **नाहीं** होण्यासाठींच जें उत्पन्न होतें, ज्याचा परिणाम **नाहीं** मध्यें होतो, त्याला तूं उत्पत्तीच्या अंगानें **झालें** म्हणतोस. परिणामाच्या दृष्टीनें मी "**झालेंचि परी नाहीं**" म्हणतों. अशा क्षणभंगुराची वार्ता काय सांगावी ? हा रहस्यार्थ होय. म्हणजे झालें हें खरें व नाहीं हेंहि खरें !

अशारीतीनें दासबोध, ज्ञानेश्वरी, भागवत, इ० आध्यात्मिक ग्रंथांतील रहस्यें अनुभवशीर रीतीनें बुवा श्रोत्यांना बरोबर पटवून देत असत. मी सृष्टीच्या किंवा देहाच्या अस्तित्वावर नसून सृष्टि व देह माझ्या अस्तित्वावर आहे. इतकेंच नव्हे, तर सर्व सृष्टींत व देहांत मीच ओतप्रोत ओतलों आहें. मी आहें म्हणून सृष्टि व देह आहे. सृष्टींतून मी वजा झालों, तर खरोखरच वजाबाकी शून्य येईल ! ग्रंथ वाचून मी कोण हें मला समजावयाचें नसून सर्व उपनिषदें, वेद, भारत, भागवत इ० ग्रंथांतून माझेंच रामायण भरलें आहे ! "**मत्तःपरतरं नान्यत्**" हें सर्व मीच आहें. अशा दृष्टीचें वासुदेवबुवांचें मोठया गमतीचें निरूपण असे.

वासुदेवबुवांनीं एखादा अभंग प्रतिपादनाला घेतला कीं, प्रथम त्या अभंगाचें वैय्यर्थ्य असें दाखवावयाचें कीं, श्रोत्यांना तें क्षणभर खरेंच वाटावें. नंतर त्या अभंगातील निवडक शब्द घेऊन त्याच्या प्रतिपादनानें एक भूमिका सिद्ध करावी श्रोत्यांना ती भूमिका खरी वाटावी. नंतर क्षणांत त्या भूमिकेचा एका शब्दानें निरास करून तिच्याहून उच्च भूमिकेवर श्रोत्याना आणून ठेवावें. अशा रीतीनें त्या अभंगाच्या आधारानें श्रोत्यांना विचाराची एक एक उच्च भूमिका दाखवीत अखेर "**तद्धाम परमं मम**" अशा बौद्धिक शुद्ध भूमिकेवर श्रोत्यांना बसल्या बैठकीवरूनच बुवा घेऊन जात असत. ती मौज सांगून यावयाची नाहीं ! अशाप्रकारचें निरूपण सहसा कोठें ऐकण्यास मिळतच नाहीं. आणि अध्यात्मविचार करणारे अधिकारी श्रोतेहि आजकाल दुर्लभ झाले आहेत ! मालाला गिऱ्हाईक असेल तर माल बाजारांत येतो. आजकाल परमार्थच सर्वांना नकोसा झाला आहे. यामुळें स्वानुभवी वक्तेहि प्रगट होऊन पुढें येत नाहींत. सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी पुण्यांत अध्यात्मचर्चा करणारे पंचवीस तीस तरी आखाडे असत. पण आजकाल ह० भ० प० केशवरावमहाराज देशमुख यांची मठी व वेदशास्त्रसंपन्न विष्णुशास्त्री बापट यांची संस्था, याशिवाय सर्व शुकशुकाट दिसतो ! वावदुक मतभेदाच्या वितंड वादांचा व मताभिमानाचा आणि संस्थांचा मात्र सुळसुळाट झाला आहे !

वासुदेवबुवा अशा रीतीनें परमार्थाचें सुलभतेचें बालबोध प्रतिपादन करीत असतां ते वैदिक सांप्रदाय, परंपरेचा आचारविचार, सगुण उपासना यांचा कधींहि उच्छेद करीत नसत. उलट त्यांचें महत्त्व सांगून त्याचे आधारावरच ही उच्च भूमिका साधावयाची आहे, शास्त्रप्रचीती, गुरुप्रचीती व आत्मप्रचीती यांच्या एकवाक्यतेनें

आपलाच स्वानंद, निजानंद, आत्मानंद आपणच सद्गुरुकृपेनें प्रगट करून भोगावयाचा आहे, हें वासुदेवबुवा उत्कृष्ट रीतीनें प्रतिपादन करीत असत. तो रंग सांगून यावयाचा नाहीं. बुवांचें आचरणहि गृहस्थाश्रमाला उचित असेंच असे. पंचमहायज्ञादि नित्यनैमित्तिक कर्म यथास्थित झाल्याशिवाय बुवा निजत नसत. " **बाह्यसाधकाचे परी । आणि स्वरूपाकार अंतरीं** " अशी बुवांची राहाणी असे. केव्हांही पाहावें तेव्हां स्तोत्रपाठ अगर नामस्मरण चालू असे.

ज्याची भाषा साधी, सोपी, घरगुती, तो वक्ता अगर लेखक उत्तम गणला जातो. तसें बुवांचें उच्च भूमिकेवरील निरूपण असे. त्यांच्या निरूपणांत संतवचनांशिवाय दुसऱ्यांच्या वचनाचा आधार येत नसे. वेद, श्रुति यांचा निरूपणांत उच्चार न करतां त्यांच्या अर्थाचा उच्चार करीत असत. मोरोपंती आर्या क्वचित येत असे. आख्यान कधींच लावलें जात नसून अध्यात्माचें व्याख्यानच अथपासून इतिपर्यंत चालत असे. इतर कीर्तनकारांचा भर आख्यानानें श्रोते डुलतील इकडे असतो. पण बुवा आध्यात्मिक अनुभवी व्याख्यानानेंच श्रोत्यांना डोलवीत असत !

वास्तविक आख्यान लावण्याचा हेतु हा कीं, पूर्वरंगांत जो वेदांताचा सिद्धांत आपण प्रस्थापित केला, त्याच्या पुष्टि व स्पष्टीकरणार्थ कथा आख्यान सांगून त्या सिद्धांताची सांगता करणें, याला **अर्थवाद** असें म्हणतात. हा उत्तर रंगाचा हेतु, पण आजकाल पूर्व रंग भक्तीनें मुक्ति प्राप्त होण्याचा आणि त्याला उत्तर रंग कीचकवधाचा ! पूर्व रंगांतील सिद्धांताला व उत्तर रंगाला मेळच नसतो ! पण आमच्या वासुदेवबुवांच्या कीर्तनाला पूर्व, उत्तर कांहीं नसून सर्वच रंग अपूर्व असे ! नाना आख्यानें चरित्रें, या सर्वांहून अध्यात्मविद्या श्रेष्ठ, " कोटीगुणें महिमा आत्मज्ञानाचा " असें समर्थ म्हणतात. " **गत गोष्टीस ऐकिलें । तेणें काय हातास आलें । म्हणती पुण्य प्राप्त झालें । तरी तें दिसेना कीं.** " बुवांच्या प्रतिपादनांत अध्यात्माशिवाय सुभाषित, अलंकार, उत्प्रेक्षा, कोटया, इ० चुकून सुद्धां येत नसे. दृष्टांत अगदीं व्यवहारांतील साधे असत. बुवा दिसण्याला साधे; तसें प्रतिपादनहि साधें; त्याला छक्के, पंचे नसत. " **बोले तैसा चाले । त्याचीं वंदावीं पाउलें** ' अशा अधिकाराचे बुवा होते. त्यांचें कीर्तन किंवा प्रवचन विद्वत्तापूर्ण नसून अनुभवपूर्ण असे. विद्वत्ता ही श्रोत्यांची फक्त करमणूक करते. अनुभव हा विद्वानांच्याहि डोळयांतील भ्रम काढून टाकून सर्वांना डोळे उघडून पाहाण्याला दिव्य दृष्टि देतो ! कीर्तनाच्या शेवटीं बुवा सांप्रदायानुरूप एक समर्थांची गोष्ट सांगत असत. ती ऐतिहासिकदृष्टीनें न सांगतां आध्यात्मिकदृष्टीनें सांगत असत. त्या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव ते श्रोत्यांच्या देहावरच दाखवीत असत. आपल्या प्रचलित व्यवहारालाच ती गोष्ट कशी लागू आहे, हें मोठ्या मार्मिकतेनें बुवा सांगत असत. बुवांच्या

मुखानें गोष्ट ऐकिली म्हणजे ती ऐतिहासिक दृष्ट्या खरी कां खोटी असावी, ही कादंबरी का इसापनीतींतील किंवा हरदाशी नक्कल असावी, अशी आजकालच्या चिकित्सक विद्वांनाप्रमाणें कुत्सित कल्पनाच श्रोत्यांच्या अंतःकरणांत उठत नसे ! अशा मार्मिकतेनें बुवा ती गोष्ट आध्यात्मिक दृष्ट्या सांगत असत. दुसरी मौज अशी कीं, जी आज गोष्ट सांगितली, तीच पुन्हां उद्यां, परवां—सांगत, तेव्हां प्रथम असें वाटे कीं, बुवा कालचीच गोष्ट आज सांगत आहेत. पण प्रतिपादन ऐकावें तर त्याच गोष्टीचें आज आध्यात्मिक रूपक अगदींच निराळें, नवीन असें वाटून श्रोते सानंदाश्चर्यचकित होत असत. ! यदुराजाची गोष्ट तर अनेक वेळां त्यांच्या प्रतिपादनांत आलेली मी ऐकली आहे. पण प्रत्येक वेळीं प्रतिपादनाचा ओघ निराळा पाहून मोठी मौज वाटे ! बुवा सत्यनारायणाच्या कथाहि आध्यात्मपर लावून सांगत असत. बुवांच्या कथेला बसलें म्हणजे त्यांच्या प्रतिपादनानें अनेकवेळां अष्ट सात्विक भाव उत्पन्न होऊन नेत्रांतून अश्रुपात वाहात असत, हा माझा स्वतःचा अनुभव आहे. एखाद्या हृदयद्रावक आख्यानानें श्रोत्यांच्या नेत्रांतून अश्रुपात होण्यापेक्षां अध्यात्मप्रतिपादनानें श्रोत्यांना अष्टभाव उत्पन्न करणें हें अधिकारी पुरुषाशिवाय होणें शक्यच नाहीं. कीर्तन हें नारदादिकांपासून सुरू आहे. त्याला हरिकीर्तन म्हणतात. अध्यात्मप्राप्ति हें त्या कीर्तनाचें ध्येय आहे. मनुष्यानें विषयांतून परावृत्त होऊन निर्विषय व्हावें, एवढयासाठीं हरिकीर्तन असतांना आजकाल कीर्तन हा एक कर्मणुकीचा विषय झाला आहे. संगीत गाणें, पेटी इ० करमणुकीच्या साधनांवांचून कीर्तनाची सांगताच आजकाल होत नाहीं. त्यांतही नाटकी व तमाशांतील छकडीच्या चालींचीं पदें कीर्तनांत असतील, तरच श्रोत्यांची गर्दी जमते. तशांतहि आजकाल गीतेनें ज्याप्रमाणें आपली आध्यात्मिक भूमिका सोडून तिनें कर्मयोगांत प्रविष्ट व्हावें अशी खटपट आधुनिक विद्वान् लोक करीत आहेत, तद्वत् कीर्तनाचें आध्यात्मिक अंग नष्ट करून त्या ठिकाणीं तानाजी मालुसरे, बाजी फसलकर, ताई तेलीण, संभाजी, इ० वीर पुरुषांचीं आख्यानें लावून कीर्तनाला राजकारणाचें रूप देऊन समाजांत वीरश्री उत्पन्न करण्याचे प्रयत्न चालू आहेत. आणि तदनुरूप री ओढणारे आधुनिक हरदासहि निर्माण होत आहेत. हा कालमहिमा होय ! आपलें राष्ट्र आपल्या परंपरागत ध्येयापासून च्युत झाल्याचा हा परिणाम होय !

वासुदेवबुवा अध्यात्मज्ञानांतील सिद्धपुरुष होते. सिद्धिचमत्कार करणारा, सगुणसाक्षात्कारी, तो सिद्धपुरुष, अशी लोकांची समजूत असून लोक चमत्कारावांचून नमस्कार करीत नाहींत. पण अध्यात्मज्ञानांतील सिद्धपुरुषाजवळ चमत्काराचें माहात्म्य नसून "**मुख्य निःसंदेहपणेंचि । सिद्ध बोलिजे**" किंवा "**जो जाणेल भगवंत । त्या नांव बोलिजे संत**" ही आध्यात्मिक सिद्धाची किंवा संताची व्याख्या होय. "**कोऽहम्**" आणि **कथमिदं जातम्**"

अर्थात् मी कोण, जग काय, याचा आत्मानात्मविचार सदसद्विवेकबुद्धीनें व सत्संगतीनें करून जो निःसंदेह म्हणजे संशयरहित व देहातीत होऊन राहिला, तो अध्यात्मांतील सिद्धपुरुष होय. या विचारानेंच चिदचिद् ग्रंथि सुटते. आणि ती ग्रंथि सुटल्यावांचून सर्व साधनें किंवा अहंब्रह्म, सर्वब्रह्म, विमलब्रह्म, सर्वांभूतीं भगवद्भाव, हें विश्वचि माझें घर, इत्यादि वल्गना सर्व व्यर्थ होत. चिदचिद् ग्रंथि सुटल्यावांचून खरी भक्ति नाहीं व मुक्तिही पण नाहीं. ही प्रत्येक मुमुक्षूनें खुण गांठ मारून ठेवावी. " **निश्चय बैसे वस्तूकडे । तरी ज्ञानमार्गेंहि सामर्थ्य चढे** " " **निश्चयाचें बळ । तुका म्हणे तेंचि फळ.** " कोणत्याहि तत्वाबद्दल ज्याचा पूर्ण निश्चय झालेला असतो, तो पुरुष तेजस्वी असतो. हें कै० लोकमान्य टिळक, प्रो० परांजपे यांच्या उदाहरणानें दिसून येईल. ज्ञानमार्गानें आत्मस्वरूपाचा निश्चय झाल्याचें तेज वासुदेवबुवांच्या वाणींत उतरलें होतें. हें सामर्थ्य येणें म्हणजे राममूर्तिप्रमाणें अंगांत शक्ति येणें किंवा सिद्धिचमत्कार होऊं लागणें असें नसून वाणी तेजस्वी होणें होय. तेजस्वी वाणी दुसऱ्याला उपदेश करण्याला समर्थ होते. तशी वासुदेवबुवांची वाणी उपदेश करण्याला तेजस्वी होती.

वासुदेवबुवा देहानें सुदाम्याचे अवतार होते, बांध्यानें वामनमूर्ति होते. स्वभावानें साधे व सुलभ होते. माळा, मुद्रा, बरोबर शिष्यांचा भार वगैरे बडेजाव मुळींच नव्हता. बुवा अशक्त होते तरी निरलसता व तत्परता विलक्षण होती. दोनतीन कोस जमीन इतक्या वयांतहि चालण्याची धमक त्यांच्या अंगी होती. स्वभाव जितका भिडस्त, तितकाच निस्पृह असे. उपाधि फार होते असें वाटलें कीं, कोणाचेंहि न ऐकतां एकदम निघून जात असत. त्यावेळीं त्यांना कोणाची परत आणण्याची छाती होत नसे. बुवांची मूर्ति घरांत आहे कीं नाहीं समजावयाची नाहीं. आवाज मात्र खणखणीत असे. दुसऱ्याला आपल्याकडून यत्किंचितहि त्रास होऊं नये अशी त्यांची प्रवृत्ति असे. हे बुवा आहेत असे कोणाला समजतहि नसे. पुष्कळ लोक फसत असत! पुण्यांत एकदां बुवा ह. भ. प. गोविंदबुवा पाटणकर मुरूडकर यांच्या पुराणाला जाऊन बसले होते. पण कोणाला समजून आलें नाहीं. कारण जामानिमा मुळींच नसे. मागाहून मुरुडकरबुवांना समजून आलें. " **वेष असावा बावळा । अंतरीं असाव्या नाना कळा** " हा राजकारणी पुरुषाचा वेष, पण अध्यात्मामध्येंहि बुवांचा वेष याप्रमाणें असून त्यांच्या अंगीं असलेल्या आध्यात्मिक नाना कळा त्यांच्या कीर्तनांत अगर प्रवचनांत प्रगट होत असत!

परमार्थमार्गांतील पुरुषांच्या भेटींची बुवांना फार आवड असे. धोमवासी परमपूज्य विश्वनाथदादा पाटणकर, ज्यांचें अल्पसें चरित्र मी '**आत्मानुसंधान**' पुस्तकांत आरंभीं दिलें आहे, त्यांचे उपासक ह. भ. प. दत्तात्रय यशवंत बापट

पेन्शनर मास्तर हल्लीं वास्तव्य मौजे आवास जि० कुलाबा यांचें व वासुदेवबुवांचे श्री० दिगंवरराव जोशांप्रमाणेंच जिव्हाळ्याचें प्रेम असे. गुरुवर्य बापट मास्तर हे धामणीनजीक निरगुडसर गांवीं दोन वर्षें मास्तर होते. त्यावेळीं दर शनिवारीं बापटांनीं धामणीस येऊन सोमवारीं परत निरगुडसरला जावें. असा नित्यक्रम असे. कधीं कधीं बुवाच शनवारीं निरगुडसरला जात असत. अशा रीतीनें उभयतां तत्त्ववेत्या साधूंचा बराच काळ सुखसंवादांत जात असे. त्यानंतरहि उभयतांच्या वारंवार प्रेमभेटी होत असत. वासुदेवबुवा हे बापटांना "देवदत्त" असें प्रेमानें संबोधीत असत. वे० शा० संपन्न यशवंतशास्त्री वाफगांवकर यांच्यापाशीं वासुदेवबुवा वेदांत शिकले हें पूर्वीं सांगितलेंच आहे. देवदत्त बापट सांगतात कीं, यशवंतशास्त्री यांनीं वासुदेवबुवांची कथा ऐकिली. शिष्याचें निरूपण ऐकून शास्त्रीबुवा फारच खुष झाले, आणि वासुदेवाच्या मस्तकीं वरदहस्त ठेवून उद्गारले कीं, बा वासुदेवा! तुला आतां सांगावयाचें मजपाशीं कांहीं राहिलें नाहीं. तूं धन्य आहेस! असो. बापटांची व माझी ओळख वासुदेवबुवांमुळेंच झाली.

आजकालची परंपराभ्रष्ट झालेली आधुनिक विद्वान् मंडळी केवळ आधिभौतिक ज्ञानांत, सुखांत, ऐश्वर्यांत रंगलेली, गुंगलेली पाहून वासुदेवबुवा नेहमीं म्हणत असत कीं, "मनुष्याला परमेश्वरानें इतर प्राण्यांपेक्षां ज्ञानरूपी शर्करा ही जास्त दिली आहे. शर्करा ही वास्तविक दुधांत, तुपांत, अगर गव्हांत घालून खाण्याचें सोडून हे विद्वान् लोक मातींत कालवून खातात! शर्करा ही दुसरा कोणी मातींत कालवून तो खाऊं लागला तर आपण त्याला वेडा म्हणूं. पण या विद्वान् मंडळीला कोणी वेडे न म्हणतां शहाणे, अति शहाणेच म्हणतात"! बुवांच्या या म्हणण्याचें तात्पर्य हें कीं, आपल्याला मिळालेल्या ज्ञानाचा ओघ अध्यात्ममार्गानें हरिभक्तीकडे वळवून मुक्त होण्याचें सोडून केवळ आधिभौतिक सुधारणांत सर्व ज्ञान खर्चीं घालून अद्वातद्वा आधिभौतिक विषयसुख भोगण्यांत नरजन्माची इतिकर्तव्यता मानणें, म्हणजे मातींत साखर कालवून खाण्यासारखेंच हास्यास्पद होय. कारण आधिभौतिक सुख हें ज्या देहासाठीं भोगावयाचें तो तर मातींतून मातेच्या उदरद्वारें येऊन शेवटीं मातींत मिळून मातीमोलच होणार! अर्थात् आधिभौतिक ज्ञान व सुख हें मातीमोलच होय. श्रीज्ञानोबा म्हणतात:—

**"अगा मातें न भजावयालागीं। कवण बळ पां आपुलिया अंगीं। काय घरीं कीं भोगीं। निश्चिंती केली १ नातरी विद्या कीं वयसा। यया प्राणीयांसी हा ऐसा। मज न भजतां भरंसा। सुखाचा कोण २ तरी भोग्य जात जेतुलें। तें एका देहाचिया निकिया लागलें। आणि येथ देह तंव असे पडिलें। काळाचिये तोंडीं ३ अगा विषाचे कांदे वांटुनी। जो रस**

**घेइजे पिळूनी । तया नाम अमृत ठेऊनि । जैसें अमर होणें४ तेंवी विषयांचें जें सुख। तें केवळ परम दुःख ।परी काय कीजे मूर्ख । न सेविता न सरे!"** समर्थहि पढत मूर्खांचें लक्षण सांगतात कीं, "**परम मूर्खांमाजी मूर्ख । जो ये संसारीं मानी सुख । संसारदुःखाएवढें दुःख । आणीक नाहीं ॥** "

एकंदरींत ज्या आधिभौतिक सुखाच्या सुलभतेसाठीं व तें मनमुराद मिळावें म्हणून आजकाल पाश्चिमात्यांच्या पशुवत् सुखाकडे पाहून आमच्या आधुनिक विद्वानांच्या तोंडाला पाणी सुटून त्याबद्दल प्रौढ विवाह, स्त्रियांना शिक्षणानें पुरुष बनवणें, स्वैरस्वातंत्र्याची हांव, इ० अनेक सुधारणांची आधिभौतिक धडपड चालू आहे, तें सुख मातीमोल क्षणभंगुर आहे हें निर्विवाद आहे. म्हणून सत्संगतीनें व आत्मनिवेदनी भक्तीनें आत्मलाभ करून घेण्याकडे ज्ञानाचा थोडाबहुत तरी उपयोग करून घेणें, हेंच शहाणपणाचें कर्तव्य होय. "**प्रपंच सुखें करावा । परंतु कांहीं परमार्थ वाढवावा । परमार्थ अवघाचि बुडवावा । हें विहित नव्हे** " "**मरणाचें स्मरण असावें । हरिभक्तीशीं सादर व्हावें** ". ज्ञानरूपी क्षीर हिचें अध्यात्मविचाराच्या मुखानेंच ग्रहण झालें पाहिजे. तें सोडून क्षीर सर्वांगाला चोपडली तर तिची काय गोडी कळणार ? असें बुवा म्हणत असत. क्षीर मुखानें सेवन न करतां अंगाला चोपडणें, म्हणजे ज्ञानाचा उपयोग अध्यात्मप्राप्तीकडे न करतां शरीरसुखाकडे सर्वस्व खर्चा करण्याचा मूर्खपणा करून ज्ञानाची माती करणें होय.

पिंपळगांवचे निळोबाचे वंशांतील कृष्णनाथ, अळकूटकर पंढरीनाथबुवा, दामोदरबुवा इ० पुष्कळ मंडळी वासुदेवबुवांजवळ कीर्तनाचें शिक्षण घेऊन गेली व कीर्तनकार बनली. वासुदेवबुवांचे चिरंजीव जनार्दनबुवा हेहि उत्तम कीर्तन करतात. बुवांची कन्या श्री० सोनुताई ह्याहि उत्तम कथा करतात असें ऐकतों. हा बुवांच्या शिक्षणाचा परिणाम होय. वासुदेवबुवांची शिष्यशाखा पुणें, नगर, सातारा, इंदूर, बडोदें, जुन्नर, खेड, शिरूर, वगैरे ठिकाणीं बरीच आहे. "**अधिकार तैसा करूं उपदेश** " अशी बुवांची उपदेशाची पद्धति असे. अनधिकारी, नास्तिक, अभाविक अशा पुरुषाशीं बुवा चर्चा करण्याचें टाळीत असत. अगर पानावर पान ठेवून त्याच्याच म्हणण्याला पुष्टि देवून वितंडवाद टाळीत असत. रामदासी सांप्रदाय व रामोपासना फार पुरातन कालापासून बुवांच्या वंशांत चालू आहे. ही परंपरा कल्याणस्वामींची आहे. श्रीरामदास, कल्याण, दत्तात्रेय, यशवंत, रावत्र, भीमकराज, अमृतराय, रघुनाथ, नारायण, वासुदेव, जनार्दन, अशी ही परंपरा चालत आली आहे. विठ्ठलमहाराजांची परंपरा ही उद्धव, माधव, गोविंद, शंकर, बालकराम, विठ्ठल अशी होती. वासुदेवबुवा समर्थांच्या ग्रंथांचें पाठांतर करीत असत. तो पाठ

परंपरागत शुद्ध असे. धुळ्याचे श्री० शंकर श्रीकृष्ण उर्फ नानासाहेब देव आणि श्रीविठ्ठलभक्त ल. रा. पांगारकर यांनीं शुद्ध पाठाचे दासबोध, मनाचे श्लोक वगैरे प्रसिद्ध केले आहेत. त्याच्याही पूर्वींपासूनचे बुवांचे पाठ शुद्ध होते. व ते प्रसिद्ध झालेल्या पाठांशीं जुळत असत.

वासुदेवबुवांना ज्योतिष आणि वैद्यकही चांगलें येत असे. दोन्ही विद्यांचा तसाच अध्यात्मविद्येचाहि उपयोग वासुदेवबुवांनीं परोपकाराकडे केला. त्यांच्या औषधानें पुष्कळांना गुण येत असे. गेल्या वैशाखमासीं बुवांची पुण्यास भेट झाली तेव्हां त्यांनीं स्वतःच्या कुंडलीची वाटाघाट करून आतां आपला अंतकाल समीप आला असल्याचें मला सांगितलें होतें. बुवा याज्ञिकीही शिकले होते. निमगांवकर बाळशास्त्री यांजपाशीं त्यांचें शिक्षण झालें होतें.

वासुदेवबुवा जरी रामदासी होते, तरी कीर्तन वारकरी सांप्रदायाप्रमाणें करीत असत. " राम विठ्ठल दुजा नाहीं " अशी त्यांची निष्ठा असे. त्यांचे पूर्वज श्रीपंढरपुरास चातुर्मास जात असत. याचा उल्लेख कुलवृत्तांतांत आलाच आहे. वासुदेवबुवाही श्रीआळंदीच्या पालखीबरोबर पायीं पंढरपुरास पूर्वी जात असत. एकंदरींत श्रीविठोबावर बुवांचें वडिलार्जित प्रेम होतें. त्यांना वारकरी व रामदासी हा भेदभाव बिलकूल नव्हता. साधारणतः रामदासी हे ज्ञानेश्वरींतील आधार घेण्याला किंवा श्रीविठ्ठलाचें भजन करण्याला कचरत नाहींत. असें माझ्या पाहाण्यांत आहे. पण वारकरी चुकून सुद्धां रामदासाच्या ग्रंथांचा आधार घेणार नाहींत असे अहंकारी आढळतात ! वासुदेवबुवांनीं जुन्नरास एकदां मौज केली होती. " **देवाचिया द्वारीं उभा क्षणभरी । तेणें मुक्ति चारी साधियेल्या** " या अभंगावर वारकरी पद्धतीनें बुवांनीं पंधरा वीस दिवस कीर्तन केलें. पण त्यांत समर्थांचें एकहि वचन आणलें नाहीं ! बुवांजवळ पाठांतर दांडगें असल्याचें वर्णन पूर्वी आलेंच आहे. बुवा वारकरी पंथाचे समजून मागें वारकरी टाळवाल्यांची गर्दी होत चालली. नंतर एक दिवस बुवांनीं भ्रमाचा भोंपळा फोडला ! समर्थांच्या वचनाचा आधार दिल्या-बरोबर टाळकरी मागच्यामागें पोबारा करूं लागले ! दुसऱ्या दिवशीं एकहि वारकरी मागें उभा राहिला नाहीं ! हरिभक्तिपरायण ल. रा. पांगारकरांसारख्या वारकरी तत्वजिज्ञासूंमध्यें हा सांप्रदायाचा दुरभिमान नसतो. पण त्यांतहि कांहीं वारकरी पंथाचे उत्तम तत्वजिज्ञासु आपल्याला रामदास स्वामी पूज्य आहेत, त्यांच्याबद्दल आपला द्वेष नाहीं असें तोंडानें म्हणतात, पण रामदासां-च्या वचनाचा आधार देण्यास कचरतात ! अशाही विभूति माझ्या पाहाण्यांत आहेत. वासुदेवबुवांचें पुण्यांत एकदां हरिभक्तिपरायण पांगारकरांकडे एक कीर्तन झालें. पांगारकरांच्या अत्याग्रहावरून एक वारकऱ्यांचे सुप्रसिद्ध

लोकप्रिय पुढारी कीर्तनास आले होते. ते आल्याबरोबर खालीं मान घालून मोठ्या जुलमानें कीर्तनास बसले होते व कीर्तन समाप्त होतांच कोणांशीं न बोलतां तडक चालते झाले! या दुरभिमानाला काय म्हणावें? रामदासांवर वाळीत कां? तर म्हणे ते शिवाजीराजाचे गुरु झाले! हा रामदासी व वारकरी यांमधील तीव्र दुरभिमान तर राहोच, पण वारकऱ्यां वारकऱ्यांमध्यें हि तीव्र दुरभिमान असल्याचें माझ्या पाहाण्यांत आहे. कित्येक वारकरी फक्त अमृतानुभवाचे भोक्ते, पण ज्ञानेश्वरी हातांत घेत नाहींत! कारण काय, तर म्हणे ज्ञानेश्वरी ही गीतेचा म्हणजे दुसऱ्याचा आधार घेऊन लिहिलेली आणि अमृतानुभव हा ज्ञानेश्वरांचा स्वतंत्र ग्रंथ! कित्येक वारकरी ज्ञानेश्वरी ही गीतेच्या आधारानें लिहिलेली नसून गीतेचे श्लोक त्यांत असले, तरी त्यांतील ज्ञानेश्वरांचे विचार स्वतंत्र आहेत, असेंहि मानणारे आहेत! "**भाष्यकारासी वाट पुसत**" आणि "**व्यासाचा मागोवा घेत**" या चरणाचा हे मताभिमानी लोक काक्तार्थी प्रश्नार्थक अर्थ घेतात. भाष्यकाराला वाट पुसत? न पुसत! व्यासांचा मागोवा घेत? न घेत! कारण आमचे ज्ञानी असे ज्ञानेश्वरमहाराज दुसऱ्याचा आधार घेऊन ग्रंथ कशाला लिहितील? ही या मतवाल्यांची समजूत! मात्र अशा मताचे वेडेपीर थोडे आहेत. या वारकरी किंवा रामदासी पंथांतहि परस्परांत तीव्र द्वेष असल्याचे मासले माझ्या पाहाण्यांत आहेत. फार दिवसांची गोष्ट, एकदां पुण्यांत मी, वासुदेवराव वैशंपायन व दत्तोपंत बापट असे रात्रीं कोठें कीर्तन असल्यास श्रवण करावें, म्हणून हिंडत होतों. इतक्यांत वारकरी पंथाचे दोन फड एकमेकांचे कट्टे द्वेषी असे समोरासमोर आमच्या पाहाण्यांत आले. एका फडांत कीर्तन चालू होतें व एका फडांत भजन चालू होतें. कीर्तनवाल्या फडाचें भजन सुरू झालें कीं, भजनवाल्या फडाचें भजन बंद. आणि कीर्तनवाल्या फडाचें निरूपण चालू होण्याचा अवकाश, कीं यांच्या भजनाला सुरवात झाली! हेतु हा कीं, आपल्या भजनाच्या कलकलाटानें कीर्तन कोणाला ऐकूं द्यावयाचें नाहीं! आतां या सूड उगवून घेणाऱ्या द्वेषाला काय म्हणावें? असो.

वासुदेवबुवांजवळ सिद्धिचमत्कार नव्हते. आणि त्याला ते महत्त्वहि देत नव्हते. याचें वर्णन वर आलेंच आहे. सिद्धि खोट्या आहेत असें नाहीं. सिद्धींसाठीं तप केलें तर सिद्धि प्राप्त होतात. पण त्याकरतां बुवांनीं तप केलेलेंच नव्हतें. असें असतांना चमत्कार होत असतील तर "**हा लोकांचा भावार्थ। भाविकां देव यथार्थ। अन्यत्र कल्पना व्यर्थ। कुतर्कांच्या.**" चमत्कार होतात ही लोकांची भावना आहे. त्या भावनेला अनुसरून बुवांच्या एका शिष्यानें चरित्रांत ग्रथित करण्याकरतां बुवांच्या कांहीं चमत्कारजन्य किंवा बोलाफुलाला गांठ पडलेल्या गोष्टी लिहून पाठवल्या आहेत. चमत्काराशिवाय नमस्कार न

करणारे कांहीं लोक आहेत. त्यांच्याकरतां व चरित्राची सांगता होण्याकरतां त्या गोष्टी येथें थोडक्यांत नमूद करतोंः—

( १ ) एकदां केंदूर पाबळ मुक्कामीं कान्हो पाठकाच्या पुण्यतिथींत कीर्तनाला पुष्कळ हरिदास जमले होते. सर्वांचीं कीर्तनें झालीं. त्यांत वासुदेवबुवांचेंहि कीर्तन झालें. तें सर्वांत गोड, सरस ठरलें. बुवा म्हणाले, माझी ही मेथीची भाजी आहे. सर्वांनीं गोड करून घ्यावी! त्यावेळीं एकजण उठून म्हणाले, ही मेथी नसून कोथिंबिर आहे. हिचा सुवास दरवळल्यावांचून राहात नाहीं! त्या दिवसापासून बुवांच्या डोळ्यांची आग होऊं लागली व त्यामुळें त्यांनीं पुरणाची पोळी वातुळ म्हणून खाण्याची सोडून दिली. गूळही खाण्याचा सोडला. पुढें चार महिन्यांनीं बुवा एकदां चांडोली गांवीं गेले. तेथें एका बाईनें केलेल्या पुरणाच्या पोळ्या बुवा खाईनात. त्यावरून बाईला कारण समजलें. बुवांवर कोणाची तरी दृष्ट पडली असें समजून त्या बाईनें बुवांची दृष्ट काढली. लागलीच बुवांच्या डोळ्यांची आग शमली! अर्थात् केंदूर पावळच्या कीर्तनांत कोणाची तरी दृष्ट पडली असावी अशी त्या बाईची समजूत होऊन तिनें दृष्ट काढली व ती खरी ठरली!

( २ ) वासुदेवबुवांची कीर्ति ऐकून मुद्दाम त्यांच्या दर्शनाचा हेतु धरून कांहीं तेलंग ब्राह्मण धामणीस आले. धामणी अगदींच आडवळणी आहे. त्याचें वर्णन पूर्वीं येऊन गेलेंच आहे. वासुदेवबुवा हे तेलंग ब्राह्मण येण्यापूर्वींच दोन तास अगोदर कांहीं सरकारी कामाकरतां खेडास निघून गेले होते. ते दोनतीन दिवसांनीं परत येणार होते. ब्राह्मणांनीं स्नानसंध्या केली. घरांत त्यांची भोजनाची तयारी होऊन पानें वाढलीं. ब्राह्मण म्हणाले कीं, महाराजांचें दर्शन झाल्याशिवाय अन्न ग्रहण करणार नाहीं. बुवा वाफगांवापर्यंत सहा मैलांवर गेले आणि त्यांना काय वाटलें असेल तें असो, पुढें जाण्याचा बेत बुवांनीं रहित करून खेडास चिठ्ठी पाठवली, आणि दोन वाजतां धामणीस परत आले. ब्राह्मणांना आपल्या अन्नग्रहण न करण्याच्या निर्धाराला यश आलेलें पाहून आनंद झाला व सर्व मंडळी आनंदानें जेवली! सर्वांना मोठें कौतुक वाटलें!

( ३ ) सिंहस्थपर्वणीला वासुदेवबुवा एकदां सहकुटुंब नाशकास गेले होते. नाशीकचें सर्व कार्य संपवून त्रिंबकेश्वरीं जाण्याकरतां गाड्या भरल्या. पुरुष मंडळींनीं देवदर्शन अगोदरच घेऊन ते गाडींत बसले. बुवांचें कुटुंब देवदर्शनार्थ शहरांत गेलें. त्यांची व गाड्यांची चुकामुक झाली. बाई रस्ता चुकल्या व गल्लोगल्लीं हिंडूं लागल्या. गाड्या दोन अडीच मैल लांब गेल्या. इतक्यांत एक ब्राह्मण हातांत पळी पंचपात्री घेऊन गाडीच्या पुढें आले व त्यांनीं गाडी थांबवण्याला सांगितलें. बुवांनीं गाडी थांबवली. इकडे तेच ब्राह्मण बाईंना रस्ता दाखविण्याला आले व बाईंना सरळ रस्त्यावर त्यांनीं आणून

सोडलें. गाड्या भेटल्यावर परस्परांना ब्राह्मणाची हकीकत समजली. आपल्याकरतां प्रभूंना विनाकारण त्रास झाला म्हणून बुवांना हळहळ वाटली !

(४) बुवांचे चिरंजीव जनार्दनबुवा हे एकदां अत्यवस्थ अजारी होते. संकटकाळीं बुवांनीं ईशांचें चिंतन चालविलें होतें. एक दिवस रात्रीं चारहि धाम करून आलेले एक रामदासी यात्रेकरू वस्तीस आले. त्यांनीं सकाळीं देवदर्शन केलें. जनार्दनाच्या अंगावरून हात फिरवला, अंगारा लावला आणि निघून गेले. तेव्हांपासून जनार्दनाला गुण येऊं लागला. व पांचसहा दिवसांत प्रकृति चांगली दुरुस्त झाली.

याप्रमाणें बुवांच्या चरित्रांत चमत्कृतिजन्य म्हणून चार गोष्टी नमूद करीत आहें. प्रवृत्तिमार्गामध्यें कसें चालावें, याबद्दल बुवांनीं आपल्या एका शिष्याला ज्या चार गोष्टी सांगितल्या, त्या गोष्टी बुवांच्या चरित्रांत नमूद करण्याकरतां शिष्यानें मजकडे पाठविल्या. त्या येथें नमूद करतोंः—

" प्रवृत्तिमार्गांतील सर्व हेतु सिद्धीस जाणें, कालाधीन आहे. कालयवनाचा वध करण्याकरतां साक्षात् भगवान् श्रीकृष्णालाहि कालाची वाट पाहावी लागली. तेथें मनुष्याची काय कथा ! मृत्यूचें स्मरण डोळ्यांपुढें ठेवावें. वर्णाश्रमधर्माप्रमाणें विहित कर्मे करून निरंतर भगवच्चिंतन करावें. परद्रव्य आणि परनारीपासून दूर राहावें. सर्वांभूतीं दया ठेवावी. अत्यंत एकनिष्ठेनें सद्गुरुसेवा करावी. ब्रह्मज्ञानाचा विचार करावा " इत्यादि.

भिक्षेवांचून वासुदेवबुवा कोणावरही आपला भार घालीत नसत. ते अत्यंत भिडस्त असत. श्रीराममंदिराचा मंडप जीर्ण झाल्यामुळें गांवकरी लोकांनीं शके १८४८ सालीं नवीन बांधण्याच्या उद्देशानें पार पाडून टाकला. पण वासुदेवबुवांनीं कोणाजवळही याबद्दलच्या याचनेचा एक शब्द काढला नाहीं ! यावरून त्यांची निरपेक्षता तर दिसून येतेच, पण मठाभिमानहि नव्हता हेंहि सहज दिसून येतें.

वासुदेवबुवांना पांच मुली व एक मुलगा जनार्दन अशीं सहा अपत्यें आहेत. मुलगा सर्वांत लहान होय. पहिली मुलगी द्वारकाबाई पावळास देशपांडये यांजकडे दिली आहे. दुसरी भागिर्थी ही लोणी येथें जोशी यांजकडे, तिसरी हरणाबाई ही लोणी येथेंच कुळकरण्यांकडे दिली आहे. चवथी मुलगी यशोदाबाई ही आळकुटी तालुके पारनेर जिल्हा नगर येथें हरिभक्तिपरायण पंढरीनाथ सीताराम आळकुटकर यांस दिली आहे. हे श्रीपंढरीचे वारकरी असून बुवांजवळच कीर्तन करण्याला शिकले. हे उत्तम कीर्तन करतात. त्यांची भगवद्भक्ति व कीर्तनकला पाहूनच बुवांनीं मुलगी दिली. पांचवी मुलगी सोनुताई ही निमगांव येथें नरहर बाळकृष्णशास्त्री यांस दिली होती. परंतु दुर्दैवानें त्यांना लहानपणींच वैधव्य आलें ! त्या कीर्तन उत्तम करीत असल्याचा

उल्लेख पूर्वीं आलाच आहे. सहावें अपत्य जनार्दनबुवा हे पित्याप्रमाणेंच परमार्थ करून कीर्ति मिळवतील अशी उमेद आहे.

विचारसागर ग्रंथाचें मराठींत प्रथम भाषांतर करणारे आपाबुवा पिंपरी पेंढारकर, यांचा उल्लेख पूर्वीं नारायणमहाराजांचे वृत्तांतांत आलेलाच आहे. आपाबुवा हे माझ्या पाहाण्यांत होते. वेदांतामध्यें ते निष्णात होते. वासुदेवबुवांवर त्यांचें फार प्रेम असे. तत्त्वज्ञ कसे वागतात असा एकदां बुवांनीं व बापट मास्तरनीं आपाबुवांना प्रश्न विचारला. आपाबुवांनीं उत्तर दिलें कीं, यथेष्ट वागतात. पण "**कायेन मनसा बुद्धया केवलैरिंद्रियैरपि । योगिनः कर्म कुर्वंति संगं त्यक्त्वात्मशुद्धये.**" म्हणजे आसक्ति व अहंकारबुद्धि सोडून यथेष्ट व यथास्थित कर्में करतात. आपाबुवा धामणीस येऊन कीर्तन करीत असत. एकदां त्यांना येण्याला उशीर झाला म्हणून वासुदेवबुवा कीर्तनाला उभे राहिले. मागाहून आपाबुवा आले. त्यांनीं बुवांचें कीर्तन ऐकून ते फार खुष झाले. आणि बुवांना म्हणाले कीं, आतां आमचें काम संपलें ! श्रीपरमानंदस्वामी पूर्वाश्रमीचे लोखंडे हे कडूस येथें असत. त्यांचेंहि वासुदेवबुवांवर फार प्रेम असे. ते वासुदेवबुवांना म्हणत असत कीं, " जोड्यानें कांटा मोडेल पण जोड्यांत शिरणार नाहीं, असा जोडा घालावा ". स्वामींचें हें म्हणणें निःसंशय खरें आहे. ज्ञानोबांनींही ज्ञानेश्वरींत बुद्धियोगाचें कवच कसें मजबूत आहे, त्याचें वर्णन केलें आहे. "**तियापरी जे सुबुद्धि । आपु झालीया निरवधि । हा असताचि उपाधि । आकळूं न शके.**" म्हणजे बुद्धियोग्यांना देहोपाधि बाधू शकत नाहीं. अशा रीतीनें पुष्कळ सद्भक्तांचें बुवांवर व बुवांचे अनेक सद्भक्तांवर मोठया जिव्हाळ्याचें अकृत्रिम प्रेम असे. कर्जत तालुक्यांतील वेणगांवचे कै० विष्णुपंत भाऊ वैद्य हे रामदासी पंथाचे असून श्री वामनबुवांचे शिष्य होते. ते वेदांतप्रवीण व प्रसिद्ध होते. घरचेही श्रीमान् होते. वासुदेवराव वैशंपायन यांचे ते आतेबंधु व पेन्शनर सबजज्ज व गच्चीवरील गप्पांचे सुप्रसिद्ध लेखक श्रीयुत नारायण गोविंद चापेकर यांचे ते मामा होते. त्यांनीं वासुदेवबुवांची कीर्ति ऐकिली होती. यामुळें ते एकदां बुवांना भेटण्याकरतां मुद्दाम खेडास गेले. बुवाही खेडास आले होते. तेथें त्यांनीं बुवांच्या मुखानें " **वृत्तिरहित जें ज्ञान । तेंचि पूर्ण समाधान । जेणें तुटे अनुसंधान । मायाब्रह्मींचें** " या ओंवीचा अर्थ ऐकण्याची इच्छा दर्शविली. त्यावरून बुवांनीं या ओंवीचें विष्णुपंत भाऊंपुढें यथास्थित निरूपण केलें. विष्णुपंत भाऊंचें समाधान झालें. त्याबद्दल त्यांनीं मजपाशीं बुवांबद्दल धन्योद्गार काढिले. आणि असें प्रतिपादन ऐकण्याला दुर्लभ असें बोलले !

उदार आणि थोर मनाचे जे सत्पुरुष असतात, ते समाधानी, मोकळ्या वृत्तीचे, सदा आनंदी आणि सहजविनोदी असतात हा अनुभव आहे. याचीं दळदळीत

उदाहरणें म्हणजे **कै० साधुवर्य अण्णासाहेब पटवर्धन, लोकमान्य टिळक, प्रो० परांजपे** ही मंडळी मोकळ्या वृत्तीची, आनंदी व विनोदी असत हें प्रसिद्धच आहे. शिवाय माझा या विभूतींशीं जो निकट परिचय होता त्या परिचयाअंतीं मलाही त्याचा साक्षात् अनुभव बरेच वेळ आलेला आहे. विस्तारभयास्तव त्यांच्या आठवणी देत नाहीं. त्याचप्रमाणें आमचे वासुदेवबुवा " **सदा सर्वदा मोकळी वृत्ति राहे** " अशा प्रकारचे मोकळ्या वृत्तीचे व सहजविनोदी आणि आनंदी असत. अंतःकरणांत कर्तव्यकर्माचे सर्व संस्कार जागृत असून पुन्हा वृत्ति मोकळी, कामक्रोधविहीन राहाणें, हें खऱ्या भाग्याचें लक्षण होय. वासुदेवबुवांच्या मोकळ्या वृत्तीचे व सहजविनोदी व आनंदी वृत्तीचे दोन तीन मासले सांगणें अवश्य आहे.

( १ ) कै० रामचंद्र धोंडदेव इंदोलीकर या नांवाचे पुणें जिल्ह्याला डे० कलेक्टर होते, याचा उल्लेख पूर्वी आलाच आहे. त्यांची वासुदेवबुवांवर फार श्रद्धा व निष्ठा होती. इंदोलीकर फार कोमल अंतःकरणाचे होते. त्यांचें पहिलें कुटुंब निवर्तलें, त्यावेळीं त्यांना फार दुःख झालें. त्यावेळीं त्यांची नेमणूक अवसरी येथील दुष्काळी क्यांपावर होती. तेथून धामणी नजीक आहे. कुटुंब निवर्तल्यामुळें मन अगदीं अस्वस्थ झालें आहे, कांहीं सुचत नाहीं, यामुळें दर्शन देऊन, दोन समाधानपर शब्द सांगून दुःख दूर करावें, अशा मजकुराचें इंदोलीकरांनीं बुवांना पत्र लिहिलें. त्याप्रमाणें बुवा आले. भेट झाली. त्यांच्या पुढें इंदोलीकर आपलें दुःख निवेदन करणार, इतक्यांत बुवांनींच भोकाड पसरून ओक्साबोक्सी रडण्यास आरंभ केला ! त्याच सुमारास बुवांचे जांवई नुकतेच मरण पावले होते. हें बुवांना रडण्याला कारण होतें. बुवांचें तें समाधानीवृत्तींतील रडणें वरकरणी इंदोलीकरांना लाजविण्याकरतां होतें ! पण इंदोलीकरांना तें खरें वाटून क्षणभर त्यांची गाळण उडाली ! जांवई अकालीं मेल्याच्या दुःखापुढें आपल्या कुटुंबविरहाचें दुःख बुवांपुढें कसें काढावें, याची इंदोलीकरांना मोठी पंचाईत पडली ! जांवयाच्या दुःखापुढें कुटुंब दुःख कांहींच नाहीं, असें त्यांना आपोआपच वाटूं लागलें ! इंदोलीकर विरमून गेले ! इतका फार्स करून बुवांनीं इंदोलीकरांना या मृत्युलोकची यथास्थित कहाणी सांगून निरुत्तर केलें व त्यांचें समाधान केलें ! हा बुवांच्या समाधानवृत्तीचा मासला झाला. आतां विनोदीवृत्तीचा मासला सांगतों.

( २ ) माझें कुटुंब सन १९०८ सालीं निवर्तलें. ही हकीकत मीं बुवांना पत्रद्वारें कळवून समाधानपर दोन शब्द लिहून कळविण्याविषयीं विनंति केली होती. त्या पत्राचें बुवांनीं उत्तर कांहींच पाठविलें नाहीं. पुढें कांहीं दिवसांनीं चिंचवडच्या श्रीमोरयाच्या उत्सवांत बुवांची व माझी भेट झाली. त्यावेळीं बुवा म्हणाले कीं, तुमच्या पत्राप्रमाणें दोन समाधानपर शब्द लिहून पाठवण्यापेक्षां

समक्षच यावें असा मी विचार केला, पण कुटुंब निवर्तल्यानें झालेलें दुःख, त्याचें मी परिमार्जन कसें करणार, ही पंचाईत पडल्यामुळें समक्ष येण्याचा बेत रहित करावा लागला! हा बुवांच्या विनोदीवृत्तीचा मासला झाला. आतां बुवांच्या सहजावृत्तीचा किंवा मोकळया वृत्तीचा मासला सांगतों.

( ३ ) वासुदेवबुवांचें एक कीर्तन पुण्यांत ताई महाराजांच्या वाड्यांत झाल्याचा उल्लेख पूर्वीं आलाच आहे. कीर्तनाची जागा माडीवर होती. बुवा कीर्तनाला उभे राहिले होते. त्यांच्याच पाठीमागें वर येण्याचा जिना होता. त्या जिन्यानें बुवांच्या अंगावरूनच येऊन बुवांच्या पुढें बसावें, तसेंच खालीं जावयाचें असल्यासहि बुवांच्या अंगावरून जिन्यानें खालीं जावें अशा प्रकारची कीर्तनाच्या बैठकीची जागा होती. कर्मधर्मसंयोगानें त्याच दिवशीं कै० लोकमान्य टिळक जामीनावर सुटून आले होते. आणि ते कीर्तनाला आले होते. अभंगाचें निरूपण इतकें बहारींत चाललें होतें कीं, बुवांच्या मुखांतून आतां काय बाहेर पडतें, याबद्दल सर्व श्रोत्यांचें चित्त चातकासारखें वेधून गेलें होतें. अशा ऐन बहारीच्या वेळीं कै० लोकमान्य टिळक हे प्रकृति नीट नसल्यामुळें म्हणा किंवा इतर महत्त्वाच्या कामामुळें म्हणा, कीर्तनांतून मध्येंच उठून बुवांच्या अंगावरून खालीं गेले. त्याबरोबर लागलीच अरसिक, बहिर्मुख वृत्तीची वीसपंचवीस मंडळी बुवांच्या अंगावरून निघून खालीं गेली. लागलीच बुवांनीं "**हेंचि दान दे गा देवा**"! म्हणून आरती आणवून कथा संपविली! श्रोते मंडळींत द्विधामत होऊन चर्चा सुरू झाली. दुसरे दिवशीं दोन्ही मतांची मंडळी माझ्या बिऱ्हाडीं बुवा होते, तेथें आली. एक पक्षाची मंडळी म्हणूं लागली कीं, "बुवा! आपण या पुण्याला चांगलें उदाहरण घालून दिलें. भर कीर्तनांतून मध्येंच उठून जाऊन कीर्तनदेवतेचा अपमान करण्याची या पुण्यांतील लोकांना फार वाईट खोड लागली आहे. टिळक झाले म्हणून काय झालें? त्यांनींच शिस्त मोडली तर लोकांना वळण कसें लागणार? यामुळें आपण केलें हें अगदीं उत्तम केलें." दुसरा पक्ष म्हणूं लागला कीं, "बुवा! रात्रीं निरूपण काय बहारीचें चाललें होतें, आणि लोकांचें लक्ष आपण काय सांगतां इकडे अगदीं वेधून गेलें होतें. त्याचा तुम्हीं मनोभंग केलात!" बुवांनीं उभय पक्षांचें बोलणें शांतपणें ऐकून घेतलें आणि उभयतांनाही एकच उत्तर दिलें कीं, "**अकस्मात होणार होऊन जातें**" तें जर कोणाच्या हातीं नाहीं, जसें पुढें व्हावयाचें असतें तशी बुद्धि होते, "**बुद्धिः कर्मानुसारिणी**" हें जर खरें आहे, "**प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः**" "**कर्मे पराधीनपणें । निपजतसे प्रकृतिगुणें**" हें खरें आहे तर घडलेल्या गोष्टीबद्दल खंती करून मी आपल्या समाधानाचा भंग कां करून घेऊं? आणि झालेल्या कर्माचा अहंकार बळेंच मी आपल्यावर घेऊन त्याच्या सुखदुःखाची मीमांसा

कां करीत बसूं ? आतां ज्याला हें कृत्य वाईट झालें असे वाटेल, तो माझी निंदा करील, ज्याला चांगलें केलें असें वाटेल तो माझी स्तुति करील. मला त्याचें काय होय ? हें सडेतोड उत्तर ऐकून दोन्ही पक्ष जागच्याजागीं थिजले !

" **बहुरत्ना वसुंधरा** "हें तर आहेच, पण " **शैले शैले न माणिक्यम्** "हेंहि तितकेंच खरें आहे. सांगण्याचा हेतु हा कीं, आजकाल रामदासी पंथांत महाराष्ट्रांत नांवाजलेले बहुत पुरुष अधिकारी म्हणून समाजापुढें चमकत आहेत. व ते आपापल्यापरी थोरच आहेत. पण वासुदेवबुवांसारखा अंतर्बाह्य रामरूप झालेला पुरुष विरळाच ! किंबहुना त्यांना आंत आणि बाहेर असें कांहीं राहिलेंच नव्हतें. त्यांतहि वासुदेवबुवांचें विशेष आश्चर्य व कौतुक करावेसें वाटतें, याचें कारण हें कीं, शहरापासून अति दूर, बिनरहदारीच्या अशा अगदीं एका बाजूला असलेल्या धामणीसारख्या खेडेगांवांत सर्व जन्म घालविलेला, फारसें संस्कृताचें अध्ययन नाहीं, केवळ स्वतःच्या बौद्धिक तपावर इतका अधिकार प्राप्त करून घेतलेला, अशा अलौकिक पुरुषाची धन्यता वाटावी हें साहजीकच आहे. बुवा आगगाडींत मुळींच बसत नव्हते. पैसा किंवा श्रेष्ठता मिळवण्याच्या उद्देशानें बुवा जर मुंबईसारख्या शहरांत गेले असते, तर त्यांनीं कितीतरी पैसा, लौकिक व शिष्यशाखा संपादन केली असती. पण त्या उपाधींत ते पडलेच नाहींत. रामदासस्वामींचे ग्रंथ तुलनात्मक दृष्टीनें पाहून समर्थांचें स्तुतिस्तोत्र गाणारे, किंवा उलटपक्षीं समर्थांची निंदा करणारे आजकाल बहुत पुरुष आहेत; पण रामदासस्वामींची खरी योग्यता केवळ वासुदेवबुवांनींच जाणली होती. अध्यात्मज्ञानांत जे पारंगत असतील तेच रामदासस्वामींची खरी योग्यता जाणतील इतरांना कळणें शक्य नाहीं. " **ज्ञानी ओळखावा ज्ञानेश्वरें । योगी ओळखावा योगीश्वरें । महा चतुर तो चतुरें । ओळखावा** " " समर्थांचा अवतार झाला नसता तर महाराष्ट्रांत अध्यात्मज्ञानाचा अंधार झाला असता " असे गेल्या वैशाख महिन्यांत बुवांनीं मजपाशीं उद्गार काढले होते ते अगदीं यथार्थ आहेत. या बाबतींत त्यांचें व माझें बरेंच बोलणें झालें होतें. समर्थांबद्दलच्या वरील उद्गारांवरून श्री ज्ञानेश्वर, एकनाथ इ० मराठी साधु, संत व कवि, यांची योग्यता कांहीं कमी होती असा अर्थ नव्हे. या इतर संतांनीं संस्कृतांतील वेदांतांचें सर्व भांडार मराठींत आणलें यांत संशय नाहीं. पण समर्थांचें वैशिष्टय हें आहे कीं, ज्याप्रमाणें एखाद्या दगडाला ठाकून ठोकून देव बनवावा, त्याप्रमाणें वेदांतशास्त्र हें वास्तविक केवळ मुमुक्षूंकरतांच असलें तरी समर्थांनीं एखाद्या बद्धालाहि आपल्या उपदेशानें सिद्ध बनवावा, हा हेतु पुढें ठेवून दासबोध लिहिला आहे. नुसता दासबोधच नव्हे तर समर्थांचें सर्व वाङ्मय अशा थाटाचें आहे कीं, मुमुक्षूला परमार्थमार्गांत ज्या ज्या शंका येणें स्वाभाविक आहे, त्या सर्व शंका शिष्यरूपानें

पुढें आणून त्यावद्दलचें यथार्थ समाधान समर्थांनीं केलेलें आहे. मुलाची भूक 'मातेशीच लागे', तद्वत् मुमुक्षूंची भूक समर्थांना लागून त्यांनीं ग्रंथ केले. आणि इतरांनीं अधिकारी पुरुषांकरतांच ग्रंथ केले. " **आधीं केलें मग सांगितलें** " अशा बाण्याच्या समर्थांनीं " **उपासनेची आण वाहून** " अध्यात्मज्ञानाचा अनुभव छातीठोकपणानें स्पष्ट सांगितला. आणि "**लटकें बोलेल तो अधम । लटकें मानील तो अधमाधम** " असें निर्भीडपणें बोलून समर्थ म्हणतात, " **माझ्या उपासनेचा वडिवार । ज्ञान सांगावें साचार । मिथ्या वदतां उत्तर । प्रभूसी लागे** ". " **येथ अनुभवासीच कारण । येर सर्व निष्कारण । तृप्ति पावावी आपण । आपल्या स्वानुभवें** ". अशा रीतीनें स्वानुभवाचें अपूर्व बोलणें, आणि तेंही कांहीं गूढ न ठेवतां सोप्या भाषेंत स्पष्टोक्तीनें बोलणें, अशा मार्गानें संस्कृतांतील वेदांताचें सर्व रहस्य स्वतंत्र ग्रंथाच्या रूपानें श्रीरामदासस्वामींनींच मराठीमध्यें आणलें. अनुभवाचे सिद्धांत सांगतांना समर्थांना मोठी पंचाईत पडली. **शास्त्रांची भीड धरावी । तरी उगवेना हे गाथागोवी । गाथागोवी उगवावी । तरी शास्त्रभेद दिसे** ". म्हणून " **शास्त्र रक्षून कौतुक**" अशा रीतीनें समर्थांना बोलावें लागलें. लोकांचा समज व परिपाठ वेगळा, आणि खरा प्रत्यय वेगळा, अशाहि संकटांत समर्थ सांपडले, तेव्हां ते म्हणतात, " **परिपाठेंचि जरी बोलिलें । तरी प्रचीत समाधान बुडालें । प्रचीत समाधान राखिलें । तरी परिपाठ उडे ॥ ऐशीं सांकडीं दोहींकडे । म्हणून बोलिलेंचि बोलणें घडे । दोन्हीं राखूनियां कोडें । उकलून दावूं.** " अशा रीतीनें समर्थांनीं वेदांतांतील सर्व कोडीं मोठ्या मार्मिकतेनें उलगडलीं आहेत. पण भारतीयांची इतिकर्तव्यता अध्यात्मिक मोक्षांत असूनहि आजकाल ती दृष्टिच राष्ट्रांतून नष्ट होऊन पाश्चिमात्यांच्या संगतीनें आधिभौतिक सुधारणा, अत्याचार, मतस्वातंत्र्य इत्यादि खुळचट ध्येयांत गुंगली आहे, ही दुर्दैवाची गोष्ट होय ! यामुळें समर्थांची आध्यात्मिकज्ञानाची थोरवी काय आहे ती जाणून घेऊन अध्यात्मलाभ करून घ्यावा, ही आजकालच्या सुशिक्षितांना मुळीं इच्छाच होत नाहीं. प्रपंच हीच आत्मारामाची सहज पूजा कशी होत आहे, किंबहुना प्रपंच हा केवळ विषयसेवनाकरितां नसून परमार्थाकरतांच कसा आहे, हें यथार्थ सांगून शिवाय प्रपंचाची प्रपंचदृष्टीनें व परमार्थाची परमार्थदृष्टीनें बैठक कशी असावी, " **प्रपंच साधून** ( किंवा शोधून ) **परमार्थाचा लाभ** " कसा करून घ्यावा, याची शिकवण समर्थांनीं फारच उत्कृष्ट सांगितली आहे. दुसरी मौज ही कीं, अगदीं हात लावून प्रत्यक्ष पदार्थ हातीं द्यावा, त्याप्रमाणें माया आणि परमात्मा समर्थांनीं जसा काय हातांत दिला आहे, अशा प्रकारची समर्थांची शब्दरचना आणि प्रतिपादन खरोखर अप्रतिमच होय ! माया म्हणून जिला म्हणतात, जिनें सर्वांना पाशांत गोंवलें

आहे, ती कोणती ? समर्थ म्हणतात, अरे ! " **तुझी कल्पना हेचि माया । ते आर्धी धाडीं विलया** " ! परमात्मा अगदीं गुह्याद्गुह्य आहे म्हणतात, पण समर्थांनीं त्याला 'अगदीं उघडें परब्रह्म' करून दाखविलें आहे ! " **चहूं देहांचा अंत । आणि जन्ममूळाचा प्रांत । अंताप्रांतासी अलिप्त । तो तूं आत्मा** "! अशा रीतीनें समर्थांनीं परब्रह्म उघडें करून दाखविल्याचीं कितीतरी स्थळें दाखवितां येतील. एकंदरींत समर्थांचा अधिकार फार थोर होता, आणि त्यांच्या सांप्रदायांत वासुदेवबुवा कायावाचामनोभावें अंतर्बाह्य वाढले असल्यानें त्यांचाहि अधिकार फार मोठा होता.

वर सांगितल्याप्रमाणें इतर संतांच्या परमार्थप्रतिपादनापेक्षां समर्थांचें प्रतिपादन जरी निराळें दिसलें तरी श्रीज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, इत्यादि संत ज्या निवृत्तिपदावर बसून " **फावल्या त्या करूं चेष्टा । निश्चल द्रष्टा होवोनी** " अशा रीतीनें जगांत वावरून जगाला उपदेश करीत होते, त्याच निश्चल पदावर समर्थ स्थित झाले होते. आणि प्रपंच किंवा राजकारण, व्यवहार इत्यादि बाबींचा प्रसंगानुरूप ओघानें जरी समर्थांनीं आपल्या ग्रंथांत उल्लेख केला असला, तरी " **पदींहून चळूं नये** " आणि तें पद कसें प्राप्त करून घ्यावें, हाच आपल्या सर्व ग्रंथांतून समर्थांनीं प्रमुखत्वानें मुमुक्षूंना उपदेश केला आहे. समर्थ हे व्यवहाराला, राजकारणाला महत्त्व देत नव्हते, तर अध्यात्मज्ञानालाच महत्व देत होते, हें एकंदर त्यांच्या ग्रंथांचें सार काढल्यास दिसून येईल. समर्थ हे संतकोटींतील होते. " **झाड जाणिजे फुलें । मानस जाणिजे बोलें । भोगें जाणिजे केलें । पूर्वजन्मींचें** ". तद्वत् समर्थांच्या ग्रंथांवरून त्यांचा मुख्य ओढा एकंदरींत परमार्थाकडेच होता असें उघड दिसतें. समर्थहि दासबोधाच्या आरंभीं म्हणतात कीं, या ग्रंथांत " **बहुधा अध्यात्मनिरूपण । निरूपिलें** " व त्यासाठीं " **मुख्य भक्तीचा निश्चय, शुद्ध ज्ञानाचा निश्चय, आत्मस्थितीचा निश्चय, शुद्ध स्वरूपाचा निश्चय. विदेहस्थितीचा निश्चय, अलिप्तपणाचा निश्चय, मुख्य देवाचा निश्चय, आपण कोण हा निश्चय, मुख्य उपासना लक्षण, कर्ता कोण हें लक्षण** " इ० सांगून " **मुख्य आत्मप्रचीती । शास्त्रेंसाहित** " या ग्रंथांत सांगितली आहे, असें समर्थ स्पष्ट सांगत आहेत. आणि खरे मुमुक्षु आहेत ते समर्थांकडे व त्यांच्या ग्रंथांकडे ते राजकारणी, व्यवहारदक्ष, होते म्हणून ते श्रेष्ठ, असें न पाहातां केवळ परमार्थदृष्ट्याच मोक्षलाभाकरितां पाहून कृतकार्य होतात. समर्थांचे अनुभवाचे आध्यात्मिक बोल मुमुक्षूंना खरोखर डोल आणणारे असतात, हें वर दाखविलेंच आहे. म्हणून आध्यात्मिक दृष्टीनें जे मुमुक्षु केवळ मोक्षप्राप्तीकरितां समर्थांकडे किंवा त्यांच्या ग्रंथांकडे श्रद्धेनें व निष्ठेनें पाहातात, त्यांना समर्थांचे अगर इतर संतांचे 'गुणावगुण' दिसतच

नाहींत. यदाकदाचित् एखादा ' दुर्गुण ' दिसलाच तर तो केवळ प्रारब्धाचा ठेवा किंवा तो दुर्गुण कां असावा हें जाणण्याला आपण असमर्थ आहोंत, असेंच मुमुक्षु मानतात. व अध्यात्माच्या अंगानें ते सर्व संतांशीं सारखेच अनन्य असतात. नारदाचा कळलावेपणा, मारुतीच्या माकडचेष्टा, श्रीकृष्णाच्या लीला किंवा कपटकारस्थानें यांचा ते विचारच करीत नाहींत. " **साधु दिसती वेगळाले। परी ते स्वरूपीं मिळाले। अवघे मिळून एकचि झाले। देहातीत वस्तु** " म्हणून अमुक साधु वारकरी आणि अमुक धारकरी, असा संतांमध्यें ज्यांना केवळ मोक्ष साधावयाचा आहे ते मुमुक्षु कधींहि भेद करीत नाहींत. आध्यात्मिक दृष्टीनें ज्ञानेश्वर, तुकाराम, समर्थ, एकनाथ यांपैकीं कोणी भोगी अगर त्यागी किंवा संन्यासी अगर गृहस्थाश्रमी, राजकारणी अगर अराजकारणी असला, तरी संतपदीं त्या सर्वांचें ऐक्यच आहे.

पण आध्यात्मिक दृष्टि नष्ट झालेले विद्वान् आजकाल या संतांकडे पाहातात, ते केवळ बहिर्मुख दृष्टीनें गुणावगुण पाहून साधूंची बाजारांत किंमत ठरवीत असतात ! वारकरी व धारकरी असे संतांमध्यें भेद करून समर्थ हे धारकरी असल्यानें श्रेष्ठ व तुकारामादि वारकरी हे कनिष्ट असें हे विद्वान् मानतात ! पण वस्तुतः प्रपंचाची नश्वरता दोघेहि सांगून वारकरी हे वारंवार प्रपंचावर वार करतात तर धारकरी हे प्रपंचावर तरवारीची एकजात धार धरतात, हें उभय सांप्रदायांचे उत्पादक ज्ञानेश्वर व रामदास यांच्या खडतर वैराग्यावरून व त्यांच्या प्रतिपादनावरून उघड होत आहे. पण आजकाल या आधुनिक विद्वान् लोकांत या साधूंचे जे धिंडवडे निघत आहेत ते पाहून हंसावें कीं या विद्वानांची कींव करावी, तेंच समजत नाहीं ! एक म्हणतात, समर्थ राजकारणी होते; तर दुसरे म्हणतात, झूट बात आहे ! ! एक म्हणतात, समर्थ विषयलोलुप होते; तर दुसरे म्हणतात, सपशेल खोटें ! एक म्हणतात, समर्थ हे स्वतंत्र विचाराचे कवि होते; तर दुसरे म्हणतात, त्यांनीं इतर कवींचाच अनुवाद केला, यांत स्वतःचें कवित्व काय झालें ? ते अगदीं 'ऑर्डिनरी' होते. गोष्ट खरी; पण स्वतंत्र विचाराचे कवि तरी नवीन ज्ञान आणतात कोठून ? " ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या " या सिद्धांताचाच अनुवाद करितात नाहीं काय ? पण आक्षेप घेणाऱ्या विद्वानांनीं हेंहि लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं, अनुवाद हा तेजस्वी पुरुषांच्याच वाणीचा असतो. आणि तो अनुवाद मुखांतून उगाच बाहेर येत नाहीं. अंतःकरणाला तो पटून तादात्म्यानें व मननानें अंतरांत तो परिपक्व झाला, म्हणजेच काव्यरूपानें तो परोपकारार्थ बाहेर येतो. आणि म्हणूनच त्या अनुवादांत तपश्चर्येचें तेज असतें. त्यामुळें तो अनुवादक ओजस्वी व तेजस्वी असतो. "**आवडी लागली अंतरीं। तैसाच वदे वैखरी**". तें कांहींही असो.

पण तीनशें वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या समर्थांच्या दिव्य वाणीनें मुमुक्षूंना आध्यात्मिक सुख प्रत्यक्ष भोगतां येत आहे. हा साक्षात्कार असतांना तो सत्संगतीनें अनुभवण्याचा सोडून त्या पुरुषाच्या गुणावगुणाच्या वाटाघाटींचें सव्यापसव्य करण्यांत फायदा काय ? सहजासहजीं घडून आलेल्या गोष्टींनीं मृत्यु आलेल्या एका गृहस्थाच्या हत्त्येचें पातक कोणाच्या माथीं मारावें हा यमदूतांना विचार पडला असतांना वर्तमानपत्रें, मासिकें, व्याख्यानें यांच्या चव्हाटयावर बसून चार संपादक व व्याख्याते त्या सहजासहजीं घडलेल्या गोष्टीची चिकित्सा करीत बसले होते. तें त्या यमदूतांनीं पाहून त्यांनीं त्या हत्त्येचें पातक त्या संपादक व व्याख्याते यांच्या बोडक्यावर लादलें ! तीच गत या शुष्क वाटाघाट करणारांची नव्हे काय ? समर्थांबद्दल शिवाजीला एकदां संशय आल्यावरून त्याचें निराकरण होऊन शिवाजीला प्रायश्चित्त मिळाल्याची गोष्ट प्रसिद्धच आहे. समर्थ प्रकृतीच्या अंगानें उत्पन्न झाले, होऊन गेले, संपले. आतां ते राजकारणी, कवि, विषयलोलुप होते का नव्हते, इत्यादि इतिहाससंशोधन करून व इतिहासांत भर घालून फायदा काय ? आजच्या आधुनिक विद्वानांची पिढी ही श्रुति, स्मृति, पुराणें, यांना शिमगा म्हणून लेखीत आहेत, आणि इतिहाससंशोधनाची तळी उचलीत आहे, तर पुढील पिढी इतिहाससंशोधन हेंहि शिमगा म्हणून म्हणणार नाहीं कशावरून ? एका काळीं जी गोष्ट महत्त्वाची वाटते ती दुसऱ्याकाळीं निरुपयोगी ठरते. आणि या इतिहाससंशोधनानें अनुमान आणि तर्क या शिवाय खरी वस्तुस्थिति काय हातीं लागणार आहे ? एक विद्वान् गृहस्थ अस्तन्या सारून व हातांत लेखणी घेऊन जगाचा इतिहास लिहिण्याला बसले. इतक्यांत त्याच्या समोर एक मारामारी झाली. ती त्यांनीं प्रत्यक्ष पाहिली. त्या मारामारीच्या हकीकतीचीं अनेक रूपांतरें होऊन तीं त्या लेखकाच्या कानावर आलेलीं पाहून तो चकित झाला. माझ्यादेखत घडलेल्या गोष्टीचीं इतकीं रूपांतरें होऊन तीं माझ्या कानावर येत आहेत, तर जगाच्या इतिहासांत तरी सत्य काय सांपडणार आहे ! असें म्हणून त्या विद्वानांनीं जगाचा इतिहास लिहिण्याचा नाद सोडून दिला ! सर वाल्टर रॅलेची ही गोष्ट प्रसिद्ध आहे.

वास्तविक समर्थांकडे किंवा ज्ञानोबातुकारामादि संतांकडे संत होऊन संतपणाच्या अंगानेंच पाहिलें पाहिजे. आपल्याला परमार्थप्राप्ति करून घ्यावयाची असेल तर विद्वत्ता व अहंकार बाजूस ठेवून व मुमुक्षु होऊनच संतांना व त्यांच्या ग्रंथांना शरण गेलें पाहिजे व परमार्थाचा लाभ करून घेतला पाहिजे. आणि तसा लाभ परमार्थमार्गी मुमुक्षु आजही करून घेत आहेत. पण आजकाल आपल्या भरतभूमींत पाश्चिमात्यविद्येनें विभूषित झालेला व आपल्याला सुशि-

क्षित, सुधारलेले म्हणवून घेऊन, आपल्याचभोंवतीं दिवा ओंवाळून घेणाऱ्यांचा जो एक निराळाच वर्ग निघाला आहे, त्याची विचाराची दिशा येथून तेथून कांहीं औरच आहे! एकतर मतस्वातंत्र्याचें पाश्चिमात्य खूळ जें या विद्वानांच्या घरांत शिरून त्यानें स्त्रिया, मुलें या सर्वांना ग्रस्त करून टाकलें आहे, त्या घमेंडीवर या विद्वानांची अशी एक ठाम समजूत होऊन गेली आहे कीं, आपल्याला पाश्चिमात्यविद्याविभूषितत्वाचा डिप्लोमा मिळतो, त्याच्या अंगभूतच आपलें मन इंग्रजी विद्येनें 'कल्टिव्हेट' झालें असल्यानें आपल्याला अधिभूत, अध्यात्म, अधिदैव, इ० वाटेल त्या विषयांत तोंड खुपसून आपण जणु तज्ज्ञच आहोंत, अशा प्रकारचा अभिप्राय देण्यालाहि आपल्याला डिप्लोमा मिळाला आहे! त्या अधिकारानें मी करीन ती पूर्व दिशा आणि बोलेन तो सिद्धांत, अशी समज घेऊन ते वाटेल त्या विषयावर 'दडपून देतों ऐसाजे' म्हणून अभिप्राय देण्याला प्रवृत्त होतात! नरजन्माची इतिकर्तव्यता आध्यात्मिक मोक्षांत आहे. पण त्यावरील त्यांची श्रद्धाच उडून गेलेली असते. त्यामुळें त्याचा त्यांना तिटकारा असतो. मग यांनीं एवढया विद्येचा उपयोग कोठें करावयाचा? तर टीकास्त्र हातीं घेऊन सर्वांवर अनुकूल, प्रतिकूल, तर्कप्रतिष्ठित, टीका करून मासिकें, वर्तमानपत्रें, व्याख्यानें यांची भर करावयाची, याशिवाय दुसरें यांना कामच नाहीं! वास्तविक संतांकडे संत या दृष्टीनें, योद्धयाकडे योद्धयाच्या दृष्टीनें, अशा रीतीनें ज्याच्या त्याच्या अंगानें ज्या त्याकडे पाहावयाचें असतें. पण या विद्वानांना कोणाकडेही आपल्या स्वतःच्या अंगानेंच पाहाण्याची खोड लागलेली असते. आपलें फाटकें तुटकें कच्चें मत हीच त्यांची कसोटी असते. ती हातांत घेऊन ते समर्थांसारख्यांकडे पाहूं लागतात. आपल्याला जातिभेद नको असला, आणि समर्थांनीं "**ब्राह्मण्य रक्षावें आदरें**" असें म्हटलें असलें कीं, समर्थ झाले जात्यभिमानी हिणकस! आपल्याला स्पृश्यास्पृश्यभेद नको असला, आणि "**अंतर एक तो खरें। परी सांगातीं घेऊं नयेती माहारें**" असें समर्थांनीं म्हटलें कीं, समर्थ कांहीं यांच्या कसोटीनें महात्मे ठरावयाचेच नाहींत! बोनापार्टीच्या वेळीं लढाई चालली असतांना युद्धकलेची माहिती नसूनहि आपण जणु तज्ज्ञ समजून "बोनापार्टीनें असें करावयाचें होतें, तसें करावयाचें होतें," अशी वर्तमानपत्रांतून एडिटरांनीं टुर टुर चालवली. ती पाहून बोनापार्टीनें सर्व एडिटरांना रणांगणावर नेलें. आणि सांगितलें कीं, असा असा प्रसंग आहे, यावेळीं काय करूं तें सांगा. त्याप्रमाणें मी करतों. आणि जर का यश आलें नाहीं तर तुमचीं डोकीं उडवीन! तेव्हा एडिटरांची टुर टुर बंद झाली! त्याप्रमाणें आजकाल या विद्वानांचें कान उपटून हातावर देणारा महात्मा कोणी नसल्यानें वाटेल त्या विषयासंबंधानें वाटेल त्या खऱ्या संतावर वाटेल त्या संपादकानें किंवा व्याख्यात्यानें वाटेल तसें खरें खोटें अनुभवशून्य पण विद्वत्तापूर्ण

तोंडसुख घेतलें तरी तें समाजांत खपलें जात आहे. हा कालमहिमा होय! या आधुनिक विद्वानांच्या मतें आजकालचे संत, राजकारणी, पूज्य पुरुप म्हणजे रानडे, गोखले, मेथा; अर्थात् तुलनात्मक दृष्टीनें यांच्या कसोटीशीं समर्थ कशाचे टिकणार? कीं झाले समर्थ निरुपयोगी, ऑर्डिनरी! सारांश हे विद्वान् म्हणतील ती कसोटी आणि त्या त्यांच्या मनःपूत कसोटीला उतरेल तो श्रेष्ठ! खाणें मुळींच नाहीं, आणि मचमचच नुसती चालावयाची! अशा रीतीनें आपल्याच बुद्धिमत्तेच्या जोरावर समर्थांसारख्यांच्या सच्चरित्रावर शिंतोडे उडविल्यानें स्वतःच्या मनाचें समाधान करून घेतां आलें तरी सामान्य समाजांत आणि लहान मुलांच्या मनावर याचा परिणाम, समर्थ हे संतच नव्हते, असा विपरीत होईल, याचा विचार वास्तविक या विद्वानांनीं करावयास पाहिजे. परंतु तो ते करीत नाहींत ही फार दुःखाची गोष्ट आहे! पण हा त्यांचा दोष नसून रजतमगुणी ताठर अशा त्या पाश्चिमात्य विद्येचाच तो गुण आहे. त्याला विद्वानांचा तरी काय उपाय? म्हणून त्यांना दोष देतां येत नाहीं. पण या करण्यानें स्वतःचा किंवा समाजाचा फायदा तर कांहीं होत नाहींच, पण उलट "**माध्यान्हीं थुंकितां सूर्यावरी। तो थुंका पडे आपणावरी**" अशी हास्यास्पद स्थिति स्वतः त्या विद्वानांची होते आणि समाजाचा बुद्धिभेद केल्याचें पातक लागतें. पाश्चिमात्यविद्या ही आसुरी असल्यानें ती जात्याच मोहक असते, यामुळें या विद्वानांची भाषाहि "**यामिमां पुष्पितां वाचं प्रवदंति**" अशा प्रकारची मोहक असते. त्यांची बुद्धि "**बहुशाखा ह्यनंताश्च**" म्हणजे अनेक फाटे फुटणारी अर्थात् चिकित्सक आणि तर्कप्रतिष्ठित असल्यानें ती श्रोत्यांना, वाचकांना मोहित करीत असली, तरी त्यांत अनुभवजन्य ज्ञान नसतें. यामुळें बहुश्रुतपणापेक्षां त्यांच्या त्या ज्ञानाचा समाजाला कांहीं उपयोग नसतो. पण आजकाल अशा प्रकारच्या पोकळ तर्कप्रतिष्ठित ज्ञानाचाच समाजांत बोलबाला चालली आहे! मासिकें, कादंबऱ्या इत्यादिकांतून आजकाल या वाङ्मयालाच ऊत आला आहे! हीच विद्या राष्ट्रांत अति झाल्यानें "**अति शहाण्याचा बैल रिकामा**" याचा चांगलाच अनुभव आपल्याला येत आहे. ही विद्वत्ता म्हणजे '**घरच्या म्हातारीचा काळ**' होऊन बसली आहे! ज्याप्रमाणें ग्रहाचें नांव मंगळ, पण त्याचें फळ अमंगळ, त्याप्रमाणें या पाश्चिमात्य विद्येला म्हणावयाची विद्या, पण आपल्या समाजांत आजकाल एकीसाठीं प्रयत्न चालला असूनहि एकीची बेकी होऊन मतामतांचा गलबला माजून लाथाळीं सुरू झाली आहेत आणि समाजाचा ऱ्हास होत आहे, त्याला कारण ही असुरी विद्याच होय, असें विचारांतीं सहज समजून येईल.

श्रीज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, रामदास, इत्यादि संतांच्या अध्यात्मज्ञानाचा उपयोग करून न घेतां त्या संतांत वारकरी आणि धारकरी असा नसताच भेद उपस्थित करून वाद घालणारे दोन्ही पक्षाचे वीरपुरुष कसेहि असले तरी ते विद्वान् आहेत. ते विभूतिमत् असे परमेश्वराचे अंश असल्यानें आपल्यास पूज्यच आहेत. ते जो वाद घालीत आहेत, तो वाद हाही ईश्वराची विभूतिच आहे. "**वादः प्रवदतामहम्**". म्हणून तो वाद खरा अगर खोटा म्हणण्याचा आपल्याला अधिकार नाहीं. म्हणून दोन्हीबाजूंच्या विद्वानांना मी क्षमस्व म्हणतों. ईश्वराची विभूति अशा त्या वादाचें ज्ञानोबा वर्णन करितातः—

"**अगा बोलतयांचिया ठायीं । वाद तो मी पाहीं । जो सकळ शास्त्र संमतें कहीं । सरेचिना ॥ जो निर्वचूं जातां वाढे । ऐकतयां उत्प्रेक्षा सळू चढे । जयावरी बोलतयांची गोडें । बोलणीं होती**". यावरून अशा प्रकारचे हे वादविवाद उर्फ वितंडवाद हे जगाच्या अंतापर्यंत असेच विद्वानांचे कंठीं बसून चालणार ! "**जनीं सांगतां ऐकतां जन्म गेला । परी वादवेवाद तैसाचि ठेला**" ! ज्याला कांहीं करावयाचें नसतें तेथें ही "**क्रियेवीण वाचाळता**" उत्पन्न होऊन वितंडवाद माजतात. सर्व तत्त्वांमध्यें आत्मतत्त्व हें सत्य आहे. त्या तत्त्वाचा बोध जेणेंकरून होईल व आपण भवबंधापासून मुक्त होऊं अशा प्रकारचा वाद सज्जनसंगतींत राहून करावा. "**वादे वादे जायते तत्त्वबोधः**" अशा वादाला समर्थांनीं सुखसंवाद हें गोड नांव दिलें आहे. म्हणून मुमुक्षूंनीं अध्यात्मज्ञानावांचून इतर वादविवाद उर्फ वितंडवाद सोडून सुखसंवाद करावा. "**जनीं वादवेवाद सोडूनि द्यावा । जनीं सुखसंवाद सुखें करावा**" तोहि सुखसंवाद कोठें करावा ? "**तुटे वाद संवाद तेथें करावा । विवेकें अहंभाव हा पालटावा**". अध्यात्मचर्चेशिवाय दुसरे वाद व्यर्थ आहेत. "**वरा निश्चयो शाश्वताचा करावा**". बाकीचे विद्वानाविद्वानांमधील वाद हे ईश्वराचें जग असेपर्यंत चालावयाचेच. ते मजेनें ऐकत बसावें त्यांत पडण्यांत अर्थ नाहीं. विद्वानांतील वाद विद्वानांनाच लक्षलाभ देऊन शोभा आणतात.

वासुदेवबुवांचें चरित्र सांगत असतांना काकेन संबंधः अशा रीतीनें वारकरी धारकरी वाद आणि समर्थांच्या अंगचे गुणावगुणांबद्दल विद्वानांमध्यें चाललेले वाद यांत विषयांतर होऊन चरित्राचें तारूं भलतीकडेच वहावत गेलें ! पण नामदार गोखल्यांचें चरित्र सांगावयाचें झाल्यास त्यांची स्वराज्याकरितां विलायतेला धांवपळ होऊन तिचा ज्या ज्या संस्थांशीं किंवा व्यक्तींशीं संबंध आला असेल तो सांगून त्या संस्थांची व व्यक्तींचींहि थोडीबहुत मूळ पीठिका सांगितल्याशिवाय त्या चरित्राची पूर्तता होत नाहीं, तद्वत् श्रीवासुदेवबुवांचें चरित्र सांगतांना ते ज्या समर्थांच्या सांप्रदायांत वाढले, व ज्या इतर संतांच्या वाङ्म-

यानें ते कृतकार्य झाले, त्या संतांचे नवीन तऱ्हेच्या समाजांत कसे वाभाडे चालले आहेत ते सांगणेंहि क्रमप्राप्तच असल्यानें येथें थोडें विस्तारानें सांगणें भाग झालें, यांबद्दल वाचक क्षमा करतीलच. वासुदेवबुवा हे अशा प्रकारच्या इतर कोणत्याहि वादांत किंवा वितंडवादांत न पडतां श्रोत्यांशीं व आपल्या मनाशीं अखंड कोणता सुखसंवाद करून आपलें व श्रोत्यांचें हृदय आनंदवीत असत, आणि तशा प्रकारचा सुखसंवाद करीत जाण्याची समर्थांनीं ज्या श्लोकांत आज्ञा दिली आहे, तो गोड श्लोक वासुदेवबुवा नेहमीं म्णनत असत, तो श्लोक येथें देतों.

**क्रमी वेळ जो तत्त्वचिंतानुवादें । न लिंपे कदा दंभवादें विवादें ।**
**करी सूखसंवाद जो ऊगमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा**

जयजय रघुवीर समर्थ !

श्रीवासुदेवबुवांचे चरित्र जितकें या फाटक्या तुटक्या वाणीनें देतां आलें तितकें दिलें आहे. साधूंचें चरित्र अगाध असतें. आतां बुवांच्या अंतकालाची हकीकत देऊन चरित्र पुरें करतों. बुवा गुदस्त शके १८५१ च्या वैशाखमासीं पुण्यास आले होते व आपला अंतकाल समीप आला असल्याचें बोलले होते हा उल्लेख पूर्वीं आलाच आहे. वृद्धावस्थेमुळें आतां यथाकालीं यथाविधि ब्रह्मकर्म होत नाहीं व त्यामुळें मनाला प्रशस्त वाटत नाहीं, म्हणून जसा मौंजीबंधनानें व यज्ञोपवीतधारणेनें नित्य कर्माला आरंभ केला, त्याप्रमाणें आतां संन्यासदीक्षेनें त्याचें यथाविधि विसर्जन करावें, आणि कर्मबंधापासून मुक्त व्हावें, लौकिक आणि वैदिकमार्गानेंहि हें हितकारक होईल, असें मनांत आणून बुवा पुण्याहून धामणीस गेले. व तेथें पुत्राच्या परवानगीनें त्यांनीं जेष्ठ वद्य ७ शके १८५१ रोजीं संन्यासदीक्षा घेतली. "तुका पांडुरंग" झाला तरी त्याचें 'भजन' सुटलें नाहीं, तद्वत् बुवा रामरूप झाले होते, तरी ब्रह्मकर्मावरील प्रेम कमी झालें नव्हतें. हें लक्षांत ठेवलें पाहिजे. संन्यास घेतल्यावर पुन्हा आषाढ शुद्ध पौर्णिमेला स्वामी पुण्यास येऊन श्रावणमासीं ते धामणीस परत आले. अंतकाल अगदीं समीप आल्याचें त्यांना कळून चुकलें होतें. अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून त्यांना कफ फार होऊं लागला. तृतीयेपासून ते नुसत्या दूधपाण्यावर होते. विजयादशमीचे दोन दिवस अगोदर स्वामींनीं सर्वांना सांगितलें कीं, आम्हांला आतां श्रीरामाचे घरीं जाणें आहे. येथील आमचें राहाणें संपलें ! दुखण्यामध्यें खिन्न मुद्रा, कण्हणें वगैरे मुळींच नव्हतें. उलट कोणी बोलल्यास हास्यवदन करावें. त्यांचें नेहमींच हास्यवदन असे. शनिवारीं रात्रीं नऊ वाजल्यापासून नाड्या थंड पडावयास लागल्या. मधून मधून "**वासुदेव वासुदेव म्हणारे बापांनो ! वासुदेव वासुदेव म्हणा**" ! असे उद्गार काढीत असत. पहांटे चार वाजतां भक्तमंडळींनीं हरिनामाच्या भजनाचा घोष चालविला.

पुत्रकन्यादिक आप्तमंडळी जवळ बसून शुश्रूषा करीत होती. लोकांना दर्शन देण्याकरतां अमुक ठिकाणीं बसवावें, बाहेर गांवाहून ब्राह्मण आणावयाचे त्यांना गडी पाठवावे, प्रसादाला खडीसाखर आणून ठेवावी, भजनाची फार गर्दी करूं नका, ही निरवानिरवीची व्यवस्था स्वामींनीं पाटीवर लिहून दाखवून पूर्वींच करून ठेवली. पहांटे पांच वाजल्यापासून घशाला शोष पडूं लागल्यानें स्वामी पाणी मागूं लागले. पुत्र जनार्दनपंत व शिष्य दामोदरपंत वेल्हे यांनीं स्वामींच्या कानाशीं त्रयोदशाक्षरी मंत्राचा व नारायणनामाचा गजर केला. स्वामींनीं खुणेनें पाणी मागितलें. डोळे उघडून सर्वांकडे पाहिलें. आणि हास्यवदन केलें. स्मृति आहेना ? असें विचारलें असतां मान हालवून खुणेनें होय म्हणून सांगितलें. मुखांत पाणी घातलें आणि ओंठ आंवळून घोट घेतला तो कायमचाच ! ! अशा रीतीनें श्रीरामउपासक वासुदेवस्वामी हे उपास्य देवतेच्या वंशदर्शक रविवारीं ज्ञानदर्शक प्रभातकाळीं संसारावर विजय मिळवून विजयादशमीला ( शके १८५१ ) धामणी मुक्कामीं निजधामीं निधन पावले ! !

अशा प्रसंगीं पुत्र, कन्या, आप्त, शिष्य या सर्वांना वियोगदुःखाचा उमाळा येणें स्वाभाविक आहे. पण तो आंवरून मंडळींनीं स्वामींच्या देहाला पद्मासन घालून पाटावर बसविलें. छाटी आंगावर घालून श्रीराम नामाचा रुमाल मस्तकाला बांधला. गळ्यांत पुष्पमाला घातल्या. अंगावर जागजागीं तुळशी वाहिल्या. कपाळीं बुका लाविला. तें रूप पाहून स्वामी जणूं ध्यानस्थ बसले आहेत कीं काय असें वाटे. मुखावर मृत्यूची छटा कांहींच दिसत नव्हती ! उलट चर्या तेजःपुंज दिसूं लागली ! पुण्यास कैलासवासी अण्णासाहेब पटवर्धन यांच्या निधनानंतर त्यांची अशीच मूर्ति बसवून ठेवलेली तेजःपुंज दिसत होती तीं ज्यांनीं पाहिली असेल त्यांना याची चांगली कल्पना होईल. दर्शनार्थ लोकांची गर्दी जमूं लागली. हरिनामाचा गजर सुरू झाला. कापूरउदबत्त्या पुढें उजळूं लागल्या. दूरदूरचे लोक अंत्यदर्शनास येऊं लागले. शेवटीं श्रीराममंदिरासमोरच समाधिस्थान योजून ठेवलें होतें, तेथें नेण्यासाठीं त्यांचा देह लांकडी विमानांत घातला. श्रीरामाचें दर्शन करविलें. आणि चिरकाल विश्रांति घेण्यासाठीं स्वामींचा देह यथाविधि भूमातेच्या पोटीं अर्पण केला. तेणेंकरून पृथ्वी पृथ्वींत, जल जलांत, तेज तेजांत, वासनात्मक लिंगदेहासकट प्राण वायूंत, आकाश आकाशांत मिळाले. " **न निरोधो नचोत्पत्ति र्न बद्धो न च साधकः । न मुमुक्षुर्नवैमुक्त इत्येषा परमार्थता** " !

स्वामींची पुण्यतिथि अश्विन वद्य ६ षष्ठी गुरुवारीं झाली. शिष्यमंडळी तीन हजारपर्यंत जमली होती. सर्वांना मुक्तद्वार होतें. पुण्याहून श्रीयुत दिगंबरराव जोशी, बाबासाहेब देशपांडे पेन्शनर पोलीस ऑफिसर, नारायणस्वामी, सुब्रावमहाराज हरिद्वारकर इत्यादि मंडळी आली होती. पालखीची मिरवणूक,

कीर्तन, दिंड्या, यांचा कार्यक्रम शिष्यमंडळींनीं यथासांग पूर्ण केला.

स्वामींचे सच्छिष्य दामोदर हरि बेल्हे यांनीं स्वामींची आरती प्रेमानें रचलीं आहे, ती शेवटीं दिली आहे. त्याचप्रमाणें दुसरे सच्छिष्य कडूसचे ह. भ. फ. विष्णु बाळकृष्ण खेडकर पेन्शनर शाळामास्तर यांनीं स्वामींवर बरेंच काव्य केलें आहे. त्यांपैकीं अष्टक, सप्तक, गुरुवरप्रार्थना व दोन पदें शेवटीं दिलीं आहेत. खेडकर हे एकनिष्ठ, श्रद्धाळू प्रेमळ भक्त असून त्यांनीं ' नित्यक्रमस्मरणी, ' एकनाथचरित्र, मोरयागोसावी यांचें चरित्र हीं काव्यें छापून प्रसिद्ध केलीं आहेत, व भानुदासचरित्र वगैरे अप्रकाशित काव्येंहि त्यांनीं बरींच रचलीं आहेत. नित्यक्रमस्मरणीच्या ६।७ आवृत्त्या निघाल्या आहेत. असो.

श्रीवासुदेवस्वामींच्या चरित्रांतील जितक्या गोष्टी मिळणें शक्य होत्या तितक्या मिळविल्या. त्या व मला जो अनुभव होता तो या चरित्रांत यथामति मी ग्रथित केला आहे. आतां चरित्र पुरें झालें. हें चरित्र त्यांच्या हयातींत लिहावें, अशी माझी फार इच्छा होती. व त्याप्रमाणें माहिती देण्याकरितां त्यांच्या चिरंजीवांना पत्रद्वारें व समक्ष अनेक वेळां मी विनंति केली होती. परंतु मला वाटतें बुवांचा हेतु तसा नसल्यामुळें चिरंजीवांनीं मनावर घेतलें नाहीं. त्यांच्या पश्चात् त्यांचे चिरंजीव व सच्छिष्य दामोदर व भास्कर हरि बेल्हे या त्रिवर्गांनीं खात्रीशीर माहिती दिली म्हणूनच मला हें चरित्र यथामति लिहितां आलें. याबद्दल या त्रिवर्गांचा मी अत्यंत आभारी आहें. त्यांनीं माहिती दिली नसती, तर कांहीं हें चारित्र पुरें करितां आलें नसतें.

श्रीवासुदेवबुवांचा व माझा नात्यागोत्याचा किंवा गुरुशिष्यत्वाचा कांहीं एक संबंध नव्हता. व त्यामुळें मला त्यांचें चरित्र निस्पृहपणानें लिहितां आलें. चंदनाच्या सहवासानें कडू निंबालाहि वास येतो म्हणतात. बुवांच्या संगतीनें पुष्कळांची ठाम समजूत मात्र अशी झालेली कीं, मी रामदासी सांप्रदायाचा असून बुवांचें व माझें गुरुशिष्याचें नातें आहे! पुष्कळांनीं मला विचारलें. पण तसा कांहीं संबंध नाहीं व मी रामदासी नाहीं असें मुद्दाम त्यांना सांगावें लागलें. आतां एखाद्या गरीबानें श्रीमंतांशीं नात्याचा संबंध लावण्याचा प्रयत्न करून श्रीमंताशीं आपलें नातें जवळचें आहे असें भासविण्याकरतां " मी श्रीमंतांच्या साडभावाचा मावस पुतण्या आहें " म्हणून थोडक्यांत पण लांबचें नातें सांगून लोकांना चकवावें, तद्वत् बुवांचा व माझा नात्यागोत्याचा किंवा ऋणानुबंधाचा बादरायण संबंधच दाखवावयाचा, तर बुवांचा माझा परिचय कसा झाला हें चरित्रांत सांगितलेंच आहे. त्याशिवाय संबंध म्हटला तर त्यांच्या चतुर्थस्थानीं शनि, माझ्या चतुर्थस्थानीं शनि, उभयतांच्या कुंडलींत गुरूच्या घरांत चंद्रमंगळयोग आहे. याहीपेक्षां त्यांचा माझा एकत्वाचा योग सगोत्राचा आहे. बुवांचें, माझें, दिगंबरराव जोशी यांचें व बापट

मास्तर यांचें गोत्र एक आहे आणि तें वाशिष्ठ आहे. हेंच चौघांच्या संयोगाचें वैशिष्ट्य होय! श्रीवासुदेवबुवांशीं आपला संबंध अशा प्रकारें दाखवावयाचा, म्हणजे कोठें इंद्राचा ऐरावत व कोठें शामभटाची तट्टाणी ? अशा सारखाच आहे. किंबहुना चार घोडेस्वार रस्त्यानें जात असतांना एका गर्दभस्वारानें चौघांच्या पुढें होऊन व आपली गणना घोडेस्वारांत करून घेऊन "पांची स्वार दिल्लीस आये" म्हणून सांगावें, अशा सारखेंच माझें हें बादरायण संबंधाचें नातें सांगणें हास्यापद होय! तथापि बुवांचा व माझा आज चवतीस वर्षांचा म्हणजे जवळ जवळ तीन तपांचा परिचय होता, त्या सत्संगतीला मी अंतरलों या वियोगानें मला दुःख होणें स्वाभाविक आहे.

ज्यांनीं क्षीरसागराच्या उत्तम कुलांत जन्म घेतला, अध्यात्ममार्गानें व आत्मनिवेदनी भक्तीनें बद्ध, मुमुक्षु, साधक, व सिद्ध या चारहि अवस्थांचें उल्लंघन केलें, ईश्वरभजनांत व निजानंदांत आयुष्य घालविलें, विद्या, विनय, श्रीराम-चिंतन व वर्णाश्रमविहित कर्म, यावांचून कोणतेंहि व्यसन ज्याला शिवलें नाहीं, मृत्यूशीं व रोगांशीं झगडतांना ज्यांनीं मुद्रा खिन्न केली नाहीं, किंवा दुःखाचा उसासा टाकला नाहीं, ज्यांनीं आपल्या सदुपदेशानें अनेकांना परमार्थमार्गाला लावलें, अशा परमपूज्य, प्रेमळ श्रीवासुदेवस्वामी धामणीकरांचें हें यथामति लिहिलेलें सच्चरित्र मुमुक्षूंना बोधप्रद व मार्गदर्शक होवो, अशी ईशचरणीं प्रार्थना करून व ज्यांनीं या चरित्र लिहिण्याला साह्य केलें त्यांचे पुन्हा एकवार आभार मानून, तसेंच '**मुमुक्षुकारांनीं**' स्थळ दिल्याबद्दल त्यांचे आभार मानून सत्पदीं विराम पावतों! तथास्तु!

ॐतत्सत्!

( सच्छिष्य दामोदर हरी वेल्हेकृत. )

## आरती.

त्रिविधतापें जन जे संतप्त झाले ।
आत्मज्ञान प्रसादें त्वां तृप्त केले ।
बाळे भोळे भाविक शरणांगत आले ।
हरिकीर्तनरस पाजुनी स्वरूपीं मिळविले ॥ १ ॥
जयदेव जयदेव जय वासुदेवा ।
करुणापूर्ण सुदृष्टी भक्तांवर ठेवा ॥ धृ० ॥
सद्गुरुगुण महिमा मनीं अखंड आठवतो ।
वर्णन करितां कंठ सद्गदित होतो ।
अनंतभुवना व्यापुनि स्वस्वरूपीं रमतों ।
प्रेमळ गुरुपदकमला दामोदर स्मरतो ॥ जय० ॥

---

( सच्छिष्य विष्णु बाळकृष्ण खेडकरकृत )

## अष्टक १ लें.

जया तात नारायणू जन्मदाता । सती लक्षुमी जन्मदाती सुमाता ।
करी वास जो धामणी नांव गांवा । नमस्कार माझा तुम्हां वासुदेवा ॥१॥
असे रामपायीं सुभक्ती जयाची । वदे वैखरी पूर्ण वेदांत ज्याची ।
करी कीर्तनीं बोध जो अज्ञ जीवां । नमस्कार माझा तुम्हां वासुदेवा ॥२॥
असे सर्व भूतीं जयाचें सुलक्ष । प्रपंचीं परी जो स्वधर्मीं सुदक्ष ।
सदा वृत्ति ज्याची असे नम्र भावा । नमस्कार माझा तुम्हां वासुदेवा ॥३॥
जया अंतरीं पूर्ण शांती विराजे । समत्वें गणी जो मनीं रंक राजे ।
कुशब्दें कधीं दुःख जो नेदि जीवां । नमस्कार माझा तुम्हां वासुदेवा ॥४॥
स्वधर्मीं असे नित्य आसक्ति ज्याची । हरीकीर्तनीं आवडी ज्या मनाची ।
सदा कष्टवी अन्य कार्यार्थ जीवा । नमस्कार माझा तुम्हां वासुदेवा ॥५॥
जरी कर्ममार्गीं दिसे तो जनाला । तरी ज्ञानमार्गीं असे रंगलेला ।

सदा मोक्षदाता असे अज्ञ जीवां । नमस्कार माझा तुम्हां वासुदेवा ॥६॥
हरीपादपद्मीं मनोभृंग ज्याचा । रमे सर्वदा गुंग होवोनि वाचा ।
वदे रामनामासि ठेवूनि भावा । नमस्कार माझा तुम्हां वासुदेवा ॥७॥
जरी थोर सर्वज्ञ दावी न गर्वा । गणी जो न मानापमानाहि पर्वा ।
धरीं अंतरीं वृत्तिनें सुस्वभावा । नमस्कार माझा तुम्हां वासुदेवा ॥८॥
मीं गुंफिला अष्टक हार साधा । व्हावी न मातें भवसिंधुबाधा ।
तो घालितों सद्गुरुराजकंठीं । हा विष्णु पोटीं धरि आस मोठी ॥९॥

## प्रार्थना सप्तक.

जयाला दिला जन्म नारायणानें । सती लक्षुमी ऊदरीं सद्गुरूनें ।
भजे धामणीं राहुनी राघवासी । नमस्कार साष्टांग त्या सद्गुरूसी ॥ १ ॥
प्रपंचांत जो राहिला फार दक्ष । हरींपादपद्मीं जयाचें सुलक्ष ।
बहू आवडे चित्तिं वेदांत ज्यासी । नमस्कार साष्टांग त्या सद्गुरूसी ॥ २ ॥
नसे कष्टवीलें कधींही कुणाला । नसे दूखवीलें जनांच्या मनाला ।
बसे गोड बोलूनि सर्वां जिवासी । नमस्कार साष्टांग त्या सद्गुरूसी ॥ ३ ॥
यथाशक्ति केल्या सुयात्रा जयानें । हरीनाम घेई सदा जो मुखानें ।
असा राहिला जो सदा पुण्यराशी । नमस्कार साष्टांग त्या सद्गुरूसी ॥ ४ ॥
करूनि प्रपंचास झाला उदास । मनीं लागला नित्य संन्यास ध्यास ।
प्रमोदेंचि घे सद्दिनीं आश्रमासी । नमस्कार साष्टांग त्या सद्गुरूसी ॥ ५ ॥
असे शुक्र हें नाम ज्या वत्सराला । शके आठराशेंहि एकावनाला ।
दिवा शुक्र दशमी असे आश्विनासी । प्रभातीं समाधिस्थ हो पुण्यराशी ॥ ६ ॥
पवित्र स्थलीं धामणी राम पद्मीं । वसे घेउनीयां समाधी स्वसद्मीं ।
असे जाहले स्वामि वैकुंठवासी । नमस्कार साष्टांग त्या सद्गुरूसी ॥ ७ ॥

## गुरुवर प्रार्थना.

सुक्षेत्र पंढरपुरीं नवराम सिद्ध । त्यांतील साधु जयराम(महीपती)असे प्रसिद्ध ।
तत्पुत्र जो अमृत येउनि धामणीला । राहे सुखें भजुनियां रघुराजयाला ॥१॥
पोटीं नसे सुत म्हणूनि विराग झाला । पितृव्य पुत्र सदनीं रघु आणवीला ।

दीक्षा तया स्वकरिं देउनि रामदासी। लावीयलें मन सदा प्रभुच्या पदासी॥२॥
भावें करूनि मग वत्सर पांच सेवा। श्रीरामपादचरणीं मग घे विसावा।
नारायणाख्य सुत सद्गुणि रामभक्त। होता रघूसि अति जो सदनीं विरक्त॥३॥
नारायणा उदरिं त्या जन उद्धराया। जो जन्मला रत असे रघुराजपायां।
त्या वासुदेवपदिं मी अति लीनभावें। हा विष्णुदास नमितो मज उद्धरावें॥४॥

पद.

पंढरपुरच्या नवरामामधिं असे जयाची ख्याती।
अमृतराय हे तत्सुत येउनि धामणीस वसती॥ १ ॥
तद्वंशज हे वासुदेवगुरु अवतरले भूवरती।
तत्पददर्शनलाभा घ्याया भावें जन येती॥ २ ॥
पावन होउनि इष्टकामना पूर्ण करुनि जाती।
कितिक शिष्य हे निशिदिनि चरणीं वास करुनि रमती॥३॥
जैशि जयाची भक्ती तैसा प्रत्यय त्याला ये चित्तीं।
त्या श्रीसद्गुरु वासुदेवपदिं विष्णुदास हा लीन अती॥ ४ ॥

पद.

वासुदेव महाराज सद्गुरु। वासुदेव महाराज॥ ध्रु० ॥
रामदास हो जगिं अवतरले। दर्शन घडलें आज॥ १ ॥
सद्गुण गाया सन्मति देउनि। पुरवि मनोरथकाज॥ २ ॥
त्वत्पदसेवनिं मत्तनु झिजवीं। तव नामामृत पाज॥ ३ ॥
नामस्मरणीं जिव्हा वळवीं। करीं कृपा महाराज॥ ४ ॥
विष्णुदास हा इच्छित निशिदिनिं। राखिं तयाची लाज॥ ५ ॥

जय जय रघुवीर समर्थ।

# गोपाळ गणेश आगरकर.

**आगरकरांचें आत्मचरित्रः**—संमतिविलाच्या संबंधानें केसरी सुधारकांत व पुण्याच्या नव्याजुन्या पक्षांत जें घोर रणकंदन झालें त्यांत उभयपक्षांनीं एकमेकांवर कठोर प्रहार करण्यास कांहीं कमी केलें नाहीं. केसरीनें एकदां लिहिलें " ज्यांना वादांत स्वपक्षाची उणीव झांकण्यासाठीं परपक्षावर आणि विशेषतः त्यांतील एकदोन व्यक्तींवर, अपशब्दरूपी गोळीबार करणें हीनपणाचें वाटत नाहीं त्यांची कानउघाडणी करण्याच्या नादास लागणेंही व्यर्थ होय. सार्वजनिक विषयावर वादविवाद करण्याचे मिषानें खाजगी द्वेषाचें उट्टे काढण्याची अमूल्य संधि क्वचित्च मिळते. " यांतील 'खाजगी द्वेषाबद्दलचा' टोमणा आगरकरांच्या सोध्या व कोमळ अंतःकरणास फारच लागला व तें विव्हळ झालें. आगरकर वादविवादांत न हटणारे खंदे वीर खरे, पण आपल्या जुन्या मित्रानें आपणांवर ' खाजगी द्वेषाचा ' आरोप करावा याचें त्यांना फार दुःख झालें. आगरकर भावनाप्रधान व टिळक व्यवहारपटु. वादविवादांत व शिवीगाळींतही आगरकरांचें ऋजुत्व ढळत नसे. त्यांचें धर्मयुद्ध होतें व टिळकांची युद्धपद्धती गनीमी काव्याची! स्तुतिनिंदेचे बाण अंगावरून झाडून टाकणारी कर्मयोग्याची भूमिका टिळकांची. आगरकर कोमल असत. त्यांनीं वायाळ मनःस्थितींत ' महाराष्ट्रीयांस अनावृत पत्र ' म्हणून एक हृदयद्रावक लेख लिहिला. त्यांत ते म्हणतात. " टिळक आणि आगरकर यांचा खाजगी द्वेष ! आणि तो कशासाठीं ? ' खाजगी द्वेष ' करण्याचें कारण आजपर्यंत झालेलें नाहीं. इतकेंच नाहीं तर त्यांपैकीं एकाच्या मतानें तरी तें केव्हांच होण्याचा संभव नाहीं. त्या दोघाचा बेबनाव व फुटाफुट ज्या समाईक संस्थाचे ते दोन सेवक होते त्या संस्था चालविण्याच्या पद्धतीविषयीं व त्यांच्या उत्कर्षाच्या साधनाविषयीं कोणत्याही रीतीनें एकवाक्यता न होणारा त्यांचा मतभेद कारण झाला व याच मतभेदामुळें आपापल्या मतांचा आणि पक्षाचा विजय होण्यासाठीं ते अन्योन्यांवर तुटून पडत आहेत, दुसरें कांहीं नाहीं. अशा रीतीनें आपापल्या देशविषयक विचारांचें प्राबल्य स्थापण्यासाठीं अंतःकरणपूर्वक झुंजणाऱ्या लढवय्यांचें संग्रामचातुर्य पहात राहून व कौतुक करावयाचें तें विसरून जाऊन, कर्णकटु टणत्कारावरूनच मत्सरद्वेषादि कुतर्क काढणें अत्यंत अनुदार होय ! ...विचारकलह दुष्ट विकोपास जाऊं न देण्याविषयीं खबरदारी ठेवली म्हणजे झालें...दोघांपैकीं कोणाही एकाच्या घरीं

अनिष्ट प्रकार घडेल तर मतभेदामुळें उत्पन्न झालेल्या वैराचा एका क्षणांत विसर पडून दुसऱ्यास विशेष वाईट वाटून डोळ्यांस पाणी येईल. " यापुढें टिळकांचा मार्गच लोकप्रियतेचा व आपला अप्रियतेचा आहे हें सांगतांना आगरकर म्हणतातः " टिळकांचे बहुतेक विचार सामान्य लोकांस मान्य होण्यासारखे असल्यामुळें किंवा त्यांस मान्य असलेल्या विचारांबाहेर जाण्यास टिळक तयार नसल्यामुळें त्यांचें वर्तन ' स्नेहं दयांच सौख्यंच ' या श्लोकार्धप्रमाणें होत आहे व याक्षणीं ते अत्यंत लोकप्रिय झाले असून प्रत्येकाच्या तोंडून त्याचें नांव निघत आहे. पण लोकांना आज ज्या गोष्टी प्रिय आहेत त्या या हतभाग्य लेखकास पसंत नसल्यामुळें लोकछंदानुवर्तन त्याला अशक्य झालें आहे, इतकेंच नाहीं तर लोकांस अप्रिय परंतु पथ्यकारक असे विचार त्यांच्या मर्जीविरुद्ध पुनः पुनः त्यांचेपुढें आणणें हेंच आपलें कर्तव्य व जीविताचें सार्थक अशी त्याची कल्पना असल्यामुळें...श्रद्धालु पंडितंमन्य, व देशाभिमानी म्हणवून घेणाऱ्या जनसमूहाच्या उपहासाचें आणि रोषाचें स्थान त्यानें आपणास करून घेतलें आहे तथापि—" आणि यापुढें आगरकरांच्या डोळ्यांपुढें स्वतःचें चरित्र आरशासारखें दिसून अर्धे आत्मसमाधानपर, अर्धे क्षमापनपर असे जे उद्गार निघाले आहेत ते प्रतिपक्षाचें तर काय पण शत्रूचेंही अंतःकरण भेदून टाकल्याशिवाय राहणार नाहींत. त्यांत ' अपि ग्रावा रोदित्यपि दलति वज्रस्य हृदयम् ' अशा प्रकारचा करुणरस मूर्तिमंत भरला आहे. त्यांत आत्मप्रौढी आहे असें एखाद्यास कदाचित् वाटेल, आणि स्वतःचें चरित्र स्वतः गाण्याचा प्रसंग येणें हें मानी पण थोर मनाच्या मनुष्यास कितीही कठिण वाटत असलें ( आणि तें जरूर वाटतें ) तरी ' शोकक्षोभेच हृदयं प्रलापैरेव धार्यते ' या न्यायानें हृदयाचा पाट फोडून स्वगत भाषणासारखेंच तें बाहेर पडल्याशिवाय राहत नाहीं. लोकांच्या कल्याणासाठीं आपण आपल्या शक्तीप्रमाणें व समजुतीप्रमाणें अहर्निश झटत असतांना उलट लोकक्षोभाचें व हेळणेचें कठोर बक्षीस मिळण्याचा प्रसंग ज्या महानुभावावर येईल त्यासच असल्या हृदयकपाट भेदून बाहेर पडणाऱ्या उद्गारांचें रहस्य कळणार आहे. ' महंती सुखाची नाहीं । येथें दुःखें उदंडही । लोक हे विकारी नाना फार अन्याय वर्तती ॥ वळितां दुःख मानिती अन्याय फार वर्तती । सांगतां हित वाटेना । ऐकतां त्रास मानिती ॥ झंझणिती चंचणिती फंफणिती हटें हटें । सज्जनें काय करावें लोक मोठा अनावरु ॥ ' असें महंती म्हणजे सुळावरील पोळी आहे असें सांगतांना समर्थांनीं म्हटलें आहे. त्याचें या प्रसंगीं स्मरण होतें. असो. आगरकर म्हणतात कीं, जनसमूहाच्या उपहासाचें व रोषाचें स्थान आम्हीं आपणांस करून घेतलें आहे " तथापि–प्रस्तुत लेखकाला असा भरंवसा आहे कीं, म्हणण्यासारखी द्रव्यानुकूलता नसतां श्रीशिवाजीराव महाराज होळकरांनीं देऊं केलेली

दरमहा पांचशें रुपयांची नोकरी ज्यानें ' मला नको ' म्हणून सांगितलें; विशेष बुद्धिसामर्थ्य किंवा शरीरसामर्थ्य नसतां आज दहाअकरा वर्षें जो उत्साहपूर्वक शिक्षकाचा आणि लेखकाचा धंदा करीत आहे; कवडीची किफायत नसतां ज्यानें सातआठ वर्षें सर्वत्र प्रसिद्ध केसरीपत्राचें बऱ्यावाईट रीतीनें रकाने भरून काढले इतकेंच नाहीं तर एका दुर्दैवी संस्थानिकास सुदशा यावी एवढ्याच बुद्धीनें लिहिलेले लेख न्यायाधीशास अप्रशस्त वाटल्यामुळें त्यानें दिलेली शिक्षा त्यानें आनंदानें साहिली; हातीं असलेल्या पत्राचे मालक शुद्ध वाटेल तें लिहूं देत नाहींत असें दिसून आल्याबरोबर त्यांच्या धमकावण्याकडे बिलकूल लक्ष न देतां समानशीलाच्या व विचारांच्या मित्रांचें प्रोत्साहन व सहाय्य मिळतांच सर्वतोमुखीं निंदा होत असलेल्या सुधारणेचा व सुधारकांचा पक्ष लोकांस वाटत असल्याप्रमाणें दुर्बल नाहीं इतकेंच काय पण त्याचेंच सर्वत्र साम्राज्य होणार असें युक्तिवादानें सिद्ध करून देण्यासाठीं कोणत्याही गोष्टीची अनुकूलता नसतां नवीन पत्राच्या नसत्या उठाठेवींत जो जाणूनबुजून पडला; रूढ धर्माचारांतील आणि लोकाचारांतील व्यंगांचें निर्भयपणें आविष्करण करण्याचें भयंकर पाप हातून घडत असल्यामुळें, देशाभिमानी व धर्माभिमानी म्हणविणाऱ्या पत्रांकडून होत असलेला प्रचंड भडिमार ज्याला व ज्याच्या निरपराधी स्त्रीला एकसारखा सोसावा लागत आहे; स्वमतानुसार वर्तन करण्याबद्दल आपल्या फार दिवसांच्या मित्रांचाच काय पण रात्रंदिवस काळजी वाहून आणि कडेवर व खांद्यावर खेळवून ज्यांनीं लहानाचें थोर केलें अशा अत्यंत ममताळू व पूज्य आतांचाही दीर्घ रोष ज्यानें आपणांवर करून घेतला आहे—अशा मनुष्याच्या लेखांत कितीही प्रमाद होत असले व केव्हांही कटुता असली तरी ते समंजस मनुष्यांच्या स्वल्प आदरास, निदान थोड्याशा अनुकंपेस तरी पात्र झाले पाहिजेत. ' हा वेडापीर इतके हाल, संकटें व लोकापवाद सोसून ज्याअर्थीं इतकी धडपड करीत आहे त्याअर्थीं ती लोकांस अंतीं हितावह होईल अशी निदान याची तरी खात्री झाली असावी ' अशा विचारानें त्यांनीं क्षमा केली पाहिजे. नाहीं केली तरी त्यास विशेषसें वाईट वाटणार नाहीं; कारण सारें जग त्यावर उलटलें तरी ' ये नाम केचिदिह ' या भवभूतीच्या वचनाचें स्मरण करून त्याला आपलें समाधान करून घेतां येतें. ”

**औद्योगिक व व्यापारविषयक लेखः**—सामाजिक सुधारणेवर आगरकराचा मुख्य भर असल्यामुळें त्यांच्या सामाजिक विषयांवरील निबंधांकडे वळण्यापूर्वीं औद्योगिक व राजकीय निबंधांचा थोडक्यांत विचार करूं. ' समाजोत्कर्षाचा एक मुख्य घटक ' म्ह० व्यापारवृद्धि या लेखांत आम्हीं उत्पादक धंद्यांकडे लक्ष पुरविलें पाहिजे. आम्हां निरुद्योगी हिंदू लोकांची उद्योगी इंग्रज लोकांशीं

गांठ पडली आहे तर त्यांच्यासारखा आम्हीं उद्योग केला पाहिजे असें सांगितलें आहे. " आमचें भावी स्वातंत्र्य अथवा आमचें निरंतर दास्य आमच्या उद्योगावर अवलंबून आहे. अमेरिकन लोकांस उत्पादक उद्योग करण्याचें जणूंकाय वेड लागलें आहे व त्यामुळें संयुक्त संस्थानें इंद्रलोकतुल्य होऊन गेलीं आहेत. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी इ० पाश्चात्य राष्ट्रांच्या कित्त्याप्रमाणें वागून आम्हीं राष्ट्राची संपत्ति उत्पादकधंदे वाढवून वाढविली पाहिजे." राष्ट्रीय सभेच्या लंडन येथील 'इंडिया' नामक मासिकाच्या जानेवारी १८९१ च्या अंकांत 'हिंदुस्थानांतील ब्रिटिश अमलाचें कृष्णांग (काळी बाजू)' या नांवाचा एक सुंदर लेख मि. डिगबी यांनीं लिहिला होता. त्या लेखाच्या आधारानें रा. आगरकर यांनीं 'आमचें घोर दारिद्र्य' 'हिंदुस्थानास क्षय लागला' 'वाचाल तर चकित व्हाल' हे तीन लेख लिहिले व त्यांत हिंदुस्थानच्या वाढत्या दारिद्र्याची आंकडे देऊन चांगली चिकित्सा केली आहे. आरंभीं मुंबई शहरचें सुंदर व भपकेदार वर्णन केलें आहे. " मुंबईतील संपत्तीच्या अर्ध्याहून अधिकांचे मालक इंग्रज लोक आहेत, मुंबईचें ऐश्वर्य पाहून देशाच्या श्रीमंतीची कोणी कल्पना करूं नये, मुंबईच्याबाहेर सारा आळस, दारिद्र्य व हरएक प्रकारचें गचाळपण भरलें आहे. उद्यां जर मुंबईवर एखादें मोठें अरिष्ट गुदरलें तर कोणाच्याही टाळूवर जोराची बुक्की मारल्यानें त्याच्या इतर अवयवांची जी गति होईल तीच इतर शहरांची होणार आहे! एका दिवसांत त्या सर्वांस अर्धांगवायूचा झटका झाल्यासारखें होऊन तीं सारीं लुलीं पडतील....हिंदुस्थानाचें वित्त कृष्णपक्षांतील चंद्राप्रमाणें क्षयास लागलें असून थोडया वर्षांत हिंदुस्थानदेश कंगालतेच्या निबिड अंधकारांत गडप होऊन जाण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं आहेत. ...इंग्रज लोकांनीं आपल्या व्यापाऱ्यांच्या फायद्यासाठीं जे कायदे केले आहेत त्यामुळें आमचें अनिर्वचनीय नुकसान होत होत शंभर वर्षांच्या अंमलांत आमचे प्राण आमच्या डोळयांत येऊन ठेपले आहेत! द्रव्यदृष्टया आम्ही अधिकाधिक खचत जाऊन पोटभर अन्नास मोताद झालों आहोंत." पुढें आंकडयांच्या आधारें असें दाखविलें आहे कीं, 'युरोपांतील गरीबांतला गरीब देश जो रशिया तोहि हिंदुस्थानापेक्षां पांचपट श्रीमंत आहे, कां कीं हिंदुस्थानांत प्रत्येक इसमामागें वार्षिक उत्पन्न सारें २० रुपये आहे! ग्रेट ब्रिटनांत प्रत्येक मनुष्याचें वार्षिक उत्पन्न ४२०, ऑस्ट्रेलियांत ४३०, व हिंदुस्थानांत अवघें २०! एका इंग्लिश लेखाधारें हे तीन लेख लिहिले आहेत तरी ते फार नामी वठले आहेत. त्याचप्रमाणें 'ग्लिशांच्या राज्यांत पोटभर अन्न मिळत नाहीं' व 'अन्नान्नदशेचे दुष्परिणाम' हे दोन लेखही वाचनीय आहेत. १८५० च्या सुमारास नगरच्या नागेश कवीनें 'समय बाका। कुणीकडे लपला पैका' हें गाणें केलें होतें. त्यानंतरचें १८९० च्या दारिद्र्याचें वर्णन वरील पांच लेखांत आलें असून आज

३७ वर्षांनंतर त्या दारिद्र्याची कमाल झाली आहे. व पुढील ३७ वर्षांनीं ही निकृष्ट दशा कोणत्या थरावर जाईल याची कल्पनाही अंगाला घाम आणीत आहे!! हिंदुस्थानांत फार प्राचीनकाळीं कलाकौशल्याची प्रगति किती झाली होती व वेदकाळीं व मनूच्याकाळीं कोणकोणते धंदे कोणत्या स्थितींत होते हें दाखवून 'भारतीय कलांचें पुराणत्व' ही लेखमाला त्यांनीं सर जार्ज बर्डवुड यांच्या लेखाधारें गुंफिली आहे. तीहि वाचकांच्या अंगीं बहुश्रुतपणा आणणारी आहे. त्या लेखमालेंत आगरकर म्हणतात. "व्यापार, विद्या, कला, युद्धकौशल्य, धाडस, शरीरसामर्थ्य, मानसिकशक्ति वगैरे कोणत्याहि गोष्टींत आम्ही इंग्लिश लोकांच्या मागें शेंकडों योजनें आहों!...हिंदुस्थानच्या बाह्यसौंदर्याकडे लक्ष दिलें तर येथें कशाचीही वाण नाहीं. पूर्वपश्चिम समुद्रांचें वेष्टण, सह्य, विंध्य व हिमाचल अशा पर्वतांच्या रांगा, कृष्णा, नर्मदा, सिंधू, भागीरथी, व ब्रह्मपुत्रा अशा नद्यांचे प्रवाह, वसंतग्रीष्मादि ऋतूंची अस्खलित परंपरा; सर्व प्रकारच्या धातूंचें, पाषाणांचें व वनस्पतींचें अस्तित्व, प्रचंड अरण्यें; विस्तृत व सपाट मैदानें; शीत, उष्ण व समशीतोष्ण हवांचे प्रदेश—इत्यादि कारणांनीं कलांच्या उत्पत्तीस व अभिवृद्धीस अत्यंत अनुकूल अशा या भरतखंडांत त्यांचा आरंभ केव्हां झाला व हिंदुस्थानचा इतर देशांशीं व्यापार किती वर्षें सुरू आहे याचा निर्णय करणें बऱ्याच अंशीं अशक्य आहे." ही लेखमालाही फार उत्कृष्ट आहे. ती वाचून पाहतां दोन हजार वर्षांपूर्वीं हिंदुस्थानांत कलाकौशल्याचे अनेक पदार्थ तयार होत असून हिंदुस्थानचा दूरदूरच्या देशांशीं व्यापारही मोठ्या प्रमाणावर चालू होता. आजकाल पाश्चात्त्यांच्या यंत्रकलेनें आमचें हस्तकौशल्य सारें मारून टाकलें आहे. तरी हस्तकलेस यंत्रकलेची जोड देऊन आमच्या देशांतच सुबक व स्वस्त माल काढूं लागलों तरच आमच्या व्यापाराची धडगत आहे असा या लेखमालेचा मथितार्थ आहे. 'दारूविरुद्ध अफू' 'आमचा अफूचा व्यापार' 'अफूचें कमिशन' 'तीन अर्थशास्त्रें' 'शेतपेढ्या' 'आमचा व्यापार वाढणार कसा' 'सरकार आणि व्यापारवृद्धी' इ० लेख औद्योगिक या सदराखालीं येण्यासारखे असून व्यापारी दृष्टीनें त्यावेळीं तरी महत्त्वाचे वाटण्यासारखे होते. या संबंधानें एकच उतार देऊन हें प्रकरण पुरें करितों:—

पाहिजे तो जिन्नस इंग्लंडच्या कृपेमुळें आम्हांस मिळतो, कशाचीही वाण पडत नाहीं.—पण दुर्दैवामुळें एकच अडचण आह्मांस पडते ती ही कीं या सर्व वस्तूंबद्दल आह्मांस किंमत द्यावी लागते; त्या फुकट मिळत नाहींत! आतां ही किंमत आम्हीं कोठून द्यावी? कोठून द्यावी म्हणजे नोकरी करून—सरकारच्या पदरीं सेवा करून! सरकार तरी सेवेबद्दल वेतन कोठून देणार? कोठून म्हणजे? करांतून! कर कोणापासून घेणार? देशांतील लोकांकडून! देशां-

तील लोक ते कशांतून देणार ? आपल्या उत्पन्नांतून ! त्यांचें उत्पन्न कोठें आहे ? शेतांतला कच्चा माल ! म्हणजे काय झालें कीं हिंदुस्थानांतल्या बहुतेक-लोकांनीं कुणबट व्हावें, आणि कच्चा माल तयार करून तो इंग्लिश व्यापाऱ्यांच्या अडत्यांस ते मागतील त्या दरानें विकावा आणि जी किंमत येईल तींतून सरकारास लागेल तेवढा कर देऊन बाकीच्यांत येथील प्रजेनें हवातसा आपला गुजारा करावा ! ही कुणबटावस्थाही आम्हीं आनंदानें पत्करली असती. पण बहुतेक लोकांस काम पुरण्याइतकी जमीन या देशांत नाहीं, व आमचें सरकार अप्रतिबंध व्यापाराचें पूर्ण भक्त असल्यामुळें आम्हांस दुसरा धंदा करतां येत नाहीं. दुसरे धंदे तुम्ही कां करीत नाहीं या आक्षेपावर आमचें उत्तर असें आहे कीं आमचे हात सरकारनें अप्रत्यक्ष रीतीनें धरले आहेत, इतकेंच नाहीं तर ते आमच्या पाठीमागें वळवून कंबरेच्या खालच्या अंगास व्यापारसंबंधी आपल्या एकदेशीय मतसूत्रांनीं करकचून बांधून ठेवले आहेत ! लांडग्याची आणि शेळीची कुस्ती लावून देऊन शेळीचें प्राणोत्क्रमण होण्याचा प्रसंग येऊन ठेपला तरी ' दोघांच्या तंट्यांत आम्हांस पडण्याची गरज नाहीं ' या मंत्राचा पुनः पुन्हा जप करून उदासीनपणें मौज पाहत बसणाऱ्या प्रेक्षकासारखें या संबंधानें आमच्या सरकारचें वर्तन होत आहे !...माल परक्या देशांत तयार न होतां येथल्या येथें तयार होऊं लागला तरच येथील धंदेवाल्यांस उद्योग मिळून आर्यभूमीच्या तोंडावर किंचित् टवटवी दिसूं लागेल. या कामीं सरकारचें साहाय्य अपरिहार्य आहे. "

**राजकीय व अवांतर लेखः**—सुधारकांत आगरकरांनीं राजकीय विषयांवर-ही कांहीं लेख लिहिले आहेत, पण त्यांत कांहीं राजकारणाचे विशेष सिद्धांत त्यांनीं नमूद केले आहेत असें नाहीं. राजकीय व औद्योगिक बाबतींत हिंदुस्थानची झपाट्यानें अधोगतिच होत चालली आहे व या देशास स्वातंत्र्य किंवा स्वराज्य मिळावें असें त्यांना अंतरापासून वाटत असे. राजकीय 'तत्ववेत्त्यांच्या स्वप्नसृष्टीचें ' चित्र आपल्या देशबांधवांपुढें ठेवतांना आगरकर म्हणतातः—" पृथ्वीवर राजकीय घडामोडी होतां होतां तींत अखेरपर्यंत जीं राष्ट्रें टिकतील त्या सर्वांत हरएक प्रकारचा राजव्यवहार अगदीं सौम्य अशा लोकसत्तात्मक राजसभेकडून होत जाईल. ज्या ज्या लोकसत्तात्मक राष्ट्रांची कांहीं कारणांमुळें विशेष मैत्री असेल त्यांचे पृथक् राष्ट्रीय समूह होतील व असें होतां होतां अखेरीस पृथ्वीवरील सर्व लोकसत्तात्मक राष्ट्रांचें एक राष्ट्र झाल्यासारखें होऊन सर्व देशांतील सर्व प्रकारचे लोक एकमेकांशीं सहोदराप्रमाणें वागूं लागतील ! " स्वराज्याचें निश्चित ध्येय, मार्ग व धोरण अद्याप मोठमोठ्या राजकारणी पुरुषांसही सांगतां येत नाहीं व उत्तरोत्तर तो प्रश्न गुंतागुंतीचा होत चालला आहे, मग आगरकरांच्या वेळीं त्या प्रश्नाचें

उत्तर त्यांच्या लेखांत आपणांस मिळेल अशी आपण अपेक्षा करणेंही योग्य नाहीं. विष्णुशास्त्रयांच्या संगतीनें स्वराज्यभक्ति त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झाली होती व ते मोठे देशाभिमानी पुरुष होते हें खरें, तथापि त्यांचीं राजकारणविषयक मतें सुधारकपक्षाच्या मतांशीं बऱ्हशीं मिळतीं झालीं; पण राजकारण हा त्यांचा प्रधान विषय नव्हता. राजकारणाच्या बाबतींत लोकांच्या मनाचा ओढा टिळकांकडे होता. व आगरकरांच्या पश्चात् टिळकांनीं २५ वर्षें राजकारणांत घातलीं व त्यासाठीं अनेक आपत्ति सोसल्यामुळें टिळकांचें राजकारण हेंच महाराष्ट्राचें राजकारण होऊन गेलें. जीवनार्थकलहांत भारतीयांचा शेवटपर्यंत निभाव लागून त्यांच्या हातीं राजसत्ता आली पाहिजे असें आगरकरांसही अर्थातच वाटत होतें. ब्रिटिशांच्या अंमलाखालीं आपण दुर्दैवानें आलों आहोंत व आपल्या हातीं कांहींच सत्ता राहिली नाहीं; तर आधीं सामाजिक सुधारणा करून लोकांस सुशिक्षित करावें, योग्य हक्कासाठीं सरकाराशीं झगडावें, अर्ज, विनंत्या करून कांहीं चतकोर नितकोर भाकरीचा तुकडा मिळाल्यास पहावें अशा विचारांच्या लोकसमुदायांत ते मिळून गेले. चालू राजकीय चळवळीवर त्यांचे जे लेख आले आहेत त्यांत त्यांनीं लोकांचीच बाजू सर्वकाळ पुढें मांडली आहे. एकीकडे लोकांस शिक्षण देऊन शाहणें करावें व दुसरीकडे यथान्याय सरकारशीं हक्कांसाठीं भांडावें असें त्यांचें धोरण असे. शिक्षणाबद्दल सक्ती, प्राथमिक शिक्षण सरकारचें अवश्य कर्तव्य आहे, मुलांइतकीच मुलींच्या शिक्षणाची आवश्यकता आहे, स्त्रियांस वरिष्ठ शिक्षण द्यावें इ० विषयांवर त्यांनीं आस्थापूर्वक लिहिलें आहे. ‘ अनाथाचा वाली कोणीं नाहीं ’ या लेखांत युनिव्हर्सिटीनें देशी भाषांचा पुरस्कार करून देशी भाषेंतच शिक्षण द्यावें या मताचा त्यांनीं पुरस्कार केला आहे. युनिव्हर्सिटी, सिंडिकेट, सेनेट, अभ्यासक्रम, शिक्षणालयें हीं सारीं परिश्रमानें लोकांनीं आपल्या हातांत घ्यावींत असें त्यांनीं कळकळीनें सदर लेखांत सांगितलें आहे. ‘राज्यकर्त्यांनों! ‘लोभमूलानि पापानि’ हें वचन नित्य ध्यानांत ठेवा, ‘ अति तृष्णा न कर्तव्या चक्रं भ्रमति मस्तके; ’ या दोन लेखांत रुप्याचा भाव उतरल्यामुळें अँग्लो इंडियन लोकांचें होणारें नुकसान व तें न होऊं देण्याविषयीं उपाययोजना या मुद्यांचा विचार केला असून त्याबाबत नवीन बसविणाऱ्या करांविरुद्ध ‘ शेळी जाते जिवानिशी, खाणारा म्हणतो वातड ! ’ ‘ जावई पाहुणा आला म्हणून टोणगा पान्हवेल काय ? ’ ‘ घ्या पण त्याला कांहीं धरबंद असूं द्या ’ हे तीन लेख लिहिले आहेत. हे पांचही लेख एकाच प्रसंगाला अनुलक्षून आहेत. त्यांत आगरकर स्पष्ट लिहितातः—“ इंग्लिश लोकांनीं आपल्या बहादुरीनें आणि आमच्या कमकुवतपणानें हिंदुस्थानचें राज्य आपलेसें केलें. आमच्यांतील आप-

सांत तंट्यांमुळें व आणि त्यांच्या धूर्तपणामुळें तें दृढ झालें. त्यांचें राज्यकौशल्य आणि आमची राजनिष्ठा यामुळें तें अव्याहत चाललें आहे. पण जरी कधींकाळीं त्यांचा लोभ अमर्याद झाला आणि आमचें दारिद्र्य असह्य झालें तर ही त्यांनीं इतक्या कष्टांनीं रचलेली इमारत ढासळल्यावांचून राहणार नाहीं. हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेंतील मुख्य दोष उधळेपणा हा आहे......आम्हीं सध्यां जे कर देत आहों त्यामुळेंच आमचे प्राण डोळ्यांत आले आहेत......आम्ही भेकड, आम्ही दुर्बळ, आम्ही भांडखोर, व आम्ही अज्ञान असल्यामुळें आमचें राज्य आम्हांस चालवितां येणें शक्य नाहीं, आणि म्हणून आमच्या डोक्यावर कोणीतरी बलवत्तर शास्ता पाहिजे हें आम्ही कबूल करितों, व त्या शास्त्याला आमच्या सामर्थ्याप्रमाणें देववेल तितका करभार देण्यासहि आम्ही राजी आहों. पण त्यास कांहीं धरबंद असायला पाहिजे." सिव्हिल सर्व्हिससाठीं समकालीन परीक्षा—या लेखांत तशी परीक्षा नको म्हणणाऱ्या गोऱ्या अधिकाऱ्यांवर टीका करून शेवटीं म्हटलें आहे, "ज्याचें नशीब त्याच्या करामतीवर सर्वथैव अवलंबून असतें ही सुप्रसिद्ध इंग्रजी म्हण ध्यानांत घेऊन इंग्लंडांत जे खरे उदार पुरुष आहेत त्यांच्या साहाय्यानें आम्हीं आपल्या उन्नतीचा मार्ग अहर्निश आक्रमिला पाहिजे." आगरकरांची किंवा त्यांच्या सुधारकपक्षाची मजल कोठवर गेली होती हें वरील अवतरणांवरून वाचकांच्या लक्ष्यांत येईल. रेल्वे कंपन्या आणि रेल्वेकडील नौकर, हिंदुमुसलमान यांचे तंटे, ऐक्य कशानें होईल, अफूचें कमिशन, इंडिया कौन्सिल ॲक्ट इ. विषयांवरील लेखांचें आज विशेष महत्त्व कोणास वाटणार नाहीं. स्पेन्सरच्या 'प्रिन्सिपल्स ऑफ सोशिऑलजी' ह्या ग्रंथाच्या आधारें देवतोत्पत्ति, आचारप्रकरण, विजयलांछनें, व्यवच्छेदन, उपायनकर व बलिदान, भेटी देवदर्शनें व यात्रा इ. लेख लिहिले आहेत. त्यांत माहिती भरपूर असून हे लेख बऱ्याच निर्विकार मनानें लिहिले आहेत. स्पेन्सरचीं वरील ग्रंथांतील मतें समजण्यास वरील सहा लेखांचें बरेंच साह्य होईल व आगरकरांच्या सामाजिक सुधारणेच्या विचारांना विशिष्ट वळण स्पेन्सरच्या संगतीमुळें कसें लागलें हेंही समजून येईल.

**आगरकरांचे सामाजिक लेख**:—ह्या लेखांचा आतां विचार करूं. चाळीस वर्षांपूर्वी 'लोकहितवादींनीं' ज्या नवीन सामाजिक सुधारणेच्या कल्पनांना चालन दिलें त्या कल्पनाच, 'सुधारकानें' पुन्हां उचलून धरण्याचा प्रयत्न केला. मध्यंतरीं १८५७ च्या धामधुमी झाल्या त्यांचा राजकीय क्षेत्रांत लोकजागृतीवर जो परिणाम व्हावयाचा तो होऊन विष्णुशास्त्री चिपळोणकरांनीं निबंधमालेंत व केसरीच्या पहिल्या दोन वर्षांच्या अंकांत स्वाभिमानवर्धक निबंध लिहिले व विष्णुशास्त्र्यांचेंच धोरण केसरींत संभाळण्याचें टिळकांनीं ठरविलें. तेव्हां केसरीपासून फुटून आगरकरांनीं 'सुधारक' पत्र

काढलें. आतां त्यांना आपलीं सुधारणेचीं मतें स्वच्छंदानें प्रतिपादितां येऊं लागलीं. लोकहितवादींनीं किंवा आगरकरांनीं समाजशास्त्राचा किंवा आपल्या समाजसुधारणेच्या मूलभूत तत्त्वांचा खोल विचार मुळींच केलेला नव्हता, ह्यामुळें त्यांच्या लेखांत उथळपणाच भरलेला दिसतो. पाश्चात्य समाज व हिंदी समाज यांच्या घटनेंत साम्य कोठें आहे, प्रत्येकाचें विशिष्टत्व कशांत आहे व सध्याच्या पाश्चात्त्य व पौर्वात्य कल्पनांच्या संधिकालीं हिंदु समाजानें आपलें विशिष्टत्व न सोडतां व राष्ट्राचा तेजोभंग न होऊं देतां राष्ट्रोन्नतीचा गाडा पुढें कसा ढकलावा याचें सोपपत्तिक विवेचन दोघांनींहि केलें नाहीं व त्यांना सूक्ष्म अध्ययनाला वेळही मिळालेला नाहीं. गोपाळरावांना नोकरी संभाळून व आगरकरांना शाळा संभाळून जेवढें लिहितां आलें तेवढें त्यांनीं लिहिलें. इंग्रज लोक आपल्यावर राज्य करीत आहेत व आपण परदास्यांत लोळत आहोंत याबद्दलची पोटतिडिक दोघांतही होती व दोघांचीही समाजसुधारणेची व लोककल्याणाची कळकळ होती यांत शंका नाहीं; तथापि पाश्चात्त्य कल्पनांच्या ओघाबरोबर वाहत जाण्याखेरीज तरणोपाय नाहीं असें त्यांच्या मनानें घेतल्यामुळें त्यांनीं सुधारणेच्या मतांचा ‘ उदो उदो ’ करण्यांत आपलें आयुष्य घालविलें. समाजसुधारणेला तेव्हां जागा नव्हती किंवा अजूनही नाहीं असें नाहीं, कोणत्याही इतर समाजांप्रमाणें आमच्या समाजांत दोष आहेत व ते घालविण्याचे उपाय सुचविणें हें लोकनायकांचें कामही आहे, पण वरील दोघां लेखकांनीं पोक्त विचार करून प्रौढ भाषेनें आपले लेख लिहिले नाहींत, बहुत ठिकाणीं त्यांचा थिल्लरपणाच दिसून येतो, व तोच त्यांच्यापेक्षां कमी योग्यतेच्या अनेक अर्धवट लेखकांनीं त्यांच्या मागाहून उचललेला आहे. देशमुख किंवा आगरकर यांच्याच वेळीं सामाजिक सुधारणेवर माधवराव रानडे आपले विचार प्रौढ भाषेनें मांडीत असत. आगरकर हे स्पेन्सर आणि मिल्ल यांच्या विचारांबरोबरच वाहवले; त्यांना हिंदुसंस्कृतीची व त्या संस्कृतींतील उदार तत्वांची बिलकूल ओळख झाली नाहीं. त्यांनीं आपल्या वेळच्या हिंदुगृहस्थितीचीं बऱ्याच ठिकाणीं यथार्थ चित्रें रेखाटलीं आहेत, कित्येक ठिकाणीं दोषही यथार्थ दाखविले आहेत, पण त्या दुष्ट, आगंतुक व रूढीनें दृढमूल झालेल्या दोषांच्या राखेखालीं जीं सोज्ज्वल सामाजिक तत्वरत्नें विखुरलेलीं आहेत तेथवर त्यांची नजर गेली नाहीं. वरवर पाहिलें, उघड दोष दिसले त्यांची उपहास्यता केली, पण राख फुंकून त्याखालचा प्रज्वलित अग्नि प्रगट करण्यालीं किंवा गंज काढून तेंच भांडें तजेलदार दाखविण्याला जी आपलेपणाची स्फूर्ती पाहिजे होती ती नसतां त्यांनीं पाश्चात्य आचारविचारांचा चष्मा लावला हाच त्यांच्यांत व बहुतेक समाजसुधारकांत मुख्य दोष होय. स्पेन्सर मिल्ल यांचें अनुयायित्व त्यांनीं अनेक ठिकाणीं कबूलही केलें आहे. “ मानवी सुधारणेचा

ओघ कोणीकडे आहे हें आम्ही कसें ठरविणार ? मिल, स्पेन्सर, कांट यासारख्या प्रचंड तत्ववेत्त्यांस ज्या गोष्टीचा निर्णय पांचपांचशें पानांच्या स्वतंत्र ग्रंथांत करतां आला नाहीं तो हे सुधारकबोवा एकदोन आर्टिकलांत कसा करणार असा उपहास कोणीं केल्यास आम्ही त्यास पात्र नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. कोणत्याही बिकट कूटाचें उत्तर काढणें व काढलेलें उत्तर समजून घेऊन तें दुसऱ्यास थोडक्यांत सांगणें या दोहोंत फार अंतर आहे. कमींत कमी शेंकडा नव्व्याणव लेखकांचा व्यवसाय दुसऱ्या प्रकारचा असतो आणि सुधारकाचा कर्ता त्यांतच मोडतो हें कांहीं सांगायला पाहिजे असें नाहीं ! "

नव्याजुन्यांच्या झगड्यांत आगरकरांनीं आपलें मत काय दिलें आहे तें पहा. ते म्हणतात:—" जिकडे पहावें तिकडे पाश्चिमात्य कल्पनांनीं व आचारांनीं आम्हांस वेढल्यासारखें केलें आहे, व त्यांच्या पेंचांतून आम्हांस निसटून जातां येईल असें वाटत नाहीं ! आणखी शेंपन्नास वर्षें असाच क्रम चालला तर हिंदुस्थानच्या पहिल्या स्थितीचा मागनूस नाहींसा होण्याइतकें त्याचें स्थित्यंतर होणार आहे. युरोपांत आज जी सुधारणा दृष्टीस पडते ती मागील अनेक सुधारणांचें सार आहे...इंग्रजांच्या राज्यामुळें ज्या गोष्टी येथें प्रस्थापित झाल्या आहेत त्यांपैकीं बहुतेक स्वीकरणीय व अनुकरणीय आहेत...... दोष वर्ज करितां एकंदरींत युरोपीय किंवा अमेरिकन कुटुंबस्थिति आमच्याहून श्रेष्ठ आहे..." यासाठीं " मनुष्यसुधारणेचा अनिवार्य कल कोणीकडे आहे, ओघ कोणीकडे वाहत आहे " हें पाहून आपणही त्या ओघाबरोबर वाहत गेलें पाहिजे असा त्यांनीं अट्टाहास केला आहे ! ओघाबरोबर वाहत जाणें हें सुलभ आहे, ओघाला थोपवून धरायला पौरुष लागत असतें, तें दुर्लभ आहे ! पाश्चात्य सुधारणेच्या प्रवाहाबरोबर वाहत जाण्यांत हिंदुस्थानचें कल्याण आहे कां त्या ओघाला मर्दपणानें शक्य तितका अडथळा करून व पूर्वप्रवाहांत सामील करून घेण्यांत हिंदुस्थानचा भाग्योदय होणार आहे याचा विचार त्यावेळीं झाला नाहीं. ' प्रवृत्तिरेषा भूतानां निवृत्तिस्तु महाफला ' ह्या॰ ओघाबरोबर वाहवणें हा सहज स्वभाव असला तरी ओघाच्या उलट जाऊन तो परतवणें यांतच कल्याण आहे अशी आपली परंपरा आहे. समर्थांनीं ' चंचलनदी ' चें जें मनोरम वर्णन ( दास॰ द. ११ स. ७ ) केलें आहे. त्यांतही ओघावरोबर वाहवणाऱ्यांच्या दुर्दशा कशा होत असतात हें सांगून ' येक बळाचे निवडले । ते पोहतचि उगमास गेले ॥ उगमदर्शनें पवित्र झाले । तीर्थरूप ' असें ओघाच्या उलट पोंहत मूळाकडे जाणाऱ्यांचें कौतुक केलें आहे ! ' उलट उलट माघारा प्राण्या ! फिर गोते खासी । भरला पुर मायेचा लोंढा वाहुनियां जासी, ' असें राष्ट्राच्या परंपरेंत मुरलेल्या मुक्ताबाईनेंही उद्गार काढले आहेत. पाश्चात्य विचाररूप वारुणीनें भ्रांत झालेल्या पुरुषांना आपली शुद्धि राहिली

नाहीं व ते नवीन कल्पनांच्या लोंढयाबरोबर वाहत गेले, स्वतःबरोबर समाजालाही खेंचण्याचा त्यांनीं अट्टाहास केला, व यांतच आपण मोठे लोककल्याण करीत आहोंत असें त्यांना प्रामाणिकपणानें वाटलें ! लोकहितवादींच्याद्वारें हा लोंढा प्रथम मोठया उसळीनें बाहेर पडला, त्याला विष्णुशास्त्र्यांनीं थोडासा प्रतिबंध केला पण 'सुधारका' च्याद्वारें त्यानें पुन्हां दुप्पट उसळी मारली. लोंढाच तो ! उगमाकडे पाठ करून खालीं खालीं ओढीत नेणें हा त्याचा स्वभाव ! तळचा पाय सुटला कीं तो गिरक्या खायला लावणार, म्हणून वाहवणार कां पोंहणार हा प्रश्न आहे ! आगरकर वाहवले व आपल्याबरोबर बऱ्याच मोठया समूहाला घेऊन गेले. त्यांना उगमाची शुद्धि राहिली नाहीं. हजारों वर्षेंपर्यंत हिंदु राष्ट्र अनेक आंतल्या व बाहेरच्या आपत्तींशीं झगडत जिवंत राहिलें आहे तें त्यांचा पाया लेचापेचा होता म्हणून राहिलें नाहीं. बालविवाह, प्रौढविवाह, केशवपन, परदेशगमन, सोंवळेंओवळें, मूर्तिपूजा, देवताराधन, अस्पृश्यता, जातिभेद इ० ह्या विषयांवर आगरकरांनीं स्पेन्सरमिल्ल इ० 'प्रचंड तत्त्ववेत्त्यांच्या' आधारावर कठोर आघात केले त्यांना दुसरी व चांगली बाजू असेल असा त्यांना विचारही स्फुरला नाहीं. स्पेन्सरमिल्ल यांचें तत्त्वज्ञान युरोपांतही त्यांच्या पश्चात् टिकाव धरून राहिलेलें नाहीं ! आगरकरांनीं आपली संस्कृति पाहिली नाहीं, वाल्मीकि, शुक, शंकराचार्य, ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास यांची त्यांना बिलकूल ओळख नव्हती. 'जुन्या विद्या, जुन्या पोथ्या, जुने लोक' यांचा त्यांनीं उपहास केला तो केवळ जुन्याचीं जीं विकृत रूपें त्यांच्याभोंवतीं पसरलेलीं त्यांनीं पाहिलीं तेवढयावरूनच. हिंदुराष्ट्राची नाडी त्यांच्या हातीं आली नाहीं. जुन्या समाजावर व परंपरागत चालीरीतींवर तुटून पडतांना आगरकरांनीं सारासार विचार कसा गुंडाळून ठेवला आहे व शिष्ट लेखनाची मर्यादा सोडून किती शिवराळपणा केला आहे हें पाहून मनास फार विषाद वाटतो. दुसऱ्या बाजीरावाच्या वेळेपासून समाजाची पुष्कळ अधोगति झाली होती, अनेक चालीरीतींतलें स्वारस्य लोक विसरून गेले होते, धर्माचरणांत ढिलाई झाली होती, स्त्रियांना कित्येक पुरुष निर्दयपणें वागवीत असत, बालविवाहाचा दुरुपयोग करून अनेक गरीब मुलींवर नवरे अत्याचार करीत, बालविधवांचा बऱ्याच घरांतून छळ होत होता—हे सर्व प्रकार होत होते असें मानलें तरी समाज साराच ढोंगी, लबाड व निर्दय पुरुषांनीं भरला होता असें समजणें हा अन्याय आहे. 'गांव तेथें महारवडा' असायचाच. कोणता समाज सकलगुणसंपन्न व सर्व दोषमुक्त असा आहे ? समाजांतील दोष जावेत म्हणून कळकळीनें कितीही लिहिलें तरी लिहिण्याला कांहीं मर्यादा पाहिजेच. पहिल्याच 'सुधारक काढण्याचा हेतु' या लेखांत त्यांनीं लिहिलें आहे "ज्यांना

समाजाच्या घटनेचीं, अभिवृद्धीचीं व लयाचीं कारणें ठाऊक नाहींत, कदाचित् पितृतर्पणापुढें ज्यांचें ज्ञान गेलें नाहीं, विषयोपभोगाशिवाय अन्य व्यवसाय ज्यांना अवगत नाहीं...अशांना लोकाग्रणी न म्हणतां लोकशत्रुच म्हटलें पाहिजे. जेवढीं जुनीं शास्त्रें तेवढीं ईश्वरप्रणीत, जगत्कारणाच्या तोंडांतून, हातांतून, मांडींतून, पायांतून एकेक वर्ण निघाला अशी ज्यांची वर्णोत्पत्तीविषयीं कल्पना; पंचामृतानें व धूपदीपानें केलेली पूजा मात्र ईश्वरास मान्य; सध्या येथें स्त्रियांचे पुरुषांशीं मुलांचे आईबापांशीं जे संबंध चालले आहेत तेच उत्तम व तेच अनंत कालपर्यंत चालले पाहिजेत व ज्ञानसंपादन हें पुरुषांचें कर्तव्य व शिशुसंगोपन हें स्त्रियांचें कर्तव्य; स्त्री दासी व पुरुष स्वामी, विवाहाशिवाय स्त्रीस गति नाहीं; वैधव्य हें तिचें महाव्रत व ज्ञानसंपादन हा तिचा मोठा दुर्गुण.—अशा प्रकारच्या ज्यांच्या कल्पना...अशा अज्ञान व धर्मभोळ्या लोकांच्या अचरट धर्मकल्पनांची व वेडसर सामाजिक विचारांची प्रशंसा करून त्यापासून पाहिजे तेवढी माया काढणाऱ्या स्वार्थपरायण उदरंभरू हजारों टवाळांनीं शिव्यांचा वर्षाव केला, शेंकडों अविचारी व हेकड लोकांनीं नाकें मुरडलीं किंवा तिरस्कार केला तरी अशा क्षुद्र लोकांच्या अवकृपेला, रागाला किंवा उपाहास्यतेला न भितां आपल्या मनास योग्य वाटेल तें लिहावें व सांगावें हेंच उचित होय." पहिल्याच लेखांत ही भाषा! पुरुषसूक्त, पंचामृत, पितृतर्पण, पितृभक्ति, पतिभक्ति या विषयींची अवहेलना जुन्या समाजाला—नव्हे कोणाही सुविचारी माणसाला—कशी आवडावी? अपशब्दांचा वर्षाव न करितां सुधारणेचे विचार लोकांपुढें मांडतां आले नसते काय? समाजाच्या घटनेचीं, अभिवृद्धीचीं व लयाचीं कारणें जुन्या लोकांना ठाऊक नव्हतीं म्हणून ते मठ्ठ, पण हीं कारणें आगरकरांना तरी कळलीं होतीं काय? किती विद्वानांना एवढा गहन विषय ठाऊक असतो? आगरकरांनीं पुढील ५।७ लेखांत राज्य, धर्म व समाज यांबद्दल कांहीं चर्चा केली आहे पण ती अगदीं उथळ आहे व तीही स्पेन्सर, मिल्ल, कांट इ० पाश्चात्त्य ग्रंथकार व ग्रीस आणि रोमचे कॉलेजांत वाचलेले इतिहास यांच्याच केवळ आधारानें केलेली असल्यामुळें परविचारपुष्ट आहे, आगरकरांचें त्यांत कांहीं नाहीं. आगरकरांचें त्यांत एवढेंच आहे कीं परक्यांचे विचार सांगतांना आपल्या जुन्या समाजावर यांनीं यथेच्छ तोंड सोडलें आहे!

"सुशिक्षित देशबांधव हो! ज्या दुर्मतांनीं दुराग्रहांनीं व दुराचारांनीं महारोगांप्रमाणें या देशाच्या बुद्धीचा, नीतीचा व शरीरसामर्थ्याचा हजारों वर्षें फडशा पाडला आहे त्यांचें यथाशक्ति निर्मूलन करणें अत्यंत उचित होय! इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका वगैरे देशांतल्या सर्व वर्गांतील लोकांमध्यें स्त्रीपुरुषसंबंध कसे आहेत हें नित्य नजरेपुढें येत असूनहि—बालविवाहासारखे अनेक

व्याधि तुह्मांस अत्यंत पीडित असून..."--हिंदुस्थानांत दिसणाऱ्या साहेब-मडमा हातांत हात घालून फिरायला जातांना दिसतात यापलीकडे साहेब लोकांच्या गृहस्थितीची माहिती आगरकरांना होती असें वाटत नाहीं.

" येथून पुढें स्त्रीपुरुषांत संग्राम सुरू होणार आहे, बहुधा साऱ्या मुलींस प्राथमिक शिक्षण मिळालें पाहिजे. मुलींस मुलांप्रमाणें वरिष्ठ शिक्षण द्यावें किंवा नाहीं असा प्रश्न निघेल तेव्हां इतर न्याय्य, अवध्य व कल्याणप्रद गोष्टींप्रमाणें या गोष्टींतही सुधारकांचा वरचष्मा होऊन या हताश, विचारशून्य, मत्सरी, भेकड, मूर्ख किंवा आपमतलबी आणि कोडग्या लोकांस आपलीं डोकीं गुडघ्यांत घालून मुळुमुळु रडत बसावें लागेल हें तर त्यांचें कपाळ ठरलेलेंच आहे ! "

"ज्या द्रौपदीस कवींनीं महापतिव्रता करून सोडिलें आहे व जिला पांच पांडवांकडे आळीपाळीनें जावें लागत असे, त्याच द्रौपदीच्या नवऱ्यांपैकीं एकानें सुभद्रा नांवाची बळरामभगिनी कपटानें काढून नेऊन बलात्कारानें आपली बायको केली होती ! याच नरपुंगवाचा साथी जो भगवान्..." संस्कृत, मराठी, हिंदी वगैरे भाषांतून शेंकडों हजारों कवींनीं व संतांनीं पूज्य मानलेल्या व आपल्या समाजाला अत्यंत प्रिय असलेल्या विभूतींविषयीं अनिर्वाच्य-अर्वाच्य भाषेंत कांहींतरी लिहीत सुटणें ही काय सुधारणा ? " या देशांत फार प्राचीन काळीं आर्यस्त्रिया पुष्कळ नवरे करीत असें महाभारताकडे जे कोणी ऐतिहासिक दृष्टीनें पाहतील त्यांना..." महाभारताकडे आगरकरांनीं मुळींच पाहिलेलें नाहीं, न पाहतांच कांहींतरी दडपून दिलें आहे ! महाभारतांतच काय पण कोणत्याही संस्कृत, प्राकृत ग्रंथांत 'आर्यस्त्रिया पुष्कळ नवरे करीत' या आगरकरांच्या विधानाला एका द्रौपदीशिवाय दुसऱ्या कोणत्याही आर्यस्त्रीचें उदाहरण आधारादाखल देतां येणार नाहीं. आगरकरांच्या भाषेंत 'क्षौरी-शास्त्री' 'दर्दुरप्राय वैदिक' ह्या शिव्या समजल्या जात नसत असें दिसतें !

**उभय पक्षांचें रणकंदनः**—सामाजिक व धार्मिक सुधारणा होऊन समाज पाश्चात्यांच्या वळणावर गेल्याखेरीज स्वराज्य मिळणार नाहीं व टिकणार नाहीं असा निश्चय झाल्यामुळें आगरकरांनीं आपलें बहुतेक लेखनकौशल्य सुधारणाविषयक चर्चेवर खर्च केलें. सुधारकांत बालविवाह, प्रौढविवाह उर्फ स्वयंवर, पुनर्विवाह, केशवपन, जातिभेद, अस्पर्श्यतानिवारण, परदेशगमन इ० विषयांवर चरचरीत लेख लिहून जुन्या समाजाचे बुरूज पाडून टाकण्याचा त्यांनीं अटोकाट प्रयत्न केला व जुन्या लोकांच्या धर्मकल्पनांवर आपला तोफ-खाना चालू केला. सोवळ्याची मीमांसा, अजुन ग्रहण सुटलें नाहीं, प्रियाराधन, घटस्फोट, आमचे प्रेतसंस्कार, सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकूल काल, सामाजिक स्थित्यंतरें, स्त्रीपुरुषांना एकच शिक्षण द्यावें व तेंही एकत्र द्यावें, वडिलपणाचे हक्क, साडेसातीचा शनिदेव, देव व देवतोत्पत्ति, पुरुषांचे पेहराव,

स्त्रियांचे पेहराव, संमतीचा कायदा, ग्रामण्यप्रकरण, पांचजन्याचा हंगाम, अंडीं खाण्यास काय हरकत आहे, मूर्तिपूजेचा प्रकार, पुजारी व पंचाक्षरी, विवाहकाल आणि संभोगकाल, बोलके सुधारक, वागते सुधारक आणि सुधारणा-निंदक, इतिश्रीचहाप्रकरणं, सामाजिक स्थिति आणि गति, प्रेतक्रिया व प्रेतसंस्कार, हें पतिप्रेम कीं पुरुषवर्गाची निर्घृणता इ० लेखांत आगरकरांचीं सुधारणाविषयक मतें सर्व ग्रथित झालीं आहेत. लेखांच्या मथळ्यांवरूनच त्यांतील प्रतिपाद्य विषयांची कल्पना होणार आहे. बालविवाह हें आमच्या सामाजिक अवनतीचें निदान असून प्रौढ व परस्परसंमत विवाह किंवा स्वयंवर हा समाजसुधारणेचा पाया आहे हें आगरकरांनीं अनेक लेखांत प्रतिपादिलें आहे व हें प्रतिपादितांना त्यांनीं जुन्या लोकांचा अमर्याद उपहास केला आहे. ‘ अल्पसमजुतीचे, कोत्या विचाराचे, मूढ, बेअक्कल, आपस्वार्थी, भेकड, मत्सरी, दुष्ट, नीच, पाषाणहृदयी इ०’ प्रकारची पाषाणवृष्टि त्यांनीं बेसुमारपणानें आपल्या प्रतिपक्षीयांवर अनेकवार केली आहे. बालविवाह, असंमतवैधव्य, विधवांचा पुनर्विवाह, केशवपन, इ० विषयांवर त्यांनीं बहुसाल लिहिलें आहे. त्यांतील बराचसा भाग यथार्थ असला तरी टीका वाजवीपेक्षां ज्यास्त तिखट आहे. या विषयांवर ते भारदस्तपणें नीट विचार करून लिहिते तर त्यांच्या वेळीं विशेषशी प्रतिकूलता त्यांस आढळली नसती. या सुधारणा कालाच्या ओघाबरोबर व शिक्षणाच्या वाढीबरोबर होतच आहेत, किंबहुना आगरकरांच्या कल्पनेबाहेर या ४० वर्षांत त्यांनीं प्रगति केली आहे! “ मुलीचें लग्न बारा वर्षें झाल्यावर व मुलाचें लग्न अठरा वर्षें झाल्यावर करावयाचें असा निर्बंध कायद्यानें करून घेतला पाहिजे. ” येथवरच त्यांची उडी होती, आतां बाराची मर्यादा सामान्यतः पंधरासोळांवर आली आहे, व कोठें कोठें वीसपंचवीसपर्यंत जाऊन विटाळ जाण्याच्या सुमारास लग्नें करण्याचा प्रघात पडणार कीं काय अशी उलट स्थिति झाली आहे! चाळीस वर्षांत एवढा फरक झाला आहे कीं, “ मुलीचें लग्न सोळा वर्षांचें आंत व मुलाचें लग्न चोवीसचे आंत करावयाचें असा निर्बंध कायद्यानें करून घेतला पाहिजे. ” असें म्हणण्याची पाळी आली आहे. बालविवाहाचे दुष्ट व अमानुष प्रकार पूर्वकाळीं कोठें कोठें दिसत तर प्रौढविवाहाचें घातुक प्रकार आजकाल दिसूं लागले आहेत. आगरकरांनीं दिलेल्या आंदोलनानें दुसरें टोंक इतक्यांतच गांठलें आहे.

पाळण्यांत, चार सहा वर्षांच्या वयांत लग्न व दहाव्यांत गर्भाधान अशी राक्षसी चाल आमच्यांत आहे. मुलामुलींचे आईबाप निर्दय आहेत, पति पशुतुल्य नराधम आहेत इ० अतिशयोक्तिपूर्ण वर्णन करून त्यांनीं जुन्या समाजास डिवचलें आहे, व नुक्तेंच बंगाल्यांत घडलेल्या हरि मोहनच्या खटल्याचें उदाहरण दिलें आहे. ‘ हा कलंक कसा जाणार? ’ ‘ समजत नाहीं तें हें ’ या दोन लेखांत

हरि मोहननें आपल्या अल्पवयी भार्येवर अत्याचार केल्यानें ती बाला मरण पावली या गोष्टीचा आधार घेऊन आगरकरांनीं जुन्या समाजावर व बालविवाहावर खूप कोरडे ओढले आहेत. हरि मोहनसारखे नराधम जुन्या समाजांत निपजत नाहींत, कोमल बालिकांवर अत्याचार होत नाहींत, असें कोणी समंजस मनुष्य म्हणणार नाहीं. पण कांहीं अपवादभूत उदाहरणें घेऊन बालविवाहाच्या पद्धतीवर जर झोड उठवावयाची तर प्रौढ विवाहाची पद्धत तरी सर्वथा निर्दोष आहे असें कोण म्हणेल? बालविवाह सरोस वाईट असता तर तो शतकानुशतकें टिकलाच नसता. बालविवाहाचीं हजारों दपत्यें काय संसारसुख भोगतीं झालीं नाहींत. विवाहकाल व संभोगकाल यांची मर्यादा वाढविल्यानें आरोग्य व दिर्घायुष्य वाढून समाजास जास्त बळकटी येते ही गोष्ट सरळपणें त्यांनीं सांगितली असती तर परिणाम अधिक होता. बाकी विवाहकालमर्यादा वाढविण्याचें काम सुधारकाच्या लेखापेक्षां १८९६ मध्यें सुरू झालेल्या प्लेगोबानें अधिक यशस्वी रीतीनें केलें आहे! भडाभड तरुणतरुणी प्लेगला बळी पडूं लागल्यामुळें विवाहाचा काल अपाप पुढें सरकला. कन्या ऋतुमती झाली तरी अनिष्टभयानें लोक मुली वाढवूं लागले. अलीकडे विवाहकालानें मर्यादातिक्रम केल्यानें प्रौढ मुली व मुलें अधिक निःशक्त, रोगट, गालफडें बसलेलीं, फिक्कट व क्षयाच्या भावनेवर दिसूं लागलीं आहेत. हेंही एक अरिष्टच होऊं पाहात आहे. तात्पर्य दोन्हीं टोकें सोडून सुधारणा झाली तरच फायदा. नाहीं तर चुलींतून निघून वैलांत जाऊन पडल्यासारखें होणार आहे. प्रौढविवाहाचे दुष्परिणाम काय कमी दिसूं लागले आहेत? गोपाळराव चिपळूणकर यांनीं ते दाखवायचा अलीकडे उपक्रम केला होता.

कुल, गोत्र, जाति, धर्म, वडिलांची व शास्त्रांची भीडमर्यादा तोडून जे कित्येक प्रौढविवाह होऊं लागले आहेत ते आगरकर आज हयात असते तर त्यांनाही पसंत पडले नसते. परदेशगमनाला धर्मशास्त्रानें बंदी केलेली जर वाईट तर आजकाल विलायतेला जाऊन येणारे कित्येक लोक सर्व हिंदुत्व खुंटीवर अडकवून परधर्मीयांच्या पोरी बायका करून खुशाल इकडे येतात हें काय समाजसंस्था रक्षण होण्याचे मार्ग आहेत? केवळ विद्या शिकून येणारे व देवयानीच्या मोहपाशांत न अडकणारे 'कच' फारच विरळ आहेत. बहकून जाऊनच फार लोक येतात, हें पाहिलें म्हणजे परदेशगमनाची बंदी अगदींच मूर्खपणाची होती असें कोणी समंजस मनुष्य म्हणणार नाहीं. कालाचा ओघ अप्रतिहत चालला आहे त्याबरोबर व्हायचें असेल तें होईल, कदाचित् ठेंचा खाऊन लोक शहाणे होतील, कदाचित् कलिकालप्रभावानें हिंदुसंस्कृति लुप्त होऊन जाईल, पुढें काय होईल तें कोणीं सांगावें? पण चाळीस वर्षांच्या अनुभवानंतर आगरकरांनीं प्रतिपादिलेल्या सुधारणांपैकीं कांहीं चांगल्या सुधारणा झाल्या किंवा

होऊं घातल्या आहेत हें जसें खरें; तसेंच आगरकरांना तोंड देण्यास उभ्या राहिलेल्या जुन्या पक्षानें किंवा त्यांच्या पुढाऱ्यांनीं सुधारणेच्या अतिवेगानें धांवत जाणाऱ्या गाडयाला थोपविण्यासाठीं केलेल्या चळवळीही अगदीं चुकीच्या होत्या किंवा त्यांच्या शंका व भयस्थानें निर्मूल होतीं असें म्हणतां यावयाचें नाहीं. आगरकरांना प्रिय वाटत असलेल्या सुधारणा लोकांना सुचीविण्याचा त्यांना अधिकार होता व त्यांनीं सुचविल्या यांत कांहीं चुकलें नाहीं. त्यांनीं लोकांवर प्रहार केले व लोकांनीं त्यांचा उपहास व छल हेंही व्हायचें तसेंच झालें. मात्र त्यांच्या मोकाट व बेताल लिहिण्यानें तरुण समाज ढिला व विस्काळित झाला व लोकसंस्थेला धक्का पोंचला हें वाईट झालें. तरुणतरुणींना त्यांनीं बेफाम व्हायला लावलें; जुन्या चालीरीति, संस्कार, गृहकृत्यें, धर्माचार यांविषयीं अनादर उत्पन्न केला, व प्रचलित हिंदुधर्मांत घुसलेल्या वाईट गोष्टी काढून टाकण्याच्या प्रयत्नांत चांगल्या गोष्टीही त्याज्य वाटायला लावून समाजसंस्थेला धक्का दिला. हें आगरकरांनीं व त्यांच्या अनुयायांनीं केलें व करीत आहेत. बालविवाहाचें खंडण करीत व तत्पक्षपाती जुन्या विचारांच्या लोकांची महापूजा बांधीत असतांनाच हिंदुस्थानांत संमतिवयाचा कायदा पास होण्याचा प्रसंग येऊन ठेपला आणि जुन्यानव्या विचारांच्या लोकांत घनघोर व तुंबळ वादसंगर सुरू झालें. ह्या केसरीसुधारकांचे झगडे व क्रीडाभुवनांतील दंगलीची सभा पुण्याच्या लोकांस अजून आठवतात. 'आम्ही सरकारच्या साह्यानें वैवाहिक गुलामगिरीच्या अंत लौकर करूं पाहत आहों' अशी आगरकरांनीं गर्जना केली व 'आमच्या धार्मिक सामाजिक चळवळींत आम्ही सरकारास हात घालूं देणार नाहीं, आमच्या सुधारणा लोकांस शिक्षण देत देत हळूहळू आमच्या आम्हींच करूं' असें त्या गर्जनेस टिळकांनीं प्रत्युत्तर दिलें! गरम किंवा उतावळे सुधारक व थंडे किंवा माफक सुधारक ऊर्फ दुर्धारक, कर्ते व बोलके सुधारक हे शब्द तेव्हांच प्रचारांत आले. स्पेन्सरसाहेबाला एकीकडे आगरकर ओढूं लागले व दुसरीकडे टिळक ओढूं लागले. लोकहितवादींच्या वेळीं जुना समाज मुग्ध होता, पण संमतिकायद्याच्या वेळीं त्याची तरफदारी करणारे पुढारी नव्या लोकांत निर्माण झाले व याचें आगरकरांस अत्यंत आश्चर्य वाटलें. "सर रोमेशचंद्रांसारखे पुरुष बंगाल इलाख्यांत, सर टी. माधवरावासारखे मद्रास इलाख्यांत आणि रा. टिळकासारखे या इलाख्यांत लोकांच्या नांवानें संमतीबिलाचा पाडाव करण्यास उभे राहिले आहेत, हें पाहून खेदानें व लज्जेनें आम्ही आपली मान खालीं घालतों.!!" या दंगलीच्या काळांत आगरकरांचा 'होऊंच द्या तर दोन हात' हा वीरश्रीचा लेख प्रसिद्ध झाला. ह्या लेखांत आगरकरांनीं मनस्वी त्रागा केला आहे. "भेकड प्रतिष्ठाखोर हिंदु लोकांनो! विषयलंपट निःशक्त वाचाळ बाबूंनो! धिक्कार असो तुम्हांला;

तुमच्या धर्माला व तुमच्या हक्काला ! दयावंत ब्रिटिश सरकार केवळ परोपकारबुद्धीनें आपल्या लहान पोरींवर जुलूम करूं नका एवढें अदबीनें सांगत असतां त्यावर तुम्ही आपलें धर्मास्त्र सोडतां ! धिक्कार असो तुमच्या व तुमच्या वाटाड्यांच्या धर्मनिष्ठेला व पापभीरुत्वाला ! तुम्ही खोटे, तुमचा धर्म खोटा, तुमचा धर्माभिमान त्याहून शतपट खोटा ! अशा प्रकारच्या धर्महीन कपटपटु लोकांनीं धर्माचा बागुलबोवा करून संमतीच्या बिलासारख्या बिलास विरोध करावा याहून अधिक असंबद्ध, अधिक उपहासास्पद, अधिक लज्जास्पद व विशेष खेदकारक काय आहे हें आम्हांस कळत नाहीं! " आगरकर तर्कशास्त्रप्रवीण होते. त्यांचे हेत्वाभास ह्या लेखांत विपुल आढळतात. ह्याच लेखांत पुढील तेजदार उद्गार आहे. " सुधारकबोवा ! तुम्ही आतां स्वस्थ बसणार कां प्रतिपक्षी लोकांचीं मनें बिघडवीत आहेत त्यांचें यथाशक्ति खंडण करणार ? कोण स्वस्थ बसणार ? सुधारक अं ? टांकांतून अर्थबोधक अक्षरें काढण्याचें सामर्थ्य असेल, व तीं वाचण्यास निदान एक तरी इसम तयार असेल तोंपर्यंत तरी हें स्त्रैणकर्म सुधारकाला स्पर्श करूं शकणार नाहीं ! " समाजसुधारणेला सरकारचा पाठिंबा आहे हें माहित असल्यामुळें आगरकरांनीं जरा ठांसून लिहिलें आहे कीं, "अप्राप्ततारुण्य अशा भारतीय आर्यकन्यकांवर विषयलंपट, विचारशून्य व अधीर नरपशूंकडून जो जुलूम कित्येक शतकें होत आहे तो थोडाबहुत तरी कमी व्हावा म्हणून केवळ परोपकारबुद्धीनें कृपावंत होऊन फौजदारी कायद्यांतील एका कलमांत लहानसा फेरफार करण्याचा विचार चालविला आहे. तों कित्येक सुशिक्षित विद्वान् व त्यांचीं पत्रें श्रुतिस्मृतींचे भलतेभलते अर्थ करून असंख्य अजाण लोकांस अपायकारक स्वातंत्र्याचें आमिष दाखवून व मिथ्याधर्माभिमानाचे मादक चषक त्यांच्यापुढें धरून त्यांच्या माथ्यांत मतिभ्रम उत्पन्न करीत आहेत...तसेंच उदार, सदय व लोककल्याणेच्छु सरकाराविषयीं राजनिष्ठ प्रजेचीं मनें कलुषित करण्याचा अप्रशस्त प्रयत्न करीत आहेत..."

**आगरकर व टिळक:**--टिळक-आगरकरांच्या काळाचा विचार करितांना थोडें मागेंपुढें पाहून समाजस्थितीचें अमळ निरीक्षण करणें वाङ्मयाच्या दृष्टीनें अवश्य आहे. निबंधमालेची कामगिरी संपवून विष्णुशास्त्र्यांनीं अधिक व्यापक दृष्टीनें लोकजागृतीचें काम करण्याचें ठरविलें व त्यासाठीं टिळक व नामजोशी यांच्या साह्यानें त्यांनीं न्यू इंग्लिश स्कूल १८८० मध्यें उभारलें. विष्णुशास्त्र्यांचें 'न्यू स्कूल' म्हणजे केवळ एक शिक्षणसंस्था नव्हती, ती नवीन विचारांची एक शाळा होती. ही शाळा काढण्यांत त्यांचे हेतु फार दूर पल्ल्याचे होते. ज्या नवीन विचारांची पेरणी त्यांनीं निबंधमालेच्याद्वारें केली होती ते विचार राष्ट्रांतील तरुणपिढीच्या अंतःकरणांत रुजवून तरुण राष्ट्रभक्तांचा वर्ग तयार करण्याची ती शाळा होती. न्यू स्कूल ह्म० नवीन विचारांची राष्ट्रीय शाळा,

देशभक्तीचें शिक्षण देणारी शाळा. विष्णुशास्त्र्यांचे खोल विचार कांहींसे टिळक व एक वर्षानें मागाहून शाळेस मिळणारे आगरकर या दोघांस कळले होते, मागाहून शाळेस मिळणाऱ्या शिक्षकांस ते मानवले होते असें दिसलें नाहीं. तरुण पिढी हातीं घेण्याचें साधन न्यू स्कूलच्या रूपानें हातीं घेतल्यावर सामान्य लोकांच्या शिक्षणासाठीं शास्त्रीबोवांनीं केसरीपत्र काढलें. त्या वेळच्या साप्ताहिकांची वर्गणी पांचसहा रुपये असे पण त्यांनीं केसरीची वर्गणी एक रुपयाच ठेवली. स्वस्तांत ज्ञानप्रसार करणें हा त्यांचा हेतु होता. दोन्ही संस्था आरंभापासून लोकप्रिय झाल्या, पण दोन वर्षांनींच त्यांवर दोन मोठीं गंडांतरें आलीं. कोल्हापूरच्या महाराजांचा नगर येथें ज्या तऱ्हेनें अंत झाला त्यावर केसरींत कडक टीका आली. आपली अब्रू साफ करून घेण्यासाठीं कोल्हापूरचे दिवाण माधवराव बर्वे यांनीं केसरीवर फिर्याद केली. पण एका विश्वासाच्या कुळानें ऐत्या वेळीं दगा दिल्यामुळें पुरावा पुढें आला नाहीं व आगरकरटिळकांना डोंगरीच्या तुरुंगाची हवा १०१ दिवस पहावी लागली! खटला चालू असतांच विष्णुशास्त्री वारले. साहाय्यक मंडळींनीं दोन्ही संस्था नेटानें चालविल्या. माधवराव गोळे, वासुदेवराव केळकर, वामनराव आपटे, नंदर्गीकर शास्त्री, गोपाळराव गोखले, चिं. गं. भानु, पाटणकर, धारप, वगैरे शिक्षक चांगले मिळाले. डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली, फर्ग्युसन कॉलेज निघालें. केसरीचे मुख्य संपादक आगरकर झाले, इतरही वेळोवेळीं केसरींत लिहीत. न्यू स्कूल कॉलेजचें धोरण व केसरीच्या लेखांचें धोरण याबद्दल मतभेद उत्पन्न झाले, स्वभावभेदाचीही त्यांत भर पडली. टिळक, पाटणकर, नामजोशी, धारप असा एक पक्ष झाला; आगरकर, आपटे, गोखले असा दुसरा पक्ष झाला. शिक्षकांच्या खोलींत उभयपक्षांचे वादविवाद होऊन ते हमरीतुमरीवर कसे येत हें समक्ष पाहिलेल्या त्यांच्या विद्यार्थ्यांपैकीं प्रस्तुतचा लेखक हा एक आहे! 'आमचे गुरुजी पोरांसारखे आपापसांत कां भांडतात' याचें आम्हां विद्यार्थ्यांस नवल वाटे. आगरकर व टिळक दोघेही विद्यार्थ्यांस प्रिय असत. आगरकरांचा उमदा व उल्हसित स्वभाव, मोकळें व निष्कपट मन, वादाची आवड व अंतःकरणाची निर्मळता हे गुण शिक्षक व लेखक या दोन्ही नात्यानें आमच्या परिचयाचे आहेत. टिळक व्यापक बुद्धीचे, सर्वविषयपारंगत, निगर्वी व गंभीर असे असत. दोघांच्या गुणांची छाप विद्यार्थ्यांवर पडत असे. हेच त्यांचे गुण पुढें त्यांच्या लौकिक वर्तनांत व लेखनभाषणांत प्रगट झाले. विद्यार्थ्यांना 'मोकळें मन रसाळ वाणी' या गुणांमुळें आगरकर फार आवडत, तथापि त्यांच्या विचारांचा कल टिळकांच्या विचारांकडे धांवे. एकाची अंतःकरणावर व दुसऱ्याची बुद्धीवर छाप पडे. दोघांविषयीं प्रेम व पूज्यभाव सर्वांस वाटे. दोघेही निरलस, त्यागी, देशाभिमानी होते. पाश्चात्य विचारांची छाप दोघांवरही

पडली होती. दोघेही आपल्या स्वार्थत्यागानें, कळकळीनें व लेखनचातुर्यानें लोकांत मान्य झाले आहेत.

सुधारणा दोघांसही पाहिजे होत्या. आगरकरांस त्या पौरुषप्रयत्नानें लौकर आणायच्या होत्या, टिळकांस सर्व प्रयत्न राजकारणासाठीं करावयास पाहिजे होता. आमच्या चालीरीतींत, रहाणींत, धर्मकल्पनांत, गृहस्थितींत पाश्चात्यांच्या बरोबरीचे आम्हीं दिसूं लागल्याशिवाय राजकीय हक्कांसाठीं झगडण्याची आम्हांस योग्यताच यायची नाहीं असा आगरपक्षाचा आग्रह असल्यामुळें आपल्या सुधारणाविषयक लेखांमुळें लोक संतापले, चिडले, त्यांनीं उपहास किंवा छळ केला तरी तो सोसण्याची त्यांची तयारी होती. आगरकर लोकक्षोभाविषयीं बेफिकीर होते, टिळकांनाही लोकक्षोभानें कार्य करून घ्यावयाचें होतें, पण आपापसांत तंटे होऊं न देतां तो राजकीय हक्कांसाठीं झगडतांना राखून ठेवायला पाहिजे होता, व तो लोकांना राजकीय शिक्षण देऊन त्यांचीं मनें तयार झाल्यावर योग्य प्रसंगीं प्रगट व्हायला पाहिजे होता! लोकांचीं मनें तयार करण्यांत त्यांनीं बहुत कष्ट भोगले व त्यापायीं सरकारचा छळ सोसण्यास ते तयार झाले. पाश्चात्य सुधारणा ज्यांना प्रिय त्यांना अर्थात् पाश्चात्यांचा संबंधही प्रिय. यामुळें सुधारकपक्ष सरकारला चिकटून राहिला, व लोकांना प्रिय झाला नाहीं. इकडे टिळकपक्ष सरकारला प्रिय वाटणें शक्य नव्हतें व लोकांना तो प्रियतर झाला. लोकांच्या कैवारानें सरकारशीं झगडायचें तर सरकारच्या रोषातोषांची क्षिती बाळगतां नये. सुधारकपक्षाच्या कपाळीं लोकांचा उपहास, छळ सोसणें आलें, पण सरकारच्या कोपांतून तो सुटला. टिळकपक्षाच्या शिरावर सरकारी अवकृपेची तिखट तलवार सर्वकाळ टांगून राहिली, पण लोकांच्या कृपाकटाक्षास तो पात्र झाला.

**सुधारकपक्ष व उद्धारकपक्षः**--भांडणें विकोपास जाऊन आगरकर केसरीपासून फुटले व त्यांनीं स्वतंत्र सुधारकपत्र काढलें. केसरी अर्थात् टिळकांचा झाला. टिळक व त्यांची मंडळी यांनीं शाळा व कॉलेज सोडलें. शिक्षकांच्या खोलींतले वाद व मतभेद सुधारक व केसरी यांच्याद्वारें चव्हाट्यावर आले. आगरकरांचा ओढा सामाजिक सुधारणेकडे ज्यास्त व टिळकांचा सर्वस्वी ओढा राजकारणाकडे. विष्णुशास्त्र्यांचें राजकीय धोरण टिळकांनीं संभाळलें व आगरकरांनीं 'इष्ट असेल तें बोलणार व शक्य असेल तें करणार' अशा बाण्यानें सुधारकांत सामाजिक व राजकीय लेख लिहिण्यास सुरवात केली. आगरकरांचा सुधारकपक्ष व टिळकांचा केसरीपक्ष--सामाजिक सुधारणा व राजकीय आकांक्षा. असे हे दोन पक्ष उत्पन्न झाले. इंग्रजांचें राज्य हिंदुस्थानांत झाल्यापासून आपलें स्वातंत्र्य व वैभव गेलें व आपण परदास्यांत लोळत पडलों ही पोटतिडिक दोन्ही पक्षांत सारखीच होती. ध्येय एक पण मार्ग भिन्न

असे हे दोन पक्ष पुण्यांत निर्माण झाले व दोन्ही पक्षांनीं देशांत चाललेल्या चळवळी आपापल्या कच्छपीं ओढण्याचा प्रयत्न केला. दोन्ही पक्षांकडे रथी-महारथी उभे राहिले. माधवराव रानडे, गोखले, भांडारकर, चंदावरकर इ० सुधारकवीर आगरकरांच्या बाजूचे. आगरकरांना राजकारणाचें वावडें होतें असें नाहीं. राजकीय चळवळ एकट्या टिळकांनींच केली असें नाहीं, ती सुधारणा-पक्षाचे वीर रानडे व गोखले यांनींही कांहीं कमी केली नाहीं. रानडे हे अर्थात् आगरकर व टिळक यांना गुरुस्थानीं शोभणारे, यांच्या पूर्वी दोन तपें सामाजिक व राजकीय कार्यांत मुरलेले. पुण्याच्या 'सार्वजनिक सभा' संस्थेचे चालक व त्याच नांवाचें इंग्रजी त्रैमासिक उत्कृष्ट चालविणार. राष्ट्रीय सभेचें जनकत्व त्यांजकडे, सामाजिक परिषद त्यांनीं चालविली, त्यांनीं मराठ्यांचा इतिहास व शिवाजीमहाराज यांजविषयीं त्यांनीं लोकांत अभिमान उत्पन्न केला. युनिव्हर्सिटींत मराठी भाषेच्या कैवारानें ते लढले. राष्ट्राच्या सर्वांगीण सुधारणेकडे लक्ष देणारा, व्यापकबुद्धीचा समतोल विचाराचा व कर्तबगारीचा थोरपुरुष रानड्यांच्या शेजारीं बसविण्यास दुसरा नाहीं. गोपाळराव गोखले त्यांच्या तालमींत तयार झाले व त्यांनीं राजकारण चांगल्याच धडाडीनें चालवून नांवलौकिक मिळविला. भांडारकर संस्कृतज्ञ पट्टीचे, विद्वानांतले विद्वान्. चंदावरकर, भांडारकर व रानडे हे समाजसुधारक व प्रार्थनासमाजाचे आधारस्तंभ एवढ्यापुरते एक. तिघेही सरकारी नोकर व सरकारच्या विश्वासांतले. रानड्यांना टिळकांप्रमाणें निर्भयतेनें राजकारणांत पडणें शक्य नव्हतें, पण प्राप्त परिस्थितींत त्यांनीं काम कमी केलें नाहीं. राष्ट्रसूत्रधार खरोखरीचे रानडे होत. गोखले सामाजिकसुधारणेंत फारसे पडले नाहींत. त्यांच्या स्नेहामुळें हरिभाऊ आपटे सुधारणापक्षांत शिरले. त्यांच्या कांहीं कादंबऱ्या सामाजिक आहेत. पण विष्णुशास्त्री-टिळकांचें राजकीय धोरण त्यांना अमान्य होतें असें त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांवरून कोणासही म्हणतां यावयाचें नाहीं. ज्ञानप्रकाशपत्र गोपाळराव देशमुखांच्या वेळेपासून सुधारकपंथाचें, पण सुधारणेचीं मतें आपल्या चटकदार, तिखट लेखांनीं नवीन पिढींत पसरविण्याचें काम ७-८ वर्षांत आगरकरांनीं केलें असें कोणी केलें नाहीं. ह्या सुधारणापक्षाच्या कार्याला रंग चढला टिळकप्रभृति विद्वानांच्या विरोधामुळें व टिळकांची लोकप्रियता वाढीस लागली. या पक्षाच्या वादामुळें 'परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ !' कलहाशिवाय, वादविवादाशिवाय, वर्दळीशिवाय, भांडणा-शिवाय सार्वजनिक कामच यावेळेपासून होईनासें झालें ! सुधारककेसरींचे झगडे त्यावेळच्या वाचकांना सुखाच्या गुदगुल्या करीत. चहाप्रकरण, ग्रामण्य-प्रकरण, रानड्यांचें प्रायश्चित्त, पंडिता रमाबाईंचीं व्याख्यानें व त्यांचें शारदा-सदन, संमतिवयाचें बिल व त्यावरील उभयपक्षांच्या सभा, लेख व हमरी-

तुमरींचीं भांडणें, ‘ होऊं द्या तर दोन हात ’ असले आगरकरांचे लेख व ‘ पुराव्याचे माप घ्या पदरांत ’ असल्या मथळ्यांचे टिळकांचे लेख, ‘ पुण्यांतील गवताच्या गंजी’वर आगरकरांचे लेख व ‘ गंजीवरील कुत्रा ’ ही टिळकांनी त्यांस दिलेली पदवी, मिशनऱ्यांच्या हातचा भात खाल्ल्याबद्दल आगरकरांचा टिळकावर आक्षेप व टिळकांनीं आगरकरांवर केलेली फिर्याद व ‘ बोलणें फोल झालें—डोलणें वायां गेलें ’ या मथळ्याखालीं आगरकरांनीं मागितलेली माफी, पुण्याची काँग्रेस, काँग्रेसच्या मंडपांत सामाजिक परिषद् भरूं न देण्याचा पुणेकरांचा निश्चय, जुन्या पक्षाचें धुरीणत्व टिळकांनीं पत्करल्यामुळें सुधारकांचा त्यांवरील क्षोभ व सुधारककेसरींत परस्परांनीं परस्परांवर केलेल्या पुष्पांजलि इ० खळबळ उडविणाऱ्या अनेक गोष्टींनीं, वादांनीं व सभांनीं पुण्याचें वातावरण क्षुब्ध झालेलें—त्यांत सोमवारचा सुधारक व मंगळवारचा केसरी पाहण्याविषयीं व ‘ कोणी कोणाची कशी उडविली ’ याबद्दल उभयपक्षीयांचे व त्यांच्या अनुयायांचे कज्जे—या सर्वांमुळें एवढें झालें कीं लोक सुधारक व केसरी दोन्ही पत्रें ईर्ष्येनें वाचूं लागले व वाचक वाढल्यामुळें लेखकांच्याही अस्तन्या वर सरल्या ! परिणाम व्हायचा तोच झाला. दोन पक्ष पुण्यांत कायम झाले, त्यांचें वैमनस्य वाढलें, अनुयायांनींही वैमनस्यपरंपरा चालविण्याचें ठरविलें, हें पक्षभेदाचें महापिशाच पुण्याच्या बाहेरही थैमान घालूं लागलें व त्यानें सारा महाराष्ट्र आक्रमिला !

आतां टिळक पक्षास पाठिंबा कोणाचा होता तें पाहूं. पुणेंवैभवकर्ते केळकर हे जुन्या पक्षाचे अभिमानीं होते. व हे आपल्या पत्रांत सुधारक व सुधारणा यासंबंधानें फार टीका करीत. त्यांच्या पत्राचा त्यावेळीं खपही चांगला असून तें लोकप्रिय होतें व म्हणून तर हरिभाऊ आपट्यांनीं आपली पहिली कादंबरी पुणेंवैभवमधूनच क्रमशः प्रसिद्ध केली. केळकरांची मराठी भाषा शुद्ध व जोरदार असे. कोटीक्रम करण्यांत ते आगरकरांच्या वर ताण होते. एका सुधारणेच्या टोंकास आगरकर ओढीत व दुसऱ्या जुन्या मताच्या टोंकास केळकर ओढीत ! केळकर हे रानडे व आगरकर यांजवर तुटून पडत व कधींकधीं टिळकांसही त्यांचा प्रसाद मिळे, तथापि सुधारकपक्षावर हल्ला चढविण्याचें कामीं पुणेंवैभवकरांचें केसरीस साह्य चांगलेंच होतें. आगरकरांचा लेखसंग्रह जसा पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाला तसा केळकरांचा झाला असता तर उभयपक्षांचीं मतें व टीका एकदम वाचावयास मिळालीं असतीं. जुन्या पक्षाचें दुसरे कैवारी प्रो. जिनसीवाले यांच्या व्याख्यानांत इतिहास, शास्त्रें, पुराणें, महाभारत यांचे आधार अनायासें ऐकावयास मिळत व यामुळें तरुण विद्यार्थ्यांची व जुन्या लोकांची व्याख्यानश्रवणास अतोनात गर्दी

जमत असे. हेही आगरकरांसारखेच एम्. ए. होते. हे मुंबईस संस्कृतचे प्रोफेसर होते पण पुढें हे पुण्यास येऊन राहिले होते. हे आचारविचारानें आगरकरांच्या अगदीं विरुद्ध दिशेचे होते. यांची स्नानसंध्या, पूजाअर्चा, नित्य नियमानें तीन तीन तास चाले. टिळक यांना गुरुप्रमाणें मान देत. उभयतांच्या बैठकी व प्रेमाचे प्रसंग प्रस्तुत लेखकानें पाहिले आहेत. हे जाज्वल्य धर्माभिमानी व उत्कट देशाभिमानी होते व उत्तम वक्ते होते. इंग्रजीविद्येंत हे निष्णात असून यांनीं संस्कृत उत्तम पाहिलें होतें. आगरकर मूर्तिपूजेची हेटाळणी करीत तर हे चांगले उपासक असून जोगेश्वरीच्या दर्शनास गेले कीं अर्धा तास सद्गदित अंतःकरणानें स्तोत्रपाठ म्हणत बसत. वेद पौरुषेय आहेत एवढें यांचें सुधारकी मत वगळलें तर हे जुन्या पक्षाचे पूर्ण कैवारी होते व टिळकांस यांचा पाठिंबा असे. अण्णासाहेब पटवर्धन ही एक पूज्य मूर्ति टिळकांना वेळोवेळीं हवें तें साह्य द्यावयास तयार असे. हे आळंदीच्या नृसिंहसरस्वतींचे सच्छिष्य असून उत्तम कायदेपंडित व नामांकित वैद्य होते व सत्पुरुष म्हणून पुण्यास यांना सर्व मान देत. टिळकांचे मित्र नामजोशी यांचें त्यांना हरएक बाबतींत पूर्ण साह्य होतें. पुण्याच्या व्यापारी व धंदेवाल्या लोकांत यांचें वजन असून त्या वर्गांत नामजोश्यांमुळें टिळकांचा प्रेमप्रवेश झाला. नारायण बापूजी कानिटकरांचीं सुधारणाविरोधी नाटकेंही त्यावेळीं चांगलीं लोकप्रिय झालीं होतीं. श्रीमंत बाळासाहेब नातु हे जुन्याचे कैवारी म्हणून सभा, ग्रामण्यें वगैरे कामांत केळकरांबरोबर पुढाकार घेत. टिळकांचे स्नेही श्री. बाबामहाराज यांचें त्यांना अनेकप्रसंगीं उत्तम साह्य झालें आहे. तात्पर्य, रानडे, गोखले, भांडारकर, आगरकर यांच्या सुधारकपक्षाशीं सामना देण्यास टिळकांचे साहाय्यक प्रो० जिन्सीवाले, अण्णासाहेब पटवर्धन, पुणेंवैभवकार केळकर, नामजोशी, श्री. बाबामहाराज व बाळासाहेब नातु इ० मंडळी तयार होती. व ८।१० वर्षें पुणें शहर उभयपक्षांच्या वादांनीं गजबजून गेलें व या सर्वांचा त्यावेळच्या व तदनंतरच्या वाङ्मयावर परिणाम घडलेला आहे. कौरव-पांडवांच्या सैनिकांप्रमाणें वादसंगराच्या रणमैदानावर उभयपक्षांचे योद्धे आगरकरटिळकांच्या आधिपत्याखालीं अष्टवार्षिक युद्धांत सतत लढले. संमतिबिल व पुण्याची कांग्रेस या दोन प्रसंगांनीं एकंदर समाज टिळकांच्या पाठीशीं उभा आहे व सामाजिक सुधारणेपेक्षां राजकीय हक्कांची किंवा स्वराज्याची भूक लोकांस अधिक आहे हें निदर्शनास आणलें. जनीजनार्दनानें ‘ परि माझा पांडवांकडे ओढा ’ या वचनाप्रमाणें बहुजनसमाजाच्या वतीनें आपला निर्णय दिला. पुढें टिळकपक्षास शिवरामपंत परांजपे यांची बहुमोलाची जोड मिळाली.

‘ सुधारक ’ काढण्याचा हेतु पहिल्याच लेखांत सांगतांना आगरकर म्हणतात, “ हिंदुस्थान हें जरठ झाड कसेंतरी अजून उभें आहे, पण त्यांत

कांहीं त्राण उरलेलें नाहीं. त्याला नवीनावस्था आणण्यास एकच उपाय आहे. तो कोणता म्हणाल तर त्याची खूप खची करून त्यास अर्वाचीन कल्पनांचें भरपूर पाणी द्यावयाचें!...पाश्चिमात्त्य नवीन शिक्षणाचें व त्याबरोबर ज्या नवीन कल्पना येत आहेत त्यांचें अभिनंदन करून त्यांचा आम्हीं अंगिकार केला पाहिजे. आमच्या समाजव्यवस्थेंत असलेलीं दोषस्थळें वारंवार लोकांच्या नजरेस आणावीं, तीं दूर करण्याचे उपाय सुचवावे व युरोपीय सुधारणेंत अनुकरण करण्यासारखें काय आहे तें पुनः पुन्हा दाखवावें यास्तव हें सुधारक पत्र काढलें आहे."

"ज्यास पाश्चिमात्त्य शिक्षण मिळतें त्याच्या विचारांत मोठें अंतर पडून त्यास आपल्या लोकांची सामाजिक व धार्मिक सुधारणा युरोपाच्या वळणावर जावी असें वाटूं लागतें, व तदनुसार त्याचें वर्तन होऊं लागलें असतां सरकारास साहजिकपणें तें आवडतें होतें. जुन्यानव्यांत कलह झाला कीं, सरकार उदासीनपणें त्याकडे पाहात बसतें. नवीन लोकांस हें पक्कें ठाऊक झालें आहे कीं जुन्या लोकांचे धार्मिक व सामाजिक विचार सरकारास बिलकूल पसंत नाहींत. पण जुन्या लोकांस असें वाटत आहे कीं, बहुजनसमाज आपल्या बाजूस आहे. इकडे नव्या लोकांस असें वाटतें कीं, आपल्या मतास सरकारची अनुकूलता आहे तेव्हां आपण जुन्या लोकांची फारशी प्रतिष्ठा बाळगण्याची गरज नाहीं. त्याप्रमाणें प्रत्येकास आग्रह धरून बसण्यास एकेक कारण सांपडलें असल्यामुळें उभयतांत तोडजोड होण्याची आशा मुळींच दिसेनाशी झाली आहे." "राज्यकर्त्यांनीं हिंदूंच्या धर्माचरणांत व सामाजिक आचरणांत हात घालावयाचा नाहीं असा संकल्प केला आहे, तथापि त्यांचा ओढा हिंदुसुधारकांकडे आहे हें निर्विवाद आहे."

**तात्पर्यः**—आगरकरांच्या निबंधांत कांहीं औद्योगिक ऊर्फ व्यापारी विषयांवरचे, थोडे प्रचलित राजकीय विषयांवरचे व बाकीचे ह्म० बहुतेक सामाजिक सुधारणेवरचे आहेत. धार्मिक म्हटल्या गेलेल्या निबंधांत धार्मिकपणा कांहींच नाहीं, ते सामाजिकच आहेत. केसरीचें संपादकत्व त्यांजकडे असतांना, आगरकरांचीं सुधारणानुकूल मतें चालकवर्गास पसंत नसल्यामुळें, त्यांना प्रचलित राजकीय प्रकरणांवरच लिहावें लागें; पण स्वतंत्र 'सुधारक' पत्र काढल्यावर त्यांनीं सामाजिक विषयांवरच झोड उठविली व आपल्या मनांत घोळत असलेल्या विचारांचा पाट फोडून दिला. त्यांच्या एकंदर निबंधांपैकीं फार थोडे निबंध चिरकालीन स्वरूपाचे आहेत. प्रचलित, राजकीय किंवा सामाजिक घडामोडींना व चळवळींना धरून त्यांनीं आपले लेख लिहिले असल्यामुळें त्यांत चिरकालीन महत्त्वाचें असें कांहीं नाहीं. स्पेन्सर, मिल्ल वगैरे पाश्चात्त्य तत्त्व-

ह्यांचे ग्रंथ किंवा ग्रीस, रोम, इंग्लंड वगैरे देशांचे इतिहास त्यांनीं पाहिले होते. तेव्हां त्यांचेच सिद्धांत चालू परिस्थितीला लावून दाखविण्यांत त्यांनीं आपली करामत खर्च केली, पण स्पेन्सरसारख्यांचे सिद्धांत युरोपांतच खंडित झाल्यामुळें आगरकरांच्या लेखांला त्या दृष्टीनें तादृश महत्त्व उरलें नाहीं. आगरकरांनीं समाजशास्त्राचा विशेष खोल अभ्यास केला किंवा शाश्वत स्वरूपाचे सिद्धांत सांगितले असें नाहीं. ॲडिसन, जॉन्सन, ह्यूम, बेकन व विष्णुशास्त्री यांच्या निबंधांचा भारदस्तपणा किंवा प्रौढी आगरकरांच्या निबंधांना नाहीं, तरी कळकळ, भाषेचा साधेपणा, चटकदारपणा, विनोद, हे गुण त्यांच्या लेखणींत असल्यामुळें विशेष प्रकारचा मोहकपणा आहे. स्पेन्सरप्रभृति ग्रंथकारांच्या आधारानें त्यांनीं जे लेख लिहिले आहेत त्यांतही अवजडपणा बिलकूल नसून अत्यंत साधेपणा किंवा सफाई आहे. जुने शास्त्रीपंडित किंवा भटभिक्षुक अगर जुन्या मताचे गृहस्थ याच्यांवर आगरकरांनीं एककल्लीपणाचे जे आरोप जागोजाग केले आहेत त्याच आरोपांला ते स्वतःही पात्र झाले आहेत. जुन्या लोकांना युरोपीय शास्त्रें, समाजघटना व वर्तमानपरिस्थिति यांचें ज्ञान नसल्यामुळें त्यांचीं मतें जर एकदेशीय; तर आगरकरांना किंवा त्यांच्या वर्गांतल्या वहुतेक लेखकांना चालू काळाच्या मागील पिढ्यानपिढ्यांची राष्ट्रीय-परंपरा ठाऊक नसल्यामुळें त्यांच्या लेखांतही दुसऱ्या प्रकारचें एकदेशीयत्व आलें आहे. वेद, शास्त्रें, पुराणें, व्यास, वाल्मीकि, शंकराचार्य, ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, तुळशीदास इत्यादि हिंदूराष्ट्राची परंपरा कायम ठेवणाऱ्या तत्त्ववेत्त्यांच्या किंवा साधुकवींच्या ग्रंथांची आगरकरांना ओळखही नव्हती. कॉलेजचा अभ्यास-क्रम संपल्याबरोबर ते झाले शिक्षक व संपादक. पुण्याच्याबाहेर ते फारसे पडलेच नव्हते व लोकस्थितीची त्यांना जाणीवही नव्हती. जुन्या लोकांना स्पेन्सरमिल्ल यांचे विचार माहीत नव्हते; त्यांना व्यास-वाल्मीकांची ओळख नव्हती. जुने लोक जुन्याला तें सोनें म्हणून चिकटून बसत, हे नव्यालाच हें सोनें म्हणून चिकटून बसले ! आपल्या राष्ट्रांचें वैशिष्ट्य त्यांना कळलें नाहीं, आपली राष्ट्रीय-संस्कृति अनेक परिस्थितींशीं टक्कर देऊन टिकाव धरून कां व कशी राहिली आहे याचें रहस्य त्यांना उमगलें नाहीं. चालू परिस्थितीच्या ओघाबरोबर ते वाहवले व त्या ओघाबरोबर वाहवणाऱ्या लोकांनाच त्यांचे विचार मान्य झाले. आपल्या राष्ट्रीय संस्कृतीचें परिज्ञान ज्याला झालें आहे व चालू देशकालवर्तमानही ज्यानें जाणलें आहे अशा विवेकी पुरुषाच्या वाणींत जो समतोलपणा व प्रौढपणा येतो तो आगरकरांच्या लेखांत नाहीं. काळाच्या ओघाबरोबर वाहवणाऱ्या व चालू परिस्थितीच्या मागें व पुढें नजर नसलेल्या उच्छृंखल पुरुषानें जसें लिहावें तसेंच त्यांनीं लिहिलें आहे.

---

# कांहीं मराठी लेखकांचें निधन.

गेल्या वर्षांत मराठी भाषेच्या अंगणांत आपापल्या बुद्धिक्रमानुरूप विहार करणाऱ्या चारपांच चांगल्या लेखकांचें निधन झालें याबद्दल आम्हांस फार वाईट वाटतें प्रो. **शिवरामपंत परांजपे, प्रो. भानु, रा. बाळकृष्ण अनंत भिडे,** इंदोरचे बा. ना. **देव** व आनंद मासिकाचे कर्ते **वासुदेव गोविंद आपटे** हे सर्वच चांगले कसलेले लेखक व आपापल्या आवडीनिवडीप्रमाणें आजन्म लेखनव्यासंग ठेवणारे गृहस्थ कालमुखीं पडल्याचें वृत्त महाराष्ट्रास यापूर्वी कळलेंच आहे. हे सर्वजण आमच्या परिचयाचे होते. प्रो. **भानु** आमच्या विद्यालयकालीन अवस्थेंत आमचे इतिहासाचे अध्यापक होते. यांचा 'नाना आणि महादजी' हा निबंध त्यावेळीं फार गाजला होता. यांनीं गीताभाष्य मराठींत आणलें होतें व ७।८ उपनिषदांवर मराठींत भाष्यभाषांतरें प्रसिद्ध केल्याचें महशूरच आहे. यांची आनंदी वृत्ति, निरोगी शरीरयष्टि व उत्साह अखेरपर्यंत कायम असे. पेशवाईकालीन मराठ्यांच्या इतिहासाचा यांचा अभ्यास चांगला होता, व त्यांची व्याख्यानशैली चित्ताकर्षक होती. **भिडे** यांनीं निबंधवजा दोनतीन पुस्तकें लिहिलीं असून चिकित्सक व टीकाकार म्हणून यांची प्रसिद्धि होती. यांनीं आमच्या बहुतेक पुस्तकांवर कांहींनाकांहीं टीकारूपानें लिहिलें आहे. कठोर टीकेच्या भरांतही गुणग्रहणदृष्टि लुप्त न होणें हा त्यांच्या टीकेंत एक विशेष गुण होता. **देव** हेहि इतिहासाचे भोक्ते असून प्रांजळ टीकाकार होते. **वासुदेव गोविंद आपटे** हे शाळामास्तर, ज्ञानप्रकाश व मल्हारीमार्तंड यांचे संपादक होते. पण यापेक्षां बालवाङ्मयाचे उत्पादक व प्रसारक म्हणून यांची ख्याति सर्वत्र होती व या दृष्टीनें त्यांची कामगिरी टिकाऊ आहे. त्यांचें 'आनंद' मासिक आबालवृद्धांत प्रिय असे. त्यांनीं २।३ कादंबऱ्या व 'अशोकाचें चरित्र' यांसारखीं कांहीं सुंदर पुस्तकें लिहिलीं आहेत. ओकांच्या 'बालबोधा''च्या नमुन्यावर यांनीं 'आनंद' सुरू केला व त्याच्या सर्वांगीण सौंदर्याकडे लक्ष दिल्यामुळें 'आनंद' लौकरच लोकप्रिय झाला व बालशिक्षणाचें काम त्यानें खरोखरच फार उत्तमप्रकारें केलें आहे. आपट्यांची शरीरप्रकृति यथातथाच असे, दोनतीनदां तर घोंगडीवर त्यांना काढलें होतें. मृत्यूशीं झगडत त्यांनीं दोन तपें काढलीं व तीं सततोद्योग-रत होऊन काढलीं. यांचा पुत्र आनंद व लाडकी कन्या वारल्यामुळें संसाराची वाताहात झाली. तथापि आपली आनंदीवृत्ति व उद्योगपरता लवमात्र यांनीं

ढळूं दिली नाहीं. हा यांचा गुण फार प्रशंसनीय असे. सतत वाचावयाचें व कांहींनाकांहीं लिहायचें यांत ते रत असत. याप्रमाणें आमरण उत्साहपूर्वक विद्याव्यासंग यांनीं टिकवला हा यांचा विशेष असे. प्रो. परांजपे यांच्याबद्दल पूर्वीं लिहिलेंच आहे. या सर्वांनीं साठी पाहिली होती.

---

# स्वयंवराचे दुष्परिणाम !

पोलंडमधील "विवाहसहायकारी संस्थे" (Marriage Bureau) च्या अध्यक्षांनीं आपलें मत नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. त्यांत ते लिहितात कीं आमच्या संस्थेनें आतांपर्यंत चाळीस हजारांपेक्षां अधिक लग्नांचे योग जुळवून आणले आहेत. या सर्व लग्नांच्या बऱ्यावाईट परिणामांचें आम्हीं अत्यंत सूक्ष्म निरीक्षण करून कोणत्या प्रकारच्या लग्नाचे काय परिणाम झाले, या संबंधाच्या अनुभवाचीं आम्हीं काळजीपूर्वक कोष्टकें बनवलीं आहेत. या कोष्टकांच्या निरीक्षणानें विलक्षण अनुमानें निघत आहेत. त्यांचा विचार विवाह करूं इच्छिणारांनीं करण्यासारखा आहे. सध्यांच्या युरोपमधील विवाहाचे मुख्य तीन प्रकार आहेत, (१) एक, केवळ नवरानवरीच्या स्वयं पसंतीनें होणारें स्वयंवर, (२) दुसरे, त्यांच्या पसंतीबरोबरच आईबापांची संमति मिळून झालेले विवाह व (३) तिसरे, आईबापांनीं स्वतः आपल्या मुलामुलींसाठीं नवरी किंवा नवरा यांचे कुलशील पाहून निवड करून त्या योजनेस आपल्या मुलांची संमति मिळवणें व असा विवाह घडवून आणणें. या तीन प्रकारच्या विवाहांमध्यें पहिल्या प्रकारानें झालेल्या विवाहांमध्यें शेंकडा सत्तर विवाह काडी मोडून व भांडणें होऊन मोडले जातात. मधल्या प्रकारच्या विवाहामध्यें काडी मोडण्याचें प्रमाण त्यापेक्षां कमी असतें व जे विवाह आपल्या मुलीसाठीं किंवा मुलासाठीं कुलशील व दोनही कुटुंबांची आर्थिक परिस्थिति पाहून आईबापांनीं घडवून आणलेले असतात, त्या विवाहांमध्यें काडी मोडण्याचे प्रसंग अगदींच थोडे म्हणजे शेंकडा पांचसुद्धां नसतात, म्हणजे शेंकडा ९५ कुटुंबें आनंदांत असतात. यासाठीं कुटुंबस्वास्थ्याच्या दृष्टीनें आईबापांनीं कुलशील पाहून व आपल्या मुलांमुलींचें हित दृष्टीसमोर ठेवून घडवून आणलेले विवाह पुष्कळ निर्दोष असतात, यांत शंका नाहीं."

(पोलंड देश युरोपामध्यें आहे. त्या देशांतील चाळीस हजार विवाहांचा योग ज्या संस्थेनें घडवून आणला व इतक्या विवाहांचे परिणाम ज्यांनीं

काळजीपूर्वक ताडून पाहिले, त्यांचें वरील मत हिंदी लोकांनीं मनन करण्यासारखें आहे. सध्यां स्वयंपसंतीकडे हिंदी शिक्षितांचें मन वळूं पाहात आहे. ही पद्धति कांहीं जातींत हिंदुस्थानांत अति प्राचीन काळींही होती. पण अनेक कटु अनुभव आल्यामुळें तरुण मुलांमुलींच्या पसंतीची बाब त्यांनीं बंद करून आईबापांनीं कुलशील गोत्र प्रवर व वधूवरांची योग्यता पाहून आपल्या मुलांमुलींचा विवाह करण्याची पद्धति सुरू केली. हीच पद्धति युरोप व अमेरिकेंतील समंजस लोकांना आतां पसंत पडूं लागली आहे, ही गोष्ट वरील उताऱ्यावरून दिसून येईल--संपादक पु० ) —पुरुषार्थ मासिक.

---

# इंग्रज विधवांची स्थिति.

माइनहेडमध्यें भाषण करतांना सर थॉमस डेविज एम्. पी. यांनीं स्वतःला नुकतांच एक आलेला अनुभव प्रसिद्ध केला. तो असा—

ते एका वेल्श शहरीं व्याख्यान देत होते व विधवापेन्शनच्या कायद्याची फोड करून सांगत होते. पुनर्विवाहित विधवांचा प्रश्न येऊन पोंचतांच एक मुलगी म्हणाली, " स्त्रियांनीं पुनर्विवाह करणें बरें नव्हे. "

" कां बरोबर नाहीं ?" सर थॉमसनीं आश्चर्यानें विचारलें.

" विधवांनीं पुनः विवाह करणें बरें नव्हे" त्या मुलीनें उत्तर दिलें. "विधवांच्या पुनर्विवाहाला बंदी करणारा एकादा कायदा आपण करावा असें आम्हां कुमारिकांचें तुम्हांस सांगणें आहे."

" कां बरें ?" वक्त्यांनीं विचारलें.

" कारण आम्हां कुमारिकांना पुरतील इतकी देखील पुरुषांची संख्या नाहीं. पुरुषांची संख्या वाढेपर्यंत विधवांना लग्न करण्याला परवानगी नसावी. "

[ विधवापुनर्विवाहाचा विचार करणारांनीं या संवादाचा विचार करावा. विधवा या पुनर्विवाह करूं लागल्यानें कुमारिकांचीं लग्नें होईनात अशी स्थिति युरोपमध्यें उत्पन्न झाली आहे म्हणून युरोपमध्यें कुमारिका ह्या विधवाविवाहाच्या विरुद्ध झाल्या आहेत. ]

—पुरुषार्थ

---

# श्रीशंकराचार्यांचें अस्पृश्यांस उत्तर.

परमप्रिय शिष्यकोटिप्रविष्ट रा. रा. संपादक 'सुदर्शन' यांस—नारायण स्मरणपूर्वक दीर्घायुष विशेषः—

श्री. शिवराम जानबा कांबळे यांजकडून ता. ११।१२।२९ चे पुरवणी ज्ञानप्रकाशांत 'शारदापीठाच्या आचार्यांस सवाल' ह्या हेडिंगाखालीं विचारलेल्या दोन प्रश्नांचीं उत्तरें त्याच ज्ञानप्रकाशपत्रांत प्रसिद्ध करण्याकरितां ता. १३।१।३० रोजीं मुंबईंतील ज्ञानप्रकाश ऑफिसांत पाठविलीं होतीं. त्यास आज एक महिन्यावर दिवस होऊन गेले, परंतु अद्यापपर्यंत 'ज्ञानप्रकाश' कारांनीं तीं प्रसिद्ध केलीं नाहींत. म्हणून तीं आपल्या 'सुदर्शन' पत्रांत प्रसिद्धीकरितां पाठविण्याची आज्ञा झाल्यावरून आपणाकडे पाठविलीं आहेत तरी, येत्या अंकांत प्रसिद्ध करावीं. इतिशिवम् ता. १५।२।३०.

श्रींचे आज्ञेवरून

**यज्ञेश्वर गोविंद मराठे**

कारकून, महाराष्ट्र विभाग

संस्थान श्रीशारदापीठ.

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य जगद्‌गुरु शंकराचार्य श्रीशारदा पीठाधीश्वर श्रीमद् राजराजेश्वराश्रम स्वामीमहाराज यांजकडून:—

शिवराम जानबा कांबळे यांस शुभाशीर्वादपूर्वक कळविण्यांत येतें कीं, ता. ११।१२।२९ चे बुधवारचे पुरवणी ज्ञानप्रकाशांत आपण 'श्रीशारदा पीठाच्या आचार्यांस सवाल' या मथळ्याखालीं लेख लिहून दोन प्रश्न विचारले आहेत. प्र. १ ला 'धर्म म्हणजे काय?' व प्रश्न २ रा 'आज तीन हजार वर्षांपासून आमच्यापैकीं जे धर्मानें वागले त्यांचा जन्म कोणते गांवीं व ज्ञातींत झाला व त्यांचीं नांवें काय?' वरील गोष्टी आम्हांस समजल्या म्हणजे शंकराचार्य सांगतील त्या धर्मानें आम्ही वागूं.

**प्रश्न १ चें उत्तरः**—धर्म दोन प्रकारचा आहे; एक सामान्य धर्म व दुसरा विशेष धर्म. सामान्य धर्म म्हणजे नवखंड पृथ्वीवरील मनुष्यमात्रास लागू पडणारा. त्यांत सांप्रदाय अथवा मतमतांतर, देश विदेश वगैरे फरक कांहीं नाहीं. तो हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती वगैरे सर्वांचा सारखाच आहे. त्या धर्माचे चार विभाग आहेत. ते सत्य, शौच, दया आणि ज्ञान. हे प्रत्येक मनुष्य-

मालाला लागू पडणारे आहेत. यांत कोणी तक्रार करणें शक्य नाहीं. व कोणी करीतही नाहीं. त्यांचा अर्थ उघडच असल्यानें त्याच्या विशेष खुलाशाची जरूर नाहीं. कदाचित् हे धर्म कोणी पाळींत नसतील तर ते मनुष्यरूपी पशूच होत. आतां विशेष धर्म म्हणजे भारतवर्षाचा धर्म; अथवा वर्णाश्रमधर्म होय. त्यांत चार वर्ण आणि चार आश्रम आहेत. यांतून भ्रष्ट झाले-ल्यांना वर्णसंकरप्रजा म्हणावें; त्यांतून अठरा वर्ण निघाले. ते चार वर्ण आणि हे अठरा वर्ण ( जाती ) वेदकालापासूनच आहेत; म्हणजे सनातन आहेत. अर्थात् पूर्वसृष्टींत पण होते ही गोष्ट वेदशास्त्रांच्या प्रमाणावरून निश्चित आहे. ते न मानणारास हिंदू ह्मणतां येणार नाहीं. त्यांतील मर्यादेनुसार स्पृश्यअस्पृश्य, भक्ष्य–अभक्ष्य, लग्न–अलग्न, वगैरे निर्णय शास्त्रांचे द्वारे झालेले आहेत. तरी कित्येक व्यक्ती केवळ अज्ञानानें व कित्येक व्यक्ती जाणून बुजून वरील अस्पृश्य–स्पृश्य वगैरे बंधनें हीं हिंदूधर्मास कलंकरूप आहेत वगैरे ओरड करतात; त्यांत मूर्खपणाशिवाय कांहीं अर्थ नाहीं. खरें पाहूं गेल्यास स्पृश्यास्पृश्य वगैरे बंधन हें हिंदूधर्माचें भूषण आहे. ज्यावेळीं हीं बंधनें किंवा मर्यादा तुटतील त्यावेळीं भारतवर्षांतील हिंदू-धर्माचें पतन समजावें, ही गोष्ट सर्वांनीं पूर्णपणें ध्यानांत ठेवावी.

**प्रश्न २ चें उत्तरः**—हा प्रश्न, गेल्यां जन्मीं कोण होतों व कोणते गांवीं, तसेंच या जन्मीं कोण आहें, व कोणत्या गांवांत हें सांगावें असा आहे. अशा प्रश्नाचें उत्तर त्रिकालज्ञानी कोणी असेल तो देऊं शकेल, इतर देऊं शकणार नाहीं. तरी पण अनुमानानें चालू मर्यादेवरून, चालचालणुकी-वरून साधारण मानानें देतां येण्यासारखें आहे. त्याचा खुलासा येणेंप्रमाणेः— " परमात्मा सर्वव्यापी व प्रीतिमान् आहे; दयाळू आहे. सर्वांतर्यामी आहे. सर्वगुणसंपन्न आहे. असें असून एकास महाराजा, एकास राजा, एकास मोठा अधिकारी, एकास लहान अधिकारी, एकास मोठा जमीनदार, एकास लहानसें कूळ, एकास न्हावी, एकास धोबी, एकास अमीर, एकास गरीब, एकास धष्टपुष्ट—निरोगी, तर एकास अशक्त रोगी, एकास अत्यंत सुखी तर एकास मरणप्राय दुःखी बनवितो. याचा विचार करूं लाग-ल्यास कांहींतरी भेद किंवा हेतु असला पाहिजे व तो म्हणजे पूर्वजन्मींच्या कर्मानुसार या जन्मींची परिस्थिति प्राप्त होते असें म्हटल्यावांचून सुटका नाहीं. या बाबतींत विचार केला म्हणजे प्रथम प्रश्नांत सांगितल्याप्रमाणें (साधारण धर्म व विशेष धर्म ) एक साधारण कोटींतला मनुष्य, तर दुसरा विशेष कोटींतला मनुष्य, असे भेद पाडावे लागतात. आणि साधारण कोटींतल्या भारत-वासी मनुष्यास पूर्वी सांगितलेला विशेष धर्म म्हणजे वर्णाश्रमधर्मरूपी कर्ममार्ग लागू पडतो. अशींच माणसें जन्म, मरण, मोक्ष, नरक, उच्चत्व, नीचत्व, स्पृश्य,

अस्पृश्य, सुखदुःख मानतात; त्यांतही विशेष कोटींतल्या महाज्ञानी पुरुषाला कोणतेंही बंधन लागू पडत नाहीं. असे पुरुष उच्च-नीच, जन्म-मरण, सुख-दुःख, स्वर्ग-नरक, गरीब श्रीमंत, राव रंक, स्त्रीपुरुष, तहानभूक, संतोषअसंतोष, शीतउष्ण, वगैरे वगैरे भावनांपासून मुक्त होतात. याच कारणामुळें भारतवर्ष श्रेष्ठ गणला जातो.

साधारण कोटींतल्या मनुष्यांपैकींच कित्येकांबद्दल वादविवाद चालू आहे व त्याचींच उदाहरणें येथें दाखवावयाचीं आहेत, तीं येणेंप्रमाणें:--जे अत्यंत सत्कर्में करून वर्णमर्यादा पाळून सुखदुःख, मानअपमान सोसून मनुष्यधर्माचे नियम जे सत्य, शौच, दया ते सांभाळून परमात्म्याचें चिंतन करीत स्वधर्म पाळून राहिले तेच आज कित्येक उच्चवर्णांत जन्मास आले असतांही पूर्व-जन्मींच्या वासनांचा त्याग करूं शकत नाहींत व तेच आज समाजसमतेचा गिल्ला करीत आहेत. ते अशा रीतीनें स्वतःच्या मर्यादांचा त्याग करतील तर पुन्हा पतन पावतील.

दुसरें, तशाच धार्मिक अंत्यजांपैकीं कित्येक उच्च वर्णांत म्हणजे स्पृश्य-वर्गांत जन्मले असून पूर्ववासना असतांही मनःसंयम करून स्वतःच्या वर्ण-मर्यादांचे नियम पाळून कुवासनाचा त्याग करून परमात्म्याचें चिंतन करीत आहेत. ते पुढील जन्म याहीपेक्षां उच्चकोटींत जाऊन उत्तरोत्तर उच्चवर्णांत जन्मून सुख भोगतील. तिसरें, जे पूर्वजन्मपरंपरेनें उच्चकोटींत जन्माला आलेले आहेत. ते सर्व वासनांचा त्याग करीत स्वस्वरूपाचे ज्ञानामध्यें तल्लीन होतील तर त्यांना यापुढें मुक्ति प्राप्त होईल.

आतां, अस्पृश्य जातींत जन्मलेल्यांची वर नजर जाते, याचें कारण पण अनुमानानें हेंच सिद्ध होतें कीं, ते पूर्वीं उच्च कोटींत जन्मले असतांही नीच कर्म केल्यानें अस्पृश्यवर्गांत जन्माला आले असावेत. त्यांच्या उच्चवासना असतांही मर्यादाभंग करून ते धर्मविरोधी चळवळ करूं लागल्यानें यापेक्षांही अधःपतन पावण्याचा संभव आहे, आणि अस्पृश्य अंत्यजांपैकीं कित्येक पूर्व-वासनांच्या अनुरोधानें उच्चवासना असूनही जन्माला आलेल्या वर्णाच्या मर्यादा पाळून उच्चविचार ठेवून ईश्वरभजन करतात ते पुन्हां उच्चवर्णांत जन्म घेऊन उच्च कोटींत जातील. आणि जे परंपरेनेंच अंत्यज आहेत तेही जर सदैव उच्चविचार ठेवून जन्मजात वर्णमर्यादा पाळून दृढनिश्चय ठेव-तील तर क्रमाक्रमानें उच्चकोटींत जातील यांत संदेह नाहीं. तुम्हीं मर्यादा सोडून ईर्ष्या व द्वेष यांनीं प्रेरित होऊन चळवळ केली तर त्यांत शोभा नाहीं, ईश्वरप्राप्ति नाहीं किंवा प्रसन्नताही नाहीं.

उच्च म्हणजे जे स्पृश्यवर्णीय आहेत त्यांनीं जर शास्त्रमर्यादानियम, स्पृश्या

स्पृश्यविचार पाळून सर्व प्राणिमात्रांवर प्रेम ठेवलें व त्यांना योग्य मदत केली तर त्यांच्याही जन्माचें सार्थक्य होईल.

हें जग ही एक नाटयशाळा आहे. त्यांतील सर्वजण पात्रें आहेत, त्या नाटकाचा सूत्रधार कर्मवशात् पट्टेवाल्याचें सोंग घेईल आणि त्याच नाटकांतला झाडलोट करणारा कदाचित् भर्तृहरीराजाचा वेष घेईल, अथवा प्रसंगवशात् त्यांतला झाडूवाला वसिष्ठ, वामदेव, कृष्ण, राम, यांपैकीं एखादा वेष घेईल आणि नाटकाचा मालक त्यांच्या भक्ताचा वेष धारण करील. तेव्हां नाटकाच्या नियमाप्रमाणें भर्तृहरीराजा जेव्हां मालकास 'अरे पट्टेवाला' म्हणून बोलावील त्यावेळीं त्याला 'जी हुजूर' म्हणून धांवत जाऊन अदब बजावून त्याच्या समोर उभें राहिल्यावांचून गत्यंतर नाहीं. तेंच दुसऱ्या सोंगांत भक्ताला (तो मालक असतांही) रामकृष्णापुढें धूप, दीप करून साष्टांग नमस्कारच घालावा लागेल. या नियमाच्या उलट चालल्यास नाटक बिघडून जाईल, हें सांगावयास नकोच.

याकरतां पुन्हां एकदां सर्व अस्पृश्यवर्णीयांस सूचना करण्यांत येते कीं, प्रत्येकानें आपापली वर्णमर्यादा व आश्रममर्यादा पाळून खऱ्या अंतःकरणानें परमेश्वराचें भजन केलें म्हणजे तुम्ही सर्व श्रेष्ठ व्हाल. परमात्मा तुम्हांस सुबुद्धि देवो, हाच माझा आशीर्वाद.

श्रींच्या आज्ञेवरून
**यज्ञेश्वर गोविंद मराठे**
कारकून-महाराष्ट्र विभाग, संस्थान श्रीशारदापीठ.

---

# संतसंग.

संतसंगाचा महिमा खरोखर अगाध आहे, संतसंगतीनें अनेक फायदे होतात, इतकेंच नव्हे तर चित्तशुद्धि होऊन प्रसंगविशेषीं ललाटींच्या कर्मरेखेलाहि कलाटणी मिळते. एवढें अद्भुत सामर्थ्य संतांच्या ठायीं आहे. तेव्हां या 'भवमहानदीच्या नाविकाला' अनन्यभावानें शरण गेलें पाहिजे.

आतां हेंहि लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं, आजकाल या संतांचा फार सुळसुळाट झाला आहे. त्यामुळें खरा कोणता व खोटा कोणता हें समजणें कठीण झालें आहे; परंतु भाविकहो ! कस्तुरीला कुठेंहि–कोण्याहि कोपऱ्यांत अथवा काळोखांत–ठेवली, तरी तिचा सुगंध दरवळल्याविना कसा राहील; बावनकशी सोनें कुठेंहि कसाला लावलें, तरी तें सोनें तें सोनेंच !

अशीच स्थिति–खऱ्या जगदुद्धारार्थ अवतरलेल्या—संतमहात्म्यांची आहे. अशा प्रकारचे संत जगांत कुठें हिंडत नाहींत; तर त्यांच्या सत्कीर्तीचा परिमळ ताबडतोब चोंहीकडे पसरतो.

'न रत्नमन्विष्यति मृग्यते हि तत् ।'

[ अर्थः—रत्न कुठें शोधावयास जात नाहीं; तर तें दुसऱ्याकडूनच शोधिलें जातें. ]

आजकालच्या उपटसुंभ संताविषयीं श्रीतुकोबाराय लिहितात,

टिळे टोपी उंच दावी । जनीं मी एक गोसावी ।
अवघा वर रंग सारा । पोटीं विषयांचा थारा ॥
मुद्रा लावितो कोरुनी । मान व्हावयासी जनीं ।
तुका म्हणे ऐसे किती । नरका गेले पुढें जाती ॥

ते पुढें सांगतात,

ऐसे संत झाले कळीं । तोंडीं तमाखूची नळी ।
स्नानसंध्या बुडविली । पुढें भांग वोढविली ॥
भांग भुर्का हें साधन । पचनीं पडे मद्यपान ।
तुका म्हणे अवघें सोंग । तेथें कैंचा पांडुरंग ॥

वरील संतोक्तीवरून उपटसुंभ साधूंचीं लक्षणें ध्यानांत येतील.

परंतु खरे साधु आहेत त्यांचा महिमा काय गावा? अशा प्रकारचे–जगदुद्धारार्थ झटणारे–साधू फार थोडे असतात; जे अखण्ड विदेहस्थितीमध्यें असतात; लोकांच्या उद्धाराकडे ज्यांचें अहर्निश लक्ष्य असतें, प्रत्यक्ष विधिलिखिताला देखील कलाटणी देण्याचें ज्यांच्या ठायीं सामर्थ्य असतें, असे साधु बोटावर मोजण्याइतकेच सांपडतात; अखिल जगन्नायकापेक्षां यांचा महिमा मोठा असतो. भवसागरांतून पार पाडण्यास अशा प्रकारचे संतमहात्मे समर्थ असतात.

म्हणूनच म्हटलें आहे कीं,

"केशव म्हणे उठा । तुम्हीं संतसंग लुटा ॥"

संतसंग लुटण्याला हे भगवद्भक्त विनंति करितात, याचें कारण तरी हेंच! यासाठीं संसारांत पडलेल्या 'जडमूढनरपामरा!' ऊठ! त्या संतमाउलीचे पाय धर! भवार्णवांतून काढावयास तीच माउली समर्थ आहे; अनन्यभक्तिभावानें सद्गुरूस शरण जा; तुझे सकल मनोरथ पूर्ण होतील.

जशी जशी मनुष्याला संगति असेल, तशी तशी त्याच्या विचारांत परिणति होत जाते. याविषयीं श्रीसमर्थ लिहितातः

" साधूसंगें साधू । भोंदूसंगें भोंदू । वाद्यासंगें वादू होत, असे ॥

होत असे भला भल्याच्या संगतीं । जाय अधोगती दुष्ट संगें
संग जया जैसा लाभ तया तैसा । होतसे अपैसा अनायासें
सज्जनाची कृपा जयालागीं होय । तयालागीं सोय परत्रांची ”

तेव्हां सज्जनाच्या संगतीनें कसें फळ पदरांत पडतें, हें वरील अभंगांत दिसून येईल.

सद्‌गुरूचा महिमा श्रीतुकोबारायांनीं आपल्या अमृतमधुर वाणीनें कसा वर्णन केला आहे पहा. ते म्हणतात,

“ सद्‌गुरुवाचोनी सांपडेना सोय । धरावे ते पाय आधीं त्याचे
आपणासारिखे करीती तात्काळ । नाहीं काळ वेळ तयालागीं
लोह परिसासी न साहे उपमा । सद्‌गुरुमहिमा अगाधची
तुका म्हणे ऐसे आंधळे हे जन । गेले विसरून खऱ्या देवा. ”

श्रीतुकोबारायांनीं जगाला आंधळें करून खऱ्या देवाला विसरून गेल्याचा दोष आपल्या माथीं मारला आहे. यांकडे प्रत्येकाचें लक्ष्य जाणें अवश्य आहे; अशा अलौकिक संतमहात्म्यांचा संग लाभावा असेंच थोर मागणें श्रीतुकोबारायांनीं दयाळू विठोबास मागितलें आहे.
ते म्हणतात,

“ नलगे मुक्ति–धन–संपदा । संतसंग देई सदा ॥ ”

पंढरीनाथा ! मला धनसंपदा नको ! परंतु संतांचा संग मात्र अखण्ड घडूं दे.

अशा संतमहात्म्यांना त्रास देणाऱ्या लोकांना श्रीतुकोबाराय म्हणतात,

“ संताशीं क्षोभवी कोण्याही प्रकारें । त्याचें नव्हे वरें उभयलोकीं ॥
देवाचा तो वैरी शत्रू दावेदार । पृथ्वीवरी थार नेदी तया
संतापाशीं ज्याचा नुरेचि विश्वास । त्याचे झाले दोष बळीवंत ॥ ”

असो. संतांच्या थोरवीविषयीं अशा प्रकारचे वेंचे पुष्कळ काढतां येतील. यावरून हेंच निदर्शनास येतें कीं, संतांचा संग अत्यंत हितकारक आहे. संतसंगतीनें चित्त–शुद्धि होते. पापविकारांचा नायनाट होतो. संत ‘ आलियासी दान ’ देतात. संत फार उदार असून त्यांच्याजवळ अनंत भांडार आहे, असें एका अभंगांत संतशिरोमणि श्रीतुकोबारायांनीं सांगितलें आहे.

‘ करमपर मेख मारण्याचें ’ अद्‌भुत सामर्थ्य फक्त संतांच्याच ठायीं आहे, यांत यत्किंचित्‌देखील संदेह नाहीं.

सद्गुरुमहिमा वर्णन करितांना श्रीज्ञानोबाराय लिहितातः

“ कां सुकतया अंकुरा ॥ वरि पडिलिया पीयूषधारा
नाना अल्पोदकीचा सागरा ॥ आला मासा ॥ १ ॥
नातरी रंकें निधान देखिलें ॥ कां आंधळिया डोळे उघडले

भणंगाचिया अंगा आलें ॥ इंद्रपद ॥ "—ज्ञानेश्वरी अ० १३

सद्‌गुरुसेवेविषयीं लिहितांना ते पुढें लिहितातः

आपुलिया गुणांचीं लेणीं । करिन गुरु-सेवें स्वामिणी
हें असो, होईन गवसणी । गुरु-भक्तीसी ॥ १ ॥
गुरु स्नेहाचिये वृष्टी । मी पृथ्वी होईन तळवटीं
ऐसिया मनोरथाचिया सृष्टी । अनंता रची ॥ २ ॥
म्हणे श्रीगुरुचें भुवन । आपण मी होईन
आणि दास होउनि करीन । दास्य तेथिंचें ॥ ३ ॥
ताट मी काढीन । शेज मी झाडीन
चरणसंवाहन ॥ मीचि करीन ॥ ४ ॥
गुरु क्षेत्र गुरु देवता । गुरु माता गुरु पिता
जो गुरुसेवेपरता । मार्ग नेणे ॥ ५ ॥
जयाचें वक्त्र । वाहे गुरुनामाचे मंत्र
गुरुवाक्यावांचोनी शास्त्र । हातीं न शिवे ॥—ज्ञानेश्वरी. अ० १०

ते पुढें काय सांगतात पहाः—

जया इये भक्तीचा चाड । जया इये विषयींचे कोड
जो हे सेवेवांचुनी गोड । न मनी कांहीं ॥
तो तत्त्वज्ञानाचा ठावो । ज्ञाना तेणेचि आवो
हे असो तो देवो । ज्ञानभक्त ॥—ज्ञानेश्वरी. अ० १३.

अहाहा ! श्रीज्ञानोबारायांनीं संत-भक्तांना किती श्रेष्ठत्व दिलें आहे ? श्रीज्ञानदेव म्हणतात त्याप्रमाणें तो खरोखरच "ज्ञानभक्त" आहे, यांत तिळमात्र संशय नाहीं.

अखिल ब्रम्हांडापेक्षां सद्गुरूचा महिमा अनंत कोटीनें मोठा आहे; संतांच्या संगतीनें सामान्य दिसणारा मनुष्य उच्चपदाला चढतो. संत त्रिकालज्ञ असतात. यासाठीं प्रत्येक मनुष्यानें संतसंग अवश्य लुटावा, संतांची सेवा करावी, प्रत्यक्ष परमेश्वरस्वरूप अशा संतांची सेवा फळाला आल्याविना कधींही रहात नाहीं.

असो, सांगण्याचें तात्पर्य हेंच कीं, अनन्यभावानें संतांना शरण गेलें पाहिजे; संत दयाळु मायबाप आहेत. जगदुद्धारार्थ त्यांचा जन्म असतो; तेव्हां भवसागरांत पडलेल्या प्रत्येक व्यक्तीनें संतदर्शनाचा अतएव संतकृपेचा प्रसाद घेण्याचा यत्न करावा. तूर्त एवढेंच सांगून वाचकांचा स-प्रेम निरोप घेतों.

दिग्रस. श्रावण शु॥ १५, १८५१. } संतांची पायधूळ, **दत्तात्रय रामचंद्र व्यवहारे.**

---

# अभिप्राय.

१ **संस्कृत ज्ञानेश्वरीः**—पुण्याचे प्रसिद्ध संस्कृत पंडित महादेव पांडुरंग ओक यांनीं संपूर्ण ज्ञानेश्वरी संस्कृत पद्यांत भाषांतरित करण्याचा प्रचंड उद्योग आरंभिला असून ह्या पहिल्या खंडांत पहिले सहा अध्याय आणले आहेत. रा. ओक यांचें संस्कृत व मराठी उभयभाषांवर प्रभुत्व सारखेंच असल्यामुळें भाषांतर फारच सरस उतरलें आहे. ज्ञानेश्वरांनीं गीतेवर 'देशीकार लेणें' चढविलें तर ओकांनीं देशी ज्ञानेश्वरीवर 'गीर्वाण लेणें' चढविलें आहे. प्रल्हादबोवा वडवे यांनीं अमृतानुभवाचें संस्कृत भाषांतर केलें आहे. पण ज्ञानेश्वरीला संस्कृत वेष देण्याचें काम आजवर कोणीं केलें नव्हतें तें रा. ओक यांजसाठींच जणूं राखून ठेवण्यांत आलें होतें. ओकांच्या हातून सर्व ज्ञानेश्वरी संस्कृत भाषेंत रूपांतरित होवो अशी आम्ही श्रीज्ञानेश्वरचरणीं प्रार्थना करितों. मराठी न जाणणाऱ्या हिंदुस्थानांतील मराठेतर लोकांना तसेंच पाश्चात्य पंडितांना ज्ञानेश्वरमहाराजांच्या वाणीचा परिचय होण्यास प्रस्तुत प्रयत्न फार उपयोगाचा होईल. ओकांचा हा अनुवाद फार सुगम, सुबोध व सुंदर झाला आहे. (एम्. पी. ओक, ४७० शनिवार पुणें.) किं० रु. २.

वरील अभिप्राय लिहून झाल्यानंतर रा. माधवराव ओक हे आकस्मिकपणें पक्षघात होऊन मार्च महिन्यांत कालवश झाले. ज्ञानेश्वरीचें संस्कृत रूपांतर अपुरें राहिलें. संस्कृत भाषेच्या अभ्यासास प्रत्यक्ष वर्गांतील शिक्षणानें व अत्यंत सुगम अशीं अनेक पुस्तकें लिहून ज्यांनीं आज २० वर्षें विद्यार्थ्यांस अमोल साह्य केलें असा सतत उद्योगी, दारिद्र्य आणि शारीरिक व्याधि यांच्याशीं सतत झगडूनहि ज्याची समाधानवृत्ति कधींहि ढळली नाहीं, आपला प्रत्येक क्षण ज्यानें अध्ययन व अध्यापन यांतच खर्च केला, ज्याची प्रतिभा वृद्धावस्थेंत क्षीण न होतां उलट जास्त सूक्ष्म व प्रभावशाली होत चालली होती, ज्यानें वाणीनें व कृतीनें कोणासही कधीं दुखविलें नाहीं, व ज्याच्या आकस्मिक मृत्यूनें गीर्वाण भाषेचें अपरिमित नुकसान झालें असा आमचा स्नेही या जगांत केव्हांहीं त्यांना न मिळालेली विश्रांति विदेही स्थितींत भोगण्यास हें जग सोडून गेला याबद्दल आम्हांस तर अत्यंत दुःख होतच आहे. परंतु सर्व महाराष्ट्र त्यांच्या मृत्यूनें निःसंशय हळहळेल.

**२ श्रीएकनाथकथासारामृतः**—हा ओवीबद्ध ग्रंथ गुरुभक्तिपरायण भीमराव सखाराम पारळकर यांनीं लिहिला असून त्यांत २१ प्रसंग आहेत. नाथरायांचें चरित्र प्रेमळ व रसाळ वाणीनें गाइलें असून हें भाविकांस संतोष देईल. जुन्या मराठी कवींशीं यांचा चांगला परिचय असल्यानें त्यांच्या वाणीला तें वळण सहज लागलें आहे. पुस्तकें ग्रंथकर्त्याकडे, शेंदूरणी, पू. खानदेश येथें मिळतात. किंमत वर दिली नाहीं.

**३ श्रीमद्दयानंदः**— 'नवयुगधर्ममालेचे' संपादक पनवेलचे वकील रा. सदाशिवराव फडके यांनीं आर्यसमाजाचा विवेचक इतिहास ह्या ग्रंथांत फार व्यवस्थितपणें दिला आहे. दयानंदी पंथाची पूर्ण माहिती ह्या एका ग्रंथानेंच होणारी आहे. प्रस्तुत भागांत दयानंदांचें चरित्र सहानुभूतीच्या उदार धोरणानें लिहिलें असूनसुद्धां दयानंदांचीं मतें सनातनधर्मीयांना रुचत कां नाहींत हें स्पष्ट व सप्रमाण दाखविलें आहे. दयानंद ही व्यक्ति थोर होती पण त्यांचीं मतें प्रमाणाबाहेर वहकलीं होतीं. मूर्तिपूजा, पुराणविद्या, सगुणोपासना, तीर्थयात्रादि साधनें त्याचप्रमाणें शंकराचार्यांपासून सर्व प्राचीन संतमहंत या सर्वांवर दयानंदांनीं आपली वाग्लता परजली होती, हें सदर पुस्तकवाचनानें कोणाच्याही लक्ष्यांत येईल. दयानंदी आर्यसमाजिष्टांचें अलीकडील राजकारण महत्वाचें आहे. पण दयानंदांचीं मतें सनातनधर्माला प्रतिकूल आहेत. आपल्या धर्माच्या इतिहासाचा सर्वांगानीं अभ्यास करणारांनीं सदर पुस्तक विकत घेऊन अवश्य वाचावें. किं. रु. १॥८.

**४ महाराष्ट्राचा स्वातंत्र्यवीरः**—हा वासुदेव बळवंत फडके होय. याचें चरित्र रा. रामचंद्र गणेश बोरवणकर यांनीं लिहिलें असून तें भावे आणि मंडळी, ठाकूरद्वार, मुंबई यांनीं प्रकाशित केलें आहे. किंमत ॥१२. स्वातंत्र्याकरितां तळमळणारे जे अनेक जीव भरतखंडांत गेल्या शतकांत झाले त्यांतल्यात्यांत पहिल्या रांगेच्या देशभक्तांत वासुदेव बळवंत फडके यांचें नांव निरंतर झळकत राहील यांत संशय नाहीं. त्यांनीं केलेला प्रयत्न फसला, त्याला देशकालाची अनुकूलता नव्हती, जनतेचें साह्य मिळालें नाहीं, ही गोष्ट वेगळी, पण त्यानें त्यांच्या जळजळणाऱ्या देशभक्तीची योग्यता कमी होते असें नाहीं. 'ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा ... चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा' या न्यायानें गतकालीन वीरांच्या भावनेकडे पाहून त्यांची धन्यताच वाटली पाहिजे. रा. बोरवणकर यांनीं 'सार्वजनिक काकांचें' असेंच चरित्र लिहिलें आहे. ( ठाणें, गणेश लॉज किं. ॥१२. ) तेंही चांगलें आहे. तरुणांनीं हीं दोन्ही चरित्रें वाचून त्यांचा अवश्य तो बोध घ्यावा.

५ **नेपाळचा प्रवास**:—ह्यावर एक मराठी व एक इंग्रजी अशीं दोन पुस्तकें बडोद्याचे श्रीमंत संपतराव गायकवाड यांनीं अनेक इंग्रजी राजनीतिनिपुण ग्रंथकारांच्या आधारें व स्वतः नेपाळांत हिंडून फिरून व अनेक रमणीय स्थळें स्वतः पाहून लिहिलीं आहेत. नेपाळांतील हिंदू लोक, नेपाळांतील धर्म, गुरखा घराणें, सण, उत्सव, भाषा, शासनपद्धति, प्रवासमार्ग प्रमुख स्थळें वगैरे सर्व प्रकारची उपयुक्त माहिती प्रस्तुत ग्रंथांत दिली असून ग्रंथ मनोरंजक झाला आहे.

६ **माझें गुरुस्थान**:—माजी केरळकोकिळकर्ते रा. आठल्ये यांनीं हें पुस्तक लिहिलें असून ( ज्ञानमित्र कचेरी, पुणें, किं. ०१२. ) यांत स्वामी विवेकानंदांचें 'गुरुस्थान' रामकृष्ण परमहंस यांविषयींची स्वामीजींची गुरुभक्ति पहावयास मिळते. पुस्तकाला उपयुक्त टीपा दिल्या असून शेवटीं 'रामकृष्ण बोधामृत' दिलें आहे. व पुस्तक अत्यंत वाचनीय आहे.

७ **गीतेंतील नित्यपाठ अथवा गीतासार**:—सासवनें येथील 'वैश्यविद्याश्रमाचे' चालक रा. ढवण यांनीं हें पुस्तक 'रहस्यकारातें वाट पुसत' मुख्यतः विद्यार्थ्यांच्या सोयीकडे लक्ष देऊन वेगवेगळ्या मथळ्याखालीं निवडक श्लोक सार्थ देऊन तयार केलें आहे. शेवटीं गीतेंतील सुभाषितें दिलीं आहेत. संपूर्ण गीता पाहायला ज्यांना सवड नाहीं, पण गीतेच्या मुख्य शिकवणी समजाव्यांत अशी इच्छा आहे त्यांची या पुस्तकानें चांगली सोय केली आहे. किं. ०८.

८ **कृष्णभजनावली** (गुजराथी):—स्तुतिपर भजनें, सद्गुरु महिमा, सत्संग, संतमहिमा, भगवल्लीला, आत्मविचार इ० विषयांवर डॉ. कृष्णराव सखाराम देवळालीकर, कलोल, गुजराथ ह्या नामप्रेमी प्रेमळांनीं केलेल्या सुंदर व सुबोध पद्यांचा यांत संग्रह केला आहे. किं. रु. १.

९ **उन्नतिप्रदीप ( संस्कृत )**:—हें छोटें काव्य विष्णुशास्त्री बापट यांचे शिष्य शिवराम रामकृष्ण कळवणकर यांनीं लिहिलें असून त्यांत देशाच्या पारतंत्र्यदुःखनिवारणार्थ व लोकदुर्गतिदूरीकरणार्थ वेदोक्त धर्मावलंब हाच एक उपाय आहे असें प्रतिपादिलें आहे. प्रतिपादन यथार्थ आहे, संस्कृत श्लोकांची रचना सुबोध आहे, वाचनीय आहे. कळवणकर यांजकडे, टिळक महाविद्यालय, पुणें २ ह्या पत्त्यावर पुस्तकें मागवावींत. किं. ०=

१० **सार्थ प्रेमानंदलहरी**:—एकनाथमहाराज यांनीं केलेला ग्रंथ रा. शारंगधर ज्ञानेश्वर भूतकर, हेड मास्तर; लक्ष्मी दहिवडी, ता. सांगोलें, जिल्हा सोलापूर, ( किं. ०६ ) यांनीं गद्यभाषेंत अर्थ देऊन सुबोध केला आहे. नाथांच्या दिव्य वाणीचीं माधुरी कोण वानील ? अर्थ बरोबर केला आहे.

———

## पांगारकरांचीं पुस्तकें

१. **भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति चौदावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ०८ व्ही. पी. नें ०१२.

२. **संतचरित्रमालाः**—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४२ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ. सं. २५६ किं. रु. १०८.

३. **श्रीएकनाथचरित्रः**—श्रीएकनाथमहाराजांच्या चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ०१२.

४. **कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडो स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ०४.

५. **आनंदलहरीः**—( कवितासंग्रह ) त्यांत पांगारकरांच्या कवितांपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत, १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ०१२.

६. **नारदभक्तिसूत्रेंः**—( आवृत्ति ४ थी ) हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ०८.

७. **नवविधाभक्तिः**—( सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी ) यांत नवविधा-भक्तींचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ०६.

८. **निरंजनमाधवांची कविताः**—भाग १ किं. रु. भाग २ व ३ एकत्र किं. १॥ रु.

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्रः**—( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. १०८.

१०. **भक्तिमणिमालाः**—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १०८

११. **सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टीः**—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध पुढारी कै. विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ०५.

१२–१३–१४. **मुमुक्षूंतील निवडक निबंधः**—भाग १ व २ किं. प्रत्येकीं १०८, भाग ३ रा किं. १०४.

१५. **मोरोपंती वेंचेः**—( दुसरी आवृत्ति ) पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रहि नवीन दिलेलें आहे. किं. रु. १०१२.

मुमुक्षु REG. No. B. 662

# पांगारकरांचीं पुस्तकें

१६. **पारिजातकाचीं फुलें:**—( तिसरी आवृत्ति ) परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ॥८.

१७. **श्रीतुकारामचरित्र:**—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलाचा पंढरपूरचा व देहूचे सहा असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ. सह किं. रु. २.

१८. **श्रीतुकारामचरितामृत:**—तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं ॥५.

१९. **निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य:**—निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख--विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ॥१०.

२०. **मुक्तेश्वर:**—( चरित्र आणि काव्यविवेचन ) श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे प्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १.

२१. **मारुतिउपासना** ( चौथी आवृत्ति ):—किं. ॥४.

२२. **सार्थ श्रीदासबोध:**—( आवृत्ति दुसरी ) किं. रु. ४ व्ही. पी. नें ४॥१०

२३. **सार्थ मनोबोध:**—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ॥१२.

२४. **समर्थसंजीवनी ऊर्फ रामदासी वेंचे:**—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें ह्या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.

२५. **मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन ):**—किं. रु. २॥८.

२६. **श्रीएकनाथी भागवत** (निर्णयसागर प्रेसचें, आवृत्ति तिसरी):—किं. रु. ६

२७. **श्रीसमर्थग्रंथभांडार:**—समर्थांची एकंदर कविता एकत्र सटीप छापलेली आहे. किं. ४॥८.


२८. **समर्थग्रंथभांडार** ( भाग २ रा ):—यांत दासबोधाशिवाय बाकीची समर्थांची सर्व कविता प्रकरणें पाडून व्यवस्थित दिली आहे. किं. रु. २॥८.

२९. **ज्ञानेश्वरांची प्रभावळ:**—ज्ञानेश्वरमहाराज व त्यांचे समकालीन नामदेवराव, जनाबाई, चोखामेळा इत्यादि सर्वजातीय २५ संत यांच्या ग्रंथांतील निवडक वेंचे प्रस्तुत ग्रंथांत घेतले आहेत. यांत ज्ञानेश्वरांच्या २५०० ओव्या व सर्व संतांचे मिळून ४०० अभंग आहेत. सुंदर प्रस्तावना आहे. टीपा भरपूर आहेत. किं. रु. २.

पत्ता:—व्यवस्थापक " मुमुक्षु " पुणें शहर.

श्री रुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होईजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ ( श्रीरामदास )

| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष २४ वें | वैशाख १८५२ | नवें वर्ष १० वें |
| मास ८ | मे १९३० | अंक ५ वा. |

संपादक व प्रकाशक,

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मुमुक्षुकचेरी, बुधवार पेठ, पुणें सिटी.

वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही. पी. नें रु. ३०३

मुद्रकः—लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव, घ. नं. ३००
येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ मंगलाचरण | १ |
| २ अभयदान | २ |
| ३ ज्ञानेश्वरींतील संसारसुखाचें चित्र | ३–१५ |
| ४ सत्याग्रहाचें व बहिष्काराचें तत्व ! | १५–१८ |
| ५ गोडबोले व चिपळोणकर | १८–२२ |
| ६ धार्मिक शिक्षणाचा प्रश्न | २२–२४ |
| ७ मदिराबया | २५–२६ |
| ८ भक्तमयूरकेकावली | २६–३१ |
| ९ अभिप्राय | ३२ |

**सूचनाः**— कांहीं अडचणीमुळें चालू अंक नेहमींप्रमाणें ४० पृष्ठांचा न निघतां ३२ पृष्ठांचा निघत आहे. पुढील अंकीं ८ पृष्ठें मजकूर जास्त देण्यांत येईल. —संपादक.


# निरंजनमाधवांची कविता

**भाग १ ला किं. १ रु.** **भाग २–३ किं. १॥ रु.**

पहिल्या बाजीराव पेशव्यांचे अमदानींतल्या राजकारणी, योगी व अधीत अशा निरंजनमाधव कवीच्या काव्यांच्या कविलिखित प्रतींवरून हे दोन भाग छापले आहेत. दुसऱ्या भागांत ज्ञानेश्वरमहाराजांचें उद्बोधक चरित्र रसाळ वाणीनें गायिलेलें ग्रथित केलें आहे. तिसऱ्या भागांत चिद्बोधरामायण हें अध्यात्मरामायणाच्या धर्तीवरील काव्याचें बालकांड आहे. अद्वैतबोध वगैरे वेदांतपर पांच स्फुट काव्यें कठिण विषय सुलभपणें प्रौढ भाषेत सांगणारीं अशीं घातलीं आहेत, व शेवटीं मराठींतील एकच चंपू काव्य जें " सुभद्रा–चंपू " नांवाचें या कवीनें केलें आहे तें छापलें आहे. यांतील भाषा आणि वर्णनशैली प्रौढ, मनोहर व सुंदर असून सुभद्राहरणाचा नेहमीचा कथाभाग या कवीनें आपल्या विद्वत्तेनें रसिकमान्य केला आहे. अशा या अपूर्व काव्यसंग्रहानें हे दोन भाग भरले असून दोन्ही एकत्र बांधविले आहेत.

**पत्ताः**—व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें सिटी.

मुमुक्षु मासिक
वर्ष १० वें

# मंगलाचरण

मे १९३०
अंक ५ वा



## ऊठ ऊठ ब्रिजलाल--

( एन्. एम्. ताम्हनकर )

ऊठ ऊठ ब्रिजलाल दयाळा उषःकाल सरला
इतुका नाहीं आजवरी तव कधिं मिटला डोळा
वनमाळा घेउनी संवगडी पूजनास आले
गोमहिशींचे वना जावया कळप सिद्ध झाले
वाजिव वेणू जगन्मंगला, सूर चेतनेचे
ऐकायाला अधीर झालें भरतखंड साचें
स्वातंत्र्याचा आळव देवा दीपराग आतां
जित जेता हा शब्द होउं दे नामशेष पुरता
तुझे संवगडी आज उपाशी कितीक दिवसांचे
बंधमुक्त करण्यास तुझ्याविण ना बल कवणाचें
धर्म तुझा लाडका तुझ्याविण झालासे बावरा
भारतरथ नेईल तुझ्याविण कोण बरें संगरा
वनवासीं हे दिवस कंठितों वसूं स्वभूमिंत जरी
मुरलीगानें आणि चेतना अंधकार संहरीं.

ऊठ ऊठ—

# अभयदान.

चिरंजीव जिवाजीपंत ठाणेदार ॥ यासी आत्मारामपंत कमावीसदार ॥ कसबे ब्रह्मपुरी ॥ आशीर्वादउपरी तुह्मांसी देहगांवचें ठाणें दिलें ॥ तर ठाण्यांत सावधपणें वर्तणूक करणें ॥ तेथें ममताई पाटलीण ॥ तिणें लटकेंच दंभ केलें आहे ॥ कामक्रोधादि षड्वैरी चाकर ठेवून लोभमोहाचे फांसे सिद्ध करून ठेविले आहेत ॥ म्हणून तुम्हांस सूचना मात्र लिहिली आहे ॥ विषयाचा लोभ न धरणें ॥ निजहितासी अंतर न करणें ॥ सत्य मिथ्या जाणून विचाराची वाट धरणें ॥ अविचारपणा सोडून देणें ॥ विवेकसद्भावासी मित्रत्व विशेष असों देणें ॥ त्यांचे बुद्धीनें गांवची लावणी करणें ॥ उत्तम चारी वर्णांसी कऊल देऊन धैर्याचा नांगर धरून शेतांतील प्रदेखट काढून वासनेच्या पालव्या तोडून संशयाचा गाशा गोळा करून ॥ भूमिका शुद्ध करून मग भक्तिज्ञानवैराग्यतिफणी करून सद्गुरुमुखें नीजबीज पेरणें ॥ जेथें शुद्ध सत्वाचा मेघ वर्षला ॥ तेथें सत्याचा माळा घालून ॥ कुतर्कपांखरूं उडवून देणें ॥ जागोजागीं विश्वास रक्षण ठेवून ॥ शेतांतील माल अवघाचि गोळा करून षड्गुण ऐश्वर्य बैल जुंपून ॥ अवघाच माल खळ्यांत आणून कश्मल काढून ॥ स्वानंदाची रास करणें ॥ तेथें सिद्ध साधक मागते येतील ॥ त्यांला भक्तीचे पायलींत अवघाचि माल मोजून देऊन ॥ सह हुजूर ब्रह्मपुरीस येणें ॥ सांगितल्या गोष्टींत बाकी ठेवाल तर चौऱ्यांशीं लक्ष योनी फिरणें लागेल ॥ मग पुनरपि तुह्मां वरदहस्त लादेल ॥ खरें चालावें जन्म मरणाची वाट खंडेल ॥ जनार्दन सद्गुरु कृपेचा सागर ॥ तेणें **एका जनार्दनीं** आनंदमय समाधान झालें ॥ द्वैताचा लेश उरला नाहीं ॥ सच्चिदानंदरूप प्रत्ययास येऊन ॥ सामाधान पावले॥

प्र. सं. ग्रं.

# ज्ञानेश्वरींतील संसारसुखाचें चित्र.

## १ संसार ब्रह्मरूप आहे.

१. ज्ञानेश्वरी कालीन महाराष्ट्रांतल्या संसारसुखाचें एक गोडसें चित्र आपणांस आज दाखवायचें आहे. ज्ञानेश्वरांनीं वैराग्य प्रतिपादन करावयाचें असतांना वैराग्याचें उत्कृष्ट वर्णन केलें आहे तरी शुद्ध संसारसुखाची छाया त्यांच्या ग्रंथभर पसरली आहे. हा दृश्य प्रपंच ब्रह्माहून वेगळा नाहीं असा त्यांचा मुख्य सिद्धांत आहे. जीव व ब्रह्म यांचें ऐक्य तसेंच ब्रह्म व विश्व यांचें ऐक्य आहे. एकाएक परब्रह्माच्या ठिकाणीं दुसरें कांहींच नाहीं. संसार हा ब्रह्मरूप आहे. अव्यभिचारी भक्तीचें स्वरूप सांगतांना त्यांनीं म्हटलें आहे कीं, ' विश्व येणें नांवें । हें मीचि आघवें । येइं चंद्रबिंब सोलावें । न लगे कांहीं ॥ ३७८ ॥ घृताचें थिजलेपण । न मोडितां घृतचि जाण । कां नाटितां कंकण । सोनेंचि तें ॥ ३७९ ॥ म्हणोनि विश्वपण जावें । मग तैं मातें घेयावें । तैसा नव्हे—आघवें । सगटचि मी ॥ ३८१ ॥' ( अ० १४ ) एकाच देहाचे जसे अनेक अवयव तसे एकाच ब्रह्माचा विश्व हा पसारा आहे. एकाच बीजाच्या उंचनीच डाहाळ्या आहेत. ' नाना कल्लोळपरंपरा । संतती जैसी सागरा । आह्मां आणि चराचरा । संबध तैसा ॥ १२२ ॥ जालेनि जग मी झांके । तरी जगवें कोण फांके ? । किळेवरी माणिकें । लोपिजे काई ? ॥ १२४ ॥ ' ( अ. १४ ) जलतरंगासारखाच ब्रह्माचा व विश्वाचा एकरूपपणाचा संबंध आहे. जग झालें म्हणजे काय ब्रह्म झाकलें जातें ? मग जगपणानें कोण फांकलें आहे ? प्रभेच्या योगानें माणिक काय लोपून जातें ? ' म्हणोनि जग परौतें । सारूनि पाहिजे मातें । तैसा नोहे उखितें । आवघें मीचि ' ( १४–१२८ ) हाच सिद्धांत ' जग आघवी वस्तुप्रभा ' याप्रमाणें अमृतानुभवांत स्पष्ट करून सांगितला आहे.

२. प्रपंच ब्रह्माचें स्वरूप आहे—नव्हे व्यक्त, उघड, सोपें, अति गोड असें सगुणरूप आहे. ज्ञानेश्वरांचा वेदांत रुक्ष, कठोर, न पचणारा व न पटणारा असा नसून अतिमधुर व सर्वगम्य आहे. त्यांनीं ज्ञानेश्वरीच्या पहिल्याच मंगलाचरणांत गणपतीच्या हातीं ' वेदांताचा मोदक ' दिला आहे—' वेदांत तो महारसु । मोदक मिरवे ' ( १–११ ) वेदांताचा सिद्धांत विश्वमान्यच आहे. पण वेदांतावरील कित्येक ग्रंथकारांनीं तो रुक्ष करून दाखविल्यामुळें लोकांना वेदांताची डोकेफोड नकोशी वाटते यांत नवल नाहीं. वेदांत पचविलेला पुरुष

वेदांताचा मोदक कसा बनवितो तें ज्ञानेश्वरीच्या वाचनानें कळून येतें. विश्वाच्या प्रपंचाकडे पाहण्याचा ज्ञानेश्वरांचा दृष्टिकोण याप्रमाणें क्षुण्ण वेदांतग्रंथांपेक्षां अमळ वेगळा पडल्यामुळें संसाराची अवहेळणा किंवा त्याग त्यांनीं शिकविला नाहीं. तर संसार ब्रह्मरूप भावण्याचा व आनंदमय करून भोगण्याचा मार्ग त्यांनीं सांगितला आहे. नुस्ता संसार करण्यास त्यांनीं सांगितलें नाहीं, तो तर सारेच करितात; पण ' माझ्या ठायीं सकळ असे ' म्हणून ' सर्वभूतीं अभिन्ना । मातें भजे ' (६–३९३)–परमात्म्याची बैठक न सोडतां संसार करा म्हणजे तो परमानंदरूपच आहे असा अनुभव येईल असें ते सांगतात. संन्यासावर त्यांचा भर नाहीं, संन्यासाचें रहस्य समजून संसार करा असें ते सांगतात. हे ' सकळ लोकसंस्था । रक्षणीय सर्वथा ' अशी आहे म्हणून जाणत्यांनीं ' मार्गाधारें वर्तावें । विश्व हें मोहरें लावावें । अलौकिक नोहावें । लोकांप्रती ' ( ३–१७१ ). ' मी माझें ' याची आठवण विसरणें हाच खरा संन्यास व तो जर साधला तर ' आतां गृहादिक आघवें । हें कांहीं न लगे त्यजावें ' ( ५–२२ ). गृहस्थाश्रम आधींच प्राप्त झाला तो सोडून संन्यास घेण्यांत अर्थ काय ? म्हणूनि अग्निसेवा न सांडितां । कर्मरेखा नोलांडितां । आहे योगसुख स्वभावता । आपणपांचि ' ( ६–११ ) जरा अंतर्मुख होऊन आपलें निजरूप पहा व सुखरूप व्हा, संसारप्रवाह संसारपणानें चालायचाच आहे. ' परतोनि पाठिमोरें ठाके । आपणियातें आपण देखे । देखतखेवों वोळखे । म्हणे तत्व हें मीं ॥ ३६६ ॥ तिये वोळखीचि सरिसें । सुखाचिया साम्राज्यीं बैसे......( अ० ६ ). ' आहासि जयाभागीं । तैसाचि अस'–परमार्थाला स्थित्यंतर, आश्रमांतर कांहीं करावें लागत नाहीं. ' इंद्रियें न कोंडीं । भोगांतें न तोडीं । अभिमान न सांडीं । स्वजातीचा ॥ ११५ ॥ कुळधर्म चाळीं । विधिनिषेध पाळीं । मग सुखें तुज सरळी । दिधली आहे ' ॥ ११६ ॥ ( १२ ) हरीचा संसार हरीला अर्पून म्ह. तो हरिमय जाणून तूं आपलीं भागा आलेलीं कर्में करीत जा असा हा परमार्थ सुलभ आहे. त्याचें अधिष्ठान दृढ धरून संसार खुशाल कर असें ज्ञानेश्वरांचें सांगणें आहे. हें ध्यानांत धरून आपण ज्ञानेश्वरीसृष्टींतल्या एका कुलवंताचा संसार पाहूं. लग्नकार्यें, पतिपत्नी, मायलेंकरें, गुरुबंधु, कुळधर्म कुळाचार, देवाची भक्ति, परोपकार यांत सकल परमार्थ आहे, यांत सर्व सुख आहे, हें समजेल.

## २ लग्नसंस्था.

३. आपण प्रथम एका कुलीन व बाळबोध वळणाच्या घरांत काय काय मौजा दिसतात त्या पाहूं. लग्नापासून संसाराला आरंभ होतो. लग्नाचा मोसम सुरू झाला. ' कुमारी तारुण्या आली व वऱ्हाडीक मांडली ' ( ७-१६६ ).

' नोवरी केळवली '- अम्ही उपवर झाली म्हणून केळवणाचे किंवा गडगनेराचे समारंभ सुरू झाले ( १३-१५२ ). दारावर ' तोरणें बांधलें ' आहे (१३-४७० ). कोठें ' लग्नघटिका बुडायच्या ' बेतांत आहे ( ६-४७१ ), कोठें ' रिणावरी विवाहो विस्तारला ' आहे ( १८-७९५ )-कर्ज काढून थाटानें समारंभ करीत आहेत, व बोहल्यावर लग्न लागत आहे (१८-१५७८ ), 'शेंस भरीत' आहेत ( ४-५३ )-ह्म० वधूवरांना एकत्र बसवून त्यांचे मळवट भरीत आहेत व ' सुकुळीनें आपली । कन्या सत्कुळींच दिधली ' (१६-८३) म्हणून लोक आनंद करीत आहेत[1] बाळेनें कुसुममाळा वराच्या[2] गळां घातली आहे ( १६-२०९ ), ' कुळें शोधूनि दोन्ही । कुमारेंचि शुभलग्नीं । मेळविजती प्रजासाधनीं । हेतु जरी ;' ( १६-३०३ ) तरी हा चारदोन वर्षांनीं येणारा प्रसंग असून तूर्त बालवधू वडिलजनांच्या प्रेमाग्रहास्तव ' न सांगणे चरी । बाळा पतीसीं रूप करी ' ( १५-४६८ ) नांव घेण्यांत दंग आहे. ' वधूवरांच्या मेळ्यांत वाजंत्री वाजत आहेत ( १३-८३३ ). ' आपणाचि विर्जाने दुहितां । न मम म्हणे पिता । तो सुटे-कीं प्रतिग्रहीता जावाई । शिरके' ( १८-२३४ )-पित्यानें कन्यादान केलें, तो सुटला, आतां प्रतिग्रहीता-दान घेणाराच जावाईच सर्वतोपरी तिचा रक्षक झाला आहे. कन्यादानांत किंवा कोणत्याहि दानांत ' जयाचें ठेविलें तया । देऊनि होइजे उतराईया ' ( १७-२७९ ) अशीच उदार दात्याची बुद्धि असते. ' कन्या उजळली ' या समाधानांत वधूचे आईबाप आहेत ( १४-६४ ). पाहुणे आले आहेत व पाहुणचार चालू आहेत, उकाडा होतो म्हणून ' विंजणें '-पंख्याचे वारे घेत आहेत ( ८-१४९ ). वानवसा-माजघर तेथें ( ८-६१ ) पडदा आड करून ( ७-६३ ) बायकांचा घोळका गर्दी करून राहिला आहे. सर्व जातींच्या लोकांना भोजनाची अक्षत दिली जात आहे. ( १८-७२३ ).

## ३ पाहुणचार.

४. परगुणें ह्म० पाहुणचार. मेजवानी म्हटली कीं पाहुणे आलेच ( ६-२ ) मुख्य यजमान व सन्मान्य पाहुणा यांच्या पंक्तीला इतरांनाही मानाचे पाट मिळतात-'येरांही पांतिकरा[3] जाहला मान'-इतकेंच नव्हे तर 'वधूवरांचियें मिळणीं । वऱ्हाडियांही लुगडीं लेणीं - त्यांच्या त्यांच्या अधिकाराप्रमाणें वस्त्रालंकार देऊन त्यांचा मान ठेवावा लागतो ( ११-२१३ ). आपल्या भाग्याची चढती कमान

१ ' अहेवतंतु ' ह्म० मंगळसूत्र-वधूच्या गळ्यांत मंगळसूत्र घालीत (अमृता० २-१).

२ ' आपणया आपणपेशीं । लागलें लग्न कवणे दिवशीं ? (अमृता० ६-७६).

३ ' एका पांती ( पंक्तीला ) ताट मांडीत ( अमृता. ९-४९ ) व ' परगुणें (पक्वान्नें) बोगरीत वाढीता ( १०-२४ ).

असतांना पैशाची अनुकूलता असावी त्यांतच मोठा समारंभ किंवा सण यावा, आणि त्यांत ( जांवयासारखा ) आवडता जेवणारा असावा-'सण सुहृद संपत्ती' यांचें ऐक्य असावें म्हणजे भाग्याचा उत्कर्षच तो! (१७-२६९). पाहुणा सभाग्य आणि वाढणारी सुभगा-तेथें स्वादिष्ट पदार्थांना काय म्हणून कमी पडेल? ( १३-६४४ ). स्वतः उत्तम स्वयंपाक करणारी सुग्रण, आणि तीच वाढणारी, उदार हातानें वाढीत आहे-हिमटी नव्हे!-आणि जेवणारे रसज्ञ आणि भोक्ते! तेथें हात काय मागें सरेल? ( १३-११५१ ) आणि पंक्तिप्रपंच बिलकूल नाहीं-'समर्थांचिया पंक्तिभोजनें। तळिल्या वरिल्या एक पक्वान्न' ( १८-४८ ) असो. याप्रमाणें मेजवान्यांचा थाट उडून 'बहुलां लग्न लागलें ( १५-५७८ ), अहेर झाले ( १७-२८६ ), धेंडा नाचला ( १८-११८७ ) [ वधूवरास कडेवर घेऊन देवतांचा अशीर्वाद मागण्यासाठीं नाचणारा मनुष्य ]. 'वाट दावणारा दिवटा'-मशाल पुढें असतांना वरात गेली. लग्न संपलें. श्रुतिगौरवाच्या मांडवावर जो कामसृष्टीचा वेल वाढवितो व विधियुक्त विवाहानें वंशविस्तार करितो तो पतिपत्नींचा पवित्र काम शेवटीं फल देणारा आहे व म्हणून भगवान् सांगतात कीं धर्माशीं अविरुद्ध असलेला काम हें माझें स्वरूप आहे ( ७-५०।५१ ). विध्युक्त विवाह करून संसार करणें ही मोक्षाची पायरी आहे.

## ४ कांहीं दुर्दैवी जीव.

५. असे लग्नसमारंभ चालले असतांना व नंतर कोणी कोणी दुःखी जीव आपापल्या दुःखानें झुरत होते. ज्यांचे पति दूरदेशीं गेले होते अशा विरहिणी व ज्यांचे पति कधींच भेटणें शक्य नाहीं अशा विधवा दुःखांत चूर होत्या. 'गांवा गेलिया वल्लभ। पतिव्रतेचा विरहक्षोभ। भलतसणी ( केवढाही ) हानीलाभ। न मनी जेवीं' ( १६-७९ ) उघडच आहे, कां कीं 'प्राणनाथाचिया आधीं। विरहिणीतें जिणेंही बाधी'-पतीच्या चिंतेनें विरहिणीला जिणेंही नकोसें होतें ( १८-९२० ). तथापि त्यांचें दुःख कालानें ओसरणारें असतें, पण बिचाऱ्या विधवा[२]? 'कांतहीना' आपलें कुंकुमविरहित कपाळ आठवून किती दुःख करीत असेल? ( १३-४७० ). कुमारी व सधवा या कुंकुममंडित होत्या हें उघडच आहे. विधवांना सासरचीं माणसें भलीं भेटलीं तर भलें, नाहींतर 'भर्तारेंवीण वनिता। उपहती पावे सर्वथा' उपहती

१ मांडे होते. 'मनोरथाचे परियळ ( मांडे ) आरोगिजतु कां लक्ष वेळ। परी उपवासावेगळ। आनुआधी?' ( अमृता० ६-३३ )-मनांतले मांडे लाख वेळ खाल्ले म्हणून काय पोट भरेल?

२ 'नव्हतेन वल्लभें। अहेवपण ( सौभाग्य ) कां शोभे?' ( अमृता० ६-६३ )

ग्रंथालय

म्ह० अपमानदुःख, निस्तेजता. संसार विचित्र आहे. एखाद्याला कुरूप बायको मिळाली तर त्याला 'हे असो वनिता आपुली । कुरूप जरी जाहली । तरी भोगितां तेचि भली । जियापरी' (३-२२४). असा उपदेश जाणत्यांना करावा लागे. एखाद्यानें हट्टानें दुसरी बायको केली तर 'जिया उत्तम कुळींचिया होती । आणि गुणलावण्य आथी । तिया आणिकीतें न साहती । सुतेजपणें' (१-१८६)-सवत न साहणें हें स्वाभाविक आहे. एखादी स्त्रीच फाजील धीट व स्वच्छंदी निघाली तर तिच्या दांडग्या नवऱ्याला तिच्यावर 'टेहणी'-नजर ठेवून तिला जरबेंत ठेवावें लागे-'बाहेरी धीट जैसी । दाटुगा पति कळासी' (१३-५०६). 'माहेवणी' म्ह० रजस्वला स्त्री-'माहेवणी प्रयत्नेंसी । चुकविजे सेजे जैसी' (१८-८६६) 'मायवणी'-महावर्णिनी म्ह. कुलवती स्त्री-तिचा पाणवठयावर पदर सरला किंवा कोणी पाप्यानें तिला नग्न केली तर-'ती नेसविल्यावीण न पाहे । शिष्ट जैसा' (१६-१४४). बायको आळशी निघाली तर पुरुषाला जेवतांना 'घासांतील हरळ काढणें' भाग आहे (१३-३३६).

## ५ स्त्रैण पुरुष

६. विषयलंपट पुरुषाला स्त्री जिंकवत नाहीं. 'सकामा न जिणवेचि । वानिता' (७.०.६) मनोनिग्रही पुरुषाच्या स्त्री कह्यांत राहते, पण 'एकाग्रचित्तें जो स्त्री उपासी' अशा स्त्रीउपासक म्ह० स्त्रैण पुरुषाच्या संसाराची घडी बिघडते. 'चित्त आराधी स्त्रियेचें । आणि स्त्रियेचेनि छंदें । माकड गारुडियाचें । तैसें होय ।। आपणपेंही शिणवी । इष्ट मित्र दुखवी,' हें स्त्रैण किंवा बाइल्या पुरुषाचें लक्षण. 'दानपुण्यें रवांची-'त्याची सारी काटकसर दानपुण्यांत ! 'तो गोत्रकुटुंबा वंची । परी बाइणी स्त्रियेची । उणी हों नेदी'—तिची मागणी खालीं पडूं देत नाहीं पण 'मायबापा दाखवी निदारपण (दारिद्र्य)! 'साच आणि चोख । तें स्त्रियेसीच अशेख'-चांगलेंचुंगलें सगळें स्त्रीलाच (१३ ओवी ७९१ ते ८०२). 'स्त्रिया गाइलें आइकावें । स्त्रीरूप डोळां देखावें । सर्वेंद्रियें आलिंगावें । स्त्रियेतेंचि' (१६-३३४) असो. ह्या स्त्रैणांच्या गोष्टी पुरेत. त्यांच्या गोष्टी सोडून विध्युक्त लग्न झालेल्या पतिपत्नी प्रेमानें कसा संसार करितात तें पाहूं.

## ६ पतिव्रता स्त्री.

७. चांगली स्त्री ही 'पतिव्रता व गृहदेवता' आहे. ही ज्या घरांत नांदते तेथें सर्व सुखाची कुळवाडी' (६-४४८) आहे-सारे व्यवहार सुखाचे होतात. समाजांत वावरतांना 'कुलवधू लपवी अवयवांतें' (१३-२०६) अशी मर्यादेनें वागते, पण पतीच्या एकांतांत 'प्रीतीची जाती लाजणें । आठवों नेदी

( १८-१३६९ )—फार मोकळ्या मनानें वागते. [1]तारुण्यानें मुसमुसलेली स्त्रीः 'कीं प्रथमवयसाकाळीं, लावण्याची नव्हाळी। प्रगटे जैसी आगळी, अंगना आंगीं' ( १–४२ ) 'पतिव्रतेचें हृदय जैसें। पतीवांचूनि न स्पर्शे' ( १–१११ )—एका प्रियोत्तमावांचून ती आपला काम वाढूं देत नाहीं, पतिव्रतेचा हा मनोधर्मच आहे.' परपुरुषें कामिली। कुलवधू आंग न घाली' १८–१०२७ )—ती कुलवधू परपुरुषाला आपल्या अंगाला बोट लावूं देत नाहीं. पतिव्रता धर्मानें स्वतः वागत असून पतीचेंही प्रेम संपादन केलेली स्त्री धन्य आहे. स्त्रीचें पतीवर प्रेम व पतिही स्त्रीचा मानसन्मान ठेवणारा, अशा दांपत्यांत पतीच्या एकपत्नीव्रताची तर तारीफच आहे. पण पतीपेक्षां पतिव्रतेचीच धन्यता आहे. 'पाहे पा अनुरागें भजे। जे प्रियोत्तमें मानिजे। ते पतींहूनि काय न वानिजे। पतिव्रता ?' ( ६–१२९ ). कुलस्त्री ही धर्मपत्नी आहे. धर्माचरणांत तिचें पतीला सर्वस्वी साह्य असतें. उभयतांनीं प्रेमानें, एकमतानें, ईश्वराराधन-बुध्दीनें धर्मकार्य करणें व धर्मकार्यार्थच गृहस्थाश्रमांची मांड आहे अशा विश्वासानें वागणें यांतच गृहस्थाश्रमाची धन्यता आहे व संसाराचें सुखसर्वस्व आहे. 'पतीचिया मता। अनुसरोनि पतिव्रता। अनायासें आत्महिता। भेटेचि ते' ( १६–४५६ ). दोघांचीं दोन मतें झालीं तर संसार नासतो, येवढ्याचकरितां शास्त्रकारांनीं धर्मकार्यनिश्चयाचा अखेरचा अधिकार ( Casting vote ) पतीला दिला असून त्याला अनुसरण्यांतच सतीचें कल्याण आहे असें आज्ञापिलें आहे. ती गृहदेवता आहे, धर्मपत्नी आहे अशी पतीला पुरी जाणीव पाहिजे आहे. असो. कांहीं थोडया पतिव्रता स्त्रिया निर्भयपणानें सतीही जात असत. 'वोखटें मरणा ऐसें। तेंही आलें अग्निप्रवेशें। परी प्राणेश्वरोद्देशें। न गणीच सती' ( १६–१८७ ); 'कां महासतीचे भोग। देखे कीर सकळ जग। परी ते आगी ना आंग ना लोक देखे' ( १६–४४० ). वृध्दपणापर्यंत सौभाग्य भोगणारी स्त्री पुण्यवंत गणली जाई; 'पतिव्रते आलें वार्धक्य जैसें'.

## ७ मातापित्यांचें प्रेम.

८. संसारांत मातापितरांच्या प्रेमाची जी अमृतसंजीवनी आहे तिचा आतां थोडासा स्वाद घेऊं. मुलीच्या संसारांत सासर माहेर हें असायचेंच. पितर प्रेमळ असून श्रीमंत असले तर 'लळेयांचे लळे सरती। मनोरथांचे मनोरथ पुरती' मुलींचे लाड होऊन त्यांच्या हौशी पुरविल्या जातात. तरुण नवरा बायको संसाराला लागली, 'तया दोघांस्तव पुत्र जन्मला', तो आजे-

---

[1] स्त्री भर तारुण्यांत आली व प्रियापतीनें तिचा अंगीकार केला कीं तिचें तारुण्य 'आंगींचें आंगीं न समाये'–अंगीं मावेनासें होतें ( अमृता. १०–२२ ).

यानें वाढविला व क्वचित् फाजील लाडानें बिघडविला ! ( ७ ओवी ६८-७० ). तें असो. लेंकराला मातापित्यांचे प्रेमसंगोपनाचें सुख मुख्य असतें. धाया-दाया ( १८-१७२ ) जरी श्रीमंतीमुळें ठेवतां आल्या तरी 'परावें बाळ धाया। पाळिजे जैसें ' ( ३-२४३ ) जन्मदेचा जिव्हाळा दाईला कधींच वाटायचा नाहीं. मूळ नक्षत्रीं जन्मलेलें मूल अशुभ वाटतें. [१८-१२३] तें असो. चांगलें मूल शुभसमयीं जन्मास आलें. साहव्या दिवशीं सटवीपूजन होऊन रात्रभर दिवा तेवत ठेवला: '‘सटवीचिये रातीं। जेविं न त्रिसंबिजे वाती ' [ १८-८३७ ]. वाढे प्रतिदिनीं बाळक हें ' बारशाचे दिवशीं मुलाला पाळण्यांत घालून त्याचें नांव ठेविलें. हळुहळू आपलें नांव ओळखूं लागलें, ' उपजलिया बाळकासी। नांव नाहीं तयापाशीं। ठेविलेनि नांवेसीं। ओ देत उठी ' (१७-३३०). त्याच्या नानावयवीं नाना लेणीं घातलीं, त्याच्या 'आंगुळियामध्यें मुदिया ' घातल्या [१४-१०७ ते ११०]. मुलाला चांगलें बाळसें आलें [ १४-१०७ ] ' हंसायरुसायला बाळाला वेळ अवेळ कांहींच नाहीं. कांकीं तें पडलें स्वेच्छ [१८ ६६९]. माउली बाळाला आपल्या अंकीं वाढविते, त्याला पालखीं-पाळण्यांत घालून परिये-झोके देते, स्तन्य देते-पाजते, त्याला बुझावून समजूत घालून निजविते, खेळणीं देते, बाळलेणीं त्याच्या अंगावर चढविते, अशी ही माउली आपल्या कृपादृष्टीची त्यावर साउली करून वाढविते. आई लेंकराची खरोखर कल्पलताच आहे [ १२ ओवी ५ ते १० ] ' मायेपुढें बाळका। रिगतां नाहीं शंका ' [ १३-२६१ ], ' तान्हयाचें लागतां झटे। तेणें अधिकाचि पान्हा फुटे. ' बरं बाळ क्वचित रुसलेंच तर ' रोषें प्रेम दुणवटे। पढियंतयाचेनि ' [ ९-१८ ] प्रेमाच्या माणसाच्या रोषानें प्रेम दुप्पट होतें ! ' आपुली ' तहानभूक नेणें। तान्हया निकें तें माउलीसचि करणें ' [ ९।३४० ] तान्हयाला केव्हां काय पाहिजे तें माउलीलाच करणें आहे. बाळाच्या तृप्तीनें तृप्त व्हावें किंवा शिष्याच्या कृतार्थतेंत कृतार्थता वाटावी ' हें सद्‌गुरुचि एकलेनि जाणिजे। कां प्रसवतिया ' ८।५५] बाळाच्या अंगावर आई प्रेमानें जीं लेणीं घालते त्याचें सुख बाळाला काय होय ' परी ते सुखाचे सोहळे भोगणें ' माउलिये दिली ' [ १०।५८ ]. आई जरी कुरूप, कुब्जा असली तरी तिचें प्रेम कांहीं कुब्ज-कुव्हें-वांकडें नसतें. दुसऱ्या शेजारणी ' रंभेहूनि बरविया ' असल्या तरी त्या त्या बाळाला काय होत ? ( १८-९२७।२८ ). बाळाचा स्वभाव कसा असतो पहाः ' हें चोख हें मैल (वाईट)। ऐसें नेणोनियां बाळ। जें देखे तें केवळ। मुखींचि घाली ' ( १६-२५० ) ' जैसें मातेच्या ठायीं। अपत्या अनवसर ( अवेळ ) नाहीं। स्तन्या लावूनि

पाहीं । जियापरी ' (३-२९) ' अपत्य थानीं रिगे । तयाची भूक ते मातेसीच लागे ' नाहींतर बाळ मागेल तेव्हां आई स्तन्य देत असते (८-१३). आईचें चित्त आधींच मायेचें आणि त्यांतही बाळ जर गुणाचें असलें ' तरी तें अद्भुतपण स्नेहाचें । कवण जाणे ! ' (५-१७०). बाळाच्या अत्यंत प्रेमामुळें माय बाळाला जेवूं बसली कीं त्याला ठाकतील तसे घांस करून त्याला भरविते (१८-१६९८), ' बाळ जैं जेवविजे । तैं घांस एक त्रिसां ठायीं कीजे ' (१३-९५१). बाळ अनावर रडूं लागला तर एखादवेळ ती बागुलबोवाची भीति दाखविते व तो गेला म्हणून त्याला खोटेंच मारते. ' बाळा बागुल देशें । दवडावा आहे ? ' (१५-२१४) त्याला काय दूरदेशीं पाठवायचा असतो ? 'बाळत्व निघोनि जाये । तैं बागुला* नाहीं त्राये । बळ ' (१८-४०७) हें उघड आहे. दुर्दैवानें मूल पांगळें झालें तर त्याचा जोजार आईला जन्मभर सोसावा लागतो (४-३४). लाडक्या बाळावर स्नेहाचे दृष्टीचें पांघरूण घालून बाळ खेळींत रमलें असतां आई त्याच्या मागोमाग धांवते व बाळ जो जो खेळ दाखवील तो तो ती त्याच्यापुढें सोन्याचा करून ठेवते. (१०-१३४।५) बाळाच्या लीला मनोरमः ' आळविलें कौतुकें । मागां असत ठाके । पुढां उभें ' (१७-३३३). ती त्याच्या बोबड्या बोलाचें व वाकडयातिकडया चालण्याचेंही कौतुक करिते. 'जैसा स्वभाव मायबापांचा । अपत्य बोले जरी बोबडी वाचा । तरी अधिक तयाचा । संतोष आथी (१-६४). नातरी बालक बोबडां बोलीं । वांकुडा विचुका पाउलीं । तें चोज करूनि माउली । रिझे जेवीं ' (९-६). स्वतःच कौतुक करिते इतकेंच नाहीं तर इतरांना करायला लावून-' करविले नि चोजें रिझे । बाळका माय ' (११-१७). आई बाळावर-क्वचित् रागावलीच तर तिच्या कोपांतही केवढें प्रेम असतें ! ' मातेच्या कोपीं थाकलें (गुप्त) । स्नेह आथी ' (२-८८), अहितीं कोपोनि सोप (वरवर) । लालनीं मउ जैसें पुष्प । तिथें मातेचें स्वरूप । जैसें होय ' (१६-१२३). एखाद्या बाईला पुष्कळ वर्षें मूल झालें नाहीं कीं ती वांझ ठरते. 'वांझेचिया लेंका । कैंची जन्मपत्रिका' (१५-२३४). त्यांतही नवसासायासानें एकदां तिला मूल झालें मग त्याचें कोडकौतुक तर किती असतें तें काय सांगावें ? ' वयसेचि शेवटीं । जैसी एकचि विये वांझोटी । मग ते मोहाची त्रिपुटी । नाचों लागे ' (६-१२१)-आई, मूल व बाप ह्या त्रिपुटीनें मूर्तिमंत मोहच अवतरला आहे कीं काय असें वाटतें ! ' म्हातारपणीं

---

* ' बागुलाचेनि मरणें । तोषावें कीं बालपणें । येरां तो नाहीं या कोणें । मृत्यु मानावा ? ' [ अमृता. ३-१३ ]

झालें । रत्न एक । उवायिलें ( उत्कृष्ट ) । तयाचें कां जेतुलें । माता पितरा ' (१३–७८८). तेतुलें यथार्थ कोण वानूं शकेल? अत्यंत दुर्दैवानें गुणी, सुंदर व लाडकें मूल जर कालवश झालें तर त्याला कोणी उचलून नेण्यास येतांच तिला युगांत होतो (१८-७८६) व ' एक लौतीया बाळका- । वरी पडोनि ठाके अंबिका ' (१३–५०३) दुःखाचा कळसच तो! 'राजहंस माझा निजला ' असलीं शोकगीतेंही तिला त्या मूर्च्छेंतून ती सावध होईल तेव्हांच सुचायचीं! असो. आवडतें गोडसें मूल नशीवानें जगलें वांचलें तर बापाकडे त्याच्या शिक्षणाची जबाबदारी येते. ज्ञानेश्वरांनीं आई व बाप यांच्या प्रेमांत कांहीं भेद केलाच नाहीं, पण ' आई ती आई बाप तो बाप ' असें कोणी म्हटलेंच तर आईच्या प्रेमाला पौर्णिमेची चंद्रकला म्हटल्यास बापाच्या प्रेमाला चतुर्दशीची चंद्रकला म्हणावें! ' बाळक बापाचिये ताटीं रिगे । आणि बापातेंचि जेवूं लागे । कीं तो संतोषलेनि वेगें । मुखाचि वोढवी ' (९-३). ' बाप पुढें जाये । ते घेत पाउलाची सोयें ' (१८–१७२२). बाळही त्याच्या मागोमाग हळुहळु चालायला शिकते. ' पुत्राचे सहस्र अपराध । जरी जाहले अगाध । तरी पिता साहे निर्द्वंद्व ' (११–५७२). कां कीं आज नाहीं उद्या हा सुधरेल, रस्त्याला लागेल अशी त्याला आशा असते. ' पुत्रें मी सर्वगुणीं । जिणावा हें बापा शिराणी (आवडी' १८–१६५३). याप्रमाणें आईबापांचा व लेकरांचा संबंध अतिशय गोड आहे. आईबापांचें विपुल सुख ज्यांच्या वाट्याला येतें ते खरोखर धन्य आहेत आईबापांचें मुलांवरचें अत्युत्कट प्रेम अगदीं सहज, अकृत्रिम आहे. मुलांचे बाळपणीं आईबापांवर तसेंच अत्युत्कट प्रेम असतें. पण पाण्याचा ओघ पुढें असतो–तो मागें वळत नाहीं. म्हणून 'मातृदेवो भव । पितृदेवो भव ' असें श्रुतीला सांगावें लागतें. वस्तुतः असा उपदेश करावा लागणें ठीक नाहीं. सारे थोर पुरुष निस्सीम मातृभक्त व पितृभक्त असतात. आपल्या उगमाशीं– आईबापांशीं आणि तसेंच थोडें पुढें जातां ईश्वराशीं–जो कृतज्ञ नाहीं, उगमाला जो विसरतो, त्याच्यांत दुसरे कोणते उदात्त गुण असणें शक्य आहे? उगमाशीं बेमान–धिक्कार असो त्याला! ' आईबापांशीं वांकडा आणि जगाशीं गोड–त्याला ज्ञानेश्वरांनीं ' मूर्ख ' एवढाच सौम्य शब्द लावला आहे! ' घरीं मातापितरां । धड बोली नाहीं संसारा । येर विश्व भरी आदरा । मूर्ख जैसा ' (१८–५९५). वस्तुतः ' सकल तीर्थांचिये धुरे । जिये का मातापितरें । तया सेवेसीं कीर शरीरें । कोण कीजे ' (१७–२०७)–आईबाप हें सर्व तीर्थांचें तीर्थ आहेत. त्यांच्या सेवेंत आपलें शरीर ओवाळून सांडावें हा सत्पुत्राचा धर्म आहे; म्हणून ' मातापितरें अर्जिजती । सर्वस्वें तोष पावविजती ' (२–३२) त्यांचा संतोष, त्यांचा प्रेमाशीर्वाद हें संसारी मनुष्याचें भांडवल आहे.

## ८ गुरुभक्ति.

९. आई आणि बाप यांच्याप्रमाणें गुरूविषयीं प्रेमादर असणें हें संसार-सुखाचें एक वर्म आहे. विद्यागुरु व मोक्षगुरु असे गुरु दोन प्रकारचे आहेत. अर्जुनाचे विद्यागुरु द्रोणाचार्य व मोक्षगुरु स्वतः भगवान् श्रीकृष्ण; ज्ञानेश्वरांचे विद्यागुरु व मोक्षगुरु एकच निवृत्तिनाथ. ज्ञानेश्वरांची गुरुभक्ति त्यांच्या ग्रंथांत सर्वत्र भरली आहे किंबहुना त्यांच्या अलौकिक गुरुभक्तीच्या बळावरच प्रस्तुत ग्रंथ त्यांना स्फुरला आहे याबद्दल अन्यत्र विवेचन केलें आहे. येथें फक्त विद्यागुरूबद्दल दोन अक्षरें लिहितों. लहान मुलांना शिकविणारे शिक्षक यांना त्या वेळीं पंडित किंवा पंतोजी म्हणत. ते पाटीवर लिहावयास शिकवीत. ' हें बहु असो पंडित । धरूनि बाळाचा हात । वोळी लिही सुव्यक्त । आपणाचि ' -( १३-३०८ ). पाटया म्हणजे धुळपाटया: ' पाटीवरील अक्षरें । जैसी पुसों येती करें ' ( १८-१०९९ )* गीतेसारखीं धर्मपुस्तकें लिहून तीं योग्य माणसास देणें पुण्यप्रद समजत. ' गीता लिहोनि वाहणें । पुस्तकमिषें ' ( १८-१४६१ ). विद्या म्हणजे एक महासमुद्र आहे. गुरूचा अधिकार, विद्येची किंवा कलेची महती व शिष्याची सुबुद्धि यांच्या प्रमाणावर विद्येचें गौरव व विद्येचें फळही मिळे. अक्षर शिकविणारे गुरु शिष्यास वर वळणदार लिहून देत व विद्यार्थी त्याखालीं तशींच अक्षरें पाहून काढी: ' धडयाचि आंखरा-। तळीं बाळ लिहे दातारा ' ( १७-४२ ). अक्षरओळख लिहिणें वाचणें येथपासून आरंभ आहे. सामान्यांचा हा मार्ग आहे. सरस्वतीचे कंठ-मणि, तिचे लाडके, त्यांना कांहीं धडे पाठ करून शिकावें लागत नाहीं ( ९-८ ). असले असामान्य बुद्धीचे पुरुष अपवाद होत. ते उपजत ज्ञानी " बाळपणींच सर्वज्ञता वरी तयाते " ' तियें सिद्ध प्रज्ञेचेनि लाभें । मनचि सारस्वत दुभे । मग सकळ शास्त्रें स्वयंभें । निघती मुखें ( ६-४५४ ). काव्यें, इतिहास पुराणें, शास्त्रें व अखेर अध्यात्म येथपर्यंत अनेक विद्या आहेत. १४ विद्या ६४ कला अशी आपली पूर्वापार म्हण आहे. सांप्रत ६४ विद्या व ६४०० कला येथपर्यंत विद्येची वाढ झाली आहे. त्यावेळीं मुख्य मुख्य विषय कोणकोणते शिकवीत यांचें एक ज्ञापक ज्ञानेश्वरींतच आहे. अध्यात्मविद्या ही अर्थात् सर्व विद्यांत अत्यंत श्रेष्ठ आहे. तिच्यावांचून बाकीच्या विद्या संसारांत उपयुक्त असतील, पण बंधमुक्त करणारी एक अध्यात्मविद्याच होय. ' कर्मकांड तरी जाणे । मुखोद्गत पुराणें । ज्योतिषीं तो म्हणे । तैसेंचि होय ॥ शिल्पीं अतिनिपुण । सूपकर्मीही प्रवीण । विधि अथर्वण । हातीं आथी ॥

* ' शब्दाची लिही पुसें '-लिहिलेलीं अक्षरें पुसतां येत ( अमृता० २-२८ ). शाईची खटपट केली की ' लिहों येती अक्षरें ' ( अमृता० ६-३६ ).

कोठें नाहीं ठेलें । भारत कीर म्हणितलें । आगम अपात्रिलें । मूर्त होती ॥ नीतिशास्त्र सुझे । वैद्यकही बुझे । काव्यनाटकीं दुजें । चतुर नाहीं ॥ स्मृतींची चर्चा । दंश जाणें गारुडीचा । निघंट प्रज्ञेचा । पाइकी करी ॥ पैं व्याकरणीं चोखडा । तर्कीं अति गाढा । परी एक आत्मज्ञानीं फुडा । जात्यंध जो ॥ मोराअंगीं अशेषें । पिसें असती डोळसें । परी एकली दृष्टि नसे । तैसें तें गा ॥ तैसें शास्त्रजात जाण । अघवेंचि अप्रमाण । पार्था अध्यात्मज्ञानेंविण । एकलेनि' (अ० १३ ओवी ८२९ ते ८३९ ). विद्या कोणतीही असो, ज्या गुरूपासून कोणतीही विद्या आपणास मिळते त्याविषयीं पूज्य बुद्धि असणें हा आपला मुख्य मुद्दा आहे. अध्यात्मविद्या व ती देणारे सद्गुरु हा प्रश्न वेगळा आहे. लौकिक विद्या देणाऱ्या गुरूविषयींही पूज्यबुद्धि व प्रेमादर असणें ही कुलवंताची रीत आहे. अर्जुनाला असलीच एक लौकिकविद्या ह्म० धनुर्विद्या द्रोणाचार्यांपासून मिळाली होती. त्याविषयीं त्याचा प्रेमादर किती विलक्षण होता हें पाहण्यासारखें आहे. राजकीय दृष्ट्या द्रोणाचार्य विरुध्दपक्षांतले असल्यामुळें त्यांच्याशीं युद्धप्रसंग वोढवला तेव्हां अर्जुन म्हणतो: 'मी पार्थ द्रोणाचा केला । येणें धनुर्वेद मज दिधला' त्याशीं म्यां स्वप्नांतही वैर करूं नये. ज्यांचा आशीर्वाद घ्यावयाचा त्यांच्याशीं वैर. कोण प्रसंग हा ! समुद्र गंभीर पण तोही प्रसंगीं खवळतो, माझ्या द्रोणाचार्यांच्या मनाला क्षोभ ठाऊक नाहीं ! आईचें प्रेम खरें पण 'कृपा ते मूर्ख आहे द्रोणीं इथे !' 'हा कारुण्याची आदी । सकळगुणांचा निधी, विद्यासिंधु निरवधि । अर्जुन म्हणे ॥ तो एवढा मोठा महंत आणि आम्हांलागीं कृपावंत ! (२ ओवी ३७ ते ४४ ) अर्जुनाच्या हृदयांत हें जें गुरुभक्तीचें बीज होतें तेंच त्याच्या यशाचें कारण आहे. सर्व कुलवंत आपल्या विद्यागुरूविषयीं असें कृतज्ञ असतात—हा थोर गुण यशदायक आहे.

## ९ तरुणांचे खेळ व विनोद

१०. महाराष्ट्रीय तरुणांत व बालांत कुस्ती, कोलकाठी, भिंगोरी, कोलती व चेंडू हे बाहेरचे व सारी ( सोंगटी ) हा बैठा अशा सहा प्रकारच्या खेळांचा प्रघात होता असें ज्ञानेश्वरीवरून दिसतें. कुस्ती, कोलकाठी व सोंगटी यांचा ११ व्या अध्यायांत, भिंगोरी व कोलती यांचा १५ व्यांत, व चेंडूचा १६ व्यांत उल्लेख आहे. '**भिंगोरी** निधिये पडली । ते गमे भूमीसी जैसी जडली । ऐसा वेगातिशय भुली । हेतु होय' ( १५-१३६ )—भिंगोरी म्ह० भोंवरा जमीनीवर टाकतांच अत्यंत वेगानें फिरूं लागला कीं भूमीला जडल्यासारखाच दिसतो. **कोलती** भोंवंडितां अखंड व चक्राकार दिसते (१५—१३७). '**चेंडू** भूमी हाणिजे । हें नव्हे—तो हातां आणिजे' ( १६—१०० ), चेंडू,

कंदुक उदकावर आपटल्यानें हातीं येत नाहीं (१७-२८०) चेंडूबरोबर लगोऱ्यांचा उल्लेख आहे. 'आपणचि आडखिळा कीजे। तो कौतुकें विंधोनि पाडिजे' (११-४७८)-आपणच लगोऱ्यांची रास-निशाण-उभी करून आपणच ती नेम धरून पाडतों. बाकीच्या तीन खेळांचा उल्लेख अर्जुनाच्या भाषणांत आहे. विश्वरूपदर्शन झाल्यावर अर्जुनास वाटलें कीं, ज्याच्याशीं आपण आजवर सलगीच्या नात्यानें वागलों, सोयरेपणाच्या व त्यांतही वरचढपणाच्या (कृष्णाचा अर्जुन आतेभाऊ व त्याच्या बहिणीचा म्ह० सुभद्रेचा नवरा अर्थात् मेहुणा) डौलानें वागलों, हंसलों, रुसलों, फुगलों, खेळलों, त्याची थट्टा केली, अपमान केला-हा आपला केवढा मूर्खपणा झाला! कृष्णाची खरी योग्यता न कळल्यामुळें हा थोर प्रमाद झाला याबद्दल पश्चात्ताप वाटून अर्जुन देवाची क्षमा मागत असतांना म्हणतो:—

"देवा! तूं विश्वाद्य परमात्मा आहेस हें न कळल्यामुळें मी तुजशीं आजपर्यंत अयोग्य रीतीनें वागलों. सभासदांत तूं बसला असतांना सोइरेपणाच्या डौलानें तुझी म्यां रळी (थट्टामस्करी) करावी, जेव्हां केव्हां तुझ्या घरीं यावें तेव्हां तूं माझा मानसन्मान ठेवावास पण मीच तुझ्यावर सलगीनें रुसून जावें, तूं माझ्या पायां पडून माझी समजूत काढली पाहिजेस असा म्यां हट्ट धरावा-अशी माझी वागणूक झाली! मित्र व मेव्हणा या डौलांत तुझ्याकडे म्यां पाठ करून बसावें! तुझ्याशीं **कोलकाठी** (दांडपट्टा)खेळावी, आखाड्यांत **झोंबाझोंबी** (कुस्ती) खेळावी, **सारी** (सोंगट्या) खेळतांना घर चोरावें व उलट तुझ्याशीं निकरानें भांडावें, चांगली वस्तु ती निर्भीडपणानें मागावी, सर्वज्ञाला तुला बुद्धि सांगावी (शहाणपणा शिकवावा,) 'तुझें आम्ही काय लागतों' असें म्हणावें, बोनियाच्या (भोजनाच्या) वेळीं त्वां प्रेमानें माझी आठवण करावीस, पण मी निसुग (निर्लज्ज) तुझ्यावरच उलटें फुगून बसावें, तुझ्या विलासमंदिरांत बेधडक घुसून तुझ्या बिछान्यावर तुझ्या शेजारीं निजावें, कृष्णा म्हणून तुला हाकारावें, सामान्य यादव समजून तुझ्याशीं वागावें. तूं जायला लागलास तर तुला आपली शपथ घालावी, तुझ्या शेजारीं तुझ्या आसनावर बसावें, तूं सांगितलेलें कांहीं मानूं नये,-असे वोवटीचेनि दाटपणें (अतिपरिचायच्या, घसटीच्या योगानें) माझ्या हातून तुझे फार अपराध घडले आहेत. पण ते नेणतेपणानें घडले असें तुझ्या पायाला हात लावून मी सांगतों! प्रीतीनें किंवा प्रमादानें तुझ्याशीं मीं विरुद्धें फार केलीं. तूं विश्वसुहृद्-तुझ्यावर सोयरेपणा गाजविला. तूं विश्वेश्वर-तुझ्यावर ऐश्वर्याचा डौल केला! तूं सभेंत माझे गुण वाखाणावेस आणि मी उलट तुझ्यावर क्षोभें (रागावून) वल्गना (बडबड)

१ चेंडू, व चेंडूफळी (अमृता० ९-५६।५७).

करावी ! स्नेहाच्या घरीं मानसन्मान इच्छूं नये म्हणून तूं आमच्या घरीं उच्छिष्टें काढावींस आणि 'परब्रह्म तूं उघडें' तुला म्यां आपला सारथी करावा माझ्या रथावर बसवावें ! सहस्रवार क्षमा कर " ( अ. ११ ओवी ५४० ते ५७७ ).

---

# सत्याग्रहाचें व बहिष्काराचें तत्व !

१. सांप्रत महात्मा गांधींच्या प्रेरणेनें व त्यांच्या पुढारीपणाखालीं मिठाचा सत्याग्रह ठिकठिकाणीं करून शेंकडों-हजारों लोक आनंदानें तुरुंगवास पत्करीत आहेत, पोलीसाच्या हातचा मार खात आहेत, प्रतिकार न करितां सरकारी अधिकाऱ्यांचा छळ सोशीत आहेत, स्त्रियाही सत्याग्रहाकरितां पुढें येत आहेत व पति सत्याग्रहाकरितां तुरुंगांत गेल्याबद्दल आनंद व्यक्त करीत आहेत. असा हा मोठा वीरश्रीचा काळ जवळ येत चालला आहे, याबद्दल प्रत्येक राष्ट्रहितेच्छुस मनापासून समाधान वाटत आहे. राजकीय सत्ता परकीय व परधर्मी लोकांच्या हातीं असून केवळ स्वार्थाकरितां राष्ट्राच्या अंगाला तुंबड्या लावून त्याचा द्रव्यशोष व रक्तशोष हजारों प्रकारांनीं ते करीत असतां स्वरक्षणाचें सामर्थ्य अंगीं नसलेल्या जित राष्ट्राला या सत्याग्रहापरतें दुसरें साधन नाहीं. हा महामंत्र महात्मा गांधी आपल्या राष्ट्राला कित्येक वर्षे शिकवीत आहेत. आफ्रिकेंत असतांना त्यांनीं लोकांना तो शिकविला. त्यांची सत्याग्रहावर पूर्ण श्रद्धा आहे. तो १९३० सालीं लोकांना थोडासा पटत चालला आहे. पांचसात वर्षांमागें महाराष्ट्रानें महात्माजींची याबद्दल पुष्कळ कुचेष्टा केली, पण सत्याग्रहाशिवाय आपणाजवळ दुसरें साधन नाहीं हें त्यास थोडेसें पटत चालल्यामुळें आपापसांतील मतभेद विसरून तोही महात्माजींचा सत्याग्रहाचा महामंत्र स्वीकारूं लागला आहे.

२. दोन तपांमागें बंगालनें पुढाकार घेतला होता, आज पुढारीपणाचें यश परमेश्वराच्या मनांत गुजराथला देण्याचें आहे. मेकॉले प्रभृति इंग्रजांनीं बंगाली लोकांना नामर्द ह्मणून डिवचलें तो कलंक बंगाल्यांनीं काढून टाकला; गुजराथी लोकांबद्दल महाराष्ट्राची अशीच भावना होती, ती गुजराथ आज काढून टाकीत असून हिंदीराष्ट्राच्या उन्नत्यर्थ झटणाऱ्या देशभक्तांचें अग्रेसरत्व आज नारायणानें गुजराथला दिलें आहे. नारायणाला कोणाचाही अहंकार व उन्माद खपत नाहीं. महात्मा गांधी, विठ्ठलभाई

पटेल व वल्लभभाई पटेल हे तीन लोकोत्तर वीर राष्ट्राच्या युद्धांत अभिमन्यू-प्रमाणें आज बिनीवर लढत आहेत. महाराष्ट्र, बंगाल, पंजाब व मद्रास हे प्रांत आज अभिमानानें व आनंदानें महात्माजींच्या नेतृत्वाखालीं राष्ट्राचा लढा लढण्यास पुढें सरसावत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. उच्चतम राष्ट्रीय भावना उदित झाल्या कीं, क्षुद्र प्रांतीय व जातीय दुरभिमान लुप्त होतात असा हा सुंदर देखावा १९३० च्या एप्रिल महिन्यांत दिसूं लागला आहे. याला कोणा चांडाळाची दृष्ट न लागो व सारा हिंदुस्थान एकमतानें स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या ह्या महायुद्धांत सामील होवो अशी परमात्मचरणीं मुमुक्षूची प्रार्थना आहे.

३. सत्याग्रह व बहिष्कार ह्या दोहींचें तत्व एकच आहे. मिठाचा सत्याग्रह हें एक निमित्त आहे. परदेशी कपडाच काय पण परदेशीय सर्व वस्तूंचा व अनिष्ट अशा परकीय कल्पनांचाही पूर्ण त्याग झाला पाहिजे. इंग्रजी अमदानींत बोकाळलेल्या मद्यपान, चहा, चिरूट, नाटकसिनेमादिकांची आसक्ति व शरीराचे फाजील चोचले इ० सर्व दुर्व्यसनांचा पूर्ण त्याग झाला पाहिजे. ज्या ज्या गोष्टींनीं लोकांत नामर्दपणा उत्पन्न केला आहे त्या त्या सर्व गोष्टींचा पूर्ण त्याग होऊन राष्ट्र मर्दांचें बनलें पाहिजे. शत्रूंच्या मिशा उपटावयाचें सोडून लोक आपल्याच मिशा काढून टाकीत आहेत किंबहुना त्या चतकोर नितकोर अशा कोरीव ठेवून व भांग काढून तरुण बायको बनत आहेत. असल्या दिसण्यांत क्षुद्र पण परिणामीं नामर्दपणा आणणाऱ्या क्षुल्लक गोष्टींचाही त्याग होऊन पिंड पोसणें व पिंड भूषविणें यांतून चित्त निघून 'उच्च विचार व साधी राहणी' या तत्त्वावर लोक आले पाहिजेत. हळू हळू येऊं लागले आहेत, देहाविषयीं औदासीन्य वाढत असून उच्च ध्येयासाठीं जगण्याकडे प्रवृत्ति होत आहे ही मोठी उमेदीची गोष्ट आहे. राष्ट्रकल्याणार्थ झटण्याची आंच जसजशी लागत जाईल तसतशा बायकी संवई व दुर्व्यसनें यांचा नायनाट होत जाईल. उच्च विचारांच्या प्रेरणेचा काळ जवळ येत आहे यांत समाधानाची जागा आहे.

४. सत्याग्रह, बहिष्कार हें तत्व पुरातन आहे, त्याचा स्वीकार अन्यायापासून आपली सुटका करून घेण्यापुरताच करावयाचा आहे. हें तिखट शस्त्र आहे, तें आपल्याच अंगावर चालवावयाचें नाहीं, त्याचा जपूनच उपयोग केला पाहिजे. मूर्खांच्या हातांत हें शस्त्र पडलें तर त्याचा ते आत्मनाशार्थ उपयोग करितील. सत्याग्रही वीर आत्मसंयमी व धीरोदात्त पाहिजे. मार खायचा–द्यायचा नाहीं, अपमान छळ सोसायचा–करायचा नाहीं हें मुख्य तत्व सांभाळलें पाहिजे. नाशकास श्रीराममंदिराभोंवतीं अस्पृश्यांनीं जो सत्याग्रह चालविला त्यांत पोरकट गोष्टी पुष्कळ घडल्या. एका महारानें पुजाऱ्यांना दारांत अडविलें तेव्हां त्याच्या तोंडांत मारिली व महारांनीं त्या हट्टाग्रही वीराच्या गळ्यांत हार घालून त्याची-तिची मिरवणूक काढली ! असल्या पोरकट भावना सत्याग्रहीला शिवतां कामा

नये. त्यानें कार्यनाश होतो. वैर वाढविणें हें सत्याग्रहीचें ब्रीद नाहीं. तुकोबासारख्यांनीं, प्रल्हादासारख्यांनीं देवाच्या प्राप्तीसाठीं अत्यंत प्रेमाचा—फार गोड व परिणामीं हितावह असा सत्याग्रहच केला आहे. प्रल्हादानें बापाचा छळ सोसला, बापाचा उपमर्द केला नाहीं. देव आपलें कार्य पाहून घेईल, ज्याला त्याला आपल्या कर्माचें फळ भोगायला लावील, या निष्ठेनें सत्याग्रही वीर आपलें सच्छील सोडीत नाहीं, आपल्या उच्च ध्येयावरून खालीं येत नाहीं. चोखामेळा या थोर भगवद्भक्तानें देवाला आपल्यापाशीं यायला लावलें, त्यानें स्पृश्यांशीं झगडा केला नाहीं. त्याच्या सत्याग्रहानें त्याला देव पावला व स्पृश्यांनींही त्याला डोक्यावर घेतलें ! चोखामेळ्याचे अभंग रामेश्वरभट्ट नामक ब्राह्मणानेंच लिहून जगाला दिले आहेत. महात्मा गांधींच्या सत्याग्रहाबद्दल टाईम्स कांहींही बरळो, थोर इंग्रजही गांधींना वंदनीय मानीत आहेत. सच्छीलानें शत्रुही मित्र बनतात. असें उत्तम शील कमावून सत्याग्रही बनावें, त्याला परमात्मा शेवटीं यश देतोच देतो.

५. राजसभा ( Assembly and Councils ) जेव्हां अन्याय व अधर्माच्या मार्गानें जात असतील तेव्हां त्यांवर बहिष्कार घालावा ह्या मताचा श्रीमद्भागवतानें पुरस्कार केलेला आहे. कौन्सिलबहिष्कार महात्मा गांधी कित्येक वर्षें सांगत आहेत. पण त्यावर कित्येक देशभक्तांचा विश्वास बसला नव्हता. अजूनही कौन्सिलांना चिकटून बसण्याची बहुतांची प्रवृत्ति आहेच. दुष्ट व दुर्दमनीय कंस यानें ‘ यदूनां कदनं चक्रे’—यादवांचें कंदन करण्यास प्रारंभ केला, तेव्हां यादवांपैकींच कांहीं कंसाच्या अनुसंधानानें वागून ( चंद्रराव मोऱ्याप्रमाणें ) स्वजातीशीं द्रोह करीतच असतां ‘ एके तमनुसंधाना ज्ञातयः पर्युपासते ’— कित्येक यादवांचे ज्ञातिबांधव कंसाच्या तंत्रानें वागून सर्वतोपरी त्याची सेवा करीत राहिले ( स्कंध १०—२—४ ). असे होयबा पोटभरू सर्वकाळीं कांहीं असतातच. कंसानें बळराम व कृष्ण यांना गोकुळाहून मथुरेस आणविलें व भलेभले कसलेल्या मल्लांशीं त्यांच्या कुस्त्या लावून दिल्या—हेतु हा कीं त्यांचा परस्पर नाश व्हावा. बलाढ्यांशीं त्या बालवीरांचे झगडे पाहून प्रेक्षकांपैकीं स्त्रिया म्हणाल्याः—

महानयं बताधर्म एषां राजसभासदाम् ।
ये बलाबलवद्युद्धं राज्ञोऽन्विच्छान्ति पश्यतः ॥ ७ ॥
क्व वज्रसारसर्वांगौ मल्लौ शैलेंद्रसंनिभौ ।
क्व चातिसुकुमारांगौ किशोरौ नाप्तयौवनौ ॥ ८ ॥
धर्मव्यतिक्रमो ह्यस्य समाजस्य ध्रुवं भवेत् ।
यत्राधर्मः समुत्तिष्ठेन्न स्थेयं तत्र कर्हिचित् ॥ ९ ॥

न सभां प्रविशेत्प्राज्ञः सभ्यदोषाननुस्मरन् ।
अब्रुवन्विब्रुवन्नज्ञो नरः किल्बिषमश्नुते ।। १० ।।

कृष्णाचें चाणूराशीं व बलरामाचें मुष्टिकाशीं युद्ध चाललें आहे हा केवढा अधर्म ह्या राजसभेंतील सभासद करीत आहेत, पहा बरें! बलाढ्यांचें बलहीनाशीं युद्ध लावून हे खुशाल मजा पहात बसले आहेत. ( असेंब्लींतही सरकारची सर्व सत्ता पाठीशीं असलेले होममेंबर व कसलीच सत्ता नसलेले नेहरू व मालवीय यांच्यांतील वाग्युध्द याच मासल्याचें नव्हे काय ? ) वज्राप्रमाणें कठोर देहाचे पर्वतप्राय हे दानव कोठें व अतिसुकुमार व यौवनांतही न आलेले ( राजकारणाचे पांचपेंच ज्यांना अजून शिकायचे आहेत असे ) हे किशोर कोठें ? ह्या राजसभेला धर्माचें उलंघन केल्याचा महादोष खास लागणार आहे !

ज्या स्थळीं अधर्म घडण्याचा संभव आहे तेथें कधींही बसूं नये. सुज्ञ मनुष्यानें, सभासदांच्या अंगीं दोष आहेत असें वाटल्यास, त्या सभेंत जाऊंच नये; कारण तेथें गेल्यावर अन्यायाच्या विरुद्ध बोललें नाहीं तरी मनुष्याला दोष लागतो! व विपरीत बोललें तरी दोष लागतो. म्हणून शहाण्या मनुष्यानें असल्या सभेवर बहिष्कारच घातला पाहिजे.

बहिष्काराचें तत्त्व किती उत्कृष्ट रीतीनें येथें सांगितलें आहे! 'म्हणोनि गा पार्था । जे विमुख या परमार्था । तयांसी भाषण सर्वथा । करावें ना ' ह्या ओवींत ज्ञानेश्वरमहाराजांनीं याच तत्वाचा उच्चार केला आहे.

---

# गोडबोले व चिपळोणकर.

**परशुरामतात्या गोडबोले** ( इ. स. १७९९–१८७४ ):–वाईस सरदार रास्ते यांच्या आश्रयास येऊन राहिलेल्या अनेक घराण्यांपैकीं गोडबोले हे एक होते. तात्यांचा जन्म मोरोपंतांच्या निधनानंतर पांचच वर्षांनीं झाला. त्यांचें बाळपणचें शिक्षण वाईस झालें. पुढें ते चरितार्थासाठीं पुण्यास आले व आपले मातुल जोग यांच्या प्रसिद्ध पेढीवर कारकून म्हणून राहिले. पेशवाईची अखेर यांनीं पाहिली असून इंग्रजी अमदानींचीही भरभराट पाहिली. मोरोपंतांच्या निधनापासून तों निबंधमालेच्या जन्मापर्यंतच्या काळांत हे हयात असून राजकीय घडामोडींविषयीं किंवा सामाजिक स्थित्यंतरांविषयीं यांनीं एक अवाक्षरही कोठें लिहिलें नाहीं. मराठी कविता वाचणें, लिहिणें, ऐकणें व छापणें हा एकच एक व्यासंग यांनीं जन्मभर केला. शास्त्रीमंडळाचा ' महाराष्ट्रभाषेचा कोश ' इ० स० १८२९ मध्यें प्रसिद्ध झाला, त्याच्या संपादकीयवर्गांत तात्या होते. त्यानंतर कँडी यांनीं जे इंग्रजी–मराठी व मराठी–इंग्रजी कोश प्रसिद्ध केले

( १८४७ ) त्यांत तात्यांची कामगिरी तर मुख्यच होती. तात्यांनीं महाराष्ट्र काव्यार्णवाचें आलोडन करून त्यांतून सुरस पद्यरत्नें निवडून तीं ' नवनीत ' रूपानें वाचकांच्या हातीं ( १८५४ ) दिलीं. त्यांनीं ' रसिकजनांस प्रार्थना ' केली तीही रसभरित आहेः—

काव्यामृताचा नवनीतभेला । हा गोड लागो तुमच्या जिभेला ।
याची तुम्ही चाखुनि घ्याल गोडी । तेव्हां सुखाची मिळवाल जोडी ॥
नाना काव्य तरुव्रजीं हुडकितां जीं जीं बरीं भावलीं
तीं तीं वेंचुनि घेतलीं सुकुसुमें पात्रांत जीं मावलीं ।
त्यांची गुंफुनि रम्य माळ विबुधां अत्यादरें अर्पिली
ती कंठीं विलसो तिणें कविसभा हे वो सदा तर्पिली ॥

नवनीताच्या आठ आवृत्या तात्यांच्या हयातींत निघाल्या. त्या अर्थात् सरकारी शाळाखात्यानें तें पुस्तक आदरिलें म्हणून. हें खरें असलें तरी तात्यांच्या नवनीतानें सामान्य वाचकांस मराठी कवितेची गोडी लावली ही गोष्ट खोटी नाहीं. पुढें मराठी क्रमिक पुस्तकें सरकारनें तयार केलीं त्यांतील ' कवितांच्या धडयांचें सगळें काम परशुराम पंत तात्यांकडे सोंपविलें होतें. ' या जुन्या क्रमिक पुस्तकांतून कवितांची निवड किती उत्कृष्ट केली होती हें अलीकडचीं पुस्तकें पाहिलीं म्हणजे चांगलें लक्ष्यांत येतें ! तात्या जुन्या परंपरेंत वाढलेले होते. कृष्णशास्त्री चिपळूणकरांसारख्यांच्या मोरोपंती शंकांचें निरसन तात्यांच्या घरीं होत असे. पंतांच्या कवितेवर तात्यांची मोठी भक्ति होती, तिला कोणी नांवें ठेवलेलीं त्यांना खपत नसत. ' प्राकृत कवितेंत मोरोपंताच्या कवितेसारखी कविता नाहीं ' असें त्यांनीं नवनीतांत लिहिलें आहे. ' रात्रींतून, दिवसांतून जो वेळ रिकामा सांपडे तो बहुधा मोरोपंतांचें काव्य वाचण्यांतच वरील पंडिताचा जात असे असें सांगतात ' ( निबंधमाला अंक ५८ ). पंतांची कविता छापून काढण्यासाठीं मुंबईचे माधव चंद्रोबा डुकले यांनीं ' सर्वसंग्रह ' नामक मासिक १८६२ मध्यें सुरू केलें, त्यांतही तात्यांची मदत होतीच. याप्रमाणें तात्यांनीं नवनीत, क्रमिक पुस्तकांतर्गत कवितांची निवड व सर्वसंग्रह या द्वारांनीं मराठी कवितेची सेवा केली व वाचकांस वृत्तांची माहिती असावी म्हणून छोटेसें ' वृत्तदर्पण'ही प्रसिद्ध केलें. याशिवाय तात्यांची आणखी एक कामगिरी सांगावयाची आहे. संस्कृत नाटकांचीं मराठी भाषांतरें करण्याचा तात्यांनीं उपक्रम केला. मराठींतलें पहिलें भाषांतरित नाटक म्हणजे तात्यांचें 'वेणीसंहार' ( १८५७ ) हेंच होय. पुढील पंचवीस वर्षांत त्याच्या तीन आवृत्त्या निघाल्या. उत्तररामचरित्र ( १८५९ ), शांकुतल ( १८६१ ), मृच्छकटिक, नागानंद, पार्वतीपरिणय अशीं एकंदर सहा नाटकें तात्यांनीं भाषांतरिलीं. अलीकडच्या संगीत नाटकांमुळें तात्यांचीं नाटकें जरी मागें पडलीं असलीं तरी रसिक-

तेच्या व भाषासौष्ठवाच्या दृष्टीनें तीं रसिक तात्यांच्या नाटकांची तादृश बरोबरी करूं शकणार नाहींत.

२. कृष्णशास्त्री चिपळोणकर—(१८२४-१८७८) यांचे पूर्वज रत्नागिरी जिल्ह्यांत पावस गांवचे राहाणारे. दोन पिढयांची फडणिशी जाऊन यांचे जन्मकाळीं यांचे वडील हरीपंत चार रुपये दरमहावर कारकून होते. कांहीं दिवस गांवठी शाळेंत शिकल्यावर ते वेदाध्ययनाकडे वळले. लवकरच तें सोडून विश्रामबागेंतल्या संस्कृत पाठशाळेंत हे शास्त्राध्ययन करूं लागले. तेथें तेव्हां षट् शास्त्रें शिकविण्याची सोय होती. येथें त्यांनीं तीन शास्त्रांचें अध्ययन केलें. बहुतेक विद्यार्थ्यांचें उठणें, बसणें, निजणें विश्रामबागेंतच असे. यांची तैलबुद्धि असे. यांनीं आपले गुरु मोरशास्त्री साठे यांच्याशीं पूर्वपक्ष—उत्तरपक्ष केला व त्यांस वादांत जिंकलें, तेव्हां त्यांनीं संतोष पावून आपले अंगावरची शालजोडी त्यांचे अंगावर घातली व त्यांस 'बृहस्पति' ही पदवी दिली! विश्रामबागेंत इंग्रजी शिकविण्याचा उपक्रम झाला तेव्हां हे अल्पायासानें इंग्रजी शिकून स्पेन्सरमिलचे ग्रंथ पाहूं लागले. त्यांनीं अर्थशास्त्र, मानसशास्त्र, तर्कशास्त्र, इ० अनेक शास्त्रांवरील इंग्रजी ग्रंथ पाहिले. हे विद्याखात्यांतच शेवटपर्यंत नोकरीवर होते. पुणें कॉलेजांत प्रोफेसर व ट्रेनिंग कॉलेजांत हे प्रिन्सिपाल होते. सारा जन्म यांनीं पुण्यास काढला. हे रामजोश्यासारखे रसिक व रंगेल होते. ते वक्ते होते. पण त्यांच्या आवाजाचें वर्णन एकानें 'काकवत् कर्करायते' असें केलें आहे, यावरून त्यांचा स्वर कर्कश होता असें दिसतें. जुनी संस्कृत विद्या व नवी इंग्रजी विद्या यांत निष्णात असून यांनीं मराठी भाषेंत सुंदर ग्रंथरचना केली आहे. बंडाचेपूर्वी ख्रिस्ती होण्याचें खूळ बऱ्याच अर्धशिक्षित लोकांत पसरत होतें त्यास यांनीं बराच आळा घातला. हे वादी जबर होते. प्रतिपक्षी वादांत हटकून पराभूत होत अशी यांची खंडणमंडणशक्ति तिखट होती. काशीचे प्रसिद्ध नैयायिक पंडित निळकंठशास्त्री हे ख्रिस्ती झाले होते त्यांच्याशीं वाद करून यांनीं त्यांना नामोहरम केलें. हिंदुधर्म व ख्रिस्तीधर्म यांबद्दल उभयशास्त्र्यांचे तोंडी व लेखी वाद पुष्कळ झाले. कृष्णशास्त्र्यांनीं ज्ञानप्रकाश पत्र चार वर्षें व 'शाळापत्रक' शेवटपर्यंत चालविलें व दोघांनाही नांवारूपास आणलें. यांनीं सात आठ ग्रंथ मराठींत लिहिले ते सर्व भाषांतररूप आहेत. तथापि शास्त्रीबोवांची भाषा इतकी सरस, सुगम, शुद्ध व अस्सल मराठी आहे कीं मराठी गद्य वाङ्मयांत त्यांच्या तोडीचा ग्रंथकार दुसरा क्वचितच सांपडेल. अनेकविद्यामूलतत्वसंग्रह (१८६१), अर्थशास्त्रपरिभाषा, साक्रेटिसाचें चरित्र, रासेलस, अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी हे यांचे गद्यग्रंथ व पद्यरत्नावलि व मेघदूत (१८६५) हे काव्यग्रंथ सर्वमान्य आहेत.

वेद, शास्त्रें व लौकिक विद्या यांत पारंगत असून हा पुरुष स्पेन्सरमिलच्या

संगतीनें निरीश्वरवादी झाला व याचें आचरणही धड राहिलें नाहीं. मोरशास्त्री साठे यांनीं त्यास ' बृहस्पति ' ही पदवी देऊन जेव्हां आज्ञा केली कीं, ' या उप्पर खांद्यावर शालजोडी टाकून हिंडण्यांत प्रतिष्ठा राहणार नाहीं. म्हणून तूं या राजविद्येचा अभ्यास कर. ' त्यावेळीं त्या विद्वान् पंडितास आपला शिष्य पुढें असा बहकेल ही कल्पनाही शिवली नसेल. कृष्णशास्त्री नास्तिक झाले, गोपाळराव देशमुख हिंदु संस्कृतीवर उलटले व निळकंठशास्त्र्यांसारखा काशीचा विद्वान् ख्रिस्ती होऊन उलट आपल्या हिंदु धर्मावर दुगाण्या झाडूं लागला, हें पाहून जुन्या परंपरेच्या लोकांस इंग्रजी विद्या व इंग्रजी संस्कृति यांविषयीं साशंकता वाटूं लागली हें अगदीं स्वाभाविक आहे. त्यावेळेपासून जुन्याचे अभिमानी व नव्याचे अभिमानी असे लोकांत दोन पक्ष होऊन त्याचा वाङ्मयावरही परिणाम घडला. प्रस्तुत कृष्णशास्त्र्यांच्या वाङ्मयसेवेचे विशेष गुण पाहून पुढें चलूं. त्यांचा स्वतंत्र किंवा दीर्घकाल टिकणारा असा कोणताच ग्रंथ नाहीं. अरबी भाषेंतील सुरस गोष्टी, रासेलस व साक्रेटिसाचें चरित्र हे ग्रंथ अजून टिकाव धरून आहेत, व ते आणखी कांहीं काळ राहतील ते त्यांच्या भाषासौंदर्यामुळें राहतील. कृष्णशास्त्र्यांची विद्वत्ता, बुद्धिमत्ता, उभयभाषानैपुण्य हे गुण सर्वमान्य आहेत. त्यांची भाषांतर करण्याची हातोटी अगदीं अपूर्व आहे. त्यांची भाषासरणी साधी व मोहक आहे. परशुरामपंततात्यांचा आवडता कवि मोरोपंत तर कृष्णशास्त्र्यांचा मुक्तेश्वर. मोरोपंताच्या कवितेला ते नाकें मुरडीत. त्यांना साधेपणा आवडे. ते अत्यंत रसिक होते. त्यांचें मराठी गद्य व पद्य सारखेंच रम्य आहे. अरबी भाषेंतील सुरस गोष्टींच्या ९ भागांपैकीं पांच भाग कृष्णशास्त्र्यांनीं, ६ । ८ । ९ हरिपंत दामल्यांनीं व ७ वा विष्णु शास्त्र्यांनीं भाषांतरिला आहे. कृष्णशास्त्री प्रस्तावनेंत म्हणतातः—

" संसारांत निर्वाहाकरितां, सुखाकरितां व कीर्तीकरितां वगैरे मनुष्यांस अनेक प्रकारचे कष्ट व व्यवसाय करावे लागतात; ते केल्यावांचून प्रायः कोणाचेंही चालत नाहीं. परंतु मनुष्यानें सर्व काळ श्रमांत घालवावा; सकाळीं उठल्यापासून रात्रीं निजेतोंपर्यंत एकसारखें शारीर व मानसिक मेहनत व दगदग यांत त्यानें जुंपलेलें असावें, असें कोणी मानूं नये. तशी स्थिति शक्य नाहीं व इष्टही नाहीं. मनुष्याच्या हातून चांगल्या रीतीनें व आनंदानें श्रम होण्यास मध्यें मध्यें त्याच्या चित्तास करमणूक पाहिजे. लोक कितीही विद्वान्, कितीही शाहाणे व कितीही उद्योगी असले तरी त्यांत करमणुकीचे प्रकार कांहीं तरी असतातच ...... अनेक प्रकारचे चमत्कारिक विषयांवरील ग्रंथ वाचून रिकामपणीं मन रिझवावें हाही एक सुधारलेल्या करमणुकीचा प्रकार आहे. रसिक ग्रंथ हा—

कांतेपरि एकांतीं स्वांतातें हर्षवूनियां रिझवी ।
आनंदसागरीं मन बुडवुनि चिंताज्वरासही विझवी ॥

उत्तम ग्रंथः—

गुरुपरि उपदेश करी संकटसमयीं उपायही सुचवी ।
चिंतित फळ देउनियां कल्पतरूपरि मनोरथा पुरवी ॥ ”

हा ग्रंथ मूळ अरबी भाषेंत असून तींतून फ्रेंच भाषेंत, तींतून इंग्रजी भाषेंत व तींतून मराठी भाषेंत अवतरला आहे !

---

# धार्मिक शिक्षणाचा प्रश्न.

१. मनुष्याचें मन एकाच टांकसाळींतून निघालेल्या रुपयासारखें तंतोतंत सारखें नसतें. सर्वांचा आत्मा तत्वतः एक आहे, हा अद्वैत सिद्धांत खरा असला तरी प्रत्येकाचा आत्मा सारखाच विकसित झालेला असतो असें नाहीं. या लेखकाला गायनांतलें मर्म कळत नाहीं—म्हणजे गायनरुचि ज्यायोगें उत्पन्न होते तें त्याच्या आत्म्याचें अंग सुप्त आहे किंवा विकसित झालेलें नाहीं. याप्रमाणेंच धार्मिक श्रद्धा, धार्मिक आत्मप्रत्यय, धार्मिक आवड, धार्मिक उत्साह, धार्मिक स्फूर्ति, हीं ज्यायोगें उत्पन्न होतात तें अंग कित्येकांचें सुप्त किंवा अविकसित असतें, असें म्हणण्याला काय प्रत्यवाय आहे ?

२. कांहीं तार्किक लोकांना वाटत असतें कीं, आपल्या बुद्धीला जें पूर्णपणें पटत नाहीं त्यांत कांहीं अर्थ नाहीं...ज्यांची ईश्वरावर श्रद्धा आहे, व ज्यांना पुराण, बायबल, उपनिषदादि ग्रंथ यांच्या द्वारें विशिष्ट प्रकारचें सात्विक समाधान होतें, त्यांना आपल्या वृत्तीचें युक्तिवादानें समर्थन करतां आलें नाहीं, तरी त्या वृत्तीला एकदम भोळसटपणाची किंवा कुचकामाची ठरवून टाकणें केव्हांहि युक्त नव्हे.

३. शाळांमध्यें किंवा कॉलेजांत मुसलमानी, खिस्ती, बौद्ध, शीख इत्यादि धर्मांचा व त्यांच्या शाखांचा इतिहास शिकवितां येईल, पण या इतिहास-ज्ञानापासून नीति सुधारेल, अशी आशा बाळगणें व्यर्थ आहे. तसेंच, ‘ देव आहे किंवा नाहीं, असला तर देवाचा व मनुष्याचा संबंध काय, ब्रह्म म्हणजे काय, माया म्हणजे काय, ज्ञानोत्तर कर्म करावें कीं नाहीं, भक्ति व ज्ञान यांचा संबंध काय, ’ इत्यादि धार्मिक तत्त्वज्ञानाचें किंवा वेदांत अथवा उत्तरमीमांसेचें शिक्षण देणें शक्य जरी असलें—तें कॉलेजांत देण्यांतहि येतें—तरी अशा शिक्षणापासून नीतीवर फारसा परिणाम

होत नाहीं; किती केलेंतरी तें ज्ञान आहे, तेव्हां त्याचा थोडासा फायदा व्हावयाचाच, पण तो विशेष असत नाहीं, एवढेंच. ब्रह्मज्ञानाविषयीं म्हटलें आहे कीं, 'नैषा तर्केण मतिरापनेया, प्रोक्तान्येनेन सुज्ञानाय प्रेष्ठ'–' हें ज्ञान तर्कानें देतां येत नाहीं; तार्किकाहून इतरानें, म्हणजे ज्याला याचा अनुभव आलेला आहे अशा ज्ञात्यानें हें जर सांगितलें, तरच तें ज्ञान सुफलदायक होतें.' धार्मिकता देखील अशीच आहे. सच्छील, धार्मिक मनुष्याच्या आचरणानें जितकी धार्मिकतेची वृद्धि होते, व जितकी ती सुफलदायी होते, तितकी धर्मविषयक विद्वत्तेनें होत नाहीं, किंबहुना ही विद्वत्ता क्वचित् सुफलदायीहि होऊं शकते. कारण विद्वत्ता ही तरवारीसारखी आहे— तिचा चांगला किंवा वाईट उपयोग, करणाऱ्याच्या बुद्धीवर अवलंबून असतो.

४. धार्मिक इतिहास, तत्वज्ञान वगैरे विद्यालयांत शिकविल्यानें एक मात्र फायदा होण्यासारखा आहे. प्रत्येक धर्माला शत्रु हे असतातच. हे शत्रु त्या धर्मांतलीं खरीं खोटीं–कांहीं खरीं, कांहीं खोटीं–व्यंगें वेळोवेळीं चवाठ्यावर आणून कोंवळ्या मुलांचीं मनें स्वधर्माविषयीं कलुषित करीत असतात. त्या शत्रूंचा धर्म निर्दोष नसतोच; कारण कोठेंहि गेलें तरी पळसाला पानें तीनच. चमत्कारिक कथा एकाच धर्मशास्त्राच्या ग्रंथांत नाहींत, सर्वत्र तीच स्थिति आहे. पण ते शत्रु स्वदोष लपवून परदोष दाखविण्याच्या कामीं दक्ष व कुशल असल्यामुळें लहान मुलांच्या नजरेस आपल्या धर्माचे दोषच तेवढे येण्याचा संभव असतो. अशा वेळीं आपल्या धर्माचें रक्षण करण्याकरितां परधर्माचीहि माहिती मुलांना करून देणें इष्ट असतें; कारण घरोघर मातीच्याच चुली असतात हें तत्व कळलें म्हणजे मग स्वधर्मांतील दोष पाहून तो परधर्माकडे एकदम धांवणार नाहीं, किंवा आपल्या धर्माविषयीं भलतेसलते उद्गार काढणार नाहीं. स्वधर्मावर केलेले आरोप खोटे कसे, हें मुलांना समजणें अत्यंत आवश्यक आहे. स्वधर्मांतलीं खरीं व्यंगेंहि समजणें आवश्यक आहे, पण आई जशी आपल्या मुलांचीं व्यंगें दाखविते त्याप्रमाणेंच तीं दाखविलीं पाहिजेत, कजाग सावत्र आईप्रमाणें नव्हे. अस्तु.

५. धार्मिक शिक्षण देण्याचा मुख्य मार्ग म्हणजे धर्मनिष्ठ शिक्षकाचें उदाहरण मुलांच्या नजरेसमोर नेहमीं ठेवणें हा होय. स्नानसंध्यादि आचारांबद्दल आग्रह धरूं नये, असें म्हणणें नाहीं; आग्रह धरलाच पाहिजे. कारण 'आचारः प्रथमो धर्मः' या वचनांत पुष्कळ तथ्य आहे. प्रातःस्नान, गीतापठण वगैरे हिंदूला, नमाज मुसलमानाला, रात्रौ निद्रा घेण्यापूर्वीं केलेली ईशप्रार्थना व रविवारीं चर्चमध्यें जाऊन तेथें ऐकलेलें त्यांच्या धर्मोपदेशकांचें प्रवचन ख्रिस्ती मनुष्याला, उच्चतर व शुद्धतर वातावरणांत नेऊन सोडतात, हा अनुभव आहे. अशा आचारांचें साहाय्य घेणें कोणालाही कमीपणाचें वाटूं नये.

६. धार्मिक इतिहास, तत्त्वज्ञान, वगैरेंचें ज्ञान डोक्यांत गेलें तरी तें जसें हाडांमासांत शिरत नाहीं व शील बदलूं शकत नाहीं; त्याप्रमाणेंच, भाविक व धर्मनिष्ठ गुरूंच्या अभावीं, धार्मिक आचारांची कवाईत करून घेतल्यानें धर्मनिष्ठेचा हृदयांत प्रवेश होऊं शकत नाहीं. धर्मनिष्ठा ही पुष्पांच्या सुवासाप्रमाणें दुरूनही हृदयाला हलवूं शकते. नाकांत किंवा घशांत फूल कोंबल्यानें त्याचा वास नष्ट मात्र होतो, तशीच गोष्ट धर्मनिष्ठेचीहि आहे. धार्मिकता हा प्रकृति गुण आहे, असें वर प्रतिपादन केलें यावरून या गुणाची कोणी कोणाला देणगी देऊं शकत नाहीं. तेव्हां धार्मिक शिक्षण देण्याचें कारणच नाहीं, असें मात्र होत नाहीं. कारण, कांहीं मुलांची स्वाभाविक प्रवृत्ति धर्मनिष्ठेकडे असून प्रतिकूल परिस्थितींत जर त्यांचें शिक्षण झालें, तर धार्मिकतेचा अंकुर नष्ट होण्याचा संभव असतो. या अंकुराला सदुपदेश, सच्छील गुरूंचें प्रत्यक्ष चरित्र, कांहीं आचारांबद्दल थोडासा आग्रह इत्यादिकांचें सिंचन मिळालें म्हणजे तो हृदयक्षेत्रांत चांगला विकसित होतो. मुलाला स्वाभाविकपणें ज्या तात्त्विक शंका येतील त्यांचें निराकरण झालें, हितशत्रूंनीं त्याच्या धर्मावर जे खोटेनाटे आरोप केले असतील त्यांचा खोटेपणा त्याच्या नजरेस आणून दिला, धर्मनिष्ठ लोकांचीं चरित्रें त्यास वाचावयास दिलीं, किंवा त्यांच्या विभूतींच्या कथा त्याला सांगितल्या, त्याच्या दृष्टीसमोर धर्मपरायण गुरूंचीं मूर्तिमंत उदाहरणें असलीं, कांहीं सात्त्विक व त्या त्या काळीं सर्वसामान्य जनसमूहास धर्मदृष्ट्या आवश्यक वाटणारे आचार पाळण्याची त्याला संवय लावून दिली, गृहशिक्षण त्याचें चांगलें असलें, म्हणजे धर्मनिष्ठेचा स्वाभाविक अंकुर चांगला विकसित होईल व त्याला चांगलीं फळें आल्याशिवाय राहणार नाहींत.

७. आचारांबद्दल आग्रह न धरावा तर धार्मिक शिक्षण केवळ शाब्दिक स्वरूपाचें होण्याचा संभव आहे. आणि दुसरें असें कीं, विशिष्ट धार्मिक आचार विशिष्ट समाजाच्या नीतीला पोषक असतात, त्यांचा फायदा न घेणें असमंजसपणाचें आहे. धर्माचें बीज आचारांमध्यें नसून शुद्ध बुद्धींत आहे, असें जरी म्हटलें तरी ही शुद्ध बुद्धि ज्या आचारांच्या साहाय्यानें सुलभ होते, ते वंद्यच समजले पाहिजेत.

—वामन मल्हार जोशी

# मदिराबया.

१ या मदिरारूपी बयाचें एका ग्रंथकारानें पुढीलप्रमाणें अलंकारिक वर्णन केलें आहे, तो म्हणतोः—

या बाईचें वर्णन मोठें ऐकण्याजोगें आहे. हिचें माहेर परद्वीपांत ! हिचें पाणिग्रहणाबरोबर 'पित्याची' मुद्रा सानंद होतेसें सांगतात. हिला पतीनें सोडल्यामुळें ती देशाटन करीत असते. तिला मोठमोठालीं विद्यापीठें व क्षेत्रें धुंडण्याचा फार नाद. ती हवें तसलें रूप घेते. ही मोठी सुस्वरूप आहे; तिचा वर्ण गुलाबाप्रमाणें मनोहर आहे. तिचे तोंडाला नेहमीं वास येत असतो. त्यामुळें 'अखंड सुवासिनी' ही संज्ञा तिला फार शोभते. ती देवाप्रमाणें स्वतः बहुतेक आहे; पण तिची ज्याच्यावर मेहेरबानी झाली तो मुका असला तरी तो बृहस्पतितुल्य वाचाळ होतो. ही बहुगुणी आहे; लोळण–फुगडी, पिंगा वगैरे पोरींचे खेळही तिला येतात. तसेंच, नर्तनअभिनयादिकांतही ती फारच कुशल आहे. ती पात्र पाहून आपली वृत्ति बदलिते; वैष्णवाप्रमाणें ती मस्तकीं मुद्रा धारण करिते; ती एकादाच शब्द बोलते; पण तेवढयानें श्रोत्यांस अगदीं वेडावून सोडिते; ही महापंचाक्षरी आहे, हिचे कृपेनें सेवक वृद्ध असला तरी तरूण होतो. ही स्वतः फार जलाल व तापट आहे; पण हिचे अनन्य भजनीं लागेल त्यास त्वरितच गार करिते. ही दर्शनकालीं हंसतमुख असते. हिला मोठमोठाले पुरुष मान देतात; व त्यामुळें हिचे आगमनाबरोबर लज्जा, शुद्धि, अब्रू, शक्ति वगैरे भिडस्त स्त्रिया दूर जातात; हिचा उपदेश ज्यांनीं घेतला त्यांचें भेदज्ञान तत्काळ नष्ट होतें. तसेंच त्यांचा झोक ताठा जाऊन ते इतके नम्र होतात कीं भर रस्त्यांत देखील लोकांपुढें दंडवत घालतात. ही इतकी मायावी आहे कीं, मनुष्याचे पोटांत शिरून तत्काळ त्याचेकडून असेल तें ओकविते. ही इतकी धट्ट आहे कीं चारचौघांसमक्ष देखील एकांत गोष्ट करिते. हिचा नेत्रपात होतांच भक्तांची समाधी लागते. सद्गुरूप्रमाणेंच 'आपणांसारिखे करिती तत्काळ। नाहीं वेळ काळ मग त्याशीं।' असें हिचें सामर्थ्य आहे. माहितगार लोक हिचे समागमानें होणारा आनंद थेट ब्रह्मानंदापेक्षांही कांहीं जास्त असें सांगतात व हें खरेंही असावें. कारण "कोण देहातें सांभाळी" या उत्तरार्धाचा प्रत्यय इतरांचेहि दृष्टीस येतो खरा. ही गोरगरीबांनाही ओळखते, तरी ही सुवर्णाक्षरांनीं मंडित अस-

त्यामुळें शिक्षणाचे भक्ते हे तिचा फारच मनःपूर्वक आदर करतात. ' मी मी ' म्हणणारे बडे मिया–पण या बाईनें त्यांना गुलाम करून सोडलें आहे. इतर कामीं कशीही हयगय होवो, हिचे भेटीचें नेमलें मिनीट चुकतां कामा नये, असा कांहीं हिचा कडक अंमल आहे. मोठमोठाले लोक हिला हात जोडून उभे राहतात. ही मोठी रंगेल असून अवर्णनीय शक्तिरूप आहे. अशी ही बाई कोण हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. या बाईच्या संगतीनें आज हजारों वरांची धुळधाण चालली आहे. हिच्या नादानें हजारों गाजींचे पाजी बनले आहेत. पण आला तो दिवस या बाईचीं वळणें अधिक अधिक वाढत आहेत अशी तिजपाशीं काय मोहिनी आहे न कळे! (' सुख आणि शांति ')

—महादेव हरि मोडक.

---

# भक्तमयूरकेकावली

## श्रीरामचंद्राय नमः

श्रीरामा ! तूं स्वामी असती माज्या शिरावरी जागा<br>
आम्हांसि तुज्या पायांवांचुनि निर्भय नसे दुजा जागा ॥ १ ॥<br>
श्रीराम स्वामी त्वं शिरसि मदीये सदैव जागर्षि<br>
मम तव चरणौ मुक्त्वा नान्यदवन्यां सुनिर्भयं स्थानम् ॥ १ ॥

---

बहु जन्म विसरलों तुज, परि तूं आम्हांसि विसरला नससी<br>
अंतर्बाह्य कृपाळा ! सर्वां जीवांसि वेष्टुनी असती ॥ २ ॥<br>
त्वां विस्मृतोऽस्मि यद्यपि बहु जन्मसु मां न विस्मृतोऽसि त्वम्<br>
व्याप्यांतर्बहिरखिलान् जीवानवतिष्ठसे कृपालुतया ॥ २ ॥

---

कल्पद्रुम तूं रामा ! ज्याची जसि भावना तसा फळसी<br>
भोगिति दुःखें जीव स्वगुणें, तूं निर्दयत्व नातळसी ॥ ३ ॥<br>
राम त्वं कल्पद्रुर्यस्य यथा भावना तथा फलसि<br>
क्लिश्यन्ते स्वानुगुणं जीवास्त्वां स्पृशति नैव नैर्घृण्यम् ॥ ३ ॥

---

" सत्संगती धरावी, सच्छास्त्रश्रवण आदरेंचि करा "<br>
म्हणसी, मग मी बुडतां देइन भवसागरीं तुम्हांसि करा " ॥ ४ ॥

सत्संगतिं कुरुध्वं सच्छास्त्रश्रवणसादरा भवत
भवसागरमग्नेभ्यो हस्तं दास्यामि वस्त्वमिति भणसि ॥ ४ ॥

---

सत्योपदेशवाक्यें तुजीं असीं ऐकिलीं; परंतु मन
आटोपेना रामा ! म्हणुनि तुला करितसें सदा नमन ॥ ५ ॥
सत्योपदेशवाक्यान्याकर्णितवांस्तवेदशानि परम्
राम मनो न निरोध्दुं शक्तस्तदहं सदैव वन्दे त्वाम् ॥ ५ ॥

---

आतां प्रभो ! दयाळा ! मज दीनावरि करूनियां करुणा
स्वपदाब्जीं मन्मानसभृंग रमो उगवु दे कृपाअरुणा ॥ ६ ॥
संप्रति करुणां कृत्वा मयि दीने त्वं प्रभो दयालो रे ।
यातु कृपारुण उदयं-स्वपदाब्जे रमय मन्मनोभृंगम् ॥ ६ ॥

---

नाहीं सहाय तुझिया नामाविण निपुण मज जगत्त्रितयीं
त्वन्नाम मित्र जेव्हां, सत्संग घडे त्रिलोकमित्र तयीं ॥ ७ ॥
तवनामविना निपुणो मम न सहायो जगत्त्रये कोऽपि
तव नाम यदा मित्रं, त्रिलोकमित्र तदैव सत्संगः ॥ ७ ॥

---

म्हणउनि नाम तुझें या मुखांत राहो सदाहि मधुरतम,
रत मन जेथें मुनिचें ज्यांचें गेलें समस्त दूर तम ॥ ८ ॥
तस्मान्मधुरतमं तव नाम मदीये मुखेऽनिशं वसतु
यस्मिन्मनो मुनीनां निरतमशेषं गतं तमो येषाम् ॥ ८ ॥

---

उद्धरिला जो पापी पुत्रमिषें नाम घे अजामिळ तो
तारीं हाहि जन तसा, दंभेंहि जरी पदीं तुजा मिळतो ॥ ९ ॥
पापः पुत्रमिषेण त्वामाह्वदजामिलस्तमुदहार्षीः
इममपि तारय तद्वद्यद्यपि दंभेन तव पदं मिलति ॥ ९ ॥

---

अपराध फार केले, परि आतां हात जोडिले स्वामी !
करुनि दया तारावें; आवडि वाढो सदा तुझ्या नामीं ॥ १० ॥
अमितापराधकृदयं संप्रति बध्नाति तेऽजलिं स्वामिन्
तारय दययाऽविरतं तव नामनि वर्धतां मम प्रीतिः ॥ १० ॥

---

सेवक तुजा म्हणवितों, श्रीरामा राघवा सख्या म्हणतों;
होसी उदास तरि हो, होत नसें मी उदास आपण तों ॥ ११ ॥
"श्रीराम सखे राघव," वदामि, तव सेवकं गदामि स्वम् ।
यद्यौदास्यं भजसि त्वं भज, नाहं भजामि तज्जातु ॥ ११ ॥

---

'संसारसागरीं तूं तारक' ऐसेंचि संत वदतात;
'वदतां तदीय नामें, देतो दासांस तो स्वपद तात' ॥ १२ ॥
'संसारसागरे त्वं तारक' इत्येव सर्वसुजनोक्तिः
'स्वपदं ददाति तातो निजनामोच्चारणे स्वदासेभ्यः' ॥ १२ ॥

---

ऐसें औदार्य तुजें प्रभुत्वकरुणाकरत्व ऐकोनी
आलों शरण स्वामी ! जोडुनियां हस्त मस्तकीं दोनी ॥ १३ ॥
करुणाकरतां श्रुत्वा प्रभुत्वमौदार्यमिति तवाकर्ण्य
बद्ध्वा करयुगलं मम मूर्ध्नि त्वां शरणमागतो स्वामिन् ॥ १३ ॥

---

पायें मज दीनाला रामा ! लोटूं नकोचि बा ! दूर
उद्धरिले बहु पापी, यांविषयीं तूं रघूत्तमा ! शूर ॥ १४ ॥
मा मां सारय दूरं चरणेन निजेन राम दीनोऽहम्
पापानुदहार्षीस्त्वं नैकान् रघुसत्तमात्र शूरोऽसि ॥ १४ ॥

---

क्लेशाक्रान्तस्वांत श्रीरामा ! तुज जरी न विसरेल,
तरि भय नसेचि कांहीं, साराही क्लेशताप हि सरेल ॥ १५ ॥
क्लेशाक्रान्तस्वान्तः श्रीराम त्वां न विस्मरेद्यदि ना
तस्य भयं किमपिहि न क्लेशजतापः समस्त उपशाम्येत् ॥ १५ ॥

---

आम्हांसि नाम मात्र क्लेशाब्धीमाजि नांव हें ठावें;
गावें तेंचि प्रेमें, स्वबिरुद रामा ! तुवांहि गांठावें ॥ १६ ॥
जानामि केवलं ते नाम क्लेशोदधौ दृढा नौका
प्रेम्णा तद्गातव्यं स्थातव्यं स्वबिरुदे त्वया राम ॥ १६ ॥

---

केवळ भजनाचिकडे जरि ठेविसि दृष्टि तरि नसे थारा,
आपुलिया थोरपणावरि ठेवुनि दृष्टि दीन हा तारा ॥ १७ ॥
त्वं राम केवलं चेद्भजने दृष्टिं ददासि, नष्टोऽहम्
निजमहिमानं लक्षय, दीनमिमं तारयस्व रघुराज ॥ १७ ॥

---

स्वामी ! आम्हीं दुर्बळ, तूं रघुवीरा ! समर्थ, यासाठीं
देउनि अभयकरातें ने स्वस्थानासि, शुद्ध यश थाटीं ॥ १८ ॥
स्वामिन् सुदुर्बलोऽहं त्वं रघुवीरः समर्थ इति हेतोः
अभयकरं देहि, नय स्वस्थानं, निर्मलं यशः प्रथय ॥ १८ ॥

---

धांव समर्था, सदया, भवपंकामाजि बुडतसे गाय !
निकटस्था ! धर्मज्ञा ! कौतुक अद्यापि पाहसी काय ? ॥ १९ ॥
धाव समर्थाद्य सदय, दुस्तरभवकर्दमेऽस्ति गौर्मग्ना
धर्मज्ञ निकटवर्तिन् मद्व्यसनालोकनेन रमसे किम् ॥ १९ ॥

---

करुणाघन तूं माथां, जाळितसे मज मृगासि भववणवा
वृष्टि न करितां होतां उदास हें योग्य तूज न सकणवा ॥ २० ॥
त्वयि मूर्ध्नि कृपांभोदे मां भवदावानलो मृगं दहति
वृष्टिमकृत्वोदास्से यदि, तव सदयस्य समुचितं नेदम् ॥ २० ॥

---

संकट वारुनि रामा ! निजगुणकीर्तन करावया योजीं,
आपलिया थोरपणें रामा ! मजला स्वकिंकरीं मोजीं ॥ २१ ॥
वारय विषमं राम स्वकीयगुणकीर्तनेन योजय माम्
आलंब्य गौरवं स्वं राम त्वत्किंकरेषु मां गणय ॥ २१ ॥

---

तूं जरि न पावसी तरि पाचारूं संकटांत मी कवणा ?
श्रवणारूढ करुनि हे विनती रक्षीं मला पदप्रवणा ॥ २२ ॥
त्वं चेत्कृपां न कुरुषे त्वदन्यमत्राह्वयामि विषमे कम्
श्रवणगतां कृत्वा मे विज्ञप्तिं रक्ष मां पदप्रवणम् ॥ २२ ॥

---

सीतापते ! रघुपते ! विश्वपते ! भूपते ! वदान्यपते !
इंद्रादिकीर्ति तुझिया कीर्तिपुढें तुच्छ, सर्वथा लपते ॥ २३ ॥
सीतापते रघुपते विश्वपते भूपते वदान्यपते ।
तुच्छेंद्रकीर्तिरपि तव कीर्तेरग्रेऽस्ति सर्वथा लुप्ता ॥ २३ ॥

---

सोडविले सुर सारे रावणकारागृहांतुनी देवा !
जे तत्सैन्यहि त्याची करीत होते तदाग्रहें सेवा ॥ २४ ॥
रक्षोऽधिपस्य कारागेहाल्लेखा विमोचिता भवता
तेऽपिच यत्सैन्या तच्छुश्रूषां बलादकार्यन्त ॥ २४ ॥

---

देवस्त्रीही दासी केल्या होत्या दशाननें दुष्टें
त्या सोडवूनि त्यांचीं चित्तें केलीं तुवांचि संतुष्टें ॥ २५ ॥
देवस्त्रियोऽपि बन्दी–कृता अभूवन् दशास्यहतकेन
तन्मोचनेन तासां चेतांस्यपि तोषितानि भवतैव ॥ २५ ॥

गंधर्वीं तुज गावें ते त्याणें लाविले निजस्तवना,
तव नामधारकांतें सोडविलें त्वां करूनियां अवना ॥ २६ ॥
गेयस्त्वं गंधर्वैस्ते तेन नियोजिता निजस्तवने
निजनामधारकांस्त्वं व्यमोचयः सपदि समवनं कृत्वा ॥ २६ ॥

त्वच्चरणार्चनतत्पर मुनि वनवासी दशाननत्रस्त
त्यांस सुखवितां जाला प्रभो ! तुजा अभयदानपटु हस्त ॥ २७ ॥
त्वच्चरणार्चननिरता मुनयो विपिने दशाननत्रस्ताः
अभयप्रदाननिपुणस्तत्सुखहेतुस्तवाभवद्धस्तः ॥ २७ ॥

त्वद्भक्त शुद्धकर्मा बिभीषण प्राज्ञ रावणें छळिला,
येतां शरण तुला त्वां हृदयीं स्वभुजीं धरूनि आवळिला ॥ २८ ॥
भ्रात्रा क्लिष्टः प्राज्ञः शुचिव्रतस्ते बिभीषणो भक्तः
त्वां शरणं समुपेतो वक्षस्यापीडितस्त्वया दोर्भ्याम् ॥ २८ ॥

वाळीनें स्त्री हरिली, मारिलही आपणासि या त्रासें
सुग्रीव शरण आला तुज, तो त्वां रक्षिला अनायासें ॥ २९ ॥
दयितां हृतवान् वाली मामपि स हनिष्यतीति सुग्रीवः
भीतः शरणमुपेतो भवता त्रातो विना प्रयासेन ॥ २९ ॥

ब्रह्मादिकांसि दुर्लभ पदरज ज्याचा, अलभ्य तूं ऐसा,
शबरी वर्णादिगुणें न बरी, तिस पात्रलासि तूं कैसा ? ॥ ३० ॥
यस्यांघ्रिरेणुरपि ते ब्रह्माद्यानां सुदुर्लभः स त्वम्
दुर्लभतमः शबर्या वर्णादिविहीनया कथं प्राप्तः ॥ ३० ॥
गुहनाम निषादपती स्वभक्तिसंपन्न त्यास बंधुपणें
त्वां मानिलें दयाळा ! दासांचें नाशितोसि ताप पणें ॥ ३१ ॥
आसीद्गुहाभिधानो निषादमुख्यः स्वभक्तिसंपन्नः
त्वं तं बन्धुममंस्थाः सदय कृतपणोऽसि दासतापहृतौ ॥ ३१ ॥

चरणविलोकनतत्पर वानर आप्तांत राघवा ! गणिले;
साधुद्वेषी जे जे कुळतरु त्यांचे समूलही खणिले ॥ ३२ ॥
चरणविलोकनदक्षाः कपयो निजबन्धुषु त्वया गणिताः
साधुद्विषां रघुपते त्वया कुलागाः समूलमुत्खाताः ॥ ३२ ॥

---

गौतमपत्नी गिळिली होती जे पापतापशापांही
ते उद्धरिली जैसी, मज निज करुणालवें तशा पाहीं ॥ ३३ ॥
या पापतापशापग्रस्तासीद् गौतमस्य पत्नी, सा
भवतोद्धृता यथा, मां तथैव करुणालवेन पश्य त्वम् ॥ ३३ ॥

---

# अभिप्राय.

**शिवाजीमहाराजांची आग्र्याहून सुटका**:—हा बहुमोल ग्रंथ इंग्रजी भाषेंत रा. सा. बाबासाहेब देशपांडे यांनीं प्रसिद्ध केला असून तो मराठ्यांच्या इतिहासाचा व विशेषतः शिवाजी महाराजांचा अभिमान असणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें अवश्य संगृहीत केला पाहिजे. बाबासाहेब हे सरकारी गुप्तहेरखात्याचे एक बडे हुद्देदार असून आतां त्यांनीं पेन्शन घेतलें आहे व पुण्यास फर्ग्युसन कॉलेज रस्त्यानजीक स्वतःचें घर बांधून ते राहिले आहेत. त्यांना बाळपणापासून इतिहासाचा छंद असून इंग्रजी भाषेवर त्यांचें चांगलें प्रभुत्व आहे हें आम्हांस त्यांच्या विद्यार्थीदशेपासून माहीत आहे. विद्याव्यासंग व मराठ्यांच्या इतिहासाचा अभिमान हे गुण त्यांच्यांत बाळपणापासून वसत आहेत. पेनशन घेतल्यापासून तर त्यांनीं मराठ्यांच्या इतिहास-साहित्यांत महत्त्वाची भर घालण्याचा संकल्प केला असून त्या संकल्पाचें प्रस्तुत ग्रंथ हें पहिलें सुंदर फळ आहे. इंग्रजी, मराठी व फारशी भाषांतील स्वदेशी व विदेशी लेखकांनीं लिहिलेले प्रस्तुतविषयावर प्रकाश पाडणारे सर्व ग्रंथ पाहून व तारतम्यानें त्यांचा विचार करून बाबासाहेबांनीं प्रस्तुत ग्रंथ लिहिला असल्यामुळें त्याची योग्यता फार मोठी आहे. ग्रंथांतील प्रतिपाद्य विषयाशिवाय शेवटीं शंभरांवर पृष्ठांत टिप्पणी व पुरवण्या दिल्या आहेत. त्याही अतिशय महत्वाच्या आहेत. बाबासाहेबांच्या हातून शिवकालीन इतिहासावर स्वच्छ प्रकाश पाडणारे असे अनेक ग्रंथ निर्माण होवोत असें आम्ही इच्छितों. पत्ताः—Rao Saheb G. K. Deshpande, Vishramdham Poona, No. 4—price Rupees Three.

२ **अनुभवामृत** ( सटीक ):—ह. भ. प. आत्माराम कृष्ण केणे उर्फ ज्ञानेश्वरीबुवा श्रीगोंदेकर यांच्या मुखांतून ज्ञानेश्वरमहाराजांच्या अमृतानुभव उर्फ

अनुभवामृत नामक सुप्रसिद्ध ग्रंथावरील प्रवचनें ऐकून व त्यांनीं केलेल्या टिपणांच्या आधारें ग्वाल्हेरचे प्रसिद्ध वेदांती रामचंद्र बळवंत डोंगरे यांनीं प्रस्तुत 'अमृतवाहिनी' नामक सविस्तर टीका मराठी गद्यांत लिहून प्रसिद्ध केली आहे. हा ७०० पृष्ठांचा सविस्तर ग्रंथ लिहून रा. डोंगरे यांनीं अनुभवामृत प्राशन करूं इच्छिणाऱ्या मुमुक्षु साधकांवर मोठे उपकार केले आहेत. अमृतानुभवावर अनेक गद्यपद्य टीका प्रसिद्ध आहेत, परंतु पद्यटीकांत जशी शिवकल्याणाची टीका उत्तम आहे तशी गद्यटीकांत प्रस्तुत टीका सविस्तर असून मुद्देसूद आहे व ग्रंथाच्या अभ्यासकांस फारच उपयुक्त वाटणारी आहे. प्रतिपाद्य विषयाशीं म्ह० निर्विषय वस्तूंशीं तादाम्य पावून रा. डोंगरे यांनीं प्रस्तुत टीकाग्रंथ केला आहे. व तो परंपरागत रहस्याला धरून आहे म्हणून त्याची महती विशेष आहे. प्रकाशकः—ह. भ. प. ज्ञानेश्वर आत्माराम केणे मु. श्रीगोंदे, जिल्हा अहमदनगर, किं. रु. ४॥८.

**३ शिवाजी व शिवकालः**—'सुप्रसिद्ध इतिहासलेखक यदुनाथ सरकार यांनीं इंग्रजींत लिहिलेल्या ग्रंथाचें मराठी रूपांतर माझ्या नजरेखालीं बडोद्याचे रा. विनायक सदाशिव वाकसकर यांनीं तयार केलें आहे. हें शब्दशः भाषांतर नाहीं तर मुळांतील माहिती जमेस धरून हा गोषवारा सामान्य मराठी वाचकांस समजेल अशा सोप्या भाषेंत देण्याचा प्रयत्न केला आहे.' यदुनाथांचें इतिहासाचें अवलोकन सर्वव्यापी आहे. 'शिवाजीसंबंधीं प्रत्यक्ष माहितीचीं साधनें निरनिराळ्या आठ भाषांत प्रसिद्ध झालीं, त्या सर्वांचा कसोशीनें व परिपूर्ण अभ्यास करून' प्रस्तुत ग्रंथ लिहिला गेला आहे व तो पुष्कळ अंशीं उपयुक्त आहे. तरी मराठी विचारप्रणालीस त्यांत पुष्कळच अपूर्णता वाटल्याशिवाय राहत नाहीं. मराठ्यांचा इतिहास परंपरेच्या विचारांत मुरलेल्या मऱ्हाठ्यानें लिहिल्याशिवाय त्याला पूर्णता येणें शक्य नाहीं असें आमचें मत आहे. दादोजी कोंडदेव याच्या कामगिरीचें वर्णन बरेंच चांगलें केलें आहे तरी 'उच्च ध्येय, दूरदृष्टि, आणि साहसी महत्वाकांक्षा हीं त्यांच्यांत मुळींच नव्हतीं' हें सरकारांचें मत उपलब्ध पुराव्यावरून अगदीं चुकीचें वाटतें. 'शिवाजीच्या १२ व्या वर्षापासून त्याच्याच नांवानें सनदा दिल्याचें जर सिद्ध आहे' तर या प्रचंड उलाढालीच्या पाठीशीं दादोजीसारखीं दहापांच मुत्सद्दी डोक्याचीं व दूरदृष्टीचीं साहसी थोर माणसें होतीं हें उघडच ओघानें येतें. रामदास हे राजकारणी पुरुष नव्हते, या फाटकांच्या मताचाच सरकार व वाकसकर यांच्या मनावर पगडा बसलेला दिसतो. 'शिवाजीच्या राज्यस्थापनेचा यशस्वी प्रयत्न रामदासांच्या दृष्टीस पडतांच त्यांनीं आपलें काव्य राजकीय स्थितीवरही करण्यास सुरुवात केली' हें मत उघडच त्याज्य ठरतें. समर्थांनीं 'आधीं केलें मग सांगितलें आहे' आधीं पाहिलें मग

सांगतलें असें नाहीं ! समर्थ महाकर्तृत्वाचे समर्थ पुरुष होते, पराक्रम पाहून वाखाणणारे भाट किंवा शाहीर नव्हते ! ते इतिहास बनविणारे महापुरुष होते, इतिहासलेखक किंवा कागदपत्रें गोळा करून संशोधक ह्मणून मिरवणारे नव्हते ! अलीकडच्या कित्येक एकांगी लेखकांना समर्थांची योग्यताच कळत नाहीं. प्रस्तुत ग्रंथांत शिवाजी महाराजांच्या राजकीय उलाढाली ठीक वर्णिल्या आहेत. तथापि 'शिवकाल' ज्यांनीं बनविला त्या तदितर थोर पुरुषांचें गौरव यांत फारसें कुठें केलेलें आढळत नाहीं. असा हा ग्रंथ अपूर्ण आहे, तरी एकवार वाचण्यासारखा आहे. प्रकाशकः—भारत गौरवग्रंथमाला, ३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई, नं. २. किं. रु. २~४.

## पांगारकरांचीं पुस्तकें

१. **भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति चौदावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ८ व्ही. पी. नें ~१२.

२. **संतचरित्रमालाः**—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४२ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ.सं. २५६ किं. रु. १~८.

३. **श्रीएकनाथचरित्र**:—श्रीएकनाथमहाराजांच्या चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ~१२.

४. **कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडो स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ~४.

५. **आनंदलहरीः**—( कवितासंग्रह ) ह्यांत पांगारकरांच्या कवितांपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत, १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ~१२.

६. **नारदभक्तिसूत्रेंः**—( आवृत्ति ४ थी ) हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ~८.

७. **नवविधाभक्तिः**—( सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी ) यांत नवविधा-भक्तींचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ~६.

८. **निरंजनमाधवांची कविताः**—भाग १ किं. रु. भाग २ व ३ एकत्र किं. १॥ रु.

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्रः**—( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. १~८.

१०. **भक्तिमणिमालाः**—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १~८

११. **सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टीः**—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध पुढारी कै. विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ~५.

## पांगारकरांचीं पुस्तकें

१२-१३-१४. **मुमुक्षूंतील निवडक निबंध:**—भाग १ व २ किं. प्रत्येकीं १॥८, भाग ३ रा किं. १॥४.

१५. **मोरोपंती वेंचे:**—(२ री आ.) पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचें उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रहि नवीन दिलेलें आहे. किं.रु. १॥१२.

१६. **पारिजातकाचीं फुलें:**—( तिसरी आवृत्ति ) परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ॥८.

१७. **श्रीतुकारामचरित्र:**—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलाचा पंढरपूरचा व देहूचे सहा असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ. सह किं. रु. २.

१८. **श्रीतुकारामचरितामृत:**—तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं ॥५.

१९. **निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य:**—निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख-विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ॥१०.

२०. **मुक्तेश्वर:**—( चरित्र आणि काव्यविवेचन ) श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे प्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १.

२१. **मारुतिउपासना** ( चौथी आवृत्ति ):—किं. ॥४.

२२. **सार्थ श्रीदासबोध:**—( आवृत्ति दुसरी ) किं. रु. ४ व्ही. पी. नें ४॥१०

२३. **सार्थ मनोबोध:**—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ॥१२.

२४. **समर्थसंजीवनी ऊर्फ रामदासी वेंचे:**—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें ह्या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.

२५. **मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन ):**—किं. रु. २॥८.

२६. **श्रीएकनाथी भागवत** (निर्णयसागर प्रेसचें, आवृत्ति तिसरी):—किं. रु. ६

२७. **श्रीसमर्थग्रंथभांडार:**—समर्थांची एकंदर कविता एकत्र सटीप छापलेली आहे. किं. ४॥८.


२८. **समर्थग्रंथभांडार** ( भाग २ रा ):—यांत दासबोधाशिवाय बाकीची समर्थांची सर्व कविता प्रकरणें पाडून व्यवस्थित दिली आहे. किं. रु. २॥८.

२९. **ज्ञानेश्वरांची प्रभावळ:**—ज्ञानेश्वरमहाराज व त्यांचे समकालीन नामदेवराव, जनाबाई, चोखामेळा इत्यादि सर्वजातीय २५ संत यांच्या ग्रंथांतील निवडक वेंचे प्रस्तुत ग्रंथांत घेतले आहेत. यांत ज्ञानेश्वरांच्या २५०० ओव्या व सर्व संतांचे मिळून ४०० अभंग आहेत. सुंदर प्रस्तावना आहे. टीपा भरपूर आहेत. किं. रु. २.

पत्ता:—व्यवस्थापक " मुमुक्षु " पुणें शहर.

॥ श्री रुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेचि काळें । संसारीं होईजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष २४ वें | ज्येष्ठ १८५२ | नवें वर्ष १० वें |
| मास ९ | जून १९३० | अंक ६ वा. |

संपादक व प्रकाशक,

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

मुमुक्षु कचेरी, बुधवार पेठ, पुणें सिटी.

वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही. पी. नें रु. ३८३

मुद्रकः—लक्ष्मण [redacted]कराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव, घ. नं. ३००
येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ मंगलाचरण ... ... ... ... | १–२ |
| २ श्रीएकनाथ महाराजांचीं दोन पदें ... ... ... | ३ |
| ३ स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा पुस्तक–परीक्षण ... ... ... | ४–८ |
| ४ ज्ञानेश्वरींतील संसारसुखाचें चित्र ... ... | ९–२१ |
| ५ भक्तमयूरकेकावली ... ... ... ... | २१–२८ |
| ६ जोगा परमानंद ... ... ... ... | २९–३३ |
| ७ स्तोत्रमणिमाला ... ... ... ... | ३३–३५ |
| ८ महाराष्ट्राची पीछेहाट ... ... ... | ३५–३७ |
| ९ निर्वाणषट्कम् ... ... ... ... | ३८–४० |

## निरंजनमाधवांची कविता

**भाग १ ला किं. १ रु.** **भाग २–३ किं. १॥ रु.**

पहिल्या बाजीराव पेशव्यांचे अमदानींतल्या राजकारणी, योगी व अधीत अशा निरंजनमाधव कवीच्या काव्यांच्या कविलिखित प्रतीवरून हे दोन भाग छापले आहेत. दुसऱ्या भागांत ज्ञानेश्वरमहाराजांचें उद्बोधक चरित्र रसाळ वाणीनें गायिलेलें ग्रथित केलें आहे. तिसऱ्या भागांत चिद्बोधरामायण हें अध्यात्मरामायणाच्या धर्तीवरील काव्याचें बाळकांड आहे. अद्वैतबोध वगैरे वेदांतपर पांच स्फुट काव्यें कठिण विषय सुलभपणें प्रौढ भाषेंत सांगणारीं अशीं घातलीं आहेत, व शेवटीं मराठींतील एकच चंपू काव्य जें "सुभद्रा–चंपू" नांवाचें या कवीनें केलें आहे तें छापलें आहे. यांतील भाषा आणि वर्णनशैली प्रौढ, मनोहर व सुंदर असून सुभद्राहरणाचा नेहमीचा कथाभाग या कवीनें आपल्या विद्वत्तेनें रसिकमान्य केला आहे. अशा या अपूर्व काव्यसंग्रहानें हे दोन भाग भरले असून दोन्ही एकत्र बांधविले आहेत.

पत्ता:— व्यवस्थापक, 'मुमुक्षु' पुणें सिटी.

मुमुक्षु मासिक वर्ष १० वें ] मंगलाचरण [ जून १९३० अंक ६ वा



## रुक्मिणीकृष्णांचें मीलन.

तें सावळें सगुण ब्रह्म कृपाकटाक्षीं
सस्मेर तन्मुख सरोरुह हें अवेक्षी ।
दृष्टीस दृष्टि जंव नीट मिळोन गेली
ते भीमकी हळुच त्याज समीप आली ।। १ ।।
कीं चक्रवाकरमणीच वियुक्त झाली
ते चक्रवाक उमगीतच काय आली ।
कीं चातकप्रणयिनीच निदाघतप्ता
धांवोन ये नवघनाभिमुखा तृषार्ता ।। २ ।।
तत्काळ इंद्रियपराङ्मुख वृत्ति जाली
श्रीकृष्णमूर्ति हृदयीं विवरीं निघाली ।
हारोन जाय मकरध्वज कोटिशोभा
पाहे न्यहाळुन तया मग पद्मनाभा ।। ३ ।।

चतुर्भुज श्यामल रूपधारी । जो शंखचक्राब्ज गदा उभारी ।
उभा असे जो रणभूमिभागीं । घेऊनियां चंदन ऊटि अंगीं ।।४।।
कंठस्थळीं कौस्तुभ दिव्य भासे । मुखेंदु सानुग्रह मंद हांसे ।
उत्फुल्लकंजोपम नेत्र दोनीं । ते कुंडलें हो झळकेति कानीं ।।५।।
पीतांबराचें परिधान साजे । कटिप्रदेशीं रशना विराजे ।
त्या किंकिणींचा समुदाय वाजे । वांकी पदीं तोडरयुग्म गाजे ।।६।।
आविर्भवे केवळ शंबरारी । शृंगार किंवा अवतारधारी ।
जें जें अहो ! रुक्मिणि अंग पाहे । तेथेंच ते दृष्टि जडोन राहे ।।७।।

जाला इला चरणदर्शनलाभ जेव्हां
प्रेमार्द्रलोचन यदूद्वह होय तेव्हां ।
तिर्यङ्मुखी सभय लज्जित फार जाली
कृष्णास ते नमनपूर्वक माळ घाली ॥ ८ ॥
न देखे वैदर्भी जवळिं सखियांतें सुनयना
नवोढत्वें लाजे, किमपि परते हंसगमना ।
जयाचें हें ईणें सहज फिरतां चित्त हरिलें
तया या श्रीरंगें त्वरित पदरीं तीस धरिलें ॥ ९ ॥
पृथुश्रोणिश्रांता, उदितमदना, खिन्नवदना,
महाभाग्यें जाली सफळनयना कुंदरदना ।
सुशीळा तन्वंगी पदरि धरितां जे दचकली
कृपाळें गोपाळें त्वरित चहुं हातें उचलिली ॥ १० ॥
रथीं वाहे, बाहे धरुन, जगदाधार जिजला
तयेची ही लज्जा तदपि न विसंबेच तिजला ।
रथारूढें कृष्णें शिथिल भुजबंधें कवळिली
कृशांगी सत्कारें करुन निजअंकीं बसविली ॥ ११ ॥
पतिप्रेमाचें ये हृदयकमळीं थोर भरतें
तयाचें हें देहीं प्रगट उमटे चिन्ह वरतें ।
प्रकर्षें हर्षाच्या कृशतनु अकस्मातच फुगे
त्यव्हां त्या सत्वाचे अनुभव कसे राहाति उगे ॥१२॥
कपोळीं बाळेच्या अपरिमित रोमांच उठती
तयेचे चोळीचे सकळ जवदाणे उतटती ।
गळां दाटे भारी, सहज सलिलें नेत्र भरले
महर्षाचे घर्मोदकण मुखचंद्रीं उमटले ॥ १३ ॥
कथा हे कृष्णाची सकळ जगदानंदजननी
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुजनीं ।
प्रसंगें श्रोत्यांचे सकळहि महादोष हरती
यदूत्तंसप्रेमें विषयरसगोडी विसरती ॥ १४ ॥

—सामराजकृत रुक्मिणीहरण.

( श्री एकनाथमहाराजांचीं म्हणून म्हटलेलीं पुढील दोन पदें नाशीकक्षेत्रीं एका वृद्ध महाराष्ट्र्याकडून ऐकावयास मिळालीं. त्यांचा समाधानकारक अर्थ कोणी वाचक लिहून पाठवील काय ? )

## नवरी.

म्यां आईच नवरी केली । खुशाली झाली । खु० ॥ ध्रु० ॥
आला विवेक ब्राह्मण । त्याणें निश्चय केला जाण ।
भाव एक शुद्ध पाहून । कृपा केली ॥ म्यां० । खु० ॥ १ ॥
बहीण वऱ्हाडणी चार । त्यांनीं केला हा उपकार ।
सर्व मिळूनि केला विचार । तेव्हां लाधली ॥ म्यां० । खु० ॥२॥
डोळस पाहतां आंधळे झाले । बोलके ते मुकावले ।
ऐकणें निवांत राहिलें । भूलचि पडली ॥ म्यां० ॥ खु० ॥ ३ ॥
दहा जणांची केली चोरी । त्यांचा पांगुळला अधिकारी ।
आनंद झाला मम अंतरीं । न बोलवे ॥ म्यां० ॥ खु० ॥ ४ ॥
चारी वर्ण एक्या ठायीं । त्यासी ध्यातातीं हृदयीं ।
एका जनार्दनाचे पायीं । आई लाधली ॥ म्यां० । खु० ॥ ५ ॥

## लाजाळू.

बाई मी लाजाळू लाजाळू । किती लाज सांभाळूं ॥ ध्रु० ॥
पतीस म्हणती पाहांटे उठा । मी दळिते भांडीं उटा ।
आपण दोघेजण दळूं । बाई० ॥ १ ॥
आपण बसती धनणीवाणी । नवऱ्यास म्हणती करा सडापाणी ।
आपण दोघे शेण वळूं । बाई० ॥ २ ॥
पती चालले बाजारा । खाऊं वाटलें खजूरा ।
त्यानें आणलें पैशाचें आळू ॥ बाई० ॥ ३ ॥
एका जनार्दनी लाजाळू । आपण बसती गुरूजवळू ।
नवऱ्याचें हातीं दिली तिनें झोळी ॥ बाई० ॥ ४ ॥

श्री.

# ' स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा '

## पुस्तक—परीक्षण

### ( लेखक—श्री. के. भि. बापट, चिपळूण )

" **स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा** " या नांवाचें एक पसतीस पानांचें छोटेंसें पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें असून तें एक अॅडव्होकेट काशिनाथ नरसिंह केळकर व दुसऱ्या विदुषी कुमारी बाळूबाई खरे बी. ए. या दोन लेखक-लेखिकांच्या लेखणींतून बाहेर पडलेलें आहे. पुस्तकांतील विषय स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा हा असल्यामुळें केवळ एकाद्या पुरुषलेखकाकडून त्याची मांडणी करण्यांत आली असती तर त्यांत कदाचित् एकांगीपणा राहण्याचा जसा संभव असतां, तसाच केवळ एकाद्या स्त्रीलेखकाकडून हें पुस्तक लिहिण्यांत आलें असतें तरीही राहिला असता; म्हणूनच कीं काय न कळे, हें छोटेखानी पुस्तक लेखक–लेखिकांच्या जोडमेहनतीनें तयार केलें असावें. असें असल्यामुळेंच या पुस्तकांत एरव्हीं दिसणारा एकांगीपणा अथवा अर्धांगीपणा न दिसतां समतोलपणा खास दिसला पाहिजे, अशी कोणीं अपेक्षा केल्यास त्यास चुकीचें ठरविणें कठीण जाईल. तरीही हें पुस्तक त्रोटक व घाईनें लिहिल्या-मुळें विचारपरिपाक जसा उतरावयास पाहिजे होता, तसा उतरला नाहीं असें वाचकांस वाटल्यावांचून राहत नाहीं. तें कांहींही असलें तरी स्त्रीशिक्षणाची व स्त्रियांच्या हक्कांची आस्था बाळगणारे व त्यांचा पुरस्कार करणारे जे लोक असतील त्यांस अशा प्रकारच्या वाङ्मयांत एका पुस्तकाची भर पडल्या-बद्दल आनंद झाल्यावांचून खास राहणार नाहीं; आणि म्हणूनच उभयतां ग्रंथकारांचें अभिनंदन करणें जरूर आहे.

या विद्वान् लेखक–लेखिकांनीं प्रथमच विषयांत प्रवेश करतां करतांच स्मृतिकार व भाष्यकार यांस झोडपण्यास सुरवात केली असून दुसऱ्या प्रकरणांत वैदिककाल व स्मृतिकाल यांत प्रवेश केला आहे. नंतर तिसऱ्या प्रकरणांत " **लग्नाच्या बाजारांत** " उतरून बरीच मौज पाहिली आहे, आणि मग पुढच्या प्रकरणांत " **विवाह हा संस्कार कीं करार** " याची गंभीरपणें चर्चा चालविली आहे. हें झाल्यावर " **विवाहसंस्काराच्या मर्यादा** "

हें प्रकरण लिहून ग्रंथकारांनीं स्मृतिकारांची व्यवहारज्ञतेबद्दल पाठ थोपटिली आहे. आणि मग '**कांहीं भानगडीच्या प्रश्नांत**' शिरून तेथूनही वाट काढून '**स्त्रियांच्या मिळकतीच्या हक्कांबद्दल**' वाटाघाट करून अखेरीस उपसंहार करून टाकिला आहे. आपणही आतां कांहीं गोष्टींचें त्रोटक व धांवतें निरीक्षण करूं.

विषयप्रवेशांत पहिल्याच पानांत ग्रंथकार लिहितात "**रूढीराक्षसीनें आम्हांला भूल दिली आहे. आणि खऱ्या वैदिकधर्माला तिलांजलि देऊन स्मृतिकार व त्यांवरील भाष्यकारांनीं आपल्या मंत्रांनीं आम्हांला भारून पशूपेक्षां आम्ही** ( स्त्रिया ) **निराळ्या नाहीं, अशी भावना आमच्या मनावर दृढमूल करून टाकिली आहे**"! यावर प्रश्न असे उद्भवतात कीं, **खरा** वैदिक धर्म कोणता ? आणि **खोटा** वैदिकधर्म कोणता ? स्मृति ह्या वेदास अनुसरून लिहिल्या आहेत कीं नाहींत ? नसतील तर त्या कोणत्या ? वेदाच्या सर्व शाखा उपलब्ध आहेत काय ! नसतील तर सर्व वैदिकधर्म पूर्णपणें कसा कळला ? कोणत्या वैदिकधर्माला कोणत्या स्मृतींनीं **तिलांजलि** दिली ? स्मृतिकारांनीं कोणत्या रूढी नवीन पाडल्या व कोणत्या पुढें चालू ठेविल्या ? बरें, बदल केला असें गृहीत धरल्यास त्यास कांहीं तात्कालिक कारणें असतील कीं नाहीं ? वैदिकधर्म कोणत्या कालापर्यंत चालू होता ? आपणांस स्मृतिकार पशू बनवीत आहेत, हें तत्कालीन स्त्रियांपैकीं एकाद्याही '**सरोजिनी**'च्या अथवा '**मुथुलक्ष्मी**'च्या **लक्षांत** आलें नाहीं, हें आश्चर्य नव्हे काय ? सर्व स्त्रिया वैदिककालांत जर सुशिक्षित होत्या, तर त्या एकाएकीं इतक्या मूढ कशा झाल्या ? वैदिकधर्माला तिलांजलि देऊन स्त्रियांस पशु बनविण्याच्या उद्योगांत गढलेल्या स्मृतिकारांनीं '**गृहिणी गृहमुच्यते,**' "**यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः**" इत्यादि वाक्यें आपल्या ग्रंथांत जीं लिहून ठेविलीं तीं वैदिकधर्मास अनुसरून ठेविलीं कां नवीन घातलीं ? कां नजरचुकीनें काढून टाकावयाचीं राहिलीं आहेत ?

पृष्ठ ३ वर ग्रंथकार म्हणतात, "**कांहींनीं वेदोदधींतील नक्र काढून ते स्त्रियांच्या अंगावर त्यांना खाण्याकरितां सोडून दिले**" ! एकूण खऱ्या वैदिकधर्मांतसुद्धां नक्र होते म्हणावयाचे ! तेवढे वैदिकधर्मसिंधूंतून नक्र काढून टाकून, ग्रंथकार दयार्द्र होऊन जर फक्त रत्नेंच काढून स्त्रियांच्या हातांत त्यांची माळ करून देतील, तर किती चांगलें होईल बरें ? मात्र एवढा शंखविरहित नवीन धर्मसिंधु त्यांनीं लवकर तयार केला तर उपयोग ! नाहीं तर उरल्यासुरल्याही स्त्रिया नक्रांच्या भक्ष्यस्थानीं पडून सुधारणा करण्यास योग्य स्त्री मिळण्यासच पंचाईत पडावयाची ! "'**वैदिककाल व स्मृतिकाल**" या प्रकरणांत हे ग्रंथकारद्वय म्हणतात,

" **वैदिककालीं अनेक मंत्रद्रष्ट्या स्त्रियाही आपल्यास दिसतात. स्त्रियांनीं रणांगणावरही पराक्रम गाजविला. पुरुषांचे बरोबरीनें स्त्रीशिक्षण घेतलें.** " कबूल, पण हल्लीं स्त्रियांना जे हक्क देण्याकरतां हे ग्रंथकार वकिली करीत आहेत, ते हक्क म्हणजे ' सूक्तें रचण्याचा हक्क, वेदाभ्यासाचा हक्क, रणांगणावर जाण्याचा हक्क, इत्यादि हक्कच कीं काय ? असें असल्यास एकाद्या स्त्रियांच्या सभेंत हे ठराव पसार झाले असल्यास ग्रंथकारांनीं यादी प्रसिद्ध करावी.

' **यम, हारीत यासारख्या विद्वानांनीं पुरुषांप्रमाणें स्त्रियांनाही चतुराश्रम मोकळे असल्याचें सांगितलें आहे** ' असें ग्रंथकार म्हणतात. आतां या म्हणण्यावरून वैदिकधर्मास तिलांजलि देणाऱ्यांत यांना घालावयाचें कीं नाहीं ? ' **स्त्रियांबद्दल असणारी ही उच्च भावना सातव्या शतकानंतर मावळली व त्यांचे हक्क सर्वस्वी हरण केले गेले** ' असें ही जोडी म्हणते. यम, हारित वगैरे विद्वान् हे कोणत्या शतकांतले ! मनु हा सातव्या शतकाच्या आधींचा का नंतरचा ? ' **स्त्रियांना मनु हा पशुवृत्तीच्या लेखितो** ' असें ज्या मनूबद्दल ग्रंथकार म्हणतात, त्याच मनूनें ' **यत्र नार्यस्तु पूज्यन्ते** ' इत्यादि उद्गार काढिले कीं दुसऱ्या एकाद्या मनूनें ?

" **उपनिषत्कालानंतर शिक्षित स्त्रियांनीं विवाहविचार करण्याचें सोडून दिल्यानें वंशवृद्धि कमी झाली असावी** " असें हे ग्रंथकार म्हणतात. मग हल्लींही स्त्रिया शिक्षित झाल्यावर पुन्हां विवाहविचार करण्याचें सोडून देतील व वंशवृद्धि कमी होईल असें ग्रंथकारांचें मन त्यांना सांगतें कीं काय ? मग स्त्रियांना गृहकृत्यांतच फक्त डांबून ठेवणार कीं वंशवृद्धीच्याही कामीं डांबून ठेवणार ? कीं वंशवृद्धि व गृहकृत्यें ह्या दोहोंतून सुटण्यासाठीं हल्लींचें भांडण आहे ?

पान आठ यांत ग्रंथकार म्हणतात— " **स्वसुखापेक्षां उच्चदृष्टि ठेवून पूर्वींप्रमाणें विवाहबद्ध होणें हेंच खरोखर उचित आहे.** " हें म्हणणें बरोबर आहे. पण यावर शंका अशी कीं, ' **स्वसुखापेक्षां उच्चदृष्टि** ' म्हणजे काय ? ' **उच्च हेतूंनीं प्रेरित होऊन स्वखुषीनें एकमेकांच्या उन्नतीसाठीं वधूवर विवाह—बद्ध झालीं पाहिजेत** ' हेंही म्हणणें गैर नाहीं. पण यांतील ' **उच्च हेतूंचा** ' खुलासा होईल तर बरें.

पान ९ यांत ग्रंथकार म्हणतात:– " **लग्न म्हणजे सण होय, रण नव्हे. मान घालवा, संपत्ति घालवा, कधीं कधीं सर्वस्वही घालवून लग्नाचा धडाका उडवा असें कोणत्या वेदांत अगर कोणत्या स्मृतींत सांगितलें आहे ?** " लुप्त झालेल्या वैदिकधर्माचें पुनरुज्जीवन करण्यास तयार झालेल्या ग्रंथकारांचें हेंहीं म्हणणें रास्त आहे. असा लग्नाचा धडाका उड-

विण्यास कोणत्याही वेदानें अथवा स्मृतीनें सांगितलें नसेल. पण '**हिंदुधर्म पद्धतीनें लग्न झाल्यावरही त्या लग्नाची सरकारी नोंद असावी, लग्नांत खर्च किती केला, लग्न कोणाचें, ज्यांचें लग्न त्यांच्यावर सक्ति झालेली आहे किंवा कसें या गोष्टींची नोंद शास्त्या अधिकाऱ्यांपुढें व्हावयास पाहिजे.**' हें तरी कोणत्या वेदानें अथवा स्मृतीनें सांगितलें आहे ? हेंही वैदिक धर्माचें पुनरुज्जीवनच कीं काय ?

'**विवाह हा संस्कार कीं करार**' या प्रकरणांत पुस्तककर्त्यांनीं धरसोडीची व असंगति-विसंगतीची कमालच केली आहे. हे पुस्तककर्ते एकदां म्हणतात कीं "**शास्त्र व रूढि यांचा वाद पडला असतां रूढीलाच प्राधान्य द्यावें हें उंटावरच्या शहाण्या इंग्रज न्यायाधीशांनीं ठरविलेलें तत्त्व सामान्यतः खरें आहे. पण रूढि दिशाभूल करणाऱ्या असल्यास शास्त्रवचनांचा आधार घेऊन बदलूं नयेत हें शहाणपण कोणतें?**" असें हे विचारतात. बरें; जाचक व जुलमी रूढि बदलण्यास शास्त्रवचन मदतीस घ्यावें, असें यावरून ठरतें असें कोणी म्हणेल, तर लगेंच हे **खरे-केळकर** असें सांगतात कीं, परिस्थिति व तारतम्यही पाहिलेंच पाहिजे. आतां या सर्व विधानांचा मेळ कसा घालावयाचा हें खरे-केळकरांसच माहीत !

दुसरा मासला पहा:- "**लग्न हा एक सामाजिक करार होय**" हें यांचें एका ठिकाणचें विधान. त्याच पानावर हेंही विधान कीं:- "**लग्न हा जितका सामाजिक करार तितकाच तो धार्मिक संस्कारही होय.**" पुन्हां हॉल केनचें वाक्य पृष्ठ १३ वर उद्धृत करितात कीं '**लग्न ही केवळ व्यक्तिविषयक व्यवहाराची गोष्ट आहे.**" साराच गोंधळ !

"**विवाहसंस्काराच्या मर्यादा**" या प्रकरणांत '**नष्टे मृते**' इत्यादि श्लोक त्यांतील '**पतौ**' या चुकीच्या पदावर अनेक वेळां वाद होऊन तो श्लोक खंडित झाला असतांही पुस्तककर्त्यांनीं आपल्या मदतीस घेतला आहे; व याच प्रकरणांत सनातनी लोकांना जी मनुस्मृति उपयोगी पडते, तिला आपण स्वतःच कुरवाळून आपल्यास अनुकूळ अशी साक्ष नेमकी तिच्याकडून आर्जवून मागून घेतली आहे; व ज्या मनूच्या पाठीवर स्त्रियांना पशु लेखल्याबद्दल या ग्रंथकारद्वयानें पूर्वीं कोर्डा ओढला होता, त्याच मनूची व त्याबरोबरच वैदिक धर्माचा लोप करणाऱ्या इतर स्मृतिकारांचीही, त्यांनीं विवाहविधीचें व्यावहारिक मर्यादा घालून वर्णन केल्याबद्दल पाठ थोपटली आहे ! अखेरीस **धर्मशास्त्रांतही विवेक आहे ही गोष्ट सनातन्यांस बजावून सांगतां सांगतां त्याच धर्मशास्त्रांतील वचनें पुढें करतांच** मात्र हे म्हणतात कीं '**मिथ्या शब्दप्रमाण्याचे वळसे कशाला !**'

" **कांहीं भानगडीचे प्रश्न** " या प्रकरणांत मुरलीची कथा लिहिली आहे ती मात्र मननीय आहे. पति नीच जातीचा असलेला त्या महर्षिकन्य- केला व महर्षीला प्रथम समजला नाहीं, तरी पुढें झालेल्या संततीच्या लक्षणां- वरून त्या पतिव्रतेच्या लक्षांत ती गोष्ट येऊन तिनें नवऱ्यास त्याबद्दल विचारलें व त्यानेंही ती गोष्ट कबूल केली. त्यानंतर त्यास तिनें आपल्यास नीच जातीच्या पतीपासून मुक्त करण्याकरितां घटस्फोटाची मागणी न करितां " **शारीरदोष मनःसंकल्पाच्या तीव्र विद्युत् शलाकेनें दग्ध करून** " अग्निनारायणाकडेच धांव घेतली; व अग्निनारायणानेंही तिला अपवित्रपणां- तून मुक्त करून आपल्याप्रमाणेंच उज्ज्वल केलें. पण हें कशामुळें झालें ? तिच्या पातिव्रत्याच्या प्रभावानें ! परंतु आधुनिक स्त्रियांच्या पातिव्रत्याविषयीं लेखकांस चांगली माहिती असल्यामुळें त्यांनीं वरून खालीं उतरून अग्नींत प्रगट होणाऱ्या परमेश्वराकडे **न** वळतां, जनतारूप परमेश्वराकडे वळून तो धांवून येत नाहीं म्हणून त्यासच दोष दिला आहे, हें ठीकच आहे ! न्यायाचा ' **पुणेरी** ' **कांटा** ! दुसरें काय !

' **स्त्रियांच्या मिळकतीचे हक्क** ' या प्रकरणांत ग्रंथकर्त्यांनीं सुचविलेले स्त्रियांच्या वारसाहक्कासंबंधाचे व दत्तकासंबंधाचे विचार कायदेपंडितांनीं खरोखर विचार करण्यासारखे आहेत. एकंदरींत स्त्रियांचे हक्क कोणते व त्यांच्याविषयीं काय सुधारणा केल्या पाहिजेत याविषयीं एक लेखिका व एक लेखक यांनीं स्त्रियांच्या हितार्थ कळकळीनें लिहिलेलें हें छोटें पुस्तक एकदां अवश्य वाचण्यासारखें आहे यांत शंका नाहीं.

---


# भक्तिमणिमाला.

संपादकः—**ल. रा. पांगारकर.** बी. ए.

भागवत हा भक्तिशास्त्रावरचा एक अद्वितीय ग्रंथ सकलसंतमान्य व सर्वजनप्रिय आहे. भक्तिप्रेमाचीं रहस्यें अमृत—मधुर वाणीनें जनांस सांगणारा भागवताच्या बरो- बरीचा दुसरा ग्रंथ नाहीं. भागवतांतील उत्तमोत्तम अशा ५५० श्लोकांची निवड करून प्रायः त्यांचा कथासंदर्भ देऊन साधुसंतांच्या वचनाधारें ही भक्तिमणिमाला तयार केली आहे. भागवती श्लोकांबरोबरच महाराष्ट्रीय सत्कविवचनांचाही यांत समावेश केल्यामुळें ही माला मराठी ग्रंथ या दृष्टीनें केवळ अद्वितीय झाली आहे. पृ. सं. २५० किंमत १॥ रु. व्ही. पी. नें रु. १॥॥३.

पत्ताः—**व्यवस्थापक, 'मुमुक्षु' पुणें.**

# ज्ञानेश्वरींतील संसारसुखाचें चित्र.

## १० पतिपत्नींची एकरूपता.

पति आणि पत्नी हे संसाराचे दोन मुख्य घटक किंबहुना पतिपत्नींचा योग म्हणजेच संसार. उभयतांच्या एकरूपतेंत संसाराची सार्थकता आहे व संसारसुखाची परमावधि आहे. दोन्ही मूळांत कशी एकरूप आहेत किंवा सभाग्य पतिपत्नींचा संसार एकरूपतेंत कसा परिणत होतो हें ज्ञानेश्वरांनीं अमृतानुभवाच्या 'शिवशक्ति समावेशन' नामक पहिल्या प्रकरणांत प्रकृतिपुरुषवर्णनप्रसंगीं फार बहारीनें दाखविलें आहे. तो पुरुष व ती प्रकृति यांचें मूळांत जें ऐक्य आहे तेंच जीवांच्या संसारांत संचरलें आहे व हें पतिपत्नींनीं ओळखून वागणें यांतच संसाराची बहार आहे. व आपल्या विवाहप्रकरणांत सप्तपदी हा जो मुख्य विधि आहे त्याचें रहस्यही एकरूपता पटविणें हेंच आहे. 'सतां सप्तपदा मैत्री' असा सामान्य व्यवहारही आहे. **सप्तपदी** हें आत्मभावाच्या विकासाचें श्रेष्ठ साधन आहे. परमार्थांत जीवपरमात्म्यांचें ऐक्य साधणें व प्रपंचांत पतिपत्नींची एकरूपता प्रतीतीस आणणें हा सप्तपदीचा हेतु आहे. सप्तपदी म्हणजे काय तें थोडक्यांत पाहूं. **शुभेच्छा**—विमलमति, निर्मल प्रेम, हें पहिलें पद, ही ज्ञानभूमि होय. **सुविचारणा**—श्रवणमनन. **तनुमानसा**—निदिध्यासानें मन सूक्ष्म ह्म. अंतर्मुख होणें, सजातीय ( आत्म ) प्रवाह व विजातीय( अनात्म) तिरस्कार यानें मानस सूक्ष्म होणें. ह्या तीन साधनावस्था आहेत. **सत्त्वापत्ति**—ज्ञानप्राप्ति, आत्म्याची एकरूपता पटणें. ह्या पुढील तीन अवस्था जीवन्मुक्त स्थितींतल्या आहेत. **असंसक्ति**—आत्मव्यतिरिक्त अन्यत्र निर्ममत्व. **पदार्थाभाविनी**—केवल आत्मस्वरूपता व **तुरीयगा**—समाधिसुखाची समरसता, तन्मयता, भावाभावरहित सहजावस्था. ही शास्त्रीय परिभाषा सोडून पाहिलें तर आत्यंतिक प्रेमानें एकरूपता पावणें हा सप्तपदीचा मुख्य हेतु आहे व तो प्रकृति पुरुषांत किती पतिपत्नींत कसा व्यक्त होतो हें आपण ज्ञानेश्वरांच्या वाणीनेंच ऐकूं. अमृतानुभवाच्या पहिल्याच प्रकरणांत शिवशक्तींच्या एकात्मतेचें फार बहारीचें वर्णन आहे.

'जगाचीं जनकें' अशा आपलें 'अद्वैत स्वरूप दर्शित करणाऱ्या मूळ देवोदेवीला' वंदन असो. परमात्मा आपल्या अधिष्ठानावर एकपणा न मांडतां 'प्रियुचि प्राणेश्वरी'—शिवच शक्तिरूप झाला. 'कैसी स्वसुखाची आळुकी । जे दोनीपण मिळोनि एकीं । नेदितीच कवतुकीं । एकपण फुटों'— त्यांना स्वसुखाची एवढी आवड आहे कीं, तीं त्यासाठीं द्वैतभाव दावीत असून कौतुकानेंही आपलें एकपण बिघडूं देत नाहींत. हीं दोघें 'जगाएवढें

बाळ वियाली परी ' दोघांतलें प्रेम उणें होत नाहीं. ' जया एके सत्तेचें बैसणें। दोघां एका प्रकाशाचें लेणें । जे अनादि एकपणें । नांदती दोघे '—एका ब्रह्मचैतन्यावर दोघे नांदतात. ' जेणें देवें संपूर्ण देवी । जियेवीण कांहीं ना तो गोसावी । किंबहुना येकोपजीवी । येकयेकांची '— दोघे एकमेका-मुळें पूर्णता पावतात, एकमेक एकमेकामुळें जगतात ! त्यांच्या ' गोडियें कैसा मेळु आला ' – त्यांच्या अन्योन्य प्रेमाचा केवढा योग आहे कीं, तीं जगांत पूर्णपणें नांदत असून परमाणूंतही एकत्र नांदतात. एकमेकाविण तृणही निर्माण करीत नाहींत, ' जिये दोघे जीऊप्राणु । जिया दोघां ! ' जगद्रूपी गृहप्रपंचांत हीं दोघेंच आहेत. तो गोसावी निजला कीं ती दंपत्य-पणें जागते – पुरुषाचें तिरोधान म्हणजे नामरूपात्मक प्रकृतीचा आविर्भाव, एकाचें तिरोधान म्हणजे दुसऱ्याचा आविर्भाव ! दोघे एकमेकांचे विषय आहेत व विषयीही आहेत. व एकमेकांमुळें सुखी आहेत. स्त्रीपुरुषनाम-भेदानें एकटा परमात्माच नटला आहे. " दो दांडी ( टिपऱ्या ) एक श्रुती ( नाद ) । दोहीं फुलीं एक द्रुती ( परिमळ )। दोहों दिवीं दीप्ती । एकीचि जेवीं । दों ओठीं एक गोठी । दो डोळां एक दिठी । तेवीं दोघीं जिहीं । एकिची जे"–टिपऱ्या दोन पण नाद एक, फुलें दोन पण सुवास एक, दिवे दोन पण प्रकाश एक, डोळे दोन पण दृष्टि एक, त्याप्रमाणें सृष्टींत शिव शक्ति या दोघांची व्याप्ति आहे असें दिसतें. हें मेहुण दोनपण दाखवून एका ब्रह्मा-नंदाचेंच भोजन करीत असतें ! ' स्वामीचिया सत्ता– । वीण नेणें पतिव्रता । जियेवीण सर्व कर्ता । कांहीं ना तो ' पतिव्रतेला स्वामीच्या सत्तेवांचून दुसरा आधार नाहीं व पुरुषाला तिच्यावांचून सर्व कर्ता असें म्हणून घेतां येत नाहीं. भ्रताराचें जेवढें ज्ञान व जेवढी सत्ता तेवढें ज्ञान व तेवढी सत्ता भार्येची, त्यांत पृथक्पणा नाहीं. गूळ आणि गोडी, कापूर आणि परिमळ, सूर्य आणि प्रभा, बिंब आणि प्रतिबिंब असा पुरुषाचा आणि प्रकृतीचा संबंध आहे. दिव्याचा प्रकाश घेऊं गेल्यास दिवाच हातीं येतो, त्याप्रमाणें प्रकृतीचा विचार करितां अधिष्ठानभूत मूळपुरुषच हातीं येतो. निर्विकाराला वायलेनें पुरुषत्व दिलें व दादल्याच्या सत्तेमुळें तिला शक्ति आली. ज्या प्राणेश्वरीवांचून शिवाच्या ठिकाणींही शिवपण नाहीं ती शिवानेंच आपले ठिकाणीं निर्माण केली आहे. तिनें आपल्या अंगापासून सर्व संसाराची उभारणी करून आपल्या कर्तबगारीनें ईश्वराला ईश्वरत्व दिलें. पति मूळचा अरूप–त्याला नांव नाहीं रूप नाहीं, हें पाहून ती लाजली व तिनें ' केलें जगाएवढें लेणें नामरूपाचें '–नामरूपात्मक जगाचा अलंकार स्वतः घडवून पतीच्या अंगावर घातला ! जेथें ऐक्य-पणाचाही दुष्काळ होता तेथें ह्या सौभाग्यवतीनें बहुपणाचा सोहळा दाखविला!

तिनें आपल्या अंगाची आटणी ( संकोच ) करून कांताला उत्कर्षास चढविलें व त्यानेंही स्वसंकोचानें प्रियेचा मान वाढविला. नवरा निजला कीं त्याच्या सत्तेच्या आधारावर ही चराचर सृष्टि निर्माण करिते व जी विसावली ( लीन झाली ) असतां पतीचें पतिपणही हिरावून नेते. ' जियें दोघे आरिसे । जियां दोघां '–दोघे स्वसुख भोगण्याचे एकमेकांचे एकमेक आरसेच आहेत! जिच्या अंगसंगानें शिव हा आपला आनंद आपण भोगूं लागतो, तिच्यावांचून त्याचे ठायीं भोक्तृत्वच नाहीं. दोघांनाही एकमेकांमुळेंच शोभा आहे. परस्पराश्रयानें दोघे द्वैतविलास करितात पण दोघांनाही भिन्नपणानें पाहतां येत नाहीं. समीरासगट गति, सोन्यासगट कांति, कस्तूरीसगट परिमळ किंवा उष्णतेसगट अग्नि त्याप्रमाणें शिवासहवर्तमान शक्ति–शिव आणि शक्ति नांवें मात्र दोन, तेथें द्वैताचा संबंधच नाहीं. ' जया दोघांच्या आलिंगनीं विरोनि गेलीं दोन्ही '–दोनी ब्रह्मचैतन्याच्या ठिकाणीं एकमय होऊन जातात. गंगा स्त्री व सागर पुरुष असा नांवांत भेद भासला तरी त्यांच्या मिळणीनंतर नुस्तें पाणीच असतें. ' नमो तया शिववोहरा ज्ञानदेवो ह्मणे '–त्या शिवशक्तिरूप दंपत्याला नमन असो.

ह्या दंपत्याचें ज्ञानेश्वरींतही दोन ठिकाणीं वर्णन आलें आहे. ही शक्ति किंवा मूळमाया महत्तत्वादिकांचें विश्रांतिस्थान आहे. सांख्य हिलाच प्रकृति म्हणतात, वेदांती माया म्हणतात, वस्तुतः आत्मस्वरूपाचें अज्ञान तेंच हिचें रूप आहे. ' आपुला आपणपया । विसर जो कां धनंजया । ' तेंच हिचें रूप. ' हे माझेनिचि अंगें । मी पहुडल्या हे जागे । आणि सत्तासंभोगें । गुर्विणी होय ॥ याकारणें मी पिता । महद्ब्रह्म हे माता । अपत्य पांडुसुता । जगडंबर. ' पुरुषाची सत्ता घेऊन प्रकृति ही सृष्टि निर्माण कशी करिते, त्रिगुण पंचभूतात्मक अष्टधा प्रकृति, बुद्धि, मन, अहंकार व पंचभूतें आधीं सूक्ष्मांत, मग स्थूळांत, हा सृष्टिरचनेचा भाग ज्ञानेश्वरीच्या १४ व्या अध्यायांत ( ओवी ६८ ते ११७ पर्यंत ) पहावा. १३ व्या अध्यायांत ओवी ९७९ ते १०३५ पर्यंत ' प्रकृतिपुरुष विवेक ' सांगितला आहे तोही पहावा. तेथें ' आवुली जोडी । आवुला खाय '–क्रिया प्रकृतीची व भोक्तेपण पुरुषाचें हें म्हाताऱ्या नवऱ्याच्या आणि तरुण, हौसी व कर्तृत्ववान स्त्रीच्या रूपकानें फारच मौजेनें सांगितलें आहे. ' अनंग तो पेंधा । निकवडा नुसधा । जीर्ण अतिवृद्धापासूनि । वृद्ध '–पुरुष हा अनंग ( निराकार ) व पेंधा ( पांगळा ), अत्यंत दरिद्री व अत्यंत वृद्ध आहे. उघडच आहे कां कीं तो ' अचक्षु अश्रवण । अहस्त अचरण । रूप ना वर्ण । ना नाम आथी ॥ तो तरी अकर्ता । उदास अभोक्ता । परि इया पतिव्रता । भोगविजे ' असा आहे. आणि ही प्रकृति पडली ' दैवी गुणमयी! ' तिला रूपगुणांचा चाळढाळ फार ! प्रतिक्षणीं नित्य नव्या रूपगुणांचचा

हिला छंद–नटवी, बहुगुणी, चंचल, हौसी, कर्तबगारीची पण पतिव्रता अशी ही त्या पुराण पुरुषाची भार्या वाटेल त्याप्रमाणें त्याला वांकविते ! मन हें नपुंसक ना, पण ही त्याला त्रैलोक्यभर हिंडविते. सर्व विकारांचें ही आगर आहे. कामादिकांना हिचें बळ. साऱ्या सृष्टीचा खेळ हिचा. ' उत्पत्ति प्रळय ते इचे सायंप्रात.' हिच्या सौभाग्याची थोरी एवढी कीं ही त्या अनावर पतीला आवरते. त्याला नामरूप देते, सगुणसाकार बनविते. ही नाचवील तसा तो नाचतो. त्या अजाला जन्म घ्यायला लावते, निर्गुणाला गुणी करिते.

शिवशक्तींनाच ज्ञानेश्वरांनीं अनेकवार अर्धनारीनटेश्वर म्हटलें आहे. निर्विकल्प ब्रह्मावर शिव आणि शक्ति किंवा पुरुष आणि प्रकृति या दोन कल्पना करून शास्त्रानें सृष्टिरचनेची कथा सांगितली आहे. ' पिताहमस्य जगतो माता धाता पितामहः ' ( गीता ९–१७ ) ' अर्धनारीनटेश्वरीं । जो पुरुष तोचि नारी–' यालाच अनुक्रमें पिता व माता म्हटलें आहे. पुरुषाच्या अंगसंगानें म्ह० सत्तेनें प्रकृति अष्टधा होऊन सृष्टि निर्माण करिते म्हणून त्यांना जगाचे आईबाप म्हटलें आहे. निर्माण झालेलें जग त्याच्याच योगें राहतें व जीवित वाढतें म्हणून त्यालाच धाता म्हटलें आहे व ' इये प्रकृति पुरुषें दोनीं । उपजलीं जयाचिया अमनमनीं ( मनरहित स्वरूपीं ) । ' तो पितामह त्रिभुवनीं । विश्वाचा मी ' ( अ.९ ओवी २६९–२७२ ). 'न मोडतां दोन्ही आकार । घडिलें एक शरीर । हें अर्धनारीनटेश्वर । रूपीं दिसे '(१८–५२) –दोन आकार न मोडतां शरीर मात्र एक, असें अर्धनारीनटेश्वराचें रूप आहे. हे शिवशक्तीचे दोन्ही आकार म्ह०अहमिदंरूप वृत्ति शुद्धस्वरूपीं लीन झाल्यावर दोन्हीमध्यें अभेदत्वानें नांदणारें चैतन्य मात्र अवशिष्ट राहतें; ' अर्धनारीनटेश्वरें । गिळित गिळित परस्परें । ग्रहण जालें एकसरें । सर्व ग्रासें ' (अमृता० ९–६२ ). न मोडतां दोनी आकार । घडलें एक शरीर, असें जें अर्धनारीनटेश्वराचें वर वर्णन केलें आहे तें ' त्रिभुवनैकपवित्र व जगाचें जीवनसूत्र ' मूर्तिमंत नेवासे गांवीं श्रीमहालयारूपानें ज्ञानेश्वराच्या पूर्वींपासून नांदत आहे. व याच मूर्तीच्या सन्निध ज्ञानेश्वरी ग्रंथाची रचना झाली आहे. ( १८–१८०४ ). श्रीमहालया किंवा मोहनीराज यांचें मंदिर नेवाशास अजूनहि पाहतां येतें. शिवशक्ति किंवा अर्धनारीनटेश्वर यांस उद्देशून संप्रदायांतून भजनें चालत आहेत. विठोबारखुमाई, राधाकृष्ण, सीताराम, पार्वतीपरमेश्वर यांच्या नामोच्चाराबरोबर भाविकांनीं शिवशक्तिरूपांत समाविष्ट व्हावें व शिवशक्ति ही जेथें लीन होतात त्या अद्वयानंदांत तन्मय व्हावें असा ' विठोबारखुमाई ' इ० वरील भजनें रूढविणारांचा मूळ हेतु असला पाहिजे.

ज्ञानेश्वरींत प्रकृतिपुरुषांचा विचार सांगतांना एखादा म्हातारा, दरिद्री, व्यंग असा नवरा व त्याची तरुण, सुंदर, हौशी, कर्तबगारीची बायको यांच्या संसा-

राचें मोठ्या मौजेचें चित्र उठविलें आहे. 'प्रकृतिपुरुषांची कुळवाडी (संसार)। सांगतां असंगाडी ( अघटित ) । जे आंबुली जोडी । आंबुला खाय !–' म्हणजे ' प्रकृति उद्यम करी, पुरुष भोगी'–बायको मिळविते व नवरा खातो ! त्या दोघांची खरोखर पाहतां ' संगती ना सोये ' पण पुरुषाच्या सत्तेवर बायको हें जगडंबर प्रसवते ! नवरा कसा आहे म्हणाल तर ' अनंग तो पेंधा । निकवडा नुसधा । जीर्ण अतिवृद्धा–। पासूनि वृद्ध '–तो अनंग म्ह. अंगहीन, निर्विकार; पेंधा म्ह० पांगळा, स्थविर; द्रव्यहीन; एकाकी ( त्याच्या नात्यागोत्याचें कोणी नाहीं ); म्हातारीपेक्षां म्हातारापुराणपुरुष ! ' तया आडनांव पुरुष। येऱ्हवीं स्त्री ना नपुंसक ।–' ही बायको आहे म्हणून त्याच्यावर पुरुषत्वाचा आळ आला आहे, खरोखर तो पुरुष, स्त्री, नपुंसक यांतला कांहीं नाहीं-अगदीं निर्लिंग, निर्धर्म आहे ! ' अचक्षु अश्रवण । अहस्त अचरण । रूप ना वर्ण । ना नाम आथी.' तर मग तो नसेलच. तर तसें मात्र नाहीं. कां कीं सुखदुःखभोक्ता त्याच्यावांचून दुसरा कोणी नाहीं व ही बया ब्रह्मांडाएवढें बाळ प्रसवली आहे ती त्याच्याच आधारावर ! तिचा व्याप पाहतां ती कोणाच्या तरी सत्तेवर एवढा खटाटोप करिते व कोणासाठीं तरी धडपडते आहे हें कबूलच करायला पाहिजे. तो अकर्ता, उदास, अभोक्ता आहे ' परी इया पतिव्रता । भोगविते. ' हिच्या रूपागुणांची चाळढाळ ( चळवळ ) मोठी, व तिला वाटेल तो खेळ ती नांवारूपाला आणते. ही अशी गुणमयी–गुणाची बाई दुरत्यया म्ह० दुर्निवार आहे. प्रतिक्षणीं ही नित्य नवें नांवरूप घेते, ' रूपागुणांचीच ' बनली आहे म्हणाना ! हिचा उन्माद जडालाही उन्मत्त करितो. मन हें नपुंसक ना ? पण ही त्याला त्रैलोक्यभर हिंडविते. सारी व्याप्ती हिची, सर्व विकार हिजपासून ! ही कामाची मांडवी, हिला ' माया ' म्हणतात. सारें वाङ्मय ( शब्दसृष्टि ), विद्या, कळा, इच्छा, ज्ञान, अज्ञान, कर्म, अकर्म, बंधमोक्ष, उत्पत्तिप्रलय, सारा या बयेचा कारभार ! अद्वय, निःसंग, निरालंब अशा पुरुषाशीं हिनें आपला संबंध जोडून संसार थाटला आहे ! हिचें सौभाग्य एवढें थोर आहे म्हणून तर त्या अनावराला हिनें आवरलें आहे. तो अगदींच निःसंग, कोरा, ठणठणपाळ, पण ही त्याचें सर्व कांहीं होते. फार हौशी आणि कर्तबगारीची बायको ! त्या स्वयंभाची संभूती, त्या अमूर्ताची मूर्ति आपण होते. " तया अनार्ताची आर्ती । तया पूर्णाची तृप्ती । तया अकुळाची जाती । गोत होय ॥ तया अनामाचें नाम । तया अजाचें जन्म । आपण होय कर्म । क्रिया तया–" आतां हें कोठवर वर्णावें ? ' तया केवळा पुरुषा । नाहीं होणें भोगणें देखा'–पण हिच्या गुणसंगामुळें तो तसा भासतो. ( अ० १३ ओवी ९७८ ते १०२१ ).

ज्ञानेश्वरांनीं शिवशक्तींचें पतिपत्नीरूपानें जें हें वर्णन केलें आहे त्याला-श्रुतीचा आधार आहे. बृहदारण्यक उपनिषदांत अ० १ ब्रा० ४ मधील पहिल्या चार कंडिका पहाव्यांत, विशेषतः तिसरी कंडिका पहावी. 'आत्मा वा इदमग्र आसीत् पुरुषविधः सोऽनुवीक्ष्य नान्यदात्मनोऽपश्यत्सोऽहमस्मीत्यग्रे व्याहरत्' –दुसरें कोणतेंही शरीर उत्पन्न होण्यापूर्वी आत्मा (प्रथमशरीरी मनु प्रजापति) हाच एक होता. तो पुरुषासारखा होता. आपल्याहून दुसरें कोणीच नाहीं असें त्यानें पाहिलें व मी आहे अशी वाणी त्यानें उच्चारली. 'स वै नैव रेमे तस्मादेकाकी न रमते स द्वितीयमैच्छत्' –त्याला करमेना म्हणून आतांही एकट्या प्राण्याला करमत नाहीं. दुसरें कोणी जोडीला असावें असें त्याला वाटलें. 'स है तावानास यथा स्त्रीपुमा ५ सौ संपरिष्वक्तौ स इममेवाऽऽत्मानं द्वेधापातयत् पतिश्च पत्नीचाभवताम्' – परस्परसंबद्ध स्त्रीपुरुष ज्या परिमाणाचे होतात तेवढ्या परिमाणाचा तो झाला, व आपल्या देहालाच दोन प्रकार देऊन पति व पत्नी असें दंपत्य होता झाला. 'तस्मादिदमर्धबृगल-मिव स्व'—त्याचें स्वतःचेंच शरीर अर्ध्या वेळूच्या कांबीसारखें झालें, अर्थात् आत्म्याचें अर्धदल झालें. 'तस्मादयमाकाशः स्त्रियापूर्यत एव ता ५ समभवत्ततो मनुष्या अजायन्त'– आकाश म्ह० पुरुषार्ध, स्त्री या अर्धानें शून्य म्ह० असंपूर्ण असा आपला देह पाहून स्त्रीच्या दुसऱ्या अर्धानेंच हा पूर्ण होतो असें जाणून तो तिजशीं मिळाला, व याप्रमाणें त्यांच्या परस्पर उपगमनापासून मानवी प्राणी उत्पन्न झाले व (सर्व सृष्टि झाली).

पतिपत्नींचा पवित्र काम हें भगवान् सांगतात कीं, माझेंच रूप आहे. 'बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम्' या तत्वाप्रमाणें मनुष्यसृष्टीचेंही बीज साक्षात् परमात्मा आहे व तोच स्त्रीपुरुषांचा काम होय. 'धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ' (७–१२) यावर ज्ञानेश्वरांनीं भाष्य करितांना म्हटलें आहेः 'भूतांच्या ठायीं काम। तो मी ह्मणे आत्माराम। जेणें अर्थास्तव धर्म। थोर होय'– ज्या कामाच्या निमित्तानें धर्माला थोरपणा आला आहे (चतुर्विध पुरुषार्थांत ज्याची गणना झाली आहे) तो भूतमात्रांच्या ठायीं वसणारा काम मी आहे असें आत्माराम (भगवान्) ह्मणाले. स्त्रीपुरुषांच्या मनांत विकारांचा उद्भव करून काम हा इंद्रियांस अनुकूल अशींच कर्मे करितो, परंतु तीं कर्मे धर्मास विरुद्ध जाऊं देत नाहीं; कां कीं 'जो अप्रवृत्तीचा अव्हाटा। सांडूनि विधिचिया निवे वाटा। तेवींचि नियमाचा दिवटा। सवें चाले' ॥– निषिद्ध कर्माची आडवाट मोडून तो शास्त्रविहित कर्माच्या राजमार्गानें निघतो व बरोबर नियमाचा दिवटा घेतो व अशा व्यवस्थितपणानें काम चालला म्हणजे धर्माला पूर्तता होते, मग 'मोक्षतीर्थींचे मुक्तें। संसार भोगी'–

संसार भोगणारे पुरुष मोक्षतीर्थांतले मुक्त ( मोतीं ) या योग्यतेला चढतात अथवा मुक्तस्थिति न गमावतां हे धर्मात्मे संसार भोगतात. ' जो श्रुति गौरवाच्या मांडवीं । कामसृष्टीचा वेल वाढवी । जंव कर्मफळेंसी पालवीं । अपवर्गी ठाके '–जो काम श्रुति गौरवाच्या मांडवावर सृष्टीचा वेल कर्मफळासह त्याचीं पानें मोक्षाला जाऊन भिडेपर्यंत, वाढवितो. ' ऐसा नियत जो कां कंदर्प । जो भूतां या बीजरूप । तो मी म्हणे बाप । योगियांचा ' ( अ० ७ ओवी ४६ ते ५१ ). अशा पवित्र कामानें प्रवृत्त झालेल्या पतिपत्नींच्या पोटीं घराण्याच्या पवित्र वातावरणांत (शुद्ध बीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं । या न्यायानें) उत्तम पुरुष जन्मावेत हा सहजक्रम आहे. ' जयातें नीतिपंथें चालिजे । सत्यधूत बोलिजे । देखावे ते देखिजे । शास्त्रदृष्टि ॥ ४४५ ॥ वेद तो जागेश्वरु । जया व्यवसाय निजाचारु । सारासारविचारु । मंत्री जया ॥ ४४६ ॥ ऐसी निजपुण्याची जोडी । वाढिन्नली सर्व सुखाची कुळवाडी । तिये जन्मे तो सुरवाडी । योगच्युत ॥ ४४८ ॥ ' ( अ० ६ ).

## ११ कुळधर्म.

कुळवंताच्या भावना ज्ञानेश्वरांनीं अर्जुनमुखानें व्यक्त केल्या आहेत. ' पुत्रातें इच्छी कुळ ' त्याचें फळ काय ? कुलवंताचा परिवार मोठा असतो. आईबाप, आजाआजी, पुत्र पौत्र, भगिनी व भार्या, गुरु, बंधु, मातुळ, सुहृज्जन, सासरे, श्यालक, मातुळ, सखे सोयरे इ. ह्या सर्वांस सुख देणें व यथाशक्ति सर्वांचा परामर्ष घेणें हें कुळांत जन्मल्याचें सार्थक आहे. तयांशीं विरोध करूं नये. ' आम्हीं कां जन्मावें । कवणांलागीं जियावें । जरी वडिलां चिंतावें । अहित मनें । २१४ आम्हीं जें जें जोडावें । तें समस्तीं इहीं भोगावें । हें जीवितही उपकारावें । काजीं इयांच्या ' २१७. हा सर्व कुलवंतांचा विचार झाला, त्यांतही अर्जुनासारखा अभिजात क्षत्रिय असेल तर तो आणखी असेंही म्हणेल कीं ' आम्हीं दिगंतीचे भूपाळ । विभांडूनि सकळ । मग संतोषविजे कुळ । आपुलें हें' ॥२१८॥ अर्जुनाच्या भाषणांत प्रसंगोचित जे कांहीं सिद्धांत प्रगट झाले आहेत तेवढेंच सामान्य विचारासाठीं येथें घेऊं. गोत्रजांच्या व कुळाच्या घातानें पाप लागतें व देव दुरावतो ( २२८ ). गोत्रजांत अभिमानानें किंवा मत्सरानें परस्पर वैर उत्पन्न होऊन युद्ध झालें व कुळाचा नाश झाला तर कुळधर्म लोपतो, घरांत अधर्म शिरतो, विधिनिषेध खुंटतात, कुळक्षयानें अनादिधर्म बुडून मनोनिग्रह उणा होतो व इंद्रियधर्म लोपतो व त्यामुळें कुलस्त्रियाही व्यभिचारास प्रवृत्त होतात. ' उत्तम अधर्मी संचरती । ऐसे वर्णावर्ण मिसळती । तेथ समूळ उपडती । जातिधर्म ॥ २५० ॥ मग चोहटाचिया बळी । पाविजे सैरां काउळीं । तैसीं महापापें कुळीं । संचरती ॥ २५१ ॥'

कुळधर्म व जातिधर्म लोपल्यानें सारा खिचडा होतो. मग नित्यनैमित्तिक गृहकर्में व श्राद्धपक्षादि पितृकर्में बंद पडतात व त्यामुळें देवता व पितर असंतुष्ट होतात व कुळाचा सत्यानाश होतो. एका भ्रष्टकुळामुळें संगतीचीं व दूरचींही अनेक कुळें भ्रष्ट व पतित होतात व शेवटीं क्रमानें सर्व राष्ट्राचा नाश होतो (अ० १ ओवी २४३ ते २६०). यास्तव कुळधर्माचें पालन प्रत्येक कुलवंतानें अवश्य केलें पाहिजे. ' कुळधर्म चाळीं । विधिनिषेध पाळीं । मग सुखें तुज सरळी । दिधली आहे ' ( अ० १२–११५ ).

## १२ देवधर्म.

आईबापांचें प्रेमसुख मिळालें, धर्मपत्नी सच्छील व मनाजोगती लाभली, विद्यागुरूंपासून कांहीं विद्यांचें ग्रहण झालें, उद्योगधंद्यांत चार पैसे हातीं आले, मुलांलेंकरांनीं घर गजबजलें, मुली उजवल्या, सुना आल्या, लोकांत चांगला बोलबाला झाला, चार जीवाचे स्नेही जोडले–तरी संसार सुखाचा होण्यास अजून कांहीं कमतरता राहिलीच. अगदींच दुर्दैवी सोडून दिले तर वरील सुखें थोडीं-फार बहुतांच्या वांट्याला येतात, पण हीं सारीं सुखें क्षणभंगुर आहेत, चिरकाल टिकणारीं नाहींत. चिरकाल टिकणारें, शाश्वत सुख दुनियेंत कोठें आहे काय, तें मला मिळेल काय, तें कोणाला मिळत असतें काय, तें कोणत्या उपायानें मिळेल असा विचार सामान्य मनुष्याला स्फुरूं लागतो. शाश्वत सुख, अखंड आनंद, सहसा न उंडळणारें शांतिसमाधान याची त्याला भूक लागते. भाग्यानें साधुसंत भेटले तर ' ते आनंदाचे अनुकार ( पुतळे ) । सुखाचे अंकुर । कीं महाबोधें विहार । केले जैसे ॥ १३८ ॥ ते विवेकाचे गांव । कीं परब्रह्मीचे स्वभाव । नातरी अळंकारिले अवयव । ब्रह्मविद्येचे ॥ १३९ ॥' ( अ० ६ ) असे खरोखर असतात असें त्याला आढळून येतें, मग तो त्यांना शाश्वत सुखाचा मार्ग पुसतो. ते सांगतात कीं, ज्या सुखापरतें सुख नाहीं, ज्या लाभापरता लाभ नाहीं, ज्या ज्ञानापरतें ज्ञान नाहीं, अशी एक वस्तु आहे, ती तुजजवळच आहे, ती तूंच आहेस ! पण तूं क्रमानें गेलास तर तुला सांपडेल. त्या वस्तूला वेदांती ब्रह्म म्हणतात, ज्ञानी आत्माराम म्हणतात, व भक्त देव म्हणतात. ती जोडण्याच्या मार्गालाच योगमार्ग, ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग अशीं नांवें आहेत. स्वधर्माचरण, वैराग्य, सत्संग, गुरुकृपा, आत्मज्ञान, ज्ञानोत्तरभक्ति व अद्वयानंदानुभव ही परमार्थाची सप्तपदी आहे. स्वधर्माचरण ही पहिली पायरी व अद्वयानंदानुभव ही शेवटची पायरी आहे. तूं स्वधर्मानें वाग. सदाचारानें वागावें व हरीला भजावें हा परमार्थाचा राजमार्ग आहे. भगवंतांनीं गीतेंत हेंच सांगितलें आहे व ज्ञानेश्वरीचें व सर्व सद्ग्रंथांचें हेंच सार आहे. हा उपदेश त्याला ठसतो व

वाडवडील व संत जसे वागत आले तसाच तो वागूं लागतो. स्वधर्माचरणानें हरीचा प्रसाद जोडणें हाच थोडक्यांत तो आपला परमार्थ समजतो. आतां त्याच्या वागण्याचे सामान्य प्रकार काय आहेत ते पाहूं. संसारी मनुष्याचा हा परमार्थाचा धोपट मार्ग आहे स्वधर्माचरणानें वागावें, सदाचार सोडूं नये, यथाशक्त्या परोपकार करावा व सर्वप्रकारें मनोभावें जगच्चालक जो परमात्मा त्याला भजावें एवढेंच तो जाणतो.

देवाला भजावें व स्वधर्मानें वागावें अशी बुद्धि होणें दुर्लभ आहे. 'हे दुर्लभ चराचरीं । सद्वासना.' गंगा जशी सहस्रमुखानें समुद्राला मिळते तसे मनबुद्धीचे सर्व तरंग देवाकडे धांवणें ही सद्बुद्धि किंवा व्यवसायात्मक बुद्धि होय ( २–२३८ ते २४२ ). देवाच्या भजनांत चित्त रमूं लागलें कीं, 'चित्ताला अखंडित प्रसन्नता' असते, आणि 'हृदय प्रसन्न होये । तरी दुःख कैंचे कें आहे ? । तेथ आपैसी बुद्धि राहे । परमात्मरूपीं' ( २–३४० ). स्वधर्मयज्ञानें देवतागण संतुष्ट होऊन योगक्षेम चालवितो. देवांनीं दिलेल्या संपत्तीच्या योगानें सर्वेश्वराचें भजन करावें. अग्निमुखीं हवन, देवतापूजन, यथाकालीं ब्राह्मणभोजन, गुरुभक्ति, अतिथिसत्कार, आपापल्या ज्ञातीचा संतोष, याप्रमाणें स्वधर्मक्रिया करावी असा वडिलांचा कित्ता पाहून तोही 'गुरुगोत्र अग्नि पूजी । अवसरीं भजे द्विजीं । निमित्तादिकीं यजी । पितरोद्देशें' ॥ १२८ ॥ स्वधर्मे जें अर्जे । तें स्वधर्मेचि विनियोगिजे । मग उरे तें भोगिजे । संतोषेसी'॥१२५॥ हें संपत्तिजात आघवें । हवनद्रव्य मानावें । मग स्वधर्मयज्ञें अर्पावें । आदिपुरुषीं ॥ १३० ॥ ( अ० ३ ). देव व देवतागण यांचा संतोष ठेवून 'तो सुखें आपुले घरीं । कुटुंबेसीं भोजन करी.' देव सांगतात कीं तुमच्या या सर्व भोजनाला व भजनाला मी केवळ साक्षिभूत आहे–'येथ प्रतिफळे भावना । आपुलाली'- हें जाणूनच तो शुद्धभावनेनें सर्व कर्मे करीत असतो. पण 'हें कर्म मी करीन । अथवा आदरिलें सिद्धी नेईन' ह्या संकल्पानें त्याचें मन विटाळत नाहीं ( ४–१०४ ). त्याला देवावांचून कांहीं दिसत नाहीं. 'मग मीचि डोळां देखिला । जिहीं कानीं मीचि ऐकिला । मीचि मनीं भाविला । वानिला वाचा॥ सर्वांगीं सर्वांठायीं । मीचि नमस्कारिला जिहीं । दानपुण्यादिकें जें कांहीं । तें माझियाचि मोहरां ॥' (९–३५९,३६०) अशा एकनिष्ठ भक्तांसारखें त्याचें वर्तन असतें. त्याचा काम, त्याचा लोभ, त्याचा अहंकार तो देवाला वाहतो. त्याचें अध्ययन देवासाठींच असतें. वर्णविशेषानें भागा आलेलीं कर्में करीत असतांना 'विधीतें पाळित । निषेधातें गाळित । मज देउनि जाळित । कर्मफळें ॥ ७६ ॥ आणिकही जें जें सर्व । कायिक वाचिक मानसिक भाव । तयां मी वांचूनि धांव । आनौती नाहीं'. ( १२–८० ) स्वधर्माचरणानें असलें भगवत्प्रेम त्याचे ठायीं भरतें.

## १३ निरंहकारता.

वैराग्याच्या भूमिकेवर त्याच्या संसाराची उभारणी असते. ' नाराचांचीं ( बाणांचीं ) आंथरुणें । पूयपंकीं लोळणें ' तसें इह लोकोचे व स्वर्गीचे भोग समजणारा तो विरक्त होय. ' तें हें विषयवैराग्य । आत्मलाभाचें भाग्य । येणें ब्रह्मानंदा योग्य । होती जीव. ' वैराग्य तेथेंच ज्ञान व ज्ञानीं आत्मदर्शन असा वैराग्याचा व ज्ञानाचा संबंध आहे. वैराग्यांवाचून ज्ञान तगत नाहीं व ज्ञानाची बैठक स्थिर झाल्यावरच प्रपंच किंवा संसार बाधक होत नाहीं. ' वर्णाश्रम पोषकें । कर्मे नित्यनैमित्तिकें ' तो अचूक करितो, सचाडासारिखीं म्ह. संसाराची आवड असलेल्या माणसासारखीं आस्थेनें व हौसेनें करितो ' पारि हें मियां केलें । कीं माझेनि आदरिलें सिद्धी गेलें । ऐसें नाहीं ठेविलें । वासनेमाजी. ' त्याच्या कर्मांत, मनांत व बोलांत अहंकाराचा मागमूस लागत नाहीं. वायु सर्वत्र आहे तसा तो सर्वत्र असतो, सूर्य जगाला प्रकाश देऊन असंग व निरहंकार असतो, ऋतुकाळीं वृक्षांला फळें येतात पण ' आपण फळलों ' हें ते जाणत नाहींत, श्रुति सहज बोलते, गंगा निर्हेतुक वाहते, त्याप्रमाणें सर्व कर्मांत तो ' अवष्टंभहीन '– निरहंकार असतो.

(१३–५२१ते ५३० ).

## १४ नित्यनैमित्तिक कर्मे.

निरहंकार होत्साता नित्यनैमित्तिक स्वकर्मे करण्यांत मात्र तो कुचरपणा करीत नाहीं. ' प्रिय देवतालया । यात्रादिकें करावया ' त्याचे पाय उत्सुक असतात; देवाचें अंगण सुशोभित करण्यास, देवाच्या पूजोत्सवादि प्रसंगीं स्वतः उपचार पुरविण्यास व देवद्वारीं सर्व प्रकारची सेवा करण्यास त्याचे हात तत्पर असतात; देवाची मूर्ति किंवा लिंग पहातांच तो ' लोटिजे कां काठी । पडली जैसी ' तसा साष्टांग नमस्कार घालतो; शास्त्रोक्त आचरणांनीं व विनयादि गुणांनीं श्रेष्ठ अशा ब्राह्मणांची तो सेवा करितो; प्रवास, व्याधि व संकटें यांनीं त्रस्त झालेल्या जीवांना सुखी करण्यास तो झटतो; ' सकळ तीर्थांचिये धुरें । जियें कां मातापितरें '– सकल तीर्थांत श्रेष्ठ असे जे आईबाप त्यांची सेवा करण्यांत तो जीवाकडेही पहात नाहीं; स्वधर्माचरणानें बुद्धीचें मालिन्य घालवितो व ' वस्तु भूतमात्रीं नमिजे । परोपकारीं भजिजे । स्त्रीविषयीं नियमिजे । नांवेनांव ( क्षणक्षणी ) '–क्षणक्षणां सावध राहून इंद्रियदमन करितो. तो वायफळ बोलत नाहीं. कोणी कांहीं विचारलेंच तर पृच्छकाचा अविवेक नाहींसा होऊन त्याला आपल्या अनादि स्वरूपाची ओळख पटेल व त्याला त्याचें भाषण अमृताप्रमाणें गोड वाटेल असेंच बोलतो; एरव्हीं वेदाध्ययन किंवा नाम-

स्मरण– ‘ निगम का नाम ’ – यांत तो सर्वकाळ दंग असतो. त्याची जिव्हा म्हणजे जणुं एक वेदशाळाच वाटते. नामही ‘ शैव का वैष्णव ’–शिवाचें किंवा विष्णूचें म्ह. हरिहरांचें नामस्मरण त्याचें चालू असतें. ( अ० १७ ओवी २०२ ते २२३ ). ‘ स्वधर्मा–आंतौतें । जें जें मिळेल आपणयातें । तें तें दीजे बहुतें । सन्मानयोगें’ ( १७–२६६ ). वसतीं धवळारें (घरें) पाडून देव्हारें करणें, व्यवहारांत लोकांना नागवून अन्नसत्रें घालणें,घर मोडून मांडव उभारणें, बैल विकून गोठा बांधणें, कांहीं लोकांचे असले उद्योग हास्यास्पद आहेत ( १३–२३१ ते ३४ )–कर्मं चार प्रकारचीं आहेत:–काम्य व निषिद्ध हीं त्याज्य व नित्य आणि नैमित्तिक कर्में हीं करणीय. ‘ सायंप्रातर्मध्यान्हीं । जें करणीय प्रतिदिनीं ’ तें स्नानसंध्यापूजादि नित्यकर्म, व सूर्यचंद्रग्रहणादि पर्वकाळीं श्राद्धदानादि क्रिया, ‘ मातापितर मरणें । अंकित जे दिवस’ त्या दिवशीं श्राद्धपक्षादि पितृकार्य, तसेंच अतिथिसत्कारादि सर्व कर्में नैमित्तिक आहेत. निषिद्ध कर्में म्ह. शास्त्राविरुद्ध क्रिया. ती त्याज्य आहे. ज्ञानीभक्त नित्यनैमित्तिक कर्में अवश्यमेव करितो. कां कीं, नोलांडितां कर्मरेखा । चित्त दीजे नित्यनैमित्तिका ’ अशी शास्त्राची आज्ञा आहे. मात्र हीं कर्में तो फलाशा सोडून आपलें कर्तव्य म्हणून करीत असतो. ( १८–१०८ ते १२५ ). तो कठिण व्रतांचें आचरण करितो, तेणेंकरून देहबुद्धीचा उठाव होत नाहीं. ब्राह्मण पुरोहित बोलावून व जरा पलीकडच्या बाजूला स्त्रियादिकांना यथाधिकार बसवून यज्ञादिकर्में करितो. ज्याला जे सर्वोत्तम असे देवताधर्म भजनीय म्हणून सांगितले आहेत ते ते तो यथाशास्त्र करितो. ( १६ ओवी ९२ ते ९७ ).

## १५ भूतदया व परोपकार.

वृक्ष जसा फूल, फळ, छाया, मूळ, पत्र यांपैकीं कांहींतरी आपल्या आश्रयांस आलेल्या अतिथीस देऊन त्याचा सत्कार करितो, त्याप्रमाणें तो मनापासून धनापर्यंत ज्याचा ज्याचा थकल्या भागलेल्या अतिथीस उपयोग होईल तें तें देत असतो. ( १६–८६।८७ ) त्याचें सौजन्य अपार असतें. रोग्याचा रोग हटवींत व त्याची शक्ति कशी वाढेल या चिंतेनें आपपर न म्हणतां रोग्याला जपतो, चिखलांत रुतलेल्या गाईला ती धडधाकड न म्हणतां करुणेनें बाहेर काढतो, बुडत असलेला मनुष्य अंत्यज आहे कीं ब्राह्मण आहे हें न विचारतां त्याचा प्राण वांचवितो, कुलस्त्री पाप्यानें नग्न केली तर तिला नेसविल्यावांचून तिजकडे पाहत नाहीं-असाच हा अज्ञानामुळें, प्रमादामुळें, दुर्दैवामुळें लोकांत निंद्य ठरलेल्या पतितांकडे करुणार्द्रदृष्टीनें पाहतो व त्यांना सर्व प्रकारचें साह्य देऊन मनांतील शल्यें तीं ते विसरतील अशा ममतेनें वागून त्यांचा उद्धार करितो. सोज्वल दृष्टीनें व उदारमनानें त्यांच्य दोषांकडे पहातो

व दोषांचें दोषरूपत्व काढून टाकतो. 'जैसा पूजूनि देव, पाहिजे । पेखूनि शेता जाइजे । तोषौनि प्रसाद घेईजे । अतिथीचा ॥ १४८ ॥ तैसें आपुलेनि गुणें । पुढिलाचें उणें । फेडूनिया पाहणें । तयाकडे ॥ १४९ ॥' तो कोणाला वर्मे काढून टोंचत नाहीं, त्याच्या हातून तसलें पाप पुन्हां घडवून देत नाहीं व त्यांना बोंचेल अशा नांवानें हांका मारीत नाहीं. अशाप्रकारें सौजन्ययुक्त परोप-कारांत तो सदा सर्वकाळ निमग्न असतो. पायाला कांटा बोंचला कीं डोळ्यांला पाणी येतें, किंवा पायाची शीतळता डोळ्यांत उतरते त्याप्रमाणें तो दुसऱ्याच्या दुःखानें दुःखी व सुखानें सुखी होतो, व परोपकारांत मग्न असून तो अत्यंत निरपेक्ष व असंग असतो. ( १६ ओवी १४१–१६० ) यज्ञयागांत, आहा-रांत, तपाचरणांत, दानांत सर्व कर्मांत त्याचा अत्यंत सत्वस्थपणाच प्रगट असतो.

## १६ आनंदरूपता

आनंदः—स्वधर्माचरणानें भगवत्प्रेम जोडतां जोडतां ज्ञानलक्षणेंही त्यांच्या अंगीं उमटूं लागतात. सन्मानाची अनावड, दंभ नाहीं, कायावाचामनानें कोणाची हिंसा करीत नाहीं, क्षांति, आर्जव ह्म० सरळपणा, गुरुभक्ति, अंत-र्बाह्य शुचित्व, बुद्धीचा स्थिरपणा, आत्मविनिग्रह, ह्म० इंद्रियनिग्रह, विषय-वैराग्य, निरहंकार, जन्मापासून मरणापर्यंत प्रवाहरूपानें वाहणाऱ्या संसारांतील दुःखदोषांची आठवण, देहाविषयीं अनासक्ति, दारागृहपुत्रादिकांविषयीं निर्म-मत्व, परमेश्वराविषयीं अनन्यभक्ति, एकांतरति, अध्यात्मज्ञानाचें अनुसंधान व तत्वज्ञानरहस्यचिंतन हीं अठरा ज्ञान्याचीं लक्षणें भगवंतांनींच गीतेच्या १३ व्या अध्यायांत सांगितलीं आहेत. आत्मज्ञान मुरलेल्या पुरुषाचीं हीं लक्षणें आहेत. 'जयाचेनि उजाळें । उघडती बुद्धीचे डोळे । जीव दोंदावरी लोळे । आनंदाचिये ॥ ऐसें हें ज्ञान । पवित्रैक निधान.' वसंताचा आगम झाल्याबरो-बर वृक्षांना टवटवी येते, किंवा वृक्षाच्या मूळाला पाणी पोंचल्याचें शाखापल्ल-वांच्या प्रफुल्लितपणावरून स्पष्ट समजतें त्याप्रमाणें ज्ञान्याच्या अंतरांतील ज्ञानाची प्रभा त्याच्या तोंडावर, इंद्रियांवर, त्याच्या एकंदर आचरणावर पडल्या-शिवाय राहत नाहीं. 'दर्शनाचिये प्रशस्ती । पुण्यपुरुष.' आंत बुद्धीचे डोळे उघडलेला ह्म० यथार्थज्ञान झालेला पुरुष आनंदाच्या दोंदावर लोळलाच पाहिजे. अखंड व निर्विषय आनंद हा ज्ञानाचा परिपाक आहे. आनंद हे ज्ञानाचें फळ, ज्ञानाचें फळ रडवेपणा नाहीं. रडका व निरानंद पुरुष ज्ञानी नव्हे. ज्ञान्याच्या बोलण्याचालण्यांत, वागण्यांत, सर्व क्रियाकलापांत आनंदच भरलेला असतो. आनंद हा ज्ञानफळाचा परिमळ आहे. शुद्ध आनंद हें परमात्म्याचें स्वरूप आहे, अव्यक्तावरच व्यक्त प्रपंचाची उभारणी आहे. म्हणून ज्ञानानंद भोगणाऱ्या

पुरुषाचा संसारही आनंदरूपच असतो. आपल्या स्वानंदानें तो संसारही सुखरूप करून टाकतो, किंबहुना आत्मव्यतिरिक्त संसारच त्याला प्रतीत होत नाहीं, त्याचा संसार ब्रह्मरूप होतो. 'भिंगारीं दीप ठेविला । बाहेरि फांके' त्याप्रमाणें आंतला आनंद बाहेर फांकतो, आंतबाहेर तो आनंदमय होतो.

---

## भक्तमयूरकेकावली.

( मागील अंकावरून पुढें चालू )

लेखक—**के. भि. बापट, चिपळूण.**

रक्षोभीतीपासुनि गाधिजमख रक्षिला जसा राया !
हो सिद्ध तसा संकट मज दीनाचेंहि आज साराया ॥ ३४ ॥
राजन्रक्षोभीतेस्त्वमरक्षीः कौशिकाध्वरं यद्वत्
तद्वन्ममसंकटमपि हर्तुं सिद्धो भवाद्य दीनस्य ॥ ३४ ॥

---

दण्डकवन खळ मर्दुनि निर्भय केलें जसें प्रतापानें
गतभय हा शीघ्र करीं, जाला बहु विकळ विप्र तापानें ॥ ३५ ॥
खलमर्दनेन निर्भयमकारि दण्डकवनं प्रतापेन
कुरु मां तथाऽभयं द्राक् विप्रं विकलं प्रभूततापेन ॥ ३५ ॥

---

आलों म्हणुनि शरण तुज, सहज दयेचाचि पूर्ण सागर तूं
तुजविण कवणाठायीं तापोपशमार्थ आज सांग रतूं ! ॥ ३६ ॥
तच्छरणं त्वामायां सहजदयासलिलपूर्णसिन्धुस्त्वम्
अद्य विना त्वां तापोपशमार्थमहं भजेय कं ब्रूहि ॥ ३६ ॥

---

तूं माय बाप बन्धू धणी सुहृन्मित्र जानकीजाने !
करुनि दया विलयाला अतिसत्वर संकटास माझ्या ने ॥ ३७ ॥
स्वामी पितरौ भ्राता सुहृत्सखा त्वमसि जानकीजाने
विलयं नय मत्संकटमतिसत्वरमेहि कुरु कृपां दीने ॥ ३७ ॥

---

श्रीरामा ! सुखधामा ! पावननामा ! स्वभक्तविश्रामा !
कामारिगीतकीर्ते ! करुणामूर्ते ! नको त्यजूं आम्हां ॥ ३८ ॥
श्रीराम शर्मधामन् पावननामन् स्वभक्तविश्राम
कामारिगीतकीर्ते करुणामूर्ते जहाहि मा नस्त्वम् ॥ ३८ ॥

---

रामा ! धांव, रघुपते ! धांव, विभो ! धांव, राघवा ! धांव;
कौतुक काय पहासी आळवितां यापरी तुजें नांव ? ॥ ३९ ॥
भो राम राघवद्राक् एहि रघुपते विभो प्रभो तूर्णम्
प्रेम्णैवं तव नामा लपतः कुतुकं नु वीक्षसे किं त्वम् ॥ ३९ ॥

---

नांव तुझें नाव चि या संसारांभोधिला तरायासी
तें हृदयीं धरुनीही मी कां अद्यापि सांग आयासी ॥ ४० ॥
संसारांभोधिमिमं तरतस्तरणिस्तवास्ति नामैव
अद्यापि कथं क्लिष्टो धृत्वा हृदयेन वद विभो तदहम् ॥ ४० ॥

---

या दीनानें आतां पसरावा पदर सांग कोणाला ?
तूजा प्रताप बसला लपोन जाऊनि काय कोणाला ? ॥ ४१ ॥
वद दीनोऽयं संप्रति कं करुणं याचतामृते भवतः
गुप्तं तव प्रतापः कोणनिविष्टो नु यत्रकुत्रापि ॥ ४१ ॥

जरि दास परानें हा अपराधावीण दंडिला, राज्या !
हें अश्लाघ्यचि तुजला, नृपनीति तुम्ही मनीं विचारा ज्या ॥ ४२ ॥
राजंस्तव दासोऽयं परेण यदि दंडितो विनामन्तुम्
भृशमश्लाघ्यमिदं तव निजमनसि विचारयाद्यनृपनीतिम् ॥ ४२ ॥

---

तुज दीनबंधु म्हणती, म्हणउनि मी दीन मारितो हाका;
हा काय दीन लटिका, जे कां निजबंधुता तुम्हीं टाका ? ॥ ४३ ॥
त्वां दीनबंधुमाहुस्तस्माद्दीनो भवन्तमनुरौमि
किमलीक दीन एष स्वकीय बन्धुत्वमद्य यत्त्यजसि ॥ ४३ ॥

---

दीनास संकटीं जरि सहाय होशील योग्य हें तूतें;
आळस न करीं माज्या स्वरक्षणातें सुकीर्तिहेतूतें ॥ ४४ ॥
यदि संकटे सहायो दीनस्य भवेस्तदास्ति तव योग्यम्
आलस्यं मा कार्षीः सुकीर्तिहेतौ मदीय रक्षायाम् ॥ ४४ ॥

---

दीनानें किति सद्गुणहीनानें विनविलें तुला आजी,
बा ! जीवदान दे गा ! प्रभो ! उपेक्षा करूं नको माजी ॥ ४५ ॥
सद्गुणहीनो दीनस्त्वामद्य प्रार्थये कियत्कालम्
भो देहि जीवदानं मा मदुपेक्षां कुरु प्रभो सदय ॥ ४५ ॥

---

हृद्गत तुजला कळतें हृदयस्था राघवा! जगज्जनका!
जन काय तत्व जाणे! प्रभो! उपेक्षा करूंचि आज नका ॥ ४६ ॥
जानासि हृद्गतं मे राघव हृदयस्थ विश्वजनक त्वम्
लोकः किं तत्त्वज्ञः प्रभो कुरुष्वाद्य मा ममोपेक्षाम् ॥ ४६ ॥

---

सर्वां लाभांहुनि बहु लाभ असे त्वत्पदांबुरुहभजनीं,
मज नीतिज्ञा! भजतां संकट न पडो दिजेचि अशुभ जनीं ॥ ४७ ॥
त्वच्चरणकंजभजनेऽखिललाभापेक्षया गुरुर्लाभः
नीतिज्ञ संकटे मां पातय मा त्वां भजन्तमसदुत्थे ॥ ४७ ॥

---

अन्यायलेश नसतां गांजिति उद्वृत्त हें तुलाचि कळो;
किकळोनि सांगतों तुज या दुःखें न मन आमचें विकळो ॥ ४८ ॥
विदितं तवास्तु दुर्वृत्त्युद्वृत्ता मां विनापराधलवम्
क्रोशन्कथयामि त्वां दुःखमिदं विकलयतु न मच्चित्तम् ॥ ४८ ॥

---

कळिमाजि क्षुद्र नृप प्रजेसि देती धनार्थ बहु ताप,
पापप्रसक्त लोभी न पाहती धर्म माय कीं बाप ॥ ४९ ॥
क्षुद्रा नृपाः प्रजाभ्योऽतनुतापं धनकृते प्रददति कलौ
अघलोभासक्ता निज धर्मं पितरौ च ते न गणयन्ति ॥ ४९ ॥

---

तूं परि सर्वांचा पति शासनकर्ता उपेक्षिसी कां हें?
'साहें उगेंचि' म्हणसी, माझें बळ येथ काय तें पाहें? ॥ ५० ॥
त्वं तु पतिः सर्वेषां शास्ता चोपेक्षसे किमर्थमिदम्
'त्वमनाक्रोशमिदं सह' भणसि विजानीहि शक्ति विकलं माम् ॥ ५० ॥

---

खळ जे हे सत्पीडक त्यांची तुज काय राघवा! भीड?
त्वद्दास तव समक्षचि गांजिति, येणें कसी न ये चीड? ॥ ५१ ॥
सत्पीडकाः खला ये तेषां राघव तवास्ति का गणना
त्वद्दास मग्रतस्ते बाधन्ते तेन ते न किं कोपः ॥ ५१ ॥

---

सिंहासमक्ष त्याच्या बाळाला जाचितील जरि कोले
तरि मग अशास पंचानन मृगपति कोण जाणता बोले?॥५२॥
सिंहस्याग्रे यदि तच्छिशुं शृगालाः कदर्थयिष्यन्ति
तर्हीदृशं मृगपतिं पंचाननमाभिवदेद् बुधः को नु ॥ ५२ ॥

---

अपराधी सेवक तरि दंडावा स्वामिनेंचि, हें युक्त
उक्त श्रवण करुनियां करिं मजला संकटांतुनी मुक्त ॥ ५३ ॥
यदि सेवक आगस्कृत्तर्हि स तत्स्वामिनैव दंड्योऽस्ति
उक्तमिदं कुरु सुश्रुतमथ मुक्तं संकटाज्झटिति कुरु माम् ॥ ५३ ॥

---

श्रीरामचंद्र ! राघव ! रघुवीर ! असेंचि आळवीन तुला
संकट वारुनि घडवीं माझ्या हातूनि या महा क्रतुला ॥ ५४ ॥
श्रीरामचंद्र राघव रघुवीरेत्येवमालपामि त्वाम्
विषमं वारय, तारय घटय महाक्रतुमिमं मम करेण ॥ ५४ ॥

---

एकान्तीं त्वन्नामें गायिन मधुर स्वरें स्थिर स्वान्तें,
संकट वारुनि द्यावें हें मज वरदान जानकीकान्तें ॥ ५५ ॥
त्वन्नामान्येकान्ते स्थिरचेतः सुस्वरं च गास्यामि
रहसि निवार्य व्यसनं सीताधव मे तथा वरं वितर ॥ ५५ ॥

---

या संकटाबरोबर वारीं लोकेषणादि अनिवार्य,
म्हणजे हा दास तुजा जाला लोकत्रयांत कृतकार्य ॥ ५६ ॥
अमुना गहनेनसमं वारय लोकेषणाद्यमनिवार्यम्
तेनाहं तव दासः कृतकार्यः स्यां जगत्त्रये नूनम् ॥ ५६ ॥

---

अन्नाच्छादन देतें दुसरें बा ! कोण सांग विश्वास ?
म्हणताति ‘ आयुरन्नं प्रयच्छति’ प्राज्ञ तेथ विश्वास ॥ ५७ ॥
विश्वस्मैत्वत्तोऽन्योऽन्नाच्छादनमपि ददाति भो वद कः
भाषन्त आयुरन्नं प्रयच्छति ज्ञाश्च तत्र विश्वसिमि ॥ ५७ ॥

---

त्वद्गुणकीर्तन करितां लज्जा हे पापिणी धरू न गळा;
हे ताटकान्तका ! हा परमार्थ इणेंचि बुडविला सगळा ॥ ५८ ॥
त्वद्गुणकीर्तनसमये पापा लज्जा गलं न मम रुन्धाम्
हे ताटकान्तकाऽयं परमार्थो नाशितोऽनयाऽशेषः ॥ ५८ ॥

---

तुजला धरीन हृदयीं म्हणजे लज्जा पळेलसें वाटे,
दाटेल प्रेम तयीं शमेल ते ताटका तसी वाटे ॥ ५९ ॥

हृदये तव धारणया मन्ये लज्जा पलायनं कुर्यात्
प्रेम्णोपचिते तस्मिन् पथि सन्तिष्ठेत ताटकेवासौ ॥ ५९ ॥

खळ हांसतील तेंही सोसाया सहनशीलता द्यावी;
लावीन मस्तक तुझ्या पदीं, तुजी भक्ति आत्मविद्या वी ॥ ६० ॥
देहि सहिष्णुत्वं मे सहितुं खलजनकृतोपहासं च
शीर्षं त्वच्चरणनतं कुर्यां, भक्तिस्तवात्म-विद्या-सूः ॥ ६० ॥

त्वद्गुणकीर्तन करितां स्तंभादिक अष्टभाव उपजावे,
जावे अनात्मधर्म क्रोधादि मनोविकार वरजावे ॥ ६१ ॥
त्वद्गुणकीर्तनसमये भावाः स्तंभादयोऽष्ट जायन्ताम्
अपयन्त्वनात्मधर्माः क्रोधाद्या मानसा विकाराश्च ॥ ६१ ॥

हा काम रामराया ! पुरवावा, कल्पवृक्ष तूं साचा;
ज्ञाता सर्वगत प्रभु आत्मा प्रिय निर्निमित्त दासाचा ॥ ६२ ॥
भो रामराज पूरय काममिमं कल्पभूरुहस्त्वमसि
ज्ञाता सर्वगतः प्रभुरात्माऽहेतुप्रियश्च दासस्य ॥ ६२ ॥

मन हेंचि फार इच्छी कीं आतां सेवणें तुजे पाय,
तुजवांचुनि इतरांच्या भजनीं मजलागि होय फळ काय ? ॥ ६३ ॥
बलवानभिलाषो मे संप्रति तव पादसेवने मनसः
त्वत्तोऽन्यभजनतो मां किं खलु फलमुपनमेद्रघूत्तंस ॥ ६३ ॥

केले म्यां मनुजांचे आर्जव बहु चाटुकारही जालों
परि तेथ ताप पावुनि पुनरपि तुजलागिं शरण मीं आलों ॥ ६४ ॥
लघुतांगीकारेणाऽकारि मया चाटु बहु मनुष्याणाम्
तत्राप्युपेत्य तापं पुनरपि शरणं भवन्तमहमागाम् ॥ ६४ ॥

प्रमदांत पावुनीयां श्रम दांत क्षुद्र विचकती कीं जे
त्यांची तशाच लोकीं सेवा, तुजला न जाणतां, कीजे ॥ ६५ ॥
प्रमदासु श्रान्त्वा ये क्षुद्रा रदनावलिं विवृण्वन्ति
त्वामनवगत्य तेषां सेवा तादृग्जनेष्वकार्षमहम् ॥ ६५ ॥

दुर्व्यसनी धर्मरहित निरक्षर क्षुद्र त्यांसि मीं नमनें

करुनि श्रमीच जालों, आलों तुज शरण आज दीनमनें ॥ ६६ ॥
क्षुद्रान्निरक्षरान् दुर्व्यसनान्नत्वा स्वधर्महीनांश्च
खिन्नोऽहमद्य राघव शरणं त्वां दीनचेतसाऽ यातः ॥ ६६ ॥

---

रामा ! शत्रुभ्राता आला तुज शरण त्यासि राज्यपद
लंकेचें अर्पियलें, कोण न वंदील तें तुजेंचि पद ? ॥ ६७ ॥
रामाऽरातिभ्राता शरणं त्वामाययौ यदा दत्तम्
लंकाराज्यं तस्मै, कस्तत्तावकपदं न वन्देत ॥ ६७ ॥

---

शरण तरी तुज यावें, नमन करावें तुलाचि सुज्ञानें,
गावे तुजेचि गुण बा ! सेवावें तुजचि मादृगज्ञानें ॥ ६८ ॥
त्वं शरणमुपैतव्यस्त्वमेव नम्यः सदैव सुज्ञेन
तावक गुणाश्चगेयास्त्वमेव सेव्योऽसि मादृशाज्ञेन ॥ ६८ ॥

---

म्हणवुनि तुमचें नामाचि राम असें हें मुखीं सदा राहो;
हा ज्ञानहीन दीन प्रसन्न होवूनि शीघ्र तारा हो ! ॥ ६९ ॥
तस्माद्राम इति त्वन्नामैव मुखं सदा ममावसतु
त्वमिमं ज्ञानविहीनं दीनं शीघ्रं प्रसीद तारय भोः ॥ ६९ ॥

---

प्रभुजी ! तुमचें सज्जन उदारपण वर्णितात बहुसाल,
सालसता मत्त्राणीं धरितां, शब्दांत सर्व गवसाल ॥ ७० ॥
तव वर्णयन्ति बहुधा प्रभविष्णो सज्जना वदान्यत्वम्
आलस्यं तनुषे चेत्त्राणे मे वचनतः प्रमत्तः स्याः ॥ ७० ॥

---

आळचि घेवुनि मी शिशु आळवितों निष्ठुरत्व दुर वाळीं;
आळ निवारुनि मातें, आळस टाकूनि धांव, कुरवाळीं ॥ ७१ ॥
एषोऽभिलाषुकतया त्वानुनये शिशुरपास्य निर्दयताम्
सादरमुपेहि शीघ्रं लालय मां दोषमेनमपहृत्य ॥ ७१ ॥

---

पाळक तूं विश्वाचा, बाळकसा तोंड पसरितों बा ! मीं,
व्याळ कराळ कठिनतर काळ कसा वारिसी न हा स्वामी ! ॥ ७२ ॥
विश्वस्य पालकस्त्वं बालकवदहं प्रसारयामि मुखम्
कालं व्यालकरालं कठिनतरं वारयसि कथं नेश ॥ ७२ ॥

---

तूं करुणाघन रामा ! मी चातक पसरिलें असें आस्य;
नामामृतकण न मिळे तरि लोकीं फार होतसे हास्य ॥ ७३ ॥
करुणाम्बुदोऽसि राम त्वं, चातक एष निजमुखं तनुते
यदि नामामृतकणमपि न लभेत, जनोपहास्यतां यायात् ॥ ७३ ॥

---

विश्वैकमान्य दशरथ, कौसल्या वीरसू सती धन्या
तत्पुत्र तूं रघुपते ! उपमा तुजला तुजी, नसे अन्या ॥ ७४ ॥
विश्वैकमान्य आसीत्पंक्तिरथो वीरसूश्च कौसल्या
धन्या सती, तदीयः पुत्रस्त्वं रघुपते त्वदुपमस्त्वम् ॥ ७४ ॥

---

ज्ञाता तूं, दाता तूं, त्राता तूं, वीरधीरभर्ता तूं;
जनपीडाहर्ता तूं श्रीरामा ! मुख्य विश्वकर्ता तूं ॥ ७५ ॥
ज्ञाता, दाता, त्राता, धीरो वीरस्त्वमेव भर्ता च
मुख्योसि विश्वकर्ता श्रीराम जनस्य दुःखहर्तापि ॥ ७५ ॥

---

ब्राम्हणरक्षणसक्षण दाक्षिण अक्षीणसद्यशोधाम,
जलदश्यामल कोमळ कलिमलहर हरमनोज्ञ रघुराम ॥ ७६ ॥
ब्राह्मणरक्षणसक्षण दाक्षिण हेऽक्षीणसद्यशोधामन्
जलदश्यामल कोमल कलिमलहर हर-मनोज्ञ रघुराम ॥ ७६ ॥

---

सुरवर-मुनिवर नृपवरनुतगुणगण वरद परमसुखसदन;
त्रिभुवनसमवनपटुभुज भवदवभयशमन रुचिरतरवदन ॥ ७७ ॥
सुरवरमुनिवरनृपवरनुतगुणगण वरद परम सुखसदन
त्रिभुवनसमवनपटुभुज भवदवभयशमन रुचिरतरवदन ॥ ७७ ॥

---

ऐसें गायिन तुजला, हा माजा काम पूरवीं वरदा !
हर दासाचें संकट रामा ! भवसिन्धुमग्नजनकरदा ! ॥ ७८ ॥
एवं त्वामभिधास्ये काममिमं पूरयस्व वरद मम
त्वं राम दाससंकटमपहर भवसिन्धुमग्नजनकरद ॥ ७८ ॥

---

स्तुति करुनि तुजी तुजला आम्ही अज्ञान काय बा ! रिझवूं ?
गावुनि अमृतगुणांतें हृदयींचे ताप आपुले विझवूं ॥ ७९ ॥
कृत्वा स्तुतिं त्वदीयां कथं खलु त्वां विनोदयिष्यामि
गीत्वाऽमृतमधुरगुणान् निजहृत्तापं प्रशामयिष्यामि ॥ ७९ ॥

---

शेषप्राचेतसमुनि पराशर व्यास नारदर्षिशुकीं
गातां गुण पार नसे, यांच्या येईल कोण अन्य तुकीं ? ॥ ८० ॥
व्यासप्राचेतसशुकपराशरब्रह्मतनयशेषाद्याः
तव गुणपारं न ययुः कोऽन्यस्तैः सह तुलां समारोहेत् ॥ ८० ॥

---

परि भावें गुण गातां प्रसन्न होतोस तूं असें ठावें
जालें सज्जनसंगें प्रेम कसें तें मनांत सांठावें ? ॥ ८१ ॥
तवगुणगानरतस्य त्वं भावेन प्रसीदसीति मया
ज्ञातं सज्जनसंगाद्धृदि मे त्वत्प्रेम ऋद्धिमुपयायात् ॥ ८१ ॥

---

शाहणपणें न रिझसी मूर्खपणें न खिजसी, भले म्हणती;
प्रेमळ भलताहि असो, करिसी त्याची स्वसेवकीं गणती. ॥ ८२ ॥
विद्वत्तया न तुष्यसि मौर्ख्येण न खिद्यसे सतामुक्तिः
यःकोऽपि प्रेमपरस्तं निजसेवकगणे समाहरसि ॥ ८२ ॥

---

होसी प्रसन्न भावें, देसी सर्वस्व आपुलें भजकां,
सत्संगीं बसतों मी, न कळे इतुकेंहि राघवा ! मज कां ? ॥ ८३ ॥
भजकेभ्यः सर्वस्वं ददासि भावेन तुष्यसि च तेषाम् ।
सत्संगमे स्थितोऽहं राघव कलयामि नैतदपि कस्मात् ॥ ८३ ॥

---

संतांच्या वदनें मीं आयिकिलीं बा ! तुजीं जयीं चरितें
त्यजुनि विषय मन केलें भरावया गुणसुधा तयींच रितें ॥ ८४ ॥
सद्वदनाद्यदवधि तव चरितानि मया श्रुतानि तदवधि भोः
गुणसुधया पूरयितुं चित्तं रिक्तं कृतं विषयहानात् ॥ ८४ ॥

---

साकेतपते ! रामा ! नाकेशनुता ! त्वदीय गुण गातां
हाकेसरिसा येवुनि हा केवळ दीन उद्धरीं आतां ॥ ८५ ॥
साकेतपते राम त्रिदिवेशनुत त्वदीय गुणगाने
आमंत्रितमात्रस्त्वं दीनमिदानीं समुद्धरागम्य ॥ ८५ ॥

---

चापशरधरा धीरा आपद्ग्रस्तासि मज नको विसरूं
या परम संकटीं मी बा ! पदर तुजापुढें किती पसरूं ? ॥ ८६ ॥
धीरापद्ग्रस्तं मां मा विस्मर चापशरधर–श्रेष्ठ
मम परमसंकटेऽस्मिन् कुर्यामभ्यर्थनां कियत्कालम् ॥ ८६ ॥

---

आधार तूं जनाचा, बाधा हरणार एक तूं दक्ष
साधावया यशातें बा ! धांव, तुला नमस्कृती लक्ष. ॥ ८७ ॥
आधारोऽसि जनानां त्वं बाधानोदनैक–दक्षोऽसि
यशसे शीघ्रमुपेहि, प्रणामलक्षं समर्पितं तुभ्यम् ॥ ८७ ॥

---

# जोगा परमानंद

१ जोगा हें याचें नांव व परमानंद हें त्याच्या गुरूचें नांव. हा जातीनें तेली होता असें म्हणतात. याची कविता थोडी आहे, तरी आहे ती फारच प्रेमळ असून आणखी उपलब्ध होईल तर बरें. असें वाटतें. हा बार्शीस राहत असे. बार्शीस भगवानाचें मंदिर आहे. अंबरीष राजाची कथा पुराणप्रसिद्ध आहे. त्याचें एकादशीचें व्रत कडक होतें. द्वादशीस तो पारणें सोडी. यावरून द्वादशी–बारस–बार्शी असें नांव पडलें. अंबरीषाचा दुर्वासानें छळ केला तेव्हां भगवान् त्याच्या साह्यार्थ धांवले. ते भगवान् बारशीस आहेत. कांहीं वारकरी पंढरीची यात्रा करून बारशीस भगवानाचे दर्शनास थांबतात. जोगा भगवानाचें दर्शनास जातांना रोज गीतेचा एक श्लोक म्हणून नमस्कार घाली व असे नमस्कार घालीत देवदर्शनास जात असे. एका भाविकानें त्याच्या अंगाला खडे टोचूं नयेत म्हणून त्याला पीतांबर नेसविला. पीतांबर नेसविल्यावर तो मळूं नये म्हणून जोगा नमस्कार जपून घालूं लागला. अधिक वेळ लागल्यामुळें मंदिरांतली आरती संपून गेली. जोगास वाईट वाटलें. हा पीतांबर देवाच्या भजनाच्या आड आला म्हणून त्यानें तो पीतांबर फाडून टाकला. देवाला गरीबी आवडते, श्रीमंती आवडत नाहीं. श्रीमंती प्रायः परमार्थाला विघ्न करते म्हणून भक्तजन तिची इच्छा करीत नाहींत. जोगा हा पंढरीनाथाचा प्रेमळ भक्त होता व पंढरीच्या प्रसंगानें जो सत्संग घडे त्याची याला अत्यंत प्रीति होती. ‘ रोमांच रवरवितु स्वेदबिंदु डळमळितु । पाहतां नेत्र उन्मीळितु ’ अशा अवस्थेंत अष्ट सात्त्विक भाव देहीं उमटून ‘ प्रेमभरित अंतःकरणांत दैव प्रगटावा ’ असें याचें देवापाशीं मागणें आहे. ‘ राया विठोबाचे डिंगर प्रेमें बोधले डुलती ’ असे प्रत्यक्ष ‘ सच्चिदानंदाचिया मूर्ति ’ आहेत, संत हे ‘ माझें माहेर ’ आहे, असें यांनीं म्हटलें आहे तें सर्वकालीन सत्यच आहे.

‘ भक्ती हे घोंगडी पांघरलों फुडी । उतरलों थडी भवनदीची ’ याप्रमाणें आपण भवपार झालों याचा संतोष जोगांनीं व्यक्त केला आहे.

( २ ) हृदयीं प्रगटला साकार । जो लावण्यगुणसागर ।
परमानंदें वाहे पूर । तेणें गहिंवर न संवरे ॥ १ ॥

प्रेमें पाझरती लोचन । पाहतां जगजीवन ॥ ध्रु० ॥
मेघश्याम पाहतां आपेआप । डोळ्यां लागले वडप (वृष्टि, धारा)॥
अष्टही सात्विकांचें रोप । हृदय आळां उगवलें ॥ २ ॥
भक्तिभावें वोल्हावलें । प्रेमफळासी पै आलें ।
नवविधा हें पिकलें । परमानंद म्हणे जोगा ॥ ३ ॥

( ३ ) वाचा लोधावली गुणां । स्वरूपीं राहिले लोचन ।
चरणीं स्थिरावलें मन । जगजीवन देखिलियां ॥ १ ॥
तो म्यां देखिला देखिला । विठ्ठल पंढरीचा राणा ॥ ध्रु० ॥
भानुबिंबें अति सुढाळ । मनमंडित वक्षस्थळ ।
चरणीं तेजाचे झळाळ । मुगुटीं किरणें फांकती ॥ २ ॥
ऐसा नयनीं देखिला । तो मज असुमाई जाला ।
जोगा विनवितो विठ्ठला । वोसंडला परमानंदु ॥ ३ ॥

जोगा परमानंदाच्या हृदयांत ज्यांच्या संगतीं देव भेटतो त्या संतांविषयीं असेंच उत्कट प्रेम भरलेलें असे. ' राया विठोबाचे डिंगर । प्रेमें बोधले डुलती' असे संत हे प्रत्यक्ष ' सच्चिदानंदाच्या मूर्ति ' आहेत, हें ' माझें माहेर ' आहे. संतमाउली कशी ?

आसलेन देहें वेगळाले । सदा हृदयीं निवाले ।
देशकाळातें विसरले । ते संतमाउली ॥ २ ॥

देहांत असून ' देहाहून वेगळे, चित्तीं शमसुख भोगणारे व देशकाल विसरून हरिरूपीं समरस झालेले–ते संत. आणखी त्यांचें बोलणेंचालणें कसें ?' चंदना आंगीचा परिमळ बाहेर पडून जवळच्या निर्जीव काष्ठाच्या हृदयीं रिघतो-' ऐसी जयाचें बोलणें आहे । तयाची मज दाखवा सोयें ' ( चालरीत, संगती) म्ह० संगतीच्या जड मनुष्यालाही पाझर फोडण्यासारखें ज्याचें भाषण आहे त्याची मला संगत घडवा. ज्याचें भाषण म्हणजे ' परिपाकच '–फोल नव्हे, मुरलेलें, अनुभविक; श्रवणद्वारां अमृतरूपच आंत शिरतें व ' वोसंडोनि मग बाहेरि निघे '–सात्विक रोमांचाश्रुद्वारां उचंबळून बाहेर पडतें, जें श्रोत्यांना विवेकसुख देतें व सुबुद्धि उत्पन्न करितें–असा संत–नामभेदामुळें त्याला संत म्हणायचें एरवीं तो प्रत्यक्ष परमानंद ( परमात्मा )च–' तयाची मज दाखवा सोये !'. संतांच्या संगतीची आवड व संतांची एवढी ओळखण ज्याला आहे त्याला काय संत भेटणार नाहीं ? जो अंगानें संत झाला त्याला संतभेट अवघड नाहीं.

( ४ ) मन निवालें निवालें । कैसें समाधान जालें ॥ ध्रु० ॥
संत आलिया अवसरीं । नवल आरतियांची परी ।

आनंदले नरनारी । परमानंद प्रगटले ।। १ ।।
द्यावया आलिंगन । बाह्यां येतसे स्फुरण ।
सजळ जाले लोचन । जैसे मेघ वरुषती ।। २ ।।
आजी सुदीन सोहळा । संत जीवनाची कळा ।
जोगा विनवितो सकळां । भेटी परमानंदेसी ।। ३ ।।

संतभेटीचा असा निर्विकल्प आनंद जेथें आहे तेथेंच संतपण असतें. जोगांची कविता अशी प्रेमरसानें आर्द्र झालेली आहे. जोगा परमानंदांची समाधी बारशीस असून तेथें मार्गशीर्ष वद्य ४ स त्यांच्या पुण्यतिथीचा मोठा उत्सव होतो.

( ५ ) जोगा परमानंदांचे गुरगुडीवर एक मार्मिक पद आहे तें पुढें देतों:—

बैसुनि संतांवरीं हो । घेतलि गुरुगुडी ( गोडी ) हो ।। ध्रु० ।।
आधीं ब्रह्मांड नारळ । मेरु सत्व तो अढळ ।
निर्मळ सत्रावीचें जळ । सोहं गुरुगुडी हो ।। १ ।।
चिलीम त्रिगुण त्रिविध । मीपण खडा तो अभेद ।
तमतमाखु जाळुनि शुद्ध । वैराग्यविंगळ धडधडी हो ।। २ ।।
सावधान लावुनि नळी । मीपण झुरका त्रिरळा गिळी ।
जन्ममरण मुरकुंडि सांभाळीं । विषयधूर सोडी हो ।। ३ ।।
लागला गुरुगुडीचा छंद । त्याला प्रसन्न परमानंद ।
जोगास्वामी तो अभंग । गुरुचरण न सोडी हो ।। ४ ।।

आमचे सन्मान्य व योगानुभवी मित्र त्र्यंबकशास्त्री खरे यांनीं आमचे विनंतीवरून वरील पदाचा अर्थ लिहून पाठविला आहे तोच आमचे वाचकांसाठीं आम्ही पुढें देत आहोंत:—

## गुरगुडीचा अर्थ.

संतांच्या घरीं बसून म्हणजे कबीरका घर त्रिकुटी भृकुटीमध्यांत म्हणजे आज्ञाचक्रांत तसहेमाप्रमाणें परमात्मरूप आहे. त्या प्रकाशरूपाचेवर त्रिकूट चक्र आहे. ह्या त्रिकूटाचलावर जहां सलसले सैल अशा संतांचे घरीं बसून मी गुरगुडी म्हणजे गुरूगोडी घेत बसलों आहें. या गुरुगोडीचा रसास्वाद घेत असतां प्रथम सहस्रार कमलरूप ब्रह्मांड हाच त्या गुरगुडी ( गुरुगोडी ) चा नारळ होय. आतां ह्या सहस्रार कमलरूप नारळाची दांडी म्हणजे मेरुदंड होय, ज्याला पृष्ठवंश असेंही म्हणतात. वरील त्रिकूटशिखरावरून सत्राव्या जीवनकलेचें उदक प्राप्त होऊन योगी इच्छामरणी होतात. चंद्र जसा एकेक कलेनें वाढत जातो, त्याप्रमाणें जीवचंद्राच्या जन्मापर्यंत सोळा कळा होतात त्या अशा:— १ आकाश २ वायु ३ अग्नि ४ आप ५ ओषधी

६ अन्न ७ रेत. व रेत मातेच्या उदरांत नऊ महिनेपर्यंत नऊ कलांनीं वाढत जातें व याप्रमाणें १६ सोळा कळांचा पूर्ण जीवचंद्र उदयाला येतो व अशा या जीवाचे गुरुकृपेनें अगर योगमार्गांतील खेचरी मुद्रेनें बाहेरचे श्वास बंद होऊन भ्रूमध्यापासून हृदयापर्यंत श्वास चालतात. श्वास बाहेर न गेल्यानें प्राणगतीचा रोध होतो. व अशावेळीं जिव्हा भ्रूमध्याचे जवळ गेल्यामुळें पडजिभेजवळ आंतील चित्रिणीपासून निघालेले अमृत परस्पर उदरांत जातें. बाह्य श्वासोच्छ्वास बंद होत असल्यानें जीवनक्षय होत नाहीं. अशा प्रकारची जीवनकला योग्यांना साध्य झाल्यानें ते इच्छामरणी होऊन जातात. आज्ञाचक्रांत सोहंरूपी गुरगोडीचा म्हणजे गुरगुडीचा आस्वाद प्राप्त होतो. परंतु त्या आस्वादाचा अनुभव त्यावरील पदावर म्हणजे त्रिकुट-शिखरावर गेल्याखेरीज सांगतां येणें शक्य नाहीं. सोहं म्हणजे अजपा गायत्री. ह्या अजपाजपगायत्रीचा अनुभव दोन प्रकारचा आहे. उर्ध्वस्रोता वै देवाः अधोस्रोतावै जीवाः. एक अधोस्रोत व एक उर्ध्वस्रोत. हंसः हा उर्ध्वस्रोत म्हणजे देवमार्ग व सोहं हा अधोस्रोत म्हणजे जीवमार्ग. सोहं ह्या मार्गानें मूलाधार स्वाधिष्ठान मणिपूर अनाहत विशुद्धि व आज्ञा ह्या क्रमानें जीव येतो व त्या क्रमांत मूलाधारांत व, श, ष, स हीं ४ बीजें येतात. स्वाधिष्ठानांत वपासून लंपर्यंत ६ बीजें, मणिपूरांत ड, पासून भपर्यंत १० बीजें, अनाहतचक्रांत कपासून ठपर्यंत १२ बीजें येतात व विशुद्धिचक्रांत सर्व १६ स्वर अशीं सोळा बीजें येतात. त्या त्या चक्रांतील ऋषि, देवताजप, वर्ण लिहि-ल्यास विस्तार होईल सबब लिहीत नाहीं. आतां आज्ञाचक्रांत सोऽहं अशीं दोन बीजें. हा जीवाचा मार्ग झाला. आतां ऊर्ध्वस्रोत असलेला देवमार्ग. ह्या मार्गांत स्वाधिष्ठानचक्रांत अ आ इ ई अशीं चार बीजें. याप्रमाणें क्रमा-क्रमानें ६, १०, १२, १६ असे वर्ण वांटले तर विशुद्धिचक्रांत थपासून सपर्यंत सोळा बीजें येऊन आज्ञाचक्रांत त्याच क्रमानें सबीजाचे पुढें ह आणि क्ष (हंस) अशीं बीजें येतात. सोऽहं हा उच्चार श्वास आंत घेऊन होणार तो उच्चार करणें सोपें. सोऽहं प्रथम व मग हंस असा उच्चार होतो. परंतु हंस असा उच्चार करण्यास श्वास पहिल्यानें बाहेर टाकावा लागतो. ती क्रिया कठीण आहे.

वरील दोन मार्गांपैकीं अधोस्रोत हा मार्ग कांहीं ठिकाणीं पहाण्यांत येतो. परंतु उर्ध्वस्रोतावै देवाः हा देवमार्ग अद्यापही गुप्तच आहे. केवळ सोहं याचें स्पष्टी-करणाकरितां इतके लिहावें लागलें. आतां ह्या गुरगुडीचा दांडा म्हणजे मेरू-दंड अगर पृष्ठवंश होय. ह्या मेरूदंडाला संलग्न झालेलीं वर उल्लेखिलेलीं षट्-चक्रें आहेत. मूलाधार चक्र गुदद्वाराचे समोर मेरूदंडास लागून

आहे. यापुढें आणखीं दोन चक्रें आहेत. परंतु त्यांची माहिती गुप्त ठेवण्यांत आली आहे. तिसरे चक्राचें नांव अग्निचक्र म्हणून आहे. हें अग्निचक्र म्हणजे अग्निप्रदीप्त असलेली चिलीम होय. हें अग्निचक्र त्रिकोणात्मक आहे. म्हणजे त्रिगुणात्मक व तीन प्रकारचें आहे. आतां ह्या त्रिकोणात्मक अग्निचक्रांत मीपणाचा खडा ठेवला आहे. हा मीपणाचा खडा म्हणजे स्वयंभु लिंग होय. ह्या त्रिकोणात्मक अग्निचक्रांत तम म्हणजे अंधकाररूपी तमाखू असतें. तिला वैराग्यानें व अभ्यासानें पुन्हांपुन्हां प्रयत्नानें कुंडलिनी जागृत करून सहस्त्रार चक्रांतून सहस्त्रांशुपेक्षांही प्रखर असा अग्नि उद्दीपित केला म्हणजे तें अग्निचक्र प्रदीप्त होतें. आतां या गुरगुडीला नळी पाहिजे ती म्हणजे नासिका रंध्रें हीच ती नळी होय. ह्या नळींतून झुरका घेत असतां कांहीं लोकांची मुरकुंडी वळते. ती मुरकुंडी म्हणजे जन्ममरण ही होय. हा मीपणरूपी झुरका घेतांना तो गिळूं नये व जन्ममरणरूपी मुरकुंडीतून मुक्त व्हावें. तसेंच धूर सोडावयाचा तो पंच विषय हाच धूर सोडवा. अशा गुरगुडीचा (गुरूगोडीचा) ज्याला छंद लागेल त्याला परमेश्वर प्रसन्न होईल जोगाचा गुरुस्वामी परमानंद हा अभंग असल्यामुळें जोगा हा आपल्या गुरूचें चरण सोडीत नाहीं व सदासर्वकाळ आत्मानंदांत निमग्न होऊन रहातो. आत्मप्रकाशाच्या आनंदांत संत बोलतात, म्हणून संतांस प्रेमपाझर फुटल्यास ते रोकडें ब्रह्माची प्रचीती आणून देतात. नुसतें ब्रह्म माया शबलब्रह्म दैवीमाया, परोक्षानुभूति यांच्या वादांत लक्ष घालीत नाहींत. संतांचे शब्द गोड खरेच. परंतु त्या शब्दांचा झरा जेथून फुटतो, तें स्वरूप त्यांहूनही गोड. ही गोडी, संतसमागमानेंच मिळणार आहे. म्हणून जोगा संतांचे घरींच रहाण्याची इच्छा करितो इतकेंच या पदाचें सार आहे.

---

# स्तोत्रमणिमाला.

## शिवमानसपूजा.

१ सगुण मूर्तीची सर्व गंधपुष्पादि उपचारांनीं पूजा करणें. २ नामजप व स्तोत्रपाठ करणें, ३ मानसपूजा करणें. ४ परब्रह्माशीं ऐक्यभावना करून त्या आनंदांत निमग्न होणें, या एकाहून एक उच्च प्रतीच्या आध्यात्मिक स्थिति आहेत. ब्रह्मानंदस्थिति प्राप्त होणें अत्यंत दुर्घट आहे. ज्यांना तें भाग्य लाभलें नाहीं, त्यांनीं यथाशक्ति पहिल्या तीन साधनांत काळ घालवावा. श्रद्धा आणि भक्ति यांनीं युक्त होऊन सगुणोपासनेचे सर्व उपचार मनामध्यें कल्पना करूनच आपल्या उपास्यदेवतेस अर्पण करणें. व आपल्या हृत्कमलामध्यें अधिष्टित अशा परमात्म्याचें आपला देह अधिष्ठान आहे अशी भावना अनुभवणें, व आपण क्षणोक्षणीं ज्या ज्या शारीरिक क्रिया करितों त्या त्या परमात्मपूजे-

मध्येंच पर्यवसान पावतात असा निश्चय मनांत बाणणें, हें मानसपूजेचें स्वरूप आहे. पुढील स्तोत्र या कामीं उपासकांना फार उपयोगीं पडण्यासारखें आहे. त्याचा कर्ता कोण याची माहिती उपलब्ध नाहीं. परंतु तें फार प्राचीन व मनोहर आहे यांत शंका नाहीं.

१

**रत्नैः कल्पित मासनं हिमजलैःस्नानं च दिव्यांबरम्**
**नानारत्नविभूषितं मृगमदामोदांकितं चंदनम् ॥**
**जातीचंपकबिल्वपत्ररचितं पुष्पंच धूपं तथा ।**
**दीपं देव दयानिधे पशुपते हृत्कल्पितं गृह्यताम् ॥**

अर्थः--रत्नांनीं युक्त असें आसन, शीतलजलांनीं स्नान; उत्तम वस्त्र; अनेक प्रकारच्या रत्नांचे अलंकार; कस्तूरीच्या परिमलानें युक्त असें गंध; जाई, चांफा वगैरे फुलें व बिल्वपत्रें, धूप, दीप, हे सर्व उपचार, हे दयानिधि शंकरा, मी मनानें अर्पण करितों; त्यांचा स्वीकार करा.

२

**सौवर्णे नवरत्नखंडरचिते पात्रे घृतं पायसं**
**भक्ष्यं पंचविधं पयोदधियुतं रंभाफलं पानकम् ।**
**शाकानामयुतं जलं रुचिकरं, कर्पूरखंडोज्ज्वलं**
**तांबूलं मनसा मया विरचितं भक्त्या प्रभो स्वीकुरु ॥**

अर्थ--तूप, खीर, भक्ष्यभोज्यादि पांच प्रकारचें अन्न, दूधदह्यांनीं युक्त अशी केळीं ( कोशिंबीर ), पन्हें, अनेक प्रकारच्या भाज्या, रुचिकर असें पाणी व कर्पूरखंडांनीं युक्त असा तांबूल हे माझ्या मनांत निर्मित केलेले पदार्थ नवरत्नांनीं खचित अशा सुवर्ण पात्रांत ठेवून मी भक्तीनें अर्पण करीत आहे. हे प्रभो, त्यांचा स्वीकार करा.

३

**छत्रं चामरयोर्युगं व्यजनकं चादर्शकं निर्मलं**
**वीणाभेरिमृदंगकाहलकलागीतं च नृत्यं तथा ।**
**साष्टांगं प्रणतिः स्तुतिर्बहुविधा ह्येतत्समस्तं मया**
**संकल्पेन समर्पितं तव विभो पूजां गृहाण प्रभो ॥**

अर्थः—छत्र, दोन चवऱ्या, पंखा, स्वच्छ आरसा, वीणा, नौबत, मृदंग, तबला वगैरेंनीं युक्त असें संगीत; नृत्य; साष्टांग नमस्कार; अनेक स्तोत्रें; हे सर्व पूजोपचार मी आपल्या मनानें तुम्हांस समर्पण केले आहेत. तेव्हां, हे सर्व-व्यापी व सर्व शक्तिमान् शंकरा, ही माझी पूजा स्वीकृत करा.

४

**आत्मा त्वं, गिरिजा मतिः, सहचराः प्राणाः, शरीरं गृहं,**
**पूजा ते विषयोपभोगरचना, निद्रा समाधिस्थितिः**
**संचारः पदयोः प्रदक्षिणविधिः, स्तोत्राणि सर्वा गिरो**
**यद्यत्कर्म करोमि तत्तदखिलं शंभो तवाराधनम् ॥**

**अर्थः**—हे शंकरा, माझा आत्मा म्हणजे तुम्ही आहांत; माझी बुद्धि ही पार्वती आहे; माझे पंचप्राण हे तुमचे सभोंवार असणारे सेवक आहेत. माझें शरीर हें आपलें मंदिर आहे. माझ्या देहधारणेकरितां जें काम करितों ती आपली पूजा आहे. माझी निद्रा हीच समाधि-अवस्था आहे. पायानें इकडे तिकडे हिंडतों ती आपल्यास प्रदक्षिणाच करितों. मी जें जें बोलतों तीं आपलीं स्तोत्रें होत. मी जें जें कर्म करितों तें तें सर्व तुमची पूजाच आहे. ( माझें शरीर, मन व बुद्धि व त्यांचे व्यापार हे आपल्याशीं एकरूप झाले आहेत. त्यांस वेगळें अस्तित्व नाहीं. सर्व ईश्वरार्पण करण्याची ही इच्छा नित्य नियमानें उच्चारल्यानें फलद्रूप होणें कठिण नाहीं. ).

५

**करचरणकृतं वाक्कायजं कर्मजं वा ।**
**श्रवणनयनजं वा मानसं वापराधम् ।**
**विहितमविहितं वा सर्वमेतत्क्षमस्व**
**जय जय करुणाब्धे श्रीमहादेव शंभो ॥**

**अर्थः**—हात, पाय, वाणी, कान, नयन वगैरे इंद्रियांकडून जीं शारीरिक पापें घडलीं असतील किंवा इतर पापें जीं मनानें घडलीं असतील, जीं प्रत्यक्ष घडलीं असतील किंवा कृतींत न उतरतां मनांतच राहिलीं असतील, अशा सर्व पापांची क्षमा करा. हे करुणासागरा, देवाधिदेवा, कल्याण करणाऱ्या शंकरा, तुमचा जयजयकार असो.

---

# महाराष्ट्राची पीछेहाट

महाराष्ट्राची पीछेहाट अलीकडे सर्व बाजूंनीं होत चालली आहे यावद्दल वाद नाहीं. या अवनतीची मीमांसा करण्याचा प्रयत्न मुंबईच्या एका साप्ताहिकानें अनेक कर्त्या व विद्वान् माणसांचे अभिप्राय छापून केला आहे. तीव्र जातिभेद, आपसांतील द्वेष व मत्सर, निंदा व टवाळी करण्याचा स्वभाव, स्वतःच्या थोरपणाची घमेंड, व्यापारांत सचोटीचा अभाव, कार्य करण्यापेक्षां

बोलण्याचीच फाजील आवड, नम्र अनुयायी होण्याऐवजीं स्वयंसिद्ध पुढारीच होण्याची हाव, ब्राह्मणांची इतर जातींपासून तुटून राहण्याची प्रवृत्ति, अर्धींच कमी सुपीक असलेल्या जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यास सरकार, सावकार, अंमलदार वगैरे अनेक रक्तशोषक तुंबड्या लागल्यामुळें दारिद्र्याची नित्य होणारी वाढ, महाराष्ट्राचा व्यापार गुजराथी, मारवाडी, लिंगाईत, जैन, पारशी वगैरे परप्रांतीयांच्या हातांत गेल्यामुळें महाराष्ट्रीयांतील संपत्तीचा अभाव व तदनुषंगानें येणारी स्वभावाची दुर्बलता वगैरे वगैरे अनेक कारणें अनेकांनीं दिलीं आहेत, तीं सयुक्तिकच आहेत. पण आम्हांस आणखी एक कारण दिसतें. तें म्हणजे खऱ्या धार्मिक वृत्तीचा लोप, पुस्तकांत, व्याख्यानांत, वर्तमानपत्रांत, हिंदुधर्माबद्दल, सनातन आचारविचारांबद्दल अघळ पघळ स्तुति केलेली नेहमीं आढळेल, पण हें धर्मप्रेम आचरणांत आणण्याची प्रवृत्ति अत्यंत रोडावली आहे. 'आचारः प्रथमो धर्मः,' ही जुनी कल्पना सुटून धार्मिक आचार हा टवाळीचा विषय होऊन बसला. आहे स्नानसंध्या करणें, सकाळसंध्याकाळ पूजा, भजन करणें, नियमानें देवदर्शन करणें, गरीबास व अपंगास यथाशक्ति दानधर्म करणें, धर्मग्रंथांचें नियमानें पारायण करणें वगैरे जे मानवी जीवन सुखकर व सफल करण्याचे अत्यंत आवश्यक आचार, ते पाळण्यांत सुशिक्षित व अशिक्षित या दोघांमध्येंही दिसून येणारी अक्षम्य हेळसांड, महाराष्ट्राच्या अवनतीच्या कारणांपैकीं एक प्रमुख कारण आहे. त्यांतल्या त्यांत अशिक्षित लोक तरी बरेच धर्माचार पाळतात; भजन-पूजन करितात, व यथाशक्ति दानधर्म करितात. परंतु सुशिक्षित समाजांत धर्माचरणाची लाज वाटते, आपण दरिद्री व अडाणी लोकांसारखें देवभोळे झालों तर लोक आपल्यास नांवें ठेवतील, अशी कांहीं विचित्र आणि अधःपातास नेणारी मनोरचना उत्पन्न झाली आहे. अलीकडील तरुणांत तर अज्ञेयवाद व निरीश्वरवाद फार प्रसार पावला आहे. कॉलेजमधील प्रोफेसर देखील उजळमाथ्यानें " सर्व धर्मांचा ज्या दिवशीं नायनाट होईल, तो दिवस या जगांत भाग्याचा गणला जाईल " अशीं विधानें वर्तमानपत्रांतून व मासिकांतून वारंवार प्रसिद्ध करीत आहेत. धर्मावर श्रद्धा ठेवणारे लोकही बोलाचाच कढीभात खाऊन स्वस्थ बसत आहेत. आमचीं बायकामुलें धर्मशिक्षण व धर्माचार यांच्या अभावीं निःसत्व, उदासीन, विषयलोलुप व कर्तृत्वशून्य होत आहेत. यामुळें कोणच्याही व्यवसायांत धडाडीनें पुढें येऊन कार्य करून दाखविण्याची महाराष्ट्राची थोर परंपरा कायम राखण्याची पात्रता अंगीं राहिली नाहीं. दक्षिण आफ्रिकेंत बोर लोकांनीं इंग्लंडसारख्या प्रबल राष्ट्राशीं सन १९०० सालीं झगडा चालविला होता. बोर लोक थोडे व युद्धकलेंत अननुभविक. पण स्वातंत्र्याची व धर्मश्रद्धेची ज्योत हृदयांत प्रज्वलित असल्यानें त्या लोकांनीं ब्रिटिशराष्ट्रास जेरीस आणलें व

स्वातंत्र्य मिळविलें. बोर लोकांचें आपल्या धर्मावरील प्रेम आश्चर्यकारक होतें. ते बहुधा शेतकीचा धंदा करणारे असत. पण शांततेच्या काळांत शेतकी करितांना व युद्धाच्या काळीं रणांगणावर लढतांना त्यांचा धर्मग्रंथ—बायबल—याचें नित्य पारायण चालू असे. त्याचप्रमाणें आमचेकडेही सतराव्या शतकांत व अठराव्या शतकांत जेव्हां मराठयांनीं आपल्या बाहुबलानें आपले झेंडे हिंदुस्थानाच्या अष्टदिशांना भिडविले, तेव्हांही त्यांच्या नित्य व्यवसायांत धर्माचें अधिष्ठान कायम होतें. शिवाजीमहाराज, बाजीराव, माधवराव वगैरे योद्धे आपल्या कुळस्वामींचे आशीर्वाद घेतल्याशिवाय, त्यांना अनन्य भावानें शरण गेल्याशिवाय कोणच्या ही कार्यास हात घालीत नसत, याची इतिहास स्पष्ट साक्ष देत आहे. सर्वसामान्य समाजांत ज्ञानदेव, रामदास, तुकाराम यांच्या शिकवणीचा परिणाम भिनून राहिला होता. महाराष्ट्राचे पहिल्या पिढीचे पुढारीसुद्धां श्रद्धाळू, कर्मठ व धर्माचरणी अशा आईबापांच्या पोटीं जन्मले होते हें त्यांच्या चरित्रांवरून दिसून येतें.

महाराष्ट्रास जर सर्व प्रांतांत अग्रस्थान पुनः मिळविणें असेल तर त्यानें पुनः धर्म **आचरण्याचा** निश्चय केला पाहिजे. आचार हा विचारापेक्षां अत्यंत हीन आहे, धर्मकार्यें अंधश्रद्धेनें केल्यामुळेंच देशाची अवनति झाली, धर्माचीं सर्व बंधनें तोडून टाकूं तरच आपण या जगांत टिकूं, अशी आत्मघातकी वृत्ति सगळीकडे पसरत आहे. पण आचारः प्रथमो धर्मः, प्रत्यक्ष आचरण हेंच धर्माचें मुख्य लक्षण आहे, हें व्यास महर्षींचें वचन अबाधित आहे. समाजांत विचार करण्याचें भाग्य हजारांत एखाद्यालाही लाभत नाहीं. धर्मांत, राजकारणांत, जो विचार करावा लागतो तो विचार करण्यास नैसर्गिक बुद्धि, दीर्घकालीन शिक्षण, चांगल्या गुरूंची प्राप्ति, वगैरे साधनसंपत्ति लागते ती फार क्वचित् वांटयास येते, इतरांनीं, हजारांतील ९९९ लोकांनीं, श्रद्धेनें विचारवंत पुरुषांनीं जीं धर्मतत्वें, जे धर्माचार घालून दिले असतील ते सर्व आळस टाकून व्यक्तीच्या, समाजाच्या, व देशाच्या स्थिरतेकरितां, आपल्या संततीच्या, भावी पिढीच्या कल्याणाकरितां आचरणांत आणलेच पाहिजेत. समाजांतील सर्व व्यक्ति—पुरुष, स्त्रिया, बालकेंसुद्धां—धर्माचरणानें शुद्ध झाल्या नाहींत, त्यांनीं धर्म प्रत्यक्ष आचरणांत आणला नाहीं, भजन-पूजन, धर्मग्रंथपठण हीं अन्नग्रहणाइतकीच नियमितपणें केलीं नाहींत, तर तो समाज खालीं घसरतच जाणार, वर कधींही येणार नाहीं. महात्मा गांधींनीं त्रिकाल प्रार्थनेचें बंधन आपल्यास व आपल्या अनुयायांस किती घट्ट घालून घेतलें आहे हें आतां सर्वविश्रुत आहे. आत्मसंयमन व विषयनिवृत्ति यांजबद्दल महात्माजी उपदेश करण्याची संधि केव्हांही दवडीत नाहींत. वर्णाश्रम-

धर्माबद्दल त्यांचा अभिमान सर्वांस माहीत आहेच. व त्यामुळें पुष्कळ लोक त्यांचेवर अत्यंत नाराजही आहेत.

तेव्हां आमचें पुनः पुनः एवढेंच सांगणें आहे कीं, जर महाराष्ट्र मागें पडावयास नको असेल, जर आपण स्वतः अधोगतीस जाऊं नये असें वाटत असेल, तर आपल्या वर्णास व आपल्या ब्रह्मचर्य,गृहस्थ वगैरे आश्रमांस अवश्य अशीं जीं कर्तव्यें, जे आचार सांगितले असतील त्यांचें श्रद्धापूर्वक नित्य आचरण करावें. आपल्या घरांतील स्त्रिया व मुलें यांच्याकडूनही भजनपूजन, ग्रंथपठण, परोपकार वगैरे करवून घ्यावे, तरच आपल्या देहाचें, आपल्या कुटुंबीयांच्या जन्माचें व मायभूमीचें सार्थक होईल. नुसतीं धर्माचीं व्याख्यानें ऐकून किंवा वाचून फार थोडा उपयोग होईल. धर्म आचरणांत आणा, श्रद्धावंत व्हा, आपल्या उपास्य देवतेची वारंवार करुणा भाका, म्हणजे स्वतःचें व देशाचें कल्याण होईल.

---

# निर्वाणषट्कम्.

पुढील स्तोत्र अद्वैतमतसंस्थापक आद्य शंकराचार्य यांचें आहे. जगांत फक्त ब्रह्म हेंच सत्य आहे, दृश्य जग हें माया म्हणजे मिथ्या आहे व मानवी जीव हा ब्रह्मच आहे, हें आचार्यांच्या सर्व मतांचें सार आहे. ऐहिक दृष्टीच्या टप्यांतील जे जे म्हणून गुणधर्म त्यांचा निरास 'न न' या पदानें केला आहे. या सर्वांच्या व्यतिरिक्त जें परब्रह्म तेंच आत्म्याचें शुद्ध स्वरूप आहे. सत्य आणि मिथ्या यांचें वेगळें वेगळें स्वरूप दाखवून क्षणिक, विनाशी व मायिक अशा ज्या ज्या वस्तु आहेत, त्यांच्याहून आत्मा वेगळा आहे असें वेदांती सांगत असतो. योगाभ्यासानें समाधीपर्यंत पल्ला गांठून योगी ब्रह्मपद मिळवितो. मग जीवात्म्याचें मर्यादित स्वरूप परब्रह्माच्या सच्चिदानंदरूपांत अंतर्धान पावतें. अशा माणसास श्रुति. स्मृति, धर्मपंथ, आचार्य यांची मुळींच गरज उरत नाहीं. तो मायेचें आवरण बाजूस सारून ब्रह्मतेज अनुभवतो. सर्व धर्मांचा उगम जें ब्रह्म तेथें तो पोचलेला असतो. तेथें वाणी आणि मन जाऊं शकत नाहीं. तो निर्विकल्प सच्चिदानंदरूप बनतो, म्हणजे शिव होतो.

योग्याच्या व वेदान्त्याच्या अत्युच्च स्थितीचें चित्र पुढील स्तोत्रांत वर्णन केलें आहे.

१

**मनोबुद्ध्यहंकारचित्तानि नाहं**
**न च श्रोत्रजिव्हे न च घ्राणनेत्रे ।**

न च व्योम भूमिर्न तेजो न वायु—
श्चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥

अर्थः—मन, बुद्धि, अहंकार किंवा चित्त हें मी नव्हे. ( हीं माझीं रूपें नव्हत. ) कान, जिव्हा, नाक, किंवा डोळे हे मी नव्हे. आकाश, भूमि, तेज किंवा वायु हें माझें रूप नव्हे. ज्ञान व आनंदरूप असा जो शिव ( परब्रह्म ) तो मी आहे.

२

न च प्राणसंज्ञो न वै पंचवायुर्
न वा सप्तधातुर्न वा पंचकोषः ।
न वाक् पाणिपादं न चोपस्थपायु-
श्चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥

अर्थः— प्राण अशी ज्याला संज्ञा आहे तो मी नव्हे. शरीरस्थ पांच वायु हेंही माझें रूप नव्हे. रक्तरेतादि शरीरस्थ सात धातु मी नव्हे. पांच प्रकारचे कोष ( आवरणें ) मी नव्हे. वाणी, हात, पाय, गुद, उपस्थ हें मी नव्हे. ज्ञान आणि आनंदरूप असा जो शिव तो मी आहे.

३

न मे द्वेषरागौ न मे लोभमोहो ।
मदो नैव मे नैव मात्सर्यभावः ।
न धर्मो न चार्थो न कामो न मोक्षः ।
चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥

अर्थः— द्वेष किंवा आसक्ति, लोभ किंवा मोह, अहंकार किंवा मत्सर, धर्म, अर्थ, काम किंवा मोक्ष यांपैकीं माझ्या ठिकाणीं कांहींच नाहीं. ( माझ्या सत्य स्वरूपास या सर्व गोष्टी सारख्याच अनिष्ट आहेत. ) ज्ञान व आनंदरूप असा जो शिव तो मी आहे.

४

न पुण्यं न पापं न सौख्यं न दुःखं
न मंत्रो न तीर्थं न वेदा न यज्ञाः ।
अहं भोजनं नैव भोज्यं न भोक्ता
चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥

अर्थः—पाप, पुण्य, सुख, दुःख, मंत्र, तीर्थ, वेद, यज्ञ यांत माझें खरें स्वरूप नाहीं. सुखोपभोग, सुखाचे विषय, सुखोपभोग घेणारा, यांचा माझ्या

आत्म्याशीं कांहीं संबंध नाहीं. ज्ञान व आनंदरूप असें शिव (कल्याणकारक) जें परब्रह्म तें माझें खरें रूप आहे.

५

न मृत्युर्न शंका न मे जातिभेदः
पिता नैव मे नैव माता च जन्म ।
न बंधुर्न मित्रं गुरुर्नैव शिष्यः
चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥

अर्थः—आत्मस्वरूपास मृत्यु, भीति, जातिभेद वगैरे विकार नाहींत. पिता, माता, जन्म हीं आत्म्यास नाहींत. मित्र, आप्तसंबंधी, गुरु किंवा शिष्य हीं माझीं नव्हेत, ज्ञान व आनंदरूप असें मंगलमय ब्रह्म मी आहे.

६

अहं निर्विकल्पो निराकाररूपो
विभुत्वाच्च सर्वत्र सर्वेन्द्रियाणाम् ।
न वा संगतं नैव मुक्ति र्न मेय-
श्चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥

अर्थः—माझ्यांत ( आत्मरूपांत ) कधींही फेरफार ( विकार ) होत नाहीं; माझ्या स्वरूपांत कसलाही आकार नाहीं. माझें स्वरूप सर्वव्यापी असल्यामुळें मी सर्वत्र स्थित आहे. कोणच्याही इंद्रियांशीं माझ्या ( माझा आत्म्याचा ) संबंध नाहीं. बंधनांतून सुटणें व ज्ञानविषय होणें हें मला नाहीं. मी ज्ञान व आनंदरूपी शिव आहे. ( मंगलमय परमात्मरूपच मी आहे. )

वरील स्तोत्रांत अत्युच्च कोटीस पोंचलेल्या ज्ञानी पुरुषाची मनःस्थिति वर्णन केली आहे. संसारी माणसास ही भावना प्राप्त होणें दुरापास्त आहे. पण उंच शिखरास जाण्याची इच्छा करणारानें जसें त्या शिखराचें दर्शन पुष्कळ दिवस लांबूनच घेतल्यास, शिखरावर आरोहण करण्याची उत्कट इच्छा उत्पन्न होते, त्यामुळें प्रयत्न सुरू होतो, प्रयत्नांनीं आरोहणाची पात्रता अंगीं येऊं लागते, व अखेरला प्रयत्न व परमेश्वरप्रसाद यांच्या साह्यानें अत्युच्च शिखरावरही मनुष्य जाऊं शकतो. तद्वतच मुमुक्षु जनांनीं या लहानशा स्तोत्राचें नित्य पठण करण्याचा नियम केल्यास, हळुहळू बद्ध आत्म्याचीही निर्गुण परमात्मतत्त्वाकडे प्रगति होईल. तेव्हां इतर पाठांतराबरोबर याही लहानशा व सुगम अशा स्तोत्राचें नित्यपठण करावें अशी मुमुक्षुजनांस नम्र विनंती आहे.

---

# पांगारकरांचीं पुस्तकें

१. **भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति चौदावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ॥८ व्ही. पी. नें ॥१२.

२. **संतचरित्रमालाः**—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४२ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ.सं. २५६ किं. रु. १॥८.

३. **श्रीएकनाथचरित्रः**—श्रीएकनाथमहाराजांच्या चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ॥१२.

४. **कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडो स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ॥४.

५. **आनंदलहरीः**—( कवितासंग्रह ) यांत पांगारकरांच्या कवितांपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत, १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ॥१२.

६. **नारदभक्तिसूत्रेंः**—( आवृत्ति ४ थी ) हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ॥८.

७. **नवविधाभक्तिः**—( सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी ) यांत नवविधा-भक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ॥६.

८. **निरंजनमाधवांची कविताः**—भाग १ किं. रु. भाग २ व ३ एकत्र किं. १॥ रु.

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्रः**—( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. १॥८.

१०. **भक्तिमणिमालाः**—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १॥८

११. **सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टीः**—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध पुढारी कै. विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ॥५.

## पांगारकरांचीं पुस्तकें

१२-१३-१४. **मुमुक्षूंतील निवडक निबंधः**—भाग १ व २ किं. प्रत्येकी १०८, भाग ३ रा किं. १०४.

१५. **मोरोपंती वेंचेः**—(२ री आ.) पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचें उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रहि नवीन दिलेलें आहे. किं.रु. १०१२.

१६. **पारिजातकाचीं फुलें:**—( तिसरी आवृत्ति ) परमार्थविचारांची संगो उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ८८

१७. **श्रीतुकारामचरित्रः**—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलाचा पंढरपूरचा व देहूचे सद्दा असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ. सह किं. रु. २.

१८. **श्रीतुकारामचरितामृतः**—तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं ०५.

१९. **निबंधमालेचें स्वरूप आणि कार्यः**—निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख-विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ०१०.

२०. **मुक्तेश्वरः**—( चरित्र आणि काव्यविवेचन ) श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे प्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १.

२१. **मारुतिउपासना** ( चौथी आवृत्ति ):—किं. ०४.

२२. **सार्थ श्रीदासबोधः**—( आवृत्ति दुसरी ) किं. रु. ४ व्ही. पी. नें ४०१०

२३. **सार्थ मनोबोधः**—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ०१२.

२४. **समर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेंचेः**—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु २.

२५. **मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन )**:—किं. रु. २०८.

२६. **श्रीएकनाथी भागवत** (निर्णयसागर प्रेसची आवृत्ति तिसरी):—किं. रु.६

२७. **श्रीसमर्थग्रंथभांडारः**—समर्थांची एकंदर कविता एकत्र सटीप छापलेली आहे. किं. ४०८


२८. **समर्थग्रंथभांडार** ( भाग २ रा ):—यांत दासबोधाशिवाय बाकीची समर्थांची सर्व कविता प्रकरणें पाडून व्यवस्थित दिली आहे. किं. रु. २०८.

२९. **ज्ञानेश्वरांची प्रभावळः**—ज्ञानेश्वरमहाराज व त्यांचे समकालीन नामदेवराव, जनाबाई, चोखामेळा इत्यादि सर्वजातीय २५ संत यांच्या ग्रंथांतील निवडक वेंचे प्रस्तुत ग्रंथांत घेतले आहेत. यांत ज्ञानेश्वरांच्या २५०० ओव्या व सर्व संतांचे मिळून ४०० अभंग आहेत. सुंदर प्रस्तावना आहे. टीपा भरपूर आहेत. किं. रु. २.

पताः—**व्यवस्थापक " मुमुक्षु " पुणें शहर.**

॥ श्री रुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेचि काळें । संसारीं होईजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


जुनें वर्ष २४ वें मास १०-११ | आषाढ–श्रावण १८५२ जुलै–आगष्ट १९३० | नवें वर्ष १० वें अंक ७।८ वा.

संपादक व प्रकाशक,

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मुमुक्षु कचेरी, बुधवार पेठ, पुणें सिटी.

वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही. पी. नें रु. ३८३

मुद्रकः—लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव, घ. नं. ३००
येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

# विषयानुक्रमणिका.


| विषय | पृष्ठ. |
|---|---|
| १ मंगलाचरण ... ... .. ... | १ – २ |
| २ पारिजातकाचीं फुलें... ... ... ... | ३ |
| ३ वंदे मातरम् ( पद ) ... ... ... | ४ |
| ४ वंदे मातरम् ... ... ... ... | ५ – ८ |
| ५ विचाररत्नें ... ... ... ... | ९ – ११ |
| ६ मुक्ताबाई व जनाबाई ... ... ... | १२ – ३० |
| ७ यांत्रिक सुधारणा !... ... ... ... | ३१ |
| ८ श्रीगुरुचरित्राची मूळ प्रत ... ... ... | ३२ |
| ९ तुकाराम महाराजांचा एक अभंग ... ... | ३३ – ३४ |
| १० भक्तमयूरकेकावली ... ... ... ... | ३५ – ४३ |
| ११ थोरांचा समागम ... ... ... ... | ४४ – ४६ |
| १२ सणांचा व खेळांचा ऱ्हास ... ... ... | ४६ – ४८ |
| १३ श्रीगोदागौरव ( कविता ) ... ... ... | ४९ – ५० |
| १४ मुमुक्षूचें स्थानांतर ... ... ... ... | ५० – ५५ |
| १५ साभिप्राय स्वीकार ... ... ... ... | ५५ – ५८ |
| १६ मराठी वाङ्मय १८१८ ते १८९८ ... ... | ५८ – ६७ |
| १७ सहज वैराग्य ... ... ... ... | ६७ – ७१ |
| १८ स्वर आणि मूळाक्षरें... ... ... ... | ७२ – ७४ |
| १९ महाराष्ट्रांत 'रामकृष्णहरि' मंत्राचें शतकोटी अनुष्ठान ... | ७४ – ८० |


---

**सूचना :**—सप्टेंबरपासून ज्यांचें वर्ष सुरूं होतें त्यांनीं हा अंक हातीं पडतांच पुढील वर्षाची वर्गणी रु. ३ म. ऑ. नें श्री. **लक्ष्मण रामचंद्र पांगारकर,** नाशीक सिटी या पत्त्यावर पाठवावी. म्हणजे व्ही. पी पाठविण्याचे आमचे श्रम वांचून त्यांचे ८३ वांचतील. ज्यांना पुढें वर्गणीदार राहावयाचें नसेल त्यांनीं तसें कृपा करून कळवावें. व्ही. पी. परत करून आमचें व्यर्थ नुकसान करूं नये.

व्यवस्थापक, ' मुमुक्षु '

मुमुक्षु मासिक
वर्ष १० वें ]

# मंगलाचरण

[ जुलै-आगस्ट १९३०
अंक ७-८ वा



## श्लोक-उपजाति.

परात्पर श्रीपति रामभूप । पदीं रमे त्या सुख दे अनूप ॥
परात्पर व्यापक चित्स्वरूप । परेश भक्तांस्तव जो सरूप ॥ १ ॥
तीरें वधी शोधुनियां अराती । तीव्रें गुणें सज्जनपक्षपाती ॥
तीनी गुणीं लिप्तनयत्प्रभाती । तीर्थास्पदें सद्गुण साधु गाती ॥ २ ॥
तद्रूप ये नाम जरी मुखांत । तल्लीन होतो जिव यत्सुखांत ॥
तरावया यत्न असा भवांत । तथापि जाती जन रौरवांत ॥ ३ ॥
पावे स्मरूं त्या जरि मायबापा । पाहे प्रयत्नें हरुनि त्रितापा ।
पाळी कृपें ओढुनि आत्मचापा । पापा न ठेवी भजुं त्या रमापा ॥ ४
वरिष्ठ जो एकचि रामदेव । वरीन त्या मी हृदयीं सदैव ॥
वदेन तन्नाम अवश्यमेव । वसेन देऊनि तयासि खेव ॥ ५ ॥
न रत्न रामा सदयासमान । नरासुरांमाजि जगन्निधान ॥
नभापरी रूप न होय मान । नमूनि ज्या देति समस्त मान ॥ ६ ॥
रात्रिंचरा देउनि तीव्र मारा । राजेश्वरें आणियलि स्वदारा ॥
राज्यासनीं बैसुनि कारभारा । राष्ट्रीय जो चालवि भक्तधारा ॥ ७ ॥
मनीं मुखीं ज्या प्रिय आत्मनाम । मवाळ त्याच्यावरि पूर्णकाम ।
मरामती वाढवि सौख्यधाम । महोद्धतांचा करूनी विराम ॥ ८ ॥

पतीतपावना रामा ! श्लोकाष्टक तुझें तुवां ॥
विष्णु कृष्ण जगन्नाथा । रचिलें स्फूर्तिनें तुझ्या ॥ ९ ॥

कृष्णंभट बांदकर ( गोवा ).

# नाथबोध.

[ बहिणाबाईंच्या थिऊर येथील गाथ्यांत श्रीएकनाथमहाराजांचा पुढील नीतिबोध आम्हांस आढळला. नाथांच्या वाणीची छाप समर्थांच्या ग्रंथावर पडलेली अनेक स्थळीं दिसते. त्याचा हा एक नमुना आहे. ]

सांडावरून जाऊं नये । लांच खाऊं नये ॥
चोहट्यांत राहूं नये । कोण्ही येक ॥ १ ॥
आक्रीत घेऊं नये । इमान सोडूं नये ॥
बैमान होऊं नये । कोण्ही येक ॥ २ ॥
सज्जनासी विटूं नये । नीचासवें बाटूं नये ॥
तस्करासी पुसूं नये । कोण्ही येक ॥ ३ ॥
भक्तिमार्ग खंडूं नये । कुभांड्यासी तंडूं नये ॥
खळासंगें भांडूं नये । कोण्ही येक ॥ ४ ॥
सत्पुरुषासी छळूं नये । सिवेचा गुंडा ढाळूं नये ।
केला नेम टाळूं नये । कोण्ही येक ॥ ५ ॥
सद्गुरुसेवा सोडूं नये । कुळधर्मासी मोडूं नये ।
पापद्रव्य जोडूं नये । कोण्ही येक ॥ ६ ॥
संपत आल्या माजूं नये । सभा देखुन लाजूं नये ॥
अभिमानें फुंदूं नये । कोण्ही येक ॥ ७ ॥
असत्यवाद करूं नये । खोटा संग धरूं नये ॥
वोहोचकासी मैत्री करूं नये । कोण्ही येक ॥ ८ ॥
भलते भरीं भरूं नये । अनाचार करूं नये ॥
कपट मनीं धरूं नये । कोण्ही येक ॥ ९ ॥
जन्मा आलिया स्वभावें । कांहीं सार्थक करावें ॥
ऐसें मनीं विचारावें । कोण्ही येक ॥ १० ॥
एकाजनार्दनीं भावें । संतचरणीं लीन व्हावें ॥
सदा हरिनाम उच्चारावें । कोण्ही येक ॥ ११ ॥

# पारिजातकाचीं फुलें.

१

देव आणि भक्त ! देवाला भक्त आणि भक्ताला देव सर्वस्व आहेत. ' पूयेयेत्यंघ्रिरेणुभिः ' भक्ताच्या चरणरजानें पावन होण्यासाठीं देव भक्ताच्यामागें चालतात. नामदेवाच्या व जनाबाईच्या मागेंमागें देव चालतो. भक्तांना तर देवावांचून ब्रह्मांडांत कोणीच नाहीं. अणुरेणूंत त्यांना देवच ! भक्ताच्या योगानें देव पूर्ण व देवाच्या योगानें भक्त पूर्ण. नुस्ता देव अर्धा व नुस्ता भक्त अर्धा ! पण हें काय बोलणें ? देवाविण भक्त कोणाला आढळला आहे ? भक्तावांचून देव तरी सांपडतो ? दोन्ही मिळून एकच. ' जळलहरी हे वार्ता । उपाधिकृत.' देवभक्तांचा सुखसोहळा देवभक्तांनाच ठाऊक.

२

ह्या काळांत मोरंबा हिंदुमात्राच्या घरोघर असतो. कच्च्या आंब्याची फोड साखरेच्या पाकांत घोळली कीं तिला मधुर रुचि येते. नुस्ती फोड आंबट असते, नुस्ती साखर गोड असते, पण साखरेच्या ( परि ) पाकांत घोळल्यानें तिला चवं येते ! तसा जीव परमात्म्याच्या मधुर भक्तिसुखांत घोळला, मिसळला कीं, त्याला जी गोडी येते ती नुस्त्या जीवपणांत नाहीं, नुस्त्या देवपणांत नाहीं ! पूर्ण ब्रह्मस्थितीच्या साखरेपेक्षां ही मुरंब्याची गोडी कांहीं और आहे. देवाचें सुख भोगण्यापुरतें वेगळेपण राहून ऐक्यतेचें सुख अनुभवणें ही भक्तांची कोटि आहे. ' नको ब्रह्मज्ञान आत्मस्थितिभाव । मी भक्त तूं देव ऐसें करीं । दावी रूप मज गोपिकारमणा । ठेवूंदे चरणावरी माथा.'

३

देव चतुर्भुज आहे म्हणजे दोन भुज देवाचे व दोन भक्ताचे–देव आणि भक्त मिळून एक देवच ! देवाला भक्ताचें मृत शरीर–आणि आपलें मरण डोळ्यांनीं पाहणाऱ्या भक्ताला त्याचा देह असून नसल्यासारखाच असतो हें सुद्धां पूज्य वाटतें हें दर्शविण्यासाठींच त्यानें शंख हातांत घेतला आहे ! चक्रगदा भक्तरक्षणासाठीं, भक्तशत्रु निवारण्यासाठीं—" घेवोनियां चक्रगदा हाची धंदा करितो । भक्ता राखे पायांपाशीं दुर्जनासी संहारी." पद्म हें देवाच्या प्रसन्नतेचें चिन्ह आहे. भक्ताची पूजा करण्यासाठीं देवानें हें अखंड हातीं धरिलें आहे. भक्ताचें लक्ष सारें देवाच्या पायीं.

४

देवाचे दोन पाय ह्म० एक देव व एक भक्त !

# वंदे मातरम् !

वंदे मातरम्

सुजलां सुफलां मलयजशीतलाम्,
शस्यशामलां मातरम्,
शुभ्रज्योत्स्नापुलकितयामिनीम्,
फुल्लकुसुमितद्रुमदलशोभिनीम्,
सुहासिनीं सुमधुरभाषिणीम्
सुखदां वरदां मातरम् ॥
सप्तकोटिकंठ-कलकल-निनाद-कराले,
द्विसप्त-कोटिभुजैर्धृतखर-करवाले,
अबला केन मा एत बले,
बहुबलधारिणीं नमामि तारिणीम्
रिपुदलवारिणीं मातरम् ॥
तुमि विद्या तुमि धर्म,
तुमि हृदि तुमि मर्म,
त्वं हि प्राणाः शरीरे ।
बाहुते तुमि मा शक्ति,
हृदये तुमि मा भक्ति,
तो मारइ प्रतिमा गडि मन्दिरे मन्दिरे ।
त्वं हि दुर्गा दशप्रहरणधारिणी
कमला कमलदलविहारिणी
वाणी विद्यादायिनी नमामि त्वाम्
नमामि कमलां अमलां अतुलाम्
सुजलां सुफलां मातरम्,
वन्दे मातरम्
श्यामलां सरलां सुस्थितां भूषिताम्
धरणीं भरणीं मातरम् ।

# वंदे मातरम्.

१ ‘ वंदे मातरम् ’ ह्या अर्वाचीन राष्ट्रीय मंत्राचा द्रष्टा बंकीमचंद्र चातर्जी हा विख्यात बंगाली कादंबरीकार होय. महाराष्ट्रीय साधुसंतांनीं पारमार्थिक दृष्टया ‘ रामकृष्णहरी ’ हा मंत्र जसा महाराष्ट्रीय जनतेस दिला किंवा गौरांग-प्रभूंनीं ‘ राधेश्याम ’ हा मंत्र जसा बंगाली लोकांस किंवा व्रजवासीजनांस दिला, त्याप्रमाणें बंकीमचंद्रांनीं ‘ वंदे मातरम् ’ हा मंत्र सर्व हिंदवासीयांस दिला आहे. कोटयवधि हिंदी लोकांच्या तोंडून अहर्निश ह्या मंत्राचा जप झाला असल्यामुळें हा मंत्र राजकीय क्षेत्रांत आतां ‘ सिद्ध मंत्र ’ झाला आहे. बंकीमचंद्रांच्या थोर पुण्याईमुळें त्यांच्या एका कादंबरींत सहजगत्या आलेलें ‘ वंदे मातरम् ’चें गीत राष्ट्रीय गीत झालें असून ‘ वंदे मातरम् ’ हा एकच एक मंत्र आतां सार्वत्रिक झाला आहे. अशा या थोर पुरुषाविषयीं दोन गोष्टी आमच्या वाचकांस सांगण्याचें आम्हीं आज योजलें आहे.

२ बंगाली वाङ्मयांत बंकीमचंद्राचें नांव अजरामर आहे. त्याला त्याच्या कादंबऱ्यांपासून पैसा मिळाला नाहीं किंवा द्रव्यप्राप्तीसाठीं त्यानें हा लेखन-व्यवसाय केला नाहीं. लक्ष्मी आणि सरस्वति यांचें वैर अनादि आहे, तथापि बंकीमचंद्राला जन्म दारिद्र्यांत काढावा लागला नाहीं. कलकत्ता युनिव्हर्सिटींतून जे पहिले दोन पदवीधर निघाले त्यांपैकीं बंकीम एक होता, व त्याला बी. ए. होतांच डेप्युटी मॅजिस्ट्रेटची जागा मिळाली व याच कामावर तो आजन्म होता. पेन्शन घेतल्यावर थोडयाच दिवसांनीं त्याचा अंत झाला. मृत्युसमयीं त्याचें वय ५६ वर्षांचें होतें. रोज ७।८ तासांची नोकरी संभाळून त्यानें आपला फुरसतीचा सर्व वेळ लेखनवाचनांत घालविला व आपल्या ग्रंथकर्तृत्वानें चिरयश संपादिलें.

३ बंकीमचा एकच फोटो उपलब्ध आहे. त्यावरून त्याच्या शरीरयष्टीची व वेषाची कांहींशी कल्पना होते. त्याच्या डोक्यावर बंगाली पद्धतीचें मोठें पागोटें असे. त्याच्या चेहऱ्यावर व नेत्रांत बुद्धितेज विलक्षण खेळत असे. कपाळपट्टी रुंद होती. नेत्र सूक्ष्म होते. टिळकांप्रमाणेंच बोलण्याच्या ऐन रंगांत येतांच त्याचे डोळे मोठे व विशाळ दिसत, एऱ्हवीं ते बारीक आहेत असेंच प्रेक्षकांस वाटे. नाक उठावदार, ओठ मध्यम, दांत बारीक, जबडा मजबूत. एकंदर चेहऱ्याची ठेवण अशी होती कीं, हा पुरुष सूक्ष्मबुद्धीचा, निश्चयी व व्यवस्थित असावा असें वाटे. डोक्यावरचे केस कुरळे असत व त्यांना तेल

किंवा फणी फार क्वचित लागे. नटवेगिरी त्याजजवळ बिलकूल नव्हती. जेथें नखरेबाजी आहे तेथें उच्च विचार राहात नसतात !

४ बंकीमचंद्रांनीं संस्कृत व इंग्रजी वाङ्मय सडकून वाचलें होतें. त्यांची प्रतिभा उज्वल व कल्पकता अपूर्व होती. त्यांचें भाषाप्रभुत्व अतुलनीय होतें. स्वभाषा त्यांनीं कमावली होती. त्यांनीं जुनें बंगाली वाङ्मय फार आवडीनें अभ्यासिलें होतें. मराठीप्रमाणेंच बंगाली भाषेंतलें सर्व प्राचीन वाङ्मय पद्यात्मक आहे. इंग्रजी अंमलानंतर लोकांचा कल गद्याकडे वळला. आपल्या इकडे पांचशें वर्षांपूर्वीं जसे ज्ञानेश्वरमहाराज आद्य व सर्वश्रेष्ठ ग्रंथकार झाले, तसाच व त्याच सुमारास बंगाली भाषेंत चंडीदास हा नामांकित व वरदी कवि होऊन गेला. चंडीदासावर बंकीमची भक्ति होती. बंकीमच्या पूर्वीं ४१२ बंगाली विद्वानांनीं गद्य ग्रंथ लिहिले होते. इंग्रजी व संस्कृत ग्रंथांचीं भाषांतरें व रूपांतरें किंवा कांहीं उष्ट्या नवलकथा किंवा सुधारणेचा पुरस्कार करणारीं पुस्तकें बंगालींत निघालीं होतीं, पण बंकीमचंद्रांच्या पाहिल्याच ग्रंथानें बंगाली वाचकांचें लक्ष आपल्याकडे वेधून घेतलें व अल्पावकाशांतच त्यानें अग्रपूजेचा मान मिळविला. त्याला प्रथम कविता करायचा छंद लागला, पण आपल्याला गद्यांतच चमकतां येईल असें लौकरच त्याच्या लक्ष्यांत येऊन त्यानें कादंबरीग्रथनास आरंभ केला.

५ बंकीमचंद्राच्या कादंबऱ्यांचीं मराठींत भाषांतरें झालीं आहेत. 'दुर्गेशनंदिनी' ही पहिली कादंबरी त्यानें वयाच्या २७ व्या वर्षीं लिहिली. दुसरी कादंबरी 'कपालकुंडला.' भवभूतीच्या मालतीमाधवांतून हें नांव सुचलेलें उघडच दिसतें. बंकीमचंद्रानें यानंतर लौकरच 'वंगदर्शन' नांवाचें मासिक सुरू केलें. हें मासिक फार लोकप्रिय झालें व ह्यांतूनच त्यानें 'विषवृक्ष' ही कादंबरी क्रमशः प्रसिद्ध केली. मासिकांत कांहीं संस्कृत व बंगाली ग्रंथांवर त्यानें अतिशय बहारीचे टीकालेख प्रसिद्ध केले. त्याच्या लेखांशीं निबंधमालेंतील लेखांचें साम्य दाखवितां येईल. त्यावेळीं इंग्रजी वाङ्मयानें बंगालचे सुशिक्षित लोक मोहित झाले होते, त्यांच्या विचारांवर व राहाणीवर इंग्रजांचे पूर्ण संस्कार झाले होते व त्यांना विद्यापति वगैरे वैष्णववीरांच्या ग्रंथांविषयीं कांहींच माहिती नव्हती. अशांचा बंकीमनें खरपूस समाचार घेतला, इतकेंच काय पण त्यांना त्यानें बंगाली भाषेची गोडी लाविली व कांहींना तर बंगालींत लिहावयास लावलें. त्याची भाषा डौलदार पण साधी होती. त्याची टीका चरचरीत पण अंजन घालून डोळे उघडायला लावणारी होती. त्याच्या लेखांचा प्रभावशालीपणा त्याच्या शत्रूंसही कबूल करावा लागे. दुर्गेशनंदिनी, कपालकुंडला याशिवाय त्यानें 'विषवृक्ष,' 'चंद्रशेखर,' 'कृष्णकांताचें मृत्युपत्र,' 'आनंदमठ,' राजसीमा,' देवी चौधुराणी व 'सीताराम' इ० अनेक कादंबऱ्या प्रसिद्ध केल्या. सर्व बंगाली साक्षर समाजाला त्याच्या कादंबऱ्यांचें वेड लागलें. दृश्यकाव्याचा

किंवा नाट्यकलेचा साक्षात्कार त्याच्या कादंबरीवाचनानेंही होतो. भरतभूमीचें प्राचीन ऐश्वर्य व आर्यसमाजांतील स्त्रीपुरुषांचें उज्ज्वल गुण त्याच्या कादंबरींत प्रगट दिसतात. समाजसुधारणेचा त्यानें पुरस्कार किंवा धिक्कार केला नाहीं. तर समाजांतील उज्ज्वल व उत्कट गुणांचे आदर्श त्यानें जगापुढें ठेवले आहेत. इंग्रजी कादंबऱ्यांची मांडणी, शिस्त व व्यवस्था मात्र त्यानें उचलली; त्याच्या कादंबऱ्यांत पाश्चात्य संस्कृतीचा वास येत नाहीं. चंद्रशेखर कादंबरींत त्याच्या कलेची पूर्णावस्था दिसते. आनंदमठांत उच्च प्रतीची देशभक्ति व परमार्थप्रवणता हे गुण जवळजवळ एकरूप कसे आहेत हें त्यानें फार नामी वर्णिलें असल्यामुळें आर्यमतीलाच त्यांचें ग्रहण होणें शक्य आहे. बंकीमचंद्रानें भगवद्गीतेचें बंगाली भाषेंत भाषांतर केलें असून त्याचें श्रीकृष्णचरित्रही सुप्रसिद्ध आहे.

६. पण बंकीमचंद्राचें नांव सर्व हिंदुस्थानभर गाजून राहिलें आहे याचें मुख्य कारण त्याच्या 'आनंदमठ' कादंबरीच्या १० व्या प्रकरणांत आलेलें 'वंदे मातरम्' हें गीत होय. हें संपूर्ण गीत आजच्या अंकांत दुसरीकडे दिलें आहे. या गीताचा प्रसंगही राष्ट्रभक्तीच्या वीरभावनांना उत्तेजित करणारा आहे. सदर गीत अत्यंत प्रभावशाली असून प्रतिभेच्या तेजानें प्रकाशित झालेलें आहे. तें बंकीमच्या अर्धसमाधिस्थितींतूनच प्रगट झालें आहे. 'सुजलां सुफलां मलयजशीतलां मातरम्–' वंदे मातरम् ! बंगालची लोकसंख्या सात कोटी असल्यामुळें तेथें 'सप्तकोटिकंठकलकल निनाद कराले,' असें पद आलें आहे. ७ कोटींच्या ऐवजीं ३२ कोटी समजले म्हणजे साऱ्या भरतभूमीचा त्यांत समावेश होतो. हें मातृभूमिस्तोत्र आबालवृद्धांचें हृदय हलविणारें आहे. त्यांतील प्रत्येक पद स्फुरद्रूप आहे. बहुबलधारिणी, रिपुदलवारिणी, विद्यादायिनी अशी आपली मातृभूमि आहे. विद्या तूं, धर्म तूं, हृदय—प्राण मन—तूं, शक्ति तूं, भक्ति तूं असाच उत्कट भाव देशभक्ताच्या रोमरोमांतून खेळत असतो. 'नमामि कमलां अमलां अतुलां । सुजलां सुफलां मातरम् । वंदे मातरम् !'

७. हें गीत अर्धें संस्कृत व अर्धें बंगाली आहे. ह्या गीतानें त्यावेळीं लोकांचें लक्ष वेधलें नव्हतें. १९०५ सालीं बंगाल्यांत वंगभंगाची चळवळ जोरांत सुरू झाली व देशभक्तीचा पारा वर चढला, सारा बंगाल व महाराष्ट्र राष्ट्रभक्तीनें हादरून गेला, त्यावेळीं बंकीमचंद्राच्या आनंदमठ कादंबरींत लपून राहिलेलें हें गीत–त्याच्या जन्मानंतर सुमारें २५ वर्षांनीं–एकाएकीं पुढें आलें व साऱ्या राष्ट्राच्या तोंडीं झालें. त्या गीताला एकदम प्रसिद्धि मिळाली. मातृभूमीविषयीं प्रेमादर त्या गीतांत नितांत भरला आहे. तें शुद्ध सात्विकभावानें ओथंबलें आहे. त्यांत शत्रूविषयींही द्वेषादि हीन भावना नाहींत. उच्च मनोभूमीवर तें लोळत आलें आहे. बंगालची भूमि अगर सारी आर्यभूमि सुजला सुफला शस्यश्यामला

अतुल, अमल आहे, असें तिचें त्यांत स्तोत्र केलें आहे. ह्यांत उन्मत्तपणा नाहीं, पण तेजस्विता आहे. मातृभूमि हीच रिपुदलवारिणी आहे, दशप्रहरणधारिणी दुर्गा आहे असें म्हटलें आहे. देशभक्ति धर्मभावनामय आहे. शत्रूंची निंदा अगर आपल्या लोकांची कुत्सा यांनीं हें गान विटाळलेलें नाहीं. ह्या दोन्ही दोषांनीं दूषित झालेलीं राष्ट्रगीतें मराठी भाषेंतही पुष्कळ आहेत. वंदे मातरम् हें गीत ह्या सर्वांहून श्रेष्ठ, सर्वांहून विमल आहे. " Britons shall never be slaves, but Britons will make other nations slaves " असला उद्दाम अमंगलभाव त्यांत नाहीं. त्यांत मातृभूमीचा मोठेपणा, सौंदर्य, विपुलता, धर्म, विद्या, सामर्थ्य यांचें उदात्तवर्णन आहे. तें ऐकतांच मातृभूमिप्रेमानें हृदय उचंबळून यावें असा त्यांत हेतु आहे. हिंदुस्थानांत नाना प्रांत, नाना भाषा, नाना पंथ, नानाप्रकारचे लोक आहेत, पण बालापासून वृद्धापर्यंत, चांडालापासून ज्ञात्यापर्यंत सर्वांचीं हृदयें मातृभूमिप्रेमानें भरून टाकणारी दैवी विद्युत् त्यांत आहे. ह्या मंत्रानें राष्ट्राचा उद्धार होणार आहे. 'वंदे मातरम्' ह्या मंत्राच्या ऋषीला—बंकीमचंद्र चातर्जीला—मुमुक्षूचे अनंत प्रणाम असोत.

---

## श्रीएकनाथचरित्र. (आवृत्ति चौथी.)

१ नाथांचे पणजे भानुदास यांचें चरित्र. २ नाथांचें बाळपण. ३ नाथांचे गुरु जनार्दनस्वामी. ४ श्रीदत्तकृपा व अनुष्ठान. ५ तीर्थयात्रा. ६ नाथांचा गृहस्थाश्रम. ७ गुरुभक्ति. ८ साधुत्वाच्या गोष्टी. ९ नाथ व श्रीखंड्या. १० नाथांचे ग्रंथ. ११ अखेर. इतक्या प्रकरणांत नाथांचें पूर्ण चरित्र साधार वर्णिलें असून ' स्तुतिसुमनांजलि ' नंतर त्यांच्या ग्रंथांतील कांहीं उत्कृष्ट अवतरणें दिलीं आहेत. पृ. सं. १७६ किं. ८१२.

**केसरी**—" महाराष्ट्रीय साधुकवींच्या चरित्रांचें व ग्रंथांचें परिशीलन करून त्यांचें हृद्गत साध्या, सोप्या पण वाचकांचे मनावर विलक्षण छाप बसविणाऱ्या भाषेंत प्रगट करण्यास ज्या प्रेमळतेची, श्रद्धेची, सहृदयतेची व भाषाप्रभुत्वाची जरूरी आहे ते गुण रा. पांगारकर यांचेमध्यें पुष्कळ अंशानें वास करीत असल्यामुळें त्यांची साधुचरित्रमाला महाराष्ट्रांत लोकप्रिय झाल्यावांचून राहणार नाहीं. "

---

# विचाररत्नें.

१

चल सखी ब्रिज जाइये जहां बसत ब्रिजराज ।
दधि बेचे हरि मिले एक पंथ दो काज ॥ १ ॥

अर्थः— एक गोपी दुसरीस म्हणते, हे सखि ! चल आपण वृंदावनांतच जाऊं. तेथें व्रजाचा धणी श्रीकृष्ण राहत आहे. आपलें दही खपेल व हरीचीही भेट होईल. एक पंथ--हरीचा—धरिला कीं दोन्ही कामें होतील.

( १ ) परमार्थाच्या मार्गाला लागल्यानें परमार्थ साधतो व प्रपंचही गोड होतो.

( २ ) हरीचा हा एकच पंथ असा आहे कीं, ज्या पंथाला मनुष्य लागला असतां त्याला देवही मिळतो व त्याचा प्रपंचही नीट होतो.

( ३ ) राजकारण म्हणजे मोठा प्रपंच, राष्ट्राचा प्रपंच. हरीचा मार्ग, भक्तिपंथ, असा आहे कीं, त्यानें हरी जोडतोच पण मोठा व्यापक प्रपंचही यशस्वी होतो.

( ४ ) म्हणून राजकारणी पुरुषांनीं हरीचा पंथ सोडूं नये.

( ५ ) सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें ।
परंतु आधीं भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥ ( श्रीरामदास ).

२

पशूका होत पन्हय्या नरका कछू न होय ।
एकबार नर करनी करे तो नरका नारायण होय ॥ २ ॥

अर्थः—नुस्ता देहाचाच विचार केला तर पशुदेहापासून कांहीं हित होतच असतें, गाय दूध देते, घर सारवायला शेण देते, शेणाच्या गोवऱ्या होतात, कांहीं पशूंच्या कातडीचे जोडेही होतात. मनुष्यदेहाचा कांहींच उपयोग होत नाहीं, पण मनुष्य करणी करील तर नराचा नारायण होईल.

( १ ) नारायण होण्यापेक्षां अधिक श्रेष्ठ करणीच कोणती आहे ?

( २ ) जे होऊं ह्मणती । ते देवचि होती । ( श्रीतुकाराम )

३

तुलसी जगमे आएके जग हंसे तूं रोय ।
ऐसी करनी करचले पीछे हंसे न कोय ॥ ३ ॥

अर्थः—तुलसीदास सांगतातः–हे मानवा ! तूं जगांत येतांच जग हंसतें

व तूं रडतोस, पण लोकांत असी करणी करून जा कीं तुझ्या मरणावसरीं कोणी हंसणार नाहीं.

( १ ) मनुष्य जन्माला आला कीं या संसाराटवींत आणखी एक प्रवाशी भेटला म्हणून जगाला आनंद होतो व ‘ सोहं ’ विसरल्यामुळें ‘ कोहं ’ म्हणत तो अज्ञानानें रडूं लागतो, पण त्यानें आयुष्यभर अशीं सुंदर कृत्यें करावींत कीं त्याच्या मरणानें कोणालाच हंसूं येणार नाहीं, सारें जग त्याच्या आठवणीनें रडेल.

( २ ) जन्मतांना तूं रड व जगाला हंसीव, मरतांना तूं हास व जगाला रडीव !

## कार्यकर्त्यांसः—

( १ ) धीर्धरा धीर्धरा तकवा । हडबडूं गडबडूं नका ।
काळ देखोनि वर्तावें । सांडावें भय पोटिचें ॥ १ ॥

---

( २ ) अखंड सावधान रे । प्रसंग हा तुफान रे ।
प्रयोग प्रेत्न मान रे । नकोचि वेवधान रे ॥
प्रसंग हा कठीण हो । बहूत पावले मोहो ।
परंतु येत्न पाहती । सुखेंचि तेचि राहती ॥
विवेक पाहणें बरा । बरा विचार तो करा ।
उपासकांसि सूचना । “ उपासना उपासना ! ” ॥

---

( ३ ) धरून पक्ष काय रे । उपाय तो अपाय रे ।
तुम्ही तुम्हांस वीवरा । स्वहीत तें मनीं धरा ॥
अभेदभाक्तिचा ठसा । अनन्यभाव तो कसा ।
निवेदनेंचि वोळखा । अहंपणें झकों नका ॥

---

( ४ ) सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ती । सांगणें काय तुम्हांप्रती ।
धर्मस्थापनेची कीर्ती । सांभाळली पाहिजे ॥

---

( ४ ) जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।
जो स्वयें कष्टत गेला । तोचि भला ॥

---

( ५ ) संकटीं कंटाळों नये । करावे अत्यंत उपाय ।
तरी मग पाहतां काय । उणें आहे ? ॥
मर्दें तकवा सोडूं नये । म्हणिजे प्राप्त होतो जय ।

कार्य प्रसंग समय । वोळखावा ॥
मरण हांक तों चुकेना । देह वांचवितां वांचेना ॥
विवेकी होऊनि समजाना । काय करावें ? ॥
विवेकविचार सावधपणें । दीर्घ प्रेत्न केलाचि करणें ।
तुळजावराचेनि गुणें । रामें रावण मारिला ॥

---

( ६ ) दुसऱ्याच्या दुःखें दुखवावें । परसंतोषें सुखी व्हावें ।
प्राणिमात्रांस मेळवून घ्यावें । बऱ्या शब्दें ॥
बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करूनि बोलणें ।
तयाचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं ॥

---

( ७ ) जगदंतर निवळत गेलें । जगदंतरीं सख्य जालें ।
मग जाणावें वोळले । विश्वजन ।
लोक नाना परीक्षा जाणती । परी अंतरपरीक्षा नेणती ।
तेणें प्राणी करंटे होती । संदेह नाहीं ।

---

( ८ ) वर्ततां येत नाहीं रे । वर्तणें न कळे जनीं ।
सकळां राखणें राजी । हे मुख्य भक्ति जाणिजे ॥
जीवांत जीव घालावा । चालावा भक्तिमार्ग हा ।

---

( ९ ) जीव जीवांत घालावा । आत्मा आत्म्यांत मिसळावा ।
राहराहों शोध घ्यावा । परांतराचा ॥
श्रेष्ठ कार्य करी श्रेष्ठ । कनिष्ठ करी तो कनिष्ठ ।
कर्मानुसार प्राणी नष्ट । अथवा भले ॥

---

( १० ) मुलाचे चालीनें चालावें । मुलाच्या मनोगतें बोलावें ।
तैसें जनांसी शिकवावें । हळूहळू ।
उदंड स्थळीं उदंड प्रसंग । जाणोनि करणें यथासांग ।
प्राणिमात्रांचा अंतरंग । होवोनि जावें ॥

---

# मुक्ताबाई व जनाबाई.

## १ मुक्ताबाई.

१ ज्ञानेश्वरांची धाकटी बहिण मुक्ताबाई ही जीवन्मुक्त कोटींतलीच होती. निवृत्तिनाथांचा ज्ञानेश्वर, सोपानदेव व मुक्ताई ह्या तिघांसही उपदेश असे. हें संप्रदायाच्या दृष्टीचें बोलणें आहे, तत्वतः चारही भावंडें एकाच परब्रह्ममुशींतून ओतलीं होतीं. नामदेवांनीं म्हटल्याप्रमाणें हे ' परब्रह्मीचे ठसे ' होते. एका ब्रह्मपदीं आरूढ झालेले हे चार संत लौकिकांतही परस्परांशीं अत्यंत प्रेमानें वागत. सोपानदेव व मुक्ताई यांचा निवृत्तिनाथांप्रमाणेंच ज्ञानेश्वरांविषयींही गुरुभाव होता. ' मुक्ताई तारक सम्यक विठ्ठल । निवृत्तीनें चोखाळ दाखविलें, ' ' निवृत्तीनें दिधलें आमुच्या करीं,' 'आदि अंतीं खुण निवृत्तीची' इ० प्रकारें हरितत्त्व निवृत्तिनाथांनीं ' आमुच्या करीं ' दिलें असें मुक्ताईनीं जागोजाग ह्मटलें आहे. मुक्ताईच्या अभंगांवरून विठ्ठलभक्तीचा, नामस्मरणाचा व कथाकीर्तनाचा मार्ग त्यांनीं चोखळला होता तरी त्यांना ' नादबिंदु, शून्याशून्य, मनपवनयोग, सत्रावी, अनाहत ध्वनि, सहस्र दळ, अजपाजप ' ह्या योगमार्गाच्या खुणा चांगल्याच ठाऊक होत्या अर्थात् त्या गुरुमार्गांत चांगल्या निष्णात होत्या हें अगदीं स्पष्ट आहे. चांगदेवासारखा योगनिपुण पंडित त्यांच्या पायीं लागला तो कांहीं उगीच नाहीं. त्यांच्या अंतरंगाच्या खुणा त्यांच्या त्यांनाच ठाऊक, मुक्ताई **योगानुभवांत निष्णात** होत्या व शिवाय त्यांच्यापाशीं **अद्वैतानुभव व सगुणप्रेम उत्कट होतें** म्हणूनच त्यांचे चांगदेवांनीं पाय धरिले. मुक्ताबाईचें वय लहान, पण अधिकार केवढा होता !

मुक्त जीव सदा होती नामपाठें । तेचि रूप इटे देखिले आह्मीं ॥ १ ॥
पुंडलीकें विठ्ठल आणिला पंढरी । आणूनी लवकरी तारी जन ॥ २ ॥
मुक्ताई चिंतनें मुक्त पै झाली । चरणीं समरसलीं हरिपाठें ॥ ३ ॥
मुक्ताई जिवन्मुक्तचि सर्वदा । अभिनव भेदा भेदियेलें ॥ ४ ॥
मुक्ताई श्रीहरी उपदेशी निवृत्ती । संसार पुढती नाहीं आह्मां ॥ ४ ॥
मुक्ताई परिपाक अवघें रूप एक । देखिलें सम्यक सोहंभावें ॥ ५ ॥
प्रारब्ध संचित आचरण गोमटें । निवृत्तितटाकें निघालों आह्मीं ॥ १ ॥
मुळीचा पदार्थ मुळीं पै गेला । परतोनि अबोला संसारासी ॥ २ ॥
मुक्ताईचें चित्त निरंतर मुक्त । हरि हेचि संचितं आह्मां वरीं ॥ ३ ॥

निवृत्तीनें दिली शक्ती । चित्त पावलें विश्रांती ॥ १ ॥
विसांविया आलें मन । मन जाहलें उन्मन ॥ २ ॥
धन्य जीविताची थोरी । एकविध चराचरीं ॥ ३ ॥
भास मावळला ठायीं । सुखी झाली मुक्ताबाई ॥ ४ ॥

ह्या जीवन्मुक्ताचा अधिकार जीवन्मुक्तांनींच ओळखावा !

२. सदाचारानें वागा, भूतदया ठेवा व हरिहरि म्हणा, एवढाच साधा उपदेश मुक्ताईनें जनांस केला आहे:—

आधीं तूं मुक्त होतासि प्राणिया । परी वासना पापिणियां नाडलासी ॥१॥
आधीचें आठवी मग घेई परी । हरिनाम जिव्हारीं मंत्रसार ॥२॥

' तत्वमसि ' ह्या वाक्यानें आपलें निजरूप ओळखून घे व मग स्थिरतेसाठीं जिव्हारीं हरिचिंतन करीत रहा. ' सर्वी सर्व सुख । अहं तेचि दुःख ' अहंकार हा दुःखाच्या खाईत लोटणारा आहे. म्हणून त्याचा त्याग करून सर्वीं सर्व होऊन रहा कीं सगळें सुखच आहे. ' नाममंत्र आम्हां हरिरामकृष्ण ' म्हणून तूंही हरिनाम घे. 'हरिनामछंदाची गोडी थोरी आहे' हें तुला आम्हीं आपल्या अनुभवानें सांगतों. ' हरिप्रेम पोटीं नित्यनाम घोटी म्हणजे तूं मुक्त होशील' ' रामकृष्णें मुक्त झाले पै अनंत । तारिलें पतित युगानुयुगीं ' पथ्य एकच आहे. 'शांति क्षमा दया सावध पै चित्तीं । आनंदें डुलती सनकादिक. '

सहस्त्रदळीं हरी आत्मा हा कुसरी । नांदे देहाभीतरीं अलिप्त सदा ॥१॥
अलिप्त श्रीहरी सेवावा श्रीहरी । सेवितां झडकरी हरिच हा आल ॥२॥

नाना साधनें कराल पण हरिप्रेमाचा कळस न बसवितां कित्येकांचे श्रम व्यर्थ जात आहेत. कां कीं ' **जाताती वाउगे नटनाट्य सोंगें । चित्त अनुरागें भजती ना**'आम्ही मुक्त आहोंत अशा अभिमानानें सगुणप्रेम सोडून देतात हें ठीक नाहीं.

मुक्तपणें ब्रीद बांधोनियां द्विज । नेणती ते बीज केशव हरी ॥१॥
**ज्यानेंनि मुक्तता सर्वही पै मुक्त । होऊनियां रत न सेविती** ॥ २ ॥
मुक्ताई मुक्त हरिनाम सेवित । **अवघेंचि मुक्त सेवितां हरी** ॥ ४ ॥

आम्ही मुक्त आहोंत या अभिमानांत काय अर्थ आहे ? मुक्तता देणारा हरी सेविल्यावांचून कोण मुक्त होईल ? मुक्ताई मुक्त असून हरिनाम सेवित आहे. हरिभजनानें अवघेंचि मुक्त होतात. ज्ञानबळानें एखादाच मुक्त होईल, पण भक्तिमार्गानें गेल्यास तुमच्या मार्गास अवघे येऊन मिळतील व अवघेच मुक्त होतील. **'अवघेंचि मुक्त सेवितां हरी '** हा सिद्धांत अत्यंत महत्त्वाचा आहे. साधुसंतांनीं जो हरिभक्तीचा मार्ग लोकांस घालून दिला व ते स्वतः त्या मार्गानें गेले या गोष्टीचें रहस्य येथें आहे. हरिभक्तीचा मार्ग लोकसंग्रहकारी आहे. ' भ्रांतीचेनि भुली वायांचि घरकुली । माथा आड ठेली अरे

-रया ' देहाहंकाराच्या घरकुलांत न राहतां भक्तीच्या मैदानांत यें म्हणजे तूं स्वतः तर तरशील पण अवघ्यांना तारल्याचें महत्पुण्य लागेल. आम्हांस सर्वच ब्रह्मरूप असल्यामुळें ' **अवघाचि संसार केला आम्ही गोड** ' तसा तुम्हींही सर्व ब्रम्हभावानें पहा म्हणजे ' **आनंदाचें लेणें मुक्ताबाई ल्याली** ' तें लेणें तुमच्याही अंगावर पडेल. याला कांहीं धरावें टाकावें लागत नाहीं—' सांडणें मांडणें दोन्ही नाहीं. ' वासना व वितंडवाद सोडून हरिप्रेमसुख भोगावें. ' विरक्त म्हणवी आणि इच्छेचा पाइक, ' वेदशास्त्रवक्ता आणि वितंडवादक, तसाच ' योगिया म्हणती आणि इंद्रियाचा रंक '—काय म्हणावें याला ! ' तयाचा **विवेक जळो परता !'**

मुक्ताई म्हणे ज्याचा परमार्थ माइकु । तयाचा विवेकु जळो परता ॥

२ मुक्ताबाईचे ' **ताटीचे अभंग** ' प्रसिद्ध गाथ्यांतून सांपडत नाहींत. वारकरी ते प्रायः मानीत नाहींत, तथापि ते मुक्ताबाईंचेच असावेत असें मला वाटतें. ते अभंग उंची आहेत यांत शंकाच नाहीं. लोकनिंदा व छल होत असतांना एकदां ज्ञानेश्वर रागावून व रुसून ताटी लावून आंत बसले, बाहेर येईनात, अशा वेळीं मुक्ताईनें बाहेरून ' ताटी उघडा ज्ञानेश्वरा ' अशी त्यांची विनवणी केली असा कांहींसा या अभंगांचा संदर्भ असावा. हे अभंग या अर्थानें फार गोड आहेत. यांत बहिणभावांचा मधुरप्रेमा सुव्यक्त आहे. मुक्ताईची लाडिकपणाची धिटाई व त्याचबरोबर बंधूच्या योग्यतेची जाणीव हे भाव मोठ्या कोमलवाणींत प्रकट झाले आहेत. काव्य मुक्ताईचें नसलें तरी जो कोणी अभंगरचनाकार असेल त्याची कल्पकता व मधुर कोमलता त्यांत स्पष्ट आहे. ज्ञानेश्वर रागावले व मुक्ताईनें त्यांची समजूत पाडली ही कल्पना ज्यांना सोसवत नसेल त्यांनीं काव्यदृष्टीनें या अभंगांकडे पहावें किंवा रागाची फार मोठी कल्पना न करितां **लाडिकपणाचा रुसवा व लाडिकपणाची समजाविस** या लाडिकपणाच्या बुद्धीनेंच त्यांकडे पहावें. **ताटी ह्म० बुद्धीचें द्वार** असाही अर्थ असूं शकेल. पण तेथें खोलपणांत न जातां सिद्धाईचा अधिकार असलेल्या बहिणभावांचा हा कोमल भाषणप्रकार असावा असें समजल्यास त्यांत गैर काय आहे ? सिद्धांच्या मानवस्वभावानुसार केलेल्या लीलाही कौतुकावह असतात. आईबापांनीं बाळपणींच सोडून गेलेल्या, लोकछलांत सांपडलेल्या बहिणभावांनीं लहानमोठेपण विसरून जिव्हाळ्याच्या प्रेमानें एकमेकांची समजूत कोमल वाणीनें पाडणें यांत तरी गैर काय आहे ? श्रीकृष्णाच्या बाललीला अनेक प्रसिद्ध आहेत. त्याचसारखी ही एक ज्ञानेश्वरांची लीला आहे व यांत कसलाही कमीपणा नाहीं. असो. ताटीबाहेरून मुक्ताई कोमल प्रेमभावानें आपल्या भावाची समजूत कशी काढते तें कोमल मनानें ऐका:—

[ १ ] योगी पावन मनाचा । साही अपराध जनाचा ॥ १ ॥
विश्व रागें झालें वन्ही । संतें सुखें व्हावें पाणी ॥ २ ॥
शब्दशस्त्रें झाले क्लेश । संतीं मानावा उपदेश ॥ ३ ॥
विश्वपट ब्रह्मदोरा । **ताटी उघडा ज्ञानेश्वरा** ॥ ४ ॥

[ २ ] संत तेचि जाणा जगीं । दया क्षमा ज्यांचे अंगीं ॥ १ ॥
लोभ अहंता न ये मना । जगीं विरक्त तेचि जाणा ॥ २ ॥
इहपर लोकीं सुखी । शुद्ध ज्ञान ज्यांचे मुखीं ॥ ३ ॥
मिथ्या कल्पना मागें सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ४ ॥

[ ३ ] एक आपण साधु झाले । येर कोण वायां गेले ? ॥ १ ॥
उठे विकार ब्रह्मीं मूळ । अवघे मायेचें गाबाळ ॥ २ ॥
माया समूळ नुरे जेव्हां । विश्वब्रह्म होइल तेव्हां ॥ ३ ॥
चिंताक्रोध मागें सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ४ ॥

[ ४ ] ब्रह्म जैसें तैशापरी । आह्मां वडिल भूतें सारीं ॥ ॥ १ ॥
अहो क्रोधें यावें कोठें ? । अवघे आपण निघोटे ॥ २ ॥
जीभ दांतांनीं चावली । कोणें बत्तीशी पाडिली ॥ ३ ॥
मन मारुनि उन्मन करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ४ ॥

अशी मधुरवाणीनें उपदेशरूप विनवणी 'लडिवाळ मुक्ताबाईनें' केली, हेतु हा कीं:—

तुम्हीं तरूनि विश्व तारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ४ ॥

४ चांगदेव उर्फ **चांगा वटेश्वर** हें तापीतीरचे रहिवासी. खानदेशांत सातपुड्यालगत **एदलाबाद** नामक एक जुनाट शहर आहे. तेथून जवळच चांगदेव नांवाचें गांव आहे. हा गांव तापी व पयोष्णा उर्फ पूर्णा या नद्यांच्या संगमावर आहे. चांगदेवानंतर नदीकांठीं टेकडीवर चांगदेवाचें देऊळ बांधलें गेलें तें अनेक दुरुस्त्या होऊन शिल्लक राहिलें आहे. देऊळ भव्य असून त्याच्या दारावर प्राचीन शिलालेख आहेत पण ते नीट लागलेले नाहींत. देऊळ यादवकालीन आहे. चांगदेवगांवाला पूर्वीं सुंदरपूर म्हणत असें सांगतात. एदलाबाद येथें मुक्ताबाईचें मंदिर असून दरवर्षीं माघ वद्य ११ ला २०।४० हजारांवर मुक्ताबाईची यात्रा भरते. हा सर्व टापू मुक्ताबाई व त्यांचे शिष्य चांगदेव यांच्या नांवांनीं दुमदुमून राहिला आहे. संगमावर ज्ञानेश्वर व त्यांची मंडळी भजन कीर्तन करीत गात नाचत असे चांगदेव, विसोबा खेचर, परिसा भागवत यांच्या कवितेंत उल्लेख आहेत. त्यावरून चांगदेव ज्ञानेश्वर मंडळांत समाविष्ट झाल्यावर त्यांच्या प्रेमाग्रहास्तव ही मंडळी तिकडे गेली असावी असें दिसतें. चांगदेव नांवाचे पांचचार पुरुष गेल्या सातशें वर्षांत होऊन गेले आहेत. त्यांपैकीं चांगा वटेश्वर व चांगा केशवदास हे दोघे ज्ञानेश्वरांचे समकालीन

होते बाकी चांगा मुधेश ( शके १४२७ ), व चांगा मरुद्गण वगैरे मागून झालेले आहेत. चांगा वटेश्वर हे महायोगी म्हणून गाजल्यानंतर त्यांचें नांव त्यांच्या वंशांत म्हणा किंवा संप्रदायांत म्हणा पुढें अनेकांनीं घेतलें होतें. असो. आपला संबंध येथें चांगा वटेश्वर यांच्याशीं आहे. हे महायोगी होते व योगबळानें मृत्युकाळ समाधिस्थ होऊन हे टाळीत. हे **चौदाशें वर्षे** जगले होते, असें यांचें वर्णन केलेलें आढळतें. योगबळानें हे दीर्घकाळ वांचले होते याविषयीं शंका नाहीं अनेक सिद्धि यांना अनुकूल होत्या. यांचें सविस्तर चरित्र माझ्या श्रीज्ञानेश्वर चरित्रांत ' चांगदेव आणि ज्ञानदेव ' नामक आठव्या प्रकरणांत दिलें आहे. ज्ञानेश्वरांनीं रेड्याकडून वेद बोलविल्याची लोकोत्तर वार्ता यांच्या कानावर जाऊन यांना कौतुक वाटलें व यांनीं पत्र लिहिण्याचें योजलें. पण मायना काय ' चिरंजीव ' लिहावा कां ' तीर्थरूप ' हें न ठरून त्यांनीं कोरेंच पत्र शिष्याबरोबर पाठविलें. मुक्ताबाई आपल्या बालवयानुरूप विनोदानें तें पत्र हातीं घेऊन म्हणाल्या कीं, ' **चौदाशें वर्षे वांचून चांगदेव कोराचा कोराच राहिला.**' यानंतर चांगदेव वाघावर बसून व हातीं सापाचा आसूड घेऊन ज्ञानेश्वरादिकांस भेटण्यास आळंदीस आले. हीं भावंडें तेव्हां भिंतीवर आत्मसुखानुभवांत तल्लीन होऊन बसलीं होतीं. चांगदेव थाटानें शिष्यांच्या जयघोषांत येतांच ज्ञानेश्वरांनीं भिंतीस ' चल वये ' म्हणून आज्ञा केली. तों ती **भिंत चालूं** लागली ' हा चमत्कार पाहतांच चांगदेव हतगर्व झाले. व्याघ्रसर्पासारख्या सचेतन प्राण्यांवर ते सत्ता चालवीत. पण अचेतन जड पदार्थावरही ज्ञानेश्वरांची सत्ता चालते हें पाहून ते त्यांना शरण गेले. ज्ञानेश्वर योगी असून आत्मनिष्ठ होते. योगाची अद्वैतानुभवापुढें मात्रा चालत नाहीं, हें जाणून त्यांचा अभिमान गळाला व ते ज्ञानेश्वरास शरण गेले. पण ज्ञानेश्वरांनीं त्यांस ' **चांगदेव पासष्टी** 'चा बोध केला तरी त्यांचें सद्‌गुरुपण मुक्ताबाईकडे गेलें. श्रीज्ञानेश्वर आपणांहून वरिष्ठ खरे, पण मुक्ताबाई काय केवळ पोर व त्यांतही स्त्रीजात असा कांहींसा गुप्त अहंकार त्यांच्या चित्तीं वसत होता व तो जाण्यास्तव ज्ञानेश्वरांनीं मुक्ताबाईंची सद्‌गुरुपदीं योजना केली. मुक्ताबाईचाही अधिकार फार थोर आहे हें त्यांस कळून येतांच त्यांनीं त्यांचे पाय धरिले व मुक्ताबाईंनीं त्यांस गुरुगुह्य सांगून आत्मपदीं चढविलें. मुक्ताबाईंच्या व चांगदेवांच्या अभंगांत ही गोष्ट स्पष्ट आहे. मुक्ताबाई ही आपली आई व आपण तिचें मूल अशी चांगदेवाची भावना होती व चांगदेवालाही ती मुक्ताबाई आपला पुत्रच समजत असे, अशा भावार्थाचे उभयतांचेही अभंग आहेत. मुक्ताबाईनें अध्यात्मयोगाचें रहस्य चांगदेवास सांगितलें व त्याला कवाइतीच्या योगविधीपासून परावृत्त केलें. " गुण ना निर्गुण शब्दातीत । तेथें तूं निश्चित

बाळा निज ॥ पाळणा लाविला हृदयकमळीं । मुक्ताई जवळी सादविते " अशा प्रकारें ' वटेश्वरसुत चांगा अवधूत । मुक्ताई शांतवीत ज्ञानदृष्टी '

निर्गुणाचे डाहाळी पाळणा लाविला । तेथें सुत पहुडला मुक्ताईचा ॥ १ ॥
निज निज बाळा न करी पै आळी । अनाहत टाळी वाजविते ॥ २ ॥
एकवीस सहस्र साहशेंवेळे बाळा । तोही डोळा स्थिर करी ॥ ३ ॥
निद्रा ना जागृती निजसी रे काई । परियेसी चांगया बोले मुक्ताबाई ॥ ४ ॥
बाळक चुकलें सकुमार तान्हुलें । तेणें पै सांडिलें मायाजाळ ॥ १ ॥
जो जो जो जो पुत्रातें निजवी । अनुहत वोवी निःशब्दाची ॥ २ ॥
मावळली दिशा वाचा पै खुंटली । माया ही भेटली मुक्ताबाई ॥ ३ ॥
अविनाश पाळणा अव्यक्तें विणिला । तेथें पहुडला योगिराज ॥ १ ॥
सोहं सोहं षट्चक्रन्यासें । तुज परिये देतां मीच न दिसे ॥ २ ॥
ऐसी निद्रा तुज लागो दे पुत्रा । मुक्ताई खेचरा उपदेशी मंत्रा ॥ ३ ॥

मुक्ताबाईनें चांगदेवास खेचरीमंत्राचा उपदेश करून ' सोहंभावें अखंडित राहीं ' असा आशीर्वाद दिला. चांगदेव म्हणतात कीं, ' मूळीचा चांगा नाहींसा झाला ' व मातृबुद्धीनें ' **मुक्ताईकरें लेइलें अंजन । चांगया निधान उपदेशिलें.**' चांगदेवाचा पुनर्जन्म झाला व ' मुक्ताई म्हणे चांगया भला भला ' म्हणजे त्याचें नांव जाऊन चांगया म्ह० चांगला, भला भला असें मुक्ताईनें त्याचें नवें नामकरण केलें. मुक्ताईमातेनें आपल्या मुलास ज्ञानामृताचें स्नान घातलें, अव्यक्तानें विणलेल्या अविनाशी पाळण्यांत घातलें, त्याच्या डोळ्यांत अंजन घातलें, त्याचें नामकरण केलें, अनुहत टाळी वाजवून व कानांत खेचरीमंत्र सांगून त्याला स्वस्वरूपीं निजविलें व मनपवनाचा दोर हातीं घेऊन व अजपाजपावर त्याचा डोळा स्थिर करून झोके देत ज्ञानदृष्टीनें शांतवीत राहिली. हा सर्वच प्रकार अपूर्व आहे. चांगदेवाचें वय काय, मुक्ताईचें काय, पण तो विचारच कशाला ? ' ' न खलु वयस्तेजसो हेतुः'—' **चांगा सोय धरी ज्ञानवटेश्वरीं । मुक्ताई जिव्हारीं बोध करीं** '.

चांगयाचें वऱ्हाड मुक्ताईनें केलें । मूळ जें फेडिलें जन्मांतरिचें ॥ १ ॥
आजवर होतों भाजियेलें हाड । नाचे संतांपुढें स्फुंद स्फुंदे ॥ २ ॥
चौदा शतें झालीं बुद्धि माझी गेली । सोय दाखविली मुक्ताईनें ॥ ३ ॥
धन्य निवृत्तिदेव धन्य सोपानदेव । परब्रह्म ठेव दाखविली ॥ ४ ॥
धन्य ज्ञानदेव धन्य मुक्ताबाई । चांगा म्हणे आईपोटीं आलों ॥ ५ ॥
आनंदवनीं भ्रमत होता । झुंकारें उडाला गेला केउता ॥ १ ॥
नाम नाहीं रूप नाहीं । पाहों गेलों तंव कांहींच नाहीं ॥ २ ॥
**रुंझी राहिली शब्द निमाला** । वटेश्वरीं चांगा विस्मित जाला ॥ ३ ॥

## २ जनाबाई.

५. ज्ञानेश्वरकालीन वाङ्मयांत किंबहुना संपूर्ण मराठी वाङ्मयांत जनाबाईचें स्थान विशेष महत्त्वाचें आहे. नामदेवांच्या घरची दळणकांडण करणारी आईबापविरहित पोरकी झालेली सामान्य दासी पण केवढ्या अधिकाराला पोंचली ! ' नामदेवाचे घरीं । चौदाजण स्मरती हरी ' —नामदेवाचे चौघे पुत्र, चौघी सूना, ' नित्य स्मरती नारायणा; ' दामा व गोणाई हे नामदेवाचे आईबाप; स्वतः नामदेव व त्याची स्त्री राजाई; नामदेवांची बहीण निंबाबाई व लेक आऊबाई हे चौदा व ' पंधरावी ती दासी जनी ' अशीं पंधराजणें पांडुरंगाचें भजन करीत. पंधराहीजणांनीं थोडेफार अभंग केले आहेत, पण ह्या पंधराहीजणांत नामदेव व जनाबाई यांच्या वाणींतला प्रेमळपणा कांहीं और आहे; खुद्द नामदेव व जनाबाई यांच्या अभंगवाणींत सरसनिरस ठरविणें कठिण आहे. जनाबाईंच्या अभंगांवर नामदेव व ज्ञानेश्वर ह्या दोघांच्या वाणीची छाप पडलेली आहे, दोघांतली गोडी त्यांत असून जनाबाईपणाची अंतरंगगोडीही अद्भुत आहे. तिच्या अभंगवाणींत नामदेवांची सगुणप्रीति आहे व ज्ञानेश्वरांची योगानुभूतिही आहे. तिच्या अभंगांत भक्तीची माधुरी व योगाची खोली दोन्ही अथांग असून सारे अभंग प्रेमानें ओथंबलेले, सरळ, सोपे व अत्यंत प्रासादिक आहेत. जनाबाईच्या वाणीला कृष्णनाथाच्या मुरलीचीच उपमा द्यावीशी वाटते. तिचे ३५० च अभंग उपलब्ध आहेत. त्यांनीं अतृप्ति होते. व आणिक अभंग मिळत नाहींत याबद्दल चुटपुट वाटते. हे मथुरेचे पेढे आहेत, त्यांना आंतबाहेर कांहीं नाहीं, सगळेच्या सगळे जिव्हेवर ठेवतांच विरघळून पोटांत जातात व आणखी मिळावेत अशी असोशी वाढते. तिच्या विठ्ठलभक्तीपुढें तर्क, कल्पनाशक्ति थिजून जाते. नवल वाटतें कीं, विठ्ठलाला ही पोरकी पोर इतकी कां आवडली ? तिची अनेक जन्मार्जित पुण्यसंपत्ति लोभनीय आहे. ज्ञानेश्वरनामदेवांची दोघांची ती लाडकी, दोघांनीं तिला भक्तिज्ञानयोगाचा खाऊ दिला व तिनें तो चटकन् खाऊन पूर्ण पचविला. ' आदि ठाणें पंढरपूर । नांदे कान्हाई सुंदर ' अशा ' विठाबाई आनंदीचा ' लो ( छंद ) लागून गोणाईच्या पोटीं नामदेव आले तेव्हां ' दामाशेटी हरुषला । दासी जनीस आनंद झाला—' ह्या अभंगावरून नामदेवांचा जन्म पंढरपुरासच झाला व तेव्हां नामदेवांच्या आईबापांजवळच धाकटी जनाबाई घरकाम करण्यास राहिली होती, अर्थात् जनाबाई नामदेवांपेक्षां वयानें थोडी वडील होती. असें वाटतें कीं, जनाबाईसाठींच नामदेवांचा अवतार झाला. गोदातीरीं गंगाखेड येथें दमा नामक शूद्राच्या पोटीं जनीचा जन्म झाला. तिचे आईचें नांव करुंड असें होतें. दमानें पंढरीस येऊन दामशेटीचे स्वाधीन तिला केलें. तो निघून गेला. तेव्हांपासून ती दामशेटीचे घरींच काम धाम करून असे.

' माय मेली बाप मेला । आतां सांभाळी विठ्ठला ॥ मतिमंद तुझी दासी ठाव द्यावा पायापाशीं ॥ ' अशी उत्कट भावना धरून ती पंढरीस दामशेटच्या घरीं कामाला राहिली, तेथें नामदेवांचा जन्म झाला, नामदेवाला तिनें बाळपणापासून अंगाखांद्यावर खेळविला, व नामदेवाला–आपला धनी, –गुरु व सर्व आधार मानून ती शरण गेली व ' नामयाची दासी जनी ' ' वेडी जनी ' म्हणून जगांत वावरली. ज्ञानेश्वर पंढरीस आले व त्यांची व नामदेवांची गांठ, भेट होऊन रहस्य जमलें. तेव्हां ' धन्य हे पंढरी, धन्य नामदेव, धन्य पंढरिराव ' व ' धन्य ज्ञानदेव धन्य त्याचा भाव ' असे आनंदाचे उद्गार काढीत जनाबाईंत ' पालट पै झाला. ' कां कीं खास तिला ' भेटावया आला पांडुरंग ! ' देवळांतून सगळी मंडळी निघून गेल्यावर व कामधाम आटोपल्यावर रात्रींचे प्रहरीं जनाबाई विटाई माउलीला आळवीत, त्याचें ' **रूप न्याहाळीत डोळां । पुढें नाचत वेळोवेळां** ' सर्वांठायीं हरीला पाहत व गात असतांना ' धांवा करितां रात्र झाली । दासी जनीसी भेट दिली।' सर्वांठायीं हरि दिसावा यासाठीं ' गुण दोष मना नाणी । म्हणे बहिरी होये जनी ' कोणाचेही गुणदोषांची उठाठेव स्वतः करायची नाहीं व कोणी बोलूं लागले तर ते कानांनीं ऐकायचे नाहींत व मनांत घ्यायचे नाहींत, असा फार मोठा अभ्यास जनाबाईनें केला. ह्या अभ्यासाशिवाय सर्वांठायीं हरी दिसत नाहीं. ' ऐसा पुत्र देई संता । तरी त्या आवडी पंढरिनाथा ॥ गीता नित्यनेमें । वाची ज्ञानेश्वरी प्रेमें ॥ कन्या व्हावी भागीरथी । जिचें प्रेम तुझे चित्तीं '' असें जनाबाईनीं म्हटल्याप्रमाणें त्या स्वतः गीता–ज्ञानेश्वरीचें श्रवणमनन करीत व देवाचें प्रेम चित्तीं अखंड ठेवून त्याच्या नामानंदांत विरघळून जात. नामदेवाचें घर देवासमोर; तेव्हां वेळ सांपडेल तेव्हां दिवसारात्रीं देवळांत जाण्याचा त्यांचा क्रम असे. नामदेवाचे अभंग ऐकतां ऐकतां जनाबाईला अभंगांत देवाचे गुणानुवाद गायची स्फूर्ति होऊन तिचे मुखांतून अभंग निघत व ते देवाला फार फार आवडत. जनाबाई देवळांत नित्य जाण्याचा वापर असल्यामुळें एकदां ' पदक विठ्ठलाचें गेलें । ब्राह्मण म्हणती जनीनें नेलें.' जनाबाईवर चोरीचा आळ आला ! ' अगे शिंपियाचे जनी । नेलें पदक दे आणुनी ॥ देवासमोर तुझें घर । तुझें येणें निरंतर ' असें पुजारी म्हणूं लागले. तिनें 'सत्याविठ्ठलाची आण' घेऊन मीं चोरी केली नाहीं म्हणून पुष्कळ सांगितलें, पण तिचें ऐकतो कोण ? चाळीसजण तुटून पडले. तों देवाची करणी–तिच्या अंगावरच्या धोतरांतून पदक खालीं पडलें ! मग काय ? ' दंडा लावल्या काढण्या ' तेव्हां ' विठो धांव रे धावण्या ' अशी देवाची करुणा भाकण्याशिवाय तिच्याजवळ कांहीं उरलेंच नाहीं ! ' चंद्रभागे लाविला सूळ । जनाबाईस आलें मूळ ! ' मरण्याची पाळी आली. ' ऐसा येळकोट केला । जनी ह्मणे विठो मेला' ॥ 'तंव सूळाचें झालें पाणी । धन्य ह्मणे दासी जनी !' देव भक्ताचें

संकटीं कसें रक्षण करितो याचा प्रत्यय आल्यावर जनाबाईची विठ्ठलावर अधिक दृढतर निष्ठा बसली. **जनाबाईच्या अभंगांत** देव भक्ताला कसे सांभाळतो व त्याचीं संकटें निवारून त्याचे लाड पुरवितो हें अनेकवार द्रौपदी, उपमन्यु, गजेंद्र, अजामीळ, ध्रुव, प्रल्हाद, बळी, भिल्लीण म्हणजे शबरी, मारुति, शुक इत्यादिकांचीं उदाहरणें देऊन त्यांनीं सांगितलें आहे व राधामुरारींचें अन्योन्य-प्रेम वाखाणून व शिवाय हरिश्चंद्राख्यान व थालीपाक यावर सुरस आख्यानें रचून त्यांनीं भाविकांसही बोध केला आहे. जनाबाईनीं आपल्या साधुवृत्तीला अनुसरून आपल्या मेळ्यांतल्या, संगतींतल्या समकालीन साधुसंतांच्या कथा सांगून त्यांच्याही उदाहरणांवरून भक्तिभावाचेंच उद्दीपन केलें आहे. लौकिक ग्रंथकार प्राचीनांना पूज्य मानतात व समकालीनांवर प्रायः दुगाण्या झाडतात; याच्या उलट साधुशील स्त्रीपुरुषांची मनोवृत्ति असते. त्यांना प्राचीन वा अर्वाचीन सज्जनांचें गुणगौरव करण्यांतच मोठें समाधान वाटतें, ते देशकालपरिस्थितीच्या पलीकडे बसून उत्तमाचें उत्तमत्व वर्णन करण्यांत सुखसंतोष मानतात; आणि जनाबाईंच्या थोर भाग्यानें त्यांच्या भोंवतीं उत्तमोत्तम संतसज्जन वावरतच होते. सेना न्हावी, गोरोबा कुंभार, चोखा मेळा, यांविषयीं त्यांनीं प्रेमोद्गार काढले आहेत. नामदेव, सोपानदेव व ज्ञानेश्वर यांविषयीं तर गुरुभाव होता, त्यांचें त्यांनीं अत्यंत आदर व प्रेमपूर्वक गुणगौरव केलें आहे.

विठो माझा लेंकुरवाळा । संगें लेंकुरांचा मेळा ॥ १ ॥
निवृत्ति हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी ॥ २ ॥
पुढें चाले ज्ञानेश्वर । मागें मुक्ताई सुंदर ॥ ३ ॥
गोरा कुंभार मांडीवरी । चोखा जीवा बरोबरी ॥ ४ ॥
बंका कडियेवरी । नामा करांगुळी धरी ॥ ५ ॥
जनी ह्मणे रे गोपाळा । करीं भक्तांचा सोहळा ॥ ६ ॥

'सेना न्हावी याचे घरीं । अखंड राबे विठ्ठल हरी ' सेना न्हावी भक्त भला । तेणें देव भुलविला ॥ १ ॥ नित्य जपे नामावळी । लावी विठ्ठलाची टाळी ॥२॥ याप्रमाणें सेनाचें गौरव करून राजाला सेनाच्या दर्पणांत विठ्ठल दिसला ही गोष्ट जनाबाईनीं सांगितली आहे. ' गोरा कुंभाराच्या संगें । चिखल तुडवूं लागे अंगें ' ' चोखा मेळ्यासाठीं । ढोरें ओढी जगजेठी ' हीं उदाहरणें देव भक्तांचा पाठीराखा कसा आहे हें सांगतांना दिलीं आहेत. ' देव दळी जनी घरीं ' हा स्वानुभाव तर त्यांनीं पुष्कळदां सांगितला आहेच. ' चोखा मेळा अनामिक । भक्तराज तोचि एक ' ' वैष्णव तो एक चोखामेळा महार । जनी म्हणे निर्धार केला संतीं ' असा चोखा मेळ्यांचा सर्वसंमत वैष्णवपणा सांगून जनाबाई म्हणतातः—

चोखा मेळा संत भला । तेणें देव भुलविला ॥ १ ॥
भक्ति आहे ज्याची मांठी । त्याला पावतो संकटीं ॥ २ ॥
चोखा मेळ्याची करणी । तेणें देव केला ऋणी ॥ ३ ॥
लागा विठ्ठल चरणीं । ह्मणे नामयाची जनी ॥ ४ ॥

देव चोखामेळ्याचा ह्मणियारा म्ह० सेवक झाला व त्यानें आपला देव बाटविला हें पाहून 'हांसे जनी गाणें गाय !' वडिलपणें किंवा गुरुपणें पूज्य असे सोपानदेव, नामदेव, ज्ञानेश्वर यांजविषयीं जनाबाईंना काय वाटत होतें तें पाहूं. नामदेव जनाबाईंचे धणी व गुरु, सारा परमार्थ त्यांच्या कृपेनें झालेला, त्यांच्या संगतीनें ज्ञानेश्वरादि संतांच्या गांठीं पडलेल्या, त्यांच्यामुळें विठ्ठल सोपा झालेला. तेव्हां नामदेवांविषयीं त्यांचा प्रेमादर अलोट होता यांत नवल नाहीं. 'नोवरिया संगें वऱ्हाडीचा सोहळा' होऊन तिला मांडे पुरणपोळ्या खायला मिळतात, परिसाच्या संगतीनें लोहाचें सुवर्ण होऊन त्याचे अलंकार श्रीमंतांचीं भूषणें होतात, तशी 'जनी ह्मणे जोड झाली विठोबाची । दासी नामयाची ह्मणोनियां.' नामदेवाची दासी झालें ह्मणून मला विठोबाची जोड झाली व संतांनीं आपल्यांत मिळवून घेतलें. नामदेवाच्या घरीं मुलेंबाळें पुष्कळ होतीं, पण '**नामयाचें ठेवणें जनासि लाधलें.**' नामदेवाचा पारमार्थिक ठेवा सगळा जनीला लाभला–ठेवा कोणता ? '**धन सांपडलें विटेवरी.**' हा विठ्ठल माझ्या वडिलांचें दैवत खरा, पण नामयाच्या कृपेनें 'हृदयीं बिंबला पांडुरंग.' संसारीचेंच काय पण स्वर्गींचें सुख सोडून दिलें, जीवभाव ओंवाळून सांडला. तेव्हांच 'सर्व सुख पायीं लोळे । जनीसंगें विठ्ठल बोले'– पुनरावृत्ति चुकविल्या, जनी अंगें ब्रह्म झाली. ही माझ्या नामयाची कृपा. 'नामदेव कीर्तन करी पुढें नाचे पांडुरंग' हा सोहळा नित्य भोगायला मिळाल्यामुळें नामयाच्या जनीला अखंड प्रेमरस मिळाला. नामा वाळुवंटीं कथा करी तेथें टाळ धेऊन मागें जनाबाई उभी आहेच. नामदेवांचा व माझा अनेक जन्मांचा ऋणानुबंध आहे, असें जनाबाई सांगतात. नामदेव प्रल्हाद झाले तेव्हां मी त्यांची श्रेष्ठ दासी पद्मिणी होतें, नामदेव अंगद झाले तेव्हां मी मंथरा होतें, नामदेव कृष्णावतारीं उद्धव झाले तेव्हां मी कुब्जा होतें, आतां कलींत त्याच नामदेवांच्या 'सेवेलागीं दासी जन्मली जनी.' जनाबाईंनीं विठोबाची एक सुंदर काकड आरती केली आहे, तिचा गोड शेवट पहाः—

चौयुगांचा भक्त नामा उभा कीर्तनीं ।
पाठीमागें डोळे झांकुनि उभी दासि जनी ॥ ८ ॥

सोपानदेव व ज्ञानदेव यांजविषयीं जनाबाईंचा असाच प्रेमभाव आहे. 'सोपानदेव धरितां ध्यानें । पुन्हां जन्मा नाहीं येणें॥ दासी जनी तल्लीन झाली। सोपानचरणीं विनटली.' विसोबा खेचरांनीं ज्ञानदेव व सोपानदेव या उभयतांना

गुरु मानलें, याबद्दल चर्चा पूर्वी केली आहे. तसाच प्रकार नामदेवांच्या बाबतींत आहे. नामदेवांचे गुरु विसोबा खेचर हें सिद्ध आहे. तथापि त्यांचेंही गुरुत्व जनाबाईंनीं सोपानदेवांना दिलें आहे. ' नामयाचा गुरु । तो हा सोपान सद्गुरु ' असें जनाबाईंनीं याच भावार्थानें म्हटलें आहे. सोपानदेवांनीं विसोबा खेचरांप्रमाणेंच नामदेव व जनाबाई यांनाही योगमार्ग दाखवून दिला. ज्ञानेश्वरांचा योगाभ्यासाचा मार्ग त्यांनीं व सोपानदेवांनीं त्यावेळच्या भक्तमंडळींपैकीं कांहीं अधिकारी जीवांना दाखविला असून अद्वैतभक्तीचा राजमार्ग ज्ञानेश्वरांनीं गुर्वाज्ञेनें सर्वांसच घालून दिला आहे. ज्ञानेश्वरादि चारी भावंडें तर उभयमार्गांत निष्णात होती. पंढरीच्या वारकरीसंप्रदायास त्यांनीं सर्वांस अद्वैतभक्तीचा उपदेश केला, पण विसोबा खेचर, नामदेव, जनाबाई, ही मंडळी त्यांच्या योगमार्गाच्या अंतरंगांतही प्रविष्ट झाली होती. चांगदेव पूर्वींचे योगीच होते. त्यांना भक्तिमार्गाचा तेवढा उपदेश केला. जनाबाईंच्या अभंगांत योगाच्या खुणा व ज्ञानदेवाविषयीं अत्यादर हे स्पष्ट आहेत.

(१) रक्तवर्ण त्रिकुट स्थान । श्रीहाट पाहे श्वेतवर्ण ॥ १ ॥
श्यामवर्ण ते गोल्हाट । नील बिंदु औटपीठ ॥ २ ॥
वरी भ्रमरगुंफा पाहे । दशमद्वारीं गुरु आहे ॥ ३ ॥
नवद्वारांतें भेदुनी । दशमद्वारीं गेली जनी ॥ ४ ॥

(२) ज्योत परब्रम्हीं होय । खेचरी दर्पणीनें पाहे ॥ १ ॥
इडा पिंगळा सुषुम्ना । तिन्ही पाहे हृदयभुवना ॥ २ ॥
हृदयकमळावरी जासी । जनी ह्मणे मुक्त होसी ॥ ३ ॥

(३) चारी वाचा कुंठित झाली । सोहं ज्योत प्रकाशली ॥ ४ ॥
ज्योत परब्रह्मीं जाणा । जनी ह्मणे निरंजना ॥ ५ ॥

प्रथम शून्य रक्तवर्ण, मध्यशून्य श्यामवर्ण, ऊर्ध्वशून्य श्वेतवर्ण, व महाशून्य श्वेतवर्ण—' त्यांत स्वरूप केवळ ' व ' स्वरूप हें अगोचर । गुरु करिती गोचर. ' ' अनुहत घंटा श्रवणीं । ऐकुनि विस्मित जाली जनी. ' तात्पर्य जनाबाई योगाच्या खुणा इतक्या निःसंदेह रीतीनें सांगत आहेत यावरून यांत त्यांची गति होती हें उघड आहे. हा मार्ग त्यांना ज्ञानेश्वर व सोपानकाका यांजकडून मिळाला. ' अहो सखिये साजणी । ज्ञानाबाई वो हरणी । मज पाडसाची माय ' ' निःसंगाचा संग संतअग्रगणी । जनी ध्याय मनीं ज्ञानेश्वरा '— अशा संतसंगामुळें ' चंदनाचे संगें पालटती झाडें ' तसा माझाही देह पालटला आहे—पूर्वींची जनी मेली, आतां ही दुसरी जनी येथें आहे !

(१) अळंकापुरवासिनी समीप इंद्रायणी । पूर्वेसी वाहिनी
प्रवाह तेथें ॥ १ ॥

ज्ञानाबाई आई आर्त तुझे पायीं । धांवोनियां येई दुडदुडा ॥ २ ॥
बहु कासावीस होतो माझा जीव । कळवळ्याची कींव येऊं द्यावी ३
नामयाची जनी ह्मणावी आपुली । पायीं सांभाळावी मायबापें ॥ ४ ॥
( २ ) विवेकसागर । सखा माझा ज्ञानेश्वर ॥ १ ॥
मरोनियां जावें । बा तुझ्याची पोटा यावें ॥ २ ॥
ऐसें करीगा माझ्या भावा । सख्या माझ्या ज्ञानदेवा ॥ ३ ॥
जाइन ओंवाळूनि । ह्मणे जन्मोजन्मीं जनी ॥ ४ ॥
( ३ ) गीतेवरील आन टीका । जैशा ओगरिल्या ओका ॥ १ ॥
रत्नताटामाजी । जैसी वोपियेली कांजी ॥ २ ॥
माझ्या ज्ञानियावांचुनी । ह्मणे नामयाची जनी ॥ ३ ॥

## बाळकृष्ण—विठ्ठल.

[ १ ] वैकुंठीचा हरी । तान्हा यशोदेच्या घरीं ॥ १ ॥
रांगतसे हा आंगणीं । माथां जावळाची वेणी ॥ २ ॥
पायीं पैंजण आणि वाळे । हातीं नवनीताचे गोळे ॥ ३ ॥
धन्य यशोदा ते माय । दासी जनीं वंदी पाय ॥ ४ ॥
[ २ ] ब्रह्मा वंदी ज्याचे पाय । त्यासी यशोदा ते माय ॥ १ ॥
साम्राज्याचा जो दानी । मागे यशोदेसी लोणी ॥ २ ॥
क्षीरसागर ज्याचे चरणीं । त्याला पायांवरतें न्हाणी ॥ ३ ॥
देव ब्रह्मांडपाल कीं । त्याची टाळू हातें मारवी ॥ ४ ॥
शुकसनकादिक योगी । लागे दळूं जनीलागीं ॥ ५ ॥

## विठ्ठलरूप

[ ३ ] आळवितां धांव घाली । ऐसी प्रेमाची भुकेली ॥ १ ॥
ते हे यशोदेच्या बाळा । बरवी पाहतसे डोळां ॥ २ ॥
विटेवरी उभा नीट । दिली पुंडलीकें वीट ॥ ३ ॥
स्वानंदाचें लेणें ल्याली । पाहुनी दासी जनी धाली ॥ ४ ॥
[ ४ ] पाय जोडुनि विटेवरी । कर ठेवुनि कटावरी ॥ १ ॥
रूप सांवळें सुंदर । कानीं कुंडलें मकराकार ॥ २ ॥
गळां माळ वैजयंती । पुढें गोपाळ नाचती ॥ ३ ॥
गरुड सन्मुख उभा । म्हणे जनी धन्य शोभा ॥ ४ ॥

## पंढरीचे वारकरी

[ ५ ] आले वैष्णवांचे भार । दिले हरिनाम नगार ॥ १ ॥
अवघी दुमदुमली पंढरी । कडकडाट गरुडपारीं ॥ २ ॥

टाळ मृदंग धुमाळी । रंगणीं नाचे वनमाळी ॥ ३ ॥
ऐसा आनंदसोहळा । दासी जनी पाहे डोळां ॥ ४ ॥
[ ६ ] पंढरीचा वारकरी । त्याचे पाय माझे शिरीं ॥ १ ॥
हो कां उत्तम चांडाळ । पायीं ठेवीन कपाळ ॥ २ ॥
मुखीं नाम गर्जे वाणी । म्हणे नामयाची जनी ॥ ३ ॥
[ ७ ] संतभार पंढरींत । कीर्तनाचा गजर होत ॥ १ ॥
तेथें असे देव उभा । दिसे समचरणाचीं शोभा ॥ २ ॥
रंग भरे कीर्तनांत । प्रेमें हरिदास नाचत ॥ ३ ॥
सखा विरळा ज्ञानेश्वर । नामयाचें जो जिव्हार ॥ ४ ॥
ऐशा संतां शरण जावें । जनी म्हणे त्याला ध्यावें ॥ ५ ॥
[ ८ ] संतांमाजी अग्रगणी । पुंडलीक महामुनी ॥ १ ॥
त्याचे प्रसादें तरले । साधुसंत उद्धरले ॥ २ ॥
तोचि प्रसाद आम्हांसी । विटेवरी हृषीकेशी ॥ ३ ॥
पुंडलीक बापमाय । दासी जनी वंदी पाय ॥ ४ ॥

## देवाला आळवणें.

[ ७ ] आधीं घेतलें पदरीं । आतां न धरावें दुरी ॥ १ ॥
तुह्मां थोरांचीं उचितें । हेंचि काय सांगो तूतें ॥ २ ॥
अहो ब्रह्मयाच्या ताता । सजणा लक्षुमीच्या कांता ॥ ३ ॥
दयेच्या सागरा । जनी म्हणे अमरेश्वरा ॥ ४ ॥
[ ८ ] रुक्मिणीच्या कुंका । सुरा असुरा प्रिय लोकां ॥ १ ॥
धांव पाव माझे आई । सखे साजणी विठाबाई ॥ २ ॥
शिवाचिया जपा । मदनताता गा निष्पापा ॥ ३ ॥
आपुली म्हणउनी । आपंगावीं दासी जनी ॥ ४ ॥
[ ९ ] येग येग विठाबाई । माझे पंढरीचे आई ॥ १ ॥
भीमा आणि चंद्रभागा । तुझ्या चरणींच्या गंगा ॥ २ ॥
इतुक्यांसहित त्वां बा यावें । माझ्या रंगणीं नाचावें ॥ ३ ॥
माझा रंग तुझे गुणीं । म्हणे नामयाची जनी ॥ ४ ॥
[ १० ] द्वारकेच्या राया । बुद्धि देगा नाम गाया ॥ १ ॥
मतिमंद तुझी दासी । ठाव देईं पायांपासी ॥ २ ॥
तुझे पदरीं पडलें खरी । आतां सांभाळ करी हरी ॥ ३ ॥
न कळे हरीची करणी । म्हणे नामयाची जनी ॥ ४ ॥
[ ११ ] आंधळ्याची काठी । आडकली कवणे बेटीं ! ॥ १ ॥

माझिये हरणी । गुंतलीस कवणे रानीं ॥ २ ॥
मुके मी पाडस । चुकले भोंवे पाहे वास ॥ ३ ॥
तुजवीण काय करूं । प्राण किती कंठीं धरूं ॥ ४ ॥
आतां जीव जाऊं पाहे । धांव घाली माझे आये ॥ ५ ॥
माझी भेटवा जननी । संतां विनवी दासी जनी ॥ ६ ॥

[ १२ ] कां गा न येसी विठ्ठला । ऐसा कोण दोष मला ॥ १ ॥
मायबाप तूंचि धणी । मला सांभाळीं निर्वाणीं ॥ २ ॥
त्वां बा उद्धरिले थोर । तेथें कोण मी पामर ॥ ३ ॥
दीनानाथा दीनबंधु । जनी म्हणे कृपासिंधु ॥ ४ ॥

[ १३ ] गंगा गेली सिंधूपासीं । त्याणें अव्हेरिले तिसी ॥ १ ॥
तरि तें सांगावें कवणाला । ऐसें बोले गा विठ्ठला ॥ २ ॥
जळ काय जळचरा ? । माता अव्हेरी लेंकुरा ? ॥ ३ ॥
जनी म्हणे शरण आलें । अव्हेरितां ब्रीद गेलें ? ॥ ४ ॥

## देव भक्ताचा अंकित.

( १ ) पक्षी जाय दिगंतरा । बाळकासी आणी चारा ॥ १ ॥
घार हिंडते आकाशीं । झांप घाली पिलापाशीं ॥ २ ॥
माता गुंतली कामासी । चित्त तिचें बाळापासी ॥ ३ ॥
वानर हिंडे झाडावरी । पिलीं बांधूनी उदरीं ॥ ४ ॥
तैसी आम्हां विठ्ठलमाये । जनी वेळोवेळां पाहे ॥ ५ ॥

( ५ ) **ज्याचा सखा हरी । त्यावरी विश्व कृपा करी ॥ १ ॥**
उणें पडों नेदी त्याचें । वारें सोसी आघाताचें ॥ २ ॥
तयावीण क्षणभरी । कदा आपण नव्हे दुरी ॥ ५ ॥
आंग आपुलें वोढोनी । त्याला राखे तो निर्वाणीं ॥ ४ ॥
ऐसा अंकित भक्तांसी । म्हणे नामयाची दासी ॥ ५ ॥

## जनाबाईचा अनुभव.

जनी जाय शेणीसाठीं । उभा आहे तिच्यापाठीं ॥ १ ॥
पीतांबराची कास खोवी । मागें चाले जनाबाई ॥ २ ॥

× × × ×

जनी डोईनें गांजली । विठाबाई धांविन्नली ॥ १ ॥
देव हातें बुचडा सोडी । उवा मारितसे तांतडी ॥ २ ॥
केश विंचरूनि मोकळे केले । जनी म्हणे निर्मळ झालें ॥ ३ ॥

× × × ×

दळण्याच्या मिषें । विठ्ठल आला सात्रकाशें ॥ १ ॥
देहबुद्धीचें वैरण । द्वैत खंडारे निसून ॥ ध्रु० ॥
एकलीच गाणें गातां । दुजा साद उमटतां ॥ २ ॥
कोण गे तुझे बरोबरी । गाणें गातो निरंतरीं ॥ ३ ॥
अंतरींच विचारितां । देव दिसे तया भक्ता ॥ ४ ॥
खूण कळली नामदेवा । विठ्ठल भुले जनिच्या भावा ॥ ५ ॥
आतां पुरे हा संसार । कोठें फेडूं उपकार ॥ १ ॥

× × × ×

सांडूनियां थोरपण । करी दळण कांडण ॥ २ ॥
नारीरूप होउनि हरी । माझें न्हाणेंधुणें करी ॥ ३ ॥
राना जाये वेंची शेणी । शेखीं घरीं वाहे पाणी ॥ ४ ॥
ठाव मागें पायापाशीं । म्हणे नामयाची दासी ॥ ५ ॥

× × × ×

झाडलोट करी जनी । केर भरी चक्रपाणी ॥
पाळी सडायांला काढीं । पुढें होउनि उखळ झाडी ॥
धुणें घेउनि काखेंसीं । जनी गेली उपवासी ॥
चहूं हातीं धुणें केलें । जनी म्हणे बरें झालें ॥

जनाबाईंच्या सगुण प्रेमाचें रूप आपण पाहिलेंच आहे. त्यांचा निर्गुण बोधही पूर्ण होता. अद्वैतभक्तीचें स्वरूप त्यांच्या कांहीं अभंगांत व्यक्त आहे. उदाहरणें पहा:--

धरिला पंढरीचा चोर¹ । प्रेमें बांधोनियां दोर ॥ १ ॥
हृदय बंदिशाळा केलें । आंत विठ्ठला कोंडिलें ॥ २ ॥

---

१ सर्वत्र असून स्थूल दृष्टीस दिसत नाहीं म्हणून त्याला गूढ, लपलेला, चोर इ० म्हटलें आहे. ‘ तूं जयाप्रती लपसी । तया विश्व हें दाविशी । प्रगट तैं करिसी । आघवेंचि तूं ॥ ४ ॥ कीं पुढिलांची दृष्टि चोरिजे । हा दृष्टिबंध निफजे । परि नवल लाघव तुझें । जें आपणपें चोरे ’ ( ज्ञाने० अ० १४ ) ‘ एष सर्वेषु भूतेषु गूढात्मा न प्रकाशते । दृश्यते त्वग्र्यया बुद्ध्या सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभिः ’ ( काठकवल्ली ३–१२ ) व ‘ तं दुर्दर्शं गूढ मनुप्रविष्टं गुहागतं गव्हरेष्टं पुराणम् । अध्यात्मयोगाधिगमेन देवं मत्वा धिरो हर्षशोकौ जहाति ’ ( काठक २–१२ ). दासबोधांत ‘ मार्ग होय अंतरिक्ष– ( द. ४–५-१३ ) ‘ आकाशमार्गी गुप्त पंथ ( द १-९-५ ) स्थूलांत सूक्ष्म, सूक्ष्मांत कारण, कारणांत ज्ञान, त्या पलीकडे द्रष्टा व त्याच्या पलीकडे सद्वस्तु ( परमात्मा चोर ) अशा अंतरिक्षमार्गानें--आंत आंत पाहण्याचा हा मार्ग. ‘ तिन्ही लोक जेथुनि– जगीं थोरला देव तो चोरलासे ’.

शब्दें केली जडाजोडी । विठ्ठलाच्या पायीं बेडी ॥ ३ ॥
सोहं शब्दें मारा केला । विठ्ठल काकुळती आला ॥ ४ ॥
जनी म्हणे गा विठ्ठला । आतां जीवें न सोडि तुला ॥ ५ ॥

प्रेमरज्जूनें विठ्ठलरूप चोराला मी पकडलें आहे. '**प्रणयरशनया धृतांघ्रिपद्मः**' [ भागवत स्कंध ११–२–५६ ] म्हणजे प्रेमरज्जूनें त्याचे पाय बांधले आहेत. ' प्रेमसूत्र दोरी । नेतो तिकडे जातो हरि ' [ तुकोबा ]. चोराला हृदयाच्या बंदिशाळेंत कोंडून ठेवलें आहे, अभंगरूप शब्दांनीं त्याच्या पायांत बेडी अडकवली आहे. सोहंजपाचा मारा त्याजवर केल्यामुळें हा चोर काकुळतीला येऊन माझ्या पुरा ताब्यांत आला आहे. अशा चोराला आतां जिवंत सोडीत नाहीं !

देव खाते देव पिते । देवावरी मी निजते ॥ १ ॥
देव देते देव घेते । देवासवें व्यवहारिते ॥ २ ॥
देव येथें देव तेथें । देवावीण नाहीं रितें ॥ ३ ॥
जनी म्हणे विठाबाई । भरूनि उरली अंतर्बाहीं ॥ ४ ॥

माझे सारे व्यवहार, देणें घेणें, परब्रह्माच्या अनुसंधानांत–साक्षित्वांत होत आहेत. कां कीं अंतर्बाह्य हरिच भरून उरला आहे. पुढील वेदांतदृष्टीचा अभंग कोमल मनाच्या उपासकांना कर्कश वाटणारा आहे:—

अरे विठ्या विठ्या विठ्या । मूळमायेच्या कारट्या ॥ १ ॥
तुझं गेलं मढं । तुला देखुनि काळ रडं ॥ २ ॥
तुझी रांड रंडकी झाली । जन्मसावित्री चुडा ल्याली ॥ ३ ॥
उभी राहूनी आंगणीं । शिव्या देते दासी जनी ॥ ४ ॥

## उपदेश.

कोणाचाही सज्जनाचा उपदेश दुसऱ्याला काय असणार ? जें त्याला पटलें आहे, ज्याचा त्याला अनुभव आहे तेंच तो लोकांना सांगणार. साधूंच्या क्रियेंत व उपदेशांत एकरूपता असते. ' वेदांतीं हें बोलिलें ' वेदांत काय सांगतो ? 'वेदबाह्य तें कर्म सांडी, न करीं अधर्म'–वेदबाह्य मतें व कर्में सोडा व अधर्मानें वागूं नका; ' लागा, भक्ति वाटा ' भक्तिमार्गानें चाला, देवनिष्ठ आहे त्याला आह्मी ज्ञानी म्हणतों, हा जनाबाईचा एका अभंगांत उपदेश आहे. ' भक्तिबळें वळें देव ' म्हणून ' पंढरीसी जावें । संतजनां भेटावें, ' ज्याचे चित्तीं देव आहे त्याला तो निश्चित पावतो. ' अंगीं हो पै शांती । दया क्षमा सर्वांभूतीं ' ॥ आवडी असावी कीर्तनीं । लवावें संतांचे चरणीं ॥ जैसी दया पुत्रावरी । तेंचि पाहे चराचरी " असा त्यांचा गोड उपदेश आहे. समाधानानें रहावें, ' हेंचि देवाचें भजन. ' अखंड चित्त शुद्ध ठेवावें व देवाचें नांव अमृतसंजीवनी आहे म्हणून नामानें देव वश करावा.

सुखें संसार करावा । माजीं विठ्ठल आठवावा ॥ १ ॥
असोनियां देहीं । छाया पुरुष जैसा पाहीं ॥ २ ॥
जैसा सूर्य घटाकाशीं । तैसी देहीं जनी दासी ॥ ३ ॥

शूराचें तें शस्त्र कृपणाचें धन । विध्वंसिल्या प्राण हातां न ये ॥ १ ॥
गजमाथां मोतीं सर्पाचा तो मणी । वेंचिलियां प्राण हातां न ये ॥ २ ॥
सिंहाचें तें नख पतिव्रतेचें स्तन । वेंचिलियां प्राण हातां न ये ॥ ३ ॥
विराल्यावांचूनी देहीं देहभाव । जनी म्हणे देव हातां न ये ॥ ४ ॥

जनाबाई, मुक्ताबाई या बुद्धिबळाचा मोठाच खेळ खेळून राहिल्या होत्या, त्यांनीं मनबुद्धिपर परमात्मा वश केला होता. त्या कदाचित् करमणुकीसाठीं बुद्धिबळाचा लौकिक खेळही खेळत असतील असें जनाबाईच्या पुढील अभंगावरून अनुमान निघतें:—

अहो मांडियेला खेळ । बुद्धिरंग बुद्धिबळ ॥ १ ॥
कैचा शह आला । प्याद्याखालीं फरजी मेला ॥ २ ॥
शहबाजू झाली । जनी म्हणे मात केली ॥ ३ ॥

## ३ मुक्ताबाई व जनाबाई.

सारख्या वयाच्या, समान अधिकाराच्या, भक्तिज्ञानवैराग्यादि गुणालंकारांनीं नटलेल्या, परमानंदाचें नित्य एकत्र भोजन करणाऱ्या मुक्ताबाई व जनाबाई पंढरपुरीं नामदेवाच्या घरीं झोपाळ्यावर बसून प्रेमाचीं गाणीं गात आहेत; निवृत्तिज्ञानदेवनामदेवादि गुरुजन हा सुखसोहळा भोगीत समोर बसले आहेत, नामदेवांच्या मुलाबाळांनीं घर भरलें आहे, प्रेमळ भक्तभाविक ज्ञानाच्या व नामाच्या ऐक्यतेचा आनंद अनुभवीत आहेत, विश्वाचे मायबाप रुक्मिणी-पांडुरंग मृत्युलोकीं दुर्लभ असा हा संतमेळ्याचा परमानंद भोगीत सर्वांच्या अंतर्यामीं नाचून डोलून राहिले आहेत—अशा एका अत्यंत मंगलसमयीं जनाबाई मुक्ताबाईस म्हणते, ' ताई ! आपण झोपाळ्यावरचीं गोडशीं गाणीं म्हणूं. गडे ! तूं एक आधीं म्हण, मग मी म्हणेन !' बरं म्हणून मुक्ताबाईनें झोके घेत घेत पुढील गाणें म्हटलें:—

पहिली माझी ओवी । परतूंनी पाहिलें । दृष्टीनें देखीलें । निजरूप ॥ १ ॥
दुसरी माझी ओवी । दूजें नाहीं मनीं । लक्ष तूझे चरणीं । लागीयेलें ॥ २ ॥
तिसरी माझी ओवी । लाभे सायुज्यता । हात तुझा माझा । सद्गुरुनाथा ॥ ३ ॥
चवथी माझी ओवी । शून्य जेथें आटे । वस्तु घन दाटे । मागेंपूढें ॥ ४ ॥

---

१ मागें, अंतर्मुख होऊन ' उलट उलट माघारा प्राण्या फिर गोते खासी ' हें मुक्ताईचें चांगदेवास उपदेशपर पद आहे. २ परमात्म वस्तु मागें पुढें घनदाट आहे. ' नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते ' ( गीता ११–५० )

पांचवी माझी ओवी । पांचही अणुआरांचा । पंचवीसींयांचा । रीघ नाहीं ॥ ५ ॥
साहवी माझी ओवी । सादृश्य देखणें । वरकड बोलणें । फोल झालें ॥ ६ ॥
सातवी माझी ओवी । साच वाटे मना । अंतरींच्या खुणा । काय सांगों ॥ ७ ॥
आठवी माझी ओवी । आठव नाहीं जरा । निर्गुण सोयरा । पर्णियेला ॥ ८ ॥
नववी माझी ओवी । नांदूं मी लागले । परपुरुषा रतले । जीवेंभावें ॥ ९ ॥
दहावी माझी ओवी । धालें माझें मन । डोळां दिसे ऊन रात्रीमाजी ॥ १० ॥
म्हणे मुक्ताबाई । निवृत्तीचें देणें । योगीयाचें खुणे । योगी जाणे ॥ ११ ॥

हे मुक्ताबाईचें गाणें ऐकून सर्वजण डोलूं लागले. यावर **जनाबाईची** पाळी आली. तिनें पुढील गाणें म्हटलें. तें अधिक सोपें व सर्वांस समजण्यासारखें आहे:—

पाहिली माझी ओवी । ओवीन जगत्र । गाईन पवित्र । पांडुरंग ॥ सावळा पां. ॥१॥
दुसरी माझी ओवी । दुजा नाहीं कोठें । जनीं वनीं भेटे । पांडुरंग ॥ २ ॥
तिसरी माझी ओवी । तिजा नाहीं ठाव । अवघाचि देव । पांडुरंग ॥ ३ ॥
चवथी माझी ओवी । वैरिलें दळण । गाईन निधान । पांडुरंग ॥ ४ ॥
पांचवी माझी ओवी । माझिया माहेरा । राहे निरंतरा । पांडुरंग ॥ ५ ॥
साहवी माझी ओवी । सहाही शिणले । गुरुमूर्ती भेटले । पांडुरंग ॥ ६ ॥
सातवी माझी ओवी । आठवे वेळो वेळां । देखिले म्या डोळां । पांडुरंग ॥७॥
आठवी माझी ओवी । अठ्ठाविस युगें । उभा चंद्रभागे । पांडुरंग ॥ ८ ॥
नववी माझी ओवी । संपलें दळण । चुकवी मरण । पांडुरंग ॥ ९ ॥
दहावी माझी ओवी । दहा अवतारीं । यावें संवसारीं । पांडुरंग ॥ १० ॥

झोके घेत असतांना किंवा दळण दळीत असतांना स्वयंस्फूर्तीनें तत्काळ रचून गाणीं म्हणणाऱ्या स्त्रिया अजूनही कोठें कोठें आढळतात, पण या मुलींच्या अधिकाराच्या मुली कोठें दिसणार ? त्यांना हें शिक्षण कोठें मिळालें ? त्यांच्या शाळा, त्यांचीं पुस्तकें सर्व कांहीं भक्तिपूर्ण अंतःकरणांतच होतीं. त्यांना ज्ञानदेवनामदेवांसारखे अत्यंत श्रेष्ठ गुरु भेटले व सत्संग मिळाला हें त्यांचें पूर्वभाग्य होय. पंढरपूरच्या विश्वविद्यालयांत त्या तयार झाल्या. सत्संग हें सर्व शिक्षणाचें बीज आहे. संतचरणरजाचा महिमा सर्वांनीं वर्णिला आहे. तो अनुभवसिद्ध आहे, सत्संगांत काय काय लाभ होत नाहींत, सर्वच लाभ होतात. असो, जनाबाईचें आणखी एक बहारीचें पद देऊन पुरें करितों.

---

३ आणुआर, बारीक चाराचुरा ( ज्ञाने० १८–३६ ) पंचभूतें हा विश्वांतला अणुआर आहे. ४ पंचीकृत पंचमहाभूतें. ५ लग्नांत वरला. ६ क्षराक्षरातीत पुरुषोत्तम. ७ दिवसा चांदणें व रात्रीं ऊन दिसणें हा योग्यांचा अनुभव आहे.

आळंदीस एकदां मुक्ताबाई व जनाबाई अशाच ऊन खात बसल्या असतांना मुक्ताबाई जनाबाईस प्रेमानें म्हणाल्या ‘ अग जने ! मला परमात्मनिधान मिळालें हें सहजच आहे. माझे भाऊ कसे एकेक चित्सूर्य आहेत, पण तुला हें ज्ञान कोठून मिळालें ? तुला शिक्षण कोणीं दिलें व तूं काय शिकलीस. यावर जनाबाईनें उत्तर केलें:—

बाइ ! मी लिहिणें शिकलें सद्‌गुरुपाशीं ॥ ध्रु० ॥
ब्रह्मीं झाला जो उल्लेख । तोचि नादाकार देख ।
पुढें ओंकाराची रेख । तुरिया म्हणावें तिशीं ॥ बाइ० ॥ १ ॥
माया महत्त्वाचें सूत्र । तीन पांचांचा प्रकार ।
पुढें पंचविसाचा भार । गणती केली छत्तिशी ॥ बाइ० ॥ २ ॥
चार खोल्या चार घरीं । चार पुरुष चार नारी ।
करूनि चौघांचा अव्हेर । बसल्ये पांचव्यापाशीं ॥ बाइ० ॥ ३ ॥
पांच शाहणे पांच मूर्ख । पांच चाळक असती देख ।
पांच कळंभखोर आणिक । वळखे मी त्या दोघांसी ॥ बाइ० ॥ ४ ॥
बीजांपासूनि अंकूर । होय वृक्षाचा उभार ।
शाखा पत्रें फूलफळभार । सामावे बीजाचे पोटीं ॥ बाइ ॥० ॥ ५ ॥
वेद शास्त्र आणि पुराण । यांचा अर्थ मनीं आणून ।
कनकीं नगांचें भूषण । अनुभव वाटे जीवासी ॥ बाइ० ॥ ६ ॥
कांतिण तंतूसीं काढून । वरती क्रीडा करिती जाण ।
शेवट तंतूशी ग्रासून । एकली राहे आपणासी ॥ बाइ० ॥ ७ ॥
नामदेव प्रतापवंत । मस्तकिं सद्‌गुरुचा हस्त ।
जनी म्हणे केली मात । पुसा ज्ञानदेवासी ॥ बाइ० ॥ ८ ॥

# यांत्रिक सुधारणा !

ही यांत्रिककला राक्षसी असून भस्मासुराप्रमाणें मानववंशाचा विध्वंस करीत असून जगाला ती सुधारणा भासत आहे ! आजकाल सोन्याचा धूर निघत असलेल्या पाश्चिमात्य देशांत बेकार वाढले, संप होताहेत, महाराष्ट्रांत कलहाचे कलकलाट ऐकूं येताहेत, यादवी माजून रसातळाला कोण अगोदर जातो याची अहमहमिका लागली आहे—हा सर्व या यांत्रिक कलेचाच प्रभाव ! सायकली, ट्रॅमगाड्या, मोटारी, आगगाड्या, विमानें, समुद्रयानें, पाणबुड्या, तारायंत्रें, वायरलेस, रेडियो इ० जगाला कोणीकडे नेत आहेत ? हे शोध आणि यांत्रिककला समाजाला उद्धारक नसून संहारक होत आहेत......' माझें राष्ट्र सर्व राष्ट्रांवर चढाई आणि वरचष्मा कसा राखूं शकेल, दुसऱ्याच्या राष्ट्रांतील संपत्ति माझ्या करामतीनें माझ्याच राष्ट्रांत कशी येईल, पांचही खंडांत आमचेच राष्ट्रसेवक अत्युच्च आरामांत राहून तेथील व्यापारी व राजकीय स्वातंत्र्य आपल्या मुठींत राखण्याची काय युक्ति करितां येईल, इकडे सर्व शास्त्रीय शोधांचा उपयोग केला जात आहे ! ' यंत्रकला ही एक स्वतंत्र मायाच आहे. सर्व भूतें यंत्राच्या योगानें मायारूढ, मोहग्रस्त, मूढ होऊन भ्रमत आहेत ! यंत्र मानवाधीन आहे कां मानव यंत्राधीन झाला आहे याचा विचार करणें अवश्य आहे. पूर्वीं वाहनें, हीं बैल व घोडा ह्या पशूंचीं होतीं, आतांचीं वाहनें निर्विकार व भरधांव असल्यानें आपल्याला त्यांच्या स्वाधीन राहून प्रवासाचा अतिरेक करावा लागतो......मनुष्य यंत्राचा इतका शोकी झाला आहे कीं, तो आपलें लेखन, गायन, वाचन, चलन, गणन, दळण, कांडण, विणणें, शिवणें, हस्तकौशल्य, शिल्प इ० सर्व चेतनभाव यंत्राच्या स्वाधीन करून मनुष्य यंत्राला सचेतन करून आपण जडत्व पत्करीत आहे, आणि त्यांत त्याला मौज आणि कृतकृत्यता वाटत आहे !...... यंत्रकला ही मजूर आपण खाते आणि जगाला मजूर बनविते. हिंदुस्थानचा मुख्य धंदा शेतीचा, पण यांत्रिककलेनें शेती बुडाली, परकी व्यापारी देशांत घुसले. पूर्वींसारखीं धान्याचीं पेंवें नाहींत, एक साल पावसानें डोळे वटारले कीं माणसांचे व जनावरांचे डोळे पांढरे होतात. कपाशीचे पैसे रगड आलेले दिसतात; पण ते शेतकऱ्यांच्या हातांत पडले कीं, मोटार, विलायती झकपक कपडे, नाटक तमाशे, दारू, चहा चिवडा भजीं इ० चैनींत तेव्हांच जाऊन शेवटीं पूज्य होतें. समाजाची राहणी ढांसळली, ह्याचा परिणाम संततीवर होऊन संतती बिघडली. अक्कल आणि शक्ति देशांत भरपूर असतांना बेअकलीपणा व अशक्तपणा वाढला. हा अनर्थ परकीय सत्तेमुळें झाला, तरी त्याला पुष्कळ अंशीं यांत्रिककलाच पर्यायानें कारण झाली आहे.......समाज बेपर्वा, विस्कळित झाला. मजूर व भांडवलवाले, दोनच जाति होऊन जीवनार्थ कलह माजत चालला. गांवचे गांव ओसाड पडून शहरें भरून अवाढव्य झालीं. खेडेगांवांत मजूर मिळेनासे होऊन शेती ओसाड पडली. हे सर्व दुष्परिणाम यांत्रिककलेमुळें झाले !'

—गोविंदसुत.

श्रीदत्तप्रसन्न.

# श्रीगुरुचरित्राची मूळ प्रत.

ज्याप्रमाणें आजपर्यंत दासबोध, ज्ञानेश्वरी इत्यादि पूज्य ग्रंथांचें महापरिश्रमानें संशोधन करून त्यांच्या यथामति मूळ प्रती ठरविल्या आहेत, त्याप्रमाणें गुरुचरित्र या प्रेमळ व अखिलकामना परिपूर्ण करणाऱ्या ग्रंथाचें संशोधन झालेलें दिसत नाहीं. तरी या ग्रंथाचें थोडेंबहुत संशोधन करावें असें मनांत आणून आज लोकांपुढें या चार ओळी मांडित आहें.

( १ ) पहिल्यानें अस्सल प्रत मिळणें शक्य आहे कीं काय ? आज महाराष्ट्रांत कोठें सरस्वतीगंगाधरांचे वारस आहेत कीं काय ? असल्यास त्यांचा पत्ता कोणता ?

( २ ) अस्सल प्रत आज उपलब्ध नाहीं असें गृहीत धरून चाललें तर असलेल्या प्रतींमध्यें सर्वांत जुनी प्रत मिळविणें हें योग्य आहे. या कामीं १ । ३ । २७ च्या केसरीमध्यें श्री. कल्याण गुंडोजी दीक्षित ( कागवाड ) यांनीं प्रसिद्ध केलेली नारायणस्वामींची ( दीक्षितस्वामी ) प्रत बरीच उपयोगी पडेल असें दिसतें. तरी सदर्हू प्रत आज कोणी दीक्षितस्वामींचा भक्त किंवा कल्याण दीक्षित हे मिळवून देतील काय ?

( ३ ) या प्रतीशिवाय नरसोबाची वाडी, गाणगापूर, औदुंबर इत्यादि क्षेत्रें व इतर ठिकाणीं मिळून छापखाने सुरू होण्याच्यापूर्वीं ( म्हणजे सुमारें शंभर वर्षांपूर्वीं ) हातानें लिहिलेल्या प्रतींचा उपयोग होण्याजोगा आहे. तरी अशा जुन्या प्रति ज्या ज्या इसमांजवळ असतील त्यांनीं आपले संपूर्ण पत्ते व प्रत ज्या वर्षीं लिहिली असेल तो शक कळविणें. म्हणजे प्रत सुरक्षितपणें वापरून नेआण करण्याचा खर्च आम्हीं करून काम झाल्यावर प्रत ज्याची त्याचे हवालीं करूं. प्रतीचे सुरक्षिततेसाठीं कांहीं रक्कम अनामत म्हणूनही मालकाजवळ ठेवण्यास हरकत पडणार नाहीं.

( ४ ) श्रीपाद श्रीवल्लभ स्वामींचा व नरसिंहसरस्वतीस्वामींचा निश्चितकाल कोणाला माहित आहे कीं काय ?

या शिवाय गुरुचरित्राभध्यें प्रत्येक कथेसंबंधीं चौकसदृष्टीनें विचार करण्याजोगीं बरींच स्थळें आहेत. त्यांचा योग्य वेळीं विचार करूं. श्रीगुरुकृपेनें वर लिहिल्याप्रमाणें अस्सल प्रत तयार झाल्यावर लोकांची इच्छा असल्यास छापविण्यांत येईल. तरी या कामीं महाराष्ट्रांतील व बाहेरील दत्तोपासक होईल तितकी लवकर आपल्याकडील माहिती पुरवून मदत करतील अशी आशा आहे. सर्व पत्रव्यहार खालील पत्यावर करावा. कळावें.

मॅनेजर – ॲंग्लो – आयुर्वेदिक फार्मसी
मु० पो० कोलगांव
संस्थान – सावंतवाडी जि० रत्नागिरी.

गणेश व्यंकटेश सांतवळेकर.

॥ श्री ॥

# तुकाराममहाराजांचा एक अभंग.

—— :o: ——

[ द. ज. माहुलकर, बडोदें. ]

भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास । गेले आशापाश निवारूनी ॥ १ ॥
विषय तो त्यांचा झाला नारायण । नावडे जन–धन–मातापिता ॥ २ ॥
निर्वाणीं गोविंद असे मागेंपुढें । कांहींच सांकडे पडों नेदी ॥ ३ ॥
तुका म्हणे सत्यकर्मा व्हावें साह्य । असत्याशीं भय नरका जाणें ॥ ४ ॥

श्री तुकाराममहाराज भक्तांविषयीं आत्मविश्वास अभंगरूपानें बोलतात. जे देहाविषयीं उदास तेच भक्त, त्यांनीं आपल्या इच्छा–वासना सोडून दिल्यामुळें त्यांना नारायणाचा ध्यास लागलेला असतो. नारायणच विश्वरूपांतही त्यांना दिसतो, यामुळें देहसंबंधापुरती त्यांची दृष्टी संकुचित राहत नाहीं. जन, धन, माता हे त्यांना पृथक्त्वानें किंवा देहबुद्धीनें आवडत नाहींत, त्यांच्या रूपानें नटलेला हरीच त्यांना दिसतो. संकटसमयीं त्यांचा परमेश्वर साहाय्यक असतो. भगवान् आपल्या भक्ताला कांहींच दुःख पडूं देत नाहीं. तुकाराम-महाराज म्हणतात कीं, आपल्या पवित्र कर्माला–स्वधर्माला–हरिस्मरणरूप स्वधर्माला धरून असावें. जो स्वधर्मापासून सुटेल त्याला नरकप्राप्ती होईल. जे देहाविषयीं उदास आहेत म्ह. देहाभिमानशून्य आहेत तेच खरे, म्हणजे ज्यांना देहाविषयीं उदासीनता आहे, ज्यांना देवापुढें देहाची चाड नाहीं, ते भक्त आहेत असें जाणा असें तुकाराम म्हणतात. देहाविषयीं उदास म्हणजे उदासीनता दाखविणारे पुष्कळ सांपडतील. कोणी कुटुंबाचा त्रास सहन होत नाहीं म्हणून उदासीन असेल, तर कोणी प्रापंचिक अडचणींनें गांजलेला म्हणून उदास असतो, तर दुसरा रोगग्रस्त असल्यानें देह नकोसा होऊन उदासीनता दाखवितो. तर हे सर्व देहाविषयीं उदास असल्यानें ईश्व-राचे भक्त म्हणावयाचे कीं काय? व हे सर्व जर भक्त म्हणावयाचे तर ईश्वराचे घरीं भक्तांचा सुकाळ होईल. पण ‘ उदास ’ शब्दाचा अर्थ असा न करितां ज्यांची चित्तवृत्ति भगवंताचे ठायीं एकरूप झाल्यानें देहाभिमान नष्ट झाला आहे, व देहाचे कांहीं होवो, त्याचेवर कितीही आघात येवोत पण जे हरिचिंतनरूप स्वकर्तव्यापासून ढळत नाहींत तेच ईश्वराचे भक्त व तेच ईश्वराला आवडतात असा अर्थ उदास शब्दाचा आहे. देहाचे

चोचले काय कामाचे ? देहाला नटविणारा व त्याला नानाप्रकारचे सुगंधी पदार्थ लावून त्याचाच थाटमाट करणारा काय पराक्रम करणार ? ईश्वरप्राप्तीसाठीं, तसेंच स्वामिकार्यासाठीं, आपल्या देशासाठीं, आपले धर्मासाठीं देह गेला तरी बेहेत्तर पण जे स्वधर्म सोडीत नाहींत ते देहाविषयीं उदास म्हणावयाचे व ते भक्त परमात्म्याला आवडतात.

तीनशें वर्षांपूर्वीचा इतिहास. श्रीशिवाजीमहाराजांनीं स्वराज्यसंस्थापनेची प्रतिज्ञा केली त्यावेळीं त्यांना एकापेक्षां एक वीर–भक्त येऊन मिळाले. नेताजी पालकर, बाजी प्रभु, तान्हाजी यांच्यासारखे पराक्रमी वीर रातबेरात घोड्यावर स्वार होऊन, भाला, बर्ची, ढाल, तलवार घेऊन युद्ध करण्यास तयार झाले व त्यांनीं देहाची पर्वा न करितां शत्रूंशीं लढून स्वामीचेकरितां, महाराष्ट्राकरितां, स्वधर्माकरितां व स्वदेशाकरितां धारातीर्थीं देह ठेविले. हे देहाविषयीं ‘ उदास’ ‘भक्त’ भगवंताला प्रिय होत.

हल्लीं महात्मा गांधींनीं सविनय कायदेभंगाच्या धर्मयुद्धाकरितां रणक्षेत्रावर प्रस्थान ठेविलें आहे. मोठमोठाले पुढारी व सत्याग्रही यांनींही आपल्या देहाची पर्वा न करितां करारीपणानें पुढें येऊन मोहीम करण्यास सुरवात केली व देहावर घाव पडले तरी बेहत्तर पण निःशस्त्र कायदेभंग केला, अन्नपाण्यावांचून दिवस काढले, तुरुंगवास पत्करला. हे देहाविषयीं उदास झालेले वीर होत. त्यांनीं आपल्या घरादारांची, बायकापोरांची, देहाची आशा टाकून दिली. त्यांना एका गोष्टीचा ध्यास लागलेला आहे. त्यांना इतर कांहीं गोष्टी आवडत नाहींत. या संकटसमयीं त्यांचा नारायण सहाय्यकर्ता आहे. ते स्वधर्माला जागृत असल्यानें तुकाराममहाराजांनीं म्हटल्याप्रमाणें परमात्मा त्यांना मोक्ष देईल. हा सर्व त्याग परमात्मसंतोषासाठीं होण्याची बुद्धि ही मुख्य आहे. देवासाठीं धर्म, देवासाठीं देश, देवासाठीं देह ह्या एका बुद्धीनें राजकारणाला धर्माचें पावित्र्य प्राप्त होतें.

# भक्तमयूरकेकावली.

( मोरोपंतांच्या आर्या केकावलीचें समवृत्त भाषांतर )

भाषांतरकारः—रा० केशव भिकाजी बापट, चिपळूण.

जळदनिभा ! बळसिंधो ! खळमथना ! सूर्यकुळमणे ! कृपण !
मी विकळ जाहलों बहु; काय तुजें लोपलें दयाळुपण ! ॥ ८८ ॥
बलसिन्धो खलमथन द्युमणिकुलमणेऽबुदाभ कार्पण्यात्
बहु विकलोऽहं जातः किं लुप्तं तव विभो दयालुत्वम् ॥ ८८ ॥

---

मज भणगाला वरदा ! वर जरि करुणा करूनि देशील
तरि मानवती सज्जनमनें जयाला असेंचि दे शील ॥ ८९ ॥
यदि दुर्गताय दास्यसि वरद वरं मह्यमतिदयालुतया
तत्तेन वितर शीलं यदभिमतं सुजनमानसानां स्यात् ॥ ८९ ॥

---

विश्व तुज्या ठायीं, तूं नामीं, तें नाम साधुच्याच मुखीं,
तत्संग दे मला, मग गुंतेना मी कदापि तुच्छ सुखीं ॥ ९० ॥
विश्वं त्वयि स्थितं, त्वं नामनि, सज्जनमुखे स्थितं तच्च
देहि त्वं सत्संगं न यथा तुच्छे सुखेऽनुरज्येऽहम् ॥ ९० ॥

---

लक्षापराध घडले, रक्षावें परि तुला शरण आलों
दक्षाध्वरहरचिंत्या ! दक्षा ! मी मग्न संकटीं जालों ॥ ९१ ॥
कृतवानपराधानां लक्षं, त्वं शरणमागतं रक्ष
दक्षाध्वरहराचिंत्य त्वं दक्षः संकटे च मग्नोऽस्मि ॥ ९१ ॥

---

संग धरुनि विषयांचा भंगचि मन पावलें, परी न विटे;
साधुसमागमभेषज साधुनि देशील तरिच मोह फिटे ॥ ९२ ॥
यद्यपि विषयासंगाद्भग्नं चित्तं तथापि न विरक्तम्
साधुसमागमभेषजमथ दास्यसि तर्हि मोहविलयःस्यात् ॥ ९२ ॥

---

चित्त अनावर रामा! वित्तस्त्रीपुत्रचिंतनींचि रते
मधुलिप्तक्षुरधारा चाटी ते जीभ तत्क्षणीं चिरते ॥ ९३ ॥
अनिवार्य राम मनो वित्तस्त्रीपुत्रचिंतने रमते
मधुलिप्तक्षुरधारा-स्वादपरा द्राग् विदीर्यते रसना ॥ ९३ ॥

---

निपटुनि विषय त्यजितां सुखमुख दृष्टी पडे, झडे ताप;
हें सत्य अत्यबाधित तेथें संताप जे स्थळीं व्याप ॥ ९४ ॥
निःशेष विषयहानात् तापः शम्यश्च सुखमुखं दृश्यम् ।
सत्यमिदं निर्बाधं यत्र महाकर्म तत्र संतापः ॥ ९४ ॥

---

तनुनिर्वाहापुरता संग धरुनिही अनर्थ मज घडला
सावध तऱ्हीं निसरडया मार्गी विचकोनि दांतमुख पडला ॥ ९५
तनुनिर्वाहकृतेऽहं कृतवान्संगं तथाप्यनर्थोऽयम्
पिच्छिलपथे निपतितोऽवहितोऽपि व्यंजयन्दशनवदनम् ॥ ९५ ॥

---

शुद्धचरित्रा रामा ! युद्धपटुभुजा ! प्रबुद्धसेव्यपदा !
उद्धवनिधे ! दयाळा ! उद्धरिं मजला नमीन तूज सदा ॥ ९६ ॥
रामानवद्यचरित प्रधनपटुभुज प्रबुद्धसेव्यपद
उद्धवनिधे दयालो मामुद्धर सर्वदा नमेयं त्वाम् ॥ ९६ ॥

---

शर्वप्रियसच्चरिता ! सर्वजगत्पाळका ! अगा बापा !
पर्वसुधाकरकररुचिगर्वहरस्मितमुखा ! हरी तापा ॥ ९७ ॥
शर्वप्रियसच्चरिताखिलजगतीपालक प्रभो जनक
पर्वसुधाकर-कर-रुचि-गर्व-हर-स्मितमुखापहर तापम् ९७

---

नानाभयें विलोकुनि पावतसे फार फार तनु कंपा;
शिर ठेविलें पदांवरि, उशिर न लावीं, करींच अनुकंपा. ९८
भूयोभूयो भजते विविधभयालोकनात्तनुः कंपम्
न्यस्तं शीर्षं पदयोर्मय्यनुकंपां कुरुष्व मा चिरय ॥ ९८ ॥

---

मन हें घातक वेडें विषयव्याळासवें करी क्रीडा,
पीडाहि पावतें, परि सावध नोहे, न तें धरी व्रीडा. ॥९९ ॥

विषयव्यालेनसमं क्रीडति मुग्धम् स्वघाति मे चेतः ।
न कदापि सावधानं त्रपावशं प्राप्तपीडमपि भवति ॥ ९९ ॥

---

या कोटग्या मनाला विषयीं या काय वाटते गोडी ?
खोडी तुज्या प्रतापावांचुनियां राघवा ! न हें सोडी. ॥ १०० ॥
विषयेषु रसास्वादं कथमुपलभते त्रपाजडं चेतः
निजदुर्वृत्तिं राघव तव प्रतापंविना न हास्यति तत् ॥ १०० ॥

---

बहुसंख्य चपळमर्कटकटकें आज्ञेंत वर्तलीं नीट
वीट न धरशील तरी माझें मन काय तुजपुढें धीट ? ॥ १०१ ॥
बहुसंख्यं कपिकटकं चपलं तव शासने स्थितं सम्यक्
यदि मयि न विरक्तस्त्वं कथमग्रे तव, मनो विधृष्टं मे ॥ १०१ ॥

---

श्रीसद्मीं पदपद्मीं होयिल मन भृंग, दाखवुनि पाहें;
लब्धसुदुर्लभ विषय त्यजिल कसें ? बहु सतृष्ण सकृपा ! हें.
भृंगायेत मनो मे श्रीसद्मनि ते पदाम्बुजे सदय ।
लब्धसुदुर्लभविषयं सकृप कथं त्यक्ष्यति प्रलोलमिदम् ॥ १०२ ॥

---

दे अभयदान देवा ! सेवारत मी तुजा विभो ! भाट;
त्यजितां अनादरानें करीन लोकांत फार बोभाट ॥ १०३ ॥
देवाभयं वितर मे, सेवारत एष तव विभो बन्दी
त्यजतोऽनादरपूर्वं प्रथयेऽपयशस्त्वदीयमधिलोकम् ॥ १०३ ॥

---

त्वच्चरणाराधन मी जाणत नाहींच लेशही इतर
नामाचि गातों, येणें प्रसन्न होवूनि अभय तूं वितर ॥ १०४ ॥
एतं विनापरं त्वच्चरणाराधनविधिं न जानेऽल्पम्
गायामि केवलं तव नामानेन प्रसीद देह्यभयम् ॥ १०४ ॥

---

आहे प्रसाद मजवरि म्हणुनिच वदनासि येतसे नाम,
हें जरि मुखा न येतें, होता कैचा मनासि विश्राम ? ॥ १०५ ॥
त्वमसि प्रसन्न इति मद्वदने तव नाम सर्वदा वसति
यदि नायाति मुखं तन्मनसः कथमस्तु तर्हि विश्रामः ॥ १०५ ॥

---

विकळमना मीं जें कीं वदलों त्याची करीं क्षमा आर्या !
जे सहनशील दक्षिण कृपाळु विश्वार्ह बुध तदाचार्या ! ॥ १०६ ॥
आर्य क्षमस्व तन्मे विकलस्वान्तेन यन्मयाऽभिहितम्
आचार्योसि बुधानां विश्वार्हाणां दयाक्षमाभाजाम् ॥ १०६ ॥

---

दुःख न रुचे, सुख रुचे, कर्में करितां विवेकही न रुचे;
अमृतफळ कसे देतिल पल्लवपाणी स्वकीय विषतरुचे ? ॥ १०७ ॥
सुखमीप्सितं न दुःखं कर्माचरितं विवेकविधुरं तु
कथममृतफलं दद्यात् पल्लवपाणिः स्वकीयगरलतरोः ॥ १०७ ॥

---

हें सर्व सत्य तोंवरि जोंवरि तुज शरण पातलों नाहीं,
आतां थोरपणासाचि आपुलिया मात्र राघवा ! पाहीं. ॥ १०८ ॥
सत्यमिदं तावत्त्वां राघव शरणं न यावदायामि ।
अधुना यशोधन त्वं पालय जनविश्रुतं स्वमहिमानम् ॥ १०८ ॥

---

गंगेला जाउनियां गावखरीचा मिळे जयीं वोढा,
तर्हि ते न म्हणे, ' मागें हा कश्मळ शिवतसे , धरा वोढा ' ॥ १०९॥
ग्रामीया क्षुद्र–सरिद्यदि विष्णुपदीसमागमं लभते
एषा मैव ब्रूयात् ' कलुषेयं स्पृशति कृष्यतां पश्चात् ' ॥ १०९ ॥

---

तूं करुणाघन रामा ! भक्तमयूरासि तूंचि सुख देशी ,
सन्निधि असोनि बापा ! न करीं या किंकरासि परदेशी. ॥ ११० ॥
राम त्वं करुणाब्दो भक्तमयूरं त्वमेव सुखयासि च
सन्निधिवर्ती मा कुरु दासं ते मां विदेशपतितमिव ॥ ११० ॥

---

विश्वंभरा ! भरवसा आहे या किंकरासि फार तुजा;
जें योग्य तें करावें दीनजनोद्धारणैकदक्षभुजा ! ॥ १११ ॥
विश्वसिति त्वयि हृदयं विश्वंभर किंकरस्य मे गाढम् ।
योग्यं तत्कर्तव्यं दीनजनोद्धारणैकदक्षभुज ॥ १११ ॥

---

हा दीन रामनंदन चकोर, तूं चंद्रमा रमानाथा !
दे चित्तस्वास्थ्य बरें, गायीन तुज्या यशोंकिता गाथा. ॥११२॥

एष चकोरो दीनो रामसुतस्त्वं रमापते चंद्रः
अर्पय हृदयस्वास्थ्यं गास्यामि त्वद्यशोऽङ्कितां गाथाम् ॥ ११२ ॥

---

बहु गोड गुण तुझे ते ऐकावे आदरें स्वयें गावे,
या वेगळे मनोरथ नसती ते तूज काय सांगावें ? ॥ ११३ ॥
मधुरतमाः सन्ति गुणास्ते श्राव्याः सादरं मया गेयाः
किं तत्कथनीयं ते यन्मम नान्ये मनोरथाः सन्ति ॥११३॥

---

सौमित्रे ! मजविषयीं तूं आर्यप्रार्थना करीं कांहीं ;
भक्ति तुझी श्रीरामीं बहु कथिलें सत्यशीळ लोकांहीं. ॥ ११४ ॥
सौमित्रे मद्धेतोरार्यं त्वं प्रार्थयस्व किंचिदपि
श्रीरामे तव भक्तिर्बहु कथिता सत्यशालिभिः सुजनैः ॥ ११४ ॥

---

श्रीभरता ! राघवपदलाभरता ! अग्रजासि तूं विनवीं,
मज दीनाला रक्षुनि साधावीं सद्यशें असींच नवीं ॥ ११५ ॥
राघवपदलाभरत श्रीभरत त्वं निजाग्रजं ब्रूहि
नवसद्यशो मयूरं दीनं त्रात्वा त्वयाधिगन्तव्यम् ॥ ११५ ॥

---

शत्रुघ्ना ! भगवज्जनशत्रुघ्ना ! राघवासि हें कळवीं
माझें भवभय सारें राम निदेशें करूनियां पळवीं. ॥ ११६ ॥
भगवज्जनरिपुघातिन् रिपुघातिन्राघवाय कथयेदम्
राम निदेशेन त्वं भवभयमखिलं ममापनुद दूरम् ॥ ११६ ॥

---

माते ! सीते ! बाई ! प्रार्थावें नृपतिला तुवां आंगें,
सुखदुःख तुला ठावें; मजविषयीं उचित तें स्वयें सांगें. ॥११७ ॥
आर्ये सीते मातस्त्वया स्वयं प्रार्थ्यतां मनुजनाथः
सुखदुःखे जानासि त्वं मामुदिश्य समुचितं कथय ॥११७॥

---

भगवद्भक्त हनूमन् ! साधो ! साधो यश प्रसिद्ध तुझें;
मजसाठीं रामाचे पाय धरीं निजशिरीं प्रतापि भुजें ॥११८॥
भगवद्भक्त हनूमन् साधो, त्वं साधुतायशः ख्यातम्
धारय शिरसि मदर्थे रामांघ्री त्वं प्रतापिनौ दोर्भ्याम् ॥११८॥

---

आंगें रिपुबळहर्ता, बाहुबळें ब्रह्मगोळ उध्दर्ता,
तूं मारुते ! पुमर्था देशी रघुवीरसेवनसमर्था ॥ ११९. ॥
सत्यांगे रिपुबलहृद् भुजशक्त्या ब्रह्मगोलकोद्धर्ता
त्वं मारुते पुमर्थं वितरसि रघुवीरसेवनसमर्थ ॥ ११९. ॥

———

अद्‌भुत चरित्र त्रिजगीं लोकोद्धारार्थ करि सुखें विभु जें,
तें त्वच्चरितसखें बा ! त्वांहीं केलें चरित्र तेंवि भुजें ॥ १२० ॥
लोकोद्धृतयेऽतानीद्विभुस्त्रिलोक्यां यदद्‌भुतं चरितम्
तत्त्वच्चरितबलवशात् निजभुजवीर्यात्त्वयाप्यकारि तथा. १२० ॥

———

‘ मजहूनि भक्त माझा समर्थ ’ हें आपणांस वांचविलें
त्वां संकटीं असें शुचिजनांस कथुनि स्वतत्त्व सूचविलें ॥ १२१ ॥
‘ त्वं संकटादरक्षो मेति वदंस्त्वां शुचि स्व किं तत्त्वम्
‘ ईशादपि तद्भक्तो बली ’ ति लोके न्यदर्शयद्रामः ॥ १२१ ॥

———

मच्छक्तिचे स्वरक्षक भक्त भले हें धरा-सुता-शोध
त्वां केला, वांचविलीं, हा कुशळालागि सुचविला बोध ॥ १२२ ॥
कृत्वा धरासुतायाः शोधनसंरक्षणे त्वया बोधः
कुशलजनायोद्दिष्टो भक्तो निजरक्षणक्षमोऽस्तीति ॥ १२२ ॥

———

तूं तो राघव, राघव तो तूं, तुम्हांत तों नसे भेद;
सप्रेम भक्त देवचि, विधुप्रसादीं समानदृग्वेद ॥ १२३ ॥
युवयोर्भेदो नास्ति त्वं राघव एव राघवश्च त्वम्
स्निग्धो भक्तो देवो वेदे शशितत्प्रसादयोर्न भिदा ॥ १२३ ॥

———

आयास मदुद्धरणीं लेश नको, सुलघु मीं सदंघ्रिरज
द्रोण नव्हे, अचळ नव्हे, सहस्त्रमित ज्यांत तुल्य सिंहगज.
नोद्धरणेऽण्वपि कष्टं सदंघ्रिरजसो लघीयसो मे स्यात् ।
नाहं द्रोणमहीभृद्यास्मिन् हरिकुंजराः सहस्त्रमिताः ॥ १२४ ॥

———

जेथ तुम्ही तेथुनि मज पहा कृपामृतरसार्द्रदृष्टीनें,
हतनिर्मितसृष्टीनें शरणागतमरुसुधौघवृष्टीनें ॥ १२५ ॥

यत्र स्थितोसि तस्मात्पश्य कृपामृतरसार्द्रदृष्टया माम्
हृतनिर्मितसृष्टिकया शरणागतमरुसुधौघवृष्टिकया ॥ १२५ ॥

---

दृष्टिमृगी ही तुमची ! राघव पदरागमोहिता आहे,
मज वीतराग रंका निजसुखभरमंथरा कसी पाहे ? ॥१२६॥
भवदीया दृष्टि मृगी राघवपदरागमोहिता नूनम् ।
मां वीतरागरंकं निजसुखभरमन्थरा कथं पश्येत् ॥ १२६ ॥

---

मन मात्र मला अणुला स्मरो तरो तेंव्हड्याचि तद्यत्नें;
अणु परमाणुचि तारूं हृत्पदिंचा हें किजे कुशलरत्नें. १२७ ॥
अणुमपि मां स्मरतु मनस्तरतु च तत्तावतैव यत्नेन
कुशलः कलयतु चित्ते हृत्पदपरमाणुरपि तरणिरेव ॥ १२७॥

---

मी विषयपिंड परवश घरोघरीं, मर्कटांस आप्त गणीं.
म्हणुनि तरि तुल्यभावें पाहें, न तरी त्यजीं गतासु गणीं ॥ १२८ ॥
विषयाणां पिंडो ऽ हं प्रतिभवनं मर्कटान्पराधीनः
आप्तानीक्षे तत्त्वं समदृष्टया पश्य, मृतमिव त्यज वा. ॥१२८॥

संतांसि तरीं प्रेरा जडतारक ते तुम्हांहुनी न उणे,
भूतीं बहु सदयहृदय, पावविती सहज अखिल आत्मखुणे. ॥१२९॥
जडतारकानपि त्वं प्रेरय तावत्सतस्त्वया ऽ नूनान्
भूतदयोपेतास्ते निजात्मतत्त्वं निवेदयिष्यन्ति ॥ १२९ ॥

---

भूतें भगवंतचि ते संतचि, परि यांत किति निजीं लग्न ?
दिसती गृहस्थ वेषें, परि सम्यक्न्यासपदसुखीं मग्न ॥ १३० ॥
भगवन्मयभूतेषु स्थिता अपि स्वात्मतत्त्वलग्नास्ते
यद्यपि गृहस्थवेषास्तथापि संन्यासपदसुखे मग्नाः ॥ १३० ॥

---

कोण्ही श्रीमन्नारदशुकादि कवि मुनि पराशरव्यासीं
हरिगुणसुधाकणांही जनसिंचानिं पाडियलें सुहव्यासीं. ॥ १३१ ॥
व्यासपराशरनारदशुकादिकानां त्रिलोकवंद्यानाम्
मध्ये कश्चिद्धरिगुणसुधया जनसेचनं समारभत ॥ १३१ ॥

---

या चातकलक्षाचें सारस्वत तेंचि जीवन प्राज्य,
इतरांहि जीवन इतरां, हें भीक बरी, नको बुचें राज्य. ॥ १३२ ॥
मम चातकस्य मनसः सारस्वतमेत्र जीवनं प्राज्यम्
इतरेषामप्यन्यद् भैक्ष्यं वरमथ न राज्यमस्ववशम् ॥ १३२ ॥

---

संतीं पंडितपंतीं अंतीं खंतींत चित्त या धरिजे.
कीं देवा सरसनिरस न पाहतां सकट शरण उद्धरिजे. ॥ १३३ ॥
अंते सन्तः पंडितपंता एष्यन्ति मयि विरागत्वम्
सरसानिरसनिरपेक्षस्त्वं देवोद्धर समागताञ् शरणम् ॥ १३३ ॥

---

हेचि अविद्या लंका, तेथ अहंकार दशमुख क्षुद्र;
याचें दहन विखंडन जडजीवोद्धरणपटु सितसमुद्र ॥ १३४ ॥
एषाऽविद्या लंका क्षुद्राहंकार एव दशवदनः
जडजीवोद्धरणपटो तस्य दहनखंडने सितसमुद्रः ॥ १३४ ॥

---

संत भगवंत साचे, परि भगवंतापरीस हे थोर,
हे आंगें अंधाचीं यष्टी होताति थोर बहु थोर. ॥ १३५ ॥
भगवद्रूपाःसन्तो महत्तरा भगवतोऽपि नूनं ते
ये लोचनविकलानां गुर्वी यष्टिः स्वयं भवन्त्येव ॥ १३५ ॥

---

कळिमाजि पुंडरीकक्षेत्रीं सितपक्ष कार्तिकाषाढीं
संत अमृतरस पाजुनि म्हणती, घे हे प्रपा, रहा वाढीं ॥ १३६ ॥
शुचिकार्तिकसितपक्षे कलिकाले पुंडरीकसत्क्षेत्रे
संतोऽमृतरसपानं ददति वदन्ति प्रपेयमत्र वस ॥ १३६ ॥

---

नीलमणिद्युतिभावितपीयूषरसऱ्हद प्रसन्न बरा,
ताप शमे, तृप्ति गमे, चित्त रमे उपरमे, सुसेव्य खरा. ॥ १३७ ॥
नीलमणिद्युतिभावितपीयूषरसऱ्हदः प्रसन्नोऽस्मिन्
तापोपशमस्तृप्तिश्चित्तोपरती रतिः सुसेव्यस्तत् ॥ १३७ ॥

---

वैकुंठचि हें विठ्ठलपदमंडित पुंडरीकसुक्षेत्र,
तेथें हरिगुणकीर्तन, येथेंही तेंच साश्रुजननेत्र ॥ १३८ ॥

वैकुंठमेव विठ्ठलपदभूषं पुंडरीकमुक्षेत्रम्
तत्र श्रीहरिकीर्तनमत्रापि तथैव साश्रुनेत्रजनम् ॥ १३८ ॥

---

वृद्ध तपस्वी पितृपदसेवन सर्वस्वपुंडरीकमुनी
पितृभक्ति पूर्णकाम श्रीरामा दावितो उभा करुनी ॥ १३९ ॥
वृद्धः पितृपदसेवां सर्वस्वममंस्त पुंडरीकर्षिः
पितृभक्तिराप्तकामः श्रीरामं स्थापितं प्रदर्शयति ॥ १३९ ॥

---

गुरुसेवा सद्विद्या पढवाया राम पातला बहुधा
येणें प्यालेहि सुधा सुचला हितमार्गही सुधाच बुधा ॥ १४० ॥
गुरुसेवासद्विद्ये उपदेष्टुं नूनमागतो रामः
अस्मात्सुधां पिबन्तो हितर्जुमार्गं बुधा अबुध्यन्त ॥ १४० ॥

---

आपण सेवा घेउनि पितृचरणीं जोडिली पुन्हां बेडी,
हा पितृभक्त रघूद्वह, कृष्ण नव्हे, बुद्धि नायके वेडी ॥ १४१ ॥
संसेवितः पितृभ्यां बबन्ध तौ प्रेमबंधने न पुनः
भक्तः पितू रघूद्वह एष न कृष्णः शृणोति नो कुमतिम् ॥१४१॥

---

रामत्रय त्यांमध्यें मध्यम तो राम मी, असें हातें
धरुनी नितंबबिंबा दावी खुण रामचंद्र, पाहातें. ॥ १४२ ॥

---

## २ सार्थ व सटीक नारदभक्तिसूत्रें. किं ८८

### ( आवृत्ति तिसरी. )

हीं नारदांचीं भक्तिसूत्रें मूळ संस्कृतांत असून ८४ आहेत. सूत्रें अत्यंत सुबोध व गोड आहेत. यांत भक्तिशास्त्राचा सर्वांगसुंदर विचार केला आहे.: ह्या ग्रंथांत सूत्रांचें वर्गीकरण मोठ्या टाईपांत सूत्रें, सरळ अर्थ व भक्तिग्रंथाधारें विस्तृत विवेचन केलें असून ग्रंथ अतिमधुर झाला आहे.

---

# थोरांचा समागम.

## १ थोरांचा कित्ता.

देखे प्राप्तार्थ[1] जाहले । जे निष्कामता[2] पावले ।
तयाही कर्तव्य असे उरलें । लोकांलागीं ॥ १ ॥
मार्गीं अंधासरिसा । पुढें देखणाही[3] चाले जैसा ।
अज्ञाना प्रगटावा धर्म तैसा । आचरोनी ॥ २ ॥
येथ वडिल जें जें करिती । तया नाम धर्म ठेविती ।
तेंचि येर अनुष्ठिती[4] । सामान्य सकळ ॥ ३ ॥
हें ऐसें असे स्वभावें । म्हणोनी कर्म न संडावें ।
विशेषें आचरावें । लागे संतीं ॥ ४ ॥
म्हणोनी समर्थ जो येथें । आथिला[5] सर्वज्ञते ।
तेणें विशेषें कर्मातें[6] । त्यजावें ना ॥ ५ ॥
मार्गाधारें वर्तावें । विश्व हें मोहरें लागावें ।
अलौकिक नोहावें । लोकांप्रती ॥ ६ ॥
येथें सत्क्रियाचि लावावी । तेंचि एकी प्रशंसावी ।
निष्कर्मींही दावावी । आचरोनी ॥ ७ ॥
आळस सांडूनी । फळकाम[8] दवडूनी ।
आंगें जीवें मांडुनी । कर्मीच भर ॥ ८ ॥
सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमांची वीरा ।
पूजा केली होय अपारा । तोषालागी ॥ ९ ॥
म्हणोनि जें जें उचित । आणि अवसरें करूनि प्राप्त ।
तें कर्म हेतुरहित । आचरें तूं ॥ १० ॥

—ज्ञानेश्वर.

---

१ प्राप्त आहे अर्थ ज्यांना, कृतार्थ, कृतकृत्य. २ ज्यांच्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या. ३ डोळस. ४ आचरतात. ५ प्राप्त झाला. अस्ति ( आहे ) ह्याचा अपभ्रंश आथी. आथिला= असलेला, पावलेला. ६ कर्तव्यकर्में जाणत्यांनीं तर सोडूं नयेतच. ७ मार्गाला. मोहर = मार्ग. मोहरें ( अव्यय ) = पुढें, समोर. अडाणी भाषेंत याचेंच रूप ह्मोरें असें आहे. ८ फळाची इच्छा.

## २ दान आणि दया.

( १ ) आतां देहवाचाचित्तें । यथा संपन्नें वित्तें ।
वैरी जालियांही आर्तातें[1] । न वंचणें जें ॥ १ ॥
फुलीं फळीं छाया । मूळीं पत्रींही धनंजया ।
वाटेचा न चुके आलिया । वृक्ष जैसा ॥ २ ॥
तैसें मनौनि[2] धनवरी । विद्यमानें आल्या अवसरीं ।
श्रांताचिये मनोहारीं[3] । उपयोगा जाणें ॥ ३ ॥
तया नांव दान । जें मोक्षनिधानाचें अंजन ।

... ... ... ...

( २ ) आतां दया ते ऐसी । पूर्ण चंद्रिका जैसी ।
निववितां न कडसी[4] । सानें थोर ॥ ५ ॥
पुढिलांचेनि[5] तापें । कळवळलिये कृपें ।
दिधलें आपणपें[6] । न्यूनचि मानी ॥ ६ ॥
पै पायीं कांटा नेहटे[7] । तंव व्यथा जीवीं उमटे ।
तैसा पोळे संकटें । पुढिलांचेनि ॥ ७ ॥
कां पांवो[8] शीतळता लाहे । कीं तें डोळियांचिलागीं होये ।
तैसा परसुखें जाये । सुखावत जो ॥ ८ ॥
किंबहुना तृषितालागीं । पाणी आरायिलें असे जगीं ।
तैसें दुःखिताचे सेळेंभागीं[10] । जिणें जयाचें[9] ॥ ९ ॥
तो पुरुष वीरराया । मूर्तिमंत जाण दया ।

... ... ... ज्ञानेश्वर.

## ३ हरिभजनाचा सुलभ मार्ग.

अकराही इंद्रियवृत्ती । कैशा लावाव्या भगवद्भक्ती ।
ऐक राया तुजप्रती । संक्षेपस्थिति सांगेन ॥ २९९ ॥
मनें करावें हरीचें ध्यान । श्रवणें करावें कीर्तिश्रवण ।
जिव्हेनें करावें नामस्मरण । हरिकीर्तन अहर्निशी ॥ ३०० ॥
करीं करावें हरिपूजन । चरणीं देवालया गमन ।
घ्राणीं तुलसी-आमोदग्रहण । जिहीं हरिचरण पूजिलें ॥३०१॥

---

१ शत्रुही आर्त म्ह० पीडा पावलेला असला तरी. २ मनापासून धनापर्यंत. ३ त्याच्या मनाचा संतोष होईतों. ४ लहानथोर हा विचार नाहीं. ५ दुसऱ्यांच्या. ६ आपल्याला, सर्वस्वाला. ७ बोंचे. ८ पायाला. ९ सुखस्वरूप झालें. १० अग्रभागीं.

नित्य निर्माल्य मिरवे शिरीं । चरणतीर्थं अभ्यंतरीं ।
हरिप्रसाद ज्याचे उदरीं । त्या देखोनि दूरी भवभय पळे ॥२०२॥
—एकनाथी भागवत ( अ० २ ).

---

## ४ देशभक्ताचा सोहळा.

दिंडी.

देशभक्ता प्रासाद बंदिशाळा
शृंखलांच्या गुंफिल्या पुष्पमाला ।
चिता सिंहासन शूल राजदंड
मृत्यु दैवत दे अमरता उदंड ॥ १ ॥
—विनायक कवि.

---

# ५ सणांचा व खेळांचा ऱ्हास.

१ आम्ही हिंदु लोक, विशेषतः आम्ही श्रेष्ठ वर्णांतले ब्राह्मण वगैरे लोक, कोणत्याही काळीं म्हणण्यासारखे खेळप्रिय अथवा खिलाडू होतों किंवा नाहीं याचा बराच संशय आहे. जे खाऊनपिऊन सुखी आहेत; ज्यांना कोणत्याही प्रकारचा व्यायाम करण्यास प्रतिबंध नाहीं; विद्यार्जनाची विशेष काळजी ज्यांच्या पाठीमागें लागलेली नाहीं; ज्यांना फाजील मानसिक श्रम करण्याची गरज पडत नाहीं; ज्यांना उघड्या हवेंत फिरण्याची व शारीरिक श्रम थोडेबहुत तरी करण्याची संवय आहे, अशा लोकांसच बहुधा व्यायामशील खेळांची हौस असते व गोडी समजते.

२ श्रम दोन प्रकारचे आहेत: शारीरिक व मानसिक. एकाच व्यक्तीला दोनही प्रकारचे फार श्रम कधींही झेंपावयाचे नाहींत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत शेतांत काबाडकष्ट करणारा कुणबी तत्त्वशोधक असूं शकणार नाहीं; आणि पुस्तक व लेखणी यांशीं रात्रंदिवस ज्याचा समागम आहे त्याच्यानें घटकाभरदेखील नांगर धरवणार नाहीं. ज्याच्या हातापायाला फार कष्ट करावे लागतात त्याला डोक्यास विश्रांति द्यावी लागते; व ज्याचें डोकें सदासर्वदा कांहींतरी व्यवसाय करीत असतें त्याला आपल्या हातापायांस फारसें हालू देतां येत नाहीं; तथापि ज्याप्रमाणें शारीरिक श्रम करणाऱ्या मनुष्याला आपलें

मनुष्यत्व राखण्यासाठीं व आपला धंदा नीट रीतीनें करतां येण्यासाठीं थोडेबहुत मानसिकश्रम करणें जरूर आहे, त्याप्रमाणें रात्रंदिवस मानसिकश्रम करणाऱ्या तत्त्वशोधकाला, पंडिताला, किंवा मंत्र्याला प्रकृति साफ राखण्यासाठीं थोडाबहुत व्यायाम करणें जरूर आहे.

३ जो साऱ्या दिवसभर ओझीं उचलण्यानें किंवा पुस्तकांचीं पानें चाळल्यानें भागून गेला आहे त्याला क्रिकेटाच्या बॅटाचे टोले मारण्यांत किंवा चेंडूच्या पाठीमागें पळत सुटण्यांत मौज कोठून वाटणार ? या दोहोंपैकीं पहिल्यानें आपलें काम आटपल्यावर जमिनीवर किंवा ईझीचेअरवर आपले पाय पसरून तंबाखूचा धूर सोडीत रहावें अथवा तब्येत लागल्यास आणि वाचतां येत असल्यास ' करमणुकी ' सारखें एकादें पत्र किंवा 'आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी' सारखें एकादें पुस्तक हातीं घेऊन मनोरंजन करावें आणि दुसऱ्यानें हातांत काठी घेऊन उघड्या हवेंत फिरण्यास निघावें, अथवा फारच झालें तर बॅडमिंटन किंवा लॉनटेनीससारख्या हलक्या खेळांत शिरून अंगांतून थोडासा घाम काढावा, व मनाचे व्यापार कांहीं वेळ बंद ठेवून त्यास विश्रांति द्यावी, हेंच उचित दिसतें. तर मग व्यायामशील खेळ विशेषेंकरून खेळावे तरी कोणी ? अर्थात् ज्यांना चांगलें खाणें पिणें मिळत असून मानसिक किंवा शारीरिक श्रमांपैकीं कोणतेही श्रम विशेष करावे लागत नाहींत त्यांनीं ! हें क्रिकेट, टेनिस, हुतूतू, मुदुंगपाट्या, विटीदांडू खो–खो वगैरे व्यायामशील खेळांच्यासंबंधानें झालें. अनेक शतकांच्या पारतंत्र्यामुळें आमचा जो शक्तिपात झाला आहे त्याच्या योगानें असल्या खेळांबद्दल आमच्या मनांतील उत्साह नाहींसा व्हावा, व आम्हांस त्यांची आवश्यकता वाटेनाशी व्हावी, हें कदाचित् स्वाभाविक असेल; पण त्यांबरोबरच बैठ्या खेळांचा व सणांचाही ऱ्हास होत चालला आहे हें पाहून आम्हांस फार वाईट वाटतें. मनुष्य हा जात्या उत्सवप्रिय प्राणी आहे असें सामान्य वचन व अनुभव असून त्याच्या उलट येथील स्थिती दृष्टीस पडावी हें अत्यंत शोचनीय नाहीं काय ? इंग्रजी राज्य आणि पाश्चिमात्त्य विद्या यांचे या देशावर जे अनिष्ट परिणाम घडले आहेत किंवा घडत आहेत त्यांतच आम्ही या ऱ्हासाचा समावेश करितों.

४ मधून मधून नित्याचे कष्ट बंद होऊन मनास वाटेल तसें खावेंप्यावें, हिंडावें, फिरावें अथवा बसल्याजागीं एकाद्या चांगल्या करमणुकीशीं कांहीं वेळ दंग होऊन जावें हें ज्या लोकांस अवश्य वाटेनासें झालें आहे किंवा तसें करण्याची ज्यांना सवड होत नाहीं, त्या लोकांची स्थिति बिलकूल चांगली नाहीं, असें साफ अनुमान करण्यास कांहीं एक हरकत नाहीं. परक्या अमलामुळें एका

टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत सारा देश अत्यंत विकल होऊन गेला आहे. मोठमोठ्या हुद्यांचीं, पुष्कळ किफायतीचीं व भारी जबाबदारीचीं, सरकारी कामें टोपीवाला बळकावून बसला. इतकेंच नाहीं, तर आमचा हरएक व्यापारधंदा देखील त्याच्या तब्यतीप्रमाणें व त्याचा फायदा होईल अशा रीतीनें चालूं लागल्यामुळें कोणालाही आपल्या श्रमाचें, कर्तबगारीचें, व मर्दुमकीचें मिळावें तसें फळ मिळत नाहीं. शेंकडा नव्वद लोकांना शुद्ध चरितार्थासाठीं अहोरात्र खपावें लागतें. अशा स्थितींत सर्व देशाच्या मुखश्रीवर खिन्नता दृष्टीस पडावी आणि कोणास कशांतही गोडी न वाटावी हें अगदीं साहजिक आहे. पण आम्ही जर असें एकसारखें मुळू मुळू करीत बसलों तर आमची स्थिति कधींच सुधरावयाची नाहीं. इंग्रजी अमलानें आम्ही निस्तेज झालों अहों खरें; पण त्याच अमलापुढें सतेज होण्याचे उपायही आम्हांस करूं लागले आहेत.

५. तुमचे सांप्रतचे प्रभु तुमच्या स्वातंत्र्यापहाराबद्दल तुम्हांस आपल्या विद्या, आपल्या कला, व आपलें राजकारस्थान शिकवीत आहेत, आणि या त्यांच्या औदार्यामुळें व कृपेमुळें तुम्हांस केव्हांतरी सुदिन येण्याचा खचित संभव आहे. तेव्हां आपल्या मानसिक व शारीरिक कमकुवतपणामुळें जी कुदशा प्राप्त झाली आहे तीबद्दल खेद करीत न बसतां, जेणेंकरून प्रतिदिवशीं आपली स्थिति सुधारत जाईल असें वर्तन केलें पाहिजे.

६. कधीं कधीं पूर्ण अनध्याय करून मनाला व शरीराला नित्यश्रमाच्या जुंवापासून खुलें केलें पाहिजे, व जेणेंकरून सारी वृत्ति अत्यंत उल्हासमय व कार्यक्षम होईल अशा प्रकारचें आचरण हातून घडण्यास प्रत्येकाला नाना-प्रकारचे खेळ खेळण्याची व सण करण्याची हौस पाहिजे असें आम्हांस वाटतें. वर्षांतले कांहीं दिवस निर्दोष सुखोपभोगांत घालविणें कोणत्याही रीतीनें अपायकारक न होतां उपकारक होईल हें सिद्ध करण्याची गरज नाहीं. दसरा, दिवाळी, संक्रांत हे किती नामी सण आहेत बरें ! पण अलीकडे जो पहावा तो वेदांती होऊन बसलेला ! "यांत काय आहे ? त्यांत काय आहे ! तें पोरकट ! तें आचरट ! हें शिकलेल्या लोकांस उचित नाहीं; तें अडाणी लोकांसच योग्य आहे;" अशा प्रकारच्या बुद्धिभ्रंशानें सोंगट्या, फांसे, बुद्धिबळें, दशावतारी गंजिफा वगैरे बैठ्या खेळांचा लोप होऊन, जो, तो 'अभ्यास–' 'अभ्यास,' 'बुक–' 'बुक–' व 'काम' 'काम' करूं लागला आहे ! असली अपायकारक श्रमव्यग्रता कांहीं कामाची नाहीं. तिच्या योगानें नानाप्रकारचे क्लेश सोसावे लागून आयुष्य क्षीण होतें. तसें न होऊं देण्यास एकच उपाय आहे तो हा कीं, वर सांगितलेल्या चांगल्या सणांत होईल तितका आनंदीआनंद करावा. खऱ्या सुधारणेचीं तत्त्वें अशा वर्तनास प्रतिकूल नाहींत.

—गोपाळ गणेश आगरकर.

# श्रीगोदागौरव

हे गोदावरि ! विश्रुत ऐशा ब्रह्मगिरीच्या प्रिय तनये, ।
जगदानंदन रघुनंदन ज्या तुजला वंदन करि विनयें ॥
कैलासाच्या वृद्ध पतीनें वरिलें, त्रिजटेवरि धरिलें, ।
त्या तुज वाहुनि 'लोटांगण' मी होइल कां गे आदरिलें ? ॥
आदिकवि श्रीवाल्मीकींची शुचि रुचिरा ती सरस्वती, ।
तव गौरव-रव करोनि धांवे भूगोलावरि कीर्तिमती, ॥
सुरस कथा तव कथुनि पुराणें गाती गोदे ! बहु महती, ।
भवभूतीची प्रतिभा-दावी तुझी विभूती मूर्तिमती. ॥
ऐसे कोकिल गाती जेथें, तेथें 'कौं'-रव काय करूं !
खुलवुं कशाला पलाश तेथें, फुलले जेथें देवतरूं ! ॥
रसाल सेविति जनांपुढें त्या करवंदें मी काय धरूं !
अंकावरिच्या अज्ञ शिशूचे प्रेमें स्वैरालाप जसे ॥
परिसे माता, तसें न भारत अठरा पर्वहि पर्वतसें ! ॥
अयि गोदे ! त्वत्प्रसाद व्हाया यत्न असे मम हा सगळा. ।
विशंक गातों. गोड नसेना, सद्गद आहे यास गळा. ॥
गिरिशिखराहुनि जगदाधारा धारा ही तव अवतरते, ।
छुम छुम झुम झुम जलकलरव हे नादब्रह्मच कीं नटतें ? ॥
राहिन हे तव जलधारारव अवधाराया या शिखरीं, ।
जय संजीवनि ! जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरीं. ॥
किति सुखशीतल ! सत्संगासम आश्रित-तनुमन गार करी, ।
भवजालांतहि बद्ध जनांच्या आणुनि देतें मोक्ष करीं. ॥
पावन पावन ! गंगे ! तुजसम तीर्थमहात्म्य न भूमिवरी. ।
पुष्कर राजा म्हणवुनि, लोकीं पूज्य विधी इतुकाच तरी. ॥
जगताच्या इतिहासांतिल हें सत्याचें संशोधन कीं ? ।
कीं सृष्टींतिल पुराण तें हें ? स्मृतिचें हेंच निवेदन कीं ? ॥
कीं हा संगम षडागमांचा ? कीं निगमांचें सार खरें ? ।
अनुपम ऐशा आत्मरसाचा हा अवतारचि कां न बरें ? ॥
भूतांवरिचें तव वात्सल्यचि अमृतमिषें हें संभवलें,
द्रवलें चंद्रकलामृत यांतचि, शिवचरितामृत कालवलें; ॥
त्रिगुणित ऐसें हें परमामृत पाजुनि तृष्णा दूर करीं; ।
जय संजीवनि ! जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरीं. ॥
शांत मनाला प्रसन्नता ये गंगे ! या तव जलांपरी, ।

स्वानंदाच्या ठुमकति त्यावरि मनोज्ञ मंजुलशा लहरी. ॥
सकल मलांचें भंजन कीं हें ? विकल मनांचें रंजन कीं ?
विषयांधांचें अंजन कीं हें ? ज्ञानमधूच निरंजन कीं ? ॥
कीं संजीवन वैराग्याचें ? शांतरसामृत खरोखरी !
ह्याचा एकहि कण प्याल्यावरि चर्चा मग यम काय करी ? ॥
हें मुक्तीचें केलिसरोवर, यांतुनि हो रममाण मना !
जगदात्म्याचें निर्मल बिंबचि, तूं प्रतिबिंब सजे सुजना !
परम सुखाचा डोह शरीरा ! मार बुडी तूं स्नान करीं. ॥
जय संजीवनि ! जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरीं.
ध्यानहि जरि तव पावन करितें, स्नान तरी वद काय करीं ?
स्नान, पान, गुणगानहि केलें, देशिल फल मग काय तरी ? ।
अधिकाचें फल अधिकचि म्हणती, पण तें माझ्या ठेव करीं ॥
जय संजीवनि ! जननि पयोदे ! श्रीगोदे ! भवताप हरीं. ॥
जन्मुनि तीरीं, पिउनि तुझें पय, न करिन तव गुणगौरव हा, ।
अधमपणास्तव चुकेल कां गे सांग मला तरि रौरव ? हा ! ॥
तव गुण गातां रमवुनि यमही झुलविन शब्द-ब्रह्म करीं. ।
जय संजीवनि ! जननि पयोदे ! श्रीगोदे ! भवताप हरीं. ॥

—चंद्रशेखर कवि.

---

॥ श्रीविठ्ठल प्रसन्न ॥

# मुमुक्षूचें स्थानांतर.

( लेखकः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर. )

१ श्रीविठ्ठलकृपेनें ‘ मुमुक्षु ’ आज पुण्यपत्तनांतून नाशीकक्षेत्रीं वस्ती करावयास आपलें ‘कार्यालय’ घेऊन जात आहे. बाळपणापासून मला तीर्थक्षेत्राची आवड असे, व आपलें उत्तरवय तीर्थक्षेत्राच्या ठिकाणीं जावें अशी तेव्हांपासूनची उत्कंठा असे. बी. ए. झाल्यावर पांच वर्षें श्रीपंढरपूरक्षेत्रीं मोरोपंती कवितेच्या अभ्यासार्थ व चरित्रलेखनार्थ विठ्ठलचरणापाशीं राहिलों. तीर्थक्षेत्रांचें पावित्र्य फार मोठें आहे. शुभसंस्कारांची ती खाण आहे. तेथें भक्तभाविकांचा सहवास घडतो, श्रवणकीर्तनाचा छंद लागतो व मनुष्य परमार्थप्रवण होतो. पंढरीचा वास मला फार उपकारक झाला. सारा इंग्रजी विद्याभ्यास पुण्यास झाला. तीं बारा वर्षें व मुमुक्षूच्या आयुष्यांतलीं १२ वर्षें मिळून २४ वर्षें सतत पुण्यांत

वस्ती झाली. पुणें शहर विद्येचें आदिपीठ आहे व अजूनही महाराष्ट्रांत त्याचें पहिलेंच स्थान आहे. तेथें आगरकर, वामनराव आपटे यांसारखे गुरु भेटले; रानडे, टिळक, जिन्सीवाले यांसारख्या विद्वान् देशभक्तांचीं व्याख्यानें ऐकावयास मिळालीं; गोविंदसुतांसारखे अनेक स्नेही मिळाले; वाचनालयें, वर्तमानपत्रें यांच्या संगतींत अनेक वर्षें गेलीं, अनेक विद्वान्, रसिक व व्यासंगी लोकांचा परिचय झाला, त्यांच्यांशीं संभाषणें, चर्चा, वादविवाद झाले, व विद्याभ्यसनाचें व्यसन जडलें. पुण्याचा संबंध सर्वस्वी सुटणें कठिण आहे. उत्तरहिंदुस्थानांतील यात्रा घडल्या व वयाचे ५० वे वर्षीं नाशकास आलों, तेथेंच मन रमल्यामुळें आज ७ वर्षें सहकुटुंब तेथेंच राहत आहे. पुण्याच्या पंचक्रोशींत आळंदी, देहु, चिंचवड ह्या आवडत्या तीर्थांच्या सहवासामुळें पुणें प्रिय वाटत होतें व वाटतेंही; तथापि नाशीकही कमी नाहीं. श्रीरामरायांनीं आपल्या १४ वर्षांच्या वनवासापैकीं १२॥ वर्षें येथें वास्तव्य केलेलें, श्रीनिवृत्तिनाथांनीं त्र्यंबकेश्वरीं समाधि घेऊन त्या स्थानाला शोभा आणलेली व श्रीसमर्थांची तपोभूमि येथून अवघ्या दोन मैलांवर ! गंगातीराचा व गंगास्नानाचा आनंद तर अत्यंत पवित्र. दोन दोन घटका गंगामाईच्या सहवासांत निवांत बसण्यांतही केवढें समाधान आहे ! पुण्यास ही क्षेत्रपणाची मौज नाहीं. तेथें मौजा आहेत, अनेक आहेत, पण त्या निराळ्या प्रकारच्या ! पुण्यास विद्वत्समागमाची मोठी मौज आहे. पण तिचा पुष्कळ अनुभव घेतला. ही येथची मौज कांहीं न्यारी आहे. ग्रंथलेखनाचे अजून थोडेसे ढंग करावयाचे आहेत ह्मणून पुण्याची सोयरिक सर्वथा सुटत नाहीं, तथापि अंतरंगप्रीति तीर्थक्षेत्रवासाची खरी ! येथें ठाण्यामुंबईसारखीं मराठी ग्रंथसंग्रहालयें नाहींत, येथें भारतेतिहाससंशोधक मंडळाचें कार्यालय नाहीं. या अडचणी येथें भासतात; पण त्यासाठीं तिकडे अधूनमधून जाणेंयेणें ठेवल्यानें बराचसा कार्यभाग होणारा आहे.

> जनस्थान गोदातटीं । परमपावन पंचवटी ।
> येथें पडली कृपादृष्टि । रघूत्तमारायाची ॥

असें समर्थांनीं स्वतः ह्मटल्याप्रमाणें त्यांना प्रत्यक्ष श्रीरामरायाचा अनुग्रह झाल्याचें हें स्थान आहे. ज्ञानोबारायांनीं ज्ञानेश्वरींत दोनदां ज्या 'ब्रह्मगिरी'चा सप्रेम उल्लेख केला आहे तो ब्रह्मगिरीपर्वत — तें गोदावरीचें उगमस्थान — येथून मोटारीनें एका तासांत जवळ करितां येतें. मोरोपंतांनीं काशीक्षेत्रीं गंगेच्या कांठांवर बसून जें गायन केलें—

> तुझ्या तीरीं नीरीं हृदय रमतें, दुःख शमतें,
> यशोगानें पानें कुमत गळतें, विघ्न टळतें, ।
> कळी भंगे, गंगे ! षडरि झुरती, दोष जुरती
> दिली रासें नामें तशिच जगतीला निजगती ॥

तें येथें गोदावरीचा मंजुल ध्वनि कानावर सतत पडत असतांना ऐकूं येतें. येथें **राम** आणि **गंगा** साऱ्या हिंदवासीयांना आपलेकडे खेंचीत असतात व या नानाविध लोकांतही क्वचित् भक्तभाविकांच्याही भेटीगांठी पडून आपलें परमार्थसुख आपल्याला द्विगुणित–शतगुणित करितां येतें. नाशीक हें शहर आहे व क्षेत्रही आहे. येथें शहराच्या सुखसोयी व क्षेत्रवासाचा आनंद आहे. येथें गुरुभक्त व संतप्रेमी ' माईंचा ' सहवास घडत आहे; अधूनमधून वाईचे नरहरशास्त्री खरशीकर, नागपूरचे भाऊशास्त्री वझे, सोनगीरचे केशवदत्त महाराज यासारख्या भगवत्प्रेमी सज्जनांच्या कीर्तनप्रवचनसमागमाचा आनंद मिळत असतो. परमार्थसुखभोगाला क्षेत्रवास फार उपकारक आहे.

२ आज सतत सात वर्षें नाशीकपंचवटींत आमचें राहणें झालें पण ह्या काळांत ' मुमुक्षुकचेरी ' पुण्यासच ठेवली होती. ऑफीस व कारकून पुण्यास व आह्मी नाशकास ! घरांत दुखणीबाणीं व स्वतःच्या जिभेचें भयप्रद दुखणें ह्यामुळें मला स्वतःला मुमुक्षूकडे पुरें लक्ष द्यायला सांपडलें नाहीं. चार वर्षें मुमुक्षु नुकसानींत चालविला आहे, त्याच्यापायीं फार झीज सोसावी लागली आहे. एक गोष्ट सांगावीशी वाटतें कीं, आज २३ वर्षांत मुमुक्षूनें आह्मास कांहींएक द्रव्यलाभ दिला नाहीं. तो आपल्या पायावर उभा राहिला ह्मणजे मिळविली. मुमुक्षु आमच्या चरितार्थाचें केव्हांही साधन नव्हतें व नाहीं. हें आवडीचें, केवळ हौसेचें काम, ह्मणून आह्मी इतकें वर्षें चालविलें आहे. हें आपलें कर्तव्य आहे या बुद्धीनें मुमुक्षु वाढविला आहे. ' मुमुक्षू ' मुळें अनेक सज्जनांचे लागेबांधे जमून गेले, परमार्थप्रियांचें एकीकरण झालें, अनेकांस विश्रांतीचें स्थान झालें, अनेकांचे लेख मुमुक्षूंत प्रसिद्ध करितां आले व ते लेख पुढें ग्रंथरूपानें प्रकाशित झाले, स्वतःच्या पारमार्थिक विचारांस प्रकट होण्यास थोडासा मार्ग मिळाला. केवळ परमार्थविचारांस वाहिलेला ' मुमुक्षु ' हा पहिलाच धर्मसेवक होय. ' रामदास आणि रामदासी ' ' रामकृष्णनिकेतन ' ' तत्त्वज्ञानमंदिर' 'सद्भक्तिप्रकाश' ' पुरुषार्थ ' अशीं परमार्थविषयांस व वाङ्मयास वाहिलेलीं चारदोन मासिकें व ' सुदर्शना ' सारखीं परमार्थास एखादें पृष्ठ देणारीं वर्तमानपत्रें मुमुक्षूच्यानंतर निघालीं आहेत, पण मुमुक्षूनें स्वतःस आंखून घेतलेल्या मार्गानें आक्रमण करण्याचें काम सतत दोन तपें केलें आहे. श्रीशंकराचार्य ( डॉ. कुर्तकोटी ) यांच्या आश्रयाखालीं चाललेला ' स्वधर्म ' बंद पडला आहे. धार्मिकपत्रें व मासिकें आधीं विरळ, व चाललीं तर संपादकाच्या आवडीमुळेंच टिकाव धरून राहतात. लोकांस ज्या तऱ्हेचें वाङ्मय वाचावयास पाहिजे आहे तेंच जे पुरवितात त्यांचें ठीक चालतें. राजकारणास वाहिलेलीं केसरी, नवाकाळ, महाराष्ट्र इत्यादि वर्तमानपत्रें व विविध विषयांवर उपयुक्त लेख प्रसिद्ध करणारें चित्रमयजगत्सारखें एखादेंच मासिक आपला संसार टुमदार

रीतीनें चालवीत आहेत. ही समाधानाचीच गोष्ट आहे. राजकारण हा राष्ट्राला महत्त्वाचा विषय आहे, त्याकडे लोकांचें चांगलें लक्ष आहे व असावें हें योग्य आहे. राजकारणाइतकाच किंबहुना आमच्या दृष्टीनें थोडा जास्त महत्त्वाचा विषय धर्म आहे. धर्म, राजकारण, वाङ्मय, शास्त्रें ( आध्यात्मिक व आधिभौतिक ), व्यापार व हरतऱ्हेचे हुन्नर, शिक्षण हे राष्ट्रीय उन्नतीच्या दृष्टीनें सर्वच महत्त्वाचे विषय आहेत व राष्ट्रांतील लोकांचें ह्या सर्व विषयांकडे लक्ष वेधणें अतिशय जरूर आहे. पुण्याचें 'गोरक्षण' पत्र, बडोद्याचा 'व्यायाम,' बालशिक्षणाकडे लक्ष पुरविणारा पुण्याचा 'आनंद' हीं आपापलीं कामें फार चांगल्या तऱ्हेनें बजावीत आहेत. जिल्हानिहाय कांहीं वर्तमानपत्रें अलीकडे चांगल्या प्रकारें आपापल्या जिल्ह्यांत चालविलीं जात आहेत. पोट सर्वांनाच आहे. पण वर उल्लेखिलेलीं व इतरही अनेक वर्तमानपत्रें व मासिकें पोटासाठीं नव्हे पण आपापले ध्येयानुरूप आपापलीं कामें करीत आहेत. कोणी पोटभर जेवतात, कोणी अर्धपोटी राहतात, पण हें ज्याचें त्याचें प्राक्तन आहे, पराक्रम आहे किंवा लोकाभिरुचि अजमावण्याचें कसब आहे. केवळ पोटार्थी लोक वर्ष दोन वर्षांत आपलें काम सोडून देतात, वर्षानुवर्षें लाभहानीकडे न पाहतां आपलें कर्तव्य करीत राहणें हें काम सोपें नाहीं. याला बुद्धीचा तणावा व मनाचा खंबीरपणाच लागत असतो. देशाची परिस्थिति अनेक तऱ्हेनें सारखी बिकट होत चालली असतांना आपले लोक वरील गुण कमावीत आहेत हें सुचिन्ह आहे. दुर्दैवाची एकच गोष्ट आहे ती ही कीं, 'मतामतांचा गलबला। कोणी पुसेना कोणाला' ह्या प्रकारची बजबजपुरी धर्म, राजकारण व वाङ्मय या महत्त्वाच्या बाबींतही दिसून येत असून वाढत्या प्रमाणावर आहे. अशाही परिस्थितींत ज्यानें त्यानें आपल्या आंखलेल्या मार्गानें चालावें व यशापयशाचें सूत्र नारायणाच्या हातीं द्यावें ( तें आहेच पण ओळखावें ). ज्यांच्यांत मुमुक्षा नसेल त्यांच्यांत ती उत्पन्न व्हावी व ज्यांच्यांत मंद असेल त्यांच्यांत तीव्र व्हावी यासाठीं भक्तिज्ञानवैराग्यविवर्धक विचारांच्या लहरी स्वधर्मबांधवांत वाढीस लावाव्यांत हा 'मुमुक्षु'च्या अवताराचा हेतु आहे, व तो कितपत सिद्धीस गेला आहे हें नारायणाला माहीत आहे. व कांहीं भक्तभाविक जाणत आहेत. मुमुक्षूवर व मुमुक्षुकर्त्यावर आत्मीयत्वाचें प्रेम ठेवणारे लोक महाराष्ट्रांत आहेत व म्हणूनच त्यांच्या प्रेमसिंचनानें तो जगला आहे. आमचें मुख्य लक्ष ग्रंथलेखनाकडे राहिलें, या कारणामुळें व अनेक सांसारिक आपत्तींमुळें मुमुक्षूकडे हवें तितकें लक्ष पुरविण्यास मला सवड झाली नाहीं ही गोष्ट खरी, पण यापुढें मुमुक्षु आपल्या नजरेखालीं चालविण्याचें योजल्यामुळें त्याची यापुढें आबाळ होणार नाहीं असा भरंवसा वाटतो. साठीच्या घरांत आलेलें वय, शारीरिक व सांसारिक अडचणी व आपला ग्रंथलेखनाचा व्यवसाय या

गोष्टी संभाळून मुमुक्षूकडे अधिक लक्ष देण्याचें आम्हीं मनांत आणलें आहे. आमच्या ग्राहकांनींही मुमुक्षूकडे प्रेमाच्या दृष्टीनें पाहावें व आपल्या स्नेह्यासोबत्यांचें साह्य मुमुक्षूस मिळवून द्यावें अशी विनंति आहे.

३ आमचे विद्यालयीन मित्र रा. श्रीपत बाजी जोग यांचें वास्तव्य पुण्यास असल्यानें व त्यांनीं गेलीं सहा वर्षे मुमुक्षु ऑफीसच्या कामावर निष्कामप्रेमानें देखरेख ठेवल्यानें आमचें येथें सुखानें राहणें झालें. आपल्या ऑफीसचीं किंवा घरगुती कामें क्षणभर बाजूला ठेवूनही त्यांनीं मुमुक्षूच्या कामाकडे लक्ष पुरविलें. रा. श्रीपतराव हे उत्तम संस्कृतज्ञ आहेत. जगन्नाथ शंकरशेटची पहिली स्कॉलरशिप व कित्येक बक्षिसें यांस मिळालीं होतीं. प्रारब्धवशात् यांचा पुढील अभ्यासक्रम पुरा झाला नाहीं. व त्यांस पुण्याच्या म्युनिसिपालिटींत काम करावें लागत आहे. तें असो. अलीकडे मुमुक्षूंत निवडक संस्कृत स्तोत्रें देऊन त्यांचें सरळ भाषांतर करण्याचें त्यांनीं सुरू ठेवलें आहे. संस्कृतांतील १२।१५ उत्तमोत्तम स्तोत्रांचें सरळ व सुलभ भाषांतर करण्याचें कार्य ते पुरें करणार आहेत. त्यांचें भाषांतर किती उत्कृष्ट होत आहे हें आमच्या वाचकांस माहीत आहेच. सवडीनुसार स्वतंत्र लेख लिहिण्याचेंही त्यांनीं कबूल केलें आहे. त्यांचे येथें उघड रीतीनें आभार मानतों.

४ '**मराठी वाङ्मयाचा इतिहास**' लिहिण्याचें काम मीं अंगावर घेतलें असून ह्या प्रचंड ग्रंथाचे पांच भाग पुढील दहा वर्षांत प्रसिद्ध व्हावेत असा मनोदय आहे. 'ज्ञानेश्वरनामदेवांचा काळ' हा पहिला खंड ३।४ वर्षें तयार होत असून तो विजयादशमीच्या आंतबाहेर छापावयास घ्यावयाचा आहे. हा भाग ह्या पूर्वींच प्रसिद्धही झाला असता. पण एक वर्ष जिभेच्या दुखण्यानें घेतलें व अलीकडे मधुमेहाची विकृति झाल्याचें डॉक्टर सांगतात, यामुळें विलंब लागला आहे. प्रस्तुत भागाच्या प्रकाशनार्थ खानदेशांतील प्रसिद्ध दानशूर गृहस्थ अंमळनेरचे श्रीमंत प्रतापशेट यांनीं मोठी रक्कमही स्वसंतोषानें दिली आहे. हे सर्व भाग प्रसिद्ध होऊन मराठी वाङ्मयाची सेवा पूर्ण व्हावी असा संकल्प आहे तो पूर्ण करणार नारायण समर्थ आहे. शारीरिक व मानसिक स्वास्थ्य देऊन त्यानें महत्कार्य माझे हातून तडीस न्यावें अशी त्याचे चरणीं नम्र प्रार्थना आहे.

सेवा करावया लावा देवा ! हा योग्य चाकर ।
या तप्ताच्या शिरीं आतपत्र हो तुमचा कर ॥
मायानदींत श्रीरामा ! तुझे चरण सांगडी ।
बहु आवडले हेची साधूंच्या मानसा गडी ॥

—मोरोपंत.

५ पुढील सपटंबर अंक नाशीकक्षेत्रीं प्रसिद्ध होईल. याकरितां आगष्ट १५ च्या पुढें लेख पाठविणें, मनीऑर्डरी पाठवणें, पुस्तकांची मागणी करणें वगैरे सर्व प्रकारचा पत्रव्यवहार ' लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, नाशीक सिटी ' या पत्त्यावर करावा अशी येथें आगाऊ सूचना देऊन ठेवतों.

---

# साभिप्राय स्वीकार.

**१ प्रेमामृत अर्थात् श्रीज्ञानेश्वरांच्या हरिपाठाचें भावार्थ निरूपणः—**

हें निरूपण मुंबईचे भाविक व प्रेमळ सद्‌गृहस्थ रा. रा. मोतीराम सुंदरराव संझगिरी बी. ए. यांनीं केलें आहे. ज्ञानेश्वरमहाराजांच्या हरिपाठाचे अभंग सारे २७ आहेत पण त्यावरील हें निरूपण ४५० पानांचें आहे. प्रत्येक अभंगावरील विवरण हें एक स्वतंत्र व्याख्यान आहे. व्याख्यान मोकळें, रसभरित व सविस्तर आहे, मधूनमधून एकनाथमहाराज, तुकाराममहाराज इ० संतांचीं वचनमौक्तिकें विखुरलेलीं विपुल आहेत. त्यामुळें निरूपण वाचण्याची गोडी अधिकाधिक वाढत जाते. कोणाही वारकऱ्याला किंवा हरिदासाला ह्या २७ अभंगांवर २७ सुंदर कीर्तनें करितां येतील अशी निरूपणाची प्रशस्त मांडणी आहे. परमार्थाचें विवरण इतकें गोड व मनोवेधक आहे कीं, ज्ञानोबारायांनीं ह्मटल्याप्रमाणें ' हिरवे चारीं गुरूं । विसरे मागील मोहर धरूं ' याप्रमाणें प्रेमसुखाच्या हिरवळींत लेखक जसे वाहवत गेले आहेत तसें वाचकाचेंही मन वाहवत जातें व समाधान पावतें. रा. संझगिरी हे सत्संगतींत व परमार्थसुखांत भिजलेले स्पष्ट दिसतात व यामुळेंच त्यांच्या ह्या निरूपणी ग्रंथाला फार गोडी आली आहे. आमच्या भाविक वाचकांनीं सदर पुस्तक ग्रंथकर्ता यांचे नांवावर—वागळे यांचें घर, केळेवाडी, गिरगांव, मुंबई ४ ह्या पत्त्यावर मागवून वाचावें अशी आमची शिफारस आहे. किं. रु. २ पुस्तकाचे मानानें थोडीच आहे.

**२ स्तोत्रमालाः—** ' हिंदुस्तानांची ही माला ' अमेरिकेंत राहणारे रे० जस्टिन ई. अॅबट ह्या गृहस्थांनीं गुंफिली आहे. ह्यांत ज्ञानेश्वरीच्या १२ व्या व १८ व्या अध्यायांचीं मंगलाचरणें, नामदेव, एकनाथ, तुकाराम इ. संतांचे दहादहा वीसवीस अभंग, समर्थांचीं चार करुणाष्टकें, व्यंकटेशस्तोत्र, केकावली व महिपतीचे पांडुरंगाष्टक हीं तीन मोठालीं पण समग्र स्तोत्रें इ० भाग शेवटीं ७० पृष्ठांत शुद्ध मराठींत अस्सल दिलेला आहे व पहिलीं २०० पृष्ठें त्याच्या इंग्रजी भाषांतराला दिलीं आहेत. आरंभीं प्रस्तावना व अगदीं शेवटीं स्तोत्रमालेची सूची व शब्दकोश दिले आहेत. ग्रंथाचा मुख्य भाग इंग्रजी भाषां-

तराचा आहे, वाकी सर्व भाग–मूळ स्तोत्रांसुद्धा–परिशिष्टांत दिला आहे. ज्यांची मायभाषा मराठी आहे त्यांना ह्या स्तोत्रमालेची महती वाटणार नाहीं व उपयोगही विशेष नाहीं. ह्यांतील अभंग कांहीं धोरणानें निवडलेले नाहींत. ह्या स्तोत्रमालेपेक्षां अधिक सरस व उपयुक्त अशीं पुस्तकें आपलेकडे बरींच आहेत. तथापि अमेरिकन व इंग्रज लोकांना ह्या पुस्तकाच्या योगानें मराठी स्तोत्रांची ओळख होण्याला सोईचें झालें आहे. भाषांतर सुरेख आहे, पुस्तकाची मांडणी व्यवस्थित आहे व प्रस्तावना गोड आहे. ॲबटसाहेबांचें वय ७५ आहे व त्यांची आयुष्याची बरींच वर्षें महाराष्ट्रांत गेलीं आहेत. त्यांचा उद्योग प्रशंसनीय आहे. प्रस्तावनेंत गीतेचा कृष्ण व भागवताचा कृष्ण असा भेद त्यांनीं कित्येक सुधारकांच्या मतानुसार केला आहे तो अयथार्थ आहे. हिंदुधर्मांत देव एक आहे कां अनेक आहेत याबद्दलचें विवरण परकी लोकांच्या डोळ्यांत अंजन घालणारें आहे. त्यांनीं स्तोत्रमाला आपल्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त हिंदी लोकांना अर्पण करतांना जी भावना प्रकट केली आहे ती योग्य आहे. ॲबट साहेब आपल्या मनाला विचारतात, “ मीं ह्या ७५ वर्षांत काय केलें आहे ? हें जग सुधारण्याचे व लोकांना अधिक सुखी करण्याचे कामीं मीं आपल्या भागाला आलेलें कर्तव्य केलें आहे काय ? मीं किती प्रसंग गमावले, जगाची स्थिति अधिक उन्नत करण्याची अपात्रता मी कोणत्या प्रमादांनीं संपादिली ! माझ्या आयुष्याचीं चळवळीचीं अधिकांत अधिक वर्षें मीं हिंदुस्थानांत घालविलीं. तर बाकीच्यां परराष्ट्रांनीं हिंदुस्थानावर प्रेम करावें व त्याची प्रतिष्ठा वाढावी ह्यासाठीं मी आपली पुण्याई खर्ची घातली आहे काय ? ” हिंदुस्थानच्या अन्नानें पुष्ट झालेल्या किती गोऱ्या लोकांच्या मनाला हा विचार शिवत असेल ! तें असो. आपल्यापैकीं प्रत्येकानें असा प्रश्न आपल्या मनास विचारला पाहिजे !

२ **सांप्रदायिक कीर्तनमाला**:—लेखक व प्रकाशक ह. भ. प. काशिनाथ गणेश खुर्दे, हेड क्लार्क इनकम् टॅक्स ऑफिस, बेळगांव. किं रु. १. रा. काशिनाथपंत खुर्दे हे वारकरी मंडळांत कीर्तनप्रवचन करणारे म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनीं ५० निरूपणी कीर्तनें लिहून प्रसिद्ध करण्याचा निश्चय केला असून त्यांपैकीं पहिलीं पांच कीर्तनें प्रस्तुतच्या पहिल्या भागांत प्रसिद्ध केलीं आहेत. असे आणखी नऊ भाग ते प्रसिद्ध करणार आहेत. हा भाग आम्हांला अतिशयच आवडला. वारकऱ्यांचीं निरूपणी कीर्तनें पंढपूरच्या फडावर कशा प्रकारचीं चालतात याची कांहींशी ओळख ह्या पुस्तकावरून सर्वांस होण्यासारखी आहे. प्रस्तावनेंत हिंदुधर्माचें व विशेषतः भागवतधर्माचें सामान्य स्वरूप काय आहे व संतांनीं भक्तिमार्गाचा प्रसार कशासाठीं केला याचें

सुंदर विवरण केलें आहे. ‘ तेणें सुखें माझें निवालें हें अंग । विठ्ठल हें जग देखियेलें ’ ‘ उजळलें भाग्य आतां । अवघी चिंता वारली ’ ‘ तुह्मी संत मायबाप कृपावंत । काय मी पतित कीर्ती वानूं ’ ‘ भक्ति प्रेम सुख नेणवे आणिकां । पंडित वाचकां ज्ञानियासी ’ व ‘ जाणे भक्तीचा जिव्हाळा । तोचि दैवाचा पूतळा ’ ह्या पांच लोकप्रिय अभंगांवर हीं पांच कीर्तनें असून ज्ञानेश्वरमहाराज, नाथमहाराज, तुकाराममहाराज इ० संताग्रणींच्या ग्रंथांतील सरस, निवडक व मार्मिक वचनें निरूपणाधाराला जागोजाग घेतलीं आहेत त्यामुळें ग्रंथ फारच रसभरित झाला आहे. निरूपणें कांहींतरी ओबडधोबड नाहींत, विचारपूर्ण व मुद्देसूद आहेत. सदर कीर्तनें वाचीत असतांना विष्णुबुवा जोग, हरिभाऊ गिंडे, अजेरकरबुवा, केशवराव देशमुख वगैरेपैकीं कोणातरी अधिकारी पुरुषाच्या कीर्तनश्रवणालाच आपण बसलों आहोंत कीं काय असें वाटून मनाला फार आल्हाद वाटला. परमार्थग्रंथवाचनाची ज्यांना आवड आहे त्यांनीं प्रस्तुत भाग तर अवश्य मागवून घ्यावा, त्यांना त्यापासून समाधान वाटेल यांत शंका नाहीं.

४ **सिंहगडः**—प्रकाशक रा. रा. महादेव बाळकृष्ण खळदकर, पंचवटी, नाशीक; किं. ०८. ऐतिहासिक कीर्तनमालेचें हें चौथें पुस्तक आहे. नागपूर येथील प्रसिद्ध अर्वाचीन कवि रा. कृष्णाजी गोविंद ताह्मनकर यांनीं सिंहगडच्या शिवकालीन ऐतिहासिक भागावर हें आख्यान विविध वृत्तांत रचलें असून तें अर्वाचीन पद्धतीच्या कीर्तनकारांस तर उपयुक्त वाटेलच, पण एरव्हीं काव्य म्हणून वाचणारांसही तें बोधप्रद वाटेल. कविता सुरस, सुलभ व स्फूर्तिप्रद आहे.

५ **अज्ञानकंसवधः**—पैठणचे सुप्रसिद्ध ज्योतिर्विद्, कवि, चित्रकार व पंडित कै. भगवंतराव तोडेवाले यांनीं ‘ अज्ञान-कंसवध ’ नामक एक अद्‌भुत काव्य पूर्वींच छापून प्रसिद्ध केलें होतें. आतां, त्याच काव्याचा चित्रभाग प्रकाशक देवीदासराव रंगराव टाकळकर, संपादक ‘ न्याय ’ औरंगाबाद यांनीं प्रसिद्ध केला असून चित्रांच्या मेहनतीच्या मानानें किंमत. ३०८ ठेवली आहे ती फार नाहीं. प्रस्तुत भागाला प्रस्तावना रा. पांगारकर यांनींच लिहिली असल्यामुळें येथें त्याचा विस्तार करितां येत नाहीं. काव्याच्या, कल्पकतेच्या, चित्रकलेच्या, वेदांत शास्त्राच्या, कृष्णभक्तीच्या कोणत्याही दृष्टीनें याकडे पाहिलें तरी ग्रंथ अगदीं अपूर्व वाटतो. रा. भगवंतरावांच्या सूक्ष्मबुद्धीची धन्यता वाटते. पाहणाऱ्याच्या व मननकर्त्याच्या बुद्धीला व विवेचकशक्तीला इतकें उत्कृष्ट खाद्य वाङ्मयाच्या प्रांतांत फार क्वचित् मिळतें. कंसवधापर्यंतचें कृष्णचरित्र पांचशें ओव्यांत सुरस वर्णिलें असून ॐ कारच

कृष्ण कसा व अल्लाही तोच कसा हें विविध चित्रांच्याद्वारें फार मनोरम रीतीनें दाखविलें आहे. काव्यकलेंत चित्रकला आहे व चित्रकलेंत काव्यकला आहे. काव्य व चित्रकला यांचें इतकें बेमालूम ऐक्य आणि तेंही अध्यात्माच्या उच्च भूमिकेवरून क्वचितच पाहण्यास सांपडेल. भाविकांनीं व जिज्ञासूंनीं सदरचे दोन्ही भाग ३०८ स जरूर मागवावेत अशी आमची शिफारस आहे.

---

# मराठी वाङ्मय १८१८ ते १८९८.

१८६७ मध्यें सरकारनें प्रसिद्ध केलेल्या १८६४ पर्यंतच्या मराठी पुस्तकांच्या यादीवरून पाहतां मराठींत ९४३१ गद्य व २३० पद्य अशीं एकंदर ६६१ पुस्तकें प्रसिद्ध झालीं होतीं. यांत कांहीं शालोपयोगी, कांहीं खरीं वाङ्मयात्मक, कांहीं शास्त्रीय व कायद्याचीं अशीं चार प्रकारचीं पुस्तकें आहेत. शालोपयोगी पुस्तकें ९८ असून सरकार हुकमानें तयारी झालेलीं भाषांतरवजा व तसल्याच किमतीचीं तीं आहेत, त्यांत महत्त्वाचीं अशीं बहुतेक कँडीचीं पुस्तकें आहेत. वाङ्मयाच्या दृष्टीनें पाहतां हीं ३३२ असून त्यांत (१) इतिहास (२) गोष्टी (३) निबंध (४) चरित्रें (५) प्रवासवृत्तें (६) पौराणिक बखरी (७) तत्त्वज्ञान व धर्मविषयक (८) राजकीय विषयावरील (९) वर्तमानपत्रें व मासिकें, (१०) शास्त्रीय वगैरे असे दहा प्रकार आहेत. इतिहासांत एलफिन्स्टन, मरे व ग्रँडडफ यांच्या इतिहासाचीं भाषांतरें व बाळ गंगाधर शास्त्र्यांचीं पुस्तकें एवढींच कांहीं महत्त्वाचीं आहेत. गोष्टी या सदराखालीं पंचोपाख्यान, वेताळ पंचविशी, सिंहासन बत्तिशी, शुकबहात्तरी हीं बरींच लोकप्रिय आहेत. हीं जुन्या पद्धतीचीं झालीं. इंग्रजी विद्येच्या संस्कारानें झालेल्यांत कृष्णशास्त्री चिपळोणकरांचें 'अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी' हें सर्वोत्कृष्ट आहे. राजा मदन व मुक्तामाला ह्या दोन कादंबऱ्या याच काळांतील आहेत. निबंधांत विदुरनीति व नारदनीति; चरित्रांत कोलंबस, कॅप्टन कुक, सायरस, नाना फडणवीस, सॉक्रेटीस, रसियाची कॅथराईन यांचीं चरित्रें; प्रवासांत गोकर्ण व काशी येथील यात्रांचीं वर्णनें व दाजीसाहेब किबे यांचा गुजराथ व महाराष्ट्र येथील प्रवास हीं नमूद करण्यासारखीं आहेत; पौराणिक बखरींत विशेष म्हणण्यासारखीं कांहीं नाहींत तरी मराठेशाहींतील बखरींचा सुगावा लागत चालला आहे. तत्त्वज्ञान व धर्म यांत विष्णुबोवा ब्रह्मचारी यांचा वेदोक्तधर्मप्रकाश हाच बरा आहे. इतर बाबी यथातथाच आहेत. ज्ञानप्रकाश व विचारलहरी हीं ठीक आहेत. शास्त्रीय पुस्तकें

शाळाखात्यांत चालू आहेत तेवढींच व तींही बहुतेक भाषांतरवजा आहेत. गणित, ज्योतिष, वैद्यकी या विषयांवर भाषांतरवजा कांहीं पुस्तकें आहेत. निघंटुप्रकाशाचें मराठी भाषांतर झालें आहे. शास्त्र्यांचा कोश, मोलस्वर्थ-कँडीचा कोश व गोडबोल्याचा हंसकोश हे तीन कोश नांव घेण्यासारखे आहेत. कायद्याच्या पुस्तकांत मिताक्षरा व व्यवहारमयूख हीं सरकारी हुकुमानें मराठींत उतरलीं गेलीं आहेत. कवितेविषयीं विचार करितां ब्रिटिश अंमलापूर्वीची कांहीं कविता छापून निघाली आहे. मोरोपंत, श्रीधर, वामन, तुकाराम, मुक्तेश्वर यांची बरीच कविता याच क्रमानें छापून निघाली आहे. ज्ञानेश्वरी, दासबोध, एकनाथ व वामन यांचे ग्रंथही छापून निघाले आहेत. साधूंचे भक्तिपर ग्रंथ, महाभारत, रामायण, गीता इ० भक्तिपर वाङ्मय व श्रीकृष्ण आणि विठ्ठल यांची भक्तिही महाराष्ट्रांत लोकप्रिय आहे. बहुतेक प्रसिद्ध नाटकांचीं मराठी भाषांतरें गेल्या दहा वर्षांत झालीं आहेत. नवनीत व सर्वसंग्रह यांच्या द्वारें कविता वाचण्याचा नाद लोकांस लागत आहे. ४० वर्षांपूर्वी मराठींत एकही छापील पुस्तक नव्हतें. नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीची स्थापना १८२९ मध्यें झाली व त्यांनीं प्रथम शालोपयोगी पुस्तकें काढलीं. चाळीस वर्षांच्या काळांत झालें हें काम कांहीं थोडें नाहीं, बहुतेक चांगलीं पुस्तकें गेल्या दहा वर्षांतच प्रसिद्ध झालीं आहेत हें लक्षांत ठेवलें पाहिजे. वाङ्मयाची प्रगति या काळांत जरी समाधानकारक झाली नसली तरी होण्याच्या मार्गास लागली हें काय थोडें आहे ?

१८६५-१८९७ पर्यंतच्या ३२ वर्षांत झालेल्या मराठी ग्रंथांच्या प्रसिद्धीचा आढावा सरकारी तिमाही रिपोर्टांच्या आधारें माधवराव रानडे यानीं १८९८ सालीं काढला होता, त्याचा गोषवारा पुढें दिला आहे:—

ह्या ३२ वर्षांत ८४९७ मराठी पुस्तकें छापलीं गेलीं. दर दशकास प्रमाण वाढतें आहे. १८६५-७४ ह्या दशकांत १५३० त्या पुढील दशकांत म्ह० १८७५-१८८४ ह्या काळांत ३१४३, व १८८५-१८९६ च्या तृतीय विभागांत ३८२४, मिळून ३२ वर्षांत एकंदरीनें ८४९७ पुस्तकें छापून निघालीं. पहिल्या ५० वर्षांतलीं ६६१ व त्यापुढील ३० वर्षांतील ८४९७ मिळून ९१५८ अगर सरासरीनें ९००० पुस्तकें छापण्यांत आलीं. यांतील द्वितीयावृत्तीचीं १२०० पुस्तकें वगळलीं तर ८० वर्षांत सरासरी ७८०० पुस्तकें छापून निघालीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. यांत साप्ताहिकें. मासिकें, इ० अहवाल वगैरे धरले नाहींत.

**जुनी कविता:**— १८५७ पासून जुन्या मराठी कवींची कविता छापण्यांत येऊं लागली ती पुढील ४० वर्षांत बहुतेक सर्व छापून निघाली. ज्ञानेश्वर,

एकनाथ, तुकाराम, रामदास, वामन, मुक्तेश्वर, मोरोपंत, श्रीधर, महिपति ह्या सर्व प्रसिद्ध कवींचे ग्रंथ निरनिराळ्या प्रकाशकांनीं उजेडांत आणले. ह्याशिवाय मुकुंदराज, नामदेव, अमृतराय, शिवदिनकेसरी, रंगनाथस्वामी, आनंदतनय, रघुनाथपंडित, मध्वमुनि, केशवस्वामी, सोहिरोबा, चिंतामणि, जनाबाई, मुक्ताबाई, वेणाबाई, व रामजोशी, प्रभाकर, सगनभाऊ, अनंतफंदी वगैरे शाहीर या सर्वांची कविता छापून निघाली. "हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याही देशी भाषेंत यापेक्षां देदीप्यमान कविरत्नें शोधून काढणें कठिण जाईल. त्यांनीं लिहिलेली कविता ही संस्कृत कवितेची छाया आहे असें म्हणून त्यांचें महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे मराठी वाङ्मयाच्या ह्या महत्त्वाच्या शाखेच्या गुणांविषयीं अज्ञान प्रगट करणें होय. ह्यांपैकीं बऱ्याच संतांना व कवींना संस्कृत भाषेचें ज्ञान नव्हतें. बहुतेकांनीं अज्ञजनसमूहाकरितां कविता लिहिली आहे हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. ब्रिटिश अंमल सुरू झाल्यापासून असा एकही विख्यात कवि झाला नाहीं कीं, ज्याचें नांव या वरील मालिकेंत घालतां येईल. राजसत्ता गेल्यापासून कवित्वशक्तीचा ऱ्हास झाला आहे असें दिसतें. कांहीं चारदोन नांवें पुढें केलीं तरी ते परप्रकाशित आहेत. स्वयंभू कवित्व त्यांच्यांत नाहीं." कृष्णशास्त्री चिपळूणकरांचें नांव घेतां येईल पण त्यांची स्वतंत्र कविता म्हणण्यासारखी नाहीं. कृष्णशास्त्री व परशुरामपंत यांनीं संस्कृतांतून भाषांतरें चांगलीं केलीं आहेत. कृष्णशास्त्री राजवाडे व गणेशशास्त्री लेले हे त्या वर्गांतलेच; लेलेशास्त्री यांचा रघुवंश बराच सरस आहे यांत शंका नाहीं. अलीकडच्या काळांत कीर्तिकरांची इंदिरा, कुंटयांचा राजा शिवाजी, पाळंद्यांची रत्नमाला, जुवेकरांची कृष्णाकुमारी, वामन दाजी ओक यांचें काव्यमाधुर्य, बजाबा प्रधानांची देवसेनी, चिंतामणिपेठकरांचें गंगावर्णना, महाजनींची कुसुमांजलि, वासुदेवशास्त्री खरे यांचें यशवंतराव महाकाव्य, जोशी यांची पद्यसुधा इ० काव्यें चांगल्यापैकीं आहेत. शंकर मोरो रानडे, मोगरे, लोंढे, रिसबूड, नित्सुरे, लेंभे, भांडारे, ओक यांचीं कित्येक छोटीं प्रकरणें आहेत. मोठें काव्य कोणीही केलेलें नाहीं. कित्येक अर्वाचीन कवींनीं इंग्लिश कवींचे कित्ते आपल्या पुढें ठेवून त्यांच्या पद्धती जरी उचलल्या आहेत तरी तुकारामाची सहज स्फूर्ति, रामदासाची बोधरूप प्रज्ञा, ज्ञानेश्वरांची उपमादृष्टांतांची शैली, हुबेहूब वर्णनांनीं वाचकांच्या वृत्ति तल्लीन करण्याची मुक्तेश्वर श्रीधरांची प्रतिभा, अमृतरायांची माधुरी, कोमलवृत्ति जागृत करण्याची वामनाची शक्ति, नामदेवाची भक्ति, मोरोपंतांची भाषाशुद्धि, शब्दसामर्थ्य व निर्मळ भावना, एकनाथाची विचारस्फूर्ति, रामजोशी, रघुनाथपंडित इ० कवींचे गुण—हे मनांत आणतां अर्वाचीन कवितेंत या प्राचीन कवींच्या गुणांचें अगदीं अंधुक प्रतिबिंब पडलेलें आहे असेंच म्हणावें लागतें!

सांप्रतकाळीं कवित्वशक्तीचा ऱ्हास झालेला दिसतो. त्याच्या कारणांपैकीं पुढील दोन कारणें दिसतात. प्राचीन व परकीय भाषांचा अभ्यास आमच्या तरुणांस करावा लागत असल्यामुळें त्याचें बुद्धिसर्वस्व तिकडे खर्च होऊन अंतःकरणवृत्तींच्या सहजविकासास अवसर सांपडत नाहीं हें एक व आपल्या राष्ट्रीय वाङ्मयाचें त्यांचें जवळ जवळ पूर्ण अज्ञान हें दुसरें! संस्कृत आणि इंग्रजी वाङ्मयाबरोबर प्राचीन काव्यांचा चांगला अभ्यास सुरू झाल्याशिवाय हा ऱ्हास थांबणार नाहीं.

**बखरी, इतिहास व चरित्रें**:—मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश पाडणाऱ्या बखरी, कैफीयती, पत्रव्यवहार वगैरे प्रसिद्ध करण्याचें काम काशीनाथ नारायण साने व जनार्दन बाळाजी मोडक यांनीं काढलेल्या व बारा वर्षें चालविलेल्या 'काव्येतिहाससंग्रह' नामक मासिक पुस्तकानें चांगलें केलें आहे. ह्या बखरी वगैरे स्वतंत्र पुस्तकरूपानें छापलेल्या आहेत. यापैकीं कांहीं बखरी याच जातीच्या युरोपिअन इतिहासांत महत्त्व पावलेल्या बखरींपेक्षांही सरस आहेत. पानपतची बखर, भाऊसाहेबांची बखर अशा कांहीं उत्कृष्ट आहेत. विंचुरकर, दाभाडे, नागपूरकर भोसले, गायकवाड, शिंदे, होळकर यांच्या कैफीयती, गुप्ते यांची प्रभुरत्नमाला, अॅक्वर्थ व शाळिग्राम यांनीं प्रसिद्ध केलेले पोवाडे, पारसनीस, राजवाडे, वासुदेवशास्त्री खरे यांनीं चालविलेलें संशोधनात्मक कार्य या सर्वांचा मराठ्यांच्या इतिहासावर चांगला प्रकाश पडणार आहे. हिंदुस्थानाला ऐतिहासिक दृष्टि नाहीं हा तारुण्यांत होणारा दुर्ग्रह काढून टाकून आमचे तरुण या विषयाकडे वळतील व चिकित्सक व ऐतिहासिक दृष्टीनें या विषयाचा अभ्यास व संशोधन करतील तर फार उत्तम होईल. गेल्या ३० वर्षांत इतिहास व चरित्रें यांचें काम अधिक पद्धतशीर रीतीनें व नेटानें झालें. हिंदुस्थानच्या व परदेशांच्या इतिहासांकडे लोकांचें लक्ष वळलें आहे. मालकमसाहेबानें मध्यहिंदुस्थानचा इतिहास लिहिला त्याचें इंदोरचे माजी दिवाण कीर्तने यांनीं केलेलें भाषांतर, तुर्करशियांच्या युद्धाचा इतिहास, फ्रेंचरेव्होल्यूशन व फ्रँको—जर्मन युद्ध यांचे इतिहास, ग्रीक, रोम, फ्रान्स, जर्मनी, इराण, इजिप्त, कार्थेज, टर्की, आसीरिआ, रशिया इ० देशांचे छोटे इतिहास, गोवा, कुर्ग, सीलोन, भोपाळ, बुंदेलखंड, कोल्हापूर व दक्षिणहिंदुस्थानांतलीं संस्थानें यांचे इतिहास, शिपायांच्या बंडाचा इतिहास, वगैरे इतिहासग्रंथ निव्वळ मराठी जाणणाऱ्यांच्या आटोक्यांत आले आहेत. चरित्रग्रंथांत सुमारें ३० परदेशीय थोर पुरुषांचीं चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत. व्हिक्टोरिया महाराणी, शेक्सपीयर, पिट, बेकन, स्विफ्ट, न्यूटन, गोल्डस्मिथ, कॉब्डेन, कुक, ब्रॅडलॉ, अॅनी बिझांट, मन्रो, क्लाईव्ह, जॉर्ज वॉशिंग्टन, बेंजामिन फ्रॅंकलिन्, लिंकन, गारफील्ड, शिकंदर, साक्रेटिस, डेमोस्थेनीस, कोलंबस, नेपो-

लियन वगैरे युरोपिअन व अमेरिकन प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें मराठींत झालीं आहेत. यांत राज्यकर्ते, मुत्सद्दी, कवि व ग्रंथकार, शूर व राज्यसंस्थापक आहेत. हिंदुस्थानांतील थोर पुरुषांचीं चरित्रें झालीं आहेत त्यांत अर्थात् संतकवींचा नंबर पहिला लागतो. ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, तुकाराम, वामनपंडित, जयरामस्वामी, नामदेव, बुद्ध, शंकराचार्य, राजा राममोहनराय यांचीं चरित्रें झालीं आहेत, ऐतिहासिक पुरुषांत शिवाजी व त्याचे पुढचे तीन राजे, पहिले दोन पेशवे, मल्हारराव होळकर, महादजी शिंदे, नाना फडणवीस, अहल्याबाई, हरिपंत फडके, परशुरामभाऊ पटवर्धन, बापू गोखले, झांशीची राणी, अकबर, औरंगजेब, अलीकडील बाळशास्त्री जांभेकर, दादाभाई नौरोजी, आनंदीबाई जोशी, इत्यादिकांचीं चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत. सत्तर चरित्रलेखकांपैकीं फक्त सात पदवीधर आहेत, इंग्रजी व संस्कृत ग्रंथांचीं भाषांतरें करणाऱ्या ७६ लोकांपैकीं मात्र २५ पदवीधर आहेत. यावरून काय अनुमान काढावयाचें तें वाचकांनींच काढावें !

**भाषांतरें व रूपांतरें**:—ह्या तीस वर्षांत एक हजार संस्कृत व इंग्रजी ग्रंथांनीं मराठीवेष धारण केल्याचें उघड आहे. ह्या ग्रंथांत कायद्याचीं पुस्तकें, कादंबऱ्या, नाटकें, शास्त्रीय, धार्मिक व वैद्यकीचीं पुस्तकें, कविता, इतिहास, चरित्रें, राजकीय ह्या उतरत्या क्रमानेंच भाषांतरीय पुस्तकें झालीं आहेत. राजकीय, ऐतिहासिक व चरित्रात्मक ग्रंथ तेवढे इंग्रजींतून व धार्मिक व काव्यपर तेवढे संस्कृतांतून घेतले आहेत, बाकीचे कांहीं इंग्रजींतून व कांहीं संस्कृतांतून आले आहेत. **वैद्यकी**वरचे ग्रंथ जितके इंग्रजींतून त्याच्या दुप्पट संस्कृत भाषेंतून भाषांतरित झाले आहेत, यावरून देशी वैद्यकावरचा लोकांचा विश्वास दृढ होतो; पण शिक्षणाच्या कामांत दुर्दैवानें देशी वैद्यकाकडे दुर्लक्ष होत गेल्यामुळें तें मागें पडत चाललें आहे. कायद्याच्या परीक्षा मराठींत होणें बंद पडल्यामुळें कायद्याचीं मराठी पुस्तकें कमी होऊं लागलीं. **नाटकें** मात्र इंग्रजी व संस्कृत भाषांतून सारख्याच प्रमाणावर मराठींत आलीं आहेत. एकट्या शेक्सपीअरच्या वीस नाटकांचीं मराठी भाषांतरें झालीं आहेत, यावरून त्यावरील लोकांची आवड दिसून येते. संस्कृतांतील बहुतेक प्रसिद्ध नाटकांनीं मराठीरूप घेतलें आहे. शाकुंतलाचीं तर चारपांच जणांनीं वेगवेगळीं भाषांतरें केलीं आहेत. **कादंबऱ्या** व गोष्टी यांचा विचार करितां स्कॉट, लिटन, रेनॉल्डस्, जॉन्सन, डीफो, स्विफ्ट, बानियन तसेच बोकॅशियो, रेनन, ड्यूमास यांच्या ग्रंथाधारें मराठींत बरींच भाषांतरें झालीं आहेत. बाणाची कादंबरी, बृहत्कथासार व विश्वगुणादर्श ह्या संस्कृत ग्रंथांचाही मराठी कादंबरीवाङ्मय रचतांना बऱ्याच जणांनीं उपयोग करून घेतला आहे. **तत्त्वज्ञाना** संबंधानें पाहतां गीता

तर सर्वांची कामधेनु आहेच. छांदोग्य, ईशावास्य, तैत्तिरीय, ऐतरेय व नारायण या उपनिषदांचीं भाषांतरें झालीं आहेत. पातंजल योगसूत्राचें भाषांतर झालें आहे. कुंटे यांची षड्दर्शनचिंतनिका, पंडितांचा वेदार्थयत्न हीं दोन्ही कामें अपुरीं राहिलीं आहेत तरी मराठींत उच्चप्रकारचे वाङ्मयाची भर पडली आहे. रामायण, भागवत, मत्स्य व गणेशपुराण यांचीं मराठींत सरळ भाषांतरें झालीं आहेत. पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांपैकीं स्पेन्सर हा विद्वानांचा विशेष आवडता होय. मॅक्स मुल्लर, मिल्ल, बेकन, मार्कस ऑरेलिअस् व सिसरो यांच्या ग्रंथांचींही मराठींत भाषांतरें झालीं आहेत. एकंदरींत भाषांतरांचा विचार करितां बरेंच समाधान वाटतें. स्पेन्सर, मिल्ल, सीली, मेन, शेक्स्पीअर, गोल्डनस्मिथ, जॉनसन, स्कॉट, बेकन, लिटन, बकल, डीफो, स्विफ्ट, बनियन्, स्माइल्स् व लबक यांच्या वाङ्मय संपत्तीची लूट करून मराठी लेखकांनीं मराठी भाषेच्या अभिवृद्धींत चांगलीच भर टाकली आहे व शिक्षणाचीं सूत्रें हातीं वागविणाऱ्या सरकारी शाळाखात्यानें या कार्यास प्रोत्साहन दिलें तर भाषावृद्धी केल्याचें त्यांस श्रेय मिळणार आहे. या ग्रंथांकडे सरकारानें दुर्लक्ष केल्यामुळें म्हणजे तीं शाळाकॉलेजांत शिकवण्याची सोय न केल्यामुळें ग्रंथकारांना वाचकांच्या पसंतीवर व उत्तेजनावरच राहावें लागत आहे. युनिव्हर्सिटीनें या कामीं मनःपूर्वक साह्य केलें पाहिजे, नाहींतर कोणीतरी कांहींतरी काम करावें असें होत राहून भाषेची पद्धतशीर वाढ होण्याचें काम कठीण होईल. आतां ही गोष्ट निर्विवाद आहे कीं, कोणत्याही भाषेंत विविध विषयांवर अगदीं स्वतंत्र ग्रंथ निर्माण झाल्यानें जशी तिची अभिवृद्धि होईल व ऐश्वर्य वाढेल तसें केवळ भाषांतरांनीं हें काम होणार नाहीं. स्वतंत्र ग्रंथ लिहिण्याची प्रवृत्ति वाढत आहे व शास्त्र, चरित्रग्रंथ, नाटकें व कादंबऱ्या या बाबतींत ती प्रगट होऊं लागली आहे हें सुचिन्ह आहे. तत्त्वज्ञान, धर्म, राजकारण, वैद्यक, कायदेकानू, प्रवासवृत्तें या बाबतींत स्वतंत्र ग्रंथांची वाढ अधिक प्रमाणांत झाली पाहिजे.

**शास्त्रीय ग्रंथः**—राजकारण, वैद्यक व ज्योतिष या विषयांवर कांहीं भाषांतरित, कांहीं रूपांतरित, व कांहीं स्वतंत्र ग्रंथ झाले आहेत. कांग्रेसचे रिपोर्ट सोडून पाहिलें तर हिंदुस्थान व वसाहती (नाटेकर), राजकारणाचीं मूलतत्त्वें (प्रो. कर्वे व पटवर्धन) स्थानिक स्वराज्य (तेलंग), ग्रामपंचायती, इंग्लंडची राज्यव्यवस्था (वागळे); हिंदुस्थानचें दारिद्र्य, अमेरिका व तेथील लोक (पंडिता रमाबाई), मोर्लेचा कांप्रोमाइज् ह्म० समेट, नेटिव्ह संस्थानांचा ब्रिटिश सरकारशीं असलेल्या संबंधाचा इतिहास, मिल्लचें 'स्वातंत्र्य,' सीलीचें 'इंग्लंडचा राज्यविस्तार' इ० राजकारणविषयक ग्रंथ लोकांना राजकीय शिक्षण देण्याच्या उपयोगाचे झाले आहेत. कित्येक डॉक्टर लोकांनीं वैद्यकविषयाचें ज्ञान

लोकांस करून देण्यासाठीं चांगल्यापैकीं ग्रंथ लिहिले आहेत. शास्त्रीय विषयांवर कांहीं उपयुक्त ग्रंथ झाले आहेत. हवा ( गोळे ), पाणी ( सरदेसाई ), रसायनशास्त्र ( मोडक ), सूर्यमालिका ( धारप ), प्रकाश व ध्वनि ( मोडक ), भूगर्भशास्त्र ( काणे ), शेती व रसायनशास्त्र ( गुप्ते ) याशिवाय मराठे व सहस्त्रबुद्धे यांचींही कांहीं पुस्तकें आहेत. ज्योतिषावर दीक्षित, केळकर व चिटणीस यांची पुस्तकें चांगलीं आहेत. दीक्षितांचा ' ज्योतिर्विलास ' हा ग्रंथ वाचनीय व सुंदर आहे. त्यांचा ' ज्योतिषशास्त्राचा इतिहास ' हा फार परिश्रम करून लिहिलेला ग्रंथही सुंदर आहे. वेदांग ज्योतिष व भास्कराचार्यांच्या ग्रंथाचा कांहीं भाग ज. बा. मोडक यांनीं लिहिला आहे. दीक्षित व मोडक यांनीं जन्मभर सायन पद्धतीचा पुरस्कार करून निरयन पद्धत मागें पाडली आहे. स्पेन्सरच्या नीतिशास्त्र व न्याय यावरील ग्रंथांचें प्रो० भानूंनीं व शिक्षण या विषयाचें सहस्त्रबुद्धे यांनीं भाषांतर केलें आहे. अर्थशास्त्रावरचा आगाशे यांचा ग्रंथ उत्तम झाला आहे. बोडस यांची अद्वैतमीमांसा व कानिटकर यांचें प्रो० मॅक्स मुल्लरच्या हिबर्ट व्याख्यानांचें भाषांतर हीं पुस्तकें वाचनीय आहेत. उद्योगधंदे व कला यावर गुप्ते आणि राजे यांनीं व संगीतावर घारपुरे यांनीं पुस्तकें लिहिलीं आहेत. पार्वतीबाई यांनीं स्वयंपाक व रुक्मिणीबाई यांनीं शिवणकाम यावर पुस्तकें लिहिलीं आहेत. शास्त्रीय विषयावरील उत्तम ग्रंथ बहुतेक पदवीधरांचेच आहेत.

**गद्यग्रंथः**—ह्या सदराखालीं या काळांत बरेच चांगले ग्रंथ झाले आहेत. पंडिता रमाबाईंचा ' अमेरिकेचा प्रवास, ' पावगी यांचा ' विलायतचा प्रवास ' व इंग्लंड आणि तेथील लोक यावरील कर्सनदास मूळजीच्या पुस्तकाचें भाषांतर हीं तीन प्रवासवृत्तें वाचनीय आहेत. सद्वर्तन ( बापट ), मधुमक्षिका व शिरस्तेदार ( ओक ), दादोजी कोंडदेव ( बापट ), आगरकरांचे ' केसरींतील निवडक निबंध ' व सुधारकांत प्रसिद्ध झालेले निबंध, ब्राह्मण आणि त्यांची विद्या ( गोळे ), बालविवाह व सुधारणा यावरील चि. वि. वैद्यांचें निबंध, पावगी यांचें भारतीय साम्राज्य, विष्णुशास्त्री चिपळूणकरांची निबंधमाला आणि संस्कृत कविपंचक, ठगाची जबानी [ बरवे ], पंडिता रमाबाईंची स्त्रीधर्मनीति, वागळे यांचे बेकनचे निबंध, भागवतांचा महाराष्ट्रधर्म व मऱ्हाठयासंबंधाचे चार उद्गार, उदास यांचें धौममहाबळेश्वरवर्णन, गाडगीळ यांचा ' संसारसुख बाळासाहेब देव यांचें सिसरोचें भाषांतर व बाबा पदमजींचे साहित्यशतक व यमुनापर्यटन इत्यादि ग्रंथ सर्वसाधारण वाचकांना फार उपयुक्त वाटण्यासारखे आहेत. मासिक पुस्तकांपैकीं विविधज्ञानविस्तार, ग्रंथमाला, — [ विजापूरकर ] भाषांतर [ राजवाडे ], भारत वर्ष ( पारसनीस ), ऐतिहासिक लेखसंग्रह ( खरे ),

केरळकोकिळ, बालबोध हीं मासिकें नांवाजलेलीं असून चांगलीं चाललीं आहेत. त्यांचा प्रसार असावा तितका नाहीं. वर्तमानपत्रें शंभरावर असून त्यांतलीं सोळा चांगलीं चालतीं आहेत.

**नाटकें:**—पाश्चात्त्य विचारांचा थोडाफार परिणाम वाङ्मयाच्या इतर शाखांवर झालेला असला तरी नाटकें, कादंबऱ्या आणि गद्यवाङ्मय यांत आपल्या संस्कृतीला आपलेपण संभाळण्याला पुष्कळ वाव सांपडली आहे. महाराष्ट्राच्या पूर्वेतिहासांत नाटकाला वाङ्मयांत स्थान मिळालें नव्हतें. इंग्रजी झाल्यावर पहिल्या ५० वर्षांत संस्कृतांतील सुमारें दहा नाटकांचीं मराठी भाषांतरें झालीं. पण पुढील ३० वर्षांत शेक्सपीअर प्रभृती आंग्ल व कांहीं संस्कृत नाटकांचीं भाषांतरें झालीं. तरी त्यांची संख्या ३० हूनही कमीच आहे; तथापि अगदीं स्वतंत्र अशीं ३०० हून अधिक नाटकें प्रसिद्ध झालीं, म्हणजे भाषांतरित व स्वतंत्र नाटकाचें प्रमाण १ स १० असें पडलें ! १८५३ च्या सुमारास सांगलीची नाटक कंपनी पुण्यास आली तेव्हां तिचीं नाटकें पाहण्यास लोकांची कोण गर्दी उडत असे ! नाटकें व नाटक कंपन्या वाढत चालल्या तसे मोठमोठ्या शहरांतून नाटकगृहें उभारण्यांत येऊं लागलीं. विष्णुपंत भाव्यांचें अनुकरण किर्लोस्कर, डोंगरे, पाटणकर, साठे वगैरेंनीं केलें. प्रथम नाटककार व नाटक कंपनीचे व्यवस्थापक एकच असत पण आतां श्रमविभागाच्या तत्त्वावर दोन्ही कामें वाटलीं जात असतात. रामायण, महाभारत व पुराणें यांतून नाट्यविषयाची पूर्वीं निवड होत असे व अजूनही होत आहे. या काळांत नाटकांत संगीताची योजना सुरू झाली. हें काम आण्णा किर्लोस्कर यांनीं प्रथम केलें. २५०. नाटकांपैकीं ५० संगीत नाटकें आहेत, तथापि अण्णांचीं शाकुंतल, सौभद्र व रामराज्यवियोग हीं अजूनही प्रेक्षकांचीं अत्यंत आवडतीं आहेत. प्रहसनें सुमारें ३० आहेत. पौराणिक नाटकांच्या पाठोपाठ सामाजिक व राजकीय विषयावरचीं नाटकें पुढें आलीं. सुमारें १०० नाटकें या जातीचीं आहेत, त्यांत कांहीं शेक्सपीअरचीं असून तीं लोकप्रिय झालेलीं आहेत. नारायणराव पेशवे व अफझुलखान यांच्या वधप्रसंगांवर किंवा थोरल्या माधवराव पेशव यांच्यावर कांहीं आहेत, तथापि पुष्कळशीं नाटकें बालविवाह, जरठ-बाला-विवाह, पुनर्विवाह इ० विषयांवर सुधारकपक्ष व जुनापक्ष यांच्यांत ज्या मुद्द्यांवर रणें माजलीं त्या मुद्द्यांच्या स्पष्टीकरणार्थ उभयपक्षीय नाटककारांनीं लिहिलीं आहेत. त्यावेळीं सुधारक व सुधारणा यांच्याविरुद्ध असलेलीं नाटकेंच अधिक आहेत. एकंदरींत नाटकांची या काळांत प्रगति बरीच झाली. लोकशिक्षकाचें काम नाटकांनीं बरेंच केलें व लोकांच्या अभिरुचीला वळण लावलें. १५० नाटककारांत पदवीधर फक्त दहाच आहेत ही एकच गोष्ट मात्र निरुत्साहजनक आहे ! पदवीधरांनीं लिहिलेल्या नाटकांत बहुतेक भाषांतरेंच

आहेत. परशुरामपंत, कीर्तने, देवल, खरे, किर्लोस्कर, कानिटकर, केळकर व शं. मो. रानडे यांचीं नाटकें लोकांना अधिक आवडलीं. इंग्रजी नाटकांच्या कसाला आमचीं नाटकें लावण्यांत कांहीं अर्थ नाहीं, कां कीं नाट्यकलेचा आमचेकडे नुक्ताच उदय होत आहे.

**कादंबऱ्या व गोष्टी:**—अरबी भाषेंतील गोष्टी, पर्शियन भाषेंतील गोष्टी, हातीमताई व पांचचार कल्पित कादंबऱ्या एवढेंच नांव घेण्याजोगें या जातीचें वाङ्मय पहिल्या ५० वर्षांत झालें होतें, पण ह्या तीस वर्षांत ३०० कादंबऱ्या निर्माण झाल्या! ह्यांपैकीं बहुतेक जरी इंग्लिश, फ्रेंच, इटालियन, पर्शियन, उर्दू व संस्कृत भाषेंतील गोष्टींचीं भाषांतरें किंवा रूपांतरें आहेत तरी स्वतंत्र कादंबरी-लेखनास याच काळांत चांगला आरंभ झाला. पूर्वपद्धतीच्या प्रेमबंधन, विचित्रपुरी, मंजुघोषा, मुक्तामाला, मोचनगड, वेषधारी पंजाबी, अनाथ पांडुरंग, नारायण-राव आणि गोदावरी ह्या कादंबऱ्या किंवा सामाजिक किंवा ऐतिहासिक स्वरू-पाच्या बाजीराव पेशवे व पानपतची मोहीम ( बापट ) आणि पण लक्षांत कोण घेतो व आजकालच्या गोष्टी ( आपटे ) ह्या कादंबऱ्या चांगल्या असून लोक-प्रिय आहेत. पण येथेंही बिनपदवीधरांची संख्या लेखकांत अधिक आहे. गेल्या ८० वर्षांच्या काळांत सुमारें ७०० लेखक झाले त्यांत ६० किंवा ७० च पदवीधर आहेत म्ह० १० स १ हें प्रमाण आहे— ही नवलाची गोष्ट आहे!

**सारांश:**—पहिल्या ५० वर्षांत मराठींत एकंदर एक हजार पुस्तकें छापलीं गेलीं तर पुढील ३० वर्षांत त्यांच्या सातपट म्हणजे सात हजार पुस्तकें छाप-खान्यांतून बाहेर पडलीं. सुमारें २० इंग्रजी ग्रंथकार व बहुतेक नाट्यकथानक-पर संस्कृत वाङ्मय महाराष्ट्रवेषांत प्रगट झालें. नाटकें, कादंबऱ्या व गद्यात्मक निबंध यांत समाधानकारक प्रगति झाली आहे. एकंदर वाङ्मयाच्या वाढीस कांहीं शिस्त अजून लागावयाची आहे. पदवीधर लेखकांत फार कमी प्रमाणांत झळकत आहेत. उत्तम नाटकें, उत्तम कादंबऱ्या, उत्तम चरित्रें, उत्तम इतिहास, उत्तम कवि व उत्तम निबंधकार यांत युनिव्हर्सिटीच्या शिक्क्याचे लोक फार थोडे आहेत. पदवीधर ह्या कामांत लक्ष घालीत नाहींत. इतकेंच काय पण त्यांची उदासीनता वाढत्या प्रमाणांवर दृग्गोचर होत आहे. मुलें इंग्लिश शाळेंत शिकूं लागलीं कीं, मराठीला पाठमोरीं होतात हा जसा कांहीं नियमच झाला आहे. यामुळें त्यांचा आपल्या लोकांशीं संबंधच तुटून जातो आणि पदवी घेण्याइतकीं तीं मोठीं होतात तेव्हां तर मायभाषेंत लिहावाचायला बोला-यलाही येत नाहींसें होऊन जातें! स्वभाषेशीं संबंध सुटल्यामुळें तिच्याविषयीं त्यांना तिटकारा वाटूं लागतो आणि ज्या शिक्षणामुळें सुशिक्षित लोक स्वभा-षेला असे पारखे होतात त्या शिक्षणाविषयीं लोकसमाजाचा आदर राहात नाहीं. तरुणांत इंग्रजी विद्येचा ( पाश्चात्य ज्ञानाचा ) प्रसार व्हावा व त्याला साधन

म्हणून इंग्रजी आणि देशी भाषांचा अभ्यास जारीनें व्हावा हा जो १८५४ च्या डिसेंबरमध्यें शाळाखातें व युनिव्हर्सिटी स्थापन करण्यांत सरकारचा हेतु होता तो सफळ झाला नाहीं. प्राकृत भाषांना लाथाडून इंग्रजी शिकण्याचा प्रघात वाढावा असा हेतुच नव्हता, उलट पाश्चात्य ज्ञानविचारांनीं समृद्ध झालेल्या तरुणांनीं प्राकृत भाषाभिवृद्धीच्या कार्यास उद्युक्त व्हावें असाच युनिव्हर्सिटीचा शिक्षण अमलांत आणतांना हेतु होता, पण परिणाम झाला आहे उलटा. हिंदुस्थानांतील युनिव्हर्सिटया व त्यांतून निघालेले पदवीधर हे देशी भाषांपासून फार दूर होणें हे पहिल्या नंबरचें घोर संकट आहे. इंग्रजी व संस्कृत भाषांकडे दुर्लक्ष व्हावें असें म्हणणें नाहीं, त्या भाषांचा अभ्यास उत्तम व्हावा. पण त्याचा उपयोग स्वभाषासमृद्धीच्या कामीं व्हावा. ह्या बाबतींत युनिव्हर्सिटीशीं १८६२ सालापासून झगडा चालू आहे, पण त्यांस अद्याप यश आलेलें नाहीं.

---

# सहज वैराग्य.

[ श्री. सौ. ]

१ प्रथम पाया जिव्हाळ्याच्या प्रेमाला चिकटण्याचे उपाय म्हणूं. पोटामधें गर्भाला पांचव्या महिन्यांत जीवनकळा प्राप्त होत असते. मग केव्हांतरी नऊ महिने पूर्ण होऊन तो बाहेर येईलच त्यांत कांहीं संशय नाहीं. कारण पुढलें कार्य राहिलें आहे म्हणूनच जन्म घेतला, तसाच संतप्रसाद. त्यांचें जेव्हां अंतर पूर्ण कृपेनें कळवळून येतें, त्यावेळीं निजात्मा प्रगट होण्याचे, किंवा प्रसवण्याचे, ऋतुमती कांत होऊन असतात. तेव्हां ऋतुमती कामिनी भेटली कीं, नाममंत्र आवडी ही रती होते. तिच्या पूर्णरूपाचें वर्णन करून मी जास्त विस्तार घेत नाहीं. परंतु बोलों, ही रती. आणि भले या सुखा मीनलों हें, रेत. ह्या अशा सत्संगतीचा गर्भ एकदां राहिला, मग 'आत्मा वै पुत्रनामासि' असा तो आत्मबोध पुत्र प्रसवतो. श्रीराम प्रसवण्यास, दशरथाचा काम नसून इच्छा मात्र होती. पुत्रकामेष्टी यज्ञाच्या प्रसादानें कौसल्येचा गर्भ राहिला. वरी रामकार्याचे डोहळे, मग इकडे तर सत्संगतीचा, नामाच्या आवडीचा गर्भ. आणि निजानंद आत्मा पुत्र प्रसवण्याचे डोहळे आणि ह्या पुत्रजन्माचें कारण काय ? तर आदी, मध्य आणि शेवट, सर्व निरुपचार प्रेम—या शिवाय दुसरें कांहीं नाहीं. तें सुद्धां दुसऱ्यावर उपकार करण्याकरितां नव्हे. 'आरसाचि देखिलीया। गोमटें कीजे धनंजया॥ तें तया नोहे आपणीया। लागीं जैसें' याप्रमाणें

आपल्या आनंदाकरितांचें आहे. मग त्याचे डोहळे होतात. ‘ सहजें स्वसुखाचेनि अपारें । सुरवाडलेंनि अंतरें ॥ रचिला म्हणउनि बाहिरें । पाऊल न घाली ’ प्रथम तारुण्याच्या भरांत गर्भवती झालेली स्त्री, साहजिक तिच्या सुखाला पारावार नसतो. ती स्वसुखांत दंग असते. पण थोडें लज्जेचें निमित्त मुद्दाम करून, बाहेर पाऊल टाकीत नाहीं. ‘ जे ऐसेनी सुखें मातले । ते आपणपांचि आपण गुंतले ॥ ते मी जाण निखिळ वोतिले । सामरस्याचे. ’ सामरस्याचें बीजच त्यांत ओतलेले ते आपल्या सुखानें मातलेले असतात. ‘ ते आनंदाचे अनुकार । कीं सुखाचे अंकुर । महाबोधें बिढार । केले जैसे ॥ ते सत्वाचे सात्वीक । चैतन्याचे आंगीक । हें बहु असो एकैक । वानिसी काई. ’ तें बीज सामरस्याचें पुढें महाबोधच आकारणार. म्हणजे ज्या रूपानें बीजाचा प्रवेश झाला, त्याला पुरा आकार येण्याचे वेळीं, त्याचे सहज विकार होतीलच. म्हणजे पहिलीं आकृती बदलत असणार. त्याला हात पाय सुखाचे, आनंदाचेच अंकुर फुटणार. ‘ ते विवेकाचे गांव । परब्रह्मींचे स्वभाव । नातरी अळंकारले अवयव । । ब्रह्मविद्येचे. ’ तें बीज पेरलेलें स्थळ कसें आहे ? ‘ सुक्षेत्रें आणी ओलट । बीज पेरिलें गोमटें । तरी अलोट फळ भेटे । परी वेळे कीं गा. ’ क्षेत्र असलें, बीज सामरस्याचें, महाबोध आकारणार, चैतन्याचें अंग, सुखाचे आनंदाचे अवयव, परब्रह्माचे स्वभाव, ब्रह्मींचे जें भांडार प्रसवणार, त्याला अलोट फळ म्हणू नये तर काय ? एका अशा अवतारांतून पुढें किती किती होतील हेंहि सांगतां येत नाहीं. आणि ब्रह्मसृष्टीचीं मुलें प्रसवल्यास, ‘ सुख पाहतां जवापाडे । दुःख पर्वताएवढें ’ त्याचें मलमूत्र, रोगराई, काढतां काढतां जन्म नकोसा होईल. हें तसें नव्हे. ह्यांत दुजेपणाच नाहीं. आतां सिंहावलोकन करूं. आधीं म्हटलें संत कांत म्हटलें, आणि भेटणारा भक्त कामिनी, ती कामिनीरूपानें कुठपर्यंत असते ? गर्भधारणा होऊन, गर्भाची पूर्ण वाढ होऊन, तो पुत्र प्रसवेपर्यंत ती पतिव्रता कामिनी असते. तो बोधपुत्र प्रसवल्यावर तो कामिनीस्वभाव संतस्वभावांतच ऐक्य झाला म्हणजे निराळा राहिला नाहीं:—

“ बोधपुत्र निर्माण झाला जेव्हां । ममता म्हातारी मरुनी गेली तेव्हां ॥ भक्ति बहिणी धांवोनी आली गांवा । आतां संध्या करूं मी कैसी केव्हां ॥ सहज कर्मे झालीं ब्रह्मार्पण । ऐसें बोलती निवृत्ती साधु जन ॥ जेणें होये अवघा जनार्दन । एका जनार्दनीं लाधली हे खूण ॥ ”

संतकृपेनें बोधपुत्र निर्माण झाला. मी एक, जन एक, जनार्दन एक, ही त्रिपुटी गेली. जीवशिवाची ऐक्यशेज बनली. “ मी वांचुनि कांहीं । आणीक गोमटेंची नाहीं । ऐसा निश्चयो तिहीं । जयाचा केला । शरीर वाचा मानस । पियालीकृत निश्चयाचा कोश । एक मी वांचूनी वास । न पाहती आन । किंब-

हुना निकट निज । जयाचें जाहलें मज । तेणें आपणपा आम्हां सेज । एकी केली। रिगता वल्लभापुढें । नाहीं आंगीं जीवीं सांकडें । प्रतिये कांतेचेनि पाडें । एक सरला जो । मिळोनी मिळतची असे । समुद्रीं गंगाजळ जैसें । मी होऊनी मज तैसें । सर्वस्वें भजती ॥ ” इतका त्यांचा निश्चय बनला. शेज एक झाली. अर्जुनानें श्रीकृष्णाला प्रश्न केला होता, कोणते भक्त तुझ्यांत समरस होतात, आणि ते तुझ्यांत मिळून जातात कीं परत येतात ? श्रीज्ञानेश्वरमाउली म्हणतात, गंगाजळ समुद्रांत मिळून झालें किंवा मिळण्याचें राहिलें हा शब्दच नाहीं. ‘ मिळूंन मिळतच ’ असतें, असें मी होऊन संत मला भजत असतात, निराळे राहून नाहीं. मग काय करितात ? आत्मगर्भाचे डोहळे ते. “ कमळ कळिका झालेपणें । हृदयींच्या मकरंदा राखों नेणें । दे राया रंका पारणें । आमोदाचें । तैसेंचि मातें विश्वीं कथीत । कथिलेनि तोषें कथूं विसरत । मग तया विसरामाजी विरत । आंगें जीवें । ऐसें प्रेमाचेनि बहुवसपणें । नाहीं राती दिवो जाणणें । केलें माझें सुख अव्यंगवाणें । आपणपेयां जिहीं । मग तया आम्हीं कांहीं । द्यावें अर्जुना पाहीं । ते ठाईंची तिहीं । घेतली सेल ” हें मूल बोधरूपानें सतत आंत असून, काम पडल्यास बाहेर येऊन, सेवारूपानें काम साधील. मग जसें सुवासानें भरलेलें फूल फुललें म्हणजे त्या वाटेला जे येतील त्यांना कांहींएक न करितां सहजींसहज आमोदाचें वाटणेंच असतें, तेथें राजा किंवा रंक हा भेद नाहीं, तसें त्याचें खाणेंपिणें, निजणें, बसणें, बोलणें चालणें, इत्यादि सर्व व्यवहार हरिप्रेमांत, हरिगुणाची रसाळ कहाणी वर्णनांत होत असतात. रात्र किंवा दिवस हेंसुद्धां समजत नसून त्या हरि-प्रेमाच्या आस्वादांत आत्मोन्मत्त असतात. सहज एका मर्त्य मनुष्यावर प्रेम केलें तर त्याला अमुकइतकी मर्यादा देतां येत नाहीं, तेव्हां स्वस्वरूपाचें प्रेम वर्णन करितां येणार नाहीं. पांच महिन्यांच्या गर्भाला जीवनकळा उत्पन्न होते ( त्याची पुढें मग वाढ आहेच. ) तशी जीवनकळा म्हणायची. इतकें शुद्धीवर लिहिलें. पुढें काय झालें ? ‘ जेथ तूतें मी स्मरें । तेथ मीपणा मी विसरें । जैसें जाकाळिला ढेंकरें । तृप्त जैसा. ’ आम्हीं नेहमीं ऐकतों कीं, राजाच्या मुलाला कारभार चालवीत येत नसला, किंवा तो लहान असला, तरी दुसऱ्याकडून त्यानें अपमान करून घेणें शक्य नाहीं. अधिकार युवराजाचाच असतो. तशी ती कल्पना तिथें सहन झाली नाहीं. जीवनकळा म्हणतांच कीं नाहीं, पूर्ण स्वभावानें बाहेर येऊन जगावर कशी नांदते ? हें विवेचन सहज स्मरतांना इथपर्यंत आलें.

आम्हीं जीव अज्ञानी असें मानतों, त्या जीवानें सत्संगतीनें सर्व जगत् नटलेला जनार्दन हें ज्ञानही मीच आहे. हा अनुभव घेऊन, भक्तियुक्त झाल्यानें तोच ब्रह्म होतो. नुसत्या ब्रह्मानुभवामध्यें, एकला न कंठवें म्हणून देव भक्तप-णानें द्वैतांत नांदतो. स्वरूपतेंतसुद्धां सुख नाहीं असा अनुभव येऊन देवच

द्वैतांत नांदतो. तेव्हां जीवानें साधनचतुष्टयसंपन्न होऊन सलोकता, समीपता, मिळविण्याचें कारण काय? जीव बद्धच नाहीं तर मुक्त कधीं होणार? आणि वैकुंठ तरी काय करावयाचें? वैकुंठ कुठें आकाशपाताळांत नाहीं. अंतर शुद्ध होऊन जगत्, जनार्दन, आणि जीव, ह्या या त्रिपुटीच्या कल्पना मावळून, दुजा खंडे तेव्हां अवघा हरी उरला. जेथें हरी तेथें वैकुंठ. आणि समाधि? मूर्छा ही समाधी नव्हे.

समाधि हरीचि समसुखेंवीण। न साधील जाण द्वैतबुद्धी॥

बाहेरच्या क्रियाकर्माला संन्यास देऊन, अभ्यासानें प्राणापानाच्या गती कुंठित करून, ताटस्थ्य ही समाधी उपयोगी नाहीं. ती समाधी उतरल्याबरोबर पहिल्यापेक्षां जोरानें कल्पना उठून केव्हांतरी खड्डयांत घालतीलच यांत संशय नाहीं. आतां कैवल्य राहिलें. माझी माउली श्रीकृष्ण कशी आहे? सर्व कर्में करून कशानेंही लिप्त नाहीं. 'ज्ञानज्ञेयाविहीन। नुसधेंचि जें ज्ञान। सुखा भरलें गगन। गाळीव जें' असलें आंतबाहेर शुद्ध जें ज्ञान, तें 'बुद्धीनिश्चयें आत्मज्ञान। ब्रह्मरूप भावी आपणा आपण। ब्रह्मनिष्ठा राखे पूर्ण। तत्परायण अहर्निशीं.' आपणच अखंड, अविनाश सहज आहे. असा जो विश्वास त्या सहजाला सहजपणें, सहज निःशंक असणें, तेंच कैवल्य.

येथवर यथामती कांहीं लिहिलें असें जें वाटतें तेंही माउली श्रीगुरूंनीं मनाचें मन, बुद्धीची बुद्धी, हाताचा हात, होऊन लिहून घेतलें. हें त्यांच्या चरणींच अर्पण असो.

हें दान पावलें सद्गुरू शांतिलिंगा। हें दान पावलें आत्मया पांडुरंगा॥ हें दान पावलें व्यापक अंतरंगा। हें दान पावलें एका जनार्दनी दोष जाती भंगा॥

ह्याच्याहून निराळें वैराग्य कुठून काढावें? वैराग्य शब्दाचा अर्थ करावयाचा नाहीं. आधीं अर्थ मग शब्द. अर्थानें शब्दाची वाट पाहावी.

## अभंग

"विदेह आत्मलिंगा गुरुकृपेचा तुषारु। पूर्णें पूर्ण भरिला घटु हळूहळू बिंदु उदारू। वरुषला लिंगावरी तेणें तुष्टला श्रीगुरु॥ प्रसन्न निवृत्तिराज ज्ञान देउनी उदारू॥ १॥ यालागीं ज्ञानदेव नाम गुरुकृपें पावलों। असतां इये देहीं संसारा हारपलों। ज्ञानविज्ञान कळों आलें अद्वैतरूप बुझालों। विठ्ठलनामें माझे वाचे तेणें वाक्पुष्प पावलों॥ २॥ नित्य गळती नामें झाली गेला प्रपंच अनिवारू। उपरती देहीं झाली निमाली वासना संसारू॥ तप न झाले ब्रह्ममूर्ति दिनिनिसीं साचारू॥ आठवीतां मागिल भावो अवघा पारुषला उदारू॥ ३॥ विज्ञानेंसीं ज्ञान गेलें एकरूप परिचारू। ज्योतीमाजि कळिका गेली एक दीप झाला आकारू॥ वृत्तीनें निवृत्ति झाली माया मारुनी केलें घर। निवृत्ति

गुरु माझा घट स्थापिला त्या समोरें ॥ ४ ॥ ज्ञानदेवें निरोपिली घटमठ हरिभक्ती । उडाली पक्षपाती इंद्रिया तेथें नाहीं गती ॥ विराले अभिमान ममता झाली समाप्ती । खुंटलीया ऊर्मी दाही स्नपन झाले लिंगाप्रती ॥ ५ ॥

गळती म्हणजे धारापात्र. हें पात्र लिंगावर अभिषेक करण्याचें असतें. ते स्वतः रितें मात्र नव्हे, सगळया अंगाला त्याला छिद्रें असतात. तें नुसतें अभिषेकाला पाणी भरण्याचें. तसें हें पंचतत्त्वाचें मानवी शरीर आपण स्वतः रितें असतें. त्या घटाचा उपयोग श्रीगुरूंनीं असा घेतला कीं ह्यांत ज्ञानाचें पाणी पूर्ण भरलें, आणि आत्मलिंगावर एकेक थेंब नाम त्यांतून गळविलें आणि आपणच तेणेंकरून संतुष्ट झाले. देह गेल्यानंतर नव्हे, या देहांत असतानांच संसाराचा मोहपाश नाहींसा केला. ज्ञानाचा विज्ञानेंकरून अनुभव दिला. अद्वैतरूप आपणच आहे असें पटवून विठ्ठलनामाचा प्रसाद जिव्हेस लावला. आणखी आपण कोण आहों, ही मागली आठवण करून दिली. तेव्हां त्या घटांतून हळू हळू नित्य नामें गळूं लागलीं. त्या योगानें देहाची उच्चस्थिति बनून संसार मागल्या पायांनींच पळाला. ज्ञान तें विज्ञान झालें. दीप हा आकार ज्योतीस्वरूपांतच मिळाला. वृत्ती होती ती निवृत्ती झाली. शास्त्रीबुवा मायेचा बाऊ दाखवतात तिला ठार मारून आत्म्याचें घर केलें. त्यांत श्रीगुरुची स्थापना केली. माझ्या ज्ञानेश्वर माउलीनें घटांत जीव आणि मठांत शिव कसा आहे हें निरोपून, सर्वांविषयीं जीवाचा उपयोग शिवाकरतांच करून हरीभक्ति शिकविली. तेव्हां काय झालें ? पक्षपात देह सोडून पळाले. अभिमान तिथल्या तिथें विराले. इंद्रियांच्या गती कुंठित झाल्या. कामक्रोधादि दहा उर्मी कुंठून लिंगावर नामाचा अभिषेक झाला.

ॐ नमो ज्ञानेश्वरा । करुणाकरा दयाळा ॥
तुमचा अनुग्रह लाधलों । पावन झालों चराचरीं ॥
मी कळाकुसरी कांहींच नेणें । वचन बोलतों भाविकां ॥
एका जनार्दनी तुमचा दास । त्याची आस पुरवावी ॥

# स्वर आणि मूळाक्षरें !

**( रा. विष्णु गोविंद पाठक, पेन्शनर मास्तर, भुसावळ ),**

स्वर, मूळाक्षरें, बाराखडी यांतील—स्वर १२ प्रकार १।२ मूळाक्षरें प्रकार १।२ आणि बाराखडी धडा १ ला [ क, का. ] यांवरील " सुबोधक नैतीक वाक्यें " पद्यरचना [ फटका ] रचून— आपलेकडेस, निरीक्षणार्थ आणि " मुमुक्षू " त स्थळ मिळून प्रसिद्धीसाठीं पाठविलें आहे.

## १ स्वर प्रकार १ ला.

अ—धिकारावरि असतांना तूं । करि उपकारा दीनजनीं ॥
आ—तां करिशिल सुकृती तेणें । यशस्वि होशिल मर्त्यगणीं ॥

इ–थें जन्मुनी आले जे, ते । गेले साधुनि ही करणी ॥
ई–श्वरइच्छा अशीच आहे । नरें मिळावें मच्चरणीं ॥ १ ॥
उ–ठावले मनिं भक्ति साधते । करि यास्तव ती ह्या ठायां ॥
ऊ–ठ सत्वरीं सोडि आळसा । न जाइं जन्मुनि कीं वायां ॥
ए–कचि आत्मा सर्वांभूतीं । मानि नरा ह्या साच नयां ॥
ऐ–कायास्तव सज्जनवाक्यें । घे श्रवणीं तूं त्यजीं भयां ॥
ओ–ढा, सरिता, तलाव, सागर । एकचि उदका भिन्न नसे ॥
औ–दार्यें तूं झिजवी देहा । कामीं ये जनिं जल तैसें ॥
अं–धचि होशी डोळे असुनी । जाणुनि नीति सोडितसे ॥
अः–हा गर्वि कां व्यर्थ गुंतशी । जन्म निरर्थक जात असे ॥ २ ॥

---

## २ स्वर. प्रकार २ रा.

अ–नंत रक्षित अनंत प्राणी । विचार हाची एक खरा ॥
आ–तां करणें अन्य विचारां । नाहीं साधन येथ नरा ॥
इ–तुकें चित्तीं समजुनि घ्यावें । परस्परांना साह्य करा ॥
ई–श्वर रक्षक सकल जिवांचा । भजन तयाचें नच विसरा ॥
उ–दरामाजीं काळे गोरे । सुज्ञ न बघती मनीं धरा ॥
ऊ–स गोड कीं सर्व जनांना । प्रेम परस्पर तेंचि करा ॥
ए–क मेक हा विचार सारे । करा समाजीं जन सुधरा ॥
ऐ–हिक सुख हें येथ भोगितां । परमार्थाला त्यांत करा ॥
ओ–ठहि आणिक दांत आपुले । जाणुनिया व्यवसाय करा ॥
औ–ट करांचा देह मानवी । पुन्हा न लाभे करी त्वरा ॥
अं–तकाळीं अनुभव येतो । आत्मकृतीचा सर्व नरा ॥
अः–हा आलिया देहिं नराचे । नरकृतिलाची येथ वरा ॥

---

## ३ मूळाक्षरें. प्रकार १ ला.

क–शास्तव तुला जन्म दीधला । भगवंतें या नरदेहीं ॥
ख–रा नरा कधिं विचार ह्याचा । करशिल सत्वर येथें ही ॥
ग–रलचि अमृत मानुनि रमशी । संसाराचें वैभव ही ॥
घ–टका आयुष्याची भरतां । काल न ठेवी क्षणभरिही ॥
च–लित काल हा सत्य निरंतर । आयुष्य मापित कळतेंहि ॥
छ–टाहि करिशी, हौस भोगिशी । परि काल बघे तव संधी ही ॥
ज–रि तूं न करी विचार ह्याचा । होइल त्वद्गत कैशी ही ॥
झ–टके देतां काळ न ऐके । तूंतें नेइल लवलाही ॥

ट–के खर्चितां वायां जातिल । उपाय तेव्हां न चले ही ॥
ठ–कवी तुजला काळचि बाप्पा । भ्रमण करी मन मोहेंही ॥
ड–सति वेदना त्वदांगीं कीं । काळाच्या त्यां खडतर ही ॥
ढ–वळचि तेव्हां होय मनाची । थकतिल गात्रें सारीं हीं ॥
त–रीच असती सावध जों तों । अर्थ परार्थी करि कांहीं ॥
थ–ट्टा न करी आत्मदेहिची । रिघ शरणागत हरिपदिंही ॥
द–यावंत अति ईश्वर आहे । सर्वपरी तो रक्षिल ही ॥
ध–र्म पाळि तूं निज वर्णाचा । सदाचारिं तूं वागे ही ॥
न–वागता रे नीतिनुसारें । जन्म तुझा हा वृथाच ही ॥
प–ढला विद्या, ज्ञान अनेकीं । तरि व्यर्थचि सारें तुजलाही ॥
फ–लां न कांहीं त्यांचि मिळविलें । जन्मुनि गेला व्यर्थ मही ॥
ब–ली न अन्यचि काळ जिंकितां । एक ईश्वरावांचुन ही ॥
भ–क्तिप्रेमें करी तयाची । संतजनीं तव कळकळ ही ॥
म–गज शुद्धि हे विचार दावी । शांति मनातें तेणें ही ॥
य–मनियमांना भंगु न देतां । सुकर्म करि तूं दिननिशिं ही ॥
र–मानायका अर्पण करि तें । मीपण सोडी स्वांगें ही ॥
व–रास मिळवी खचित प्रभूचे । भजनीं प्रेमचि ठेवुनहि ॥
श–रदिं चंद्रमा निर्मल ऐसा । होय नरा तूं या देहीं ॥
स–दा त्रिलोकीं सुखास भोगी । काळाचें भय तुज नाहीं ॥
ह–रति आपदा, व्याधि सर्वही । तत्त्व प्रपंचीं साधी ही ॥
क्ष–मापराधा ईश्वर करितो । त्वद्भावातें जाणुनि ही ॥

## ४ मूळाक्षरें. प्रकार २ रा.

क–ळे परंतु वळे न बुद्धि । आत्मज्ञानचि साधाया ॥
ख–रें परंतु वाटत खोटें । हीच नरा ती हरिमाया ॥
ग–रिब परंतु मनांत ताठा । व्यर्थचि राही धरूनिया ॥
घ–रीं परंतु दारा, धन हीं । इतरीं आवडि बहुतां या ॥
च–टक परंतु लपवि स्वताची । इतरीं दावी लोकीं या ॥
छ–ळसि परंतु दीनजनांतें । तदोदरास्तव उगीच या ॥
ज–सा परंतु तसा न तूं कां । बाह्य, अंतरीं वागाया ॥
झ–टशि परंतु पटशि न लोकीं । नाहीं किंचित् भूतदया ॥
ट–के परंतु फिके खरचितां । घे जन ठपका माथीं या ॥
ठ–के परंतु लोकां दावी । थोरपणानें बोलुनियां ॥
ड–ससि परंतु भिन्नचि होशी । असत्कृतीतें करूनिया ॥

ढ–चि परंतु प्रौढी मोठी । लोकीं मिरविशि भांडुनिया ॥
त–त्पर परंतु प्रेम निरंतर । परधन, दारा, हरणें या ॥
थ–कशि परंतु उमेद धरिशी । विषयडोहिं कीं बुडावया ॥
द–शा परंतु यमदंडाची । तत्पर होशी भोगाया ॥
ध–रिशि परंतु प्रभू सोडिशी । वरवर दाविशि प्रेमा या ॥
न–र, परंतु कृती न तैशी । अनीति वागशि नाहिं भयां ॥
प–वित्र, परंतु धन अन्यायीं । न देशि कवडी परार्थि या ॥
फ–टके, परंतु सोशि दुर्जनिं । सज्जनवाक्यें टाकुनिया ॥
ब–रें, परंतु तव मन ने घे । स्व–वर्णधर्म कीं आचराया ॥
भ–ला, परंतु सोडुनि, कुजनिं । आवडीं संगत धरावया ॥
म–तें, परंतु भिन्नचि चित्तीं । नसे सत्यता मनीं जयां ॥
य–मे, परंतु नियमें देतां । सोशिसि शिक्षा स्तब्धचि या ॥
र–डशि परंतु न तें कळकळी । नाहि अंतरीं असुमाया ॥
ल–टकि परंतु साच दाविशि । व्यवहार जनांशीं करूनियां ॥
व–दशि परंतु ये न भरंवसा । इतर भल्यांचा तुज ठाया ॥
श–कशि, परंतु धीटपणानें । अविचारें तूं वागशि या ॥
स–म, परंतु शील, न वय हें । पाहि न वर्तत जनांत या ॥
ह–राशि परंतु धनें सर्वहि । दुर्व्यसन सोडिना हट्टें या ॥
क्ष–णिक परंतु दीर्घ मानिशी । आयुष्य निश्चय सोडि भया ॥

---

## ५ बाराखडी. धडा १ ला.

क–रि करि मनुजा परमार्था रे । नरजन्माला येउनिया ॥
का–म मदें कां लंपट होशी । जाणतपण हें टाकुनिया ॥
कि–र्र अशा ह्या प्रपंच–जाळीं । न राहि व्यर्थचि गुंतुनिया ॥
की–र्तनरंगीं अखंड जाउनी । सद्बोधा घे ठसवुनिया ॥
कु–मक करी बा परोपकारी । सुनीति मार्गें वावुनिया ॥
कु–श्चल वृत्तित संग नको रे । जिवास जाइल घेउनिया ॥
के–वळ दारा, पुत्र, धनादिक । सारें सत्याचि मानुनिया ॥
कै–क पावले रे जन येथें । अधोगतीला तत्समयां ॥
को–णाचे कीं कोणिं न येथें । येणें जाणें एकटया ॥
कौ–सल्येचे सुतां मित्र करि । जा भवसागर तरूनिया ॥
कं–ठिं यमाचा पाश न लागे । वागे सावध तूं जागिं या ॥
कः–पदार्था समान मानी । हें जग, रामचि घे हृदया ॥

---

ॐ तत्सत्-श्रीसद्गुरु प्रसन्न.

# महाराष्ट्रांत 'रामकृष्णहरि' मंत्राचें शतकोटी अनुष्ठान.

व्यक्तीच्या, समाजाच्या व राष्ट्राच्या हिताकरितां देशांत तपोबळ वाढलें पाहिजे. केवळ बुद्धिबळ, शौर्यबल, द्रव्यबल अथवा सैन्यबल हीं यशास कारणीभूत होत नाहींत. ('धिग्बलं क्षत्रियबलं ब्रह्मतेजोबलं बलं') त्यास तपाचा पाठिंबा लागतो. श्रीशिवाजीमहाराजांपेक्षां संभाजीमहाराज कांकणभर अधिक शूर होते. पण शिवाजीमहाराजांच्या अंगचें तपोबल संभाजीमहाराजांत नसल्यामुळें त्यांना राजकार्यांत यश आलें नाहीं व कशी दुर्दशा झाली, हें इतिहासज्ञांस माहीतच आहे. श्रीशिवाजीमहाराजांकडे ईश्वरभक्ति, मातृभक्ति, गुरुभक्ति व ब्रह्मचर्य [ परस्त्रीविमुखता ] अशा महत्तम तपांचा सांठा असल्यामुळें स्वराज्यस्थापनेसारखें महत्तम कार्य त्यांना करतां आलें.

तपानें अंतःकरणशुद्धी होते, तशा विशुद्ध अंतःकरणांत अभ्युदयाच्या अचूक कल्पना स्फुरण पावतात व तशीं अचूक कार्यें घडून येतात आणि त्या कार्यांत यशही अचूक ठेवलेलें असतें. फार तर काय, देवताप्रसादानें म्ह. तपाच्या अदृश्यशक्तीनें अपायाचा उपाय होऊन बसतो. प्रातिकूल्याचें आनुकूल्य होतें व कल्याण घरीं चालून येतें.

अट्टाहासानें केलेले दृश्य-लौकिक-प्रयत्न विफल होत चालले व यशाबद्दल डोळ्यांपुढें गाढ अंधकार दिसूं लागला, तेव्हां सुप्रसिद्ध देशभक्त महाशय बाबू अरविंद घोष यांनीं "आतां ईश्वरीशक्तीच्या साहाय्यावांचून राष्ट्रोद्धार होणें शक्य नाहीं; यासाठीं कळकळीच्या देशभक्तांनीं थोडें दिवस मानवी उपाय म्ह. लौकिकप्रयत्न किंचित् बाजूस ठेवून, ईश्वरीशक्तीच्या आकर्षणाकरितां तपाचरणास लागलें पाहिजे, तपानें दुष्कर गोष्टी सुकर होऊन जातात" असा उपदेश, ते राजकीय कैदी होऊन कोर्टांत उभे असतां सर्वांना मोठ्या कळकळीनें केला व तो ऐकून सुमारें २०० तरुण हिमालयाकडे निघून गेले, ही गोष्ट पुष्कळांना माहीत असेलच. त्या तरुणांचीं नांवेंही डिटेक्टिव्हांच्या डायरींत नमूद आहेत. ( स्वतः अरविंद बाबू तर त्याच कामास लागले आहेत हें सर्वांना माहीतच आहे. ) तात्पर्य,

"यद् दूरं यद् दुराराध्यं, यच्च दूरे व्यवस्थितम् ।
तत्सर्वं तपसा साध्यं, तपो हि दुरतिक्रमम् ॥"

ह्या वचनाप्रमाणें, आतां ब्राह्मणांनीं-लोकहितेच्छु विद्वान् पुरुषांनीं-तपाचरणास लागलें पाहिजे; स्वतः लागून इतरांसही प्रवृत्त केलें पाहिजे व जे त्या कामास लागलेले आहेत त्यांना उत्तेजन दिलें पाहिजे.

पण हें तप कसलें करावयाचें ? कारण, तपाचे अनेक प्रकार आहेत व ते अत्यंत कष्टसाध्य व द्रव्यसाध्य आहेत. ह्या काळीं सर्वसाधारण मनुष्यांना करण्यास सुलभ व शक्य असें कोणतें असेल, तर, लोककल्याणाचे आधारस्तंभ अशा संतश्रेष्ठांनीं व ऋषिमहर्षींनीं पूर्वींच सांगून ठेवलेलें भगवन्नाम-जपाचें अनुष्ठान हेंच होय. हेंच सर्व सिद्धींचें कारण आहे.

" हेंचि साधन रे तुझिया सर्व सिद्धीचें ।
नाम उच्चारीं रे गोपाळाचें वाचें ॥
फुकाचें, सुखाचें, कांहीं न वेंचे भांडार ।
[ पण ] कोटी यज्ञापरिस तुका म्हणे हें सार ॥ "

तात्पर्य नामस्मरणासारखें दुसरें तप नाहीं, नामजपासारखा दुसरा यज्ञ नाहीं. ' यज्ञानां जपयज्ञोऽस्मि ' असें भगवान् गीतेंत सांगतात. हा यज्ञ करीत असतां लौकिक व्यवहार सोडावें लागतील अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. वेळेंत वेळ काढून निदान तीन घटिका तरी या तपःसाधनांत स्वार्थेच्छूंनीं-कल्याणेच्छूंनीं-खर्च कराव्या. शक्य असल्यास अधिकही वेळ त्यांत घालणें बरेंच. तीन घटका एकाच बैठकींत खर्च करणें उत्तम. पण तसें करणें अशक्य वाटल्यास सकाळसंध्याकाळ मिळून खर्च कराव्या. कमींत कमी एक घटिका ( ह्म. २४ मिनिटें ) तरी या कामीं खर्च केल्याशिवाय राहूं नये. संख्या ठेवण्यासाठीं तुळसीमणि, रुद्राक्ष, स्फटिक, पोंवळीं वगैरे कसली तरी माळ घ्यावी. किंवा बोटानें मोजून करावा. ' हातानें काम तोंडानें नाम ' असेंही चालवीत असावें. अशा हातकामाच्यावेळीं संख्या ठेवण्याकरितां घड्याळाचें साह्य घ्यावें. अमुक वेळेंत अमुक जप होतो असें एकदोनदां पाहून ठरवून ठेवावें. संख्या न ठेवतां केलेला जप फुकट जातो असें नाहीं, पण संख्या ठेवण्यास एकप्रकारचें महत्व असतें व अगत्यही लागतें.

महाराष्ट्रांत थोड्या दिवसांखालीं होऊन गेलेले भक्ताग्रणी, योगिवर्य व ब्रह्मनिष्ट महापुरुष **श्रीमद्वासुदेवानंदसरस्वती** ऊर्फ **टेंब्येस्वामी** यांनीं ह्या नामजपाची मीमांसा व प्रक्रिया ( ' मोठा यज्ञ व साक्षात्कार ' पुस्तकांत ) सांगून सिद्ध करून दिलें आहे कीं, नामजपानें हवी ती सिद्धी प्राप्त करून घेतां येते. ( इकडे वेदान्ती लोकांनीं ' सिद्धि ' शब्दामुळें दचकून जाऊं नये. त्यांनीं ' मोक्षसिद्धि-नैष्कर्म्यसिद्धि ' —एवढाच अर्थ घ्यावा व इतर गरीब-प्राकृत-लोकांना ' कामनासिद्धि ' असा अर्थ हवा तर करूं द्यावा ). फार काय प्रारब्धरेषाही पालटून टाकतां येते. प्रारब्ध हें भोगल्यावांचून सुटत नाहीं म्हणतात हेंही खरें आहे, पौरुषप्रयत्नानें तें हटलें जातें हेंही खोटें नाहीं. नल-राम-युधिष्ठिरादिकांचीं उदाहरणें पहिल्या विधानार्थ दिलीं जातात, त्याचप्रमाणें मार्कंडेय-

सत्यवान–सीमंतिनी–भद्रायु इत्यादिकांचीं उदाहरणें दुसऱ्या विधानाच्या पुष्टीस सांपडतात. अर्थात्, पुरुषप्रयत्नानें प्रारब्ध हटलें जातें यांत संशय नाहीं. नामजप पण संख्यायुक्त ही त्या पुरुष–प्रयत्नाची गुरुकिल्ली अथवा शास्त्रसिद्ध प्रक्रिया आहे.

**श्रीशिवाजी**महाराजांचे गुरु **श्रीसमर्थ** रामदासस्वामी यांनीं त्रयोदशाक्षरी राममंत्राचा तेरा कोटि जप केलेला होता हें इतिहास-प्रसिद्धच आहे. त्याचप्रमाणें आधुनिक विद्वच्छिरोमणि व परम देशभक्त कै. **चित्तरंजनदास** (बॅ. सी. आर. दास) यांनीं अठरा अक्षरी मंत्राचा अठरा कोटि जप केल्याचें सांगतात. ( अत्युत्कटैः पुण्यपापैरिहैव फलमश्नुते. ) असे हे लोकविलक्षण पुरुष मनावर घेतील तर काय न करितील ? परंतु व्यक्तिशः इतक्या चिकाटीनें एवढा जप करणार लोक क्वचित् आढळतील. कौटुंबिक कल्याणाकरितां कुटुंबातील सर्व मंडळीकडून एखाद्या मंत्राचा बारा बारा कोटि जप करविणारे कित्येक लोक आढळतात. शास्त्रनियमाप्रमाणें-नव्हे, निसर्गनियमाप्रमाणें-त्यांना इष्टसिद्धिही प्राप्त झालेली आहे. कर्मभूमींतील कर्माच्या कायद्याप्रमाणें, ज्याचें जितकें पुण्य, त्याला तितकें फळ प्राप्त होणारच. हल्लींचा काळ संघ–शक्तीचा आहे. तेव्हां शेअरहोल्डर्सच्या कंपन्यांप्रमाणें

## सामुदायिक जपानुष्ठान

करणें हें हल्लींच्या काळीं लाभदायकच आहे. व्यापारी कंपनीच्या व्यापारांत डायरेक्टर व म्यानेजर ह्यांच्या नजरचुकीनें व लबाडीनें शेअरहोल्डर (भागीदार) लोकांचें नुकसान होण्याचा संभव असतो. तसा प्रकार मात्र ह्या अनुष्ठानात कधींही होणार नाहीं, याबद्दल खात्री बाळगावी. यास '**नहि कल्याणकृत्कश्चिद् दुर्गतिं तात गच्छति**' ह्या भगवद्वचनाचें प्रमाण आहे. त्यास अनुसरून देशांत ठिकठिकाणीं अशा तऱ्हेचीं जपानुष्ठानें झालीं पाहिजेत व तीं ईश्वरीप्रेरणेनें हल्लीं जिकडे तिकडे चाललीं आहेत, हें देशाच्या भाग्योदयाचें चिन्ह आहे.

श्रीतुकाराम व रामदास ह्या दोन मोठ्या विभूति, नव्हे दोने मोठ्या शक्ति महाराष्ट्रांत होऊन गेल्या. श्रीसमर्थांनीं 'श्रीराम जयराम जयजय राम' ह्या मंत्रानुष्ठानानें व श्रीतुकाराममहाराजांनीं 'रामकृष्णहरि' ह्या मंत्रानुष्ठानानें जगदुद्धारक दिव्य शक्ति संपादन केल्या [ बाबाजी आपुलें सांगितलें नाम ' मंत्र दिला '**रामकृष्णहरि**' ह्या अभंगावरून श्रीतुकाराम महाराजांचा मंत्र 'रामकृष्णहरि' होता हें प्रसिद्ध आहे. ] श्रीसमर्थांच्या मंत्राचीं तेरा तेरा कोटींचीं अनुष्ठानें आज कित्येक वर्षांपासून देशांत चालू आहेत, तशींच श्रीतुकाराममहाराजांच्या 'रामकृष्णहरि' मंत्राचींही चालणें अवश्य आहे. सकाम असो वा निष्काम असो, संख्यायुक्त जप करणें हें सर्व प्रकारें श्रेयस्कर

आहे. येत्या श्रीतुकाराम द्वितीयेच्या [ फा. कृ. २ श. १८५२ ] आंत महाराष्ट्रांत ' रामकृष्णहरि ' मंत्राचें शतकोटी अनुष्ठान झालें पाहिजे अशी मी तुकोबारायांच्याच प्रेरणेनें अथवा आशेनें महाराष्ट्रास प्रार्थना करीत आहे, नव्हे, भिक्षा मागत आहे. ती मला महाराष्ट्र देईल असा भरंवसा आहे. गोमांतकांत चार गांवांनीं एकेक कोटीचें अभिवचन देऊन सुरवात केली आहे. दुसरींही गांवें तयार होत आहेत. बेळगांवांतही त्याच संकल्पानें सुरवात झाली आहे. प्रत्येक गांवांतील धार्मिक पुढारी गृहस्थ, कुटुंबांतील वडील मनुष्य, हरएक प्रकारच्या कारखान्याचे मालक, तसेंच शाळामास्तर, हरिदास, पुराणिक, वारकरी संप्रदायांतील निरनिराळ्या फडांचे प्रमुख, इतर सांप्रदायिक व स्वयंसेवकांचे पुढारी; तसेंच वर्तमानपत्रकार अशा लोकांनीं मनावर घेऊन आपल्या वजनाचा उपयोग केल्यास शतकोटीची भरती होण्यास वेळ लागणार नाहीं. तरी आपापल्या गांवीं हें अनुष्ठान सुरू केल्याची सूचना कार्डद्वारें प्रथम कळवून, नंतर प्रत्येक एकादशी अथवा पौर्णिमेपर्यंतची संख्या खालील पत्त्यावर लिहून कळविण्याची मेहरबानी करावी. ह्या सर्व हिशोब राखून तो प्रमुख वृत्तपत्रांमधून जाहिर करणेंचें काम हरि व हरिजनाची सेवा म्हणून प्रेमानें केलें जाईल. ( मद्रास इलाख्यांतील लोकांनीं आपली जपसंख्या " श्रीयुत पी. एन्. शंकर नारायण अय्यर बी. ए. बी. एल्, ६० गोपाळपुरं, क्याथेड्रल पोष्ट, मद्रास " ह्या पत्त्यावर इंग्रजींत पत्र लिहून कळवावी. त्यांनीं व त्यांच्या भगिनी परम कृष्णभक्त श्रीमती विशालाक्षी देवी ह्यांनीं त्या प्रांतीं ' रामकृष्णहरि ' मंत्राचें सामुदायिक जपानुष्ठान चालविलें आहे. हा जप एका वर्षांत शंभर कोटी करवायाचा असा त्यांचा संकल्प आहे. त्यांच्या भावबळाप्रमाणें परमेश्वर तो सिद्धीस नेईल ). मद्रास प्रांतांतहि जर या मंत्रा चें अनुष्ठान चालू झालें आहे, तर श्रीतुकारामभक्त महाराष्ट्रानेंही तसें करावयास नको काय ?

' **राम–कृष्ण–हरि** ' हा मंत्र श्रीतुकाराममहाराजांचा म्हणजे वारकरी संप्रदायाचा आहे. वारकरी लोक व त्यांचे अनुयायी अथवा भक्त यांनीं तर ह्या मंत्राच्या अनुष्ठानास उत्कट भावनेनें सुरवात केली पाहिजे व करविली पाहिजे. तथापि वारकरी संप्रदायाशिवाय इतर लोकांनींही ह्या मंत्राचें अनुष्ठान करण्यास हरकत नाहीं. गुरुमुखाशिवाय नामजप कसा करावा, भिन्न मंत्र कसा जपावा इत्यादि शंका मनांत आणून कालक्षेप करूं नये. " **गुरु आज्ञे किंवा गुरु आज्ञेविण । आधीं सुखें करीं नामस्मरण** " असें गुलाबराय महाराज आपल्या ' संप्रदाय–सुरतरु ' ग्रंथांत म्हणतात. कारण " गुरु आज्ञेविण जपतां । **तरी गुरुलाभाचें फळ तत्त्वता** " असें पुढें ते सांगतात. दुसरी

गोष्ट—एकाद्यास गुरूकडून पूर्वींचा दुसरा एखादा मंत्र मिळाला असल्यास, त्यानें त्या मंत्राचा नित्य नियमाप्रमाणें जप करून ह्या ‘ सामुदायिक ’ नवीन जप-यज्ञामध्यें यांत ठरलेल्या दुसऱ्या मंत्रानें भाग घेण्यास मुळींच हरकत नाहीं. त्यांत कसलाही दोष नाहीं. आपल्या भांडवलावर स्वतंत्र व्यापार करीत असतां देवानें शक्ति दिल्यास दुसऱ्या कंपनीचे शेअर्स घेऊं नयेत असें नाहीं. ( येथें शक्ति म्हणजे वेळेची सवड. ) तें अधिकच लाभदायक होईल. कारण, भगवंताच्या सर्व नामांमध्यें सारखी शक्ति आहे. ‘ **नाम्नामेकार्थता यतः** ’ इ. वचनांनीं श्रीमच्छंकराचार्यांनीं विष्णुसहस्रनामभाष्याचे अखेरीस उत्तम प्रतिपादन केलें आहे. मात्र कोणत्याही नामानें ( मंत्रानें ) आपल्या उपास्याचें स्वरूप एकच लक्षिण्याचा अभ्यास साधावा म्हणजे झालें. फार काय ! **एखाद्या पक्षाचा शब्द ऐकला, तरी तें तें आपल्या उपास्याचें नाम स्फुरलें पाहिजे**, तरच तो खरा साधक व खरा उपासक.

‘ **रामकृष्णहरि** ’ ह्या मंत्रानें श्रीतुकाराममहाराजांची उपास्य देवता श्रीविठ्ठल होती हें सर्वांस माहीत आहेच. याच मंत्रानें कोणी **श्रीकृष्ण**, **श्रीराम**, **श्रीदत्त** वगैरे मूर्तींचीही उपासना करीत असतात. कोणी निर्गुण उपासनेचे अधिकारी हे ‘ रामकृष्णहरि ’ नामाबरोबर **प्रत्यगात्म्याकडे** ( जागृत्स्वप्नसुषुप्ति—अवस्थात्रय साक्षीकडे ह्म. बुद्धिसाक्षि चैतन्याकडे ) वृत्ति फिरवून तदाकारतेचा अभ्यास करितात. ‘ रामकृष्णहरि ’ या मंत्रानें कोणी प्रणवाची ( ॐकाराची ) उपासना करितात. या मंत्रातील तीन शब्द हे अकार—उकार—मकार ह्या अर्थी घेतात. ‘ रामकृष्णहरि ’ मंत्रानें कोणी भूर्—भुवर्—स्वर् ह्या त्रिलोकींचें अधिष्ठानचिंतनपूर्वक ध्यान करून चित्ताची व्यापकता वाढवितात. कोणी ‘ राम—कृष्ण—हरि ’ या मंत्रानेंच ‘ अहंब्रह्मास्मि ’ ह्या महावाक्यार्थाचा अभ्यास करितात. ( अहं—ब्रह्म—अस्मि, तत्—त्वम्—असि, अयं—आत्मा—ब्रह्म इत्यादि महावाक्याच्या अर्थाचें अनुसंधान करितात. ) कोणी देश—ईश—भक्त म्हणतात, कीं, हिंदुस्थानचे तीन इलाखे मुंबई—मद्रास—बेंगाल यांत व्यापून असणाऱ्या ब्रह्मांशाचें ध्यान करून भारतीयांना श्रद्धा, मेधा, यश, प्रज्ञा, विद्या, बुद्धि, श्री, बल, आयुष्य, तेज व आरोग्य देण्याकरितां प्रार्थना चालवावी. तात्पर्य, जपकर्त्यांनीं आपापल्या मगदुराप्रमाणें—चित्ताच्या व बुद्धीच्या आकलनशक्तीप्रमाणें—ध्यान धरून ‘ रामकृष्णहरि ’ मंत्राचा जप करावा. ‘ तज्जपस्तदर्थभावनम् ’ ह्या पातंजल योगसूत्राप्रमाणें, अथवा ‘ नाम उच्चारितां कंठीं । पुढें उभा जगजेठी ॥ ऐसें धरूनियां ध्यान । मनें करावें चिंतन ॥ ’ इ. संतवचनाप्रमाणें मंत्राच्या उच्चाराबरोबर मंत्रार्थाचें

ध्यान होणें हें फार महत्त्वाचें आहे. पण असें मंत्रार्थध्यानपूर्वक नामस्मरण सर्वकाळ सर्वांना होणें शक्य नाहीं. करितां कल्याणेच्छूंनीं हा जप कांहीं माळा मंत्रार्थ-ध्यानपूर्वक करावा. बाकीचा जप घडेल तसा व घडेल तेव्हां—जातां, येतां, बसतां उठतां—कामधंदा करीत असतां—करीत असावा. मात्र संख्या ठेवावी म्हणजे झालें.

उत्तर हिंदुस्थानांत गोरखपुर येथें प्रसिद्ध होणाऱ्या सुविख्यात ' कल्याण ' नामक हिंदी मासिकाच्या विद्वान् संपादकांनीं त्या प्रांतीं 'हरे राम हरे राम राम राम हरे हरे। हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे'. ह्या ३२ अक्षरी मंत्राचा सामुदायिक पद्धतीनें जप चालविला आहे. हें जपानुष्ठान आसामपासून काश्मीर व मुंबई-पासून दक्षिण—रामेश्वर, तसेंच आफ्रिकेपर्यंतही सर्व मिळून १७३ गांवांमध्यें सुरू झालें असून यांत सर्व उच्चशिक्षित व अल्पशिक्षित बंधु व भगिनी सामील झाल्या आहेत व यावर्षीं ( गेल्या फा. कृ. ११ पर्यंत ) २८ कोटि ४८ लक्ष ७३ हजार ८०० इतका जप झाल्याचें वैशाख ( १८५२ ) च्या अंकांत त्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. जिज्ञासूंनीं हवें तर पाहून घ्यावें.

वरील ' हरेराम ' हा ३२ अक्षरी मंत्र कलिसंतरणोपनिषदांतील होय. ' राम—कृष्ण—हरि ' मंत्र हा याच मंत्राचा सारभूत आहे. कारण हीं तीनच नामें त्या अनुष्टुप श्लोकात्मक मंत्रांत आहेत. असो.

" हल्लींचा काळ मोठा भयंकर आहे, पुढें यापेक्षांही भयंकर होईल, ह्यावेळीं जिकडे तिकडे भगवन्नामाचा जप चालू झाला पाहिजे " असें महान योगी व ज्ञानी श्रीसिद्धारूढस्वामी वरचेवर म्हणत असत. त्यांच्या भविष्यवाणीप्रमाणें काळाच्या भयंकरतेची साक्ष तर येतच चालली आहे. त्यांच्या सूचनेप्रमाणें नामानुष्ठानें देशांत चालू होतील तर त्या योगें भगवंताचें कृपाधिष्ठान लवकर लाभून सर्व संकटांचा नायनाट होईल.

नामें संकटें नासती । नामें विघ्नें निवारतीं
नामस्मरणें पाविजेति । उत्तम पदें ॥ ( दा. बो. )
नामपाठ करीं ' राम—कृष्ण—हरि ' ।
होतील कामारी ऋद्धिसिद्धि ॥ ( श्रीनामदेव )
एका जनार्दनी जपतां हें नाम ।
पुरवील काम जो जो हेतु ॥

( जपाच्या आरंभीं व अखेरीस खालील दोन वाक्यें, राष्ट्राच्या कल्याण-बुद्धीनें तीनदां अंतःकरण पुरःसर उच्चारावीं. )

" सर्वारिष्टशान्तिरस्तु । समस्तमंगलावाप्तिरस्तु " ( ३ )

श्रीदुर्गादत्तमंदिर,
माशेल—गोवा.

संतांचा चरणरज—
रामचंद्र कृष्ण कामत.

# पांगारकरांचीं पुस्तकें

१. **भक्तिमार्गप्रदीपः**--( आवृत्ति चौदावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ८८ व्ही. पी. नें ८१२.

२. **संतचरित्रमाला**:—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४२ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असुन ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ.सं. २५६ किं. रु. १८८.

३. **श्रीएकनाथचरित्र**:—श्रीएकनाथमहाराजांच्या चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ८१२.

४. **कविरामायण**:—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ८४.

५. **आनंदलहरी**:—( कवितासंग्रह ) यांत पांगारकरांच्या कवितांपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत, १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ८१२.

६. **नारदभक्तिसूत्रें**:—( आवृत्ति ४ थी ) हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ८८.

७. **नवविधाभक्तिः**—( सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी ) यांत नवविधा-भक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ८६.

८. **निरंजनमाधवांची कविता**:—भाग १ किं. रु. भाग २ व ३ एकत्र किं. १॥ रु.

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्र**:—( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. १८८.

१०. **भक्तिमणिमाला**:—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १८८

११. **सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी**:—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध पुढारी कै. विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ८५.

## पांगारकरांचीं पुस्तकें

१२-१३-१४. **मुमुक्षूंतील निवडक निबंधः**—भाग १ व २ किं. प्रत्येकी १॥८, भाग ३ रा किं. १॥४.

१५. **मोरोपंती वेंचे:**—(२ री आ.) पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रहि नवीन दिलेलें आहे किं.रु. १॥१२.

१६. **पारिजातकाचीं फुलें:**—( तिसरी आवृत्ति ) परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झाल आहे. किं. ॥८.

१७. **श्रीतुकारामचरित्र:**—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलाचा पंढरपूरचा व देहूचे सहा असे सात फोटो, तुकोबांची भरपूर अवतरणें इ. सह किं. रु. २.

१८. **श्रीतुकारामचरितामृत:**—तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं ॥५.

१९. **निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य:**—निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख-विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ॥१०.

२०. **मुक्तेश्वर:**—( चरित्र आणि काव्यविवेचन ) श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे प्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १.

२१. **मारुतिउपासना** ( चौथी आवृत्ति ):—किं. ॥४.

२२. **सार्थ श्रीदासबोध:**—( आवृत्ति दुसरी ) किं. रु. ४ व्ही. पी. नें ४॥१०

२३. **सार्थ मनोबोध:**—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ॥१२.

२४. **समर्थसंजीवनी ऊर्फ रामदासी वेंचे:**—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें ह्या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.

२५. **मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन ):**—किं. रु. २॥८.

२६. **श्रीएकनाथी भागवत** (निर्णयसागर प्रेसचें, आवृत्ति तिसरी):—किं. रु.६

२७. **श्रीसमर्थग्रंथभांडार:**—समर्थांची एकंदर कविता एकत्र सटीप छापलेली आहे. किं. ४॥८.


२८. **समर्थग्रंथभांडार** ( भाग २ रा ):—यांत दासबोधाशिवाय बाकीची समर्थांची सर्व कविता प्रकरणें पाडून व्यवस्थित दिली आहे. किं. रु. २॥८.

२९. **ज्ञानेश्वरांची प्रभावळ:**—ज्ञानेश्वरमहाराज व त्यांचे समकालीन नामदेवराव, जनाबाई, चोखामेळा इत्यादि सर्वजातीय २५ संत यांच्या ग्रंथांतील निवडक वेंचे प्रस्तुत ग्रंथांत घेतले आहेत. यांत ज्ञानेश्वरांच्या २५०० ओव्या व सर्व संतांचे मिळून ४०० अभंग आहेत. सुंदर प्रस्तावना आहे. टीपा भरपूर आहेत. किं. रु. २.

पत्ता:—व्यवस्थापक " मुमुक्षु " पुणें शहर.

श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ।

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वस्पाकारें ।। (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष २४ | भाद्रपद १८५२ | नवें वर्ष १० वें |
| मास १२ | सपटेंबर १९३० | अंक ९ वा. |

वार्षिक वर्गणी रु. ३) संपादक व प्रकाशक, (व्ही. पी. नें रु. २८३



**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

मुमुक्षु कचेरी, नाशिक सिटी.



मुद्रक:—दत्तात्रिय जनार्दन मराठे यांनीं नासिक येथें घ. नं. १०१४ आपल्या श्रीकृष्ण छापखान्यांत छापिलें.

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ मंगलाचरण .... .... .... | १ |
| २ मुमुक्षूस आशीर्वाद .... .... .... | २ |
| ३ देवी अहल्याबाई .... .... .... | ३–८ |
| ४ गीतेची शक्ति .... .... .... | ९–२० |
| ५ पारमार्थिक पत्रें .... .... .... | २१–३२ |
| ६ सत्संग .... .... .... | ३३–३९ |
| ७ संपादकीय टिप्पणें .... .... .... | ३९–४० |



## मुमुक्षूचें स्थानांतर

'मुमुक्षु' कचेरी आजवर पुण्यास होती ती तेथून नाशकास आणल्या-बद्दल मागील अंकीं जाहीर केलेंच आहे. करितां यापुढें **पांगारकरांशीं** अगर **मॅनेजर मुमुक्षु** यांजशीं होणारा सर्व प्रकारचा पत्रव्यवहार, मनीऑर्डरी, पुस्तकांची मागणी वगैरे पुण्यास न करितां नाशिकच्या पत्त्यावर करावी.

व्यवस्थापक 'मुमुक्षु' नासिक शहर

## निरंजनमाधवाची कविता

**भाग १ ला किं. १ रु.** **भाग २-३ किं. १॥ रु.**

पहिल्या बाजीराव पेशव्यांचे अमदानींतल्या राजकारणी, योगी व अधीत अशा निरंजनमाधव कवीच्या काव्यांच्या कविलिखित प्रतीवरून हे दोन भाग छापले आहेत. दुसऱ्या भागांत ज्ञानेश्वरमहाराजांचें उद्बोधक चरित्र रसाळ वाणीनें गायिलेलें ग्रथित केलें आहे. तिसऱ्या भागांत चिद्बोधरामायण हें अध्यात्मरामायणाच्या धर्तीवरील काव्याचें बालकांड आहे. अद्वैतबोध वगैरे वेदांतपर पांच स्फुट काव्यें कठिण विषय सुलभपणें प्रौढ भाषेंत सांगणारीं अशीं घातलीं आहेत. व शेवटीं मराठींतील एकच चंपुकाव्य जें "सुभद्रा–चंपु" नांवाचें या कवीनें केलें आहे तें छापलें आहे. यांतील भाषा आणि वर्णनशैली प्रौढ, मनोहर व सुंदर असून सुभद्राहरणाचा नेहमींचा कथाभाग या कवीनें आपल्या विद्वत्तेनें रसिकमान्य केला आहे. अशा या अपूर्व काव्यसंग्रहानें हे दोन भाग भरले असून दोन्ही एकत्र बांधविले आहेत.

पत्ताः—व्यवस्थापक 'मुमुक्षु' नासिक सिटी.

# राष्ट्रीय कीर्तन रत्नमाला

# कार्यालय पंचवटी नाशिक.

## मालेची नवी योजना.

अगदीं बालपणापासून कीर्तन श्रवणाचा बराच नाद असल्यानें उत्तरोत्तर तो वाढत जाऊन अखेर गोमातेच्या आशिर्वादानें त्याचें पर्यवसान कीर्तनकाराच्या सदरांत येतांच महाराष्ट्रांतल्या जुन्या व नव्या कीर्तनकारांकडे व त्यांच्या प्राचीन अर्वाचीन वाङ्मयाकडे दृष्टी वळून त्याच्या प्रसिद्धि करणार्थ गेल्या शके १८५१ च्या विजयादशमीच्या सुमुहूर्तावर या राष्ट्रीय कीर्तन रत्नमालेचा त्रैमासिक स्वरुपांत जन्म झाला. त्या अवधींत अनेक हरिभक्तांच्या भेटी होऊन त्यांच्याशीं या ग्रंथप्रकाशनाच्या बाबतींत बराच विचार विनिमय झाला; व अखेर बहुमतानें मालेची ही नवी योजना त्यांतून निर्माण झाली.

महाराष्ट्रांत परंपरागत व गुरुमुखानें विद्यासंपादन केलेल्या अशा स्वानुभवी हरिभक्तांची संख्या अत्यंत अल्प आढळून त्यांच्या पुढील पिढीचें या विषयाकडे दुर्लक्ष्य असल्याचें दिसून आलें अर्थात् जुनी पिढी नामशेष होऊन तिच्या संग्रहांतील परंपरागत आलेलें कीर्तन विषयक ज्ञानभांडार नष्ट होण्यानें व नव्या पिढीजवळ पद्धतशीर अध्ययनाचा अभाव असल्यानें पुढें राष्ट्राच्या ऐन भावी उत्कर्ष कालांत अर्ध्याहाळकुंडानें पिवळा झालेला आमच्या

नवीन कीर्तनकारांचा वर्ग जर पुढें आला व चिकित्सक जनतेच्या वाढत्या कसोटीस तो स्वानुभवाच्या अभावीं उतरला नाहीं तर कीर्तन संस्थेचा हळुहळूं लोप होऊन जनतेंतील धर्म, ईश्वरभक्ती व अध्यात्मज्ञान इत्यादि शिक्षणाचें हें एक परंपरागत द्वार बंद होण्याचा विशेष संभव दिसून येतो.

सांप्रत कीर्तन याविषयावर बऱ्याच हरिभक्तांनी आपापले स्वतंत्र ग्रंथ प्रकाशित करून कीर्तनाच्या वाङ्मयाची वाढ केली असें वरवर पाहाणारास आढळुन येईल. ही वाढ अगदींच निरुपयोगी आहे असें आमचे म्हणणें नाहीं. पण त्यांत अनेक व्यक्तींच्या मतभेदाची भेसळ झाल्याने कीर्तनाचें मुळचें शुद्ध स्वरूप नष्ट होत जाऊन त्याचें विकृतीकरण होत चाललें व मुळच्या प्रासादिक काव्यांत प्रसादहीन काव्यांची परंपरा वाढून त्यांतील अनुभव जन्य ज्ञान लोपल्याने उत्तरोत्तर तीं कीर्तनें कलाप्रवर्तक बनून बेचव व नीरस वाटुं लागलीं; हा अनुभव सांप्रत तटस्थ वृत्तीच्या कीर्तनप्रीय माणसास केव्हांही नाकबूल करितां येणार नाहीं.

कालमानानुरूप हरिभक्ति पेक्षां राजकारणाकडेसच जनतेची विशेष प्रवृत्ति साहजिकपणें असल्याने कित्येक कीर्तनकारांनीही आपापल्या कीर्तनांतून केवळ लोकरंजनार्थ स्वकृत राष्ट्रीय आख्यानें प्रतिपादन करून आपसांतील अहमहमिका वाढविली व त्यामुळें जनताही खऱ्या ध्येयास पारखी होऊन श्रोतृसमाजांत जुना व नवा असे दोन वर्ग निर्माण झाले व अखेर नव्या कीर्तनांचा व कीर्तनकारांचा तात्पुरत्या पोपटपंची ज्ञानाने बोजवारा उडून जनतेचा ओढा पुन्हां प्राचीन सत्पुरुषांच्या प्रासादिक वाङ्मया-

कडे वळूं लागला.

ही स्थिती लक्षांत घेऊन आम्हीं तरुण पिढीच्या राष्ट्रीय जिज्ञासा पूर्ती करितां व त्यांतूनच त्यांस कीर्तनाचें खरें मर्म पटवून क्रमानें मूळच्या मार्गावर आणण्याकरितां हें राष्ट्रीय कीर्तन त्रैमासिकाचें कार्य चालू ठेऊन बाकीच्या एकंदर जनतेसाठीं हरिकथा, राजकारण व सर्वांविषयीं सावधपणा शिकविणाऱ्या आद्य कीर्तनाचार्य मुनिवर्य नारदादि भारतीय कीर्तनकारांपासून परंपरा प्राप्त श्री समर्थापर्यंतच्या ईश्वरी प्रसादास प्राप्त होऊन कीर्तनाच्या गादीस लायक ठरलेल्या सत्पुरुषांच्या प्रासादिक काव्यांतून ग्रथित केलेली अशी एकंदर ३५१ दिव्य चरित्रें अत्यंत परिश्रमानें मिळविली आहेत. गेल्या एका तपांतील आमची ही तपश्चर्या आर्यावर्तांतील जनताजनार्दनाच्या सेवेस क्रमवार सादर करावी या पवित्र हेतूनें त्या ३५१ चरित्रांतूनही अत्यंत श्रेष्ठ अशी १५१ आख्यानें निवडून काढून तीं 'कीर्तन रत्न समुच्चय' या ग्रंथाच्या पूर्वार्धांतील १० भागांतून देण्याचें योजिलें आहे.

एकदम १० भाग छापणे झाल्यास प्रत्येक भागाचे निदान एक हजार प्रतीस अगदीं कमीतकमी पांचशे रुपये याप्रमाणे १० भागास ५००० रुपये खर्च येईल; पण एवढे धाडस करण्याची आज आमची पात्रता नाहीं तथापि सर्वांच्या सुदैवानें कोणा श्रीमान् हरिभक्ताने इकडे लक्ष पुरविल्यास त्यास ही गोष्ट अशक्य नाहीं.

अध्यात्म ज्ञानदाना इतकें या जगांत दुसरे कोणतेंही सर्व श्रेष्ठ दान नाहीं व हें ज्ञानभाण्डार पुढील कोणत्याही कालांत निर्विवादपणें अखंड टिकणारे असून त्यांत आमच्या पदरचें असें

कांहीं एक नाहीं.

परंपरागत राजशासन पद्धतीने अधर्मी सत्तेचा नष्टांशकाल दर्शवून भारताच्या उत्कर्षकालाचें यथार्थज्ञान देणाऱ्या शेंकडो हरिभक्तांच्या अनुभवजन्य ज्ञानाचा हा अपूर्व ठेवा असून कीर्तनाच्या व्यवसायांतील संपूर्ण भाण्डार यांत साठविलें आहे. सर्व साधारण जनतेसही या ज्ञानदानाच्या पवित्र कार्यांत भाग घेता यावा म्हणुन या ग्रंथाच्या प्रकाशन कार्यांत मालेने पुढील नवी योजना अमलांत आणिली आहे.

१ कीर्तनरत्न समुच्चयाच्या कोणत्याही एका भागास एकदम ५०० रुपये देणगी दाखल देणारास मालेचे तहाहयात आश्रयदाते समजून सदर ग्रंथांत फोटोसह त्यांचें संक्षिप्त चरित्र दिलें जाईल व त्यांच्या नांवची अर्पण पत्रिका जोडण्यांत येऊन सदर ग्रंथाच्या १०० प्रति त्यांस भेटी दाखल देण्यांत येतील.

२ या कार्यास एकाच वेळीं १०१ रुपयें देणगी दाखल देणारास मालेचा आश्रयदाता समजून मालेतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक ग्रंथाच्या ५ प्रती त्यांस भेटीदाखल देण्यांत येतील.

३ एकदम ५१ रुपये देणारास तहाहयात सभासद समजून प्रत्येक ग्रंथाच्या तीन प्रती त्यास भेटी दाखल मिळतील.

४ २५ रु. देणारास हितचिंतक समजून प्रत्येक ग्रंथाची एकेक प्रत त्यास भेट म्हणुन दिली जाईल. आश्रयदाते, सभासद व हितचिंतक यांचीं नांवें त्यांच्या देणगीसह प्रत्येक भागांतून देण्यांत येतील.

५ अगाऊ १० रुपये भरून वर्गणीदार होणारास प्रत्येक भागाची एकेक प्रत एकेक रुपयास दिली जाईल.

६ अगाऊ ५ रु. भरून वर्गणीदार होणारास प्रत्येक भाग १८२ रुपयांस देऊं.

७ प्रवेश फी दाखल १ रु. भरून नांवें नोंदविणारास ग्रंथाचा प्रत्येक भाग सव्वा रुपया किंमतीत मिळेल ट. ख. सर्वांसच निराळा द्यावा लागेल. इतरांस प्रत्येक भागाची किंमत १॥ रु. पडेल.

या प्रमाणें या पवित्र कार्यांत आपण यथाशक्ति भाग घेऊन आम्हांस अवश्य मदत करावी अशी सविनय प्रार्थना आहे. ग्रंथांतील संपूर्ण आख्यानांची यादी सोबत दिली आहे ती अवश्य पहावी. समर्थ सांप्रदायिक त्रयोदश कीर्तनांचा एक स्वतंत्र भाग रचण्यांचें कार्यही चालू आहे.

राष्ट्रीय कीर्तन रत्नमाला
पंचवटी--नाशिक.

म. वा. खळदकर
संपादक व प्रकाशक.

**कीर्तन त्रैमासिक**—कीर्तनाच्या व्यवसायांत विलक्षण चैतन्य उत्पन्न करणोंर असें हें एकच त्रैमासिक. वा.व. १ रु. द्वितीय वर्ष चालू अंक ८६ सिंहगडादि प्रथम वर्षाच्या एका सप्ताहास पुरणाऱ्या चार राष्ट्रीय कीर्तनार्थ १ रु. व्ही. पी. ने १ ८५ प्रति फारच थोड्या. **सं. राष्ट्रीयकीर्तनमाला पंचवटी, नाशिक**

# पौराणिक कीर्तन रत्नमाला

कीर्तनाच्या वाङ्मयांतील प्राचीन हरिभक्तांचें संपूर्ण भाण्डार

म्हणजेच

# कीर्तन रत्न समुच्चय

## पूर्वार्ध भाग १ ते १० आख्यानें १५१ किं.

## प्रत्येकी १॥ रुपया.

### प्रथम भाग

१ लक्ष्मीस्वयंवर २ सुरथ-सुधन्वा ३ वृंदाजालंदर ४ मदालसा ५ धनेश्वर ६ गजगौरी ७ गालवचरित्र ८ राम-हनुमानयुद्ध ९ संतसखुबाई १० गोपिचंद (पूर्वार्ध) ११ युवराजसंरक्षण १२ चंद्रावधध १३ आचार्यजन्म १४ कीचकवध १५ सत्तांधवेन-शासन

### द्वितीय भाग

१ चुडालोपाख्यान २ भरतभेट ३ गोपिचंद ४ मिराबाई विवाह ५ अलर्क मदालसा ६ सीतास्वयंवर ७ गोरक्षजन्म ८ मुरलीवृत्त ९ चोखास्त्रीप्रसूति १० मंडनमिश्रवाद ११ शिवजन्म १२ झांशीची राणी १३ शिवसमर्थ भेट १४ शिवगोप्रदान १५ एकादशी जन्म

### तृतीय भाग

१ भट्टकुमारिल २ मच्छेंद्रनाथ ३ ब्रम्हचारी कबीर ४

परकायाप्रवेश ५ बाजीदेशपांडे ६ अफझूलवध ७ देवीआहिल्या ८ शिवमनोजय ९ राणाप्रताप १० संयोगिता ११ समर्थप्रताप १२ ब्राम्हतेज १३ शुकचारित्र १४ सौगंधीका १५ शिवराज्याभिषेक

## चतुर्थ भाग पूर्वार्ध रामायण

१ वाल्मिकिचरित्र २ दशरथविवाह ३ श्रीरामजन्म ४ सीताजन्म ५ विश्वामित्रआगमन ६ मखरक्षण ७ अहिल्योद्धार ८ सीतास्वयंवर ९ स्वराज्यत्याग १० भरतभाव ११ कांचनमृग १२ सीताहरण १३ हनुमानभेट १४ वालीवध १५ सीताशोधन

## पंचम भाग संत-चरित्रें

१ तुलसीदास २ सुरदास ३ पुंडलीक ४ ज्ञानेश्वर ५ नामदेव ६ एकनाथ ७ नरसींमेहता ८ कान्होपात्रा ९ बिल्वमंगल १० रामदास ११ तुकाराम १२ सांवतामाळी १३ उद्धवचिद्धन १४ भानुदास १५ रोहिदास

## षष्ट भाग स्त्रीचरित्रें

१ सुलोचना २ चांगुणा ३ दमयंती ४ सीमंतीनी ५ सावित्री ६ देवहूति ७ गार्गी ८ अनुसूया ९ महानंदा १० संतसखुबाई ११ मीराबाई १२ झांशीची रणरागिणी १३ देविअहिल्या १४ साध्वीजीजाबाई १५ बहिणाबाई १६ जनाबाई १७ सुकन्या

## सप्तम भाग

१ अंबरीष २ शिबीचरित्र ३ जरत्कारू ४ उद्धवगोपि ५ सांबचरित्र ६ कपिलजन्म ७ गोवत्सद्वादशी ८ जडभरत ९ दिलीप १० गोदावरीजन्म ११ भागिरथी अवतरण १२ नहूष १३ कंसवध १४ पुरंजनाख्यान १५ कलिप्रभाव.

## अष्टम भाग–उत्तरार्ध रामायण

१ अंगदशिष्टाई २ राम-रावणभोजन ३ बिभिषणमीलन ४ इंद्रजितवध ५ अहिमहीवध ६ रावणवध ७ राज्यदान ८ भरतभेट ९ राज्याभिषेक १० चुटकी ११ ते १५ अश्वमेध

## नवम भाग

१ सागरमंथन २ सर्पसत्र ३ भरतजन्म ४ शंतनु-भीष्म ५ द्रोण-संकोप ६ वैरनिष्पत्ति ७ जरासंधवध ८ द्यूतक्रीडा ९ वनवास १० अज्ञातवास ११ प्रगटीकरण १२ उद्योगपर्व १३ कृष्णशिष्टाई १४ कर्णबोध १५ वीराविडंबन

## दशम भाग

१ ते ३ भीष्मपर्व ४ ते ५ द्रोणपर्व ६ कर्णवध ७ दुर्योधनवध ८ सौप्तिकपर्व ९ चार्वाकवध १० ते १३ शांतिपर्व १४ धर्मराज्य १५ कलिबंधमुक्ति

**सूचना**—कीर्तनतरंगिणी, कीर्तनसुमनहार, कीर्तनसुधा उत्तर रंगसमुच्चय इत्यादि आधुनिक पुस्तकांतून हीं आख्यानें नाहींत प्रत्येक आख्यानांतील काव्यसंग्रह सत्पुरुषांच्या प्रासादिक वाणींतून उतरला असल्यानें कीर्तनांत अभिनवरस पदोपदीं उत्पन्न करितां येतो. रुचि पालट करण्यासाठीं अनेक विद्वानांच्या सूचनेवरून कांहीं भागांत आधुनीक राष्ट्रीय चरित्रें ही देण्यांत आलीं आहेत. प्रत्येक आख्यानास पूर्वरंग जोडणे हें प्रकाशन कार्याच्या आटोक्याबाहेर जाऊं लागल्यानें ती उणीव भरून काढण्यासाठीं कीर्तन त्रैमासि-काच्या प्रत्येक अंकांत कीर्तन साहित्य संग्रहद्वारा विनोदी लघुकथा दृष्टांतरत्नावली. अलंकारदीपिका, स्वातंत्र्याचीं स्फूर्तिदायक गीतें

अभिनवपद्यमाला, अध्यात्मविचारतरंग, सुभाषितबोधकथा, वेदांतसारसुत्रें, रागताल दीपिका इत्यादि विविध प्रकरणें देण्यांत येत असल्यानें त्यावरून पूर्वरंग स्वतंत्रपणें सहजच तयार करितां येईल व त्यामुळें कीर्तनांत नेहमीं नाविण्य कायम राहील पूर्वरंग केव्हांही पोपटपंची थाटाचा बांधलेला नसावा असें आमचें प्रामाणिक मत आहे. शिवाय अगदीं नवशिक्याकरितां सदर त्रैमासिकांतून पूर्वरंगासह एकेक आख्यान येतच असते. त्याचाही संग्रह सर्वांनीं अवश्य करावा. केवळ कीर्तनकाराकरितांच हा आमचा प्रयत्न नसून कर्मयोगी भारतीयांच्या प्रत्येक कुटूंबास भक्तिज्ञान वैराग्यादि विविधज्ञानाचा सर्व संतमहंताच्या एकमुखीवाणीनें घरबसल्या लाभ घेतां यावा अशाच रीतीनें याची रचना करण्यांत आली आहे. ईश्वरकृपेनें या दहाभागांचा हा पूर्वार्ध संपूर्ण प्रसिद्ध होऊन तो लोकादरास पात्र होतांच त्याच्या उत्तरार्धाची भरपूर तयारीही आम्ही करून ठेविली आहे मात्र याकामीं जनतेचा आश्रय काय घडवून आणील तें खरें ! भविष्यं नैव चिंतयेत्.

| | | |
|---|---|---|
| राष्ट्रीय कीर्तन रत्नमाला | } | म. बा. खळदकर |
| पंचवटी नाशीक | } | संपादक व प्रकाशक |

---

प्रकाशकः—म. बा. खळदकर राष्ट्रीय कीर्तनमाला पंचवटी नाशिक
मुद्रकः—रा. ग. देवकर सुदर्शन प्रेस नाशिक

१९ ९/२
22-10-30

मुमुक्षु मासिक वर्ष १० वें ] # मंगलाचरण [ सपटंबर १९३० अंक ९ वा.



देवा! तुझें रूप वय कैसें । तुज पैलीकडे काय असे ।
तूं कायिसयावरी आहासि ऐसें । पाहिलें मियां ॥ २७५ ॥
तंव देखिलें जीं आघवेंचि। तरि आतां तुझा ठाव तूंचि ।
तूं कवणाचा नव्हेसि ऐसाचि । अनादि आयता ॥ २७६ ॥
तूं उभा ना बैठा । दिघडा ना खुजटा ।
तुज तळीं वरीं वैकुंठा । तूंचि आहासी ॥ २७७ ॥
तूं रूपें आपणयाचि ऐसा । देवा तुझी तूंचि वयसा ।
पाठी पोट परेशा । तुझें तूं गा ॥ २७८ ॥
एवं आदिमध्यांतरहिता । तूं विश्वेश्वरा अपरिमिता ।
देखलांसि जी तत्वता । विश्वरूपा ॥ २८२ ॥
तरी मज पाहतां मुकुंदा । तूं ऐसाचि व्यापक सर्वदा ।
मग भक्तानुग्रहें तया मुग्धा । रूपातें धरिसी ॥ २८९ ॥
कैसें चहूंभुजांचें सांवळें । पाहातां वोल्हावती मन डोळे ।
खेम देऊं जाइजे तरी आकळे । दोहींचि बाहीं ॥ २९० ॥
तूं धर्माचा वोलावा । अनादिसिद्ध तूं नित्य नवा ।
जाणे मी सतांतिसावा । पुरुष विश्वेश तूं ॥ ३०९ ॥
देवा! अविद्यार्णवीं पडिलों । जी विषयवागुरें आतुडलों ।
स्वर्गसंसाराचिया सांकडिलों । दोहीं भागीं ॥ ३२९ ॥
ऐसें आमुचें सोडवणें । तुजवाचोनि कीजेल कवणें ।
तुज शरण गा सर्वप्राणें । म्हणतसें देवा ॥ ३३० ॥

—ज्ञानेश्वरी अ. ११

# मुमुक्षूला आशीर्वाद

( १ ) कोल्हापूरचे ' विद्याविलास ' कर्ते म्हणतातः–

" **मुमुक्षु**—मासिकाचा आषाढ–श्रावण या दोन महिन्यांचा जोड अंक आला आहे. हें मासिक आज सतत २३ वर्षें महाराष्ट्र भाषेची सेवा करीत असून, पारमार्थिक विषयांत पूर्णपणें रंगलेलें याच्यासारखें दुसरें मासिक नाहीं. याचे संपादक श्री० लक्ष्मण रामचंद्र पांगारकर बी. ए. हे आपलें पुण्याचें वास्तव्य सोडून नाशिक येथें रहाण्यास गेल्यानें, त्यांनीं ' मुमुक्षु ' ची कचेरीही या महिन्यापासून नाशकास नेली आहे. हें मासिक आज सुमारें २ तपें उत्तम रीतीनें चाललें असून, तें अद्यापि आपल्या पायावर उभें राहूं शकत नाहीं ही गोष्ट महाराष्ट्रभाषाप्रेमी लोकांस लाजिरवाणी होय व ही गोष्ट त्याच्या चालकांस नाइलाजानें अखेर लोकांपुढें मांडावी लागली; ही स्थिति अत्यंत अनुकंपनीय होय. तरी या मासिकास चांगला लोकाश्रय देणें प्रत्येक महाराष्ट्रीयाचें कर्तव्य आहे. "

( २ ) श्री. **विश्वनाथ महाराज केसकर** यांनीं 'आस्ट्रिया–व्हियेना' येथून पत्रांत लिहिलें आहे:—

" आपल्या आयुष्याची धन्य आहे ! परमार्थामृत पिण्यांत व पाजण्यांत आपण आपल्या जीविताचें सार्थक केलें आहे. आपले ग्रंथ व आपला मुमुक्षु यांनीं मराठी भाषा जाणणाऱ्या सहस्त्रावधि लोकांना परमार्थाचा निर्मळ मार्ग दाखवून दिला आहे. मुमुक्षु व मुमुक्षुकर्ते चिरायु असोत. आशीर्वाद "

( ३ ) रा. आर. के. **पंडित,** देवासहून लिहितात:– "आपला मुमुक्षु येण्यास उशीर लागला कीं माझा जीव कासावीस होतो. यासाठीं आपलें प्रकृतिमान विचारण्यास मी अनेकदां तारा करून आपणांस त्रास दिला आहे. 'मुमुक्षु' नें मला परमार्थाची गोडी लावली आहे, तो माझा मित्र आहे, गुरु आहे. " इ०

१९ १/२

२२-१०-३०

# देवी अहल्याबाई ( इ. स. १७२९ ते १७९५ )

## ( समकालीनांचे अभिप्राय )

देवी अहल्याबाईचा कीर्तिदुंदुभि आज दीडशें वर्षें जगावर गाजून राहिला आहे. दिव्य चारित्र्य, अद्भुत प्रजावात्सल्य, अंतर्बाह्य संकटांशीं झगडणारी वीरता, अप्रतिहत तेजस्विता, अढळ धर्मनिष्ठा, सर्वांगसुंदर सच्छीलता व अखंड दानशूरता इत्यादि गुणांत अहल्यादेवींची बरोबरी करणारी दुसरी व्यक्ति जगाच्या इतिहासांत नाहीं. ' मी आज जें कांहीं सत्तेच्या बळावर करीत आहें त्याचा मला परमेश्वरापाशीं जाब द्यावा लागेल' अशा बुद्धीनें राजदंड हातीं वागविणाऱ्या उदार व्यक्ति इतिहासांत किती सांपडतील ? ' राज्य संभाळायचें काम आतां तुझ्या हातीं आहे' असें म्हणून मल्हाररावांनीं आपल्या हयातींतच राज्यभार अहल्याबाईवर टाकला होता. सासऱ्याच्या हयातींतलीं ११ व पुढें स्वतंत्रपणाचीं ३० मिळून ४१ वर्षें देवींनीं माळव्याचा राज्यकारभार शूरपणानें व तेजस्वितेनें वाहिला. अल्पवयांत वैधव्य, पुत्रशोक व कन्याजामातांच्या निधनाचें दुःख असे हृदय विदारण करणारे आघात सहन करून अहल्याबाईनीं राज्याची व्यवस्था किती चोख ठेविली होती हें पाहिलें म्हणजे मन थक्क होऊन जातें. राघोबादादा, महादजी शिंदे, नाना फडणवीस, सभोंवारचे रजपूत राजे व तुकोजीसारखे मानलेले पुत्र व कारभारी या सर्वांवर आपली छाप ठेवून व भिल्लांसारख्या निष्कपट कडव्या लोकांचीं मनें प्रेमानें आपल्याकडे आकर्षून घेऊन तसल्या धामधुमीच्या काळांत अहल्याबाईनीं ४० वर्षें होळकरांच्या राज्याचा दरारा सर्वत्र बसविला, प्रजांना त्या मायबाप झाल्या व अवघ्या हिंदुस्थानभर दयादानधर्मशीलतेचा डंका गाजविला ! अहल्यादेवींचें एकंदर चारित्र्य मनांत आणलें म्हणजे ही थोर ईश्वरी विभूति होऊन गेली असेंच म्हणावें लागतें. सर्व प्रकारचें ऐश्वर्य पायांशीं लोळत असतांना कसल्याही मोहाचा त्यांच्या मनावर परिणाम झाला नाहीं यावरून साधुपुरुषांचे विवेकवैराग्यादि गुण त्यांच्या अंगीं मूर्तिमंत नांदत होते हें उघड आहे. साधा नित्यक्रम, धार्मिक आचरण, परोप-

कारबुद्धि, भूतदया, ईश्वरनिष्ठा, सत्संगाची आवड, सच्छास्त्रश्रवणनित्यता हे साधुत्वाचे गुण त्यांचे अंगीं पूर्णपणें वसत असून राज्यभार शिरीं वाहण्यास लागणारी तेजस्विता, मुत्सद्दीपणा, समयसूचकता याही गुणांचा प्रसंगोपात्त अवलंब करण्याइतकी स्थितप्रज्ञता—हा देवींच्या अंगचा गुणसमुच्चय पाहिला कीं 'न प्रभातरलं ज्योतिरुदेति वसुधातलात्' ह्या कालिदासोक्तीचें स्मरण होतें. गंगे-सारखें त्यांचें पावित्र्य मनोहर होतें. त्यांचें चरित्र जसें ज्याला कळलें तसें त्यानें लिहिलें आहे, पण त्यांचे संपूर्ण गुण एका 'महेश्वराला' च ठाऊक होते. आजच्या प्रसगीं अहल्यादेवीच्या चरित्राकडे त्यांचे समकालीन पुरुष कोणत्या दृष्टानें पाहत असत एवढेंच मला अगदीं संक्षेपानें सांगावयाचें आहे.

(१) **कविवर्य मोरोपंतः**—इ. स. १७९० मध्यें मोरोपंत आपली त्रिस्थळी महायात्रा संपवून दक्षिणेंत परत येत असतांना वाटेंत महेश्वर येथें अहल्याबाईंनीं त्यांस आठ दिवस ठेवून घेतलें. त्यांस पालखी पाठवून मोठ्या सन्मानानें आणलें व त्यांचा त्यांनीं प्रेमपूर्वक सत्कार केला. ज्या आर्यसंस्कृतीच्या रक्षणार्थ पंतांनीं अफाट कविता लिहिली त्या संस्कृतीचें मूर्तिमंत शुद्धस्वरूप अहि-ल्याबाईंत पंतांस पाहावयास सांपडलें. उभयतांसही एकमेकांच्या भेटीचा आनंद झाला. त्यांनीं:—

> देवि अहल्याबाई ! झालीस जगत्त्रयांत तूं धन्या ।
> न न्यायधर्मनिरता अन्या कलिमाजि ऐकिली कन्या ॥

याप्रमाणें ७।८ आर्यांत अहिल्याबाईचा गौरव केला आहे. 'न्यायधर्मनिरत' अशी स्त्रीच काय पण कोणी पुरुषही जगत्त्रयांत झाला नाहीं असें म्हटल्यास अतिशयोक्ति खचित होणार नाहीं. जगाच्या इतिहासांत अहल्याबाईंना तोड नाहीं. पंतांनींच पुढें 'तुजदेवि ! भेटली जी सत्कीर्ति कधींच हे न राजन्या'—तुला मिळालेली कीर्ति कोणाही राजाला आजवर मिळाली नाहीं असें म्हटलें आहे. अहिल्याबाईच्या पुण्यपावन चारित्र्याबद्दल त्यांना पंतांनीं सीता, पार्वती व गंगा यांच्या उपमा दिल्या आहेत त्याही समर्पक आहेत. त्यांनीं 'पुण्यकीर्ति' व 'सत्वराति' अहल्यादेवींची स्तुति केली आहे व ती करितांना 'विश्व जिला वानि-तसे कां न मयूरेंहि तीस मानावें ?' असें म्हटलें आहे. त्यावरून अहिल्याबाई विश्वख्यात व विश्वस्तुत होत्या हें उघड दिसतें. अहिल्याबाईच्या सद्गुणांची कीर्ति भरतखंडभर दुमदुमून राहिली होती असा प्रत्यक्ष इतिहासच साक्ष देत आहे.

(२) **अनंतफंदीः**—हे संगमनेर (नगर) चे फंदी कवि फिरत फिरत महेश्वरक्षेत्रीं गेले, तेव्हां महेश्वरास संपत्ति अफाट होती, देशोदेशींचे लोक अहिल्यादेवीच्या सत्कीर्तीनें आकर्षिले जात व देवीचा दयादानधर्म पाहून संतुष्ट होत वगैरेंचें एका छेत्त्यश्या पोवाड्यांत त्यांनीं वर्णन केलें आहे. महेश्वरासारखें 'क्षेत्र भू नाहीं पाहिलें' 'नर्मदानिकट तट घाट। बहुत अफाट। पायऱ्या दाट। चिरेघाट। मुक्तीचीं शिवालयें। कैलाससमता नानापरिची '—कैलासाची भावना तेथें जाणाऱ्या लोकांस आजही होते. 'शहर गुलजार। बहुत बाजार। दुकानें लक्षापति सावकार। भार माल खजीना रस्ता स्वस्ता सुकाळ—नाहिं दुष्काळ। बाळवृद्ध प्रतिपाळ करीती' अशी 'प्रताप अहिल्याबाईच्या' धर्मक्षेत्र राजधानीची भरभराट व सुरक्षितता फंदीनें समक्ष पाहून वर्णिली आहे. 'गरिब गुरिब कंगाल गांजले। अडले भिडले' त्यांच्या साह्यार्थ अन्नछत्रादि साधनें तयार आहेत. 'दानधर्म करि नित्यशिवार्चन। सत्वशील ऐकुनी धांवती।'

(३) **प्रभाकरः**— 'सति धन्य धन्य कलियुगीं अहल्याबाई। गेली कीर्ति करुनियां भुमंडळाचे ठायीं' हा प्रभाकराचा पोवाडा फार मनोरम आहे.

महाराज अहल्याबाई पुण्य प्राणी। सपूर्ण स्त्रियांमधि श्रेष्ठ रत्नखाणी।
दर्शनें मोठ्या पापाची होईल हानी। झडतात रोग दोषांची होईल ग्लानी।

पुण्यात्मा अहल्यादेवीच्या दर्शनानें मोठालीं पापें, नाना दोष, व अनेक रोग्यांचे रोग झडतात अशी त्यावेळीं देवीच्या पुण्याचरणाची ख्याति होती. 'उद्धार कुलाचा केला'-कुलाचाच काय, भरतखंडाचा व पृथ्वीचाही केला ह्मटल्यास वावगें होणार नाहीं. अहल्यादेवीच्या बरोबर नांव घ्यायला कोणत्या देशांतील कोणती स्त्री योग्य आहे? जो कोणी आईबाप बायकापोरें घेऊन महेश्वरास गेला, 'त्याचा संसार चालवी दीन दुबळ्याची आई' देवीचा धर्माचार, दयादान, औदार्य, निष्ठा सर्वच सात्विक गुण अतुलनीय आहेतः—

प्रत्यहीं ब्राह्मणांस द्यावीं दशदानें। ऐकावीं पुराणें बहुत आनंदानें।
कधीं कोटिलिंगें करवावीं। वधूवरें कधीं मिरवावीं।
अर्भका दुधें पुरवावीं।

भरतखंडभर अहल्याबाईच्या धर्मशाळा, देवळें, अन्नछत्रें, विहिरी, रस्ते; तळे वगैरे लोकोपयोगी संस्था अहल्यादेवीच्या धर्मपरायणतेची साक्ष देण्यास दीडशें

वर्षांनंतर आजही उभ्या आहेत, त्या सर्व निर्विघ्नपणें देवीच्या पुण्याईवर चालल्या आहेत. परोपकाराची सीमा ह्मणजे अहल्याबाईच आहे. 'ज्यासि आली जरा झाली कांहीं विकळ गात्रें । पुरवावीं त्यांस औषधें वस्त्रेंपात्रें'—

आधीं इच्छाभोजन द्यावें । उपरांतिक तीर्थ घ्यावें ।
वाढून ताट वर मग न्यावें । जेविल्या सर्व मग अन्न खाई ।
रघुवीरचरित्रें ती रात्रिस गाई ॥....

यात्रेकऱ्यांना धोतरजोडे, चरमीजोडे, पंचे, आंगरखे, दुशाला, घोडे—ज्याच्या त्याच्या गरजेप्रमाणें व योग्यतेप्रमाणें देण्यांत येत.

बांधिले घाट मठ फार । कुठें शिवास संतत धार ।
कुठें वनांत पाणी गार ।....

मार्गांतही सर्व सोयी केलेल्या असत. मुशाफर 'विश्रांति पावती पाहुनि आमराई,' राजकारणाला अवश्य तेवढा वेळ घालवून बाकीचा सर्व वेळ देवीचा धर्माचरण, परोपकार, दानधर्म यांत जात असे, यामुळें योग्यांनाही दुष्प्राप्य अशी निर्वासनता व शांति ह्यांना लाभली होती !

संसारीं असुनि तिच्या वासना मेल्या ।
तिजपुढें सहज मग मुक्ति उभ्या ठेल्या ! ॥

(४) **खुशालीराम**:—यानें 'अहल्याकामधेनु' नामक एक प्रचंड ग्रंथ केला आहे. या कामधेनूचे बारा 'वत्स' आहेत. दानधर्मांत गुंतलेल्या अहल्याबाईच्या उपयोगार्थ व्रतदानादिकांचें वर्णन पुराणाधारें यानें केलें असून त्याच्या प्रस्तावनेंत त्यानें 'अहल्याप्रशस्ति' लिहिली आहे. सारा ग्रंथ अर्थात संस्कृत भाषेंत आहे. अहल्यादेवीच्या वर्णनांत खुशालीरामानें 'सर्वतो वैराग्यशीला सततं दानशीला, सद्धर्ममाचरिष्यमाणा, सच्छास्त्रकथाश्रवणात् विगतशोका, भक्तिप्रेमविवेकाढ्या, श्रद्धालुर्दयालुश्च, विगतलोकबंधना, सदाचारपरायणा, पारलौकिकहितैषिणी, भगवत्सायुज्यं गंतुकामा, सती श्रीभगवत्परिचर्यापरायणा' इत्यादि यथार्थ व साभिप्राय विशेषणें लाविलीं आहेत. ह्या सर्व विशेषणांत अहल्यादेवीचें अंतरंग स्वरूप दिसतें व जगाला धर्माचरणाचा कित्ता घालून देण्यासाठीं अवतरलेली ही ईश्वरी विभूतिच आहे असें मनास वाटतें. अहल्यादेवी 'वाङ्मनःकायसंशुद्ध' असून 'जितेंद्रिया च सकलप्राणिनां च हितैषिणी' कशी होती हें आपण पाहिलेंच आहे.

देवब्राह्मणपूजार्हा ब्राह्मणेषु दयापरा ।
सदाचारवती नित्यं विध्युक्तं कर्मकारिणी ॥
युक्ताहारविहारा च युक्तस्वप्नावबोधिका ।
दयार्द्रशुद्धभावेन सर्वत्र समदर्शना ॥

रामायण, महाभारत व भागवत यांचें नित्य पुराण ऐकण्याचा त्यांचा नियम असे, त्यांचा पुराणीक अंबाराम हाही अत्यंत सत्पात्र ब्राह्मण होता व त्यांची साधुशीलता पाहून देवीनें त्याचाच उपदेश घेतला होता; तात्पर्यः—

श्रद्धाप्रेमविवेकार्द्रा महाभागवती सती ।
कथामृतात्परं लाभं मन्यते नाधिकं हि सा ॥

**( ५ )सर जॉन मालकम**:—अहल्याबाईच्या धर्मपरायणतेसंबंधानें आमच्या कवींनीं प्रत्यक्ष अनुभवानें जें लिहिलें आहे त्याचें तात्पर्य वर सांगितलेंच आहे. अहल्याबाई धर्मरत होत्या याविषयीं शंका नाहीं. पण ' त्या राजकारणांत निपुण होत्या असें म्हणतां येत नाहीं; किंबहुना राजकारणपराङ्मुख होत्या असा आक्षेप अलीकडे कांहीं इतिहासपटूंनीं घेतला आहे' राज्याची आबादानी राखणें, प्रजा संतुष्ट ठेवणें, आपल्या राज्याचा दुसऱ्यावर दरारा ठेवणें, राज्यांत शांति-सुख पसरणें हें जर राजकारणनैपुण्याचें फळ असेल ( आणि याशिवाय दुसरें कोणतें असणें शक्य आहे ? ) तर अहल्याबाईच्या राजकारणपटुत्वाविषयीं शंका घेणें अगदीं चुकीचें आहे. बाजीराव पेशव्यांनीं ज्याच्या हातावर पेशवाईचें उदक पुढें सोडलें व ज्यानें मध्यहिंदुस्थानांत पोलिटिकल एजंटचें काम अनेक वर्षें केलें तो आपल्या Memoirs of Central India ह्या पुस्तकांत म्हणतोः—

" The success of her Internal Administration was altogether wonderful. So efficient were her relations with foreign princes, that her territories were never invaded except for a few weeks by the Rana of Udepur (he was subsequently defeated and had to due for peace). The undisturbed internal tranquity of the Country was ever more remarkable than its exemption from foreign attack. " (p. 147 )

प्रजेंत भरभराट, संतोष व शांति आणि बाहेरच्या राज्यावर दरारा ह्या दोन गोष्टी अहल्याबाईच्या कारभारांत जर सिद्ध आहेत तर त्यांच्या राजकारणाला नांवें ठेवणें असमंजसपणाचें आहे. लबाड्या, कपटपटुत्व, परस्वापहार, परघात, लावालावी या गोष्टींना जगाच्या राजकारणांत महत्त्व असेल पण तें तामसी राजकारण अहल्याबाईच्या राजकारणांत दिसत नाहीं, हा त्यांच्या उज्ज्वल धर्मन्यायनिरतत्वाचाच परिणाम होय.

( ६ ) **मिस् जॉन बेली:**—ह्या तत्कालीन इंग्लिश स्त्रीनें चार काव्यात्मक ओळींत अहिल्यादेवीचें वर्णन फार सुरस केलें आहे. ती ह्मणते:—

For thirty years her reign of peace
The land in blessings did increase;
And she was blessed by every tongue
By stern and gentle, old and young.

अहिल्यादेवीचे राज्यांत जनतेला शांतिसुख मिळून तिची भरभराट झाली व वृद्धतरुण, सात्विक व राजस, सर्व प्रकृतीच्या लोकांनीं तिचा एकमुखानें जयजयकार केला असें या बाईच्या ह्मणण्याचें तात्पर्य आहे.

ह्या प्रमाणें देशी आणि विदेशी अशा समकालीन लेकांनीं अहिल्यादेवीच्या धर्मशीलतेचें, परोपकारबुद्धीचें, भूतदयेचें, विजयी राजकारणपटुत्वाचें व सौजन्याचें वर्णन केलें आहे. अशा या पुण्यपावन अहिल्यादेवीचा अखंड जयजयकार असो.

---


# भक्तिमणिमाला.

संपादक—**ल. रा. पांगारकर.** बी. ए.

भागवत हा भक्तिशास्त्रावरचा एक अद्वितीय ग्रंथ सकलसंतमान्य व सर्वजनप्रिय आहे. भक्तिप्रेमाचीं रहस्यें अमृतमधुर वाणीनें जनांस सांगणारा भागवताच्या बरोबरीचा दुसरा ग्रंथ नाहीं. भागवतांतील उत्तमोत्तम अशा ५५० श्लोकांची निवड करून प्रायः त्यांचा कथासंदर्भ देऊन साधुसंतांच्या वचनाधारें ही भक्तिमणिमाला तयार केली आहे. भागवती श्लोकांबरोबरच महाराष्ट्रीय सत्कविवचनांचाही यांत समावेश केल्यामुळें ही माला मराठी ग्रंथ या दृष्टीनें केवळ अद्वितीय झाली आहे. पृ. सं. २५० किंमत १॥ रु. व्ही. पी. नें रु. १८१३.

पत्ता:– **व्यवस्थापक, ' मुमुक्षु ' नाशीक.**

ॐ तत्सत्-श्रीसद्गुरु प्रसन्न.

# गीतेची शक्ति.

**‘ सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ’** (अ. १८।६६)

[ लेखकः--**ह. भ. प. रामचंद्र कृष्ण कामत**
श्रीदुर्गादत्तमंदिर, माशेल-गोवा ]

**गीता** ही प्रभूची ‘ **वाङ्मयी** ’ **मूर्ति** असें श्रीज्ञानेश्वर महाराज ह्मणतात-प्रभूची श्यामसुंदर चतुर्भुज मूर्ति भूतलावर अवतरून तिनें ‘ दुष्टनिग्रह, ’ ‘ शिष्ट-परिपालन ’ ‘ व धर्म--स्थापन ’ अशीं तीन कार्यें केलीं; किंबहुना ह्या तीन कार्यांकरितां प्रभु निर्गुणामधून सगुणांत येतातः—

**( १ ) परित्राणाय साधूनाम्,**
**( २ ) विनाशाय च दुष्कृताम्,**
**( ३ ) धर्मसंस्थापनार्थाय—**
**संभवामि ॥ युगे युगे ( अ ४--८ )**

अशी त्यांची प्रतिज्ञा आहे.

( २ ) पण प्रभूचे हे सगुण अवतार त्या त्या कालापुरते, विशिष्ट कार्या-करितांच होत असून, तीं तीं कार्यें झालीं ह्मणजे त्या सुंदर अवतारतनु गुप्त होतात; परंतु, प्रभूची ही गीतारूपी ‘ वाङ्मयी ’ तनू तशी नसून शाश्वत आहे; सुकुमार पण व्यापक आहे; एकादशाध्यायांतील प्रभूच्या विश्वरूपाप्रमाणें ती ‘ सर्वाश्चर्यमय ’ व ‘ दुर्निरीक्ष्य ’ ही आहे, अश्रद्धावान्, अतपस्क व असूयावान् लोकांना ती खरोखरच दुर्निरीक्ष्य आहे. तसे लोक गीतेचे मुळीं अधि-कारीच नाहींत. श्रद्धावान् पण अज्ञ म्हणजे दुर्बलबुद्धीच्या लोकांनाही ती दुर्निरीक्ष्य ह्मणजे दुर्गम आहे, किंबहुना प्राज्ञ पुरुषाला सुद्धां ती त्याच्या कृपे-वांचून सुगम होणार नाहीं. भगवंताच्या लीला-तनु ( रामकृष्णादि लीलाविग्रह अवतारदेह ) दैत्यांना व देवांनाही ज्याप्रमाणें सुसेव्य नाहींत-कंसशिशुपाला-दिकांना त्या अवतारतनूंचा जसा प्रभाव समजला नाहीं, तसाच इंद्रविरिंच्या-

दिकांनाही तो उमजला नाहीं, तेही मोह पावले--त्याचप्रमाणें प्रभूची ही 'वाङमय' तनु देखील सर्वांना सुसेव्य नाहीं. कारण—

( ३ ) ( अ ) '**उद्धरेदात्मनात्मानं**' ह्या वचनाच्या विरुद्ध '**तेषामहं समुद्धर्ता**' हें वचन; ( आ ) '**कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः** या विरुद्ध '**ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पंडितं बुधाः**' व '**ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा**' हीं वचनें; ( इ ) **न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः**' '**नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः**' ह्याविरुद्ध, '**ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति। भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया**' '**चातुर्वर्ण्यं मया सृष्टम्**' इत्यादि वचनें ( ई ) '**सुहृदं सर्वभूतानां**' या विरुद्ध '**कालोस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धः लोकान्समाहर्तुमिह प्रवृत्तः** हीं वचनें ( उ ) **समोऽहं सर्व भूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः** ह्याविरुद्ध '**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्** हें वचन! ( ऊ ) **श्रेयान्, स्वधर्मो विगुणः, स्वधर्मे निधनं श्रेयः** ह्या विरुद्ध '**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज**, हें वचन या प्रमाणें परस्परविरोध किंवा विरोधाभास पाहून अप्रबुद्ध लोकांचीं मनें संशयांत पडतात. कांहीं आधुनिक शिक्षित विद्वान् लोक तर गीता ह्मणजे 'प्रमत्त प्रलाप' असें म्हणून आंधळ्यानें सूर्याची निंदा करावी, तशी निंदा व उपहास करून आपलाच प्रमत्तपणा दाखवितात! तात्पर्य, असंस्कारी व संकुचित बुद्धीला गीतेचा परपार लागणें केव्हांच शक्य नाहीं. याकरितां 'प्राप्य वरान्निबोधत' ह्या वचनाप्रमाणें सच्छास्त्र देखील संतमुखानेंच श्रवण केलें पाहिजे तरच तें पचनीं पडतें. तशा प्रकारचे ज्ञानी, संत महात्मे कोणी न-मिळाल्यास अनन्यभावानें हृदयस्थाला शरण जाऊन अर्थाचा प्रकाश करण्या-बद्दल त्याची अत्यंत कळकळीनें प्रार्थना केली पाहिजे. ह्मणजे तो दयावन हृदयस्थ परमात्मा '**ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते**,' **तेषा-मेवानुकंपार्थं अहमज्ञानजं तमः। नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता ॥** ह्या आपल्या वचनाप्रमाणें त्याच्या हृदयांत सत्यार्थाचा प्रकाश करून त्याला आपणाकडे येण्याचा खरा मार्ग दाखवील.

( ४ ) पण कोणाला दाखविल? त्याच्या तशा अनुकंपेला ( दयेला ) कोण पात्र होईल? त्या ( पात्र होणाऱ्या ) पुरुषाचीं लक्षणेंही त्या परमपुरुषानें त्याच्या वरच्या श्लोकांत ( अ. १० श्लो. ८-९-१० ) सांगून दिलीं आहेत.

**भजन्ते मां बुधा भावसमन्विताः। मच्चित्ताः, मद्गतप्राणाः बोधयन्तः परस्परम् । कथयन्तश्च मां नित्यं, तुष्यंति च रमंतिच ॥ तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकं** अशा 'सततयुक्त' भक्तांवरच तो तशी कृपा करील, मग अशी कृपा पाहिजे असेल त्यानें तसे भक्त व्हावयाला नको काय? असो.

( ९ ) अर्जुन हा कृष्णाचा सखा होता, श्रीकृष्ण सख्यभावानें त्याच्याकडे वागत होते; अनेक दिवस व अनेक रात्री त्यांनीं एकांतांत प्रेमानें घालविल्या होत्या; गीतेंतील अमोलिक तत्त्वज्ञान शांतपणानें व स्वस्थपणें सांगण्यास श्रीकृष्णाला किती तरी सवड होती; पण त्यांनीं कां बरें सांगितलें नाहीं ? श्रीकृष्णाला सवड व आवड होती; पण अवसर नव्हता, प्रसंग नव्हता. सांगितलेला नीतिबोध ग्रहण करण्यास मनाची तयारी लागते. ही तयारी ह्मणजे मनाची एकप्रकारची अवस्था होय. या अवस्थेंतच मन बोध ग्रहण करण्यास समर्थ होतें. श्रीकृष्ण ही संधि पहात होते. कारण, मनाच्या अन्य अवस्थेंत सांगितलेला बोध व्यर्थ जातो. ही अवस्था श्रीकृष्णाच्या अपेक्षेप्रमाणें अर्जुनाच्या मनास युद्धाच्या वेळीं प्राप्त झाली. तात्काळ श्रीकृष्णांनीं ती संधि साधून घेतली. अर्जुन 'धर्मसंमूढचेतस' झाला, काय करावें व काय न करावें हें त्यास समजेनासें झालें, स्वतःच्या ज्ञातृत्वाचा अहंकार मावळला, व **यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे, शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्** ' असे उद्गार त्याच्या तोंडून निघाले. हा 'शिष्यभाव' ह्मणजे ज्ञातृत्वाहंकारशून्यता व वक्त्याच्या ठिकाणीं विश्वास व पूज्यता, हा भाव ह्मणजेच बोधग्रहण करण्याची मनाची विशिष्ट अवस्था. 'प्रपत्ति' ( त्वां प्रपन्नम्' मधील 'शरणागति' ) ह्मणजे बोधग्रहण करण्यास लागणारी पात्रता पाहिल्यानंतरच भगवंतांनीं बोधाला सुरवात केली. दुसऱ्या अध्यायांत ज्ञानोपदेशाला आरंभ केला, पण त्याच्या उद्धाराची प्रत्यक्ष जबाबदारी ( घेण्याची इच्छा होती तरी ) घेतल्याप्रमाणें दाखविली नाहीं. दुसऱ्या अध्यायांत ज्ञानयोग बीजरूपानें सांगितला. तिसऱ्या अध्यायामध्यें कर्मयोगाची योग्यता कळवून तोच आचरण्याबद्दल प्रशंसा केली. चौथ्या अध्यायांत कर्मच ब्रम्हरूप कसें करावें, ह्याबद्दल सांगतांना ज्ञानाची प्रशंसा केली; ज्ञानामध्यें कर्मांतील विषाला अमृतरूप करण्याची शक्ति आहे, असें प्रतिपादन केलें; परंतु, तें ज्ञान तुला आपण सांगण्यास तयार आहें, असें न सांगतां,

'तत्त्वदर्शी ज्ञानी ( संत ) तुला तें सांगतील, त्यांना शरण जाऊन—प्रणिपात, परिप्रश्न व सेवा करून—त्यांजकडून संपादन कर असें सांगून परभारें हवाला दिला. प्रणिपात, परिप्रश्न व सेवा ह्या योगानें ज्ञानग्रहण करण्याची व पचविण्याची योग्यता प्राप्त होते असें दर्शविलें. त्यानंतर त्यास उपदेश करीत करीत 'कर्मसंन्यास ' व ' अभ्यास ' योग सांगून सप्तमाध्यायाचे अखेरीस ब्रह्म, **अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ, प्रयाणकालीं** माझें स्मरण मद्भक्ताला लाभतें असें सांगून, या गोष्टीविषयीं त्याची जिज्ञासा जागृत केली. नंतर आठव्या अध्यायांत ' किंतद्ब्रह्म' वगैरे प्रश्न अर्जुनानें केल्यानंतरच त्या सातही गूढांचा भगवंतानीं खुलासा केला. शहाण्या गुरूची प्रबोधचातुरी अशीच असते. ते शिष्याची प्रज्ञा प्रथम तयार करितात, व नंतर त्यास ज्ञान देतात.

( ६ ) श्रीकृष्णपरमात्म्यांनीं आपल्या सख्याला योग्य संधि साधून युक्तिप्रयुक्तीनें त्याची प्रज्ञा वाढवून त्याला निजस्वरूपाची ओळख करून दिली. त्याची आकुंचित बुद्धि—देहाभिमान—कर्तृभोक्तृत्वाभिमान—नष्ट करून त्याला आपल्या निजकृपेस पात्र करून घेतलें. ईश्वरशरणागतीचा खरा श्रेयोमार्ग त्याला दाखविला. त्याला विश्वरूपदर्शनादि अनुभव दाखवून, चालू जगच्चक्राशीं जीवाचा संबंध कितपत पोंचतो, जीव, जगत् व ईश्वर यांचे परस्परसंबंध काय आहेत, हें सांगून व प्रत्ययास आणून देऊन, 'ज्ञानप्रधान भक्तियुक्त कर्मयोगावर ' त्याची मति स्थिर केली; आणि असा त्याला तयार करून त्याच्या कर्माकर्मांची सर्व जबाबदारी आपण घेतली व त्याला पूर्ण आश्वासन—अभयवचन—दिलें. भगवंताची भक्तवत्सलता व सामर्थ्य दर्शविणारा गीतेचा हा श्लोक ह्मटला ह्मणजे **'सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज। अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः '** हा आहे.

( ७ ) गीता, सप्तशती, भागवत वगैरे ग्रंथांचें अर्थानुसंधानपर पारायण हें मोक्षफलदायक आहे, किंबहुना त्यांतील वचनाच्या अर्थचिंतनानें परमार्थ साधावा असा त्याचा हेतु आहे; तथापि ' केवल पारायण ' — अर्थानुसंधान रहित पठण — देखिल ज्ञानयज्ञाचें फल देणारें आहे, असें **' अध्येष्यते च य इमं०'** ( अ. १८।७० ) या श्लोकानें भगवंतानीं सांगून दिलें आहे. या श्लोकाच्या टीकेंत ' जपमात्रादपि ज्ञानयज्ञफलं मोक्षं लभते ।.... फलविधिरेवायं नार्थवादः '

असा श्रीमधुसूदन सरस्वती, श्रीधरादि टीकाकारांनीही अभिप्राय दिला आहे. येथें ‘ अर्थे तेंचि पाठें जोडे० ’ असें श्रीज्ञानेश्वर म्हणतात. असो. वरील ग्रंथांतील प्रत्येक श्लोक म्हणजे सिद्धमंत्र आहेत. म्हणून अनुष्ठान-भावनेनें त्याचें पारायण करावयाचें झाल्यास त्याला विधि सांगितलेले आहेत. त्या विधीप्रमाणें श्रद्धावान् लोक अनुष्ठान करून फल प्राप्त करून घेतात, हा लोकानुभव आहे. अनुष्ठानाच्या मंत्राला **ऋषि, छंद, देवता, बीज, शक्ति, कीलक, करन्यास, हृदयादिन्यास,** वगैरे सांगितलेले असतात. मंत्रानुष्ठानास आरंभ करण्यापूर्वी त्यांचा उच्चार करावा लागतो. ह्या उच्चारानें व न्यासादि क्रियेनें त्या मंत्रामध्यें एक प्रकारची विद्युच्छक्ति भरली जाते. कराङ्गन्यासांनीं अनुष्ठानकर्ता पुरुष मंत्ररूप होतो, हें तत्त्व जाणून जो मंत्रानुष्ठान करितो, त्याचें तें अनुष्ठान वीर्यवत्तर ह्म. सामर्थ्यवान होतें, हें वैदिक धर्मानुयायांस माहितच आहे.

( ८ ) आपल्या ‘ भगवद्गीतामालामंत्रा ’ चा **ऋषि** वेदव्यास, **छंद**-अनुष्टुप् **देवता**—श्रीकृष्णपरमात्मा; ‘ अशोच्यानन्वशोचस्त्वं. हें **बीज,** ‘ सर्वधर्मान्परित्यज्य० ’ ही **शक्ति** ‘ अहं त्वा सर्वपापेभ्यो ’ ०हें **कीलक** असें सांगितलें आहे. त्यानंतर अंगुष्ठादि न्यासाला निरनिराळे मंत्र आहेत, ते गीतापाठकांना माहितच असतील. हें येथें सांगण्याचें कारण हेंच कीं ‘ **सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज** ’ ( इतिशक्तिः ) ही **गीतेची शक्ति** आहे, हें वाचकांनीं स्मरणांत ठेवून गीतेचें पठण करावें व त्या शक्तीकडे आपली सर्व शक्ति वेंचून अर्थात् तदनुरूप वागून ह्मणजे त्या वचनांतील तत्त्वाचें ‘ अनुष्ठान ’ करून आपण तद्रूप व्हावें.

( ९ ) आतां, त्या वचनाचें अनुष्ठान म्हणजे काय ह्याचा विचार केल्याशिवाय हें लेखनानुष्ठान ‘ कल्याणप्रद , होणार नाहीं, याकरितां तसा थोडासा प्रयत्न करणें अवश्य आहे. ‘ सर्वधर्मान्, परित्यज्य, माम्, एकं शरणं, व्रज ह्या वचनामध्यें ‘ सर्व धर्म ’ ते कोणते ? ‘ परित्यज्य ’ ह्मणजे काय ? ‘ माम् ’ कोण ? ‘ एकं ’ म्हणजे काय ? ‘ शरणं ’ चें स्वरूप अथवा लक्षण कोणतें ? ‘ व्रज ’ ह्मणजे कोणती क्रिया ? यांचें विवरण झालें पाहिजे. पण शब्दार्थाचें विवरण करूं लागल्यास तो एक लहानसा ग्रंथच होईल. शब्दाच्या चहात्यांनीं ( शब्दोपासकांनीं ) हवा तर तो खटाटोप करावा. हा लेखक

तो खटाटोप करण्यास समर्थ नाहीं, करितां भावार्थच द्यावा अशी त्याची इच्छा आहे.

( १० ) शब्द देखील निःशब्दाला पोंचवितात. किंबहुना, निःशब्दाला पोंचविण्याकरितांच—पोंचविण्यापुरताच—शब्दाचा उपयोग आहे. पण हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. कारण, शब्द हे शाखास्थानीं असून, निःशब्दवस्तु ही चंद्रस्थानीं आहे. शाखा सोडून आकाशांत चंद्राकडे दृष्टि फेंकली, तरच चंद्र-साक्षात्कार होतो. शाखेवरच दृष्टि ठेवली तर फक्त शाखासाक्षात्कारच होणार. करितां शब्द सोडून त्यांतील 'भावा' चें ग्रहण केलें पाहिजे. **भाव अभ्यासिला पाहिजे.** भावाभ्यासी पुरुषच 'भावातीतं त्रिगुणरहितं' ह्या पदवीला पोंचतात.

( ११ ) गीतेवरील **श्री**ज्ञानेश्वर महाराजांच्या '**भावार्थदीपिका**' टीकेच्या आधारानें वरील गीतेच्या शक्तिस्वरूप—शक्तिदायक—वचनाचा प्रथम विचार करूं; नंतर सवडीनुसार इतर महात्म्यांच्या अभिप्रायाचा परामर्ष घेऊं. श्रीज्ञानेश्वरमहाराज त्या श्लोकाच्या टीकेंत ह्मणतात:——

[ सर्व धर्मान् परित्यज्य ] **स्वर्गनरकसूचक । अज्ञान व्यालें धर्मादिक । तें सांडूनि घालीं अशेख । ज्ञानें येणें ॥ १३९१ ॥ हातीं घेऊनि तो दोर । सांडिजे जैसा सर्पाकार । कां निद्रात्यागें घराचार । स्वप्नींचा जैसा ॥ ९२ ॥ × × तैसें धर्माधर्माचें टवाळ । दावी 'अज्ञान' जें का मूळ । तें त्यजूनि त्यजीं सकळ । धर्मजात ॥ ९५ ॥** [ मामेकं शरणं व्रज ] **मग अज्ञान गेलिया । मीचि एक असे धनंजया । सनिद्र स्वप्न गेलिया आपणपें जैसें ॥ १३९६ ॥ तैसा मी एकवांचूनि कांहीं । मग भिन्नाभिन्न आन नाहीं । सोहंबोधें तयाच्या ठायीं । 'अनन्य' होय ॥ ९७ ॥ आपुलिया भेदेंवीण । माझें जाणिजे जें एकपण । तयाचि नांव 'शरण' । मज येणें गा ॥ ९८ ॥ घटाचेनि नाशें । गगनीं गगन प्रवेशे । मज शरण येणें तैसें । ऐक्य करी ॥ ९९ ॥ मजही शरण रिघिजे । आणि जीवत्वेंचि असिजे । धिक् बोला यिया नलजे । प्रज्ञा केवीं ! ॥ १४०२ ॥" इ.**

( भावार्थ ) - ' सर्व धर्म ' म्हणजे धर्माधर्मजाताचें मूळ जें अज्ञान तें ' परित्यज्य ' म्ह. ज्ञानानें टाकून देऊन—हातांत दोर घेऊन त्यावर भासणारा सर्पाकार जसा टाकावा किंवा निद्रात्यागानें स्वप्नांतील संसार जसा टाकावा त्याप्रमाणें ज्ञानाचा—आत्मज्ञानाचा—स्वीकार करून अज्ञान समूळ टाकावें. (ज्ञानाचा स्वीकार केला म्हणजे अज्ञान आपोआप जातें असा भावार्थ. ) अज्ञान गेल्यानंतर माझ्यावांचून ( अखंड सच्चिदानंद स्वरूपावांचून ) दुसरें कांहींच उरत नाहीं; त्या स्वरूपाचे ठिकाणीं ' सोऽहं ' भावानें अनन्यता ( ऐक्यता ) प्राप्त होते. आपल्या भिन्नत्वाची कल्पना सोडून माझें एकपण जाणणें याचेंच नांव मला ' शरण ' येणें होय. घटाच्या नाशानें घटाकाश महाकाशांत प्रवेश करतें, तद्वत् तुझें मला शरण येणें ऐक्यकारक आहे. अलंकार सोन्याला किंवा तरंग पाण्याला शरण येतो तसा तूं मला शरण ये. मला शरण आला आणि जीवपणानें पुन्हां राहिला, असें बोलण्याला बुद्धीला लाज कशी वाटत नाहीं ? करितां तशा बोलण्याला धिक्कार असो. इत्यादि.

( १२ ) श्रीरमावल्लभदास महाराज या श्लोकावरील टीकेंत ह्मणतात:—

" **कानें ऐकणें, वाचें बोलणें । त्वचें स्पर्श, करीं घेणें । डोळां देखणें, पायां चालणें । जिव्हे चाखणें सर्व रस ॥ मलविसर्ग गुदें करणें । गंध घ्राणें शिश्नें रमणें । हे इंद्रियधर्म इंद्रियां लावणें । यावें आपण मज शरण ॥ .... एवं प्राण उपप्राण । दहा धर्म दहांचे जाण । जे त्यागूनि शीघ्र सुजाण । यावें शरण मजलागीं ॥** ' निर्विकल्प ' **धर्म अंतःकरणाचा ।** ' संकल्प विकल्प ' **मनाचा । बुद्धीसी धर्म निश्चयाचा ।** ' चिंतन ' **चित्ताचा जाणिजे ॥ अहंकारा** ' थोरीव, ' **सत्वा** ' जागरण' । **राजसासी** ' स्वप्न ' **आपण ।** ' सुषुप्ति ' **करी तामसार्पण । मग तूं शरण येई मज ॥** ' तुर्या ' **करी जीवार्पण ।** ' उन्मनी ' **करी शिवार्पण ।** 'प्रकृतीस' **लटकें दे आंदण ।** ' पुरुषा ' **आपण सत्य घ्यावें । ऐसें सर्व धर्मावेगळें । होऊन शरण यावें सगळें । मग सुख पावसी आगळें । होणें मोकळें सहजचि ॥** " इत्यादि

याचा सारांश असा कीं, सुखदुःखें, क्षुधातृषा, कामक्रोध, जरामरण, हे देहेंद्रियादिकाचे धर्म जीवानें अज्ञानानें आपणांवर लादून घेतले आहेत.

( स्वधर्म सोडून परधर्माचा स्वीकार केला आहे ) ह्मणून लक्ष चौऱ्याशींच्या फेऱ्यांत तो सांपडला आहे. करितां हे सर्व धर्म सोडून आत्म्याला—परमात्म्याला शरण गेलें पाहिजे. ऐकणें, स्पर्श घेणें, पाहणें, रस घेणें, गंध घेणें, बोलणें, चालणें, देणें, घेणें, मलमूत्र विसर्जन करणें इ. हे ज्ञानेंद्रियांचे व कर्मेंद्रियांचे धर्म; तसेच पंच प्राण पंच उपप्राण यांचे क्षुधातृषा—शिंक-जांभई इत्यादि धर्म. संकल्प—विकल्प—निश्चय—अभिमान इ. अंतःकरणचतुष्टयाचे धर्म; जागृति—स्वप्न—सुषुप्ति हे सत्वरज—तम यांचे धर्म; हे ज्यांचे त्यांना दे. तुर्या जीवाला, उन्मनी शिवाला व प्रकृति लटिकेपणाला देऊन सोड ( अथवा हे सर्व नाशिवंत मिथ्या पदार्थ प्रकृतीला अर्पण कर; ) व फक्त पुरुषालाच तूं ग्रहण कर. **पुरुषाचेंच आत्मत्वानें ध्यान कर** असें भगवान सांगतात. यालाच **सर्व धर्मावेगळें होऊन परमात्म्याला शरण जाणें** म्हणतात अशी शरणागति झाली म्हणजे सर्व पापांपासून (अविद्येच्या बंधनापासून) सहजच मोकळीक होते. ( हा अर्थ श्रीरमावल्लभदासांनीं आपल्या 'दशक निर्धार' नांवाच्या प्रकरणांत त्या गीता श्लोकांवर लिहितांना लिहिला आहे. भ. गीतेवरील ' चमत्कारी ' टीकेमध्येंही त्यांनीं असाच अर्थ; पण थोड्या निराळ्या शब्दांनीं केला आहे.) असो. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या टीकेवर हें एक भाष्यच शोभेल, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

( १३ ) आतां, हा फार उच्चभावनेचा अर्थ सोडून देऊन, सगुणाचाच आश्रय करून ह्या श्लोकाचा अर्थ केला, तरी सुद्धां कांहीं लहानसान गोष्ट नाहीं. " सर्व—धर्म—परित्याग " म्हणजेच शास्त्रोक्त सर्व कर्मफलांची आशा साफ सोडून देऊन त्याचप्रमाणें कर्मकर्तृत्वाभिमानही टाकून ( हीं कर्में मी करितों ही बुद्धि सोडून ) भगवतप्रीत्यर्थ निरहंभावानें कर्में करीत रहाणें व भगवंताला सर्व भूतमात्रीं व वस्तुमात्रीं पहाणें; असाही अर्थ या श्लोकार्धाचा कित्येक टीकाकार करितात. तोही सर्व सामान्य जीवांना विचार करण्यासारखा आहे. उदाहरणार्थ--पितृश्राद्ध करावयाचें पण तें कर्म अखेरीस पित्रंतर्यामी किंवा पितृस्वरूपी ' जनार्दन वासुदेवः ' प्रीयताम् असें ह्मणून भगवंताला अर्पण करावयाचें. आपली एक लीला नांवाची कन्या वसंतराव नांवाच्या वराला अर्पण करावयाची, पण ' नारायणरूपिणे वराय ' असें म्हणून तें कन्यादानरूपी कर्म भगवंताला अर्पण करावयाचें. कर्मफलाशा

व कर्तृत्वाभिनिवेश सोडून भगवदर्पण--बुद्धीनें कर्मे करणें यालाच ‘ सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ’ असें म्हणतात.

( १४ ) याच्याही पलीकडे थोडासा विचार केला असतां व प्राचीन भक्तवर्यांचीं चरित्रें पाहिलीं असतां असें दिसून येतें कीं, शास्त्रांत सांगितलेले वर्णाश्रमधर्म अथवा आचारनीति ह्या उच्च शरणागतीमध्यें मागें पडतात. उदाहरणार्थ ‘मातृदेवो भव’‘पितृदेवो भव’ हा धर्म कुक्कुट द्विज व पुंडलीक भक्त,यांनीं आचारिला, पण ध्रुव, प्रल्हाद व भरत यांनीं तो धिक्कारून सोडला ( हे भक्त मातापित्यांच्या वचनाची अवज्ञा करून भगवंताला शरण गेले. ) अनुसूयेचा पातिव्रता धर्म हा व्रजगोपिका व यज्ञपत्न्या यांच्या उपयोगीं पडला नाहीं. पतींची अवज्ञा करून त्या वागल्या. आधुनिक संतांमधील संत सखुबाईची गोष्टही अशीच आहे. श्री तुकाराम महाराज ह्मणतात---

**‘ देव जोडे तरी करावा अधर्म । अंतरे तें कर्म नाचरावें ॥’**
**‘ जेणें नारायणीं घडे अंतराय । होका बापमाय त्यजावे ते ॥ ’**
**‘ प्रल्हादें जनक बिभीषणें बंधु । राज्य—माता निंदू भरतें केली ॥ ’**

कारण, **धर्म** याची व्याख्या ते सांगतातः---

**‘ तुका म्हणे सर्व हरीचे पाय । येर ते अपाय दुःखमूळ ॥ ’**

याचा अर्थ देवाची प्राप्ति होत असेल तर अधर्मही करावा, देव अंतरेल असें कर्म आचरूं नये. नारायणाच्या भक्तीमध्यें विघ्न होत असेल तर आई-बापांचाही त्याग करावा. मग पुत्र, बंधु भगिनी व पत्नी यांची काय कथा ? प्रल्हादानें बापाचा, बिभीषणानें पितृतुल्य जेष्ठ बंधूचा, भरतानें मातेचा व राज्याचा, बलीनें गुरूचा व व्रजवनितांनीं पतींचा त्याग केला. ( त्यजो पिता पेह्लाद, बिभीखन बंधु, भरत महतारी। हरिहित गुरुबली, ब्रिजबनितन पति, भये मुद मंगलकारी ) याचें कारण श्रीतुकाराम महाराज ह्मणतात. श्रीहरीचे पायें हेच ‘ सर्वधर्मरूप ’ आहेत. सत्यधर्मरूप—शाश्वतधर्मरूप आहेत. त्या वांचून इतर सर्व गोष्टी अपायकारक व दुःखमूलक आहेत.

( १५ ) हा धर्माधर्माचा विचार फारच सूक्ष्म आहे (धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां ) धर्म या शब्दाचा अर्थच करूं गेल्यास तो चार प्रकारांनीं करितां येईल. ( १ ) धर्म ह्म. **वर्णाश्रमधर्म** ( Religion ) ( २ ) धर्म ह्म. **दान धर्म** ( Charity ) ( ३ ) धर्म ह्म. **कर्तव्यकर्म** ( Duty ), व ( ४ ) धर्म ह्म. **स्वभावधर्म** (Natural Proparty) जसा अग्नीचा धर्म

उष्णता. हे अर्थ उत्तरोत्तर अधिक महत्त्वाचे व व्यापक आहेत. पहिला अर्थ अगदीं संकुचित म्ह. विशिष्ट जातीकरितां व विशिष्ट लोकांकरितां—विशिष्ट लोकां पुरताच—उपयोगीं आहे. हा जातिविशिष्ट धर्मही युगधर्म, देशधर्म, जातिधर्म, कुलधर्म, कालधर्म यांप्रमाणें बदलणारा आहे. पण पुढील अर्थाचे धर्म बदलणारे नाहींत. तथापि पहिल्या तिन्ही अर्थांमध्यें अथवा धर्मांमध्यें धर्म व धर्मी भिन्न असतात चौथ्या अर्थामध्यें मात्र धर्म-धर्मी अभिन्न असतात. अग्नि व अग्नीचा धर्म उष्णता, साखर व गोडी, चंदन व द्रुती हीं एकमेकांपासून भिन्न करतां येत नाहींत. त्याचप्रमाणें, जिवाचे जन्मजाति—कुल—विशिष्ट धर्म जन्मजाति कुलांवर सोंपवून, त्याच्या ( जिवाच्या ) निजधर्माचा विचार केल्यास चैतन्य, हाच त्याचा ' एकमेवाद्वितीय धर्म ठरतो- ' चैतन्य ' हा जीवाचा ' स्व-धर्म ' अर्थात् ' स्व-रूप ' होय, ह्या स्वधर्माकडे म्हणजे वरील अर्थानुक्रमाच्या चौथ्या अर्थाकडे पोंचविण्याकरितां वरीचे तीन अर्थ हे ' साधनरूप ' आहेत. चौथा अर्थ म्हणजेच चतुर्थ पुरुषार्थ ( मोक्ष ) हा " साध्यरूप ' आहे. पण हा **स्वतःसिद्ध आहे. क्रिया—साध्य नव्हे.** ( साधनें हीं फक्त प्रतिबंध दूर करण्यापुरतींच उपयोगीं आहेत. )

( १६ ) जीवाचा निजधर्म जें चैतन्य, तें आनंदरूप सद्रूपही आहे. अर्थात्, जीव **सत्—चित् आनंद**रूप आहे. व्यष्ट्यंतर्गत सच्चिदानंद स्वरूप आत्मा हा समष्टिस्वरूप—अनंतकोटि ब्रह्मांडाला व्यापून असणाऱ्या चैतन्याचा परमात्म्याचा—घटाकाशवत् अभिन्न अंश आहे. थंडीनें किंवा कांहीं विशिष्ट क्रियेनें पाण्याचें जसें बर्फ बनतें, त्याप्रमाणें भक्ताच्या ' तीव्र संवेगानें ' तो परमात्मा घनीभूत—सगुणस्वरूप—बनतो. ह्याच त्या परमात्म्याच्या ' अवतार तनु होत. ( **उपसकानां कार्यार्थं ब्रम्हणो रूपकल्पना** अथवा ' मोक्षपदें तुच्छ केलीं या कारणें । आम्हां जन्म घेणें युगायुगीं ॥ देवा हातीं रूप धरवूं आकार । नेदूं निराकर होऊं त्यासी ॥ असें श्रीतुकाराम महाराज म्हणतात. हाच भक्ताचा 'तीव्रसंवेग' होय. ) देहांतील तत्त्वाचें शोधन करीत करीत, ' न इति, न इति ' ( नेति नेति ) म्हणत, आत्मस्वरूपापर्यंत वृत्ति नेऊन त्यांत समरसून जाणें हा ज्ञानियांचा मोक्षमार्ग आहे. आत्मस्वरूपाला वृत्तीनें कवटाळणें यालाच ' भक्ति ' असें ज्ञानी लोक म्हणतात. **'मोक्षसाधन-सामग्र्यां भक्तिरेव गरीयसी । स्वस्वरूपानुसंधानं भक्तिरित्यभिधीयते'** याप्रमाणें श्रीशंकराचार्य भक्तीची व्याख्या करितात. ' **चैतन्याकडे वृत्ति**

**फिरावेणें या नांवें भक्ति** ' असें श्रीशिवराम स्वामी म्हणतात. पण ही निर्गुण भक्ति होय. सगुण भक्तीची मौज याहून कांहीं और आहे असें श्रीतुकारामादि संत प्रतिपादन करितात. ते म्हणतात—

**" घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं । मुक्तां आत्मस्थिति सांडवीन "**

**' भक्तिप्रेमसुख नेणवे आणिकां । पंडित वाचकां ज्ञानीयासी ॥**

**आत्मनिष्ठ जरी झाले जीवन्मुक्त । तरी भक्तिसुख दुर्लभ त्यां ॥**

**तुका ह्मणे कृपा करिल नारायण । तरिच हें वर्म पडे ठावें ॥**

सर्वप्रसिद्ध नवविध भक्तींपेक्षां ही ' **प्रेमलक्षणा** ' नामक दशम भक्ति आहे. यालाच ' **पंचम पुरुषार्थ** ' असेंही म्हणतात. नारायणाच्या कृपेनेंच हा लाभ झाला पाहिजे. अद्वैतामध्यें क्रिया किंवा कल्पनाही सहज होत नाहीं इतकें तें नाजूक आहे, पण तशा अद्वैतांतही भक्ति आहे. परंतु, ती अनुभवावयाचीच आहे, बोलतां येणें जोगी नाहीं, असें श्री. ज्ञानेश्वर महाराज ह्मणतात.

**तैसी क्रिया कीर न साहे । परी अद्वैतीं भक्ति आहे । हें अनुभवाचि जोगें, नव्हे । बोला ऐसें ॥** " ( अ. १८–११९१ )

( १७ ) आत्मानंदांत समरसलेले—अद्वैतानंदानुभवसंपन्न—असे ज्ञानी जीवन्मुक्त पुरुष देखील श्रीहरीच्या सगुणरूपाची अहैतुकी भक्ति करितात; कारण, परमात्म्याचें तें सगुण रूप तशाच गुणाचें—तशाच योग्यतेचें—आहे. ' **आत्मारामाश्च मुनयो निर्ग्रन्था अप्युरुक्रमे। कुर्वन्त्यहैतुकीं भक्तिं इत्थंभूतगुणो हरिः** ' हा प्रसिद्ध भागवतोक्त श्लोक त्यास प्रमाण आहे. श्रीकृष्णचैतन्य ऊर्फ **गौ**रांगप्रभूंनीं **ह्या** श्लोकाचें एकसष्ट ( ६१ ) तऱ्हेनें व्याख्यान करून वासुदेव-सार्वभौम नामक अद्वैती पंडिताचा गर्व हरण केला होता, ही गोष्ट त्यांच्या चरित्रांत प्रसिद्ध आहे. ( हे एकसष्ट अर्थ श्रीगौरांगचरित्रांत बंगालींत व इंग्रजींतही छापून प्रसिद्ध झाले आहेत, ते कोणा विद्वानांनीं मराठींत प्रसिद्ध केल्यास महाराष्ट्र वाचकांवर उपकार होतील. अशी ह्या लेखकाची प्रेमाची सूचना आहे. ) असो. श्रीकृष्ण गोकुळांत असतांना गोपाळकाल्याचे वेळीं त्याचें उच्छिष्ट मिळावें म्हणून ' इंद्रादिक ' अपरोक्ष ज्ञानसंपन्न ' देव ' यमुनेमध्यें मासे होऊन राहिले होते; तसेंच राजसूय यज्ञाचे वेळीं भगवंताचा हात लागलेलीं उच्छिष्ट शितें खाण्याकरितां जीवन्मुक्त श्रीशुक व वामदेव ऋषि पक्ष्याचें रूप घेऊन आले होते ही गोष्ट प्रसिद्धच आहे. त्याच यज्ञामध्यें अग्रपूजेचा प्रश्न निघाला, तेव्हां भीष्माचार्यासारख्या आजन्म ब्रम्हचारी महाभागवतानें श्रीकृष्णाचेंच नांव

सुचविलें. इत्यादि गोष्टींचा विचार केला असतां भगवंताच्या सगुण अवताराचें काय माहात्म्य आहे, याची थोडीशी कल्पना करितां येईल. श्रीगुलाबराव महाराजांनीं ज्ञानोत्तर भक्तीची मीमांसा सांगतांना याच श्लोकास अधिक महत्त्व दिलें आहे. श्रीएकनाथ महाराज आपल्या भागवत एकादश स्कंधाच्या टीकेंत सगुण अवताराविषयीं व्याधस्तुतीमध्यें व्याधमुखानें म्हणतातः—

**तूं स्वलीलादेह कैसा धरिसी । अवतार-चरित्रें कैसीं करिसी।। कैसेनि देह सांडिसी । हें ब्रह्मादिकांसी कळेना ।। सुखें होईल ब्रह्मज्ञान । परी तुझें स्वलीला-देहधारण । याचें नेणती पर्यवसान । अति सज्ञान साकल्यें ।।** —( एकनाथी भागवत अ. ३० )

ब्रह्मज्ञान होणें कांहीं सोपें नाहीं, फार कठिण आहे, तथापि हरिकृपेनें तेंही सुखानें होईल, पण भगवंताच्या अवतारदेहाचें पर्यवसान-कार्यकारण मीमांसा--मोठमोठ्या ज्ञानी जीवन्मुक्त पुरुषांनाही होणें शक्य नाहीं. '**मुह्यन्ति ह्यस्मदादयः** म्ह. आमच्यासारखेही मोह पावतात असें प्रत्यक्ष ब्रह्मदेव जेथें म्हणतात, तेथें इतर सामान्य जीवांचा सामान्य—ज्ञान्यांचा काय पाड ? अशा त्या ' अनंतकल्याण-गुण-परिपूर्ण ' भगवंताच्या चरणीं अनन्यभावें शरण जाऊन त्यालाच खरा मार्ग दाखविण्याविषयीं प्रार्थिणें हें आपलें कर्तव्य आहे.

१८ **गीता वेदांची माउली** असें श्री. तुकाराम महाराज ह्मणतात. वेदांनीं फक्त त्रैवर्णिकांसच आपल्या घरीं आश्रय दिला आहे; परंतु, गीता माउली वेदांपेक्षां फारच उदार आहे. तिनें स्त्रीशूद्रादिकांना ' व ' पतितचांडालांनासुद्धां आपल्या पोटांत घेतलें आहे. नव्हे वेदांनींच आपली मागील ( कृपणतेची ) उणीव भरून काढण्याकरितां हवें त्यानें आपलें सेवन करावें म्हणून गीतेचें रूप धारण केलें आहे. असें श्री ज्ञानेश्वर महाराज ह्मणतात. तात्पर्य, आपल्या सर्व लेंकरांना-निरनिराळ्या प्रकारच्या अधिकारी जीवांना—भगवत्प्राप्तीचा ' मार्ग ' गीतेनें दाखवून दिला आहे, व तो '**सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज**' हाच होय. आणि हीच तिची शक्ति आहे. ह्या शक्तीचा आश्रय करील त्यालाच सर्व पापांपासून(स्वर्गनरकदायक पुण्यपापकर्मांपासून) मुक्त होण्याची किल्ली सांपडेल.

दयाघन परमात्मा लेखकवाचकांना त्या शक्तीचा आश्रय करण्याची शक्ति देवो व निर्दंभ—निर्मलभक्ति देऊन सर्वांना भुक्तिमुक्तिसंपन्न करो, अशी त्यांच्या चरणीं प्रार्थना करून विराम पावतों.

**ॐ तत्सत्.**

# पारमार्थिक पत्रें

( माझे मातुल व गुरु श्रीमत्परमहंस पुरुषोत्तमानंद सरस्वति उर्फ श्री विष्णुदास कवि महाराज यांना, मला जशजशा शंका येत, तसतशीं पत्रें पाठविलीं. त्या माझ्या पत्रांचीं उत्तरें ते त्यांचे पूर्वाश्रमींचे बंधु श्री गुरुदास महाराज ऊर्फ अनंतराव मामा यांना लिहिण्यास सांगत असत. नंतर श्रीमामा पत्र लिहून गुरु-महाराजांचे पुढें ठेवीत व ते पाहून मजकडे पाठवीत असत. हीं पत्रें परमार्थ जिज्ञासूंस अत्यंत मार्गदर्शक आहेत. त्यांचा लाभ मुमुक्षु वाचकांस घेतां यावा या हेतुनें तीं पत्रें मुमूक्षूंत प्रसिद्ध करीत आहें. याशिवाय, श्रीमामांचीं ध्यानेंही लवकरच मुमुक्षूंतून येतील तींही परमार्थांत उत्तेजनपर असून मार्गदर्शक होण्या-सारखीं आहेत. या अंकांत ९ पत्रें छापलीं आहेत. बाकीचीं क्रमाक्रमानें येतील. )

सद्‌गुरुदास

**नरहरशास्त्री खरशीकर**

---

## पत्र १ लें

॥ ॐ ॥

श्री गुरुदत्त प्रसन्न.

क्षेम अधिक श्रावण कृ. १ । १८३१ सोमवार श्रीक्षेत्र माहूर

### पद १ लें.

उत्थानिया अशान्त साचें समाधान भंगतें ॥ धृ. ॥

आहे परंतु मी असंग, मज नसोन कांहीं संग,

अचिंत्य चित्त चिंतनांत, जाहल्यास दंग तें ॥ समाधान.॥ १ ॥

वृत्ति कांहीं नुरावी । सर्व कल्पना मुरावी ।

अवंग हेंचि मन तुरंग । कुरंगांत रंगतें ॥ समाधान. ॥ २ ॥

भींतर सुखी आहेंच खास । परि नसावें सुखदुःखास ।

वाटल्यास सागरास । मज नसो-तरंग ते ॥ समाधान ॥ ३ ॥

मीतर नित्य सत्यसार । अनित्य नित्य संसार ॥
मजसि नळगे तरि असार । अभ्यंगीं व्यंग तें ॥ समाधान. ॥ ४ ॥

पुण्य तेंचि आवडे । पाप तेंचि नावडे ॥
हें कोरडेंचि बावडें । कशास व्हावे ढंग तें ॥ समाधान ॥ ५ ॥

अकर्ता मी अविकार । स्वर्ग नरक हा विकार।
व्यर्थ व्यर्थ अहंकार । कासया निसंगतें ॥ समाधान ॥ ६ ॥

सुख समाधिचें असावें । दुःख जागृतीं नसावें ।
मूळ स्वभावें परब्रह्म । श्रीगुरुदासाऽभंग तें ॥ समाधान ॥ ७ ॥

---

**पद २ रें** ( चाल—जाऊं कामाला )

प्रापंचाचें शीर च्छेदुनि परमार्थामधें शीर ॥ मनारे ॥ धृ० ॥ .

कोणेक विषयाची तरि कधिंही करूं नये खंति ॥ मना रे ॥
सहज स्थितीनें वर्तत जाई सदाचार-पंथी ॥ मनारे ॥
सहजाचारें तरि सद्गति तुज सहज मिळे अंतीं ॥ मनारे॥
लावुं नकोस उशीर । मनारे पर०॥

समान राही सर्वांभूतीं नकोच भेदाभेद ॥ मनारे ॥
द्वैतभाव दे सोडून मानूं नको कशाचा खेद ॥ मनारे ॥
ज्ञान-खड्गें सदा करित जा अज्ञानाचा च्छेद ॥ मनारे ॥
लावुं नकोस उशीर ॥ मनारे पर० ॥

जगामधें या जगभावानें सुखें वर्तत जावें ॥ मनारे ॥
संकल्प वासना आशा सोडुन निष्कामचि व्हावें ॥ मनारे ॥
अखंडाविनाशी अहं ब्रह्मास्मि सच्चिंतनीं रहावें ॥ मनारे ॥
लावुं नकोस उशीर ॥ मनारे पर० ॥

भवबंध तटाया सगत कर तू सत कल्पतरूची ॥ मनारे ॥
विसरूं नको कधीं कल्पांताहा सेवा सद्गुरुची ॥ मनारे ॥
घे गुरुदासा आत्मनिवासा सोहं-नामीं रुची ॥ मनारे ॥
लावु नकोस उशीर । मनारे पर० ॥

**पद ३ रें** ( चाल—सुटला पितृदिशेचा वारा )

सोडी नरा आधीं देहंकारा, अंगीं अभिमानाचा वारा ।
जरा लागु न देसी तरि सेविसील सारा ॥ धृ ॥
तुजहुनि हे धन स्त्रीसुत सारे, धर्म वर्णाश्रम निःसारे ।
चारे भिन्नत्वि त्या त्यागून काय संसारा ॥ सोडी ॥१॥
स्थूला मी म्हणसी तें सांडी । सूक्ष्म वासनेचें शिर खांडी ।
तोडी कारण महाकारण मुळ जगत पसारा ॥ सोडी० २ ॥
त्रिपुटींतिल द्वैताचा सोटा । अहं जाणीव स्फूर्तिचा मोटा ।
काटा निवतां सुख सदनिं । गुरुदासा थारा ॥ सोडी० ३ ॥

---

**पद ४ थें** ( चाल—प्रिये पहा० )

अरे नरा पावेल तोत्थान खरा समाधि नव्हे तरी ॥ धृ ॥
जाऊनि निरंजनांत, निबिड एकला वनांत
त्यजुनि कल्पना मनांत । स्वस्थ बैससी जरी ॥ अरे० १ ॥
अंग सारें गुरफटुन । नेत्र घेउनी मिटुन ।
दृढ सिद्धासनिं गटुन । स्वस्थ बैससी जरी ॥ अरे० २ ॥
करूनि सर्व द्वारें बंद । दाबुनि कुंडलिनी-कंद ।
प्राण कर्षुनि सबंध । स्वस्थ बैससी जरी ॥ अरे. ३ ॥
मौन समुद्रादि छंद । करूनि रहाटणी स्वच्छंद ।
किंचित मानुनी आनंद । स्वस्थ बैससी जरी ॥ अरे. ४ ॥
श्रीगुरुदास उपक्रम । नित्य नित्य बहु परिश्रम ।
साधुनिया यमनियम । स्वस्थ बैससी जरी ॥ अरे. ५ ॥

आजरोजीं गडबडीनें चार पदें लिहून पाठविलीं आहेत. आपण इकडे कधीं येणार तें कळवावें. कळावें हे आशीर्वाद.

---

## पत्र २ रें

श्री दत्तात्रेय सुप्रसन्न

क्षेम श्रीक्षेत्र माहूर श्रावण कृ. ११ शुक्रवार शके १८३१

अनेक आशीर्वाद विशेष आपलें पत्र पोंचलें. परमानंद झाला. अखंड समाधीविषयीं लिहिलें आहे. तर अखंड समाधानी होणें याला मायेचें मिथ्यात्व

कळणें जरूर अहे. मिथ्यात्व खरें समजल्यावर जरी माया भासली तरी कदाकाळीं ती सत्यत्व पावत नाहीं. आतां जशा जागृति, स्वप्न, सुषुप्ति या अवस्थावृत्ति नियमित आयुष्याच्या असतात तशीच, पळ, क्षण, घटका, दिवस-नियमित आयुष्य संपल्यावर उत्थान होणारी समाधि ही एक अवस्थावृत्तिच आहे. कारण, जागा आहे त्याच्या मागें झोंप, स्वप्न आहे. झोंपेच्या मागें स्वप्न जागृति आहे, मरणामागें जन्म आणि जन्मामागें मरण ठरलेलेंच आहे. तसाच नियमितकाल जो समाधि असतो त्याच्या मागें उत्थान असणारच. जशी दिवसामागें रात्र आणि रात्रीमागें दिवस त्याला अखंड दिवस किंवा अखंड रात्र म्हणतां येत नाहीं. तर सर्व वृत्तींत अद्वैतस्थिति म्हणजे अखंड शांति राहणें तोच अखंड समाधि. याविषयीं:—

## पद ( चाल—रुचती कां तीर्थयात्रा )

भंगेना समाधानी साध्य करी तो आधी ॥ साच समाधी ॥
साध्य करी तो आधी ॥ धृ. ॥
गुरु-शास्त्रानुभव पूर्ण, वेद संपूर्ण, होई परिपूर्ण, असा निरुपाधी ॥ साध्य १॥
वायूस टोंचितां गळा, टोंचेना गळा, राहे वेगळा, असा निरुपाधी ॥ साध्य २॥
कनकाचा मेरु कसा, तळीं वर जसा, अंतरीं तसा, असा निरुपाधी ॥ साध्य ३॥
त्रै अवस्थेंत एकला, नाहीं निजला, प्राण जागला, असा निरुपाधी ॥ साध्य ४॥
वडवाग्नि स्वस्थ निजला, निश्चित भीजला, नाहिं वीजला, असा निरुपाधी ॥साध्य ५॥
गुरुदासा आत्माराम, जसा निष्काम, भोगि आराम, असा निरुपाधी ॥ साध्य ६॥

## पद २ रें ( चाल—मला मुंबईला. )

गुरु सशास्त्रानुभव घेऊनि आधीं । सुखि होईल जो साधील तो समाधी ॥
चाल—गृहधनजाया, पुत्रमित्र काया, समजुनि वाया, सदोदित निरुपाधी ॥
सुखि होईल जो साधील तो० ॥ धृ. ॥
स्वप्न जागृती सुषुप्ती पाहे स्वरूप, सुखदुःखामध्यें स्वस्थ सदा सुखरूप ॥
चाल- तो सारें करी, ना करी तरी, परि निरंतरी, सदोदित निरुपाधी ॥
सुखि होईल जो० ॥ १ ॥
पुण्य पापामध्यें समान ज्या संतृप्ती, शांति अखंड खंडेना तृप्ता तृप्ती ॥
चाल- तो सारें करी. ॥ सुखि होईल जो. ॥ २ ॥

प्राप्ताऽप्राप्त भोगामध्यें भोगी आनंद, देह जावो राहो कमी स्वानंद ॥
चाल- तो सारे करी ॥ सुखि होईल जो. ॥ ३ ॥
खऱ्या खोट्या अवस्थेचा करोनी संग, संगामधें गुरुदास खरा निःसंग ॥
चाल - तो सारे करी. ॥ सुखि होईल जो. ॥ ४ ॥

## ३ श्लोक

सद्गुरु कृपांजन हें कसें ? । मायाब्रह्में मी एकची असें
खंडेना कधीं कीं अनित्यसा । मी अखंड आहो जसा तसा ॥ धृ. ॥ १ ॥
काय मी करूं कायना करूं । साभिमान हा कासया धरूं ॥ खंडेना ॥ २ ॥
दृश्य तें मी द्रष्टा म्हणूं कसें । साक्ष साक्षीचें सर्वही पिसें ॥ खंडेना ॥ ३ ॥
ज्ञेय ज्ञातृ ज्ञान त्रिपुटी आधीं । ध्येय ध्यातृ ध्यान जन्मली कधीं ॥ खंडेना ॥४॥
साध्य साधक आणि साधन । प्रवृत्ति ही निवृत्ति भाव न ॥ खंडेना ॥ ५ ॥
मी स्मृती आहे नाहीं विस्मृति । सर्व व्यापकी काय ही रिती ॥ खंडेना ६ ॥
समाधि ही मी उत्थानीही मी । स्वप्न जागृति सुषुप्तींत मी ॥ खंडेना ॥ ७ ॥
सह विकल्प मी निर्विकल्प मी । सह विकारी मी निर्विकारी मी ॥ खंडेना ॥८॥
चंचळांत मी निश्चळांत मी । मंगळांत आ मंगळांत मी ॥ खंडेना ॥ ९ ॥
नामरूप हा भास तोच तो । माझ्या वरी मीच तोच ॥ खंडेना ॥ १० ॥

## पद ४ थें ( चाल—असा धारि छंद )

बसेल धोका । एकी एक ब्रह्मचि धोका ॥ धृ ॥
खल्विदं ब्रह्म श्रुतिचे बोल । अखंड साचे तरि बिन मोल ।
मिथ्यत्वेंचि होतिल फोल । खरें अवलोका ॥ एकीएक ब्रह्मचि धोका ॥ १ ॥
माया जरि ती साची असती । नष्ट कदापि झाली नसती ॥
वांझ मुलाची कोठें वसती । खरें ॥ २ ॥
तेल वाळूचें काढणें । अंध दृष्टीचें पाहणें ।
मृगजळ सागरिचें पोहणें । खरें ॥ ३ ॥
जें जन्माला आलें नाहीं । त्याची पालक कोण आई ।
श्रीगुरुदास दोन काई । खरें ॥ ४ ॥

असो. श्रीसद्गुरुरवीच्या कृपेनें मायेचा मिथ्या अंधारभ्रम समूळ नाहींसा होईपर्यंत सेवेचा अभ्यास चालत असावा; हेंच सत् शिष्याचें खरें कर्तव्य आहे. अखंड काळ अनन्य शरणागतीच असावी. वारंवार असेंच पत्राद्वारें संतोषवीत असावें, कळावें हे आशीर्वाद.

## पत्र ३ रें

क्षेम श्रीक्षेत्र मातापूर आश्विन शुद्ध २ शनिवार १८३१

श्रीगुरु दत्तात्रय प्रसन्न

सबाह्य सर्वांतरवासी अखंडाविनाशी श्रीसच्चिदानंदाद्वैत सद्गुरुचरणीं अखंडसा. नमस्कार.

अनेक आशीर्वाद विशेष. आपलें भाद्रपद शु. १४ चें पत्र पावलें परमानंद झाला. सशिष्य स्वामी खुशाल आहेत.

" मुख्य आपलें म्हणणें काय आहे कीं, स्वरूपाची स्थिति त्रैअवस्थेंत पाहिजे" ह्या वाक्याचा उच्चारच मुळीं स्वस्वरूपावांचून झाला नाहीं. म्हणजे असा उच्चार होण्याच्या अगोदरच तिन्ही अवस्थेंत स्वस्वरूप स्वयंभु सिद्ध आहेच. स्वस्वरूपावांचून अवस्थेचें अस्तित्व कशावर उद्भवणार? पाण्यावांचून लहरी कशावर उठणार ? स्वरूप आह्मणून अवस्थेला जागा आहे, पाणी आहे ह्मणून लाटा आहेत. म्हणजे अवस्थेच्याच रूपानें " ब्रह्म " स्वस्वरूप आहे; आणि लाटेच्याच रूपानें पाणी आहेहे असें असून लाटेनें माझ्यामध्यें पाणी असावें या ह्मणण्याप्रमाणेंच तिन्ही अवस्थेंत " ब्रम्ह स्वस्वरूप असावें " हें ह्मणणें दिसतें. जसं सोन्याच्या दागिन्यानं मीं सोनं असावं; रत्नाच्या दागिन्यानं मीं रत्न असावं; देवानं मीं देव असावं; भक्तानं मीं भक्त असावं; सूर्यानं मीं सूर्य असावं; चंद्रानं मीं चंद्र असावं; मायेनं मीं माया असावं; ब्रह्मानं मी ब्रह्म असावं हे म्हणणं माझं मीं असावं या म्हणण्याप्रमाणें दिसतें. जमिनीच्या आश्रयावांचून झाड नाहीं असा सिद्धांत आहे. तर नुसती झाडाकडे दृष्टि देऊन जमिनीचें अस्तित्व नाहीं ह्मणणं संभवत नाहीं. झाड आहे असें जर कबूल आहे तर जमीन आहे हें कबूल केलेंच पाहिजे तसें अवस्था जर कबूल करायच्या तर अवस्थेला मूलाधार असलेलें स्वस्वरूप कोणीकडे जाईल. असं पहा! आपण जोंपर्यंत हा माझा देह आहे असें आपण स्वत: म्हणतों आहोंत, तोंपर्यंत मी आपण असल्याबद्दल शंका नाहीं; आणि शंका आहे म्हणाल तर नाझी मलाच आहे. तेव्हां मी नाहीं असा ठराव कोणत्या न्यायाधीशाच्या कोर्टांत सिद्ध होईल बरें ? कारण, मीच नसतों तर माझा देह आहे असें कोण म्हणतो. म्हणून देह आहे तर मी आहें हें निर्विवाद सिद्ध आहे. स्वस्वरूप आहे म्हणून माया त्रैअवस्थोपाधी आहेत. स्वस्वरूपावांचून त्रयोपाधींचें

अस्तित्व कोण प्रतिपादन करतो ? तर उपाधीचा आधार व उपाधीला स्वतंत्रपणें जाणत स्वस्वरूपच आहे ? फिरून पहा--ब्रह्म स्वस्वरूपच नसतें तर मायोपाधीचें अस्तित्व कुणावर कोणाच्या आधारानं आहे? म्हणून मायोपाधी त्रयावस्थेचें जर अस्तित्व आहे. तर स्वस्वरूपाच्या अस्तित्वाची शंका नाहीं, कारण, स्वस्वरूप प्रकाशानं त्रैअवस्था प्रकाशमान आहेत. तीनही अवस्थेला सबाह्य आत्मस्वरूप असल्यावांचून अवस्थेला जाणण्याचें ज्ञान अवस्थेचें नसून स्वस्वरूपाचेंच आहे. म्हणून आत्मस्वरूपाचें नसणं केव्हांही संभवत नाहीं; याविषयीं शंका नाहीं; आणि जरी वाटतें तरी तीही शंका आत्मस्वरूपानंच परिपूर्ण सबाह्य लिडबिडलेली आहे, शंकेला जाणतें तेंच आपलें स्वस्वरूप, म्हणून कोणत्याच अवस्थाकाळीं स्वस्वरूप नसल्याची भ्रांति नाहीं. स्वस्वरूपाचें खरें ज्ञान झालें म्हणजे मायोपाधी--अवस्था--प्रत्यक्ष नाहींशा होण्याचें कारण नाहीं. मायोपाधी त्रयावस्था मिथ्या खास ठरल्या म्हणजे झालं. मीच स्वस्वरूप "ब्रह्म" समजल्यावर देह नाहींसा होण्याचं कारण नाहीं. नरहरी म्हणतात तो मीच आहें. असा माझा दृढनिश्चय असला म्हणजे पुरे झाला. लाख मंडळींत जरी मी उभा असलों तरी लाखांपैकीं मी नरहरी कोणता आहे, याची शंका मला केव्हांही होणार नाहीं, मग मी नेहमींचा पंचा नेसलेला असो, धाबळी नेसलेला असो, जरतारी पोशाख केलेला असो, घोंगडी पांघरलेला असो, लंगोटी घातलेला असो; नागवा असो; आपल्या देशांत, आपल्या घरांत किंवा परक्या देशांत परक्याच्या घरांत असो किंवा खरशीहून माहूरास आलों अथवा माहूराहून खरशीस गेलों तरी मी नरहरी आहे किंवा नाहीं, अशी शंका कालत्रयीं नाहीं. तशी स्वस्वरूप त्रैअवस्थेंत आहे कीं नाहीं, अशी शंका उत्पन्न होण्याचा संभव नाहीं. असो. गुरुकृपेनें या अल्पमतीला समजलें तसें सांगितलें आहे. यावर तूंही विचार कर. अभ्यास मात्र सोडूं नये; आणि स्वस्वरूपाची धारणा अक्षयी असावी हा आशीर्वाद. निरंतर संशयनिवृत्ति करून घेत असावी, म्हणजे अंतर शुद्ध होतें. ॐ तत्सत्

**पद** ( चाल धृपदाची )

गुणसंग न घडे तेंवि जिवातें । मग कोठून तरि शिवेल शिवातें ॥ धृ. ॥
तृण कण जाळिन कधिं चित्रानळ । नुडेचि भूगोल जड प्रचंड वातें ॥ १॥
कसें प्रतिबिंबा गिळवेल बिंबा । जाईनं गिळिला अग्नि धुवातें ॥ २ ॥

न बुडे न बुडे मृगजळीं डोंगर । ग्रासि, न छाया हिमा न वातें ॥ ३ ॥
नुगवाति रोमांकुर रसनेवर । गुरुदासा, चेत नये शब्दातें ॥ ४ ॥

पद ( चाल- प्रीति धरि हरिपायीं )

एक ध्यान गुरूचें पाहीं । शरणागत होउनि पायीं पायीं । मनारे। एक० ध्रु ॥
देव देवि श्रीकुलगुरू स्वामी । निजजनक तशी निज आई आई॥ मनारे ॥१॥
साधुसंत मुनी देव भक्तसम । कीटक नर पशु गायी गायी ॥ मनारे २ ॥
सुरतरुवर आणि केळी नारळी । पारिजातक मोगरी जाई जाई ॥ मनारे ३ ॥
अनंतकोटी ब्रह्मांड पिंड सम । पर्वत मेरु राई राई ॥ मनारे ४ ॥
गुरुदासानिज-सौख्य विलासा । जिवन्मुक्तचि बसल्या ठाईं ठाईं ॥ मनारे ५ ॥

परगांवला आइ नको धाडूं हेंच पद का या चालीवर दुसरें पद आहे तें कळवावें, अथवा जयंतिला आल्यावर समजावून देईन. कळावें हे आशीर्वाद.

ॐ तत्सत्.

## पद ४ थें

क्षेम श्रीक्षेत्र माहूर फाल्गुन शु. २ रविवार १८३१

श्रीगुरु दत्त समर्थ

अनेक आशीर्वाद विशेष.

आपलें माघ शु. १५ चें पत्र पाहून आनंद झाला. सारांश " निश्चयाचें बळ तुका म्हणे तेंचि फळ " हेंच खरें आहे. जसेंजसें मनाचें दृढीकरण होत जाईल तसें तसें आत्मरूप आपलें आपणाला भेटत जाईल, व मातुश्रीसही असाच अभ्यास लक्षपूर्वक व दृढ विश्वासानें करीत जा ह्मणून सांगावें. जोंपर्यंत मन अगदीं निर्मळ झालं नाहीं, तोंपर्यंत देवता दूरदूर असतात. हितगुज बोलायचें तें आपण भलत्याजवळ बोलत नसतों. दोघांच्या मनाचें द्वैत जाऊन ऐक्यता झाली ह्मणजे निःशंकपणें आपण बोलूं लागतों. व्यवहारांत सुद्धां तशीच रीत आहे. अबोला असण्याचें कारण नाहींसें झालें म्हणजे सलोखा होतो. जसजसें मन ताब्यांत तसतसें एकाग्रतेस आपलेंसें करील, जसजशी एकाग्रता होईल तसतसा द्वैतभाव मावळत जाईल, जसजसा द्वैतभाव मावळेल तसतशी अद्वैतता जवळ येईल, जसजशी अद्वैतता जवळ येत जाईल, तसतसे पापमल दूर जातील. जसजसे मापमळ दूर जातील तसतशा देवता दृष्टिगोचर होत जातील.

त्यांच्यावर जों जों विश्वास बसेल तों तों ( त्या ) जवळ येत जातील. जों जों त्यांच्या ठिकाणीं प्रेम उत्पन्न होईल तों तों त्या आपल्याशा होत जातील; आणि मनाचा मनपणा त्यांचेकडेच ओढ घेत जाईल, तों तों देहमात्राच्या दोऱ्या सैल-सैल होत जातील, अहंभावांतून मोकळे झालों ह्मणजे बाकी सोहंभावत्व राहिला कीं, पक्की अद्वैतता मनाला ठसली ह्मणजे संभाषणयोग घडण्यास आरंभ होईल. पण तेवढ्यावरच कृतकृत्यता समजूं नये. पुढें अभ्यास दृढ चालवावा. असो. एकंदरींत त्रिवर्गांनीं सन्मार्ग धरला तो पाहून धन्यता वाटते. ज्या वेळेला मातुः-श्रीस गत गोष्टी मिथ्या वाटूं लागतील तो सुदिन विशेष धन्यतेला कारण होईल. असो. सौ०वती ज्या पायरीवर आहे त्या पायरीवरच आहे ह्मणून वरच्या पायरी-वर चढेल यांत शंका नाहीं.

आतां जोंपर्यंत देहसंबंध आहे असें वाटतें, तोंपर्यंत देहधर्म असणारच. परंतु, देह मिथ्या तसे त्याचे धर्महि मिथ्या. जोंपर्यंत देहसंबंध आहेसा वाटतो तोंपर्यंत “ वियोग अग्नि हा जाळितसे दिनराती ” असें वाटणें देहधर्मानुसार साह-जिकच आहे. वस्तुतः तें मिथ्याच आहे. पण असं तरी ज्याला वाटतं तो हा वाटण्यापासून न वाटण्यापासून वेगळा आहे. तो या दोहोंचा जाणता आत्मरूपी आत्मा तोच आपण या नांवानं आहे.

**पद** ( चाल—आतां मी नाहीं )

व्हावी सुखप्राप्ति सुखप्राप्ति । तरी धरी अखंड शांती ॥ धृ०॥
तनु उत्तम वर्णाची । अथवा असल्या नीच वर्णाची ।
जरि अधम जाति । अधम जाति ॥ तरि० ॥१॥
दिसून येत बालक तरणा । देहव्यवस्थेमधें प्रतरणा ॥
आली जरा अंतीं । जरा अंतीं ॥ तरि० ॥२॥
राजपदावर चढलासी । तेथुनहि निसरून पडलासी ॥
येउनि जरि खालतीं । जरि खालती ॥ तरि० ॥३॥
जगामधें या मिळता मान । अथवा सर्वस्वी अपमान ।
होतां दुःख अती । दुःख अती ॥ तरि० ॥४॥
उत्तम तुजला उत्तम म्हणतील । अधम अधमामधेंच गणतील ॥
गणोत अल्पमती । अल्पमती ॥ तरि० ॥५॥

दैवें धन सुत उत्तम वाईल । मिळेल अथवा सर्वहि जाईल ॥
निघून संपत्ती । संपत्ती ॥ तरि० ॥६॥
श्रीगुरूदासा आत्मरसाची । गोडी मग विषयामरसाची ॥
झाली हो माती । हों माती ॥ तरि० ॥७॥

जिथं शांति आहे तिथंच शरणागति आहे. शरणागति आहे तिथंच आत्मप्राप्ति कृतकृत्यता नरजन्माची आहे. म्हणून फक्त

## पद

कृतकृत्यश्च भारतं । श्रीगुरू ब्रह्मवंदिनं ॥ धृ० ॥
स्वयंभु स्वप्रकाशकं । अखिल विश्वव्यापकं ॥
महत्ब्रह्म नाशकं । अखंडितं सखंडितं ॥ श्रीगुरू० ॥१॥
अखिल विश्वजीवितं । सदानंद सेवितं ॥
कृपाघनं कृपामृतं । निरंतरं सुवर्षितम् ॥ श्रीगुरू० ॥२॥
निराकृतिं निरंजनं । ज्ञान—निधन--अंजनं ।
जन्ममृत्यु—भंजन । योगि—चित्त—रंजितं ॥ श्रीगुरू० ॥३॥
निर्मलं निरामयं । अखिल सुकृतालयं ॥
श्रीगुरूदास रक्षणं । भवभयं निवारितं ॥ श्रीगुरू० ॥४॥

( या खालील मजकूर श्रीसद्गुरू विष्णुकवि यांचे हातचा आहे. )

हेचपत्रीं सर्वत्रांस आशीर्वाद नारायण विशेष. वरील मजकूर ध्यानीं आणून सदानंदीं निमग्न असावें. वरचेवर पत्रोत्तरीं कुशल क्षेम कळवीत जाणें. उत्तरोत्तर प्रेम वाढवीत जाणें म्हणजे श्रीगुरू सहज कृपाप्रसाद करतील कळावें.

---

## पत्र ४ थें

क्षेम मातापूर वैशाख शु. १५।१८३१ मंगळवार
श्री गुरुदत्त प्रसन्न.

अनेक आशीर्वाद वि० आपलें चैत्र कृ॥ ११ चें पत्र पोंचलें. धोमची हकीगत समजली. वाईची हवा बिघडली कीं मुन्यांत जाण्याचा त्यांचा सांप्रदाय असतो तो कसा चुकला. अथवा ईश्वरी संकेताप्रमाणं चुकणं साहजिक आहे. नामधारी मानवा हातीं कांहीं नाहीं. कर्तुं अकर्तुं अन्यथा कर्तुं सर्व सूत्र परमेश्वरा हातीं आहे. त्याच्या संकेताप्रमाणं जें जें होणार ज्या ज्या वेळीं तें तें न

चुके कदाकाळीं. म्हणून होणार तेंच झालं तर त्याचें आश्चर्य काय? पळ, घटका, प्रहर, दिवस, रात्र, पक्ष, मास, ऋतु, वर्ष, युग, कल्प हीं येतात आणि जातात, म्हणून आल्याचं व गेल्याचंही आश्चर्य नाहीं. आश्चर्य कशाचें? पृथ्वी उत्पन्न झाली आणि ती अखंडकाळ शाश्वत राहिली तर त्याचं आश्चर्य. परंतु, अगोदर ब्रह्मांड हें मायावी--क्षणभंगूर. मग यांत असलेले ईशापासून अणुरेणूपर्यंत सर्व पदार्थहि तसेंच; ते कसें शाश्वत असणार? हें एक परमेश्वरी कर्तृत्व जगाला सावध करण्याविषयीं आहे, कीं पहा, हें सर्व नाशिवंत आहे. हें पाहून तरी लोक सावध होऊन जन्ममरण-परंपरेपासून सुटून आपल्या मूळ चिदात्मस्वरूपास मिळतील. परंतु, आम्ही किती मूर्ख विलक्षण? जें जें पाहतों तें तेंच खरें मानून त्यांतच फिरफिरून गटकळ्या मोठ्या दुःखाच्या सुखानं सहातों. पालथ्या घागरीवर पाणी ओतल्याप्रमाणं किंवा खडकावर पाऊस पडल्याप्रमाणं अथवा अग्नींत बीं पेरल्याप्रमाणं, जसा तोंडीं धरलेला गळ मासा सोडीत नाहीं, त्याला कुणाचा काय उपाय? वणव्यांत जाऊन पतंग पडला त्याला कोण वांचविणार? हीं ढळढळीत उदाहरणं डोळ्यासमोर परमेश्वर दाखवितो पण आम्ही ज्ञानांधळे तीं पाहतो कुठं. वस्तुतः जर थोडासा विचार निश्चळ मनानें करूं तर तत्काळ उजडेल, अशी व्यवस्था ज्याच्या त्याच्या जवळच परमात्म्यानं करून ठेविली आहे, ती कोणती तर ज्ञानकला जाणीव. पिंडास बाह्यांतरिच्या सर्व बऱ्या वाईट वृत्ती ह्या ज्याच्या योगानं समजल्या जातात तो स्वयंप्रकाश चिदात्मा लांब नाहीं. पण दूध सोडून जसे गोचीड रक्तप्राशन करतात तसें आम्हीं ज्या आधारानं वागतों, ज्याच्या आश्रयानं आहों त्या हृदयस्थाला ब्रह्मांडाच्या बाहेर झुगारून देऊन दूरचा म्हणजे पिंडाबाहेरची खटपट करून ईश्वर प्राप्तिविषयीं झटतों, तो तर जवळच आहे. तो तर जवळच आहे, असंही म्हणतों त्याच्याच आधारानं. तरी समज पडत नाहीं. तेव्हां किती आम्ही दुर्दैवी? का हातचं निधान सोडून पळत्याच्या मागं लागतो. मग जसा पाण्याच्या कांठीं उभा असलेला कुत्रा पाण्यांत भाकरी घेऊन उभा असलेल्या कुत्र्यास पाहून त्याची भाकर घेण्याला तोंड उघडून धांवतो. तो जवळची गेली आणि दूरचीही गेली मग बाकी राहिले हात ओठाचे चुरमुरे तेच फांकून तळमळत बसावं लागतं. "यद्दष्टं तन्नष्टं" याचा विचार करतो कोण? कोणत्याही दृश्य पदार्थाचें सत्यत्व श्रुतीही कबूल करीत नाहीं, यावरून सुविचारानं चिद्रूप स्वरूपाला ओळखावं.

जोंपर्यंत त्याला ओळखलं नाहीं तोंपर्यंत माया द्वैतसृष्टि खरी भासून संसृति-परंपरा भोक्तृत्व भोगणं भाग आहे. परंतु, बुद्धिवान शिष्य मात्र गुरूपदेशाच्या सूत्रसूत्रानं चिद्रूप स्वरूपाला ओळखील तोच ज्ञानी, तोच समाधानी, तोच सहज समाधि, तोच मोक्ष. सारांश, तीन्हीं अवस्थेमध्यें आपण चिद्रूप आहोंत हें दृढ होण्याची खटपट ही मानवी धर्माला योग्य आहे. भक्तिमार्ग कां होईना, पण तोही असाच आहे. देवाकडे तरी तनमनधन अर्पणच झालें पाहिजे. नामस्मरण कां होईना तेंही असंच आहे, देव साकार पण भक्तीचें फळ निराकार स्वयं चिद्रूपात्माच. रामकृष्णादिक कोणता कां देव असेना चिद्रूपानंच प्रकाशित आहे. देव सद्रूप पण त्याकडे लक्ष लागणं हें चिद्रूप. कोणत्याही रस्त्यानं पण आपलं चिद्रूप जाणलं पाहिजे. देवाला भजायचं तर अगोदर त्याला पूर्ण ओळखलं पाहिजे. ओळखणं तोच भक्तिचा शेवट. आणीक जसं देवाला ओळखलं पाहिजे तसं भक्तानंही आपणाला ओळखिलें पाहिजे. हें जें ओळखणें तेंच आपलं चिदात्मरूप प्राप्त करून घेणं. तर आधीं आपण कोण आहोंत याचा पत्ता गुरुकृपेनें लावण्याचा मार्ग आहे म्हणजे गुरूपासना ही अखेरच कां ? तर गुरूच परब्रम्ह म्हणून तो गुरु परब्रम्ह चिदात्मा सर्वत्र एकच आहे. मग आपल्या हृदयांत नसतं कां ? त्याच्याच साक्षीनं आपण आहोंत, किंवा अपरोक्षानुभवांतीं तेंच आहोंत याविषयीं स्मरणार्थ पद आहे.

**पद** ( चाल ठुमरीची )

शोध करी मना अंतरि आपुल्या । कोण मी आधीं खरोखर याचा ॥ धृ. ॥
माझें माझें वाहसी ओझें । पण संबंधही नसे तुज त्याचा ॥शोध. १ ॥
अविनाशी तूं करिसी कशाला । निशिदिनीं ध्यासा ऽ नित्याचा ॥ शोध. २॥
तुझें सुख तुजला मिळेल कैसें । केल्यावांचून संग नित्याचा ॥ शोध. ३ ॥
पळ घटकेचा नाहीं भरंवसा । माया मृगजळ असत्याचा ॥ शोध. ४ ॥
श्रीगुरुदासा गुरु ब्रह्मात्मा । प्राणविसावा सदा सत्याचा ॥ शोध. ५ ॥

अशी अखंड गुरुची कधीं उपासना गुरूच करवितील तीं करवोत. परंतु, तूर्त तर तुझ्या पत्रामुळं दोन घटका सद्गुरू चिंतनांत खर्च पडल्या. हाच अलभ्य लाभ. हाच प्राप्त करून घेण्याविषयीं तत्परता असणं हा त्याचा रस्ता आहे. असें ज्ञाते सांगतात, तेंच खरें आहे. असो. एकाग्रता संपल्यावर मस्तक चढलेलें असतें याविषयीं आणखी कांहीं लिहिणार होतों पण लिहिण्यास सवड नाहीं. कळावें. पुंडरीक-वरदे हरि विठ्ठल. बोल भवानीकी जय. ॐ तत्सत्.

# —❀ सत्संग ❀—

[ लेखक—रा. ब. खाडीलकर बी. ए. एल. एल. बी, वकील, नासिक ]

१ जगांत ज्या कांहीं दुर्मिळ वस्तु आहेत त्यांपैकीं सत्संग ही अत्यंत दुर्मिळ वस्तु आहे. प्राण्यास अनेक योनि फिरतां फिरतां महत्पुण्याईनें नरतनु प्राप्त होते. ती प्राप्त झाली तरी त्यांत त्याच्या अंतःकरणांत मुमुक्षुत्व उत्पन्न होणें कठीण. कारण, दुर्जय अशी जी विषयलालसा तिनें प्रत्येकास जन्मापासून तों मृत्यूपावेतों संपूर्ण घेरिलें आहे. निरनिराळ्या वासनांनीं अनादिकालापासून जीवांस बद्ध व अंध केलें आहे, त्यामुळें त्यांस उत्तरोत्तर आपलें पाऊल खड्यांतच पडून रोंवलें जात आहे हें अज्ञानामुळें कळत नाहीं. तो सुखप्राप्तिकरितां धडपड रात्रंदिवस करितो; पण योग्य दिशा माहीत नसल्यामुळें दुखःरूप व नश्वर वस्तूंतच सुख आहे असें मानून फसतो. लहानपणीं चित्त नानाप्रकारचे खेळ खेळण्यांत गुंतलेलें असतें म्हणून ते दिवस केव्हांच निघून जातात; तारुण्य हें विषय—संपादनांत व तत्सेवनांत सर्व खर्च होतें; वृद्धपणीं शरीर दिवसेंदिवस निःशक्त होत असल्याकारणानें सर्व लक्ष शरीराकडे व तदनुषंगिक व्याधींकडे जातें; शेवटीं मृत्युसमय आला तरी प्राणि विषयानुसंधान सोडीत नाहीं. सारांश, मोहाचा प्रभाव असा आहे कीं, तो मुमुक्षत्व उत्पन्नच होऊं देत नाहीं. यदाकदाचित् झालें तर तें टिकूं देत नाहीं. म्हणून खरें मुमुक्षत्व मानवाचे अंतःकरणांत उत्पन्न होणें हें सुदैवाचें लक्षण आहे. बरें, मुमुक्षुत्व आहे पण तें फलद्रूप कोणत्या रीतीनें होईल हें सांगणारा मार्गदर्शी जर कोणी मिळाला नाहीं तरी सर्व व्यर्थ. सत्पुरुषांची भेट होणें हें फार दुर्लभ आहे. त्यांची नुसती एकदां भेट होऊन उत्तम जो अधिकारी आहे. त्याचें कदाचित् कार्य होईल, पण जो मध्यम अधिकारी आहे त्याला सत्पुरुषांचा नेहमीं समागम पाहिजे, नाहींतर त्याचें कार्य होणार नाहीं. उत्तम अधिकाऱ्यांची बात आपण बाजूला ठेऊन सध्या मध्यम अधिकाऱ्यासंबंधानेंच विचार करूं.

२ सामान्यत्वेंकरून जनता मध्यम वर्गांत गणली जाते व सर्व विद्वज्जनांचा उपदेश बहुशः या मध्यम अधिकाऱ्यांसच असतो. उत्तम अधिकारी हा कापुरासारखा असतो. त्यास " ज्ञानादेव तु कैवल्यम् " हा सिद्धांत लागू पडतो. त्याचे बाबतींत परमात्मानुभूति होण्यास वेळ लागत नाहीं; कारण, तो पूर्वीच साधनचतुष्टयानें युक्त असतो. "सावध साक्षेपी आणि दक्ष। तयास तत्काळचि मोक्ष। इतरांस तें अलक्ष। लक्षिलें नवचे ॥ " प्रज्ञावंत असून जर अनन्य असेल तर त्यास ध्येय प्राप्त करून घेण्यास वेळच लागणार नाहीं. काडी लावण्याचाच अवकाश कीं, कापूर अग्निरूप झालाच. कापूर ज्याप्रमाणें अग्निरूप झाल्यानंतर स्वत: उरत नाहीं त्याप्रमाणें उत्तम अधिकारी उपदेश होतांच मीपणानें उरत नाहीं. पण मध्यम अधिकाऱ्याची ह्मणजे सामान्य जनतेची तशी स्थिति नसते. त्याला ध्येयमय होण्यास बहुतकाल सत्संग व अभ्यास पाहिजे असतो. मात्र अभ्यास कोणत्या दृष्टीनें व कसा करावा हें एकाद्या तज्ज्ञापासून समजून घेणें इष्ट आहे. त्यावांचून प्रगति होणार नाहीं.

अधिकारी उत्तम असो अगर मध्यम असो त्यास आपल्या ध्येयाकडे नेणाऱ्या मार्गदर्शकाची जरूरी भासतेच. ध्येय कसें गांठावें, तें गांठण्याकरितां कायकाय करावें लागतें, आपल्याजवळ कायकाय सामग्री असणें इष्ट आहे, कोणते प्रतिबंध आड येत असतात व ते टाळण्याकरितां काय इलाज करावे लागतात वगैरे सर्व सांगणाऱ्या अनुभवी व तत्प्रवीण माणसाची जरूर लागते. आपल्याच बुद्धीच्या जोरावर कोणास आपल्या ध्येयासंबंधीं विचारपूस न करतां अहंपणानें जर एकाद्यानें कार्यास आरंभ केला तर त्यास अत्यंत अडचणी भोगाव्या लागतील व त्यांतून पार पडणें फार कठीण जाईल. ध्येय प्राप्त करून घ्यावयाचेंच असा आपला प्रथम निश्चय झाला पाहिजे. उत्तम विचार नुसता मनांत आहे पण कृति मात्र त्याच्या अगदीं उलट होत असेल तर तें व्यर्थ आहे. कृतीशिवाय नुसते चांगले हेतु मनांत बाळगणें वृथा होय. आपले विचार हे आचारांत कसे आणावे, त्यांस योग्य दिशा कशी द्यावी, आपलें खरें कल्याण कशांत आहे वगैरे सर्व गोष्टी एका सत्संगावांचून कळणें शक्य नाहीं. महापुरुषांचा, विद्वान व ब्रह्मनिष्ठांचा समागम घडणें हें महद्भाग्याचें लक्षण आहे.

**दुर्लभं त्रयमेवैतद्देवानुग्रहहेतुकम्। मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुषसंश्रयः**

—विवेकचूडामणि. म्हणून सत्संग हा सर्वांत दुर्मिळ आहे.

३ जगांत इतरही दुर्मिळ वस्तु आहेत; पण त्या प्राप्त झाल्या असतां आत्यंतिक दुःखनिवृत्ति होत नाहीं. जें सुख कोणत्याही साधनानें प्राप्त होत नाहीं, जें सुख मिळण्याकरितां अनेकजण अनेकप्रकारें खटपट करितात, गिरिकंदरीं हिंडून हाडाचीं काडें करतात, फार काय सांगावें शेवटीं प्राणही वेंचण्यास तयार होतात, तें सुख हे संत प्राप्त करून देतात; त्या सुखसागरांत मनसोक्त पोंहावयास लावतात व पुनश्च दुःखाचें दर्शनही होऊं देत नाहींत. असें त्यांच्या अंगीं सामर्थ्य असतें. म्हणून इतर सर्व दुर्मिळ वस्तूंपेक्षां सत्संगाची किंमत अवर्णनीय आहे. किंकर्तव्यतामूढ होऊन आंधळ्यासारखा ठेंचा खातखात चांचपडणाऱ्या मानवास दयेनें सुखकर व सोपा मार्ग दाखविणारा जर कोणी असेल तर तो सत्संगच होय.

४ महापुरुष व्यक्तीचें कल्याण करितात येवढेंच नव्हे तर ते राष्ट्राचें, सर्व जगाचें कल्याण करतात. व त्यासाठीं अहर्निश झटतात " जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टवीती उपकारें " सर्व संतांत आपणांस एकच आढळून येईल कीं, सर्वकाळ परहित जेणेंकरून साधेल असाच हाच आचार व हीच शिकवणूक. संतच शिवाजी सारख्या पराक्रमी वीराला योग्य दिशा दाखवून देणारे झाले. ज्या काळांत महाराष्ट्र हा अत्यंत परतंत्र झाल्यामुळें, गोब्राह्मणांचा छळ होत असे, यावनी साम्राज्य चोंहोंकडे पसरल्यामुळें धर्मनीतीचा उघड उघड खून होत असे, सर्व महाराष्ट्र अगदीं त्रस्त व दुःखी झालेला होता त्याकाळांत महाराष्ट्रास सुखाचे दिवस आणण्याच्या कामांत मूळकारण श्री समर्थच, समाजाचें अथवा राष्ट्राचें कल्याण करणारे हे संतच आहेत.

५ आतां आपण महापुरुष कोणाला ह्मणावें याचा विचार पाहूं. पुष्कळ लोक भोंदू जनांसच साधु ह्मणूं लागले आहेत. जसें दिसतें तसें असतेंच असें नाहीं. अनेक " ठकोबा व ठकूबाई " बिचाऱ्या भाविक जनांस भुलवून " शिष्यवित्तापहारकाः " बनतात. असो. तात्पर्य हें कीं, "शिष्यचित्तापहारकाः" असे गुरु किंवा संत विरळा सांपडतील.

६ ह्मणून श्रीरामदासांनीं व इतर पुष्कळ ज्ञानेश्वर, एकनाथ आदिकरून पूर्वींच्या महापुरुषांनीं, भोळेभापुडे जन फसूं नयेत एतदर्थ संत ओळखण्याचीं कांहीं प्रमुख चिन्हें सांगितलीं आहेत. त्याचप्रमाणें भगवान् श्रीकृष्णानेंही भगवद्गीतेंत अर्जुनास स्थितप्रज्ञाचीं, सिद्धाचीं अथवा निस्त्रैगुण्याचीं लक्षणें सांगितलीं

आहेत. श्रीसमर्थ ह्मणतात कीं, “ साधु विरक्त पुण्यशीळ । अंतःशुद्ध धर्मात्मा केवळ । कर्मनिष्ठ स्वधर्में निर्मळ । निर्लोभ अनुतापी ॥ ” पहिलें लक्षण ह्मणजे **विरक्ति** हें होय. तोच धीर, वीर व साधु कीं, ज्यांच्या डोळ्यांसमोर भोग्य-वस्तु असतांनाही, व त्या वस्तूंचा उपभोग त्यानें मन मानेल तसा घेण्यास त्यास मुभा असतांही तो त्या वस्तूविषयीं विरक्त असतो, मनांत यत्किंचित्‌ही विकाराचें स्फुरण होत नाहीं. या लोकांतील अथवा परलोकांतील कोणत्याही विषयांवर त्याची वासना जात नाहीं. काकविष्ठेसमान विषयास मानून त्याकडे ढुंकून देखील पाहात नाहीं. इतकी सत्यविरक्ति ज्यांचे अंगीं पूर्णपणें बाणून गेली आहे तोच खरोखरच संत या पदास शोभतो. कित्येक लोक “ सर्व ब्रह्मच आहे मग त्याग तरी विषयांचा कां करावा ? प्रारब्धामुळें जें जें भोगास येतें तें तें भोगून सोडावें; गुणांची कामें गुण करीत आहेत, त्याचप्रमाणें इंद्रियांचीं कामें इंद्रियें करीत आहेत; करीत ना बिचारीं, ” असे वृथा प्रलाप काढून स्वार्थी बनतात व यच्चयावत् सव गोलंकार ब्रह्मघोटाळा करितात.

श्री रामकृष्ण परमहंस वैराग्याची साक्षात मूर्तीच होते. कनकासक्ति व कांतासक्ति—जे परमार्थमार्गांतील अजिंक्य रिपु—त्यांस नव्हतीच. त्यांच्या बाबतींत **‘मातृवत् परदारेषु** व **परद्रव्येषु लोष्ठवत्’** अशी मनःस्थिति त्यांनीं बनविली याचा इतिहास सर्वांस माहित आहेच. स्वामी विवेकानंदांनीं श्रीरामकृष्ण परमहंसांची परीक्षा पाहण्याकरितां, एके दिवशीं ते निजले असतां त्यांचे उताणे हातावर एक रुपया हळूच ठेवला. तोंच त्यांचा हात उलटला व तो रुपया खालीं त्यांचे हातानें टाकला : व ते एकदम खडबडून उठले व मोठ्यानें ह्मणाले “आई ! आई ! हे जगदंबे ! हे दयाळमाते ! या तुझ्या बालकावर आज तूं हें काय संकट आणलेंस ? आई ! सांग, सांग, माझ्या हातून असा काय अपराध घडला की जेणेंकरून तूं कोपलीस !! ” असें ह्मणून मोठ्यानें रडून कालीमातेची करुणा भाकावयास लागले. जागृतावस्थेंत व स्वप्नावस्थेंत तर नाहींच नाहीं पण सुषुप्तींतहि विषयासक्ति ज्या पुरुषांस नाहीं त्यांचे अंगीं खरी विरक्ति बाणली असें समजावें व तोच खरा संत आहे हें ओळखावें. जितेंद्रियत्व अंगीं येणें ही सामान्य गोष्ट नव्हे. व हा गुण ज्याचे जवळ असेल त्यासच महाभाग्यवान्, महापुरुष म्हणावें. अशा माणसाचें दर्शन हें अत्यंत पवित्र असतें. अशा महापुरुषाचा उपदेशपर एक शब्द नव्हे, त्याचें खुद्द आचरण हेंच सामान्य जनांस जितकें आदर्शपर व बोधपर असतें तितकें शब्दज्ञानपारंगताचें होत

नाहीं. अशा पुरुषाचें नुसतें अस्तित्व हें जितकें स्फुरणदायी व कल्याणकारक होईल व समाजाचें उद्धारक होईल तितकें वाक्पंडिताचें वाक्पटुत्व होणार नाहीं.

विरक्ति या शब्दाचा अर्थ विषयलालसेचा अभाव; व याचें फल चित्त-स्वास्थ्य. विरक्ति ही शांतीचें कारण आहे. विरक्तीवांचून निःसंकल्पावस्था प्राप्त होणें शक्य नाहीं. हा आराम अथवा शांति सामान्यजनांचे ठिकाणीं अखंड नसते, पण संतांचे ठिकाणीं अखंड असते. संत या शब्दाचा अर्थच असा आहे कीं, पूर्ण विरक्तीमुळें अखंड निर्भेळ स्वास्थ्य, अथवा आनंद नांदणें. म्हणून विरक्ति हें संतांचें प्रमुख लक्षण आहे.

७ आतां आपण दुसऱ्या लक्षणाकडे वळूं. तें म्हणजे पुण्यशीलत्व अथवा पावित्र्य. " आदौ स्ववर्णाश्रमवर्णिताः क्रियाः कृत्वा समासादितशुद्ध-मानसः " या रामगीतेंतील वचनाप्रमाणें ज्यानें आपल्या वर्णाश्रमानुसार आपलीं कर्तव्यकर्में ईश्वरार्पण करून चित्तशुद्धि संपादन केली आहे, ज्याचें हृदयरूप आसन अत्यंत सोज्ज्वळ व पवित्र असल्यानेंच प्रभूस तेथें येऊन कायमचें ठाणें द्यावेंसें वाटतें—नव्हे तेथें तो ठाणें देतो, ज्याचा चरणस्पर्श तीर्थांस तीर्थत्व आणून देतो; "सकल तीर्थरावो । दर्शनें प्रशस्तासी ठावो । हें असो. जया देखतां ब्रह्मभावो । भ्रांतांसही " अशी ज्याची योग्यता—तोच खरोखर महापुरुष. थोडक्यांत श्रीरामदासांच्या वचनांत संतलक्षण करावयाचें म्हणजे महापुरुष अथवा सद्गुरु याचे ठिकाणीं " ज्ञान वैराग्य आणि भजन । स्वधर्मकर्म आणि साधन । कथानिरूपण श्रवण मनन । नीति न्याय मर्यादा " या सर्व गुणांचा वास असतो; परंतु " यामध्यें एक उणें असे । तेणें तें विपरीत दिसे । म्हणौन सर्वही विलसे । सिद्ध सद्गुरुपासीं ॥

८ अशा महापुरुषांचा, साधूंचा समागम हाच पुण्यदायी असतो व हाच आपणास आत्यंतिक सुख देणारा असतो. म्हणूनच विवेकी जनांनीं, परमात्मा-जवळ ' प्रभो! सत्संग दे ' अशीच मागणी केली, व परमात्म्यानेंही सांगितलें आहे कीं, ' मद्भक्ता यत्र गायंति तत्र तिष्ठामि नारद ' ज्याच्या हृदयांत असंभावना विपरीत भावनादिक दोषांचा लेशही नाहीं, व जो परमात्मभजनांत रंगून गेला आहे तो माझीच विभूति आहे असें समजावें व त्याचा एकनिष्ठ सेवक जो होतो तोच खरोखर देवालाही अत्यंत आवडता व पूज्य होतो. अशा पुरुषांच्या संगतीचा महिमा खरोखर अगाध आहे. त्यांचे संगतींतील एक क्षण हा जितका

फायदा करून देईल तितका हजारों पारमार्थिक पुस्तकें वाचल्यानेंही होणार नाहीं. अनुभव घेतला असतांना वरील विधानाची सत्यता पटेल.

९ कोणी ह्मणतील कीं, अलीकडच्या काळांत खरे सत्पुरुषच नाहींत, मला वाटतें असें जे म्हणतात त्यांनीं सत्पुरुषांच्या प्राप्तीविषयीं खटपटच केलेली नसते. पुष्कळसे लोक भोंदू असतात, यावरून सन्निष्ठ पुरुष जगांत एकही नाहीं, असें एकदम विधान ठोकून देणें हें प्रगल्भ विचाराचें काम होणार नाहीं. सत्पुरुषांची गांठ पडावी अशी ज्यास तळमळ असेल, रात्रंदिवस त्यांच्या भेटीसंबंधीं अत्यंत उत्कंठा असेल तर त्यास ते खास भेटतील व समाधान प्राप्त करून देतील. संत हे साक्षात् भगवंताच्या मूर्तीच आहेत. त्यांचें अस्तित्व या जगांत आहे, म्हणूनच कांहीं थोडी तरी नीति, न्याय, मर्यादा, धर्म आदिकरून आपणास आढळून येतात. नाहींतर त्यांचा केव्हांच नायनाट झाला असता.

१० संत सर्वांस वारंवार उपदेशरूपी अमृत पाजीत असतात. त्यांचें दयालुत्व हें निरुपम आहे. ते स्वतः सदोदित जागरूक राहून—लोक निष्कारण अज्ञानामुळें दुःखावर्तांत पडूं नयेत म्हणून—त्यांस निरंतर जागवितात. त्यांचे उपकार जनतेवर अनंत आहेत पण जनता अहंभावानें इतकी अंध झालेली आहे कीं, तीस त्यांची किंमत कळून येत नाहीं. अमृतरायसारखे महापुरुष देवाजवळ हीच प्रार्थना करितात कीं, " श्रीहरी ! संतपदाची जोड दे रे " ज्या मुक्तीकरितां योगी लोक अखंड साधन करीत असतात, विद्वान लोक अखंड साधन करीत असतात, विद्वान लोक जिचें अनेकप्रकारें वर्णन करितात व ज्या मुक्तीची महती उपनिषदादि शास्त्रें गातात, ती मुक्ति प्रभूजवळ संत मागत नाहींत . प्रभो ! तुझी आम्हाला मुक्ति नको, ऐश्वर्य नको, फार काय सांगावें तूं स्वतः देखील आम्हाला नकोस; पण तुझे जे एकनिष्ठ दास आहेत त्यांची संगत मात्र अखंड दे. लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट कीं, " संतपदाची जोड " हें मागणें आहे. म्हणजे महापुरुषांच्या चरणाजवळ अखंड वास असावा; त्यांची कायावाचामनेंकरून सेवा करण्याचें भाग्य उदयास यावें ही प्रार्थना आहे; व अशा सत्पुरुषांची सेवा जर घडेल तर आत्यंतिक—दुःखनिवृत्ति होण्यास व हृदयरूपी शुद्ध भूमींत ज्ञानरूप बीज पेरलें गेल्यानें स्वात्मसुखाचा सुंदर मोड उगवण्यास वेळ लागत नाहीं. अशा संगतींत जीवाचे सर्व मनोरथ पूर्ण होऊन कृतकृत्यता होते व या नरदेहाचें सार्थक केल्यासारखें होतें. म्हणूनच परमात्म्या-

जवळ प्रत्येकानें सत्संग दे " अशी प्रार्थना करावी ह्मणजे तेणेंकरून सत्बुद्धि उत्पन्न होते. " जैशी दीपकलिका धाकुटी। परी बहु तेजातें प्रकटी। तैसी सद्बुद्धि थेंकुटी। म्हणों नये॥ " " दुर्लभ सद्बुद्धि। जिये परमात्माचि अवधी। जैसा गंगेसी उदधी। निरंतर॥" अशाप्रकारची उत्तमप्रकारची बुद्धि होते व शेवटीं आत्महित होतें. म्हणून ज्यास कल्याण साधावयाचें असेल, सत् ज्ञान व अखंड आनंद प्राप्त करून घ्यावयाचा असेल त्यानें दुर्मिळ व अमोल असा जो सत्संग तो मिळविण्याचा यत्न करावा व व्यर्थ निंदास्तुतींत वेळ घालवूं नये.

" तें ज्ञानगा पैं बरवें। जरी मनीं आथी जाणावें। तरी संतांतें भजावें। सर्वस्वेंसी॥ " ज्ञानेश्वरी. ॥ ॐतत्सत्॥

---

# संपादकीय टिप्पणें.

१ **मुमुक्षु**:— नासिकक्षेत्रीं ' मुमुक्षूचा प्रस्तुतचा पहिला अंक प्रसिद्ध होत आहे. मुमुक्षूच्या हातून जनीजनार्दनाची सेवा घडावी असा सज्जनांचा आशीर्वाद असावा. मुमुक्षूच्या प्रत्येक ग्राहकानें आणखी दोन ग्राहक मिळवून देऊन त्याला आपल्या पायावर उभें करावें. सांप्रतकाळीं सामान्य लोकांस विशेष आवडणाऱ्या गोष्टी व विषय आह्मी द्यावेत अशी कांहींकांची सूचना आहे, पण तशा गोष्टींची तहान अन्यत्र भागण्यासारखी आहे व मुमुक्षूला परमार्थासारखें दुसरें कांहींच प्रिय नाहीं. त्याची प्रकृतिच परमार्थलोलुप आहे, तो आपल्या स्वभावाप्रमाणें जी अल्पसेवा करीत आहे ती गोड करून घ्यावी.

**चालू चळवळी**—तथापि वर्तमान चळवळींकडे मुमुक्षु सहानुभूतीच्या दृष्टीनें पाहत आहे. राष्ट्राच्या उर्जितासाठीं ज्या ज्या गोष्टी घडत आहेत; जे जे लहानथोर वीर पुरुष अत्यंत स्वार्थत्याग करून आपल्या संसाराची होळी करून घेत आहेत, राष्ट्राला त्यागाचे, वैराग्याचे, देशप्रीतीचे, साहसात्मक देशसेवेचे मार्ग दाखवीत आहेत त्या सर्वांविषयीं मुमुक्षूला प्रेम वाटतें. महात्मा गांधी, वल्लभभाई व विठ्ठलभाई पटेल, पंडित मदनमोहन मालवीय ही चौकडी राष्ट्रकार्यकर्त्या पुरुषांच्या अग्रभागीं आज विराजत आहे. जे हजारों लहानथोर स्त्रीपुरुष, हिंदु मुसलमान, उदार देशभक्तीनें प्रेरित होऊन मातृभूमीच्या उद्धारार्थ आपल्या सर्वस्वाचा होम करीत आहेत त्यांच्याकडे आपलेपणाच्या

प्रेमानें सर्वांनीं पाहिलें पाहिजे. ही राष्ट्राची राजकीय तपश्चर्या वायां जाणार नाहीं. कोठें चुका होत असतील तर त्यां कार्यकर्त्यांना अगोदर दिसतील व ते टीकाकारांच्याही आधीं दुरुस्त करितील. लोकांनीं पुढाऱ्यांवर विश्वास ठेवायला व त्यांच्या आज्ञा पाळायला शिकलें पाहिजे. महत्कार्याचा नगारा वाजत आहे तेथें बारीक सारीक तुणतुण्यांकडे लक्ष कोण देणार ? धाराप्णा, मुंबई, संगमनेर, बागलाण येथें घडणाऱ्या गोष्टी पाहिल्या असतां आलेले लोक राजकारणाचे धडे उत्तम प्रकारें गिरवीत आहेत, सारें राष्ट्र जागृत झालें आहे, देशभक्ति आबालवृद्धांत उचबळून राहिली आहे याबद्दल समाधानच वाटलें पाहिजे. देश अधिकाधिक दारिद्र्यदैन्यांत खचत चालला आहे. मद्यासारख्या दुर्दशा करणाऱ्या व्यसनापायीं हजारों कुटुंबांची राखरागोळी झाली आहे, कायदे व कर यांच्या असह्य जाचांखालीं लोक त्रस्त झाल्यांमुळें कोणी आम्हांला त्राता भेटेल काय, याची वाट पहात आहेत, अशा वेळीं राष्ट्रोद्धारार्थ महात्मा गांधींनीं सुरू केलेल्या चळवळींकडे आपलेपणाच्या प्रेमानें आपण नाहीं पाहिलें तर आपण कृतघ्न ठरूं. स्वदेशी व बहिष्कार या दुपाती शस्त्रानेंच दारिद्र्याचा राक्षस हतबल होणार आहे. चालू चळवळीला भगवंताचें अधिष्ठान आहे, लोकांनीं मात्र भगवंताला विसरूं नये. नारायणावांचून आपला त्राता कोणी नाहीं म्हणून श्रीहरीचें सख्य जोडावें व त्याच्या अधिष्ठानावर बैठक मारून भागाला आलेलें स्वकार्य करीत असावें, म्हणजे देव सोन्याचे दिवस दाखविल्याशिवाय राहणार नाहीं. हिंदुस्थानचें भवितव्य उज्ज्वल आहे.

## धर्मार्थ संचार.

रा. पांगारकरांचें श्रीगोकुळाष्टमीच्या सप्ताहानिमित्त विजापूरशहरीं ५-६ दिवस जाणें झालें होतें. तेथें चार प्रवचनें, एक काल्याचें कीर्तन व कुब्रांत व्याख्यानें असे कार्यक्रम झाले. तेथें सिव्हिल सर्जन डॉ. मोने, कुऱ्हाडे महाराज, रा. बापट पोस्टमास्तर, रा. जनवाडकर, डॉ. रानडे, डॉ. पेंडिबिद्री इ. सज्जनांचा सहवास फार संतोषजनक झाला. गणेशोत्सवांतही रा. पांगारकर यांचें मुंबईस जाणें झालें व तेथें ब्राम्हणसभेंत एक कीर्तन व तेथेंच पांचचार ठिकाणीं प्रवचनें झालीं.

# पांगारकरांचीं पुस्तकें

१. भक्तिमार्गप्रदीपः—( आवृत्ति चौदावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ऽ८ व्ही. पी. नें ऽ१२.

२, संतचरित्रमाला:—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४२ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ. सं. २५६ किं. रु. १ऽ८

३. श्रीएकनाथचरित्र:—श्रीएकनाथमहाराजांच्या चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ऽ१२

४. कविरामायण:—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ऽ४

५. आनंदलहरी:—( कवितासंग्रह ) ह्यांत पांगारकरांच्या कवितांपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें, महाराष्ट्र संत व सद्ग्रंथ, व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ऽ१२

६. नारदभक्तिसूत्रें:—( आवृत्ति ४ थी ) हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ऽ८

७. नवविधा भक्तिः—( सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी ) यांत नवविधा-भक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ऽ६

८. निरंजनमाधवांची कविता:—भाग १ किं. रु. भाग २ व ३ एकत्र किं. १॥ रु.

९. श्रीज्ञानेश्वरचरित्र:—( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यांमुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. १ऽ८

१०. भक्तिमणिमाला:—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक—संदर्भ व विवरण यांसह—दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं १ऽ८

११- सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी:—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध पुढारी कै. विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ऽ५

१२–१३–१४ मुमुक्षूंतील निवडक निबंध:—भाग १ व २ किं. प्रत्येकीं १ऽ८ भाग ३ रा किं. १ऽ४. तिन्ही भाग एकदम रु. ३॥

१५ मोरोपंती वेंचे:—( दुसरी आवृत्ति ) पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रहि नवीन दिलेलें आहे. किं. रु. १ऽ१२.

मुमुक्षु **Reg. No. B. 662**

## पांगारकरांचीं पुस्तकें.

१६ **पारिजातकाचीं फुलें** ( तिसरी आवृत्ति ) :—परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ॥८

१७ **श्रीतुकारामचरित्र**:—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. किं. रु. २.

१८ **श्रीतुकारामचरितामृत**:—तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं. ७५

१९ **निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य**:—निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख—विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ॥१०

२० **मुक्तेश्वर**:—( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १

२१ **मारुतिउपासना** ( चौथी आवृत्ति ) :—किं. ॥.

२२ **सार्थ श्रीदासबोध**:—किं. रु. ४. व्ही. पी. ने ४॥१०

२३ **सार्थ मनोबोध**:—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ॥१२.

२४ **समर्थसंजीवनी ऊर्फ रामदासी वेंचे**:—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें ह्या चार भागांत समर्थांचे कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.

२५ **मोरोपंत** ( चरित्र आणि काव्यविवेचन:—किं. रु. २॥८.

२६ **श्रीएकनाथी भागवत** ( निर्णयसागर प्रेसचें, आवृत्ति तिसरी ) :—किं. रु. ६

२७ **श्रीसमर्थग्रंथभांडार**:—समर्थांची एकंदर कविता एकत्र सटीप छापलेली आहे. किं. ४॥८.


२८ **समर्थग्रंथभांडार** ( भाग २ रा ):—यांत दासबोधाशिवाय बाकीची समर्थांची सर्व कविता, प्रकरणें पाडून व्यवस्थित दिली आहे. किं. रु. २॥८

**ज्ञानेश्वरांची प्रभावळ**:—ज्ञानेश्वरमहाराज व त्यांचे समकालीन नामदेवराव, जनाबाई, चोखामेळा, इत्यादि सर्वजातीय २५ संत यांच्या ग्रंथांतील निवडक वेंचे प्रस्तुत ग्रंथांत घेतले आहेत. यांत ज्ञानेश्वरांच्या २५०० ओंव्या व सर्व संतांचे मिळून ४०० अभंग आहेत. सुंदर प्रस्तावना आहे. टीपा भरपूर आहेत. किं. रु. २.

पत्ता:—व्यवस्थापक “ मुमुक्षु ” नासिक शहर.

श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ।

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ ( श्रीरामदास )


| जुनें वर्ष २५ मास १ | आश्विन १८५२ आक्टोबर १९३० | नवें वर्ष १० वें अंक १० वा. |
|---|---|---|

वार्षिक वर्गणी रु. ३) संपादक व प्रकाशक, (व्ही. पी. नें रु. ३८३

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मुमुक्षु कचेरी, नाशिक सिटी.

मुद्रक:—दत्तात्रिय जनार्दन मराठे यांनीं नासिक येथें घ. नं. १०१४ आपल्या श्रीकृष्ण छापखान्यांत छापिलें.

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ मंगलाचरण .... .... .... | १ |
| २ संतांचीं लक्षणें .... .... .... | १–२ |
| ३ तामीळ वाङ्मय .... .... .... | ३–८ |
| ४ नरनारायणयोग .... .... .... | ९–११ |
| ५ श्रीगुरुदास महाराज -माहूर- यांचीं ध्यानें .... | १२–१७ |
| ६ भक्तिमार्गाविषयीं बोबडे बोल .... .... | १८–२५ |
| ७ भक्तमयूर-केकावलि .... .... .... | २६–३० |
| ८ आर्याचार्य कवि-मयूरपंत-स्तवन .... .... | ३१–३३ |
| ९ सुखाचा लाभ .... .... | ३४–३७ |
| १० भगवंताचें अधिष्ठान .... .... .... | ३७–३९ |
| ११ पूर्वीची स्वस्ताई व सध्यांची महागाई .... .... | ४० |

## अंकास विलंब कां?

'मुमुक्षु' कचेरी नाशकास आणल्यामुळें येथें नवीन ऑर्डिनन्सप्रमाणें कलेक्टरपुढें डेक्लेरेशन करावें लागलें, ज्या श्रीकृष्ण प्रिंटिंग प्रेसमध्यें मुमुक्षु छापला जात आहे त्यालाही डिपॉझिट मागितल्यानंतर डिक्लेरेशन करावें लागलें. या कामास फार विलंब लागला. अंक निघाल्यानंतर पोस्ट मास्तर जनरलकडे कलेक्टरच्या शिफारसीसह तो पाठवून त्याची येथील पोस्टास ऑर्डर आणावी लागली. या कामास अपेक्षेबाहेर म्ह० दीड महिना लागला! सर्वांचेंच पराधीन जिणें झालें आहे! अंक वेळेवर न पोंचल्यामुळें अनेक ग्राहकांच्या तक्रारी आल्या, त्या सर्वांस उत्तर पाठवितां आलें नाहीं. याबद्दल ते क्षमा करतील अशी आशा आहे. —संपादक

## निरंजनमाधवाची कविता

**भाग १ ला किं. १ रु.** **भाग २-३ किं. १॥ रु.**

पहिल्या बाजीराव पेशव्यांचे अमदानींतल्या राजकारणी, योगी व अधीत अशा निरंजनमाधव कवीच्या काव्यांच्या कविलिखित प्रतीवरून हे दोन भाग छापले आहेत. दुसऱ्या भागांत ज्ञानेश्वरमहाराजांचें उद्बोधक चरित्र रसाळ वाणीनें गायिलेलें ग्रथित केलें आहे. तिसऱ्या भागांत चिद्बोधरामायण हें अध्यात्मरामायणाच्या धर्तीवरील काव्याचें बालकांड आहे. अद्वैतबोध वगैरे वेदांतपर पांच स्फुट काव्यें कठिण विषय सुलभपणें प्रौढ भाषेत सांगणारीं अशीं घातलीं आहेत. व शेवटीं मराठींतलि एकच चंपुकाव्य जें " सुभद्रा-चंपु " नांवाचें या कवीनें केलें आहे तें छापलें आहे. यांतील भाषा आणि वर्णनशैली प्रौढ, मनोहर व सुंदर असून सुभद्राहरणाचा नेहमींचा कथाभाग या कवीनें आपल्या विद्वत्तेनें रसिकमान्य केला आहे. अशा या अपूर्व काव्यसंग्रहानें हे दोन भाग भरले असून दोन्हीं एकत्र बांधाविले आहेत.

**पत्ता:—व्यवस्थापक ' मुमुक्षु ' नासिक सिटी.**



( भूपाळी—घनश्याम सुंदरा या चालीवर )

रक्ष रक्ष ईश्वरा भारता प्राचीना जनपदा ।
भोगियलीं बहुजयें एकदा वैभवसुखसंपदा ॥ धृ० ॥
सगरद्वीपाहुनी सिंधुतीं काश्मीरापासुनी ।
कृष्णकुमारीकडे शांतिचें राज्य देई पसरुनि ॥
प्रेमभाव धरुनियां पुत्र हे ऐक्य करुत झडकरी ।
कर्तव्या जागुनी करूं दे कर्तव्यें हीं खरीं ॥
शाश्वत सत्य ज्ञानदिवाकर उगवो हृदयांतरीं ।
धर्मतेज देखुनी चकित हो देववृंद अंबरीं
गाढतमीं बुडतसे राष्ट्र हें उद्बोधन द्या करीं ।
कृपाकटाक्षें पुन्हां चढूं दे वैभवशिखरावरी
रोमरंध्रिं चैतन्य खेळवीं राष्ट्राच्या ईश्वरा ।
सातसमुद्रावरी फडकूं दे यशोध्वजा सुंदरा ॥
चाल–हे पार्थसारथे कंसारी विजयवंता ।
हे एकवचन रामा धनुर्धरावंता ।
सोडीं न यास विकला काळ असे पडता ।
आर्यपुत्र जरि अपात्र दिसले घ्याया स्वीया पदा ।
रक्ष भारता सहाय्यहीना ईशा चिरसौख्यदा ।

—स्वामी रामतीर्थ

---

## संतांचीं लक्षणें

सन्तोऽनपेक्षा मच्चित्ताः प्रशान्ताः समदर्शिनः ।
निर्ममा निरहंकारा निर्द्वंद्वा निष्परिग्रहाः ॥ ( भागवत. स्कं ११ )

साधूंचे अमित गुण । त्यांत मुख्यत्वें अष्टलक्षण ।
निवडूनि सांगे श्रीकृष्ण । ते कोण ते अवधारीं ॥ १ ॥
प्राप्ताप्राप्तलाभावस्था । बाधूं न शके साधूंच्या चित्ता ।
चित्त रातलें भगवंता । **निरपेक्षता** या नांव ॥ २ ॥

निरपेक्ष म्हणावया येथ । जागृतिस्वप्नसुषुप्तीआंत ।
चिन्मात्रीं जडलें चित्त । या नांव **मच्चित्त** गुण दुजा ॥ ३ ॥
कामलोभादि दोषरहित । परमानंदीं जडलें चित्त ।
शांति सुखवासें वसे तेथ । यालागीं **प्रशांत** बोलिजे ॥ ४ ॥
जग पाहतां दिसे विषम । विषमीं देखे सम ब्रह्म ।
तोचि **समदर्शी** परम । हा गुण निरुपम पै चौथा ॥ ५ ॥
हे समदृष्टी यावया हाता । भावें भजोनि भगवंता ।
निःशेष त्यजिली अहंममता । हेही कथा अवधारीं ॥ ६ ॥
जें जें सानथोर दिसे दृष्टीं । तें तें अवघें मीची सृष्टीं ।
माझ्या मीपणाची निजपुष्टी । घोटीत उठीं त्रैलोक्य ॥ ७ ॥
तेथ मीपणें मी माझें । नुरेचि तूंपणेंसीं तुझें ।
ऐसें परब्रह्माचेनि निजे । झालें सहजें निर्मम ॥ ८ ॥
जो निर्मम निरभिमान । त्यासी नाहीं भेदभान ।
अभेदीं मिथ्या द्वंद्वबंधन । हा सातवा गुण निर्द्वंद्व ॥ ९ ॥
छाया विष्ठेवरी पडे । कां पालखीमाजीं पडे ।
तेणें पुरुषा सुखदुःख न जोडे । मुक्तासि तेणें पाडें देहभोग ॥ १० ॥
साधू परिग्रही दिसती । परि ते अपरिग्रही असती ।
हे संतांची पावावया स्थिती । त्यांची निजभक्ति करावी ॥ ११ ॥
स्वजनधनस्त्रीपुत्रांसी । नांदोनि तो नातळे त्यासी ।
स्वप्नघरवात जागृता जैसी । तैसा साधूसी संसारू ॥ १२ ॥
चैतन्यसरोवरीचें कमळदळ । विकासलें अष्टदळ ।
तें हें संतलक्षण केवळ । स्वानंदशीळ साधूसी ॥ १३ ॥
पृथ्वीतळीं देवता साधु । साधू दीनांचे सखे बंधु ।
साधूरूपें मी परमानंदू । जाण प्रसिद्ध परमात्मा ॥ १४ ॥
मी निर्गुणत्वें ब्रह्मपूर्ण । साधु बोलतें चालतें ब्रह्म जाण ।
तयांसी रिघालियां शरण । जन्ममरण बाधेना ॥ १५ ॥ (एक. भाग. अ. २६)

# तामीळ वाङ्मय

१ तामीळ प्रांतांत ३ ऱ्या शतकापासून तों ८ व्या शतकापर्यंतच्या पांचशें वर्षांत अनेक वैष्णव आणि शैव भक्त निर्माण झाले व त्यांनीं तामीळ भाषेंत भक्तिप्रधान सुंदर काव्यें करून बौद्ध व जैन पंथांची हकालपट्टी केली. बौद्ध व जैन पंथ हे वेदविरोधी आणि वैष्णव व शैव पंथ हे वेदानुकूल. वेदविरोधी पंथांना हिंदुस्थानांत पाखांड मतें म्हणतात. दक्षिण प्रांतांत पाखांड मतांचें प्राबल्य तेव्हां झालें होतें व कित्येक राजांनीं तें मत स्वीकारल्यामुळें वैष्णव व शैव पंथांचा व तत्प्रचारक भक्तांचा थोडाफार छळही झाला. या दोघांचें पाखंडमतांचा उच्छेद करण्यांत एकमत्य होतें. पाखंडमतांचें बंड कमी झाल्यावर शैव व वैष्णवपंथी यांमध्यें चुरस सुरू झाली व त्यांच्यांतही तीव्र मतभेद झाले. पण ते स्मार्तवैष्णव यांचे झगडे हजार बाराशें वर्षें अद्यापपर्यंत तिकडे चालू आहेत. अनुयायांत तंटे असले तरी शैव आणि वैष्णव पंथांत जे खरोखर मोठे भक्त झाले ते एकमेकांशीं प्रेमानें वागत. शिव व विष्णु या नामभेदाशिवाय दोन्हीं पंथांत बिलकूल भेद नव्हता व नाहींही. तामीळ प्रांतांत ह्या पांच शतकांत जे वैष्णव भक्त झाले त्यांत 'बारा अलवार' प्रसिद्ध आहेत. अलवार म्हणजे वैष्णव, विष्णुभक्त. वैष्णवपंथ तामीळ प्रांतांत तरी शैवपंथांच्या आधीं सुरू झालेला दिसतो. ह्या अलवारांच्या निवडक व सुंदर कवितांचा संग्रह तिकडे 'प्रबंधनम्' ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. हिंदुस्थानांतल्या तामीळशिवाय कोणत्याहि देशी भाषेंत इतकी प्राचीन कविता झालेली नाहीं ! वैष्णवांच्या उपासनेचें मुख्य मंदिर श्रीरंगम् हें होय. महाराष्ट्रांत पंढरपूरचें महत्व पुढें प्रस्थापित झालें, तसेंच दक्षिणेंत त्याच्या फार आधीं श्रीरंगम्‌चें झालें. श्रीरंगम् हें त्रिचनापल्लीपासून २ मैलांवर कावेरीनदीच्या दोन फांट्यांच्या मधल्या बेटावर आहे. तेथें शेषशायी श्रीरंगनाथाचें एक प्रशस्त मंदिर आहे. प्रस्तुतचें मंदिर हजार वर्षांपूर्वी बांधलेलें आहे. दक्षिणेंत याच्या इतकें दुसरें मोठें देवालय नाहीं. त्याला ७ आवारें असून आंतल्या आवारांत श्रीशेषशायीची मूर्ति आहे. हें स्थान अतिप्राचीन आहे. श्रीभागवतांत 'श्रीरंगाख्यं महापुण्यं यत्र सन्निहितो हरिः' ( १०–७९–१४ ) याप्रमाणें याचा उल्लेख आहे. चौथ्या आवारांत एक-

हजारखांबी सभामंडप आहे ! विष्णुभक्त जे अलवार त्यांत तिरुमलिसाइ, नम्माळवार, राजा कुलशेखर, पेरियालवार व त्याची कन्या आंदल, तोंडाराडिपोडि व शेवटचा तिरुमंगाई हे विशेष प्रसिद्ध आहेत. ह्या सर्वांत नम्माळवार व आंदल हे दोन आळवार अत्यंत लोकप्रिय आहेत. राजा कुलशेखर ह्याची संस्कृत 'मुकुंदमाला' सुप्रसिद्धच आहे. हा त्रावणकोरचा पराक्रमी राजा, पुढें शेर, चौल व पांड्य यांचाही राजा झाला. हा न्यायनीतीनें राज्य करी. हा रामभक्त होता. साठी उलटल्यावर यानें मुलाला गादीवर बसविलें व राज्यभोग सोडून रंगनाथचरणीं लीन होऊन राहिला. त्याचीं तामीळ भाषेंत दहा काव्यें आहेत व तीं तामीळ देशांत आबालवृद्धांच्या तोंडीं आहेत. त्याच्या काव्यांचा आरंभ असा आहे: 'हे भगवन् ! आपणांस वाटतील त्या आपत्ति मजवर आणा, मी मात्र आपल्या चरणावांचून दुसऱ्या कोणाचाही आश्रय करणार नाहीं. मुलाला जन्म देणाऱ्या आईनें क्षणैक रागानें जरी त्या लेंकराचा त्याग केला तरी तें आईचेंच चिंतन करितें आणि रडतें अगदीं तसाच.हे प्रभो ! मी आहें ! ' पेरियालवाल ( व अर्थात् त्याची कन्या आंदल ) हा ब्राम्हण होता. त्याचें मूळचें नांव विष्णुचित्त. हार गुंफावेत, चित्रविचित्र पुष्पमाळा तयार कराव्यात व त्या देवाच्या गळ्यांत घालून देवाचें ध्यान करावें हाच त्याचा उद्योग. हा विद्वान् नव्हता, पण पांड्यराजा वल्लभदेव यानें भरवलेल्या एका विद्वत्परिषदेला देवाच्या प्रेरणेनें हा हजर राहिला व आयत्यावेळीं याला बोलायची स्फूर्ति झाली. राजानें जो ज्ञात्यांत श्रेष्ठ ठरेल त्याला एक मोठी नाण्यांची थैली द्यायचें आधीं जाहीर केलें होतें. विष्णुचित्ताचें स्वयंस्फूर्तीचें भाषण अप्रतिम ठरलें व ती थैली त्याला मिळाली. त्यानें गांवीं येऊन ग्रामांतील मुख्य विष्णुदेवाला ती अर्पण केली. असा तो निरपेक्षप्रेमी होता. त्याचे संगतींत 'आंदल' ला विष्णुभक्तीचें रहस्य समजलें. कोणी म्हणतात कीं आंदल त्यांची कन्या नव्हती, त्यानें त्या अर्भकाला कन्येप्रमाणें वाढविलें हें खरें आहे. त्याच्या विष्णुप्रीत्यर्थ माळा गुंफण्याच्या प्रेमकार्यानेंच तिच्या हृदयांत विष्णुभक्ति चेतविली. त्यानें तयार केलेल्या पुष्पमाळा एकदां तिनें आपल्याच गळ्यांत घातल्या. तेव्हां त्या भक्ताचा मनोभंग झाला, पण विष्णूनेंच प्रगट होऊन त्या आपल्यास पोंचल्याचें व आपण प्रसन्न झाल्याचें त्यांस पटविलें असें सांगतात ! 'आंदल'नें लग्न करण्याचें नाकारलें व 'विष्णूशिवाय माझा भ्रतार किंवा स्वामी दुसरा कोणीच नाहीं' असें उत्तर केलें.

तिच्या पित्यानें तिला विष्णूशीं लग्न करण्याकरितां श्रीरंगमला नेलें व तेथें देवाच्या पायाशीं ती गुप्त झाली ! तिच्या पद्यांत उत्कट भक्तिरस भरला आहे, विष्णुस्वरूपाशीं ती तन्मय झाली होती. “ नारायण सर्वभूतांचा सुहृद आणि माझा स्वामी आहे, माझ्या ह्या जन्मींचा व जन्मजन्मींचा तो एकच आधार आहे, त्यानें आपल्या पवित्र हस्तांनीं माझें पाणिग्रहण केलें आहे. मातापितरांचा व सर्व बंधुजनांचा त्याग करून मी त्यालाच हृदयाशीं घट्ट धरिलें आहे. हा मायेचा नियंता माझ्यापुढें प्रकट झाला आहे व त्याच्या स्वरूपाला मी मोहित झालें आहें ” असें तिनें एका पद्यांत ह्मटलें आहे. पेरियालवारच्याही कविता पुष्कळ आहेत. तो आपल्या एका पद्यांत ह्मणतो:-- “ समुद्रमंथनसमयीं सागरांतून निघालेलें अमृत जसें एखाद्यानें घरांत सांठवावें, त्याप्रमाणें हे प्रभो ! म्यां तृषित जीवानें तुझ्या स्वरूपाच्या आनंदानें आपला हृदयघट भरून घेतला आहे. सोन्याचा तुकडा तांबडी रेषा उमटेतों जसा कसावर घांसतात त्याप्रमाणें मी आपलें काव्य तुझ्या नामरंगानें रंगविलें आहे, माझ्या हृदयांत मी तुला स्थापिलें आहे व मी तुझ्यांत विरून गेलों आहें. तुझ्या लीलांनीं व गुणप्रभावांनीं माझें हृदय चित्रित केलें आहे. ” तोंडारापल्लि ( ब्राह्मण ), तिरुमंगाई ( शूद्र ) व तिरपान ( पंचम ) हे अलवार ८ व्या शतकाच्या सुमारास झाले. पहिला श्रीरंगमच्या मंदिरांत एक सेवेकरी होता, दुसरा बंडखोर व अडदांड होता व तिसरा कावेरीतीरावर उभा राहून मुक्तकंठानें श्रीरंगनाथाच्या प्रार्थना करणारा प्रेमळ नामशूद्र होता. बाराही अलवारांत नम्माळवार याची सर्वाधिक ख्याति झाली. तिरुमंगाई यांचीही कविता पुष्कळ उपलब्ध असून तामीळ प्रांतांत ती सर्वमान्य आहे. या अलवारांच्या निवडक व उत्तमोत्तम कवितांचा एक संग्रह ‘ प्रबंधम् ’ म्हणून मागेंच तयार झाला होता व त्याला तामीळ लोक वेदतुल्य मानतात. प्रबंधम् हा त्यांचा वेद आहे. ह्यांत नम्माळवार व तिरुमंगाई यांच्या कविताच अधिक आहेत. प्रबंधांतल्या ४९०० पद्यांपैकीं १३६० तिरुमंगाई यांच्या आहेत. हे वैष्णव अलवार व त्यांचेच व समकालीन शैव यांच्या कवनांत सगुण प्रेमाचा अत्युत्कट रंग असून तत्त्वज्ञानाच्या विचारांनीं तो प्रकाशित झाला आहे. आतां ह्या अलवारांपैकीं अधिक लोकप्रिय व मोठ्या प्रमाणावर काव्यरचना करणारा जो नम्माळवार त्यांच्या विषयीं चार शब्द सांगतों.

३ **नम्माळवार** याचा जन्म ताम्रपर्णी नदीच्या कांठीं तिनेवल्ली जिल्ह्यांत एका विष्णूपासकांच्या घराण्यांत झाला. याची जात वेल्लाळ--शेतीवाडी करून राहणें हा

वडिलांचा धंदा. हें मूल जन्मतःच फार विचित्र होतें. तें डोळे उघडीत नाहीं, दूध पीत नाहीं व रडतही नाहीं असें पाहून तें त्याच्या आईबापांनीं बाराव्या दिवशीं एका विष्णुमंदिरांतील आवारांत चिंचेच्या झाडाला दोरीचा पाळणा बांधून त्यांत ठेवून दिलें ! त्या मंदिरांतच तें कसें तरी वाढत होतें. देवाच्या स्वाधीन केल्यानें देवानें त्यास वाढविलें अशी लोकांची श्रद्धा झाली. याप्रमाणें तें मूल १६ वर्षांचें झालें! पुढें तेथें मधुरकवि नामक एक सामवेदी विद्वान् ब्राह्मण तीर्थयात्रा करीत असतांना कांहीं दृष्टांत झाल्यामुळें आला. चिंचेच्या झाडाखालीं डोळे मिटून पडलेल्या त्या जडभरततुल्य पुरुषाला त्यानें पाहिलें. मधुरकवीनें एक मोठा धोंडा उचलून घेतला व तो त्या सुप्त प्राण्याच्या पुढें दाणकन् आपटला. त्याबरोबर त्यानें १६ वर्षानंतर प्रथम डोळे उघडून पाहिलें! लोकांस मोठा अचंबा वाटला. याला कांहीं बुद्धि आहे कां नाहीं हें अजमावण्यासाठीं मधुरकवीनें त्यास वेदांतांतील कांहीं प्रश्न विचारले. उदाहरण "जड प्रकृतींत जीवचैतन्यानें जन्म घेतला तर तें चैतन्य काय खाईल व कशावर राहील ?" मारणनें ( हें त्या मुलाचें पहिलें नांव होतें. ) तत्काळ उत्तर केलें 'तें चैतन्य प्रकृतिच खाईल ( प्रकृतींतील सुखदुःखें भोगील, व प्रकृतींतच राहील.)" हें उत्तर ऐकून मधुर कवि मनांत चपापला व मारण हा कोणी योगभ्रष्ट पुरुष आहे असें त्यास वाटलें. तो मारणजवळच त्याचा शिष्य ह्मणून राहिला व मधुर कवीच्या संवादांमुळें मारणलाही कवित्वस्फूर्ति झाली. त्याला मधुरकवीची संगति, त्याचें संभाषण फार आवडलें व दोघेही एकमेकांच्या सहवाससुखांत राहिले. मारणच्या तोंडून स्वयंस्फूर्तीनें निघणारीं पद्यें मधुर कवि ताडपत्रावर लिहून ठेवीत असे. मारण ३५ वे वर्षी वारल्यावर पांड्यराजाच्या दरबारीं ३०० पंडितांच्या सभेंत मधुर कवीनें त्यांपैकीं बऱ्याचा कविता गाऊन दाखविल्या व त्या सर्वांस फार पसंत पडल्यामुळें त्यांची पुढें तामीळ देशभर प्रसिद्धि झाली. थिरुक्कुरुहर येथें मारणचें मंदिर बांधण्यांत येऊन त्या मूर्तीची पूजाअर्चा सुरू झाली. नम्माळवार व मधुरकवी यांत गुरु कोण व शिष्य कोण? कोणापासून कोणाला स्फूर्ति झाली हें ठरविणें कठिण आहे. मधुरकवीचें वेदाचें ज्ञान नम्माळवारच्या कवितेंत प्रतिबिंबित आहे एवढें खरें. नम्माळवारला लक्ष्मीनारायणांनीं साक्षात् दर्शन दिलें असें म्हणतात. त्याच्या हजार कवितांच्या संग्रहाला 'तिरुवोयमोळी' असें नांव आहे. श्रीरंगमच्या मंदिरांत या संग्रहाला वेदतुल्य मानतात व याचें पठण अद्यापही होत असतें. वैष्णवपंथाच्या प्रसाराला नम्माळवा-

रच्या ह्या काव्यसंग्रहानें फारच मोठें साह्य केलें आहे. त्याच्या कवितेंत वेदार्थ स्पष्ट रीतीनें प्रकट झाला आहे. चोल, पांड्य, तिनेवेल्ली, व त्रावणकोर ह्या सर्व प्रांतांतील प्रमुख विष्णुदेवतांच्या स्तुतिपर अनेक सुंदर स्तोत्रें यानें केलीं आहेत. यावरून पुढें मधुरकवीच्या संगतींत नम्माळवार ह्या सर्व प्रांतांतून हिंडून आला असावा असा कित्येकांचा तर्क आहे. याच्या ग्रंथाला 'द्राविड वेद' असें म्हणतात. नम्माळवार ६ व्या शतकांत झाला असावा असा तर्क आहे. याच्या काव्यांत अध्यात्मदृष्टि सोज्ज्वळ असून जिव्हाळ्याची भक्ति आहे. सृष्टींतील सौंदर्याचें पान करण्याची रसिकता त्यांत होती. अंतःकरणांत उचंबळणारे भक्तीच प्रवाह यानें मोकळ्या व सुरस भाषेंत सहज सोडून दिले आहेत. नम्माळवारच्या प्रेमभक्तीची थोडीशी ओळख करून घेऊं.

४ 'अरे, ठका, तूं माझ्या दृष्टीसमोर येत नाहींस काय? अथवा खरेंच आहे-मी किती पातकांचा आगर आहें! एका उडीसरसा भूमि गांठणारा तूं—मी तुला हांका मारीत आहें, माझें चित्त प्रेमानें आर्द्र झालें आहे; नेत्र अश्रु ढाळीत आहेत हें पाहून 'तूं महापातकी आहेस' एवढें म्हणण्यासाठीं तरी प्रकट होणें तुला शोभणार नाहीं काय? .... हे स्वर्गकांति नाथा! तूं आपल्या उत्फुल्ल नयनांनीं मजकडे पहा बरें! तूं मोठा-फार मोठा आहेस, देवांनांही तूं न दिसणारा आहेस. समुद्रमंथन करणारा, सुदर्शन चक्र हातीं धरणारा, महासमर्थ आहेस. मी क्षुद्र अहंकारी जीव तुला येरे येरे म्हणून बोलावीत आहें. बापा, तुला व तुझ्या चतुर्भुज रूपाला आलिंगन देण्यासाठीं माझे बाहू फुरफुरत आहेत, माझे नेत्र निरंतर अश्रुपूर्णाकुल आहेत, माझा जीव क्षणक्षणीं झुरत आहे, मग तूं नाहीं का येणार! तूं आतांच ये रे! मी दर्शनोत्सुक आहें. माझ्या डोळ्यांना तुझ्या दर्शनाची तहान लागली आहे. तूं सर्वव्यापी आहेस, पण मला तुझें ज्ञान नाहीं हे तुलसीमालाधर! ये रे! साऱ्या पृथ्वींतल्या साऱ्या पुष्पांच्या माळा तुझ्या गळ्यांत घालून तुझें मनोहर रूप पाहून मी आनंदभरित कधीं होईन बरें? मी आक्रंदत आहें, आळवीत आहें, दशदिशा तुला धुंडित आहें, आणि तूं दिसला नाहींस कीं लज्जेनें मान खालीं घालून रडत आहें ........ मी तुझ्यावेगळा आणखीं किती वेळ राहणार बरें! सांग सांग प्रभो! स्वमुखानें सांग एकदां. हे शेषशयना! हे देवाधिदेवा! हे अमृता! हे ज्ञानाच्या परात्परा! हे कमलनयना! हे तेजोनिकरा! तूं आपल्या दयेनें मला सेवासुख दिलेंस. आनंदसमुद्रांत

बुडविलेंस. तुझी चरणसेवाच मला पुरे. प्राणांतसमयीं तुझ्या चरणाचा आनंद दे, आद्यपुरुषा ! व्यापका ! दर्शन दे. **आल्यावांचून तुला येतां येतें !** तुझ्या या दिव्य सेवेनंतर मी संसारकर्दमांत राहीन काय? दयानिधे! ये ये ये.'

"मीं त्याला पकडलें आहे. आतां सोडीत नाहीं. माया निवारण झाली. देहबंध तुटले. त्याचा मार्ग एकदांचा सांपडला. तो ह्या देहपंजरांत प्रविष्ट झाला आहे. मी तुझ्या हृदयांतच कायम राहणार असें त्यांनीं मला वचन दिलें आहे, आतां सारा आनंदीआनंद आहे ! अमृताचें भोजन आहे. तूं मला आजवर कां सोडलें होतेंस ? नाहीं; मीच तुला विसरलों होतों. आतां पळभरही विसरणार नाहीं. हे चरण सोडणार नाहीं; तूं विश्व व्यापलें आहेस, सर्व धर्म व्यापले आहेस, तूं इंद्रियांना अगोचर आहेस, ऐका. तो ज्ञानातीत आहे. आपल्या अंतर्हृदयांत ध्यानानें त्याला पकडा, सर्व बाह्यविषय सोडून त्याला आंत शोधा, तो आंतच आहे.

( पुढें चालू )

---

# अभंग

सांगा श्रीहरीला कैशापरी वानूं । काय यातें ह्मणूं सांगा सांगा ॥ १ ॥
सूर्यचंद्रतारा मणिमौक्तिकमाळा । याच्या मेघमाळा तुळणे आणूं ॥ २ ॥
उपमा या पृथ्वीची अग्नीची वायूची । किंवा आकाशाची यासि देवूं ॥ ३ ॥
उपमा सागराची यांसीं देवूं जातां । दोष महातत्वता वाजतसे ॥ ४ ॥
सागर हा क्षारमर्यादा न सांडी । श्रीहरीची गोडी अनिर्वाच्य ॥ ५ ॥
मधुदुग्धघृतसुधादिकांहुनी । देव सर्वांहूनी गोडगोड ॥ ६ ॥
देव सकलाद्य देव निरुपम । देवीं भवभ्रम असेचिना ॥ ७ ॥
अनादि अनंत अपार अमूप । देव विश्वरूप निजानंद ॥ ८ ॥
वेदांचें हें सार श्रुतींचें भांडार । ज्ञानाचा आकर देवदेव ॥ ९ ॥
सकला धर्मांची शास्त्रांची हे मूर्ती । ऐसीं याची ख्याती सर्वलोकीं ॥ १० ॥
इंद्रियें मनबुद्धि यांच्याही परौता । ज्ञानाच्या वरौता वासुदेव ॥ ११ ॥
जीवींच्या जिव्हारीं हाचि ध्यावा गावा । आतुडे प्रेमभावा देवराव ॥ १२ ॥

# नरनारायणयोग

## प्रवचनकार रा. केशव भिकाजी बापट, चिपळोण

[ चिपळूणच्या हायस्कूलमधील मास्तर रा. बापट हे मुमुक्षुवाचकांच्या परिचयाचे आहेत. मोरोपंती आर्याकेकांचें त्यांनीं बेमालुम केलेलें संस्कृत भाषांतर मुमुक्षूंतून नुकतेंच प्रसिद्ध झालेलें वाचकांच्या पुढें आहेच. गेल्या सालीं "**मुलांचें शिक्षण कसें असावें**" या विषयावर त्यांचे मुमुक्षूंतून प्रसिद्ध झालेले लेख, व कु. बाळूताई खरे व ॲडव्होकेट का. न. केळकर या उभयतांनीं स्त्री-स्वातंत्र्यावर प्रसिद्ध केलेल्या एका चोपड्यावर रा. बापट यांनीं केलेली मार्मिक टीका नुकतीच मुमुक्षूंतून प्रसिद्ध झाली आहे. संस्कृत व मराठी भाषेवर त्यांचें प्रभुत्व चांगलें आहे. अध्यात्म हा त्यांचा आवडीचा विषय असून त्यांत त्यांची चांगली प्रगति आहे. हें खालीं दिलेल्या प्रवचनाच्या सारांशावरून समजून येईल. उपनिषदें, आचार्यांचे ग्रंथ तसेंच प्राकृत संतांचे ज्ञानेश्वरीदासबोधादि ग्रंथ यांचें परिशीलन नेहमीं चालू असून कादंबऱ्यांशिवाय इतर प्रौढ वाङ्मयहि त्यांच्या नित्य वाचनांत असतें. ज्योतिष, वैद्यक, गायनशास्त्र यांतहि त्यांचा चांगलाच प्रवेश आहे. जुन्या आर्यसंस्कृतीचे ते कट्टे पुरस्कर्ते आहेत. हे गरीब स्थितींत वाढले असून ब्रम्हचारी आहेत. शिवाय, ते निस्पृह, निर्लोभी, परोपकारी, एवंगुणविशिष्ट आहेत. रत्नागिरी येथें गेल्या गणपति--उत्सवांत त्यांना मुद्दाम बोलाविल्यावरून त्यांचें श्रीविठ्ठलमंदिरांत "**नरनारायणयोग**" या विषयावर सुश्राव्य प्रवचन झालें. बॅ. सावरकर रत्नागिरीस आहेत, त्यांच्या उपद्व्यापावरून रत्नागिरींत हल्लीं श्रीविठ्ठलमंदिरांत जुना सनातनपक्ष आणि पतितपावनाच्या नव्या मंदिरांत वर्णसंकरपक्ष असे दोन तट झाले आहेत. रा. बापट यांचें प्रवचन अर्थात् सनातनीयांसमोर झालें. नरनारायणयोग हा श्रीमद्भगवद्गीतेच्या रूपानें प्रसिद्ध आहे. आध्यात्मिक दृष्ट्या गीतेचें रहस्य नरनारायणरूपानें वाचकांस कळण्याकरितां बापट यांच्या मार्मिक प्रवचनाचें सार थोडक्यांत खालीं दिलें आहे.]

" वेद हे ज्याच्या निद्रेचे घोर आहेत, अशा साक्षात् श्रीनारायणाच्या मुखांतून निघालेली ती ही भगवद्गीता होय. **कृष्णस्तु भगवान् स्वयम्** म्हणूनच

हिला ' **भगवद्गीता** ' असें नांव पडलें. गीताकार श्रीकृष्ण हे सनातन, म्हणून गीतेंतील ज्ञानोपदेशहि सनातन होय. हा ज्ञानोपदेशहि ' ममैवांशो जीवलोके ' असा आपलाच अंश जो अर्जुन **नर** त्याला केला आहे. ह्मणजे नारायणांनीं नरालाच उपदेश केला आहे. जो जो नर ह्मणून असेल, तोच आत्मज्ञानोपदेशाला अधिकारी आहे. वानरत्व गेल्याशिवाय नरत्व येत नाहीं. नरांमधून वानर कसे ओळखावे ? **'मतयो यत्र गच्छंति तत्र गच्छंति वानराः'** मनाला वाटेल तसें स्वैर वागणारे ते सर्व नर दिसले तरी वानर होत; आणि **'शास्त्राणि यत्र गच्छन्ति तत्र गच्छन्ति ते नराः'** सशास्त्रवर्तनाचे ते **नर** होत. डार्विनच्या मताप्रमाणें वानरांपासून नर झाले असले तरी पुष्कळांच्या ठिकाणीं अद्याप वानरत्वच राहिलें आहे. यामुळें त्यांना उपदेशाचा अधिकार येत नाहीं. "**भक्तोसि मे सखा चेति** " असें भगवंताला म्हणतां येईल असा जो **नर** असेल, तोच अध्यात्मज्ञानोपदेशाला खरा अधिकारी होय. नवविधाभक्तींपैकीं सख्यभक्तीपर्यंत अर्जुन पोंचला होता. अखेर " **शिष्यस्तेऽहम्** " म्हणून आत्मसमर्पण किंवा आत्मनिवेदन करावें लागलें. तेंही युद्धाच्या वेळीं ! अद्यापपर्यंत श्रीकृष्णभगवान् हे नारायणस्वरूप होतेच; परंतु,अर्जुनाची बुद्धि त्यांच्याविषयीं गुरुरूप झाली नव्हती. नारायण अगदीं आपल्याजवळ, अंतरांत असला, तरी त्याला सख्यभक्तीनें भजणारा विरळाच; त्यांतहि त्याची ओळख पटवून घेऊन त्याला शरणागति करणारे नर फारच विरळा ! आपण सर्व **द्वा सुपर्णा सयुजा सखायौ** या श्रुतीप्रमाणें नारायणाच्या अगदीं जवळच आहोंत, इतकेंच नव्हे , तर साक्षात् नारायणच आहोंत; पण **' क्षेत्रांत '** येऊनहि अखेरीस **युयुत्सवः** होतों ! ज्या क्षेत्रांत आपण आलों आहोंत, तें क्षेत्र वास्तविक **धर्मक्षेत्र** आहे. हें अर्जुनाला माहीत होतें, पण प्रबळ आणि पूज्य असे पुरुष पापपक्षांत आहेत अशा व्यक्ति पाहून त्यांच्याबद्दल अर्जुनाच्या मनांत कौतुक वाटून दया उत्पन्न झाली. स्वपक्षाभिमान मूळचा नव्हता असें नाहीं. पण **धर्मक्षेत्र** असून कुरुंविषयीं ह्मणजे पापपक्षाविषयीं—अधर्माविषयींच— त्याच्या मनांत ओढा उत्पन्न झाला. कोणत्याहि नराची अशीच स्थिति होते. **स्व** आणि **पर**, स्वपक्ष व परपक्ष, असा पक्षपात करूनच मनुष्य त्यांत गुरफटला जातो. परंतु, पुण्याचा पापाशीं म्हणजे धर्माचा कुरुशीं, किंवा कुरुचा धर्माशीं केव्हां तरी झगडा होण्याचा प्रसंग येतोच; आणि मग मात्र बुद्धीचा गोंधळ उडून अखेरीस

" **यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे** " असें हृदयस्थ परमात्म्यास म्हणणें भाग पडतें, पण ज्या भूमिकेवर बसून ही शरणागति करावयाची, ती भूमिका—मात्र अर्जुनाप्रमाणें **सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत** याप्रमाणें आपण **स्व** आणि **पर** हे दोन्ही पक्ष सोडून " उदासीन " पणें दोहों पक्षांहून अलिप्त होऊं तेव्हांच मिळणार. तोंपर्यंत केलेले विचार हे पक्षपातीच असणार. अशा रीतीनें स्वपरभाव टाकून शरण गेलें पाहिजे; व नारायणापासून आपण कसे विभक्त नव्हेंत, तें समजून घेतलें पाहिजे. **निमित्तमात्रं भव** कारण तुझें यांत कांहीं नाहीं, असें या **स्व** आणि **पर** या झगड्यांत श्रीकृष्ण आपल्यास सांगतात तेंच खरें. आपण प्रवाहपतित असून झगड्यांत सांपडलों आहोंत असें वाटतें, हाच भ्रम होय; आणि आपल्यावांचून हा **कर्मयोग** कसा चालेल असें वाटणें हाही भ्रमाचाच प्रकार होय! आपली भूमिका स्थिर करण्यास ' **विषाद-योग** ' अथवा **वैराग्य** आणि **शरणागति** हाच गीतोपदेशाचा पाया व ' **मोक्षसंन्यासयोग** , हा गीतोपदेशाचा कळस होय. या कळसापर्यंत चढून **संन्यासी** होऊन मगच कर्माच्या प्रवाहांत कोठेंही आणि कसेही आपण असलों, तरी अर्जुनाप्रमाणें युद्ध करूनही आपल्यास अभंग व अलिप्त राहातां येतें. परंतु, आधीं हा **नरनारायणयोग** केला पाहिजे. तोहि हें **धर्मक्षेत्र** मिळालें आहे, त्या अवधींत साधला पाहिजे. **योगस्थः कुरु कर्माणि** हें खरें आहे, पण **कुरु कर्माणि** हा कांहीं उपदेश नव्हे. कारण, कर्मांत असल्यामुळेंच तर गोंधळ उडाला आहे. आपण कर्मांतून उत्पन्न झाल्यामुळें अकर्मकृत् राहाणें शक्यच नाहीं. त्याला उपदेशाची जरूर नाहीं. म्हणून उपदेशाचें रहस्य **कुरु कर्माणि** यांत नसून " **योगस्थः भव** " यांत आहे. हाच उपदेश खरा होय. हा योग ज्यांनीं ह्या धर्मक्षेत्रांत बसून जागच्या जागींच साधला, किंवा आपण मूळचेच नारायणस्वरूपी संन्यासीच कसे आहोंत, हें ज्यांनीं ओळखिलें, तेच खरे योगी होत. असे जे **नरनारायणयोगी** असतील त्यांनींच फक्त **जनताजनार्दनयोगांत** पडावें. नाहींतर **इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः** असें होईल. **तुका म्हणे आतां। उरलों उपकारापुरता** या समर्थोक्तिप्रमाणें चळवळीच्या सामर्थ्याला भगवंताच्या अधिष्ठानाची जोड पाहिजे ती ही होय.

—ॐ तत्सत्—

# श्री गुरुदास महाराज–माहूर–यांचीं ध्यानें

## लेखकः—नरहरशास्त्री खरशीकर

( श्री गुरुदास महाराज ऊर्फ अनंतराव मामा धांदरफळे यांचें चरित्र मुमुक्षूच्या माघ शके १८५१ च्या अंकांत आलेंच आहे. माहूर येथील सुप्रसिद्ध श्रीविष्णुदास कवि यांचे हे बंधु होत. हे योगमार्गांत प्रवीण असत. राजयोगाच्या मार्गानें यांचा अभ्यास फार उत्तम झाला होता. यांच्या ध्यानयोगांत गद्य-पद्यात्मक वाङ्मय तयार होत असे, हें वाङ्मय लिहून ठेविल्यास साधकांस उपयोग होईल अशी मीं त्यांना आग्रहाची विनंति केली. नंतर ते लिहूं लागले. ध्यानांत जीं भाषणें होत तीं ते उत्थानावर येतांच टिपून ठेवीत. कित्येक वेळां असें होत असे कीं, ध्यानांत एखादा विषय सुरू व्हावा व व्युत्थान होतांच त्यांनीं तेवढा मजकूर लिहून ठेवावा व पुन्हां ध्यानास आरंभ करावा; नंतर पुढील मजकूर तयार होत असे. ते उत्थानावर येत त्या ठिकाणीं ॐ तत्सत् हीं अक्षरें लिहित असत, पुढील लेखनांत ॐ तत्सत् नंतर लेखन झालेलें दिसेल तें सर्व अशा प्रकारचें आहे, त्यांचें हें वाङ्मय बरेंच मोठें आहे. त्यांतील निवडक ध्यानें साधकांच्या अभ्यासासाठीं मुमुक्षुद्वारें आज प्रसिद्ध करीत आहे.

— १ —

ध्यानांत एकाग्रता झाल्यावर हिरवीगार दाट बाग व सोनेरी रंगाचीं मोठमोठीं फुलें आलेल्या वेली पाहिल्या. स्वच्छ शुक्राची चांदणी त्यांत निळें आकाश, तेथें सोनेरी रंगाचे पुष्कळ सर्प चळवळ करीत होते. गगनचुंबित पांढऱ्या पताका व त्यांवर रुप्याचे कळस. मध्यंतरीं चुनेगच्ची एक लहानसें देऊळ. लहानाचें मोठें होऊन पुष्कळ उंच झालें व रुप्यासारखें चमकूं लागलें. तें अष्टपैलू होतें. त्याच्या दोहोंबाजूंस लागूनच दोन लहान देवळें होतीं. तिघांचे कळस उंच होते. सभोंवतीं झाडी उंबराची होती. सभोंवार पांढरें चिरेबंदीचें दोन हात उंचीचें पटांगण होतें. देवळें पश्चिमाभिमुख होतीं. डाव्या पटांगणावर **दोनतीन सत्पुरुष** देवळाला टेंकून बसले होते. त्यांचा वर्ण नखशिखांत पांढरा होता. त्यांचीं पोटें गणपतीसारखीं मोठीं होतीं. मधल्या दरवाज्यांतून

आंत पाहूं लागलों तों कोणीं म्हणाला ' नीट पहा, नीट पहा, ' दुसरा म्हणाला—नीट पाहणारा पाहूं देईल तेव्हां कीं नाहीं! पहिला म्हणाला, **कां बरं** ' तो म्हणाला **तें त्याचें त्यालाच माहीत.**' मग नीट पाहूं लागलों तों देवळांत उजेड दिसूं लागला. त्या उजेडांत एकदम दिव्य अलंकार घातलेली लहानशी पुष्कळ हात असलेली दिव्य मूर्ति निळ्या डोळ्यांची आकाशांत उंच चमकली. ॐ तत्सत्

( २ )

मन निर्विकल्प होण्यांत आनंद, षण्मुखी करण्यांत देखावे व तद्रूपता. एका मनुष्यानें धांवत येऊन माझ्या तोंडाला बंदूक लाविली . आत्मस्वरूपी श्रीदत्तगुरूचें स्मरण करतांच **एक गौरवर्ण उंच भला धिप्पाड संन्यासी भगव्या छाटीची कास घातलेला अंगावर भगवें गुंडाळलेला उजव्या हातांत उंच दंड घेऊन जोरानें पाय आपटीत समोरून येत होता.** डोळे वटारून पाहात कांहीं तोंडानें बडबड करीत उजव्या बाजूनें झरझर मागें जात होता. पण मन स्थिर करून पाहूं लागलों तेव्हां त्याचा वेग कमी होऊन हळुहळू जाऊं लागला. तेव्हां मनानेंच नमस्कार डोळे झांकून केला. **ॐ तत्सत्**

पुष्कळ प्रकारचे देखावे. पूर्ववाहिनी कृष्णानदीचे कांठीं आंब्याची दाट झाडी. त्या झाडींत पश्चिमाभिमुख तोंड करून असलेली लहानशी तृणाची झोंपडी. ही लांबूनच दिसत होती. तिकडे चालूं लागलों. माझ्या मागून येणारा गृहस्थ ह्मणाला, ती पुढें लहानशी झोंपडी दिसते त्या झोंपडींत चल ह्मणजे त्यांत काय मिळेल तें पहा. मग त्या झोंपडींत जाण्याचा इरादा करून चाललों. ती झोंपडी ३ । ४ हात पलीकडे आहे. तोंच **त्रैमूर्ति श्रीदत्तात्रेय** बाळरूपी नग्न असून दोन्ही हातांच्या ओंझळींत पीठ आणून माझ्या पदरांत टाकलें. मग स्वतःच्या झोंपडीबाहेर उभा राहिलों असतां सागाच्या बेळ्यांतून एक मनुष्य आला. त्याच्या अंगावर कांहीं पांढरे व काळे कपडे होते. त्याचे जवळ एक पांढरा घोडा होता. उजवे हातांत घोड्याचा लगाम व डाव्या हातांत उघडलेली छत्री, डोक्यावर धरलेली होती. त्याच्यामागें दुसरा तसाच घोडा व एक मनुष्य असे आंत आल्यावर पुढच्या गृहस्थास विचारिलें, ' तुह्मी कुठं जातां ? तो ह्मणाला ' **इथंच आलों, तयारी करा.**

—ॐ तत्सत्.—

( ३ )

निजस्वरूपींच देवीचें ध्यान ह्मणजे पृथक् समोर देवीची मूर्ति व आपण ध्यान करतों तसें न करतां आपणच देवी आहोंत असें ध्यान करण्याला आरंभ केला. १० मिनिटांनीं स्थूलदेहाभिमानापासून वेगळा होऊन निराकार स्वयं परमानंदांत होतों. तों कांहीं मंडळी बोलत होती, ती मजभोंवतालीं बसूनच बोलत होती. एक कापडी उजव्या बाजूला उभा असून त्याच्या खांद्यावर मोटी कावड होती. तो गेल्यावर एका उंच पांढऱ्या घोड्यावर बसलेली देवीची मूर्ति मजसमोर ह्मणजे पश्चिमेकडे तोंड करून अधरच उभी होती. ती १४-१५ वर्षांची तरुण होती. तिची दिव्य कांति होती. पायांत सांखळ्या व पैंजण होते. तांबडा लाल जरिकांठी पितांबर नेसलली, सहा हात असून त्यांत आयुधें होतीं. गळ्यांत मोत्यांच्या व पांढऱ्या फुलांच्या माळा दोन्ही पावलांपर्यंत लोळत होत्या. हास्यवदन असून ओंठ लाल दिसत होते. सरळ नाकांत नथ मोठी असून त्याचे मोती बारीक तोरणाएवढे होते. ते मोती चांदण्याचे असावेत. दोन्ही कानांचे खालील बाजूस चारचार मोत्यांचे घोंस लोंबत होते. हे मोती बोराएवढे असून शुक्राच्या चांदणीसारखे चमकत होते. कपाळ मोठें असून कुंकूं बारीक लावलें होतें. भुवयांमध्यें काळा टिकला होता. डोक्यावर मयूरपिच्छाचा सोन्याचा मुकुट होता. हें स्वरूप फारच सुंदर व मोहक दिसत होतें. ३-४ मिनिटांनीं हें दृश्य मावळलें; इतक्यांत एक मुसलमान शिपाई येऊन म्हणालाः—

" **कायके वास्ते तूं बैठा है. क्या तेरा इरादा है. इसमे कुच फायदा नहीं, कायके वास्ते श्रम लेना. हें सब झूट है. आपने स्वरूपमें आनंदसे सहजस्थितीमें मगन हो जाना. ओ! सबसे अच्छा ख्याल कर** " असें बोलून तो निघून गेला. ॐतत्सत्

( ४ )

स्वानंदसौख्य व बरेचसे देखावे पाहिले. मग एक ब्रम्हचारी येऊन दोहों-बाजूंस समयांत दिवे लावून साष्टांग नमस्कार करून गेल्यावर एक गृहस्थ पांढरीं वस्त्रें नेसलेला माझ्या डाव्या मांडीपुढें येऊन वरचेवर वांकड्या दृष्टीनें पाहात होता. मग एक लहानसें मूल पिवळी लंगोटी, कपाळीं कुंकवाचें बोट लावलेलें, हातांत काठी, दोन्हीं गालांवर काजळाचीं गालबोटें असें आलें? तें पोर ह्मणालें "**आतां चल की. जितका लवकर चालशील तितकें लवकर काम होईल. जितका विलंब करशील तितकें लांबेल.** ॐ तत्सत्.

( ५ )

मातृतीर्था(माहूर)सभोंवतीं मोठा मंडप व चार पटांगणें होतीं. उत्तरेच्या पटांगणावरून एक ब्राह्मण पांढरें धोतर नेसलेला व हिरवी टोपी घातलेला येत होता. अलीकडे येतां येतां एकाचे दोन व दोहोंचे तीन असे शेंपन्नास ब्राह्मण फुलांच्या माळा घातलेले अलीकडे आले व सुस्वर गायन सुरू झालें. दोन दिवे होते तेथपर्यंत येऊन गुप्त झाले. ॐ तत्सत्.

( ६ )

बरेच ऋषि पोथ्या पुढें ठेऊन अध्यात्मचर्चा करीत होते. १-२ श्लोक मीं वाचले होते. शेवटीं **आपण वजा करून बाकी तेंच खरें. तें पहा म्हणजे समजेल . तें समजेल हें वजा करून शिल्लक तदाकारता !** असा सिद्धांत तेथें झाला. ॐ तत्सत्

( ७ )

निर्विकल्प स्थिति व स्वच्छ चंद्राप्रमाणें दिव्याची ज्योत व चंद्रासारखा थंड प्रकाश गायन वगैरे व शेवटीं एक पांढरी गाय उंच आकाशांत उत्तरेकडे तोंड करून उभी होती. तिचे मस्तकाचे वर तीन हात उंचीवर अधर ❀ अशा आकाराचा लाल सूर्योदय होऊन मावळला. ॐ तत्सत्

( ८ )

प्रथम लाल मग स्वच्छ प्रकाश ; दोन हात उंच समया होत्या; त्यांत, दोन दिवे असून एक जटाधारी पुरुष येऊन त्यानें पाटावर पोथी सोडून ठेविली व नमस्कार करून गेला ' ती पोथी पाहिली तिचें नांव ' **मनःश्चंद्र-बोध** ' असें तांबड्या शाईनें लिहिलें होतें. ॐ तत्सत्

( ९ )

" **श्रीगुरुपादुकेची सेवा करायला सांगितली पण दैव कोठें करूं देतें? त्याला कुणी काय करावें** " असा शब्द घोर अरण्यांत सांपडलों असतां दाट झाडींतून ऐकण्यांत आला. ॐ तत्सत्

( १० )

चंद्रग्रहणाला हरिदासबुवा आले ते म्हणाले मजपाशीं मनश्चंद्रबोध नांवाची एक पोथी आहे. तेव्हां मला ध्यानांत पाहिलेल्या पोथीचें स्मरण होऊन मी त्यांस म्हणालों, ही पोथी तांबड्या रंगानें नांव छापलेली असून लांबट आहे काय ?

ते म्हणाले होय. मला पाहण्यास पाठवा असें ह्मणतांच देईन ह्मणाले. ती पोथी काल खंडेराव यांचे बरोबर आली आहे.आतां चांगली वाचून पाहीन्. ॐतत्सत्

रात्रौ झोंपेच्या वेळीं **देदीप्यमान श्रीदत्तमूर्ति अधर दिसली** ॐ तत्सत्

नाना प्रकारचे देखावे व उभे गोपीचंदनाचे नाम लावलेले पांढरे पोशाख केलेले काळ्या रंगाचे तीन इसम येऊन बसले. ते कांहीं बोलत होते. मग अधर उंच देवी दिसली. तिच्या भोंवतालीं मखर होतें. ती उभी असुन गौरवर्ण होती.हिरवें लुगडें व पिवळी चोळी होती .डोक्यास मुकुट असून तिला आठ हात होते . त्यांत आयुधें होतीं, उजवा पाय मागें व डावा पाय पुढें ठेऊन पवित्र्यांत उभी होती. अलंकार व पुष्पमाळांनीं ती भूषित होती.३-४ मिनिटें ती मूर्ति होती. मग गुलाबी -भगव्या- रंगाचे पोषाख केलेल्या १०-२० मंडळींचा घोळका आला. त्यांत भगवें पांघरून कोणी निजलें असावें अगर झांकून ठेविलें असावें. नंतर गुप्तरूपानें संस्कृत बोलण्याला आरंभ झाला. सरासरी अर्धातास भाषण होत होतें. त्यांत गद्यपद्य होतें, व मीही संस्कृतांतच गद्यपद्य बोलत होतों. मला संस्कृत येत नसून बोलतां कसें येतें याबद्दल नवल वाटत होतें. असें बोलतां बोलतां शेवटीं मला इतकें सांगितलें कीं, **भक्तानें मजवर कृपा कर असें देवाला कधींही ह्मणूं नये हे लक्ष्यांत ठेव.** उत्थान होतांना स्वइच्छेप्रमाणें पुन्हां देवीचें दर्शन झालें.

**पद** ( मूर्तिमंत भीति उभी ही चाल )

सांगणें तें हेंचि तुला मि सांगतोंचि एकदां ।
फक्त भक्तिनें प्रमाण करित जा अनेकदा ॥ धृ ॥

मार्गशीर्ष कृष्ण चौथ बुधवार रात्र शके अठराशें
एकतिशी प्रसिद्ध ध्यानि कायदा ॥ सांगणें ॥ १ ॥

भक्त तो विभक्त नव्हे सोडुनि देव वेगळा ।
भक्त मी ह्मणेन त्यास नेसुटे आपदा ॥ सांगणें ॥ २ ॥

सच्चिदानंद प्रभुस मी तुझाचि म्हणुनियां
मागणें हेंचि पाप गृहसुतादि संपदा ॥ सांगणें ॥ ३ ॥

एक एक देव भक्त शांत सर्वदा विरक्त ।
जेविं दीप्ति जाइनाच त्यजुनि भानुच्या पदा ॥ सांगणें ॥ ४ ॥

सुबोध स्पष्ट ऐक हा श्रीगुरूस गुरुदासें ।
करीं कृपा आम्हांवरी असें न प्रार्थणें कदा ॥ सांगणें ॥ ५ ॥

ॐ तत्सत्

( १३ )

दाट झाडींत पूर्वाभिमुखी असलेल्या ब्राह्मणानें पोथीचें एक पान धरून त्यावरील सर्व अक्षरें दोन्ही हातांनीं झांकून पहिल्या ओळीच्या मध्यें **पापच्छेद** एवढींच अक्षरें दाखविलीं तीं वाचली. चंद्रप्रकाश, देहविस्मृति, लगेच उत्थान त्यांत विचार कीं, **देहाभिमानापासून वेगळें होणें तेंच आपलें सुखस्वरूप व शांति तर हीच साधली पाहिजे; व प्राणायाम, ध्यान वगैरे फारच सावकाश किंचितही गडबड न करितां अभ्यास केल्यास फारच सोप्या रीतीनें निजस्वरूपोपभोग भोगतां येण्यास हरकत नाहीं** असा विचार करून त्याप्रमाणें संशय न धरतां मन एकाग्र करण्यास आरंभ केला. तो एकाएकीं निर्विकल्प आनंद एक मिनिटभर वाटला. **स्वानंद अनुभवला फार चांगलं झालं असं वाटतांच उत्थान!** पुन्हां एकाग्रता होतांच तळहाताचा रंग फारच गोरा, बोट सरळ नाजूक, त्यावर चक्रें व तळ **हातांतील चक्रें, शंख वगैरे चिन्हें ठळक रेघांनीं दिसलीं.** ॐ तत्सत्

१४ **पद** ( चाल— राम स्मरावा राम )

जगदंबा ध्यानांत पाहिली । जगदंबा ध्यानांत ॥ धृ० ॥
दाट निबिड आमराई नारळी । कल्पद्रुम बनांत ॥ पाहिली जगदंबा० ॥१॥
स्वयंप्रकाशित सिंहासनि स्थित । बसलि हृदयसदनांत ॥ पाहिली० ॥२॥
आत्मज्योति सदा आनंदी । आनंदीत मनांत ॥ पाहिली० ॥३॥
वरदहस्त सुप्रसन्न प्रेमें । हांसतसे वदनांत ॥ पाहिली० ॥४॥
जाइजुई शिरीं गळिं सुमनांचे । हार कुंडलें कानांत ॥ पाहिली० ॥५॥
सुरवर किन्नर नारद तुंबर गुंग होती गानांत ॥ पाहिली० ॥६॥
सान्निध्य श्रीपुरुषोत्तम सद्गुरु । दंग होते भजनांत ॥ पाहिली० ॥७॥
शरणागत गुरुदास श्रीगुरु । माउलिपद नमनांत ॥ पाहिली० ॥८॥

---

# भक्तिमार्गाविषयीं बोबडे बोल.

## लेखकः—कृष्णा परशुराम घावडे,

मुखीं नाम हातीं मोक्ष । ऐसी साक्ष बहुतांसी ॥१॥ ( संततुकाराम )

१ ईशप्राप्तीकरितां ह्या मानवी सृष्टींत ज्ञान, योग, निष्काम कर्म, भक्ति इत्यादि मार्ग आपल्या पूर्वजांनीं अविश्रांत महत्प्रयत्न करून अनुभवानें चोखाळून ठेविले आहेत; त्या सर्वांमध्यें सुलभ असा भक्तिमार्ग हा होय. ज्यांनीं ज्यांनीं ह्या भक्तिमार्गाचा तात्त्विकरीत्या विचार केला किंवा स्वतः अनुभव घेतला अशा सर्व सत्पुरुषांची या बाबतींत एकवाक्यताच दिसून येते.

२ कलियुगांत तर या निर्मळ **भक्ति**देवीला फार महत्त्व आलें आहे. प्रस्तुत कालाच्या पडोशानें भावी कालचा विस्तृत नकाशा पुढें धरून त्याजकडे जरा चिकित्सक दृष्टीनें पाहूं लागल्यास मोक्षस्थानीं बिनधोक जाणारा राजमार्ग भक्तिच आहे. कारण, या कलियुगांत जन्मणाऱ्या हीनबळ, क्षीण आयुष्य, चंचल वृत्ति, इंद्रियवश, विषयाधीन जीवानें धर्मभ्रष्ट अशा वर्तमानकालच्या प्रतिकूल मलिन आरशांत निर्मल हरिस्वरूप पाहण्याकरितां अन्य मार्गाचा अवलंब करणें म्हणजे फार दुर्घट होय. ' रोग जाय दुधें साखरें । तरी निंब कां पियावा ॥ ' या उक्तीप्रमाणें भक्तीचाच स्वीकार करणें सोईचें आहे. सर्वसाधारण लोकांना श्रुति, स्मृति, पुराणें, सत्पुरुष यांनीं आगाऊच कलियुगाकरितां निवडून दिलेल्या सोप्या भक्तिमार्गाचाच आश्रय करणें श्रेयकर होय.

३ ज्ञानमार्गावर आरूढ होण्यास वेदोक्त निष्काम कर्माचरण, प्रगल्भ-विवेचकशक्ति, चित्तस्थैर्य, साधनचतुष्टयसंपन्नता, वेदाध्ययनाधिकार इत्यादि सामग्री सिद्ध असलेला पुरुष हवा. योगमार्ग तर-बलहीन, अस्थिरचित्त, विसंगत अभ्यासी, अनिग्रही, अधीर, परतंत्र अशांना - आपल्या जवळच उभा राहूं देत नाहीं. शिवाय, अद्वैतज्ञानावांचून योगही लंगडाच ! ज्ञानाभावीं तो सिद्धीसारख्या भलत्याच खडकावर आदळणार किंवा द्वैतरूपी पिंजऱ्यांत कोंडणार ! व जरा नजरचूक झाली कीं, धोका हा ठेवलेलाच. बरें, वेदोक्तकर्ममार्गाचा स्वीकार करूं

म्हटलें, तर बाह्यवृत्ति-पर्यायानें प्रभुप्रेमत्रच खुलविणाऱ्या अशा राष्ट्रांच्या चळ्ठ-ओढीमध्यें व त्यांतही परदेशांतील परधर्मीय लोकांच्या नेतृत्वाखालीं स्वार्थी वृत्तीच्या दडपणानें आकंठप्राण झालेल्या क्षीण देशांत, आणि रात्रंदिवस अविश्रांत श्रम करूनही पोटभर अन्न मिळत नाहीं अशा स्थितींत, तसेंच ज्याचें ब्राम्हमुहूर्त शौचशुद्धीकरितां बिछान्यावर डोळे मिटून असतां 'अशक्ततेकरितां काय करावें' या चिंतनांत जातें अशा दैहिक अवस्थेंत आणि स्वेच्छाचरणप्रवृत्तिपरांत वेदोक्त कर्माचरणाचें नांवही काढणें कठीण झालें आहे! किंबहुना तें बिचारें कर्मच स्वत: नामशेष होऊं पहात आहे! वरील मार्गांचे अधिकारी या नवयुगांत बोटांवर मोजण्याइतकेही मिळतील कीं नाहीं याची शंकाच आहे.

४ आम्हीं हरीसमीप असलें पाहिजे. आमचे कडून प्रभूची अस्खल्य सेवा घडली पाहिजे, त्रिविध तापांच्या आवारांतून निसटून आम्हांस नित्य सुखांत अखंड वस्ती करितां आली पाहिजे, अशी बहुतेकांची जिज्ञासा असणें शक्यच आहे. इच्छा तर फार, व जवळ तर वरील साधनसंपत्तीचा अभाव त्यांतही सभोंवार संसाराचें कर्मजाळ पसरलेलें! अशा अनेक जन्मांच्या चक्रांत सांपडून, भांबावलेल्या **आणि त्रिविध तापांच्या** बेसुमार माराखालीं हालहाल झालेल्या, कुंठितशक्ति जीवांची दया येऊनच कीं, काय त्या दयाघन परमेश्वरानें या सृष्टींत भक्तिबीज पेरलेलें असावें. कांहींही असो, मात्र बहुत कालापूर्वींच त्या बीजाला अंकुर फुटून नारदव्यासादिकांच्या हस्तें वेलीच्या स्वरूपांत भासूं लागलें खरें आणि आतां आतां तर ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ आणि तुकारामादि, कळकळीच्या **अवतारिक** संतांनीं चांगली जोपासना केल्यामुळें, त्या वेलीचा दुरून दिसण्याजोगा हिरवा गार विस्तीर्ण मंडप तयार झाला आहे. ह्या दिव्य-रत्नांनींच आपल्या साध्या आचरणानें भक्तीची सुलभता चांगल्या तऱ्हेनें सर्वांच्या निदर्शनास आणून दिली. 'सकळांसी येथें आहे अधिकार' असें अनुभवानें ठासून सांगून चांगलासा धीर दिला; व ही 'भवविषनाशक अमृतवेली' सांप्रतकाळीं तर रामबाण मात्राच आहे असें प्रत्यक्ष दाखविलें.

५ मनुष्याजवळ श्रद्धा व प्रेम हीं असलीं कीं, पुरे! खुशाल या मार्गांत शिरावें. गंमत ही कीं, श्रद्धा व प्रेम ह्या दोन वस्तु तर प्रत्येकास स्वभावत:च प्राप्त असतात! भगवत्स्वरूपाला हुडकून कढण्याकरितां श्रद्धेचा व त्याला पूर्ण-पणें स्वाधीन करण्याकडे प्रेमाचा उपयोग होतो, एकंदरींत या जोडगोळीच्या

बळावरच मनुष्य कृतार्थ होऊं शकतो. श्रद्धेला पुढें करूनच जगांत प्रत्येक व्यक्तीचा व्यवहार होत असतो. व्यवहारपटु पुरुषाच्या कृतीवर व वचनावर जशी आपली नेहमीं श्रद्धा असते, तशीच ती आप्तवचनाच्या ठायीं धारण करून संतांच्या मागोमाग भक्तिमार्गानें चालूं लागावें. तिला हातीं धरूनच विश्वाच्या अनेक धाग्यांवर आपलें स्वामित्व गाजविण्यास मनुष्य प्राणी समर्थ झाला आहे. स्वतःवर व इष्टांवर जें प्रेम असतें त्या प्रेमानेंच भगवंताला वश करावयाचें असतें. आज ईश्वर जरी इतर पदार्थांप्रमाणें दृग्गोचर नसला तरी तो आपल्या सर्व भावनांस जाणण्यास समर्थ आहे, व तो या जगांतच आहे, अशा दृढनिश्चयानें त्याजवर प्रेम करावें. प्रत्यक्ष नसलेल्या-हरवलेल्या पुत्राकरितां त्याचा बाप जसा अत्यंत प्रेमभरित होऊन तळमळतो व पुत्रप्राप्तिस्तव नानाप्रकार करूं लागतो तसेंच आपणांस अज्ञानामुळें, व्यक्त न होणारा-मायापटलांतच स्थित असलेला-भगवान् स्पष्ट अनुभवास येईतों तळमळीत झालें पाहिजे. त्याकरितां हवें तें करण्यास तयार असलों पाहिजे. एवढें करणें कांहीं कठीण नाहीं. कारण, प्रेमी जीव, इष्ट पदार्थ इत्यादिकांकरितां व स्वतःकरितां ह्या जगांत आपण काय करूं शकत नाहीं ? तें व्यावहारिक प्रेमच भगवंतास अर्पण करावयाचें असतें. भक्तीमध्यें प्रेमालाच विशेष महत्त्व आहे. स्वतःच्या व प्रेमी पुरुषांच्या सुखाकरितां आपण जशा भावना, संकल्प व उपचार करतों, तसलेच देवाकरितांही करावे लागतात. एवंच संसारच हरीशीं करावा लागतो ! उत्तरोत्तर वाढत्या व निःसीम प्रेमानें 'प्रभु' निःसंशय वश होतो, असा संतांचा अनुभव आहे.

६ ज्याच्या स्वरूपाचा विचार करतां करतां तीव्रतर कुशल बुद्धीचीही गति कुंठित होतेः---

तैशी जाणीव जेथ न रिघे । विचार मागुता पाउलीं निघे ।<br>
तर्कु आयणी नेघे । आंगीं तयाच्या ॥ ( ज्ञानेश्वरी ७–९ )

ज्यासाठीं वेदही 'नेति नेति 'ह्मणून मौन धरतात अशा त्या अनिर्वचनीय परमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं सामान्य भक्तांचा पाड लागणार नाहीं म्हणून उपकारें देह कष्टविणाऱ्या सत्पुरुषांनीं अचिंत्य ब्रह्मपुरीमध्यें प्रवेश होण्याकरितां

धरीयेलीं सोंगें । येणें अवघीं पांडुरंगें ॥१॥<br>
तें हें ब्रह्म विटेवरी । उभें चंद्रभागेतिरीं ॥२॥ (तुकाराम)

" विश्वीं विश्वंभर रिता नाहीं ठाव । प्रतिमा तो देव नोहे कैसा ॥ १ ॥ "
असें प्रश्नोक्तीनें पटवून देऊन सगुणोपासनेकरितां प्रतिमा–पूजनाचा परिपाठ पाडला. सर्व चराचर सृष्टीचा मालक एकच असला पाहिजे. तसेंच तो सर्वव्यापी, अव्यक्त, अचिंत्य, निर्गुण निराकार व शुद्धस्वरूप असून आपल्या अनिर्वचनीय मायाशक्तीच्या योगेंकरून सगुण स्वरूप धारण करितो, नानाप्रकारें नटतो, त्या भावनेनें युक्त होऊन तो जणुं ' हरीच ' या प्रतिमारूपानें आपल्य समोर आहे, तो सर्वज्ञ असल्यामुळें आपल्या सर्व उपचारांना जाणूं शकतो, त्याला ते अर्पण होतात व ज्याअर्थी तो सृष्टीचें नियमन करूं शकतो त्याअर्थी आपल्या सर्व वासनाही पुरविण्यास तो समर्थ आहे, अशी दृढ भावना होणें साहजिक आहे. लहान मुलांनाही प्रतिमेकडे बोट दाखवून " बाळा, हा देव, आहे बरें! अशी याची पूजा करावयाची म्हणजे तो आपणांस सुखांत ठेवतो ! " एवढें उच्चारलें कीं पुरतें. एकूण प्रतिमा पूजनाधारें जगदीश्वराची भक्ति आबालवृद्धांनाही शक्य आहे.

७ कोणत्याही तात्त्विक शोधास्तव प्रयत्न करणाऱ्या जिज्ञासूनें त्या त्या तत्त्व–प्रवीण अनुभविकाच्या आश्रयानें चालल्यास सुखानें ध्येय गाठतां येतें. तदनुरूप सर्वश्रेष्ठ जगन्नायकाच्या शोधाकरितां साधकास सद्गुरूची आवश्यकता असणें न्याय्यच होय. हरिसुखाची गोडी चाखल्यामुळें ' ब्रह्मरसें गेलें भरूनियां अंग ' असा आपला अनुभव सांगणारे व ' निराभासीं पूर्ण झालों समरस ' याप्रमाणें तृप्तीचे ढेंकर देणारे महात्मेच खरे सद्गुरु होत. यांच्याच ठिकाणीं सर्वांना भवचक्रामधून काढून भगवंताचे ओंच्यांत घालण्याची सत्ता विलसत असते. यांचा नेत्रकटाक्ष हीच ईश्वरी कृपेची लाट ! यांचे सहज शब्द हेंच आत्मवचन, यांचा स्पर्श हेंच गंगास्नान ! किंबहुना प्रत्यक्ष बोलतें चालतें असें ब्रह्मच म्हणावयाचें! अशांचा लाभ ज्यांना जन्मांतरींच्या महत्पुण्याईनें लाभला त्यांची मुक्ती घरचीच झाली. पण अशा सद्गुरूऐवजीं ब्रह्मज्ञानाचा उसना आव आणून जग नाडविणाऱ्या पोटबाबूंचेंच आजकाल पेंव फुटलें आहे ('अतएव सावधान !') भक्तिमार्गाचें स्वरूप साधें व आचरण्यास सुलभ असल्यामुळें त्याचे अनुयायी जास्त, सत्समागमानें भागण्यासारखें आहे. प्रसंगोपात्त चरित्ररूपानें व वाङ्मयरूपानें संत आपणांस आधारभूत आहेतच, मग 'मनोमार्गगति श्रीपतीला आकळण्यास 'कोणती हरकत आहे? संतांचें हस्तलिखित व मुखोद्गार, त्यांना मान्य असलेले ग्रंथ, व प्रेमळ निरहंकारी, निस्पृह, नम्र, सरलस्वभाव असे

भाविक पुरुष यांच्या ठिकाणींच गुरुभाव ठेवून जीवानें आत्महित साधावें. भाविकांकडून झालेलें शंकासमाधान व त्यांचा प्रत्यक्ष अनुभव हीं संतवचनांच्या कसोटीवर लावून सदसद्विवेकबुद्धीच्या डोळ्यानें निरखून पहावीं व ज्ञान आचरणांत आणावें म्हणजे झालें. परस्परविरोधी भासणाऱ्या संत–वचनांचा प्रथमावस्थेंत बोध न झाल्यामुळें साधक गोंधळून जातो. अशीं वचनें निरनिराळ्या अवस्थेचीं द्योतक, भावदर्शक, रुच्योत्पत्तिक, अन्यमतखंडनीय, सद्वस्तु-निदर्शक वगैरे स्वरूपाचीं असतात. त्यांचें सुज्ञांपासून ज्ञान करून घ्यावें म्हणजे सोईचें होतें.

८ निष्काम भक्तिच चित्तशुद्धीला कारण होते:—

' जाळी महाकर्में । दावी निजसुख वर्में ' असा संत आपला अनुभव सांगतात. अनेक वासनांनीं भरलेल्या भाविकांचे मनोरथ तो ' भक्तकामकल्पद्रुम प्रभु ' पूर्ण करतो ! स्वतः भगवान् ह्मणतात " लभते च ततः कामान्मयैव विहितान्हि तान् ' आणि या म्हणण्यास त्याचे भक्तही ' जसा ज्याचा भाव । तैसा होय त्याकारणें ' ' अंतरींचा देणें इच्छा--भोग ' अशी साक्ष देतात. इच्छित कामना पूर्ण होऊं लागल्यामुळें या अजाण भक्ताची भगवंताविषयींची कामना आणि आवड अतिरिक्त वाढूं लागेल. सत्समागमानें आयतें बोधामृत मिळाल्यामुळें पुढें पुढें आपोआपच कामेच्छाही कमीकमी होत जाईल; सद्गुणांची वाढ होऊन सत्कर्मांकडे प्रवृत्ति होईल; अशा रीतीनें भक्तीचें छोटेंसें रोपटें चोहोंकडून भराभर वाढत जाऊन ईश्वर-भेटीची अत्यंत उत्कण्ठा लागेल; नामामृताचा झरा सतत वाहूं लागून पूर्व व सद्यःपापामुळें मलिन झालेलें अंतःकरण स्वच्छ होईल; व लवकरच निष्कामभक्तीच्या उंच मळ्यावर चढण्याची पात्रता बाणेल !

९ या अफाट संसाराकडे पाहून-- "हरहर ! कोण विषयेंद्रियांनीं घेरलें ! काय ही भयानक भ्रांति ! अरे ह्या विषयदऱ्या ! कोण काम व क्रोध ! हे तर मारेकरी ना ? 'देवा' बांधलों बांधलों ! चंचल मनोवृत्तीनें कितीतरी जखडलें आहे!! हरी हरी! कोण या जिवंत यमयातना!!! विठ्ठला, धांवा हो धांवा. सोडवा सोडवा ह्या बंदिखान्यांतून!" असले कळकळीचे उद्गार उठूं लागतात. अनेक कल्पना दत्त ह्मणून उभ्या राहतात. ही अंतःस्थिति आणि बाहेरून निरंतर जागविणाऱ्या संतांचीं ' क्षणक्षणा हाचि करावा विचार । तरावया पार भवसिंधु ॥ नाशिवंत देह जाणार सकळ । आयुष्य खातो काळ सावधान ॥' अशी जागृति. येणेंप्रमाणें

आतून बाहेरून एकच कोंडमारा झाल्यानें अज्ञान--निशा झराझर उतरत जाते; व लगेच खडबडून उठून ज्ञानोदयाचें चिंतन करीत होत्साता भाविक सत्समागमाचा हव्यास करितो. ‘ शुद्धविवेकें परमेश्वर । ओळखावा ’ याचा विचार करूं लागतो. संसारतरंगांनीं भरलेलें अंतःकरण हळुहळु रितें व्हावयास लागून जगदीश्वराच्याच कल्पना-तरंगांनीं तें भरूं लागतें ! त्या नादांत इंद्रियेंही कधीं कधीं हरिसुखाच्याच भोग भोगण्याची इच्छा प्रदर्शित करतात. भक्तितत्त्वें कितीतरी गोड आहेत पण ! इतरांना जगत् दुःखरूप तर भक्तांना आनंदाचा अवतार ! इतरांना कर्में बाधक पण भक्तांना तींच भगवत्पूजनाची सामग्री ! इतरांना कुटुंबांतील माणसांची नावड, तर भक्तांना प्रभूच्या विभूति सारख्या ! अन्यांना स्वबलानें व कष्टानें मार्गक्रमण तर भक्तांना तेंच ईशशक्ति-सहाय्यामुळें सुलभ ! इतरांपुढें अहंकाराचा बाबुलबोवा, तर भक्तांपुढें नम्रतेमुळें निर्भय प्रदेश !

१० आप्तवाक्यांचें अव्याहत श्रवण मनन चालू झाल्यामुळें सृष्टि आपलें गूढ भक्तापुढें उकलूं लागते. त्याचा हारपलेला ‘ मी ’ त्याचा त्यालाच सांपडूं लागतो. आजवर अज्ञानांधकारांतून केलेल्या मार्गक्रमणाबद्दल बुद्धीला लाज वाटूं लागते. अनेक जन्मांच्या येरझारा फुकट गेल्यामुळें मनच मनाला टोंचतें, इंद्रियें स्तब्ध होतात, विषयांना तर आपला काळ जवळच आला असें वाटून थरथरी सुटते; पण हा भक्त मात्र आनंदांत शिरकाव करूं पाहातो. याप्रमाणें अजाणत्या भाविकाचें रूपांतर ज्ञानीभक्तांत होण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागतात. छोट्याशा मूर्तीमधील त्याचा चिमकुला हरी शुद्धभक्तीमुळें भक्ताच्या विवेक-शक्तीबरोबर वाढीस लागून जगभर होतो आणि भक्ताला अंतर्बाह्य वेढून सृष्टी-बाहेरही माझी व्याप्ती अमर्याद आहे असें दाखवून, आपल्या स्वरूपासह भक्ताच्या स्वरूपाचें सर्व गूढ ज्ञान त्याच्या स्वाधीन करतो! अनिर्वाच्य हरी अनुभवास आलेला पाहून आनंदानें त्याचें हृदय उचंबळून येतें. अचिंत्य आत्माराम चिंत्य झाल्यामुळें त्याचेंच अखंड चिंतन चालतें.

उजळलें भाग्य आतां । अवघी चिंता वारली १ ॥
संतदर्शनीं हा लाभ । पद्मनाभ जोडला ॥ २ ॥
संपुष्ट हे हृदयपेटी । करूनि पोटीं सांठवूं ॥ ३ ॥
तुका ह्मणे होता ठेवा । तो या भावा सांपडला ॥ ४ ॥

भक्तीचे उदरांतून ज्ञान उपजल्यावरच भक्तीची खरी गोडी आहे. जिकडे पाहे तिकडे 'कृष्ण गोविंद गोपाळ, झाल्यानें याचा निदिध्यास वाढत जातो. देव बोलत नाहीं. हें पाहून त्यावर रुसतो, मोठ्यानें रडतो; केव्हां लेंकरूं होऊन, केव्हां सखा होऊन, तर केव्हां सखी होऊन प्रभूचे गुणानुवाद गातो. एका रूपानें एका नामानें त्या एकरूप परमात्म्याची अगर कधीं कधीं अनंत रूपांनीं अनंत नामांनीं त्या अनंताची अनंत प्रकारें भक्ति करण्यांतच हा दंग होतो. अष्ट सात्त्विकभाव उत्पन्न होऊन इंद्रियेंही विषयाला विसरतात. मनाचें मनपण जातें. वृत्ति तटस्थ होते. त्यामुळें देहाला व जगालाही तो विसरूं पाहातो. त्या प्रभूचें स्वरूपच असें मोहक आहे कीं:—

कळों नेदी सुख दुःख । तहान हारपली भूक ॥
जाय तिकडे लागे पाठी । नाहीं तुटी आठवाची ॥
दाऊनिया रूप डोळां । मन चाळा लावियेलें ॥
आणिक तोंडा पडली मिठी । कान गोठी नायकती ॥ १ ॥

अशी साक्ष तो पटविल्यावांचून राहातच नाहीं. हरी आपल्या आनंदमय स्वरूपाचा निर्मल प्रकाश त्याच्या शुद्ध अंतःकरणांत पाडल्यावांचून राहात नाहीं. त्यावेळीं त्याच्या सर्व दुःखाचा परिहार होऊन तो अत्यानंदांत बुडून जातो कीं आनंदच त्याच्या स्वरूपांत बुडी मारावयास जातो कोणास कळे !

"आनंदाचे डोहीं आनंद तरंग। आनंदाचि अंग आनंदाचें। ब्रह्मरसें गेलें भरोनिया अंग आधील तो रंग पालटला ॥" असले उद्गार हृदयांतून उठत असतात. ज्ञानी पुरुषाची आनंदावाप्ति, योग्याची सानंद सविकल्पसमाधी व भक्ताची वरील अवस्था एकच. पण एवढ्यानेंच कित्येक भक्तांचें समाधान होत नाहीं; तर यापूर्वीच किंवा परोक्षज्ञान होण्यापूर्वींच भक्तास सगुण स्वरूपाचाच छंद लागून दृढ उपासनेनें-ज्ञान्यास किंवा योग्यास न होणारा सगुण साक्षात्कारही तो करून घेऊं शकतो.

११ मंत्र, तंत्र, जप, तपानुष्ठानानें प्राप्त होणाऱ्या सर्व शक्ति अनायासेंच भक्ताचे घरीं चालत येतात, इतकेंच नव्हे तर ज्ञानी पुरुषास व योग्यास ज्या सिद्धि प्राप्त होतात त्याही भक्त-चरणापाशीं घिरट्या घालतात ! पण हे भक्त प्रेममदानें मातलेले असतात. ते:—

ऋद्धि सिद्धि सुखें हाणितल्या लाता । तेथें या प्राकृता कोण मानी ?॥ असा निश्चय करून अखंड हरिगुणानुवाद गात सुखानें कालक्रमण करतात. भगवत्स्वरूपाहून एकही पदार्थ त्यांना प्रिय नसतो. 'मागण्याची वास पाहे मुखाकडे । चिंतिल्या रोकडे मनोरथ ॥' असा समर्थ हरी सदा जवळ असल्यावर त्यांचें ऋद्धिसिद्धींकडे लक्ष्य तरी कसें जावें !

तुका ह्मणे हरीवीण । त्याशी अवघा वाटे शीण ॥ हें भक्तिसुख भोगीत असतां 'लाभाचिया सोसे पुढें चाली मना' असें होऊन परमात्मस्वरूपांत भक्त विरून जातो. तो ठाव आघातावेगळा असून तेथें त्रिपुटी नष्ट होते, तो स्वयं-स्वरूपच होतो. एवंच देव पहावयास गेलेला भक्त यावेळीं देवच होतो. पुढें कर्तव्यच उरलेलें नसतें. तेंच स्थळ तो अचळ धरून राहतो. योग्यांची निर्विकल्प समाधी व ज्ञान्यांची ब्राह्मीस्थिति (अपरोक्ष साक्षात्कार) ती हीच ! तथापि मुक्तीवरील भक्तीचा आस्वाद भक्त घेत असतात.

भक्तींचें पर्यवसान मुक्तींत नसून भक्तींतच आहे! धन्य या भक्तांची !!

भक्तीची कास धरणाऱ्या दुर्बलासही परमपदाची प्राप्ति निश्चयानें होते. ह्मणूनच नारदादि 'भक्तिरेव गरीयसी! भक्तिरेव गरीयसी! भक्तिरेव गरीयसी!' असे प्रेमळ अंतःकरणानें निश्चयाचे उद्गार काढतात. अशा प्रकारची हा भक्ति सुलभ 'कामधेनुच' नव्हे तर काय?

---

# भक्तमयूर-केकावलि

रामत्रयमध्येऽयं मध्यमरामत्वमात्मनो व्यक्तम् ।
धृत्वा नितंबबिंबं स्वकराभ्यां ज्ञापयति विलोकयत ॥१४२॥

---

वृत्ति यदृच्छालब्धें करा, स्मरा मज, धरा तनुसि हातीं; ।
मग मी आलिंगाया उभाच हें सुचवितों बुधव्रातीं ॥ १४३॥
कुरुत यदृच्छालाभैर्वृत्तिं, मां स्मरत मम तनुं स्पृशत ।
अस्मि परिष्वंगार्थं स्थित इत्थं सूचयति बुधसमाजे ॥१४३॥

---

मध्येकर मी ह्मणतों नरलोकीं, सत्क्रिया समाधानें ।
करुनी, अन्नोदक द्या भूतीं आर्तीं, स्वसिद्धि या दानें ॥१४४॥
मध्यमलोके यूयं तुष्टस्वान्तेन सत्क्रियां कुरुत ।
दत्तान्नोदकमार्तप्राणिषु, दानेन सिद्धिरात्मीया ॥१४४॥

---

विरहें कराक्रियांच्या अकर्तृता पूर्णकामता सुचवी, ।
करुणोत्कंठा दीनप्रोद्धारीं हें उभ्यापणीं रुचवी ॥१४५॥
इति वदति सदा तिष्ठन् मध्यस्थित निजकरेण सूचयति ।
दीनोद्धरणोत्कंण्ठां क्रियाद्यभावं निजाप्तकामत्वम् ॥१४५॥

---

तूं तों येथेंचि उभा, अंतीं आह्मांसि ठेविशी कोठें ? ।
तरि आपुल्या सख्याला पोटीं ह्मणतो न बोलतां ओठें ॥१४६॥
अत्रावतिष्ठमानस्त्वं कुत्रान्ते सखीन् निवेशयसि ।
इति पृच्छतां मदुदर इति निर्वचनं प्रतिब्रवीत्येषः ॥१४६॥

---

भक्तप्रेमाचा मी परम भुकेलों असें, असें कळवी ।
कटिवरि कर ठेवुनियां उभा, खरा तर्क हा, न दुर्बळ वी ॥१४७॥
अत्र स्थितोऽस्मि नित्यं भक्तप्रेमाशनायितो नितराम् ।
प्रणिधाय करौ कट्यामिति सत्यमयं निवेदयत्येव ॥१४७॥

विषय पहातां सादर तरि जातों म्हणुनियां उभा रुसतो ।
हितबोधग्रहणास्तव करुणाब्धि क्षोभला मला दिसतो ॥१४८॥
विषयेषु सादरा यद्यूयं तस्माद् व्रजामि रोषेण
तिष्ठेदितिव गमयन् हितबोधायाकुलो दयाब्धिः किम् ॥१४८॥

मी साक्षी, या सर्वीं अखंडदंडायमान, लिप्त नसें ।
शरणागतास भेटें उभाउभीं कळवितों स्वतत्त्व असें ॥१४९॥
साक्षित्वेनाखंडं विश्वस्मिन् दंडवत्स्थितोऽलिप्तः ।
अत्राहं द्रष्टव्यः सुखेन शरणागतैरिति ख्यातिः ॥१४९॥

प्रेमळ भक्तांहीं मज भेटावें कडकडूनि पोटभरी, ।
कटिं कर ठेवुनि भीमातटीं उभा शुद्धभक्त्यधीन हरी ॥१५०॥
प्रेमपरैर्भक्तैरिह परिरभ्योऽहमयं प्रकाममयम् ।
तिष्ठति भीमातट्यां कटिनिहितकरो हरिः सुभक्तिवशः ॥१५०॥

होती कैवल्याची कलिकाळीं लूट, जे असी न कधीं ।
मागेंहि गोप्रतारीं आली सरयूंत एकवेळ तधीं ॥१५१॥
कलिकालेऽपूर्वतया कैवल्यं लुंठ्यतेऽखिलैरत्र ।
लुंठितमासीत्सरयूधुन्यां प्राग् गोप्रतारतीर्थे तत् ॥१५१॥

सर्वस्वदान केलें पात्रीं, क्षेत्रीं स्वमूर्तिसर्वस्व ।
न सरे अनंत लुटितां, सद्धन सदधीन लुटितसे विश्व ॥१५२॥
सर्वस्वं व्यतरदयं पात्रे, क्षेत्रे स्वमूर्तिसर्वस्वम् ।
पर्याप्तो नानन्तः सद्धनमेतद्विलुंठ्यते लोकैः ॥१५२॥

हे इंद्रनीलमणिच्या कांतिरसाचीच वोतिली मूर्ति, ।
मन तृणकण लिगटतसे, तुह्मी बरी पाहिली खरी पूर्ते ॥१५३॥
ध्रुवमिंद्रनीलमणिरुचि-रसघटितेयं मनोहरा मूर्तिः ।
कण इव मनोऽत्र लग्नं निकाममवलोकिता नु युष्माभिः ॥१५३॥

हा विठ्ठल ठक, ठकिले ठक, ठक पडलें ठकासि जें हरितो; ।
नमचि देतो दाउनि निजार्थ, जनसंचितार्थ संहरितो ॥१५४॥

शठविठ्ठलेन कितवाः प्रतारिता निर्जिता कितवमाया ।
जनसंचितसंहारी स्वार्थं संदर्श्य दिशति नामैव ॥१९४॥

दासहि नामा ठकडा भेटे मग यासि ठकविले तेणें ।
सद्गुण गाय, सुनिपुणें वेधियला कृष्णसारसा जेणें ॥ १९५ ॥

वंचित आसाद्यासौ कितवो मायितर नामदेवेन ।
निपुणेन तेन सद्गुणगानेनायं विमोहितो मृगवत् ॥ १९५ ॥

ऐसे भगवत्तत्पर सदयहृदय संत पंत भेटावे ।
ते सच्छिक्षादाते मुमुक्षुबुद्धीसि होति नेटावे ॥१५६॥

कारुणिका भगवद्वशमनसः संतः सदैव लभ्येरन् ।
सच्छिक्षादातारस्ते हि मुमुक्षोर्मतेरवष्टंभाः ॥१९६॥

सद्हृदयवशीकरण श्रीमत्सीतानिवास या मनुनें ।
त्याच्या जपीं असावें निरत सदा मीं सचित्तवाक्तनुनें ॥१९७॥

' सद्हृदयवशीकरण श्रीमत्सीतामनोरमणमनूना ।
कायमनोवाग्भिरहं त्वज्जपनिरतः सदा भविष्यामि ॥१९७॥

हे भरतसुमित्रात्मज ! हे सीते ! माय आयका विनती, ।
सिकवा साधुजनाला कैसी शरणागतें करावि नति ॥१९८॥

हे भरतसुमित्रात्मज मातः सीते मदर्थनां शृणुत ।
शरणागतेन साधुं प्रतिकर्तव्या कथं नतिः शिष्ट ॥१९८॥

तुह्मी वसिष्ठगाधिजमुनिमुखसच्चरणसेवनोद्युक्त ।
गुरुजनभजन शुभजनीं शिकवा; होईन भवभयोन्मुक्त. ॥१५९॥

यूयं वसिष्ठगाधिजमुखमुनिसच्चारणसेवनोद्युक्तः ।
गुरुभजनमुपदिशत शुभ-जनेषु भवभय विमुक्त एवं स्याम् ॥१५९॥

श्रीमंदिरइंदीवर हें भ्रमरहित प्रसिद्ध तीर्थतटीं, ।
वृद्धांसि गमे सरयूनिकट उभा राम निहितपाणिकटीं ॥१६०॥

भ्रमरहितं श्रीमंदिरमिंदीवरमेतदस्ति तीर्थतटे ।
सरयूनिकटे रामः कटिपाणिस्तिष्ठतीति वृद्धमतम् ॥१६०॥

अंभोदसंनिभ सुभग भाविकजनभव्यभाग्यभर भोळा ।
भासे उभा शुभाशय शयविधृतनितंबबिंब हरि डोळां ॥१६१॥
अंभोदाभः सुभगो भाविकजनभव्यभाग्यमतिमुग्धः ।
शयधृतनितंबबिंबः शुभाशयो भाति मे तु हरति दृशम् ॥१६१॥

निजपदजलजभजकजन जगांत बहु पूज्य हरिसि कीं शिव ते ।
प्रत्युत्थान दिलेंसें गुरुतर्कपदा अशा मती शिवते ॥१६२॥
हरिपदजलजभजकजन एति जगत्पूज्यतां शिवः सोऽयम् ।
प्रत्युत्तिष्ठति हरिरिति गुरुतर्कामिमं मतिर्मम स्पृशति ॥१६२॥

श्यामळ विमळज्योति स्वयंप्रभ प्रकट चित्र तम हरितें ।
करितें तर्क असा मन, पतंग शमती विलोकितां हरितें ॥१६३॥
चित्रं विमलश्यामलमपहरति तमः स्वयंप्रभं ज्योतिः ।
इति मनसो मे तर्कः शलभाः शाम्यन्ति दीप्तिमवलोक्य ॥१६३॥

ताप शमे तम नाशे ह्या तेजें हें विलक्षण प्रकट; ।
वर्णे सुनीळ उज्ज्वळ मनःपतंगासि जीववी निकट ॥१६४॥
अद्भुतमेतत्तेजः शमयति तापं तमो विनाशयति ।
उज्ज्वल सुनीलकान्त्या मनःपतंगं च जीवयति निकटे ॥१६४॥

हा अवधूत विलक्षण सपरिग्रह आणिखी उदासीन, ।
यानें या सत्क्षेत्रीं नाम्याची सोडिलीहि दासी न ॥१६५॥
अवधूत उदासीनः सकुटुम्बोऽप्ययम्र लक्षणातीतः ।
अपि नामदेवदासी सत्क्षेत्रेऽपि न विमोचिताऽनेन ॥१६५॥

हा बाळक नंदाचा वसुदेवाचा खरा दशरथाचा ।
कोणेक विरळ यातें वदती तत्त्वज्ञ पति अनाथांचा ॥१६६॥
नंदस्य नन्दनोऽयं वसुदेवस्याथवा दशरथस्य ।
क्वचिदभिदधति कतिपयास्तत्त्वज्ञाः पतिमिमं त्वनाथानाम् ॥१६६॥

हा सुमणि मनश्चुंबक विष्टपचिन्तामणीर्विषघ्नमणी ।
स्पर्शमणी अमृतमणी सुरमणि चूडामणी मणींद्रधणी ॥१६७॥
चुंबकमणिरेष हृदो विष्टपाचिन्तामणिर्विषघ्नमणिः ।
स्पर्शमणिरमृतमणिरपि सुरचूडामणिरिनो मणींद्रमणिः ॥१६७॥

हा कल्पपादपाचा रोपा लसलसित कोंवळा सोपा, ।
याच्या हृदयीं आहे खोपा, घेतात हंस सुखझोंपा. ॥१६८॥
कल्पद्रुकन्दलोऽयं कोमलमसृणः सुखेन लभ्यश्च ।
अस्य हृदय-भवने सुखसुप्तिं कुर्वन्ति राजहंसाश्च ॥१६८॥

गोरा नंद, यशोदा गोरी, वसुदेव दशरथेहि गोरा ।
तत्सुत काळा कां तूं ? भोळे जन ठकविसी हृदयचोरा ! ॥१६९॥
नंदयशोदे गौर्यावास्तां वसुदेवदशरथौ गौरौ ।
तत्पुत्रः कृष्णस्त्वं, किं शठयसि निरुपधीन् हृदयचोर ॥१६९॥

काळा कां हें कळलें मजला, तूं नीलकंठकंठमणी ।
भोळ्या शिवें दिलें तुज पुंडरिकातें रिझोनि साधुपणीं ॥१७०॥
त्वं कृष्णः कस्मान्मम विदितं त्वं नीलकंठकंठमणिः ।
सरलो हरोऽददात्त्वां तुष्टः सत्त्वेन पुंडरीकाय ॥१७०॥

तूं सोय जाणसी बहु, दीनांचा सोयरा खरा, सुभगा ! ।
राखिसि लाज जनाची, हें संसारांत जोडिलें शुभ गा ! ॥१७१॥
सुखकारित्वाभिज्ञो, दीनानां सुभग बन्धुरसि सत्यम् ।
रक्षसि जनलज्जां त्वं लब्धं श्रेयस्त्वमेव संसारे ॥१७१॥

जीवोद्धारीं करुणा श्रुतिनिष्ठांचीहि भीड वागविशी; ।
वेषांतरें कलिंत बहु जन तारिसि, साधनीं न भागविशी. ॥१७२॥
जीवोद्धृतौ दया ते, श्रुतिनिष्ठानपि सदैव मानयसि ।
वेषांतरेण नैकोद्धृतिकृच्छ्रमयसि न साधनेषु कलौ ॥१७२॥

तूं सज्जनशुकपंजर कंजरमण वंशमाणिवतंसपद ।
खळशमन बळशमनशरकरहर हरहृदयहर विरक्तपद ॥१७३॥
हे सज्जनशुकपंजर कंजरमण वंशमाणिवतंसपद ।
खळबळशमनशरस्त्वं हरहृदयं हरसि भो विरक्तपद ॥१७३॥

भक्तमयूरदयाघन तूं रामा ! भवदवार्तविश्रामा ! ।
साष्टांग नमन तुजला भुजलालितनिजजना गुणग्रामा ! ॥१७४॥
भक्तमयूरदयाम्बुद राम त्वं भवदवार्तविश्रामः ।
भुजलालितनिजजन तव साष्टांगा मम नतिर्गुणग्राम ॥१७४॥

इति श्रीमत्करुणामृतघनरामस्मरणानंदितभक्तमयूरकेकावलिः ( श्रीरामपदार्पितास्तु. )

# आर्यांचार्य कविमयूरपंतस्तवन.

( लेखक वासुदेव राजाराम सिन्नरकर, संगमनेर. )

अनुष्टुप्:—नमः श्रीमन्मयूराय, आर्याऽनंदकराय च ।
श्रीरामघनचित्ताय, भवाहि--भयहारिणे ॥ १ ॥
आर्या:—आर्याचार्यकवीश्वर मयूरपंतासि हें असो नमन ।
न स्तविल कोण यातें ? सुंदर साधन महा असोन मन ॥ २ ॥
श्रीरामरूप, वरदी, प्रकृतिप्रेमळ, कवीश यासम हा ।
हरिदासविबुधजीवन, अमृतशशी--धवल सुयश यास महा ॥ ३ ॥
या कृष्णकथारसिकें भागवतांतील भक्तिरस लुटिला ।
कुटिला प्रमाद-मृत्यू, स्वमनोदर्पण पुनः पुन्हां उटिला ॥ ४ ॥
आर्या--भारत नोहे विलसे निज रत्नसानु तेजानें ।
साहित्य-सार धरिलें, बुधरम्याऽराम उपरि तें ज्यानें ॥ ५ ॥
भगवद्यशसुरसरसिक, प्रतिरामायणीं करी नव्या करणी ।
भाषा-विभुत्व-शुद्धी कवणाची यासमान व्याकरणीं ? ॥ ६ ॥

---

श्रीमन्मयूराय—मोरोपंतास किंवा मोरास. आर्याऽनंदकराय—आर्यावृत्तानें आनंद करणारास किंवा श्रेष्ठास आनंदकरणारास. श्रीरामघनचित्ताय—श्रीरामरूपीं मेघाचे ठायीं चित्त असणारास. भवाहि-भयहारिणे—संसारसर्पाचें भयहरण करणारास किंवा ( भवतीति भवः ) उत्पन्न होणाऱ्या सर्पभय हरणास. अमृतशशी-धवल—अजरामर चंद्रधवल. प्रमाद-मृत्यू—आत्मरूपाविषयीं अनवधान हाच मृत्यु, होय. श्रुतीमध्येंदेखील प्रमादालाच मृत्यु ह्मटलें आहे. “ प्रमादो मृत्युरहं ब्रवीमि ” इ० भारतांतील ‘ सनत्सुजात ’—प्रकरणाचें बीज हेंच होय. रत्नसानु—मेरुपर्वत. साहित्य-सार—काव्य, अलंकारशास्त्राचें सार. बुधरम्याऽराम—ज्ञात्यांचे रमणीय बगीचे किंवा देवांचे रमणीय बगीचे. मेरुपर्वतावरील बगीच्यांत देव रममाण होतात, हें पुराण प्रसिद्ध आहे. उपरि—वर. भगवद्यश-सुरस-रसिक—भगवद्यश-अमृतलोलुप. नव्या करणी—नवेनवे चमत्कार. भाषा-विभुत्व-शुद्धि—भाषास्वामित्व व भाषाशुद्धि. * निज—आपल्या याचा संबंध ‘तेज’ याकडे.

दुर्गम्‌भवदुर्ग षडरिसह भेदायास हा रची शस्त्रें ।
नानाशब्दार्थ चमत्कातिकर-सन्मंत्रमय महा अस्त्रें ॥ ७ ॥
केकावलि ही मावलि ज्ञाते म्हणती हिचें सुवर्णन गा ।
ही भक्तिशास्त्रगंगा घे, करितो काय त्या सुवर्णनगा ! ! ॥ ८ ॥
पंडित यमकी सत्याचि, परि गमते पंत थोर हे यमकी ।
ज्यांनीं प्रभूत-भगवद्यशगानें सहज पळविला यम कीं ॥ ९ ॥
सच्छब्दरत्नवटिका , ऐशी सुरगुरुहि विरचिता नाहीं ।
नाना-सृष्टीं रमवी विबुधेंद्रा , जेवि सुरुचि तानांहीं ॥ १० ॥
" सुरसा, सालंकारा, सुपदन्यासा स्व-कन्यका मातें ।
दिधली संता ! पंता! " हरी ह्मणे " धन्य " यांचि कामातें ॥ ११ ॥
कवि ह्मणविल्याहि नाहीं यद्रति आश्चर्य होय; आधुनिका ।
या " विद्वन्मुकुटमणी " कोण परीक्षक ह्मणे न "साधु" निका ॥१२॥
सत्पुष्पांचा रसिकभ्रमरां प्रिय आत्मयासम स्तबक ।
वायसतीर्थी रमते परि त्या नच पाहती समस्त बक ॥ १३ ॥

---

भवदुर्ग—संसाररूपी किल्ला. सन्मंत्रमय--त्रयोदशाक्षरादि मंत्र बीजांनीं युक्त. ब्रह्मास्त्रादि सर्व अस्त्रें मंत्रसिद्धच होत. गा--गायन कर. सुवर्णनगा--मेरू पर्वतास ( हा सुवर्णमय आहे ). पंडित-- वामन पंडित. प्रभूत--पुष्कळ. भगवद्यशगानें—पंतांनीं केवळ देवकथागायनानें यम पळविला, पंडितास ज्ञानाचें प्रबळ साह्य घ्यावें लागलें. विबुधेंद्रा--इंद्रास किंवा ज्ञानीश्रेष्ठास. सुरुचि तानांही--सुरुचिनामक अप्सरा गायनांत ताना मारून. सुरसा--उत्तमरसयुक्त किंवा सुंदर. सालंकारा—काव्यांतील अलंकारयुक्त किंवा दागिन्यांनीं मंडित. सुपदन्यासा--सुंदर शब्दांनीं विरचित किंवा उत्तमपद पद्धति--चालचलणूक जिची आहे अशी--कुलीन--हा भावार्थ. यद्रति--याची आवडी. कवि ह्मणविल्याहि=आधुनिका-- आधुनिक कवि ह्मणवून घेणारांस. निका--खरोखर. आत्मयासम--आपल्या मुख्य जीवासारखा. सत्पुष्पांचा स्तबक--सुंदर पुष्पगुच्छ. वायसतीर्थी रमते--खरकटवणी धुऊन सांच-

विकसितकाव्यकलापा ! सुनर्तका ! रसिकगीतकमनीया ! !
तुजसम करुणामृतघन-रघुपति बिंबो सुतारक मनीं या ॥ १४ ॥
या वासुदेवबाळा, दे ‘ आर्यावृत्त ’ ! हा असोंच वर ।
त्वत्सम परमार्थी रति, याविण छत्रादिसह नसो चवर ॥ १५ ॥
हा स्तव तंव नवनव रुचिदायी हो अर्पिला तुला भावें ।
येणें वळेंचि रघुपति-पदरज मज अमृत-हेतु लाभावें ॥ १६ ॥

---

लेल्या डबक्यांस वायसतीर्थ म्ह. कावळ्यांचें सितें, खरकटें वेंचण्याचें तें स्थल ! तेथें मोतीं खाणारे मानस सरोवरींचे हंस थोडेच रमणार आहेत ? तें स्थळ बगळ्यांनाच मजा मारावयास बरें ! ! ‘ तो-ती ’ च्या ग्राम्य प्रेमानें, किंवा तरोड, आगगाडी, टमरेल, कोळसा इ. इ. शुष्क विषयानें भरलेल्या कविता त्या मोरखंडासारख्याच नव्हत काय ? सुशिक्षित म्हणविणारा बहुजनसमाजही तेथें कसा रममाण होतो नकळे ! आतां सर्वच सुशिक्षित तसे आहेत असें आम्हीं म्हणत नाहीं; किंवा आधुनिकांत कविच नाहींत, असेंही म्हणण्याचा आमचा मुळींच हेतु नाहीं; परंतु, प्रस्तुत बहुजनप्रवृत्ति पाहून वरील उद्गार सहज निघाले; याबद्दल ज्ञात्यानें क्षमा करावी. बक—बगळे. कलाप—पिसारा. कमनीया—सुंदरा. बिंबो—ठसो. या—या माझ्या. आर्यावृत्त—आर्यानांवाचें वृत्त दे म्ह. या वृत्तांत काव्य स्फूर्ति असो. किंवा ( आर्य+आ+वृत्त )—सज्जनांच्या विशेष कथा दे अथवा सज्जनांची वागणूक माझे ठायीं-दे होवो. सारांश “ तूं सदाचारी ऐस ! ” असा आशीर्वाद द्या. चवर—चामर. अमृतहेतु—मोक्षहेतु.



# सुखाचा लाभ.

— १ —

मन जेव्हां आघातानें, परकृत निंदेनें अगर अपकारानें दुभंग होत असेल, तेव्हां, गड्या ! क्षणभर त्या मनालाच दूर सारून भगवंताचें स्मरण कर व ज्यांनीं भगवंताला आपलासा केला त्या संतमहात्म्यांपैकीं एखाद्याच्या चरित्राचें स्मरण कर !

— २ —

संकल्प विकल्पांच्या उतरंडी रचाव्यात, मोडाव्यात आणि पुन्हा रचाव्यात हा मनाचा स्वभावच आहे. एखाद्या खोडकर, चपळ मुलासारखें मन आहे. माकड जसें या झाडावरून त्या झाडावर व त्या झाडावरून तिसऱ्या झाडावर या प्रमाणें सतत उड्या मारीत असतें त्याप्रमाणें अनेक कल्पनांच्या मागें एकसारखें धांवत राहणें हा या खोडकर मनाचा स्वभाव आहे. मूल मोठें झाल्याशिवाय जसा त्याचा स्वभाव बदलायचा नाहीं, किंवा माकड आपल्या स्वभावाला सोडूं शकत नाहीं, त्याप्रमाणें मन हें आपल्या सहज स्वभावाला टाकूं शकणार नाहीं! मन चंचलत्व कधींही सोडायचें नाहीं.

— ३ —

मन चंचल, प्रमाथि, बलवत् व दृढ आहे अशी अर्जुनासारख्यांची ओरड आहे; आणि अर्जुन तरी नरच ना ! नराचा आणि वानराचा कांहीं लागाबांधा आहेच कीं नाहीं ! नराचा पूर्वावतार ह्मणजेच वानर असें डार्विनसाहेबाचें मत आहे; आणि नरांत वानरत्व जें आहे तें मनाच्या रूपानें प्रत्यक्ष आहे. म्हणून नरानें वानररूप मनाचा संग सोडावा व नारायणाचा संग जोडावा यांतच सुखाचा लाभ होणार आहे. मनाची संगत सोडावी म्ह० मनापासून वेगळें व्हावें, मन मी नव्हे हें जाणावें.

— ४ —

‘ माझें मन ’ असें आपण ह्मणतों, तेव्हां मन वेगळें व मी वेगळा हें आपणांस माहीत आहे हें उघड आहे. ‘ मी मन ’ असें आपण ह्मणत नाहीं तर ‘ माझें मन ’ असें ह्मणतों. या आपल्या रोजच्या भाषेचाच जरा विचार कर,

मनाहून मी वेगळा आहें. मनाच्या उद्यांशीं ‘ माझा ’ हा० ‘ मी ’ च्या कांहीं संबंध नाहीं हें विचारानें ओळखावें व हा ‘ मी ’ कोण याचें चिंतन करावें म्ह० मनाच्या सुखदु:खांहून आपलें असंगत्व ओळखावें म्हणजे मनाचें मनपण सरतें व आपलें आपणच आहोंत हा विचार उरतो !

— ५ —

सुखाचें स्वरूप ज्ञानोबारायांनीं कसें सांगितलें आहे पहा: ‘ जें जीवया आत्मयाचिये संगती होय तया नाम सुख ! ’ जीवानें मनाकडे पाठ फिरवली व तो आत्म्याकडे म्ह० नारायणाकडे वळला कीं दु:ख संपलें, मग सुखाची अमूप लूट ! नारायण सुखस्वरूप आहे. तेथें सुखाला कमतरता नाहीं. सर्वसुख मग आपलेंच आहे.

— ६ —

सर्व सुखाचें आगर । बाप रखुमादेवी--वर ॥ १ ॥

— ७ —

“ Happiness is thought, sought and caught but never bought.” अशी एक इंग्रजींत म्हण आहे. तिचा अर्थ एवढाच आहे कीं, सुख विकत मिळत नाहीं तर विचार कर, शोध कर, तें तुझें तुझ्यापाशींच सांपडेल !

— ८ —

आघात, दु:ख, क्लेश, संताप, हानि या सर्व कल्पना आहेत. त्या टाकून दे. धोतर झाडून मोकळा हो. परमात्मा निर्विकल्प आहे म्हणून—

तया निर्विकल्पासि कल्पीत जावें ।
जगीं संग सोडूनि सुखी रहावें ॥

— ९ —

सुखाचा एक क्षण अनंत दु:खराशींना भस्मसात् करितो. इंग्रजी कवि ॲडिसन म्हणतो:—

A day, an hour of virtuous liberty
Is worth a whole eternity in bondage !

स्वातंत्र्यसुखाचा एक क्षण दीर्घकालीन पारतंत्र्यदु:खापेक्षां किती पटीनें मोठा आहे ! कल्पनावश होणें हें पारतंत्र्य, निर्विकल्प आत्मसुखाचा संग हें

स्वातंत्र्य ! आत्मा स्वतत्र आहे. मी आत्मा आहें, मी स्वतंत्र आहें म्हणून मी सुखस्वरूप आहें.

—१०—

सुख घरचें आहे. दुःख आगंतुक आहे, पाहुणा आहे. पाहुण्याला शिरजोर होऊं न देतां मालकानें मालकीहक्कानें राहिलें पाहिजे! पाहुणा मालक झाला कीं दुःख, मालक मालकपणांत नांदूं लागला कीं सुख !

—११—

आत्माराम मालक, देहभाव आगंतुक!

—१२—

ॲडिसनचेंच म्हणणें पण एकनाथमहाराजांनीं किती उंच भूमिकेवरून किती गोड सांगितलें आहे; महात्म्यांचें सहज बोलणें त्यांची बैठक दाखवितें. नाथ ह्मणतात :—

हरिचरणीं अपरोक्षस्थिती । तेथील क्षणार्धाची जे प्राप्ती ।
त्यापुढें त्रिभुवनविभवसंपत्ती । भक्त मानिती तृणप्राय ॥

—१३—

प्रसिद्ध इंग्रजी कवि शेले याच्या कवितेंतलें रडगाणें पाहून नवल वाटतें. तो एका कवितेंत ह्मणतो " अरेरे ! मला आशा नाहीं व आरोग्य नाहीं, आंत समाधान नाहीं, बाहेर शांति नाहीं, किंवा संपत्तीहून अधिक मोलाचें असें साधूंना मिळणारें ध्यानसुख नाहीं, यश नाहीं सत्ता नाहीं"? प्रेम नाहीं, विश्रांति नाहीं, माझ्या सभोंवारचे लोक हांसत खिदळत आहेत व संसाराचीं सुखें भोगीत आहेत आणि माझ्या कपाळीं हें कांहीं नाहीं.

—१४—

गरीब बिचारा कवि शेले! त्याच्या दुर्दैवाबद्दल कोणालाही वाईट वाटेल. ईश्वरानें दिलेल्या उज्ज्वल काव्यप्रतिभेचा त्याला' जन्मभर रडगाणें गात रहाणें' हाच लाभ मिळावा काय ? त्याची कविता सारी रडकी आहे. याचें उलट आमचे कवि आनंदानें कसे नाचत असतात तें तर पहा: ' आनंदाचे डोहीं आनंदतरंग ' ' सर्वसूख ल्यालों सर्व अलंकार । आनंदें निर्भर डुल्लतसों ' 'आनंदाच्या कोटी । सांठविल्या आम्हां पोटीं ' इत्यादि तुकोबांच्या उक्ति पहा !

# भगवंताचें अधिष्ठान.

आमचे एक सन्मान्य मित्र विचारतात:—

" मुमुक्षूचा ताजा अंक वाचला. चालू चळवळीस भगवंताचें अधिष्ठान आहे असें आपण लिहिलें आहे. भगवंताच्या अव्यक्त स्वरूपाचें अधिष्ठान सर्वत्रच आहे, व्यक्त स्वरूपाचें अधिष्ठान कोठें आहे हें मला समजून आलें नाहीं. पार्थाचे सारथी व्यक्तरूपानें स्वत: युद्धांत हजर होते. श्रीसमर्थांनीं भगवान् रामचंद्र व मारुतीराय यांच्या व्यक्त स्वरूपाचें अधिष्ठान आपल्या तप:सामर्थ्यानें संपादन केलें होतें. तसेंच श्री विद्यारण्यस्वामींनींही श्री भगवतीच्या व्यक्त स्वरूपाचें अधिष्ठान संपादन केलें होतें. महाराष्ट्रराज्य व विजयानगरचें राज्य ह्या दोन्ही राज्यांच्या स्थापनेपूर्वीं भगवदधिष्ठान संपादन केलेल्या विभूतींचें पाठिराखपण होतें, तशी व्यवस्था सध्यां दिसत नाहीं. महात्मा गांधी स्वत: रोज ३ वेळ श्रीविष्णूची प्रार्थना करितात, पण इतर जे लोक पुढें आहेत — नांवें कशाला घ्या ? त्यांना धर्मानुष्ठानच नको आहे मग भगवदधिष्ठानाची गोष्टच कशाला बोला? तेव्हां हें काय गौडबंगाल आहे हें कळावें अशी माझ्याप्रमाणेंच आपल्या इतर ग्राहकांची इच्छा असणारच ! तर खुलासा होईल काय ? "

———आपलें ह्मणणें अगदीं बरोबर आहे. आमचें मत पहिल्यापासून आपल्यासारखेंच आहे. प्रश्न फार नाजुक आहे व कोणाही व्यक्तीला न दुख-

---

परब्रम्ह झालें आम्हां घरीं खेळणें ' असें गरजणारे नाथ किंवा आनंदाचें जगाला आवार करणारें ज्ञानोबाराय यांच्या संगतींत जगाला आनंदाशिवाय काय मिळणार ?

—१५—

कारण एवढेंच आहे कीं, पाश्चात्य कवि हे बहुधा बहिर्मुख आहेत, अंतरीं सुखाचा शोध त्यांनीं केला नाहीं. आमचे कवि संत आहेत, अंतर्मुख आहेत, त्यामुळें सुखाचा ठेवा त्यांना अंतरींच सांपडला आहे.

—१६—

पाश्चात्य कवि मनाचे गुलाम आहेत. आमचे सत्कवि मनाचे मालक आहेत.

वितां त्याचें स्पष्ट उत्तर देणें अधिक नाजुक आहे ! सांप्रत देशभर जी एक प्रचंड लाट उठली आहे तींत देशभक्ति, स्वार्थत्याग, सहनशीलता, एकनिष्ठा, देहाविषयीं बेपर्वाई इ० जे दिव्य गुण खरोखरीच प्रगट झाले आहेत त्यांच्या मूळाशीं भगवत्प्रेरणा नाहीं असें कसें ह्मणावें ? पांचांमुखीं जर परमेश्वर आहे, तर जे पन्नास हजार लोक समाधानानें तुरुंगांत काय-क्लेशाची एकप्रकारची तपश्चर्या करीत आहेत त्यांच्या पाठीशीं भगवंताचें अधिष्ठान नाहीं असें कसें म्हणावें ? परमेश्वराच्या सत्तेशिवाय वृक्षाचें पान-झाडाचें वाळलेलें पानसुद्धां—हालत नाहीं हें जर खरें आहे, तर लक्षावधि भारतपुत्र आज ज्या दिव्यभावनेनें भरलेले व भारलेले आहेत त्या भावनेच्या पाठीमागें परमेश्वरी सत्ता नाहीं असें कसें म्हणतां येईल ? अशा अर्थानें चालू चळवळीस भगवंताचें अधिष्ठान आहे असें आम्हीं म्हटलें आहे. तथापि आमच्या मित्राचें म्हणणेंही अयथार्थ नाहीं, अगदीं अक्षरशः खरें आहे.

वीस वर्षांपूर्वी आम्ही मुमुक्षूंत ' आमचे पुढारी संतच ' असा एक लेख लिहिला होता; त्यांतील प्रस्तुत विषयाला पोषक असा एक उतारा पुढें देत आहोंत:—

" खऱ्या धर्मबुद्धीच्या प्रेरणेनें लोककार्य करणारे लोकनायक आज भरतखंडाला पाहिजे आहेत. राजसकालांत राजस माणसांनीं चालविलेल्या राजस चळवळी चिरसुख देण्यास असमर्थ आहेत. सत्त्वगुणाच्या उच्च भूमिकेवर किंवा त्याच्याही पलीकडच्या ' गुणानेताननतीत्य त्रीन् ' ह्या वृत्तिशून्यपणाच्या पदावर आरूढ झालेले महात्मे लोककल्याण करण्यास पुढें सरसावतील तेव्हांच समाजाला योग्य वळण लागेल.

" आणि भगवंताचें अधिष्ठान सोडून मनुष्य ज्या ज्या चळवळी करील त्यांचा त्यांचा परिणाम अनिष्ट व्हावयाचाच ! अविचाराच्या हुल्लडीनें स्थिर देशकार्य होत नसतें.

" जो जो तरणोपाय करावा तो तो अपाय होतो असा सर्वांनाच अनुभव आला आहे; पण ह्या अनुभवानें शहाणे होणारे लोक कोठें आहेत ? अहंकर्तृत्वाचा मद उतरला नाहीं तोंवर ' मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरन्ति ते ' ह्या भग-

वद्वन्दनावर किंवा ' जो जो प्रयत्न रामावीण । तो तो दुःखाशीं कारण ' ह्या समर्थोक्तीवर विश्वास बसत नाहीं.

" हरिप्रेमाचा जिव्हाळा ज्यांच्या ठिकाणीं नाहीं, त्यांच्याबद्दल हरील तरी प्रेमभर कसा यावा ? प्रेम करावें आणि करवून घ्यावें. प्रेमरज्जूनें हरीला स्ववश केल्यावर त्याला आपली चिंता लागते, आणि हरीचें चिंतन करावें ह्मणजे हरी आपली चिंता वहातो. असा आत्मभाव वाढवून निरहंकारानें निष्काम कर्मयोग हरिप्रीत्यर्थ आचरतां येईल. विश्वाएवढा आत्मा व्यापक करणारे महात्मेच विश्वाचें किंवा विश्वांगभूत अशा मोठ्या राष्ट्राचें खरें कल्याण करूं शकतील.

"हरि म्हणजे सर्व भूतांच्या अंतरीं एकत्वानें नांदणारा सर्वांचा प्रिय होय. त्याला ब्राह्मणांपासून चांडाळापर्यंत सर्वच प्रिय होत. कारण सर्वांच्या ठायीं समत्वानें त्याचीच व्याप्ति आहे. हिंदु, मुसलमान, पार्शी, ज्यू, खिस्ती, आफ्रिकन्स सर्वांच्याच ठायीं हरीची व्याप्ति आहे. त्याला ब्राह्मण, महार, सर्व सम आहेत. त्याच्या भूमिकेवरून त्याच्या दृष्टीनें सर्वांकडे ज्याला पाहतां येईल तोच संत लोककल्याणकर्ता होईल.

"जशास तसें" "ठेशास ठोसा" इत्यादि राजस तत्वें रजोगुणी लोकांनाच साजतात. दुसऱ्याच्या विषमतेनें आपली समता ढांसळूं देतां नये. कर्माचरणाची जी किल्ली भगवंतांनीं गीतेंत अर्जुनाच्या हातीं दिली आहे ती गीतेंतच शोधावी ह्मणजे हातीं लागेल. " अखंड हरिप्राप्तीची अतरीं तळमळ ठेवून घरदार, सर्व इष्टमित्र, स्वदेश, परदेश यांच्या सर्व चिंता हरिपायीं वाहून हरीचेच एकनिष्ठ भक्त बनण्यास तयार व्हावें. ज्यानें विश्व निर्माण केलें तो धर्माची, समाजाची, राष्ट्राची, कुटुंबाची चिंता वाहण्यास काय समर्थ नाहीं ? सर्व राष्ट्रकार्य हरीच्या चरणीं वाहून निश्चिंत व्हावें. निश्चिंत, निरपेक्ष व निर्भय असेल तोच भक्त, तोच ज्ञानी, तोच मुक्त, व लोककल्याण करण्यास तोच समर्थ होईल. "

# पूर्वींची स्वस्ताई व सध्यांची महागाई !

जगाची गति उत्कर्षाच्या दिशेनें होत आहे कीं अवनतीकडे होत आहे हें एक कोडें होऊन बसलें आहे. तें अधिक बिकट करण्यासारखी माहिती इतिहास पुरवीत आहे ! हिंदुस्थानांत अकबराचे वेळीं धान्याचे दर काय होते हें पाहिलें म्हणजे " ते हि नो दिवसा गताः " असे खेदोद्गार कोणाच्या मुखांतून बाहेर पडणार नाहींत ! त्या दरांचे **एक मणाच्या किंमतीचे कांहीं आंकडे** पुढें दिले आहेत—

| | आणे | पै | | रु. | आणे | पै |
|---|---|---|---|---|---|---|
| गहूं | ४ | ९·६ | मीठ | ० | ४ | ४·८ |
| बाजरी | ३ | २·४ | कांदे | ० | २ | ४ |
| तांदूळ | ८ | ० | हळद | ० | ४ | ० |
| कणिक | ६ | ० | साखर | १ | ६ | ४ |
| मुगाची डाळ | ७ | २·४ | तेल | २ | ० | ० |
| दूध | १० | ० | तूप | २ | १० | ० |

अशा **स्वस्ताईमुळें** सामान्य मजुराला दरमहाचा खर्च पांच-साडेपांच आण्यांत पुढीलप्रमाणें येत असे.

उदरनिर्वाहाला इतकें अल्प द्रव्य पुरत असल्यामुळें रोजच्या **मजुरीचे दर** पुढें दिल्याप्रमाणें कमी असावेत हें साहजिकच आहे.

| धंदा | शेर | आणे | पै | | रु | आणे | पै |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कणीक | २५ | ३ | ९ | सुतार | ० | २ | ९ |
| डाळ | ५ | ० | ७ | गवंडी | ० | १ | ४ |
| तूप | १ | १ | १-२ | बुरुड | ० | ० | ९ |
| मीठ | १ | ० | ८. | भिस्ती | ० | १ | २ |
| घर शाकारणारे | ० | १ | २ | | | | |

हल्लींचे धान्याचे भाव, राहणीचा खर्च व मजुरीचे दर वरील आंकड्यांशीं तोलून पाहिले तर कोणती भावना मनांत उभी राहील ! ( केसरी )

# पांगारकरांचीं पुस्तकें

१. **भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति चौदावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ॥८ व्ही. पी. नें ॥१२.

२, **संतचरित्रमालाः**—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४२ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ. सं. २५६ किं. रु. १॥८

३. **श्रीएकनाथचरित्रः**—श्रीएकनाथमहाराजांच्या चरित्राची ही चौथी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ॥१२

४. **कविरामायणः**— संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ॥४

५. **आनंदलहरीः**—( कवितासंग्रह ) ह्यांत पांगारकरांच्या कवितांपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें, महाराष्ट्र संत व सद्ग्रंथ, ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ॥१२

६. **नारदभक्तिसूत्रेंः**—( आवृत्ति ४ थी ) हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिरसोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ॥८

७. **नवविधा भक्तिः**—( सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी ) यांत नवविधा-भक्तीचें नव प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ॥६

८. **निरंजनमाधवांची कविताः**—भाग १ किं. रु. भाग २ व ३ एकत्र किं. १॥ रु. तिन्ही भाग एकंदम घेणारास रु० २॥४

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्रः**—( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यांमुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. १॥८

१०. **भक्तिमणिमालाः**—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक–संदर्भ व विवरण यांसह–दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १॥८

११- **सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टीः**—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध पुढारी कै. विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ॥५

१२–१३–१४ **मुमुक्षूंतील निवडक निबंधः**—भाग १ व २ किं. प्रत्येकीं १॥८ भाग ३ रा किं. १॥४. तिन्ही भाग एकदम रु. ३॥

१५ **मोरोपंती वेंचेः**—( दुसरी आवृत्ति ) पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रहि नवीन दिलेलें आहे. किं. रु. १॥१२.

मुमुक्षु **Reg. No. B. 662**



# पांगारकरांचीं पुस्तकें.

१६ **पारिजातकाचीं फुलें** ( तिसरी आवृत्ति ) :—परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ៛८

१७ **श्रीतुकारामचरित्र**:—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. किं. रु. २.

१८ **श्रीतुकारामचरितामृत**:—तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं. ७५

१९ **निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य**:—निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख-विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ៛१०

२० **मुक्तेश्वर**:—( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता याची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १

२१ **मारुतिउपासना** ( चौथी आवृत्ति ) :—किं. ៛४.

२२ **सार्थ श्रीदासबोध**:—किं. रु. ४. व्ही. पी. नें ४៛१०

२३ **सार्थ मनोबोध**:—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ៛१२.

२४ **समर्थसंजीवनी ऊर्फ रामदासी वेंचे**:—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें ह्या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.

२५ **मोरोपंत** (चरित्र आणि काव्यविवेचन):—किं. रु. २៛८.

२६ **श्रीएकनाथी भागवत** ( निर्णयसागर प्रेसचें, आवृत्ति तिसरी ) :-किं. रु. ६

२७ **श्रीसमर्थग्रंथभांडार**:--समर्थांची एकंदर कविता एकत्र सटीप छापलेली आहे. किं. ४៛८.


२८ **समर्थग्रंथभांडार** ( भाग २ रा ):—यांत दासबोधाशिवाय बाकीची समर्थांची सर्व कविता, प्रकरणें पाडून, व्यवस्थित दिली आहे. किं. रु. २៛८

२९ **ज्ञानेश्वरांची प्रभावळ**:—ज्ञानेश्वरमहाराज व त्यांचे समकालीन नामदेवराव, जनाबाई, चोखामेळा, इत्यादि सर्वजातीय २५ संत यांच्या ग्रंथांतील निवडक वेंचे प्रस्तुत ग्रंथांत घेतले आहेत. यांत ज्ञानेश्वरांच्या २५०० ओंव्या व सर्व संतांचे मिळून ४०० अभंग आहेत. सुंदर प्रस्तावना आहे. टीपा भरपूर आहेत. किं. रु २.

**पत्ता:—व्यवस्थापक " मुमुक्षु " नासिक शहर.**

श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होईजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वस्पाकारें ॥ (श्रीरामदास)


जुनें वर्ष २५ ] कार्तिक १८५२ [ नवें वर्ष १० वें
मास २ ] नवंबर १९३० [ अंक ११ वा

वार्षिक वर्गणी रु. ३] संपादक व प्रकाशक, [व्ही.पी.नें रु. ३८३


## लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी, ए.

## मुमुक्षु कचेरी, नाशिक सिटी.


मुद्रकः—दत्तात्रेय जनार्दन मराठे ह्यांनीं नासिक येथें घ. नं. १०१४
आपल्या श्रीकृष्ण छापखान्यांत छापिलें.

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ मंगलाचरण .... .... | १--३ |
| २ चीन धर्मगुरूंचीं वचनें .... .... | ४ |
| ३ श्रीकृष्ण चरित्रांतील दिव्य प्रेम (उतारा) .... | ५ |
| ४ जुने व नवे पंडित (उतारा) .... .... | ६--७ |
| ५ गोव्याचें बातमीपत्र .... .... | ८ |
| ६ तामीळ वाङमय--लेखांक २ .... .... | ९--१६ |
| ७ अमावास्येची पर्वणी .... .... | १७--२० |
| ८ शिवाजीचें व्यंकोजीस पत्र .... .... | २१--२३ |
| ९ श्रीगुरुदास महाराज--माहुर--यांचीं ध्यानें .... | २४--३१ |
| १० बाराखडी फटके .... .... .... | ३२--३३ |
| ११ व्यायामाची महती .... .... .... | ३४--३६ |
| १२ नाथांचें चिरंजीव पद .... .... .... | ३७--३९ |
| १३ अभयपत्र .... .... .... | ४० |

**सूचना**—ह्या महिन्याचा अंक निघण्यास १०-१२ दिवस उशीर लागला. व्यवस्था लागत आहे. पुढील महिन्यापासून अंक प्रत्येक महिन्याच्या १० व्या तारखेस प्रसिद्ध होईल. एक दोन महिन्यांत एक उत्कृष्ट लेखमाला सुरू होणार आहे.

# भक्तिमणिमाला.

संपादक—**ल. रा. पांगारकर.** बी. ए.

भागवत हा भक्तिशास्त्रावरचा एक अद्वितीय ग्रंथ सकलसंतमान्य व सर्वजनप्रिय आहे. भक्तिप्रेमाचीं रहस्यें अमृतमधुर वाणीनें जनांस सांगणारा भागवताच्या बरोबरीचा दुसरा ग्रंथ नाहीं. भागवतांतील उत्तमोत्तम अशा ५५० श्लोकांची निवड करून प्रायः त्यांचा कथासंदर्भ देऊन साधुसंतांच्या वचनाधारें ही भक्तिमणिमाला तयार केली आहे. भागवती श्लोकांबरोबरच महाराष्ट्रीय सत्कविवचनांचाही यांत समावेश केल्यामुळें ही माला मराठी ग्रंथ या दृष्टीनें केवळ अद्वितीय झाली आहे. पृ. सं. २५० किंमत १॥ रु. व्हीं. पी. नें रु. १८१३.

पत्ताः— **व्यवस्थापक, ‘ मुमुक्षु ’ नाशीक.**

मुमुक्षु मासिक वर्ष १० वें ]

# मंगलाचरण

[ नवंबर १९३० अंक ११ वा.



[ तामीळ वैष्णव भक्त नम्माळवार यांच्या चरित्राची व भक्तिरसपर कवितेची थोडीशी ओळख मागील अंकांत वाचकांस करून दिलीच आहे. ह्या अंकांत त्याच्या एका सुंदर गाण्याचें मराठींत रूपांतर करून देत आहोंत तें आमच्या भाविक व प्रेमळ वाचकांस अतिशय आवडेल असा भरंवसा वाटतो. विचार नम्माळवारचे, मराठी भाषा पांगारकरांची. गोकुळांतील एक गोपी आपली तरुण कन्या श्रीकृष्णछंदानें कशी वेडीपिशी बनली याचें वर्णन करीत आहे. तिला वस्तुमात्राच्या ठिकाणीं श्रीकृष्ण दिसतो व प्रत्येक वस्तु श्रीकृष्णास स्मरविते. ]

## अभंग

कैसी कन्या माझी झाली वेडीपिसी ।
काय करूं यासी बाइयानों ॥ १ ॥

* * *

भूमीसी खेळतां स्मरे वामनपाय ।
ह्मणे सांडूं काय ओवाळूनी ॥ २ ॥
आकाशीं पाहतां हस्त जोडोनीयां !
म्हणे ' मत्स्वामिया येथ राहे ' ॥ ३ ॥
सागरासी पाहे म्हणे ' शेषशायी ।
पहुडे येथ बाई ! काय सांगों ' ॥ ४ ॥
अश्रुपूर्णाकुल नेत्र चोळोनियां ।
ध्यानमग्न पाया—कडे पाहे ॥ ५ ॥
बालसूर्याकडे बोट दावी नीट ।
हे तों मूर्ति धीट गोविंदाची ॥ ६ ॥
प्रेमविव्हल होय अश्रूसीं ढाळित ।
नाना नामें गात केशवाचीं ॥ ७ ॥
अच्युत म्हणोनी अग्नी धरी हातें ।
पांची बोटें घेते पोळोनीयां ॥ ८ ॥

शीतवायुस्पर्श स्मरवी रमणा जे ।
हरिखें मुकें लाजे अंगसंगें ॥ ९ ॥
पूर्णचंद्राकडे पाहताचि राहे ।
पसरी ते बाहे आलिंगाया ॥ १० ॥
शैल स्थाणु येई जेव्हां दृष्टीपुढें ।
म्हणे ' हें तों फुडें विष्णुरूप ' ॥ ११ ॥
घनवृष्टी झाली—' आला पुरुषोत्तम ।
करुणामेघश्याम आला आला ' ॥ १२ ॥
गोवत्सांते प्रेमें आलिंगी वेल्हाळा ।
म्हणे पाठीं गोवळा कृष्ण आहे ॥ १३ ॥
दही दूध लोणी आणितां विकाया ।
म्हणे ' त्यासी खाया आवडे हें ' ॥ १४ ॥
सर्पा मागें मागें धांवे ती बेभान ।
म्हणे हें शयन श्रीधरांचें ॥ १५ ॥
केव्हांही कोठेंही कानीं येतां नाद ।
म्हणे ऐका साद मुरलीचा ॥ १६ ॥
लाज भय चिंता गेली हारपोनी ।
पुसे ' कृष्ण कोणी पाहिला जी ? ' ॥ १७ ॥
पाहे तुळशी तेव्हां खुले प्रेमकळा ।
म्हणे हा तों गळा कृष्णजीचा ॥ १८ ॥
भलीं बुरीं भूतें मूर्ती वा राउळें ।
तितुकीं देउळें कृष्णजींचीं ॥ १९ ॥

*    *    *

ऐसी माझी कन्या केली वेडीपिसी ।
बोलायाची तिशीं सोय नाहीं ॥ २० ॥
कोण्या चेटकीचें दूध प्यालें बाळ ।
माझी हे वेल्हाळ मोहियेली ॥ २१ ॥
गोजिरवाणी वेल माझी हे कोमेली ।
देहभावा मुकली काय सांगों ॥ २२ ॥

मध्येंची हंसावें मध्येंची रुसावें ।
मध्येंची रडावें फुंदफुंदों ॥ २३ ॥
नाचावें डोलावें सदा गीत गावें ।
अश्रुही गाळावे आनंदाचे ॥ २४ ॥
भेटीसी झुरावें भेटतां नुरावें ।
नानाचार व्हावे लाडकीचे ॥ २५ ॥
कोठोनी हा ठक भेटला हो तिसी ।
काय मी कोणासी बोल लावूं ॥ २६ ॥
बाई बाई याची काय सांगों मात ।
जोडावे हे हात ठकड्यासी ! ॥ २७ ॥

## भूत

भुत जबर मोठं गडे बाई ।
झाली झडपण करु गत काई ॥ भुत जबर । भुत जबर ॥ धृ० ॥
आंत दिसे बाहेर वसे । या भुतानें लाविलें पिसें ॥ भुत० ॥१॥
पंचाक्षराची केली भालदोरी । ही चालेना भूतावरी ॥ भुत ॥२॥
चाटु पळयाचा केला देवलसी । त्या भुतानें धरलें त्यासी ॥भुत०॥३॥
जाणे जोशी खंडोबा आला । भूत भेईना त्याच्या बाला ॥भुत०॥४॥
लिंबं नारळ कोंबडा उतारा । या भुतानें धरला थारा ॥भुत०॥५॥
भूत लागलं ध्रुवबाळाला । ऊभा अरण्यांत ठेला ॥भुत०॥६॥
भूत बसलं वाळुवंटीं । या पुंडलिकाच्या हो साठीं ॥भुत०॥७॥
एका जनार्दनीं भूत । मागेंपुढें सदोदित ॥भुत०॥८॥

\+ \+ \+ \+

“ निराकार जलामध्यें साकार बर्फ जमावें त्याप्रमाणें निराकार सच्चिदानंदाला भक्तिरूप थंडीनें साकार रूप प्राप्त होतें. साकार मूर्तीच्याही अवलंबनानें ईश्वराच्या यथार्थ स्वरूपाचा साक्षात्कार होतो. अग्नि व त्याची दाहक शक्ति जशी एकरूप असतात, त्याचप्रमाणें ब्रह्म व त्याची जगत्प्रसवकारिणी शक्ति अगदीं एकरूप आहेत. ईश्वर साकार आहे व निराकारही आहे, आणि याशिवाय आणखी कसा कसा आहे हें कोणी जाणूं बोलूं शकेल ? ”

—श्रीरामकृष्ण परमहंस.

# चीन धर्मगुरूचीं वचनें

( चीन देशांत कनफ्यूशिअस नांवाचा एक ऋषितुल्य आचरणाचा महात्मा आडीच हजार वर्षांपूर्वीं होऊन गेला गृहकार्य व राष्ट्रकार्य निर्दोषरीतीनें कसें करावें हें त्यानें चिनी लोकांस शिकविलें. बौद्धाचा जसा बुद्ध, ख्रिस्त्यांचा जसा येशू, मुसलमानांचा जसा महमद तसा तो चिनी राष्ट्राचा आद्य धर्मसंस्थापक होय, त्याच्या उक्ति फार खोल विचाराच्या, प्रौढ व मननीय आहेत, त्यांपैकीं कांहीं खालीं देत आहोंत. )

१

श्रेष्ठ मनुष्य जें शोधतो तें त्याच्यांतच असतें, व क्षुद्र मनुष्य जें शोधतो तें दुसऱ्यांत असतें.

२

श्रेष्ठ मनुष्य मानी असतो, पण तो मानासाठीं भांडत नाहीं. तो लोकांतला असतो, तो एकपक्षीय नसतो. तो कोणाला शब्दावरून चढवीत नाहीं. किंवा त्याच्याकरितां चांगले शब्द बाजूला सारीत नाहीं.

३

गरीब मनुष्य स्तुतिपाठक किंवा श्रीमंत मनुष्य निगर्वी हे बऱ्यांत समजावें पण गरीब असून आनंदी व श्रीमंत असून शिष्टाचार पाळणारा हे दोघे अधिक श्रेष्ठ होत.

४

विवेकविचारानें न पचविलेली विद्या म्हणजे ते व्यर्थ श्रम होत, व विद्येच्या मदतीशिवाय विचारही गौण होय.

५

उधळेपणानें अविनय वाढतो व कृपणपणानें क्षुद्रता प्रगट होते, अविनयापेक्षां क्षुद्रता बरी.

६

मनुष्याला आपलीं मतें व्यापक करितां येतात, पण मतांना मात्र मनुष्य मोठा करितां येत नाहीं !

## श्रीकृष्णचरित्रांतील दिव्य प्रेम

" हे प्राकृतिकांनों ! तुमच्या स्वतःच्या बुद्धींतील सर्व मळ दूर झाले ह्मणजे श्रीकृष्णचरित्र व त्यांतील गोपीप्रेमाचा भाग-तुह्मांस अत्यंत उज्ज्वल दिसूं लागेल, त्या गोकुलवृंदावनांतील सर्व चराचर वस्तु प्रेममय दिसूं लागतील. गाई वासरें, झाडें, नद्या, पर्वत, सर्प इत्यादि सर्व प्रेममयच दिसूं लागतील. श्रीकृष्ण-चरित्रांत शुद्ध प्रेमाशिवाय दुसरें कांहींच दिसणार नाहीं. पितृप्रेम, मातृप्रेम, पुत्र-प्रेम, मित्रप्रेम, गोवत्सप्रेम, क्रीडाप्रेम, पतिपत्नीप्रेम, गानप्रेम, वादनप्रेम, पानप्रेम, जारप्रेम, जारिणीप्रेम, असें किती प्रकारचें प्रेम वर्णावें ? त्या सर्व प्रेमांतील बाह्य जड उपाधि टाकून जें निव्वळ प्रेम शिल्लक राहतें तें गोकुळवृंदावनांत त्यावेळीं मूर्तिमंत वास करित होतें. त्यावेळीं तेथें ओंगळपणा व हिडिसपणा यांस थाराच नव्हता. तेथील प्रत्येक प्राणी शुद्ध प्रेमानंदांत सदैव विलसत होता. सर्व प्रकार-च्या प्रेमांची एकवटलेली ती श्रीकृष्णमूर्ति ज्या ठिकाणीं होती त्या ठिकाणीं गोप, पशुपक्षी, वृक्षवेली, तृणलता, मृत्तिका, किंबहुना पाषाण होण्याचाही अभिलाष कोणत्याही भक्तवरानें केला असता, मग त्या प्रेमानें डबडबलेल्या गोपींचा जन्म आपणांस यावा अशी मोठमोठ्या तपस्व्यांनीं इच्छा केल्यास त्यांत त्यांचा काय दोष आहे ? श्रीकृष्णदर्शनाच्या उत्कंठेनें नीवीबंध शिथिल होऊन सर्वांगाचें डोळेबनवून, सर्व बाह्य वृत्ति विराम पावून, सर्व वासनादेह एका नेत्रावाटेच बाहेर पाडण्याचा व तो श्रीकृष्णपदीं अर्पण करण्याचा निश्चय करून ज्या गोपींची एका क्षणांत प्रेमसमाधि लागे त्या गोपींचें प्रेम मोठमोठ्या मी मी ह्मणणाऱ्या भक्तां-च्या मनांतही उद्भवलें नाहीं, मग तें आह्मांसारख्या बहिर्मुखांना कोठून येणार !"

—श्रीमद्भागवतादर्श (कोल्हटकर)

---

अवीट हें क्षीर हरिकथा माऊली । सेवितां सेविली वैष्णवजनीं ॥१॥ अमृत राहिलें लाजोनी माघारें । येणें रसें थोरें ब्रह्मानन्दे ॥२॥ पतित पातकी पावनपंगती । चतुर्भुज होती देवाऐसे ॥३॥ सर्व सुखें तया मोहोरती ठाया । जेथें दाटणी या वैष्णवांची ॥४॥ निर्गुण हें सांग धरिलें गुणवंत । धरू-निया प्रीत गाये नाचे ॥५॥ तुका म्हणे केली साधन गाळणी । सुलभ कीर्तनीं होऊनि ठेला ॥६॥

# जुने व नवे पंडित.

जुन्या पद्धतीच्या शिक्षणांतही एकाग्रता असे आणि यामुळें त्या पद्धतीनें शिकणारा विद्यार्थी आपल्या विषयांत खरा निष्णात होत असे. जुन्याकाळचा उत्तम वैय्याकरण किंवा नैय्यायिक घेतला तर, व्याकरण किंवा न्याय या विषयांत त्याला अगोचर असा कोणताही ग्रंथ-उपग्रंथ वादाचा मुद्दा सहसा रहात नसे. आतां या एकांगी अध्ययनामुळें त्या विषयाबाहेरचा कांहीं मुद्दा निघाल्यास, जुन्या पंडितास पाण्यांतून बाहेर काढलेल्या माशाप्रमाणें चुकल्याचुकल्यासारखें होणें स्वाभाविक असे; पण तो जोंपर्यंत पाण्यांत राही तोंपर्यंत त्याची शक्ति इतकी अचाट असे कीं, त्याला विद्यासमुद्राच्या थेट तळापर्यंत बुडी मारून तेथील गूढ मुक्ताफळें वर आणतां येत असत. जुन्या पद्धतीचा दुसरा विशेष गुण म्हटला म्हणजे स्मृतिसामर्थ्य. हातांत पुस्तक धरून अध्यापन करणें हा पूर्वी एकप्रकारें कमीपणा मानला जाई; व अध्ययन करण्याच्या वेळीं विद्यार्थ्यास जरी ग्रंथाचा आश्रय करावा लागे, तरी अध्ययन संपून तो स्वतः अध्यापकाच्या पदवीस येण्याच्या सुमारास त्याचे सर्व अध्ययनग्रंथ प्रायः तोंडपाठ होऊन जात; आणि केवळ ह्या अर्थानेंच पण तो पुस्तकास सोडचिठ्ठी देत असे. अशा रीतीनें जुने पंडित हे खरोखरच चालते बोलते ग्रंथ असत. त्यांचें विषयनिष्णातत्व व पाठांतर हीं पाहून अलीकडच्या कालांतील मनुष्य थक्कच होऊन जावयाचा! पण या एकांगी शिक्षणामुळें जुन्या पंडितांच्या बुद्धीस एककल्लीपणा येत असे.

अनेकांगी अशी जी आधुनिक शिक्षणपद्धति तिचेंहि नफे—तोटे असेच आहेत. नव्या युगांत ग्रंथसंग्रह विपुल, कोणताहि विषय घेतला तरी त्याच्यावर प्रत्यंतराच्या तोफखान्याचा सडकून मारा करितां येईल, इतकी चोहोंकडे ऐस पैस मोकळी जागा व उंचवट्याचीं ठिकाणें, तसेंच त्या त्या विषयाच्या अभिमान्यांनीं वेशीचीं कवाडें लावून घेतलीं तरी आंत प्रवेश करण्यास शेंकडों गुप्त मार्ग. या मुळें हल्लींच्या काळांत कोणताही विषय कोणालाहि सुलभ. गुरुमुखाच्या गंगोत्रीचा प्रवास जुन्या काळाइतका हल्लीं दुःखद नाहीं. किंबहुना कोणालाहि स्वाव-

लेखनानें व गुरुमुखाशिवाय एखादी विद्या सांगोपांग शिकणें कठीण नाहीं. उद्योग मात्र हवा; साधनांची कमतरता नसते. साधारणतः उद्योगशील असा विद्यार्थी घेतला तर त्याला अमुक एक विषयांतलें थोडें बहुत तरी माहीत नाहीं असें सहसा व्हावयाचें नाहीं. गुलाबदाणीच्या कारंजांतून निघाल्याप्रमाणें आधुनिक विद्वानांच्या मुखांतून प्रसंगोपात्त विद्येच्या सहस्र धारा एकाच वेळेस स्रवत असून, शिवाय प्रत्येक धारेस निरनिराळ्या शास्त्राचा निरनिराळाच सुगंध येत आहे, हा अजब चमत्कार पाहून जुन्या काळचा पंडित आज आश्चर्यानें थक्कच होऊन जावयाचा !

पण या अनेकांगीं शिक्षणाचा मोहकपणा कांहीं अंशी केवळ दिखाऊ आहे, हें त्या बिचाऱ्यांस काय माहीत ? आधुनिक विद्वानांच्या ज्ञानाची लांबी-रुंदी फार विस्तृत; पण त्याची खोली फार थोडी असते ! वादाचा विषय बदलला असतां जुन्या पंडिताप्रमाणें त्याला पाण्याबाहेर काढून टाकलेल्या मत्स्यासारखें चुकल्याचुकल्यासारखें होऊन तो तडफडणार नाहीं. कारण तो, जलचर व स्थलचर ह्मणजे उभयचर आहे खरा. बकाप्रमाणें तो जमीन असेल तेथपर्यंत चालेल व पाणी भेटतांच पोहूं लागेल पण त्याची गति खोल पाण्यांत मात्र होणार नाहीं. यामुळें विद्यासमुद्राच्या तळाशीं बुडी मारून मोतीं वर आणणें हें त्याला दुष्कर होय. फार तर त्यानें सरस्वतीदेवीच्या क्रीडासरोवरांतील कमळांबरोबर उथळ पाण्यांत खेळावें. कोणताही विषय तळहातावरील आवळ्याप्रमाणें त्याला चोहोंकडून दिसेल; पण आवळ्याच्या पोटांतल्या बीची कल्पना मात्र त्याला होणार नाहीं.

**नरसिंह चिंतामण केळकर**

## बातमीपत्रें

**गोव्याचें पत्रः—** " यंदां गोव्याचे नवरात्रांतील श्रीसरस्वत्युत्सव मोठ्या थाटाचे व आनंदाचे झाले. वे. शा. सं. नरहरशास्त्री खरशीकर यांना यंदा मुद्दाम पाचारण केलें होतें. प्रथम शिरोडे येथें त्यांचीं ९ दिवस कीर्तनें झालीं व शास्त्रीबोवांच्या भक्तिप्रवण उद्बोधक प्रवचनांचा व कीर्तनांचा लोकांच्या मनावर फार चांगला परिणाम झाला. गायनाचें अंग जरी बेताचेंच होतें तरी निरूपण-शैली प्रेमळ होती. दसऱ्यास श्रीसरस्वत्युत्सवाचें अध्यक्षस्थान त्यांजकडे होतें. 'आर्य संस्कृतींत सरस्वतीचें श्रेष्ठत्व' यावर त्यांचें भाषण झालें. वैदिक कालापासून आतां-पर्यंत भारतावर सरस्वतीची कशी कृपा आहे हें त्यांनीं सोदाहरण दाखऊन दिलें. रात्रीं शास्त्रीबोवांचें ' क्षणक्षणा हाचि करावा विचार । तरावया पार भवसिंधु ' ह्या अभंगावर कीर्तन झालें. जनाबाईचें गोड आख्यान लावलें होतें. दुसरे दिवशीं पुण्याचे रा. देशमुख यांचें व्याख्यानही सुंदर झालें. दोन्ही वक्ते धर्माचरणी दिसले व ह्मणून त्यांच्या बोलाचा परिणाम झाला. तिसरे दिवशीं शास्त्रीबोवांचें 'संपन्न भारत' यावर फार नामी व्याख्यान झालें.

---

**मुमुक्षूंतील निवडक निबंधः—** ( भाग १, २ व ३ ) प्रत्येक भाग किं. रु. १।८ मुमुक्षु साप्ताहिकांत पहिल्या २० वर्षांत जे संपादकीय लेख आले, त्यांतील निवडक लेख तीन भागांत प्रसिद्ध केले आहेत. हे तीन भाग जवळ असले म्हणजे २० वर्षांच्या ' मुमुक्षु ' चा समागम केल्याचा लाभ होणार आहे. तिन्ही भागांत मिळून ८० वर निबंध आहेत. घंटा, होळी व शिवलिंग यांचें रहस्य, मूर्तिपूजा, राष्ट्रीय प्रार्थना, रामजन्मोत्सव, कृष्णावताराची माधुरी, पंढरीची यात्रा व पालख्यांचे समारंभ, भारतीवीर, निंदकांचे उपकार, वेदांताचीं चार मतें, हिंदुधर्म, आमचे पुढारी संतच, डिप्रेस्ड क्लासेस मिशन उर्फ पंढरीचा भागवतधर्म, भागवतधर्माचें मंदिर, मातृभाषेचें प्रेम, धर्माकडे केव्हां वळणार, वाङ्मयतप, प्रेमामृतमाधुरी, आगरकर, गीतारहस्य इ० महत्वाचे सुंदर निबंध यांत असून प्रत्यक्ष घडलेल्या सात उत्कृष्ट गोष्टी दिल्या आहेत. तिन्ही प्रती एकदम घेत-ल्यास रु. ३।८ त्वरा करा. पत्ताः—**व्यवस्थापक 'मुमुक्षु', नाशीक सिटी.**

# तामीळ वाङ्मय

## लेखांक २ रा.

## तिरुज्ञानसंबंदर

तामीळ प्रांतांत बौद्ध व जैन ह्या पंथांचें प्राबल्य मोडून टाकून लोक सनातनधर्माकडे परत आणण्याचें काम वैष्णव भक्तांप्रमाणें शिवभक्तांनींहीं केलें आहे. शक ५०० पासून शक ९०० पर्यंतच्या चारशें वर्षांच्या काळांत तामीळ देशांत प्रसिद्ध असे एकंदर ६३ महाशैव झाले. **तिरुज्ञानसंबंदर** व अप्पर हे दोन पहिले शैव शके ५२० ते ६०० च्या दरम्यान झाले तर **सुंदरमूर्ति** स्वामी हा शके ८०० च्या आंतबाहेर होऊन गेला. त्यानें ६२ महाशैवांची स्तुति केली आहे. त्यावरून हाच ६३ वा होय हें उघड आहे. शैवांत सर्व जातींचे भक्त आहेत. ब्राम्हण आहेत. शूद्र व शेतकरी आहेत, **नंदा**सारखा एखादा चोखामेळाही आहे. ह्या ६३ पैकीं सर्वांहून अधिक योग्यतेचे व सर्व लोकप्रिय असे पहिले २ ज्ञानसंबंदर व अप्पर हेच होत. संबंदर हा तंजावर प्रांतांत शियाळी गांवीं जन्मला व अप्पर हा कुडलूर ( कडलोर ) जिल्ह्यांतल्या एका खेडेगांवांत जन्मास आला. 'तिरुज्ञानसंबंदर' म्हणजे देवाच्या ज्ञानाशीं सात्म्य पावलेला. तिरु ज्ञ. श्री. अप्पर याचें मूळचें नांव तिरुनांवक्करसू ज्ञ० वाचस्पति, संबंदर त्याला अप्पर बाबा असें प्रेमानें म्हणत असें म्हणून त्याला लोकांतही अप्पर असेंच म्हणूं लागले. संबंदर हा कौन्डिण्य गोत्री तामीळ ब्राम्हण व अप्पर हा वेळाळन्-वेल्लाळ किंवा शेतकरी वर्गांतला. अप्पर याच्या ज्या मूर्ति बसविल्या आहेत त्यांत अप्पर याच्या हातांत गवत कापण्याचा कोयता दिलेला आहे. या कोयत्यानें तो पुढें शिवमंदिरांतील खडे वगैरे काढीत असे. असो, संबंदर व अप्पर यांची व यांच्या विचारांची आपण थोडीशी ओळख करून घेऊं म्हणजे शैवसंप्रदायांतील ह्या संतांनीं तामीळ देशांत काय कामगिरी केली याची आपणांस कांहींशी कल्पना करितां येईल. संबंदर व अप्पर हे दोघेंही एकनिष्ठ शिवभक्त होते, संबंदर विद्वान्ही होता. अप्परापेक्षां ज्ञानानें व लोकप्रसिद्धीनें संबंदर श्रेष्ठ होता तरी त्या दोघांची एकदां जी मैत्री जमली ती यावज्जीव अखंड राहिली. ही गोष्ट उभयतांसही भूषणास्पद आहे.

कदाचित् ते दोघे नुसते विद्वान् असते तर त्यांच्यांत चुरस माजून राहिली असती ! पण दोघेही भक्त होते--त्यांचीं हृदयें एका शिवस्वरूपीं समरस झाल्यामुळें मत्सरादि क्षुद्र विकारांच्या ते फार पलीकडे होते. ते विमलाशय होते. शिवाय ते कार्यकर्ते होते. बौद्ध व जैन धर्मांचें दक्षिणेंत जें बंड माजलें होतें तें मोडून टाकून दोघांना सनातन वैदिकधर्माचा प्रसार करायचा होता. ते एकजीव झाल्यानें त्यांचें इष्ट कार्य फार सुकर झालें. संबंदर यानें हें काम विद्वत्तेच्या व ज्ञानाच्या बळावर लीलेनें पार पाडलें, पण अप्पर याला जैनांचा छळ सोसावा लागला. उभयतांनीं हें कार्य कसें केलें तें आपण पाहूं. त्या वेळचा मदुरेचा राजा मूळचा शैव होता पण जैन पंडितांच्या संगतीमुळें त्याच्यावर जैनधर्माचा पगडा बसला व त्यानें जैन धर्म स्वीकारला, तथापि त्या राजाची राणी व त्याचा कारभारी हे पूर्णपणें शैवधर्मी राहिले होते, राजा जैन झाल्याबद्दल राणीला व इतर लोकांनाही वाईट वाटलें व त्यांनीं संबंदर याचे पाय धरिले. राजानें दरबार भरविला व त्या दरबारांत हजारों पंडितांशीं चर्चा होऊन संबंदर यानें लीलेनें जैन पंडितांस वादांत जिंकलें. संबंदरचा जयजयकार झाला. त्यानें राजास पुन: शैवधर्माची दीक्षा दिली. राजा यानंतर फार कडक शैव झाला. त्यानें जैनांना आपल्या राज्यांतून काढून लावले व कोणी म्हणतात त्यानें जैनांचा अतिशय छळही केल संबंदरनें हजारो बौद्धांसही वादांत जिंकलें व त्यांस शैवदीक्षा घ्यावयास लावलें बुद्धधर्म दक्षिणेंतून काढून लावण्याचें व जैनांचें बळ मोडण्याचें फार मोठें कार्य करून संबंदर यानें सनातनधर्माची थोर सेवा केली. त्यानें शिवोपासना वाढविण्यासाठीं शिवस्तुतिपर सुंदर कविताही केली आहे. शके ५६४ मध्यें हा हयात असल्याचा पुरावा आहे. अनेक मंदिरांतून संबंदर याच्या मूर्तीची देवासारखीच पूजाअर्चा होते. सखोल ज्ञान व अत्युत्कट भक्ति यामुळें त्यावेळचे बौद्ध व जैन पंडित यांचें त्याच्यापुढें कांहीं चाललें नाहीं व **मदुरेच्या जैनधर्मी पांड्यराजास यानें आपल्या पायांशीं आणिलें** व त्यास शिवदीक्षा दिली. या त्याच्या पराक्रमामुळें व गांवोंगांव हिंडून यानें हजारों लोकांस परत सनातनधर्मांत आणलें या कामगिरीमुळें याला शैवसंप्रदायांत धर्माचार्य म्हटलें आहे. हा शिवाचार्यांतला अग्रणी होय. याचे कांहीं चमत्कारही तिकडे प्रसिद्ध आहेत. हा आद्य शंकराचार्यांच्या जरा अगोदर झाला. आचार्यांच्या सौन्दर्यलहरीतील ' द्रविड शिशु ' हाच होय ! संबंदर याचा मठ मदुरा येथें

असून तेथील विद्यमान मठपति हा त्यापासून ११८।११६ वा पुरुष आहे. काश्मीरांतल्या शिवसंप्रदायांत 'शिवसूत्राणि' हा ग्रंथ प्रसिद्ध असून त्याचा ज्ञानेश्वरांनीं आपल्या अनुभवामृतांत स्पष्ट उल्लेख केला आहे, इतकेंच नव्हे तर त्यांतील शिवस्वरूपाला धरूनच त्यांनीं 'शिवशक्तिसमावेशनाचें' पहिलें प्रकरण लिहिलें आहे. तामीळ वाङमयांत '**देवारम्**' नांवाचा एक असाच वेदतुल्य संग्रह आहे. हे संग्रह ११ आहेत, त्यांपैकीं पहिले तीन ज्ञानसंबंदर याचे तीन अप्पर याचे व एक सुंदरमूर्ति याचा ह्या सात संग्रहांना तिकडे 'देवारम' अशी संज्ञा आहे, ह्या सप्तसंग्रहाला वेदाइतकें प्रामाण्य देतात. हे ११ संग्रह व पेरीयपुराण मिळून तामीळ शैवांचें पवित्र वाङमय होय. तामीळांत जी ज्ञानसंबंदर याची कामगिरी झाली तीच व तशीच कामगिरी पुढें शंकराचार्यांनीं सर्व भारतखंडांत केली यावरून संबंदर हा आचार्यांचाच पूर्वीचा अवतार असावा असें मनांत येतें !

आतां ज्ञानसंबंदर याच्या शिवभक्तीची थोडीशी ओळख करून देण्यासाठीं त्याच्या कवितेंतील कांहीं विचारांचें मराठी भाषांतर पुढें देत आहें.

* * *

"त्याच्या कानांत मोत्यें आहेत, तो बैलावर बसला आहे, त्याचें मस्तक चंद्रकिरणांनीं प्रकाशित झालें आहे, स्मशानांतील रक्षेनें त्याचें अंग विभूषित झालें आहे, ह्याच चोरानें माझें चित्त चोरून नेलें आहे ! कमलासनस्थ ब्रम्ह त्याच्या चरणीं नम्र झाला आहे व त्याची स्तुति करीत आहे आणि ब्रम्हपुरांत राहणाऱ्या माझ्या प्रभूनें त्यावर दया केली आहे"

"आमचा हा एकमेव स्वामी आहे. जिच्या स्तनांतलें अमृत कोणालाही प्यायला मिळालें नाहीं अशाशीं तो संपृक्त झाला आहे. तो पहा ह्या अन्नामलीच्या शिखरावर राहत आहे, तेथून फेनधवल निर्झरोदकाच्या धारा खालीं घसरत येत आहेत, सर्व पर्वत मौक्तिकबिंदूंनीं चकाकत आहे. ह्या आमच्या स्वामीला वंदन करा. तो पिता आहे व माताही आहे, दोन्ही तोच आहे. त्याला जो शरण जातो तो शुभाशुभ कर्मफळांपासून निश्चयानें मुक्त होतो.

कावेरीच्या खळखळणाऱ्या प्रवाहाच्या उत्तर तीरावर तो स्थिर बसला आहे. त्याच्या मस्तकावर अर्धचंद्र, गंगा व सर्प आहेत; त्याच्या भोंवतीं शुद्ध कुमारिकांचें वळें पडलें आहे."

" त्याच्या गळ्यांत जानवें आहे, मुखानें तो वेदघोष करीत आहे, अंगा-वर व्याघ्रचर्म आहे, अकिंचन पण निरिच्छ आहे. तो त्रिनेत्र आहे. तो मृत्युंजय आहे. मृत्यु त्यानें पायाखालीं दडपला आहे; तेथून रक्ताचे पाट वाहत आहेत, मृत्यु मेला आहे ! आमचा बाप असा आहे. आई उमा त्याच्या सन्निध आहे. मधुपानानें मस्त झालेले भ्रमर त्याच्याभोंवतीं आहेत. त्याला शरण जा. तो सर्व पापांचा नाश करितो. "

" तो वेदांचें सार आहे. आमचा हा सम्राट् कांचनगरींत बसला आहे. तो पुरुष आहे व स्त्रीही आहे. त्याच्यावांचून माझ्या मनाला दुसरा विषयच नाहीं. माझी भक्ति एकविध आहे माझी संपत्ति माझें सुखसर्वस्व तोच आहे. "

" हे तेजोमया ! सृष्टीचा उत्पत्तिकर्ता ब्रह्मा व संरक्षक विष्णु तुझ्याकडे पाहूं शकत नाहींत ! माझ्या पदरीं पुण्य नाहीं. कर्माचें फळ चाखवूं नकोस. मी अहर्निश तुझे गुणानुवाद गात आहें. "

" तो कंठानें विष प्याला आहे ह्मणून त्याला नीलकंठ ह्मणतात. माझ्या हातीं वीणा आहे तींतला मधुर ध्वनि तोच आहे. त्यानें माझ्या हृदयांत ठाण मांडलें आहे. रवि, चंद्र, नक्षत्रें-सर्व शिवभक्ताला शुभ आहेत, तीं त्याला गोडच फळ देणार ! "

" भस्मांत दिव्य शक्ति आहे. भस्म शोभादायक आहे. तंत्रांचें सारें रहस्य भस्मांत आहे, खऱ्या धर्माचें बीज यांत आहे. "

" ते वेडे बौद्ध व खुळे जैन खुशाल निंदा करोत. सत्यमार्गापासून च्युत झालेल्यांनीं दुसरें काय करावयाचें आहे ? ह्या दिगंबर व अकिंचन देवानें माझें हृदय चोरलें आहे. "

" बाळा ! प्रेमांकुराला सेवेचें सिंचन घाल, म्हणजे तुझ्या हृदयांत प्रकाश पडेल व सर्व बंधांपासून तूं मुक्त होशील. शिवाचे गुण-गाण्यास आळस करूं नकोस, कीं जगांतले मोहपाश दूर होतील. प्रेमाचीं सुमनें त्याला अर्पण कर कीं तुझीं सारीं दुःखें लयाला जातील व जिकडे तिकडे सुखाचा-स्वानंदाचा सुकाळ होईल. "

* * *

प्रेमाचीं असलीं गोड गीतें संबंदरनें गायिलीं आहेत. आतां आपण अप्परकडे वळूं.

## अप्पर

अप्पर हा कडलोर जिल्ह्यांतल्या एका खेड्यांत जन्मास आला. याला एक वडील बहिण होती. तिच्या १२व्या वर्षी तिचें एका लष्करी अंमलदाराशीं लग्न ठरलें होतें, पण लग्नविधि होण्यापूर्वीच त्याला लढाईवर जाणें भाग पडलें व तो लढाईंत मारला गेला. अप्परच्या बहिणीनें जन्मांत पुनः लग्नाचें नांव काढलें नाहीं. पुढें तिचे आईबापही मरण पावले. तेव्हां त्या मायाळु बहिणीवर धाकट्या भावाचा सांभाळ करण्याचें काम आलें; व तें तिनें मोठ्या आस्थेनें केलें. विशीच्या सुमारास अप्पर जैन पंडितांच्या पाशांत सांपडला ! हे पंडित हिंदु तरुणांस आपल्या कळपांत ओढायला सांप्रतच्या मिशरींप्रमाणें टपलेले असत. त्यांनीं अप्परला जैनधर्माची दीक्षा दिली. अप्पर जात्या बुद्धिमान असल्यामुळें त्यानें अल्पकाळांतच जैनांचे मुख्य मुख्य ग्रंथ सर्व वाचून काढले, जैन वाङ्मयांत तो इतका निष्णात झाला कीं, अल्पावधींतच जैनांनीं त्याला मुख्य धर्माधिकाऱ्याच्या जागेवर नेमलें. इकडे त्याच्या बहिणीला अपार दुःख झालें. लग्न फिसकटलें, आईबाप गेले, व ज्याच्यावर मदार ठेवून जी दुःख गिळून राहिली त्या भावानेंही धर्मांतर केलें! या सर्व आघातांमुळें तिच्या दुःखास पारावार राहिला नाहीं. तिनें आपल्या गांवाचा त्याग केला, व ती एका प्रसिद्ध शिवमंदिरांत जाऊन राहिली व शिवाची तिनें मनोभावें आराधना चालविली. आपला भाऊ पाखांडमतांत शिरला याबद्दल तिला फार वाईट वाटे व तो स्वधर्मांत परत यावा याबद्दल ती शिवाची प्रार्थना करी. कांहीं काळानें शंकरानें तिची प्रार्थना ऐकली ! जैनांचा मुख्य या नात्यानें अप्पर तिकडे मोठ्या वैभवांत व आनंदांत राहिला होता. त्याची विद्वत्ता त्याच्या धर्मगुरुत्वाला भूषणभूत झाली. त्याची कीर्ति जैनांत विस्तारली. त्यानें विवाह करून कदाचित् संसारसुखही भोगलें असल्याचा संभव आहे. तो एकदा एका दुर्धर रोगानें आजारी पडला. जैन अनुयायांनीं त्याची सेवाशुश्रूषाही केली, नामांकित वैद्यांनीं उपाय केले; पण तो बरा होण्याचें चिन्ह दिसेना. त्याला अकस्मात् आपल्या प्रेमळ बहिणीचें स्मरण झालें व तिच्या भेटीसाठीं तो उतावीळ झाला. त्यानें दूत पाठवून तिला भेटीला बोलावण्याचा प्रयत्न केला, पण त्या शिवभक्त हिंदु स्त्रीनें उत्तर पाठविलें कीं ‘ मी कदापि जैनांच्या मंदिरांत पाऊल ठेवणार नाहीं किंवा कोणाही जैनाचें तोंड पाहणार नाहीं !’ अप्परला हें उत्तर ऐकून दुःख झालें. एके रात्रीं त्यानें जैनांचा वेष, त्यांचा कमंडलु व तीं मोरांचीं पिसें ह्या सर्वांचा त्याग केला

व अतिशय आजारी असूनही तो चालत आपल्या बहिणीकडे गेला आणि तिच्या पायांवर मस्तक ठेऊन तिची त्यानें क्षमा मागितली. बहिणीनें भावाला आनंदानें जवळ केलें, ममतेनें त्याची उत्तम शुश्रूषा केली व शंकराच्या कृपेनें तो लवकरच दुखण्यांतून उठला. बहिणीनें भस्म व शिवचरणोदक एवढेंच देऊन त्याला दुर्धर रोगांतून वांचविलें. त्याची बहिणीच्या संगतीनें शिवावर निश्चळ भक्ति जडली व त्यानें उत्कट भावानें शिवस्तोत्रें गाण्यास आरंभ केला. तो अहोरात्र शिवोपासनेंत निमग्न झाला. रोगमुक्त झाल्यावर त्यानें जें शिवस्तोत्र केलें तें त्याच्या शिवस्तोत्रमालिकेंत प्रथमच दिलें जातें. त्या प्रांतावर त्यावेळीं **पल्लवांचा राजा केदार** याचा अंमल होता. तो जैनधर्मी होता. सर्व जैनांनीं राजाचे कान हातीं घेतले व राजसत्तेच्या बळावर त्या शिवभक्ताचा अनन्वित छळ केला, राजाचा दिवाण शिपाई प्यादे घेऊन अप्परास पकडण्यास गेला त्यावेळीं त्या थोर भक्तानें जें उत्तर केलें त्याचा भावार्थ मी मूळ तामीळ पदाच्या आधारें मराठी पदांत सांगतों:-

### पद

आह्मि कुणासि जाणत नाहीं । शिवचरणावांचुनि कांहीं ॥ ध्रु० ॥
ना आह्मां मृत्युची भीती । ना स्वर्गनरकहि खंती ।
नृप काय वांकुडें करिती । शिव समर्थ आमुचा पाहीं ॥ १ ॥
त्यजुनियां कामिनीकनक । शिव धरिला चित्तीं एक ।
घ्या घ्या ही माझी भाक । जा तुम्हीं परत जा भाई ॥ २ ॥
राजांचा हा शिव राजा । मायबाप स्वामी माझा ।
वाहिलें त्याचिया काजा । तनमनधन सर्वही कांहीं ॥ ३ ॥
हें भस्मोद्धूलित रूप । हें मंगलगान अमूप ।
यापुढें पृथ्वीचे भूप । आह्मीं कोणी लेखित नाहीं ॥ ४ ॥
ही प्रेमाश्रूंची वृष्टी । अभिषेकें शिवसंतुष्टी ।
व्यापुनी राहिला सृष्टी । देवदेव शंकर पाहीं ॥ ५ ॥
शिवरूप निरंतर ध्याऊं ! शिवनाम अखंडित गाऊं ।
शिवपदीं अहर्निश राहूं । शिव व्यापक सर्वांठायीं ॥ ६ ॥

अप्पराला जैन राजाच्या दरबारांत नेण्यांत आलें. त्याला प्रल्हादाप्रमाणें तप्त तैलाच्या कढाईत टाकण्यांत आलें, त्याची मोट मारून समुद्रांत टाकली, तथापि सर्वकाळीं त्याची शिवभक्ति अढळ राहिली. तो म्हणाला:—

नसे दास मी हो कुणा मानवाचा
नसे राहिला धाक मातें यमाचा ।
न पापी न भी मी कदा रौरवास
सदा प्रेमभावें स्मरे या शिवास ॥
पाखंड--कूपांतुनि सोडवीलें । सद्धर्ममार्गी मज लावियेलें ।
या पार्वतीशें मज राखियेलें । प्रेमामृतें मन्मन शांत केलें ॥

## संबंद्र व अप्पर

ह्या नंतर कांहीं काळ अप्पराला आपल्या प्रेमळ बहिणीचें सहवाससुख लाभलें. संबंदर व अप्पर ह्या उभय शिवभक्तांच्या प्रथमभेटीचा प्रसंग मोठा गोड आहे. ७०० वर्षांनंतर महाराष्ट्रांत ज्ञानेश्वर व नामदेव यांच्या भेटींत जो एकात्मतेचा आनंद उसळला त्याचें वर्णन नामदेवांच्या तीर्थावळीच्या अभंगांत आपणांस पाहा-वयास मिळतें, अगदीं तसाच थाट संबंदर व अप्पर यांच्या भेटीचा उडाला. संबंदर विद्वान, ब्राम्हण, एकनिष्ठ शिवभक्त, हजारों भक्तांनीं वेढलेला, राजगुरु-त्वाचें पद पावलेला व सर्व द्राविड प्रांतांत प्रख्यात आणि अप्पर जैनांनीं केलेल्या छळामुळें व मधुरशा शिवस्तोत्रांमुळें एका प्रांतांत प्रसिद्धी पावलेला! दोघेही श्रेष्ठ पुरुष, दोघेही भक्त, अप्पराच्या शिवभक्तीची ख्याति ऐकून संबंदर त्याच्या भेटीस आपण होऊन त्याच्या गांवीं आला. अप्परनें आपल्या गांवचे सारे लोक गोळा केले व त्यांच्यांसह तो त्यास सामोरा गेला. संबंदराची स्वारी पालखींत बसून मोठ्या वैभवासह गांवाकडे वळली, अप्पर अत्युत्कट संतप्रेमानें पुढें सरकला व त्यानें संबंदराच्या पालखीस खांदा दिला. पालखी गांवांत येतांच संबंदरानें अप्पराचा शोध केला तेव्हां त्यास कळलें कीं, अप्पर आपल्या पालखीस लागला आहे! संबंदरानें लगेच पालखीखालीं उडी घेतली, संबंदर व अप्पर हे एकमे-कांस कडकडून भेटले व निजठेवा प्राप्त झाल्याचा आनंद भोगीत असतांना उभयतांच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या! भक्ताच्या भेटीचा आनंद भक्तांनींच भोगावा. ह्या उभय शिवभक्तांचा अकृत्रिम स्नेह चिरकाल टिकला, दोघांनीही बरोबर अनेक शिवक्षेत्रांच्या यात्रा केल्या व शिवभक्तीचा प्रसार केला. त्यांच्या एक-वटलेल्या प्रेमानें शिवभक्तीचा सात्त्विक प्रसार करण्याचें एवढें मोठें कार्य केलें कीं तें दोघांसही पृथक्त्वानें करितां आलें नसतें. अप्पराच्या शिवभक्तीची ख्याति ऐ-कून ज्या जैनांच्या केदार राजानें त्याचा पूर्वी छळ केला होता तोही अनुताप

पावला व अप्पर यास शरण आला. अप्परानें मोठ्या प्रेमानें त्यास शिवदीक्षा दिली. केदार राजा शैव झाला, व पुढें त्यानें जैनांची मठमंदिरें उध्वस्त केलीं आणि एक प्रचंड शिवमंदीर उभारलें. अप्पर शेवटीं तंजावरप्रांतांत कावेरी-तीरीं थिरुऐयरु ह्या शिवक्षेत्रीं राहिला. त्यानें कैलासची यात्रा केली असें कोणी ह्मणतात. अप्परचीं शिवस्तोत्रें तामीळ देशांत आज कैक शतकें लोकांच्या तोंडीं आहेत. त्याची ३०० स्तोत्रें प्रसिद्ध आहेत, प्रत्येक स्तोत्रांत चारचरणीं दहा पद्यें असतात. त्याची भाषा साधी पण ओजस्वी आणि हृदयाचे पडदे उकलणारी आहे, शंकरस्वरूप गुणातीत, अप्रमेय, अचिंत्य आहे; पृथिव्यादि पंचभूतें, नक्षत्रें, सूर्यचंद्र सर्वकांहीं तो आहे; अनंत ब्रह्मांडें हा त्याचाच विस्तार आहे, असें असून तो प्रेमसागर, दयाळु, उदार, सर्वप्रेरक आहे; सर्व रसांचा तो रस आहे; तो फुलांत परिमळरूपानें नांदतो, प्रेमाला वश आहे, तो भक्तहृदयांत मणिदीप आहे इ. प्रकारचें ज्ञानभक्तिप्रधान असें शिवरहस्य त्यानें आपल्या कवितेंत व्यक्त केलें आहे. त्याच्या कवितेचा थोडासा मासला भाषांतररूपानें पुढें देतों

## अभंग

सत्यनिष्ठ मुनी तूतें शोधिताती । पार्वतीचा पति प्राण माझा ॥१॥
वटवृक्षाखालें सनकादि चौघां । वेद तुवां मागां पढविले ॥२॥
भक्तांच्या हृदयीं योगियांच्या ध्यानीं । राहसि प्रकाशूनी देवदेवा ॥३॥
प्रेमळांचा सखा विश्वाचें जिव्हार । तूं होसी अपार तोषदाता ॥४॥
मातें मी न जाणे तूतें मी न जाणें । हेंचि एक जाणे दास तुझा ॥५॥

## श्लोक

गंगाप्रवाहीं जरि स्नान केलें । कावेरितीरीं तप आचारिलें ।
विश्वात्मकासी नच ओळखीलें । सारें तरी व्यर्थचि व्यर्थ गेलें ॥१॥
आपादिलीं तीं जरि वेदशास्त्रें । बापा ! दिलीं त्वां धनधान्यवस्त्रें ।
प्रेमस्वरूपासि न ओळखीलें । सारें तरी व्यर्थचि व्यर्थ गेलें ॥२॥
त्या योगसिद्धी जरि राबल्या घरीं । तपार्थ वा आदरिली जरी दरी !
ज्ञानस्वरूपासि न ओळखीलें । सारें तरी व्यर्थचि व्यर्थ गेलें ॥३॥
व्रतोपवासादिहि सर्व केलें । शरीरवाचा मन आवरीलें ।
प्रेमामृतीं सर्व न हें विरालें । सारें तरी व्यर्थचि व्यर्थ गेलें ॥४॥

( अपूर्ण )

# अमावास्येची पर्वणी

## लेखकः—केशव भिकाजी बापट, चिपळोण

१ व्यक्तीच्या किंवा राष्ट्राच्या आयुष्यामध्यें पर्वणीच्या वेळा अशा थोड्याच येत असतात. पण या थोड्या येणाऱ्या वेळां महत्त्वाच्या मानानें इतर साऱ्या वेळांना मागें टाकणाऱ्या असून, ह्या पर्वणींचा पर्वकाळ योग्य रीतीनें साधण्याविषयीं व्यक्तीनें किंवा राष्ट्रानें फार दक्ष असावें लागतें. एकदां का या वेळा चुकल्या कीं, कायमच्याच चुकल्या. ह्मणूनच पर्वणीसारखा पुण्यकाळ नाहीं असें ह्मणतात. कालचक्राच्या मासिक भागांत श्राद्धतिथि म्हणून येणारी अमावास्येची पर्वणी ही खरोखर अमूल्य पर्वणी असून या पर्वणीला ‘ तर्पण ’ आणि ‘ अर्पण ’ करावयाचें असतें. आपल्या साऱ्या खटपटी तर ‘ तर्पण ‘ अथवा ‘ तृप्ति ’ या साठींच चाललेल्या असतात ; पण अनेक वेळां ‘ तर्पणाच्या ’ क्रिया करून सुद्धां आपण अतृप्त ते अतृप्तच राहतों . या अतृप्तीचें कारण एवढेंच असतें. कीं ‘ तर्पण ’ करणारा सर्वांचें ‘ तर्पण ’ करून आपलें मात्र ‘ तर्पण ’ करावें तसें म्हणजे ‘ आत्मसमर्पण-पूर्वक ’ करीत नाहीं, ह्मणून अमावास्या ह्मणजे :‘ दर्श अथवा दर्शन-आत्मसाक्षात्कार ’ —होण्याची वेळ आली असूनही पुन्हां येरे माझ्या मागल्या असें होतें. यासाठीं या पर्वणीचा अर्थ नीट लक्षांत आणून त्यापासून आपण योग्य तो बोध घेतला पाहिजे.

२ ज्या तिथीला चंद्रसूर्य एकत्र येतात व एकमेकांचा ‘ दर्श ’ अथवा दर्शन घेतात ती अमावास्या ( अमा सह वसतः अस्यां चंद्रार्कौ ) अशी अमा-वास्या शब्दाची व्युत्पत्ति आहे.सूर्य आणि चंद्र ह्मणजे आत्मा आणि मन. ( सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च; चंद्रमा मनसो जातः ) हे दोन्हीं एकत्र येतात असें आपण म्हणतो खरें; पण खरें म्हटलें असतां येणारा कोण सूर्य कीं चंद्र? सूर्याला तर म्हणण्या-सारखी गतिच नाहीं. गति वाटते ती भासमान आहे, खरी नव्हे. तो तर स्वयं-

प्रकाश व स्थिरच आहे. त्याचें दर्शन घेण्यास चंद्र येतो, पण हा चंद्र दर्शन घेऊन जर तेथेंच राहता तर त्याला फेरे फिरण्याचे कष्ट कशाला पडले असते? पण विरक्तिपूर्वक फेरे फिरून फिरून कंटाळलेला असा हा खरोखर दर्शनाला येता तर दर्शन घेऊन पुन्हां कशाला परत जाता? पण तसें कांहीं होत नाहीं. यावरून आत्म-सूर्याच्या दर्शनास येणारा हा चंद्र खरा दर्शाधिकारीच नव्हे असें ठरतें. मुद्दाम देव-दर्शनास हा येतो हें म्हणणेंच मुळीं खोटें असून सहज फिरतां फिरतां याला ही दर्श-पर्वणी साधते हेंच खरें. ज्यानें याला जन्म दिला त्याच्याच सत्तेनें याला जन्मदात्याच्या दर्शनाची संधी आली. याला स्वत:चा प्रकाश व स्वत:ची शक्ति यांपैकीं कांहींच नाहीं. याचें तेज शीतळ वाटलें तरी तें उसनेंच असतें, मग यानें व्यर्थ गर्व कां करावा ? हा पराधीन असून याच्या डोक्यावर सूर्य अखंड तळपत असतो. म्हणून याला सामर्थ्य व तेज मिळून साऱ्या जगाला जिवंत व आल्हादित ठेवितां येतें. एखाद्या राजाचा प्रधान आपलें काम करीत असतां मधूनमधून राजाकडे सल्ला विचारण्यास जातो त्याप्रमाणें हा चंद्रमासुद्धां सूर्यदेवाचा सल्ला घेण्यास महिन्यांतून एक वेळ सूर्याभिमुख उभा राहत असतो. आपलें कामही अशा संधींतच साधून घेतलें पाहिजे. पंचभूतात्मक सृष्टीकडे चंद्राचें अर्धांग कायमचेंच वळलेलें असतें पण तें नेहमीं एकरूपानें प्रकाशित असतेंच असें मात्र नाहीं. कलेकलेनें हा वृद्धि--क्षय धारण करितो असें दिसतें. केव्हां हा जगाकडे संपूर्णपणें पूर्णिमा कालीं पाहतो तर केव्हां संपूर्णपणें- पण जगाला विमुख होऊन सूर्यदेवाकडे पाहतो. ही त्याची दुसरी वेळ म्हणजे आत्माभिमुख होण्याची शुभ वेळ होय. अशा या पर्वणीच्या शुभवेळीं सुस्नात होऊन तीर्थ-रूप झालेला हा चंद्र पुन्हां जर मागें येऊन जगत्संसर्ग न करिता तर यास वृद्धिक्षयाची बाधा कशाला झाली असती ? पण ' स्वभावो दुरतिक्रम: !

३ सत्तावीस प्रकारच्या शुभाशुभ नक्षत्र-पत्नींच्या मंडळांत गिरक्या घेऊन रमतरमत चाललेला हा चंद्र अखेरीस इतका थकतो कीं, सूर्य-देवाच्या समोर 'लीन' होऊन-लयपावल्याखेरीज त्यास गत्यंतरच नसतें. पण पूर्वतयारी अपुरी असल्या-

मुळे पुन्हां हा बाहेर फेंकला जातो ; विक्षिप्त होऊन विक्षेप पावतो . मृतप्राय झालेल्या या चंद्रमाला थोडीसुद्धां लाज वाटत नाहीं . वास्तविक पाहातां अशा या ' लय व विक्षेप ' पावण्याच्या संधिकालांत जर शुद्धचित्त होऊन हा आपला ' योग ' कायम ठेविता तर काय मौज झाली असती ? पण वाडिलांपासून ' जीवन ' घेऊन त्यांच्याशीं सुद्धां बेइमानपणें विभक्त होऊन व्यवहार करीत असतां त्यांची आठवण तरी यानें ठेवावयास नको काय ? पण आठवण तर नाहींच , उलट फुकटचा अहंकार मात्र हा बाळगीत असतो. अहंकार वाटण्यासारखें याजपाशीं काय आहे ? शरीरबळ नाहीं, मनोबळ नाहीं, म्हणून आत्मसमर्पण अथवा आत्मनिवेदन करणें हेंच याचें कर्तव्य. हें कर्तव्य त्रिविध आहे , आपण म्हणून स्वतंत्र कोणी नसून आपली उत्पत्ति - स्थिति - संहार करणारा जो आत्मसूर्य त्यालाच शरण जाणें हें आपलें पहिलें कर्त्तव्य . " **जी हा अवघा देवाचा** " हा पहिला प्रकार ' आपण सूर्यापासून फुटून निघालेले असे अंशभूत असून ' अंशी ' जो सूर्य त्याचेच आहों असें म्हणून पहिल्या जड-देह समर्पणानंतर दुसऱ्या सूक्ष्म देहाचें समर्पण करणें हा दुसरा प्रकार. हेंच ' चंचल आत्मनिवेदन. ' याच्या पुढें ' ठावचि नाहीं चंचळाचा । तेथें आधीं आपण कैंचा ' हें तिसऱ्या प्रकारचें आत्मनिवेदन होय. हें त्रिविध समर्पण केल्याशिवाय तर्पण करून कांहीं उपयोग नाहीं ! चंद्रानें चंद्रपणाला विसरून अथवा आत्म्यानें (अंतःकरणानें) आत्म्याला विसरून--सहजासहजीं परमात्मरूप होणें हाच परमयोग होय. त्याच्या पूर्वीचा हा चंद्रसूर्यांच्या भेटीचा योग म्हणजे ' मन आणि बुद्धीचें । ऐक्य आथि ।। ' असा ज्ञानोबांनीं वर्णिलेला साम्ययोग होय. हाच **जगांतील** मोठा योग आहे. म्हणूनच ज्ञानेश्वर म्हणतात " जे साम्यापरौती जगीं । सिद्धी नाहीं. "

४ चंद्र ही प्रकृति असून सूर्य हा पुरुष आहे. वस्तुतः यांचें अनन्यपण असावयास पाहिजे. व असतेंही. पण समजून उमजत नाहीं असा प्रकार होतो. वामनासिकेंतून वहाणारा चंद्रमा व सव्यनासिकेंतून वहाणारा सूर्य हे दोनही

अगदीं जवळजवळ असून दोहींचा योग अमावास्येंत ह्मणजे सुषुम्नेंत होत असतो. ही जशी पिंडांतील स्थिति तशीच ब्रह्मांडांतील स्थिति आहे. चार आणि पांच ह्मणजे कर्क आणि सिंह हीं चंद्र-सूर्याचीं स्वगृहें असून दोनहीं योगानें, ह्मणजे बेरजेनें नऊ-जणुं काय- नवविधा भक्तिरूपच होतात; पण दोनही जवळजवळ असूनही आणि दोघांचाही दरबारी थाट सारखाच असूनही ही भेटीची पर्वणी क्वचितच येते. याचें कारण गतिभेद हें होय. चंद्र हा प्रकृतिरूपानें वाममार्गी आहे, त्यामुळें तो कर्काच्या मागें असलेल्या मिथुन—वृषभ—इत्यादि राशींच्या मालकांच्या ऐश्वर्यांत दंग असतो, आणि अशा रीतीनें अर्धवर्तुळाकार गतीनें फिरत असतो. सूर्याची भासमान गति त्याच्या स्वगृहांतून ह्मणजे सिंहांतून पुढें असून तोही सव्यमार्गानें आपलें अर्धवर्तुळ चालत असतो, अशा प्रकारें उलट सुलट वर्तुळामुळें ऐक्य क्वचितच होतें. तीच स्थिति आपल्या मनाची आहे. मन जर आपला अभिमान सोडून बुद्धिरूप-बुधरूप होईल - तर त्यालाही जवळच समोर 'गुरु' सांपडल्याशिवाय राहणार नाहीं. ज्योतिषशास्त्रांतही बुधाच्या घरा-समोरच गुरूचें घर सांगितलेलें आहे. 'यो बुद्धेः परतस्तु सः' या श्रीकृष्णोक्ती-प्रमाणें बुद्धीच्या पुढेंच असलेला सद्गुरुस भेटल्यावर मग ' गुरु तेथ ज्ञान । ज्ञानीं आत्मदर्शन । दर्शनीं समाधान । आथीं ।। याप्रमाणें समाधान होण्यास उशीर कसला ? पण 'अग्नेरापः'—याश्रुतीप्रमाणें तेजापासून जन्मलेलें पाणी पुन्हां त्याच तेजांत विलीन केलें पाहिजे. चंद्राला बुद्धिरूप सूर्यांत मिळविला पाहिजे. अर्थां-तच प्रकृतीचा निरास केल्याशिवाय भागणार नाहीं. आपण नुसते चंद्र असून-उपयोग नाहीं. आत्मारामाशीं योग करून रामचंद्र झालें पाहिजेः मग परमात्मा परेश । अनन्यभावें भजावा ' हेंच अर्पण आणि तर्पण होय !

# शिवाजीचें व्यंकोजीस पत्र.

(पुढील ऐतिहासिक महत्त्वाचें पत्र रा. रा. यशवंत राजाराम गुप्ते यांनीं संशोधन करून प्रथम प्रकाशांत आणलें. पत्राचा ग्रँट डफ याला पत्ता लागला होता. )

" श्री महादेव श्रीतुलजा भवानी.

श्रीसहस्रायु चिरंजीव अखंडित लक्ष्मी आलंकृत राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री येंकोजी राजे प्राति राजश्री शिवाजी राजे आशिर्वाद येथील क्षेम जाणोन स्वकीय--कुशल लेखन केलें पाहिजे. उपरि कैलासवासी साहेबी कैलास- वास केला त्यास आजी तेरा वर्षे जालीं. महाराजाचे पैके व जडाव व हाती व घोडे व मुलुख आत्रवेंही राजश्री रघुनाथपंती तुह्माला राज्यावरी बैसवून संपूर्ण राज्य तुमचे हातीं दिल्हें. यैसीयास आमचा अर्धा वांटा तेरा वर्षे तुम्हींच खादला. आह्मी जरी तुह्मा जवळी मागावें तरी बहुत दूर होतो. बऱ्या बोलें तुम्ही देणार नाव्हां म्हणून तेरा वर्षे सबूरी केली. मनामध्यें यैसा विचार केला. कीं, बरें, महाराजाचे पुत्र तेही आहेत. खाती तों वरी खात. मालाचे धनीच आहेत. जे समई आम्हांला फावेल ते समई आम्हीं वेव्हार सांगोन घेऊ. यैसे मनी धरून होतों. यैसीयास राजकारण प्रसंगे आम्हीं कुतुबशाहाचे भेटीस भागानगरास गेलों तेथून कर्नाटकांत गेलों चंजीस आलों. चंजी घेतली व येलूर तर्फेचा मुलुख घेतला व सेरखानास झगडीयांत मोडून गर्देस मेळविलें. शेर- खानाचे हातीं मुलुख होता तेवढाही घेतला त्यावरी मजल दरमजल कावेरी तीरास गेलों. हे भले लोक तुम्हांजवळी जाऊन बहुता रीती बोलिले कीं गृह- कलह करू नये आपला अर्धावाटा मागतात तो द्यावा यैसें बोलिलें. परंतु कपटबुद्धि तुह्मीं यैसी मनीं धरिली कीं, या समयांत आह्मी बहुत थोर राजे

जालों आहों. आह्मासी आपण खासा भेटीस येऊन् हलभल नरमी बहुत दाखवावी आणि आमचा वांटा बुडवावा. तेरा वर्षें सारें राज्य आपणच खादलें. पुढेंही आपणच सारें राज्य खावे यैसी बुधी मनी धरून वाटीयांच्या निवाडी-याचा तह न करितां आपण खासाच भेटीस आलेस. आमची व तुमची भेट जाली त्याउपरि आम्ही बहुतां रीती तुम्हासी बोलिलों कीं आमचा वांटा द्या परंतु तुह्मी वाटा द्यावा हा विचार मनी धराचना. मग जरूर जालें कीं तुम्ही धाकोटे भाऊ आपण होऊन आमचे भेटीस आलेस आणि तुम्हाला धरावे आणि वाटा मागावा हे गाष्टी थोरपणाचे इजतमिध्यें ल्याख नव्हे. या निमित्य तुम्हांला चंजाउरास जावयाचा निरोप दिधला. तूम्हीं चंजाउरास गेलेंसी याउपरी गृहकलह वाढवूं नये. वाढविल्यानें पहिले युगीं पांडव कौरव बहुत बहुत कस्टी जाले ते सारी भारताची कथा मनांत आणून गृहकलह वाढविल्यांत उभयपक्षीं कस्टी होयेजे. सांगोन पाठविलें कीं, तुम्हीं व आम्ही वाटे करून घेऊन परस्परे समाधानें राहोन. परंतु तुम्हीं दुर्योधनासारिखा दुष्ट बुद्धि करून संधि न कराच. युद्ध करावें यैसेंच मनीं धरिलें. यैसीयास आम्हांस रायेगड प्रांतें बहुत कांहीं कार्य होतें या निमित्य तोरगल प्रांतास आलों, तेथें यैसी खबर आइकिली कीं, तुम्हीं तुरक लोकांच्या बुद्धीस लागोन आमच्या लोकांसीं झगडा करावा, यैसे मनीं धरून आपली सारी जमेत येकवट करून आमच्या लोकांवरी पाठवून दिल्हेत. तुमचे लोक चालोन आल्यावरी तुमच्या आमच्या लोकांत थोर झगडा जाला तुमचें लोक पराजय पावले, किती येक लोक पलोन दाणादाण होऊन गेले यैसा समाचार आइ-किला. हे ऐकोन बहुत नवल यैसे वाटलें कीं कैलासवासी महाराज त्यांचे तुम्हीं पुत्र बहुत थोर लोक यैसे असोन कांहीं विचार करीत नाहीं. यैसे असतां कस्टी व्हाल याच नवल काये.

दुसरा विचार करावा कीं, श्रीवाची व श्रीची कृपा त्यावरी पूर्ण जाली आहे, दुस्ट तुरुकाला ते मारितात, आपल्या सैन्यांतही तुरुक लोकच असतां जये कैसा होतो, आणि तुरुक लोक कैसे वाचो पाहतात हा विचार करावा

होता आणि युद्धाचा प्रसंग पडावा नव्हता. परंतु दुर्योधनासारखी बुधी धरून युद्ध केलें आणि लोक मारविलें, जें जालें तें जालें, पुढें तऱ्ही तुम्ही हट न करणें. तेरा वर्षें तुम्ही सारें राज्य खादलें तें खादलें या उपरि किंतक आमचे आम्ही घेतले असे. जे जागे तुमचे हातीं उरले आहेतीं ते आमचे लोकांचे हातीं देणें आणि नकद पैके व जडाव व हाती व घोडे यांचा अरधा वांटा देणें यैसा विचार करून आम्हांसी संधि करणें. तुम्ही यैसा संधि निर्मलपणें केलिया आम्ही आपणांपासून तुम्हांला तुंगभद्रे अलाड पनाले धातें तीनी लक्ष होनांची दौलत देऊन अथवा आह्मा जवळील दौलत तुम्हांला मानेना तरी कुतूबशाहास अर्ज करून त्यापासून तुह्माला तीन लक्षांची दौलत देवऊनु. यैसे दोन्ही विचार तुम्हांला लिहिले आहेत. या दोन्हीमधील येक मनी धरून मान्य करणें. हटाचे हातीं न देणें. आपल्यांत आपण गृहकलह करावा आणि कस्टी व्हावें याचें कांहीं प्रयोजन नाहीं याउपरि तऱ्ही आमचा आपला संधि व्हावा यैसी बुधी मनी धरून वांटीयाचा वेव्हार निर्गमून टाकणें आणि सुखें असणें गृहकलह बरा नव्हे. आम्ही तरी वडीलपणें आजीवरी तुम्हांला सांगितले आतांही सांगतों. ऐकाल तरी बरें. तुम्हीच सुख पावाल नाईकाल तर तुम्हीच कस्टी व्हाल.

---

# श्रीगुरुदास महाराज-माहूर ह्यांचीं ध्यानें

एक तरुण स्त्री हिरवें लुगडें नेसलेली नमस्कार करून गेली. कांहीं वेळानें प्रकटरूप पुढें बसलेलें आहे, त्यानें मजपुढें पत्रावळ टाकून तें एका बाईकडून वाढवीत होतें. सर्व पदार्थ वाढले. प्रकटरूप एका बाईस म्हाणालें " याला यथेच्छ वाढून जेऊं घाल. हा जेवल्यावांचून मी उठत नाहीं " माझ्या मनांत आलें कीं, स्वामी जेवल्यावांचून आपण कसें जेवावें ? इतक्यांत एक उंच बाई पांढरें पातळ नेसलेली, कपाळभर कुंकवाचा मळवट भरलेला, हातांत तांब्या, काखेंत तांबडें लुगडें असून मजकडे डोळे वटारून पाहात होती. मी तिला नमस्कार केला.

पुन: एकाग्रता, त्यांत वाद्यें वाजत असून गायन ऐकूं येत होतें, त्यांत **जोगवा वाढाहो ॥ आईचा ॥ १ ॥ येणेंचि होईल सर्व निवाडाहो ॥ १ ॥** असें प्रकटरूप गाणें गात होतें. ॐ तत्सत्

१५

एकाग्रतेंत ' दोन दिवसांत तुझी व्याधि जाईल ' हा लेख लिहून ठेव असें श्री आईनें सांगितलें. मग उजवीकडे सूर्योदय, डावीकडे तांबडा दिवा यास धूर व काजळ होतें. नंतर समोर सूर्योदय. मग एकाग्र निश्चलतेच्या संधानांत उजव्या हाताच्या उजव्या बरकड्या स्फुरण होऊं लागल्या. ॐ तत्सत्

एकाग्रतेंत:—

१६

खेळ मांडला खरोखरी । मिथ्या कळला आखरी ॥
परंतु देह असे जोंवरी । तोंवरी नाटोपे ॥ १ ॥
देह जोंवरी माझा । तोंवरी भोग सिंधु राजा ॥
मा इतराऽभागी प्रजा । लहरी मोजा किती ॥ २ ॥

ॐ तत्सत्

१७

'आतां स्वस्थ करोनि चित्त । राहणें हेंचि उचित' ॥ निर्मळ अंतःकरण झाल्या वांचून कार्यभाग होत नाहीं असें भाषण. पितळेचा गडु सूर्यासारखा चमकत होता. एक स्वरूप—तांबडा मळवट. तांबडें लुगडें, कानांत काप, असें-समोर बसून म्हणूं लागलें " परमात्मा जातही नाहीं येतहि नाहीं, प्रवृत्ति आणि निवृत्ति दोन वाटा. दोहोंतही एकच शांति पाहिजे. प्रवृत्तींत शांति आली कीं तीच निवृति. निवृत्ति आपण गांठली कीं प्रवृत्ति मेली ॐ तत्सत्

१८

केशरी रंगाचें लुगडें नेसून बाई चाललेली पाहिली तिला हांक मारली. तिनें येऊन दोन्ही हातांनीं मला हालविलें, त्यांत ती नाहींशी होऊन मोठा बगीच्या दिसला. त्यांतून एक लहानसें पोर मजकडे धांवत येऊन अंगावर पडलें. मग एक बाई बसलेली दिसली, तिच्या हातांत दुसरें एक लहानसें मूल होतें. त्याच्या कमरेस रुद्राक्षांचा करगोटा होता. ती म्हणाली या पोराला भस्म लावा. मग निराकार आनंद. त्यांत केलेले प्रश्न व दिलेलीं उत्तरें.

प्र.—सकल सौख्यांत उत्तम सौख्य कोणतें ?

उ.—आत्मसौख्य उत्तम.

प्र.—सकल ध्यानांत उत्तम ध्यान कोणतें ?

उ.—आत्मध्यान उत्तम.

प्र.—सकल ज्ञानांत उत्तम ज्ञान कोणतें ?

उ —आत्मज्ञान उत्तम.

प्र.—सकल लाभांत उत्तम लाभ कोणता ?

उ.—आत्मलाभ उत्तम.

मग निराकार स्वच्छ प्रकाश. घर व घरांत दिवा दिसला, ॐ तत्सत्

१९

निर्विकल्पतेंत उजेड व भोंक -- त्या भोंकांतून पलीकडे गेलों, मी पाहूं लागलों तों निळ्या रंगाचें आभाळ झावळाझावळा अंधार होता. इतक्यांत सर्वांगाला शेक लागूं लागला, शेक खालून लागत लागत वर चढत होता. जसजसा वर चढूं लागला तसतसा नीळवर्ण कमी होत जाऊन पांढऱ्या ढगाप्रमाणें ( अथवा पांढऱ्या झिरझिऱ्या पडद्यांतून पलीकडे दिवा असले-

त्याचा उजेड पडद्याबाहेरून पाहिला असतां जसा दिसतो तसा उजेड दिसूं लागला, ) पांढऱ्या ढगाच्या आड रात्रीं वीज चमकूं लागली; म्हणजे तिची चमक चोहोंकडे ढगावर चमकूं लागते तसें अथवा एका ठिकाणीं पाणी हालले म्हणजे सभोंवार लाटा हालूं लागतात तशी चमक सर्व शरीरांत चमचम करूं लागली, डोळ्यापुढें एकदम वीज चमकल्याबरोबर उत्थान. ॐ तत्सत्.

२०

एकाग्रता. त्यांत उराच्या ठिकाणीं व मस्तकांत दोन्ही कानांच्या वरच्या व मागच्या बाजूनें वायूला साफ जातां येत नाहीं ( तो तुंबून राहतो.) हे दोन मोठे अडथळे आहेत व हेच रोग आहेत असें समजलें व पुढें तसेंच धैर्यानें व युक्तीनें प्रवेश केला तों थंड आणि स्वच्छ प्रकाशाचें एक झरोकें तें पुढील बाजूला म्हणजे भुवयाच्या आंतल्या बाजूला आहे. त्याच्या मागें म्हणजे डोळ्यांच्या मागच्या पश्चिमेच्या अंगास तटबंदी खोल हौदासारखें आहे. म्हणजे पोकळ गाभारा आहे त्या गाभाऱ्यांत फक्त आनंद निर्वेध आहे. आनंदरूप ती जागा आहे. तेथें जाईपर्यंत जरी कष्ट वाटले तरी त्या झरोक्यांत उभे राहून पलीकडचा म्हणजे मागचा गाभारा पाहूनच आनंद वाटला, व इथेंच मुख्य देव राहतो असेंही कोणी सांगितलें, पुढें म्हणजे त्या गाभाऱ्यांत जाण्याची खटपट करावी असें मनांत आलें. पण ' पुढें जाण्याची आतांच घाई करूं नको कारण तुला बिनहरकत जातां येणार नाहीं. अडथळे आड येतील म्हणजे ते धक्के देतील ' ॐ तत्सत्.

२१

साफ प्राणायाम चालणें, ध्यान निर्वेध होणें, समाधि लागणें, हें सर्व मनावर अवलंबून आहे खरें; परंतु, त्याला प्रकृतीचा रस्ता चांगला पाहिजे. शरीरास कोणतेही अल्प व्याधीचे दगड हे अडथळा करीत असतात. जसे मानसिक विचार झोंपेला अडथळा करतात तसें आनंदसुखाला प्रकृतीचें वैगुण्य विकार करतें म्हणून प्रकृति निकोप व तत्संबंधी खाणेंपिणें सात्विक, रसिक, पुष्टिकारक, ताजें असें खाणें व तें वेळेवर पाहिजे. क्रोध, काळजी, चिंता, लोभ, मोह, मोठेपणा, परस्वाधीनता, निराशा वगैरे कांहींएक नसावी. अमुक एक करायचें आहे असें लचांड तें अपथ्यकारक असतें. अपथ्यानें

जसा औषधाचा गुण नाहीं तशी ही व्यवस्था नाहीं तर हेंहि साध्य होणें कठीणच. मुख्य आधीं मन शांत राहील असें करण्यास झटलें पाहिजे. मन शांत तो सुखी आणि शांति तोच देव, तेंच आत्मरूप व तोच मोक्ष इतकें ठरल्यावर ' थोड्या अवकाशांत होईल ' असें सांगितलें आहे. एक मोठा शेंदुराचा मुखवटा दिसला व मग एक मुलगी १०।११ वर्षांची बाजूला उभी राहून हळूच मजकडे पाहून हंसत म्हणाली '**इथं काय करावें ?** ॐ तत्सत्.'

२२

एकाग्रतेंत एक लाल शेंदराचा मुखवटा मग एक लहान मुखवटा तांबड्या फुलांनीं पूजा केलेला, पूर्वेकडे तोंड असलेला व चांदीच्या निरांजनींत तुपाची फुलवात पेटविलेल्या दिव्याची आरती आपल्या आपणच वाळगल्याप्रमाणें उभी चक्राकार फिरत आहे असें दिसलें. मग देव्हाऱ्यांत देवीची तसबीर असून पुष्कळ अलंकार व पुष्कळ फुलें वाहिलेली व जरीचीं वस्त्रें परिधान केलेली व पुष्कळ दिवे असलेली व सूर्योदय पाहिला ! ॐ तत्सत्.

२३

पुष्कळ शेंपन्नास सवाष्णी बायका. दिवे व पूजा केली, देवी दिसल्यावर एक श्लोक ऐकूं आला तो.

**महाकाली महालक्ष्मी भवानी ब्रह्मनंदिनी ।**
**शुभांगी सर्वकल्याणी नमामि देवि रेणुका ॥**

यामध्यें **नमोस्तु का नमामि** हें लक्ष्यांत राहिलें नाहीं. ॐ तत्सत्

२४

मोठें तीर्थ होतें त्यांत एक बाई स्नान करून लुगडें नेसतांना पाहिली. मग आत्मरूपाचिंतनांत तदाकारता–आनंदरूपता. त्यावेळेस ,आनंदच मी असें वाटत होतें तों प्रश्न आला.

प्रश्न—देह कुणाचा ? उत्तर—देह देहाचा.

तुझा याचा संबंध काय ? उत्तर—संबंध नाहीं.

तूं सुखी कां देह सुखी ? उत्तर—मी सुखी.

मग तुम्हांला आतां काय पाहिजे—मला कांहीं नको, फक्त मी आतां आहें असाच नेहमीं सुखरूप असावें.

हें सुख कुणाचें ? —माझें

मग स्वतःच जर तूं सुखरूप आहेस तर असावें म्हणतोस याचें कारण काय ?

उत्तर—केव्हां केव्हां देहपणाचा संग घडतो त्या वेळेस माझें मला विस्मरण होतें.

विस्मरण होतें तें कळतें कुणाला ? —मलाच.

मग स्मरणविस्मरणाला जाणणारा स्मरणविस्मरणांतील आनंदरूप तूंच आहेस, हेंच तुला तुझें दर्शन, ॐ तत्सत्,

२५

एकाग्रताः—मोठ्या व खोल भुयारांत मंडप होता. मंडपांत एक दार होतें. त्याला चौकट सोन्याची होती. दार पूर्वाभिमुखी होतें. दाराचे दोन्ही बाजूंस दोन दिवे होते. त्या दारांत पांढऱ्या शुभ्र वर्णाची हास्यमुख हिरवें लुगडें जरीकांठीं व पिवळी चोळी, मुगुट कुंडल, शंख, चक्र चार हातांची उभी राहिलेली देवी दिसली. ॐ तत्सत्.

२६

एकाग्रता होऊन मस्तकापर्यंत वायु गेला कीं प्रकाश मग आम्ही नांव, गांव, रंगरूप, जातगोताची चौकशी करीत नाहीं. फक्त आम्ही आमच्या कामाकडे पाहातों मग लहानसें देऊळ त्यांत काळीं चंद्रकळा नेसून गौरवर्णाची बाई [ देवी ] उभी होती. तिच्या भोंवतीं पताका तांबड्या होत्या, मग एकाग्रता व आत्मरूप विचारान्ती **आत्मसुखापरतें सुख नाहीं हा स्वानुभव**. ॐ तत्सत्

**पद** ( चाल—पांडुनृपति जनक जया )

रेणुराज चंद्राची, रेणुकाही चंद्रकळा ।
हृदयमंदिरांत उभी नेसून चंद्रकला ॥ धृ ॥
काल वृद्धता अति । उंचवर्ण सावळा ।
आजि तरुण गौरवर्ण, मुखेंदु वाटोळा ॥ १ ॥

सुवर्ण पादुका पदिं, रत्नहार आगळा ।
कंकण बाहुभूषणें कंचुकी रंग पिवळा ॥ २ ॥
कार्णि मकरकुंडलें, सुमनमालिका गळा ।
काजळ कुंकु दिव्यभाळिं, कस्तुरी टिळा ॥ ३ ॥
दिव्य तेज किरिट दीप्ति, दिपवी सूर्यमंडळा ।
श्रीगुरुदासाऽनंदे, दावि स्वसुख सोहळा ॥ ४ ॥

ॐ तत्सत्.

२७

परवांच्या दिवशीं एक सर्प मारला तुला आठवतो कां नाहीं ? मग पांढरें पातळ नेसून झेंडूच्या पिवळया फुलांच्या माळा हातांत घेऊन उन्हांत एक बाई उभी राहिली होती:—

**फार नाहीं कोडें, फार नाहीं, कोडें, एक लक्षचि आहे थोडें**
**परस्थळिं कशाला रहावें । आपआपल्या सदनिं जावें ॥ धृ ॥**

अशीं दोन वेगळीं ध्रुवपदें ऐकूं आलीं. मग चांगली एकाग्रता व आनंद वाटला. उत्थान झाल्यावर आपलेंच दुर्लक्ष्य असल्यामुळें आत्मसुख होत नाहीं अशी खात्री वाटली. **आत्मप्राप्ति न होण्याला कारण दुर्लक्ष्य हेंच.**

ॐ तत्सत्

अद्वैतानंद यावांचून कांहीं नाहीं. याचें कारण डोळे मिटले ह्मणजे कांहीं चमत्कार दिसतात व **अद्वैतभावनेचें ध्यान उघड्या डोळ्यानें केलें म्हणजे आत्मस्वरूपी आनंदाशिवाय कांहीं अनुभवास येत नाहीं.**

ॐ तत्सत्

२८

ध्यान एकाग्रता त्यामध्यें त्रैमूर्तिचे मुखवटे लांब दिसले. ते जवळ दिसते तर चांगले स्पष्ट दिसले असते. ते पाहून आम्ही मोठे धन्य आहोंत असें ह्मणालों तों स्मरण झालें कीं, **आम्ही** हा अहंपणा उपयोगीचा नाहीं. मग मी मोठा धन्य आहें असें तोंडांतल्या तोंडांत म्हणूं लागतो तों एक ब्राम्हण उजव्या

वाजूला बसला होता, तो तोंडातल्या तोंडांत हसूं लागला. त्याचा हेतु **मीपण हें नसावें** हें याला समजलें आणि हें नसावेंच. अशा भावनेनेंच हंसत होता हें स्पष्ट दाखविलें. मग दिवा चांगला स्पष्ट दिसला. ॐतत्सत्

२९

एकाग्रता त्यांत **चलो कैलासकू आनाहै ? आनाहै** असें प्रश्नाला उत्तर दिलें त्यावेळेस प्रश्न करणारा वायुरूपानें अदृश्य कंठाच्या वरच्या बाजूस होता तिथून आवाज आला व मी हृदयाचे ठिकाणीं होतों. उत्तर देतांक्षणिंच उत्थान. ॐतत्सत्

३०

२।३ वेळ एकाग्रता झाली. दुसऱ्या खेपेस २ निरंजनें लाविलीं होतीं. एक अलीकडे व एक पलीकडे एक हात अंतरावर होतें. अलीकडील दिवा मंद होता, पलीकडील स्वच्छ मोठा प्रकाशमान असून थंड होता. तो १।२ मिनिटें स्पष्टपणें पाहिला. व तो निरखून पाहिला. इतक्यांत खालून सर्व वायु येऊन उरांत भरला. वर जाण्याचे वेळेस त्याला दाटी होऊं लागून उत्थान ॐतत्सत्

( सिद्धासनानें ) लवकर एकाग्रता होऊन वायु वर चढूं लागतो पण आज हें आसन नव्हतें.

३१

एकाग्रतेंत एक उत्तर दिशेस मोठा तलाव चिरेबंदी बांधलेला होता. सभोंवतीं झाडी साधारण होती. बारा वाजण्याची वेळ ऊन होतें. तलाव दृष्टीं पडतांच मला गुप्त वाणीनें सांगितलें कीं, **इथं ६२ कोटी मांदार गणपती स्थापन केले आहेत.** या वेळेस गायन वाद्यें ऐकूं येत होतीं. मग स्मरण झालें कीं, चि. नरहरी( खरशीकरा )ला परळीस रामदास स्वामीचें दर्शन झालें. इतक्यांत हदग्याच्या झाडाखालीं सावळ्या रंगाचा फक्त पांढरी लंगोटी जटेचे केस मोकळे सोडलेले दोन्ही हात उंच करून दोन्ही हातांत दोन्ही बाजूचे वीत वीत पदर धरलेली एक पांढरी लांबचक लंगोटी होती. तो असतांनाच राम-सिंगाच्या झोपडीमागें उंबराच्या झाडाखालून २ हिंदुस्थानी ( गृहस्थ ) पांढरा पोशाख केलेले डाव्या बाजूनें अगस्त्याच्या झाडींत येऊन मला म्हणाले **तुम्ही कांहीं धर्म करतां कां ?** ॐतत्सत्

३२

एक मुसलमान येऊन ह्मणाला **महाराज बुलाते है चलो.** त्याला येत नाहीं म्हणून सांगितलें. कांहीं वेळानें एक गोसावी म्हणाला चला त्याला यायला अवकाश आहे, त्याकडे पाहिलें तों त्याचे बरोबर एक मनुष्य होता.

ॐतत्सत्

३३

एक जटाधारी येऊन कांहीं बोलत होता. तो गेल्यावर मी १०-१२ हात उंच झालों आहें असें वाटलें. अधरच अंतराळीं आहें असें वाटलें. मग चंद्रप्रकाश दिवे व फिरून पांढरा सद्रा काळें जाकीट व टोपी घालून बसलेल गृहस्थ पाहिला. दाढी काळी लांब होती. पहिल्या **जटाधारीनें मला दूध भात जेऊं घातला,** ॐतत्सत्

३४

निर्विकल्पता व मातृतीर्थ. मारुतीच्या घाटावर महादेव व तुळशीचें झाड आहे त्यांची पूजा करून निघालों तों महादेवाजवळ तुळशीच्या खालीं एक पांढरा नाग दिसला. दंडापेक्षां जाड होता. पुष्कळ लांब होता, तो चळवळ करूं लागला. तेव्हां हा दंश करील असें वाटून तेथून निघावें म्हणून माघारी परतलों तों स्मरण झालं कीं, तो नाग नसून शंकरच असावा तर त्याचें दर्शन घ्यावें म्हणून पुन्हां उलट जाण्यास निघालों. ॐ तत्सत्.

३५

निर्विकल्पता-एक दैदीप्यमान ६।७ वर्षांची देवीची मूर्ति हिरवें लुगडें पांढरी चोळी, मुगुट, मोत्याचे दागिने, बारीक कुंकवाचा टिकला विडा खाल्लेला अशी दिसली. मग ( मुसलमानी भाषेंत बोध ) जटाधारी गौरवर्णाचे दोघे जण होते. बोधाचा सारांश **द्वैतउपासना आतां कां करतोस** असा होता. दिवा स्वच्छ मग दुसरा दिवा पांढरी वाटोळी हंडी त्यांत लावलेला खालीं होता. ती हंडी आपोआप वर चार हात जाऊन थांबली. मातृतीर्थांत दोन बायका स्नान करतांना पाहिल्या ॐ तत्सत्. ( समाप्त )

# बाराखडी फटके

## लेखकः—विष्णु गोविंद पाठक, भुसावळ

— १ —

खरें बोलणें बोल सदां तूं वाचिक तप हें साधि नरा ॥
खाणें लेणें भरपुर करितां मन चिंतातुर नको जरा ॥
खिदखिद हंसणें कठोर वाणी सोडायाची करीं त्वरा ॥
खिन्नत्वेंसा कदां न राही हंसतें मुख तूं ठेवि नरा ॥
खुला मार्ग बा सज्जनसंगें धरून जाई पैलतिरा ॥
खूळ मूळ हें मायाजाळें सोड सत्वरी नरवीरा ॥
खेंचति आशा तृष्णा तुजला अधोगतीचा मार्ग खरा ॥
खैचुं न देई आवरि तयांना त्रैलोकीं तूं लावि तुरा ॥
खोली न कळे भवोदधीची तरणें दुर्घट जगीं नरा ॥
खोट वस्तुतें चित्तीं न धरि मत्कुणसंगें मलिन हिरा ॥
खंब्राह्मीं द्विज लक्ष साधिती तैसा साराचि घेइ बरा ॥
खग्रासासम वेष्टित माया लंघुनि जा मग मोक्षपुरा ॥

— २ —

गरबड चित्तीं कदा नसावें अचलमनें स्मर उमावरा ॥
गा जनिं हर्षे जनार्दनातें भावें आणीं त्यास घरा ॥
गिरीकंदरीं नको जावया गेहीं देहीं याचि नरा ॥
गीररसा घे चाखुनि मनुजा टाकुनि बांकुस भराभरा ॥
गुलहुल सारी होय शांत मग आत्मनिवेदनिं तोष खरा ॥
गूढ कल्पना नाश पावती चौऱ्याशींचा सुके झरा ॥
गेलें मायावेष्टण सारें वाटे लटका जग सारा ॥
गैरसमजिचे नरा कळेना आत्मारामचि एक खरा ॥
गोलाकृतिचें त्रैजग कर्ता उरे दशांगुल प्रभु सारा ॥
गौमुखिंमाजीं देहशुचित्तव अजपा जप तूं करी नरा ॥
गंधाचि न उरे त्वत्कर्माचा प्रगटे आपहि ज्ञानझरा ॥
गः शब्दाचें मूळ खुंटलें स्वयंब्रह्म तूं होशि खरा ॥

३

घटीं मठीं जगदीश बिंबला ठाव दिसेना रिता तुला ॥
घाली माया झांकण डोळां काढुनिया तें बघ हरिला ॥
घिरटीं घालुनि शिणूं नको रे व्यर्थचि जन्मुनि मरण्याला ॥
घीस शरीरें या नरदेहीं परकल्याणीं या महिला ॥
घुमति कल्पना त्वदंतरीं त्यां सुखदुःखाच्या न दे स्थला ॥
घूघू शब्दें दुबड नाडलें झलें अंधचि तें रविला ॥
घेवे बोधामृत तूं हृदयीं हो नरजन्मीं अमर भला ॥
घैंवे रडशिल खेद झालिया विचार अजुनी करी भला ॥
घोरसिंधुसम दुस्तर भव हा बिंदुतुल्य करि तरण्याला ॥
घौघबाट करि लौकिक येथें जीं मग सोडुनि नरतनुला ॥
घंटानादें सुरवर तुजला नेतिल निर्गुणभुवनाला ॥
घर्षणेंचि चंदनसुगंध पसरे तेंवि करी निज करणीला ॥

४

चराचरांना निज जीवासम मानुनि त्यावरि करी दया ॥
चाल जनीं या लीनपणें तूं प्रेम निरंतर ठेवुनियां ॥
चिते समानचि चिंता आहे त्यजीं , धरी ना मुळीं भया
चीड असूं दे दुर्व्यसनाची मनें न घेई लावुनिया ॥
चुरचुर चित्तीं सदा असूं दे न जाइ धर्मेविण समया ॥
चूक शोधुनी निजमनिं पाहीं दोष अवयवीं घडलीया ॥
चेप मनातें ठेवि निरंतर होऊं न तें दे चंचालिया ॥
चैन करी मग आत्मरूपीं तूं अखंड हृदयीं पाहुनियां
चोज प्रभूच्या चातुर्याचें जगांत लक्षी मानविया ॥
चौकसपण कीं अंगीं असूं दे भुलतां न करीं काल दया ॥
चंचूनें बघ अंडज गाती प्रभाति प्रभुला उठूनिया ॥
चक्षूनें तूं सत्य विलोकीं ईशकृतीला ह्या गया ॥

अपूर्ण

# व्यायामाची महती

तेच दिवशीं संध्याकाळीं चार वाजण्याची वेळ बलवंतानें सर्वांस तालमींत, तालमीचे सर्व अधिकार नागेश व प्रभाकर याचे स्वाधीन करणार होता. अथात् त्यांची खाजगी बैठक होती.

सर्व स्थीरस्थावर झाल्यावर बलवंत ह्मणाला, "माझ्या बाळगोपाळांनों, तुम्हीं आज जो माझा आदरसत्कार केलात तो करण्याचें कांहींच कारण नव्हतें; कारण, मी तुमच्याचमध्यें कोणी श्रेष्ठ म्हणून नसून तुमच्यांतलिच आहें व पुढें तसाच राहणार; तरी पण तुमच्या प्रेमाबद्दल व आदरबुद्धिबद्दल मी तुमचा फार आभारी आहें.

"मित्रांनों, जुटीचें सामर्थ्य फार विलक्षण आहे. जेथें जूट आहे, तेथें जय आहे. हें खास समजा ………… म्हणून तुमचीं खाजगी भांडणें कशींही झालेलीं असोत आपल्या तालमीचा जेथें म्हणून संबंध येईल, तेथें जुटीनें वागा. माधवव्यायामशाळेचा विद्यार्थी म्हटला कीं लोकांना तुमच्या धैर्याविषयीं, सत्यवादित्वाविषयीं, एकीविषयीं अगदीं खात्रीच असली पाहिजे, असें वर्तन ठेवा. येथें येणारा प्रत्येक विद्यार्थी हुषार असतो; आज्ञाधारक असतो; नम्र असतो; आणि धर्मनिष्ठ असतो; असा आतांपर्यंत आपल्या शाळेचा लौकीक आहे तो घालवूं नका; तर या कीर्तींत भर घाला. तालमींत आपण येतों तें केवळ शरीर बलिष्ठ करण्याकरितां येतों असें समजू नका; तुमच्या शरीरसामर्थ्याबरोबर तुमचें मनोबलही वाढलें पाहिजे. दुबळें शरीर आणि दुबळें मन हीं दोन नरकाचीं द्वारें आहेत. तेव्हां हीं व्यायामानें, सच्छीलतेनें आणि धर्मनिष्ठेनें कायमचीं बंद करून टाका. एकदां हीं द्वारें बंद झालीं म्हणजे जगांत तुम्हाला कोणीही आडवूं शकणार नाहीं; कोणत्याही संकटाची तुम्हाला भीति वाटणार नाहीं आणि कसलेंही अपयश तुमचेकडे फिरकणार नाहीं. यापूर्वी तुह्मांला पुष्कळदां अशा गोष्टी सांगितल्या आहेत. पुन्हां जातां जातां थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे शरीर सबळ आणि निरोगी असणें हेंच या जगांतील पुरुषार्थाचें मूळ आहे; आणि व्यायाम हाच सुखाचा मूलमंत्र आहे. तेव्हां आमच्या प्रभाकरानें म्हटल्याप्रमाणें मी पुन्हां सांगतों

या या या या विद्यार्थ्यांनों व्यायामाला मित्र करा ।  
शक्तिबुद्धिचा, संपत्तीचा मानाचा जो असे झरा ॥

आमच्या कवीच्या या म्हणण्यांत काडीइतकाही संशय नाहीं. व्यायामाला तुह्मी मित्र केलेंत, सत्संगतीचीं वस्त्रें अंगावर घेतलींत, सुविचाराचें शिरस्त्राण डोक्याला चढविलेंत, धर्मनिष्ठेचें कवच अंगीं धारण केलेंत आणि दृढ निश्चयाची तलवार हातीं घेतलीत, कीं हा उन्नतीचा डोंगर चढून तुम्हांस काडीमात्रही त्रास पोहोंचणार नाहीं. कारण, मग तुम्ही समर्थांचे दास झालांत आणि समर्थांनीं,

समर्थाचिया सेवका वक्र पाहे ।
असा सर्व भूमंडळीं कोण आहे ! ॥
जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही ।
नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ १ ॥

असा निर्वाळा दिला आहे.

बलवंतानें म्हटलें, " मित्रांनों ! आतांचा काळ काम करणारास फारच चांगला आहे. पूर्वी चांगल्या गुरूकरितां घरदार सोडून वणवण करीत हिंडावें लागे व त्यावेळचें गुरुशिष्याचें नातें, त्यांचें परस्परांशीं वर्तन, त्यांचा कार्यकारण-भाव, सर्वच कांहीं वेगळें होतें. आतां काळ पालटला आहे.

समाजाची स्थिति पालटली आहे व राष्ट्राचें ध्येयही बदललेलें आहे. अशा वेळीं गुरुशिष्याच्या कल्पनाही बदलल्या असल्यास नवल नाहीं. या दृष्टीनें विचार करितां आज आपणांपुढें वाटेल तेथें आढळणारे, सतत तुमच्या बरोबर राहणारे आपल्या चरित्रानें तुह्मास वळण लावणारे व आपल्या चरित्ररूपानें तुमच्या वर्त-नावर नजर ठेवणारे असे किती तरी गुरु तुमच्या आमच्या भोंवतीं आहेत !

जगांत जेवढे ह्मणून थोर पुरुष झाले,—ते कोणत्याही जातीचे, पंथाचे धर्माचे, वयाचे किंवा राष्ट्राचे असोत तेवढे आपणां तरुण विद्यार्थ्यांचे गुरु आहेत. आपल्या चरित्रानें तुमच्याजवळ सतत राहणारे आहेत आणि आपल्या चरित्रानें तुम्हांस मार्ग दाखविणारे आहेत. "

थोर महात्मे होऊन गेले चरित्र त्यांचें पहा जरा ।
आपण त्यांच्या समान व्हावें हाच सांपडे बोध खरा ।

हें कविवचन लक्ष्यांत ध्या व आपला गुरु निवडा !

( मारुतीकडे बोट दाखवून ) मित्रानों ! हा आपला व्यायामाचा गुरु ? हीच आपली व्यायामदेवता ! पहा त्यांचें चरित्र !

बल, बुद्धि, शील, ब्रह्मचर्य, सदाचरण कोणतीही गोष्ट घ्या, सर्व गुणांत आमच्या या मारुतीरायांचा—आमच्या या बजरंगबलीचा पहिला नंबर लागेल ! यांची मूर्ति डोळ्यापुढें ठेवली, हृदयांत ठसविली, जिभेवर बसविली तर आपलें कल्याण नाहीं कां होणार ! त्याच्या गुणांचें थोडें थोडें अनुकरण केलें तरी आपला उत्कर्ष नाहीं कां होणार! ध्यास झाला पाहिजे. मनाला ज्या गोष्टीचा ध्यास लागतो तसेंच त्याचें रूप बनतें. त्याचप्रमाणें शरीरास वळण लागतें ! "

"दोस्त, आवडत्या महात्म्याचा फोटो सतत जवळ बाळगून व त्याच्या चरित्राचें सतत वाचन ठेऊन आपण आपला आयुष्यक्रम ठरविला पाहिजे. त्याच्या फोटोपुढें कोणतेंही वाईट कृत्य करावयाचें नाहीं. कोणत्याही मोहांत पडावयाचें नाहीं; आणि कोठेंही चुकावयाचें नाहीं असें ठरविलें पाहिजे. मी अमक्यचा शिष्य आहें, मला माझ्या समाजाच्या व देशाच्या उपयोगीं पडावयाचें आहे, असें निश्चित ठरऊन आपणच आपला उद्धार केला पाहिजे; ज्याला स्वतःस सुधारतां येत नाहीं त्याला जगाच्या उपयोगीं पडतां यावयाचें नाहीं व त्याचे हातून कोणतेंही चांगलें कृत्य व्हावयाचें नाहीं "

"ऐन प्रसंगीं मनुष्यास स्वतःस सांभाळतां आलें पाहिजे. व्यायाम करून तुम्हीं पुष्कळ बळ मिळविलेंत, परंतु एखादा दुर्बळ छळला जात असतां जर तुम्ही गप्प बसला किंवा पळून गेला तर त्या तुमच्या बळाचा काय उपयोग? मोठ्या लोकांचें शिष्यत्व पत्करून त्याची परीक्षा द्यावयाची असते ती या अशा वेळीं !! थोर लोकांच्या चरित्रांत सर्वच लहान मोठ्या गोष्टी अद्भूत नसतात तर पुष्कळ लहान लहान गोष्टींतही ते आपल्या चातुर्यानें बळानें, आत्मसामर्थ्यानें, शुद्ध चरित्रानें चमत्कार घडवून आणितात, त्यांच्यावर येणारीं संकटें, त्यांचे मोहाचे प्रसंग, त्यांच्या अडचणी विलक्षण मुळींच नसतात; पण सामान्य मनुष्य तेथें कचरतो, फसतो किंवा आडतो आणि थोर त्यांतून निर्लेप निघून जातात. त्याच्या चरित्रापासून शिकावयाचें असतें तें हेंच !

—**नारायण हरी आपटे.** ( सुखाचा मूलमंत्र )

# नाथांचें चिरंजीवपद.

चिरंजीवपद पावावयासी । अधिकार कैसा साधकासी ॥
किंचित बोलूं निश्चयनिश्चयेंशीं । कळावयासी साधकां ॥१॥
येथें मुख्य पाहिजे अनुताप । त्या अनुतापाचें कैसें रूप ॥
नित्य मरण जाणे समीप । न मनी अल्प देहसुख ॥२॥
ह्मणे नरदेह किमर्थ निर्मिला । तो मीं विषयस्वार्थीं लाविला ॥
थिता परमार्थ हातींचा गेला । करीं वहिला विचार हा ॥३॥
ऐसा अनुताप नित्य वाहतां । तंव वैराग्य ये तयाच्या हातां ॥
त्या वैराग्याची कथा । ऐक आतां सांगेन ॥४॥
तें वैराग्य बहुतापरीं । आहे आहे गा अवधारीं ॥
सात्विक राजस तामस त्रिप्रकारीं । योगीश्वरीं बोलिजे ॥५॥
नाहीं वेदविधी आचार । नेणें सत्कर्म साचार ॥
कर्मधर्मीं भ्रष्टाकार । तो अपवित्र तामस ॥६॥
त्याग केला पूज्यतेकारणें । सत्संग सांडूनि पूजा घेणें ॥
शिष्यममता धरोनी राहणें । तें जाणणें राजस ॥७॥
हें वैराग्य राजस तामस । तें न मनेंच संतांस ॥
त्यास न भेटे कृष्णपरेश । अनर्थास मूळ तें ॥८॥
आतां वैराग्य शुद्ध सात्विक । जें (मी) जगद्वंद्य मानी यदुनायक ॥
तें तूं सविस्तर ऐक । मनीं निष्टंक बैसावया ॥९॥
भोगेच्छा विषयीक । ते तो सांडी सकळीक ॥
प्रारब्धें प्राप्त होतां देख । तेथोनि निष्टंक मन काढी ॥१०॥
कां जे विषय पांच आहेती । ते अवश्य साधकां नाडिती ॥
म्हणोनि लागों नेदी प्रीति । कवणे रीतीं ऐकपां ॥११॥
जेणें धरिला शुद्धपरमार्थ । त्यासि जनमान हा अनर्थ ॥
तेणें वाढे विषयस्वार्थ । ऐक नेमस्त विचार हा ॥१२॥
विरागी पुरुष देखोनी । त्याची स्तुती करिती जनीं ॥
एक सन्मानें करूनी । पूजे लागोनि पै नेती ॥१३॥
त्याचें वैराग्य कोमळकंटक । नेट न धरीच निष्टंक ॥
देखोनि मानस्तुति अलौकिक । भुलला देख पै तेथें ॥१४॥

जनस्तुति लागे मधुर । म्हणती उद्धरावया हा हरीचा अवतार ॥
आह्मांलागीं जाहला स्थिर । तेणें तो धरी फार शब्दगोडी ॥१५॥
हा पांच विषयांमाजीं प्रथम । शब्दविषय संभ्रम ॥
मग स्पर्श विषय सुगम । उपक्रम तो ऐसा ॥१६॥
नाना मृदु आसनें आणिती ॥ विचित्र पर्यंक निद्रेप्रति ॥
नरनारी शुश्रूषा करिती । तेणें धरी प्रीति स्पर्शाची ॥१७॥
रूपविषय कैसा गोंवी । वस्त्रें भूषणें देती बरवीं ॥
तेणें सौंदर्य करी जिवीं । देहभावीं श्लाघ्यता ॥१८॥
रूपविषय ऐसा जडला । रसविषय कैसा झोंबला ॥
जें जें आवडे तयाला । त्या त्या पदार्थाला अर्पिती ॥१९॥
ते रस-गोडी--करितां । घडी न विसंबे धरी ममता ॥
मग गंधविषय ओढिता । होय तत्त्वतां त्या कैसा ॥२०॥
आवडे सुमन चंदन । बुका केशर विलेपन ॥
ऐसे पांचही विषय जाण । जडे संपूर्ण सन्मानें ॥२१॥
मग जे जे जन वंदिती । तेची त्याची निंदा करिती ॥
परि अनुताप नुपजे चित्तीं । ममता निश्चितीं पूजकांची ॥२२॥
म्हणाल विवेकी जो आहे । त्यासी जनमान करील काय ॥
हें बोलणें मूर्खाचें पाहे । तया चाड आहे मानाची ॥२३॥
झाल्यासी प्रारब्ध गती । मान झाला तरी म्हणती ॥
परी तेथेंचि गुंतोनि न राहती । उदास होती तात्काळ ॥२४॥
यापरी साधकाच्या चित्ता । मान गोडी न संडे सर्वथा ॥
जरी कृपा उपजेल भगवंता । तरीच मागुता होय विरक्त ॥२५
तो विरक्त कैसा म्हणाल । जो मानलें सांडी स्थळ ॥
सत्संगीं राहे निश्चळ । न करी तळमळ मानाची ॥२६॥
मांडीना स्वतंत्र फड । म्हणे अंगा येईल अहंतावाड ॥
धरूनी जीविकेची चाड । न बोले गोड मनधरणी ॥२७॥
नावडे प्रपंचजनीं बैसणें । नावडे कोणासी बोलणें ॥
नावडे योग्यता मिरवणें । बरवें खाणें नावडे ॥२८॥

नावडे लौकिक परवडी । नावडती लेणीं लुगडीं ॥
नावडे परान्न गोडी । द्रव्यजोडी नावडे ॥ २९ ॥
नावडे स्त्रियांत बसण । नावडे स्त्रियांचें पाहणें ॥
नावडे स्त्रियांचें रगडणे । त्यांचें बोलणें नावडे ॥ ३० ॥
नको नको स्त्रियांची संगत । नको नको स्त्रियांचा एकांत ॥
नको नको स्त्रियांचा परमार्थ । करिती आघात पुरुषासी ॥ ३१ ॥
म्हणती गृहस्था साधकें । स्त्री सांडोनी जायें कें ॥
येच अर्थी उत्तर निकें । ऐक आतां सांगेन ॥ ३२
स्वस्त्रिये वांचोनी । नातळावी अन्य कामिनी ॥
कोणे स्त्रियेशीं संनिधवाणी । आश्रयो क्षणी न द्यावा ॥ ३३ ॥
स्वस्त्रीसही कार्यापुरतें । पाचारावें स्पर्शावें निरुतें ॥
परी आसक्त होऊनीया तेथें । सर्वथा चित्तें नसावें ॥ ३४ ॥
नरनारी शुश्रूषा करीती । भक्तिममता उपजविती ॥
परी शुद्ध जो परमार्थी । तो स्त्रियांचे सांगती न बैसे ॥ ३५ ॥
अखंड एकांतीं बैसणें । प्रमदासंगें न राहणें ॥
जो निःसंगनिरभिमानें । त्यापैं बैसणे सर्वदा ॥३६॥
कुटुंब आहारा कारणें । अकल्पित न मिळे तरी कोरान्न करणें ॥
ऐसे स्थिती जें वर्तणें । तें जाणणें शुद्ध वैराग्य ॥३७॥
ऐसी स्थिति नाहीं ज्यासी । तंव कृष्णप्राप्ति कैची त्यासी ॥
त्यालागीं कृष्णभक्तासी । ऐसी स्थिती असावी ॥३८॥
या स्थिती-वेगळा जाण । कृष्णीं मिळूं पाहें तो अज्ञान ॥
तो सकळ मूर्खांचें अधिष्ठान । लटिकें तरी आण देवाची ॥३९॥
हें बोलणें माझिये मतीचें । नव्हे नव्हेचि गा साचें ॥
कृष्णें सांगितलें उद्धवा हिताचें । तें मी साचें बोलिलों ॥४०॥
साच न मानी ज्यांचें मन । तो विकल्पें नपवे कृष्णचरण ॥
माझें काय जाईल जाण । मी तो बोलोन उतराई ॥४१॥
साधावया वैराग्य ज्ञान । मनुष्यदेहीं करावा प्रयत्न ॥
सांगे एकाजनार्दन । आणिक यत्न असेना ॥४२॥

## अभयपत्र

स्वस्ति श्रीनृपशालिवाहन शके १५२५ आषाढ वद्य ५ गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस अयोध्याधीश श्रीरामराजा छत्रपती अनंत ब्रह्मांडनायक यांणीं आज्ञापत्र राजेश्री जिवाजीपंत शेखदार मौजे देहगांव तर्फ अष्टपुरी मामले--पंचालेश्वर यांस आज्ञापत्र ऐसाजे मौजे मजकूर जी खबर बखर लिहून पाठविली तेथील लिहिलें कीं मनाजी देशमुख याणें कामक्रोधादि असुरसेना पुंडपाळेगार मेळवून गांव मारितो वसाहत होऊं देत नाहीं. ब्रह्मपुरीचा मार्ग चालूं देत नाहीं. त्याजवरून तुम्हावर साहेब मेहरबान होऊन मनाजी देशमुख वगैरे यांस तंबी पोंहचावयास सरकारांतून सुभे रवाना केले बितपसील आत्मानात्मविवेक पंतप्रधान स्वानुभव सेनापती प्रबोध सरलष्कर या समागमें वीतरागवीर दैवी संपदा देऊन ताबडतोबीनें रवाना केले आहेत. तर मौजे मजकुरीं पावतांच अवघे पुंडपाळगार मारले जातील.

जेरजबरदस्ती करून त्यांस सत्समागमीं लागोन नवविधा भजनीं लागोन तुम्हास अनन्य शरण येऊन वश होतील तेंव्हां साहेब काम सुरळीत चालोन ब्रम्हपुरीचा मार्ग चालों लागेल तर तुह्मी आपुली खातर जमा राखोन साहेब कामास रुजु राहणें म्हणजे केली सेवा मंजूर आहे. हुजूर आलीया सबंध मोक्षांतील शाश्वतपद दिल्हें जाईल. सहज पूर्ण निजानंदे रंगोन साहेब कामास तत्पर असणें जाणिजे लेखन अलंकार. ॥ श्रीसद्गुरु नाथार्पणमस्तु ॥

## कांडण

विवेक कांडणीं कांडितें साजणी । निजबोध स्मरणीं फिरतसें ॥ धृ ॥
देह हें उखळ मन हें मुसळ । कांडिले तांदुळ विवेकाचे ॥ १ ॥
एका जनार्दनीं कांडण कांडितां । ब्रह्मसायुज्यता प्राप्त झाली ॥ २ ॥

# पांगारकरांची पुस्तकें

१. भक्तिमार्गप्रदीपः—( आवृत्ति चौदावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ८८ व्ही. पी. नें ८१२.

२. संतचरित्रमालाः—यांत कांहीं प्राचीन व कांही अर्वाचीन अशा ४२ संतांचीं चरित्रे सप्रमाण दिली असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ. सं. २५६ किं. रु. १८८.

३. श्रीएकनाथचरित्रः—श्रीएकनाथमहाराजांच्या चरित्राची ही चौथी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांही उतारे नवीन घातले आहेत. किं. ८१२

४ कविरामायणः—संस्कृत व प्राकृत रामायणे व शेकडो स्फुट प्रकरणे यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हे स्वतंत्र रामायण तयार केले आहे किं. ८४

५. आनंदलहरीः—( कवितासंग्रह ) ह्यांत पांगारकरांच्या कवितांपैकी ४ स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें, महाराष्ट्र संत व सद्ग्रंथ, ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ८१२

६ नारदभक्तिसूत्रें:—( आवृत्ति ४ थी ) हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहुन भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेल आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ८८

७ नवविधा भक्तिः—( सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी) यांत नवविधाभक्तिचे नव प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ८६

८ निरंजनमाधवांची कविताः— भाग १ किं. रु भाग २ व ३ एकत्र किं. १॥ रु. तीनही भाग एकदम घेणारास रु० २८४

९. श्रीज्ञानेश्वरचरित्र :—( आवृत्ति दुसरी ) चरित्र' उतारे व विवरण यांमुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. १८८

१०. भक्तिमणिमाला :—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक—संदर्भ व विवरण यांसह —दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं १८८

११. सार्थ हरिपाठ व चांगदेव पांसष्टीः—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध पुढारी कै. विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ८५

१२–१३–१४ मुमुक्षूंतील निवडक निबंध :—भाग १ व २ किं. प्रत्यकीं १८८ भाग ३ रा किं. १८४ तिन्हीं भाग एकदम रु. ३॥

१५ मोरोपंती-वेंचे :— ( दुसरी आवृत्ती ) पंतांच्या अगाध कवितासमुद्रातील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेचे एका ग्रथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहाव प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचे संक्षिप्त चरित्रहि नवीन दिलेले आहे. किं. १८१२

## पांगारकरांचीं पुस्तकें

१६ पारिजातकाचीं फुलें (तिसरी आवृत्ति) :—परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ॥८

१७ श्रीतुकारामचरित्र:—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. किं. रु. २.

१८ श्रीतुकारामचरितामृत:—तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं. ॥५

१९ निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य:—निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख–विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ॥१०

२० मुक्तेश्वर:—( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सरकांत मुक्तेश्वर हें सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता याची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १

२१ मारुतिउपासना ( चौथी आवृत्ति ) :—किं. ॥४.

२२ सार्थ श्रीदासबोध:—किं. रु. ४. व्ही पी. नें ४॥१०

२३ सार्थ मनोबोध:—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ॥१२.

२४ समर्थसंजीवनी ऊर्फ रामदासी वेंचे:—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें ह्या चार भागांत समर्थांच्या कवितेतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभी सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.

२५ मोरोपंत (चरित्रआणि काव्यविवेचन):—किं. रु. २॥८.

२६ श्रीएकनाथी भागवत( निर्णयसागर प्रेसचे आवृत्ति तिसरी ):–किं. रु. ६

२७ श्रीसमर्थग्रंथभांडार:—समर्थांची एकदर कविता एकत्र सटीप छापलेली आहे. किं. ४॥८.


२८ समर्थग्रंथभांडार ( भाग २ रा ):—यांत दासबोधाशिवाय बाकीची समर्थांची सर्व कविता, प्रकरणें पाडून, व्यवस्थित दिला आहे. किं. रु. २॥८

२९ ज्ञानेश्वरांची प्रभावळ:—ज्ञानेश्वरमहाराज व त्यांचे समकालीन नामदेवराव जनाबाई, चोखामेळा, इत्यादि सर्व जातींचे २५ संत यांच्या ग्रंथांतील निवडक वेचे प्रस्तुत ग्रंथांत घेतले आहेत. यांत ज्ञानेश्वरांच्या २५०० ओंव्या व सर्व संतांचे मिळून ४०० अभंग आहेत. सुंदर प्रस्तावना आहे. टीपा भरपूर आहेत. किं. रु. २

पत्ता:—व्यवस्थापक " मुमुक्षु " नासिक शहर.

श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ।

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होईजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वस्पाकारें ॥ (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष २५ | मार्गशीर्ष १८५२ | नवें वर्ष १० वें |
| मास ३ | डिसेंबर १९३० | अंक १२ वा |

वार्षिक वर्गणी रु. ३] संपादक व प्रकाशक, [व्ही.पी.नें रु. ३/२



**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी, ए.**

**मुमुक्षु कचेरी, नाशिक सिटी.**



मुद्रकः–डॉ. जी. बी. भुतेकर ह्यांनीं नासिक येथें घ. नं. १०१४

श्रीकृष्ण छापखान्यांत छापिलें.

| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ मंगलाचरण | .... .... | १--२ |
| २ सुविचार समागम | .... .... | ३–४ |
| ३ तामीळ वाङ्मय ( लेखांक ३ ) | .... | ५–१८ |
| ४ पारमार्थिक पत्रें | .... .... | १९–२६ |
| ५ मातापित्यांची सेवा-दोन चित्रें | .... .... | २७–३१ |
| ६ भगवंताच्या दर्शनाचा लाभ | .... .... | ३२–३६ |
| ७ डॉ. कुर्तकोटींचे नाटक | .... .... | ३६–३८ |
| ८ सनातनधर्ममाला | ... .... | ३९–४० |
| ९ नाथांचे उद्गार | .... .... | ४० |


**सूचना**— जानेवारी पासून ज्यांचें वर्ष सुरू होतें त्यांनीं ता.५ जानेवारीच्या आंत आम्हांस पोचतील अशा बेतानें ट. ह. स. वर्गणीचे रु. ३ ( तीन ) आम्हांकडे मनीऑर्डरनें पाठवावे. त्यांचे तीन आणे वांचतील व आमचेही श्रम वांचतील म. ऑ. पाठविणें अधिक सोईचें आहे.


# भक्तिमणिमाला.

संपादक—ल. रा. पांगारकर. बी. ए.

भागवत हा भक्तिशास्त्रावरचा एक अद्वितीय ग्रंथ सकलसंतमान्य व सर्वजनप्रिय आहे. भक्तिप्रेमाचीं रहस्यें अमृतमधुर वाणीनें जनांस सांगणारा भागवताच्या बरो बरीचा दुसरा ग्रंथ नाहीं. भागवतांतील उत्तमोत्तम अशा ५५० श्लोकांची निवड करून प्रायः त्यांचा कथासंदर्भ देऊन साधुसंतांच्या वचनाधारें ही भक्तिमणिमाला तयार केली आहे. भागवती श्लोकांबरोबरच महाराष्ट्रीय सत्कविवचनांचाही यांत समावेश केल्यामुळें ही माला मराठी ग्रंथ या दृष्टीनें केवळ अद्वितीय झाली आहे. पृ. सं. २५० किंमत १॥ रु. व्ही. पी. नें रु. १॥=॥३.

पत्ता:— व्यवस्थापक, ‘ मुमुक्षु ’ नाशीक.

मुमुक्षु मासिक वर्ष १० वें ] मंगलाचरण [ डिसेंबर १९३० अंक १२ वा.



## ओव्या.

ॐ नमो सद्गुरु खांबसूत्री । चौऱ्यायशी लक्ष पुतळ्या यंत्री ।
नाचविशी निजतंत्रीं । प्राचीनदोरीस्वभावें ॥ १ ॥
जेथ जैशी ज्याची पूर्वगती । तें भूत नाचे तैशा रीती ॥
ते नाचविती चेतनाशक्ती । तुझ्या हातीं वीणहातें ॥ २ ॥
जेवि कां अचेतन लोहातें । चुंबक खेळवी निजसामर्थ्यें ॥
तेवीं तूं सकळभूतांतें । निजसत्ते नाचविसी ॥ ३ ॥
ऐशीं सदा नाचती परतंत्र । तरी अभिमानाचें बळ थोर ॥
सदा मानूनि देहाकार । आम्ही स्वतंत्र म्हणविती ॥ ४ ॥
आम्ही सज्ञान अतिज्ञाते । आम्ही कर्मकुशल कर्मकर्ते ॥
इतर मूर्ख समस्तें । ऐशा अभिमानातें वाढविती ॥ ५ ॥
एवं देहाभिमानाचेनि हातें । विसरोनि आपुल्या अकर्तृत्वातें ॥
स्वयें पावती कर्मबंधातें । जेवीं स्वप्नावस्थेतें विषबाधा ॥ ६ ॥
स्वप्नीं अतिशय चढलें विख । आतां उतरलें निःशेख ॥
तेवीं बंधमोक्ष देख । सत्यत्वें मूर्ख मानिती ॥ ७ ॥
अकर्ताचि तूं होसी कर्ता । कर्ता होत्साता अकर्ता ।
हे तुझी खांबसूत्रता । न कळे सर्वथा कोणातें ॥ ८ ॥
तुझेनि जग होये जाये । परी त्वां केलें हें ठावें नोहे ॥
ऐसा तुझा खेळ पाहे । कोणें काये लक्षावा ? ॥ ९ ॥
मीतूंपणेंवीण प्रसिद्ध । जनीं जनार्दन निजानंद ॥
त्याचे कृपेस्तव विशद । श्रीभागवत शुद्ध वाखाणलें ॥ १० ॥

—श्रीएकनाथी भागवत. अ. २२

# शिवभक्त अप्पर याचीं आणखी पद्यें.

## अभंग.

कृष्णाजिन अंगीं चंद्र माथ्यावरी ॥ वीरकंकणें करीं शोभताती ॥ १ ॥
दृढ स्कंध ज्याचे मागें पुढें होतां ॥ नृत्य हें पाहतां विश्व नाचे ॥ २ ॥
विश्वगोल आणि अणुही नाचती ॥ चराचर गाती नाचताती ॥ ३ ॥
शिव तांडवमूर्ति भरे माझे मनीं ॥ अप्सरा विमानीं पाहताती ॥ ४ ॥
त्याच्या नृत्यासवें भूतेंही नाचती ॥ कांपती भीती जाती पळोनिया ॥ ५ ॥
कमलाक्षी देवी पार्वतीही पाहे ॥ प्रेमदृष्टी बाहे भक्तवृंद ॥ ६ ॥
स्वामी हा देवांचा आत्मा विरक्तांचा ॥ दयाळु दीनांचा महादेव ॥ ७ ॥

## आर्या.

काष्ठीं अग्नि जसा वा दुग्धीं घृत, सागरोदकीं लवण ।
पुष्पीं परिमळ तैसा भरला विश्वांत पार्वतीरमण ॥

* * * *

"भक्ताला जें रूप आवडतें त्या रूपांतच ईश्वर त्याला दर्शन देतो. थोडक्यांत असें समज कीं, ईश्वर साकार आहे व निराकारही आहे. निराकारही सत्य व साकारही सत्य, मात्र तुझा ज्यावर विश्वास असेल तें पक्कें धरून ठेव. ईश्वर साकार आहे यावर विश्वास ठेव आणि मग जें रूप तुला आवडेल त्याचें ध्यान कर. मुलाला प्रथम मोठ्या अक्षराचे कित्ते गिरवायला देतात व तो सराव झाला म्हणजे लहान अक्षर काढायला सोपें जातें त्याप्रमाणें साकारावर मन स्थिर झालें म्हणजे त्याला निराकाराची धारणा सहज होऊं शकते. ईश्वरप्राप्तीचा सुलभ उपाय भक्तिमार्ग हा होय. व्याकुळ होऊन 'देवा दर्शन दे' असा एकसारखा देवाचा धांवा करणें हा भक्तिमार्ग होय. बायकापोरांबद्दल किंवा पैशाबद्दल कशीं आतडीं पिळून निघतात, तशी तळमळ पाहिजे. भक्तिमार्गानें अंतरिंद्रियनिग्रह आपोआप होतो व सहज होतो. ईश्वरावर जसजसें प्रेम वाढेल तसतसें इंद्रियसुख अळणी लागूं लागेल!"

—श्रीरामकृष्ण परमहंस.

# सुविचारसमागम.

१

आपले मित्र कोण व शत्रु कोण, आपल्या बाजूचे कोण विरुद्ध कोण, या गोष्टीचा विचार करण्यांत आयुष्य न दवडतां देव आपल्या बाजूचा व आपला निरंतरचा मित्र कसा होईल याचा विचार करीत जा व त्याचा स्नेह जोडण्याच्या अभ्यासांत जगांतले भेदभाव विसरून जा.

२

आपले सर्व प्रयत्न शास्त्रशुद्ध व सज्जनांना मान्य असेच करीत जा, ईश्वर योग्य मार्गानें व योग्य वेळीं तुझ्या साह्यार्थ धांवत येईल. त्याची इच्छा म्हणून जें जें प्राप्त होईल तें तें निमुटपणें मान्य करीत जा. देवाच्या इच्छेविरुद्ध वागणें हें पाप व तो सर्वज्ञ दयाळु प्रभु जें जें करितो तें तें शांतपणानें सहन करणें हें पुण्य ! पापपुण्य हरिचरणीं समर्पून तूं त्याच्या चिंतनांत निमग्न हो.

३

आपल्या दोषांच्या जाणीवेनें आपण नम्र झालों कीं दुसऱ्याच्या ठिकाणचें विरुद्धपण मावळतें व तोही नम्र होतो. माणसें हीं एकमेकांचे आरसे आहेत. तुझ्या हृदयांतलें औद्धत्य व नम्रता लगेच दुसऱ्याच्या हृदयांत प्रतिबिंबित होतात.

४

‘ नम्र झाला भूतां । तेणें कोंडिलें अनंता ’—जो नम्र, निरहंकार व अनुद्धत आहे त्याच्या विषयीं लोकांना प्रेम वाटतें व म्हणूनच सर्वभूतांतर्यामी परमात्मा त्यावर प्रसन्न होतो.

५

नमनभक्ति देवाजवळ नेते. सज्जन नम्रतेवरूनच ओळखतां येतात.

जैसें उंचीहूनि उदक पडिलें । तें तळवटवरी येऊं लागलें ॥
तैसें नमिजे भूतजात देखिलें । ऐसा स्वभावचि तयांचा ॥ २२४ ॥
कां फळातियां तरूची शाखा । सहजें भूमीसी उतरे देखा ॥
तैसे जीवमात्रां अशेखा । खालावती जे ॥ २२५ ॥
अखंड अगर्वता होऊनि असतां । तयांची विनय हेचि संपत्ती ॥
जे जयजयमंत्रें अर्पिती । माझ्या ठायीं ॥ २२६ ॥ ( ज्ञाने ९ )

६

उंचावरून पडलेलें पाणी सखोल भूमीकडे सहज धांवतें, त्याप्रमाणें समोर दिसलेल्या सर्वांना वंदन करावें हा त्यांचा स्वभावच असतो. किंवा फळांनीं दाटलेल्या वृक्षाची शाखा सहज खालीं भूमीकडे लवते त्याप्रमाणें सर्वप्राण्यांपुढें ते नम्र होतात. ते निरंतर निरहंकार होऊन राहतात. विनय हीच त्यांची संपत्ती व ती ते माझा जयजयकार करून मलाच अर्पितात.

७

सज्जनाची कोणी निंदा, द्वेष, छल किंवा उपहास केला तरी ते शांत असतात. त्यांची शांति ढळत नाहीं. कारण, ते ईश्वराशीं संलग्न असतात, जगाशीं त्यांचा संबंध नसतो ह्य. ते अंतर्यामीं जगाहून वेगळे असतात.

८

जो अंतर्यामीं शांतिसुख पावलेला असतो त्याच्याचपासून संसर्गी लोकांना समाधान व सुख मिळतें. अशांतापासून जगाला शांति कशी मिळावी ? रोग्यापासून रोग्याला, करंट्यापासून करंट्याला सुख काय मिळणार ?

९

तळमळ्या विद्वानापेक्षां देवमामलेदारासारख्या साधुपुरुषाच्या संगतीनें जगाला अधिक सौख्य मिळतें. सज्जन सर्व गोष्टी भलाईच्या दृष्टीनें पाहतो, तो दुसऱ्याचे दोष पाहत नाहीं, त्याला कोणाचा संशय येत नाहीं, तो स्वतःची शांति अढळ राखून दुसऱ्याची शांति ढळूं देत नाहीं.

१०

जो प्रथम स्वतःचा उद्धार करून घेतो तोच दुसऱ्याचा उद्धार करण्यास समर्थ असतो. आपण ब्रम्हरूप आहोंत हा बोध पूर्ण ठसल्याशिवाय विश्व ब्रम्हरूप आहे ही प्रतीति कधींच यायची नाहीं. आपण पूर्ण तर जग पूर्ण. जो आपण खोटा त्याला जग खोटें :-

तुका म्हणे शुद्ध नाहीं जो आपण । तया त्रिभुवन अवघें खोटें ॥

११

आपल्या अंगचे दोष लोकांनीं पाहूं नयेत असें ज्याला वाटतें त्यानें दुसऱ्याचे दोष न पाहण्याचा अभ्यास ठेवावा. दोष दोषाला व गुण गुणाला पाहतात.

# तामीळ वाङ्मय.

(लेखांक ३ रा,)

## सुंदरमूर्ति.

**सुंदरमूर्ति** ह्याचा जन्म अर्काट प्रांतांत ९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत झाला. हा जातीनें ब्राह्मण होता, पण ह्याच्या दोन्ही बायका ब्राह्मणेतर होत्या. एक तिरुवारूर येथील शिवमंदिरांतील नर्तकी होती व एक मद्रासकडील वेल्लाळ जातींतली होती ! दोघी नारींच्या ह्या दादल्याचा जन्म मात्र दारिद्र्यांत व संकटांत गेला, त्याला बायकांचें पोट भरण्याचीही पंचाईत पडे. संबंदर व अप्पर यांच्य खालोखाल ह्याच्या कवितेची योग्यता मानतात. हा शेवटचा सन्मान्य शैव होय. ह्याच्या कवितेचा थोडासा मासला पाहूं—

**पृथ्वीवृत्त.**

तुझें स्मरण जन्मुनी पळभरीहि केलें नसे
शरीर विषयांत वा विषयपुंज देहीं वसे ।
सुखार्थ भ्रमलों जगीं बहु उनाड पोळापरी
परंतु सुखलेशही गवसला न मातें तरी ॥ १ ॥
तुवांचि धरिलें मला निजकरीं कृपासागरा
तुलाचि फुटला कसा मजवरी दयेचा झरा ।
न भक्तिलव ठाउका न घडलीहि सेवा जरा
अशा मज असाधुला झडपिलेंहि भूतेश्वरा! ॥ २ ॥
न सोडिन तुझे विभो ! चरण, जीव गेला तरी
तुला न विसरेन मी दृढ धरीन अभ्यंतरीं ।
कदाचितचि विस्मृती घडलि थोर पापास्तव
कदा त्यजिल वैखरी न ‘ जयशंकरा ’ हा स्तव ॥ ३ ॥

## ओव्या.

कविजनहो ऐका मात । तुम्हांसि करितों एकांत ॥
द्रव्य पाहिजे प्रभूत । तरीही ऐका वचन माझें ॥ १ ॥
श्रीमंत लौकिकी–जन ! असत्यकाटें काटलें मन ॥
शठ कपटी दुर्जन । त्यांचे पवाडे गाऊं नका ॥ २ ॥
वचन माझें ऐका ऐका । जरी तुम्हांसी पाहिजे पैका ॥
त्यांचे द्वारीं जाऊं नका । तोंड पाहूं नका त्यांचें ॥ ३ ॥
द्रव्यास्तव न व्हावें लाचार । श्रीमंत करिती नाना चार ॥
गोष्ट सांगतों साचार । भजा निरंतर शंकरातें ॥ ४ ॥
तो पुरवील सर्व कामना । देईल इहलोकींच्या धना ॥
दुःख निरसूनि मोक्षनिधाना । देईल ऐसा समर्थ ॥ ५ ॥
दुर्बळातें भीमार्जुन म्हणावें । कृपणातें कर्ण बोलावें ॥
ऐसें कासया शिणावें । व्यर्थ चावटी करूनिया ॥ ६ ॥

# माणिक्क वासहर.

शालिवाहनाच्या ९ व्या किंवा ८ व्या शतकांत—-कोणत्या तें अद्याप निर्णित झालें नाहीं—हा मदुरेच्या पांड्य राजांचा एक मुख्य दिवाण होता. तंजावर प्रांतांतील एका सुप्रसिद्ध शिवमंदिरांत तो आला असतां शिवानें त्याचें मन हरण केलें, त्याला शिवभक्तांचें वेड लागलें. हें वेड लागायला त्या मंदिराच्या एका ओरींतला एक निस्सीम शिवभक्त कारण झाला. सत्संग देवाकडे नेत असतो. सत्संगमींच चित्त देवाकडे रंगतें. त्या दिवाणाला तो शिवभक्त मूर्त शिवावतार वाटला व तो त्याचे चरणीं नम्र झाला. राज्यकारभारांत त्या दिवाणानें आयुष्य घातलें होतें, त्या राजस परिस्थितीला त्याचें मन विटून सत्संगतींत शिवभक्तीनें त्याला दिवाणा केला. मदुरेस तो परत गेला व सर्व संपत्ति त्यानें दानधर्मांत खर्च केली आणि वितृष्ण होऊन शिवभक्तींत तो पूर्णपणें रंगून गेला. शिवाचे नामाचा जयघोष करावा व येतील तशीं शिवाचीं गाणीं गावींत हें त्याला व्यसन जडलें. त्याच्या गुरूनें त्याला ' माणिक्य वासहर ' ह्म. ' माणिक्यवाचक ' अर्थात मोत्याच्या ओळी बोलणारा, ज्याच्या वचनपंक्ति मोत्याच्या दाण्यासारख्या अमोल आहेत

असा—ही पदवी दिली व याच नांवानें तो पुढें लोकप्रसिद्ध झाला. दक्षिणेंतील सर्व शिवमंदिरें त्यानें पाहिलीं. शिवाचें गुणनाम गात तो दाक्षिणभर फिरला. भक्तियोगानें त्याला कांहीं सिद्धीही प्राप्त झाल्या. त्यानें चिदंबरम् येथें शिवप्रसादार्थ तप केलें. एका चोल राजकन्येला त्यानें वाचा दिली, सिंहलद्वीपांतील बौद्ध पंडितांना त्यानें वादांत पराभूत केलें; अशा त्याच्या कांहीं गोष्टी प्रसिद्ध आहेत. त्याचीं अनेक शिवगीतें प्रसिद्ध आहेत. तिरुक्केवैय्यार नांवाचें एक ४०० पद्यांचें त्याचें पुस्तक आहे. त्याची गीतें गाणारा शिवभक्तींत मस्त होतो. माणिक्याच्या वाणीनें ज्याचें हृदय द्रवत नाहीं त्याचें हृदय कशानेंही द्रवणार नाहीं अशा अर्थाची तामीळ भाषेंत एक म्हण आहे. त्याच्या कवितांचें डॉ.—पोप यानें इंग्रजी भाषांतर केलें आहे पद्यांत बहुविधत्व आहे. त्याच्या कवितेपैकीं कांहीं अनुतापाच्या व वैराग्याच्या आहेत, कांहींत प्रेमाच्या प्रार्थना आहेत, कांहींत कृतार्थतेचे उद्गार आहेत. यावरून वेळोवेळीं स्फुरलेले विचार किंवा भाव त्यांत मोकळेपणानें प्रगट झाले आहेत असें दिसतें. माणिक्याची भावगीतें मनोरम आहेत. त्याच्या कवितेंत सत्संगाचा महिमा वर्णिला आहे. साधुसंगतीची माणिक्याला फार आवड असे. बायकांनीं दळणकांडण करितांना किंवा खेळतांना गावींत अशीं कांहीं गाणीं त्यानें रचिलीं आहेत. हा काव्यप्रकार तेव्हां अगदींच नवीन होता. भ्रमर, कावळा, कोकिळ यांना त्याची कविता थोडीशी स्पर्श करून गेली आहे. त्याच्या वाणीचा आपण आतां थोडासा प्रसाद भोगूं :—

" पृथिवी, वायु, तेज, आकाश, प्राण्यांचें शरीर आणि आत्मा सर्व कांहीं तूं आहेस. जें कांहीं आहे तें तूं आहेस आणि नाहीं तेंही तूं आहेस! आहे नाहीं सर्व तूंच आहेस. हे शिवराजा ! माणसें "मी आणि माझें" याविषयींच्या मूर्खपणाच्या कल्पनांनीं कशीं नाचत असतात हें तूं पाहतोस व सर्व सूत्रें तूं आपल्या हातीं वागवितोस ! तुझे अमित गुण कोण वर्णूं शकेल ? "

" तुझा प्रसाद पूर्ण झाला असा भरंवसा मला कधीं वाटेल? या भाग्याची सकाळ कधीं उगवेल ? असा दुःखातिरेकानें मी आक्रोश करित असतों हें तुला दिसत नाहीं काय ? मला स्वर्ग नको व पृथ्वीचें साम्राज्यही नको. फक्त तुझी दया पाहिजे. "

" इंद्र, विष्णु व ब्रह्मा यांचा प्रसाद व्हावा असें मी मागत नाहीं, फक्त तुझ्या भक्तांचें प्रेम मजवर असावें एवढीच माझी मागणी आहे; मग माझ्या घरा-

दाराचें वाटोळें झालें तरी मला त्याची पर्वा नाहीं. मला पाहिजे तर नरकांत ढकल, पण तुझी मजवर दया असों दे. तुझ्यावांचून मी दुसऱ्या कोणाला बरें ईश्वर म्हणून हांक मारूं ?

" मी तुझ्या भक्तांसारखा जगाला दिसलों तरी मी तसा खरोखर नाहीं. हें सारें वरपंग आहे. तुझ्या स्वरूपाकडे माझें चित्त वेगानें धांवत आहे. तुझा प्रसाद होऊं दे, तुझ्या चरणीं अखंड प्रेम दे व प्रेमानें आर्द्र होणारें अंतःकरण दे.

" त्याला सर्व शोधतात पण कोणीही यथार्थ जाणत नाहींत. तो अत्यंत निर्मल व परम मंगल आहे. पूर्ण ज्ञान त्याच्यापाशीं सहज आहे, तो ज्ञानरूप आहे, मनुष्याच्या दृष्टीला न दिसणाऱ्या, कोणाच्याही कानाला ऐकूं न जाणाऱ्या गोष्टी त्यानें मला सांगितल्यां आहेत! त्यानें माझ्या जन्माचें खंडण केलें आहे त्यानें मला प्रेमानें बांधून घेतलें आहे. असली जादू त्याच्याजवळ आहे ! "

" मी त्याच्या दासांच्या दासाच्या मेळ्यांत मिसळलों असून मी अधिकाधिक सुखांत वाहत चाललों आहे. नाचावें आणि गावें हाच माझा व्यवसाय आहे.

" हा संसार संपीव, मी तळाशीं गेलों आहें. अपराधांची क्षमा करणें हें थोरपणाचें लक्षण आहे. हा देहवृक्ष मायानदीच्या प्रचंड लाटांत सांपडला आहे. कमलाक्षी तरुणींचें दर्शन मला मोह पाडतें. हे उमापते जागा हो, माझा उद्धार कर. मी दुःखपापानें दूषित आहें. तूं मला सोडूं नकोस, हे हरा ! दीनांवर दया करण्यास्तव तूं हालाहल विष प्राशन केलेंस. दीनांतला दीन जो मी त्या मज तूं अमृत चाखीव. "

## भ्रमर–दूत.

" कठिणचित्त व मुग्ध असा मी–पण मला त्यानें कांहीं नांव ठेवलें नाहीं; माझें हृदय कठिण पण त्यानें वितळायला लावलें आणि आपल्या दयेनें त्यानें मला तन्मयता दिली! त्याच्या तळ्यांत किती सुंदर हंस आहेत. हे भ्रमराधिपा! धांव, त्यांच्या हातांतील सुवर्णकटकावर जाऊन बैस व माझा निरोप गुंजारव करीत त्याला सांग ! "

" मी मूर्ख पण त्यानें आपले गुणानुवाद गायला मला लावलें आहे. मी वेडा पण त्यानें क्षमा केली आहे. माझा तिरस्कार न करितां तो माझी सेवा घेत आहे तो देव (हर) ती माझी आई (पार्वती) आहे. भ्रमराधिपा ! जा व माझा निरोप त्याला गुंगत गुंगत कळीव.

" माझें मन व चित्त त्याच्यापासून फार दूर बहकलें असतें पण माझ्या मायबापांनीं ( शंकरपार्वतींनीं ) मला सांवरलें म्हणून मी ठिकाणावर आहे! त्यांनीं माझा उद्धार केला आहे ! हें आकाश, हा महासागर, पूर्व पश्चिम दक्षिण उत्तर सर्व दिशा, सर्वत्र तो वसत आहे. भ्रमरराज ! जा, त्याच्या चरणावर मधुबिंदु आहे. तेथें माझा निरोप गात बैस.

" ह्या जगाच्या भ्रममय द्रव्यनिधानांत मी बुडालों होतों, आत्मवंचना करून अहंकारांत मस्त होतो, त्यालाच सत्य मानून उराशीं धरिलें होतें-पण यानें मला आपला म्हटलें व त्या मिथ्यामोहांतून सोडविलें ! माझे सर्व प्राण आतां तोच आहे. भ्रमरा ! जा, त्याच्या चरणकमळीं गुंजारव करीत माझे शब्द त्याच्या कानांवर घाल ! "

## कोकिळ.

" ऐका! ऐका! ह्या द्राक्षांच्या बागेंत तो कोकिळ गात आहे. त्यानें स्वर्ग तुच्छ केला आहे, व तो आपणां मानवांच्या करुणेनें पृथ्वीवर अवतरला आहे. तो उदार दाता आहे. माझ्या देहपंजरांत मनांतच तो शिरला पहा ! माझें मनच तो होऊन गेला आहे ! त्या कमलाक्षी पार्वतीचा वल्लभ-तोच तोच ! त्याला मजकडे घेऊन या !"

## ओवी.

दीर्घकाल विषय सेविले । आयुष्य हें व्यर्थ वेंचिलें ॥
शिवचरण नाहीं वंदिले । अभागी मी बापुडा ॥ १ ॥
असो झालें तें होवोनि गेलें । परी आतां मद्भाग्य उदेलें ।
शिवें आपुलें म्हणितलें । अंगिकारिलें वत्सलें ॥ २ ॥
शिव माझा हिरा खरा । सकल मंगलांचा तुरा ।
तेणें जन्ममरणांसी चिरा । लावुनी मुक्त पै केलें ॥ ३ ॥

* * *

अत्यंत मूढ मी खरा । परी पावलों या हरा ।
आतां दुःखाचें नांवही जरा । उरलें नाहीं ॥ १ ॥
शिवचरणीं ठेवितां डोई । उद्वेग कांहीं राहिला नाहीं ।
अनंत सुखाचिया डोहीं । मातें तेणें बुडविलें. ॥ २ ॥
हें सुख देवादिकांहीं । वांच्छितां स्वर्गीही मिळणें नाहीं ।
बाप भाग्याची नवलाई । अपार मातें दिधलें ॥ ३ ॥

## श्लोक.

वेद तूं शास्त्र तूं दानतपयज्ञ तूं
सत्य तूं मिथ्य तूं ज्ञान अज्ञान तूं ।
तेज तूं तमहि तूं, सौख्यदुःखादि तूं
अर्थ तूं सकल तूं, बंधमोक्षादि तूं ॥ १ ॥
सकल वृद्धांहुनी वृद्ध तूं
सकल नूत्नामधें नूत्न तूं
सर्व तूं— अणुहि तूं तुजविना नाडळें
नाकळे चरित—मी शरण आलों बळें ॥ २ ॥
भक्त तूं देव तूं भाव तूझी हरा
त्वद्विना आमुतें अन्य नच आसरा ।
भक्त रूपें तुझीं सगुण हीं साजिरीं
करुत बा दया पूर्ण आम्हांवरी ॥ ३ ॥

---

## नंद.

चातुर्वर्ण्यबाह्य अशा अंत्यज वर्गात जन्मलेला नंदनामक एक शिवभक्त अर्काट जिल्ह्यांतल्या एका खेड्यांत होऊन गेला. महाराष्ट्रांतल्या चोखामेळासारखाच हा एक तामीळ प्रांतांतला चोखामेळा होऊन गेला. बाळपणींच मातीचें शिवलिंग करून त्याच्याभोंवतीं नाचावें, ‘ नटराज नटराज ’ असें भजन करावें, शिवमंदिराच्या शिखराचें लांबून दर्शन घ्यावें, उत्सवांत प्रेमपूज्यभावानें दुरूनच मनानें सामील होऊन रमावें, कोणाच्याही उपयोगीं पडण्याची संधी गमावूं नये असा नंदाचा बालपणींच अंगस्वभाव बनला होता, भक्तीचा जिव्हाळा फार मोठा होता. मृदंगाला लागणारें कातडें उत्तम तयार करून तें त्यानें भक्तिभावानें शिवमंदिरांत अर्पण करावें, अंगाला भस्म लावून शिवनामाचीं आवर्तनें करीत आनंदांत नाचावें हा त्याचा नित्यक्रम असे एका ब्राम्हणाच्या तोंडून चिदंबरम् येथील नटराज शिवाचें माहात्म्य ऐकून तो तन्मय झाला. चिदंबरम् येथें पंचलिंगांपैकीं एक लिंग आहे. हें क्षेत्र शैव व वैष्णव यांना सारखेंच महत्वाचें आहे. शिवमंदिरापासून नजीकच श्रीगोविंदराज पेरुमलचें म्हणजे विष्णूचें प्रख्यात मंदिर आहे. येथील नटवर शिव व श्रीगोविंदराज विष्णू हे दोनी देव श्रीमंत आहेत. शैवांचें तर हें चिंदंबरम् महाक्षेत्रच आहे. चैतन्यानें व्यापलेलें आकाश

असा चिदंबर शब्दाचा अर्थ आहे, दिक्कालाद्यनवच्छिन्न असा परमात्मा येथें आहे. मंदिराच्या मध्यभागीं सोन्याचीं कौलें घातलेला ' चित्सभा नांवाचा मंडप आहे. नटराजाची मूर्ति अतीव मनोहर आहे. मस्तकावरचा जटाजूट, सुंदर व दीर्घ नासिका, आतां जणूं बोलणार असा आविर्भाव दाखविणारे विशाळ नेत्र, सुखानंद व दया यांचें निवास असें सुंदर मुखकमळ, विशाळ व उठावदार बाहु व बहुमोल बाहुभूषणें, नृत्याची ऐट, उजव्या हातांतला डमरू एक वरद हस्त नटराजाचें ध्यान नास्तिकालाही प्रेमाचा पाझर फोडील असें सुंदर आहे. अप्पर माणिक्यादि शिवभक्तांनीं नटराजाचें फार गोड वर्णन केलें आहे. उत्पत्ति स्थिति संहाररूप जगाचें नाटक करणारा व स्वतः अलिप्त राहून भक्तांचा उद्धार करणारा हा नटराज पाहून भाविक वेडे होतात, अभाविकही चकित होतात व चित्रकार दिपून जातात. विश्वाचे अनंत व्यापार हा नटराजाचा खेळ आहे. बालांच्या लीलांत, स्त्रियांच्या विलासांत, राष्ट्रांच्या रणरंगांत, नक्षत्रतारांच्या फेऱ्यांत वृक्ष वनस्पतींच्या सौंदर्यांत, उत्पत्तींत आणि प्रलयांत, परमाणूंत आणि ब्रम्हांडांत सर्वत्र नटराजाचें तांडवनृत्यच भक्तांच्या दृष्टीला गोचर होत असतें. ज्ञानाच्या दृष्टीला ह्या नृत्यांत ब्रम्हानंद होतो. अंतर्गत विकार आणि बाह्य मिथ्या सृष्टीचे व्यवहार यावर विजय मिळवून स्वात्मसुखांत मग्न असणारा महापुरुष कसा असतो ह्याचें हें प्रत्यक्ष रूप आहे. योगी पतंजली व भक्त व्याघ्रपाद हे दोघेही नटराजाच्या ध्यानसुखांत मग्न झाले, यावरून योग, भक्ति, ज्ञान, सर्व मार्गांनीं 'नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इवं' एक परमात्माच सेव्य आहे आहे असा बोध होतो. असो.

नंदानें ब्राह्मणाच्या मुखानें चिदंबर क्षेत्राचें व नटराजाचें सुंदर वर्णन ऐकलें व तो तें ऐकतां ऐकतांच तन्मय झाला. त्याच रात्रीं त्यानें चिदंबराला जाण्याचें ठरविलें, पण त्याच्या जातभाईनीं त्याला सांगितलें कीं ' आतां रात्र फार झाली आहे, ' देवळाचीं दारें लागतील आणि शिवाय तूं ज्या ब्राम्हणाचा नोकर आहेस तो तुजवर रुष्ट होईल. त्याची परवानगी घेतली पाहिजे, नंदाला हें पटलें. तो अत्यंत सात्विक वृत्तीचा व प्रेमळ होता, बंडखोर नव्हता. त्याच्या मनांत ब्राम्हण, वेद, धर्म, मंदिरें, पूजा, गोपुरें, यात्रा महोत्सव भजनें, उपवनें, नद्या, या सर्वांविषयीं पराकाष्ठेचा आदरभाव वसत होता. नंद-म्हणाला 'हें म्हणणें बरोबर आहे., परमेश्वरानें मला ज्या स्थितींत ठेवलें आहे

तीच मला योग्य असली पाहिजे. देव सर्वज्ञ व दयाळु आहे. माझें कल्याण कशांत आहे हें माझ्यापेक्षां अनंतपटीनें त्याला अधिक कळतें. त्याच्या इच्छेला शरण जाणें हें मंदिरांत जाण्यापेक्षांही अधिक श्रेयस्कर आहे. मी माझ्या ब्राह्मण धन्याच्या पायां पडेन, त्याला विनवीन व त्याला राजी राखून त्याच्या आज्ञेनेंच चिदंबरम्‌ला जाईन. त्यानें नंतर आपल्या बंधुवर्गाला मदतीला घेऊन पाणी पिण्याचा एक तलाव खोदला. नंदाला चिदंबरम्‌चा निदिध्यास लागला. शेतांत काम करीत असतांना, जागृतींत व निद्रेंत, घरीं व दारीं, त्याला नटराजाचा ध्यास लागला. ध्यासांत पारमार्थिक कोडीं सहज सुटत जातात. नटराजाचें नृत्य म्ह. सृष्टीच्या उत्पत्तिलयाचेंच स्वरूप होय असें त्याला वाटलें व तो आनंदित झाला. त्यानें आपल्या जातीच्या मुलांचें व प्रौढांचें एक 'भजन मंडळ' बनाविलें. शिवाचें नामस्मरण, भस्मलेपन, भजन, प्रहर प्रहर एकांतांत ध्यान, असा त्याचा अभ्यास वाढत चालला, व त्याचें हृदय लोण्यासारखें मऊ होऊन सर्व प्राणिमात्रांशीं तो अत्यंत नम्रतेनें व प्रेमानें वागूं लागला. त्याची निर्वैर व निर्विकार स्थिती बनत चालली. जनावरांना मारणें, मांसाशन इ० गोष्टी त्याला वर्ज्य झाल्या. तो आपल्या लोकांना त्या प्रकारचा बोध करूं लागला व यामुळें त्याच्या जातीचे कांहीं लोक त्याचा द्वेष व पुढें पुढें छळही करूं लागले. वृक्ष-वेली, नदीपर्वत, नक्षत्र तारा, चंद्र सूर्य या ईश्वराच्या सृष्टीकडे कौतुकानें पहावें व देवाच्या प्रेमानें त्यानें अधिकच तन्मय व्हावें. तो मनाशींच म्हणाला: 'हा संसाररूप मायेचा पसारा नटराजाच्याच चरणाचा प्रताप आहे. हा सर्व देखावा सुंदर आहे. पण हे शंकर! मला अज्ञानरूप मायानदीच्या पलीकडे ने व तूं दिसतोस तसा नव्हे तर आहेस तसा मला पाहूं दे ' नटराजाच्या चरणध्यानांत मग्न होऊन त्याच्या नेत्रांतून अश्रु वहावेत. तो ध्यानसमाधींत मग्न असतांना एका मनुष्यानें त्याला पाहिलें व लोकांत बोभाटा केला. सर्वांनीं नंद पागल बनला असें ठरविलें ! त्यांनीं बाहेर शेतांत जातीची सभा भरवून याला चिंचेच्या झाडावरील पिशाचानें झपाटलें आहे असा निश्चय केला! शंभर बकरीं मारून एका क्षुद्र देवतेचा उत्सव गांवकऱ्यांनीं करायचें योजिलें ! नंद स्थिर बसला होता. तो मनांत म्हणाला, ' नटराजाच्या नाटकांतलाच हा एक प्रवेश चालला आहे. पेदारि, विर, इकला इ. क्षुद्र व मानीव देवतांच्या नादीं अडाणी लोक होते. नंद एका महादेवाशिवाय कोणी जाणत नव्हता.

लोकः—पेदारि बावा शेताच्या देवा ।
नंदाचा सांभाळ तुम्ही करावा ॥ १ ॥
नंदः—बळिया नटवर–दुजा न कोणी ।
नंदाचा लाडका एकच धणी ॥ २ ॥
लोकः—पागोटं मोठं विराच्या शिरीं ।
त्याचेच पाय आम्ही धरूं उरीं ॥ ३ ॥
नंदः—व्यापूनि राही ब्रम्हांड सारं ।
पागोटं त्याला कैच बारं ॥ १ ॥
लोकः—इकला देवाचि भूकच मोठी ।
हजारों बकरीं त्याच्या पोटीं ॥ २ ॥
नंदः—अररं ! निष्ठुर देव कसे ।
देवाच्या पोटीं दया वसे ॥ ३ ॥

नंदाच्या जातभाईना नंदाचें म्हणणें रुचलें नाहीं, नव्हे समजलेंच नाहीं ! त्यांनीं बकरीं वगैरे चराचरा कापायला आरंभ केला. नंदाला हें असह्य झालें. सर्व प्राणी देवाचीं लेकरें आहेत; देव, एक नटराज आहे, देव दयासागर आहे; हें त्यानें सांगितलें. पण कोणी ऐकऊं नाहीं. नंद तेथून निघून गेला, गांवकरी नंदावर चिडले. त्यांनीं नंदाच्या मालकाचे कान भरले. नंद चिदंबरला जायला उत्सुक झाला; पण मालकाची आज्ञा होईना. मालक ब्राह्मण जमीनदार श्रीमंत होता व सारे गांवकरी त्याच्या शेतांत खपणार होते. नंदानें मोठा हिय्या करून मालकाची परवानगी विचारली. मालक संतापला, ‘ मूर्खा, तुला चिदंबरला जायला पाहिजे काय ? ब्राह्मण व्हायची तुला हांव सुटली आहे. ’ नंद रडत घरीं आला. तो म्हणाला “ देवा ! तूं किती निष्ठुर आहेस ! माझ्या धन्याला मी दोष देत नाहीं, त्याला प्रेरणा देणारा तूंच आहेस; तुझ्या आज्ञेवांचून परमाणूही हालत नाहीं. मी दीन् अंत्यज! ना माझ्यापाशीं धन, ना रूप, ना कीर्ति, ना बुद्धि, ना ज्ञान. तुझ्या दयेवांचून मला कांहीं नकोही. ती दया तूं केव्हां करणार ? काय मी तुझ्या दयेला केव्हांतरी पात्र होईन ? धण्याच्या धण्या ! बोल रे ! मी अत्यंत हीन दीन अमंगळ आहें; पण सर्वस्वीं तुझा दास आहें. याचा विचार कर ” तो पुन्हा विचार करीत आपल्याशींच बोलला; “ नटराजाला माझी काळजी आहे, माझें हित मला कळत नाहीं, माझें हित अनंतपटीनें माझ्या देवाला कळतें ! तर मग

ही तळमळ कां ? मी ईश्वराच्या इच्छेला शरण असलें पाहिजे. माझ्या येथील धण्याचा धणी तरी मजवर कसा प्रसन्न होईल बरें ? कांहीं नाहीं,--धन्याची प्रसन्नता मला जोडतां आली नाहीं, तर माझीच बंडखोरी देवाच्या व माझ्या आड येत आहे. मी आज्ञाधारक व शरणागत झालों कीं माझ्या ब्राह्मण धण्याला द्रव येईल व देवही प्रसन्न होईल. मी पात्र झालों कीं देव भेट देईलच देईल. नंदाच्या हृदयाची ह्या विचारानें शुद्धि झाली, त्याच्या चित्ताला दीर्घ काळ न मिळालेली शांति मिळाली. तो एकांतांत रमूं लागला, ध्यानसाधनांत त्याचा काळ अधिक जाऊं लागला, मला दर्शन देण्याची देवाला इच्छा होतांच माझ्या धण्याची बुद्धि फिरेल व तो मला जाऊं देईल असा त्याचा निश्चय झाला. जें जें दिसेल त्यांत त्याला नटराज दिसूं लागला. कधीं त्यानें वृक्षाला कवटाळावें, कधीं पक्ष्यांच्या मागें धांवावें, कधीं जळाशीं खेळावें ! याचें वेड वाढत चालल्याचें पाहून लोकांना वाईट वाटलें. त्यांनीं याचा परोपरीनें छळ केला; त्याला बांधलें—मारलें सुद्धां! नंद म्हणाला ' हा त्यांचा दोष नाहीं. देवा ! त्या अडाणी जीवांना क्षमा कर. ' त्याचें मन अतीव कोमळ झालें. रस्त्यांत कीड-मुंगी दिसली कीं त्यानें हलक्या हातानें ती उचलून बाजूला ठेवावी, हेतू कीं, तिच्यावर कोणाचा पाय पडूं नये ! शेतांतून मुंग्यांना साखर घालीत फिरावें. सर्वांशीं मृदू शब्दांनीं बोलावें. त्याचे क्रोध, लोभ पार गेले, त्याच्या चेहऱ्यावर प्रसन्नतेची प्रभा पसरली! त्यानें पुन्हा एकदां रजेचा शब्द काढला धणी म्हणाला: " नंदा तूं खरोखर भला मनुष्य आहेस, पण अलीकडे तूं उनाड झाला असून कामाकडे तुझें लक्ष्य नाहीं. हे हंगामाचे दिवस आहेत;तुला माहीत आहे. धान्याची मळणी होऊन रास झाली कीं मी तुला चिदंबरमला जायला रजा देईन " धन्याच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच नंदाला अत्यानंद झाला व तो हरिणाप्रमाणें उडया मारीत गात नाचतच शेतांत गेला.दोन प्रहरांतच परत येऊन धन्यास म्हणाला कीं,'चला एकदां शेतांत येऊन पहा' नंदाचा तो उल्हास पाहूनच धणी चकित झाला नंदाबरोबर शेतांत येऊन पाहतो तों त्याला काय दिसलें ? सर्व धान्याची मळणी व रास होऊन काम पुरें झालेलें! नंदाचा तो ब्राम्हण धनी मनांत चरकला व तो नंदाला म्हणाला ' नंदा ! हें मी काय पाहत आहें ? अरे ! तुलाच काय पण साऱ्या लोकांना एक दोन आठवड्यांतही जें काम करितां आलें नसतें तें अवघ्या दोन प्रहरांत झालें कसें? माझ्या ह्या शेतांत देवानें हा केवढा चमत्कार करून

आज दाखविला आहे! नंदा! हा सारा तुझा पुण्यप्रताप आहे खास. हें तुझ्या भक्तीचें फळ आहे. तुझी योग्यता देवानें आमच्या नजरेस आणली आहे. मी जन्मांत तुझ्यासारखा पवित्र भक्त दुसरा पाहिला नाहीं. अरेरे! तुला नोकर म्हणून वागविण्यांत माझे हातून घोर पाप घडलें आहे. ह्या क्षणापासून नंदा, तूं माझा स्वामी आणि मी तुझा सेवक आहें असें समज ! ही सारी संपत्ति व जमीन तुझी आहे. तुझ्या निकटवर्ती शंकराजवळ माझ्याबद्दल विनवणी कर व मला माझ्या उद्धाराचा मार्ग दाखीव. परमेश्वराच्या कृपेनें सारें पारडें फिरलें. स्वामी तो सेवक व सेवक तो स्वामी! अत्युत्कट भक्तीचा महिमा किती थोर आहे! साक्षात् भगवान् जेथें भक्ताचा दास होतो तेथें सामान्य जमीनदाराची कथा काय? असो. त्या ब्राम्हणानें सद्गदित होऊन नंदाचे पाय धरिले, नंदानेंही अश्रु ढाळीत त्याला उठवलें व 'हं हं! मालक असें उलटें कसें होईल? मी आपला सेवक व आपण माझे मायबाप आहांत असें म्हणाला. त्या ब्राम्हणाचें ब्राम्हणत्व लोपलें, नव्हे खरें ब्राम्हण्य उदित झालें. त्याचा अहंकार गेला. 'तूंच माझा गुरु आणि देव आहेस. मला पातक्याला क्षमा कर' असें म्हणून त्यानें नंदाच्या गळ्याला मिठी मारली. शिवस्वरूपीं दोघे एकमय झाले, देहबुद्धीच्या दोघेही पार गेले. 'चिदंबरमला जा पण माझें स्मरण ठेव व नटराजाच्या पांयीं माझी दाद लाव. मला जातांना दोन उपदेशाच्या गोष्टी सांगून मग जा 'असें तो ब्राम्हण म्हणाला तेव्हां नंद एवढेंच बोलला, " बायकापोरांवर, घरादारांवर, संपत्तीवर जेवढें प्रेम करितां तेवढेंच देवावर करा, यापेक्षां मी आपला दास आपल्याला काय अधिक सांगणार?" नंद चार पावलें गेला असेल तोंच त्या ब्राम्हणानें नंदाला पुन्हा हांक मारिली, व वियोगदुःखानें विव्हळ होऊन रडत रडतच तो म्हणाला ' नंदा ! माझ्या सद्गुरो आपण परत केव्हां याल ? आपलें दर्शन पुन्हां केव्हां होईल ? ' नंद म्हणाला ' मालक ! चिदंबरला जाऊन परत कशाला यायचें ? देवाच्या भेटीला जाऊन मागें फिरायचें नाहीं, देवाच्या दर्शनांतच मोक्ष. मी परत नाहीं बरें यायचा. आतां देव तेथें मी. हा देह अन् हा संसार यांना कायमचा रामराम ! ' नंद उडया मारीतच चिदंबरम्ची वाट चालूं लागला पळूं लागला, म्हणणं जास्त खरें होईल.' आनंदभरांत नटराजाच्या दयेनें चित्त भरून येऊन त्याच्या मुखांतून पुढील अर्थाचें गाणें आलें:—

औषधी औषधी दिव्य ही औषधी
दुःखशोकामया त्वरित संहारिते ।
हृदयिं उगवुनि विश्वही व्यापिते
भ्रांत जीवा पहा ! अमृतही पाजिते ॥ १ ॥
शांतिबळ देउनी इंद्रियां सुखविते
दिव्य ही औषधी मृत्युला मारिते ।
प्रेमवल्ली कशी चित्तिं फोपावली
जाउनी ती निशा सत्प्रभा फांकली ॥ २ ॥
जन्ममरणादिसंसार हा लोपला
थोर आनंद सर्वत्र विस्तारला ।
पार नाहींच स्वानंदसौख्यार्णवा
मृत्युभीती नसे, जन्म झाला नवा ॥ ३ ॥
नटराजा ! नटराजा ! नटराजा पावला मम स्वामी ।
करुणामृतसागर हा— नेलें येणें मला परंधामीं ॥ ४ ॥

नंद याप्रमाणें तन्मय होऊन नाचत बागडत देवाच्या भेटीसाठीं चिदंबरमूक्षेत्राकडे चालला असतांना देव प्रसन्न होऊन आकाशांत नाचूं लागले, पृथ्वी आनंदानें थरारली; पायाखालीं पसरलेलीं शेतें आनंदानें डोलूं लागलीं व सृष्टीवर आनंदजलाची वृष्टि झाली! नंद आनंदमय झाला, त्याचे पाय चिदंबरमूक्षेत्राजवळ आले. कोलॅडम् नदीला पूर येऊन ती तुफान झाली होती, हत्तीलाटा एकमेकांवर आदळत होत्या. पैलतीरावर नटराजाच्या मंदिराचा कळस दिसतांच नंदाची जी स्थिती झाली तिची कल्पना आषाढीकार्तिकीला पंढरीस जाणाऱ्या प्रेमळ वारकऱ्यांनीं करावी! नटराजाच्या पायाशीं उचंबळणाऱ्या नदीच्या लाटा व नंदाच्या हृदयगंगेंतील प्रेमलहरी यांच्यांत तादात्म्य झालें. ‘आपोनारायणाचें तें रूप- नटराजच प्रत्यक्ष तो! नौकेवर लोक चढले. नंदाचे पायही चढले. नाव चालूं लागली; नंद वेहोप होऊन आनंदानें भजन करीत नाचूं गाऊं लागला:—

औषधी औषधी दिव्य ही औषधी
श्रीकृपा अंतरीं रोमरोमांतरीं संचली ।
भक्त देवा तसा देव भक्तासही धुंडितो
पातली धांवली वत्सस्नेहार्द्र ही मावली ।

नौका पाण्यावर नाचत चालली, नंद नौकेवर नाचत होता, नौकेवरचे लोक नंदाबरोबर नाचूं लागले; नंदाच्या हृदयांतल्या भक्तिप्रेमाच्या विजेचे धक्के सर्वांच्या हृदयाला पोंचले. नावाडीही तन्मय होऊन वल्हीं मारावयाचीं सोडून नाचूं लागला. नौका, नंद, नावाडी सर्व नटराज होऊन नटराजाच्या प्रेमांत नृत्य करूं लागले. नौका तीराला लागली, नंद नाविकाला पैसे द्यायला पाहूं लागला, तेव्हां नाविकानें पाय धरिले, नाविक रडूं लागला ' महाराज ! आपण प्रत्यक्ष नटराज आहांत. ' त्यानें मग कोणाचेच पैसे घेतले नाहींत! नंद, नाविक, यात्रेकरू सर्व देवमय होऊन मंदिराकडे नाचत चालले. व्यापारी व इतर लोक आपापले उद्योग सोडून या भक्तमेळ्यांत मिसळले. नंद हा भाविकांत नटराजासारखा शोभूं लागला. सर्वजण महाद्वारापाशीं आले. नंद म्हणाला " अहाहा! हें कैलासाचें द्वार आहे; भक्तानांच आंत जातां येतें, येथून कोणीही परत जात नाहीं. ह्याच पवित्र द्वारांतून माणिक्य, अप्पर, सुंदर हे भक्त देवाच्या भेटीला गेले, ह्या सर्व भिंतींना व वृक्षपाषाणांना त्यांनीं देवरूप केलें. धन्य ते थोर भक्त! मित्रांनो! देव रूपांत आहे आणि अरूप आहे; तो आंत आहे आणि बाहेर आहे; तो नृत्य करतो आणि स्तब्धही आहे. येथें अज्ञानी ज्ञानस्वरूप होतात व ज्ञानी इंद्रियें विसरतात! येथें देव उघडा प्रकाशमय आहे. ब्रम्हा हाच, विष्णु हाचि, माझा नटराज सर्वकांहीं आहे, त्याचें तांडव --त्याचें नृत्य हें प्रेमरूप आहे. मला हें जग नको; हा संसार नको. देवा! मी कोणत्या शब्दांनीं तुला आळवूं! तुझें स्तवन कसें करूं? देवा! आपल्या पायापासून क्षणभरही मला दूर करूं नकोस. येथून दूर होणें हाच मृत्यु होय व येथें अखंड वास हें केवढें भाग्य! देवा! मी निष्पाप शुद्ध आहे ना ? पायावेगळा करूं नकोस. " देहभानविवर्जित होऊन नंद व त्याचे सवंगडी मंदिराभोंवती व गावांभोंवती नटराजाचें भजन करीत तीन अहोरात्र प्रदक्षिणा करीत फिरत होते. नंदावर नटराज प्रसन्न झाले; तेथील मंदिराचे पुजारी यांना सर्वांनाच नंदाला आपल्या दर्शनाला आणण्याबद्दल नटराजाचे दृष्टांत झाले, तेव्हां त्यांनी सभा भरवून ठराव केला कीं ' अग्नीच्या दिव्यांतून शुद्ध करून घेऊन मग नंदाला मंदिरांत न्यावें. नंद दिव्यास आनंदानें कबूल झाला. अनुतापाच्या दिव्यांतून तो आधींच पार पडला होता. शीतल चंदनोदकानें स्नान केल्याप्रमाणें अग्नि त्याला सुखस्पर्श झाला. ब्राम्हणांनीं वाजत गाजत नंदाला मंदिरांत नेलें व त्यानें नटराजाची पूजा केली. तो देवासंन्निध गेला व देवमय झाला.

नटराज, माझ्या जीवाच्या जिवलगा ॥
तुझ्या अंगसंगा लाभलों जी ॥ १ ॥
आह्मां तुह्मां आतां भेद नाहीं देवा ॥
अभिन्नत्वें सेवा घ्यावी माझी ॥ २ ॥

असें म्हणत नंदानें देवाच्या पायावर मस्तक वाहिलें व नंद तेथेंच गुप्त झाला ! नंद कोठें आहे ? नंद कोणासही दिसेना, नंदाची ज्योति नटराजाच्या ज्योतींत मिळाली, इतकेंच नव्हे तर नंद देवाच्या पायीं हजारों लोक पाहात असतांना देहाःकट गुप्त झाला ! नंदाचा सर्वत्र जयजयकार झाला. घंटा व नौबती झडल्या तेव्हांपासून तामीळ देशांत ह्याच मार्गशीर्ष महिन्यांत हजारों तरुणी नूतन वस्त्रालंकार घालून नंदाचीं गाणीं गात नाचत असतात.

नंदाच्यां शिवस्तोत्रांतील आणखी कांहीं विचारांची ओळख करून घेऊं.

“ नटराजाचें नृत्य किती गोड ! आपण सर्व जण त्याच्याच सारखें नृत्य करूं म्हणजे तो आपणांस नृत्यांतच सांपडेल—गावें आणि नाचावें, पुन्हां गावें नाचावें हेंच काम ! वर्तुळ किंवा फेर धरून त्या राजराजाचें नाम गावें. तो निर्विकल्प व निर्मळ आहे.”

“ नृत्य आणि प्रेम यांचा स्वामी, महासमर्थ, प्रेमळांची कामधेनु, प्रेमसागर, दीनांचा कल्पवृक्ष, शुद्ध प्रकाश—अशा नटराजाला आपण शोधूं.

“ हे सौम्य, आल्हादक, शुभ्र चंद्रा ! शिवाला प्रिय होण्याचा मला मार्ग दाखीव ! माझा प्राणविसावा जो नटराज त्याच्या मस्तकावर तूं विराजत आहेस! तूं कोणतें पुण्य केलें आहेस ? रात्र नाहीं व दिवस नाहीं असा तूं ‘ अहोरात्रांचा पैलकड आहेस, मला असें होतां येईल काय ? ( ज्ञानाज्ञानातीत ) असें माझें मला कसें होतां येईल तें सांग बरें !

“ शुभ्र चंद्रा ! त्याच्याशीं मला एकांत कसा करितां येईल ? गड्या सांग ना ! हें किती कठीण आहे ! तो महामानी आहे ! तो आणि मी, मी आणि तो अगदीं एक--अहाहा ! या भावनेनें मी किती सुखी आहे ! ( पंच ज्ञानेंद्रियरूपी मुखांचा ) पांचतोंड्या सर्प ( अहंकार ) हा आमच्या आड येतो ! त्याला तूं अमृत पाजून सजीव कर म्हणजे तो छळणार नाहीं. त्याच्या नृत्यानें सारीं ब्रम्हांडें नाचत आहेत. चंद्रा ! एकच अमृतकिरण मला पुरे. तें माझें जीवित आनंदमय करील.”

# पारमार्थिक पत्रें

( श्री मत्सद्गुरु विष्णुकवि महाराजाश्रित श्रीगुरुदासमहाराज उर्फ अनंतराव मामा मु. माहुर यांजकडून आलेल्या पत्रांपैकीं ५ पत्रें मुमुक्षूच्या भाद्रपदाचे अंकांत छापलीं आहेत. त्यानंतरचीं पत्रें प्रस्तुतच्या अंकांत देत आहें. )

**प्रकाशकः- नरहरशास्त्री खरशीकर**

## पत्र ६ वें

श्री क्षेत्र माहूर श्री गुरुदत्तप्रसन्न. आषाढ कृ. १।१८३२ शनिवार

अनेक आशीर्वाद. इकडील सर्वत्र मंडळी स्वामीमहाराजांसह खुशाल आहेत. काळजी नसावी. एकाग्रतेबद्दल लिहिणार होतों. परंतु, आतां वेळ नाहीं. हरिदास काल गुरुपूजेसाठीं आले होते, ते जाण्यास निघाले आहेत. म्हणून कार्डच लिहिलें. सारांश इतकाच कीं, पाहणें पाहणारा, ऐकणें ऐकणारा, बोलणें बोलणारा, खाणें खाणारा, घेणें घेणारा, देणें देणारा, चालणें चालणारा, करणें करविणारा समग्र क्रिया व बऱ्यावाईट जपतपादि उपासना या सर्व क्रिया--करविणारावांचून होत नाहींत. सर्व करणें हें त्याच्या करितांच करावें लागतें; परंतु केव्हां ? त्याचें विस्मरण असतें तेव्हां. मग अर्थात जी जी क्रिया करणें तीं आपणच आपला शोध करीत त्रिभुवन फिरण्यासारखें आहे याचा विचार कर. एकाग्रता मुद्दाम ( कांहींतरी युक्तीनें ) करून घ्यावी लागते; म्हणून तो वायु मस्तकांत प्रवेश करतो तर सहज एकाग्रतेचें सौख्य भोगतां येईल. तितकें भोगण्याची संवय करावी. म्हणजे तसें होणार नाहीं. ( एकाग्रता करण्यामुळें मस्तक चढणार नाहीं. ) असो. तुला विशेष लिहावेंसें नाहीं. विचार केलास म्हणजे तुला सर्व आपोआप समजेल. कळावें हा आशीर्वाद.

स्नान, संध्या, जप, पूजा, ध्यानधारणा करण्याला आरंभ म्हणजे अगोदर द्वैतपणा स्वीकारावा लागतो, मग अद्वैताचें ध्यान करावें लागतें. म्हणजे जो स्वयं सर्वदासिद्ध त्याला शोधण्याला एकांतांत बसून डोळे झांकून घेऊन हुडकण्याचा प्रयत्न म्हणजे जें सदोदित असणारें तें लोकांतांत उजेडांत डोळे उघडे असतां नाहीं अशी समजूत विलक्षण ! परंतु, सहज सर्वदा अनुभवानें तें सौख्य विचारानें घेण्याची संवय लावीत असावी असो:—

मातुश्रीस स्वामीमहाराजांनीं सांगितलें आहे कीं, आपण अभ्यास सोडूं नये; लौकरच त्याचें फळ मिळेल. माझा त्यांना नमस्कार सांगावा. चि. सौ. वतीचा अभ्यास कसा काय चाललाय ? त्यास आशीर्वाद.

---

## पत्र ७ वें

क्षेम श्रीक्षेत्र माहूर श्रावण शु॥ ९ रविवार शके १८३२

श्रीसद्गुरु दत्तात्रेयाय नमः

अनेक आशीर्वाद विशेषः—

आपलें आषाढ कृ. १० पत्रांक ११९ चें पाकीट श्रावण शु॥७ शुक्रवारीं पावलें. इकडील सर्वत्र मंडळी सद्गुरुसह क्षेमरूप आहेत. काळजी नसावी. आपलें निवृत्ति व प्रवृत्त्यतीत पत्र पाहून परमानंद झाला. तो पत्रीं लिहितांच येत नाहीं. हीच स्थिति दृढ झाली म्हणजे भयावस्थांचीं नावेंरूपेंही स्वस्वरूपच होतील. आतांच नाहींतशीं झालीं आहेतच. पण असल्याबद्दलच्या संशयाचा मिथ्या संशयाचें द्रिग्दर्शन झाल्यासारखें वाटतेंसें वाटतें. हेंही मिथ्याच आहे. ही स्थिति कृष्णांनीं अर्जुनास गीतेमधें,(१२ वा अध्याय) सांगितल्याप्रमाणें आहे. या स्थितीला तेंच फळ प्राप्त झाल्यावांचून बिनसंशय राहणारच नाहीं; अशी स्थिति सद्गुरुकृपेवांचून अनंत जन्मांनीं व अनंत प्रयत्नांनीं होणें कठीण ! तेव्हां अर्थात तुजवर सद्गुरुकृपा परिपूर्ण आहे यांत संशय नाहींच याला सांप्रतची शांत स्थिति हें प्रत्यंतर. आणखी एक प्रमाण आहे कीं, ईश्वराची कृपा आणि भक्ताचं वाटोळं हा प्रत्यक्ष हल्लींचा स्वानुभव यामध्यें दोन प्रकार आहेत. तरी दोहोंचा साधारण मुक्काम जवळजवळ एकाच घरांत आहे. एक भक्ताचं वाटोळं म्हणजे भक्त ज्याला ( घरदार वगैरे सदेह संसार ) माझं माझं म्हणतो त्याचं त्याचं वाटोळं. कारण, माझं माझं या द्वैतोपाधीचं वाटोळं झाल्यावांचून भक्तत्व येतच नाहीं; आणि दुसरा अर्थ असा कीं 'भक्ताचं वाटोळं' देवाहून भक्त निराळा नसणं, भक्त या द्वैतोपाधीवर शून्य पडणं म्हणजे भक्तच देव होणं म्हणजे अर्थात भक्तपणाचं वाटोळं ! सांप्रत या दोन्ही अर्थांची अम्मलबजावणी सुरू झाली आहे. अशीच ही स्थिति निभावून कड लावणार सद्गुरु समर्थ आहेत, असं सांप्रत म्हटलं पाहिजे, व त्याप्रमाणं होईल हा संशय नाहीं. आपणां त्रयमूर्तींवरही त्रयमूर्तींची चांगली कृपा आहे बाकी ' **जयाचें जें कर्मसूत्र ।**

**मांडूनि ठेविलें स्वतंत्र। तिये तिये गति पात्र। होवोचि लागे।**
खुशाल होवो, त्या कर्मसूत्राशीं आपला संबंध बिलकूल नाहीं. हें आपणांस आतां सांगण्याची आवश्यकता नाहीं. म्हणून तुकारामांनीं सांगितल्याप्रमाणें 'तुका म्हणे स्वस्थ रहावें। जें जें होईल तें तें पहावें' असें पाहूं लागलें असतां दृश्य, दर्शन,द्रष्टा ही त्रिपुटी आपोआप एकरूपच आहेत हाही स्वानुभव आहेच. ह्मणून आतां जास्त लिहिणें नको. कळावें हा आशीर्वाद ती. मातुश्रीस सा. न. चि. सौ. वतीस आशीर्वाद. ॐ

## पत्र ८ वें

श्रीक्षेत्र माहूर आश्विन शु॥ १४ शके १८३१ सोमवार रात्र

क्षेम श्रीगुरु दत्तात्रेयाय नमः

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्री पुरुषोत्तमानंद सरस्वति सद्गुरु-संस्थान मठ श्रीक्षेत्र माहूर यांचा आशीर्वाद नारायण वि.

आपलेकडून भाद्रपद कृ. ९ शुक्रवार १८३२ चें पत्रांक १३६ चें पत्र पावलें आजच. उदयीक डाकवाला जाणार म्हणून आतां रात्रींच लिहिण्याचा प्रसंग आला. इकडील स्वामीसह सर्वत्र मंडळी खुशाल आहेत, काळजी नसावी. या देहतन झोपडीला हीवज्वर येत असतो म्हणून पद वगैरे लिहिण्यास सवड नाहीं करितां वाईट वाटतं. असो. आपल्या एकंदरींत उत्तरोत्तर पत्रद्वारें उत्तरोत्तर आनंद प्राप्त होतो. आतां आनंदच प्राप्त व्हावयास लागला मग आतां आनंदप्राप्तीसाठीं आणखी काय लिहावयाचें बाकी उरलें आहे! सर्वांच्या शेवटीं आनंद— तो प्राप्त झाला. आतां सर्वांच्या मागल्या वंशावळीच्या कथा व्यर्थ कां गात बसाव्यात ? एकंदरींत सद्गुरुलीलामहिमा अचिंत्य अनंत आहे. त्याचेंच निरंतर हृदयमंदिरामध्यें अचल पद स्थापून नित्यानंदांत असावं. असो ती. मातुश्रीस सा. न. चि. सौ. वतीस आशीर्वाद.

श्री सद्गुरु रामदासचरणीं सा. नमस्कार अनन्य विनंतिः—

**अभंग.**

संत समर्थ येतील। सौख्यसिंधुतें देतील ॥ १ ॥
संत यावे संत यावे। दीना दरुषण द्यावें ॥ २ ॥
संत येतील येतील। भेटि बाळाची घेतील ॥ ३ ॥
संत यावे संत यावे। खांदी कडेवर घ्यावें ॥ ४ ॥

संत येणार येणार । आम्हां आमुचें देणार ॥ ५ ॥
संत येतील येतील । जन्म मरण नेतील ॥ ६ ॥
संतचरणां विनंति । माझी एक आदि अंतीं ॥ ७ ॥
व्हावें हृदय-निवासी । उद्धरावें गुरुदासी ॥ ८ ॥

( खालील ओळी श्री. विष्णु कवि महाराजांनीं स्वहस्तें लिहिल्या आहेत)
ॐ नारायणाय नमः । विशेष— जोंपर्यंत तुह्मांस सहजस्थिति प्राप्त झाली नाहीं तोंपर्यंत आम्हांस आनंद प्राप्त होणार कसा ? प्रवृत्तिमध्यें जें जें प्रिय व अप्रिय सहज वाटतें तसें उलट निवृत्तिमध्यें सहज वाटूं लागलें म्हणजे पूर्ण आनंदास कारण होईल. दुसरें देऊळ, घाट, धर्मशाळा, यज्ञयागादिक करण्याची उसळी शांत होईल व कृतकृत्यता व प्राप्तप्राप्तव्यता होऊन कांहींयेक कर्तृत्व बाकी राहिलें नाहीं असें झाल्यानें महानंदास आम्ही मानून धन्य होऊं. हरये नमः

—ॐ—

## पत्र ९ वें

क्षेम श्रीक्षेत्र माहूर का. शु. ७ शके १८३२ बुधवार

श्री गुरु दत्तात्रय समर्थ

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य सद्गुरु पुरुषोत्तमानंद उर्फ विष्णूकवी महाराज श्रीक्षेत्र मातापूर यांचा अनेक आशीर्वाद. नारायण! गुरुदास मामाचे अनेक आशीर्वाद विशेष.

इकडील स्वामी सशिष्य सुखरूप आहेत काळजी नसावी. आपलें पाकिट आश्विन कृ. १० चें पावलें. सर्व मजकूर समजून अत्यानंद झाला. जों जों सोन्याला अग्निसंग होतो तों तों तें निर्मळ होत जाऊन शुद्ध स्वयंरूपच राहतें, म्हणून अग्निसंगाचें दुःख तें सुखच मानतें. त्याप्रमाणें शतशहा असाध्य संकटें आपणांवर येतात त्याचा हेतु तोच आहे. या सर्व संकटांपासून ' अनन्याश्चिंतयन् ' या गीताश्लोकाप्रमाणें निःसीम भक्तांचीं सर्व संकटें सद्गुरु निरसन करण्याला हृदयांतच कंबर बांधून तयारच असतो. तर तुजवर संकटें येतात तीं कशीं निरसन होतील याची काळजी करणं ही अज्ञान मानवी समजुत होईल. तूं सर्व संकटांतून निभलास व निभशील. कारण, गीता अ. २ श्लोक ७१ अ. १२ श्लोक १३-१४ अ. १८ श्लोक ६१-६२-६६ या प्रमाणें तुझी खरी स्थिति आहे तर तेंच फळ प्राप्त झाल्यावांचून राहणार नाहीं व भगवत्वाक्य मिथ्य

नाहीं. ( मनुष्याणां सहस्रेषु ) असा तुजसारखा सच्छिष्य परिपक्व स्थितीचा ज्या गुरूस मिळेल तो गुरूही धन्य आणि तो शिष्यही धन्य. त्या दोघांत द्वैत नाहीं. एक देहाला जसे दोन डोळे परंतु दृष्टि एकच त्याप्रमाणें नांवाला दोन परंतु वास्तवीक एकच. असो. वास्तवीक संसारअरण्यांत असून तूं अलगच आहेस. तुजवर सद्गुरूची पूर्ण कृपा आहे हें पाहून परमानंद वाटतो. असो. तुझ्या येण्याची व्यवस्था लावणार तुझाच सद्गुरु समर्थ आहे; काळजी नसावी. माझी प्रकृति बरीच ताळ्यावर येत चालली आहे.

श्रीगुरु शरण मी तुझें बालक । तूं माझा पालक दत्तात्रेया १
श्रीगुरु माउलि तूंच माझी माता । तूं कुलदेवता दत्तात्रेया २
श्रीगुरु दयाळा तूंचि दीन बंधु । तुजसीच वंदूं दत्तात्रेया ३
श्रीगुरु कृपाळा तूंचि माझी तनू । चैतन्या चेतनू दत्तात्रेया ४
श्रीगुरु निधाना तूंचि माझें धन । तूं माझें निधन दत्तात्रेया ५
श्रीगुरु देवेंद्रा तूंचि माझें मन । तूं माझें मनन दत्तात्रेया ६
श्रीगुरु विश्वेशा तूं माझा मालक । तूं माझा पालक दत्तात्रेया ७
श्रीगुरु परेशा तूं माझें पूजन । तूं माझें अर्चन दत्तात्रेया ८
श्रीगुरु सर्वेशा तूं माझें कीर्तन । तूं माझें भजन दत्तात्रेया ९
श्रीगुरु आत्मेशा तुजविण कांहीं । मज त्राता नाहीं दत्तात्रेया १०
श्रीगुरु दे जागा पायीं गुरुदासा । हृदयविलासा दत्तात्रेया ११

## पद्–भैरवी.

तुझीच कृपा ही श्रीगुरुराया ॥ धृ ॥

धरुनि करीं बसविसि नर तरी वर । मज भवपुर भवपारु तराया ॥ १ ॥
परघर दुःख नच दाविसि लाविसि । निज सुखसदनिं गमन कराया ॥ २ ॥
अनकुल भार्या देसि अवर्जुन । वर्जुन प्रतिकुल नारि पराया ॥ ३ ॥
गुरुदासाच्या देहसंपत्तिचें । नांव रूप हें शिल्लक नुराया ॥ ४ ॥

असो ती. मातुश्रीस सा. न. चि. सौ. वतीस आशीर्वाद तुमच्या येण्यासंबंधानें काय विचार होईल तो कळवावा. श्री. हरिहरानंदस्वामी १ वर्षापासून येथें नाहींत.

कालमान चोहोंकडेसच फार चमत्कारिक झालें आहे. चोहोंकडेच मनुष्या-जवळ पैशाचें त्राण राहिलें नाहीं व आतां तर शरीरसामर्थ्य वगैरेंचीही क्षीणा-

वस्था चोहोंकडे प्राप्त झाली आहे असो. कर्ता करविता श्रीसद्गुरुच. त्याच्या मर्जीनुरूप येण्याजाण्याची जशी वाटेल तशी व्यवस्था करणार समर्थ आहे. बाकी आपण सर्व बाजूंनीं असमर्थ आहोंत. ठेविलि त्या स्थितींतच राहून तच्च-रणीं लक्ष्य ठेऊन स्वस्थ असावें. ॐ तत्सत्.

## पत्र १० वें

क्षेम श्रीक्षेत्र माहूर मार्गशीर्ष शु॥ ९-१८३२

श्रीगुरुदत्त सुप्रसन्न.

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्री. सद्गुरु पुरुषोत्तमानंद सरस्वति श्रीगुरुदास मामांचे अनेक आशीर्वाद विशेष.

आपलें पत्र पोंचलें. व परमानंद झाला. याचें कारण, तूंच परमानंदी अगोदर आहेस म्हणून. तुलाच जर परमानंदानुभव झाला नसता तर आम्हालाही झाला नसता हें उघड आहे. आणि दुसरें प्रत्यंतर ' जयाचें जें कर्मसूत्र ' या ज्ञानेश्वर महाराजांच्या ओंवीचा दृष्टांतही दिला आहेस त्यावरूनच सिद्ध होत आहे. म्हणून जयाचें म्हणजे आत्म्याचें नव्हे. कारण, आत्म्याच्या ठिकाणीं कर्म नाहीं व कर्मकर्तव्याभिमान नाहीं, तर मग जयाचें म्हणजे अर्थात् ज्या देहाचें तिथं आत्म्याचा संबंध नाहीं हें ज्यानं जाणलं त्याला त्याच्या कर्मसूत्राविषयीं हर्ष, खेद नाहीं. आणि तूं म्हणतोसच आहेस, देहकर्म तशींच सर्व कर्में तर आनंदाचा तुला अनुभव नाहीं असं म्हणतां येत नाहीं. म्हणजे तूं आपला परमानंदपणा स्वानुभवलासा अर्जुनाला दिव्यचक्षु दिलें तेव्हां तो विश्वरूप पाहता झाला. तसंच तुला जर ज्ञानचक्षु नसते तर तूं आपल्या स्वस्वरूपाला पाहिलें नसतेंस. देह, संसार, मन यांची तळमळ गेल्यावर मग बाकी काय राहील ? त्याला परमानंद ह्मणण्याला काय हरकत आहे. असो.

' गुरुदर्शनासाठीं तुझें मन पंचप्राण व्याकूळ होत आहेत ' तर तूं येच. त्यावांचून तुझे मनाची समाधानी होणार नाहीं , अशी लक्षणंही सत्-शिष्यावांचून इतरांजवळ नसतात. हें पुढील सद्गुरूच्या अखंड कृपाप्रसादाचेंच दिग्दर्शन आहे. परंतु, तिकडून परवानगी मिळाली पाहिजे तर त्यांचीच प्रार्थना कर अगर तेच जाणून देतील, कारण, परमात्मा भक्ताच्या इच्छेबाहेर नसतो तेव्हां तुला परवानगी बहुतकरून देतीलच. त्यांना एकवेळ तरी माझी अखंड शरणागति सांगून ते काय मला प्रसाद देतील तो घेऊन ये. त्यांचें आगमन दार्शित झालें म्हणजे खालील प्रार्थनेचें पद म्हणावें.

## दिंडी.

सर्व व्यापक सर्वांस जाणता तूं । अणु परमाणु मालिकेस तातू ।
अचळ विश्वा गुरु तूंचि चळाकार । तुला माझा साष्टांग नमस्कार॥१॥
लक्ष चौऱ्यांशी कोंटि तूं वितोसी । जगज्जिवना जग तूंचि जिववितोसी ।
गुरु तुं कळसिन हेतूस हेतुकार ॥ तुला०॥२॥
तुजसि चित्ता चिंतनें चिंतवेना । कल्पनेला कल्पने कल्पवेना ।
गुरु न होसी द्रष्टयासि दृश्यकार। तुला०॥३॥
स्वयं सविता तूं सदा उदयमान । तुझा नाहीं कल्पांतिं अस्तमान ।
सूर्य प्रभेचा गुरु तूंचि प्रभाकार । तुला०॥४॥
ॐकारासी तरि तूंचिं या अकार । शून्य गगनाचा तूंचि गगनकार ।
ॐकारासि गुरु तूंचि मुळोंकार । तुला०॥५॥
नाम नामातीत तूंचि अविकार । जन्ममरणाचे तुजसि ना विकार ।
गुरो सच्चित्घन तूंचि निराकार । तुला० ॥६॥
तुला नेणाति श्रुतिशास्त्र ज्ञानराशी । कसा कळशी मज मूढ या नरासीं ।
तारि मारी गुरु तुजसि अधिकार ॥ तुला०॥७॥
नामधारी मी चित्र मृत्तिकेचें । तूं हें कर्ता तरि यास ज्ञान कैचें ।
विकारी मी ब्रम्ह तूं अविकार ॥ तुला०॥८॥
माझी माता तूं पिता बहिणभाऊ । तुझ्यावांचून मी दीन कुणा बाहूं ।
गुरो हर्ता मम सर्व तूं विकार ॥ तुला०॥९॥
क्षुधा वत्साची जाणे बहुधा ते । स्वयें पाजितसे गैातमी दुधातें ।
गुरो जाणासि तूं सर्व हा प्रकार ॥ तुला०॥१०॥
तुझी कळवळ खरि नाहीं ते दिखावूं । तरी दे या बाळास इष्ट खावूं ।
नको त्यागू निज ब्रीद अंगीकार ॥ तुला०॥११॥
दयासिंधो दिनबंधो तूं उदार । म्हणुनि धरिलें गुरुदासे तुझें द्वार ।
गुरो दात्या दे दान मी भिकार ॥ तुला०॥१२॥

**पद**—( झाली ज्याची उपवर-चाल )

अशि तूं तुला तरि कशी जाणूं मी । नच देखो मनीं कैसि आणूं मी ॥ धृ ॥
निर्मळ निल शामसुंदर मूर्ती । वदति श्रुतिस्मृति पण नेणो मी ॥अशी॥ १ ॥
1 भस्माधिभूषित 2 चंदनचर्चित । सज्जनाऽर्चित पण नेणो मी ॥ २ ॥

1 वैराग्य 2 प्रपंच

विश्वेश्वर तूं विश्वाधारा । विधिहरिहरा पण नेणो मी ॥ ३ ॥
पुराण पुरुषोत्तम अविनाशी । मज जाणसीं तूं तुज नेणो मी ॥ ४ ॥
तुजसाठीं मम तिळतिळ तुटतो । जिव उरीं फुटतो पण नेणो मी ॥ ५ ॥
परब्रह्म श्रीगुरु दासांतरीं । असासि अढळ तरीं पण नेणो मी ॥ ६ ॥

**पद** ( घेउनि ये पंखा--चाल )

न पडो न पडो विसर तुझ्या गुरुराया चरणाचा मला ॥ धृ ॥
सच्चिदानंद योगी तूं मी हा भवरोगी दत्तात्रेया विमला ॥ च. १ ॥
तूं तीर अजन्मा सदाचि मी ये जन्मा । ,, २ ॥
तूं सर्वज्ञानी मूढचि मी अज्ञानी । ,, ३ ॥
तूं शिव निःस्संगी जिवपण माझ्या अंगीं । ,, ४ ॥
मम निज-सुखधामा हृदयस्थात्मारामा ,, ५ ॥
दिन गुरुदासाचा तूं एक सद्गुरु साचा ,, ६ ॥

**पद**--( चाल सदर )

नको नको भोगाया तूं लावूं हा संसार मला ॥ धृ ॥
ज्ञानीजन वदती, तो जाईलचि वाया, यांताचि जो नर रमला ॥ हासंसार. १
विषयाची खाणी विषरूपची निर्वाणी मारक जो सहित कुला ॥ हा. २ ॥
या दावाग्नीनें केली खाक जळोनी कनकाच्या लंकेला ॥ हा. ३ ॥
तरि घडिनें नाहीं सांप्रत जरि आहेसा प्राणसखासा गमला ॥ हा. ४ ॥
मुकेन स्वसुखासी ऐसें नकरी स्वामी शरण गुरुदास तुला ॥ हा. ५ ॥

( खालील मजकूर श्री विष्णुकवि महाराजांच्या हस्ताक्षरांत आहे. )

वि.सू.---**मुख्य उत्तम काळ संध्येचा** आहे. त्या संध्याकाळीं साधकानें कृतार्थ होण्याचा पूर्ण बुद्धियोगानें प्रयत्न करून धन्य व्हावें असें आहे. तो प्रकार तुम्हीच लक्ष्यांत आणावा. तोच संध्याकाळ तुम्हांस प्राप्त झाला आहे. कसा ? श्रीसमर्थ रामदासमहाराजांनीं आपणांस श्रीरामचंद्राचें देऊळ बांधण्याची आज्ञा केली, ही आज्ञा प्रतिपालन करावी लागत आहे. त्याविषयीं आमची आज्ञा कीं जेणें करून आम्हांस कृतकृत्यता वाटत नाहीं. तरी हीच दोन्हीकडून संधी प्राप्त झाली आहे. या वेळीं उभयतांचें समाधान कसें घडून येईल याची काळजी अतितीव्र मनामधें उत्पन्न होऊन हृदयस्थ श्रीगुरु शरणागत प्राप्त झाले म्हणजे तोच याचा निवाडा करून परमानंद करील हें आपणांवर अवलंबून आहे. कळावें. ॐ नारायण.

# मातापित्यांची सेवा–दोन चित्रें.

## १ नारायण.

**नारायणः**— हा आमचा ४० वर्षांपूर्वींचा एक वर्गबंधु आहे. आतां पेन्शन घेऊन पितृसेवेस सादर झाला आहे. त्याचें वय ६० असून बाप ८४ वर्षांचा वृद्ध आहे; आम्ही इंग्रजी तिसरे यत्तेपासून एकाच शाळेस एकत्र शिकलों तेव्हांपासून त्याचा आमचा स्नेह आहे. शाळा सुटल्यावर आम्ही चारदोन स्नेही ' चल रे पर्वतीला जाऊं ' म्हणून त्याला घराबाहेर काढायला गेलों तर तो थांबा ! मी आईला विचारतों व 'ती जा म्हणाली तर येईन, नाहीं तर यायचा नाहीं ' असें म्हणायचा ! कोणतेंही काम आईला विचारल्यावांचून करावयाचा नाहीं. त्याची आई २५ वर्षांपूर्वीं वारली. आमरण नारायणानें आईची सेवा अनुपम केली. तिच्या शब्दाबाहेर-नव्हे मनोदयाबाहेर- नारायण कधींच गेला नाहीं. आईबापांची पडेल ती सेवाचाकरी करणें, सेवेंत आनंद मानणें, त्यांत आपल्या आवडी-निवडी, लाभ-हानि, सुखदुःख कांहींच न पाहणें, इतकें करून आपण यांत कांहीं विशेष करितों असा विचारही मनाला न शिवणें, हा नारायणाचा अंगभूत स्वभाव आज ४० वर्षें आम्ही पाहत आहों. नारायणाला भाऊ--भावजया, पुतणें, स्वतःचीं मुलेंबाळें, नातूही आहेत. त्याची बायको २० वर्षांपूर्वीं वारली तेव्हांपासून तो विधुर आहे. त्याचें स्त्रीवरही उत्तम प्रेम होतें, पण तें त्यानें लोकांत कधींच दाखविलें नाहीं, आईबापांसमोर कधीं स्त्रीशीं बोलला नाहीं. फार काय पण स्वतःच्या मुलांचेंही कौतूक केलें नाहीं; पोटांत स्त्रीबद्दल प्रेम असून त्यानें कधीं ' प्रणयगीत ' गायिलें नहीं, व ती गेल्यावर ' शोकगीतें ' गायिलीं नाहींत. घरांत २५ माणसें त्यांतलीच एक बायको; अशा साम्यबुद्धीनें सर्वांशींच तो वागत आला आहे. सर्वांच्या बरोबरच तिलाही त्यानें प्रेमानें वागविलें. त्याचा बाप उत्कृष्ट रामभक्त आहे, रामदासी आहे, अंतरंग अधिकारी आहे. त्याच्या आमच्या पुष्कळ बैठकी झाल्या आहेत. नारायणाची आई रामरूप झाली तेव्हां शेवटच्या प्रसंगीं तिच्या बिछान्याभोंवतीं घरांतलीं सर्व मंडळी जमली होती. नारायणाच्या बापानें तिला सहज विचारिलें, 'तुझी कांहीं इच्छा

आहे काय ? असली तर सांग.' त्या माउलीनें क्षणभर विचार केला. तिचे डोळे अश्रूंनीं भरून वाहिले व तिनें एकदा पतीकडे व एकदां पुत्राकडे पाहिलें व इतकेंच म्हणाली कीं, "माझ्या सर्व इच्छा तृप्त झाल्या आहेत. पण रामाच्या मनांत मला पुन्हां जन्म द्यायचा असला तर आपल्यासारखे पति व माझ्या नारायणासारखा मुलगा मला त्यानें द्यावा इतकेंच त्याच्यापाशीं मला मागायचें आहे. माझ्या नारायणासारखा पुत्र नाहीं हो कोणाच्या भाग्यांत सांपडावयाचा ! यानें मला जन्मभर सुख दिलें. माझ्या इच्छेबाहेर हा कधींच वागला नाहीं. राम त्याचें सदैव कल्याण करो." सद्गदित होऊन पतिपुत्रांनीं दिलेल्या सुखचिंतनांत ती गेली. नारायणानें आईच्या अखेरच्या अवस्थेंत तिची सर्व प्रकारें सेवाशुश्रूषा केली. तिला औषधपाणी देणें, तिचा हागमूत करणें, वस्त्रें धुणें व वस्त्राची आदलाबदल करणें, ह्या सर्व कामांत रात्रीच्या रात्रीं जागून नारायणानें अंगेजणीनें आईची सेवा केली व दुसऱ्या कोणालाही या सेवेंत भागीदार होऊं दिलें नाहीं! आई गेल्यापासून आई आणि बाप मिळून बाप अशा बुद्धीनें बापाची सेवा त्यानें चालविली आहे. नोकरीवर असतांना त्याचें सारें लक्ष पितृचरणीं असे. एकदा बाप विशेष आजारी असल्याचें भावाचें पत्र आलें त्याबरोबर नारायणानें तार केली कीं, 'वडिलांना विचारून त्यांचें प्रकृतिमान ताबडतोब तारेनें कळवा. मी नोकरीचा राजिनामा देऊन याचक्षणीं येतों. त्यांच्या पुढें मला नोकरीची पर्वा नाहीं." भिण्याचें कारण नाहीं असा जबाब आला तरी नारायण रजा घेऊन ताबडतोब गेला, व वापास बरें वाटूं लागल्याबरोबर त्याची आज्ञा म्हणून परत नोकरीवर आला. आतांतर पेन्शन घेतल्यापासून नारायण पितृसेवेंत अखंड रत आहे. हाच माझा राम, हीच देवपूजा व हाच माझा परमार्थ अशा बुद्धीनें नारायण अहर्निश पितृसेवेंत गुंग आहे. स्वतः साठींत आलेला पण स्वतःच्या देहाची कदर न बाळगतां वृद्ध पित्याची सेवा मनोभावें करीत आहे व यांत कर्तव्यापेक्षा कांहीं अधिक आहे असें त्याच्या मनांतही येत नाहीं. मी त्याला म्हणालों कीं, 'तूं ह्या काळांतला पुंडलीक आहेस, धन्य तूं, धन्य तुझे आईबाप व धन्य तुझ्या घराण्याची 'परंपरा!' तेव्हां यांत स्तुति करण्यासारखें माझ्या हातून कांहींच होत नाहीं' एवढेच शब्द त्याचे मुखांतून बाहेर आले. रामसेवा, अतिथिपूजन, ब्राह्मणसेवा, कुळधर्म, कुळाचार हे सर्व घरांत नीट पाळले जात आहेत. जुन्या बाळबोध वळणाचें हें एक नमुनेदार पवित्र घर आहे. या घरच्या साध्या अन्नाला प्रता-

दाची रुचि व पावित्र्य असतें हा प्रत्यक्ष अनुभव आहे. साधुत्व या घरांत मूर्तिमंत वास करीत आहे. गृहाश्रम हाच येथें परमार्थ आहे. नारायणांचे भाऊ व पुतणे यांनाही वळण चांगलें आहे. अशीं बालबोध घराणीं उत्तरोत्तर कमी होत आहेत एवढीच गोष्ट मनाला तापदायक वाटते. मला त्यांच्या घरीं प्रसाद घेण्याचा प्रसंग वरचेवर येतो, कधींकधीं मी त्यांचे घरींही उतरतों. संसारांत साधु कोणास पाहावयाचा असल्यास नारायणांचे घरीं जावें असें मी म्हणतों, पण ही स्तुति त्यास बिलकूल आवडणार नाहीं म्हणून त्याचें नांव व पत्ता मला जाहीर करितां येत नाहीं. सज्जनांना प्रसिद्धि नको असते. ' प्रतिष्ठा सूकरी विष्ठा ' असें त्यांचे ब्रीद असतें.

पुंडलीकें काय केलें । परब्रम्ह उभें ठेलें ।।<br>
तुका म्हणे मायबापें । अवघीं देवाचीं स्वरूपें ।।

*　　　*　　　*

मातृदेवो भव । पितृदेवो भव । आचार्यदेवो भव ।<br>
अतिथिदेवो भव　　　　( श्रुति )

---

पिता प्रत्यक्ष नारायण<br>
माता लक्ष्मी ते आपण ।<br>
ऐसें भावी ज्याचें अंतःकरण<br>
धन्य तो एक सुपुत्र ।।　( मुक्तेश्वर )

---

## महादेव.

**महादेव**—ज्या लेखणीनें वरील गोड चरित्र लिहिलें त्याच लेखणीनें पुढील गोष्ट सांगण्याचें जिवावर येत आहे, पण श्रीज्ञानेश्वर माउलीनें सांगितल्याप्रमाणें सत्यमिथ्या वोळखावें, बरें वाईट जाणावें, हिताचिलागीं—म्हणून सांगणें प्राप्त आहे, ' नारायण ' विरळ, आमच्या गोष्टींतले ' महादेव ' पुष्कळ आहेत ! नगरनाशिकटापूतच एक बाई ऐकण्यांत अशी आली आहे कीं, तिच्या नवऱ्यानें इस्टेट मिळविलेली, एक मुलगा शेतीवाडीवर व एक उच्च म्हटलेल्या धंद्यांत प्रमुखपणानें वावरत असून व महिना पांचचारशें रुपयांची त्याची

प्राप्ती असून, त्या बाईला वृद्धपणीं पोळपाटलाटणें घेऊन पोटासाठीं लोकांच्या दारोदार फिरावें लागत आहे ! दोष कोणाचा, आह्मांला माहीत नाहीं, त्याशीं आपणांस कर्तव्य नाहीं—पण आईला संभाळणें हें मुलाचें श्रेष्ठ कर्तव्य आहे असेंच कोणीही म्हणेल ! कशीही असली तरी ती आई आहे, तिनें उदरीं नव-मास वागविलें आहे, लहानपणीं आपल्यासाठीं काबाडकष्ट सोसले आहेत, तिनें लहानाचें मोठें केलें आहे, ह्या प्रचंड ऋणभारानें प्रत्येक सुपुत्रानें वांकून आई-बापांच्या स्वभावदोषांकडे दुर्लक्ष्य करूनच त्यांचा प्रतिपाल---वस्तुतः सेवा केली पाहिजे !

मायानदीचा ओघ खालीं वाहत असतो ! कुणी न सांगतां संवरतां मनुष्य स्त्रीपुत्रादिकांवर सहज प्रेम करितो, पण 'संसारोऽयमतीव विचित्रः' म्हणू-णच केवळ श्रुतीला ' आईबापांना देवासारखें मान ' अशी आज्ञा करावी लागली आहे! आपल्या उगमाशीं इमान राखणें हा सज्जनाचा मुख्य धर्म आहे. उगमाशीं जो बेमान त्याच्यांत कोणता सद्‌गुण असणें शक्य आहे ? उगम आईबाप व उगमाचा उगम परमात्मा--अशा सगुणनिर्गुण उभयविध उगमांशीं इमान राखणें हेंच मनुष्यत्वाचें प्रधान लक्षण आहे. उगमाशीं बेमान तो जगाशीं बेमान ! ज्याला आईबाप व देवधर्म याविषयीं प्रेमादर वाटत नाहीं, जो त्यांचा संतोष राखणें हाच आपला परमधर्म मानून त्याप्रमाणें वागत नाहीं, तो मनुष्य कसला? असले मानव ' मनुष्यरूपेण मृगाश्चरन्ति ' या कोटींतले होत. असो. आमची ' महादेवाची गोष्ट ' फारशी मोठी नाहीं. असल्या महादेवांचें वर्णन श्रीसमर्थांनीं दासबोधाच्या तिसऱ्या दशकांतल्या दुसऱ्या समासांत केलें आहे तें तेथें पहावें. आम्हांला मागें वाटे कीं समर्थांनीं यांत अतिशयोक्ति केली आहे; पण ह्या ३० वर्षांत असे पुष्कळच 'महादेव पाहण्यांत आले त्यामुळें समर्थांचें हें वर्णन पुष्कळच कमी आहे असें वाटू लागलें आहे! असो. एक होता महादेव-होता नाहीं आहे! विद्यमान आहे. तरुणपिढीचे सर्व ढंग त्याच्या खोलींत पाहण्यांत येतात. साबणाच्या वड्या, रेझर्स, इस्तरीचे शर्ट ( महात्माजींची खादीची चळवळ त्याला मानवत नाहीं कां कीं ती साधेपणा शिकविते, ) औषधांच्या बाटल्या, साहेबी हॅट, नाटकें कादंबऱ्यांचीं पुस्तकें, बुटाचें साहित्य-जाऊं द्या, आपल्याला काय करायचें त्याशीं! त्याच्या बापानें काढलें त्याचें लग्न, मुलगी ठरविली. ' बायको स्वतः

पाहिल्याशिवाय लग्नाला उभा राहणार नाहीं '–' बरं जा बाबा! स्वतः पाहून पसंत करून ये ' —आईबापांना वधू पसंत करायचा अधिकार काय? जणूंकाय आईबाप मुलाचे शत्रु! हें मत मासिकांतल्या थिल्लर गोष्टींनीं व 'प्रणयविवाह' व 'स्वयंवर' इ० विचारांनीं उच्छृंखल तरुणांच्या मनांत पूर्ण भरलेलें! प्रेमापुढें सर्व तुच्छ! मग तें प्रेम कोठें कां वहकेना! जातपात, कुलशील, देवधर्म सर्व प्रेमापुढें -विषयप्रेमापुढें तुच्छ! मालिनीची गोष्ट! राहूं द्या— जेथें डॉ. कुर्तकोटी सारखे शंकराचार्य म्हणविणारे जगन्नाथपंडित (हिंदु-ब्राम्हण) व लवंगी (मुसलमान बीजाची स्त्री) यांच्या प्रेमावर नाटकें लिहूं लागले आहेत! ' -कालाय तस्मै नमः' आमचा महादेव इतका सुशिक्षित अजून झाला नाहीं, अजून एम्. ए. व्हायचाय, विलायत दूर! त्यानें स्वजातीची सुशिक्षित कुलीन वधू पसंत केली, लग्न लागलें. वधू घरीं येतांच महादेवाला ब्रम्हांड ठेंगणें झालें. तारुण्यसुलभ विषयांनीं त्याचें मन भरलें, वधू घरीं आली, ओळखपाळख झाली. तिला 'मार्निंग वॉकला' बरोबर नेलेंच पाहिजे. घरीं केरपोतेरें करावं म्हातारीनें! काबाडकष्टाला आई व सुखाला बायको! "आई! हें काय ग तिला काम सांगतेस! तांदुळ निसायला काल बसविलेंस, तिचे डोळे बिघडतीलना अशानें! काल तिनें तीन घागरी पाणी आणलें व तिची कंबर दुखायला लागली! ती मोठ्या कुळांतली आहे तुझें तें केरपोतेरें व शेणगोळे, तूं संभाळ, ती हात नाहीं लावायची!"— 'अरे! मला काम होत नाहीं. थोडीशी मदत म्हणून तिला मी थोडें काम सांगतें. 'बस! ती कांहीं काम करायला दासी नाहीं, नोकर ठेवावेत 'अरे तुला माहीत आहेना पेन्शन थोडें आहे--नोकर चाकर ठेवायला पैसे नाहींत '' मग तिला काय त्याचा उपकार? सांग त्यांना!' एकदां पेन्शनर बाप म्हणाला 'बाळ! तूं आतांशीं अभ्यासाकडे लक्ष कमी देतोस! भलतीं पुस्तकें वाचणें यावेळीं योग्य नाहीं. परीक्षा ४।५ महिन्यांवर आली आहे. सारें लक्ष तिकडे दे 'एकदम् डोळे तांवरून बापाकडे पाहिलें. ' मला माझा अभ्यास समजतो आहे. मी सहज जवळ होतों. मी म्हणालों ' अरे! बापाशीं असें ताठ्यानें वागूं नये. विद्या विनयेन शोभते -'बस्स! त्या दिवसापासून घुस्सा! पुष्कळ आहे. 'तये भार्येचेनि कैवारां!!! मायबापासी नीच उत्तरें'—श्रीसमर्थच ' महादेवाचें चरित्र वर्णितात तेंच दास-- बोधांत पहावें.

# भगवंताच्या दर्शनाचा लाभ.

( दिनकर मासिकाच्या ताज्या अंकांत वरील विषयावर एक सुंदर लेख आला आहे. तो जयदलालजी गोयदंका यांच्या हिंदी लेखाचा अनुवाद आहे. )

दोन अति जिवलग मित्र जसे प्रत्यक्ष एकमेकांस भेटतात, बोलतात, तशा प्रकारें या कलियुगांत भगवंताचें प्रत्यक्ष दर्शन होणें शक्य आहे काय? शक्य असलें तर कोणत्या उपायांनीं त्या मनमोहन भगवंताचें लौकर दर्शन होईल? आणि असें भगवंताचें दर्शन घेतलेला कोणी महात्मा हल्लीं विद्यमान आहे कीं, काय? पुष्कळ लोक अशा प्रकारचे प्रश्न साशंकपणें विचारतात.

खरें पाहतां या तीन प्रश्नांचें उत्तर ज्यांनीं भगवंताच्या दर्शनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला असेल असेच महापुरुष देऊं शकतील!

( १ ) जशीं सत्ययुगादिकांत ध्रुव-प्रल्हादांस भगवंताचें साक्षात् दर्शन झाल्याचीं प्रमाणें मिळतात त्याचप्रमाणेंच कलियुगांतही सूरदास, तुलसीदास, इ. पुष्कळ भक्तांस प्रत्यक्ष दर्शन झाल्याचा पुरावा इतिहासांत सांपडतो. परंतु, सत्ययुगादिकांहून कलियुगांतच भगवंताचें दर्शन होणें फार सुलभ आहे असें विष्णुपुराण वगैरे ग्रंथांत सांगितलें आहे. श्रीमद्भागवतांतही म्हटलें आहे:—

कृते यद्ध्यायतो विष्णुं त्रेतायां यजतो मखैः ॥
द्वापरे परिचर्यायां कलौ-तद्धरिकीर्तनात् ॥ १ ॥
(स्कंद २ अ. ३ श्लोक १२)

" सत्ययुगांत निरंतर विष्णूचें ध्यान केल्यानें, त्रेतायुगांत यज्ञानें, आणि द्वापरयुगांत पूजा ( उपासना ) केल्यानें जी परमगति ( मुक्ति ) प्राप्त होते तीच कलियुगांत केवळ नामकीर्तनानें लाभते. "

ज्याप्रमाणें अरणीचीं लांकडें एकमेकांवर जोरानें घासल्यानें तात्काळ अग्नि पेटतो त्याचप्रमाणें खऱ्या अंतःकरणाच्या प्रेमपूर्ण गर्जनेच्या घर्षणानें अर्थात् त्या भगवंताच्या प्रेमपूर्ण नामोच्चाराच्या गंभीर ध्वनीच्या प्रभावानें भगवान् प्रकट होतात. महर्षि पतंजलींनीं आपल्या योगदर्शनांत सांगितलें आहे —

"स्वाध्यायादिष्ट देवतासंप्रयोगः।"

**"नामोच्चारानें इष्टदेवतेचें साक्षात् दर्शन होतें."**

ज्याप्रमाणें सत्यसंकल्प योगी ज्या वस्तूचा संकल्प करितो ती वस्तू तात्काळ प्रकट होतें, त्याचप्रमाणें शुद्ध अंतःकरणाचा भगवंताचा खरा अनन्यप्रेमी भक्त ज्यावेळीं भगवंताच्या प्रेमांत मग्न होऊन भगवंताच्या ज्या प्रेममयी मूर्तीचें दर्शन व्हावें अशी इच्छा करितो त्या रूपांतच भगवान् तत्काल प्रकट होतात.

भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन।
ज्ञातुं द्रष्टुंच तत्वेन प्रवेष्टुं च परंतप॥ गीता॥ ११-५४

[ भा ]—हे श्रेष्ठ तपस्वी अर्जुना, अनन्यभक्ति केली असतां अशा प्रकारचा ( चतुर्भुज ) रूपधारी मी, प्रत्यक्ष पाहण्यास तत्वदृष्ट्या जाणण्यास तसेंच माझ्या ठिकाणीं प्रवेश करण्यास अर्थात् ऐक्यभावानें, प्राप्त होण्यासही शक्य आहे.

समजा, दोघे अत्यंत प्रेमळ मित्र आहेत. त्यांतील एकाला आपल्या दुसऱ्या प्रेमळ मित्राला भेटण्याची अतिशय उत्कट इच्छा झाली आणि ही बातमी दुसऱ्या त्या प्रेमळ मित्राला कळली, तर तो स्वतः त्याला भेटल्याशिवाय कधीतरी राहील काय? तर मग, प्रेमाचें खरें रहस्य ज्याच्यासारखें कोणालाच जाणतां येत नाहीं असा जो प्रेममूर्ति परमेश्वर तो आपल्या प्रेमळ भक्ताला भेट दिल्याशिवाय राहील हें संभवेल तरी कसे?

म्हणूनच यावरून सहज सिद्ध होतें कीं, तो प्रेममूर्ति परमेश्वर सर्व काळीं, सर्व स्थळीं सर्व मनुष्यांस भक्तिवश होऊन अवश्य प्रत्यक्ष दर्शन देतो.

( २ ) भगवंताच्यां प्रत्यक्ष दर्शनाचा सर्वोत्तम उपाय खरें खरें प्रेम त्यावर करणें हाच होय. त्यालाच शास्त्रकारांनीं अव्यभिचारिणी भक्ति, अनुरक्ति, प्रेमभक्ति आणि विशुद्ध भक्ति इत्यादि नांवें दिलीं आहेत.

सत्संग, भजन, चिंतन, निर्मलता, वैराग्य, उपरति, उत्कट इच्छा आणि परमेश्वरविषयक व्याकुलता यामुळें भगवंताचे ठिकाणीं खरें शुद्ध प्रेम जडतें.

पुष्कळ लोक सांगतात कीं—"आम्हीं खूप खटपट केली, पण त्या प्राणप्रिय परमेश्वराचें दर्शन झालें नाहीं!" त्यांस जर विचारलें:—"कायहो,

तुम्हीं फांशीच्या गुन्ह्यांतून सुटण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या खटपटीइतकी खटपट जन्ममरणरूप फांशीच्या शिक्षेतून सुटण्यासाठीं केली आहे काय ? स्त्रीप्रेमास भुलून तिला भेटण्यासाठीं केल्या जाणाऱ्या प्रयत्नांइतके प्रयत्न तरी कधीं ईशदर्शनासाठीं केले आहेत का ? " आणि जर केले नाहींत तर " भगवान् भेटत नाहींत " हें म्हणणें काय उपयोगाचें ?

जे मनुष्य शरशय्येवर शयन करणाऱ्या पितामह भीष्मांप्रमाणें भगवंताच्या ध्यानांत रंगून जातात, भगवंतही त्यांच्या ध्यानांत तसाच निमग्न होतो.

**ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ॥ गीता ४-११ ॥**

" हे अर्जुना, जे मला जसे भजतात, मीहि त्यांना तसाच भजतो "

भगवंताच्या अखंड—सतत —निरंतर—नामोच्चाराच्या प्रभावामुळें जेव्हां क्षणोक्षणीं आंगावर रोमांच उभारूं लागतात, तेव्हां मनुष्याच्या सर्व पापांचा पूर्ण नाश होऊन त्याला एका ईश्वराशिवाय —त्या प्राणविसाव्या प्रभूशिवाय कांहींच गोड लागेनासें होतें; भगवंताच्या विरहदु:खानें अतिशय व्याकुळ झाल्यामुळें त्या मनुष्याच्या डोळ्यांतून प्रेमाश्रूंच्या धारा वाहूं लागतात; तसेंच जेव्हां तो त्रैलोक्याच्या ऐश्वर्यावर लाथ मारून त्या ऐश्वर्याचा सर्वस्वी त्याग करून—गोपींप्रमाणें केवळ वेडापिसा होऊन भटकत सुटतो, आणि पाण्यांतून बाहेर काढलेल्या मासळीप्रमाणें भगवंताच्या दर्शनासाठीं तळमळूं लागतो, त्याच वेळीं-अगदीं तेव्हांच मात्र—आनंदकंद, श्यामसुंदर, मनमोहन प्राणप्रिय प्रभूचें दर्शन होतें. हाच त्या भगवंताच्या दर्शनाचा खरा उपाय आहे.

( ३ ) ज्यास वर लिहिल्याप्रमाणें भगवंताचें साक्षात् दर्शन झालें आहे असे पुरुष कलियुगांत उघडाउघड दिसत नाहींत. तथापि मुळींच नाहींत हेंही खरें नाहीं; कारण हजारों भक्तांपैकीं प्रल्हादासारख्या एकाद्याच भक्ताची कांहीं विशेष कारणानें प्रसिद्धी होते; नाहींतर असे साक्षात्कारी लोक ह्या गोष्टीची वाच्यता करणें हें गौणच समजतात.

तेव्हां अशा प्रकारचे साक्षात्कारी लोक जगांत आहेतच, या गोष्टीवर आपण विश्वास ठेविला पाहिजे. परंतु ते भेटत नाहींत याचें कारण आमची अश्रद्धा हेंच आहे, आणि विश्वास न ठेवण्यापेक्षां ठेवणें हेंच सर्वांस जास्त फायदेशीर आहे. कारण भगवंतावर खरें प्रेम जडण्यास, तसेंच दोन मित्रांप्रमाणें

**भगवंताच्या मनोमोहिनी मूर्तीचें प्रत्यक्ष दर्शन होण्यास विश्वास हेंच मूळ कारण आहे.**

आनंदमय भगवंताचें प्रत्यक्ष दर्शन होण्याचा सर्वोत्तम उपाय " खरें प्रेम " हाच आहे. तें प्रेम कसें करावें आणि कोणत्या प्रकारच्या प्रेमामुळें भगवान् प्रत्यक्ष प्रकट होऊन दर्शन देतात त्याबद्दल येथें दोन शद्ब सांगण्यांत येत आहेत.

हजारों संकटें आलीं तरी **ध्रुवाप्रमाणें** भगवंताच्या ध्यानांत अत्यंत अचल राहिलें तरच भगवंताचें प्रत्यक्ष दर्शन होणें शक्य आहे.

भक्त **प्रल्हादाप्रमाणें** रामनामाच्या जोरावर अत्यंत आनंदानें सर्व प्रकारचे कष्ट सहन करण्यास, तसेंच तीक्ष्ण तरवारीच्या धारेनें मस्तक छाटून घेण्यास सर्वदा तयार राहण्यानेंच भगवान् प्रत्यक्ष दर्शन देणें शक्य आहे.

श्री**लक्ष्मणजी**प्रमाणें कामिनीकांचनाचा सर्वथा त्याग करून भगवंतासाठीं वनवाससुद्धां स्वीकारणारास भगवान् प्रत्यक्ष भेट देतो.

ऋषिकुमार **सुतीक्ष्णाप्रमाणें** प्रेमोन्मत्त होऊन फिरण्यानें भगवान् भेटेल.

श्री**हनुमंताप्रमाणें** प्रेमानें विव्हल होऊन अतिशय श्रध्देनें भगवतास शरण गेले असतां भगवान् प्रत्यक्ष भेटेल.

कुमार **भरताप्रमाणें** रामदर्शनासाठीं अतिविव्हळ झालें तर प्रभू भेटले

मान, प्रतिष्ठा इ. चा त्याग करून **अक्रूराप्रमाणें** भगवंताच्या चरणरजांत लोटांगणें घातलीं असतां भगवंताची भेट होईल.

**गोपींचें प्रेम** पाहून ज्ञानाचा व योगाचा अभिमान सोडून देणाऱ्या **उध्दवाप्रमाणें** प्रेमानें विव्हल होऊन जातांच भगवंत प्रत्यक्ष धांवून येतो.

विवाहापूर्वी एक एक पल प्रलयासमान घालविणाऱ्या **रुक्मिणीप्रमाणें श्रीकृष्णप्रभु** भेटण्यासाठीं अंतःकरणपूर्वक विलाप केला तरच भगवान् धांवून भेटेल.

महात्म्यांची आज्ञा पाळण्यांत तत्पर असणाऱ्या राजा **मयूरध्वजा**प्रमाणें प्रसंग पडला तर आपल्या पुत्राचें मस्तक चिरण्यासही न भिणाऱ्या प्रेमळ भक्तांस ईश्वर साक्षात् दर्शन देऊं शकतो.

श्री**नरसी मेहत्या**प्रमाणें लज्जा, मान, मोठेपणा, भय इ. सोडून भगवंताच्या गुणगायनांत रात्रंदिवस मग्न होऊन भटकणाऱ्या भक्तासमोर भगवान् साक्षात् उभाच असतो.

भगवान् केवळ दर्शन देतो, एवढेंच नव्हे तर द्रौपदी, गजेंद्र, शबरी, विदुर इत्यादिकांप्रमाणें भक्तानें प्रेमपूर्वक अर्पिलेल्या वस्तु तो स्वतः प्रगट होऊन खातोही.

**पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति।**
**तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ गीता ९--२६**

" पान, फूल, फळ, पाणी इत्यादि जो कोणी माझा भक्त मला मोठ्या प्रेमानें अर्पण करितो, त्या शुद्धबुद्धि निष्काम प्रेमी भक्तानें अर्पिलेले ते ते जिन्नस मी सगुणरूपानें प्रकट होऊन अतिप्रीतीनें भक्षण करितों. "

असो. तर सर्वांनीं परमप्रेमानें आणि अतिशय उत्कंठेनें भगवंताच्या दर्शनासाठीं व्याकुळ व्हावें हेंच कल्याणकारक आहे.

---

## डॉ. कुर्तकोटींचें नाटक !

१ ' करवीरपीठाधिष्ठित श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्य ( डॉ. कुर्तकोटी पी. एच्. डी. ) यांच्यासारख्या अधिकारी श्रेष्ठांनीं केवळ स्वमतप्रसारार्थ लिहिलेल्या ' **गंगासंमति** ' नामक नाटकाची एक छापील प्रत येथील एका गृहस्थानें आम्हांस परवा दाखविली व त्याच्या प्रस्तावनेंत आपल्याविषयीं कांहीं मजकूर लिहिला आहे म्हणून सांगितलें व तो त्यानें वाचूनही दाखविला. तो मजकूर असा : " नाटकाची मुद्रणालयासाठीं एक प्रत लिहिण्याचें काम चालू असतांना एके दिवशीं ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, ह. भ. प. केशवदत्तबुवा सोनगिरीकर व वे. शा. सं. नरहरशास्त्री खरशीकर या उभयतासमवेत सहज श्रींच्या दर्शनासाठीं आलें होतें. पांगारकर बुवांना श्रींनीं नाटक लिहिणें अगदीं मान्य झालें नाहीं, इतकेंच नव्हे तर लिहिलेले कागद **'नदींत बुडवितो'** या असेंही ते म्हणाले. **श्रींनीं द्या म्हणून संतापानें त्यांचे पुढें कागद ठेवून** नाटकावर इतकी निर्दयता कां असें विचारिलें. ' **नाटक हें सज्जनांचें काम**' नव्हे या पांगारकरबुवांच्या आक्षेपाला श्रींनीं संक्षेपानें नाट्यशास्त्राचा इतिहास सांगून त्याची उपयुक्तता दाख-

विली आणि अलीकडच्या सामान्य लेखकांमुळें त्याला आलेलें विकृत स्वरूप घालविणें हें पवित्र कार्य आहे हें सांगतांना श्रींनीं पांगारकरबुवांना आवडणाऱ्या भक्तिमार्गांत देखील रामलीलेसारख्या गोष्टी आहेत हें दाखविलें, श्रींचें सांगणें पांगारकरबुवांना पटलें असो वा नसो, पण पांगारकरबुवांच्या, हें नाटक **नदींत बुडविलें पाहिजे** या म्हणण्यास, श्रींनीं आपली सिद्धता दाखविल्याप्रमाणें **हें नाटक तामसिकपणें नदींत बुडविण्यापेक्षां सात्विक भावानें गंगादेवीला अर्पण** करण्याचें ठरविलें."

२ ह्यांत दोन गोष्टी अगदीं **साफ खोट्या** आहेत! डॉ. कुर्तकोटींनीं वरील भेटीच्या प्रसंगीं आपण होऊन आपल्या नाटकाचा एक प्रवेश वाचून दाखविला, तेव्हां अधिक ऐकायची इच्छा नसल्यामुळें रा. पांगारकर म्हणाले. "शंकराचार्यांच्या गादीवरील कोणीही पुरुषानें आजवर नाटक लिहिलें नाहीं! आपली विद्वत्ता व बुद्धिमत्ता या विषयीं माझा अत्यंत आदर असल्यामुळें माझी अशी विनंति कीं आपण स्टेजवर नाटक आणून नाटककारांच्या पंक्तींत बसावें हें बरें दिसणार नाहीं. नाटकाचा विषय तरी काय? जगन्नाथ पंडित ब्राम्हण व लवंगी मुसलमान कन्या यांचें प्रेम! हें आधीं धर्मविरुद्ध आहे. दुसरें प्रेमावर नाटकें लिहिणारे दुसरे लोक आहेत. आपली विद्वत्ता व पीठाची योग्यता याला लौकिक प्रेमविषयक नाटक लिहून प्रसिद्ध करणें ही गोष्ट कमीपणा आणणारी आहे. आपण परवानगी द्याल तर हें नाटक घरीं जातां जातां मी गंगेला अर्पण करितों, म्हणजे तें जगाला दिसणार नाहीं, सांप्रत वाटेल त्या जातीचा पुरुष व हव्या त्या जातीची स्त्री यांच्या प्रेमाच्या गोष्टी लिहून समाजबंधनें ढिलीं करणारे, समाजाचा विध्वंस करणारे, बरेच नाटककार व कथालेखक निपजत आहेत, आपली योग्यता त्याहून फार मोठी असल्यामुळें आपण गीतेवर विस्तृत भाष्य लिहावें अगर स्वमतप्रसारक प्रबंध लिहावेत पण नाटक ही गोष्ट आपल्याला कमीपणा आणील व प्रस्तुत नाटक तर समाजाला हानिकारकच होईल म्हणून हें नाटक मजजवळ द्या मी गंगेंत बुडवितों!" ह्यावर 'श्रींनीं घ्या म्हणून संतोषानें त्यांजपुढें कागद ठेवले' असें लिहिलें आहे हें अगदीं खोटें आहे. श्रींचा गौरव वाढविण्यासाठीं हे शब्द श्रींच्या तोंडांत. प्रस्तावनेंत घातले आहेत पण ते श्रींच्या प्रत्यक्ष तोंडांतून आलेच नाहींत! दुसरें खोटें विधान '**नाटक हें' सज्जनांचें काम नव्हे**'—— असें रा. पांगारकर बोलल्याचें प्रस्तावनेंत लिहिलें आहे तें अत्यंत खोडसाळपणाचें आहे. पांगारकर असें बोललेच नाहींत. शंकरा

चार्यांच्या गादीवरील पुरुषानें व डॉ. कुर्तकोटीसारख्या विद्वान् धर्मगुरूनें नाटक लिहिणें अप्रशस्त आहे असें त्यांना प्रामाणिकपणानें वाटतें, पण असें ह्मटलें म्हणजे नाटक कोणीही लिहूं नये व लिहिणारे सज्जन नव्हत असा त्याचा अर्थ होत नाहीं. शेक्सपीअर, कालिदास किंवा अण्णा किर्लोस्कर यांच्या सारख्यांचीं नाटकें रा. पांगारकरांनीं पूर्ववयांत वाचलीं आहेत व त्याविषयीं त्यांचा आदरही आहे. नाट्यकलेबद्दल श्रींनीं कांहीं गोष्टी 'दाखवून दिल्याचें' लिहिलें आहे पण त्या सामान्य वाचकांसही कांहीं नवीन नाहींत. संस्कृतमध्यें 'यतीनें' एकच नाटक लिहिलें आहे आणि तें प्रबोधचंद्रोदय हें होय. हें नाटक आध्यात्मिक असून उच्च कोटींचें आहे त्याची प्रौढी कोणीकडे आणि पहिल्याच अंकांत भटाभिक्षु-कांची व पुढील एका अंकांत काशीच्या शास्त्रीमंडळाची कुचेष्टा करणारें कुर्तको-टींचें थिल्लर विचारांनीं भरलेलें हें नाटक कोणीकडे! डॉ. कुर्तकोटींचा काशीच्या शास्त्र्यांवर जो राग आहे तो प्रस्तुत नाटकांत प्रगट झाला आहे. शास्त्र्यांचीं उपहासात्मक नांवें जीं दिलीं आहेत त्यांत 'लक्ष्मण' 'अनंत' 'राज' ह्या नावानें कोण बोधित होतात हें वर्तमानपत्रांच्या वाचकांस सांगावयास नको. लक्ष्मणशास्त्री, अनंतशास्त्री, राजराजेश्वर शास्त्री यांचीं विद्वत्तापूर्ण व धर्मबुद्धीनें भरलेलीं भारदस्त व्याख्यानें आह्मीं ऐकलीं आहेत. त्यांच्या धर्मकार्याविषयीं आदर असलेल्या हजारों लोकांना ह्या नाटककाराच्या गुपित हल्यानें वाईट वाट-ल्याशिवाय राहणार नाहीं. जगन्नाथपंडितांना महाराष्ट्रीय ब्राह्मण कोणत्या आधा-रावर बनविलें आहे कोण जाणे! त्यांच्या विषयीं दंतकथा म्ह. बाजारगप्पा यांनाच शास्त्र समजून नाटकाची जी उभारणी केली आहे ती अगदीं अनैति-हासिक आहे; सर्व नाटक वाळूच्या पायावर उभें केलें आहे. नाटकांतील पद्यें गचाळ आहेत, गद्य अगदीं सामान्य प्रतीचें आहे. कुर्तकोटींच्या अलौकिक बुद्धीचा प्रभाव नाटकांत कोठेंच दिसत नाहीं. कुर्तकोटींचें आवडतें 'हिंदूकरण,' हें नाटकाचें सूत्र आहे. उच्छृंखल तरुणांना हें मोठें शास्त्र सांपडून प्रेमाच्या मोठ्या नांवाखालीं 'जातपात मोडक' तरुणतरुणींच्या उच्छृंखल प्रेमाला यानें ऊत येणार आहे! हें 'हिंदूकरणाचें उदार तत्व' शिवाजी महाराजांना सांग-णारे कोणी कुर्तकोटी भेटले नाहींत हें हिंदुधर्माचें व हिंदुसमाजाचें सुदैव होय! स्वामी कुर्तकोटी यांची प्रस्तुत लेखाबद्दल क्षमा मागून हा अप्रिय विषय पुरा करितों.

# नवयुगधर्म–माला.

पनवेलचे रा. रा. सदाशिव कृष्ण फडके, वकील, यांची आमच्या वाचकांस माहिती आहेच. ‘ नवयुगधर्ममालेचा पहिला खंड ’ त्यांनीं या पूर्वीच प्रसिद्ध केला आहे व तो विद्वन्मान्य झाला आहे. गेल्या शेंसव्वाशें वर्षांतील हिंदुस्थानांतील धार्मिक चळवळींचा सांगोपांग इतिहास लिहिण्याचें महत्कार्य त्यानीं अंगावर घेतलें असून त्यासाठीं त्यांनीं वकीलीही सोडल्यासारखें केलें आहे. त्यांचा विद्याव्यासंग जबरा असून ते पूर्ण सनातनधर्मी आहेत. ते गुरुपुत्र असून त्यांची हिंदुधर्म व हिंदुसमाज यांच्या घटनेविषयींची बुद्धि सोज्ज्वळ आहे. गेल्या शतकांत हिंदुस्थानच्या इतिहासांत आर्यसमाज, ब्राम्हसमाज प्रार्थनासमाज, थिऑसफी इ. ज्या नवीन चळवळी झाल्या त्यांचा त्यांनीं सांगोपांग अभ्यास केला असून सनातनधर्माच्या दृष्टीनें या चळवळींचें कार्य काय झालें आहे, त्यांत उणीवा कोणत्या आहेत, त्या चळवळींच्या पुरस्कर्त्यांच्या चरित्रांवरून काय निष्कर्ष निघतो, सनातनधर्मी असे कोणकोणते संत महंत या काळांत झाले, त्यांनीं काय कार्य केलें आहे इ. अनेक गोष्टींचा सविस्तर साधार इतिहास तयार करण्याचे कामावर श्रीनारायणानें त्यांची योजना केली आहे व ते ह्या कामास सर्वतोपरी योग्य आहेत. समाजानें मात्र त्यांस सर्व प्रकारचें साह्य केलें पाहिजे. त्यांनीं पत्करलेली कामगिरी अत्यंत महत्वाची असून त्यांस सर्व लोकांनीं मदत केली पाहिजे. त्यांनी ‘ नवयुगधर्म-मालेचा एक योजना तयार केली असून बारा कुसुमांचा गुच्छ ते वर्ष दीड वर्षाच्या मुदतींत पुरा करणार आहेत. एकंदर पृष्ठें १३०० होणार असून त्यांची आगाऊ वर्गणी रु. ६ ठेवली आहे. ‘सूर्य, विष्णू, शंकर, गणपती, देवी, दत्त, राम, कृष्ण, मारुति इ० देवतांच्या आधुनिक काळाला योग्य अशा बारा उद्बोधक उपासना ’ पहिल्या गुच्छांत येणार आहेत. दुसरा गुच्छ ‘ सत्य अहिंसाधर्म ’ यांत विशेषेंकरून महात्मा गांधींचे धर्मविषयक विचार इतरांशीं तुलना करून लिहिलेले पाहण्यास मिळतील. ४ थ्या गुच्छांत आर्यसमाजाचा इतिहास येणार असून ५ व्यांत ‘ आर्यमतसमीक्षा, वेदविचार, प्रामाण्यविचार, तत्त्वज्ञान, ईश्वरविचार अवतारवाद, गुरुवाद, मूर्तिपूजा, जातिभेद इ. विषयांसंबंधीं आर्यमतांचें मुद्देसूद

परीक्षण ' येईल. ह्या नवयुगधर्ममालेची लोकांस कल्पना यावी ह्यासाठीं रा. फडके यांनीं मालेचा ' नमुना अंक ' प्रसिद्ध केला आहे. ( त्याची किंमत एक रुपया आहे.) तोही विविधत्वानें उद्बोधक आहे. आमच्या वाचकांनीं तो अंक तर घ्यावाच, पण ' नवयुगधर्ममालेचे' सहा रुपये भरून अवश्य वर्गणीदार व्हावें व एका अत्यवश्य व मोठ्या पुण्यकृत्यास साह्य करावें अशी आमची त्यांस आग्रहाची व प्रेमाची विनंति आहे.

## नाथांचे उद्गार.

( १ ) जैसा अससी तैसियासी । नमन साकार निराकारासी ।
तंव अंगत्व मुकलें अंगासी । भज्य भजकासी अद्वैत ॥
( २ ) सत्संगाचे निजमेळीं । परमार्थ जाय पाल्हाळीं ।
लगडोनि ये स्वानंद फळीं । सर्वकाळीं सफाळित ॥
( ३ ) जनार्दनां पाढियें एकपण । एकां पढियें जनार्दन ।
स्वरूप एक नामें भिन्न । अनन्यशरण या नांव ॥
( ४-५ ) मुक्ता ब्रह्मरूप मींतूंपण । शत्रु मित्र ब्रम्ह पूर्ण ।
ब्रम्हरूप त्रिभुवन । भूतें सनातन ब्रह्मरूप ॥
ऐसिया ब्रह्मस्थिती । मुक्त संसारीं वर्तती ।
जिण्या मरण्याची भ्रांती । नाहीं त्या चित्तीं ब्रम्हरूपत्वें ॥
( ६ ) मी ज्ञाता तो अज्ञान । ऐसें जेथें स्फुरे स्फुरण ।
तेथोनि पळे ब्रम्हज्ञान । ज्ञानाभिमान उरें देहीं ॥
( ७-९ ) गुरुवाक्यें वीण जें ज्ञान । तें क्षयरोगी जन्मलें जाण ।
विकल्पमातें सांडी प्राण । अतिक्षीण अपायी ॥
जें जें देखों जाय दिठी । तें तें आत्मत्वेंचि उठी ।
बाप गुरुवाक्याची कसवटी । दृश्याचिये पोटीं परब्रम्ह नांदे ॥
गुरु आज्ञेचा चमत्कार । श्रवणीं पडतांचि अक्षर ।
सुखरूप जाला संसार । चराच ब्रम्हमय ॥
( १० ) स्नेंह सूतें दीप भिन्न । प्रभा एकत्वें अभिन्न ।
तेवीं ज्ञात्यांचें विचित्र कर्म चिन्ह । परी ज्ञेय ज्ञान एकचि ॥
( ११ ) देह देखतां दोष कोटी । आत्मत्वें पाहतां निर्दोष सृष्टी ।
यालागीं देहीं न ठेवावी दृष्टी । दोषांची कोटी देहात्मता ॥

# पांगारकरांची पुस्तकें

१. भक्तिमार्गप्रदीपः—( आवृत्ति चौदावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ८८ व्ही. पी. नें ८१२.

२. संतचरित्रमाळा:—यांत कांहीं प्राचीन व कांही अर्वाचीन अशा ४२ संतांचीं चरित्रे सप्रमाण दिली असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ. सं. २५६ किं. रु. १८८.

३. श्रीएकनाथचरित्र:—श्रीएकनाथमहाराजांच्या चरित्राची ही चौथी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांही उतारे नवीन घातले आहेत. किं. ८१२

४ कविरामायण:—संस्कृत व प्राकृत रामायणे व शेकडो स्फुट प्रकरणे यांतून उत्कृष्ट वेचे संगतवार दिले असून हे स्वतंत्र रामायण तयार केले आहे किं. ८४

५. आनंदलहरी:—( कवितासंग्रह ) ह्यांत पांगारकरांच्या कवितांपैकी ४ स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें, महाराष्ट्र संत व सद्ग्रंथ, ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ८१२

६ नारदभक्तिसूत्रें:—( आवृत्ति ४ थी ) हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहुन भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ८८

७ नवविधा भक्ति:—(क्षूधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी) यांत नवविधा-भक्तिचे नव प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे किं. ८६

८ निरंजनमाधवांची कविता:— भाग १ किं. रु भाग २ व ३ एकत्र किं. १॥ रु. तीनही भाग एकदम घेणारास रु० २८४

९. श्रीज्ञानेश्वरचरित्र :—( आवृत्ति दुसरी ) चरित्र' उतारे व विवरण यांमुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. १८८

१०. भक्तिमार्गमाला :—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक—संदर्भ व विवरण यांसह —दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं १८८

११. सार्थ हरिपाठ व चांगदेव पांसष्टी:—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध पुढारी कै. विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ८५

१२–१३–१४ मुमुक्षूंतील निवडक निबंध :—भाग १ व २. किं. प्रत्यकी १८८ भाग ३ रा किं. १८४ तिन्हीं भाग एकदम रु. ३॥

१५ मोरोपंती-वचे :— ( दुसरी आवृत्ती ) पंतांच्या अगाध कवितासमुद्रातील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेचे एका ग्रथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचे संक्षिप्त चरित्रहि नवीन दिलेले आहे. किं. १८१२

## पांगारकरांचीं पुस्तकें

१६ पारिजातकाचीं फुलें (तिसरी आवृत्ति) :—परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारेसूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ८

१७ श्रीतुकारामचरित्रः—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. किं. रु. २.

१८ श्रीतुकारामचरितामृतः—तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं. ६५

१९ निबंधमालेचें स्वरूप आणि कार्यः—निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख–विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. १०

२० मुक्तेश्वरः—( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १

२१ मारुतिउपासना ( चौथी आवृत्ति ) :—किं. ४.

२२ सार्थ श्रीदासबोधः—किं. रु. ४. व्ही पी. नें ४।१०

२३ सार्थ मनोबोधः—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. १२.

२४ समर्थसंजीवनी ऊर्फ रामदासी वेंचेः—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विध प्रकरणें ह्या चार भागांत समर्थांच्या कवितेतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभी सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.

२५ मोरोपंत (चरित्रआणि काव्यविवेचन):—किं. रु. २८.

२६ श्रीएकनाथी भागवत( निर्णयसागर प्रेसचे आवृत्ति तिसरी ):–किं. रु. ६

२७ श्रीसमर्थग्रंथभांडारः—समर्थांची एकंदर कविता एकत्र सटीप छापलेली आहे. किं. ४८.

२८ समर्थग्रंथभांडार ( भाग २ रा ):—यांत दासबोधाशिवाय बाकीची समर्थांची सर्व कविता, प्रकरणें पाडून, व्यवस्थित दिली आहे. किं. रु. २८

२९ ज्ञानेश्वरांची प्रभावळः—ज्ञानेश्वरमहाराज व त्यांच समकालीन नामदेवराव जनाबाई, चोखामेळा, इत्यादि सर्व जातीयें २५ संत यांच्या ग्रंथांतील निवडक वेचे प्रस्तुत ग्रंथांत घेतले आहेत. यांत ज्ञानेश्वरांच्या २५०० ओंव्या व सर्व संतांचे मिळून ४०० अभंग आहेत. सुंदर प्रस्तावना आहे. टीपा भरपूर आहेत. किं. रु. २

पत्ता:—व्यवस्थापक " मुमुक्षु " नाशिक शहर.